# सांस्कृतिक महाराष्ट्र

## १९६० ते २०१०

भाग-२

संपादक
मधु मंगेश कर्णिक

महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# सांस्कृतिक महाराष्ट्र
# १९६० ते २०१०

भाग
२

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती : २०११

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
मुंबई ४०० ००४.

किंमत : रु. २५२/-

(या पुस्तकात व्यक्त केलेली मते त्या त्या लेखकाची असून त्या मतांशी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.)

# अनुक्रमणिका

# सांस्कृतिक महाराष्ट्र १९६० ते २०१०

**भाग २**

## अनुक्रमणिका

**१. जलसंस्कृती-जलव्यवस्थापन :**
महाराष्ट्राची जलसंस्कृती.................................................... डॉ. माधवराव चितळे...............६
**२. पर्यावरण :**
पर्यावरण संस्कृती आणि महाराष्ट्र ...................... अतुल देऊळगावकर ..... ६०
**३. तत्त्व-न्याय :**
महाराष्ट्रातील तत्त्वविचार ....................................................डॉ. अशोक चौसाळकर ..........७४
महाराष्ट्राची न्यायसंस्कृती ....................................................न्या. नरेंद्र चपळगावकर १०६
**४. शिक्षण :**
महाराष्ट्रातील शालेय शिक्षण ..................................................हेरंब कुलकर्णी १२५
महाराष्ट्रातील उच्चशिक्षण : एक दृष्टिक्षेप ..................................डॉ. भालचंद्र मुणगेकर १६८
**५. इतिहास :**
शासनाची इतिहास साधनसंपदा-गॅझेटिअर्स; काल आणि आज ...........डॉ. के.के. चौधरी...............१७८
**६. श्रमसंस्कृती :**
कामगार चळवळ, श्रमसंस्कृती आणि समाजपरिवर्तन ........................भानू काळे ........................२०९
**७. जीवन :**
महाराष्ट्राची आहारगाथा ......................................................श्रीमती मोहसिना मुकादम ....२४०
महाराष्ट्राची वस्त्रसंस्कृती भाग-१ .........................................डॉ. सुरेश महाजन ............२५१
महाराष्ट्राची वस्त्रसंस्कृती भाग २ ..........................................डॉ. वर्षा जोशी ................२६३
महाराष्ट्राची पर्यटन संस्कृती ................................................समीर कर्वे ......................२७४
क्रीडाक्षेत्र ...........................................................................संदीप चव्हाम ..................२९९
महाराष्ट्राबाहेरील मराठी जगत ..............................................निशिकांत मिरजकर ..........३१८
बदलती जीवनशैली ..........................................................मधु मंगेश कर्णिक ............३३५
परिशिष्ट.......................................................................................................३४२
महाराष्ट्राचे -सुवर्णपान॰-साहित्य आणि संस्कृती मंडळ.......................................................३४३
महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळ आणि शासनाचा सहभाग..................................................३४७
मराठी विश्वकोश.............................................................................................३५४
दर्शनिका विभाग-अचूक संदर्भाचा खजिना...........................................................................३६०
पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई .............................................................. ३६८
राज्य मराठी विकास संस्था ..............................................................................३७१

# जलसंस्कृती - जलव्यवस्थापन

जलसंस्कृती - जलव्यवस्थापन
जलसंस्कृती - जलव्यवस्थापन
जलसंस्कृती - जलव्यवस्थापन
जलसंस्कृती - जलव्यवस्थापन
जलसंस्कृती - जलव्यवस्थापन
जलसंस्कृती - जलव्यवस्थापन
जलसंस्कृती - जलव्यवस्थापन

# महाराष्ट्राची जलसंस्कृती



**डॉ. माधव आ. चितळे**

स्वीडनने पाण्याचे नोबेल पारितोषिक म्हणून गौरविलेल्या 'स्टॉकहोम पुरस्काराने' १९९३ मध्ये सन्मानित केलेले माधव चितळे हे आंतरराष्ट्रीय पातळीवरील जलतज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म ८ ऑगस्ट, १९३४ रोजी झाला. स्थापत्य अभियंता म्हणून त्यांनी १९५६ ते १९९२ पर्यंत शासकीय नोकरी केली. त्या काळात केंद्र शासनाच्या जलसंसाधन मंत्रालयाचे सचिव तसेच भारत सरकारच्या केंद्रीय जल आयोगाचे अध्यक्ष म्हणून काम केले. ज्याचे सभासद ८४ देश आहेत, त्या आंतरराष्ट्रीय सिंचन आयोगाचे पहिले पूर्णकालिक सरकार्यवाह म्हणून ५ वर्षे कार्यरत असताना जगभर भ्रमण. जागतिक जलसहभागिता मंचाचे दक्षिण आशियाचे अध्यक्ष. सिंचन सहयोग, भारतीय जलसंस्कृती मंडळ, सरोवर संवर्धिनी यासारख्या स्वयंसेवी संघटनांच्या कामात व्यस्त.

---

पत्ता : बी-१, वेदान्त गृहकुल, सावरकर चौक, नवे श्रेयनगर, औरंगाबाद ४३१ ००५.
दूरध्वनी : ०२४०-२३३८९३९, भ्रमणध्वनी : ९८२३१६१९०९

---

**भा**रताच्या विकासाच्या सध्याच्या गतिमान अवस्थेत अग्रेसर असलेल्या प्रांतांमध्ये महाराष्ट्र आहे. स्वातंत्र्य मिळवल्यानंतर भारताने पाण्यासारख्या आवर्ती नैसर्गिक संसाधनांच्या आधारावर आपल्या विकासाची नवीन जुळवाजुळव सुरू केल्यापासून व भारताचे एक घटक राज्य म्हणून महाराष्ट्राची स्थापना झाल्यापासून विशेषतः गेल्या पाच दशकांमध्ये देशांतर्गत व जागतिक पातळीवर अनेक बदल घडून आले आहेत. महाराष्ट्रातील लोकसंख्या तिपटीने वाढली आहे. पण तरीही याच काळात महाराष्ट्राचे जीवनमान आठपटीहून अधिक उंचावले आहे. निसर्गचक्रात उपलब्ध असणारे सरासरी पाणी मात्र तेवढेच आहे. त्यामुळे समाजाचे पाण्याशी असलेले नाते खूप बदलले आहे. म्हणून पाण्याच्या संदर्भातील व्यवहारांची नवी हितकारक व्यवस्था उदयास आणणे व तद्नुकुल अशा व्यक्तिगत व सामाजिक मनोधारणा प्रोत्साहित करणे आता आवश्यक झाले आहे.

अनुक्रमणिका

## १·० जलसंस्कृतीची ऐतिहासिक परंपरा

१·१ भारताच्या गौरवास्पद प्रदीर्घ परंपरेमध्ये पाण्याला मानाचे स्थान सदैव देण्यात आलेले आहे. भारतीय विचारवंतांचा पाण्याबद्दलचा उदात्त दृष्टिकोन "इमा आपः शिवतमा. ……, इमा राष्ट्रस्य वर्धनीः, इमा सर्वस्य भेषजी", अशा अनेक वैदिक मंत्रांमधून व्यक्त झालेला आहे. असे अनेक मंत्र भारतीय उत्सव, समारंभ, धार्मिक कार्ये यांचे अंग बनून राहिले आहेत. इतिहासपूर्वकाळापासून या उदात्त तत्त्वांच्या आधारे होणाऱ्या सिंचनाची व जलव्यवस्थापनाची प्रदीर्घ परंपरा महाराष्ट्रालासुद्धा लाभली आहे. तापी खोऱ्यातील पांझरा, गिरण्या, मोसम या नद्यांवरील बंधाऱ्यांवरची फडपद्धती, वैनगंगा खोऱ्यातील गोंडकालीन हजारो सिंचन तलाव किंवा मराठवाड्याच्या पूर्वेकडचे बिलोली तालुक्यातील शेकडो गावतलाव व महाराष्ट्रभर सर्वत्र विखुरलेल्या सामुदायिक पाणीवापराच्या बारवा (विहिरी) आजही अस्तित्वात व वापरात असून ऐतिहासिक काळातील उन्नत जलविकासाची साक्ष देतात. स्थानिक हवामान व जमीनविषयक तपशील यांना अनुसरून जलव्यवस्थापनात ज्या भौतिक रचना व सामाजिक तत्त्वे अंगिकारली गेली होती, त्यांचे तपशील या पारंपरिक विकास व्यवस्थांमधून मिळतात. भारताला 'तलावांचा देश' असेच म्हटले जाई. महाराष्ट्रातील हजारो मनुष्यनिर्मित तलाव, बंधारे, कालवे, पाणवठे, घाट यांची माहिती ब्रिटिशांनी १९ व्या शतकात प्रकाशित केलेल्या त्यावेळच्या जिल्हानिहाय परिचय पुस्तकांमधून संकलित स्वरुपात (दर्शनिकांमधून) मिळते.

१·२ पुरेशा संशोधनाच्या आणि माहितीच्या तपशीलवार संकलनाच्या अभावी त्या काळातील रचनांची अभियांत्रिकी वैशिष्ट्ये, पीकरचनेचे नियम, महसूल वसुलीची पद्धत व व्यवस्थापकीय संघटना या बाबतचे सर्व बारकावे अजून पूर्णपणे एकत्रित स्वरुपात उपलब्ध झालेले नाहीत. परंतु जी माहिती हाती आहे, त्यातूनही खूप शिकण्यासारखे आहे. भारतीय जलसंस्कृती मंडळ (स्थापना इ. स. २०००) या दिशेने व्हावयाच्या माहितीच्या संकलनात व विश्लेषणात प्रयत्नशील आहे. या मंडळाच्या उपाध्यक्षांनी लिहिलेल्या व मंडळाने पुरस्कृत केलेल्या 'भारतीय जलसंस्कृती स्वरूप आणि व्याप्ती' (जुलै २००६) या पुस्तकात या विषयाचा भारतीय पट उलगडून दाखवतांना महाराष्ट्रातील अनेक दाखले समाविष्ट झालेले आहेत. पण महाराष्ट्राचे याबाबतीतील व्यापक दर्शन घडवणारे पुस्तक स्वतंत्रपणे जितके लवकर प्रकाशित होईल, तितके ते महाराष्ट्राच्या भविष्यातील मार्गक्रमणेसाठी वेळीच उपयुक्त ठरेल.

१·३ धुळे व नाशिक जिल्ह्यातील पांझरा, बुराई, गिरणा, मोसम, केळझर, हरणबारी, या नद्यांवर बंधारे बांधून त्याचे पाणी नदीकाठच्या जमिनीवर वळवून त्या कालव्यांवर सामुदायिक सिंचन व्यवस्थेची फडपद्धत प्रदीर्घ काळापासून राबवण्यात आलेली आहे. सह्याद्रीच्या पूर्वेकडील पायथ्यातून उगम पावलेल्या या नद्या पाझरणाऱ्या खडकांमधून वाहत असल्यामुळे जवळ जवळ बाराही महिने प्रवाही राहत असत. या अनुकूल परिस्थितीचा उपयोग करून या नद्यांच्या परिसरातील शेती प्राचीन काळापासून विकसित करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या काठचे भूप्रदेश समृद्धीची आगरे होती व काही प्रमाणात अजूनही ते तसे आहेत.

१·४ विदर्भात वैनगंगेच्या पूर्वेकडील उपखोऱ्यातील तलावांची शृंखला गोंड राजांच्या कालावधीत निर्माण झाली होती चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा गोंदिया व नागपूर या जिल्ह्यांत ३००-३५० वर्षांपूर्वी जवळ जवळ १० हजार तलाव कोहळी समाजाच्या कुशल लोकांनी संपूर्णतः खाजगी उपक्रमातून म्हणजेच स्वतःचा पैसा व श्रम वापरून बांधले होते. या तलावांच्या निम्नस्रोत अंगाकडील भूक्षेत्रांमध्ये स्थायी

पाणीपुरवठ्यासाठी बावड्या (विहिरी) पण बांधल्या होत्या. त्यांतील ६८६९ तलाव अजूनही सिंचनासाठी उपयोगात येतात व त्यांतून १·३२ लक्ष हेक्टर शेतीक्षेत्राला आधार मिळतो आहे. जलविकासातील व सिंचन व्यवस्थापनातील इतिहासकालीन लोकप्रवणतेचे व स्थायी लोकसहभागाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे हे तलाव आहेत. वेगवेगळ्या नदी-नाल्यांवर अशा तलावांच्या शृंखला आहेत. त्यांची उभारणी शृंखला पद्धतीतील जलव्यवस्थापनाला अनुकूल अशीच करण्यात आली आहे. पाणीवाटपासाठी लाभधारकांची एक समिती असे. ही समिती तलावातील पाण्याची उपलब्धता पाहून प्रत्येकाला किती पाणी द्यावयाचे हे ठरवित असे. महाराष्ट्राच्या या भागातील भंडारा जिल्हा हा तर 'तलावांचा जिल्हा' आणि 'अन्नधान्याचे भांडार' म्हणूनच ओळखला जात होता. अशाच प्रकारच्या तलावांचे जाळे पूर्व मराठवाड्यातही (तालुका बिलोली जिल्हा, नांदेड) अस्तित्वात होते. तेथेही आजसुद्धा १०० च्या वर जुने लघुतलाव कार्यान्वित आहेत.

१·५ भारतीय परंपरेनुसार जलस्रोतांचा विकास करणे, बंधारे बांधणे, तलाव, विहिरी, घाट यांची निर्मिती करणे, आणि त्यांची निगराणी राखणे व त्यांचे व्यवस्थापन करणे हे अत्यंत पवित्र असे पुण्यदायी काम मानले जाई. असे काम करणाऱ्यांना स्वर्गप्राप्ती होते अशी श्रद्धा होती. परिणामतः राजापासून ते स्थानिक पुढारी, व्यापारी, उद्योगधंदा करणारे अथवा समाजसेवी कामे करणारे साधु, संत यांच्यापर्यंत समाजातील विविध प्रकारच्या लहानथोर लोकांमध्ये पाणीपुरवठ्याच्याबाबत काही ना काही लोकाभिमुख काम करण्याची एक प्रकारे चढाओढ लागलेली असे. त्याचे पुरावे आजही महाराष्ट्रभर सर्वत्र पाहायला मिळतात. भंडारा जिल्ह्यातील गोंडकालीन सर्वात मोठा नवेगाव बांध (उंची २७ मी.) त्यावेळी ज्या 'कोलू पाटील' यांच्या पुढाकारातून बांधला गेला, त्यांना लोकांनी देवत्व दिले. त्यांच्या समाधिस्थानी त्यांचे मंदिर बांधले गेले आहे. तेथे वार्षिक यात्राही भरते. लोकमानसांतील जलविकासाबद्दलचा सामाजिक गौरव हा अशा प्रकारचे होते.

१·६ देवगिरीच्या परिसरांतील नागरी, शेतीविषयक, मनोरंजनात्मक अशा सर्व गरजांसाठी समन्वित पद्धतीने निर्माण केलेली प्रगल्भ स्वरूपातील व्यवस्था हाही असाच एक मोठा मानबिंदू होता. श्री. तुळजाभवानीच्या परिसरात भूजल संवर्धनासाठी निर्माण केलेल्या तलावांच्या साखळीतून होणारा बारमाही पाणीपुरवठा हा तत्कालीन वैज्ञानिक प्रगल्भतेचा व व्यवस्थापन कुशलतेचा नमुना आहे.

१·७ महाराष्ट्राच्या प्राचीन व ऐतिहासिक प्रदीर्घ अनुभवांचे सिंहावलोकन केले तर असे दिसते की, त्या रचनांमध्ये स्थानिक हवामानाप्रमाणे निसर्गानुकूल अशी विविधता होती. ठरावीक साचेबंदपणा नव्हता. पाणीवितरणाच्या पद्धतीसुद्धा वेगवेगळ्या प्रकारच्या स्थानिक लाभदायी पिकांच्या गरजांना अनुसरून होत्या. सर्वांमध्ये समान असलेली गोष्ट इतकीच की, स्थानिक राजांकडून सिंचनाच्या व पाणी पुरवठ्यांच्या विकासाला प्रोत्साहन व साहाय्य दिले गेले, तरी पाणीव्यवस्थेच्या दैनंदिन व्यवहारात मात्र राजकीय प्रशासनाची मुळीच ढवळाढवळ नव्हती. सर्व पाणीपुरवठा रचनांची देखभाल व व्यवस्थापन हे पूर्णतः लोकांच्या हाती होते. याबाबतींत पूर्णतः स्वायत्तता होती. स्वातंत्र्यानंतर भारताने विचारपूर्वक स्वीकारलेल्या गणतंत्रव्यवस्थेत आता असेच होणे अपेक्षित आहे.

१·८ भारतावर बाहेरून राजकीय यवनी आक्रमणे सुरू झाल्यानंतरच्या अलीकडच्या पाचसहा शतकांच्या धामधुमीच्या व राजकीय अस्थिरतेच्या काळात, नव्या नागरी पाणीपुरवठ्यांचे व सिंचन प्रणालीचे, काही थोडे अपवाद वगळता (उदा. अहमदनगरचे व औरंगाबादचे पाणी पुरवठ्याचे भूमिगत नळ

अनुक्रमणिका

व पुण्यातील कात्रज तलावातून होणारा नागरी पुरवठा) जलव्यवस्थांची नवी निर्मिती मोठ्या प्रमाणावर होऊ शकली नाही. पण समाजाच्या अधीन असलेल्या अगोदरच्या पारंपरिक व्यवस्था ह्या कालखंडातही बहुतांश निर्विघ्नपणे चालू राहिल्या. त्यानंतरच्या ब्रिटिश कालखंडात मात्र एतद्देशीयांच्या स्वयंपूर्ण अशा स्वायत्त सामूहिक व्यवस्थांना छेद देऊन त्या शासनावलंबी व शासननियंत्रित करण्याच्या तत्कालीन राजकीय धोरणांमुळे या पारंपरिक व्यवस्थांना गौणत्व देण्यात आले. त्यांच्या व्यवस्थापनात कालांतराने काहीसा विस्कळीतपणाही आला. गोंडकालीन तलावांच्या जलव्यवस्थापनाची स्वयंसिद्ध व्यवस्था मालगुजारांच्या अखत्यारीत वळती झाली. त्यामुळे स्थानिक समृद्धीचे जागरूक आधार असे त्या तलावांचे असलेले स्थान जाऊन राजकर्त्यांसाठी केवळ महसुली उत्पन्नाचे एक खात्रीशीर सोपे साधन एवढेच त्यांचे प्रशासनिक वित्तीय महत्त्व राहिले.

## २·० ब्रिटिश कालखंडातील उपलब्धी व उणिवा

२·१ महाराष्ट्र प्रदेशावर ब्रिटिशांनी आपली पकड बसवल्यानंतर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये वारंवार भीषण दुष्काळ पडल्यामुळे ब्रिटिश सरकारला नाइलाजाने 'शेतीला किमान संरक्षण' म्हणून नव्या पाटबंधारे योजनांचा विचार करावा लागला. महाराष्ट्रातील पहिले मोठे सिंचनाचे काम म्हणजे १८७० साली सुरू झालेला कृष्णेचा कालवा होय. खोडशी येथे एक बंधारा घालून कृष्णा नदीचे पाणी कालव्याद्वारे कृष्णेच्या पूर्वपरिसरात वापरात आणले गेले. अशाच प्रकारचे बंधारे व त्यापासूनचे कालवे त्यानंतर प्रवरा, गोदावरी, मुठा, गिरणा अशा नद्यांवरही हाती घेण्यात आले. ब्रिटिशांच्या काळातील सिंचनाचा विस्तार हा प्रारंभी केवळ कालव्यांच्या निर्मितीतून झाला. त्यामुळे ज्या प्रमाणात नदीत पाणी असेल त्या प्रमाणात त्याखाली भिजणाऱ्या जमिनीच्या क्षेत्रफळात वर्षावर्षात मोठा फेरफार होत असे. म्हणून केवळ नदीतील नैसर्गिक प्रवाहावर अवलंबून न राहता पावसाळ्यात जे पुराचे पाणी वाहून जाते, ते अडवून नदीवर धरणे बांधून त्या धरणांमागील जलाशयांमध्ये त्याचा भरपूर जलसंचय करून ठेवल्याशिवाय सिंचनाला स्थैर्य येणार नाही हे हळूहळू ब्रिटिश राज्यकर्त्यांना स्पष्ट झाले. अशा प्रकारे धरणामागे जलसंचय करून त्यावर आधारित कालव्यावरच्या सिंचनाची सुरुवात पुण्याजवळ मुठा नदीवर खडकवासला येथील धरणापासून काढलेल्या कालव्यांपासून झाली. त्यानंतर १८८५ साली भाटघर धरण पूर्ण होऊन नीरेच्या डाव्या बाजूचा कालवा सुरू झाला. तत्पूर्वी विहार (१८६०) पवई, तुळशी (१८७६) व तानसा (१८८३) हे धरणांचे प्रकल्प केवळ मुंबईसाठी पिण्याचे पाणी व औद्योगिक वापर याकरिता पूर्ण झाले होते. विज्ञानाचा आधुनिक आधार असलेल्या स्थापत्यशास्त्राचा उपयोग करून मोठाल्या धरणांच्या बांधणीचे नवे पर्व अशाप्रकारे महाराष्ट्रात सुरू झाले.

२·२ महाराष्ट्रातील व भारताच्या अन्य भागातील १८९९ च्या महाभयानक दुष्काळानंतर १९०१ मध्ये स्थापन झालेल्या भारत सरकारच्या सिंचन आयोगाने केलेल्या सूचनांना अनुसरून ब्रिटिश सरकारने, भारतात उपलब्ध असणाऱ्या विविध जलस्रोतांचा दुष्काळांवरील उपाय योजनांसाठी काळजीपूर्वक तपशीलवार अभ्यास करण्याचा विचार प्रथमच सुरू केला. ब्रिटिशांच्या अखत्यारीतील मुंबई प्रांताच्या दक्षिण पठारावरील अवर्षणप्रवण क्षेत्राला दिलासा देण्यासाठी सिंचन प्रकल्पांची निर्मिती करण्याकरिता मि. बील या तत्कालीन अधीक्षक अभियंता पदावरील इंग्रज अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली एक सर्वंकष पाहणीचे काम हाती घेण्यात आले. सह्याद्रीतून उगम पावणाऱ्या नद्यांवर (वारणा, कृष्णा, नीरा, मुठा, भीमा, मुळा, प्रवरा, गोदावरी, गिरणा इ.) पाण्याची साठवणी करण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या धरणांसाठी अनेक अनुकूल जागा बीलने शोधून काढून, त्यावर आधारित संभाव्य सिंचन प्रकल्पांकरता कालवे विस्तार

सुचवणारा अहवाल १९०५ साली शासनास सादर केला. बीलची क्षेत्रीय पाहणी व विश्लेषण चाकोरीबद्ध होते. मोठाली धरणे व कालवे एवढ्यापुरताच त्याचा विचार मर्यादित होता. नदीखोऱ्याच्या समन्वित विकासाची क्षेत्रीय व्यापकता त्यात नव्हती. परंतु त्या अहवालाच्या आधारावर पुढे भाटघर, भंडारादरासारखी मोठाली, उंच धरणे आणि त्यापासून पाणी मिळणारे कालवे यांची बांधकामे झाली. सन १९१६ मध्ये दारणा जलाशय पूर्णपणे तयार होऊन गोदावरीवरील कालवे काढण्यात आले. गिरणा नदीवर चणकापूर धरण बांधून १९१८ साली कालवे सुरू करण्यात आले. १९२० मध्ये भंडारदरा येथील जलाशयामुळे प्रवरा नदीवरील कालव्यांची रचना क्रमशः त्यानंतर कार्यवाहीत आली. त्यांतून पाण्याची शाश्वती लाभलेले मोठाले समृद्ध सलग प्रदेश नव्याने उदयास आले. त्यातूनच पुढे ग्रामीण जीवनातील सामाजिक व राजकीय प्रभावाचे गट व नेतृत्व उभे राहिले. विदर्भातही रामटेक, घोडाझरी, असोलामेंढा आणि नालेश्वर येथील तलावांपासून अनुक्रमे सन १९०९, १९१०, १९११ आणि १९१९ साली सिंचनास सुरुवात झाली. मराठवाडा मात्र निजामाच्या अधिपत्याखाली असल्याने तेथे त्या काळात 'जैसे थे' चे धोरण असल्याने जलविकास प्रकल्पांचा प्रारंभ होऊ शकला नाही. तेथपासून मराठवाड्याच्या विकासाच्या अनुशेषाची सुरुवात झाली.

२·३ १९१८ मध्ये पहिले जागतिक महायुद्ध सुरू झाले. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळपण त्याकाळात जोमाने सुरू झाली होती. त्याचा परिणाम म्हणून भारतातील विकासात्मक योजनांमधील ब्रिटिश सरकारचे स्वारस्य संपले. त्यांनी जलसंपदेचा उपयोग करणाऱ्या योजनांची आखणी व उभारणी करण्याचे काम बंदच करत आणले. १९२० च्या आणि नंतरच्या १९३५ च्या कायद्यांन्वये जलसिंचन आणि पाणीपुरवठा हे विषय प्रादेशिक सरकारांवर सोपवून ब्रिटिशकालीन भारत सरकार या जबाबदारीतून पूर्णतः मोकळे झाले. पण तत्पूर्वीच पश्चिम महाराष्ट्रात सिंचनाच्या दृष्टीने (१) गोदावरी (नांदूर मधमेश्वर) (२) प्रवरा (ओझर) (३) नीरा (वीर) (४) मुठा (खडकवासला) (५) कृष्णा (खोडसी) (६) गिरणा हे सहा मोठे प्रकल्प (प्रत्येकी १०,००० हेक्टर पेक्षा जास्त सिंचन असलेले) व १५ मध्यम प्रकल्प (प्रत्येकी २,००० हेक्टर पेक्षा जास्त सिंचन असलेले) निर्माण करण्यात आले होते. त्यांतूनही सिंचन क्षेत्रांत भर पडून स्वातंत्र्यपूर्व काळात एकूण २·७४ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती. महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३०८ लक्ष हेक्टर असून त्यापैकी २२५ लक्ष हेक्टर क्षेत्र लागवडीयोग्य आहे. त्यापैकी ४० टक्के क्षेत्र अवर्षण प्रवण आहे. या संदर्भात स्वातंत्र्यपूर्व काळातील सिंचनाची सुविधा फारच तोकडी म्हणजे एकूण लागवडीयोग्य भूक्षेत्राच्या केवळ १·२ टक्केच होती.

२·४ तरीपण ब्रिटिश कालखंडात हाती घेण्यात आलेल्या मोठ्या जलसिंचन योजनांच्या कुशल अंमलबजावणीसाठी कार्यक्षम प्रशासन यंत्रणेची आवश्यकता नव्यानेच निर्माण झाली होती. भारतामध्ये ब्रिटिशांनी स्थापन केलेल्या भारतीय अभियांत्रिकी सेवेच्या गुणवंत अधिकाऱ्यांनी ही जबाबदारी सांभाळली. पण अशा प्रकारच्या सर्व योजना व त्यांची आखणी, उभारणी व व्यवस्थापन यासाठी पूर्णतः शासनावर निर्भर होत्या. त्यांना विशेष प्रतिष्ठा देण्यात आली होती. तत्पूर्वीच्या जुन्या पद्धतीच्या लहान आकाराच्या पण प्रत्यक्ष लाभधारक जनतेकडूनच देखभाल, व व्यवस्थापन केल्या जाणाऱ्या जलसिंचन योजनांकडे ब्रिटिश सरकार तुच्छतेने बघत असे. 'दुय्यम दर्जाच्या योजना' म्हणून त्यांची संभावना व गणना केली जात असे. त्या योजनांची जबाबदारी तेथील ग्रामीण जनतेवर किंवा ब्रिटिशकाळात निर्माण केलेल्या जमीनदार व मालगुजार यासारख्या मध्यस्थांवर सोपविली गेली होती. ब्रिटिश सरकारने तयार केलेल्या सिंचनाच्या कायद्यांमध्ये जनतेद्वारे चालविल्या जाणाऱ्या पारंपरिक जलसिंचन योजनांच्या व्यवस्थापनाबाबत विशेष तरतूदही नव्हती. ब्रिटिश कायद्याचा सर्व भर मोठ्या शासकीय योजनांवर होता. सिचनासाठी पाणीपुरवठा

अनुक्रमणिका

मिळणाऱ्या जमिनींवरील, अतिरिक्त करांच्या माध्यमातून मिळणाऱ्या वाढीव उत्पन्नाकडेच ब्रिटिश सरकारचे मुख्यतः लक्ष होते. अधिकाधिक पैसा सरकारी तिजोरीत जमा करणे हाच त्यांचा मुख्य उद्देश होता. याप्रकारचा तत्कालीन कायद्याचा उद्देश स्पष्टपणे त्या कायद्याच्या मसुद्यावरही लिहिला गेला होता. समाजाच्या विस्तृत व व्यापक विकासाचा विचार ब्रिटिशांच्या मनात नव्हता. त्यामुळे सिंचनाचा कायदा केवळ शासनाच्या हितासाठी व एकांगी स्वरुपाचा होता.

२·५ स्वातंत्र्यानंतर 'भारतरत्न' म्हणून ज्यांना गौरवले गेले त्या सर विश्वेश्वरय्या यांची अभियांत्रिकी सेवा ब्रिटिश कालखंडातच महाराष्ट्राला लाभली. पारतंत्र्यांतील कारकिर्दीतही त्यांनी लोककल्याणाचे व स्थायी ग्रामीण विकासाचे स्पष्ट उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सिंचनातील लोकसहभागाचा व तत्कालीन कायद्याच्या चौकटीत राहूनही समन्वित पीकसमूह पद्धतीचा पुरस्कार केला. त्यामुळे नीरा, प्रवरा, गोदावरी या कालव्यांच्या क्षेत्रांमध्ये सुव्यवस्थित अशी पिकसमूह रचना रूढ झाली. दर सहावर्षांनी पीकसमूह गटांचे पुनर्निरीक्षण व्हावे असे मुळात अभिप्रेत होते. पण पुढे पुढे त्या गटांना पाण्याच्या उपलब्धेतील स्थायी हक्कांचे रुप देण्यात आल्याने त्या पद्धतीतील तांत्रिक आणि सामाजिक उद्दिष्टे नजरेआड झाली.

२·६ ब्रिटिशांनी जरी हळूहळू आपले अंग जलविकास कार्यक्रमांतून काढून घेतले, तरी त्याच सुमारास सह्याद्रीच्या कुशीतील इंद्रायणी आणि मुळा खोऱ्यांतील धरणांच्या साहाय्याने जलविद्युत निर्मितीच्या योजनांची आखणी व उभारणी करण्याचे काम टाटांनी १९१६ ते १९२४ या काळात खासगी उपक्रमांतून सुरू करून पूर्णत्वास नेले. लोणावळा व वळवण येथील धरणे १९१६ मध्ये, शिरवटा धरण १९२० मध्ये, ठाकुरवाडी धरण १९२२ मध्ये आणि मुळशी धरण १९२४ मध्ये पूर्ण झाले. शिरवटा धरणाची उंची ३८ मीटर्स, ठाकुरवाडी धरणांची उंची ५९ मीटर्स आणि मुळशी धरणाची उंची ५० मीटर्स आहे. टाटांच्या या स्वदेशी उपक्रमशीलतेमुळे महाराष्ट्रात जलविद्युत निर्मितीच्या आधुनिक युगाचा प्रारंभ झाला. या जलविद्युत प्रकल्पांच्या यशस्वी उभारणीमुळे मुंबई पुणे परिसरात औद्योगिकीकरण झपाट्याने होऊ लागले. महाराष्ट्रातील रेल्वे वाहतुकीचे अंशतः विद्युतीकरण झाले, आणि सुप्रसिद्ध 'डेक्कन क्वीन' वेगाने व दिमाखाने धूरविरहित अशा स्वच्छ सुखद वातावरणात धावू लागली. जलसंपत्ती क्षेत्रातील भारतीयीकरणाचा शुभारंभ अशा प्रकारे भारत स्वतंत्र होण्यापूर्वीच खासगी उद्यमशीलतेत्न झाला होता. त्याच व्यापक विचाराचा धागा शासकीय नियोजनातही पकडून महाराष्ट्राचे मुख्य अभियंता श्री. म. ल. चाफेकर यांनी पुढे कृष्णा खोऱ्याच्या विकासाची आखणी केली. त्यातून ते 'कोयना जलविद्युत' विकासाचे पहिले शिल्पकार ठरले.

**३·० स्वातंत्र्योत्तर नवी आव्हाने**

३·१ विकासासाठी उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या आधारावर आपला स्वतःचा मार्ग निश्चित करायचा म्हणजे आपल्याजवळ असेल्या नैसर्गिक साधनांपैकी जमीन आणि पाणी यांचा समन्वित विचार करायला हवा. यापैकी पाणी ही गोष्ट दरवर्षी नवीनपणे उपलब्ध होणारी आहे. त्याच्या उत्तम व्यवस्थापनासाठी विविध प्रदेशांतील जलस्रोतांची व त्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या एकूण जलसंपदेची व त्या त्या भागातील वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीची सर्वांगीण आणि सखोल माहिती हाती असणे नितांत आवश्यक आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी या दिशेने विशेष असे काहीच प्रयत्न झालेले नव्हते. त्यामुळे देशातील विविध जलस्रोत, त्यामधून उपलब्ध होणारी जलसंपदा, यांच्या शास्त्रशुद्ध मोजणीची व

अभ्यासाची सुरुवात एकंदरीने भारतात त्यामानाने उशिराच झाली. पाण्याबाबत व पाण्याच्या शुद्धतेबाबत भारतीय मनात परंपरेने जरी आदरपूर्ण भावना ठसलेली होती तरी विविध ठिकाणी, विविध भागांत प्रत्यक्षात किती पाणी कशा प्रकारे उपलब्ध आहे किंवा होऊ शकते याविषयी नीटपणे संकलित केलेली माहिती कोठेच फारशी उपलब्ध नव्हती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महाराष्ट्राच्या मराठवाड्या सारख्या भागात तर शुन्यापासूनच सुरुवात करावी लागली. विकासाच्या अनुशेषांचे जे प्रश्न अलीकडच्या दोनतीन दशकांमध्ये तीव्रतेने जाणवू लागले, त्यांचे मूळ अशा स्वातंत्र्य काळापूर्वीच्या विषम व उपेक्षित अवस्थांमध्ये आहे.

३·२ स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने नियोजनात्मक विकास पद्धती स्वीकारली. पाणी नियोजनाच्या व सिंचनाच्या क्षेत्रांतही लवकरच नियोजनबद्ध पद्धतीने कामांना हात घालावा लागला. त्या त्या भूक्षेत्रांवरील पाण्याच्या नैसर्गिक उपलब्धतेचा व्यापक संदर्भ नजरेसमोर ठेवला जाणे हे आवश्यक ठरले. उपलब्ध पाण्याच्या मोजणीत हळूहळू अधिकाधिक काटेकोरपणा येऊ लागला. राज्याराज्यांमधील पाण्याच्या वाढत्या स्पर्धात्मक मागणीचा परिणाम म्हणूनही महाराष्ट्राला आपल्या जवळची नेमकी पाण्याची एकूण उपलब्धता आहे, तरी किती व भावी विकासाला ती कितपत व कशी उपयोग पडू शकेल याचा विचार सुरू करून दीर्घकालीन विकासाचे बृहत आराखडे तयार करण्याचे काम हाती घ्यावे लागले. त्यातून महाराष्ट्रातील कृष्णा, गोदावरी खोऱ्यांचा पहिला बृहत आराखडा १९६२ मध्ये तयार झाला.

**आंतरराज्यीय विवाद**

३·३ पाण्याच्या केवळ स्थानिक उपलब्धतेचा मर्यादित विचार करून जलविकास प्रकल्पांची आखणी करण्याचा ऐतिहासिक काळ संपून नदी, खोऱ्याच्या अधिक व्यापक संदर्भात व आंतरराज्यीय परिमितीत विचार करणे आवश्यक ठरले. त्यातूनच पाण्याबद्दलच्या राज्यीय हक्काची भावना वाढीस लागली. पाण्याच्या व्यवस्थापनात एक नवाच पैलू तयार झाला. त्याची परिणती नद्यांमधील उपलब्ध पाण्याच्या वापराबद्दल विवाद निर्माण होण्यात झाली. आंतरराज्यीय नद्यांवर असे वाद निर्माण होण्याची शक्यता लक्षात ठेवूनच ते सोडवण्यासाठी भारताच्या घटनेत न्यायिक प्रक्रियेची तरतूद असलेले कलम २६२ समाविष्ट करण्यात आले होते. त्याला अनुसरुन १९५६ मध्ये संसदेने आंतरराज्यीय जलतंट्याबाबत नेमावयाच्या लवादांसाठी स्वतंत्र कायदा केला होता. त्याच्या आधाराने कृष्णा, गोदावरी व नर्मदा यांच्या पाणी वाटपाचे प्रश्न १९६९ मध्ये लवादांकडे सोपवावे लागले. त्यांचे निवाडे कृष्णेच्या बाबातीत १९७६ मध्ये, तर गोदावरी व नर्मदेच्या बाबतीत १९७९ मध्ये हाती आले. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतरची पहिली दोन दशके अशा रीतीने पाणी वापराच्या नियोजनाच्या दृष्टीने एकूण उपलब्धतेबाबतींतील अनिश्चिततेच्या वातावरणात गेली.

३·४ कृष्णा खोऱ्यांतील तिन्ही राज्यांनी कृष्णेचा निवाडा तात्पुरता २५ वर्षांपुरता म्हणजे इ. स. २००० पर्यंतच्या कालखंडापुरता स्वीकारला. लवादाने सुचवलेली कृष्णा नदी प्राधिकरणाची दीर्घकालीन स्थायी व्यवस्था राज्यांनी स्वीकारली नाही. त्यामुळे समाजमानसात पाणी वाटपाच्या संदर्भात आंतरराज्यीय कटुतेचे जे बीजारोपण झाले होते, ते कृष्णा खोऱ्यात तसेच चालू राहिले. कृष्णा लवादाच्या निर्णयाचा २५ वर्षाचा विहित कालखंड संपल्यामुळे कृष्णा पाणी वाटपाचा प्रश्न आता २००३ पासून पुन्हा नव्या लवादापुढे आहे. राष्ट्रीय सामंजस्याला तडा जाईल, की काय, अशी भीती वाटावी इतपत पाणी तंट्यामधल्या आग्रही भूमिका राज्या-राज्यांनी ताणल्या आहेत. त्याचा जनमानसावरही विपरीत परिणाम दिसू लागला आहे. भारताच्या भूप्रदेशांना भावनिक व व्यावहारिक पातळीवर जोडणारा प्रभावी घटक म्हणून नद्यांची भूमिका

बाजूस पडून त्या, देशातील प्रादेशिक समाज घटकांना तोडणाऱ्या होणार की, काय अशी कडेलोटाची स्थिती मात्र राजकीय व सामाजिक सुज्ञतेमुळे व केंद्र सरकारच्या समोपचारवादी भूमिकेमुळे टाळली गेली आहे. नर्मदेसाठी आंतरराज्यीय नर्मदा नियंत्रण प्राधिकरण राज्यांनी स्वीकारले आहे. यापुढील काळामध्ये तशी प्राधिकरणे इतर खोऱ्यांमध्ये जसजशी आकारला येतील व राष्ट्रीय पातळीवर अमलबजावणी करावयाच्या नदीजोड प्रकल्पांची संकल्पना स्वीकारली जाईल त्याप्रमाणात, पाण्याच्या हाताळणीत व्यापक राष्ट्रीय सामंजस्य निर्माण होण्यास व टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकेल असे दिसते.

**पाण्याच्या उपलब्धतेच्या मर्यादा**

३·५ महाराष्ट्रभर केलेल्या मोजणीमधून महाराष्ट्रातील जलसंपत्तीची वार्षिक सरासरी नैसर्गिक उपलब्धता अंदाजे १६४ अब्ज घनमीटर भूपृष्ठीय जल म्हणून व २०·५ अब्ज घन मी. भूजल म्हणून आहे असे चित्र आता हळूहळू स्पष्ट झाले आहे. आंतरराज्यीय नद्यां संबंधातले जल लवादांचे निवाडे व करार, यांतून निर्माण झालेल्या मर्यादांमुळे महाराष्ट्र राज्यात वापण्यास मुभा असलेली भूपृष्ठीय जलसंपत्ती मात्र केवळ १२५ अब्ज घन मी. इतकीच सीमित आहे. वेगवेगळ्या खोऱ्यांमधील पाण्याच्या उपलब्धतेची नैसर्गिक वैशिष्ट्ये व त्यावरील प्रशासनिक मर्यादा समजावून घेणे व पचनी पडणे प्रारंभी अवघड गेले. देवाने अमाप पाणी दिले आहे ही भावना सोडून, निसर्गाच्या रचनेत पाण्याची जी संख्यात्मक मर्यादा आहे त्यावरच दीर्घकालीन विकासाची उभारणी करावयाची आहे, ही जाणीव निर्माण व्हायला महाराष्ट्राची सुरुवातीची काही दशके खर्ची पडली. कृष्णा, भीमा, गोदावरी, पैनगंगा, वर्धा, वैनगंगा, उल्हास अशा मोठाल्या विस्तृत खोऱ्यांची भौगोलिक रचना व त्यांतील लोकसमूहांच्या वैशिष्ट्यपूर्ण वेगवेगळ्या प्रकारच्या गरजा यांच्याकडे सम्यक दृष्टीने पाहण्याची सवय प्रशासनाला व त्या खोऱ्यांमधील सर्व समाजघटकांना नव्यानेच अंगवळणी पाडून घ्यावी लागली.

३·६ भूजलबाबतींतील भ्रमनिरास व्हायला तर खूपच वेळ लागला. पृथ्वीच्या पोटात पाणीच पाणी साठवलेले आहे व ते केव्हाही कितीही वापरता येईल ही धारणा दीर्घकाळ सामान्य माणसाच्या मनात रेंगाळत राहिली. १९७२-७२ च्या दुष्काळांतील हलाखीच्या स्थितीमुळे त्याबाबतच्या स्वप्नाळू कल्पनांना प्रथमच जबरदस्त धक्का बसला. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची १९७१ मध्ये स्थापना झाल्यानंतर गेल्या शतकाच्या आठव्या दशकात भूजल पाहणीचे अहवाल जसजसे उपलब्ध झाले, तसतशा महाराष्ट्रातील भूस्तरांच्या पाणीधारणा करण्याच्या मर्यादा स्पष्ट होऊ लागल्या. अजूनही भूजल अवस्थेतील पाण्याच्या उपलब्धतेबद्दलच्या वास्तविक मर्यादा स्वीकारण्याबाबत समाजमनाची पुरेशी तयारी झालेली नाही.

**आयोगांकडून मिळालेले मार्गदर्शन**

३·७ पाण्याचा सर्वाधिक वापर हा शेती व्यवस्थेत व्हावयाचा असल्याने महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर लगेचच सिंचन विकासाच्या प्रश्नावर अभ्यास करून सिंचन विषयक धोरण व कार्यपद्धती यासंबंधी सूचना करण्यासाठी सिंचन आयोगाची स्थापना १९६० मध्ये करण्यात आली. तोवर नियोजनपूर्व काळातील २·७४ लक्ष हेक्टर सिंचनक्षमता वाढून केवळ ३·८६ लक्ष हेक्टर झालेली होती. या आयोगाचा अहवाल १९६२ मध्ये शासनास प्राप्त झाला. त्यानंतरच्या तीन दशकांहून अधिक काळ पाण्याचे व सिंचनाचे नियोजन त्यातील शिफारशींच्या अनुषंगाने महाराष्ट्रात करण्यात आले. त्या आयोगाने राज्यातील प्रमुख खोऱ्यांतील पाण्याची उपलब्धता, सिंचन विकासाची दिशा, सिंचनाचे वित्तविषयक अंग, सिंचनाची

पाणीवाटप व्यवस्था अशा सर्व विषयांवर मार्गदर्शक अशा जवळपास २०० शिफारशी केल्या होत्या. त्यातील बऱ्याचशा शिफारशी पूर्णतः व काही थोड्या अंशतः स्वीकारल्या गेल्या. महाराष्ट्राच्या जलव्यवस्थेचे आजचे जे चित्र आहे, त्याच्या पाठीशी उभी असलेली जी सुविहित तंत्र-प्रशासनिक व्यवस्था आहे, आणि तांत्रिक संशोधनाची व प्रशिक्षणाची सक्षम कार्यपद्धती उभी आहे, त्याचा मूळ आधार सिंचन आयोगाच्या शिफारशी हाच राहिलेला आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतरच्या नव्या आधुनिक रचनेत पाटबंधारे खात्याला व एकंदरच जलव्यवस्थापनाला सुयोग्य आकार या आयोगाच्या अहवालामुळे लाभला.

३·८ ज्यावेळी महाराष्ट्राच्या संदर्भात पाण्याचा विकास आणि सिंचनाचा विकास यावर महाराष्ट्रात विचारविनियम चालू होता, त्यावेळी भारतात राष्ट्रीय पातळीवरही विविध प्रश्नांवर स्वतंत्रपणे विचारमंथन चालूच होते. वेगवेगळ्या प्रश्नांच्या संदर्भात विचार करण्यासाठी समित्या नेमल्या जात होत्या. त्यातील निष्कर्षांचा महाराष्ट्रालाही पर्यायाने मार्गदर्शनात्मक लाभ होत राहिला. १९७२ मधील राष्ट्रीय सिंचन आयोग आणि त्याच सुमारास नेमलेला राष्ट्रीय कृषी आयोग यांनी शेती क्षेत्रांतील पाण्याच्या वापराच्या संबंधात अनेक मुद्यांचा राष्ट्रीय स्तरावर जो विचार केला त्याचा प्रभाव महाराष्ट्रातील कार्यपद्धतीवरही होत राहिला. भूजलाचा अंदाज बांधणे, तसेच लघु पाटबंधारे योजनांची सद्यःस्थितीची गणना करून त्यांच्या वास्तविकतेचा अंदाज घेणे, धरणसुरक्षाविषयक व्यवस्थेसाठी मार्गदर्शक तत्त्वे विहित करणे अशा विविध अंगांना स्पर्श करणारे अहवाल केंद्रशासनाकडून वेळोवेळी प्रकाशित झाले. त्यातील सूचनांचा महाराष्ट्र राज्यातील व्यवस्थेवर, विचारसरणीवर आणि कार्यपद्धतीवर निश्चितच अनुकूल परिणाम झालेला दिसतो. महाराष्ट्रातही वेळोवेळी विविध प्रश्नांची उकल करण्यासाठी अनेक महत्त्वाच्या समित्या नेमल्या गेल्या. त्यांच्या शिफारशींना अनुसरून नवनव्या आव्हानांना तोंड देऊ शकेल अशा प्रकारे प्रशासकीय व सामाजिक व्यवस्था सुधारण्याचे प्रयत्न हाती घेता आले.

३·९ महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर त्यापुढील ३५ वर्षांत झालेली प्रचंड लोकसंख्यावाढ, नागरीकरण, उंचावलेले राहणीमान, विस्तारित औद्योगिकीकरण व त्यातून सतत वाढणारी पाण्याची विविध उपयोगांसाठीची मागणी यामुळे पिण्यासाठी, सिंचनासाठी व कारखानदारीसाठी लागणाऱ्या पाण्याचा एकत्रित विचार करणे अपरिहार्य ठरले. पर्यावरणीय जागृतीमुळे व आरोग्यविषयक वाढत्या दक्षतेमुळे पाण्याच्या गुणवत्तेबद्दलच्या अपेक्षाही उंचावल्या. पाण्याच्या व्यवस्थापनातले पर्यावरणीय घटकांचे महत्त्व वाढले. विकासाच्या असमतोलाचे व अनुशेषाचे प्रश्न, विकासाच्या गतीबरोबर वाढलेला भूजलाचा अमर्याद व अनिर्बंध उपसा, नागरी व औद्योगिक वापरामुळे होणारे जलस्रोतांचे, जलाशयांचे व भूजलाचे प्रदूषण हे नवे गंभीर प्रश्न समोर आले. त्यामुळे जलविकासाचे व्यवस्थापन अधिकाधिक बिकट व गुंतागुंतीचे होत गेले. त्यामुळे १९६० च्या सिंचन आयोगाने विचार केला त्याप्रमाणे सिंचन व्यवस्थापनाचा वेगळा विचार न करता पाण्याच्या एकूण उपलब्धतेच्या संदर्भात सिंचनाचे पाणी, ग्रामीण व नागरी पाणीपुरवठा यासाठीचे पाणी, औद्योगिक गरजांचे पाणी आणि पर्यावरणीय गरजा या सर्वांचा एकत्रित विचार यापुढे आवश्यक ठरणार हे स्पष्ट झाले. सिंचन विकासाच्या संदर्भात नव्याने विचार करण्यासाठी म्हणून दुसरा सिंचन आयोग नेमण्याचा विचार १९९५ मध्ये सुरू झाला, तोवर महाराष्ट्रांतील सिंचन क्षमता ३·८६ लक्ष हेक्टरवरून ३० लाख हेक्टरपर्यंत पोचली होती. या नव्या आयोगाचे नाव केवळ सिंचन आयोग असे न राहता त्याऐवजी महाराष्ट्र जल व सिंचन आयोग असा त्यात बदल करावा अशी विनंती मार्च ९७ मध्ये त्या आयोगातर्फेच शासनाला करण्यात आली. शासनाने औपचारिक आदेशाने ऑक्टो. ९७ मध्ये नव्या आयोगाचे नाव त्याप्रमाणे बदलले. पाण्याचा विचार एकाच कप्प्यात न होता अधिक व्यापक संदर्भात होऊ लागल्यामुळे

महाराष्ट्रात सर्वत्र अनुकूलता वाढली. सध्याचा महाराष्ट्राचा प्रवास त्या आयोगाने ऑक्टो १९९९ मध्ये दिलेल्या शिफारशींना अनुसरून चालू आहे.

**४.० तंत्र प्रशासनिक नव्या रचना**

४.१ ब्रिटिश राजवटीच्या काळात 'सरकारी' म्हणून गणल्या गेलेल्या सर्व प्रकारच्या बांधकामांची जबाबदारी एकाच सार्वजनिक बांधकाम (पीडब्ल्यूडी) असे. त्या यंत्रणेला जनतेच्या गरजांशी संबंधित विकासात्मक रचनांचा मूलभूत विचार करण्याची फारशी गरज नव्हती. सरकारी कामात लोकांच्या सामूहिक सहभागाचीही नियोजनासाठी किंवा व्यवस्थापनासाठी आवश्यकता नव्हती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र तसा विचार विविध क्षेत्रांमध्ये आवश्यक ठरला, त्याचप्रमाणे तो सिंचन व पाणीपुरवठा यासाठीही आवश्यक ठरला. यासंबंधातील पाण्याच्या योजनांचे तांत्रिक स्वरूप हेही रस्ते अथवा इमारतींच्या बांधणीपेक्षा खूपच वेगळे असल्यामुळे त्यासाठी शासकीय यंत्रणेची पुनर्रचना आवश्यक ठरली. केवळ बांधकामप्रवण अशा बांधकाम विभागाऐवजी पाटबंधारे (सिंचन) विभाग, व सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग किंवा पाणीपुरवठा व मलप्रवाहनिस्सारण मंडळे, अशी सामाजिक उद्देशानुरुप स्वतंत्र खाती यांची उभारणी करावी लागली. त्याचप्रमाणे भूजलस्त्रोतांच्या पाण्याच्या वापराचे नियोजन करण्यासाठी वेगळ्या भूजल यंत्रणेची उभारणी करावी लागली. राज्याच्या पाटबंधारे विभागात जलविद्युत निर्मितीसाठी स्वतंत्र वेगळ्या संघटनेची व राज्य विद्युत मंडळामधेही जलविद्युत केंद्रांच्या परिचालनासाठी स्वतंत्र जलविद्युत विभागाची निर्मिती व विस्तार महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर पहिल्या दशकातच करावा लागला.

४.२ या विविध तंत्रवैज्ञानिक यंत्रणांमुळे जलसंपत्तीचा विविध प्रकारे विकास करण्यासाठी उपयुक्त ठरतील अशा विशेष तज्ज्ञ सेवा महाराष्ट्र राज्यात उपलब्ध झाल्या. त्यांच्या माध्यमातून जलविकासाचे आहे तसे राहू देणे. प्रगल्भ रूप हळू हळू आकारला आले. आधुनिक तंत्रवैज्ञानिक काळाशी सुसंगत असेच हे परिवर्तन होते. निसर्गातील पाणी तेच व तेवढेच राहिले पण त्याचे समाजाभिमुख तंत्रवैज्ञानिक व्यवस्थापन करावयाचे काम अष्टपैलू रूपांत विकसित झाले. विविध विषयांतला प्रशिक्षित जाणकार वर्ग मोठ्या संख्येत समाजात वावरू लागला. त्याचा परिणाम म्हणून हळूहळू समाजाचाही तंत्रवैज्ञानिक समज पाण्याच्या संदर्भात वाढत राहिली.

४.३ यापैकी सर्वप्रथम व सर्वाधिक विस्तार झाला तो सिंचनासाठी लागणाऱ्या व्यवस्थेचा. सार्वजनिक बांधकाम विभागापासून वेगळी अशी स्वतंत्र पाटबंधारे विभागाची निर्मिती १९५८ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वी नुकती झाली होती. पण त्या विभागांतर्गत धरणे, कालवे, दरवाजे यांच्या संरचना निश्चित करणाऱ्या मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व अभियांत्रिकी संशोधन संस्था यांचा विस्तार आणि स्वतंत्र अशा यांत्रिकी संघटनेची निर्मिती (१९६४), पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालयाची स्थापना (१९६९), मोठाल्या कालव्यांच्या क्षेत्रांत पाणीवापर व उत्पादकता यांना प्रोत्साहन देणाऱ्या लाभक्षेत्र विकास यंत्रणांची निर्मिती (१९७४) व त्यासाठी प्रशिक्षित सिंचन व्यवस्थापन वर्ग उभी करणारी जल व भूमी व्यवस्थापना संस्था (१९८०), धरण सुरक्षितता संघटना (१९८०) अशी विशेष व्यवस्थांची उभारणी केल्याने विविध अंगांनी सिंचन विकासाचे काम सिंचन क्षेत्राच्या विस्ताराबरोबरच सुदृढ होत गेले. महाराष्ट्राला आधुनिक जागतिक स्तराबरोबर आणून पोहचण्याचे काम या संघटनांनी केले. धरणबांधणी असो, कालवे असोत, धरणावरच्या दरवाजांची निर्मिती व उभारणी असो, किंवा भुयारांतर्गत विद्युतगृहांची रचना व

अनुक्रमणिका

बांधकाम व्यवस्थापन असो या सर्वात तंत्रवैज्ञानिक दृष्टीने सर्वार्थाने स्वयंपूर्णता महाराष्ट्राच हस्तगत झाली व त्याचा भारतीय संदर्भात आणि जागतिक पटलावरही दबदबा निर्माण झाला. महाराष्ट्राच्या पाटबंधारे खात्यातील गेल्या दोन पिढ्यांच्या परिश्रमांचे हे मोठेच तंत्रवैज्ञानिक यश आहे.

४·४ पेयजलाची समस्या अधिकाधिक बिकट होत चालली आहे हे लक्षात आल्यावर १९९५ मध्ये स्वतंत्र अशा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाची निर्मिती महाराष्ट्रात करण्यात आली. तसेच जुलै १९९५ मध्ये या प्रश्नाचे समग्र विश्लेषण देऊन उपाययोजना सुचविणारी एक श्वेतपत्रिकाही प्रसिद्ध करण्यात आली. बृहन्मुंबई वगळता राज्याच्या इतर सर्व भागाच्या नागरी पाणीपुरवठ्याच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संघटित करण्यात आले. प्राधिकरणाकडून संपूर्ण राज्याचे सर्वेक्षण करून पाणी पुरवठ्याची व्यवस्था समाधानकारकरीत्या बसविण्यासाठी बृहत आराखडाही तयार करण्यात आला. त्या आराखड्याची अंमलबजावणी आता तीन स्वतंत्र यंत्रणांकडून होत आहे. शहरी भागाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता योजना, तसेच मोठ्या खर्चाच्या ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजना राबविण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे आहे. पण औद्योगिक क्षेत्रांना लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाकडून १९६२ पासून स्वतंत्रपणे पाहिली जात आहे. छोट्या नळ पाणीपुरवठा योजना व विहिरी, तळी बुडक्या इ. उपाय योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मात्र जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित झाली आहे, तर कूपनलिकांद्वारे पेयजल पुरवठा करण्याची जबाबदारी भू-जल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे सोपविली गेली आहे. महाराष्ट्रभर त्यांच्या कामाचे जाळे परसरलेले आहे. या पाणीपुरवठा यंत्रणांच्या समन्वयासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदांच्या छत्राखाली जिल्हा पाणीपुरवठा अधिकाऱ्यांची पदे आहेत. पाणीपुरवठ्यांच्या व्यवस्थांमधली ही फेररचना मूलतः तांत्रिक व प्रशासकीय कार्यपद्धतीची झाली आहे. त्याची पाण्याच्या स्थानिक समग्र व्यवस्थापनाशी अजून नीटशी जोडणी झालेली नाही. पाणलोट क्षेत्रशः व उपखोरेशः करावयाच्या पाण्याच्या नियोजनाशी व व्यवस्थापनाशी आणि पाण्याच्या सर्वाधिक वापर करणाऱ्या सिंचन व्यवस्थापनाच्या रचनांशी त्याची सुव्यवस्थित सांगड घातली जाणे अजून बाकी आहे.

४·५ अशा या व्यवहार व्यवस्थेत पाण्यासंबंधातील कार्यक्रमांचे वेगवेगळे तज्ज्ञ विभाग स्वतंत्रपणे काम करीत आहेत. पाण्याचा समन्वित विचार करण्याची व एकात्मिक व्यवस्थापन चालविण्याची स्पष्ट जबाबदारी कोणत्याच एका घटकावर किंवा सामूहिक यंत्रणेवर टाकण्यात आलेली नाही. महाराष्ट्राचे ८० टक्क्यांहून अधिक क्षेत्र हे पाण्याच्या तुटीचे वा केवळ सर्वसाधारण उपलब्धतेचेच असल्यामुळे पाण्याची वाढती गरज आणि त्या तुलनेत कमी पडणारी उपलब्धता यांचा मेळ घालण्यासाठी सर्व प्रकारच्या पाण्याच्या वापरांचा एकत्रित समन्वित विचार होणे यापुढील काळात अपरिहार्य होणार आहे. म्हणून पाणी हाताळणाऱ्या सर्व यंत्रणांना सामूहिक मंचावर एकत्रित आणून त्यांच्या समन्वय समितीतर्फे विविध उपखोऱ्यांतील विकासांचे तपशील ठरवले जाणे आवश्यक राहणार आहे. पाण्याचा ७० टक्क्यांहून अधिक वापर सिंचनासाठी होत असल्याने, सिंचन व्यवस्थेला यापुढे केवळ सिंचनाच्या उद्दिष्टांचा संकुचित विचार करता येणार नाही. समाजाच्या सिंचनेतर गरजांचाही पाण्याच्या एकूण उपलब्धतेच्या संदर्भात योग्य तो विचार करावा लागणार आहे. म्हणून त्या खात्याने केवळ पाटबंधारे खाते असे न राहता जलसंपत्तीच्या विकासाचे व व्यवस्थापनाचे समन्वयात्मक प्रतिनिधित्व करणारा जलसंपदा विभाग असे त्याचे व्यापक रूपांतर होणे आवश्यक होते. तसा बदल होऊन 'जलसंपदा विभागाची' निर्मिती २००६ मध्ये होऊन त्या विभागाच्या छत्राखाली पाण्याच्या समन्वयाची सुविहित व्यवस्था लावण्याच्या प्रयत्नांना आता प्रारंभ झालेला आहे.

अनुक्रमणिका

४·६ त्या दिशेने काम होण्यासाठी महाराष्ट्राच्या विधिमंडळाने स्वतंत्र कायदा करून महाराष्ट्र जलसंपदा नियमन प्राधिकरण २००५ मध्ये स्थापन केले आहे. या प्राधिकरणाचे काम हे यापुढे फार महत्त्वाचे राहणार आहे. समन्यायी व टिकाऊ अशी पाणी वाटपाची व वापराची व्यवस्था खोरेनिहाय, उपखोरेनिहाय, व पाणलोट क्षेत्रनिहाय बसवण्याचे काम त्यांना करावे लागणार आहे. शेती, उद्योग, घरगुती वापर अशा विविध प्रयोजनांसाठी पाण्याचे काय दर असावेत हेही प्राधिकरणाने ठरवायचे आहे. एका संवेदनशील अवस्थेतून महाराष्ट्राला आता पुढे जावयाचे आहे. त्यात प्रशासनिक कुशलतेपेक्षाही पाणी वापरणाऱ्या समाजघटकांची पाणी प्रश्नाची जाण व सामूहिक सहकार्याची तयारी यावर याबाबतचे यश अवलंबून राहणार आहे. शासकीय विभागांची पुनर्रचना करून त्यांच्यात तांत्रिक तज्ज्ञसेवा विकसित करणे तुलनेने सोपे होते. पण सर्वसमावेशक लोककल्याणकारी पाणीव्यवस्थापनाची कार्यपद्धती लोकांच्या व लोकसंघटनांच्या सहभागातून उभी करणे हे जिकिरीचे व चिकाटीचे काम राहणार आहे. पाण्याच्या एकात्मिक व्यवस्थापनाबाबतीतील समज अजून सर्वसाधारण प्रशासन यंत्रणेत किंवा लोकमानसातही नीटशी आकाराला आलेली नाही. महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचा अंतिम कस तेथे लागणार आहे.

## जलविद्युत

४·७ पाणी व ऊर्जा यांच्यातील अन्योन्य संबंध याबाबतही प्रशासनांत व जनमानसांत अजून पुरेशी स्पष्टता नाही. पाणी आणि ऊर्जा यांचे नाते द्विमार्गी आहे. पाण्याचा साठा जर उंचावर असेल तर तिथून ते खाली येताना गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीमुळे निर्माण होणाऱ्या वेगशक्तीचा उपयोग करून विद्युतनिर्मिती करता येते. याउलट पाण्याचा साठा जिथे त्या पाण्याचा वापर करावयाचा आहे त्यापेक्षा खालच्या पातळीवर असेल. तर ते पाणी वर चढविण्यासाठी ऊर्जेचा वापर करावा लागतो. कोळसा, ज्वलनवायू, अणुशक्ती, यांच्या साहाय्याने विद्युतनिर्मिती करणाऱ्या केंद्रातही तिथे निर्माण होणारी प्रचंड उष्णता कमी करण्यासाठी व नियंत्रित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर करावा लागतो. आधुनिक काळातील अनेक उत्पादन उद्योगांची व्यवस्थासुद्धा अतिशय मोठ्या प्रमाणात विजेच्या आणि पाण्याच्या वापरांवर अवलंबून असते म्हणून ज्या समाजांना पाण्याबरोबरच विद्युत निर्मितीचे, वितरणाचे आणि वापराचे उत्तम प्रकारे व्यवस्थापन करण्याची आणि विविध ऊर्जास्रोतांमधील संतुलन सांभाळण्याची क्षमता असेल, तेच प्रगतिपथावर टिकू शकतात. महाराष्ट्रातील पर्वतीय प्रदेशांमध्ये उदा. सह्याद्री, अजिंठा व सातपुडा येथे जलविद्युत निर्मितीच्या व ऊर्जा संतुलनाच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. परंतु आतापर्यंत त्यापैकी जेमतेम २५ टक्के क्षमतेचाच आपण वापर केलेला आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक, शेतकी, घरगुती अशा विविध क्षेत्रांकरिता सातत्याने मागणी वाढणाऱ्या विजेची गरज पूर्ण व्हावी म्हणून सर्वांना योग्य त्या वेळात योग्य तितका वीजपुरवठा करण्याकरता एकंदर वीज निर्मितीतील जलविद्युत शक्तीचे स्थान सुदृढ होणे अत्यंत निकडीचे आहे. पण प्रदूषणविरहित अशी ही ऊर्जाशक्ती प्रशासनात व जनमानसांत आपले योग्य ते स्थान निर्माण करू शकलेली नाही. जलविद्युत निर्मिती केंद्रातून मिळणारी वीज ही विजेच्या कमाल मागणीच्या वेळात अत्यंत उपयुक्त ठरली आहे. औष्णिक वीज केंद्रांनी नियमित, स्थिर प्रमाणात विद्युतनिर्मिती करून वीज पुरवावयाची आणि कमाल मागणीच्या काळात लागणारी वाढीव वीज मागणीच्या प्रमाणानुसार जलविद्युत केंद्रांनी पुरवावयाची असे वीज पुरवठ्याचे संतुलन नागरी व औद्योगिक व्यवहारांच्या सुकरतेसाठी आवश्यक आहे. जलविद्युत केंद्रामधून विद्युतनिर्मिती काही क्षणांच्या आतच सुरू किंवा बंद करता येते किंवा निर्मितीमध्ये तत्काळ वाढ वा कपात करता येते. औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांना असे करणे अशक्य असते. औष्णिक वीजनिर्मिती केंद्रे वीज मागणीतील चढउताराला समर्थपणे तोंड देऊ शकत नाहीत.

अनुक्रमणिका

४·८ कमाल वीजमागणीच्या काळात जलविद्युत निर्मितीसाठी वापरलेले पाणी रात्रीच्या वेळी जेव्हा विजेची मागणी कमी असते त्या वेळेत पुन्हा परत उंचावर असलेल्या जलाशयात पंपांद्वारे चढवून ठेवणे इष्ट ठरते. म्हणजे मग कमाल मागणीच्या काळात तेच पाणी पुन्हा प्रवाहित करून वाढीव वीजपुरवठा करता येतो. अशा प्रकारे जलविद्युत निर्मितीसाठी वापरलेले पाणी पुन्हा वरच्या जलाशयात चढविण्याची व्यवस्था असलेले पहिले संयुक्त विद्युतनिर्मिती व उदंचन केंद्र गोदावरी नदीवरच्या पैठणजवळील धरणामध्ये सन १९८४ मध्ये उभारले गेले. नर्मदेवरील आंतरराज्यीय सरदार सरोवर प्रकल्पातील नदीच्या पात्रात असलेल्या विद्युतनिर्मिती केंद्राची आखणी (१२०० मेगावॅट क्षमता) देखील याच दृष्टीने करण्यात आलेली आहे. अलीकडेच भंडारदरा जलाशयाच्या पश्चिमेस घाटमाथ्याच्या उंचीच्या घाटघर येथे, अशा प्रकारचे फेरनिर्मितीचे उपयोग करणारे जलविद्युत केंद्र (२५० मे. वॅ.) सह्याद्रीच्या पश्चिमेकडील पायथ्याजवळ कार्यान्वित करण्यात आले आहे. अशा केंद्रांची मालिका सह्याद्रीच्या पश्चिम पायथ्याशी वेगवेगळ्या घळींमध्ये उभी राहू शकेल. व त्यातून १०,००० मेगॅवॅटहून अधिक वीजनिर्मिती हाती येऊ शकेल असा अंदाज आहे. या तंत्राचा वाढता वापर भविष्यात आवश्यक राहणार आहे.

४·९ महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हा महाराष्ट्र राज्यातील स्थापित विद्युत क्षमता ८२८ मे. वॅ. इतकी होती. त्यापैकी जलविद्युत स्थापित क्षमता २९० मे. वॅ. इतकी होती. आता १० व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी एकूण स्थापित क्षमता १६३९२ मे. वॅ. अपेक्षित आहे. जलविद्युतची स्थापित क्षमता जानेवारी २००९ अखेर ३५४५ मे. वॅ. इतकी आहे. जलविद्युत क्षेत्रांत गेल्या पाच दशकांत दसपटीहून अधिक वाढ झाली आहे. जलविकासात आता जलविद्युत केंद्रांना ठळक स्थान मिळालेले आहे. विजेच्या कमाल मागणीच्या कालावधीमध्ये ५००० ते ५७०० मे. वॅ. इतक्या विजेची कमतरता महाराष्ट्रात तीव्रतेने भासत असून जागोजागी ३ ते १४ तास भारनियमन करावे लागत आहे. महाराष्ट्रात स्वतःच्या वीजनिर्मितीला ३ रु. प्रतियुनिटचा खर्च गृहित धरला असताना केवळ विजेची तूट भरून काढण्यासाठी इतर राज्यातून रु. ८ प्रति युनिट किंवा अधिक अशा दरानेदेखील वीज विकत घ्यावी लागत आहे. त्यामुळे नजीकच्या भविष्यात जलविद्युत निर्मितीला अधिक महत्त्वाची भूमिका बजावावी लागणार आहे.

४·१० अशारीतीचा पाण्यातून वीजनिर्मिती हाताळण्याचा पैलू परंपरागत जलव्यवस्थापन व्यवहारामध्ये अस्तित्वात नव्हता. पण आधुनिक ऊर्जाघन जीवनपद्धतीत ऊर्जा वितरणाचे स्थैर्य टिकवण्यासाठी पाण्याचा अशा प्रकारचा वापर हा जगभर फार उपयुक्त ठरला आहे. ज्या प्रमाणात प्रशासनातील विविध घटकांना व समाजाला याची स्पष्ट जाणीव राहील, त्या प्रमाणात यादृष्टीने हाती घ्यावयाचे प्रकल्प लवकर मार्गस्थ होतील. पाण्याचा वापर उपसा पद्धतीने सिंचनासठी करताना किंवा नागरी व औद्योगिक पाणीपुरवठ्यासाठी व वितरणासाठीही पाण्याच्या नियोजनाबरोबरच ऊर्जेच्या वापराचे नियोजन आता आवश्यक झाले आहे. ऊर्जेच्या चढ्या दरांमुळे यांत अधिक डोळसपणा लागणार आहे. शासकीय खर्चाने राबवलेल्या उपसा योजनांचा अनुभव पुरेसा बोलका आहे. त्या दिवसेंदिवस अधिकाधिक तोट्यात जाऊ लागल्या आहेत. त्यामुळे जलक्षेत्रांतील ऊर्जेचा वापर अधिक विवेकीपणाने यापुढे करावा लागेल, प्रत्येक खोऱ्यातील सर्व कुटुंबांना समन्यायी पाणी वाटप व्हायला हवे असा विचार अलीकडे मांडला जात आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील चिकोत्रा नदीच्या खोऱ्यांत यादृष्टीने एक सामाजिक प्रकल्प हाती घेतला जात आहे. त्यात उंचीवर वसलेल्या लोकसमूहांना उपसापद्धतीने पाणी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था अभिप्रेत आहे. उंचीवर वसलेल्या त्या लोकसमूहांना उपसा पद्धतीने पाळी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था अभिप्रेत आहे. विजेच्या वाढत्या किंमतींना तोंड देऊ शकतील अशा अधिक किंमतीच्या पाण्याच्या वापराची पीकरचना व उद्योगव्यवस्था त्यासाठी विकसित करावी लागणार आहे. यापुढची जलसंस्कृती ही केवळ

भावनिक किंवा पारंपरिक उपयोगांच्या आधारावर विकसित होणारी नसेल. तिच्यात नव्या तंत्रवैज्ञानिक क्षमतांची व सुयोग्य आर्थिक निकषांची गुंफण असावी लागेल. तसे होत नाही तोवर महाराष्ट्राजवळ यासाठी लागणारी नैसर्गिक भौगोलिक अनुकूलता व तंत्र वैज्ञानिक क्षमता असूनही व्यवहारात मात्र तिचा पुरेसा व नीट वापर होऊ शकत नाही अशी स्थिती राहील.

**भूजल**

४·११ अशीच काहीशी धूसर स्थिती भूजलाच्या पुनर्भरणाबाबत झालेली आहे. भूजलभरणाच्या उद्देशाने १९६०-१९८० या कालखंडात पूर्णपणे स्वदेशी असे पाझर तलाव उभारणीचे तंत्रज्ञान महाराष्ट्रात विकसित केले गेले व ग्रामीण जीवनात लोकप्रिय झाले. या पाझर तलावांचा उपयोग प्रामुख्याने पाणी जमिनीत जिरवण्यासाठी, भूगर्भातील जलसाठ्यांचे व जलस्त्रोतांचे पुनर्भरण करण्यासाठी आणि विशेष करून फाल्गुन महिन्यानंतर पुढे पावसाळा सुरू होईपर्यंतच्या काळात भूपृष्ठावरील पाण्याचे प्रचंड प्रमाणात होणारे बाष्पीभवन टाळण्यासाठी होतो. महाराष्ट्रात १९९५ पर्यंत १३००० हून अधिक पाझर तलाव उभारण्यात आले. त्यांत नंतरही स्थानिक मागण्यांना अनुसरून भर पडत राहिली आहे. विशेषकरून नद्यांपासून दूर अंतरावर असलेल्या उंचवट्यांच्या भागात धरण, कालवे व नळयोजना या मार्गांनी आवश्यक तितका पाणीपुरवठा सहजपणे वर्षभर करता येईल अशी शक्यता नसलेल्या ग्रामीण भागात भूजलस्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन व पुनर्भरण करणाऱ्या योजनांना एक वेगळेच महत्त्व आहे. ग्रामीण जनतेत लोकप्रिय होत चाललेल्या पाणलोटक्षेत्र विकासाच्या कामांमध्येही पाणी जिरवणारे समतल चर खोदणे व नालाबाधांनी पाणी अडवणे अशा माध्यमांतून भूजलाचे पुनर्भरण करण्याचे उद्दिष्ट समाविष्ट करण्यात आले आहे.

४·१२ भूमिगत जलस्त्रोतांचा चांगला उपयोग करण्यासाठी व त्यांचे पुनर्भरण घडवून आणण्यासाठी जमिनीचा प्रकार, खडकांचे प्रस्तर, भूपृष्ठाखालच्या विविध थरांची रचना, त्यामधील भेगा, घड्या आणि उंचसखलता, त्यांची पाणी साठविण्याची वा पाणी प्रवाहित ठेवण्याची क्षमता याची नीट माहिती असणे अत्यावश्यक आहे. या कामांसाठी भूजलतज्ज्ञांची, हवामान जलविशेषज्ज्ञांची आणि जलवैज्ञानिकांची मोठ्या संख्येत गरज आहे. ती नीट पूर्ण करण्यावरच यापुढील भूजलव्यवस्थापनातील कुशलता वाढू शकेल. अशा वैज्ञानिक जाणकारांची आज फार चणचण आहे. म्हणून येत्या काळात केवळ भूजल या विषयाकडेच नव्हे तर एकंदरीनेच जलविज्ञानाकडे वाढत्या प्रमाणात लक्ष देणे आवश्यक राहील. आजमितीला जलअभियंते उपलब्ध आहेत, पण जलवैज्ञानिक मिळत नाहीत. प्रशिक्षित जलवैज्ञानिकांचे मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर उभे करण्याची तातडीची गरज आहे. त्या अभावी आज पाणलोटक्षेत्रातील पावसाचे व पाण्याचे हिशोब नीट ठेवता येणे शक्य झालेले नाही. याबाबतींतील शैक्षणिक गरजा समाधानकारकपणे पूर्ण करण्यासाठी विविध विद्यापीठांनी विशेष प्रयत्न करून आपले उत्तरदायित्व समर्थपणे पार पाडायला हवे आहे. केवळ प्रशासकीय पुनर्रचनेतून व प्रशिक्षणांमधून सर्व उद्दिष्टे नीट हस्तगत होणार नाहीत. पाण्याची मोजणी, तपासणी, हिशोब या कामातील वैज्ञानिक कुशलता समाजाला उपलब्ध होण्यासाठी शैक्षणिक पुनर्रचनेचीही गरज आहे.

४·१३ महाराष्ट्राच्या आधुनिक जलविकासाच्या पहिल्या टप्प्यात ज्यावेळेला भूक्षेत्रीय सर्वेक्षण व बांधकाम यांना विशेष महत्त्व होते त्यावेळेला साहजिकच स्थापत्यशास्त्रप्रवणता महत्वाची होती व पुरेशी मानली जात होती. त्यानंतर कालव्यांच्या लाभक्षेत्र विकासाच्या अवस्थेत कृषिविज्ञानातील तज्ज्ञतेची गरज लक्षात आली. १९७२ च्या केंद्रीय सिंचन आयोगाच्या अहवालात यासाठी हाती घ्यावयाच्या कार्यवाहीवर

अनुक्रमणिका

विशेष भर देण्यात आलेला आहे. आता पाण्याच्या वाढत्या गरजांमुळे व पसरत्या प्रदूषणांमुळे पाणलोटक्षेत्रशः समन्वित नियोजन करावे लागणार आहे. त्यासाठी जलविज्ञानाची सम्यक समज असणाऱ्या व आंतरशाखीय समन्वयाची क्षमता असणाऱ्या कुशल तज्ज्ञांची फळी उभी करावी लागणार आहे. गेल्या दीड दोन शतकातील जलविकासाच्या उपक्रमांमध्ये प्रशासनाने विशेष रस व अग्रेसरत्व घेतल्याने शासनातील गुणदोषांचे प्रतिबिंब जलविकासाच्या प्राकृतिक रचना व व्यवस्थापन पद्धती यातही अपरिहार्यपणे उतरले आहे. शिवाय जलविकासासाठी लागणाऱ्या पैशाची गुंतवणूक हीसुद्धा मुख्यतः शासकीय माध्यमातून होत राहिल्याने शासकीय कार्यपद्धतीचा व विचारधारेचा प्रभावही जलव्यवस्थापनावर घट्ट पकड ठेवून आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या आजच्या जलसंस्कृतीची बरीचशी जडणघडण ही केवळ प्रशासनिक व स्थापत्य अभियांत्रिकी विचारांनी अधोरेखित झाली आहे. तिचे रूपांतर डोळस अशा विज्ञानप्रवण लोकसंस्कृतीत होण्यासाठी येत्या एकदोन दशकांमध्ये जलक्षेत्राच्या पुनर्रचनेचे विशेष प्रयत्न लागणार आहेत.

### ५·० महाराष्ट्राची जलनीती

५·१. १९६० साली नेमलेला पहिला सिंचन आयोग, १९९५ साली मुळात नेमलेला पण नंतर १९९७ साली व्यापक संदर्भात नामांतरित झालेला जल व सिंचन आयोग यांच्या व्यापक अभ्यासांव्यतिरिक्त महाराष्ट्रातील सिंचनविषयक व पाणीपुरवठा विषयक धोरणे व कार्यपद्धती यांना आकार देण्यासाठी तत्कालीन आवश्यकतेनुसार विविध समित्या महाराष्ट्र शासनाकडून स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यांचे जे मार्गदर्शनपर अहवाल उपलब्ध झाले त्यातील काही प्रमुख अहवाल सार्वत्रिक संदर्भासाठी प्रकाशितही झाले. उदा. अवर्षणप्रवण क्षेत्राची सत्यशोधन समिती-१९७३, आठमाही पाणी वापर समिती (१९७९), कोकण बृहत आराखडा समिती (१९८१), राज्यातील प्रादेशिक अनुशेषविषयक समिती (१९८४), मुंबई पाणीपुरवठा समिती (१९९५), मुंबई महानगर प्रदेश पाणीपुरवठा समिती (२०००). अशा प्रकारच्या समित्यांनी व वेळोवेळी नेमलेले इतर अभ्यास गट यांनी त्यांना सोपवलेल्या प्रश्नांसाठी जे अहवाल तयार केले, त्यांतील काही जरी अप्रकाशितही राहिले तरी त्यातील विचार महाराष्ट्रातील जलव्यवस्थापनाला दिशा देण्यात त्या त्या वेळी प्रभावी ठरले हे निःसंशय. अशा सर्व विचारांमध्ये एका दीर्घकालीन सुसूत्रतेचा स्पष्ट धागा असावा व केवळ शासनाच्या कार्यवाहीसाठीच नव्हे तर समाजातील पाणीविषयक वैचारिक व संस्थात्मक पुनर्रचनांसाठीही महाराष्ट्रापुढे सुस्पष्ट दिशा असावी म्हणून महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र राज्याची जलनीती जुलै २००३ मध्ये प्रसृत करण्यात आली. त्यातून एका नव्या उन्नत व्यवस्थेचा पाया घातला गेला आहे. स्वतःची स्वतंत्र अशी सुस्पष्ट जलनीती निश्चित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे. राज्यभरातील पाणी वापरकर्ते व पाण्याच्या विविध प्रयोजनांचे हक्कदार या सर्वांचे प्रतिनिधी यांचे विचार जाणून घेऊन मगच जलनीती ठरवण्यात आली.

५·२ अपेक्षेप्रमाणे जलसिंचन आयोगाच्या शिफारशींचा प्रभाव राज्याच्या या जलनीतीवर पडलेला आहे. महाराष्ट्र शासनाने जलसिंचन आयोगाच्या शिफारशींना अनुलक्षून १९९९ नंतर जे प्रशासकीय आदेश काढले, त्यांच्याही पलीकडे जाऊन अनेक अपेक्षित सुधारणांना धोरणात्मक असे कायमचे स्थान राज्याच्या जलनीतीत मिळाले आहे. त्याचा हितावह प्रभाव आता पाण्याच्या संबंधातल्या अनेक उपक्रमांमध्ये जाणवत आहे. जलसिंचन आयोगाच्या सविस्तर अहवालामुळे एक वेगळे वैचारिक वातावरण महाराष्ट्रात निर्माण झाले. याचे एक प्रमुख कारण म्हणजे महाराष्ट्र शासनानेच आयोगाचा पाच खंडांचा २००० पृष्ठांचा विस्तृत अहवाल लगोलग प्रकाशित करून तो कोणाही अभ्यासकाला खरेदी करता येईल व सहज उपलब्ध होईल

अशी अनुकूल स्थिती निर्माण केली. त्यामुळे आयोगाच्या अहवालात सुचवलेल्या परिवर्तनांना गती मिळाली. शिवाय शासनानेच केलेले महत्त्वाचे दोन मुख्य बदल म्हणजे ‘पाटबंधारे’ हे सीमित कर्तव्य दाखवणारे खात्याचे नाव बदलले जाऊन ‘जलसंपदा’ असे समर्पक नवे नाव ठेवले गेले आणि शेतकऱ्यांच्या पाणी वितरणाच्या सामूहिक संस्थात्मक रचना या सिंचनासाठी कायद्याने आवश्यक ठरवण्यात आल्या (२००५).

५·३ भारत सरकारने पाण्याबाबतची राष्ट्रीय जलनीती १९८६ मध्ये प्रस्तृत केली होती. तिच्या अनुपालनातील १५ वर्षांच्या अनुभवानंतर ती एप्रिल २००२ मध्ये सुधारित केली गेली. भारतातील भौगोलिक विविधता लक्षात ठेवून राज्य शासनांनी आपली जलनीती तयार करावी व येत्या दोन वर्षांत प्रसृत करावी असे त्या सुधारित जलनीतीत सुचवण्यात आले होते. त्याला अनुसरून महाराष्ट्र शासनाने पावले उचलली. १९६० नंतरच्या चाळीसहून अधिक वर्षांच्या अनुभवांचा आढावा घेऊन महाराष्ट्राच्या जलनीतीचा मसुदा महाराष्ट्र सिंचन परिषदेच्या मंचावर लोकांपुढे विचार विनिमयासाठी ठेवला गेला. साधकबाधक खुली चर्चा झाली. अशा सर्व चर्चांची दखल घेऊन जलनीतीच्या मसुद्यात योग्य त्या सुधारणा केल्या गेल्या. अशा प्रकारे लोकमंचावर जाऊन जलनीती तयार करणे हे एका अर्थाने जलक्षेत्रात पहिलेच क्रांतिकारक पाऊल होते. पारंतंत्र्याच्या काळापासून शासकीय चौकटीत बंदिस्त झालेला पाणी हा विषय प्रथमच खुलेपणाने आता लोकांपुढे आणला गेला. एक नवा चांगला पायंडा पडला. सध्याच्या सामाजिक व आर्थिक गतिशीलतेचे भान ठेवून महाराष्ट्राच्या जलनीतीत अशी तरतूद करण्यात आली आहे की दर पाच वर्षांनंतर राज्याच्या जलनीतीचे नियतकालिक पुनरावलोकन करण्यात येईल. ही स्वागतार्ह तरतूद प्रगतिशील व्यवस्थेला व सामाजिक उपक्रमशीलतेला प्रोत्साहन देणारी आहे. त्याचा अनुकूल प्रभाव पाणीक्षेत्रातील यापुढील परिवर्तनांवर होत राहील. स्वतःच्याच जलनीतीच्या प्रकाशात पंचवार्षिक योजनेची रचना व अंमलबजावणी करण्याची पहिली संधी आता २००७-२०१२ या ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात मिळते आहे. त्याकरिता ‘पाणी सर्वांचे सर्वांसाठी’ हे सूत्र असावे असा विचार मांडला जात आहे. कदाचित या पंचवार्षिक योजनेत पूर्णतः जरी नव्हे, तरी पुढील पंचवार्षिक योजनांमध्ये या दिशेने होणाऱ्या प्रगतीवरच महाराष्ट्राच्या जलनीतीचे यश अवलंबून राहणार आहे.

**पाणी वाटपाचा प्राधान्यक्रम**

५·४ उपलब्ध होणाऱ्या पाण्याच्या उपयोगाबाबतचा जो प्राधान्यक्रम जलनीतीमध्ये उद्‌धृत करण्यात आला आहे, त्याबद्दलच्या जनमानसातील अनेक शंका विविध मंचावरून व्यक्त केल्या जात आहेत. स्वीकृत प्राधान्य क्रमात पिण्याचे पाणी व पाण्याचा घरगुती वापर, याला पहिला क्रमांक आहे. यात मानवी आरोग्य व स्वच्छता याबरोबरच पशुधनासाठी लागणारे पाणी समाविष्ट असणे अपेक्षित आहे. यानंतर दुसऱ्या क्रमांकावर औद्योगिक व वाणिज्यक वापर व कृषिउत्पादनावर आधारित उद्योग आहेत. पण ते औद्योगिक वापर या एकत्रित शीर्षकाखाली आहेत. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर कृषी व जलविद्युत आहेत. चवथ्या क्रमांकावर पर्यावरण व करमणूक यासाठी लागणारे पाणी आहे. त्यानंतर इतर उपयोग आहेत. पिण्याच्या पाण्याखालोखाल शेतीतील पाणीवापराला प्राधान्य दिले जावे असे अनेक जण सुचवत असतात. वस्तुतः प्रति लिटर पाण्याची आर्थिक मूल्यवृद्धीची अधिकाधिक क्षमता व रोजगार निर्मितीची सुलभता यांचा विचार करून त्या अनुषंगाने उद्योगातील पाणीवापराला कृषीपेक्षा अधिक प्राधान्य देण्यात आलेले दिसते. शिवाय एकूण उपलब्ध पाण्यापैकी ७५ टक्के पाणी सध्या शेतीसाठी वापरात येते. त्याच्या तुलनेत उद्योगक्षेत्रातील १० टक्के पाणीवापर हा फार उल्प आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे शेतीमध्ये होऊ शकणारी पाण्याची बचत हीच उद्योगक्षेत्राची वाढती गरज भागवू शकेल असे दिसते. पाणीवापराच्या प्राथमिकतेसारख्या मुद्यांवर अधिक

चर्चा उपयुक्त ठरणार आहे. महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीला काळानुरूप योग्य ते वळण देण्याचे काम जलनीतीच्या सुधारणांमधूनच होणार आहे. त्यामुळे लोकमंचावर जलनीतीतील विविध मुद्यांवर फार व्यापक प्रमाणात चर्चा घडवून आणून नंतरच तिचे यापुढील सुधारीत रूप तयार करणे हितावह राहील.

**आर्थिक संतुलन**

५·५ महाराष्ट्राच्या जलनीतीत पाण्याच्या क्षेत्रात खासगी भांडवलालाही प्रोत्साहन देण्याची तरतूद करण्यात आली आहे. जवळपास गेल्या १५० वर्षांहून अधिक काळ जलक्षेत्रातील शासकीय एकाधिकारी स्वरूपात, जल विकासाची व व्यवस्थापनाची धुरा सरकारी उपक्रमांमाधून वाहिली गेली. आता यांतील शक्य तितकी जबाबदारी अन्य समाजघटकांवरती सोपवण्याचा उद्देश स्वागतार्हच आहे पण त्यासाठी सामाजिक कल्याणाच्या मुख्य उद्देशाला अनुरूप अशी पारदर्शी व्यवहारपद्धति अमलात आणावी लागली. १९९६-९८ या काळात महाराष्ट्र सरकारने शासकीय कोषाबाहेरील भांडवल, सिंचन विकासासाठी उपयोगात आणण्याच्या दृष्टीने पाऊल टाकले होते. महाराष्ट्रातील नद्यांच्या खोऱ्यांतील सिंचन विकास योजना राबविण्यासाठी पाच वेगवेगळी महामंडळे स्थापण्यात आली. त्यासाठी विधिमंडळांत कायदे करताना त्यांची कार्यवाही पूर्णपणे स्वतंत्र व स्वायत्त अशा आर्थिक, प्रशासनिक आणि व्यवस्थापकीय तत्त्वांवर सुचवण्यात आली. त्या महामंडळांना त्यांच्यामार्फत पुरविण्यात यावयाच्या पाण्यासाठी व सुविधांसाठी त्यांनी गुंतवणूक केलेल्या भांडवलावरील व्याज व इतर खर्च यांची भरपाई होऊ शकेल अशा दराने मूल्य आकारणी करण्याचे अधिकारही देण्यात आले. परंतु त्या रचनेत एक महत्वाचा दोष राहिलाच. तो दोष म्हणजे या सगळ्या संस्थांची संघटनात्मक रचना आणि कार्यपद्धती या सरकारी यंत्रणांप्रमाणेच राहील्या. त्यांच्यावरचे व्यावहारिक नियंत्रणही सरकारचेच राहिले. आर्थिक निकषांवर चालणाऱ्या संस्थांसाठी आवश्यक असणारे बदल त्यांच्यामध्ये केले गेले नाहीत. त्यामुळे शासनावलंबित अशा महामंडळांना बांधकामाची तत्कालीन गती वाढवण्यापलीकडे फार काही नव्याने करणे जमले नाही.

५·६ वस्तुतः सरकारच्या तिजोरीबाहेर समाजामध्ये उपलब्ध असणाऱ्या भांडवलाच्या आधारावर आर्थिकदृष्ट्या यशस्वी होणारे अनेक उपक्रम समाजात चालू आहेत. ते मोठा लांभाश देणारे भले नसले तरी किमान आतबट्ट्याच्या स्थितीत नसणारे व शासनावर फारसा बोजा न टाकणारे असे आहेत. उदा. महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था. पाणी ही जर समाजाची अत्यावश्यक गरज आहे, तर ती गरज पूर्ण करणाऱ्या यंत्रणा त्या पाण्याचा लाभ घेणाऱ्यांच्या सक्रिय आधारावर आर्थिक व्यवहारात टाकाऊ होणे अशक्य होऊ नये. पण केवळ सिंचन प्रकल्पांचीच नव्हे तर पाणीपुरवठा मंडळे, नगरपालिकांच्या पाणी वितरण व्यवस्था आणि ग्रामीण क्षेत्राला पिण्याचे पाणी पुरविणाऱ्या पंचायती संस्था यांचीही स्थिती आर्थिक दृष्टीने असमाधानकारक अशीच राहिली आहे. पाणीपुरवठा योजनांवर आणि त्यांच्या व्यवस्थापनांवर होणारा सतत वाढणारा खर्च आणि पाणीपुरवठ्यांमधून मिळणारी तुटपुंजी महसुली जमा यांची तोंडमिळवणी होत नसल्यामुळे त्यांची वित्तीय स्थिती दिवसेंदिवस अधिक चिंताजनक होत आहे. सिंचनासाठी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे दर हे भांडवली खर्चावरील व्याज जरी सोडले तरी किमान त्या योजनांच्या वार्षिक व्यवस्थापनासाठी व देखरेख दुरुस्तीसाठी होणारा खर्च भागेल इतपत तरी असायलाच हवेत. तसे न झालेल्या शेतीसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करणाऱ्या सिंचन योजना राज्य सरकारच्या दृष्टीने आर्थिक स्रोताची बळकट धारा बनण्याऐवजी सरकारच्या डोक्यावरील एक अवजड ओझे बनतात.

५·७ व्यवस्थापनावरील खर्च व पाणीपट्टीमधून येणारे वार्षिक उत्पन्न यामधील तफावत कमी करण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने मोठ्या धिटाईने सिंचन/बिगर सिंचन पाणीपट्टीच्या दरात १ सप्टेंबर २००१ पासून पुढील तीन वर्षांसाठी टप्प्याटप्प्याने (१५ टक्के प्रतिवर्षी) वाढ केली. दिनांक १ सप्टेंबर २००६ पासून बिगर सिंचन दरात आणखी वाढ करण्यात आली. वाढत्या महागाईमुळे राज्यातील प्रकल्पांच्या किंमतीत दरवर्षी सुमारे १२ ते १५ टक्के वाढ होत आहे. तसेच व्यवस्थापनाच्या आस्थापनेतसुद्धा १० टक्के वाढ होत आहे. त्यामुळे संकल्पित १५ टक्के प्रतिवार्षिक वाढ ही आवश्यकच होती. त्याचा लाभही आता शासनाला जाणवू लागला आहे. पाटबंधारे खात्याच्या व्यवस्थापनावर होणारा वार्षिक खर्च गेल्या दोन वर्षांपासून आता पूर्णतः पाण्याच्या महसुली उत्पन्नातून भागवला जात आहे. राजकीय लोकप्रतिनिधी व समाजातील पुढारी यांनी शासनाची ही नवी दरव्यवस्था समाजाच्या पचनी पडेल व लाभधारकांमध्ये स्वीकारली जाईल अशीच इष्ट भूमिका घेतली, त्याला या यशाचे श्रेय आहे. समाजमानसातला एक मोठा सांस्कृतिक बदल यामुळे घडून आला आहे. आपल्याला मिळणाऱ्या सेवेचा योग्य तो मोबदला आपण द्यायला हवा ही सामाजिक मानसिकता फार महत्त्वाची आहे. पाणीपट्टी वसुलीतून देखभाल दुरुस्तीचा पूर्ण खर्च भागवणारे महाराष्ट्र हे भारतांतील पहिलेच राज्य ठरले आहे!

५·८ शहरी भागातील नागरिकांच्या वैयक्तिक उत्पन्नात विशेषतः गेल्या तीन दशकांमध्ये खूपच वाढ झाली आहहे. त्याचप्रमाणे ज्या ग्रामीण भागात सिंचन योजनांचा फायदा मिळतो, त्या क्षेत्रातील भागातील बँकांमधील ठेवीदेखील त्या क्षेत्रातील वाढत्या उत्पन्नांमुळे चांगल्याच वाढत्या आहेत. तरीदेखील त्याची परिणती नगरपालिकांच्या पाणीपुरवठा अथवा मलनिस्सारण योजनांसाठी किंवा ग्रामीण भागातील सिंचन योजनांच्या विस्तारांसाठी वाढीव आर्थिक पाठबळ मिळण्यामध्ये झालेली नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जेव्हा अशा प्रकारच्या योजना राबवण्यास सुरुवात झाली तेव्हा या योजनांमुळे समाजाचा जीवनस्तर व उत्पन्नस्तर वाढेल आणि त्यामुळे साहजिकच या योजनांच्या कार्यक्षम व्यवस्थापनासाठी आणि नंतर अशा प्रकारच्या योजनांच्या विस्तारासाठी पुरेसे अर्थबळ त्यातून उभे राहील अशीच अपेक्षा केली गेली होती. परंतु ती अपेक्षा अजूनही पूर्ण झालेली नाही. कारण जलविकास म्हणजे शासकीय गुंतवणूक व सवलतीचे दर हा विचार अजून समाजमनात घट्ट मूळ धरून आहे. पाण्याच्या क्षेत्रातील भारतीय परंपरांचा वारसा अभिमानपूर्वक मांडताना त्या परंपरांमधील आर्थिक स्वायत्ततेची, शिस्तीची व स्वयंपूर्णतेची कार्यपद्धती सोयीस्करपणे डोळ्याआड केली जात आहे. त्यामुळे ज्यांना अशा सुविधा अजून मिळालेल्या नाहीत त्यांना आर्थिक मर्यादांच्या कारणाने भावी लाभांसाठी दीर्घकालीन खडतर प्रतीक्षा करावी लागत आहे. विकासाची एकंदर गती त्याप्रमाणात अवगुंठित होते आहे.

**६·० नवी सामाजिक भूमिका**

६·१ माणसाभोवतीचे जसे पर्यावरण तशी त्याची संस्कृती बनते असे मानले जाते. पाण्याची स्थिती हा तर पर्यावरणातला मोठा प्रभावी घटक, सर्व सजीव सृष्टीचा आधार म्हणून पाण्याच्या अस्तित्वाला अनुसरून पर्यावरण बदलते. तद्नुसार पाण्याशी असणारे समूहांचे नाते बदलते व त्याची जलसंस्कृती बदलते असे दिसते. अवर्षणग्रस्त वाळवंटात राहणारा माणूस आणि हुकमी येणाऱ्या बारमाही पावसाच्या प्रदेशात राहणारा माणूस यांच्या राहणीत, पोषाखात आणि विचार करण्याच्या पद्धतीतही फरक पडतो. महाराष्ट्राच्या एकूण लागवडीयोग्य क्षेत्रांपैकी १३ टक्के क्षेत्र पाण्याच्या अतितुटीच्या उपखोऱ्यांमध्ये आहे. तेथे पाण्याची (दर हेक्टरी उपलब्धता १५०० घनमीटरपेक्षाही कमी) आहे. ३२ टक्के क्षेत्र तुटीच्या उपखोऱ्यांमध्ये आहे तेथे (पाण्याची उपलब्धता ३००० घन प्रति हेक्टरपेक्षा कमी) आहे. ३४ टक्के क्षेत्र सर्वसाधारण

अनुक्रमणिका

उपलब्धतेचे आहे आणि केवळ ६ टक्के क्षेत्र विपुलतेचे (दर हेक्टरी पाणी ८००० घ.मी.पेक्षा जास्त) व १५ टक्के क्षेत्र अति विपुलतेचे आहे, म्हणजेच दर हेक्टरी १२००० घ.मी. प्रतिहेक्टरपेक्षा जास्त पाणी असणारे निसर्गताच आहे. पाण्याच्या उपलब्धतेत इतकी विषमता असताना तेथील समाजजीवनात होणारा पाण्यासंबंधीचा विचार वेगवेगळ्या धर्तीचा असणे अपरिहार्य आहे.

६·२ नैऋत्य मोसमी वाऱ्यांबरोबर आलेला विश्वासार्ह पाऊस हा सह्याद्रीतून उगम पावणाऱ्या गोदावरी, भीमा, कृष्णा, वारणा, पंचगंगा या नद्यांना मोठा आधार देणारा ठरला आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत सह्याद्रीला लाभलेला पाणी हा विपुलतेचा नैसर्गिक ठेवा एका छोट्या पट्ट्यापुरता मर्यादित आहे. अशी अनुकूलता असलेला भूप्रदेश महाराष्ट्राच्या एकूण भूप्रदेशांपैकी केवळ २० टक्के आहे. नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर ही रेषा त्या लाभकारी पट्ट्याच्या उत्तर दक्षिण अक्ष असल्याप्रमाणे आहे. या उलट महाराष्ट्राच्या अवर्षणप्रवण पट्ट्यातून उगम पावणाऱ्या ज्या नद्या आहेत उदा. येरळा, माण, सीना, तेरणा, मांजरा, दुधना, पूर्णा व पैनगंगा यांची जन्मजात दुर्बलता ही त्यांच्या उगमस्थानांच्या परिसरातील अनिश्चित व तोकड्या पावसामुळे आहे. अशा या बेभरवशाच्या नद्यांवर अवलंबून असलेले महाराष्ट्राचे सलग क्षेत्र सर्वात मोठे, जवळपास ४० टक्क्यांहून अधिक आहे. म्हणून या प्रदेशाला जलनियोजनांसाठी सह्याद्रीच्या पूर्वपायथ्याजवळील प्रदेशाचे अनुकरण करता येणार नाही. तशीच विसंवादी स्थिती पूर्वेकडून पश्चिमेकडे उलट दिशेने वाहणाऱ्या तापीच्या खोऱ्याची आहे. ते महाराष्ट्राचे सर्वाधिक तुटीचे खोरे आहे. या उलट उत्तर दक्षिण वाहणाऱ्या वैनगंगा व मुख्यतः ती पूर्वेकडून येणाऱ्या तिच्या उपनद्यांचे नागविदर्भातील क्षेत्र मुबलक पावसाचे आहे. अशा या पावसाळ्याच्या भिन्नतेमुळे व तज्जन्य नैसर्गिक विषमतेमुळे या वेगवेगळ्या पर्जन्य पट्यातील लोकांचे पाण्याशी असणारे नाते व त्यातून उभी होणारी जलसंस्कृती ही भिन्न छटांची आहे.

६·३ सामान्यतः पावसाच्या पाण्याची उपलब्धता जेवढी अनिश्चित तेवढी समाजप्रवृत्ती ही अधिक दैववादी होते, प्रयत्नपराङ्मुखता येते. निसर्गाची अशी विचित्र रचना आहे, की ज्या प्रदेशांत पर्जन्यमान कमी, त्याच प्रदेशांत पर्जन्यमानातील अनिश्चितताही अधिक, एखाद्या वर्षी कधी तरी उत्तम पावसाळा तर लगेच पुन्हा कधी तरी अचानक भीषण दुष्काळ महाराष्ट्राचे ४० टक्क्यांहून अधिक भूक्षेत्र हे अशा अनिश्चिततेला तोंड देत असल्यामुळे तेथील केवळ पर्जन्याधारित शेतीच्या क्षेत्रांत दैववादाचा सर्वाधिक प्रभाव जाणवतो. सह्याद्रीच्या कुशीत विश्वासार्ह पावसाच्या प्रदेशात पाण्याची साठवण करून अवर्षणप्रवण क्षेत्रातील काही भागाला सिंचनाचा भक्कम आधार पावसाळ्यानंतरच्या महिन्यांतही निर्माण केला गेला आहे. उदा. नीरा, प्रवरा, खडकवासला, गोदावरी या कालव्यांचे क्षेत्र. त्यामुळे तेथील समाज दैववादाच्या वर उठून हळूहळू प्रयत्नवादी व उपक्रमशील बनला आहे. महाराष्ट्रात विविधांगी ग्रामीण समृद्धी व आधुनिक शैक्षणिक संकुले याच टापूंमध्ये बहरतांना दिसतात. सलग सिंचनाची नवीन क्षेत्रे जसजशी विस्तारत आहेत तसतशी दैववादाकडून प्रयत्नवादाकडे समाजाची वाटचाल होताना दिसते आहे. वर्षाकालीन अनिश्चित शेतीचे रूपांतर किमान दुहंगामी सिंचन शेती व्यवस्थेमध्ये घडवून आणणे हे भारताच्या सिंचन व्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रातील २२५ लाख हेक्टर लागवडीयोग्य क्षेत्रापैकी अंतिमतः १२६ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल असा जलसिंचन आयोगाने केलेला अंदाज आहे. त्यांतील किमान ६० लाख हेक्टर हे दुहंगामी उपयोगात यावे अशी अपेक्षा आहे. त्यातून एका आत्मनिर्भर ग्रामीण समाजाची उभारणी होऊ शकेल. जून २००८ पर्यंत २७ लाख हेक्टर क्षेत्रच प्रत्यक्षात सिंचन लाभान्वित होत आहे. पण तेवढ्यातूनही निर्माण झालेली ग्रामीण समृद्धी व उन्नत जीवनाची शक्ती ही लाभान्वित सिंचनाने न झालेल्या प्रदेशांपेक्षा वेगळी उठून दिसते आहे.

अनुक्रमणिका

६·४ प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून असलेल्या आणि पावसाच्या पाण्याशिवाय अन्य कोणत्याही मार्गाने पाणी मिळण्याची सोय नसलेल्या भागातील महाराष्ट्रीय जनतेला पूर्वी दुष्काळ ही सर्वात मोठी, महाभयानक आपत्ती वाटत असे. परंतु गेल्या काही दशकांतील शासनाच्या व लोकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे, निरनिराळ्या सिंचन योजना, त्याबरोबर शेतामालावर प्रक्रिया करणारे उद्योग, शेती उत्पादनाची साठवण आणि विक्री करण्याच्या व्यवस्था यांसारख्या सोयीसुविधा ग्रामीण विभागात अनेक ठिकाणी उपलब्ध झाल्या. त्यामुळे पूर्वी वर्षानुवर्षे अत्यंत गरिबीत व दैन्यावस्थेत जीवन कंठावे लागणाऱ्या अनेक ऐतिहासिक दुष्काळग्रस्त भागांतून आता संपन्नता स्पष्टपणे दिसू लागली आहे. उदा. बीड जिल्ह्यातील मांजरा नदीचा परिसर. त्या परिसरातील वाढत्या उपक्रमशीलतेतून नवनवे प्रक्रियाउद्योग वाढीस लागेले आहेत. पारंपरिक दैववादी समाजाचे प्रयत्नवादी व परिश्रमवादी समाजसमूहांमध्ये रूपांतर झालेले स्पष्ट दिसते आहे.

६·५ मोठ्या उंच धरणांची निर्मिती हा नव्या आधुनिक जलव्यवस्थेचा एक अविभाज्य घटक आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर जलविकासाच्या अगदी प्रारंभीच्या टप्प्यांतच धरणबांधणीच्या तंत्रांबद्दल साशंकता निर्माण करणाऱ्या दोन अपघाती प्रसंगांना महाराष्ट्राला तोंड द्यावे लागले. बांधकामाखाली असलेले मातीचे पानशेत धरण १९६१ मध्ये अवकाळी आलेल्या तीव्र पावसामुळे फुटले व त्याखालचे खडकवासला धरणही त्यामुळे फुटले. नंतर १९६७ मध्ये झालेल्या कोयना धरणाच्या परिसरांतील मोठ्या भूकंपामुळे त्या धरणालाही विशेष दुरुस्तीची आवश्यकता निर्माण झाली. पण या दोन्ही अपघातांची वैज्ञानिक कारण मीमांसा समजावून घेतल्यानंतर पुन्हा तेथेच नवे पानशेत धरण, खडकवासला धरण व दुरुस्त कोयना धरण उभे राहिले व गेली ४ दशके ते स्थानिक जलसेवेचे मोठे आधार ठरले आहेत. समाजाने डोळसपणे या अपघातांकडे पाहिले व नव्या धरणनिर्मितींना विरोध केला नाही. समाजात नवी तंत्रवैज्ञानिक जलव्यवस्था रुजण्याचा तो काळ होता. त्यावेळच्या समाजाच्या समंजस भूमिकेमुळेच नंतर मोठाल्या धरणांची शेकडो कामे महाराष्ट्रात आत्मविश्वासपूर्वक पूर्ण होऊ शकली. १९७० पूर्वी महाराष्ट्रात २४० मोठी धरणे (१५ मी. पेक्षा अधिक उंचीची) पूर्ण झाली होती. त्यानंतर त्यांत आतापर्यंत आणखी १४१५ मोठ्या धरणांची भर घालण्यात आली आहे व सध्या आणखी नवी १६९ मोठी धरणे महाराष्ट्रात प्रगतिपथावर आहेत.

६·६ महाराष्ट्राने आजवर प्रकल्पांच्या नियोजनात पाण्याच्या वापरासाठी अवलंबिलेला ७५ टक्के विश्वासार्हतेचा निकष शास्त्रशुद्ध नाही. या निकषाचा अर्थ चार वर्षांतील तीन वर्षे पुराचे पाणी सांडव्यावरून वाहून जाऊ देणे असा होतो. त्यातून पाण्याचा इष्टतम उपयोग सिद्ध होत नाही. अशा प्रकारचा निकष जलप्रकल्पांच्या नियोजनात जगात इतरत्र कोठेच अस्तित्वात नाही. केंद्रीय जलआयोगाच्या नद्यांच्या राष्ट्रीय हिशोबांमध्ये व भारतीय मानक संस्थेने तयार केलेल्या विविध मानकांमध्येही त्याचा पुरस्कार नाही. विश्व बँकदेखील हा निकष अग्राह्य मानते. म्हणून प्रकल्पांच्या जलनियोजनात जलसाठ्यांचे आकारमान ठरविताना वार्षिक सरासरी वा त्यापेक्षा कमी विश्वासार्हतेच्या पाण्याचा उपयोग करण्यात कोणताही प्रत्यवाय नाही. केवळ आर्थिक सफलता व व्यवस्थापनाचे व्यावहारिक निकष लावूनच प्रकल्पांचे शास्त्रीय नियोजन करणे यापुढे इष्ट होईल. त्यामुळे केवळ पावसाळ्यातील पुराच्या पाण्याची साठवण शीतकालीन व उन्हाळी पिकांसाठी करायची एवढेच मर्यादित उद्दिष्ट न राहता, सरासरीपेक्षा अधिक पाऊस झालेल्या वर्षामध्ये उपलब्ध होणारे पाणी त्यापुढील कमी पावसांच्या वर्षासाठी राखीव साठा म्हणून हातात बाळगायचा व त्यातून पाणी पुरवठ्याचे व त्यावर आधारित जीवनव्यवस्थांचे स्थैर्य वाढवायचे हे प्रमुख उद्दिष्ट असावे लागेल. वाढीव साठ्यांवरची वाढीव जलविद्युत निर्मिती हाही एक मोठा लाभ राहीलच. लहरी

निसर्गावर मात करून सामाजिक व आर्थिक स्थैर्य निर्माण करायचे म्हणजे अशा प्रकारच्या अधिक शास्त्रशुद्ध रचना अंगिकारायला हव्यात. महाराष्ट्रात वापरायला अनुमती असलेल्या १२५ अब्ज घनमीटर पाण्याच्या तुलनेत २००७-०८ या वर्षापर्यंत प्रत्यक्षात जेमतेम ३० अब्ज घनमीटरपर्यंतचे पाणी साठववणीत आणले गेले आहे. उर्वरित पाणीवापराचे यापुढील नियोजन करताना फसव्या अशास्त्रीय नियोजनपद्धतीत अडकून न पडता, जलाधारित सर्वंकष सामाजिक विकासासाठी आधुनिक पद्धतीच्या जलनियोजनाची कास धरावी लागेल.

**पाण्याची उत्पादकता**

६·७ महाराष्ट्रात गेल्या ५० वर्षांचा काळ हा मूलतः पायाभूत सोयींचा विस्तार करण्यात म्हणजेच पाणी साठवणीची व वितरणाची कामे करण्यात गेलेला आहे. अजूनही यापुढे महाराष्ट्रात या प्रकाराचे निम्म्याहून अधिक काम करावयाचे शिल्लक आहे. पण त्याबरोबरच आता आणखी एक दुसरे महत्त्वाचे काम हाती घ्यावे लागणार आहे. ते म्हणजे जेथे पाणी उपलब्ध करून दिले आहे तेथे पाण्याची उत्पादन क्षमता वाढविणे. जगाच्या तुलनेत महाराष्ट्रातील अन्नधान्याची उत्पादकता दर हेक्टरी हिशेबात निम्म्यापेक्षाही कमी आहे. उपलब्ध जमिनीच्या तुलनेत उपलब्ध पाणी हे बहुतेक खोऱ्यांमध्ये फार कमी आहे. पाण्याचा कुशल वापर हा पीकउत्पादनाचा निर्णायक घटक आहे. म्हणून वर्षाकालीन पर्जन्याधारित शेती पद्धतीला अनुसरून यापुढे उत्पादकता ही केववळ प्रति हेक्टरी संदर्भात व्यक्त न करता उपलब्ध पाण्याचा प्रति घनमीटर / प्रतिलिटर या परिमाणात सांगितली जाणे आवश्यक आहे. सिंचन प्रकल्पांचे वार्षिक मूल्यांकन प्रसिद्ध करताना महाराष्ट्राच्या जलसंपदा विभागाने विविध प्रकल्पांतील पाण्याची वास्तविक प्रतिघनमीटर उत्पादकता देण्याची कालोचित पद्धत अलीकडेच स्वीकारली आहे. पण उत्पादकतेची ही नवी परिभाषा व त्याचे पाण्याचे एकक शेतकरी वर्गात व जनमानसात रुळलेले नाही. हा एक फार मोठा बदल यापुढे घडवून आणावा लागणार आहे. यशस्वी अनुकरणीय शेतकरी कोण, प्रतिष्ठा व गौरव कोणाला, तर प्रतिहेक्टरी उत्पादकतेत अग्रेसर ठरणाऱ्याला नाही. तर प्रति घनमीटर / प्रतिलिटर अधिक मूल्यदायी उत्पादन देऊ शकणाऱ्याला. पाण्याच्या व्यवस्थापनेतील सफलतेची ही नवीन सामाजिक व्याख्या समाजात रुढ व्हायला हवी आहे. शिवाय जलविकासाचा विचार गेल्या पाच दशकांमध्ये मूलतः जमिनीवरील उत्पादनांच्या संदर्भात सीमित झाला आहे. जलीय हेसुद्धा स्वतंत्रपणे स्वतःचे उत्पादक असते उदा. मत्स्योत्पादन, शिंगाडे, खस गवत, कमळबी यांची निर्मिती. या बाजूकडे अजून पुरेसे लक्ष गेलेले नाही. वस्तुतः ऐतिहासिक परंपरेने या उत्पादनांशी जोडले गेलेले व्यावसायिक समाजघटक मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात अस्तित्वात आहेत. नवनिर्मित तलावांच्या डूब क्षेत्रातील विस्थापित मूळ रहिवाशीसुद्धा या जलोत्पादनांवर आधारित व्यवसायांकडे वळू शकतात. पण त्या दृष्टीने एका वेगळ्या जीवनरचनेत त्यांना आणायचे प्रयत्न झालेले नाहीत. व्यापक जलसंस्कृतीचाच अंगभूत भाग असलेली मत्स्यसंस्कृती किनारपट्टीवरच्या व्यवसायाव्यतिरिक्त नदी, नाले, तलाव यांच्या संदर्भातही महत्त्वाची आहे. या पैलूकडे अजून पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही. ललित साहित्यात त्याचे काव्यात्मक वर्णन येते. पण आर्थिक, सामाजिक प्रशासनिक व्यवस्थेत त्या सांस्कृतिक धारेचे अजून पुरेसे सबळीकरण झालेले नाही.

६·८ प्रारंभी केवळ अन्नधान्य उत्पादनासाठी संरक्षण देण्याचे उद्दिष्ट असणाऱ्या सिंचनाच्या व्यवस्थेकडून आता सर्वंकष ग्रामीण समृद्धीच्या दिशेने सिंचन व्यवस्थेची फेरजुळणी, सामाजिक व आर्थिक परिवर्तनांमधून होऊ लागलेली आहे. पाण्याच्या चणचणीमुळे आर्थिक बदलांमुळे व बाजारभावांमुळे लोक आपणहून हौसेने पीक रचना बदलत आहेत. उदा. उसाऐवजी डाळिंबे, द्राक्षे घेण्याकडे वाढता कल आहे.

अनुक्रमणिका

यादिशेनेच फळबाग, भाजीपाला, फूलशेती यांचे प्रभावी स्थान यापुढे सिंचनव्यवस्थेत वाढते राहणार आहे. सिंचनाच्या प्रतिघनमीटर पाण्यातून अधिक उत्पन्न देणाऱ्या पीकव्यवस्थेकडे शेतकरी वर्ग हळूहळू वळतोच आहे.

६·९ शेतीतील उत्पादकतेसाठी शेतजमिनीला नाही, त्यावरील पिकालाही नाही तर पिकाच्या मुळांना त्यांच्याजवळ अनुकूल अशी आर्द्रता निर्माण करून द्यावी लागते. मातीचे वाफे करून पिकाला पाणी देणारी व त्यामुळे पाण्याच्या वाफारण्यातून पाणी वाया घालवणारी जुनी कालबाह्य पद्धत टाकून द्यावी लागणार आहे. ठिबक, तुषार, सूक्ष्मसिंचन यासारख्या आधुनिक सिंचन प्रणालींचा अतिशय द्रुतगतीने अंगीकार करण्याची गरज आहे. अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इटली या प्रगत देसात ७०-७५ टक्के शेती ही आधुनिक सिंचन प्रणालीचा वापर करून केली जाते. इस्रायलमध्ये तर १०० टक्के शेती अशा सिंचनप्रणाली खाली आहे. महाराष्ट्रात मात्र आजमितीस हे क्षेत्र केवळ पाच लक्ष हेक्टरच्या आसपास आहे. महाराष्ट्राची निर्मिती झाली तेव्हा व्यवहारात असलेल्या कालव्यावरील सिंचन पद्धतीखालील एकूण २·७५ लाख हेक्टर सिंचन क्षेत्रातील आता आधुनिक तंत्राखाली आलेले सिंचनाचे ५ लाख हेक्टर क्षेत्र हेसुद्धा, महाराष्ट्रातील आधुनिक दिशेने होणाऱ्या विकासाची व परिवर्तनाची उत्तम साक्ष आहे. पण आजच्या एकूण २५ लाख हेक्टर प्रत्यक्ष सिंचन क्षेत्रापैकी केवळ ५ लाख हेक्टरच अजून आधुनिक पद्धतीवर आहे (२० टक्के) ही स्थिती लक्षात घेतली तर अजून सिंचनाच्या शेतीत केवढा मोठा बदल घडवून आणावा लागणार आहे याची कल्पना येते. ठिबक पद्धत, तुषार पद्धत, सूक्ष्मसिंचन पद्धत, यासारख्या आधुनिक सिंचन तंत्रांमुळे अधिक किंमत मिळवून देणारी उच्च प्रतीची पिके कमी पाण्यात घेता येतात. काही तंत्रांमध्ये पाण्यात विरघळवलेल्या खतांचा पाण्याद्वारे योग्य त्या प्रमाणात पुरवठा करता येतो. त्यामुळे खतांचा वापर पण कमी करावा लागतो. पारंपरिक पद्धतीपेक्षा निम्म्याच पाण्यात व कमी खतांचा वापर पण कमी करावा लागतो. पारंपरिक पद्धतीपेक्षा निम्म्याच पाण्यात व कमी खतांचा वापर करूनही अधिक प्रमाणात अधिक चांगले पीक घेता येते. पण असे सर्वागीण दृष्टीने प्रगत सिंचन क्षेत्र महाराष्ट्रात १ लाख हेक्टरहून कमी आहे. वैज्ञानिक संस्कृती ग्रामीण व्यवस्थेत ज्या प्रमाणात विस्तारेल व रुजेल, त्या प्रमाणात शेतीचे या दिशेने व्हावयाचे उन्नतीकरण घडून येणार आहे.

६·१० कसे तरी शेती व्यवस्थेत टिकून राहणे ही अल्पसंतुष्टीची ग्रामीण मानसिकता टाकून देऊन समृद्धीकडे झेपावण्याची जिद्द ग्रामीण समाजात हळूहळू उभी होते आहे. पाणी वापराचा विचार केवळ नांगरटीच्या पिकांच्या सिंचनामध्ये अडकून न राहता फलोत्पादन, हरितगृहे, दुग्धउत्पादन, पशुपालन, ग्रामीण कारखानदारी अशा विविध अंगांना गवसणी घालणारा होत आहे. यातून पाण्यावर आधारित ग्रामीण विकासाची सर्वांगीण व्यापकता उदयाला येत आहे. १९६० च्या तुलनेत या दिशेने आता परिस्थितीत खूप बदल झाले आहे. विकासात अग्रणी असलेल्या करवीर, रावेर, निफाड, बसमतनगर, सांगोला या तालुक्यांमध्ये ही नवी ऊर्मी विशेष जाणवते. तिचा महाराष्ट्रभर विस्तार व्हायला हवा आहे.

**भूजल नियमन**

६·११ सामाजिक जाणिवांमध्ये जे महत्त्वाचे बदल व्हावे लागणार आहेत. त्यात भूजलाच्या स्वामित्वाविषयीची कल्पना यातील बदल मोठा अवघड राहील. आजच्या विद्यमान कायद्यांचा अर्थ अजूनही पुष्कळदा जमिनीखालून उपसता येणाऱ्या वाटेल तितक्या पाण्यावर त्या जमीनधारकाचे पूर्ण स्वामित्व आहे अशा पद्धतीने लावण्यात येत आहे. वस्तुतः भूजल हासुद्धा निसर्गनिर्मित असा एक भूपृष्ठाखालचा

अनुक्रमणिका

भूस्तरांमधून विस्तारलेला पाणीसाठाच आहे. विहिरी व कूपनलिका हे केवळ त्या सामूहिक भांडारापर्यंत पोहोचायचे मार्ग आहेत. भूजलाचे ते स्वयंभू स्वयंपूर्ण स्त्रोत नव्हेत. या मार्गाचा उपयोग करण्याची नियंत्रित सार्वजनिक व्यवस्था असल्याशिवाय त्या भांडारावर अवलंबून असणाऱ्या अनेकांना त्याचा न्याय्य उपयोग करता येत नाही. महाराष्ट्रातील ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या ८५ टक्के योजना या भूजलावर अवलंबू आहेत. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या स्थैर्यासाठी भूजलनियमनाला वेगळेच महत्त्व आहे.

६·१२ महाराष्ट्रात कठीण कातळाने व्यापलेले क्षेत्र मोठे आहे. पाणी साठवण्याबाबात त्याची मूलभूत मर्यादा आहे. पर्जन्यमानातील दोलायमानतेमुळे भूजलाच्या उपलब्धतेवर वर्षनिहाय बदलत्या मर्यादा आहेत. ही मर्यादा नेमकी कोठे, किती आहे याबाबत मात्र वैज्ञानिकवर्गामध्येही अजून काहीशी संभ्रमावस्था आहे. भूजल संपत्तीच्या उपलब्धतेबाबत निश्चित आकडेवारी उपलब्ध व्हावी व भूजल संपत्तीचा अंदाज जास्तीत जास्त बिनचूक असावा यासाठी केंद्र शासनाने वेळोवेळी भूजल तज्ज्ञांच्या समित्या नियुक्त करून त्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित केली आहेत. त्यांच्या आधारे महाराष्ट्रातील भूजल संपत्तीचा सुधारित अंदाजाचे काम वेळोवेळी करण्यात आले आहे. पण या मर्यादांची जाणीव न ठेवता भूजल अवस्थेतील पाण्याचा उपसा मर्यादेबाहेर अनेक ठिकाणी वाढतो आहे. याचे मुख्य कारण म्हणजे भूजलाचा वापर हा त्या वापरदाराला स्वयंनिर्भरतेचा द्योतक वाटतो. त्यासाठी नियंत्रणात्मक व्यवस्था अस्तित्वात नसल्यामुळे स्वेच्छेनुसार हवे तितके व शक्य तितके पाणी उपसता येते. भूजलाची उपलब्धता हा भूस्तरांच्या वैज्ञानिक मोजणीचा गुंतागुंतीचा भाग असल्यामुळे भूजल नियोजनाचा नीट खोलात विचार होऊन, सुयोग्य अशी नियंत्रण पद्धती भूजलासाठी तत्काळ अमलात येणे आवश्यक आहे. त्यासाठी भूजल हीसुद्धा भूपृष्ठावरील पाण्याप्रमाणेच सामूहिक संपत्ती आहे, ही भावना समाजात दृढ होणे गरजेचे आहे. पूर्वीच्या काळी विहिरीतील पाण्याचा उपसा केवळ मोटेतून होत असल्याने उपसा प्रक्रियेला आपोआपच व्यावहारिक मर्यादा होती. आता वीज व इंधनयंत्रे यांच्या मदतीने अखंड अमर्याद उपसा होऊ शकतो. त्यामुळे या संबंधातील नव्या डोळस जाणीवा व तद्नुसार नव्या शास्त्रशुद्ध नियंत्रण व्यवस्था यांचा तातडीने अंगिकार व्हायला हवा आहे. भूजल नियमानाचा व्यापक कायदा बराच काळ शासनाच्या विचाराधीन राहिला आहे. एका बाजूला त्यावर प्रगती होत असतांनाच भूजल व्यवस्थापनामागील वैज्ञानिक तपशिलांची व सामाजिक न्यायाची भूमिका जनमानसात नीट रुजवली जाणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने होत असलेले आजचे प्रयत्न फारच अपुरे आहेत.

६·१३ ज्या क्षेत्राला कालव्यांच्या पारंपरिक पद्धतीच्या सिंचन व्यवस्थांमधून लाभ मिळू शकत नाही, अशा उंचवट्यावरील भूप्रदेशाला पाणलोट क्षेत्र विकास ही संजीवनी आहे. पण त्यातील भूजलाचे नियोजन व नियमन जर शास्त्रशुद्ध रीतीने झाले नाही व पाणलोट क्षेत्रातील भूजलाचा उपसा अमर्याद चालू राहिला तर गोंधळाची स्थिती वाढणार आहे व एका चांगल्या उपयुक्त योजनेबाबत लोकांच्या पदरी शेवटी निराशा येणार आहे. महाराष्ट्रातील १५०५ पाणलोट क्षेत्रांपैकी ७६ पाणलोटांमध्ये पाण्याचा अवास्तव उपसा अगोदरच झालेला असून तेथे आता आणखी भूजल वापर शक्य नाही. आणखी २० पाणलोट क्षेत्रे काठोकाठ संवेदनशील स्थितीत आहेत. तर १६३ पाणलोट क्षेत्रे त्या अवस्थेत पोचण्याच्या अर्धवट स्थितीत आहेत. अशा रीतीने एकूण २५९ पाणलोटांमध्ये संकट अगोदरच उभे राहिलेले आहे. महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्राच्या १७ टक्के क्षेत्र याप्रमाणे अगोदरच समस्याग्रस्त आहे, तरी आत्यंतिक उपसाचा हा रोग झपाट्याने पसरतो आहे. त्याला वेळीच आवर घातला गेला नाही, तर ग्रामीण व्यवस्था धोक्यात येणार आहे. पाणी ही सामाजिक मालमत्ता आहे असे मानून त्याच्या व्यवस्थापनाचे काम समंजसपणाने समाजाने एकत्रितपणे करावे अशी प्राचीन काळापासूनची भारताची गौरवशाली परंपरा आहे. पण त्यात पूर्वी भूजलाचा समावेश

फारसा महत्त्वाचा नसे, आता मात्र समाजातील सामूहिकतेची भावना भूजलाबाबतही जागृत करून त्याच्या आधाराने नव्या कार्यव्यवस्था यापुढे उभ्या व्हाव्या लागतील. 'पाणी सर्वांचे सर्वांसाठी', ही भावना समाजात रुजवण्याचे प्रयत्न लवकर हाती घ्यायला हवे आहेत.

६·१४ सध्याची समस्याग्रस्त पाणलोटक्षेत्रे काही उपखोऱ्यांमध्येच एकवटलेली आहेत. उदा. तापीचा उत्तर काठ, उर्ध्व गोदावरीचा दक्षिण काठ, सीनाचे दोन्ही काठ व अग्रणी आणि येरळा नद्यांची खोरी, त्यांना समस्याग्रस्त नसलेल्या पाणलोटांमधून आधार देणे सहज सोपे नाही. म्हणून अशा समस्याग्रस्त उपखोऱ्यांच्या नियोजनाचा इतरांच्यापेक्षा पूर्णतः वेगळा विचार होणे उपयुक्त ठरेल. तेथील सामाजिक उद्दिष्टे व ग्रामीण व्यवहार यांची मांडणी वेगळ्या पद्धतीची ठेवावी लागेल.

**भांडवली गुंतवणूक**

६·१५ पाण्याची साठवण व वितरण यासाठी सुरुवातीचा भांडवली खर्च बराच येतो. भांडवली गुंतवणुकीच्या बाबतीत समाजात शासनाधीनता प्रचंड आहे. योजनांचे खर्च वेगवेगळ्या कारणांमुळे वाढतच आहेत. त्यामुळे शासकीय अर्थसंकल्पीय तरतुदी अपुऱ्या ठरत आहेत. पहिल्या सिंचन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे २५ वर्षांत जेवढी सिंचन क्षेत्रात वाढ व्हावयाची होती त्यासाठी प्रस्तावित वित्तीय तरतूद बऱ्यापैकी करूनही ४५ लाख हेक्टर भूक्षेत्राला पाण्याचा आधार मिळण्याऐवजी त्या कालावधीत २५ लाख हेक्टर भूक्षेत्रच सिंचनाच्या छत्राखाली येऊ शकले. म्हणून भांडवल उभारणीच्या अन्य पर्यायी व्यवस्थांचाही विचार अधिक गांभीर्याने यापुढे व्हावा लागेल. उदा. खासगी गुंतवणूक व दानप्रवण साहाय्य, समाजाच्या दानप्रवणतेला आरोग्य व शिक्षण अशा क्षेत्रांसाठी जसा वाव आहे तसाच जलविकास क्षेत्रासाठीही आहे. पण त्या दिशेने अजून फारसे प्रयत्न केले गेलेले नाहीत.

६·१६ महाराष्ट्रातील २२ महानगरपालिकांचे रहिवासी यांचा पाण्याशी येणारा संबंध आणि त्यामुळे बद्धमूल झालेले पाण्याबद्दलचे समज व अपेक्षा आणि २७९२६ ग्रामपंचायतीमधले ग्रामीण रहिवासी यांचे पाण्याशी असलेले स्थानीय नाते अगदी वेगळ्या स्वरूपाचे आहे. हा फरक लक्षात घेऊन महानगरीय नागरिकांचे व ग्रामीण रहिवाशांचे प्रबोधन वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिकांसाठी व्हायला हवे आहे. राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका यांना पाणीपुरवठा व मलनिःस्सरण संबंधित योजनांसाठी २३·३३ ते ९० टक्क्यांपर्यत शासकीय अनुदान महाराष्ट्र शासनातर्फे मिळत असते. ग्रामीण योजनांना तर आणखीच विशेष सवलती प्राकृतिक व सामाजिक दुर्बलतेच्या निकषांनुसार शासनाकडून मिळतात. पण शासकीय अनुदानाव्यतिरिक्त काही रक्कम या स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्ज व लोकवर्गणीद्वारे उभी करावी लागते. प्रश्न केवळ लोकनिर्मित भांडवल उभारणीचा नसून त्या माध्यमांतून नागरी पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थांबद्दल आत्मीयता निर्माण होण्याचा आहे. तशी ती वाढीस लागण्यासाठी वित्तीय व्यवस्थांना पूरक होईल अशी भावनात्मक चळवळ नागरी जीवनामध्ये किंवा ग्रामीण समाजामध्ये आज नाही. त्यामुळे पाणीपुरवठ्याच्या चांगल्या चांगल्या योजना रखडताना किंवा अपप्रवृत्तींना बळी पडलेल्या दिसतात. स्वामित्वाची भावना व उत्तर दायित्वाची जाणीव वाढीस लागताना फारसे दिसत नाही. म्हणून अशा विकास कार्यक्रमांसाठी केवळ वित्तीय नियोजन व शासकीय पाठिंबा पुरेसा नसून, त्या उपक्रमांच्या पाठीशी कणखर सामाजिक सामूहिक प्रेरणा उभी करण्याचे प्रयत्न स्वतंत्रपणे व्हायला हवे आहेत. ग्रामीण जीवनात तसे, काही प्रमाणात तरी होते आहे, पण नागरी जीवन यापासून फार दूर राहिले आहे.

अनुक्रमणिका

६·१७ महाराष्ट्र राज्याच्या प्रारंभीच्या काळात वित्तीय जरी नव्हे, तरी लोकांच्या श्रमदानाचा वाटा हा ग्रामीण भागांतील बांधकाम रचनांसाठी महत्त्वाचा ठरेल असे वाटत होते. पण शासनाकडून वेगवेगळ्या दबाव तंत्रांनी केवळ अधिकाधिक वित्तीय सहायता ओढून आणण्याची जणू सर्वांमध्ये स्पर्धा लागल्यामुळे १९७० ते १९९० या कालखंडात आत्मनिर्भरतेची व विकास विस्तारातील प्रत्यक्ष सहभागाची जनतेची भूमिका हळूहळू पुसट होत गेली. नंतर स्वाध्याय परिवाराच्या चळवळीतून निर्मलनीर सारखे हजारो छोटे छोटे पाणी साठवण प्रकल्प किंवा वनराईच्या प्रोत्साहनातून नालाबांधनिर्मितीचे उपक्रम यशस्वीपणे सुरू झाल्यामुळे व आडगाव, राळेगणसिद्धी, हिवरेबाजार असे ग्रामीण विकासाचे अनुकरणीय नमुने उभे राहिल्यामुळे परिस्थितीत सुधारणा होऊन पुन्हा काहीशी स्वयंस्फूर्तीची प्रेरणा जागृत होईल असे चिन्ह आहे. पण यापुढील जलव्यवस्थांची एकंदर मोठी सामाजिक गरज पाहता. हे प्रेरक उपक्रम अजून तोकडेच पडतात. त्यांच्यात खूप वाढ होण्याची गरज आहे.

### ७·० जलजागृती

७·१ दूरवरून पाण्याचे हंडे भरून ते डोक्यावरून आणण्याचे कष्ट नाहीसे व्हावेत म्हणून घराघरात नळ पोचवण्याची जी आधुनिक पाणी वितरण प्रणाली, तिचा आपण लोककल्याणाचा भाग म्हणून विस्तार करीत आहोत. पण पाण्याच्या अशा सुलभ उपलब्धतेतून समाजात एक वेगळी अज्ञानी व बेधुंद अशी ‘नळसंस्कृती’ उदयाला आली आहे. पाण्याचा मूळ स्रोत काय व त्याच्या मर्यादा काय, वास्तव खर्च काय याची काहीही माहिती विशेषतः महानगरीय पाणी वापरणाऱ्याला नसल्याने त्या पाण्याच्या काटकसरीची व संयमित वापराची जाणीव निर्माण होत नाही. तोटी उघडताच नळाला येऊ शकणाऱ्या धोधो पाण्यामुळे वास्तविक गरजेपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात पाण्याचा अतिरेकी वापर स्वच्छतेसाठी, आंघोळीसाठी, वाहने धुण्यासाठी करण्याची सवय नागरिकांना लागत आहे. त्याच्याशी प्रतिष्ठा निगडित करण्याची अहितकारक मानसिकताही वाढीस लागली आहे. तिला वळण लावण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागणार आहेत.

७·२ शासनाने निर्धारित केलेल्या १५० लिटर किंवा १३५ लिटर प्रतिमाणसी अशा मापदंडापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात पाणी वापराची सवय काही समाज घटकांना जडली आहे. मुंबई-पुणे शहरांमध्ये २०० लिटर ते ३०० लिटर पाण्याचा अनिर्बंध सर्रास वापर करणारी अनेक नागरी क्षेत्रे आहेत. म्हणून माहितीचा प्रचार आणि प्रबोधन याबरोबरच पाण्याची वास्तविक किंमत समाजाला जाणवणे व ती तशी वसूल होणे इष्ट आहे. विशेषतः पाण्याची सार्वजनिक तूट व टंचाई जाणवत असताना उधळपट्टी या प्रकारात मोडणाऱ्या पाणी वापराला कठोर आवर घालणे हे स्थानिक स्वराज्यसंस्था नगरपालिका/ग्रामपंचायती यांच्यापुढचे मोठे आव्हान आहे. त्यासाठी प्रत्येक कुटुंबाची किंवा निवाससमूहाची पाणी वापराची मोजणी होऊन तद्नुसार वास्तविक आकारणी होणे व वसुली होणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील पाणीपुरवठ्याच्या अनेक नागरी आणि ग्रामीण व्यवस्था तुटीत असून आकारणीच्या योग्य त्या पाणी दरांअभावी, पाणी वापराच्या मोजणी अभावी व वसुलीतील हलगर्जीपणामुळे डबघाईस येत आहेत.

७·३ पेयजल ही एक मूलभूत मानवी गरज आहे. हे खरे. पण घरगुती वापरातले सर्वच पाणी हे ‘पेय’ जल नव्हे. त्यातील बरेचसे पाणी म्हणजे व्यावहारिक व आर्थिक पैलू असलेली घरगुती वापरातील एक वस्तू आहे. मानवी जीवनाच्या किमान गरजेपुरते पाणी प्रत्येकाला मिळाले पाहिजे म्हणून गरिबांना किमान पाणी देण्याची हमी शासनाने स्वीकारलेली आहे. पण त्यामुळे पाण्याच्या सुविधेसाठी येणाऱ्या वास्तविक

खर्चांकडे डोळझाक करता येत नाही. पाण्याची दर आकारणी सर्वांना सारखीच लागू करता येणार नाही. मूल्यभेद पद्धतीने करावी लागेल. आर्थिक दुर्बल गटाला सवलतीने पाणीपुरवठा करीत असताना एकंदर पाणीपुरवठा व्यवस्थेचा आर्थिक पायाच कमजोर होणार नाही याची काळजी घ्यावी लागणार आहे. पाणी ही तुटवडा असणारी खर्चिक आर्थिक वस्तू आहे याची जाणीव वापरदार समाजाला सतत होत राहील अशी पाणी पुरवठ्याची महसुली रचना हवी. २००३ च्या महाराष्ट्र राज्याच्या जलनीतीमध्ये घनमापन पद्धतीने पाण्याची आकारणी करायची व पाण्याचे दर असे बसवायचे, की एकूण मिळून वार्षिक खर्च व भांडवली घसारा यांची नीट तोंडमिळवणी होऊ शकेल अशी स्पष्ट भूमिका स्वीकारण्यात आली आहे. पण त्याचे प्रत्यक्ष कार्यवाहीत रूपांतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी वा अन्य पाणीपुरवठा माध्यमांनी अजूनही नीटसे केलेले नाही. अनेक नागरी व्यवस्थांमध्ये पाणी पुरवण्यासाठी १० रुपये ते १५ रुपये प्रतिघनमीटर खर्च येत असताना आकारणी मात्र केवळ ३ किंवा ४ रुपयांपर्यंतच होत राहिल्यामुळे पाण्याच्या वास्तविक मूल्याची पाणी वापरणाऱ्याला जाणीवच होत नाही. त्यामुळे पाण्याचा अवास्तव वापर वाढत राहतो. जलजागृतीसाठी वास्तव स्थितीच्या माहितीचे प्रसारण सतत मोठ्या प्रमाणावर होत राहणे व त्याबाबत स्थानिक पातळीवर साधकबाधक चर्चा वारंवार होत राहणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाणीपुरवठा योजनांसाठी महाराष्ट्र शासनाने नुकत्याच हाती घेतलेल्या अभियानात, सर्वांना नळजोडण्या देणे, १०० टक्के पाणी वापरदारांकडून पाणी देयकांची पूर्ण वसुली करणे व सर्व पाणी वापरदारांना द्यावयाचे पाणी मोजणी करूनच देणे अशी तीन महत्त्वाची उद्दिष्टे समोर ठेवण्यात आली आहेत. पण त्यासाठी समाजात अनुकूल मानसिकता निर्माण करावी लागेल.

७·४ जलसंपदा विभागातर्फे सिंचन महसुलाबाबत व सिंचनातील पाण्याच्या वापराबाबत अशाप्रकारची महितीपुस्तिका प्रकाशित करण्यास २००५ पासून प्रारंभ झाला आहे. पण त्या माहितीचा उपयोग करून स्थानिक पातळीवर उपखोरे निहाय चर्चांना अजून प्रारंभ झालेला नाही. शासनाने पारदर्शिकतेची आपली जबाबदारी पार पाडली आहे. पण समाज प्रबोधनाची बाजू मात्र अजून बाकी आहे. यासाठी शासकीय, व्यवसायी व स्वयंसेवी संस्थांना एकत्रितपणे समाज प्रबोधनाचे उपक्रम सातत्याने हाती घ्यावे लागणार आहेत. यासाठी अनेक स्वयंसेवी संघटनांनी पुढे येण्याची गरज आहे. १९८७ पासून भारतात देशभर आणि त्यामुळे महाराष्ट्रातही प्रतिवर्षी मार्च/एप्रिलमध्ये ‘जलसंपत्ती दिन’ मोठ्या व्यापक प्रमाणात साजरा होऊ लागला आहे. त्यावेळी पाण्याशी निगडित असलेल्या विविध मुद्द्यांवर सार्वजनिक स्वरूपाची मोकळी चर्चा होऊ लागली आहे. त्याचा परिणाम म्हणून त्या त्या विषयांबाबत जनमत काही प्रमाणात जागृत होऊ लागले आहे. पण महाराष्ट्रात अशी ठिकाणे २५-३० पेक्षा अजून जास्त नाहीत. अशा प्रयत्नांचा गावागावातून ज्या प्रमाणात विस्तार होईल, त्याप्रमाणात यापुढील जलव्यवस्थापनाला सुयोग्य वळण मिळेल.

७·५ ‘पाण्याचा कटकसरीने वापर व्हावा आणि पाण्याचे महत्त्व समजावे’ यासाठी अगदी प्राथमिक शाळेपासूनच जलसाक्षरता कार्यक्रम सुरू करण्यात येईल, असे महाराष्ट्र राज्याच्या जलनीतीमध्ये (२००३) अंतर्भूत करण्यात आले आहे. शैक्षणिक माध्यमातून अशा विचारांचा प्रसार करणारी पाठ्यपुस्तकेही निर्माण होऊ लागली आहेत. नव्या आधुनिक जलसंस्कृतीचे बीजारोपण व संवर्धन करण्यासाठी सर्वच शिक्षण क्षेत्राने हौशीने पुढे यायला हवे आहे. महाराष्ट्राच्या त्या त्या भागातील जलस्रोतांची, जलउपलब्धतेची, मर्यादांची व त्या संबंधित आवश्यक असलेल्या रचनांची नीट नेमकी माहिती त्या त्या भागातील विद्यार्थ्यांना व लोकांना दिली गेली, तरच ते पाण्याशी निगडित असलेल्या विविध कामांमध्ये आपली भूमिका परिणामकारकपणे बजावू शकतील.

अनुक्रमणिका

७·६ त्यातही महिलांचे प्रबोधन पाणी क्षेत्रात अधिक महत्त्वपूर्ण राहणार आहे. कारण घराघरांतून पाण्याचे 'पालकत्व' महिलांकडेच असते. शेती क्षेत्रातसुद्धा शेताला प्रत्यक्ष पाणी देण्याचे व प्रत्येक रोपापर्यंत ते नीटपणे पोहोचविण्याचे कामही बहुतेक ठिकाणी महिलाच करीत असतात. आपल्या मुलाबाळांना स्वच्छतेचे, स्वयंशिस्तीचे धडेही आईच्या भूमिकेतून महिलाच देत असतात. महिला संस्थाचा सहभाग सार्वजनिक आरोग्यविषयक आणि शिक्षणविषयक उपक्रमांमध्ये लक्षणीय आहे. त्याचप्रमाणे तो पाणीविषयातही वाढला तर स्थानिक पातळीवरील जलव्यवस्थापनाच्या कामात त्याचा अत्यंत चांगला उपयोग होऊ शकेल. नागपूरच्या महिला पाणी मंचाने अशा प्रकारची महिला संघटनांची साखळी उभी करण्याचा प्रयत्न गेली आठ वर्षे हाती घेतला आहे. पाणी काटकसरीने वापरले जावे यासाठी हा मंच नागपुरात निगराणीचे काम प्रभावीपणे करतो आहे. म्हणून नागपूर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने, नागपूर महिला पाणीमंचच्या प्रवर्तकांना 'जलमित्र' म्हणून घोषित केले आहे. महाराष्ट्रातील पहिली जलसाहित्य परिषदही या महिला पाणी मंचच्या पुढाकारानेच नागपुरात भरवली गेली होती (२००१). त्यानंतर अशी परिषद पुणे, मालगुंड व नाशिक येथे झाली व ऑगस्ट ०९ मध्ये जळगावात भरली. जळगांवच्या परिषदेत 'पाणी आणि शिक्षण' या विषयावर उद्‌बोधक चर्चा झाली. ही जल साहित्य सम्मेलने विचारप्रवर्तक व नव्या संकल्पनांना चालना देणारी ठरत आहेत. अशा उपक्रमांमधून जलविषयक कार्यकर्त्यांचा महाराष्ट्रभर विस्तार होणे व त्याला महिलांमधून व साहित्यिकांमधून उत्तम प्रतिसाद मिळणे गरजेचे आहे. नागपूर येथील राजाराम दीक्षित वाचनालय मागील १३ वर्षांपासून पाणी विषयक संस्थांच्या सहकार्याने 'जलसंवाद व्याख्यानमाला' चालवीत आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. पाण्याबाबतचे निदान नागरी जनमानस बदलवण्यात अशा नागरी मंचांचा वाटा फार मोठा असणार आहे.

७·७ पाण्याच्या मर्यादित उपलब्धतेतही उत्पादकतेचा आणि जीवनमानाचा आलेख चढतावाढता ठेवला म्हणजे पाण्याशी निगडित असलेल्या जीवनपद्धतीचाही फेरविचार व्हावा लागेल. पूरप्रवण क्षेत्रातील व्यवस्थापन आणि त्या क्षेत्रातील विकास रचनांची मांडणी ही इतरांपेक्षा वेगळी, अधिक गुंतागुंतीची आणि खर्चिकपणाची असते. त्यात अधिक प्रगल्भतेची गरज असते. उंचवट्यावरील पाणीपुरवठ्याच्या खार्चिक व्यवस्थाही वेगळ्याधर्तीच्या असाव्या लागतात. म्हणून महाराष्ट्रातले वेगवेगळ्या ठिकाणचे समाजघटक आणि पाणी यातील वास्तविक नाते व त्यातील आधुनिक गरजांच्या संदर्भातील नव्या व्यवस्थांची गरज उकलून दाखविणारा जलजागृती कार्यक्रम मोठ्या प्रमाणात चालू ठेवावा लागणार आहे. या दिशेने महाराष्ट्राच्या भूजल सर्वेक्षण व विकास अभिकरणाने ३५३ खेड्यांमध्ये अलीकडेच हाती घेतलेला पाण्याचे स्थानिक हिशोब गाववार ठेवण्याचा उपक्रम फार उपयुक्त ठरणार आहे. स्थानिक पावसाची नोंद करणे व ह्याबरोबरच तेथील भूजलाचीही स्थिती गावकऱ्यांनीच मोजणे हे एकत्रितपणे या उपक्रमात केले जात आहे. पण याबरोबरच पाणी वापराची कुशलता वाढण्यासाठी बाष्पीभवनाचा हिशेब ठेवणे यापुढे आवश्यक राहणार आहे. कारण पाणी नाशाचा तो सर्वात मोठा घटक आहे. जलाशयातून व पाणीवापर क्षेत्रावरून बाष्पीभवनाने उडून जाणाऱ्या पाण्याचा नेमका हिशोब करता यायला हवा. पण याबात अजून पुरेसा प्रचार प्रसार झालेला नाही. त्यामुळे पाण्याच्या हिशोबांमध्ये अजून ढोबळपणा आहे, अचूकता आलेली नाही. पाणलोटक्षेत्रात तत्काळ होणारे बाष्पीभवन हे पडलेल्या पावसाच्या निम्म्यापर्यंत असते. बाष्पीभवन रोखणीचे तंत्र विकसित करायचे म्हणजे बाष्पीभवन प्रक्रियेचा नीट स्थानिक तपशीलही हवा. म्हणून यापुढे बाष्पीभवनाची मोजणी हा महत्त्वाचा घटक पाणीविषयक माहिती संकलनात लागणार आहे.

७·८ महाराष्ट्राचे फार मोठे भौगोलिक क्षेत्र हे पाण्याच्या तुटीचे असल्यामुळे जलजागृतीचाच एक भाग म्हणून पाण्याच्या काटकसरी वापराचीही मोहीम समाजात चालू ठेवावी लागणार आहे. गेल्या पाच

अनुक्रमणिका

दशकांतील जलविकासाच्या ऊर्मीत अधिकाधिक नवे पाणी हस्तगत करण्याच्या उत्साहात पाण्याच्या काटकसरीचा पैलू हा तसा उपेक्षितच राहिला आहे. काटकसरी वापर हा जलसंस्कृतीचाच एक भाग व्हायला हवा आहे. या दिशेने ज्यांनी पाऊल उचलले त्यांचा अनुभव उत्साहवर्धक आहे. उदा. नाशिकच्या एका शिक्षण संस्थेने विद्यार्थांना प्रगतिपुस्तकांप्रमाणे पाणी वापर पुस्तिका देऊन घरातले पाणी रोज कसे वापरले जाते याची निरीक्षणे त्यात रोज नोंदवण्याचा उपक्रम गेली चार वर्षे चालवला आहे. त्यातून घराघरातून झालेल्या पाणी वापराच्या व गैरवापराच्या जागृत जाणिवांमुळे त्या शाळांच्या परिसरातील नगरपालिकेकडील पाण्याची मागणी १० टक्के कमी झाल्याचे नगरपालिकेच्या अनुभवास आले आहे. नागपूरमध्येही जलजागृतीचे उपक्रम जलसंपदा दिवसाच्या निमित्ताने गेली २१ वर्षे चालू आहेत. त्यात गेली ८ वर्षे 'पाणी वाचवा' हा संदेश देणारी चित्रे स्पर्धक विद्यार्थी काढतात. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून एक कुटुंब जलसाक्षर होत राहते. हे चित्रकला स्पर्धक विद्यार्थी जलदूत बनतात. इ. स. २००० पासून नागपुरांतील १०० शाळांतील विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेत असून आतापर्यंत अशा प्रकारचे २५००० जलदूत तयार झाले आहेत. अशा प्रकारच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचा अंगीकार जलजागृतीच्या कामांसाठी महाराष्ट्रात सर्वत्र व्हायला हवा आहे.

७·९ सिंचन प्रकल्पांमधून शेतीसाठी आवश्यकतेपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात पाणी वापरले जाते असे शेती तज्ज्ञांनी अनेक वेळा सांगितले आहे. सध्या जितके पाणी वापरले जाते त्याच्या निम्म्या पाण्याच्या उपयोग पुरेसा आहे. तांदूळ, कडधान्ये, तेलबिया, कापूस, एवढेच काय पण ऊस, केळी या पिकांनासुद्धा सध्या दिले जाते त्यापेक्षा खूप कमी पाणी पुरेसे राहील. परंतु तसे होण्यासाठी आपल्या देशातील शेतकऱ्यांच्या मनात खोलवर रुजलेली चुकीची संकल्पना, की 'जितके अधिक पाणी तितके अधिक पीक' तिच्यावर मात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पाण्याच्या अतिरेकी वापरामुळे काही ठिकाणी जमिनी चिबड, नापिकी झाल्या आहेत. भूजलाचे संनियंत्रण करून जमिनी पाणथळ, होण्यापासून वाचवता येतात. भूपृष्ठापासून ३ मी, पेक्षा जास्त खोलीवर भूजलाची पातळी असते तोवर भूपृष्ठावरच्या जमिनींना पाणथळपणाचा उपसर्ग राहत नाही. म्हणून भूपृष्ठावरील पाण्याच्या व भूजलाचा संयुक्तपणाने काटकसरीने वापर व्हायला हवा आहे.

७·१० अजूनही सध्या हंगामी पिकांसाठीसुद्धा प्रति हेक्टरी ८००० घनमीटरपर्यंत पाण्याचा वापर केला जात असल्याचे लक्षात येते. वस्तुतः त्याऐवजी सुमारे ३५०० घनमीटर वापर पुरेसा आहे. शेतीतील पाणीवापराचे वार्षिक अहवाल जलसंपदा विभागातर्फे २००५ पासून नियमाने प्रसिद्ध होत आहेत. त्यावरून स्पष्टपणे असे दिसते की, नाशिक जिल्ह्यातील वाघाड प्रकल्पावरच्या पाणीवापर संस्थांनी काटकसरीने पाणी वापराचे वैज्ञानिक निकष वास्तवात आणून दाखवले आहेत. तेथे पाणी वापर कमी झाला. पण तरी प्रतिहेक्टरी व प्रतीघनमीटर अशी दोन्ही प्रकारची उत्पादकता वाढली. अशी जागृती व कुशलता सर्वत्र आणावी लागणार आहे.

७·११ १९६९ मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्राच्या पाटबंधारे व संशोधन संचालनालयातर्फे मोठाल्या सिंचन क्षेत्रांतील भूजलाच्या पातळीवर सतत लक्ष ठेवले जाते व त्या मोजणीचे अहवालही प्रसिद्ध केले जातात. त्यामुळे भूजलाची पातळी मर्यादेहून अधिक उंचावत असेल तर वेळीच निचरा, चरांसारखे प्रतिबंधक उपाय हाती घेता येतात. आजवरच्या अनुभवांवरून असे दिसते, की सिंचन प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर किमान १ ते २ टक्के क्षेत्राला जमीन पाणथळ होण्याचा धोका पोचतोच. पण त्यावर वेळीच उपाययोजना झाली तर परिस्थिती नियंत्रणात राहते. याबाबतीतील दक्षता व त्यातील सातत्यही सिंचन

अनुक्रमणिका

क्षेत्रासाठी आवश्यक असते. शेतीच्या जिरायत क्षेत्रापेक्षा एक वेगळी जागरूक व्यवस्था सिंचित क्षेत्रासाठी लागते. ती लोकांनी अंगीकारणे व त्यासाठीचे नियमन स्वीकारणे यावर सिंचनातील समृद्धीचे सातत्य टिकून राहते. जलसंस्कृतीच्या दृष्टीने जिरायत शेतकऱ्यांपेक्षा सिंचनाचा शेतकरी अनेक बाबतीत खूप वेगळा घडवावा लागतो. अमरावतीजवळ हाती घेण्यांत आलेल्या पेढी प्रकल्पाच्या प्रस्तावित सिंचनक्षेत्रात जमिनी पाणथळ होण्याबाबतची व क्षारतेबाबतची भीती जनमानसात तरळत राहिल्यामुळे प्रकल्पाला विरोध करणारे आंदोलन २००७ मध्ये बरेच चिघळले होते. पण या प्रश्नाची वैज्ञानिक उकल संबंधितांना समजावून सांगितल्यानंतर ते मागे घेतले गेले. शासकीय नियोजनाच्या पलीकडे जाऊन लोकप्रबोधनाचा पैलू किती महत्त्वाचा आहे हेच त्यावरून पुन्हा एकदा लक्षात आले.

७·१२ लोकजागृतीचा एक महत्त्वाचा आधार म्हणजे पाण्याच्या वास्तविक स्थितीबद्दलची लोकांपर्यंत पोचणारी अद्ययावत माहिती. अशा माहितीची नोंदणी व संकलन मूलतः सरकारी यंत्रणेकडून होत असल्याने त्यांनी लोकप्रबोधनाची भूमिकी स्वीकारून सर्व माहिती विस्तृत प्रमाणात वितरित केल्याशिवाय अपेक्षित जागृती होणे अवघड आहे. उदा. भूजलाच्या गुणवत्तेची स्थिती, नदी-नाल्यांच्या पूरप्रवणतेचे नकाशे, पाणीपुरवठ्याचा वास्तविक खर्च व वसुलीचे प्रमाण याबाबतच्या वस्तुस्थितीचे वार्षिक अहवाल सर्व ग्रामपंचायतींना पोचणे आवश्यक आहे. तसे उपक्रम आता रूढ करावे लागतील. जलसंपदा विभागाने या दिशेने गेली चार वर्षे (२००५-२००८) शेतींतील पाणीवापराचे चांगले विश्लेषण प्रसृत केले आहे. आता त्याही पुढे जाऊन ते प्रकल्पशः तपशीलवार वितरित होणे हे अधिक उपयोगी ठरेल.

७·१३ नागरी पाणी वापरातील ८० टक्के पाणी व औद्योगिक क्षेत्रात वापरलेल्या पाण्यापैकी ९७·५ टक्के पाणी पुनर्वापराला परत मिळावे असे कृष्णा लवाद व गोदावरी लवाद यांनी सुचवले आहे. त्या खोऱ्याच्या उपलब्ध पाण्याच्या हिशोबात तसे गृहीतही धरावे लागत आहे. निदान ७० टक्के पाण्याचा तरी पुनर्वापर होईल. असा प्रयत्न येत्या दशकांत (२००० ते २०१० मध्ये) व्हावा असे महाराष्ट्र जलसिंचन आयोगाने सुचवले होते. पण नगरपालिकांतर्फे अजून पाण्याचे व सांडपाण्याचे हिशोब नीट ठेवले जात नसल्याने याबाबतींतील वस्तुस्थिती स्पष्ट नाही. नागरी संस्था व उद्योग समूह हेही याबाबत पुरेसे जागृत झालेले नाहीत. जलव्यवस्थापनामध्ये प्रत्येक घटकाची भूमिका व जबाबदारी नेमकी काय असायला हवी याबाबतचे व्यापक प्रबोधन व स्पष्टीकरण अजून झालेले नाही. त्यामुळेच पाण्याच्या एकंदर हिशोबातच फार विस्कळीतपणा शिल्लक आहे. यापुढे पाण्याच्या हिशोबांची नीट व्यवस्था खोरे, उपखोरे व पाणलोटक्षेत्रनिहाय बसवावी लागणार आहे.

७·१४ महाराष्ट्राचा पूरप्रवण भूप्रदेश हा एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ७ टक्के आहे. त्यात नांदेड, पैठण, चिपळूण, महाड अशा अनेक गावांचे काही नागरी क्षेत्रही पूरबाधित आहेत. पुरांचे अंशतः तरी नियंत्रण व्हावे म्हणून महाराष्ट्रातील मोठ्या धरणांवर ११० ठिकाणी पूरनियंत्रक दरवाजे बसवण्यात आले आहेत. पुरांपासून बाधित होणाऱ्या संभाव्य ठिकाणी पूररेषा निश्चितीची व जमिनीवरील आखणीची जवळपास सर्व कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील नद्यांवर १५२ ठिकाणी पुराचे पूर्वानुमान करून धोक्याच्या पूर्वसूचना देण्याची केंद्रेही कार्यान्वित करण्यात आली आहेत. पण पुराच्या धोक्याच्या पातळीखालील लोकवस्तीचे कायम स्वरूपात सुरक्षित जागी स्थलांतर व पुराच्या पातळीखालील जमिनींचा अन्य सुयोग्य उपयोगांसाठी वापर हा गुंतागुंतीचा कार्यक्रम भावी काळात पार पाडावा लागणार आहे. निदान यापुढील काळात पूरक्षेत्रात आणखी दाटी होणार नाही व धोके वाढणार नाहीत याची काळजी घ्यावी लागणार आहे. याबाबतची तांत्रिक पूर्वतयारी जरी पूर्ण होत आली असली तरी त्यासाठी अजून

अनुक्रमणिका

पुरेशी प्रशासनिक पूर्वतयारी झालेली नाही. जनमानसहित त्या दृष्टीने पूर्णतः तयार नाही. पुनर्वसन आणि सुरक्षितता, का जैसे थे अवस्था यातील निर्णय पूरबाधितांनी घ्यायचा आहे. वेगवेगळ्या खोऱ्यांमधील पुरांची वारंवारता वेगवेगळी आहे. त्यामुळे यापुढे खोरेनिहाय व्यवस्थापनाची नवी घडी जसजशी बसत जाईल. तसतसे पूरप्रवणतेचे मुद्दे पुढे येत राहतील. आजतरी याबाबतींतील स्पष्टता दृष्टिक्षेपात नाही. मुंबईसारख्या महानगरीय प्रदेशाला २००५ च्या पुराचा मोठा फटका बसल्यानंतर व मोठी जीवित हानी व वित्तहानी झाल्यानंतरही तेथे नवी सुरक्षित व्यवस्था उभी करायला जो वेळ लागत आहे त्यावरून लोक आणि प्रशासन या दोन्ही घटकांच्या याबाबतीतली पूर्ण तयारी व्हायला बराच काळ लागेल असे दिसते.

**८·० लोकसहभाग**

८·१ ब्रिटिशांच्या काळात महाराष्ट्रातील पाणी प्रकल्पांच्या प्राकृतिक रचनेत आधुनिक तंत्रज्ञान आले व प्रकल्पांचे आकारमान वाढले. पण त्याबरोबरच शासन प्रवणता आली. पारतंत्र्याच्या काळात तयार केल्या गेलेल्या व लोकाभिमुखतेचा अभाव असलेल्या अधिकारवादी ब्रिटिशकालीन कायद्यांचे दुष्प्रभाव पाणी व्यवस्थेवर अजूनही टिकून आहेत. सामान्य प्रशासनातले असोत किंवा तंत्रवैज्ञानिक प्रशासनातले असोत, प्रशासकांची मानसिकता अजून भारतीय घटनेत अभिप्रेत असलेल्या गणतंत्र पद्धतीला अनुकूल झालेली नाही. सिंचनाची आदर्श पाणी वितरण पद्धती म्हणून गिरणा व पांझरा या नद्यांच्या खोऱ्यांतील ज्या फडपद्धतीचे जगभर कौतुक होते, ती बंधाऱ्यांवरील कालव्यांच्या व्यवस्थापनाची स्थानिक पद्धतच ब्रिटिशांनी 'दुय्यमदर्जाची' ठरवली होती. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांनीही त्या लोकाधारित व्यवस्थेला आपल्या प्रशासनिक अधिकार क्षेत्राखाली आणण्यासाठी न्यायालयात आव्हान दिले. त्यामुळे त्या व्यवस्थेच्या गौरवाला व प्रतिष्ठेला १९७० ते ८० या काळात मोठे तडे गेले.

८·२ या उलट विसाव्या शतकाच्या सुरूवातीला 'लोकांचा' राजा म्हणून जनमानसात स्थान मिळवलेल्या राजर्षी शाहू महाराजांनी भोगावती नदीवर जेव्हा मोठे राधानगरी धरण बांधावयास घेतले तेव्हा त्यामागील जलाशयाचे पाणी नदीमध्ये सोडून नदीवरील बंधाऱ्यांच्या शृंखलेतून नदीकाठी लाभक्षेत्र विस्तारण्यासाठी लोकांच्या सहभागाला प्रोत्साहित केले. पंचगंगेवरील बंधाऱ्यांमागे अडवलेले पाणी मुख्यतः मोटेद्वारे उचलून पंचगंगा नदीच्या दोन्ही काठांवर सिंचनक्षेत्राचा विकास सामुदायिकरीत्या लोकांच्या सहकार्यातून झाला. त्या सामूहिक सिंचन पद्धतीलाही फड पद्धत असेच म्हटले जाई. अधिक उंचीवर पाणी नेण्यासाठी टप्प्याटप्प्याने मोटांनी पाणी उचलून, जास्त अंतरावर आणि उंचीवर सामूहिकरीत्या आणण्यात येई व नंतर आपापसात पाणी वाटप करून सहकार्यातून सिंचन केले जाई. कोल्हापूर परिसरातील स्वातंत्र्योत्तर काळातील सहकारी चळवळीचे नंतरचे यश हे शाहू महाराजांनी त्या काळात रुजविलेल्या लोकसहभागाच्या प्रवृत्तींच्या आधारावर विकसित झालेले आहे.

८·३ भारतात जेथेजेथे इंग्रजांचे राज्य आले तेथे तेथे शासनप्रवणेतचा कालखंड सुरू झाला. नाग विदर्भाच्या वैनगंगा खोऱ्यातील गोंडकालीन तलावांच्या लोकाधारित व्यवस्थेला प्रोत्साहन देण्याऐवजी केवळ महसूल गोळा करण्यावर लक्ष ठेवून या तलावांची पाणीपट्टी वसुली करण्याची मालकी त्या भागातील काही प्रतिष्ठित नागरिकांकडे देण्यात आली. त्यांना मालगुजार असे संबोधले गेले. हे मालगुजार लाभधारकांकडून वसूल केलेल्या रकमेतून ठरावीक रक्कम सरकारकडे जमा करत असत. पाण्याचे वाटप, देखरेख, दुरुस्ती, गाळ काढणे ही कामे मात्र लाभधारकाकडेच चालू राहावी असे अपेक्षित होते. पण तलावांची 'मालकी' जणू एकप्रकारे मालगुजारांकडे हस्तांतरित झाल्यासारखे चित्र निर्माण झाले. या

गोंडकालीन तलावांना मालगुजारी तलाव असेच संबोधण्यात येऊ लागले. सन १९५० नंतर तत्कालीन मध्यप्रदेश सरकारने कायद्यान्वये मालगुजारी संपुष्टात आणली व हे तलाव शासनाच्या नियंत्रणाखाली आणले. त्यामुळे लोकांचा सहभाग आणखी कमी झाला. लोकांमधून उत्स्फूर्तपणे होणाऱ्या दुरुस्ती व देखभाल व्यवस्थेच्या अभावी काही तलाव आता नाहीसे झाल्याचेही दिसते. भंडारा, चंद्रपूर, गोंदिया या जिल्ह्यांमधील या गोंडकालीन तलावांचे सुयोग्य आधुनिकीकरण व लोकाधारित व्यवस्थापनाची पुनःप्रतिष्ठापना या कामासाठी वेळोवेळी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेऊन पाहिला पण पूर्वीचा गौरव या तलावांना अजून प्राप्त होऊ शकलेला नाही. सामुदायिक व्यवस्थापनाच्या क्षीण झालेल्या भावनेचे व विस्कळीत कार्यपद्धतीचे पुन्हा पूर्ववत पुनरुज्जीवन आता कठीण झाले आहे.

८·४ ब्रिटिशकालीन सिंचन कायदा १८९१ मध्ये अस्तित्वात आणला गेला. त्यावर कायद्याचे उद्दिष्ट म्हणून 'सिंचनातून महसुली उत्पन्न जमा करण्यासाठी केलेला कायदा' असे अधिकृतपणेच लिहिले गेले होते. उत्पादकता वाढ, क्षेत्रीय विकास, दुष्काळ निवारण असा सामाजिक उद्दिष्टांचा किंवा व्यवस्थापनातील तोवरच्या पारंपरिक लोकसहभागाचा नामोल्लेखही त्या कायद्यात नाही. १९७५ मध्ये जेव्हा स्वातंत्र्यानंतर प्रथमच महाराष्ट्राचा स्वतःचा असा सिंचन कायदा करण्यात आला, तेव्हा ब्रिटिश व्यवस्थेतील अधिकारवादाचीच पकड पाटबंधारे खात्यातील व्यवस्थापन यंत्रणेवर कायम असल्यामुळे सुधारित नव्या कायद्याचाही बराचसा गाभा १८९१ च्या कायद्याप्रमाणेच शिल्लक राहिला. गणतंत्र व्यवस्थेतील समाजाच्या स्वतंत्र प्रेरणा त्यांत प्रतिबिंबित झाल्या नाहीत. मुख्य म्हणजे लोकांकडून त्यावेळी तशी प्रखर मागणी झाली नाही. सिंचन महसूल गोळा करण्यात शासनाला आधार देणारा कायदा असाच उद्देश १९७५ च्या कायद्याच्या मसुद्यावर उद्धृत केला गेला. विकासात्मक लोकाभिमुखतेच्या गरजा त्यात प्रतिबिंबित झाल्या नाहीत. शेतकऱ्यांच्या समूहांकडून व्हावयाच्या पाणी व्यवस्थापनासाठी म्हणून नंतर जो कायदा २००५ मध्ये महाराष्ट्र राज्यात करण्यात आला त्यात भारतातील लोकसहभागाच्या गौरवसंपन्न परंपरेचे प्रतिबिंब पहिल्यांदाच उमटले.

**सिंचनाच्या पाणी वितरण संस्था**

८·५ पाणी हे लोकांच्या कल्याणासाठी आहे, याची जाणीव जलव्यवस्थापनाच्या व्यवहारात स्पष्टपणे व्यक्त व्हायला पाहिजे. सर्व लोकांचा पाण्यावर सामाजिक हक्क आहे व त्याचे कालोचित नियमन करण्यासाठी म्हणून व्यवस्थापनाची कार्यपद्धती आहे, ही भूमिका लोकशाहीप्रवण समाजाच्या कायद्यात स्पष्ट असली पाहिजे. पाण्याचे सुयोग्य व्यवस्थापन करून उपलब्ध पाण्यातून जास्तीत जास्त सामाजिक लाभ घडवून आणणे व समृद्धीचा आधार निर्माण करणे ही फक्त सरकारच्या अखत्यारीतली बाब असू शकत नाही. ती जबाबदारी पाण्याचा उपयोग करणाऱ्या प्रत्येक घटकाची तशीच सामूहिकपणे सर्व समाजाची आहे. शासनाच्या विधीविधानांमध्ये व व्यवहारप्रणालीमध्ये तसे चित्र स्पष्टपणे दिसले पाहिजे. भारताच्या राष्ट्रीय जलनीतीतून प्रेरणा घेऊन व महाराष्ट्राच्या जलसिंचन आयोगाच्या (१९९९) शिफारशींना अनुसरून अशी गणतंत्रानुकूल व्यवस्था महाराष्ट्रात कायद्यान्वये २००५ साली अधिकृतपणे प्रथमच अस्तित्वात आली. महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीच्या दृष्टीने हे एक क्रांतिकारी पाऊल आहे. त्याचे फार मोठे दूरगामी परिणाम येत्या काही वर्षांत ग्रामीण जीवनावर दिसून येणार आहेत. पण हे एकदम अचानकपणे घडलेले नाही. लोकाधारित व्यवस्थेकडे जाण्यासाठी पाटबंधारे खात्याने १९८० पासून लाभक्षेत्र विकासाच्या संकल्पनेचा पाठपुरावा करीत वेळोवेळी शासकीय आदेश काढून पूर्वपीठिका तयार करत आणली होती. या सर्वांचा अनुकूल परिणाम म्हणून २००८ पर्यंत लाभधारकांच्या २७२३ पाणी वितरण संस्था स्थापन झाल्या आणि

अनुक्रमणिका

त्यातून लाभधारकांचे सामूहिक नियंत्रण १० लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर प्रस्थापित होऊ घातले आहे. ब्रिटिश कालखंडापूर्वीची सामूहिकतेची भारतीय परंपरा लाभलेल्या जवळपास २ लाख हेक्टर सिंचनक्षेत्रापेक्षा आजचे हे सामूहिक व्यवस्थापनाचे क्षेत्र फार मोठे आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. नाशिक जिल्ह्यातील वाघाड प्रकल्पाप्रमाणेच विदर्भातील अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा प्रकल्प पूर्णपणे पाणी वापर संस्थास हस्तांतरित झाला आहे. नागपूर जवळच्या पेंच प्रकल्पावर २५० पाणी वापर संस्था तर गोंदिया जिल्ह्यातील इटियाडोह प्रकल्पावर जवळपास ५० संस्था स्थापन झाल्या आहेत. अकोला जिल्ह्यांतील मोर्णा प्रकल्पासाठी ४० पाणी वापर सहकारी संस्थांचा संघ पातूर येथे स्थापन झाला आहे. केवळ पाणी वितरण संस्थांच्या स्थापनेवर न थांबता अशा संस्थांचे संघ उभे राहत आहेत हे विशेष स्पृहणीय आहे. विश्व बँकेच्या आर्थिक मदतीने हाती घेतलेल्या महाराष्ट्र जलक्षेत्रसुधार प्रकल्पामुळे या प्रक्रियेला विशेष गती मिळेल असे दिसते आहे. यशस्वी पाणी वितरण संस्थांच्या माध्यमातून महाराष्ट्राची नवी ग्रामीण सिंचन संस्कृती उदयाला येत आहे.

८·६ यापैकी अनेक संस्थांनी उत्तम काम करून गौरव पुरस्कारही प्राप्त केले आहेत. महाराष्ट्राच्या जलव्यवस्थापनातील गेल्या दशकातील ही फार मोठी उपलब्धी आहे. कालव्यांवरील निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष वापर यांतील तफावत ही शासनाच्या दृष्टीने १९७० ते २००० या काळात मोठी विवंचनेची गोष्ट होती. सिंचन व्यवस्थांचा पार्थिव विस्तार झपाट्याने होत होता. पण त्यासोबत आवश्यक असणारे सामाजिक परिवर्तन त्या गतीने घडून येत नव्हते. पण गेल्या दशकातील लाभधारकांच्या सामूहिकीकरणाची प्रगती पाहता व यापुढे प्रकल्पांच्या नियोजनातच लाभधारकांना समाविष्ट करून घेण्याची शासनाची भूमिका पाहता सिंचन स्थितीत येत्या दशकात खूप सुधारणा दिसून येऊ शकेल. मात्र सिंचनाच्या पार्थिव विस्ताराची गती आणि सामाजिक उन्नतीकरणाची गती यातील अंतर अजूनही फार आहे. गेल्या पाच वर्षात सिंचनाचे नवे क्षेत्र दरवर्षी जवळ जवळ ३ लाख हेक्टर या गतीने विस्तारले आहे. त्यासाठी दरवर्षी नव्याने एक हजार पाणी वितरण संस्था उभ्या कराव्या लागणार आहेत. पण ते काम मात्र दरवर्षी साधारणतः नव्या २५० संस्था या गतीने वाढते आहे. ही गती आणखी वाढणे ही आजच्या काळाची गरज आहे. त्याप्रमाणात अनेक सामाजिक कार्यकर्ते नव्याने सिंचन क्षेत्रात पुढे यायला हवे आहेत. १९९९ पासून दरवर्षी नियमाने महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात सिंचन सहयोग या स्वेच्छिक चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्र सिंचन परिषदेचे आयोजन होत आहे. तिच्यात कळीच्या विषयांवर खुली चर्चा होते आहे. सिंचनाच्या उन्नत व्यवस्थेसाठी विशेष धडपडणाऱ्या यशस्वी कार्यकर्यांचा सिंचनाच्या या लोकमंचावर 'सिंचन मित्र' पुरस्कार देऊन गौरव होतो आहे. त्यातून प्रेरणा घेऊन नव्या सिंचनसंस्कृतीचा विस्तार करणारे नवनवे कार्यकर्ते पुढे येत आहेत. हे एक मोठे आशास्थान आहे.

८·७ 'शासन' व 'पाण्याचा वापर' करणारे यांच्या मूलभूत भूमिका आणि परस्परसंबंध यांची राज्य शासन पुनर्रचना करील असे महाराष्ट्र राज्याच्या जलनीती (२००३) मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. पाण्याचा वापर करणाऱ्यांनी पाणी अधिक कार्यक्षमतेने आणि अधिक उत्पादनासाठी वापरावे म्हणून त्यांना प्रोत्साहन देण्यात येईल, त्यासाठी राज्य शासन पाणी वापर संघटनांना पाणीवाटपाचे व्यवस्थापन, व सेवासुविधांचे परिरक्षण यात पूर्णपणे सहभागी करून घेण्याकरिता अधिकार प्रदान करील, नोकरशाहीच्या हस्तक्षेपाशिवाय पाण्याचा उत्तम प्रकारे वापर करणे शक्य व्हावे म्हणून स्थिर स्वरूपाचे हक्कही प्रदान करील असे आश्वासन महाराष्ट्र राज्याच्या जलनीतीत देण्यात आले आहे. या धोरणाच्या पाठपुराव्यांसाठी 'शेतकऱ्यांकडून सिंचन प्रणालीचे व्यवस्थापन' या नावाचा नवा कायदा इ. स. २००५ मध्ये करण्यात आला आहे.

अनुक्रमणिका

८·८ यासंबंधातील विशेष स्पृहणीय यश वाघाड प्रकल्पावरील पाणी वितरण संस्थांनी मिळवले आहे. प्रकल्पाच्या सर्व ८००० हेक्टर लाभक्षेत्रात पाणी वितरण संस्था निर्माण होऊन त्यांचा महासंघ तयार झाला. त्याने संपूर्ण लाभक्षेत्राची सिंचन व्यवस्था शासनाकडून अधिकृत आदेशान्वये आता आपल्या ताब्यात घेतली आहे. संपूर्णतः शेतकऱ्यांचे नियंत्रण प्रकल्पाच्या सर्व सिंचन व्यवस्थेवर प्रस्थापित झाले आहे. त्यामुळे तेथील पाण्याचा वापर काटकसरीने होऊन प्रत्यक्ष सिंचन क्षेत्रात वाढ झाली आहे. या लाभक्षेत्रातील प्रतिघनमीटर पाण्याची उत्पादकता महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. सरासरी हेक्टरी उत्पन्न रु. ३०,००० हून आता १·२ लाखाच्या पुढे गेले आहे. अशा या यशामुळे नव्या युगाची जणू नांदीच झाली आहे. इतरही काही प्रकल्प अशा प्रकारच्या हस्तांतरणाच्या मार्गावर आहेत. लघुप्रकल्पांवरदेखील पाणी वापर संस्था स्थापन होत असून शेतकरी सिंचन सिंचन व्यवस्थापनातील सहभागासाठी मोठ्या संख्येत पुढे येऊ लागले आहेत. ज्यांनी या दिशेने यापूर्वीच यश मिळवले व टिकवले अशा अनुभवी पाणी वापर संस्था आता नव्याने पुढे येणाऱ्या पाणी वापर संस्थांसाठी मार्गदर्शन करीत आहेत. इतकेच नव्हे, तर नव्याने यश मिळवणाऱ्यांचे गौरव-सत्कार शासनाच्या परिघाबाहेर स्वतंत्रपणे आयोजित करीत आहेत. जुन्या दिव्याने नवा दिवा लावावा तसा सिंचन व्यस्थापनाचा प्रकाश महाराष्ट्रभर पसरतो आहे.

**परिवर्तनाचे प्रेरक**

८·९ अशा या परिवर्तनामध्ये महत्त्वाची अग्रेसर भूमिका शासनाच्या ज्या दोन संस्थांनी बजावली त्यातील एक म्हणजे भूमी आणि जलव्यवस्थापन संस्था, औरंगाबाद. तिची स्थापना १९८१ मध्ये झाली. नंतर केंद्र शासनातर्फे अशा दहा संस्थांची एक साखळी देशात निर्माण करण्यात आली. सिंचनासाठी उपलब्ध असणाऱ्या पाण्याचे शास्त्रशुद्ध पायावर पद्धतशीर व्यवस्थापन होण्यासाठी, पाणी वापरदारांची क्षमता वाढवणे व त्यांच्यात संघटनात्मक सहकारिता प्रोत्साहित करणे हे महत्त्वाचे काम या संस्थेतील प्रशिक्षण व प्रबोधन वर्गामधून होते. महिला शेतकऱ्यांसाठीसुद्धा ही संस्था स्वतंत्र वर्ग चालवते. यातून प्रशिक्षण आणि प्रेरणा घेऊन अनेक उत्साही कार्यकर्ते महाराष्ट्रभर सामूहिक सहभागाची नवी सिंचनसंस्कृती निर्माण करण्यात गढले आहेत.

८·१० या यशात दुसरा महत्त्वाचा वाटा आहे तो पुणे येथील जलसंपदा विभागाच्या पाटबंधारे संशोधन आणि विकास संचालनालयाचा, 'महाराष्ट्र सिंचन' या नावाचे एक त्रैमासिक ही संस्था १९८२ पासून प्रसिद्ध करते आहे. आजमितीला त्याचे २५००० हून अधिक नियमित वर्गणीदार झाले आहेत. या त्रैमासिकाच्या रूपाने सिंचन क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणारे कार्यकर्ते, निरीक्षक, शास्त्रज्ञ, व्यवस्थापन तज्ज्ञ, अशा मंडळींना आपल्या ज्ञानाची, अनुभवांची व माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी एक उत्तम प्रभावी माध्यम उपलब्ध झाले आहे. शासनाने राबविलेली एखादी योजना जर खरोखरीच लोकाभिमुख व हस्तक्षेपविरहित असेल तर ती किती उत्तम प्रकारे यशस्वी होऊ शकते त्याचे 'वाल्मी' ही संस्था व 'सिंचन' हे त्रैमासिक ही उत्तम उदाहरणे आहेत.

८·११ शासकीय परिघाबाहेर पाणीविषयक प्रश्नांचा साधकबाधक ऊहापोह करणारे व इ. स. २००५ पासून दर महिन्याला नियमितपणे प्रसिद्ध होणारे 'जलसंवाद' मासिक हे असेच एक युगप्रवर्तक पाऊल आहे. अशासकीय हौशी प्रयतनांच्या माध्यमातून व अखिल भारतीय जलसंस्कृती मंडळाच्या आधाराने 'जलसंवाद' ने अत्यंत चिकाटीने चार वर्षांची वाटचाल आता पूर्ण केली आहे. 'जलसंवाद' हा पाणी या

विषयाला वाहिलेला लोकमंच आहे. हे लोकांचे मुक्त व्यासपीठ आहे. महाराष्ट्राची नवी जलसंस्कृती आकाराला येण्यात या मासिकाचे मोठे योगदान असणार आहे.

**पिण्याचे पाणी**

८·१२ पिण्याच्या पाण्याच्या समस्या सोडवण्याकरिता ग्रामीण तसेच नागरी भागांत सर्वंकष व सर्वमान्य धोरण अवलंबण्यासाठी २६ जुलै १९९५ रोजी पाणीपुरवठ्याच्या कार्यक्रमावर महाराष्ट्र शासनाने एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली होती. त्यावर नंतर चर्चाही घडवून आणण्यात आली. नंतर पाणीपुरवठ्याचा कार्यक्रम एकात्मिकरीत्या राबविण्याच्या दृष्टीने स्वतंत्र असा पिण्याचा पाणीपुरवठा विभागही १९९६ मध्ये नव्याने निर्माण करण्यात आला. परंतु याबाबतची प्रत्यक्ष कार्यवाही मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हाती असल्याने पुढील उपक्रमांची गती अवगुंठित झाली आहे. श्वेतपत्रिकेच्या निमित्ताने सर्व माहिती एकत्रित होऊन समाजाच्या विविध घटकांमध्ये चांगला संवाद घडून आला. पण त्यातील निष्कर्षांच्या आधारे स्थानिक पाणीपुरवठ्याचे प्रश्न नीट सोडवले जाण्यासाठी आता स्थानिक पुढाकाराची गरज आहे. लोकचळवळी मधून असा पुढाकार निर्माण होणे अपेक्षित आहे. पण त्या दृष्टीने अजून फारशी प्रगती झालेली नाही, ती एक चिंतेची बाब आहे. लोकानुवर्ती स्थानिक नेतृत्व व प्रशासन व्यवस्था यांचा चांगला मेळ बसला, तर नगरपालिकेची पुरवठा व्यवस्था आर्थिक दृष्टीने स्वयंपूर्ण व टिकाऊ होऊ शकते हे शिरपूरच्या नगरपालिकेने (लोकसंख्या ६५०००) गेल्या काही वर्षांत सातत्याने सिद्ध करून दाखवले आहे. अशा यशस्वी नगरपालिकांकडून मार्गदर्शन व प्रेरणा घेऊन नागरीपुरवठ्यांची आत्मनिर्भरता येत्या दशकामध्ये सिद्ध होऊ शकेल. महाराष्ट्राकील ८२,००० वस्त्यांमध्ये मिळून एकूण ३·२५ लाख पाणीपुरवठा योजना शासनाच्या पाठिंब्यावर पूर्ण करण्यात आल्या. तरी पाण्याच्या टंचाईचा प्रश्न यांतील अनेक वस्त्यांपुढे अजून उभाच आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे या योजना सामूहिक सहकारातून चालवणे तेथील वस्त्यांना जमलेले नाही. ग्रामीण परिसरातच ही उणीव जाणवते आहे असे मात्र नाही. पाणी व्यवस्थेतील सुधारणांसाठी पाण्याचे नागरी लोकमंचही अजून उभे नाहीत, ही उणीव सतत जाणवत राहते. तेथेही अजून सर्व भर हा शासकीय यंत्रणांच्या पुढाकारावरच आहे. गावपातळीवर पाणीपुरवठ्याविषयी जनजागृती व प्रशिक्षण यांतून नळ योजने विषयी उत्साह निर्माण व्हावा. योजनेचे आराखडे बनवून स्थानिक स्वराज्य संस्थेने म्हणजे ग्रामपंचायतीने स्वतःच त्याची अंमलबजावणी करावी असे शासनाचे धोरण आहे. या धोरणावर आधारित 'स्वजलधारा' कार्यक्रमाची सुरुवात झाली आहे. त्यासाठी जलस्वराज्य प्रकल्प २००३ पासून ३०१८ ग्रामपंचायतींमध्ये राबवला जात आहे. यातून ग्रामस्थांची क्षमताबांधणी करण्याचे कामही व्हावयाचे आहे.

**पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन**

८·१३ जमिनीची धूप थांबवण्यासाठी मृदसंधारणाचा उपक्रम विविध रूपांमध्ये १९४० पासून जरी शासनाच्या प्रोत्साहनाने चालू होता, तरी पाणलोट विकास या व्यापक संकल्पनेला अनुसरून जमीन व पाणी या नैसर्गिक संसाधनांचा एकत्रित विकास करण्याचा उपक्रम १९८३ पासून नव्याने शासनातर्फे हाती घेण्यात आला. १९९२ पासून त्याचे स्वरूप अधिक जलविकासाभिमुख करून मृदसंधारण, सामाजिक वनीकरण, लघुसिंचन, भूजलविकास या सर्वांना एकत्र गुंफणाऱ्या स्वतंत्र जलसंधारण विभागाची त्यासाठी निर्मिती करण्यात आली. त्या संकल्पनेला अनुसरून महाराष्ट्राच्या एकूण ३०७ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ज्या २४१ हेक्टरवर हे काम करायचे आहे. त्यातले जेमतेम ४५ लाख हेक्टर वरचे काम आजवर

अनुक्रमणिका

पूर्ण करता आले आहे. वित्तीय अपुऱ्या पुरवठ्याबरोबरच लोकसहभागातील उदासीनता हे एक प्रमुख कारण या उपक्रमाचा विस्तृत प्रभाव न जाणवण्याचे आहे. नळ, कालवा अशा पाणी देणाऱ्या दृश्य घटकांभोवती लोकसहभाग उभा करणे तुलनेने सोपे आहे. पाणी जिरवणारे समतलचर व नालाबांध याबरोबरच चराई बंदी सारख्या सामाजिक व्यवस्थेशी सांगड घालणाऱ्या परस्परपूरक अशा संमिश्र उपक्रमाभोवती संघटन उभे करणे व ते नेटाने कार्यरत ठेवणे अवघड आहे. जेथे प्रगल्भ व नैष्ठिक सामाजिक नेतृत्व यासाठी उपलब्ध झाले अशा ठिकाणी यात यश आले आहे. अजूनही बऱ्याच प्रमाणात पाणलोटक्षेत्र विकास हा केवळ शासनप्रणीत खर्चाचाच उपक्रम राहिला आहे. त्याचे सुसंघटित लोकचळवळीत रूपांतर झालेले नाही.

८·१४ महाराष्ट्रातील लागवडीयोग्य अशा २२५ लाख हेक्टरपैकी विविध उपायांनी महाराष्ट्रात एकूण १२६ लाख हेक्टर लागवडीचे क्षेत्र सिंचनाखाली आणता येईल असे महाराष्ट्र जलसिंचन आयोगाचा अहवाल सांगतो (१९९९). त्यापैकी २४ लाख हेक्टर क्षेत्र हे पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रमातून मिळू शकणार आहे. जेथे रूढ पद्धतीची नदी नाल्यांवरील धरणे, कालवे, नळ यांच्या आधाराने सहजपणे पाणी उपलब्ध करून देता येत नाही, अशा ठिकाणी भूशास्त्रीय अनुकूलतेनुसार पाण्याची क्षेत्रीय उपलब्धता वाढविण्यासाठी पाण्याच्या छोट्या छोट्या विखुरलेल्या साठवणी व भूजल पुनर्भरणाच्या रचना यातून पाणलोटक्षेत्र विकासाचा कार्यक्रम उभा राहतो. मातीची धूप कमी करणारे उपायही त्यात समाविष्ट करावयाचे असतात. विशेषतः सातपुड्याच्या पायथ्याशी, अजिंठ्याच्या दोन्ही बाजूच्या उतारांवर व अजिंठ्यापासून उगम पावणाऱ्या नद्यांच्या दोन्ही बाजूंच्या डोंगराळ प्रदेशात फार मोठ्या प्रमाणात पाणलोटक्षेत्र विकासाच्या कार्यक्रमाला अनुकूलता आहे. तशा कार्यक्रमांची तेथे गरजही आहे. महाराष्ट्रातील एकूण ४३,७११ गावांपैकी १८६४५ गावांमध्ये पाणलोट क्षेत्र विकास कामांना प्राकृतिक अनुकूलता आहे. त्यापैकी १४,२१९ गावांमध्ये कामे सुरू करण्यात आली आहेत. पाणलोटाला अनुकूल असलेल्या भूक्षेत्राची एकूण ४४१८५ लघुपाणलोटक्षेत्रांमध्ये विभागणी केलेली आहे. त्यापैकी आतापर्यंत १०,९०० लघुपाणलोटांची विहित कामे पूर्ण करण्यात आली आहेत व आणखी १६,००० लघुपाणलोटक्षेत्रांमध्ये ती विविध टप्प्यांवर चालू आहेत. महाराष्ट्रात आडगाव (१९८५) राळेगणसिद्धी (१९९०) हिवरेबाजार (२०००) यांसारखे पाणलोटक्षेत्र विकासाचे यशस्वी प्रयोग हे गेल्या दोन दशकांमध्ये सर्वांना प्रेरणादायक व मार्गदर्शक ठरले आहेत. परंतु अशा कार्यक्रमांना लोकसंघटनात्मक पक्का पाया अजून सर्वत्र मिळू शकलेला नाही. बराचसा कार्यक्रम मूलतः अजूनही शासकीय खर्चाच्या प्रोत्साहनातून व शासकीय यंत्रणेच्या पुढाकारातून चालू राहिला आहे.

८·१५ अशा प्रकारच्या नव्या उपक्रमांना जिथे निःस्वार्थी सामाजिक कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन व नेतृत्व मिळाले, तिथे या चळवळीमुळे त्या भागाचा चेहरामोहराच बदलून गेल्याचे दिसून येते. 'गोमुख', 'प्रयास' अशा संस्था किंवा शिरूर परिसरात काम करणारी 'जयमल्हार' संस्था अशा अनेक संस्था पाण्याच्या चणचणीचे आव्हान स्वीकारून पाणलोटक्षेत्राच्या नव्या रचनेला हातभार लावीत आहेत. शिवाय ग्रामगौरव प्रतिष्ठानच्या 'पाणी पंचायत' सारख्या उपक्रमांमध्ये पाण्याचा सामूहिक क्षेत्रीय व्यवस्थापनाला व ग्रामीण समाजातील परस्पर सहकार्याला उद्युक्त करण्यात येते आहे. पाणलोट क्षेत्रातील जलसंधारण प्रकल्पांमध्ये लोकांचा स्थानिक सहभाग वाढून त्यांच्या मनात या नव्या प्राकृतिक रचनेबद्दल आपुलकीची भावना वाढावी अशी अपेक्षा आहे. अशा रचनांची देखरेख-दुरुस्ती व जमीन आणि पाणी वापराचे क्षेत्रीय नियमन हे शासकीय यंत्रणातर्फे नव्हे, तर स्थानिक लोकसंघटनांच्या माध्यमातून होत राहवे अशी अपेक्षा आहे. चराई बंदी, कुऱ्हाड बंदी व उपसा नियंत्रण अशा उपायांचा अवलंब करून २,००० ते २,५०० हेक्टर पर्यंतच्या

अनुक्रमणिका

भूक्षेत्राचे सामुदायिक व्यवस्थापन स्थानिक लोकसंघटनेला यशस्वीपणे जमू शकते असा आजवरचा अनुभव आहे. पण त्यापेक्षा अधिक मोठ्या पाणलोटक्षेत्राच्या सामूहिक व्यवस्थेचा प्रयोग अजून फारसा हाती घेतला गेलेला नाही. ग्रामीण समाजात 'गावकी' ची भावना परंपरेने सुदृढ आहे. त्यामुळे गावक्षेत्रापुरत्या पाणलोटाच्या सामूहिक व्यवस्थापनात यश मिळते आहे. पण त्यापुढे जाऊन ५-१० गावांचा सामुदायिक सहभाग असलेल्या मोठ्या पाणलोटक्षेत्राच्या व्यवस्थापनाच्या कार्यक्रमाला अजून हात घालता आलेला नाही. कालव्याच्या सिंचन क्षेत्रात ज्याप्रमाणे पाणी वितरण संस्थांचे महासंघ उभे होऊन संपूर्ण कालवाक्षेत्राचे व्यवस्थापन आत्मविश्वासपूर्वक शेतकऱ्यांच्या हाती घेतले जात आहे, तसेच महासंघ मोठ्या पाणलोट क्षेत्रांच्या सामूहिक व्यवस्थापनात पुढे यावेत अशी अपेक्षा आहे. पण त्यासाठी व्यापक सामाजिक दृष्टीची व फार चांगल्या संघटन कौशल्याची गरज आहे. पिण्याच्या पाण्यासाठी म्हणून ज्या ७६२ प्रादेशिक नळ योजना दहाव्या पंचवार्षिक योजनेअखेर शासकीय पुढाकारातून अस्तित्वात आल्या आहेत त्यांच्या परिचालनात सामूहिक कार्यपद्धतीचा यापुढे कस लागणार आहे. गावांसाठी स्वतंत्रपणे १८,०६४ नळयोजना पूर्ण होऊन वेगवेगळ्या गावांना हस्तांतरित झाल्या आहेत. त्याही सुरळीतपणे चालवणे अजून वेगवेगळ्या अडचणींमुळे नीट जमलेले नाही याबाबतची तांत्रिक व सामाजिक क्षमता वाढवल्याशिवाय या व्यवस्थांना स्थैर्य येणार नाही.

८·१६ महाराष्ट्र शासनाने १५०५ पाणलोटक्षेत्रे औपचारिकरीत्या अंकित केली आहेत. साधारणतः त्या प्रत्येकात २०-२५ गावे येतात. त्या प्रत्येक पाणलोटक्षेत्राचे आत्मनिर्भर व्यवस्थापन नीट बसवले जावे असे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे. पण अशा २००-३०० चौ. कि. मी. (२०,००० ते ३०,००० हजार हेक्टर) सलग स्रवण क्षेत्राबाबत अजून सहज आत्मीयता स्थानिक समाजात निर्माण होऊ शकलेली नाही. परंपरेने समाजाची 'अस्मिता' ही आजवर 'तालुका' 'जिल्हा' अशा प्रशासकीय घटकांशी निगडित झाली आहे. पाणलोट, उपखोरे, खोरे अशा नैसर्गिक भूक्षेत्रांबाबत तितकीशी आपुलकीची भावना अजून निर्माण करता आलेली नाही. वस्तुतः ही नैसर्गिक घटकक्षेत्रे म्हणजे यापुढील स्थायी विकासाच्या पायाभूत आधारशिला आहेत. पण तशी सुस्पष्ट वैज्ञानिक, आर्थिक, व सामाजिक जाणीव संबंधितांमध्ये, उत्पन्न झाल्याशिवाय या क्षेत्रांचे संघटन व सुविहित व्यवस्थापन अवघड राहणार आहे. त्या दिशेने जावे तर लागणार आहे, पण त्यासाठीची आवश्यक ती वैज्ञानिक व सामाजिक पूर्वतयारी अजून तरी महाराष्ट्राच्या समाज जीवनात झालेली नाही. महाराष्ट्र शासनाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने ग्रामस्तरीय पाणलोटातील पाण्याचा ताळेबंद गावातच तयार होण्यासाठी ३५३ गावामध्ये म्हणजे प्रत्येक तालुक्यांतील एका गावामध्ये जून २००४ पासून ग्राम जलव्यवस्थापनाचा उपक्रम हाती घेतला आहे. त्याचाच विस्तार नंतर पाणलोटाच्या पूर्ण क्षेत्रावर इतर गावांच्या सहकार्यातून करावा लागणार आहे.

८·१७ शेती करणाऱ्या खातेदारांची संख्या महाराष्ट्रात साधारणतः एक कोटीच्या आसपास आहे. त्यात ०·४ हेक्टरपेक्षाही कमी जमीन असणारे ४० टक्के शेतकरी आहेत. एक हेक्टरपर्यंतच जमीन असणारे ७० टक्के शेतकरी आहेत. पण या एक हेक्टरपर्यंतच्या ७० टक्के शेतकऱ्यांकडे एकूणातील फक्त २५ टक्के जमीन आहे. गरिबीचे मूळ तेथे आहे. म्हणून अशा या एकेकट्या अल्पभूधारकाला स्वबळावर शेतीचा विकास करण्यात यापुढे स्पष्ट मर्यादा आहेत. सामूहिक कार्यपद्धतीतूनच त्यांची शेती भरभराटीला आणणे शक्य होणार आहे. पण त्यासाठी माणसांची मने सामूहिक कार्यपद्धतीसाठी तयार करणे गरजेचे आहे, त्याला पर्याय नाही. 'पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन मंडळे' शेती विकासाच्या सामूहिक प्रयत्नांना पूरक ठरणार आहेत. शासनाच्या नियमावलींमध्ये अशा मंडळांची निर्मिती अभिप्रेत असली तरी त्यादृष्टीने काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा अभाव असल्यामुळे तशी मंडळे फारशी आकाराला आलेली नाहीत. पण

अनुक्रमणिका

ग्रामीण जीवनाला ही नवी सामूहिकतेची दिशा प्राप्त होण्यावर ग्रामीण परिसरातील समृद्धीची निर्मिती भविष्यात अवलंबून राहील. शासनाकडून होणाऱ्या खर्चाच्या आकर्षणामुळे व रोजगार निर्मितीच्या तत्कालिक लाभामुळे पाणलोटक्षेत्राच्या कामांची मागणी वाढत असली व त्या कामांबाबतची अशा प्रकारची पाणलोटक्षेत्रनिहाय आकडेवारीही बऱ्यापैकी उपलब्ध असली, तरी पाणलोटाच्या पार्थिव व्यवस्थेत शेवटी प्राण निर्माण करणारी सामूहिक व्यवस्था कोठे, कितपत, कशी उभी आहे याची माहिती अजून नीटशी उपलब्ध नाही. यशस्वी ठरलेल्या काही स्थानिक प्रयोगांचीच तेवढी माहिती मिळते. पण त्यातून महाराष्ट्राची या दिशेने नेमकी प्रगती किती झाली आहे याचा बोध होत नाही.

८·१८ काही किमान शालेय शिक्षणाचा लाभ मिळालेला नवा प्रौढ तरुण गट सुदैवाने आज ग्रामीण भागातील सामाजिक जीवनात कार्यरत होऊ लागला आहे. दोन पिढ्यांपूर्वीचा 'अशिक्षित शेतकरी' आज संख्यात्मक दृष्टीने पुष्कळ कमी झाला आहे. अनेक शिक्षित शेतकरी आज खेड्यापाड्यातून शेतीतील व ग्रामीण जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी धडपडत आहेत. सांगोला हा एकेकाळचा आत्यंतिक दुष्काळी तालुका. पण तेथील ग्रामीण जीवनात आज खूप लक्षणीय परिवर्तन जाणवते. विकासाचा (अग्रेसर) तालुका अशी आज सांगोल्याची ओळख झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कागल तालुका आणि मराठवाड्यातील वसमत तालुका हेसुद्धा आज विकासाचे अग्रेसर तालुके म्हणून कोल्हापूर, निफाड, रावेर यांच्या मागोमाग पुढे आले आहेत. ग्रामीण जीवनातील शैक्षणिक विस्ताराचा लाभ जलव्यवस्थापनातील परिवर्तनासाठी होणार आहे. हा शिक्षित शेतकरी गट आता पाण्याच्या व्यवस्थापनाबाबत अधिक डोळस, अधिक वैज्ञानिक व अधिक व्यापक विचार करू शकतो आहे. जेथे हा नवा वर्ग पुढे येऊन जबाबदारी उचलताना दिसतो आहे, तेथे तेथे नवे आशावादी चित्र तयार होताना दिसते आहे. उदा. साक्री तालुक्यातल्या बारीपाडा गावाच्या शेती विकासाचे व वनव्यवस्थापनाचे झालेले लोकाधारित यशस्वी परिवर्तन. अशा प्रयत्नांना अधिक प्रोत्साहनाची व प्रगत तांत्रिक मार्गदर्शनाची गरज मात्र वाढती राहणार आहे.

**तज्ज्ञ व्यावसायिक संघटना**

८·१९ त्याकरिता पाणी या विषयाशी संबंधित असणाऱ्या विविध प्रश्नांची उकल करू शकणाऱ्या व मार्गदर्शन देऊ शकणाऱ्या तज्ज्ञ व्यावसायिकांच्या संघटना अधिक प्रमाणात सामाजिक कामासाठी पुढे यायला हव्या आहेत. दि इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन (IWWA) ही संस्था नागरी, ग्रामीण व औद्योगिक पाणीपुरवठा या विषयात लक्ष घातले, तर भारतीय जलसंशोधन संस्था (इंडियन वॉटर रिसोर्सेस सोसायटी) ही संस्था जलस्रोतांशी संबंधित असणाऱ्या क्षेत्रीय विकासाच्या प्रश्नांकडे लक्ष देते. '(IWWA)' गेली चाळीस वर्षे तर, '(IWRS)' गेली तीस वर्षे भारतभर कार्यरत आहेत. दरवर्षी जलसंपत्तिदिन साजरा करण्याच्या निमित्ताने पाणी आणि पाणीविषयक प्रश्न यासंबंधी जनजागृती करण्याचे, लोकांना पाणी या विषयातील अधिक ज्ञान देऊन समाजात जलसाक्षरता वाढविण्याचे प्रयत्न या दोन्ही संस्था आपआपल्या परीने करीत असतात. पाणी गळतीचा शोध घेणे, पाण्याची नासाडी टाळणे, पाणी पुरवठ्याच्या शास्त्रशुद्ध संरचना ठरवणे अशा तांत्रिक स्वरुपाच्या विषयात मार्गदर्शन करणारे साहित्य/पुस्तिका प्रकाशित करण्याचे अत्यंत उपयुक्त काम '(IWWA)' ही संस्था करीत असते. महाराष्ट्रात त्यांच्या सहा शाखा अहमदनगर, औरंगाबाद, जळगाव, मुंबई, पुणे, नागपूर येथे कार्यरत आहेत. जलविज्ञान, जलअभियांत्रिकी आणि भूजल यासारख्या विशिष्ट विषयांमध्ये लक्ष घालणाऱ्या त्या त्या विषयातील विशेषज्ञांच्या स्वतंत्र स्वेच्छिक संस्थांही आता चांगले मूळ धरू लागल्या आहेत. या सर्व संस्थाचे उपक्रम स्वयंसेवी स्वरूपाचे आहेत. पाण्याच्या

अनुक्रमणिका

संबंधातील निरनिराळ्या पैलूंची संकल्पनात्मक उकल व विकासात्मक दिशा यांना या संस्था अत्यंत उत्तम चालना देऊ शकतात पण त्यांची सदस्य संख्या आणि त्यांची केंद्रे वाढण्याची, त्यांच्या भौगोलिक व विषयात्मक कार्यकक्षा अधिक विस्तारण्याची व त्यांची कार्यपद्धती केवळ तात्त्विक विषयांशी मर्यादित न होता विवक्षित क्षेत्रीय प्रश्नांशी निगडित केली जाण्याची नितांत आवश्यकता आहे. महाराष्ट्रात उदयास येत असलेल्या नव्या जलसंस्कृतीला ठोस वैज्ञानिक आधार देण्याचे काम अशा संघटनांच्या माध्यमांतूनच होऊ शकणार आहे.

८·२० पाण्याची कल्याणकारी उपलब्धता समाजात वाढवणाऱ्या ज्या ज्या व्यवस्था आहेत उदा. नदी, कालवा, पाणवठे, विहिरी, घाट, त्याच्यांकडे आदराने पाहण्याची भारतीय परंपरा होती. त्यातील अनेक नव्या व्यवस्था आता शासकीय माध्यमातून निर्माण होत आहेत. त्यामुळे त्या सरकारी म्हणून समाजमाणसात गणल्या जात आहेत. पारतंत्र्याच्या काळात स्वातंत्र्यासाठी जी आंदोलने झाली, त्यात अधिकार प्रवण सरकारी प्रतिमेबद्दलची एकंदर नाराजी किंवा त्रयस्थ भूमिका तयार झाली. पुढे स्वातंत्र मिळाल्यानंतरही धरण, कालवे, जलकुंभ अशा सरकारने निर्माण केलेल्या ज्या गोष्टी आहेत त्यांच्याबद्दलची अशीच दूरत्वाची भावना अजून रेंगाळत राहिली आहे. त्यांच्याशी आपले काही आत्मिक नाते आहे अशी भावना समाजात वाढली नाही. गांधी प्रतिष्ठानचे कार्यकर्ते अनुपम मिश्रा यांनी भारतभर तीन वर्षे भ्रमण करून 'अब भी खडे हैं तालाब' या नावाचे उद्‌बोधक पुस्तक लिहिले आहे. त्याचा 'भारतीय तलावांची परंपरा' या नावाखाली मराठीत अनुवादही झाला आहे. त्याचे क्रमशः मराठीतून वाचन आकाशवाणीवर होत असते. त्या लेखनातून त्यांनी हेच सांगायचा प्रयत्न केला आहे, की आपल्या भारताला पुन्हा वैभवाकडे न्यायचे असेल तर तलावांना आपल्या व्यवस्थेमध्ये पूर्वीची सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली पाहिजे. समाजव्यवहारात त्यांना आदराचे स्थान निर्माण करून द्यायला हवे आहे. अनिल अग्रवाल या पर्यावरणीय चळवळीतल्या कार्यकर्त्यानेही 'डायिंग विज्डम' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. जलव्यवस्थापनाच्या बाबतीत समाजात जे परंपरागत शहाणपण होते व तदंतर्गत अशा व्यवस्थांबद्दलची जी आत्मीयतेची दृष्टी होती, त्याला आता गळती लागली आहे. याकडे त्यांनीही लक्ष वेधले आहे. पाण्याचा लाभ घडवून आणणाऱ्या व्यवस्थांबद्दल आदर, आत्मीयता व श्रद्धा निर्माण करणाऱ्या जाणिवा समाजात जिवंत राहिल्या तरच या व्यवस्थांचे दृढीकरण होईल व समाजात टिकाऊ अशी सुबत्ता नांदेल असा या सर्व विवंचनाचा गाभा आहे. म्हणून ऐहिक विकासाबरोबरच त्यांच्याशी निगडित अशी सामाजिक, सांस्कृतिक बांधणीही व्हायला हवी आहे.

८·२१ नव्याने निर्माण करण्यात आलेल्या आधुनिक सिंचन व्यवस्थांबद्दल अशी आत्मीयता वाढीस लागावी म्हणून नव्या जलव्यवस्थांशी संबंधित वास्तूंचे व प्रकल्पांचे वाढदिवस साजरे करण्याचा उपक्रम महाराष्ट्रात सिंचन सहयोग या चळवळीच्या माध्यमातून हाती घेण्यात आला आहे. या वास्तूंचे औपचारिक स्वामित्व शासनाकडे असले व बहुशः ठिकाणी व्यवस्थापनही अजून शासन नियंत्रित असले, तरीही अशा या वाढदिवसांच्या उपक्रमाला शासनाकडून व लोकांकडूनही उत्स्फूर्त व उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा प्रकल्पाचा वाढदिवस अशाप्रकारे प्रथमतः २००० मध्ये साजरा झाला. नंतर मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा प्रकल्पाचा २००२ मध्ये, सोलापूर जिल्ह्यातील उजनी प्रकल्पाचा २००४ मध्ये, वर्धा जिल्ह्यातील बोर प्रकल्पाचा २००५ मध्ये, नगर जिल्ह्यातील मुळा प्रकल्पाचा २००८ मध्ये व बीड जिल्ह्यातील मांजरा प्रकल्पाचा २००९ मध्ये साजरा झाला. राजर्षि शाहूराजांनी बांधलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी प्रकल्पाची शतसांवत्सरीही लवकरच साजरी करण्याचा प्रयत्न चालू आहे. मराठवाड्यातील गोदावरीवरील जायकवाडी (पैठण) प्रकल्पाचा वाढदिवसही संकल्पित आहे. ज्या

अनुक्रमणिका

समाजासाठी हे प्रकल्प आहेत त्या समाजाचे व प्रकल्पाचे भावनिक नाते वाढदिवसासारख्या उपक्रमांमधून वृद्धिंगत व्हावे अशी अपेक्षा आहे. गावागावात ग्रामदेवतांना जसे सन्मानाचे स्थान असे, तसे स्थान या नव्या पाणी व्यवस्थांना व त्या व्यवस्थांच्या प्रतीकांना मिळावे असा प्रयत्न आहे. धरणे, कालवे, बंधारे, पाणीपुरवठ्याचे जलकुंभ, हातपंप, नळ, जलविद्युत केंद्रे ही जलव्यवस्थेची नवी रूपे आहेत. सत्यनारायणाच्या पूजेत कलशाला जसे मानाचे स्थान असते तसे गौरवाचे स्थान या प्रतीकांना जनजीवनात मिळायला हवे आहे. महाराष्ट्राच्या नवोदित जलसंस्कृतीला त्यातून फार मोठा उन्नत आधार मिळेल.

**पाण्याचे लोकमंच**

८·२२ नद्यांबद्दलची अशीच भावनात्मक जागृती २००२ पासून जलदिंडीच्या उपक्रमांतून केली जात आहे. इंद्रायणीच्या तीरावरील आळंदीपासून निघून इंद्रायणी-भीमा-उजनी-जलाशय यातून ४५० कि. मी. चा वळणावळणाचा प्रवास नावांमधून करीत शेवटी १२ दिवसांनंतर चंद्रभागेतीरी पंढरपूरला विठ्ठलदर्शन घेणारी जलदिंडी वाटेतील ७० गावांमध्ये थांबून नदीच्या पाण्याची शुद्धता आरोग्य, पाण्याचे पर्यावरणीय नाते याविषयी काठावरचे रहिवासी व शाळांमधले विद्यार्थी यांच्यात जागृती करीत असते. त्याबरोबरच भक्तीभावाचा आध्यात्मिक संदेशही देत असते. तीरावरील तरुण वर्ग व परिसरातील ग्रामस्थ या उपक्रमाकडे चांगला आकर्षित झाला आहे. आतापर्यंत एक हजार तरुणांनी यात सहभाग नोंदवला आहे. असाच उपक्रम आता तापी (मुक्ताईनगर ते श्रीप्रकाशे), गोदावरी (नाशिक ते पैठण), पवना (उगम ते मोरया गोसावी), भीमा (भीमाशंकर ते तुळापूर संगम) या नद्यांमधून हाती घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्यातून नदीच्या वास्तव स्थितीचे प्रत्यक्ष दर्शन अनेकांना घडावे, नदीबद्दलची आत्मीयता वाढावी व नदीप्रवाहाच्या व्यवस्थापनाच्या उन्नतीकरणासाठी झटणारा कार्यकर्ता वर्ग उभा व्हावा अशी अपेक्षा आहे. पण अशी नवी नाती निर्माण व्हायला वेळ लागतो. दीर्घकाल चिकाटीचे प्रयत्न लागतात. महाराष्ट्रात या दिशेने जलदिंडी प्रतिष्ठानसारख्या हौशी संघटना पुढे येत आहेत हे शुभसूचक आहे.

८·२३ पाण्याच्या नव्या संस्कृतीला परंपरेचा आधार देणारे व या संदर्भातील नव्या गरजांकडे लक्ष वेधणारे उपक्रम भारतीय जलसंस्कृती मंडळातर्फे (स्थापना २०००) चालू असतात. सिंचन सहयोग (स्थापना १९९४), सरोवर संवर्धिनी (स्थापन २००७) अशा सेवाभावी संघटनांचे या संबंधातले उपक्रमही महाराष्ट्राची नवी जलसंस्कृती सुदृढ करायला उपयोगी पडणार आहेत. पाण्याच्या संदर्भात अलीकडे नियमाने भरवल्या जात असलेल्या मराठी जलसाहित्य परिषदाही कार्यकर्त्यांच्या मनांची मशागत करण्यात महत्त्वाची भूमिका निभावणार आहेत.

८·२४ अशा विविध उपक्रमांमधून लोकांमध्ये सिंचन, पिण्याचे पाणी, पाणलोट क्षेत्र याबाबत लोकजागृती संघटन व रचनात्मक कार्यक्रम अशा विविध प्रक्रियांमध्ये गुंतलेल्या कार्यकर्त्यांचे मोहोळ उभे राहत आहे. त्यातील काही प्रभावी कार्यकर्त्यांच्या कामाचा मागोवा महाराष्ट्रात हिंडून व त्या कार्यकर्त्यांना भेटून घेण्यात आला व त्यावर आधारलेले पुस्तक 'महाराष्ट्राचे जलनायक' या नावाने प्रसिद्ध झाले आहे (२००४). किती विविध प्रयत्नांनी महाराष्ट्राची जलव्यवस्था लोकमंचावर आकाराला येते आहे याची चांगली कल्पना त्यातील तपशिलांवरून येते. महाराष्ट्राच्या नव्या जलसंस्कृतीची बीजे या कार्यकर्त्यांच्या कामांमध्ये आहेत. गेल्या पाव शतकाहून अधिक काळ आपल्या परिसरात पाण्यासंबंधीची अनेक कामे या कार्यकर्त्यांच्या व्यक्तिगत प्रयत्नांनी, सामूहिक सहयोगाने आणि शासनाच्या सक्रिय पाठिंब्याने अनेक ठिकाणी चालू आहेत. महाराष्ट्रात विखुरलेल्या अशा जीवनस्पर्शी कामांची व कार्यकर्त्यांची अतिशय

मौलिक अशी प्रेरणादायी माहिती एकत्रित रूपाने यापुस्तकात महाराष्ट्रातल्या वाचकांसमोर ठेवली गेली आहे. या पुस्तकाचा दुसरा भागही लवकरच अपेक्षित आहे.

८·२५ मार्च २००० मध्ये नेदरलँडची राजधानी हेग येथे झालेल्या जागतिक पाणी परिषदेमध्ये 'पाणी आणि संस्कृती' हा विषय प्रथम जागतिक मंचावर चर्चेसाठी घेण्यात आला. नंतर संयुक्त राष्ट्र संघातर्फे प्रायोजित जागतिक जलदिवसासाठी मुख्य विषय म्हणून २००५ मध्ये हाच विषय पुढे आणला गेला. तद्‌नंतर झालेल्या जगभराच्या विचारमंथनामधून 'पाणी आणि संस्कृती' या विषयाचे अनन्य साधारण महत्त्व आता सर्वांच्या लक्षात येऊ लागले आहे. पृथ्वीवरील भिन्न भिन्न प्रदेशातील मानवी समूहांच्या जीवनव्यवहारांची रचना पाणी या घटकाभोवती कशी उभी राहिली आहे, त्यात कशा प्रकारची भिन्नता आहे, कोणत्या जाणिवा आणि संकल्पना या समरूप आहेत व कोणत्या वेगळ्या असणे अपरिहार्य आहे याचा मागोवा घेतला जात आहे. भारतीय जलसंस्कृती मंडळातर्फे २००७ मध्ये मराठीत प्रकाशित झालेले 'भारतीय जलसंस्कृती' हे पुस्तक म्हणजे या जागतिक विचारधारेला भारताची एक मोठी देणगी आहे. त्या पुस्तकात महाराष्ट्रातील ऐतिहासिक जलविकास परंपरांचा सांस्कृतिक आढावा समाविष्ट आहे. जागतिक वापरासाठी या पुस्तकाचा इंग्रजी भाषेमध्येही अनुवाद प्रसिद्ध झाला आहे (जुलै २००९) जलसंस्कृती या विषयावरचे इतके विस्तृत पुस्तक जगाच्या विचारपटलावर ठेवण्याचा मान प्रथमतः मराठी भाषेला मिळाला आहे!

**९·० जलव्यवस्थापनांचे विकेंद्रीकरण**

९·१ निसर्गातील मूलभूत जलवैज्ञानिक भूक्षेत्रीय घटक म्हणजे नाल्याचे स्त्रवण क्षेत्र किंवा नदीचे खोरे, या क्षेत्राच्या आत होणाऱ्या घडामोडीचा परस्परांवर व पाण्यावर परिणाम होतो. पाण्याची मोजणी (भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील) व हिशोब हाही अशा नैसर्गिक घटकांच्या भूक्षेत्रांसाठी सुलभतेने करता येतो म्हणून नदी, खोरे, उपखोरे व पाणलोट क्षेत्र हे पाणी नियोजनाचे व व्यवस्थापनाचे पायाभूत घटक म्हणून स्वीकारण्यात आलेले आहेत. महाराष्ट्राचे एकूण ३ लाख २१ हजार चौ. कि. मी. चे भौगोलिक क्षेत्र मूलतः ४ मुख्य नदीखोऱ्यांमध्ये व कोकणच्या खोरेसमूहामध्ये पसरलेले आहे. गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा ही ती चार खोरी व कोकणातील २२ पश्चिमवाहिनी नद्यांचा खोरेसमूह, त्यातील एकेकाचा क्षेत्रीय विस्तार पाहता एवढ्या मोठ्या भूप्रदेशाचा एकत्रितपणे समन्वित विचार करणे अवघड आहे. म्हणून व्यवहार्यतेच्या दृष्टीने प्रत्यक्ष लौकिक व्यवस्थापनात 'उपखोरे' अशा छोट्या घटकाचा विचार करणे इष्ट ठरते. ५००० चौ. कि. मी. ते अधिकाधिक २०,००० चौ.कि.मी. यामधील भूक्षेत्राचे सर्वंकष नियोजन तितकेसे अवघड नाही. प्रचलित प्रशासकीय व्यवस्थेत जिल्हा हा साधारणपणे १०,००० चौ.कि.मी.च्या आसपासचे क्षेत्र व्यापतो. इतक्या विस्ताराच्या क्षेत्राचे नियोजन करण्याचा व प्रशासन सांभाळण्याचा अनुभव गाठीशी असल्यामुळे साधारणतः तेवढ्याच आकाराच्या उपखोरे या नैसर्गिक घटाकाचेही काटेकोर नियोजन व व्यवस्थापन करता येणे शक्य व्हावे म्हणून महाराष्ट्र जलसिंचन आयोगाने (१९९९) पाण्याच्या व्यवस्थापनासाठी महाराष्ट्राचे क्षेत्र २५ उपखोऱ्यांमध्ये विभागावे असे सुचविले आहे. त्यादृष्टीने आता पाण्याच्या हिशोबासाठी, सिंचन अहवालांसाठी किंवा जललेखा निरीक्षणासाठी पुढील कार्यवाहीची पाऊले पडताना दिसत आहेत.

९·२ निसर्गातील निरनिराळ्या प्रकारच्या भौगोलिक रचनांमुळे पाणी साठवणीच्या व सिंचनाच्या दृष्टीने सर्व उपखोरी सारख्याच पात्रतेची नाहीत. त्या त्या उपपखोऱ्यांमध्येही नद्यांच्या व उपनद्यांच्या संगमाजवळ असलेले भूप्रदेश उदा. निफाड, राहुरी, नेवासा, माजलगाव व गंगाखेड यांना कालव्यांद्वारे व

अनुक्रमणिका

नदीमधून सिंचन देणे सहज शक्य असते. पण उंच पठारांवर वसलेले तालुके उदा. चांदवड, केज, कळंब, उस्मानाबाद (धाराशीव), वाशिम, यवतमाळ यांना पाणी पोहोचवणे शेतीसाठी किंवा नागरी व औद्योगिक उपयोगासाठी अत्यंत खर्चिक व अडचणीचे आहे. अशा प्रकारे प्राकृतिक रचनेमुळे काही भूक्षेत्राला जलविकासाची आत्यंतिक अनुकूलता तर काहींना प्रतिकूलता आहे. अवघड जागांच्या भूक्षेत्रांना पाण्याच्या सुविधांसाठी अनुकूल क्षेत्रांच्या पातळीवर पूर्णपणे आणणे शक्य नाही. म्हणून त्यांच्या विकासाचे व आर्थिक समृद्धीचे असे पर्याय निवडायला हवेत, की ज्यांना पाण्याची विपुल गरज नसते, उदा. व्यापार, वाहतूक, शिक्षण व आरोग्यसेवा, याचाच अर्थ असा, की उत्पादनाचे नैसर्गिक आधार, जीवन रचना व राहणीमान याबाबत खूप वेगळेपणा पाणलोट क्षेत्रांमध्ये व उपखोऱ्यांमध्ये अपरिहार्य आहे. साहजिकच जलसंस्कृतीच्या संदर्भात सर्वत्र एकरूपतेची अपेक्षा करता येणार नाही. जलसंस्कृतीच्या वेगवेगळ्या पैलूंची प्राथमिकता व महत्त्व वेगवेगळ्या भूक्षेत्रांवर वेगवेगळ्या प्रकारचे राहणार आहे. महाराष्ट्राच्या एकूण ३·०७ लाख चौ. कि. मी पैकी १·१२ लाख चौ. कि. मी. (म्हणजे १/३ हून अधिक क्षेत्र) अवर्षणप्रवण आहे. त्याच्या स्थायी विकासाचा व तेथील जीवनरचनेचा विचार इतर क्षेत्रापेक्षा खूप वेगळ्या पद्धतीचा व्हायला हवा आहे. अलीकडे त्या क्षेत्रासाठी शासननियुक्त एक स्वतंत्र समिती काम करत आहे. पण तेथील वैशिष्ट्यांना अनुकूल अशी समाजरचना घडून यायला काही वेळ लागेल असे दिसते.

९·३ उपखोऱ्यांच्या भूपृष्ठावरील प्राकृतिक रचनेत व भूपृष्ठाखालील भूस्तरांमध्ये जशी विविधता आहे त्याचप्रमाणे हवामान व पर्जन्यमान यांच्या तपशिलांतही वेगळेपणा आहे. सरासरी सर्वांत जास्त ९५ पर्जन्यदिवस कोकणात आहेत, तर सर्वात कमी पर्जन्यकाळ सरासरी २६ दिवसांपर्यंतच मराठवाड्यात काही ठिकाणी आहे. महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांमध्ये पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणात व विश्वासार्हतेतही खूप तफावत आहे. कोकणात दरवर्षी २००० ते ३५०० मि. मी. पाऊस पडतो. सह्याद्रीच्या माथ्याच्या पूर्वेला पर्जन्यमान झपाट्याने कमी होते. सह्याद्रीच्या रांगेला समांतर असलेल्या मावळच्या पूर्वेकडील ३० ते ५० कि.मी. पट्ट्यात सरासरी पर्जन्यमान ६५० मि.मी. पेक्षाही कमी (काही ठिकाणी केवळ ५०० मि.मी.) आहे. म्हणूनच या भागाला पर्जन्यछायेचा प्रदेश असे म्हणतात. त्यापुढे मात्र पूर्वेकडे पर्जन्यमान वाढत वाढत जाऊन महाराष्ट्राच्या अतिपूर्वेकडील तालुक्यामध्ये पुन्हा सरासरी पर्जन्यमान १४०० मि.मी. पर्यंत आहे. याबरोबरच कोकण प्रदेशात वार्षिक सरासरी बाष्पीभवनाचे प्रमाण तुलनेने कमी आहे. रत्नागिरी जिल्ह्यात सर्वात कमी बाष्पीभवन म्हणजे वर्षभरात १४७८ मि.मी. आहे. तर धुळे व जळगाव या जिल्ह्यांत वार्षिक पर्जन्यमान ७०० मि.मी. पर्यंत, पण वार्षिक सरासरी बाष्पीभवन मात्र बरेच जास्त म्हणजे २४७५ मि.मी. आहे. बुलढाणा, अकोला व अमरावती या तीन जिल्ह्यांतही वार्षिक बाष्पीभवन २२०० ते २४०० मिमी आहे. निसर्गातील वनस्पतीची वाढ, पीकरचना, घररचना व एकंदर मानवी जीवनाची ठेवण यावर या वेगळेपणाचा प्रभाव स्पष्ट आहे. म्हणूनच या सर्वांचा विचार करून कृषीविभागाने महाराष्ट्राचे नऊ कृषि हवामान विभाग निर्धारित केले आहेत. त्या प्रत्येकातील जलव्यवस्थापन तेथल्या वैशिष्ट्यांना ध्यानांत घेऊन करावे लागणार आहे.

९·४ पाण्याच्या उपलब्धतेच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या २५ उपखोऱ्यांची मुख्यतः ५ अतितुटीचे, तुटीचे, सर्वसाधारण उपलब्धतेचे, विपुलतेचे व अतिविपुलतेचे अशी गटात विभागणी सयुक्तिक ठरते. पाण्याची उपलब्धता दरडोई प्रमाणात किंवा लागवड क्षेत्राच्या दरहेक्टरी प्रमाणात अशा दोन्ही पद्धतीने सांगता येते. लोकसंख्येत बदल होत जातात. त्याप्रमाणात दरडोई पाण्याच्या उपलब्धतेचे आकडे बदलतात. पण लागवडक्षेत्राच्या तुलनेतील पाण्याची नैसर्गिक स्थिती ही बव्हंशी स्थिर असते म्हणून पाणी व लोकजीवन यातील नात्याचा विचार करताना प्रथमतः दरहेक्टरी उपलब्धतेचा व त्यानंतर दरडोई उपलब्धतेचा विचार

अनुक्रमणिका

हितावह ठरतो. दरहेक्टरी उपलब्धतेचा विचार केला तर येरळा, अग्रणी, माण, सीना या उपखोऱ्यांमध्ये ५०० ते १००० घनमीटर, कृष्णेच्या पश्चिमेकडील वारणा, पंचगंगा अशा उपखोऱ्यांमध्ये २०,००० घनमीटर, तापी खोऱ्यांतील दक्षिण भागात २२०० घ.मी. तर वैनगंगेच्या मध्यभागात ८२०० घ.मी. व त्याच्या पूर्वेकडे ३०,००० घ.मी. इतकी विषमता आहे. कोकणातील खोऱ्यांमध्ये ३०,००० ते ४०,००० घनमीटर पाणी प्रतिहेक्टर उपलब्ध आहे. नैसर्गिक उपलब्धतेतील हे साठपटीहून अधिक अंतर पाहता पाण्याच्या नियोजनातील वेगळेपणाची गरज स्पष्ट दिसते. शेतीचे हंगाम, पीकरचना, व त्यावर आधारित लोकप्रिय सार्वजनिक सण याचप्रमाणे नागरी जीवनातील दरडोई पाण्याचा वापर, त्यासंबंधातील सवयी, सामाजिक संकेत व उत्सव यात स्थानिक परिस्थितीनुसार वेगवेगळेपणा अपरिहार्य आहे. म्हणून प्रत्येक उपखोऱ्याचे व्यवस्थापन वेगवेगळेपणाने तेथील वास्तव परिस्थितीच्या संदर्भात व्हायला हवे आहे. जेथे दरहेक्टरी ३००० घनमीटरपेक्षा कमी पाणी उपलब्ध आहे. तेथे दोन हंगामी पिके घेणे (खरीब व रब्बी) सर्वांना शक्य होणार नाही. जेथे दरहेक्टरी ४००० ते ८००० घनमीटर पाणी उपलब्ध आहे तेथेच दोन पिकांचे नियोजन करता येईल. दरहेक्टरी ८००० घ.मी. पेक्षा जास्त पाणी उपलब्ध असेल तेथेच बारमाही पिकांची रचना उचित राहील. सिंचनेतर वापरांसाठी विपुल पाणी लागणारे ऊर्जा निर्मितीचे औष्णिक प्रकल्प किंवा रासायनिक उद्योग हे १२००० घनमीटरपेक्षा अधिक पाणी उपलब्ध असलेल्या प्रदेशातच इतर गरजांशी विसंवाद न करता सुस्थिर होऊ शकतील.

९·५ नैसर्गिक स्थितीच्या भिन्नतेमुळे विकासांच्या तपशीलवार नियोजनात पाणलोटक्षेत्रांसाठी (प्रत्येकी १०० ते ३०० चौ.की.मी. आकार) व उपखोरेनिहाय (प्रत्येकी ५००० ते २०००० चौ.कि.मी. आकार) खुल्या मंचावर चर्चा होऊन मग तेथील उपक्रमांचा प्राथमिकता क्रम ठरविला जाणे हे उचित होईल. जलव्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीमध्ये एकाच प्रकारच्या उपक्रमाला वा मोहिमेला राज्यभर सार्वत्रिकपणे एकाच प्रकारची प्राथमिकता दिली जाणे इष्ट नाही. त्या त्या उपखोऱ्याच्या स्थानिक विकासांच्या गरजा व पाण्याची उपलब्धता व भौगोलिक स्थिती यांची योग्य ती सांगड घातली जाणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या जलनीतीमध्ये (२००३) अशा रीतीचे विकेंद्रीकरण करण्यासाठी राज्यस्तरावर व नदी, खोरे स्तरावर नवीन संस्थात्मक व्यवस्था राज्यशासन निर्माण करील, तसेच अस्तित्वातील संस्थात्मक व्यवस्थांचे पुनरावलोकनही करील व त्यांची यथोचित पुनर्रचना करील असे स्पष्टपणे निर्देशित करण्यात आले आहे. भूपृष्ठीय जल व भूजल यांच्यामध्ये परस्परपूरक असे नियोजन व व्यवस्थापन करायचे म्हटले तर ते व्यावहारिकदृष्ट्या पाणलोटक्षेत्र निहाय व्हावे लागणार आहे. असे विकेंद्रीकरण होऊन पाण्याचे व्यवस्थापन स्थानिक पातळीवर सोपविले जाणे हे पंचायत राज्य व्यवस्थेच्या उद्दिष्टांना अनुसरून होणार आहे. पण गेल्या अनेक दशकांच्या अंगवळणी पडलेल्या केंद्रीकृत व्यवस्थेकडून उचित अशा उपखोरेशः व पाणलोटक्षेत्रशः विकेंद्री व्यवस्थेकडे जायला प्रशासकीय मानसिकतेला जड जात आहे.

९·६ महाराष्ट्रातील ब्रिटिशकालीन सिंचनाबाबतचा अनुभव हा मूलतः सह्याद्रीच्या पूर्वपायथ्याजवळील उपखोऱ्यांमधील सिंचन व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणारा होता. त्यावेळी विदर्भ, मराठवाडा किंवा कोकण यात मोठ्या संख्येत आधुनिक पद्धतीचे सिंचन प्रकल्प झालेले नसल्याने त्या क्षेत्रांच्या वैशिष्ट्यपूर्ण अशा वेगळ्या गरजांचे पुरेसे विश्लेषण महाराष्ट्र स्थापनेनंतरच्या सुरूवातीच्या काळात लगेच उपलब्ध नव्हते. जलसंपत्तीचा अंदाज, भूजलाचा वापर, सिंचनाचे हंगाम, कालव्यांची व्यवस्था किंवा पाणीपट्टी या सर्वच तपशिलांबाबत सह्याद्रीच्या पूर्वपठारावरील नीरा कालव्यांवरील तत्कालीन व्यवस्थेचा नमुनाच मुख्यतः डोळ्यापुढे होता. महाराष्ट्र निर्मितीनंतरच्या प्रारंभीच्या दोन दशकांमधील नियोजनांत

त्याचे सार्वत्रिकीकरण होऊन तो महाराष्ट्रभर बहंशी तसाचा तसाच लागू झाला. १९७५ मध्ये पाटबंधारे खात्याचे विकेंद्रीकरण होऊन जेव्हा मुख्य अभियंत्यांची स्वतंत्र कार्यालये वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये कार्यरत झाली तेव्हा त्या क्षेत्रांमध्ये धरणे, कालवे, पाणीपुरवठा व्यवस्था यांचा स्थानिक गरजांनुसार स्वतंत्रपणे वेगळा विचार सुरू झाला. त्यातून भिन्नभिन्न प्रकारचा अधिक व्यापक अनुभव त्यापुढील दोन दशकांमध्ये (१९८०-२०००) महाराष्ट्राच्या हाताशी आला. त्या आधारे आता प्रदेशनिहाय, खोरे/उपखोरेनिहाय गरजांचा वेगळा स्वतंत्र विचार हळूहळू इ. स. २००० नंतर उदयाला आला. पाणलोट क्षेत्राच्या विविधतेची आता त्यात भर घालून सुसंबद्ध अशा स्थानिक विकास व्यवस्थांची यापुढे निश्चिती होऊ शकेल. घटनेतील ७३ व्या दुरुस्तीमुळे, सुदृढ होऊ घातलेल्या पंचायती राज व्यवस्थेमुळे व जिल्हा परिषदांना नियोजनांत मिळू लागलेल्या मध्यवर्ती भूमिकेमुळे आता हे अधिक सुलभतेने होऊ शकेल. स्थानिक स्वराज्य संस्थेचे पायाभूत रूप असलेल्या ग्रामपंचायतींना आता आपापल्या पाणीपुरवठा योजनांची रचना व स्थानिक पाणी वापराचे अधिकार पूर्णपणे सोपवण्यात आले आहेत. त्यातून अधिक सुसंवादी स्थानिक व्यवस्था उदयास येणे आता अपेक्षित आहे.

९·७ महाराष्ट्रात (जून २००७ अखेरपर्यंत) सिंचनसेवा देणारे ६६ मोठे, २३३ मध्यम व २७७७ लघु (राज्यस्तरीय) प्रकल्प झाले आहेत, त्यांची व्यवस्था सध्या राज्याच्या जलसंपदा विभागाकडून (भूतपूर्व पाटबंधारे खात्याकडून) पाहिली जाते. पण याव्यतिरिक्त ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीत स्थानिक स्तरावर २३४० लघुप्रकल्प कार्यान्वित आहेत. शिवाय कोल्हापूर बंधारे (एकूण ९४४९) वळवणीचे बंधारे, पाझर तलाव (१८५७८) व गावतलाव आणि भूमिगत बंधारे (१०४७९) असे एकूण ५३५६६ स्थानीय प्रकल्प सध्या पाणी उपलब्ध करून देत आहेत. २५० हेक्टरपेक्षा कमी सिंचनक्षेत्र असलेले सर्व प्रकल्प ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून पाहिले जातात. २५० हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षेत्र असलेल्या प्रकल्पामधून थोडीथोडकी नव्हे तर ६·३६ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे. त्यातील १०० ते २५० हेक्टर क्षमता असलेल्या २२५ योजनांद्वारा मात्र केवळ ३५,१५० सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. तर उर्वरित ६ लाख हेक्टर सिंचन क्षमता ही १०० पेक्षा कमी लाभक्षेत्रांच्या छोट्या छोट्या प्रकल्पांमधून निर्माण झाली आहे. वस्तुतः २५० ते २००० हेक्टरपर्यंत सिंचन क्षमता असलेले २७७७ राज्यस्तरीय लघुप्रकल्पही आता पंचायत व्यवस्थेकडेच हस्तांतरित होणे अपेक्षित आहे. पण त्यासाठी आवश्यक ती तांत्रिक व व्यवस्थापकीय कुशलता पंचायत व्यवस्थेच्या अधिपत्याखाली उभी राहणे आता गरजेचे आहे. लोकसहभाग व विकेंद्रीकरण या उद्दिष्टांची सार्थकता तेव्हाच सिद्ध होऊ शकेल. म्हणून ग्रामीण जीवनाचे सबळीकरण त्या दिशेने आता व्हायला हवे आहे. त्या अभावी स्थानिक विकेंद्रीत पाणी व्यवस्था आज मोठ्या व मध्यम प्रकल्पांच्या तुलनेत फार दुःस्थितीत आहे. मोठ्या सलग व्यवस्थांसाठी प्रशासनिक कुशलता अधिक लागते. पण दूरदूर पसरलेल्या विकेंद्रीत छोट्या व्यवस्थांसाठी समाजात स्वयंअनुशासनबद्धता अधिक लागते. वेगवेगळ्या कारणांनी ग्रामीण जीवनातील या शिस्तीच्या प्रवृत्तींना गेल्या काही दशकांमध्ये तडा गेला असल्यामुळे या विकेंद्रीत लघुव्यवस्थांची निगराणी व कार्यचालन सध्या सुयोग्य पद्धतीने होत नाही. ग्रामीण कार्यकर्त्यांच्या माध्यमातून ग्रामीण समाजाची या दिशेने पुनर्बांधणी होणे आता आवश्यक आहे.

९·८ महाराष्ट्राला उपलब्ध असलेल्या एकूण पाण्यापैकी ४२ टक्के पाणी एकट्या कोकणात आहे. या विपुल जलसंपत्तीचा अधिकाधिक उत्तम उपयोग कसा करून घेता येईल, हा प्रश्न स्वातंत्र्यानंतरच्या नियोजनकर्त्यांसमोर नेहमीच होता. त्यातूनच कोकणाबद्दल स्वतंत्र सर्वंकष विचार करण्याकरता कोकणासाठी असे स्वतंत्र अभ्यासही वेळोवेळी करून घेण्यात आले. कोकणात धरण बांधणीला व

साठवणीच्या जलाशयांना तांत्रिक दृष्टीने फार वाव नाही अशी भूमिका महाराष्ट्राच्या पहिल्या सिंचन आयोगाने (१९६२) मांडली होती. पण गेल्या चार दशकांमधील प्रत्यक्ष अनुभव मात्र आता असे दाखवितो, की कोकणामध्ये काळजीपूर्वक रचना आणि बांधणी केली तर मोठाली धरणेसुद्धा सुरक्षितपणे आपले पाणीसाठवणीचे कर्तव्य चोखपणे बजावू शकतात. आजमितीस कोकणात १३० च्या वर मोठी धरणे उभी आहेत. तेव्हा आता प्रश्न धरण बांधणीतील व पाणी साठवणीतील यशस्वितेचा राहिलेला नसून तेथील पीकरचनेच्या, पाणी वितरणाच्या व पाणी वापराच्या सुयोग्य पद्धती बनवण्याचा आहे. महाराष्ट्राच्या इतर भूप्रदेशापेक्षा अगदी वेगळी भूरचना व हवामान असल्यामुळे कोकणातील पाणी वापराच्या पद्धती इतरांपेक्षा अगदी वेगळ्या प्रकारच्या विकसित होणे आवश्यक आहे. कोकणात सिंचनाखाली येऊ शकणारे क्षेत्र प्रवाही पद्धतीमुळे किंवा उपशांमुळे 'काही नाही' असेच महाराष्ट्राच्या पहिल्या सिंचन आयोगाने तयार केलेल्या (१९६२ च्या) सिंचन क्षमतेच्या तक्त्यात दाखविले गेले. अजूनही कोकणात फार मोठ्या क्षेत्रावर सिंचनाचा विस्तार होऊ शकला आहे असे जरी नाही, तरी आजवरचे प्रत्यक्षात सिंचनाखाली भिजणारे क्षेत्र आता, ८०,००० हजार हेक्टर आहे. तो आकडा पुरेसा बोलका व भावी विकासाच्या दृष्टीने आश्वासात्मक आहे. गेल्या दोन तीन दशकांतील कोकणातील नव्या अनुभवांच्या आधारावर आता पुढील जलनियोजनाची आणि सिंचनाची उभारणी कोकणात आत्मविश्वासपूर्वक करणे सुलभ व्हावे.

### १०·०० विस्थापित व लाभान्वित यांचे संबंध

१०·१ पाण्याच्या लहानमोठ्या साठवणी करावयाच्या म्हणजे काही भूक्षेत्र बुडून त्या क्षेत्रावर अवलंबून असलेल्या लोकांचे सुयोग्य पुनर्वसन होणे आणि त्यांना विकासाच्या नव्या लाभांमध्ये सहभागी करून घेणे ही सामाजिक प्रक्रिया नीट सांभाळली जाणे आवश्यक आहे. या सामाजिक जबाबदारीची जाणीव असल्यामुळे महाराष्ट्र राज्याने १९७६ मध्ये स्वतः पुढाकार घेऊन पुनर्वसनाचा कायदा केला. त्यातील उणिवा लक्षात आल्यानंतर बराच फेरविचार करून १९८६ मध्ये नवा कायदा अस्तित्वात आणला. त्या संबंधातील गेल्या दोन दशकांतील अनुभवांच्या आधारावर त्यातही अधिकाधिक लोकप्रवण सुधारणा करून, पुनर्वसनाचे काम समाधानकारकपणे व द्रुतगतीने हाताळणे भविष्यात अवघड ठरू नये.

१०·२ या कामासाठी खरी उणीव भासते ती पुनर्वसित लोकांचे नवजीवन निर्माण करण्यात मार्गदर्शन व साहाय्य करणाऱ्या सेवाभावी संघटनांची. केवळ शासकीय व्यवस्था प्रणालीतून विस्थापितांचे पूर्णतः पुनर्वसन हेऊ शकत नाही. पुनर्वसितांना स्नेहमय संबंधांचा दीर्घकालीन आधार लागतो. शिक्षण अथवा आरोग्य या क्षेत्रांमध्ये ज्याप्रमाणे अनेक हौशी संघटना लोकहितासाठी उतरल्या आहेत. त्याचप्रमाणे जलविकासाचे त्या त्या प्रदेशातील महत्त्व जाणून, तद्नुषंगीक पुनर्वसनाची संवेदनशील जबाबदारी सांभाळणाऱ्या सेवाभावी संघटना ज्याप्रमाणात यासंबंधातील जबाबदारी उचलतील, त्याप्रमाणात पुनर्वसित लोकांची सोय कालापव्यय न होऊ देता समाधानकारकपणे लावणे व त्यांचे जीवनमान अधिक उन्नत व सुखावह करणे शक्य होईल. विदर्भात व कोकणात पाणी साठवणीची कामे फार मागे राहिलेली असल्यामुळे तेथे अशा संघटनांची साखळी लवकर उभी राहणे त्या प्रदेशांच्या भावी विकास कार्यक्रमांसाठी जरूरीचे आहे.

१०·३ पाण्याच्या नव्या विकास प्रकल्पांतून ज्या समाजघटकांना फायदा मिळणार आहे. त्यांच्यातूनच पुनर्वसितांच्या कल्याणयोजना आखणारे व अमलात आणणारे सामाजिक कार्यकर्ते पुढे आले तर ते अधिक सुसंस्कृतपणाचे द्योतक ठरणार आहे. आपल्यासाठी त्रास व कष्ट सहन करणाऱ्याबद्दल

कृतज्ञतेची भावना ठेवणे हे उन्नत अवस्थेचे लक्षण आहे. अशा प्रकारची कृतज्ञतेची भावना प्रकल्पांचे जे वाढदिवस सिंचनसहयोगाच्या प्रोत्साहनातून होत आहेत, त्यामध्ये व्यक्त करण्याची नवी प्रथा रूढ होऊ पाहते आहे. त्या वाढदिवसांमधे प्रकल्पबाधितांना आदरपूर्वक आवर्जून बोलावून व त्यांचे सत्कार करून अंशतः तरी भावनिक ऋणानिर्देश होत आहे. हे एक सामाजिक परिपक्वतेचे चांगले लक्षण आता दिसून येत आहे. पण अशा समारंभीय औपचारिकतेच्या पलीकडे जाऊन प्रकल्पबाधितांना दीर्घकालीन व्यावहारिक साहाय्य करणाऱ्या संघटना जलक्षेत्रात उभ्या राहणे ही काळाची एक मोठी गरज आहे. त्या दृष्टीने सेवाभावी प्रवृत्तीच्या व्यक्तींना यापुढे विचार करावा लागेल व उपक्रमांची आखणी करावी लागेल. महाराष्ट्रात आज अशा संघटनांची फार उणीव जाणवते. विस्थापित आणि लाभान्वित यांच्यात व्यावहारिक आदानप्रदान व सामाजिक समरसता वाढविण्यासाठी अशा संस्थांची गरज आहे. २००७-२००८ पर्यंत झालेल्या महाराष्ट्रातील सर्व प्रकल्पांचा संकल्पित पाणीसाठा जेमतेम ३४ अब्ज घनमीटर आहे. महाराष्ट्राला एकूण १२६ अब्ज घनमीटर पाणी वापरता येऊ शकेल. पण त्यासाठी पाण्याच्या साठवणीच्या सोयी आजच्या तीन पटीने वाढवाव्या लागतील. त्यासाठी विस्थापितांच्या पुनर्वसनासंबंधीच्या व्यवस्थांमधील सुधार तातडीने करावे लागतील. म्हणजे मग विस्थापनाच्या प्रश्नातून प्रकल्पांना होणारे विरोध कमी होऊ शकतील व विकास कार्यक्रमांतील विलंब टळतील.

**११·० समन्वित व्यापक व्यवस्थापन**

११·१ महाराष्ट्र निर्मितीनंतरच्या पहिल्या दोन दशकांमध्ये महाराष्ट्राचे मुख्य लक्ष प्रकल्प उभारणीकडे होते. त्यापलीकडे जाऊन प्रकल्पाच्या सुयोग्य व्यवस्थापनेकडे लक्ष देण्याचा प्रारंभ, सिंचित क्षेत्रांसाठी लाभक्षेत्र विकास प्राधिकरणांची १९८० नंतर स्थापना करण्यात आल्यामुळे झाला. उत्पादनक्षमता जास्तीत जास्त वाढावी या हेतूने शेतीशास्त्रज्ञ, जमिनीचे तज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, सहकार क्षेत्रातले कार्यकर्ते, अभियंते व्यवस्थापन तज्ज्ञ अशा विविध विषयातील तज्ज्ञ मंडळींना एका प्रशासकीय मंचावर एका छत्राखाली या प्राधिकरणांमध्ये एकत्र आणण्यात आले. प्राधिकरणाच्या प्रशासकांना विशेष प्रोत्साहन वेतनही देण्यात आले. पण बहुशाखीय कार्यपद्धती निर्माण करण्यात पुरेसे यश आले नाही. शिवाय अशा प्रकारच्या बहुशाखीय व्यवस्थापन पद्धतीचा कालव्यावरील सिंचन क्षेत्रांसाठी पूर्ण विकास होण्यापूर्वीच सिंचन तलावामधून परस्पर पाणी उपसण्याच्या मागण्यांमध्येही भराभर वाढ झाली. प्रचंड गतीने होणारे शहरीकरण व औद्योगिकीकरण यामुळे पाण्याच्या सिंचनेतर उपयोगांनाही तलावांच्या पाण्याच्या व्यवस्थापनामध्ये सामावून घ्यावे लागले. आजमितीस मोठाल्या तलावांमधून जे पाणी वापरले जाते त्यातील २० टक्क्यांहून अधिक पाणी अशा सिंचनेतर उपयोगांसाठी दिले जाते. प्रकल्प नियोजनांमध्ये साधारणतः १० टक्के सिंचनेतर वापराचीच केवळ तरतूद होता. २००७-०८ मध्ये सिंचनासाठी १९·७ अब्ज घनमीटर पाणी वापरले गेले तर बिगर सिंचन वापरात ६·७ अब्ज घनमीटर पाणी आले. सिंचनेतर वापराचे पाण्याचे दर सिंचनाच्या दरांपेक्षा बरेच जास्त असल्याने असा सिंचनेतर पाणीवापर जलसंपदा विभागाला यापुढे आर्थिक दृष्टीने अधिक आकर्षित करीत राहील. त्यामुळे कमी पाण्यात अधिक उत्पादनाची गरज सिंचनक्षेत्रात वाढत जाईल. सिंचन क्षेत्रांचा प्रोत्साहनात्मक सवलतीचा कालखंड संपून आता पाण्याच्या अन्य वापरांशी सिंचनक्षेत्राला स्पर्धा करावी लागणार आहे.

११·२ याबरोबरच नद्यांच्या उपखोऱ्यांमध्ये एका साठवणीऐवजी अनेक ठिकाणी धरणे होऊन पाणीसाठवणींची संख्या वाढल्यामुळे त्यांच्यामधली परस्परावलंबिता हाही व्यवस्थापनाचा एक नवा महत्त्वाची घटक झाला आहे. पर्यावरणविषयक झालेली जागृती आणि पाण्याच्या गुणवत्तेविषयीचा वाढता

आग्रह या गोष्टींनाही पाणी व्यवस्थापनाच्या तपशिलांमध्ये वाव द्यावा लागणार आहे. एकाच उद्दिष्टाला समर्पित कार्यक्षम प्रकल्प व्यवस्थापकाऐवजी, पाण्याच्या विविध उपयोगांविषयी यथोचित सहानुभूतीचा दृष्टिकोन बाळगणाऱ्या व पाण्याशी निगडित असणाऱ्या सर्व लोकव्यवहारांचा एकात्मिक दृष्टिकोनातून विचार करू शकणाऱ्या कुशल प्रबंधकांची मागणी यापुढे वाढत जाणार आहे. ती गरज पुरी करू शकणाऱ्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वांची निर्मिती व नव्या गरजांना अनुसरून जलव्यवस्थापनाच्या व्यवहारांची सुयोग्य फेररचना मात्र अजून नीटशी होऊ शकलेली नाही. पाण्याचा बराचसा विचार अजून प्रशासकीय कप्प्यांमध्येच स्वतंत्रपणे चालू राहिलेला आहे.

११·३ पाण्याचे खोरे, उपखोरे व पाणलोटक्षेत्र यांचे सुयोग्य व्यवस्थापन हा केवळ तांत्रिक गुंतागुंतीचा प्रश्न नाही, आर्थिक दृष्टीने व सामाजिक दृष्टीने अधिक तरल जाणिवेचा भक्कम आधार त्याला आवश्यक झाला आहे. यापुढील जलव्यवस्थापनासाठी सर्वसमावेशक व्यापक कार्यप्रणाली अंगीकारावी लागणार आहे. त्यासाठी बहुशाखीय, बहुउद्देशीय समन्वय साधू शकणाऱ्या यंत्रणा लागतील. एकाच प्रकारच्या तज्ज्ञतेवर भर देणाऱ्या किंवा शासकीय नोकरांच्या पारंपरिक संवर्ग संकल्पनांनी जखडलेल्या यंत्रणा नव्या प्रकारच्या विविधांगी जबाबदाऱ्या नीट पेलू शकत नाहीत, हे गेल्या २०-२५ वर्षांतील अनुभवांवरून आता स्पष्ट झाले आहे. म्हणून यासाठी लागणाऱ्या यंत्रणांमध्ये मोकळेपणाने सहभागी होऊ शकतील व त्याहीपुढे जाऊन कालांतराने यशस्वी सूत्रचालन करू शकतील अशा अनुभवसंपन्न संचालक वर्गाची निर्मिती यापुढे प्रयत्नपूर्वक करावी लागेल. पर्यावरणाचा अविभाज्य घटक म्हणून पाण्याकडे पाहण्याची व त्या दृष्टीने पाणी हाताळण्याची क्षमता अजून पाण्याशी संबंधित विविध संघटनांमध्ये आणि संबंधित व्यक्तींमध्ये पुरेशी निर्माण झालेली नाही. त्यामुळे पर्यावरणीय कायदे आहेत, नियम आहेत, पण त्या उद्दिष्टांबाबत पुरेशी आत्मीयता नाही, त्यामुळे पाण्याच्या प्रकल्पांचे स्वरूप पर्यावरणीय उन्नतीकरणाचे असावे हा विचार दृष्टिआड होत राहतो.

११·४ शिवाय ग्रामीण क्षेत्रातील जमिनीच्या उत्पादक उपयोगाच्या विविध पर्यायांचे परस्परानुकूल मिश्रण यशस्वीपणे यापुढे घडवून आणावे लागणार आहे. पशुधन संवर्धन, मेढपाळी, दुग्धव्यवसाय हे ग्रामीण जीवनाला भक्कम आधार देणारे पूरक व्यवसाय म्हणून अनेक ठिकाणी पुढे येत आहेत. त्यासाठी ग्रामीण भागात कुरणांचे व चाऱ्यांचे नियोजन हे महत्त्वाचे ठरत आहे. वृक्षाधारित फलोद्यान संवर्धन व त्यावर आधारित उद्योगही वाढू लागले आहेत. जमीन, पाणी, वृक्षराजी, गवताळ आच्छादन, औद्योगिक निर्मिती, मानवी लोकव्यवहार आणि प्राणिजीवन या सगळ्यांमधील संतुलन हे यापुढील जलव्यवस्थापनाचे प्रमुख उद्दिष्ट राहील. त्यामुळे नदी-खोऱ्यांचे जलव्यवस्थापन हाताळणाऱ्या यंत्रणेला वक्षसंवर्धन, गवताळ आच्छादनांचे विकसन, सांडपाण्याचे शुद्धीकरण व पुनर्वापर अशा सकृतदर्शनी परस्परांशी संबंधित न दिसणाऱ्या बाबींना एकत्रितपणे समन्वयाने हाताळावे लागणार आहे. महाराष्ट्राच्या आजवरच्या संवर्ग केंद्रित तंत्रवैज्ञानिक व प्रशासनिक संस्कृतीमधील कालोचित परिवर्तनांवर या बाबतीतील यश यापुढे अवलंबून राहणार आहे.

११·५ ज्याप्रमाणे पाण्याच्या लाभधारकामध्ये वैयक्तिक स्वामित्वविषयक धारणे ऐवजी, 'मी' व 'माझे' याऐवजी 'आम्ही' व 'आमचे' अशा प्रकारची पाण्याबद्दलची सामूहिक मानसिकता रुजवणे हे अत्यंत कठीण काम करावे लागणार आहे. त्याचप्रमाणे सरकारी प्रशासनातील आतापर्यंतची व्यक्तिकेंद्रित अधिकार पद्धती, विवेकाधीन अनेक अधिकार, संवर्गशः मोठेपणाची भावना या जागी सामूहिक विचारविनिमय व संघभावना यांची वाढ करावी लागणार आहे. नियंत्रक आणि नियंत्रित अशा दोन्ही

अनुक्रमणिका

बाजूंच्या मानसिक धारणांमध्ये आवश्यक असलेले बदल प्रयत्नपूर्वक सातत्याने होणारे प्रबोधन व प्रशिक्षण यातूनच केवळ शक्य होणार आहे. केवळ एका प्रकल्पापुरताच जलव्यवस्थापनाचा वेगळा विचार न करता त्याऐवजी उपखोऱ्यातील किंवा संपूर्ण खोऱ्यांतील सर्व प्रकल्पांचा एकत्रित विचार, आपण त्याचे एक घटक मात्र आहोत असे लक्षात ठेवून करावा लागणार आहे. एकट्यादुकट्या प्रकल्पाच्या स्वतंत्र व्यवस्थापनापुढची ही पायरी आहे. यामध्ये नदीच्या खोऱ्यांतील पाण्याशी निगडित असलेल्या प्रत्येक घटकाला निरनिराळ्या पाणी वापरणाऱ्यांचे हितसंबंध कसे परस्परावलंबित आहेत याची नीट जाणीव असणे आवश्यक आहे. आपले नाते आपल्या नैसर्गिक जलस्त्रोताशी व मानवनिर्मित प्रणालीशी कसे जोडलेले आहे. हे प्रत्येकाला नीट आकलन होणे आवश्यक आहे. अजूनही अनेक चांगले शिकले सवरलेले अनेक लोक आपण नेमक्या कोणत्या नदीखोऱ्यात, उपखोऱ्यात अथवा पाणलोटक्षेत्रांत राहतो आहोत हे नीट सांगू शकत नाहीत. कारण त्यांनी तसा विचारच केलेला नसतो. या दृष्टीने शिक्षणक्रमातही आवश्यक ते बदल झाल्याशिवाय आणि त्याद्वारे आपल्या नैसर्गिक व्यवस्थांशी असलेले नाते आपल्या मनावर नीटपणे ठसवले गेल्याशिवाय, एखाद्या विशिष्ट जलक्षेत्राच्या उपखोऱ्याच्या किंवा नदीखोऱ्याच्या सामूहिक, सर्वांगीण, एकात्मिक विकासाच्या व व्यवस्थापनाच्या प्रक्रियेला आणि तदनुरूप कामाला उठाव येणार नाही. त्या दृष्टीने आव्हान देणाऱ्या एका कालखंडाच्या उंबरठ्यावर आता महाराष्ट्र उभा आहे.

११·६ अन्य कोणत्याही वितरण व्यवस्थांपेक्षा पाण्याच्या व्यवस्थापनातील सर्वांत अवघड बाजू म्हणजे वर्षावर्षाला व महिन्यामहिन्याला होणारा पाण्याच्या नैसर्गिक उपलब्धतेतील बदल आणि त्याला अनुसरून करावयाचा पाण्याच्या वाटपातील बदल. असे बदल ही व्यवस्थापकीय मनमानी वाटू नये म्हणून पाण्याच्या उपलब्धतेतील वार्षिक व हंगामवार दोलायमानतेबद्दल समाजामध्ये पुरेशा माहिती विस्तृतपणे उपलब्ध असायला हवी. ती तशी सध्या वितरित होत नसल्यामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेत आवश्यक असलेल्या लवचीकपणाला, समाजातील मानसिकता अनुकूल झालेली नाही. 'हवे तेव्हा, हवे तितके पाणी' अशा प्रकारच्या अपेक्षा या मुळातच अवास्तव आहेत, याची जाणीव समाजाला करून द्यायला हवी आहे. भारतातील परंपरागत ६० वर्षांच्या संवत्सर चक्राच्या कल्पनेप्रमाणे दिलेली साठ संवत्सराची वर्षावर्षाची वेगवेगळी नावे पाहिली तरी त्यात 'बहुधान्य, विलंबी, प्रमाथी, सौम्य, विकारी, साधारण, रौद्र, क्षय' अशा नावांचा भरणा आहे. आपल्या देशातील पावसाच्या अनिश्चिततेबद्दल व त्यामध्ये वर्षावर्षाला पडणाऱ्या मोठ्या फरकाबाबत आपल्या पूर्वजांना खूप चांगली जाणीव होती हेच या नावांवरून स्पष्ट होते. गिरणा, पांझरा खोऱ्यांमधील सिंचनाच्या यशस्वी फडपद्धतीमध्येसुद्धा वर्षातून एकदाच क्रमानुसार बारमाही पीक घ्यायचे व एखाद्या वर्षी पाण्याअभावी कोणतेच सिंचित पीक मिळणार नाही यासाठीची तयारी ठेवायची अशी डोळस व्यवस्थाच फडपद्धतीला दीर्घकालीन स्थैर्य देऊ शकली आहे. निसर्गातील वर्षनिहाय बदलणाऱ्या पाण्याच्या उपलब्धतेला जलव्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीत सामावून घेतले जाणे आवश्यक आहे. अविचल पक्का पाणीपुरवठा हे व्यवस्थापनाचे उद्दिष्ट न ठेवता निसर्गाच्या बदलत्या क्षमतेत बसेल तितकाच व तसा पाणीपुरवठा हे धोरण अंगीकारणे आवश्यक आहे. यंत्रयुगाच्या व विज्ञानयुगाच्या उदयानंतर निसर्गावर विजय मिळवण्याच्या उत्तेजित भूमिकांमुळे निसर्गाच्या दोलायमानतेकडे नीटसे लक्ष गेलेले नाही. पण त्या दोलायमानतेशी जमवून घेणारी व्यवस्थाच नीटपणे चालू शकेल. सध्याच्या सुधारित सिंचन कायद्यामध्ये किंवा पाणीपुरवठा करारांमध्ये या संदर्भातील सुस्पष्ट अशा तरतुदी अजून समाविष्ट करण्यात आलेल्या नाहीत. पाणी वापरदारांनाही नीट कल्पना दिली गेलेली नाही. त्यामुळे या दोलायमानतेबद्दल एक प्रकारचा गाफीलपणा समाजात आणि प्रशासन व्यवस्थेतही आहे, तो दूर व्हायला हवा आहे.

## १२. जलसहभागिता मंच

१२·१ विश्वबँक व यूएनटीपी (राष्ट्र संघाचा विकास कार्यक्रम) यांच्या संयुक्त प्रोत्साहनाने जगभर जलसहभागिता मंचाच्या उभारणीचा कार्यक्रम १९९८ मध्ये प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या दक्षिण आशियाई क्षेत्रीय गटाचे मुख्यालय जल आणि भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद येथे आल्याने त्या नव्या जागतिक चळवळीमागचा विचार व कार्यपद्धती महाराष्ट्राला पटकन परिचित होणे सोपे गेले. जागतिक जलसहभागिता मंचाचे संस्थात्मक सहभागी घटक म्हणून महाराष्ट्राचे पाटबंधारे खाते व जल आणि भूमी व्यवस्थापन संस्था या दोन्हीनीही इ.स. २००० पूर्वीच स्वतंत्रपणे सदस्यत्व स्वीकारल्यामुळे जलव्यवस्थापनाच्या उन्नतीकरणातील जागतिक विचारप्रवाह महाराष्ट्रात लवकर येऊ शकला आहे. या दिशेने उपखोरे निहाय स्थानिक जलसहभागिता मंच करण्याच्या प्रयत्नांना काही ठिकाणी अनुकूल प्रतिसाद मिळू लागला आहे. उर्ध्व भीमा जल सहभागिता (१९९९), उर्ध्व गोदावरी जलसहभागिता (२०००), पूर्णा (तापी) जल सहभागिता (२००१) आणि पातळगंगा जल सहभागिता (२००३) यांचे अनुभव याबाबतीत उपयोगी पडणार आहेत. अलीकडचे अशा प्रकारच्या लोकसहभागाचे विदर्भातील नावीन्यपूर्ण उदाहरण म्हणजे यशोदा जलसहभागिता मंच. तो वर्धा जिल्ह्यात उभारण्यात आला असून नागपूरच्या महिला पाणी मंचाने हे काम २००५ पासून हाती घेतले आहे. अकोला व अमरावती जिल्ह्यामध्ये पूर्णा खोरे मित्र मंडळ कार्यरत आहे, त्यापासूनच यशोदा खोरे जलसहभागिता मंचाने प्रेरणा घेतली आहे. धुळे जिल्ह्यातील पांझरा नदीवर असाच व्यापक समन्वयात्मक मंच उभा होतो आहे. शासकीय, खासगी, शैक्षणिक, व्यावसायिक व सामाजिक संघटना, या सर्वांनाच जलसहभागिता मंचावर एकत्रितपणे काम करायला तयार करावयाचे आहे. आजच्या संघटनात्मक आणि प्रशासकीय रचनेत बदल घडवून अशा प्रकारचे मंच जसजसे कार्यान्वित होतील, तसतसे पाण्याबाबतच्या व्यवस्थापनाचे आजचे विस्कळीत स्वरूप जाऊन एक सुविहित अशी लोकानुवर्ती रचना उदयाला येईल.

१२·२ महाराष्ट्र राज्यात लाहन मोठ्या मिळून ४०० नद्या वाहतात. त्यांची एकंदर लांबी २०,००० कि.मी. आहे. या सर्वांची नीट तणावमुक्त व्यवस्था यापुढे लावायची आहे. सामूहिक पाणी म्हटले, की त्याबरोबर तंटे, विवाद व कटुता असलीच पाहिजे असे नाही. नदी, खोऱ्यांच्या नियोजनात इतर राज्यांबरोबर घ्यावयाची विधायक सहकार्याची महाराष्ट्राची भूमिका नदीखोरे, पाणी, तंट्याच्या विवादांमध्ये स्पष्ट दिसून आली आहे. महाराष्ट्र व मध्यप्रदेश यांच्या संयुक्त आंतरराज्यीय जलनियंत्रण मंडळाच्या गेल्या २५ हून अधिक वर्षांच्या वाटचालीतही ही समन्वयात्मक कार्यपद्धती स्पष्ट झाली आहे. या मंडळाचे मुख्यालय महाराष्ट्रात नागपूरला आहे. अशीच प्रगल्भ भूमिका गोदावरी खोऱ्यात इतर राज्यांबरोबर महाराष्ट्राने केलेल्या करारांमध्ये दिसून आली आहे. गोदावरी लवादाने १९८० मध्ये दिलेला निवाडा म्हणजे वस्तुतः गोदावरी खोऱ्यातील पाच राज्यांनी परस्पर विचारविनिमयाने गोदावरीच्या वेगवेगळ्या उपखोऱ्यांमधे पाणी वाटपाचे जे आपापसात करार केले त्यांचे संकलन मात्र आहे. या निवाड्याच्या शेवटी आपले विचार व्यक्त करताना लवादाने म्हटले आहे, की या विषयाच्या संदर्भात सर्व संबंधित राज्यांनी जी परस्परांना समजून घेण्याची, साभाळून घेण्याची, सामंजस्यपूर्ण भावना दाखविली आणि या अत्यंत तांत्रिक स्वरूपाच्या आणि अतिशय किचकट व गुंतागुतीच्या विषयात परस्परांशी सुसंवादाच्या मार्गाने चर्चा आणि वाटाघाटीच्या मार्गाने निर्णयाप्रत पोचण्यासाठी जे अत्यंत प्रमाणिक प्रयत्न केले त्याबद्दल आम्ही कृतज्ञता व आनंद व्यक्त करू इच्छितो. अशा प्रकारच्या तंट्याबखेड्यात योग्य निर्णय कसा करावा यासंबंधीचा हा एक आदर्शच ठरेल. ही सामंजस्याची परंपरा वाढीस लागेल असे वातावरण राज्यांतर्गतही जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये

अनुक्रमणिका

व प्रदेशाप्रदेशांमध्ये निर्माण करण्यासाठी व टिकवून धरण्यासाठी पाण्याचे तणाव असणाऱ्या खोरे/उपखोऱ्यांमध्ये जलसहभागिता मंचांची निर्मिती फार पोषक ठरणार आहे.

१२·३ पाणी हा जैविक अस्तित्वाचा तसाच मानवी समृद्धीचाही आधार असल्यामुळे पाण्याच्या उपलब्धतेवर येणाऱ्या ताणांमुळे मानवी समाजातील घटकांमध्ये दुरावा व संघर्ष वाढीला लागतात. त्यांना हाताळण्यातील सामाजिक कुशलता हा त्या समाजाच्या जलसंस्कृतीचाच एक भाग असतो. भगवान बुद्धांच्या राजसंन्यासामागे 'नदी पाणी वापराच्या संदर्भात संघर्ष नव्हे, संवाद आणि समन्वय' हीच कार्यदिशा असली पाहिजे हा आग्रह होता. निष्ठा होती. त्या दिशेने आधुनिक काळातील जलव्यवस्थापनाच्या रचना वृद्धिंगत करणे हे समाजाच्या सांस्कृतिक उन्नतीचे लक्षण राहाणार आहे. त्यांत वैचारिक प्रगल्भता व मानसिक उदात्तता या दोहोंचाही संगम असावा लागतो. तसा तो निर्माण करणे हे केवळ राजकीय किंवा प्रशासनिक उपचारांमधून शक्य होत नाही. त्यासाठी सामाजिक स्तरावर प्रबोधन करणाऱ्या व संवाद साधणाऱ्या स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात असाव्या लागतात. यापुढील नद्यांच्या व्यवस्थापनांमध्ये या उद्देशाला अधिकाधिक महत्त्व येत जाणार आहे. त्यासाठी जलसहभागिता मंचांचे अस्तित्व फार उपयोगी ठरणार आहे. गेल्या दहा वर्षांत मिळून महाराष्ट्रातील केवळ ६ नद्यांमध्ये अशी समन्वयात्मक जलसहभागितेची व्यवस्था उदयास आली आहे. वेगवेगळ्या नद्यांमधील तणावाची स्थिती पाहता आणखी सहा नद्यांमध्ये गिरणा, सीना, मांजरा, तेरणा, पूर्णा (गोदावरी) व पेनगंगा यांच्यासाठी जलसहभागिता मंचाची तातडीने उभारणी व्हायला हवी आहे.

### १३. निर्मलतेची वाटचाल

१३·१ आर्थिक समृद्धीबरोबर व उन्नत राहणीमानाबरोबर अधिक प्रमाणात टाकाऊ कचरा व दूषित पाणी निर्माण होण्याचा उपसर्ग महाराष्ट्रालाही १९७०-८० च्या दरम्यान सतावू लागला. त्याची हाताळणी कौशल्याने करायची म्हणजे व्यक्तिगत जीवनात व सामाजिक व्यवहारात टापटिपीची व प्रदूषण विरहित वर्तणुकीची सवय लागायला हवी. तशा चांगल्या सवयी लावणारी काही व्यवस्था अजून सर्वत्र उभी होऊ शकलेली नाही. त्यामुळे "इमा आप शिवतमाः इमा सर्वस्व भेषजीः" हे पाणी पवित्र राहावे, सर्वांना आरोग्यदायक व्हावे, ही वारंवार म्हटली जाणारी वैदिक प्रार्थना प्रत्यक्ष व्यवहारात जाणवत नाही. उलट नदीच्या व पाणीसाठ्यांच्या प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस उग्र रूप धारण करीत आहे. मोठाली शहरे व औद्योगिक क्षेत्रे यांच्या जवळून वाहणाऱ्या नद्या उदा. उल्हास, काळ, पाताळगंगा, गोदावरी (नाशिक), कृष्णा (सांगली), मुळामुठा (पुणे), पवना (पिंपरी) यांची स्थिती तर विशेष चिंतनीय आहे.

१३·२ महाराष्ट्राचे जलस्रोत सुरक्षित राहावेत म्हणून महाराष्ट्रात जलप्रदूषण नियंत्रण कायदा, १९६९ मध्ये पारित करण्यात आला व १९७० साली प्रदूषण नियंत्रण मंडळही स्थापन करण्यात आले. या दिशेने पाऊल टाकणारे महाराष्ट्र हे भारतातले पहिले राज्य होते! वरील कायद्यांतर्गत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संपूर्ण राज्यच जलप्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण क्षेत्र म्हणून घोषितही केले गेले. स्थानिक स्वराज्य संस्था व उद्योगक्षेत्रे यांच्याकडून केल्या जावयाच्या सांडपाण्याच्या विल्हेवाटीवर लक्ष राहण्यासाठी या कायद्याच्या अंतर्गत त्यांनी करावयाच्या व्यवस्थेला संमतिपत्र घेणे आवश्यक ठरवले गेले. मंडळाने आजवर अशी ४९९०६ संमतिपत्रे दिली आहेत. त्यातील तरतुदींचा भंग झाला, तर विद्युतपुरवठा व जलपुरवठा खंडित करता येतो. या तरतुदींना अनुसरून ३३४ कारखान्यांवर न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत व कारखान्यांवर कार्यवाहीसुद्धा करण्यात आली आहे. खाजगी उद्योगक्षेत्राला

अनुक्रमणिका

याबाबत वळण लावण्याचे प्रयत्न काही प्रमाणात तरी मार्गस्थ झाले आहेत. पण मलप्रवाहांसंबंधातील अपेक्षित अनुपालन स्वराज्य संस्थांकडूनच नीट होत नसल्यामुळे कायद्याचे पूर्ण उद्दिष्ट साध्य होत नाही.

१३·३ नदीच्या प्रवाही पाण्याच्या तुलनेत तलावांत साठविलेल्या पाण्याची स्वयंशुद्धीकरणाची क्षमता निसर्गतः मुळातच कमी असते. त्यामुळे तलावांच्या पाण्याच्या गुणवत्तेचा सांभाळ अधिक अवघड आहे. प्रदूषणकारी पदार्थ पाणी साठ्यांपर्यंत न पोहोचू देणे हाच प्रभावी मार्ग आहे. म्हणून जलाशयांच्या स्रवणक्षेत्रात प्रदूषणमुक्त जीवनव्यवहार पद्धती बसविणे अत्यंत महत्वाचे आहे. भीमेजवळील उजनी जलाशय, औरंगाबादजवळील सुखना नदीवरील तलाव व पुसद शहराखालील पूस नदीवरील निम्न पूस जलाशय, कोल्हापूरचा रंकाळा तलाव किंवा नागपूरमधील अंबाझरी व तेलंखेडी सारखे जलाशय यातून पाणी प्रदूषणाच्या यापुढील भयानकतेचा इशारा मिळू लागलेला आहे. त्याची वेळीच दखल घेतली जाणे आवश्यक आहे. पण या तलावांच्या पाण्याची गुणवत्ता नीट तपासत राहण्याची कार्यपद्धतीही अजून तयार नाही. या तलावांवर ज्यांचे सार्वजनिक स्वामित्व आहे. त्यांच्यावर पाण्याची गुणवत्ता सांभाळण्याची काही जबाबदारी आहे याची पुरेशी जाणीव नसल्याप्रमाणे एकंदरीत ढिलाईचा व्यवहार आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यकुशलतेवर सर्व भरवसा टाकून तलावांची मालकी असणाऱ्या संस्था स्वस्थ बसल्या आहेत. स्रवणक्षेत्रातील व्यवहारांची फेररचना डोळसपणे वेळीच झाली नाही तर काही काळानंतर या तलावांचा उपयोग करून घेणेही दुरापास्त होईल. एकंदर जलव्यवस्थापनाच्या आव्हानांमध्ये सरोवरांच्या गुणवत्तेचे व्यवस्थापन हा मोठा नवाच प्रश्न आता महाराष्ट्रापुढे आहे.

१३·४ पाण्याच्या गुणवतेबद्दल एक प्रकारचा सामाजिक गाफिलपणा महाराष्ट्रात सर्वत्र नजरेत येतो. पाण्याची वेळोवेळी क्षेत्रीय तपासणी होणे, त्यासाठी नमुने गोळा करणे, त्यांची चाचणी घेणे यासाठी मदत करणाऱ्या सक्षम प्रयोगशाळा महाराष्ट्रात अलीकडे उभ्या राहिल्या आहेत. पण पाणी प्रदूषित होऊ नये यासाठी आवश्यक असलेली तत्परता अजून संबंधितांकडून दाखवली जात नाही. जलाशयाच्या स्रवण क्षेत्रातील अनियंत्रित अशी सर्व घाण तलावांत येऊन जमा होत राहते. तलावांची दुरवस्था ही चिंतेची बाब झालेली आहे. उत्स्रोत क्षेत्रांतील शहरांमुळे, कारखान्यांमुळे व शेतांमधील वाढत्या रासायनिक खतांमुळे जलाशयामधील पाण्याची गुणवत्ता झपाट्याने घसरते आहे. पण या संकटाबाबत अजून खडबडून जाग आलेली दिसत नाही. सर्व तलावांच्या उत्स्रोत भागात संरक्षणात्मक उपाययोजना अंमलात येणे यापुढे फार महत्त्वाचे राहील. त्या त्या स्रवणक्षेत्रामधील समाजाच्या पाण्याबाबतच्या संवेदनशीलतेचे व पाणी व्यवस्थापनातील जागरूकतेचे अखेरचे फलित तलावांमध्ये पाहायला मिळते. तलावांच्या संरक्षणात केवळ तलावांभोवतीच्या दृश्य पाणी वापरदारांचा सहभाग अपेक्षित नसून तलावाच्या स्रवण क्षेत्रातील सर्वच व्यवहारांचे यथायोग्य नियमन होणे आवश्यक आहे.

१३·५ त्यासाठी त्या त्या तलावांशी संबंधित असलेल्या घटकांचे कृतिशील गट तलावशः उभे व्हायला हवेत. याकरिता 'सरोवर संवर्धिनी' संकल्पना मांडण्याचा प्रयत्न चालू आहे. नांदेडजवळच्या विष्णुपुरी धरणामागील शंकरसागरसाठी अशा सरोवर संवर्धिनीची स्थापना झाली आहे (२००६). लोणार तलावासाठी सरोवर संवर्धिनीची निर्मिती करण्याची बोलणी चालू आहेत (२००७). उजनी जलाशयासाठी या दृष्टीने जागृती करण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन होते आहे (२००८-२००९). काही जागरूक संघटना त्या दृष्टीने सध्या प्रयत्नशील आहेत. पण त्या उपक्रमांना सुसंघटित आकार अजून आलेला नाही. तलावांचे सुयोग्य गुणवत्ता व्यवस्थापन ही सर्व प्रकारच्या जलव्यवस्थापनाची अंतिम परीक्षा ठरणार आहे. त्याकरिता

अनुक्रमणिका

महाराष्ट्रात सरोवर संवर्धिनीसारख्या तलावनिहाय संघटनांची साखळी उभी होणे हे फार महत्त्वाचे राहणार आहे.

१३·६ दोन पिढ्यांपूर्वीपर्यंत गावातून किंवा गावाजवळून नद्यांच्या काठावरचे दृश्य अनेक ठिकाणी आकर्षक व मन प्रसन्न करणारे, डोळे सुखविणारे असे. पण नद्यांचे ते रूप आता पालटले आहे. सांडपाण्याच्या सुरक्षित विल्हेवाटीची व्यवस्था याबाबतीत, दुर्लक्ष वाढत गेल्याने अनेक नद्यांचे रूपांतर गटारात झालेले आहे. पण ही जबाबदारी असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका याबाबतीत दुबळ्या ठरल्या आहेत. शहरात निर्माण झालेला घनकचरा शहरांच्या नजीकच्या भागात जिथे टाकला जातो तिथे मुरणारे पावसाचे पाणी, मलप्रवाहाच्या नळांमधील गळतीमुळे जमिनीत मुरणारे सांडपाणी, गटारांमधून मुरणारे घाण पाणी अशा अनेक मार्गांनी त्या त्या शहरांखालील व त्यांच्या परिसरातील भूजल साठेसुद्धा दूषित झालेले आहेत. या अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांची (नगरपालिकांची) आर्थिक दुस्थिती. अशा सुनियोजित व्यवस्थांसाठी आवश्यक असलेली संस्थात्मक यंत्रणा उभारण्यासाठी आवश्यक असणारा पैसा उभा करण्यात नागरी व्यवस्था उदासीन आहेत. याचाच परिणाम अस्वच्छता, घाण व दुर्गंधी याला आळा बसू शकलेला नाही. लाखो यात्रेकरूंचा एकत्रित तात्कालिक निवास सांभाळावा लागणाऱ्या पंढरपूरसारख्या, दक्षिण काशी म्हणून मान्यता पावलेल्या, पवित्र तीर्थक्षेत्रीसुद्धा दुर्गंधीमुक्तता येण्यासाठी करावयाची विशेष सुद्धीकरण व्यवस्था जुलै २००७, मध्ये आषाढी वारीच्या वेळी पहिल्यांदाच कार्यान्वित करण्यात आली. ऐहिक विकासाबरोबर एक प्रकारची स्वयंशिस्त, विनम्रता आणि निसर्गाबद्दलचा आदरभाव याही गोष्टी अनिवार्यपणे अंगीकारल्या जाणे आवश्यक आहे. निम्नस्तरावरून उच्च स्तराकडे वाटचाल करणाऱ्या सर्व समाजाच्या समोर पाण्याची गुणवत्ता हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा केव्हा ना केव्हा घोर स्वरूपात उभा ठाकलेलाच आहे. दोन दशकांपासून महाराष्ट्रापुढेही तो आता उभा राहिलेला आहे.

१३·७ जगभरच त्या बाबतीत सुधारणा व्हावी म्हणून २००५ हे जागतिक वर्ष 'पाणी आणि आरोग्य वर्ष' म्हणून संयुक्त राष्ट्र संघातर्फे साजरे केले गेले. पाण्याबाबतच्या युनेस्कोच्या व्यापक व्याख्येप्रमाणे आता पाणी या शब्दात वस्तूरूप पाण्याबरोबरच, 'स्वच्छता व्यवस्था व वैयक्तिक सवयी' यांचाही समावेश केला गेला आहे. water means water, sanitation and hygiene अशीच पाण्याची व्याख्या करण्यात आली आहे. पाण्याबाबतचा हा व्यापक विचार डोळ्यापुढे ठेवून व पाण्याचे मानवी आरोग्याबरोबर असलेले दृढ नाते लक्षात घेऊन निर्मल व्यवस्थेचा आग्रह धरणारे नागरिक व त्यांचे नागरी संघ आता पुढे यायला हवेत. तरच सध्याची परिस्थिती बदलू शकेल. संयक्त राष्ट्र संघातर्फे २००८ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय स्वच्छता वर्ष' म्हणून सगळीकडे अमलात आणले गेले. पण महाराष्ट्रातील विद्यमान कार्यपद्धतीमुळे त्याचा प्रभाव बराचसा शासकीय वर्तुळामध्ये सीमित राहिला. एखादे लोकअभियान म्हणून ते शासनेतर व्यवस्थांमध्ये उचलून धरले गेले नाही. इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशनने २००६ पासून इकोसॅन म्हणून पर्यावरणीय स्वच्छतेच्या दिशेने काम करणारा गट तयार केला आहे. पण त्याचाही प्रभाव या दिशेने अजून फारसा जाणवणारा ठरला नाही.

१३·८ 'सुजल निर्मल महाराष्ट्र अभियान' महाराष्ट्रात अलीकडेच शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी एक उच्चस्तरीय सुकाणू समितीही आहे. जिल्हास्तरीय समित्याही आहेत. त्या दिशेने अगोदरच जे उपक्रम चालू करण्यात आले होते, त्यात २००० पासून ग्रामीण भागासाठी व २००२ पासून नागरी भागासाठी हाती घेण्यात आलेले संत गाडगेबाबा स्वच्छता

अभियान महत्त्वाचे आहे. जगातील स्वच्छतेची मोठी चळवळ म्हणून जागतिक स्तरावर युनिसेफ व जागतिक बँक यांनी या अभियानाचा गौरव केला आहे. या कार्यक्रमांत २००८ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या त्यांच्या स्वच्छतेचा दर्जा पाहून अ, ब, क अशी औपचारिक श्रेणी आता देण्यात येत आहे. त्यानुसार २००८ मध्ये १३६०८ ग्रामपंचायतींना अ वर्ग (५० टक्के), ७५७५ ग्रामपंचायतींना 'ब' वर्ग ५९४० पंचायतींना 'क' वर्ग मिळाला आहे. २००४-०५ मध्ये महाराष्ट्रातल्या १३ ग्रामपंचायतींना 'निर्मलग्राम' पुरस्कार मिळाला. ती संख्या वाढत जाऊन २००५-०६ मध्ये ३८० ग्रामपंचायतींना, २००६-०७ मध्ये १९७४ ग्रामपंचायतींना व २००७-०८ मध्ये ४३०१ ग्रामपंचायतींना हे पुरस्कार मिळाले. ही वाढती संख्या निश्चितच उत्साहवर्धक आहे. महाराष्ट्रासमोरचे उद्दिष्ट सर्वार्थाने पूर्ण होण्यासाठी अशा अभियानांची गती अजून खूप वाढवावी लागणार आहे. महाराष्ट्रात २७९२६ ग्रामपंचायती आहेत. त्या सर्वांपर्यंत निर्मलता पोचवायची आहे. आजवर फक्त २४ टक्के ग्रामपंचायतींपर्यंत निर्मलतेचा प्रभाव पोचवता आला आहे. २००१-०२ पर्यंत फक्त १९ टक्के ग्रामीण जनतेपर्यत स्वच्छतेच्या सुविधा पोचल्या होत्या. मार्च २००९, पर्यंत आता ६५ टक्के ग्रामीण लोकसंख्येला स्वच्छतेच्या सोयी उपलब्ध केल्या गेल्या आहेत. या अभियानाचा सुपरिणाम म्हणून जवळपास ९८ टक्के ग्रामीण शाळांसाठी व अंगणवाड्यांसाठी स्वच्छतेच्या सुविधा पोचू शकल्या आहेत. आता या सर्व नव्या व्यवस्था नीट सांभाळण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींच्या पाणी व स्वच्छता समित्यांनी पत्करावयाची आहे. पण गावांच्या सर्वंकष स्वच्छतेसाठी अजून खूप काम बाकी आहे.

१३·९ यात नागरी क्षेत्रांतील सांडपाण्याची हाताळणी हा सर्वात अवघड प्रश्न आहे. २२ महानगरपालिका व २२३ नगरपरिषदा यापैकी फक्त २५ ठिकाणी सुविहित मलप्रवाह व्यवस्था कार्यान्वित आहे व आणखी १३ योजना हाती आहेत. २५० शहरांना पाणीपुरवठा करण्याच्या योजना पूर्ण करण्यात आल्या आहेत त्यामुळे शहरांत येणारे पाणी वाढले आहे. पण त्याचा निचरा करणाऱ्या योजना वेळीच हाती घेतलेल्या नसल्याने नागरी मलप्रवाह ही आता विवंचनेची गोष्ट झाली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सहकार्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने राबवलेल्या सांडपाणी शुद्धीकरणाच्या व्यवस्थेचा अनुभव पाहता त्यासाठी प्रतिघनमीटर खर्च रुपये १·८ मात्र आहे. नव्या नागरी पाणीपुरवठ्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या तो निम्म्याहून कमी आहे. शुद्धीकृत पाण्याचा फेरवापर शेतीत व अन्य विवक्षित उपयोगासाठी सहज शक्य असल्याने अशा परिष्कृत सांडपाण्याच्या पुनर्वापरावर यापुढे भर द्यावा लागणार आहे. किंबहुना असा फेरवापर हे नव्या आधुनिक जलसंस्कृतीचे एक अंग बनावे लागेल. या व्यवस्थेतला पायाभूत घटक म्हणजे शौचालये. त्यांची बांधणी पूर्ण करणे हेही मोठे आव्हानच आहे. साठ टक्के नागरी लोकसंख्येलाच आतापर्यंत स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. दारिद्र्यरेषेखालच्या उर्वरित ९ लाख कुटुंबांना शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देणे हेही खर्चाचे व व्यावहारिक गुंतागुंतीचे काम राहिलेले आहे. अगोदर पुरेशा पाण्याची नीट विश्वासार्ह व्यवस्था लागल्याशिवाय सध्याच्या पद्धतीतील शौचालयांची स्वच्छताही नीट राहू शकत नाही. सर्व नागरी व ग्रामीण 'लोकवस्त्या हागणदारी मुक्त' करण्याचे उद्दिष्ट त्याशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात १९९७ पर्यंत फक्त ६ लाख शौचालये होती. त्यानंतर याबाबतीतला धडक कार्यक्रम हाती घेतला गेला व केवळ ३ वर्षांत १७ लाख नव्या शौचकूपांची भर पडली. शासनाकडून यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत. पण स्वच्छता व निर्मलता हे सामाजिक जीवनातले अग्रक्रमाचे उद्दिष्ट बनू शकलेले नाही. सामाजिक मानसिकता अशी आहे की, पाण्यासाठी म्हणून काही खर्च करायला निदान काहीसा उत्साह दाखवला जातो पण त्या पाण्याचा नंतर निचरा करण्याची जबाबदारी स्वीकारावीशी वाटत नाही.

अनुक्रमणिका

१३·१० स्वच्छता व आरोग्याचा संदर्भात एक तांत्रिक प्रश्नही हाताळावा लागणार आहे, तो म्हणजे निसर्गतः स्त्रोतांवर अवलंबून असणाऱ्या गावांसाठी स्वच्छ व निर्दोष पाण्याचा पुरवठा करण्याच्या सोयी. ग्रामीण लोकसंख्येला उपलब्ध असणाऱ्या एकूण ९६१७१ स्त्रोतांपैकी ९७९८ गुणवत्ताबाधित गावांचे मिळून २८६३८ स्त्रोत दूषित आहेत, म्हणजे जवळपास ३० टक्के. त्यात फ्लोराईट, नायट्रेट व लोह यांनी दूषित असलेल्यांचे प्रमाण बहुसंख्य म्हणजे ६५ टक्के आहे. अशी हानिकारक द्रव्ये अतिरिक्त प्रमाणात असणाऱ्या स्त्रोतांमधील पाणी संयंत्रांमधून सुद्ध करून गावांना पुरवावे लागणार आहे. यासंबंधांतील घरगुती उपचारांचे शिक्षणही संबंधित लोकांना द्यावे लागणार आहे. १९६० साली महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले, तेव्हा याबाबतची तपशिलांतील माहितीही शासनाजवळ वा स्थानिक संस्थांजवळ उपलब्ध नव्हती. त्यासाठी महाराष्ट्रात पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षणाचा स्वतंत्र कार्यक्रम हाती घ्यावा लागला. प्रयोगशाळांची उभारणी करावी लागली व ग्रामीण समाजाची पाण्याची परीक्षा व संरक्षण यासाठी ग्रामस्तरांवर क्षमतासंवर्धनाचे कार्यक्रमही हाती घ्यावे लागले. आता ३४५ ठिकाणी पाण्याची गुणवत्ता तपासण्याची सोय कमीअधिक प्रमाणात उपलब्ध झाली आहे. अशा पायाभूत व्यवस्था प्रथमतः निर्माण करून आता प्रत्यक्षात शुद्ध पाणीपुरवठ्याच्या सोयींची अंमलबजावणी हाती घेण्याची अवस्था आली आहे. निर्मलता ही समाजाच्या सांस्कृतिक उन्नतीचा अत्यंत महत्त्वाचा मापदंड आहे. अनेक वर्षे उपेक्षित राहिलेला हा विषय निदान शासनस्तरावर आता गंभीरपणाने हाताळला जात आहे. त्याला सामाजिक चळवळींमधून ज्या प्रमाणात पाठिंबा मिळेल व दोषींवर कडक कार्यवाहीं होत राहील त्या प्रमाणात निर्मल महाराष्ट्राचे दर्शन लवकर घडून येईल.


## १४. पाच दशकांचा अनुबोध

१४·१ वैज्ञानिक अद्ययावतता, आत्मनिर्भरता, लोकसहभागाचा व्यापक आधार, पाण्याच्या विविध उपयोगांचा समन्वय, व्यवस्थांचे स्थायित्व, समृद्धीची निर्मिती आणि निर्मलता ही जलसंस्कृतीची व्यवच्छेदक सात लक्षणे आहेत. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर या सातही अंगांनी महाराष्ट्राची आधुनिक जलसंस्कृती आकार घेत आहे. सर्वच अंगांची प्रगती एकसारखी नसली तरी १९६० च्या तुलनेत विचार केला तर महाराष्ट्र आता सर्व बाबतीत खूप पुढे गेला आहे. आवश्यक असणाऱ्या पार्थिव रचनांची निर्मिती अजून खूप बाकी आहे. पण त्याहीपेक्षा जास्त मागे राहिली आहे ती नवी सामाजिक बांधणी. खर्चाची व बांधकामाची उद्दिष्टे यांना नियोजन व्यवस्थेत प्राथमिकता मिळाल्याने त्या दिशेने जी व्यावहारिक गतिमानता आली त्याची बरोबरी सामाजिक परिवर्तनांना अजून करता आलेली नाही.

१४·२ प्राकृतिक स्थिती व मानवनिर्मित पार्थिव रचना, वैचारिक अधिष्ठान व लोकव्यवहारांची सांगड यावर जलसंस्कृती ठरते. त्यांतील चौथा भाग फार कच्चा राहिला आहे. समाजाचे पाण्याशी नवे नाते निर्माण होत आहे. पण त्या बाबतीतली नवी जाग अजून समाजाला नीटशी आलेली नाही. व्यावसायिक तंत्रज्ञांनी आघाडी घेतली. शासनानेही रेटा लावला आहे. पण पुरेसे सामाजिक कार्यकर्ते जलक्षेत्राच्या आधुनिकीकरणासाठी व उन्नतीकरणासाठी पुढे आले नाहीत. ही तूट भरून काढण्यावर महाराष्ट्राच्या नव्या जलसंस्कृतीचे कालोचित अंतिम स्वरूप अवलंबून राहील. महाराष्ट्र अजून सांस्कृतिक स्थित्यंतराच्या काळातून जात आहे. शिवाय जलसंस्कृती हा अखेर एकंदर सामाजिक नीतिमत्तेचाच एक भाग असणार आहे. ज्या प्रमाणात सामाजिक नीतिमत्तेत ठिसूळपणा राहील, त्याप्रमाणात जलसंस्कृतीचा विकास व आविष्कार हाही कच्च्या पायावर उभा असेल. विशेषतः सामूहिक अनुशासनबद्धतेची मानसिक सवय एकंदरच समाजजीवनात ज्या प्रमाणात रुजलेली असेल, त्या प्रमाणात तिचे प्रतिबिंब महाराष्ट्राच्या

अनुक्रमणिका

जलसंस्कृतीतही पाहायला मिळेल. म्हणून महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीच्या आधुनिकीकरणाचा व उन्नतीकरणाचा विचार करताना, एकंदर समाजाच्या सांस्कृतिक उन्नतीकरणाचाही मागोवा घेत राहणे व पाठपुरावा करीत राहणे उपयुक्त राहील.




अनुक्रमणिका



**अतुल देऊळगावकर**

पर्यावरण विषयावरील तज्ज्ञ, लेखक व कार्यकर्ते. १९९९ मध्ये मध्य प्रदेश सरकार व दिल्लीतील सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट संस्थेच्यावतीने पाणलोट क्षेत्र विकासाच्या अभ्यासासाठी तसेच २००४ मध्ये भारत सरकारच्या वतीने पाणलोट क्षेत्र विकासाच्या अभ्यासासाठी फेलोशिप. पर्यावरण, स्वच्छता, आपत्ती निवारण या व तत्सम विषयावरील जागतिक परिषदांमध्ये २००१ पासून सातत्याने सहभाग, पर्यावरण, शेती, आपत्ती व्यवस्थापन विकास, विज्ञान तंत्रज्ञान या विषयावर नियमितपणे लेखन, अनेक पुरस्कारांनी सन्मानित, डळमळले भूमंडळ, लॉरी बेकर, स्वामिनाथन-भूकमुक्तीचा ध्यास, बखर पर्यावरणाची आणि विवेकी पर्यावरणवाद्याची ही पुस्तके प्रकाशित.

**पत्ता : चंद्रमौळी, सरस्वती कॉलनी, लातूर, ४१३५३१.**
**दूरध्वनी : ०२३८२-२४२५३१**

"पर्यावरणाचे स्वरुप जागतिक असून त्याचे आव्हान मात्र सामाजिक व राजकीय आहे. आपला समाज काळानुरूप सुसंस्कृत व जबाबदार होत नसल्यामुळे तर संपूर्ण सिव्हिलायझेशन धोक्यात आली आहे." — जगद्विख्यात पर्यावरण शास्त्रज्ञ जेम्स लव्हलॉक.

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली त्यावेळी जगाला पर्यावरणाची समज नव्हती. प्रदूषण ह्या संज्ञेचा वापर सुरू व्हायचा होता. याचा अर्थ ती समस्याच अस्तित्वात नव्हती, असा मात्र नाही. त्याच सुमारास अमेरिकेमध्ये ग्रंथातून पर्यावरणवादाचा पाया घातला जात होता. १९६२ पासून आजतागायत त्याच्या ४२ आवृत्त्या निघाल्या, १५ भाषांमधून अनुवाद झाले. पुढे पर्यावरणवादाची गीता ठरलेला, विसाव्या शतकाचा इतिहास घडविणाऱ्या ग्रंथांच्या यादीत सन्मानाचे स्थान लाभलेला 'सायलेंट स्प्रिंग' या ग्रंथाचे लिखाण जीवशास्त्रज्ञ राशेल कार्सन करीत होत्या. ह्या ग्रंथाने १९६० च्या दशकात पर्यावरण विनाशाची व्याप्ती जगाला दाखवून दिली.

"निसर्गाने सर्व काही मुक्तहस्ते बहाल केले आहे असे नयनमनोहर गाव होते. सारे काही ठीकठाक चालले होते. अचानक घडी बिघडली. विचित्र आजाराने त्या भागाला घेरले. एकाएकी अनेक पक्षी मरून पडू लागले. कित्येक पक्ष्यांना उडताच येईना. अनेक पक्ष्यांचे कूजन थांबले. त्या वसंत ऋतूत वसंत तसाच होता. नव्हता तो केवळ पक्ष्यांचा आवाज! सकाळी सर्व पक्ष्यांचा किलबिलाट नष्ट झाला. सगळीकडे भयाण

स्मशानशांतता पसरली. वाणी हरवलेल्या केविलवाण्या पक्ष्यांच्या सान्निध्यात तो जीवघेणा मूक वसंत होता."

वाचणाऱ्यांना खेचून नेत थरकाप उडवणाऱ्या त्या ग्रंथाचा पहिला परिच्छेद, हा असा आहे.

वसंत ऋतुची बहार अचानक का गेली? वसंत मूक का झाला? निसर्गनियमात कोणी बिब्बा घातला याच्या शोधाला कार्सन लागल्या.

१९३९ साली पॉल म्युलर ह्या रसायनशास्त्रज्ञांनी स्वित्झर्लंडमध्ये डी. डी. टी. ची (डायक्लोरो डायफिनाइनल ट्रायक्लोरोइथेन) भुकटी तयार केली. दुसऱ्या महायुद्धात, डास, जळवांच्या उच्चाटनासाठी डी. डी. टी. वापरल्याने हिवताप व इतर संसर्गजन्य रोग रोखले गेले. हे लक्षात येताच डी. डी. टी. चा पिकावरील कीड नष्ट करण्यासाठी वापर सुरू झाला. अनेक प्रकारच्या किडीला नाहीसे करण्यासाठी डी. डी. टी. उपयोगी ठरली. त्यामुळेच १९४८ मध्ये पॉल म्युलर यांना रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार बहाल करण्यात आला. त्यापाठोपाठ रसायनशास्त्रज्ञ कृत्रिम कीटकनाशक तयार करण्यासाठी प्रयत्न करू लागले. डाइमफॉक्स, टेट्राईथाइल फॉस्फेट ही संयुगे किडीवर फवारली गेली. त्यानंतर मॅल्थिऑन, बी. एच. सी. (बेंझिन हेक्झॅ क्लोराइड), थायोकार्बोनेट ही कीटकनाशके बाजारात आली. तोपर्यंत प्रदूषण हा संज्ञाच अस्तित्वात नव्हती.

कीटकनाशकातील रसायनांमुळे कीड मरते. परंतु ते विष पक्ष्यांना घातक आहे. याची जगाला जाणीव सर्वप्रथम कार्सन बाईंनी करून दिली. कीटकनाशकांची बलस्थाने हेच त्यांचे दुर्गुण ठरू लागले. डी. डी. टी. फवारल्यानंतर त्याचे विघटन होत नाही. धान्यावाटे क्लोरिनचे अंश आपल्या पोटात जातात. मातेच्या दुधातसुद्धा क्लोरिनचे अंश आढळल्यावर डी. डी. टी. वर जगभर बंदी आली. नोबेल पुरस्काराने सन्मानित होण्यापासून ते समूळ उंच्चाटन होण्यापर्यंतची डी. डी. टी. ची ही वाटचाल जगाच्या बदललेल्या दृष्टीची साक्ष आहे. 'सायलेंट स्प्रिंग' मुळे निसर्गाची हानी, पर्यावरण संरक्षण, प्रदूषण हे मुद्दे चर्चेत आले, तशी लोकांमध्ये प्रदूषणाविषयीची जागरुकता वाढीला लागली. तंत्रज्ञानाच्या व आर्थिक प्रगतीच्या वाटेवर पर्यावरणाचा नाश होत असल्याचा धोक्याचा इशारा १९६२ साली जीवशास्त्रज्ञ राशेल कार्सन यांनी दिला होता.

यापुढे जगाला ऊर्जेची समस्या छळणार असल्याचा इशारा १९७० च्या दशकाने दिला. १९७० च्या सुमारास अरब राष्ट्रांनी पेट्रोलियम पदार्थांचे भाव दणकून वाढवल्यावर ऊर्जासंकट आल्याची भीती अमेरिकनांना वाटू लागली. त्यातून 'पर्यावरण वाचवा, इंधन वाचवा, जंगलतोड टाळा' असे उपदेश सुरू झाले. १९७२ साली पहिली जागतिक पर्यावरण परिषद स्टॉकहोममध्ये भरवली गेली. आधीच धनवान असणाऱ्या राष्ट्रांसाठी नैसर्गिक साधनसंपत्ती वेगाने नष्ट होऊ नये याची खबरदारी म्हणून पर्यावरण संवर्धन होते. याउलट दरिद्री राष्ट्रांकडे नैसर्गिक सामग्रीचाच तुटवडा असताना संपत्तीची निर्मिती करणे हीच प्राथमिकता होती. त्या सुमाराला श्रीमंत व दरिद्री राष्ट्रांच्या विकासाबाबतच्या अग्रक्रमात अफाट फरक होता. वसाहती नुकत्याच स्वतंत्र झाल्या होत्या. वसाहत काळात गुलामदेशातील निसर्ग व श्रम ओरबाडून सत्ताधारी देशांच्या संपत्तीची वाढ झाली होती. ठेकेदार व सत्ताधाऱ्यांनी जंगलतोड करून बेहिशेबी संपत्ती कमवावी आणि बापड्या आदिवासींनी मात्र जळणासाठी लाकूड घेतल्यास त्यांना पर्यावरण जपण्याचा सल्ला द्यावा, अशा धर्तीचा हा हितोपदेश संयुक्त राष्ट्रसंघाच्या परिषदेत चालू झाला. त्यामध्येच इंदिरा गांधींनी

अनुक्रमणिका

अमेरिकेला फटकारले— “पर्यावरणाचा सुटा विचार करून चालणार नाही. आर्थिक व विकासाचे प्रश्नही त्यात गुंतले आहेत. दारिद्र्य हेच सर्वात गलिच्छ प्रदूषक आहे.” इंदिरा गांधींच्या या उद्‌गारांनी जागतिक पर्यावरण समस्येला वेगळे वळण दिले.

१९७० च्या दशकात केरळमधील ‘सायलेंट व्हॅली’ आंदोलनाने भारतामध्ये पर्यावरण चळवळीचा आरंभ झाला. केरळच्या नीलगिरी रांगामध्ये नव्वद चौरस किलोमीटरवर पसरलेले ‘सायलेंट व्हॅली’ चे सदाहरित, घनदाट जंगल धोक्यात आले होते. जीवसृष्टीचा अनमोल ठेवा कैक वर्षांपासून जपणाऱ्या या जंगलात वनस्पती व प्राण्यांच्या कित्येक दुर्मीळ जाती आजही सुखाने नांदत आहेत. तापमान कधीही वीस अंश सेल्सियसपेक्षा वर जात नाही. दरवर्षी सरासरी पाऊस तीन हजार मिलीमीटर होतो. १९२४ साली ब्रिटिशांनी तिथे जलविद्युत प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव ठेवला होता. परंतु जंगलात जाणेच अवघड असल्यामुळे पुढे हालचाल झाली नाही. जंगलात येऊन सर्वेक्षण करायला १९५० साल उजाडावे लागले. १९७३ साली दोनशे चाळीस मेगॅवॅट वीज तयार करण्यासाठी पंचवीस कोटींचा ‘सायलेंट व्हॅली’ प्रकल्प केंद्राने मंजूर केला. ‘सायलेंट व्हॅली’ मधील जैविक समृद्धीची सरकारी संस्थांना अजिबात कल्पना नव्हती. परंतु जंगलभ्रमण करणारे वनस्पतीशास्त्राचे व जीवशास्त्राचे अभ्यासक वीज प्रकल्पामुळे होऊ घातलेल्या निसर्गाच्या विनाशामुळे हादरले. ते उत्स्फूर्तपणे ‘सायलेंट व्हॅली’ वाचवण्याच्या प्रयत्नाला लागले. केरळ साहित्यशास्त्र परिषदेने पर्यावरण ब्रिगेड तयार केली. एम. के. प्रसाद, चंद्रन नायर, एम. पी. परमेश्वरन चळवळीच्या अग्रभागी होते. त्यांनी केरळ व तमिळनाडूमधील सर्व वैज्ञानिक संस्थांना ही माहिती दिली. केरळ साहित्यशास्त्र परिषदेची पत्रके वाचून साहित्यिकही चिंतेने ग्रासले. वैज्ञानिकांच्या साथीला साहित्यिक आले. कवी, लेखक, कादंबरीकर निसर्ग वाचवायला सरसावले. वायकोम मोहम्मद बशीर, ओ. एन. व्ही. कुरूप, एम. व्ही. कृष्णा वॉरियर हे सायलेंट व्हॅलीच्या संरक्षण मोहिमेत सामील झाले. माध्यमांनी प्रसिद्धी दिली. देशातील निसर्गप्रेमींनी पाठिंबा दिला. डॉ. सलीम अली, डॉ. माधव गाडगीळ, एम. ए. पार्थसारथी आदींनी देशभरातील निसर्गमित्रांना साथ देण्याचे आवाहन केले. निसर्गसंरक्षकांचे जाळे देशभर निर्माण झाले. आंतरराष्ट्रीय संघटनांनी भारत सरकारला सायलेंट व्हॅलीतील जलविद्युत प्रकल्प रोखण्याची विनंती केली. केंद्र सरकारने डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांना सायलेंट व्हॅलीला भेट देऊन प्रत्यक्ष स्थितीचा अहवाल सादर करायला सांगितले. स्वामीनाथनांनी ‘सायलेंट व्हॅली’ जपण्यासाठी वीजप्रकल्प रद्द करण्याची सूचना केली. इंदिरा गांधींनी विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ. एम. जी. के. मेनन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून सविस्तर अहवाल मागितला. डॉ. मेनन यांनीदेखील स्वामिनाथनांप्रमाणेच मत व्यक्त केले. त्यानंतर मोरारजी देसाई, चरणसिंग सरकार येऊन गेले. इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्यावर त्यांनी १९८३ साली मेनन समितीच्या अहवालाचा निष्कर्ष स्वीकारून वीजप्रकल्प रद्द केला. त्यानंतर १९८५ साली राजीव गांधींनी सायलेंट व्हॅलीला राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित केले. भारतातील पहिल्या पर्यावरण चळवळीच्या लढ्याला ऐतिहासिक यश मिळाले. त्यानंतर भारतीय पर्यावरण विस्तीर्ण होत गेली.

**तहान भागवण्यासाठी**

जागतिक आणि भारतीय पातळीवर पर्यावरणाची जागरुकता वाढत होती. त्याच सुमारास १९७२ साली भीषण दुष्काळामुळे महाराष्ट्र होरपळून निघाला. पाण्यासाठी एकट्याने लढाई लढणे शक्य नाही. तसेच शासनाच्या मागे लागण्यात अर्थ नाही. लोक एकत्र आले, तर माती व पाणी एकाच वेळी अडवता येते. आपणच समस्या सोडवू शकतो, हे लक्षात येऊन एकाच वेळी अनेक ठिकाणी पाणी व्यवस्थापनासाठी

अनुक्रमणिका

शर्थीचे प्रयत्न सुरू झाले. दुष्काळी राळेगणसिद्धीमध्ये अण्णा हजारेंनी पावसाचे पाणी अडवण्याची व्यवस्था केल्यामुळे दुष्काळ कायमचा हटला. त्याचवेळी पुण्याच्या पुरंदर तालुक्यात विलासराव साळुंखे पाण्याचे समान वाटप करण्याचे अशक्य कार्य वास्तवात आणत होते. पाणी ही संपत्ती असून तिच्या वाटपासाठी पंचायत बसवण्याचे ऐतिहासिक कार्य साळुंखे यांनी केले. अंबेजोगाईमध्ये डॉ. द्वारकादास लोहिया, आडगावात विजय अण्णा बोराडे, विल्यामध्ये वसंतराव गंगावणे यांनी हे सिद्ध करून दाखवले. सभोवतालच्या माणसांची तडफड पाहून या सर्वांनी स्वतःचा व्यवसाय बाजूला सारून पाण्यासाठी आयुष्य पणाला लावले.

१९७० ते ८० या दशकात अनेक ठिकाणी पाणी व्यवस्थापनातील पथदर्शक कामे चालू होती. मराठवाडा शेतीसहाय्य मंडळाने आडगावात (जिल्हा जालना) पाणी समस्येची हकालपट्टी केली. गोकुळ प्रतिष्ठानाने विल्ये गावात (जिल्हा रत्नागिरी), वनराईने सासवड (जिल्हा पुणे) मध्ये, तर हिवरेबाजारच्या (जिल्हा अहमदनगर) गावकऱ्यांनी दुष्काळाला पराभूत केले.

हिवरेबाजार हे गाव १९८९ पर्यंत अपराध, गुन्हे, मारामाऱ्यांमुळे कुप्रसिद्ध झाले होते. पोपटराव पवार हे वाणिज्य शाखेचे पदवीधर गावाचे सरपंच झाल्यावर त्यांनी गावाचा कायापालट करण्यास सुरुवात केली. पोपटरावांनी राज्य सरकार, वनखाते व गावकऱ्यांच्या मदतीतून सलग समपातळीतील चर खोदण्याची योजना हाती घेतली. या समपातळीतील चरांच्या ४५० हेक्टर जमिनीला लाभ झाला. त्यासाठी राज्य सरकारने ६६ लाख रुपये दिले, तर गावकऱ्यांनी वर्गणीतून व श्रमदानातून २१ लाख रुपये जमा केले. ही योजना इतकी साधीसुधी व कमी खर्चाची होती, की या योजनेत पोलाद, सिमेंट अथवा खर्चिक बांधकाम साहित्याचा उपयोग करावा लागला नाही. एकूण पडणाऱ्या पावसापैकी ६० ते ८० टक्के पाणी या योजनेमुळे जमिनीत मुरवता आले. "गावातील पाणी ही सार्वजनिक संपत्ती आहे आम्ही लोकांना कूपनलिकेऐवजी विहिरी खणण्यास परवानगी दिली. या गावात सरासरी वार्षिक २०० मि. मी. इतका पाऊस पडतो. पण आम्ही पावसाच्या प्रत्येक थेबांचे नियोजन केल्याने आता गावात बाराही महिने जमिनीत पाणी लागते." पोपटराव सांगतात, आज जलव्यवस्थापनामुळे हिवरेबाजारातील दुग्धव्यवसाय, बायो गॅस प्रकल्प, सामूहिक शेती भरभराटीस आली. १९९० च्या दशकात या गावातील १८० कुटुंबांपैकी १६८ कुटुंबे दारिद्र्येरेषेखाली होती. आज या घडीला गावातील एकही कुटुंब दारिद्र्य रेषेखाली नाही.

१९८० च्या दशकात नर्मदा बचाव आंदोलनाने मोठ्या धरणांमुळे होणाऱ्या पर्यावरण विनाशाकडे जगाचे लक्ष वेधले. विकास योजनांमुळे नेमका कुणाचा विकास होतो? हा मूलभूत प्रश्न ऐरणीवर आणला. सिंचनाकरिता, वीजनिर्मितीसाठी धरण बांधून होतं. पण त्या धरणाच्या क्षेत्रातील पाण्यामध्ये ज्यांची घरे, गावे आणि शेती समाधी घेतात, त्यांची संपूर्ण ह्यात विस्थापित म्हणून जाते. कुठलाही प्रकल्प तयार करताना त्यामुळे बाधा पोहोचणाऱ्यांची सर्व सोय केल्याशिवाय त्यांची घरे हटवणे हे अमानुष व बेकायदेशीर आहे. त्यांच्या पुनर्वसनाविना विकासाचा गाडा कसा चालू शकतो? लाखो एकर जमीन, जंगल बुडवून हजारो स्थानिक लोकांना बेघर करणारी ही कसली विकास नीती? प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्यांशी काहीही चर्चा न करता नियोजन कसे होतो? आजपर्यंत झालेल्या धरणांचा खर्च व नफा काढला तर ही धरणे फायदेशीर ठरतात का? धरणाची गरज सांगताना त्याचे फायदे फुगवून दाखवले जातात काय? अपेक्षेपेक्षा अधिक गतीने धरणात गाळ का साचतो? नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी असे अनेक मूलभूत प्रश्न उपस्थित केले. आंदोलनाच्या रेट्यामुळे न्यायालयांनी पुनर्वसनाच्या समस्यांची दखल घेतली. जागतिक बँकेने नर्मदा धरणाचे अर्थसहाय्य थांबवले.

अनुक्रमणिका

सद्यःस्थितीतल्या विकासाच्या नमुन्याबाबत विचारणा करण्याच्या प्रथेचे एतिहासिक कार्य नर्मदा आंदोलनाने केले. त्यापाठोपाठ प्रसार माध्यमांमधून "केवळ नकार देऊन भागणार नाही. विकासासाठीचा पर्याय सांगा" असा आग्रह सुरू झाला. पर्यावरणाचा नाश न करता, अल्पखर्चात अधिक फायदा देणारे पाणी व्यवस्थापन कसे करता येईल, याचा खल देशभर चालू झाला.

**सीमेच्या पल्याड जाणारे पर्यावरण**

१९९१ च्या एप्रिलमध्ये अमेरिकेने इराकवर जोरदार बॉंबहल्ले केले होते. त्यामुळे तयार झालेले काळे ढग तिथेच थांबले नाहीत. काळ्या ढगांचा चाललेला प्रवास नेपाळमधील हिमालयाने थांबवला आणि तिथे काळा पाऊस पडला. बॉंब टाकला अमेरिकेने, युद्धभूमी इराकमध्ये आणि काळा पाऊस भोगावा लागला नेपाळला! नेपाळला नाहक काळ्या पाण्याची शिक्षा झाली. त्यापोटी अमेरिकेने नेपाळला भरपाई द्यावी अशी मागणी जगातील पर्यावरणवाद्यांनी केली. हवा व पाण्याला नद्या व समुद्राला वनस्पती व पक्ष्यांना माणसांनी घातलेल्या सीमा लागू पडत नाहीत. राजकीय कारणांनी पडलेली बंधने पर्यावरणाला घालता येत नाहीत. याची जाणीव १९८० च्या दशकातच झाली होती. जगाच्या हवामानात बदल होत आहे जगाचे तापमान वाढत आहे. हे मुद्दे तेव्हापासून चर्चेत आले. महाराष्ट्रभर उत्तम पाऊस पडतो तेव्हा मराठवाडा कोरडाठाक राहतो. ओरिसाला कधी अवर्षण तर कधी अतिवृष्टी त्रासून टाकते. पावसाळा जूनऐवजी जुलैमध्ये चालू होतो. गारपिटीचे प्रमाण वाढते. 'या सर्वांचे कारण जागतिक हवामान बदल हेच आहे काय?' अशी विचारणा आज सर्व भागातील लोक करतात. वैज्ञानिकांनी व पर्यावरणवाद्यांनी हे प्रश्न पंचवीस वर्षांपूर्वी उपस्थित केले होते.

१९७२ च्या स्टॉकहोम जागतिक पर्यावरण परिषदेनंतर वीस वर्षांनी १९९२ साली रीओ दा जानेरियो येथे दुसरी जागतिक पर्यावरण परिषद झाली. 'जागतिक तापमानवृद्धीची' समस्या प्रथमच आंतरराष्ट्रीय कार्यक्रमपत्रिकेवर आली. आज जगभर वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी इंधनात व तंत्रज्ञानात खूप बदल होताना दिसतात. त्याचे बीज रिओ मध्ये १९९२ साली पडले. त्याचा पाठपुरवा करण्यासाठी १९९७ साली 'घटणारे ऊर्जास्त्रोत आणि हवेचे प्रदूषणीकरण' या समस्येच्या निवारणाकरता क्योटो (जपान) येथे जागतिक परिषद भरवली गेली. क्योटोमध्ये दीडशे राष्ट्रांच्या प्रमुखांनी सर्वसंमतीने एक जाहीरनामा घोषित केला. त्यानुसार १९९० साली असलेल्या कर्बवायुच्या उत्सर्जनात पाच टक्के कमी हे प्रमाण पायाभूत मानलं गेलं. सर्व देशांनी त्यांच्या देशात कर्बवायूच्या उत्सर्जनाची पातळी १९९० साली होती तिथपर्यंत खाली आणावी. हे उद्दिष्ट २०१२ सालापर्यंत गाठले पाहिजे. सगळ्या देशांमधून बाहेर पडणाऱ्या वायूच्या आकडेवारीचे प्रमाण समोर ठेवलं. साहजिकच धनवान राष्ट्रांची उत्सर्जन पातळी कमालीची होती. युरोपियन राष्ट्रांनी आठ टक्क्यांनी उत्सर्जन घटवण्याचे मान्य केले. अमेरिकेला सात टक्क्यांनी, तर जपान व कॅनडा यांना सहा टक्क्यांनी उत्सर्जन कमी करण्याची ग्वाही द्यावी लागली. रशिया, युक्रेन यांची गणना विकसित गटांत असूनही त्यांच्या डबघाईला आलेल्या अर्थव्यवस्था ध्यानात घेऊन त्यांना काही काळासाठी सूट दिली गेली. विकसितांपैकीच नॉर्वे, आईसलॅंड, ऑस्ट्रेलिया यांचे उत्सर्जन आधीच कमी असल्याने त्यांना ते एखाद्या टक्क्याने वाढवण्याची मुभा दिली गेली. राष्ट्रनिहाय उत्सर्जन कपातीचे उद्दिष्ट क्योटो परिषदेच्या जाहीरनाम्यात स्वीकारले गेले. अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी क्योटो परिषदेच्या करारावर सही केली. त्यानंतर क्लिंटन यांच्या भारतभेटीत एकूण विकसनशील राष्ट्रांना आणि विशेषतः भारताला प्रदूषणहीन तंत्रज्ञान देण्याचे आश्वासन दिले.

अनुक्रमणिका

२००२ साली जोहान्सबर्गला चिरंतन विकासावर वसुंधरा परिषद झाली. दोन महिने आधीच या परिषदेत काय होणार याची चुणूक येऊ लागली होती. २००२ च्या आषाढात गडद निळे जलद दाटून आले. पण पाऊस काही भारताला न्हाऊ घालेना. बारा राज्यांवर दुष्काळाचे ढग जमा झाले. श्रावणमासीही जनमानसात हर्ष होण्यासारखी कारणे दिसेनात. नभात मेघांचे आक्रमण होऊनही क्वचित एखादी सर किंवा तुषारसिंचनाने सगळे चकित झाले. तेवढ्यात मौजे लंडनहून बातमी आली, "हे सारे भारतातील प्रदूषणाचे परिणाम! हिंदी महासागरावरील तपकिरी ढग दक्षिण आशियात पाऊस पडू देत नाहीत." चुलीत गोवऱ्या व लाकूड जाळणे पर्यावरणास घातक असल्याचा इशारा संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण प्रकल्पाच्या अहवालात दिला गेला. चुलीतून निघणारा धूर आणि अर्धज्वलनातून बाहेर पडणारे कार्बनचे घण कण आकाशात जाऊन ढग तयार होतात. हे ढग पावसाच्या ढगांना रोखतात. सबब चीन, पाकिस्तान आणि भारतीयांनी जीवनशैलीत तातडीने बदल घडवावा असा सल्लावजा आदेश जारी केला. प्रदूषणात भारताचा वाटा अधिक असल्याने ह्याबद्दल भरपाई द्यावी, अशी मागणी पाकिस्तानने लगबगीने केली, पण आवाज क्षीण होता. प्रदूषण, ढग आणि पावसाच्या संबंधाविषयी सघन चर्चेचा आरंभ २००२ च्या जुलै महिन्यात झाला. ऑस्ट्रेलिया आणि कॅनेडातील वैज्ञानिकांच्या निष्कर्षांनी ढगफुटीच झाली. "अमेरिका व युरोप खंडातील कारखाने आणि वीज प्रकल्पांमुळे आफ्रिका खंडात पर्जन्यमान घटत आहे." असा त्यांचा निष्कर्ष होता. १९७० नंतरची तब्बल पंधरा वर्षे, आफ्रिका खंडातील सेनेगलपासून इथिओपिया पर्यंत सर्व राष्ट्रांमध्ये महाभयंकर दुष्काळाने हाहाकार माजवला होता. हाडांचे सापळे झालेल्या मुलांकडे पाहणाऱ्या हताश माता आणि अन्न-पाण्यासाठी तडफडणाऱ्या चिमुकल्यांच्या छायाचित्रांनी जगाला हादरवून सोडलं होतं. त्या काळात आफ्रिका खंडात बारा लाख भूकबळी गेले. या दुष्काळाच्या कारणांचा कसून शोध घेण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञ करीत आहेत. कारखान्यातून बाहेर पडणारी वायुप्रदूषके विशेषतः सल्फेटच्या कणांमुळे पावसाचे ढग निर्माण होण्याची प्रक्रियाच थांबते. त्याचा परिणाम आफ्रिका खंडातील पावसावर झाला. असा साधार निष्कर्ष ऑस्ट्रेलियातील कॉमनवेल्थ इंडस्ट्रियल रीसर्च ऑर्गनायझेशन ह्या शासकीय संशोधन संस्थेने काढला. लंडनहून आलेल्या 'जबाबा' मागच्या राजकारणाचे स्वरुप असे होते. ऐन पावसाळ्यात आलेले आकाशातील ढग नेमके कसले? पाण्याचे की प्रदूषणाचे? आणि ते कुणाच्या पापाचे? ह्या आरोपांनी जागतिक राजकारणाचा पारा चढू लागला. नेमकी ही वेळ साधणे यात आकस्मिकता अथवा योगायोग नव्हता. २००२ च्या ऑगस्ट महिन्याअखेरीस जागतिक रंगमंचावर होऊ घातलेल्या पर्यावरण परिषदेच्या नाट्यासाठीची ती नेपथ्यरचना होती.

परंतु पर्यावरणाच्या राजकारणात बाजू मांडण्याएवढी आपली वैज्ञानिक तयारी होती. भारत, मालदिव, युरोप व अमेरिकेतील दोनशे शास्त्रज्ञांनी १९९७ ते १९९९ या काळात जहाज, वातयान (बलून), विमान व उपग्रहाच्या साहाय्याने हिंदी महासागरावरील ढगांचा अभ्यास केला होता. हिंदी महासागराच्या उत्तरेस तब्बल एक कोटी चौरस किलोमीटर भागावर प्रदूषणाचे दाट काळे ढग पसरले होते. अशी माहिती, या अभ्यासगटातील सदस्य व भारतीय भौतिकी प्रयोगशाळेचे शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. मित्र यांनी दक्षिण आशियातील पर्यावरण पत्रकारांच्या कार्यशाळेमध्ये दिली होती. डॉ. मित्र यांनी स्वतः तो ढग पाहिला व अभ्यासला होता.

वाहने आणि कारखान्यांतून निघणारा धूर यांपासून मोठे धूलिकण (एरोसोल) तयार होतात. खास करून औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील कोळशाच्या ज्वलनातून कर्बवायू व घनकणांचा त्यात मोठा वाटा आहे. "प्रदूषित ढगांमधील कार्बनमुळे वातावरण तापते तर सल्फेट थंडावा निर्माण करतो. सूर्यप्रकाश आणि सौर ऊर्जा पृथ्वीपर्यंत पोहोचण्यात अडसर तयार होतो. काही वायू अल्पायुषी तर काही दीर्घ काळ टिकणारे

असतात. त्यांच्या गुणांनुसार ते ताप देत राहतात. प्रदूषणाचे ढग पावसाच्या ढगांच्या निर्मितीस रोखतात. आपल्या पावसावर त्यांचा परिणाम होत आहे. पश्चिम व ईशान्य भारतात पावसाचे प्रमाण कमी होत असून दक्षिण व पूर्व भारतामध्ये अधिक पाऊस पडत आहे. कालमान व प्रमाण पाहता भारतीय पर्जन्यमानातील ठळक बदल झाल्याची ही लक्षणं आहेत. या प्रक्रियेचा अधिक अभ्यास होणं आवश्यक आहे" असे डॉ. मित्र यांचे मत होते. प्रदूषणाच्या ढगांमध्ये बत्तीस टक्के सल्फेट, चौदा टक्के कार्बन कण, पाच टक्के राख प्रामुख्याने आहेत. या प्रदूषणाच्या ढगांमुळे पृथ्वीवर सूर्यप्रकाश कमी पोहोचतो. प्रकाश संश्लेषण क्रियेवर याचा थेट परिणाम होऊन शेती उत्पादन घटत आहे. श्वसन, नेत्र व त्वचा रोगांची लागण वाढीस लागत आहे ती यामुळेच!

२००९ च्या डिसेंबर महिन्यात कोपनहेगनला ९९२ राष्ट्रांचे प्रमुख, हवामानबदल रोखण्याचे आव्हान पेलण्याची कृती ठरवण्यासाठी जमले. उत्तर आणि दक्षिण गोलार्धात झालेली जगाची विभागणी केवळ भौगोलिक नाही. ती आर्थिकसुद्धा आहे. उत्तरेकडील देश औद्योगिक व त्यामुळे श्रीमंत आहेत. याउलट दक्षिणेचे दरिद्री अवस्थेत आहेत. आधीच जगाची वाटणी विषम; त्यात तेरावा महिना हवामान बदलाचा! सगळे ऋतु बदलून चालले आहेत. शेती कोलमडून जात आहे. सध्या जगातील भुकेल्यांची संख्या १०० कोटींच्या वर गेली आहे. हे सगळे भोग दक्षिणेला आहेत, हेच जी-७७ मधील १३२ देशांनी ठणकावून सांगितले.

हवेमध्ये घाण करून ठेवण्यात आघाडीवर विमान आहे. हजारो मीटर उंचीवर जाऊन साधारणपणे ताशी शंभर किलोग्रॅम कर्ब वायू सोडण्याचे कार्य विमान करते. एक कार दर किलोमीटरला दोनशे ग्रॅम कर्ब वायू सोडते. दर माणशी कर्ब उत्सर्जनाची पातळी जादा असल्याबद्दल अमेरिकेला शिक्षा केली पाहिजे. अमेरिकेत प्रत्येक व्यक्ती १९·७८ टन कार्बन वायू सोडते. भारतामध्ये हे प्रमाण १·१६ टन एवढे आहे. अमेरिका असो वा देशांच्या अतुले धनाढ्य! सत्ता चालते ती त्यांचीच. हे रोखण्याकरिता आंतरराष्ट्रीय प्रशासन आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाला दंड करण्याचे अधिकार देण्यास १९२ देश राजी आहेत. अशा आंतरराष्ट्रीय प्रशासनाच्या आरंभाचे सूतोवाच झाले आहे.

आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार कोणत्याही देशाची सागरी हद्द ३७० किलोमीटरपर्यंत (२०० सागरी मैल) असते. त्यापलीकडच्या खोल सागरावर कुणाचेही नियंत्रण नसल्याने धनाढ्यांना मोकाट रान आहे. अतोनात मासेमारी, प्रवाळांची (कोरल) लूट चालली आहे. हे समुद्रमंथन व मुलूखगिरी रोखण्याकरिता खोल सागरावर पहारा ठेवण्याचा इरादा संयुक्त राष्ट्रसंघाने नुकताच व्यक्त केला आहे. त्याच पद्धतीने कार्बन उत्सर्जनाच्या घालून दिलेल्या मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या राष्ट्राला शासन करण्याकरिता हवेची रखवाली करावी लागणार आहे. इथून पुढच्या काळात प्रदूषण करणाऱ्या धनाढ्य व्यक्ती असो वा राष्ट्रे त्यांना वेगळा कर द्यावा लागेल. प्रदूषणरहित स्वच्छ तंत्रज्ञानाला चालना मिळेल. व्यक्तिस्वातंत्र्याच्या कवचकुंडलाआडून डोकावणाऱ्या वैयक्तिक जीवनशैलीमधून प्रदूषणाचे प्रश्न निर्माण झाले आहेत.

पर्यावरणाचे (व प्रदूषणाचेदेखील) स्वरूप जागतिक आहे. परंतु, राजकारण मात्र राष्ट्रांच्या सीमांमध्ये जखडून गेले आहे. या सापळ्यातून बाहेर पडण्याची हिंमत कुणाकडेही नाही. आणि इथेच जागतिक तापमान वाढीचे घोंगडे भिजत, थिजत पडले आहे. विज्ञानाबद्दल राणा भीमदेवी चर्चा झडत आहेत. पर्यावरणाच्या अर्थशास्त्राविषयी खंडण-मंडण चालू आहे. परंतु, राजकीय पर्यावरण बदलेले नाही तर संधी आलेली असूनही जग बदलणे शक्य होणार नाही. पर्यावरणाला कुठल्याही भौगोलिक व राजकीय

अनुक्रमणिका

सीमा नाहीत. हवा आणि नदी सर्व बंधने ओलांडून प्रवास करतात. राजकारणानेही काळानुरुप असेच प्रगल्भ व्हावे असा पर्यावरणाचा संदेश आहे.

**पर्यावरण आणि विकास यांचे अद्वैत**

ही पृथ्वी केवळ माणसांचीच नाही, तर ती सर्व वनस्पती व प्राण्यांचीही आहे. आर्थिक विकासाच्या नादात हे भान ठेवले पाहिजे. या जीवसृष्टीच्या साखळीमधील प्रत्येक कडी तेवढीच महत्त्वाची आहे. कुठलीही कडी तुटली, तर विश्वाची जैविक लय बिघडून जाईल. माणसाने निसर्गाला बाधा आणणारा विकास चालू ठेवल्यास तो विनाशाकडे नेईल. या विचाराने १९६० च्या दशकात पर्यावरणवादाची पहिली लाट निर्माण झाली.

पर्यावरण विनाशाचे परिणाम गरिबांना भोगावे लागतात. पर्यावरण समृद्ध असण्याला पर्याय नाही. दारिद्र्याचे मूळ कारण आर्थिक नसून पर्यावरणीय आहे आर्थिक व सामाजिक दारिद्र्याचा उगम पर्यावरणाच्या दारिद्र्यातून होतो आणि त्यामागे राजकीय हितसंबंध असतात हेच आजच्या राजकारणाचे खरे स्वरूप आहे अशी मांडणी १९८० च्या दशकात झाली. पर्यावरणवादास सघनता आणणारी ही दुसरी लाट होती.

“निसर्गाला अंकित करा, निसर्गाला ताब्यात न ठेवल्यास माणूस प्रगती करू शकणार नाही.” हे विकास करणाऱ्यांचे टोक होते. त्याला उत्तर म्हणून, “निसर्गात अजिबात ढवळाढवळ करू नका.” असे पर्यावरणवाद्यांनी दुसरे टोक गाठले. या दोन ध्रुवांमध्ये राहून निसर्ग जपत विकास साधणे हे आपले कर्तव्य आहे या बाबतीत कार्ल मार्क्स यांची सिद्धांत किंवा मंडण (थीसीस), प्रतीसिद्धांत वा खंडण (अँटिथीसीस) आणि समन्वय (सिन्थेसिस) ही संकल्पना लावता येते. विकासाच्या एका टप्प्यावर पर्यावरणाची हानी होते ते काही अंशी अटळही आहे. परंतु पुढील टप्प्यावर पर्यावरण जपणारा विकास साधता येणे शक्य आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे उपलब्ध होणारे नवे तंत्रज्ञान ऊर्जा वाचवणारे, निसर्ग जपणारे असू शकते. विज्ञान उत्क्रांत होत आहे. यावर विश्वास असेल आणि दृष्टी खुली असेल तर याची प्रचिती येते. पर्यावरण आणि विकास यांच्यामध्ये अद्वैत साधेल असा व्यापक विचारच पर्यावरणवादातील तिसरी लाट आणू शकेल. ती यावी अशी समाजमनाची गरजही आहे.

एकविसाव्या शतकातील पर्यावरणवाद कसा असावा असे विचारल्यावर डॉ. एम. एस. स्वामिनाथन म्हणाले, “सतत नकारघंटा न वाजवता मार्ग व कृती दाखवणारा पर्यावरणवाद ही सदाहरित क्रांतीची व स्थायी विकासाची निवड आहे. पर्यावरणवाद हे एक बौद्धिक आव्हान आहे. मूल्यवादी जगण्यासाठी, सामाजिक न्यायाचा आग्रह धरणारा हा विचार अमलात आणण्याची निकड आहे. त्याचबरोबर प्रचलित पर्यावरणवादाला नैतिक, वैज्ञानिक, तार्किक व तात्त्विक कसोट्यांवर घासूनपुसून घेण्याची गरज आहे.” खरे पाहता ‘पर्यायी’ पर्यावरणवादी विचारांची अधिक गरज आहे. कारण पर्यावरणाचा प्रश्न आपल्या विकासाशी, जीवनमानाशी निगडित आहे सर्व माणसांना अधिक सुखी (म्हणजे भोगवादी नव्हे.) जीवन जगायचे तर तो प्रश्न भौतिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक आहे.

पर्यावरणवादाला विवेकीपणाची जोड देऊन समग्र करणाऱ्या विचारांची आंतरिक गरज आपल्या सर्वांना वाटत आहे. आपल्याकडे कुठल्याही समस्यांचा राजकीय खेळ्यांकरिता वापर होतो. जगताना

अनुक्रमणिका

प्रत्येक पावलावर राजकारणाला सामोरे जावे लागते, तुम्हाला राजकीय भूमिका घ्यावी लागते, राजकारणविरहित काहीही असू शकत नाही, या व्लादिमीर लेनिन यांच्या वचनाची प्रचिती सतत येते. तसाच पर्यावरण समस्यांचा हत्यार म्हणून उपयोग केला जातो. समस्या दूर करण्याची राजकीय इच्छा क्वचित दिसते. पर्यावरण समस्यांचे राजकारण व्हावे आणि राजकारणाच्या पर्यावरणात बदल घडावा, अशी आकांक्षा बाळगून जगभरातील समस्त विवेकी कार्यरत आहेत.

**पर्यावरणवादाची वाट आणि चाल**

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील पर्यावरण चळवळीच्या खांद्याला खांदा लावून महाराष्ट्राने १९८० पर्यंत वाटचाल केली. त्यानंतर महाराष्ट्रातील स्वयंसेवी चळवळ क्षीण होत गेली. स्वयंसेवी संस्थांमुळे विकासाची काही बेटे तयार झाली. त्यांचा प्रसार करणाऱ्या व्यक्ती प्रामाणिक होत्या. त्यांची निष्ठा अविचल होती. त्यांच्या हेतुबद्दल शंका नव्हती. तरीही त्यांना नमुनेदार गावांचा प्रसार करता आला नाही हे वास्तव आहे. शासकीय असोत वा स्वयंसेवी संस्था त्यांची सर्व गावांमधील कामे सारखी नसतात. दाखवण्यासाठी कामे असतात; तशी लपवण्यासारखीही असतात. कामे दाखवताना प्रदर्शनीय ठिकाणांची निवड केली जाते अशा 'शो केसेस' सर्वत्र नसतात. यशामागील कष्ट सर्वांना समजले पाहिजेत. यशकथा सार्वत्रिक व्हाव्यात ही इच्छा जरूर असावी. त्या दृष्टीने प्रयत्नही करावेत परंतु दोन शेजारच्या गल्ल्यांमध्ये वा गावांमध्ये सारखेच यश का मिळत नाही याची कठोर चिकित्साही करावी तरच चुकांपासून काही शिकता येईल; पुढची वाट सुकर होईल.

मुंबई, पुणे, कोल्हापूर येथे निसर्ग जपण्यासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. कोल्हापूरची 'विज्ञान प्रबोधिनी' ही संस्था १९८२ पासून पर्यावरण जागृतीचे अष्टपैलू कार्य करीत आहे. कोल्हापूर जिल्हा म्हणजे साखर सम्राटांचा अभेद्य बुरूज! साखर कारखाने, चर्मोद्योग यांच्या सांडपाण्याने पंचगंगा व कृष्णा नद्या नासून गेल्या. शहरातील प्रसिद्ध रंकाळा तलाव गणेश विसर्जनाच्या निर्माल्याने खराब झाला. पर्यावरणाची नासाडी थांबवण्यासाठी उदय गायकवाड यांनी लोकांना पाण्याच्या विनाशाची किंमत आपण कशी मोजतो, हे समजावून सांगितले त्याचवेळी कायद्याची अमलबजावणी करण्यासाठी अधिकाऱ्यांवर दबाव आणून तलाव स्वच्छ केला व निर्माल्यासाठी स्वतंत्र तलाव तयार केला. पंचगंगा नद्याच्या प्रदूषणाची व्याप्ती व त्याचे परिणाम समजून सांगण्यासाठी १७४ ग्राम पंचायत, ३ नगरपरिषद व १ महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. कोल्हापूर परिसरातील बेकायदेशीर खाणकाम असो वा प्राण्यांची कत्तल 'विज्ञान प्रबोधिनी' चे कार्यकर्ते तातडीने हजर होतात आणि प्रश्न धसाला लावतात.

हळूहळू लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होत आहे. हवेचे प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, दूषित पाण्याचे आजार ह्या प्रश्नांवर लोकच खवळून उठतात. दूरचित्रवाहिन्या व वृत्तपत्रे याबाबत ठळकपणे बातम्या देतात. परंतु, गुन्हेगारांना शासन होण्याचे प्रमाण अत्यल्प वा नगण्य आहे. जागतिक पातळीवरील रेट्यामुळे पर्यावरण विषयक कायदे तयार केले गेले. पण अमलबजावणीच्या बाबतीत महाराष्ट्राची कामगिरी भूषणावह नाही.

अनुक्रमणिका

**पर्यावरणाचा अंत की सुसंस्कृतीचा उदय; निवड आपली**

ज्ञान आणि विज्ञानाचा आदर न करणारे राजकीय नेतृत्व काळाच्या कसोटीस कधीच उतरू शकत नाही.

'अवर कॉमन फ्युचर' या ग्रंथाचे लेखक ग्रो हार्लेम ब्रुंटलँड यांनी एकविसाव्या शतकातील पहिल्या दशकाने नैसर्गिक आपत्तींची व्याप्ती जगड्वाळ असल्याचा इशारा वारंवार दिला आहे. मेक्सिकोच्या खाडीमध्ये दहा किलोमीटर खोलवर गेलेल्या तेलवाहिनीचा स्फोट होतो. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उगमस्थान असल्याची शेखी मिरवणाऱ्या अमेरिकेला तब्बल एकशे दहा दिवस तेलाची गळती रोखता आली नाही. कोट्यावधी लिटर तेलाने समुद्र भरून गेला. सागरी जैवसंपदेची अपरिमित हानी झाली. याचा ताप जगाला सहन करावा लागणार आहे. आइसलँडच्या बेटावर ज्वालामुखी उसळला आणि जगाची हवाई वाहतूक ठप्प पडली. पर्यावरणीय आपत्तींचे स्वरूप असे जागतिकच आहे. आपण जगाशी 'असे' जोडले गेलो आहोत.

'आम्हाला काय त्याचे' ही वृत्तीच आपत्तीजनक आहे. आपल्याला नैसर्गिक व मानवनिर्मित दोन्ही प्रकारच्या आपत्ती पिडणार आहेत. हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्तींमध्ये भर पडत आहे. त्याचवेळी बेपर्वाईमुळे अनेक आपत्तींना आमंत्रण दिले जात आहे. केवळ स्वतःचा विचार करून, मन मानेल तसे वागणे ही संस्कृती नव्हे आणि 'अशी बेपर्वाई' जगाचा घात करीत आहे. कुठल्याही प्रकारची संकुचितता पर्यावरण संस्कृतीस मान्य नाही. विशाल दृष्टिकोन नसेल तर पर्यावरणाचा अंत अटळ आहे. "पर्यावरण न जपणारा समाज काळाच्या ओघात नाहीसा होतो, हा इतिहास आहे." असे 'कोलॅप्स-हाऊ सोसायटीज चूज टू फेल ऑर सर्व्हाइव्ह' या ग्रंथाचे लेखक जरॅड डायमंड यांनी बजावून ठेवले आहे.

कृतीतून प्राथमिकता दिली तरच पर्यावरण वाचवणे शक्य आहे. पर्यावरण जपणारी संस्कृती रुजवायची असेल तर मनोवृत्ती व जीवनशैली आमूलाग्र बदलावी लागेल. हेच 'इनकन्व्हिनियंट टूथ' अल गोर यांनी अमेरिकेला सांगितले आहे. भारतामध्ये पर्यावरणीय नियमांचे पालन कठोरपणे करणे निकडीचे आहे. जनमत (ओपिनियन) तयार करणाऱ्या वर्गाच्या वर्तनाकडे संपूर्ण समाज पाहत असतो. कायद्यासमोर सगळे समान आहेत याची ग्वाही मिळाली नाही, तर संपूर्ण समाज कायदे मोडायला कुचरत नाही. दरम्यान पर्यावरणाचा विनाश समस्त जनतेसाठी विध्वंसक ठरू शकतो.

एके काळी महाराष्ट्र व बंगाल संपूर्ण देशाचे बौद्धिक नेतृत्व करीत असत. राजकारण, सामाजिक सुधारणा, शिक्षण साहित्यच नाही, तर उद्योग, सिंचन, शेती, ऊर्जा अशा अनेक आघाड्यांवर महाराष्ट्राचे पाऊल पुढे असायचे. राज्यभर मूलभूत प्रश्नांवर, धोरणांवर वाद, चर्चा झडत असत. जगात घडणाऱ्या बदलाचे लोण महाराष्ट्रात लवकर पोहचत असे. प्रत्येक क्षेत्रात नवीन काहीतरी घडत असे. काळाच्या ओघात ते चैतन्याचे दिन निघून गेले. आता दिसते ती सार्वत्रिक सुस्ती आणि मांद्य! निष्क्रियतेच्या संसर्गजन्य रोगाने अवघा महाराष्ट्र निःप्राण झाला आहे. पिण्याचे पाणी, शौचालय, शिक्षण, वीज, आरोग्य या मूलभूत सोयीसुविधांची अवस्था दारुण आहे. पाणी नाही. जळण नाही, वीज, शाळा, दवाखाना व एस. टी असून नसल्यासारखे आहेत. आरोग्य, पाणी, वीज शिक्षण, वाहतूक या मूलभूत सोयी ही ग्रामीण भागातील जनतेची क्रूर चेष्टा आहे. कुठल्याच सुविधा गावात नाहीत. सारांश-महाराष्ट्रात पर्यावरणाची सामूहिक विटंबना चालू आहे.

अनुक्रमणिका

उशीर झाला असला तरीही अधिक कल्पक योजनांची अमलबजावणी करून महाराष्ट्र राज्याला सुवर्णमहोत्सवी वर्षात आघाडी घेता येणे शक्य आहे. काळाची पावले ओळखत महाराष्ट्र राज्याने पर्यावरण धोरण ठरवून अमलबजावणी केल्यास ते संपूर्ण देशाकरिता नमुनेदार ठरू शकते. पुन्हा एकदा भारताचे नेतृत्व करण्याची संधी चालून आली आहे. त्यामधील काही तरतुदी खालीलप्रमाणे असू शकतात.

(१) **कार्बन क्रेडिट.**— कर्ब उत्सर्जन कमी करण्यासाठी कार्बन क्रेडिटचे प्रोत्साहन दिले जाते. याचा फायदा (बहुतेक वेळा गैर) गरीब व श्रीमंत देशांमधील धनाढ्यांनी उचलला. **ग्रामपंचायतींना वृक्ष लागवडीकरिता कार्बन क्रेडिट मिळाले तर वनीकरणाला चालना मिळेल.** मराठवाड्यामध्ये वनाचे प्रमाण एक टक्क्याहून कमी आहे. पर्यावरणाच्या दारिद्र्यातून आर्थिकदारिद्र्य जन्माला येते. ते रोखण्यासाठी हे महत्त्वाचे पाऊल ठरेल.

(२) **निर्धूर चूल.**— भारतामधील चुलींमुळे प्रदूषण वाढत असल्याचा आरोप सातत्याने होत आहे. दरवर्षी चुलीच्या धुरामुळे पाच लाख महिला दगावतात. चूल मोडीत काढणारा गॅस घराघरात जावा, यासाठी निधीची मागणी भारताला करता येईल. त्यामुळे वृक्षतोडही आटोक्यात येऊ शकेल.

(३) **पर्जन्यरोपण.**— उपलब्ध ढगांमधून कार्यक्षम वापर करण्यासाठी आजमितीला ४७ राष्ट्रांमध्ये पर्जन्यरोपण नियमित केले जाते. दुष्काळावरील प्रतिबंधक उपाय म्हणून या तंत्राकडे पाहिले जात आहे. चीन, रशिया, जॉर्डन, इंडोनेशिया, अमेरिका कॅनडा, मेक्सिको, अरब राष्ट्रे, इस्त्रायल, दक्षिण आफ्रिका या देशात पाण्याच्या नियोजनासाठी पर्जन्यरोपण सर्रास केला जात आहे. चीनमध्ये गेल्यावर्षी तब्बल ५० अब्ज घनमीटर पाणी उपलब्ध करून घेतले गेले. गारपिटीची शक्यता जाणवताच चीनमधील हवामानशास्त्रज्ञ पर्जन्यरोपण करून गारांचा मारा टाळण्यात यशस्वी होत आहेत. आपत्ती व्यवस्थापनाकरिता कल्पकतेने पर्जन्यरोपणाचा वापर करण्याची इच्छा त्यांच्याकडे आहे. आपल्या शेजारच्या राज्यात आंध्रप्रदेशने गेल्यावर्षी पर्जन्यरोपणामुळे १० जिल्ह्यांत १८ दशलक्ष घनफूट पाणी मिळवले.

(४) **सलग समपातळीचर.**— मराठवाडाभर पाणलोट क्षेत्र विकासासाठी सलग समतलचर खणण्यात यावेत. त्याला सिमेंट लागत नाही. लोखंडाची गरज नाही. बांधकामाची गरज नाही. केवळ सलग समपातळीवर चर खणले, तर पन्नास ते साठ टक्के पाणी अडवून जिरवता येते. हे आता सर्व जलतज्ज्ञांनी मान्य केले आहे. सलग समपातळीचर हे पाणी व्यवस्थापनचे अतिशय सुलभ, सोपे, उत्तम व कार्यक्षम डिझाईन आहे. पुरस्कारांचा वर्षाव होणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातल्या हिवरे बाजार गावातील हिरवा चमत्कार सलग समपातळी चराचा आहे. या गावात २०० मिलीमीटर पाऊस झाला तरीही टँकरची गरज भासली नाही. याउलट सलग समपातळीतर नसलेल्या शेजारच्या गावात टँकरशिवाय एक दिवस भागत नाही.

(५) **हवामान व्यवस्थापक,**— आपल्याकडे ग्रामीण भागात हवामानाची नोंद ठेवण्याची यंत्रणाच अस्तित्वात नाही. तापमापक, पर्जन्यमापक धड नसतात. तापमान, पाऊस अंदाज पंचे ठरवला जातो. हवामान बदलाचे पुरावे सादरच करता आले नाही तर भरपाई मागणार कशी? **महिला बचत गटांना हवामानाचे व्यवस्थापक केल्यास त्या हवामानाची चोख नोंद ठेवू शकतील.**

अनुक्रमणिका

(६) **जलनीती.**— वीस लीटर शुद्धपाणी—नगरपरिषद व महानगरपालिकांनी पिण्याचे पाण्याकरिता मीटर लावावे आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा करावा. आंध्रप्रदेशाने राज्यभरातील खेडेगावांत दर माणसी १५ लीटर शुद्धपाणी देण्याची योजना जाहीर केली आहे.

(७) **स्वच्छ महाराष्ट्र.**— हागणदारीपासून मुक्ती – उघड्यावर पडलेला मानवी मळ पाण्याच्या स्त्रोतांमध्ये मिसळल्याने भूजलसुद्धा बिघडत चालले आहे. उघड्यावर शौचास बसू नये. हा संदेश राजकीय नेत्यांकडून जाणे गरजेचे आहे. स्वतःचे गाव हागणदारी मुक्त नसलेल्या नेत्यास विधानसभेचे तिकीट देऊ नये. शहरात व खेड्यात पर्यावरण स्नेही मुताऱ्या व शौचालयांची सोय करणे आवश्यक आहे.

(८) **कचऱ्यापासून संपत्ती व भंगारकोष.**— पुण्याच्या कचऱ्याची विल्हेवाट लावताना पालिकेच्या नाकातोंडात कचरा गेला. कचऱ्यापासून खत करून शेताला पुरवठा करता येणे शक्य आहे. गाव व शहर यांच्यात समन्वय घडवण्याचे काम कचरा करू शकतो. असे नमुनेदार पथदर्शी प्रकल्प घेणे गरजेचे आहे. प्रत्येक गावाच्या व शहराच्या आकारानुसार भंगार व टाकाऊ वस्तुंच्या पुनर्वापरास चालना देऊन कोष स्थापला जावा. कल्पक व संशोधकांना सवलती व बक्षीस दिले जावे.

(९) **शिवाराची शेती.**— व्यक्ती ऐवजी समुदाय एकवटला तर खर्च कमी होतो. परिणामकारकता वाढते हे लक्षात घेऊन कालव्याचे पाणी शेतीस देताना सहकारी संस्थांना प्राधान्य दिले जाते. मनुष्यबळ व इतर खर्च वाढल्याने शेती नेहमीच तोट्याची आहे. कधी कमी तर कधी अधिक तोटा एवढाच फरक. शेतीचा आकार कमी झाल्याचे शेतकरी दुष्परिणाम भोगत आहे. १००० एकर शिवाराच्या शेतीचे पथदर्शक प्रकल्प उभारणे निकडीचे आहे.

(१०) **खारफुटीची संरक्षक भिंत.**— “खारफुटी हीच सागरकिनारची संरक्षक भिंत आहे. तिचा विनाश हा सर्वनाश ठरू शकतो” हे शास्त्रज्ञ नेहमीच सांगत आले. कोकणच्या किनारपट्टीवर आपण अशी योजना करणे आवश्यक आहे.

२६ डिसेंबर २००४ च्या त्सुनामीच्या तडाख्यातून बोटावर मोजता येतील अशी काही गावे वाचली. तामिळनाडूमधील पिच्छावरम व मुथुपेठ या गावांमधील ३००० लोकांचा जीव व मालमत्ता खारफुटी (मँग्रोव्ह) वनस्पतींमुळे वाचली. बेभान लाटांबरोबर वाहून जाणारे जीव, खारफुटी झाडांच्या जाळीमुळे अडून राहिले. इतर गावांमध्ये समुद्र आणि जमिनीला विभागणारी (आणि सांधणारी) वृक्षराजी नव्हती. त्या ठिकाणी निसर्गापासून माणसांना कोणीही वाचवू शकले नाही. चेन्नईमधील एम. एस. स्वामिनाथन संशोधन संस्थेने खारफुटी बचाव योजना हाती घेतली होती. तुटून पडलेल्या खारफुटीच्या जागी नव्याने झाडे लावण्यात आली. त्यामुळेच गावच्या गाव निसर्गाच्या रौद्र तांडवातही तगून राहिली. वेळीच केलेल्या प्रतिबंधक उपायांमुळे तीन गावे विनाशापासून वाचवता आली. त्याच वेळी पाँडेचरी राज्यातले वीरमपट्टणम हे गाव ‘माहिती ग्राम’ (इन्फॉर्मेशन व्हिलेज) असल्याने ते जगाशी जोडले गेले आहे. सिंगापूरला त्सुनामीचा तडाखा आधी बसला त्यानंतर त्या लाटा भारताकडे धडकू लागल्या. मधल्या कालावधीत सिंगापूरच्या जागरुक तज्ज्ञांनी फोनवरून त्सुनामीची खबर भारताकडे पाठवली. एम. एस. स्वामिनाथन संशोधन संस्थेमुळे ही माहिती वीरमपट्टणम गावाला कळाली. तातडीने भोंगे लावून गावातील ३००० रहिवाशांना त्सुनामीचा इशारा दिला गेला. गावकरी घराबाहेर पडले. वीरमपट्टणमधील बळी टाळता आले.

अनुक्रमणिका

**(११) सार्वजनिक वाहने.**— रस्त्यांवरील वाहतूक व धूर कमी करण्यासाठी सर्व शहरात सार्वजनिक बस उपलब्ध करणे व दुचाकीकरिता (सायकल) खास रस्ता हे नगर पालिकांवर बंधनकारक असले पाहिजे. अन्यथा त्यांचे विकास निधी रोखावेत. वैयक्तिक वाहनांवर अधिक कर, वाहनतळांवर गाड्या थांबवण्यास अधिक रक्कम असे उपाय केल्यास वाहन चालक 'योग्य तो अर्थ' लावतील.

**(१२) बक्षीस व शिक्षा.**— पर्यावरण क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्यांना बक्षीस व चुकारांना शिक्षा करणे गरजेचे आहे. कल्पकतेला वाव दिला तर विद्यार्थीसुद्धा नवोन्मेषी योजना घेऊन सहभागी होतील. ख्यातनाम व्यक्तींवर पुरस्कारांचा वर्षाव करण्यापेक्षा त्याच प्रकारच्या कार्यात नवीन पिढी येण्यास गती दिली जावी. त्याकरिता तीच रक्कम तरुणांना पाठ्यवृत्ती (फेलोशिप) म्हणून देण्यात यावी.

अनुक्रमणिका

# ददद्व
# न्याय



**डॉ. अशोक चौसाळकर**

हे राज्यशास्त्राचे नामवंत अभ्यासक असून वेगवेगळ्या विषयावर त्यांचे इंग्रजी व मराठीमधून सुमारे १० ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्यामध्ये नवरात्र, न्याय आणि धर्म, आगरकरांचे राजकीय विचार, राज्यसंस्था व क्रांती आणि मार्क्सवाद व उत्तर मार्क्सवाद या ग्रंथाचा समावेश होतो. डॉ. चौसाळकर शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पुस्तकांना अनेक पारितोषिके मिळाली आहेत.

**पत्ता : डिपार्टमेंट ऑफ पॉलिटीकल सायन्स, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४.**
**भ्रमणध्वनी : ९४२११७२८६८**

**गे**ल्या दीडशे वर्षांत महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात तत्त्वचिंतन झाले आहे आणि त्यादृष्टीने आधुनिक भारतीय तत्त्वविचारांस महाराष्ट्राने मोठेच योगदान दिले आहे. न्या. रानडे, म. फुले, आगरकर आणि लोकमान्य टिळक यांनी केलेली तत्त्वज्ञानाची मांडणी आपल्या देशाच्या वैचारिक जडणघडणीत महत्त्वाची ठरली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ही परंपरा कायम राहिली डॉ. आंबेडकर, आचार्य विनोबा भावे, आचार्य शं. द. जावडेकर, स्वातंत्र्यवीर सावरकर व श्रीपाद अमृत डांगे यांनी विविध तत्त्वज्ञानांची समर्थपणे मांडणी केली. या विचारवंतांनीपण भारतीय विचारांच्या विकासात महत्त्वाचे योगदान केले. प्रस्तुत निबंधात इ. स. १९६० ते २०१० या काळात महाराष्ट्रात कशाप्रकारे तत्त्वमंथन आणि तत्त्वचिंतन झाले याचा परामर्श घ्यावयाचा आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने वर्ष १९६० महत्त्वाचे आहे कारण १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे स्वतःचे असे राज्य स्थापन झाले आणि मराठीला राज्यभाषेचा दर्जा मिळाला.

गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात तत्त्वमंथन झाले आणि वेगवेगळ्या तत्त्वविचारांचा येथे खल झाला. या तत्त्वचिंतनास योगदान करणारे विचारवंत हे मुख्यतः तीन प्रवाहांतून आले होते. त्यातील पहिला प्रवाह हा राजकीय नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा होता. त्यांच्या दृष्टीने राजकारण महत्त्वाचे होते आणि राजकारणास पूरक म्हणून ते आपले विचार मांडीत होते. डॉ. आंबेडकर, सावरकर, डांगे आणि विनोबा हे पहिल्या दर्जाचे देशातील मोठे राजकीय नेतेपण होते. या तत्त्वविचारांत महत्त्वाची भर घालणारा दुसरा विचारप्रवाह विविध सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा होता. १९८० नंतर महाराष्ट्रात ज्या नव्या सामाजिक चळवळी उदयास आल्या त्या सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनीपण तत्त्वचिंतनात मोठी भर घातली आहे. त्यात शरद जोशी, शरद पाटील, मेधा पाटकर, वसंत पळशीकर आणि इतर अनेक कार्यकर्त्यांचा समावेश होतो. तिसरा प्रवाह हा प्रत्यक्ष तत्त्वज्ञानाचा

अनुक्रमणिका

रीतसर अभ्यास करणाऱ्या तत्त्वज्ञांचा. यामध्ये मुख्यतः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. दि. के. बेडेकर, प्रा. दि. य. देशपांडे आणि प्रा. मे. पुं. रेगे यांचा समावेश होतो. या तिन्ही विचारप्रवाहांचा या निबंधात थोडक्यात परिचय करून दिला आहे. या लेखात मराठी विचारवंतांच्या मराठी भाषेत लिहिलेल्या लिखाणाचाच उपयोग केला आहे.

**पूर्व परंपरा** - महाराष्ट्राची तत्त्वविचारांच्या चिंतनाची पूर्वपरंपरा मोठी आहे. त्याची सुरुवात थेट तेराव्या शतकात ज्ञानेश्वर व चक्रधरांपासून होते. उत्तर व दक्षिण भारतात तत्त्वज्ञानविषयक निरनिराळ्या चळवळींचा प्रभाव आत्मसात करून स्वतःचे असे तत्त्वज्ञान मांडण्याचा महाराष्ट्रातील विचारवंतांचा प्रयत्न होता आणि ज्ञानेश्वर व चक्रधर त्यास अपवाद नव्हते. स्वतंत्र विचार मांडण्याची ही परंपरा पुढेही अव्याहत चालू राहिली. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वेळी प्रा. गं. बा. सरदार व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'महाराष्ट्र-जीवन-परंपरा, प्रगती व समस्या' या नावाचा द्विखंडात्मक ग्रंथ संपादित केला होता. या ग्रंथाच्या पहिल्या खंडात महाराष्ट्रातील तत्त्वमीमांसेच्या इतिहासाची आणि स्वरूपाची चर्चा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि प्रा. दि. के. बेडेकर यांनी केली. तत्त्वमीमांसा म्हणजे काय याचे विवेचन करताना प्रा. बेडेकर असे मत व्यक्त करतात, की तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात दोन विषय महत्त्वाचे आहेत; ते म्हणजे मनुष्याच्या भोवतालच्या विश्वाचे स्वरूप व त्यात मानवाचे स्थान आणि मनुष्यजीवनाचे अंतिम साध्य व त्याची साधने. मानवी जीवनात अनेक कल्पना प्रसृत होतात व त्याची अनेक रूपे देशकालानुसार निर्माण होतात. तत्त्वमीमांसा या सर्व विचारांना सामावून घेणारी असते आणि म्हणून तिचा परीघ व्यापक व सर्व मानवी विचारांना सामावणारा असतो. [सरदार, गं. बा. (सं) **महाराष्ट्र - जीवन - परंपरा प्रगति आणि समस्या, खंड-१,** प्रा. दि. के. बेडेकर तत्त्वमीमांसा प्रयोजन व व्याप्ती पृ. १०८, २०५ जोशी आणि लोखंडे कं, पुणे १९६०.] १९६० पर्यंत महाराष्ट्रात जी तत्त्वमीमांसा झाली त्याचे सम्यक असे विवेचन बेडेकरांनी व तर्कतीर्थांनी केले.

एकोणिसाव्या शतकात लोकहितवादी, फुले, रानडे, चिपळूणकर व आगरकर यांनी अत्यंत गांभीर्याने राज्य, समाज आणि व्यक्ती यांच्या संबंधात आपले विचार मांडले. ही परंपरा लो. टिळक, गोखले व इतरांनी १९२० पर्यंत चालू ठेवली. १९२० नंतर देशाच्या राजकारणात दोन विचारप्रवाह निर्माण झाले. त्यातील पहिला विचार प्रवाह म. गांधी यांच्या तत्त्वज्ञानाचा होता तर दुसरा विचारप्रवाह मार्क्सच्या समाजवादाचा होता. विसाव्या शतकातील राजकारण या दोन विचारवंतांच्या विचारांभोवती फिरत राहिले. पण त्याचबरोबर त्यांना प्रतिवाद करणारे दोन विचारप्रवाहपण निर्माण झाले. म. गांधी व काँग्रेसच्या सामाजिक व धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा प्रतिवाद करणारा हिंदुत्ववादी विचार महाराष्ट्रात विकसित झाला. त्याचप्रमाणे या राष्ट्रवादी विचारात जातिनिर्मूलनाच्या विचारांचा समावेश नाही. त्यामुळे समता व सामाजिक न्याय यांचा विचार करता, त्यात उणेपणा आहे अशी मांडणी ब्राह्मणेतर व त्यांच्या नेत्यांनी व नंतर डॉ. आंबेडकर यांनी केली. भारतीय लोकशाही जास्त व्यापक अशा सामाजिक आधारावर उभी राहिली पाहिजे असे त्यांचे मत होते. १९६० साली ज्यावेळी सं. महाराष्ट्राची स्थापना झाली त्यावेळी वरील चार विचारप्रवाह महाराष्ट्रात प्रभावी ठरले होते. त्या दृष्टिकोनातून तत्त्वचर्चा त्याकाळात केल्या जात होत्या.

राजकारण, राजकीय चळवळी आणि त्यामागे असणाऱ्या विचारसरणी तत्त्वचर्चेचा व तत्त्वचिंतनाचा भाग असतो. पण त्याच्या पाठीमागे खोल असा तत्त्वविचारांचा संकल्पना समूह असतो ज्यामध्ये विचारसरणीच्या पाठीमागे असणाऱ्या तत्त्वांचा ऊहापोह असतो, त्याचप्रमाणे तत्त्वज्ञानांतील विविध समस्यांचा खल करण्यात आलेला असतो. त्यात ज्ञानमीमांसा, सहस्तूमीमांसा, नीतिमीमांसा,

अनुक्रमणिका

सौंदर्यमीमांसा आणि धर्म. यांच्याबाबतची चर्चा केली जाते. भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानात याबाबत चर्चा झाली आहे व महाराष्ट्रातील विचारवंतांनी सातत्याने त्याबाबत योगदान दिलेले आहे. त्याचीही चर्चा प्रस्तुत लेखात केलेली आहे. या चर्चेत १९४०-८१९६० या काळात झालेल्या अभ्यासाचे सूत्रपण लक्षात घेतले आहे. कारण राजकीय विचारांच्या दृष्टीने हा कालखंड अत्यंत सर्जनशील असा कालखंड होता. डॉ. आंबेडकर, सावरकर, आचार्य विनोबा भावे, कॉ. डांगे, आचार्य जावडेकर, आचार्य दादा धर्माधिकारी इत्यादी विचारवंतांनी त्यांचे प्रमुख ग्रंथ याच काळात लिहिले होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे महत्त्वाचे ग्रंथ व प्रा. बेडेकर यांचे सुरुवातीचे लिखाण याच काळात झाले. १९५०-६० या दशकात संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी मोठे रणकंदन झाले. संयुक्त महाराष्ट्राचे तत्त्ववैचारिक आधार स्पष्ट करून सांगणारे लेखन त्या काळात डॉ. धनंजयराव गाडगीळ, लालजी पेंडसे व प्रा. बेडेकर यांनी केले. [गाडगीळ, ध. रा. भारत व महाराष्ट्र उक्त पृ. १-४८.] लेनिनच्या राष्ट्रकांच्या सिद्धांताच्या आधारे लिहिलेले प्रा. दि. के. बेडेकर यांचे 'संयुक्त महाराष्ट्र' हे पुस्तक उल्लेखनीय होते. त्यात मराठी भाषिकांच्या सांस्कृतिक स्वातंत्र्यासाठी व लोकशाही स्वराज्यासाठी भारतीय संघराज्यात सं. महाराष्ट्र स्थापन करणे कसे महत्त्वाचे आहे याचे विवेचन करण्यात आले होते. [बेडेकर, दि. के. **संयुक्त महाराष्ट्र** चित्रशाळा, पुणे १९४७] डॉ. गाडगीळांनी भारतीय राष्ट्र व महाराष्ट्राचे घटक राज्य यांच्यातील द्वंद्वविकासात्मक तात्त्विक संबंधांचे विवेचन समर्थपणे केले होते. १९६० नंतर शेकडो वर्षांनंतर प्रथमच एकत्र आलेल्या मराठी भाषिक लोकांच्या समस्यांबद्दल, ध्येयधोरणाबाबत व भवितव्याबद्दल मराठी विचारवंतांनी चिंतन केले. या चिंतनाचे स्वरूप केवळ मराठी भाषिकांपुरते मर्यादित राहत नाही तर त्याचे स्वरूप वैश्विक बनते. कारण अंतिमतः विचारवंत विशिष्ट लोकांच्या प्रश्नाबाबत चर्चा करीत असताना संपूर्ण मानव जातीचे प्रश्न आकळत असतो. प्रा. बेडेकर ज्यावेळी धर्मश्रद्धेच्या समस्येची चर्चा करतात त्यावेळी सर्व मानव जातीला व्याकूळ करणाऱ्या प्रश्नाचा ते ऊहापोह करीत असतात.

आपण प्रथम तत्त्वज्ञानाचा रीतसर अभ्यास करणाऱ्या तत्त्वज्ञांचे तत्त्वचिंतन त्यानंतर वेगवेगळे राजकीय विचार मांडणाऱ्या विचारवंतांच्या विचारांचे चिंतन व शेवटी विविध सामाजिक चळवळीच्या नेत्यांनी केलेले तत्त्वचिंतन यांचा अभ्यास करणार आहोत.

## महाराष्ट्रातील विद्यापीठे व तत्त्वज्ञान

महाराष्ट्रात तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची परंपरा जुनी होती आणि अंमळनेर येथे प्रताप तत्त्वज्ञान मंदिराने त्याची दमदार सुरुवात केली. मुंबई विद्यापीठात तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारा स्वतंत्र विभाग नव्हता पण विद्यापीठाच्या स्कूल ऑफ सोशल आणि इकॉनॉमिक स्टडीज मध्ये राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारे काही प्रबंध लिहिण्यात आले. [विभागात प्रा. प्रतापगिरी, प्रा. अंजरिया, प्रा. घीवाला, प्रा. नाईक यांच्यासारख्या अभ्यासकांनी प्राचीन भारतीय राजकीय तत्त्वज्ञान व त्याचे सद्यकालीन औचित्य यांची चर्चा केली.] पण स्वातंत्र्यानंतरच्या काळात परिस्थिती बदलली. १९४९ साली पुणे विद्यापीठ स्थापन झाले. काही वर्षांत तेथे तत्त्वज्ञान विभाग सुरू झाला. विविध महाविद्यालयांतून तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारे त्याविषयाचे अध्यापन करणारे होतकरू प्राध्यापक कार्यरत झाले. नंतर तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारी चार पीठे महाराष्ट्रात निर्माण झाली. त्यातील पहिले पीठ हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व त्यांच्या रॉयवादी मित्रांनी आपलेसे केलेले प्राज्ञपाठशाळा, वाई हे होते. प्राज्ञ पाठशाळा 'नवभारत' नावाचे मासिक चालवते. प्रा. वि. म. बेडेकर, प्रा. गोवर्धन पारिख व प्रा. मे. पुं. रेगे या समर्थ विचारवंतांनी या मासिकाचे संपादन केले. नारायणशास्त्री मराठे यांनी प्राज्ञपाठशाळेची स्थापना केली व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्यास आधुनिक रूप दिले. [रेगे, मे. पुं. (सं) **प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा,** प्राज्ञपाठशाळा, वाई १९९८.] महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनावर 'नवभारत'चा

अनुक्रमणिका

मोठा पगडा होता. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचे दुसरे पीठ विदर्भात प्रा. दि. य. देशपांडे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्थापन केले. विश्लेषक तत्त्वज्ञानाचा अभ्यास तेथे झाला आणि देशपांडे यांनी 'आजचा सुधारक' नावाचे तत्त्वचर्चेस वाहिलेले असे मासिक इ. स. १९९० साली सुरू केले. तिसरे पीठ पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागात डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी स्थापन केले. या विभागाने 'परामर्श' नावाचे दर्जेदार त्रैमासिक अनेक वर्षे समर्थपणे चालवले. या विभागात भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा खोल असा अभ्यास करण्यात आला. चौथे पीठ १९८४ साली स्थापन झालेल्या 'महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे'. या परिषदेमार्फत वेगवेगळ्या महाविद्यालयात विद्यापीठात कार्यरत असणारे प्राध्यापक एकत्र आले. त्यात प्रा. शि. स. अंतरकर, प्रा. जोशी, प्रा. श्रीनिवास दीक्षित, प्रा. प्रदीप गोखले आणि इतर अनेकांचा समावेश होतो. लातूर येथून प्रा. नागोराव कुंभार यांनी 'विचारशलाका' नावाचे तत्त्वज्ञान व इतर विषयांना वाहिलेले त्रैमासिक १९९० पासून सुरू केले. परिषदेत सादर करण्यात आलेले निबंध परामर्श आणि 'विचारशलाका'त प्रकाशित करण्यात येतात. या चार पीठांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यामध्ये व त्याबाबतचे साहित्य प्रकाशित करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच महाराष्ट्रातील तत्त्वविचार सकस मराठी भाषेमध्ये मराठी जिज्ञासूंपर्यंत पोहोचवला. या अभ्यासकांनी महत्त्वाच्या पाश्चिमात्य तत्त्वज्ञांच्या पुस्तकांचे मराठीत भाषांतर केले. प्रा. रेगे, प्रा. दि. य. देशपांडे, कविमंडन, प्रा. रा. भा. पाटणकर यांचा त्यात समावेश होतो. काही अभ्यासकांनी परिचयपर ग्रंथ लिहिले. त्यात रेगे, देशपांडे, पाटणकर, मुरलीधर पवार, बेडेकर यांचा समावेश होतो. अनेकांनी भाष्य म्हणून व टीकाग्रंथ म्हणून स्वतंत्र ग्रंथ लिहिले त्यातून त्यांचे मूलभूत चिंतन व्यक्त झाले. रेगे, बारलिंगे, बेडेकर आणि पळशीकर यांच्या पुस्तकांचा व लेखांचा यात आपणास समावेश करता येईल.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे योगदान**

आधुनिक महाराष्ट्राच्या तत्त्ववैचारिक जडणघडणीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे योगदान अनन्य साधारण असे आहे. हे योगदान वैचारिक व संस्थात्मक योगदान आहे. स्वतः शास्त्रीजी संस्कृत विद्या, दर्शनशास्त्रे व धर्मशास्त्र भारतातील पारंपरिक पद्धतीने शिकले. ही पद्धत अत्यंत चोख होती. त्यानंतर त्यांनी एम. एन. रॉय यांच्याशी संबंध आल्यानंतर, पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा व सामाजिक शास्त्रांचा अभ्यास केला आणि प्राज्ञ पाठशाळेच्या कार्यात या दोन्ही विचार परंपरांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. ऐतिहासिक दृष्टिकोनातून धर्मकोशाची रचना करण्याचे काम प्राज्ञ पाठशाळेने केले. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर मराठी विश्वकोश मंडळाचे व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे ते अध्यक्ष झाले आणि या दोन्ही संस्थांच्या उभारणीत त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले.

आपल्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथात शास्त्रीजींनी भारतीय संस्कृतीच्या विकासाचा सम्यक असा आढावा घेतला व आजच्या संदर्भात तिचे काय महत्त्व आहे याचे प्रतिपादन केले. त्यामुळे गीतारहस्य, आधुनिक भारत वगैरे मूलगामी विचार मांडणाऱ्या ग्रंथांबरोबर त्याचा समावेश करावा लागतो. सुरुवातीस त्यांनी स्वतःस हिंदूधर्मशास्त्रांच्या प्रभावापासून मुक्त केले आणि ते एम. एन. रॉय यांच्या प्रभावाखाली आले. रॉय यांच्या प्रभावामुळेच ते मार्क्सवादाकडे आकर्षित झाले आणि त्यांनी विज्ञानाचा पुरस्कार केला. रॉय यांच्याबरोबर ते रॅडिकल डेमॉक्रसीचे व नवमानवतावादाचे पुरस्कर्ते झाले. बुद्धिविवेक आणि स्वातंत्र्य याबाबत नवमानवतावादाने धरलेला आग्रह त्यांना भावला पण नंतरच्या त्यांच्या भूमिका जास्त परिपक्व आणि उदार झाल्या. भारतीय परंपरेतील उदार व सर्वसमावेशक बाजू त्यांनी जगासमोर मांडली. त्यांनी आपले कार्य मुख्यतः तीन पातळ्यांवर केले :—

अनुक्रमणिका

(१) प्राज्ञपाठशाळेचा उद्देश प्राचीन नैतिक आदर्श, विवेक व विज्ञान निष्ठा याचा समन्वय करून भारतीयत्वास नवे जीवन देणे हा होता. भारतीय तत्त्वविचारांचा उद्देश पुरुषार्थांची प्राप्ती करणे हा आहे. त्याची सम्यक मीमांसा त्यांनी केली. भारतीयतेच्या पक्क्या पायावर, तज्ज्ञ व आत्मविश्वासाने भारलेला समाज त्यांना निर्माण करायचा होता.

(२) मानवी समाजाच्या धारणेत मानवाची नैतिक संवेदनशीलता महत्त्वाची असते. ही नैतिक संवेदनशीलता त्यांनी ज्याप्रमाणे भारतीय तत्त्वज्ञानातून आत्मसात केला त्याचप्रमाणे त्यांनी ती राममोहन रॉय, विवेकानंद, टिळक रॉय आणि गांधी यांच्या विचारांतून प्राप्त केली. या विचारवंतांच्या प्रभावामुळे त्यांचा धर्माविषयीचा दृष्टिकोन बदलला. धर्माने नैतिक संवेदनशीलता प्राप्त होते आणि मूल्यविवेक निर्माण होतो ही गोष्ट त्यांनी मान्य केली पण धर्माचे स्वरूप हे लौकिक प्रमाणवादी आहे व सर्व धर्म व धर्मग्रंथ हे मानवनिर्मित आहेत ही भूमिका त्यांनी सोडली नाही. [अंतरकर शि. सं., तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री प्रतित जडवादाधिष्ठित धर्मविचार पृ. ६६-७७ **विचारशलाका** खंड १५ अंक ५-४-५५ मार्च, २००१.].

(३) त्यांना पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे यांच्या अभ्यासाचा खोल ठसा त्यांच्या मनावर पडला. उद्याच्या समाजरचना याच शास्त्रांच्या आधारावर उभ्या राहणार आहेत असे त्यांचे मत होते. बौद्ध तत्त्वज्ञ नागार्जुन म्हणतो त्याप्रमाणे या सामाजिक विज्ञानाच्या ज्या दृष्टी आहेत त्या दृष्टीतून जावे, त्या जवळ ठेवाव्या पण नागार्जुन सांगतो त्याप्रमाणे त्या सोडून देऊ नयेत तर त्या जवळ ठेवून अनुभवाने पुढे जावे असे तर्कतीर्थांचे मत होते. त्यांनी लोकशाही, मानवतावद व विश्वबंधुत्व यांचा पुरस्कार केला पण या सर्वांचा गाभा नैतिक मूल्ये असली पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. [रेगे मे. पुं., तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी १-१४, नवभारत खंड ४९ अंक ४-६ मार्च, १९९६.] थोडक्यात सांगायचे झाले तर लक्ष्मणशास्त्रीजींनी भारतीय परंपरा व आधुनिक तत्त्वज्ञान यांच्यातील सेतू म्हणून काम केले आणि मराठी समाजाला आधुनिक दृष्टिकोन प्रदान केला. 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथानंतर त्या तोडीची ग्रंथरचना शास्त्रीजींकडून झाली नाही पण फुटकळ स्वरूपात त्यांनी लिखाण केले. भारतीय संस्कृतीतून प्राप्त झालेला मूल्यविवेक, नैतिक संवेदनशीलता त्यांना बौद्धतत्त्वज्ञानाकडे घेऊन गेली. म्हणून सर्वाभूती समत्व धारण करणारा आत्मौपम्याचे महत्त्व जाणणारा, अहिंसा, सत्य व अस्तेय यांचा आग्रह धरणारा व वैचारिक क्षेत्रांत इतरांवर जोरजबरदस्ती न करणारा उन्नत धर्म विकसित झाला तर त्यांना तो हवाच होता.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे तत्त्वविचारात जुन्या व नव्या परंपरांना जोडण्याचे काम करीत होते. याच काळात तत्त्वमीमांसेच्या क्षेत्रात प्रा. दि. के. बेडेकर, प्रा. दि. य. देशपांडे, प्रा. सुरेंद्र बारलिंगे व प्रा. मे. पुं. रेगे यांनी मोलाची भूमिका बजावली. याकाळात पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा प्रभाव वाढीस लागला होता आणि मार्क्सबरोबरच रसेल विश्लेषक तत्त्वज्ञानाचा व तार्किक प्रत्यक्षार्हवादाचा पुरस्कार करणारे विचारवंत यांचा प्रभाव वाढला होता. तत्त्वज्ञान आधुनिक झाले होते व परंपरेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन विकसित केला गेला होता. या सर्व नव्या विचारांचा प्रभाव महाराष्ट्रातील विचारवंतांवर पडला.

अनुक्रमणिका

**दि. के. बेडेकर.**— प्रा. दि. के. बेडेकर यांचे लिखाण १९४० च्या दशकात सुरू झाले. शेवटपर्यंत तत्त्वचिंतनात ते मग्न होते. म. गांधींच्या तत्त्वज्ञानावरचा त्यांचा ग्रंथ ते पूर्ण करू शकले नाहीत. प्रा. बेडेकर यांच्या वैचारिक जडणघडणीत मार्क्सचा मोठी प्रभाव होता आणि तो शेवटपर्यंत कायम राहिला. सुरुवातीच्या काळात त्यांच्या लिखाणात आक्रमक आग्रहीपणा होता. त्यांना वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास केला व त्या विषयांना मूलगामी असे योगदान दिले. १९६० नंतर त्यांनी केलेल्या लिखाणात मुख्यतः तीन वैशिष्ट्ये आपणास दिसून येतात.

(१) प्रा. बेडेकर हे मार्क्सवादाचे श्रेष्ठ असे भाष्यकार होते आणि त्यात होणाऱ्या नव्या बदलांची ते आवर्जून नोंद घेत असत. 'मार्क्सची समाज परिवर्तनाची कल्पना' या विषयावर त्यांनी समाज प्रबोधन पत्रिकेत दोन लेख लिहिले.

(२) प्रा. बेडेकरांनी आधुनिक महाराष्ट्रातील धर्मविचारांचा खोल असा अभ्यास केला. न्या. रानडे, म. फुले, आगरकर व लोकमान्य टिळक यांच्या धर्मविषयक विचारांचा त्यांनी परामर्श घेतला. म. गांधींच्या विचारांवर रानडे यांचा कसा प्रभाव पडला याचे त्यांनी विवेचन केले. या विषयास प्रा. बेडेकरांचे मोठे योगदान म्हणजे त्यांनी धर्मश्रद्धेच्या संकल्पनेची केलेली मांडणी हे होय.

(३) थोर जर्मन विचारवंत व तत्त्वज्ञ हेगेल यांच्या तत्त्वज्ञानाचा परिचय करून देणारे पुस्तक त्यांनी लिहिले. या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात बेडेकरांनी हेगेलचे तत्त्वज्ञान व भारतीय तत्त्वज्ञान यांच्यातील साम्य व भेद दाखवले.

मार्क्सवरील आपल्या लेखात प्रा. बेडेकरांनी नवमार्क्सवाद्यांनी केलेले योगदान लक्षात घेतले. मार्क्सच्या सुरुवातीच्या लिखाणात परात्मभावाची कन्पना मांडण्यात आली होती त्याचा त्यांनी आधार घेतला. त्यांच्या मते आजचे मानवी जीवन परात्मतेने ग्रासलेले आहे. कारण माणूस आपले स्वत्व विसरून मिथ्य अशा परात्मतेला शरण जातो. तो आपल्या जीवनाला पारखा होतो. देवदानवांना निर्माण करून त्यांना शरण जाणारा माणूस त्याच किमयेने संपत्तीच्या स्वनिर्मित अमानुष बाह्यशक्तींना शरण जातो. भयभीत होतो. आज व्यक्तीव्यक्तिंनी बनलेली सर्व मानव जातच मीपणा, स्वत्व आणि मानुषता हरवून बसली आहे. या परात्मभावाचा निरास करण्याचे तत्त्वज्ञान मार्क्सने मांडले. भय, लोभ व वैर यांनी ग्रस्त झालेल्या केवळ कामगारांनीच नवेह, तर सर्वच माणसांनी या शृंखला तोडायच्या आहेत. ते लिहितात, मार्क्सचा दृष्टिकोन परात्मतेचा निरास करणे व मानुषता परत आणणे हा आहे. नुसती सत्ता संपादन करून कोणताही एक वर्ग किंवा व्यक्तिसमूह मानवी मताचे आमूलाग्र परिवर्तन करू शकत नाही. किंबहुना ती परिवर्तनाचे हे ध्येय समोर न ठेवलेली राज्यक्रांती ठरते. सामाजिक क्रांती ठरत नाही. माणसाला जर मनुष्यत्व प्राप्त करून घेण्यासाठी सामाजिक क्रांती करावयाची असेल, तर माणसामाणसातील परस्पर प्रेम, समूहभावना यांना डावलून अमानुष क्रौर्याने व साहसाने क्रांतीचा मार्ग अनुसरता येत नाही. मार्क्सने हिंसेला वा अहिंसेला सर्जनशील मानले नाही. हिंसेने व बळाने नवनिर्मिती होत नाही. त्याच्या मते हिंसा व सत्ता या माणसाच्या खऱ्या प्रेरणा नाहीत; त्या अमानुष असून त्यांचा निरास करूनच माणसाला स्वत्व व खरी माणुसकी प्राप्त होईल. माणसाची परात्मतेतून सुटका होईल. [बेडेकर दि. के. **समाजचिंतन** पॉप्युलर मुंबई १९६९ पृ. ३५ व ३७].

अनुक्रमणिका

महाराष्ट्रातील धर्मचिंतनाचा बेडेकरांनी खोल असा आढावा घेतला. रानडे यांच्या धर्मविषयक चिंतनातील विशाल आशय व आगरकरांच्या तत्त्वज्ञानातील जीवितत्वाची कल्पना यांचे मनोरम विश्लेषण त्यांनी केले. टिळकांच्या राजकीय विचारात सत्ता समतोलाचे तत्त्व प्रधान होते असे अचूक आकलन त्यांनी केले होते. [बेडेकर दि. के. **संयुक्त महाराष्ट्र** आणि **धर्मचिंतन** समाज प्रबोधन संस्था, पुणे.] प्रा. बेडेकरांचे या विषयाला खरे योगदान त्यांचे 'धर्मश्रद्धा-एक-पुनर्विचार' हे पुस्तक आहे. या पुस्तकात त्यांनी आधुनिक जीवनात धर्मप्राय श्रद्धेचा पुनर्लाभ होणे कसे आवश्यक आहे याचे विवेचन केले. त्यांच्या मते प्राचीन समाजात यातु प्रधान धर्माचा उदय झाला. त्यानंतर एकेश्वरी धर्माचा विकास झाला. पण आधुनिक काळात विज्ञान व तत्त्वज्ञान यांच्या प्रभावामुळे एकेश्वरी धर्माचा अस्त झाला. धर्माच्या अस्ताबरोबर धर्मश्रद्धेचापण अस्त झाला व मानवी जीवनात पोकळी निर्माण झाली. मानवी जीवनातील ही पोकळी दूर करण्यासाठी धर्मश्रद्धेचा पुनर्लाभ होणे गरजेचे आहे. त्यांच्या मते हा पुनर्लाभ धर्मश्रद्धा वा राष्ट्रवाद यांच्या द्वारे होणार नाही. मानव जातीची समूहता, एकात्मता जर साध्य करावयाची असेल तर नव्या श्रद्धेच्या साह्याने ती प्राप्त होऊ शकेल. त्यास ते धर्मप्राय श्रद्धा म्हणतात. ती विज्ञान व कला यांनी निर्मिलेल्या मानुष विश्वातील माणसांना अशी ग्वाही देऊ शकते, की हे मानुष विश्व मानवी जीवनाला व सर्जनाला अर्थवत्ता देऊ शकते. विज्ञानाची जिज्ञासू वृत्ती व कलेची सहृदयता त्यात अपेक्षित आहे, नव्या संदर्भात विज्ञान, कला, मानवी समूहाच्या एकात्मतेची जाणीव आणि विराट विश्व व मानुष विश्व यांनी साधणारी मानवी कर्तृत्वशक्ती धर्मप्राय श्रद्धेचा आपणास पुनर्लाभ करून देईल असा विश्वास त्यांना वाटत होता. [बेडेकर दि. के. **धर्मश्रद्धा एक पुनर्विचार** प्राज्ञपाठशाळा, वाई १९९५].

प्रा. बेडेकर यांनी हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा परिचय करून देणारे पुस्तक लिहिले; त्यासाठी त्यांना स्वतःची अशी परिभाषा तयार करावी लागली. त्यांच्या मते हेगेलच्या तत्त्वमीमांसेचा व्यूह प्रचंड असून त्यात सर्व मानवी चिंतन सामावलेले आहे. हेगेलचे विश्व ही एक श्रेयगर्भ विराट रचना असून जड व चेतन अशा वस्तुजाताच्या विश्वाची श्रेयसाधना चालू आहे. मानवाच्या प्रज्ञेने, अत्यंत प्रयत्नाने व दीर्घकाळानंतर विश्वाचे स्वरूप ओळखले, त्यास स्वसंवेदना व स्वत्त्व लाभ झाला. यात मानवाचे गौरवपूर्ण आत्ममूल्यन आहे तसेच विश्वविकासाच्या विराट घडामोडीत ते साधनरूप व अंशरूप असा घटक आहे. [बेडेकर दि. के. हेगेल - **जीवन व तत्त्वज्ञान** पुणे विद्यापीठ १९६६, पृ. १५-१६.] बेडेकरांच्या विवेचनाचे वैशिष्ट्य असे की, त्यांनी त्याच्या तत्त्वज्ञानाची भारतीय तत्त्वज्ञानाशी सातत्याने तुलना केली. त्यांच्या मते या दोन्ही तत्त्वपरंपरेत काही साम्य आहे, तर काही भेद आहेत. भारतीय परंपरा ज्ञानाचा उद्देश बंधनातून मुक्त अशी मोक्षप्राप्ती करणे मानते. हेगेलच्या मते स्वातंत्र्य प्राप्त करणे हे मानवी प्रज्ञेचे अंतिम ध्येय आहे. ते विश्वाला सामोरे जाऊन, मानवाने युगानुयुगाच्या ज्ञानपरिश्रमाने सर्वांसाठी मिळवलेले स्वातंत्र्य आहे. [उक्त, पृ. १७-१८] त्याच्या इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचेपण प्रा. बेडेकरांनी परिशीलन केले. बेडेकरांनी हे पुस्तक लिहिल्यानंतर पश्चिमेकडे मोठ्या प्रमाणात हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास झाला कारण मार्क्स समजावून घ्यावयाचा असेल तर हेगल समजावून घेतला पाहिजे, याची अभ्यासकांना जाणीव झाली. पण मराठीत मात्र हा विषय फारसा पुढे गेला नाही. त्याचप्रमाणे हेगेल व भारतीय आदर्शवाद यांचाही योग्य अशा प्रकारे तुलनात्मक अभ्यास झाला नाही. पण हेगेलच्या विराट तत्त्वज्ञानाची चांगली ओळख करून देण्याचे श्रेय बेडेकरांना जाते.

**दि. य. देशपांडे.**— प्रा. दि. य. देशपांडे यांनी महाराष्ट्रात तत्त्वज्ञानाच्या अभ्यासास प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्यांनी मराठी भाषेत तत्त्वज्ञान समजावून सांगण्यासाठी काही महत्त्वाच्या पुस्तकांची भाषांतरे केली, परिचयात्मक पुस्तके लिहिली व आपणास प्रिय असणाऱ्या विवेकवादाचे मंडन करण्यासाठी १९९० पासून 'आजचा सुधारक' हे मासिकपण सुरू केले. देकार्त बर्कले व मूर यांच्या ग्रंथांची चोख अशी भाषांतरे त्यांनी केली. त्यानंतर त्यांनी अनुभववाद, प्रज्ञावाद व विवेकवाद यांचा परिचय करून देणारी पुस्तके

लिहिली. देशपांडे त्या काळात पाश्चात्त्य देशात प्रभावी असणाऱ्या विश्लेषक तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या मते तत्त्वज्ञानाचा अभ्यास हा सत्याचा शोध घेण्याचा खटाटोप असतो. विज्ञान प्रायोगिक पद्धतीने सत्याचा शोध घेतच असते. तर्काची त्यास जोड दिली जाते. तत्त्वज्ञानाचे कार्य विश्लेषण करणे हे आहे व विश्लेषण हे भाषिक तार्किक आणि वैचारिक स्वरूपाचे असते. त्यांच्या मते भाषिक विश्लेषण सत्यशोधनाच्या कामी उपयोगी पडणारे अंग आहे. दि. य. देशपांडे यांनी केलेली प्रमुख पाश्चात्त्य तत्त्वज्ञांच्या पुस्तकांची भाषांतरे चोख, नेमकी, सुलभ आणि अर्थवाही आहेत. त्यास त्यांनी जोडलेल्या प्रस्तावना विचारप्रवर्तक आहेत. [कुलकर्णी प्र. ब. प्रा. दि. य. देशपांडे यांचे मराठीतील तत्त्वचिंतन पृ. १३८-१४८ **परामर्श** खंड २८, अंक १ मे-जुलै २००६.] दि. य. देशपांडे यांनी आपल्या नीतिविचारांनी नव्याने मांडणी केली. त्यांनी आपल्या मांडणीत कांट व मिल यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला. त्यात प्रत्यक्ष कर्तव्ये पार पाडीत असताना त्यामागचा नैतिक हेतू व त्यातून साध्य होणारे परिणाम यांचापण विचार करावा लागतो. म्हणून नीती म्हणजे कर्तव्यबुद्धीने व सदिच्छेने प्रेरित व ज्याचे परिणाम समाजहितास पोषक आहेत असे आचरण. त्यांच्या मते नीती, सद्‌गुण व चारित्र्य हे परमोच्च स्वतोमूल्य आहे. दि. य. देशपांडेंची नीतिमीमांसा कोणते प्रश्न उपस्थित करते याचे विवेचन प्रा. शि. स. अंतरकर यांनी केले आहे. [अंतरकर शि. सं., देशपांडे प्रमित विवेकवादाचे स्वरूप पृ. ८१-९९, **परामर्श खंड** १५ अंक १ मे १९९३ पाहा परामर्श खंड २७, अंक ४ एप्रिल, २००४.] जवळजवळ ५० वर्षे प्रा. दि. य. देशपांडे यांनी विवेकवादाचा पुरस्कर केला आणि मराठी वाचकांसाठी अत्यंत सकस असे तत्त्वज्ञानपर साहित्य निर्माण केले. त्यांच्यामुळे तत्त्वचिंतनाला वरची पातळी प्राप्त झाली.

**प्रा. सुरेंद्र बारलिंगे.**— प्रा. सुरेंद्र बारलिंगे यांनी पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागात प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून काम केले आणि तत्त्वज्ञानाच्या अभ्यासास नवी दिशा दिली, नवा संस्थात्मक आशय दिला. या गोष्टी प्रा. रेगे, बेडेकर किंवा देशपांडे करू शकले नाहीत कारण त्यांना संस्थात्मक व इतर सुविधा पुरविणाऱ्या विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागाचा आधार नव्हता. स्वतः बारलिंगे पौर्वात्य व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानांचे अभ्यासक होते. त्यांनी पुणे विद्यापीठात तत्त्वज्ञानाच्या या दोन्ही पद्धतींचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन दिले. भारतीय तत्त्वज्ञानाचा नीट अभ्यास व्हावा, भारतीय दर्शनांची मांडणी विद्यार्थ्यांसमोर व्यवस्थित व्हावी म्हणून त्यांनी दर्शनाचे पारंपरिक ज्ञान असणाऱ्या पंडितांना शिकवण्यासाठी पाचारण केले. त्यांनी संशोधनास मोठी चालना दिली व त्यामुळे पुणे विद्यापीठात विद्यापीठ अनुदान मंडळाने प्रगत अभ्यास केंद्राची स्थापना केली. त्यांनी मराठी व हिंदी भाषेमध्ये 'परामर्श' नावाचे दर्जेदार त्रैमासिक सुरू केले. मराठीत तत्त्वज्ञानाचे गंभीर चिंतन प्रकाशित करणारे केवळ तत्त्वज्ञानाचा अभ्यास या विषयाला वाहिलेले हे त्रैमासिक आहे.

डॉ. बारलिंगे यांचा भारतीय आणि पाश्चात्त्य परंपरांचा अभ्यास होता व त्यांचा दृष्टिकोन स्थूलमानाने विश्लेषणवादी होता. तत्त्वज्ञ मांडीत असलेल्या संकल्पनांच्या अर्थाचे विश्लेषण करून तात्त्विक समस्यांचे निराकरण करता येते अशी भूमिका त्यामागे होती. या काळातील भारतीय तत्त्वज्ञानावर मूर, रसेल व विश्लेषक तत्त्वज्ञानाच्या मांडणीचा प्रभाव होता. [देशपांडे शरद जौडपादाचार्यांचे तत्त्वज्ञान - नवे आकलन नवे प्रश्न पृ. १४९-१५३, **परामर्श** खंड २०, अंक ३-४, नोव्हें. ९८-९९.] बारलिंगे यांचे मुख्य योगदान असे, की त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास केवळ प्राच्यविद्यावादाच्या दृष्टिकोनातून केला नाही. त्यांतील संकल्पनांचे विश्लेषण करावे. अभ्यासाचे स्वरूप केवळ ऐतिहासिक आढावा घेणारे असू नये असे त्यांना वाटत होते. भारतीय चिंतन परंपरेत ज्या संकल्पनांचा, तत्त्वांचा व उपपत्तींचा ऊहापोह केला जातो त्याची नव्या युरोपीय विचारांच्या धाटणीत मांडणी करणे, त्याची पुनर्बांधणी करणे त्यांना अपेक्षित होते एका अर्थाने तत्त्वज्ञान हे माणसाचा

अनुक्रमणिका

इतिहास व त्याच्या संप्रेषण व्यवहाराची समीक्षा करणारे शास्त्र होय असे त्यांचे मत होते. मानवी सृजनशीलता त्यांच्या अभ्यासाचा विषय होता. [भेलके सुभाषचंद्र, डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांचे चिंतनविश्व पृ. ६९-८४ उक्त]

प्राचीन विचारसरणीचा अभ्यास करीत असताना त्यांच्या आशयास धक्का न लावता तो आधुनिक परिभाषेत व्यक्त झाला पाहिजे असे त्यांचे मत होते त्यादृष्टीने भारतीय तर्कशास्त्राची फेरमांडणी करणारा त्यांचा ग्रंथ महत्त्वाचा ठरला. मुळात जिवंत व समृद्ध असलेल्या पण परंपरागत चौकटीत अडकून पडलेल्या भारतीय तर्कशास्त्राची मांडणी व चिकित्सा आधुनिक दृष्टिकोनातून करण्याचा व भारतीय तर्कशास्त्राला एकूण तर्कशास्त्रविषयक चर्चेच्या व्यापक प्रवाहात आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. [बारलिंगे सुरेंद्र व पांडे क्रांतिप्रभा, भारतीय तर्कशास्त्राची रूपरेषा, **परामर्श** प्रकाशन, पुणे १९८५ उपोद्‍गात पाहावा.].

**प्रा. मे. पुं. रेगे.**— प्रा. मेघश्याम पुंडलिक रेगे यांनी मराठी तत्त्वविचारास समृद्ध करण्यासाठी मोठे प्रयत्न केले. ते जवळजवळ वीस-बावीस वर्षे वाईच्या ‘नवभारत’ या मासिकाचे संपादक होते. रेगे यांनी आपल्या कार्याचे प्राधान्यक्रम ठरवले होते. त्यातील पहिले कार्य मराठी वाचकांना भाषांतराद्वारे पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातील मूलगामी संकल्पनांचा परिचय करून देणे हे होते. प्रा. दि. य. देशपांडे यांच्याप्रमाणेच रेगे यांनी हे कार्य सातत्याने केले. त्यांची सर्वच भाषांतरे चोख आणि उत्तम मराठी गद्यात लिहिलेली होती. दुसरे कार्य महत्त्वाच्या संकल्पनांचा व विचार प्रवाहांचा परिचय करून देण्याचे होते. मॅकन्टायरच्या नीतिशास्त्रावरील ग्रंथाचा अत्यंत सुगम असा परिचय त्यांनी करून दिला. तिसरे कार्य म्हणजे त्यांनी स्वतः अभ्यास करून संशोधनपर व नवी मीमांसा करणारे लेखन केले. विवेक व न्याय या ग्रंथातील लेखात त्यांनी रानडे, आगरकर आणि म. फुले यांच्या तत्त्वज्ञानांची खोल अशी समीक्षा केली [प्रा. रेगे यांची महत्त्वाची पुस्तके खालीलप्रमाणे :—

(१) **पाश्चात्त्य नीतिशास्त्राचा इतिहास** समाज प्रबोधन संस्था, पुणे
(२) विवेक व न्याय प्रतिमा प्रकाशन, पुणे २००१
(३) **स्वातंत्र्य समता व न्याय** मौज प्रकाशन २००४
(४) **इहवाद व सर्वधर्मसमभाव** प्राज्ञपाठशाळा वाई १९९८
(५) **विवेकवाद विज्ञान व श्रद्धा** लोकवाङ्‍मय, मुंबई २००८, देव सुनीती प्रा. मे. पुं. रेगे यांचे तत्त्वज्ञान, सुनीती देव, नागपूर २००० चौसाळकर प्र नवहिंदुत्ववाद **परामर्श** १९८६.] त्यांनी अनेक उद्‍बोधक अशा प्रस्तावना लिहिल्या. रसेल यांच्या पुस्तकाचे भाषांतर करून त्यांनी त्यास लिहिलेली शंभरपेक्षा जास्त पानांची प्रस्तावना नवा दृष्टिकोन प्रदान करते. त्याचप्रमाणे प्रा. रेगे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या ‘वैदिक संस्कृतीचा विकास’ या ग्रंथास लिहिलेली प्रस्तावना विचारप्रवर्तक होती. श्री. मुरलीधर पवार यांच्या ‘मार्क्सचा मानववादी विचार’ या पुस्तकास त्यांनी जी प्रस्तावना लिहिली त्यात मार्क्सपूर्व तत्त्वज्ञानाचा उचित असा आढावा घेतला होता.

सुरुवातीच्या काळात प्रा. रेगे यांच्यावर पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातील वेगवेगळ्या प्रवाहांचा प्रभाव पडला. त्यात रसेलचा प्रभाव काही प्रमाणात दिसतो. नंतर ते असे लिहितात, की ‘ज्ञानशास्त्र व सद्‍वास्तुशास्त्र यात मी कांटवादी होतो व नीतिशास्त्राच्या बाबतीत कांटच्या मूळवादी होतो.’ कांटच्या तत्त्वज्ञानातील नीतिविचार व उदारमतवाद त्यांना आकर्षित करणारा ठरला. त्याकाळात रॉयवादी विचारवंतांत त्यांची उठबस होती. तर्कतीर्थ, वि. म. बेडेकर, गोवर्धन पारिख, प्रा. अ. भि. शहा यांच्या समवेत त्यांनी काम केले. ते धर्मनिरपेक्षतेचे व इहवादाचे पुरस्कर्ते होते. पण नंतरच्या काळात त्यांच्या काही लेखांमुळे ते नवहिंदुत्ववादाचा पुरस्कार करतात असा आक्षेप घेण्यात आला. प्रा. रेगे यांचा पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा चोख असा अभ्यास होता. त्यांच्या मते ग्रीकांच्या काळापासून पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचे स्वरूप गणिती राहिले व त्यात गणिताचा नेमकेपणा होता. निगामी गणितावर केंद्रित झालेल्या अनेक संकल्पना

अनुक्रमणिका

ग्रीकांच्या व नंतरच्या आधुनिक तत्त्वज्ञानात विकसित झाल्या. प्राचीन ग्रीक व आधुनिक पाश्चिमात्य तत्त्वज्ञान यात भेद असला तरी त्यात एक प्रकारचे सातत्य आहे. पण भारतीय दर्शने व आधुनिक तत्त्वज्ञान यात सातत्य नाही. कारण दर्शनात शास्त्रांचे वर्गीकरण मानवकेंद्रित आहे व त्याचा संबंध पुरुषार्थ प्राप्तीशी जोडलेला आहे. भारतात शास्त्रांची वस्तुनिष्ठ व्यवस्था लावण्यात आली नाही आणि स्वतंत्र नागरिकत्वाची कल्पना येथे विकसित झाली नाही.

प्रा. रेगे असे मत मांडतात, की भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानात भेद आहेत व भारतीय दर्शनांचे स्वतःचे असे संकल्पन आहे. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानास पूर्वपक्ष मानून भारतीय तत्त्वज्ञानाची मांडणी व्हावी असे त्यांचे मत होते. आज आपण विज्ञान युगात व सामाजिक परिवर्तनाच्या काळात जगत आहोत पण मानवी संस्कृती विज्ञानाहून व सामाजिक परिवर्तनाच्या कार्यक्रमापेक्षा जास्त प्राचीन आहे व तत्त्वज्ञानही प्राचीन आहे. आपणास विज्ञान आणि परिवर्तनाची आकांक्षा यांची दखल घ्यावी लागते पण तत्त्वज्ञान या गोष्टीपुरते मर्यादित नाही. [रेगे मे. पुं. भारतीय तत्त्वज्ञानाची समकालीन प्रस्तुतता पृ. १-६ **नवभारत** खंड ४९, अंक ९-१० जुलै, १९९६.]

शेवटच्या काळात प्रा. रेगे सर्व प्रकारच्या चौकटी दूर सारत नवे नैतिक प्रश्न समजावून घेण्याचा, मानवी मनात असणाऱ्या नैतिक प्रेरणा जाणून घेण्याचा प्रयत्न करीत होते. या दृष्टिकोनातून त्यांनी धर्म व श्रद्धा या संकल्पनांचा विचार केला, त्यामागे असणाऱ्या प्रगल्भ नैतिक धारणा सहानुभूतीपूर्वक समजावून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते कालानुभवाची जशी स्वायत्त अशी भाषा असते तशी ती धार्मिक श्रद्धेची पण असते. विज्ञानाजवळ माणसाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे नाहीत. धर्मश्रद्धेतून निर्माण होणाऱ्या नैतिक प्रेरणा व त्यामुळे त्या व्यक्तीने केलेले समाजहितपर नैतिक वर्तन त्याज्य मानता येत नाही. [रेगे मे. पुं. तत्त्वज्ञानातील माझी वाटचाल पृ. २५-२६ बदललेला काळ, संस्कृतीची मानवीयता आणि जीवन मूल्ये पृ. ३७-४४ **नवभारत** खंड ५५, अंक ५-७, एप्रिल, २००१.]

प्रा. मे. पुं. रेगे यांच्या लिखाणाचा पट मोठा होता आणि प्रत्येक विषयाबाबतची त्यांची जाण खोल अशी होती. तत्त्वज्ञानाबरोबर आधुनिक सामाजिक शास्त्रांचा त्यांचा उत्तम असा व्यासंग होता. आपल्या विस्तृत व बहुविध लिखाणातून प्रा. रेगे यांनी उपस्थित केलेले प्रश्न समजावून घ्यावयास व त्यांची योग्य अशी उत्तरे शोधावयास मराठी तत्त्वज्ञांना अनेक वर्षे काम करावे लागणार आहे एवढे प्रा. रेगे यांचे योगदान मूलगामी आहे.

या चार तत्त्वज्ञांच्या तोडीचे तत्त्वज्ञानातील विविध विषयांवर गंभीरपणे लिखाण करून स्वतःचे योगदान करणारे अनेक तत्त्वज्ञ महाराष्ट्रात झाले. त्यात प्रा. शि. सं. अंतरकर, प्रा. श्री. ह. दीक्षित, प्रा. श्री. व्यं. बोकील, भा. ज. कविमंडन, प्रदीप गोखले, सुनीती देव, जावडेकर, पार्पळकर, प्रा. सदानंद मोरे यांचा समावेश होतो. सर्वांनी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत चांगल्याप्रकारे लिखाण केले.

**महाराष्ट्रातील धर्मचिकित्सा**

१९६० नंतर महाराष्ट्रात धर्मविचारांवर खोलवर अशी चर्चा झाली. या चर्चेस न्या. रानडे, फुले, आगरकर, टिळक, म. शिंदे आणि डॉ. आंबेडकर यांच्या धर्मचिंतनाची पार्श्वभूमी होती. विद्वत्‌रत्न के. ल. दफ्तरी यांनी धर्ममीमांसा करून त्यांतील महत्त्वाचे प्रश्न चर्चेमध्ये आणले. दफ्तरी यांच्यानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या विविध ग्रंथांतून धर्मचिकित्सा केली. नंतरच्या काळात लक्ष्मणशास्त्रींनी धर्माच्या नैतिक आशयाकडे सर्वांचे लक्ष वेधले. प्रा. दि. के. बेडेकर यांनी आपल्या धर्मश्रद्धेवरील ग्रंथात

अनुक्रमणिका

धर्मप्राय श्रद्धेचा पुनर्लाभ होणे का गरजेचे आहे याचे विवेचन केले. प्रा. मे. पुं. रेगे यांना धर्मश्रद्धेच्या पाठीमागे उभा असणारा नैतिक व्यूह महत्त्वाचा वाटला.

महाराष्ट्रात धर्मचर्चा अनेक अंगांनी झाली. त्यात इरावती कर्वे यांनी 'धर्म' या निबंधात केलेले विवेचन महत्त्वाचे होते. [कर्वे इरावती **धर्म** देशमुख प्रकाशन, पुणे १९७७] श्रीमती दुर्गा भागवत, डॉ. स. रा. गाडगीळ, डॉ. गं. बा. सरदार, डॉ. सदानंद मोरे, प्रा. शि. स. अंतरकर, डॉ. रावसाहेब कसबे व उमेश बगाडे यांनी केलेले धर्मविषयक लिखाण उल्लेखनीय आहे. [गाडगीळ स. रा. **मध्ययुगीन धर्मसाधना व मराठी संत** सरदार गं. बा. **संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती,** तगारे ग. वा. **अमृतानुभव मिरज,** २००५.] मध्ययुगीन धर्मसाधनेस महाराष्ट्रातील भागवतधर्मीय संतांनी कसे समाजसतर्क बनवले याचे उद्‌बोधक असे विवेचन प्रा. सरदार, डॉ. स. रा. गाडगीळ आणि डॉ. ग. वा. तगारे यांनी केले. धर्म व लोकसंग्रह यातील संबंध गाडगिळांनी समजावून सांगितला.

## महाभारतावरील तत्त्वचिंतन

महाराष्ट्रात महाभारताचा अभ्यास मोठ्या प्रमाणात झाला. महाराष्ट्रातच भांडारकर प्राच्य विद्यासंस्थेने महाभारताची चिकित्सक आवृत्ती तयार केली. डॉ. सुखटणकर, बेलवलकर, उटगीकर, दांडेकर, मेहेंदळे आणि चिंतामणराव वैद्य यांनी महाभारताचा खोल अभ्यास केला. महाराष्ट्रातील तीन विदुषींना महाभारतावर स्वतंत्र ग्रंथ लिहून नव्या वीचारमंथनास सुरुवात केली. आजच्या संदर्भात महाभारत आपण कसे समजावून घेतले पाहिजे हे सांगण्यावर त्यांचा भर होता.

डॉ. इरावती कर्वे ह्या थोर समाजशास्त्रज्ञ आणि मराठी भाषेतील सिद्धहस्त लेखिका. त्यांनी महाभारतावर 'युगांत' हा ग्रंथ लिहिला. त्यात त्यांनी महाभारताने उपस्थित केलेल्या सामाजिक व नैतिक प्रश्नांची चर्चा केली. त्यांच्या मते महाभारतात एका युगाचा अंत वर्णन केला आहे. त्यात मानवी जीवन हे किती गुंतागुंतीचे व व्यामिश्र आहे हे दाखवून दिले आहे. कृष्ण वासुदेवाच्या कथेत ही खोल अशी गुंतागुंत आपल्या लक्षात येते. गीतेत त्याने युद्धाच्या प्रसंगी क्षत्रियाने कसे वागावे याचे विवेचन केले. त्यातून त्याने निष्काम कर्मयोगाची कल्पना मांडली. पण अर्जुनाने कृष्णाचा उपदेश पाळला नाही. त्याला या युद्धात ज्यांना ठार मारायचे नव्हते त्यांना त्याने ठार मारले नाही. गीतेत कृष्ण मित्रास समजावून सांगत आहे. त्याच्या भक्तास समजावून सांगत नाही! महाभारतात धर्मचर्चा खूप झाली पण त्याबाबत एकमत झाले नाही. डॉ. कर्वे यांच्या मते जगात जे काही निर्माण झाले ते नष्ट होणार आहे हे सर्वजण सांगतात पण जे काही नष्ट झाले आहे ते पुन्हा जन्मास आले पाहिजे असे कृष्णाने व बुद्धाने सांगितले. त्यात महापुरुषांची पूजा नाही. शरण या असे सांगणारी भक्ती नाही. त्यात रसरशीत असा वास्तववाद आहे. वीरपुरुषांचे स्खलन आहे व जीवन जगताना त्यांनी अनुभवलेले वैफल्य आहे. कृष्णाच्या मते मानवी समाज व मानवी मूल्ये यांनी प्रामाण्य आहे. मात्र ते क्षुद्र स्वार्थ साधण्याची साधने बनता उपयोगाचे नाही. कृष्णाने ज्या अनासक्तीचा उपयोग केला तिचा संबंध आधुनिक साहित्यात वर्णन केलेल्या 'आऊटसाईडर'शी येत नाही. कृष्ण सांगतो, की कोणतीही घटना घडत असताना त्या घटनेचे निव्वळ साक्षीदार बनून राहणे शक्य नसते. त्यापेक्षा संपूर्ण आत्मज्ञान प्राप्त करून व आपल्या कर्मांचे परिणाम काय असणार आहेत हे जाणून घेऊन कृती करणे जास्त स्वीकारार्ह आहे [कर्वे इ. **युगांत** देशमुख प्रकाशन, पुणे, १९६६ पृ. २२९-२३२] डॉ. कर्वे यांच्या मते कृष्णाने अर्जुनापुढे असणाऱ्या दुविधेचे या पद्धतीने निराकरण केले.

अनुक्रमणिका

दुर्गा भागवत यांनी आपल्या ‘व्यासपर्व’ या ग्रंथात व्यासाने रंगवलेल्या रुद्रभीषण नाट्याचे विवेचन केले. अनुपम गद्यशैली, त्यातील असाधारण अर्थवत्ता व अल्पाक्षर ही या ग्रंथाची वैशिष्ट्ये, त्यांच्या मते व्यासाच्या कृतीत अकृत्रिम जीवनच शैली बनते. जीवनाच्या अंतिम उद्दिष्टाचे भान कधीच विकृत होत नाही. जीवनाच्या सर्व अवस्थांना त्याने समरूप बनवले आहे. जीवनाचे अंतिम उद्दिष्ट समरूपतेच्या साधनेत दाखवत असताना त्याने हे दाखवले, की थोरांचे थोरपण त्यांच्या सत्तेत नसते, ते त्यांच्या सत्याच्या साधनेत असते. कालाच्या सर्व थरांतून मानवामानवातून वाहणारी माणुसकीची संतत धार जिथे खुंटते, तेथे व्यासाचा कलानिष्ठ क्रोध दुःखावेगाने उसळून उठतो. त्यांच्या मते एकलव्याची कथा आता एकलव्याची वा द्रोणाची राहिली नाही तर ती बुद्धिवंतांच्या आकांक्षांची भीतीदायक शोककथा बनली आहे. व्यवसायी समर्थांच्या हाती बळ गेले आणि बुद्धी व कौशल्य यांचे नियोजन द्रोणाने एकलव्याचा अंगठा कापून केले. द्रोणाला भीती पुन्हा दारिद्र्य घेण्याची होती. तो शूर योद्धा होता पण त्याला भीतीवर विजय मिळवता आला नाही. त्या लिहितात, “विद्यावंतांची बधिरता हा संस्कृतीला लागलेला मोठा शाप आहे. बुद्धिवंतांची संवेदनशीलता करवंडली, की मग पाशवी बलाचाच आग्रह अनावर होतो. स्वतःची कीव करीत भले भले बसतात. मग चळवळे व दुय्यम दर्जाचे लोक सामर्थ्याची सर्व क्षेत्रे काबीज करतात.” [भागवत दुर्गा **व्यासपर्व** मौज, मुंबई १९६९, पृ. ३१-३३] समाजात जोपर्यंत कमअस्सल ईर्ष्येने पेटलेले बुद्धिवंत आहेत तोपर्यंत ही ठिणगी पेटतच राहणार आहे असे त्यांचे मत होते.

दुर्गाबाईंनी कर्णाची व्यक्तिरेखा रंगवत असताना अनेक महत्त्वांचे मुद्दे मांडले. कर्णाच्या मनात खोल अशी उदात्त व उदार भावना वसत होती पण त्यांचे संस्कार त्यास मिळाले नाहीत. भीष्माच्या तोंडातून ‘तू क्षत्रिय नाहीस म्हणून अर्धरथी आहेस’ ही सनातन जातीय गतानुगतिकता बोलत असताना त्याने त्यास प्रखरतेने पण संयमाने उत्तर दिले. त्याचे दुर्दैवी शोकात्म व्यक्तिमत्त्व सर्व महाभारतास व्यापून राहते. कारण शेवटी तो सर्वांच्या वेदनेचे, अभिमानाचे पराक्रमाचे व नेकीचे प्रतीक आहे.

भागवतांच्या मते धर्मराज हा जनक व बुद्ध यांच्यातील दुवा आहे. त्याला त्यांनी मुक्तपथिक म्हटले. आपल्या भावांच्या मनात फिरून चैतन्य ओतून त्यात पूर्णता आणण्याचा त्याचा प्रयत्न होता. त्या अपूर्णतेची जाण प्रगल्भ व धारदार होती. त्यास पूर्णतेची आस होती. आदर्शाला तो पूजत राहिला. पण आदर्शाचे त्याने जड दैवत बनवले नाही. करडा संयम, अनिवार हळुवारपणा, जागृतीचे व्यवस्थित भान व अजोड स्वप्नाळू वृत्ती यांचा संगम त्याच्या व्यक्तिमत्त्वात होता. त्याचा धर्म म्हणजे उच्चतर नीतिमत्ता होती. दैनंदिन जीवनातील व विशिष्ट प्रसंगातील माणसाचे वागणे हाच तत्त्वज्ञानाचा मूलाधार आहे हे त्याने जाणले होते. त्याने मोक्षाचा ध्यास घेतला नाही. त्याने ध्यास घेतला तो स्वकीयांना धर्ममार्गाने जाऊन सुखी कसे करता येईल याचा. मानवप्रणीत सनातन सदाचारावर त्याचा विश्वास होता. आचारमय नीती त्याचा गुरू विदुर ह्यास ब्रह्मज्ञानापेक्षा जास्त महत्त्वाची वाटत होती. सदाचारावर त्याची श्रद्धा होती, त्यासंदर्भात भागवत लिहितात, की मानवाचे मूळ माणूस व ध्येय माणूस हे विदुराच्या जीवनाचे सार होते. [उक्त पृ. ११८]

महाभारतावरचे तिसरे पुस्तक ख्यातनाम गांधीवादी विचारवंत प्रेमाताई कंटक यांनी लिहिले. ‘महाभारत-मुक्त चिंतन’ या ग्रंथात त्यांनी महाभारतात निर्माण झालेल्या वैचारिक द्वंद्वाचा खोल असा आढावा घेतला. त्यांच्या मते महाभारत काळात समाजाला मार्ग दाखवण्याचे जे काम कृष्णाने केले तेच आज म. गांधी करीत आहेत. त्यांनी धर्मपुरुषार्थाचे स्वरूप समजावून सांगितले. मानवी जीवनास आसक्ती व स्वार्थ यामुळे अन्याय व हिंसा व्यापून टाकते. त्यावेळी संघर्ष करावा लागतो. या काळात भावशुद्धी महत्त्वाची असते. कारण आपण जर आपली कर्तव्ये विपरीत बुद्धीने केली तर ती पापमय होतात.

महाभारतात युधिष्ठिर हा धर्माचा पुरस्कर्ता होता. त्याला सत्य हाच परमधर्म वाटत होता. प्रेमाबाईंना त्याच्यापुढे राहिलेले प्रश्न समजले होते. त्या लिहितात, 'युद्ध भयानक असते, निर्घृण असते. भौतिक नाशापेक्षा युद्धातून होणारा नीतिनाश जास्त भयानक असतो.' हे मान्य करूनही म्हणावेसे वाटते, की युद्धापेक्षा युद्धास कारण ठरणारे अन्याय हेच प्रामुख्याने पापमूलक, भयावह व समाजाचा नीतिनाश करतात. युद्ध हे व्यक्त रूप आहे. अन्याय पुष्कळदा अव्यक्त रूपात असतात. विषमता तर त्याहून अव्यक्त असते. दुर्योधनास व कर्णास मरणाच्यावेळी धर्म सुचला. पण मानवता धर्म महत्त्वाचा आहे. कारण मानव समाज करून राहिल्यानंतर त्यात धर्म आवश्यक ठरतो. त्यांच्या मते ज्यावेळी समाजात दैवी व आसुरी संपत्तीच्या माणसाशी संघर्ष करावयाचा असतो, तो कोणत्या प्रकारे करायचा हा मुद्दा असतो. महाभारतात युद्धिष्ठिरापुढे हाच मुद्दा होता. हे कर्म स्थितप्रज्ञ बुद्धीने करावे असे गीतेचे सांगणे होते. पण गीतेत व महाभारतात हिंसाहिंसेचा सूक्ष्म विचार नाही. पण आता तो करावा लागणार आहे. स्थितप्रज्ञाने आसुरी संपत्तीच्या माणसाशी कसे वागायचे याची मांडणी गीतेत नाही; हे प्रश्न प्रत्येकास आपल्या कुवतीप्रमाणे व बुद्धीप्रमाणे हाताळावे लागतात. [कंटक प्रेमा **महाभारत एक सुक्त चिंतनमहाभारत एक सुक्त चिंतन** महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर १९६०, पृ. १९७.]

प्रेमाबाईंच्या मते आसुरी संपत्तीच्या लोकांशी संघर्ष करताना हिंसेचा वापर केला तर त्यात आसुरी संपत्तीच्या लोकांजवळ असणाऱ्या दैवी संपत्तीचा नाश होतो, कारण कोणतीच व्यक्ती पूर्णपणे आसुरी नसते. थोर महात्म्यांनी आजन्म जनतेच्या उद्धारासाठी प्रयत्न केले, त्यांनी व्यक्तीची पातळी उंचावली पण ते समाजाची पातळी उंचावू शकले नाहीत. त्यामुळे ज्यावेळी व्यक्तीस आत्मसंयम करणे अवघड जाते तेथे संपूर्ण समाजाकडून तशी अपेक्षा करणे अशक्य असते. येशू ख्रिस्त व महात्मा गांधी यांच्या हे लक्षात आले होते म्हणून त्या दोघांचेही असे मत होते, की संपूर्ण समाजात हे बदल घडवून आणण्यासाठी क्षमा व तितिक्षा यांची गरज असते. हे दोन गुण अंगी बाणवून व्यवहार व्हावयास खूप वेळ लागणार आहे. [उक्त पृ. २११-२१५.]

डॉ. कर्वे, दुर्गा भागवत आणि प्रेमा कंटक यांनी महाभारतातील तत्त्वचिंतनाच्या वेगवेगळ्या बाजू आपणापुढे मांडल्या.

### विचारसरणींचा प्रभाव

१९२० ते १९६० या काळात महाराष्ट्रात थोर नेते व विचारवंत झाले आणि त्यांच्या विचारांचा प्रभाव सर्व भारतावर पडला. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आचार्य विनोबा भावे, स्वातंत्र्यवीर सावरकर, कॉ. श्री. अ. डांगे, कॉ. बी. टी. रणदिवे, आचार्य जावडेकर यांच्यासारख्या अव्वल दर्जाच्या विचारवंतांचा समावेश होतो. १९५० नंतरपण या विचारवंतांनी आपले विचार मांडले आणि १९६० नंतरच्या सामाजिक व राजकीय जीवनावर त्यांच्या विचारांचा प्रभाव कायम राहिला. त्यातील काही विचारांचा नंतरच्या काळात विकास करण्यात आला. या विचारसरणीत गांधीवाद, मार्क्सवाद व लोकशाही समाजवाद, फुले-आंबेडकरवाद, हिंदुत्ववाद आणि धर्म निरपेक्ष राष्ट्रवाद यांचा समावेश होतो.

### महाराष्ट्रातील गांधीवादी विचार

महाराष्ट्रात गांधीजींच्या विचारांचा विकास गांधीवाद्यांच्या दोन परंपरांनी केला. त्यामधील एक परंपरा सर्वोदयवाद्यांची होती तर दुसरी परंपरा लोकशाही समाजवाद्यांची होती. १९८० नंतर पुन्हा एकदा गांधीविचारांची नव्याने मांडणी करावयास सुरुवात झाली.

अनुक्रमणिका

म. गांधींच्या अनुयायात त्यांच्या सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करणारे अनुयायी महत्त्वाचे होते. आचार्य विनोबा भावे, आचार्य दादा धर्माधिकारी, काकासाहेब कालेलकर, शंकरराव देव, प्रेमा कंटक यांचा यामध्ये आपणास समावेश करता येईल.

**विनोबा भावे :** म. गांधींच्या विचारांची मीमांसा करून त्याचा सातत्याने विकास करण्याचे काम विनोबांनी केले. विनोबांनी गांधीविचारांना अद्वैत वेदांताच्या चौकटीत बसवले. त्यांनी गीतेवर तीन पुस्तके लिहिली आणि त्यात स्वतःची अशी गीतामीमांसा केली. त्यावर म. गांधींच्या विचारांचा प्रभाव आहे, पण अनुसरण नाही. 'ब्रह्म सत्य जगत्स्फूर्ती : जीवनं सत्य शोधनं' हे तत्त्व त्यांनी मांडले. [भावे विनोबा **महागुहेत प्रवेश** परंधाम प्रकाशन, वर्धा १९८२, पृ. १४४] या सूत्रात शंकराचार्य, ज्ञानेश्वर व म. गांधी यांच्या तत्त्वज्ञानाचा समन्वय आहे. त्यांच्या मते आपल्या जीवनाचे ध्येय सत्याचा शोध घेण्याचे आहे. सतत प्रयोग करीत सत्याचा शोध घ्यावा लागतो म्हणून सत्याच्या शोधात विज्ञानाची भूमिका महत्त्वाची आहे. विज्ञानाच्या प्रगतीला मर्यादा नसते. त्यांनी ज्ञान, भक्ती व कर्म या तिन्ही मार्गांचा पुरस्कार केला. गांधींनी सांगितले की, समाजसेवेसाठी यमनियम गरजेचे आहेत. सत्याचा त्याग करून मला स्वराज्य मिळत असेल तर ते मला नको आहे. सत्यासाठी मी स्वराज्याचा पण त्याग करीन. विनोबांच्या मते गांधींनी यात अपवाद मान्य केले नाहीत, यातच त्यांचे मोठेपण आहे.

त्यांच्या मते भारतात विज्ञान व धर्म यांच्यात संघर्ष नाही. ज्ञानशिरोमणी शंकराचार्य यांनी सांगितले की, ज्ञान पुरुषतंत्र नाही. ते मनुष्याच्या मर्जीवर अवलंबून नाही तर ते वस्तुतंत्र आहे, ते वस्तूच्या स्वरूपावर अवलंबून आहे. वस्तूचे स्वरूप वस्तूच ठरवते. त्रिकोणाचे स्वरूप त्रिकोणावरच अवलंबून असते. मनुष्याची बुद्धी त्रिकोणास वर्तुळ म्हणू शकत नाही. म्हणून भारतात विज्ञान व धर्म यांत संघर्ष नाही. [**धर्मामृत** परंधाम वर्धा, २०००]

विनोबांनी भूदान चळवळ सुरू केली. त्यानिमित्त त्यांनी भारतभर पदयात्रा केली. त्यांचे चिंतन चालू होते. दुसरे महायुद्ध संपले होते. शीतयुद्धाचे वातावरण होते. साम्यवाद आणि भांडवलशाही यांना पर्यायी विचार म्हणून विनोबांनी साम्ययोगाची कल्पना मांडली. त्यांच्या मते गीतेने समत्वाची व साम्ययोगाची शिकवण दिली. कारण त्यात सर्व मूलमात्रांना समान मानण्याची कल्पना आहे. साम्ययोगात साम्यवादी व भांडवलशाही व्यवस्थेतील उणिवा दूर करण्यात आल्या आहेत. साम्यवादी व्यवस्थापण सर्वांचे कल्याण इच्छिते, पण तिचा मार्ग हिंसेचा व बळाचा आहे. भांडवलशाही व्यवस्था, तज्ञन्य कल्याणकारी राज्याची कल्पना व संसदीय व्यवस्था समाजाच्या उपयोगाच्या नाहीत. साम्ययोगी समाज हा सर्वोदयाच्या मार्गाने व अवैरत्वाच्या साधनेने प्राप्त होणार आहे. त्यांच्या मते आदर्श राज्य स्थापन करण्याचे दोन प्रयत्न झाले. पण ते अयशस्वी झाले. पहिला प्रयत्न येशूने केला. त्याने बाह्य परिस्थितीचा विचार न करता आपल्या आत्म्यात देवाचे राज्य स्थापन करण्यावर भर दिला. दुसरा प्रयत्न साम्यवादाचा होता. त्यांनी बाह्य परिस्थिती सुधारून आदर्श राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी हृदयाची शुद्धी केली नाही. साम्ययोगाचा भर बाह्य परिस्थितीत परिवर्तन व अंतःशुद्धी यावर होता. विकेंद्रीकरण, सहकार व्यक्तीचा सर्वांगीण विकास, श्रमप्रतिष्ठा, समाजमनस्कता, ज्ञान व कर्म यांचा योग्य समन्वय व अंतिमतः शासनमुक्ती ही साम्ययोगाची उद्दिष्ट्ये आहेत. साम्ययोगाचा उद्देशपण राज्यविहीन समाज स्थापन करण्याचा आहे. [**साम्यवाद की साम्य** योग परंधाम वर्धा, १९९०]

भूदान चळवळीत प्रवासात असताना विनोबांनी साम्यसूत्रांची रचना केली. या सूत्रांत आचार्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे सार ग्रथित करण्यात आले आहे. यात एकूण १०८ सूत्रे आहेत आणि त्यात

पौर्वात्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानातील म्हत्त्वाच्या मूल्यांचा त्यांनी समावेश केला आहे. साम्यसूत्रातील पहिले सूत्र आहे अभिध्येय. परम साम्य समत्व प्राप्त करणे हे आमचे परमध्येय आहे असे विनोबा सांगतात. या साम्याच्या प्राप्तीत त्यांच्या मते चतुर्विद्य पुरुषार्थाची प्राप्ती समाविष्ट होते. सूत्रांमध्ये विनोबांनी अनेक मुद्यांचा समावेश केला आहे. साम्ययोगी समाजाच्या प्राप्तीसाठी उचलावयाच्या पावलांची माहिती त्यांनी या सूत्रांत सांगितली आहे.

समाजात नेहमी असा वाद असतो, की प्रत्यक्ष जनतेत जाऊन, लोकांमध्ये जाऊन काम करणारी व्यक्ती जास्त श्रेष्ठ असते, की घरात बसून लिखाण करणारी व आपले विचार निरनिराळ्या मार्गांनी लोकांपर्यंत नेणारी व्यक्ती जास्त श्रेष्ठ असते. या सूत्रांत विनोबा सांगतात, की साम्ययोगाच्या साधनेत कर्ममार्ग अटळ आहे. त्यांच्या मते व्याप्त स्वरूपात काम करणारा धर्ममार्गी पुरुष म्हणजे जनक होय, तर अव्यक्तपणे धर्मसाधना करणारा पुरुष म्हणजे शुकदेव होय. जनक व शुकाचार्य यांचे दोन वेगवेगळे पंथ आहेत, असे गीतारहस्यात टिळक म्हणतात. पण याबाबत विनोबांचे असे म्हणणे आहे, की जनकाचा व शुकाचा मार्ग एकच आहे त्यात भेद नाही. विनोबांच्या मते मानवी जीवनाचा उद्देश सत्याचा शोध घेणे हा आहे व सृष्टीसमाज व मनुष्याची प्रकृती याचा प्रत्येक माणसाने शोध घेतला पाहिजे. आपल्यामध्ये आत्मशक्तीचे भान जसजसे जागृत होत जाईल तसतशी शासनमुक्तीची कल्पना प्रत्यक्षात आणणे सोपे जाईल. कारण शासनमुक्त समाज स्थापन करणे हे साम्ययोगाचे उद्दिष्ट आहे. [**साम्यसूत्रे** परंधाम वर्धा, १९८८ पृ. ३३-३६]

विनोबांनी सत्याग्रहाच्या संकल्पनेचा खोल असा अभ्यास केला. त्यांच्या मते सत्याग्रहाचा शोध भारतात लागला. भारतातील संतपरंपरेने व वीरपरंपरेने त्याचा पुरस्कार केला. समाजात जेथे अन्याय झाला आहे तेथे प्रतिकार करावा आणि वैराला उत्तर देऊ नये ही सत्याग्रहाची मूळ तत्त्वे आहेत. गांधीजी प्रल्हादास आदर्श सत्याग्रही मानीत असत. विनोबा शुकदेवास आदर्श सत्याग्रही मानतात. म. गांधींचे मोठेपण यात आहे की, त्यांनी मनुष्याच्या आत्मशक्तीस सत्याग्रहाद्वारे जागृत करण्याचा प्रयत्न केला. विनोबांचे असे मत होते, की आपले सत्याग्रह अजून अपूर्ण आहेत. गांधींनापण ही गोष्ट माहीत होती. आपले सत्याग्रह दुर्बलांचे होते व काही प्रमाणात तो निःशस्त्र प्रतिकाराचाच प्रकार होतो हे त्यांनी जाणले होते. म्हणून ते या सत्याग्रहांना यशस्वी सत्याग्रह मानीत नव्हते. कारण त्यात विरोधकावर दबाव पडे. १९३२ साली जातीय निवाड्याच्या वेळी केलेल्या उपोषणाचा दबाव विरोधकांवर पडला. सत्याग्रहाची कल्पना सकारात्मक आहे व त्यात आपणास संपूर्ण मानवी जीवन सत्याच्या आधारावर उभे करावयाचे आहे. म्हणूनच गांधींनी त्यास रचनात्मक कार्याची जोड दिली. [सत्याग्रहविचार, परंधाम वर्धा, पृ. १६-१७-५५-५६]

विनोबांच्या मते, सत्याग्रहाचा अर्थ आपणास भावलेल्या सत्याचा आग्रह धरा, असा नसून त्याचा खरा अर्थ सत्याग्रह किंवा सत्याचे ग्रहण करा असा आहे. आपल्यातील सत्याला चिकटून राहण्याची व प्रतिपक्षातील सत्यांश ग्रहण करण्याची वृत्ती खऱ्या सत्याग्रहाने अंगी बाणवली पाहिजे. त्यांच्या मते लोकशाहीतपण सत्याग्रहाची गरज असते, कारण आजच्या लोकशाहीत निर्णय हे एकमताने होत नाहीत. ते बहुमताने होतात. सत्याग्रह विधायक असावा. आजच्या विज्ञान युगात मतभेदांचे निराकरण बुद्धीच्या साह्याने करण्यात यावे. मनाचा क्षोभ होणे टाळले पाहिजे. सत्याग्रहाच्या साधनेत निरंतर सेवा व निरंतर आत्मशुद्धी यांचा समावेश होतो. आपल्या साम्ययोगाच्या कल्पनेत विनोबांनी सत्याग्रहास महत्त्वाचे स्थान दिले.

अनुक्रमणिका

आचार्य विनोबा भावे यांनी भूदान, सर्वोदय, लोकनीती या संकल्पनांची मांडणी केली. त्याचाच विस्तार नंतरच्या काळात काका कालेलकर, दादा धर्माधिकारी व इतर गांधीवाद्यांनी केला. कालेलकरांनी आपल्या विपुल लिखाणातून म. गांधींच्या सांस्कृतिक दृष्टिकोनाचे विवेचन केले. भारतीय संस्कृती आणि भारतीय भाषा यांच्यात अनुस्यूत असणाऱ्या संस्कृती समन्वयाची कल्पना त्यांनी मांडली.

**दादा धर्माधिकारी :** सर्वोदय विचारवंतात दादा धर्माधिकारी यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी गांधीवादी विचारांना गांधीवादी कर्मकांडातून मोकळे केले व त्यातील सामाजिक व राजकीय व्यवस्थांची पुनर्रचना करा असे सांगणारा नैतिक आशय महत्त्वाचा मानला. त्यांनी पुरुषविहीन नव्हे तर पुरुषनिरपेक्ष स्त्रीमुक्तीचा विचार महत्त्वाचा मानला. त्यांच्या मते स्त्री-पुरुष सहजीवन हे सख्यभावावर आधारलेले आहे. [धर्माधिकारी दादा, **सर्वोदय दर्शन** सर्व सेवा संघ, वाराणसी १९९८, पृ. ४०-६१.] दादांच्या सर्व पुस्तकात त्यांचे 'सर्वोदय दर्शन' हे पुस्तक महत्त्वाचे आहे. या पुस्तकात त्यांनी वर्णाश्रमव्यवस्थेबाबत गांधी व विनोबा यांच्या विचारांना मोडीत काढीत असे मत व्यक्त केले, की जन्मसिद्ध वा गुणसिद्ध जातिसंस्था विषमतेवर आणि अन्यायावर आधारलेली आहे, म्हणून ती पूर्णतः मोडीत काढली पाहिजे. [धर्माधिकारी दादा, **सर्वोदय दर्शन** सर्व सेवा संघ, वाराणसी १९९८, पृ. ४०-६१.] त्यांनी राजनीतिऐवजी लोकनीतीचा पुरस्कार केला आणि असे मत प्रतिपादन केले, की विकेंद्रित राजनीती म्हणजे लोकनीती नव्हे. प्रत्येक व्यंक्तीमध्ये, नागरिकत्वाची भावना विकसित होणे गरजेचे आहे. सहजीवन हा खऱ्या नागरिकत्वाचा आधार आहे. पण सहजीवन हे संविभागाशिवाय शक्य नाही. संविभाग म्हणजे संपत्तीचे समान वाटप. संविभागाचे तत्त्व आर्थिक संयोजनाचा आधार असेल. जो वर्ग आर्थिक संविभागाच्या आड येईल त्याचा अहिंसक प्रतिकारपण करावा लागेल; कारण सर्वोदयाचे तत्त्व सर्वांचा विकास करणे हे आहे. भांडवलशाहीचा नाश झाल्यावरच खऱ्या अर्थाने भांडवलदार माणूस म्हणून मुक्त होतो. कारण भांडवलशाही स्वार्थ त्याचे माणूसपण कलंकित करतो. [जावडेकर शं. द. (सं.) **गांधीवाद : समाजवाद** धर्माधिकारी दादा सर्वोदयाची मूल प्रमेये ५६-६५, महाराष्ट्र कोल्हापूर १९४९.]

## लोकशाही समाजवादी विचार व गांधी

भारतात लोकशाही समाजवादी विचार दोन परंपरांतून व्यक्त झाला. त्यातील पहिली परंपरा ही पं. नेहरू आणि कॉंग्रेस पक्षाची होती. पं. नेहरूंच्या समाजवादी विचारांवर ब्रिटिश मजूर पक्षाच्या विचारांचा पगडा होता. समाजवादाची दुसरी परंपरा ही समाजवादी व प्रजा समाजवादी पक्षाची होती. या पक्षातील जय प्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, डॉ. लोहिया व अच्युतराव पटवर्धन यांच्या विचारांवर म. गांधींच्या विचारांचा खोल असा प्रभाव होता. समाजवादी पक्षातील अशोक मेहता यांच्यासारखे जे नेते होते, त्यांच्यावर ब्रिटिश मजूर पक्षाच्या विचारांचा प्रभाव होता आणि त्यांनी त्याबाबत लिखाणपण केले. आचार्य शंकरराव जावडेकर यांनी आपल्या 'आधुनिक भारत' या ग्रंथात भारतीय संस्कृतीचे अमृततत्त्व सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मार्क्स व गांधी यांच्या विचारांचा समन्वय करून सत्याग्रही समाजवादाचा विचार मांडला. आपल्या 'गांधीवाद' या ग्रंथात त्यांनी म. गांधींच्या तत्त्वज्ञानाचा साम्यवादाशी समन्वय होणे का आवश्यक आहे, याचे विवेचन केले. [जावडेकर शं. द. **सत्याग्रही समाजवाद-मार्क्स व गांधी** नवभारतातील चार लेख, समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी १९९६.]

आचार्य जावडेकर यांच्याप्रमाणेच आचार्य स. ज. भागवत यांनी म. गांधींच्या विचारांची चिकित्सा केली. त्यांच्या मते म. गांधींनी मानवाचा नैतिक विकास ही सतत वर्धिष्णू जीवनशक्ती मानली. समाजातील दुष्प्रवृत्ती केवळ बाहेरून नियमन केल्यामुळे नाहीशा होत नाहीत. त्यांच्या निर्मूलनासाठी समाजात सत्प्रवृत्तींचा व प्रेरणांचा जाणीवपूर्वक विकास करावा लागतो. गांधींचा सत्याग्रह हा उच्च दर्जाचा कर्मयोग

अनुक्रमणिका

आहे. त्यात सामाजिक जीवनाचा सूक्ष्म विचार आहे. आज आपणास एका व्यक्तीच्या हिंसेस तोंड द्यावयाचे नाही तर समाजाच्या व राष्ट्राच्या हिंसेस तोंड द्यायचे आहे. [भागवत स. ज. **आचार्य भागवत लेख संग्रह** भाग-१ महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई पृ. २१८-२३.]

म. गांधींच्या विचारांचा नव्याने अभ्यास करण्याची प्रक्रिया १९८० नंतर सुरू झाली. या काळात समाजापुढे राज्यसंस्थेच्या वाढत्या बळाचे, पर्यावरणाच्या संरक्षणाचे, स्त्रीस्वातंत्र्याचे आणि समाजातील वंचित घटकांच्या सबलीकरणाचे प्रश्न निर्माण झाले. त्यामुळे पुन्हा एकदा लोकशाही समाजवादी परंपरेतील विचारवंतांनी गांधींच्या विचारांची प्रस्तुतता तपासण्याचा प्रयत्न केला व गांधीविचारांची फेरमांडणी केली. या विचारवंतातं सर्वश्री वसंत पळशीकर, यशवंत सुमंत, प्रा. एम. एस. पांढरीपांडे, प्रा. राम बापट यांचे योगदान महत्त्वाचे आहे. श्री. वसंत पळशीकर यांनी म. गांधी व विनोबा भावे यांचे विचार आणि कार्य यांचा खोल असा अभ्यास करून निष्कर्ष काढले. 'हिंद स्वराज्य' या म. गांधींच्या पुस्तकास नव्याने प्रस्तावना लिहून म. गांधींच्या विचारांचे मर्म सांगितले. त्यांच्या मते भारतातील सभ्यता पाश्चात्त्य सभ्यतेपेक्षा जास्त चांगली अशी राष्ट्रवादी भूमिका गांधी घेत नाहीत. आधुनिक पाश्चात्त्य संस्कृतीची प्रकृती मूलतः विकृत व घातक आहे. या त्यांच्या मांडणीस वैश्विक संदर्भ होता. म. गांधींना भयग्रस्त व लाचार शांतता. नको होती. त्यांना हिंसेचा नव्हे तर मैत्रीभावाचा गुणाकार करायचा होता. समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी अटळ असलेल्या संघर्षातून फुटीरपणा व वाढता हिंसेचा गुणाकार न होता परस्पर एकात्मकता व मैत्री कशी वाढेल यावर त्यांचा भर होता. सत्याग्रहाची रीत ही संघर्षाची वेगळी अशी रीत होऊ शकते. चिरंजीवी विकास, जगापुढील पर्यावरणाच्या प्रदूषणाचे संकट पर्यायी अर्थनीती, स्वदेशी आणि खरीखुरी विकेंद्रित अर्थव्यवस्था व राज्यव्यवस्था याचे सम्यक असे विवेचन पळशीकरांनी त्यांच्या लेखात केले. म. गांधींची स्त्रीस्वातंत्र्याची कल्पना स्त्रीचे स्वातंत्र्य व स्वायत्त अस्तित्व मान्य करून तिच्यातील आत्मबळ वाढवण्याची होती. गांधी व विनोबा यांच्या अंतरंगात शिरून त्यांच्या विचारांतील नवी दृष्टी समजावून सांगण्याचा प्रयत्न पळशीकरांनी केला [पळशीकर वसंत, हिंदस्वराजची प्रस्तावना या विषयावर पळशीकरांनी विपुल प्रमाणात लिखाण केले असून ग्रंथररूपात ते प्रकाशित केले तर ते ४०० पृष्ठांचे दोन खंड भरतात; पाहा किशोर (सं) निवडक वसंत पळशीकर, **चौकटीबाहेरचे चिंतन** पृ. ८६-११९ लोकवाङ्मयगृह मुंबई २००९.] प्रा. एस. एम. पांढरीपांडे यांनी त्यांच्या 'ध्रुवपद', 'अन्वय' आणि 'स्वराज्य दर्शन' या ग्रंथातून गांधीविचारांचे विवेचन केले. नव्या पर्यावरणवादी विचारांची मीमांसा त्यांनी गांधीविचारांच्या संदर्भात केली. गांधींनी मानवी जीवनातील परात्मभाव दूर करून आत्मप्रत्ययाच्या आधारावर जीवनातील ऐक्य कसे साधायचे हे शिकवले. त्यांनी समग्रतावाद व अहिंसा यांतील परस्पर संबंध व त्यातून निर्माण होणारा पर्यावरणीय सख्यभाव यांचे विवेचन केले. त्यांतून चराचर सृष्टीबद्दल सख्यभाव निर्माण होतो व सत्यं, शिवं व सौंदर्य यांचा साक्षात्कार होतो. त्यांच्या मते आपल्या पुढील संकट हे संस्कृतीचे व सभ्यतेचे संकट आहे. त्यावर मात करण्यासाठी हवी असणारी मर्मदृष्टी आपणांस गांधीविचारांतून प्राप्त होते. त्यामुळे त्यांच्या विचारांत क्रांतिकारी नवजीवनाची प्रसादचिन्हे आपणास दिसतात. [पांढरीपांडे सु. श्री, **गांधी-परंपरा व परिवर्तन** परमधाम प्रकाशन, वर्धा २००१ पृ. २८-२९, ६१-६२ पाहा.

(१) ध्रुवपद केतश्री अंमळनेर १९९०

(२) पांढरीपांडे अन्वये प्रतिमा, पुणे १९९२

(३) स्वराज्यदर्शन प्रतिमा, पुणे २००८] प्रा. यशवंत सुमंत यांनी म. गांधींचे स्त्रीप्रश्न व जातिप्रश्न याबाबत काय विचार होते यांचे विवेचन केले. म. गांधींनी विविध सामाजिक चळवळींना पाठिंबा देत जातविरोधी चळवळींना बळ दिले आणि बहुजनवादी राजकारणास सुरुवात केली. जातीचा प्रश्न समतेच्या आधारावर त्यांना सोडवयाचा होता. त्यासाठी त्यांनी त्यांतील शुद्धतेचा प्रश्न निकालात काढला आणि त्यासाठी त्यांनी स्वतः भंगीकाम केले. श्रमप्रतिष्ठा महत्त्वाची मानली आणि सर्वांस बरोबरीचा दर्जा दिला. स्त्रीपुरुष संबंधांचा म. गांधींनी खोल असा अभ्यास केला होता. सध्या हे संबंध भय आणि बळ यांच्यावर आधारलेले आहेत.

अनुक्रमणिका

त्यांच्या मते स्त्री-पुरुष संबंध हे मैत्रभावावर आधारलेले असावेत आणि स्त्रीजीवनात प्रभावी असणारी वात्सल्याची भावना सर्व समाजात निर्माण झाली पाहिजे. अशाप्रकारे डॉ. सुमंत यांनी गांधीविचारांचे नव्या दृष्टिकोनातून विवेचन केले [सुमंत यशवंत गांधी **विचारांतील समता संकल्पना** पृ. १६२-१९६ कसबे रा. (सं) **समता-विचार व्यवहार व भवितव्य** प्रेमानंद रूपवते, रूपवते फौंडेशन, मुंबई २००० पाहा **गांधी विचारांचा विकास काही दिशा** पृ. ३९-६५ दाभोळकर शिरसाट (सं) **तत्त्वप्रणाली आणि अंमलबजावणी** साधना ट्रस्ट, पुणे २००९.]

## एम. एन. रॉय आणि नवमानवतावाद :

भारतीय तत्त्वविचारांच्या इतिहासात एम. एन. रॉय यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांनी मार्क्सवादापासून फारकत घेतली आणि प्रथम रॅडिकल डेमॉक्रसीचा व नंतर नवमानवतावादाचा विचार मांडला. पाश्चात्त्य देशातील विज्ञाननिष्ठ विवेकवाद व प्रबोधन काळात निर्माण झालेल्या मानवी स्वातंत्र्याच्या नैतिक प्रेरणा यावर रॉय यांचे विवेचन आधारलेले होते. रॉय यांना महाराष्ट्रात मोठा पाठिंबा मिळाला. त्यांना मानणाऱ्यांमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, न्या. तारकुंडे, प्रा. गोवर्धन पारिख, श्री. बा. रं. सुंठणकर, व. भ. कर्णिक द्वा. भ. कर्णिक यांचा समावेश होतो. व. भ. कर्णिक यांनी त्यांचे राजकीय चरित्र लिहिले. त्यांच्या नवमानवतावादाची सम्यक अशी मांडणी प्रा. गोवर्धन पारिख यांनी केली. [प्रा. पारिख गोवर्धन, **नवमानवतावाद** मुंबई १९६०] नवमानवतावादात व्यक्तिस्वातंत्र्यास व व्यक्तीच्या विवेकबुद्धीस महत्त्व देण्यात आले आहे. मानव सातत्याने स्वतःच्या स्वातंत्र्याचा कस वाढवण्याचा प्रयत्न करीत असतो. अधिकाधिक ज्ञान मिळविण्याची व त्याच्या साह्याने आपले जीवन बदलण्याची प्रेरणा ही त्याची मूलभूत प्रेरणा आहे. याकाळात 'नवभारत' मासिकावर या विचारांचा प्रभाव होता. [रेगे मे. पुं, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी-**अध्ययन व वैचारिक वाटचाल** पृ. १-३३, नवभारत - खंड ३४ अंक ५-६ फेब्रु-मार्च १९९१ रेगे मे. पु. **रॉय आणि गांधी** पृ. १५०-१५६, **नवभारत खंड** ५७ अंक ७-१० एप्रिल-जुलै २००३.] प्रा. वि. म. बेडेकर, प्रा. गोवर्धन पारिख व काही प्रमाणात प्रा. मे. पुं. रेगे हे संपादक सदस्य रॉयवादाच्या प्रभावाखाली होते.

रॉय यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन वैचारिक काम करणारा गट तयार झाला होता. त्या गटास व इतर समविचारी लोकांना एकत्र आणून शंकरराव देव यांनी 'समाज प्रबोधन संस्थे'ची स्थापना केली. त्यात प्रा. अ. भि. शहा, प्रा. मे. पुं. रेगे, प्रा. देवदत्त दाभोळकर, प्रा. भा. शं. भणगे, प्रा. दि. के. बेडेकर व प्रा. वि. म. दांडेकर यांचा समावेश होता. भारतात विवेकवादाचा आश्रय घेऊन विज्ञाननिष्ठ व धर्मनिरपेक्ष इहवादी समाज स्थापन करण्याची त्यांची मनीषा होती व हे काम ते समाज प्रबोधनाच्या मार्गाने करणार होते. त्यासाठी त्यांनी 'समाज प्रबोधन पत्रिका' नावाचे त्रैमासिक सुरू केले व त्याचे संपादन करण्याचे काम नव्या दमाचे विचारवंत श्री. वसंत पळशीकर यांच्याकडे सोपवण्यात आले. वसंत पळशीकर यांच्या संपादकत्वाखाली विचारसौंदर्याने नटलेले अनेक अंक पत्रिकेने काढले. भारतीय समाजाला अंधश्रद्धा, धर्मवाद व जातिवाद यातून मुक्त करण्याचे कार्य या गटाने हाती घेतले होते. श्री. वसंत पळशीकर यांच्यानंतर भा. शं. भणगे हे पत्रिकेचे संपादक झाले आणि पत्रिकेने आपले काम चालू ठेवले. पुढे हे द्वैमासिक १९८२-८३ साली बंद पडले पण १९९० साली डॉ. राजेंद्र व्होरा, प्रा. सुहास पळशीकर, प्रा. भोळे यांनी हे द्वैमासिक त्रैमासिकाच्या रूपात सुरू केले. अर्थात नव्या संपादक मंडळाची भूमिका पूर्वीच्या संपादक मंडळाच्या भूमिकेपेक्षा वेगळी होती.

**धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद :** प्रा. अ. भि. शहा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या काळात धर्मवादी व जातिवादी राजकारणास विरोध करीत विवेकनिष्ठा व धर्मनिरपेक्षता यांचा सातत्याने पुरस्कार केला. भारतीय समाजाची इहवाद धर्मनिरपेक्षता आणि समता या मूल्यांच्या आधारावर पुन्हा उभारणी करावयाची

अनुक्रमणिका

असेल, तर विवेकवादाचा पुरस्कार केला पाहिजे. धर्म आणि राजकारण यात पूर्ण फारकत झाल्याशिवाय, धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार केल्याशिवाय भारतीय राज्य खऱ्या अर्थाने लोकशाही राज्य होऊ शकणार नाही अशी त्यांची भूमिका होती. धर्म ही माणसाच्या वैयक्तिक उपासनेची बाब असून प्रत्येकास धर्म मानण्याचा मूलभूत हक्क आहे पण सार्वजनिक जीवनात विशेषतः शासकीय मदतीने धार्मिक कार्यक्रम केले जाऊ नयेत अशी प्रा. शहा व त्यांच्या सहकाऱ्यांची भूमिका होती. प्रा. शहा यांनी ही आपली भूमिका आग्रहाने मांडली. [शहा अ. भि. शास्त्रीय विचारपद्धती समाज प्रबोधन संस्था, पुणे १९७८.]

प्रा. अ. भि. शहा यांच्या प्रेरणेने मुस्लीम सत्यशोधकसमाजाची स्थापना करण्यात आली. हमीद दलवाई, सैय्यदभाई, हुसेन जमादार असा कार्यकर्त्यांचा नवा संच त्यातून तयार झाला. हमीद दलवाई यांनी त्यांच्या लिखाणातून मुस्लीम मानसिकता व मुस्लीम समाजातील सुधारणा यांच्याबाबत वाचा फोडली आणि मुस्लीम धर्मगुरुंकडून झालेल्या प्रखर विरोधास न जुमानता त्यांनी धर्मनिरपेक्षतेचा व समाज सुधारणेचा पुरस्कार केला. भारतातील जमातवादाच्या प्रसारात हिंदू जमातवाद्यांबरोबरच मुस्लीम जमातवादी जबाबदार आहेत. मुस्लीम धर्मगुरू इस्लामचा चुकीचा अर्थ लावतात आणि मुस्लिम समाजाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण करून प्रतिगामी रूढी व परंपरा समाजावर लादतात. त्यामुळे मुस्लीम समाजास नव्या पुरोगामी नेतृत्वाची गरज आहे. समाजाची सनातनी मानसिकता बदलणे आवश्यक आहे. या संदर्भात हमीद दलवाई यांनी खालील मुद्दे महत्त्वाचे मानले :—

(१) इस्लाम व राष्ट्रवाद यांच्यामध्ये कोणताही संघर्ष नाही आणि राष्ट्राचा अभिमान मुस्लिमांनी बाळगला पाहिजे.

(२) जगाची दारूल हरब व दारूल इस्लाम अशी विभागणी करणे टाळले पाहिजे. त्याप्रमाणे किताबी व बिनकिताबी लोकांत फरक करू नये.

(३) धर्मग्रंथ व धर्मपरंपरा मानवनिर्मित असतात, म्हणून त्या परिवर्तनीय असतात. त्यांचा विचार करीत असताना त्यांचा अर्थ लावत असताना बुद्धीचा वापर केला पाहिजे.

(४) मुस्लिमांनी धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार कुरून धर्माचा राजकारणात वापर करू नये आणि राज्यघटनेत सांगितलेली नागरिकांची कर्तव्ये त्यांनी पार पाडावी.

(५) हिंसा, जातीय दंगली आणि बळाचा वापर यांपासून त्यांनी दूर राहावे आणि पाकिस्तानबाबत विशेष प्रेम दाखवू नये.

(६) भारतातील मुस्लिमांमध्ये सांस्कृतिक विविधता आहे. मुसलमान भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील भाषिक घटकाचा अविभाज्य असा भाग आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील मराठी भाषिक मुसलमानांनी मराठी भाषेतच व्यवहार करावा. आपल्या धर्माची भाषा म्हणून उर्दू माध्यमात शिकू नये.

दलवाई यांच्या मते भारतात हिंदू व मुसलमानांनी सार्वजनिक व्यवहारात धर्माचा प्रभाव कमी करून इहवादी निष्ठांचा स्वीकार केला पाहिजे. भारताच्या राष्ट्रनिर्मितीसाठी त्याची गरज आहे. [दलवाई हमीद **राष्ट्रीय एकात्मता ते भारतीय मुसलमान साधना,** पुणे २००२ दलवाई ह. **मुस्लीम जातीयतेचे स्वरूप कारणे व उपाय साधना,** पुणे, १९७८ प्रस्तावना

अनुक्रमणिका

प्रा. नरहर कुरूंदकर.] दलवाईंप्रमाणेच या विषयावर प्रा. नलिनी पंडित यांनीपण पुस्तक लिहिले. मुस्लीम प्रश्नावर एम. ए. करंदीकर, वसंत पळशीकर आणि प्रा. नरहर कुरुंदकर यांनी पण लिखाण केले. प्रा. कुरुंदकरांनी त्यात गुंतलेल्या प्रश्नांचे विवेचन केले. [कुरुंदकर नरहर **जागर** १९७७ **शिवरात्र** १९८० या ग्रंथांत त्यांनी विवेचन केले.]

## फुले-आंबेडकरवादाचा उदय

म. जोतीराव फुले यांनी हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेचे विश्लेषण करून असे मत प्रतिपादन केले, की जातिव्यवस्था समतेच्या व स्वातंत्र्याच्या तत्त्वाच्या विरोधी आहे. १९६० नंतर जोतीरावांच्या कार्याचे नव्याने विश्लेषण होऊ लागले. कीर व मालशे यांनी म. फुले यांचे समग्र वाङ्मय प्रकाशित केले आणि १९७५ नंतर म. फुले यांच्या विचारांची नव्याने मांडणी होऊ लागली त्यांचे विचार डॉ. आंबेडकर यांच्या विचारांशी जोडून घेण्यात आले कारण दोघांनी वर्णव्यवस्थेस पूर्णतः नकार देऊन सांस्कृतिक स्वातंत्र्याचा व सामाजिक न्यायावर आधारलेली समाजरचना स्थापन करण्याचा आग्रह धरला होता. १९७५ नंतर महाराष्ट्रात जी परिवर्तनवादी चळवळीची लाट आली तिच्यासाठी जोतीराव हे संस्कृतिपुरुष ठरले. प्रा. गं. बा. सरदार यांनी जोतीरावांच्या जीवनकार्याची समीक्षा करणारे पुस्तक याच काळात लिहिले. [सरदार गं. बा., **म. फुले जीवन तत्त्वज्ञान व कार्य** ग्रंथाली; कोल्हापूर १९८२.] म. फुले यांच्या विचारांचा अभ्यास मुख्यतः पाच दृष्टिकोनांतून करण्यात आला.

(१) म. फुले यांचे विचार मार्क्सवादी विचारांस पूरक आहेत, अशी मांडणी डॉ. गेल आग्वेद आणि कॉ. शरद पाटील यांनी केली.

(२) शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाच्या शताब्दीनिमित्त त्याचे वेगळे असे विश्लेषण केले.

(३) म. फुले यांच्या सामाजिक व राजकीय विचारांची मांडणी करून त्यांना राजर्षी शाहू व वि. रा. शिंदे यांच्या बहुजनवादी विचारांशी जोडण्याचे काम डॉ. भास्कर भोळे यांनी केले.

(४) म. फुले व म. गांधी यांच्या विचारांतील साम्य व भेद लक्षात घेऊन त्यांच्या विचारांचे तौलनिक असे विवेचन श्री. वसंत पळशीकर यांनी केले.

(५) म. फुले यांच्या साहित्याचे सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन त्याची मांडणी डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी केली.

डॉ. गेल ऑग्वेद यांनी आपल्या 'वसाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड' या इंग्रजी पुस्तकात म. फुले यांच्या व सत्यशोधक चळवळीच्या कार्याचे नव्याने विश्लेषण केले व त्यांचा प्रागतिक वारसा प्रतिपादन केला. त्यांच्या मते वसाहतिक समाजातील साम्राज्यशाही व जातिसंस्थेतून निर्माण झालेल्या शोषणाविरुद्ध जनतेस उभे करण्याचे काम जोतीरावांनी केले व शोषणमुक्त समाजाचा आदर्श लोकांसमोर मांडला. पण महाराष्ट्रातील कम्युनिस्ट चळवळीच्या नेत्यांनी सत्यशोधक चळवळीशी जवळचे संबंध न जोडल्यामुळे ती चळवळ कमजोर राहिली. [ऑग्वेद गेल **वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड** (मराठी भाषांतर) सुगावा, पुणे २००१ पाटणकर भारत **मुद्दा आहे जग बदलण्याचा.**] कॉ. शरद पाटील यांनी डॉ. ऑग्वेद यांची लाईन पुढे नेत 'मार्क्स फुले आंबेडकरवाद'

नावाची नवी विचारसरणी जन्मास घातली. पाटील यांच्या म्हणण्याप्रमाणे जोतीरावांनी जातिसंस्थेवर आधारित सरंजामशाहीवर प्रहार करून नवा आदर्श निर्माण केला. महाराष्ट्रातील कम्युनिस्ट पुढारी फुले यांच्या कार्याचे योग्य असे आकलन करू शकले नाहीत. त्यांनी वर्गांचा अंत झाल्यावर जातींचा पण अंत होईल असा विचार मांडला आणि जातलढ्याकडे दुर्लक्ष केले. या दोन्ही विचारवंतांच्या मते मार्क्स व फुले यांच्या विचारात मोठ्या प्रमाणात साम्य होते. [पाटील शरद **दासशूद्रांची गुलामगिरी** खंड १ प्राज्ञपाठशाळा, वाई]

शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी फुले यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथाचे नव्याने विश्लेषण करून असे मत मांडले, की शेतकऱ्यांचे शोषण ज्याप्रमाणे वसाहतवादी करीत आहेत त्याचप्रमाणे एतद्देशीय सावकार, नोकरशहा, व्यापारी व कमिशन एजंटपण करीत आहेत, असे फुले मानीत. सर्व शेतकरी या व्यवस्थेने पीडलेले असल्यामुळे त्यामध्ये वर्गभेद नाही. म. फुले यांना शेतकऱ्यांचे शोषण थांबवून शेतीच्या समृद्धीवर आधारलेला नवा समताधिष्ठित समाज स्थापन करायचा होता. शेतकऱ्यांच्या जिवावर जगणाऱ्या बांडगुळांना त्यांना दूर करावयाचे होते. शेतीत प्राप्त होणारा पैसा शेतीतच गुंतवावा शेतकऱ्यांना नागवून तो औद्योगिकरणासाठी वापरला जाऊ नये असे जोतीरावांचे सांगणे होते. [शरद जोशी **म. फुले यांचा शेतकऱ्यांचा आसूड, शतकाचा मुजरा,** शेतकरी संघटना पुणे, १९८८.]

जोतीरावांच्या सामाजिक व राजकीय विचारांत समतेचा व स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्यात आला आहे. त्या विचारांचा मुख्य गाभा सामाजिक न्याय आणि समाजातील सर्व थरात सत्ता व संपत्ती यांचे योग्य वाटप करणे आणि सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रांतील मक्तेदारी दूर करणे हा आहे. डॉ. भास्कर भोळे यांच्या मते जोतीरावांनी बहुजनवादाचा पाया रचला आणि त्याचे तत्त्ववैचारिक स्वरूप स्पष्ट केले. या देशातील कोळी, कातकरी, रामोशी, महार हे जोपर्यंत सत्ताधारी होत नाहीत. समाजात इतरांच्या बरोबरीने येत नाहीत तोपर्यंत भारतात खरे राष्ट्र निर्माण होणार नाही हे जोतीरावांचे म्हणणे या बहुजनवादाचा मुख्य आशय होता. डॉ. भोळे यांच्या मते हाच बहुजनवाद छत्रपती शाहू महाराज, म. वि. रा. शिंदे आणि डॉ. आंबेडकर यांनी पुढे जोपासला. म. फुले यांचा वसा व वारसा या प्रकारचा आहे. [भोळे भा. ल., **म. फुले वसा व वारसा** साकेत, औरंगाबाद १९९६ **म. फुले यांची समता संकल्पना** लोकवाङ्मयगृह मुंबई १९९०.]

म. गांधी व म. फुले हे अनेक बाबतीत समानधर्मी होते. त्यांनी समाजातील शोषित वर्गांना जागृत केले. त्यांच्या मनात मानवी अधिकाराबाबत नवे भान निर्माण केले आणि श्रमप्रतिष्ठेस असाधारण महत्त्व दिले. कष्टकरी शेतकऱ्यांच्या व्यथा त्यांनी जाणल्या. त्यांनी व्यक्तीच्या प्रतिष्ठेला व स्वयंनिर्णयास महत्त्व दिले. वसंत पळशीकर यांनी त्यांच्या विचारांचा तुलनात्मक असा अभ्यास केला. त्यांच्या मते व्यक्तीच्या अधिकारांबाबत माणसामाणसातील भाऊपणा त्यांना महत्त्वाचा वाटत होता. निर्मळ भाऊपणा व्यक्तीच्या कृतीचा व उक्तीचा आधार असावा. इतरांचा विचार आत्मौपस्य बुद्धीने करावा. जातिसंस्थेचे निर्मूलन केवळ हक्क, सत्ता व मत्ता यांच्या विभाजनाने होणार नाही, तर त्यासाठी वेगळ्या मूल्यांची रचना व्यक्ती व समुदाय यांनी करावी. त्यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ शोषण व शासन यांना नकार देणारा नवा समुदायनिष्ठ समाज निर्माण करण्याचा जाहीरनामा होता. त्यात नव्या समुदायाची निर्मिती करणारा आत्मप्रतिष्ठा व श्रमप्रतिष्ठा यांच्यात सांगड घालणारा विधायक पुरुषार्थ अपेक्षित होता. मानवसमाजाची पुनर्रचना त्यांना अपेक्षित होती. [पळशीकर वसंत म. फुले यांची शिकवण आज उद्याच्या संदर्भात पृ. ६-२० नवभारत खंड ५०, अंक ५-६ मार्च-एप्रिल १९९७ उक्त भाग २ वर्ष ५०, अंक ७-८, मे-जून १९९७.] वसंत पळशीकर यांच्या मते म. गांधींना अशाच प्रकारचा समाज स्थापन करणे अपेक्षित होते. प्रा. नेमाडे यांच्या मते फुले यांनी सर्व थरावर माजलेल्या जातीयतेचा धिक्कार केला आणि आजन्म मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. महाराष्ट्रात राहणारे, मराठी भाषा बोलणारे सर्व मराठे आहेत असे त्यांचे मत होते. त्यांनी जे लिहिले ते लोकहितार्थ लिहिले. त्यांच्या कार्याचा व्याप मोठा होता.

अनुक्रमणिका

त्यांच्या लिखाणात इंग्रजी वसाहतवादाचा निषेध, स्वदेशी अर्थशास्त्राचे महत्त्व, श्रमिक संस्कृती स्वातंत्र्य व करुणा यांना कवेत घेणारी विशाल व व्यापक सांस्कृतिक दृष्टी दिसून येते. [नेमाडे भालचंद्र **म. फुले यांची गद्यशैली** पृ. ६९८-७०६, पी. बी. साळुंखे (सं.) **म. फुले गौरव ग्रंथ,** महाराष्ट्र शासन मुंबई १९९२.]

म. फुले यांच्या विचारांचा नव्या दृष्टिकोनांतून अभ्यास करणारे दोन ग्रंथ शासनाने प्रसिद्ध केले. हे दोन ग्रंथ श्री. पी. बी. साळुंखे व श्री. हरी नरके यांनी संपादित केले होते.

**मार्क्सवादी विचार**

भारतात कम्युनिस्ट चळवळीची सुरुवात महाराष्ट्रात झाली. मार्क्सवादाच्या तत्त्वज्ञानाचा आपापल्या परीने अर्थ लावणारे भारतीय व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, लालनिशाण पक्ष, शेतकरी कामगार पक्ष आणि शरद पाटील यांचा सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष असे पक्ष व त्यांचे नेते कार्यरत होते. कम्युनिस्ट चळवळीत कॉ. श्रीपाद अमृत डांगे व कॉ. बी. टी. रणदिवे हे नेते प्रमुख होते. त्यांच्यात मोठ्या प्रमाणात मतभेद होते. त्या मतभेदाची परिणती म्हणजे १९६४ साली कम्युनिस्ट पक्षाचे विभाजन झाल्यावर डांगे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष बनले तर रणदिवे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे एक महत्त्वाचे नेते बनले. वैचारिक स्तरावर प्रा. दि. के. बेडेकर, प्रा. गं. बा. सरदार, प्रा. नलिनी पंडित आणि कॉ. सरदेसाई यांनी मार्क्सच्या विचारांची मांडणी केली. १९६० च्या दशकात युरोपात परिवर्तनाचे वारे वाहू लागले. नव्या डाव्या चळवळीचा प्रभाव वाढला. **अंतोनिओ ग्रामसी, हर्बट मार्क्यूज आणि माओ त्से तुंग यांच्या विचारांचा प्रभाव वाढला** या काळात स्थापन झालेल्या 'मागोवा' गटातील तरुण कार्यकर्त्यांनी प्रथम 'मागोवा' आणि नंतर 'तात्पर्य' या त्यांच्या नियतकालिकांतून व्यापक असे विखाण प्रसिद्ध केले. मार्क्सच्या विचारांवर जे नवे चिंतन चालू आहे त्याचा काही प्रमाणात परिचय करून दिला. मार्क्सवादाच्या या नव्या मांडणीत मार्क्सच्या सुरुवातीच्या काळातील लिखाणास महत्त्वाचे स्थान होते. मार्क्सने लिहिलेल्या 'Economic and Philosophical manuscript of 1844' या टिपणी महत्त्वाच्या होत्या. त्याप्रमाणे critique of political economy हे पुस्तक व त्याचा पहिला खर्डापण उल्लेखनीय होता.

डॉ. गेल ऑस्वेद यांनी 'cultural revolt in colonial society' या ग्रंथात मार्क्सवादी दृष्टिकोनातून सत्यशोधक चळवळीचे विश्लेषण केले आणि परिवर्तनाच्या लढाईत जातीचे परिमाण वगळल्याबद्दल कम्युनिस्टांवर टीका केली. [गेल ऑम्वेद उपरोल्लिखित] डॉ. ऑस्वेद यांच्या विवेचनास पाठिंबा देऊन त्यास लोकांपर्यंत नेण्याचे काम लालनिशाण पक्षाने केले पण पक्षाने त्यांची सर्व मांडणी स्वीकारली नाही. कॉ. शरद पाटील यांनी सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली आणि मार्क्स-फुले- आंबेडकरवादाचे तत्त्वज्ञान मांडले. [पाटील शरद उपरोल्लिखित श्री. पाटील यांनी या विषयावर विपुल लिखाण केले आहे.] त्यांच्या मते भारतातील वसाहतपूर्व शोषण हे जातीय होते तर वसाहतिक समाजातील शोषण हे वर्गीय आहे. आताचे शोषण हे वर्ग जातीय असल्यामुळे परिवर्तनासाठी वर्ग जातीय लढे लढवावे लागणार आहेत. परिवर्तनाच्या सांस्कृतिक संघर्षात त्यांनी स्त्रीमुक्तीस महत्त्वाचे स्थान दिले. भारतीय समाजाच्या नवनिर्माणात बौद्ध तत्त्वज्ञान महत्त्वाची भूमिका बजावेल असे त्यांचे मत होते.

प्रा. दि. के. बेडेकरांनी 'मार्क्सचा समाज परिवर्तनाचा दृष्टिकोन' या नावाचे दोन लेख समाज प्रबोधनपत्रिकेत लिहिले. या लेखात मार्क्सच्या परात्मभावाच्या कल्पनेस मध्यवर्ती मानून विवेचन करण्यात आले आहे. त्यांच्या मते मार्क्सला मूलगामी असा बदल हवा होता. आजचे मानवी जीवन हे परात्मभावाने ग्रासले आहे. परात्मता मनुष्यास त्याचे मनुष्यत्व विसरावयास लावून त्याच्या मनात मिथ्य भ्रांती निर्माण

करते. त्यामुळे तो स्वनिर्मित अमानुष बाह्यशक्तीस शरण जातो. भयभीत होतो. माणसाला या परात्मतेतून मुक्ती हवी आहे. मार्क्सला या परात्मतेचा निरास करून मानुषता परत आणायची आहे. त्यासाठी त्यास मनुष्यत्वास साक्षी ठेवून नवे परिवर्तन आणायचे आहे. हे परिवर्तन एका गटासाठी, एका वर्गासाठी नसून ते सर्व समाजाने घडवून आणायचे आहे. [बेडेकर दि. के. **मार्क्सचा समाजपरिवर्तनाचा दृष्टिकोन** पृ. ३३-३७ समाजचिंतन पॉप्युलर मुंबई १९६९.]

प्रा. बेडेकर यांच्यानंतर मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा परिचय करून देण्याचे काम श्री. प्रभाकर पाध्ये आणि श्री. मुरलीधर पवार यांनी केले. त्यापूर्वी परामर्श प्रकाशनाने प्रा. राम बापट यांच्या संपादकत्वाखाली मार्क्सवरच्या लेखांचा एक छोटासा संग्रह प्रकाशित केला. [बापट राम (सं) **मार्क्सचे तत्त्वज्ञान परामर्श** पुणे १९८४ बापट **राम स्वराज्य व राज्यसंस्था** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर २००३.] प्रभाकर पाध्ये यांनी 'मानव आणि मार्क्स' नावाच्या आपल्या पुस्तकात मुख्यतः तरुण मार्क्सच्या विचारांचा आढावा घेतला. पाध्यांनी जॉन फ्लॅमेलाट्झ, एरिक क्रॉम इसाय बर्लिन, डेव्हिड मॅकलेनॅन यांच्या मार्क्सवरील ग्रंथांचा अभ्यास केला होता. त्यांच्या विवेचनावर फ्लॅमेनाट्झच्या ग्रंथाचा दाट असा प्रभाव आहे. पाध्ये हे तसे मार्क्सवादाचे जुने अभ्यासक आणि स्तालिनच्या काळात झालेल्या अत्याचारांचे टीकाकार. त्यांच्या मते मार्क्स हा युरोपीय प्रबोधनयुगाचे अपत्य होता. प्रबोधनकालीन विचारवंतांचे असे मत होते की, मानवी विवेकाच्या साह्याने आपणास नवसमाजनिर्मिती करता येईल. मार्क्सने पण समाज परिवर्तनाचा पुरस्कार केला. त्याने भांडवलशाहीची खोल अशी मीमांसा केली आणि त्यातून सुटकेचा मार्ग सांगितला. पाध्ये यांच्या मते मार्क्सच्या तत्त्वज्ञानातील आर्थिक नियतीवाद आणि त्याची कामगारांच्या हुकूमशाहीची कल्पना त्याच्या लोकशाहीवादी विचारांचा संकोच करतात. [पाध्ये प्रभाकर **मानव आणि मार्क्स** श्रीविद्या प्रकाशन पुणे १९८०]

श्री. मुरलीधर पवार यांनी मार्क्सचा मानव विचार या ग्रंथात मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा खोल असा अभ्यास केला. हे पुस्तक श्री. पवार यांच्या निबंधांचे संकलन असून त्यास प्रा. मे. पुं. रेगे यांनी ३० पानांची विद्वत्तापूर्ण अशी प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेत त्यांनी मार्क्सपूर्व तत्त्वज्ञानाची मांडणी केली आहे. रेगे यांच्या मते मार्क्सचा विचार हा मानवी स्वातंत्र्याचा विचार होता आणि त्याने जगातील सर्व सत्ताधाऱ्यांपुढे एक नैतिक आव्हान उभे केले. मार्क्सचा निरीश्वरवाद, मार्क्सची मानवी स्वभावाची कल्पना, मार्क्सची परात्मभावाची कल्पना आणि मार्क्सच्या मानवी स्वातंत्र्याच्या कल्पनेचे नीतिशास्त्र या चार विषयांवर पवारांनी स्वतंत्र असे निबंध लिहिले असून त्यात पवारांचा या विषयाचा खोल असा व्यासंग दिसून येतो. त्यांच्या मते मार्क्सने मानवी अस्तित्वाच्या उद्दिष्टांचा अभ्यास केला आणि माणूस व माणूस, माणूस व निसर्ग यांच्यामधील एकात्मता स्पष्ट करून सांगितली. त्यांनी हेगेल व मार्क्स आणि मार्क्स आणि फायरबाख यांच्या तत्त्वज्ञानांतील सूक्ष्म भेद समजावून सांगितले. पवार यांच्या मते परात्मतेचा निरास मानवी स्वातंत्र्यासाठी कसा आवश्यक आहे याचे विवेचन मार्क्सने केले. मार्क्सचे तत्त्वज्ञान मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार करते आणि माणसाच्या संकल्पशक्तीवर कोणत्याही प्रकारचे बंधन आणीत नाही. [पवार मुरलीधर **मार्क्सचा मानवविचार** लोकवाङ्मयगृह मुंबई २००१]

मराठीत समाजवादासंबंधी परिचयात्मक लिखाण झाले. समाजप्रबोधन संस्थेने डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या संपादकत्वाखाली 'समाजवाद' या विषयावर एक ग्रंथ प्रकाशित केला होता. हा ग्रंथ प्रा. दि. के. बेडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रकाशित करण्यात आला होता. या ग्रंथातील काही लेख उल्लेखनीय होते. त्यात प्रा. श्री. व्यं. बोकील यांचा परात्मभावावरचा लेख चांगला होता. [नाडकर्णी आनंद (सं) **समाजवाद बेडेकर गौरवग्रंथ** समाज प्रबोधन संस्था, पुणे १९७५] या विषयावर परिचयात्मक लिखाण काही प्रमाणात झाले. पण स्वतंत्र मांडणी करणारे लिखाण झाले नाही. रशियातील सोवियत राजवटीच्या वतनाची मीमांसा गोविंद

अनुक्रमणिका

तळवलकर यांनी केली पण त्यावर जी अधिक चर्चा व्हावयास हवी होती ती झाली नाही. अंतोतिओ ग्रामसी, अल्युजर, मार्क्युज, लुकाच, हेबरमास, ॲडोर्लो, कोर्श, हॉर्कहायमर फ्रॉम यांच्या लिखाणाचा परिचयपण अजून करून देण्यात आलेला नाही. तीच गोष्ट लेनिन, स्टॅलिन, माओ त्से तुंग, रोझा लकझेम्बग, बुखारित डॉटस्की चे ग्वेएरा बाहरो आणि इटालियन कम्युनिस्टच्या विचारधनाची आपल्या देशातील डांगे व रणदिवे यांचे विचार लालनिशाण पक्ष शेकाप यास मुजुमदार नक्षलवाद्यांचे विविध गट व त्यांनी केलेली माओवादांची नवी मीमांसा या गोष्टींचा देखील नीट अभ्यास झालेला नाही.

**लोकशाही समाजवादी विचार**

म. गांधींच्या विचारांच्या संदर्भात मांडणी करीत असताना आपण लोकशाही समाजवाद मानणाऱ्या विचारवंतांनी गांधीवादाची मांडणी कशी केली याचे विवेचन केले. येथे आपण लोकशाही समाजवादाच्या संदर्भात महाराष्ट्रात कोणत्या प्रकारचा विचार मांडला गेला याची माहिती घेऊ. तसे पाहिले तर या काळात बहुसंख्य महाराष्ट्रीय विचारवंत हे लोकशाही समाजवादाचे पुरस्कर्ते होते. रॉयवादी सामाजिक कार्यकर्त्यांनी डॉ. लोहियांच्या संयुक्त समाजवादी पक्षासाठी काम करावयास सुरुवात केली होती. लोकशाही समाजवादाच्या दोन परंपरा महाराष्ट्रात होत्या. त्यातील एक परंपरा पं. नेहरूंना मानणाऱ्यांची व दुसरी परंपरा जय प्रकाश, लोहिया यांना मानणाऱ्यांची. त्यांनी आपले विचार त्यांच्या चौकटीत मांडले.

पं. नेहरूंच्या लोकशाही समाजवादात राज्यसंस्थेस विशेषतः सार्वजनिक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावयाची होती. नेहरूंचे प्रतिमान ग्रामीण भागात सामुदायिक शैलीचा व कल्याणकारी राज्याचा पुरस्कार करीत होते. नेहरूंच्या या तत्त्वविचारांत महाराष्ट्राच्या विकासाचे प्रतिमान चपखलपणे बसवण्याचे काम यशवंतराव चव्हाण यांनी केले. चव्हाणांनी लोकशाही समाजवादात कृषी औद्योगिक समाजाचे प्रतिमान स्थापित केले. जे सहकारी संस्था, पंचायत राज्य व्यवस्था कसेल त्याची जमीन या तत्त्वाप्रमाणे जमिनीचे वाटप व जास्तीत जास्त लोकांचा सत्तेत सहभाग यावर आधारलेले होते. त्यांत बहुविधतेवर व बहुजनांच्या हाती सत्येच्या हस्तांतरावर भर देण्यात आला होता. चव्हाणांनी नेहरूंच्या सामुदायिक शेतीच्या कल्पनेऐवजी सहकारी शेतीच्या कल्पनेचा पुरस्कार केला. [चव्हाण यशवंतराव **सह्याद्रीचे वारे** महाराष्ट्र शासन मुंबई १९६०] चव्हाणांचे हे प्रतिमान काँग्रेस पक्षाने योग्यरीत्या अमलात आणले नाही कारण पक्षाचे राजकारण ग्रामीण व शहरी भागातील धनिकांच्या आधारे चालले.

समाजवादी पक्षांपैकी प्रजासमाजवादी पक्ष आणि अशोक मेहता यांचे विचार पं. नेहरू यांच्यापेक्षा वेगळे नव्हते. जयप्रकाश व लोहिया यांच्या विचारांवर गांधींच्या विचारांचा प्रभाव होता. डॉ. लोहियांच्या प्रतिमानात त्यांनी अनेक नव्या संकल्पनांचा समावेश केला होता. त्यात पाश्चात्त्य भांडवलशाहीस व भारतातील उच्च जातीय वर्चस्वास विरोध चौखंबा राजा सतकुंतीचा सिद्धांत इत्यादी गोष्टींचा त्यांनी समावेश केला होता. महाराष्ट्रात डॉ. लोहिया यांना अनेक अनुयायी मिळाले. त्यांनी त्यांच्या तत्त्वास अनुसरून नवे काम सुरू केले. डॉ. बाबा आढाव यांच्यासारख्या कार्यकर्त्यांनी समाजवादी विचारांना तीन पातळ्यांवर विकसित करण्याचा प्रयत्न केला. त्यातील पहिली पातळी सत्यशोधक समाजाचा वारसा पुढे चालवत बहुजनांना संघटित व सकल करण्याची होती. दुसरी पातळी दुर्लक्षित व असंघटित कष्टकरी जनतेस चळवळीद्वारा संघटित करण्याची होती व तिसरी पातळी भारतीय संदर्भात लोकशाही समाजवादात स्त्रीमुक्ती व दलित मुक्तीचा व्यापक आशय देण्याची होती. [आढाव बाबा **सत्यशोधक समाजाची १२५ वर्षे**, १२२-१२६ नवभारत खंड ५९, अंक ८-११, मे-जुलै २००६.]

अनुक्रमणिका

भारतातील लोकशाही समाजवादाच्या संदर्भात लोकशाही समाजवादाच्या आशयाचा पुनर्विचार केला पाहिजे असे प्रतिपादन श्री. वसंत पळशीकर यांनी केले. त्यांच्या मते आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी कामगार चळवळीचा साधन म्हणून वापर, राज्यसंस्थेचा समाजवादी समाज स्थापन करण्यासाठी उपयोग करणे व तंत्रवैज्ञानिक क्रांतीतून समाजवादाची स्थापना करणे सुकर होईल असे मानणे या तीन गोष्टी समाजवाद्यांच्या भ्रम निर्मितीस कारण ठरल्या. त्यांचा फारसा उपयोग झाला नाही. पण या विचारांची फेरतपासणी करणे गरजेचे आहे. त्यात बंधुभाव, श्रमप्रतिष्ठा खऱ्या अर्थाने सहकारी चळवळीची स्थापना, भांडवलशाही व साम्राज्यशाही यांस विरोध, कुवतीप्रमाणे काम व गरजेप्रमाणे दाम प्रत्येकास मिळाले पाहिजे. त्यांच्या मते भारतात म. गांधी, विनोबा भावे, आचार्य जावडेकर, जय प्रकाश व डॉ. लोहिया यांचा थोर वारसा लोकशाही समाजवादी विचारांस आहे व त्याच्या आधारे तिचा पुनर्विचार झाला पाहिजे. [पळशीकर वसंत **लोकशाही समाजवादाच्या आशयाचा पुनर्विचार** पृ. ५९-८५. बेडकीहाळ निवडक पळशीकर जास्त विवेचनासाठी पहा नवभारत ऑक्टोबर. डिसेंबर, २००५.]

## हिंदुत्ववाद आणि नवहिंदुत्ववादी विचार

हिंदुत्ववादी विचारांच्या मांडणीची सुरुवात महाराष्ट्रात झाली. आपल्या प्रांतात हिंदुत्ववादी विचारांचे वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले. त्यांत तीन प्रवाह प्रमुख होते. त्यातील पहिला प्रवाह हा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचा होता. सावरकरांनी त्यांच्या विज्ञानवाद आणि उपयुक्ततावाद याच्या तात्त्विक चौकटीत हिंदुत्ववाद बसवण्याचा प्रयत्न केला. सावरकारांच्या विचारांचे सूक्ष्म असे परीक्षण प्रा. विलास खोले यांच्या 'सूर्यबिंबांचा शोध' या संपादित ग्रंथात करण्यात आले आहे. त्यात प्रा. मे. पुं. रेगे व वसंत पळशीकर यांचे लेख महत्त्वाचे आहेत. [खोले विलास (सं) **सूर्यबिंबाचा शोध,** पुणे १९८७] हिंदुत्ववादाचा दुसरा प्रवाह हा हिंदु अध्यात्मवादाचा पुरस्कार करणारा. त्याची मांडणी प्रथम बाबाराव सावरकरांनी केली पण त्या सिद्धांताचा विकास व विस्तार गोळवलकर गुरुजींनी केला. गोळवलकरांनी हिंदुत्ववादाचा पुरस्कार करीत असताना भारतीय संस्कृतीचा उल्लेख केला. त्यांच्या मते भारत हा हिंदूंचा देश आहे. कारण हा गंगा-सिंधू-यमुना या नद्यांचा, हिमालयाचा देश आहे. हिमालय प्रत्यक्ष परमेश्वराचे निवासस्थान आहे. त्यांनी वर्णाश्रम व्यवस्थेचा पुरस्कार केला. हिंदुत्वाचा तिसरा सिद्धांत नागपूरच्या अप्रबुद्धांनी किंवा व्ही. के. पालेकर यांनी मांडला. संघाशी मतभेद झाल्यानंतर त्यांनी 'भारतीय धारणा समितीची' स्थापना केली. अप्रबुद्ध सावरकरांना प्रतिक्रियावादी हिंदू मानीत असत. त्यांच्या मते राज्यसंख्या आणि समाजरचना याबाबतच्या मूळ भारतीय धारणा योग्य असून भारतात पाश्चिमात्य प्रतिमानावर आधारलेले राज्य व समाज निर्माण करण्याचे प्रयत्न चुकीचे आहेत. हिंदुत्वविचारांच्या या तिन्ही मांडण्या १९४०-१९६० या काळात करण्यात आल्या आणि १९६० नंतरसुद्धा त्यांचा प्रभाव कायम राहिला. १९६२ सालच्या चिनी आक्रमणानंतर व १९६५ सालच्या भारत पाकिस्तान युद्धानंतर भारतात राष्ट्रीय भावना जास्त तीव्र झाल्या आणि त्यातून हिंदुत्ववादी विचारांचा प्रभाव वाढू लागला. हिंदुत्ववादी विचारांचा हा वाढता प्रभाव लक्षात घेऊन आर.एस.एस. ने 'विश्व हिंदु परिषदेची' स्थापना केली. या परिषदेचे नेतृत्व दादासाहेब आपटे यांच्याकडे होते.

१९५० पर्यंत महाराष्ट्रातील विचारवंतांवर काही प्रमाणात हिंदुत्वाचा प्रभाव होता. या विचारवंतांत डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, प्रा. श्री. म. माटे, प्रा. द. न. गोखले आणि माधव ज्युलियन यांचा समावेश होतो. दादासाहेब आपटे यांनी १९६६ साली प्रा. सहस्रबुद्धे यांना 'हिंदुसमाज संघटना व विघटन' या विषयावर पुस्तक लिहिण्यास सांगितले. हे पुस्तक अनेक भाषांत भाषांतरित करण्यात आले व संघाच्या पत्रिकांतून ते प्रकाशित झाले. सहस्रबुद्धे हे सावरकरवादी विचारवंत होते व हिंदू संघटनेबाबत त्यांचे तोडगे सावरकरांजवळ जाणारे होते पण हे नवे विचार छापण्यात आले त्यात जाती व वर्णव्यवस्था यांना विरोध,

अनुक्रमणिका

इहवादी शासन व्यवस्थेचा पुरस्कार, विज्ञान व विवेक यांचा पुरस्कार, यांचा समावेश करण्यात आला होता [सहस्त्रबुद्धे पु. ग. **हिंदू समाज विघटन व संघटन,** पुणे १९६७] आज प्रा. स. ह. देशपांडे ज्या हिंदुत्व विचारांचा पुरस्कार करतात त्याची बीजे आपणास सहस्त्रबुद्धे यांच्या या पुस्तकात सापडतात.

१९७३ साली संघाच्या नेतृत्वात बदल झाला आणि बाळासाहेब देवरस संघाचे प्रमुख झाले. १९७४ सुरू झालेल्या जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीत संघ सहभागी झाला. १३ जुलै १९७३ रोजी आपल्या भाषणात देवरस म्हणाले की, लोकांच्या टीकेमुळे संघकार्यकर्त्यांनी वस्तुनिष्ठ आत्मपरीक्षण करावयास लागले पाहिजे. संघाने सामाजिक कार्य करून जनतेच्या संघाकडून असणाऱ्या अपेक्षा पूर्ण केल्या पाहिजेत. राजसत्तेशी संघर्ष करणे संघास मान्य नाही कारण कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी ते आपलेच सरकार आहे. आम्ही फक्त वाईटाविरुद्ध संघर्ष करण्याची शक्ती समाजात आणू बघतो. [बेडेकर सुधीर **गुरुजीनंतरचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ** पृ. ६-७, ६०-६३ माणूस, ७ जुलै १९७३.] देवरसांच्या काळात संघाने आपले काम मोठ्या प्रमाणात वाढवले. संघ आणीबाणीविरुद्धच्या चळवळीत सामील झाला. पुढे १९७७ साली जनसंघ जनता पक्षात सामील झाला. पुढे चरणसिंग यांनी जनता सरकार दुहेरी सदस्यत्वाच्या मुद्यावर खाली खेचले आणि १९८० साली जनता पक्षाचा मोठा पराभव झाला व इंदिरा गांधी यांचे सरकार सत्तेवर आले. एप्रिल १९८० मध्ये पुन्हा दुहेरी सदस्यत्वाचा मुद्दा पुढे आला आणि १ मे १९८० रोजी 'भारतीय जनता पक्षा'ची स्थापना करण्यात आली. या काळात भाजपने गांधीवादी समाजवादाच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला. या काळात भाजपच्या या बदलत्या भूमिकेबद्दल नाराजी होती. त्यामधून नवहिंदुत्ववादी विचारांचा व संघटनांचा उदय झाला.

नव हिंदुत्ववादाची मांडणी तीन स्तरावर झाली. त्यातील पहिली मांडणी ब. स. एरकुंटवार व प्रा. श्रीनिवास दीक्षित यांची होती. दुसरी मांडणी प्रा. स. ह. देशपांडे यांनी केली आणि तिसरी मांडणी प्रा. शेषराव मोरे यांनी केली.

अप्रबुद्ध पालेकर यांनी आपल्या 'प्रज्ञालोक' या त्रैमासिकातून आपल्या मतांचे प्रतिपादन केले आणि प्रतिक्रियावादी व राजकारणग्रस्त हिंदुत्वास विरोध केला. त्यांच्यानंतर त्यांचे शिष्य श्री. ब. स. एरकुंटवार यांनी आपल्या विचारांची मांडणी केली. त्यास त्यांनी आक्रमक पाश्चात्त्य राष्ट्रवादास व बळ, सत्ता आणि मत्ता यांची पूजा करणाऱ्या विचारांना विरोध केला. अल्पसंख्य म्हणून जातींचे व धर्मांचे समूहशः अतिरिक्त राजकारण करणाऱ्या प्रवृत्तींना त्यांनी विरोध केला. त्यांच्या राष्ट्रात कोणासही वगळण्यात आलेले नाही. त्यांच्या मते राष्ट्राच्या कृत्रिम प्रदेशनिष्ठेपेक्षा शेकडो वर्षे विकसित झालेल्या समाजाच्या सांस्कृतिक व सामाजिक परंपरा जास्त स्थिर असून त्या वैराच्या व विग्रहाच्या भावनेस मान्यता देत नाहीत. भारतीय स्वायत्ततेस महत्त्व देते आणि परंपरांच्या राजकीयीकरणास विरोध करते. नागरी समाजाची सक्रियता त्यास अभिप्रेत आहे. [येरकुंटवार ब. स. भारतीय धारणा समितीच्या प्रज्ञालोक या मासिकात त्यांनी लिखाण केले. पुस्तकाचे नाव नवयुगाची बीजाक्षमे राधेय प्रकाशन, नागपूर १९७८.] त्यामुळे बाबरी मशिदीचे ज्यावेळी विध्वंसन झाले त्यावेळी समितीने त्यास विरोध केला.

नवहिंदुत्ववादाची मांडणी याच दिशेने करण्याचे काम प्रा. श्रीनिवास दीक्षित यांनी केले त्यांनी नवभारतातील एका लेखात त्याबाबतची मांडणी केली. त्यापूर्वी १९७७ साली त्यांनी पुणे विद्यापीठात इहवाद, धर्म व नीती या विषयावर व्याख्यान दिले. गुरुदेव रानडे व्याख्यानमालेत त्यांनी असे मत व्यक्त केले की, हिंदुत्वाच्या वेगवेगळ्या व्याख्या होऊ शकतात त्यात वेगवेगळ्या अर्थच्छटा आहेत. [दीक्षित श्रीनिवास

**इहवाद धर्म व नीती** पुणे विद्यापीठ, पुणे १९७७ पृ. २-४.] याच विषयांची मांडणी तीन वर्षांनंतर त्यांनी केली. त्यांच्या मते त्यांचा हिंदुत्ववाद आर.एस.एस. चा नसून त्याची सर्वोदय व विनोबा यांच्या विचारांशी जास्त जवळीक आहे. त्यांच्या मते हिंदुत्वाला जो प्रादेशिक राष्ट्रीय अर्थ चिकटलेला आहे तो दूर करून त्यास सांस्कृतिक रूप देणे महत्त्वाचे आहे. त्यांचा आक्रमक आणि इतरांचे वैर करणाऱ्या हिंदुत्वावर विश्वास नाही, त्यांच्या मते हिंदुत्व ही दीर्घ अशी सांस्कृतिक परंपरा आहे आणि तिचा राज्यसंस्थेच्या सत्तेच्या राजकारणाशी संबंध नाही. समाजाच्या एकूण सांस्कृतिक उन्नयनासाठी ती आवश्यक आहे. [दीक्षित श्रीनिवास **हिंदुराष्ट्रवाद** नवभारत एप्रिल, १९८०]

नवहिंदुत्ववादाची मांडणी पुन्हा एकदा सुरू झाली कारण त्यामागे प्रस्थापित हिंदुत्वाबद्दल एक प्रकारची अस्वस्थता होती. भाजपने गांधीवादी समाजवादाचा पुरस्कार केला होता. शिवसेनेने आक्रमक धोरण स्वीकारून आपणास शेंडी जानव्यांचे हिंदुत्व मान्य नाही असे सांगितले होते. या काळात प्रा. शेषराव मोरे यांनी सावरकरांचा बुद्धिवाद आणि सावरकरांचे समाजचिंतन या विषयांवर दोन अभ्यासपूर्ण अशी पुस्तके लिहिली. त्यांतून सावरकरांच्या विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादी विचारांचा वारसा, जात आणि वर्ण यांत अडकलेल्या व अध्यात्मवादावर विश्वास ठेवणाऱ्या हिंदुत्ववाद्यांना समजावून सांगण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यांच्या मते सावरकरांच्या हिंदुत्वाचे स्वरूप पुरोगामी होते म्हणून महाराष्ट्रातील बहुजन समाजाने त्याचा अंगीकार करावा. सावरकरांचे विचार धर्मनिरपेक्ष राज्याचा व लोकशाहीचा पुरस्कार करतात. त्यांना वैश्विक बंधुभावाची कल्पना मान्यच आहे. कारण मनुजमंगल म्हणजे सर्व मानवजातीचे कल्याण करण्याचे ध्येय त्यांनी स्वीकारले आहे. [मोरे शेषराव **अप्रिय पण पथ्यकर** पुणे २००७ **सावरकरांचे समाजचिंतन**]

प्रा. स. ह. देशपांडे यांनी त्यांच्या वेगवेगळ्या पुस्तकांतून आणि लेखांतून हिंदुत्ववादी विचार मांडले. त्यांच्या मते गोळवलकरांच्या काळात संघ हा विधायक कार्य हाती घेत नव्हता पण देवरसांनी त्यांत बदल केला त्यामुळे त्यांच्या काळात संघकार्याचा विस्तार झाला. गोळवलकरांच्या अध्यात्मवादामुळे व वर्णव्यवस्था समर्थनामुळे निर्माण झालेली कोंडी सावरकरांच्या विचारांनीच सुटणार होती. डॉ. देशपांडे हे सावरकर प्रणीत सांस्कृतिक हिंदुत्ववादाचे पुरस्कर्ते आहेत. त्यांच्या मते भारताच्या राष्ट्रीयत्वाचे अधिष्ठान चिवट अशी हिंदू परंपरा असून ती प्राचीन काळापासून आहे. तिने भारतीय राष्ट्रास पृथगात्मता प्रदान केली आहे. सावरकरांची पितृभू व पुण्यभूची कल्पना योग्यच आहे. हिंदुस्थानला स्वतंत्र व समृद्ध राष्ट्र बनायचे असेल तर हिंदूंनी विवेकनिष्ठा व विज्ञानवाद यांचा स्वीकार केला पाहिजे. चातुर्वर्ण्य आणि जातिसंस्था यांचे निर्मूलन केले पाहिजे. अध्यात्मवाद आणि त्यातून निर्माण होणारी तुटकपणाची भावना यांचा त्याग केला पाहिजे. इहवाद व धर्मनिरपेक्ष शासन यांचा पुरस्कार केला पाहिजे. सर्वांस समान नागरी कायदा लागू करावा व नागरी समाजात विकासाच्या व नागरी हक्कांच्या चळवळी सुरू करून हिंदुत्ववाद आणखी बळकट पायावर उभा करता येईल. [देशपांडे स. ह. **धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातून हिंदुत्त्वाची मांडणी** राजहंस पुणे २००६.] अशा प्रकारे एक नव्या प्रकारच्या हिंदुत्ववादाची मांडणी शेषराव मोरे व स. ह. देशपांडे यांनी केली.

### आंबेडकरवाद व दलित मुक्तीचे तत्त्वज्ञान

१९६० नंतर महाराष्ट्रात नव्या चळवळी निर्माण झाल्या. १९५६-५७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारा रिपब्लिकन पक्ष स्थापन झाला पण पक्षांतर्गत फुटीमुळे त्यांत अनेक पक्ष आणि उपपक्ष निर्माण झाले. १९५६ साली त्यांनी बौद्धधर्माचा स्वीकार केला. या धर्मांतरातून दलितांना नवी अहिमता प्राप्त होईल आणि सांस्कृतिक स्वातंत्र्याचा लाभ होईल अशी त्यांची त्यामागची भूमिका होती. १९६८-६९ मध्ये भारतात हरितक्रांती झाली आणि ग्रामीण भागात दलित शेतकऱ्यांवर हल्ले व्हावयास

सुरुवात झाली. तामिळनाडूमध्ये किलावेणमणी या गावात २२ दलित शेतमजुरांना जिवंत जाळण्यात आले. १९६६-६७ या दुष्काळ, बेरोजगारी, उपेक्षा आणि भूकमार यामुळे चिडलेल्या नव्या पिढीने दलित पँथर नावाची नवी संघटना स्थापन केली. त्यात नामदेव ढसाळ, राजा ढाले, अर्जुन डांगळे, अरुण कांबळे, रामदास आठवले यांचा व इतर नव्या दमाच्या नेत्यांचा समावेश होता. यातील नामदेव, राजा ढाले, डांगळे हे अव्वल दर्जाचे लेखक व कवी होते. दलित मुक्तीसाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करावा याबाबत त्यांच्यात खोल असे विचारमंथन झाले. या विचारमंथनात डॉ. म. ना. वानखेडे, प्रा. गंगाधर पानतावणे, दया पवार, जे. व्ही. पवार, बाबूराव बागूल, रावसाहेब कसबे आणि गोपाळ गुरू यांच्यासारखे विचारवंत सामील झाले. प्रा. पानतावणे यांनी 'अस्मितादर्श' नावाचे नियतकालिक मोठ्या जोमाने चालवले. श्री. रत्नाकर गणवीर यांनी बाबासाहेबांचे बहिष्कृत भारतातील लेख अभ्यासकांपुढे सादर करून दोन्ही खंडांना अभ्यासपूर्ण अशा प्रस्तावना लिहिल्या.

दलित पँथर व त्यानंतर उदयास आलेल्या चळवळीमध्ये चर्चेचे मुख्यतः तीन मुद्दे होते :—

(१) दलितांच्या सध्याच्या विपन्नावस्थेस भारतातील जातिव्यवस्था व प्रस्थापित नेतृत्व जबाबदार आहे आणि या व्यवस्थेविरुद्ध मोठा लढा उभारणे गरजेचे आहे.

(२) दलितांच्या मुक्तीच्या राजकारणाची मुख्य सूत्रे बाबासाहेबांनी त्यांच्या तत्त्वज्ञानात मांडली म्हणून त्यांचे विचार हे आजचे क्रांतिविज्ञान आहे. त्या विचारांच्या प्रत्यक्ष अमलबजावणीतून आपणास जग बदलण्याचे काम करायचे आहे.

(३) डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान हे क्रांतिविज्ञानच आहे पण दलितांच्या राजकारणाचा विचार करता परिस्थितीत मूलगामी बदल घडवून आणण्यासाठी दलितांना देशातील इतर शोषितांच्या चळवळीशी जोडून घ्यावे लागेल. कारण भारतातील शोषण हे वर्ग जातीय शोषण आहे. डॉ. बाबासाहेबांनी जातीय शोषणाचे प्रत्ययकारक असे विवेचन केले आहे. वर्गीय शोषणाचीपण त्यांना योग्य अशी जाण होती. पण वर्गीय शोषणाचा अंत करण्यासाठी त्यास कार्ल मार्क्सच्या विचारांची जोड घ्यावी लागेल. त्यासाठी डाव्या चळवळीने दलितमुक्तीचा कार्यक्रम अग्रक्रमाने हाती घेणे गरजेचे आहे. त्यामुळे मार्क्स आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांत समन्वय होऊ शकतो. डॉ. रावसाहेब कसबे यांनी 'डॉ. आंबेडकर आणि मार्क्स' हा ग्रंथ लिहून या विषयास वाचा फोडली. [कसबे रावसाहेब, **आंबेडकर आणि मार्क्स** सुगावा, पुणे १९८५]

बाबासाहेबांचे विचार क्रांतिकारक असून ते मुक्तीचे तत्त्वज्ञान यशस्वीरीत्या मांडतात. भारतातील कम्युनिस्ट चळवळ उच्चवर्णीय नेत्यांच्या हाती होती आणि हे नेते कामगार चळवळीतील जातीवाद संपवू शकले नाहीत. १९५२ च्या लोकसभा निवडणुकीत कम्युनिस्टांच्या नकारार्थक धोरणांमुळे बाबासाहेबांना पराभवास तोंड द्यावे लागले. भारतातील जाती आणि तिच्यातून निर्माण झालेले सामाजिक आणि सांस्कृतिक वर्चस्व यामुळे भारतात मूलगामी परिवर्तन होणार नाही. केवळ आर्थिक बदलामुळे मूलगामी सामाजिक बदल होणार नाहीत.

अनुक्रमणिका

## शेतकरी संघटनेचे तत्त्वज्ञान

१९७८-७९ मध्ये भारतात शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेने स्वतंत्र अशी शेतकरी चळवळ सुरू केली. या चळवळीने एक दशकभर मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांत जागृती केली व या चळवळीत लाखो लोक सामील झाले. या चळवळीचे तत्त्वज्ञान संघटनेचे नेते शरद जोशी यांनी विकसित केले. त्यांच्या मते भारतात भारत विरुद्ध इंडिया असे विभाजन असून इंडिया सातत्याने भारताचे शोषण करीत आहे. भारतात सत्ताधारी वर्ग शेतीचा स्वतंत्र विकास होऊ देत नाही. शेतीतून निर्माण झालेला प्राथमिक धनसंचय औद्योगिक विकासासाठी वापरला जातो. बाजारपेठेत चलाखीने वापर करून सत्ताधाऱ्याच्या किंमतीवर नियंत्रण ठेवले जाते. बाजारपेठेत व्यापारशर्ती शेतकऱ्यांच्या विरोधी आहेत. आयात निर्यातीचे धोरण शेतकऱ्यांचे नुकसान करणारे आहे. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी शेतीचा विकास होणे गरजेचे आहे पण भारतात शेतीत गुंतवणूक होत नाही. विषम व्यापार शर्तींमुळे शेती करणे फायद्याचे नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी संघटित होऊन बाजारपेठेत आणि सरकारकडून योग्य व किफायतशीर बाजारभाव मिळवले पाहिजेत. शेतकऱ्यांचे हजारो कोटी रुपये त्यांच्यापासून लांबवले जात आहेत. मार्क्सला कामगारांच्या शोषणातून निर्माण झालेले अतिरिक्त मूल्य दिसले पण शेतकऱ्यांच्या शोषणातून निर्माण झालेले अतिरिक्त मूल्य त्यास दिसले नाही. या काळात जोशींनी विविध सुधारणांचा पुरस्कार केला आणि आपल्या 'चांदवडची शिदोरी' या पुस्तकात स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. म. फुले यांनी शेतकऱ्यांच्या व स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न योग्यरीत्या समजावून घेतला म्हणून त्यांनी त्यास शतकाचा मुजरा केला. [जोशी शरद **इंडिया विरुद्ध भारत** शेतकरी संघटना, पुणे १९८६]

## पर्यावरणवादी विचार

पर्यावरणाच्या संरक्षणाचा प्रश्न हा एक महत्त्वाचा प्रश्न बनला कारण सध्याच्या विकासाच्या प्रतिमानामुळे पर्यावरणाच्या प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला. विकासाच्या प्रश्नाची दुसरी बाजू मांडण्याचे काम पर्यावरणवादी चळवळीने केले आणि महाराष्ट्रात मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या 'नर्मदा बचाव' चळवळीने हा प्रश्न उचलून धरला. या चळवळींनी विकासाची पद्धत, तिच्या लाभाचे होणारे विषम वाटप, मोठ्या प्रकल्पामुळे लाखो विस्थापितांची ससेहोलपट, जंगलांचा व जंगलात राहणाऱ्या आदिवासी संस्कृतीचा व जंगलातील औषधी वनस्पतींचा नाश, पशुपक्ष्यांचा नाश आणि मोठ्या धरणामुळे भूकंप, महापूर आणि पाणी साचून हजारो एकर जमीन खारपड होण्याची भीती इत्यादी प्रश्न उपस्थित केले आणि त्यांनी पर्यायी विकासनीतीची कल्पना मांडली. पाटकरांच्या चळवळीने अहिंसात्मक सत्याग्रहाचे काही नवे प्रयोग केले. अनेक प्रकारचे सत्याग्रह त्यांनी केले. या सत्याग्रहांचे विश्लेषण 'समकालीन सत्याग्रहाची काही नवी रूपे' या पुस्तकात या चळवळीतील एक ज्येष्ठ कार्यकर्ते संजय संगवाई यांनी केले. [संगवाई संजय **समकालीन सत्याग्रहाची नवी रूपे** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर २००४.] भोपाळच्या वायू दुर्घटनेनंतर बहुराष्ट्रीय कंपन्यांची नफेखोरी आणि मानवी जीविताबद्दल त्यांना असणारी अनास्था आणि औद्योगिकरणाचे पर्यावरणावर होणारे भीषण परिणाम आपल्यासमोर आले होते. त्यामुळे पर्यावरणवादी चळवळींनी जनतेच्या लोकशाही अधिकारांचा प्रश्न हाती घेतला व सामाजिक व राजकीय समतेचा आग्रह धरला. शेतीसाठी समान पाणी वाटपाची कल्पना त्यातूनच निघाली.

प्रस्थापित भांडवलशाही विकासनीती ही शोषणाच्या तत्त्वावर आधारलेली असून तिला स्वार्थासाठी नैसर्गिक कंपनीचे दोहत करायचे आहे. त्यामुळे या आंदोलनांनी पर्यायी विकासनीती विकसित केली. त्यात मानवी हक्क व जनतेची प्रतिष्ठा, पर्यावरणीय निरंतरता, समता व लोकशाही, उत्पादन, उत्पादन साधने व

अनुक्रमणिका

त्यांच्यावरील सामुदायिक अधिकार, त्यांच्या वितरणपद्धतीत मूलगामी बदल करणे, स्थानिक साधनांचा स्थानिक उपयोगासाठी वापर आणि सत्तेचे विकेंद्रीकरण यांचा समावेश होतो. आंदोलनाला समतेचा व स्वातंत्र्याचा परीघ सातत्याने विस्तृत करावयाचा आहे. या आंदोलनातील एक विचारवंत, श्री. संजय संगवाई यांच्या मते आपल्या जीवनाशी निगडित आपल्या परिसरातील विकासाबाबतच्या प्रश्नांच्या नियमनात, परिसरांतील लोकांचा वाटा असावा व त्यात त्यांना वाव मिळावा हे विकेंद्रीकरण शोषित समुदायांच्या सबलीकरणासाठी व शेतकरी कष्टकरी यांना अधिकार देण्यासाठी गरजेचे आहे. शाश्वत देशी अर्थशास्त्र, ज्ञानाची बहुलता, सम्यक जीवनशैली, अहिंसा व नवा आंतरराष्ट्रीय वाद ही पर्यावरणवादाची सूत्रे असून म. गांधी व म. फुले यांच्या मार्गाने पुढे जाण्याचा विचार त्यात आहे. [**महाराष्ट्रातील पर्यायी विकासाच्या चळवळी** पृ. ८६-११० **बदलता महाराष्ट्र** भोळे बेडकाहाळ (सं) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी सातारा २००३.]

चिरंजीवी किंवा निरंतर विकासाची कल्पना आपल्या डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात लिखाण झाले. श्री. वसंत पळशीकर यांनी या विषयावर विपुल लिखाण केले आहे. पळशीकरांच्या मते आधुनिक विकास प्रक्रियेचे वळण विनाशकारक आणि म्हणून त्याचा मूलगामी पुनर्विचार झाला पाहिजे. गेल्या काही दशकांत तंत्रविज्ञानाचा अशा प्रकारे विकास झाला, की मूठभर अभिजनांनी त्यावर ताबा मिळवून विकास प्रक्रिया राबवली. सर्वसाधारण लोकांनी मनाने तंत्रविज्ञानाची गुलामी पत्करून त्याचा वरचष्मा स्थापन होण्यास मदत केली. गेल्या अनेक वर्षांत तंत्रविज्ञानाची वरच्याप्रमाणे वाटचाल करीत देशाने वाटचाल केली. नवी राज्ये ही राष्ट्रराज्ये असून त्याची मूळ बैठकच विषमतेचे पोषण करणारी आहे. त्यात सत्ता, मत्ता व प्रतिष्ठा यांचे केंद्रीकरण व हिंसात्मक स्पर्धा यांचा समावेश होतो. पर्यावरणाच्या संरक्षणास अनुकूल ठरेल आणि चिरंजीवी विकासाची प्रक्रिया गतिमान करेल असा कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. त्यात भारतीय खेड्यांच्या विकासास मध्यवर्ती स्थान देणे गरजेचे आहे. ते लिहितात, खेड्यांना मध्यवर्ती ठेवून निसर्गव्यवस्थेची जीवनधारणा क्षमता वाढवणे, सर्व प्रौढ व सक्षम पुरुषांना अर्थपूर्ण रोजगार देणे, त्यांचे जीवनमान उंचावणे, जे. ज्या परिसरात राहतात तो परिसर निकोप, शुद्ध आणि प्रसन्न बनवणे अशा अनेक गोष्टी साध्य करायच्या आहेत. [पळशीकर वसंत **आधुनिक विकास प्रक्रियेचे विनाशकारी वळण व पुनर्विचाराची दिशा** ४६-५६, नवभारत खंड ५९, अंक ४-७ जाने-एप्रिल २००६.] डॉ. माधव गाडगीळ यांनी पर्यावरणाचा ऱ्हास घडविणाऱ्या जनहितविरोधी विकासनीतीस विरोध केला. त्यांच्या पर्यायी विकासनीतीतील पर्यावरणाच्या दृष्टीने चिरस्थायी विकासनीतीचे अवलंबन करणे, सामाजिक क्षमता वाढवणे, स्थानिक समुदायांना त्यांचे भवितव्य ठरवण्याचा अधिकार देणे व त्यांना आर्थिकदृष्ट्या सबल बनवणे आवश्यक आहे. त्यासाठी गावसमुदायाकडे व्यवस्थापन देणे गरजेचे आहे. [गाडगीळ माधव **पर्यावरणाचा ऱ्हास घडविणारा जनहितविरोधी विकासाचा नमुना**, पृ. ५७-६५.]

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात पर्यावरणवादाची मांडणी वेगवेगळ्या सामाजिक चळवळींनी केली. त्यात स्त्रिया, दलित, आदिवासी, मागास जाती आणि वंचित वर्ग यांच्या ज्या समस्या आहेत त्यांची विस्ताराने चर्चा करण्यात आली. नवसमाज निर्मितीचा पर्यायी कार्यक्रम आखण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

## समारोप

गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्रात कशा प्रकारचे तत्त्वज्ञान लिहिले गेले आणि कशाप्रकारचा तत्त्वविचार मांडण्यात आला याचे वर ढोबळ असे विवेचन करण्यात आले आहे. या तत्त्वविचारावर जगभर चाललेल्या तत्त्वमंथनाचा व चळवळींचा ज्याप्रमाणे प्रभाव होता त्याचप्रमाणे भारताच्या इतर भागात चाललेल्या तत्त्वमंथनाचा पण प्रभाव होता. अनेक बाबतीत महाराष्ट्रीय विचारवंत देशपातळीवरही आपले विचार

अनुक्रमणिका

मांडीत होते. या काळात तीन महत्त्वाचे बदल तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात झालेले आपणास दिसतात; हे बदल खालीलप्रमाणे :—

(१) महाराष्ट्रात वेगवेगळ्या महाविद्यालयांतून व विद्यापीठांतून तत्त्वज्ञानाचा अधिक शास्त्रशुद्ध आणि पद्धतशीर असा अभ्यास सुरू झाला. त्यादृष्टीने नियतकालिके सुरू झाली.

(२) भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास काही विद्यापीठांत होत राहिला तरी महाराष्ट्रात संस्कृत विद्येचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला. त्यामुळे एकेकाळी या क्षेत्रात सर्वात पुढे असणारा प्रांत आज मागे पडला व तत्त्वज्ञानाच्या अभ्यासावर त्याचा परिणाम झाला.

(३) गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्रात जे सामाजिक बदल झाले त्याचा परिणाम तत्त्वविचारांवर झाला. सामाजिक चळवळींनी तत्त्वचिंतनाच्या क्षेत्रात चांगल्या प्रकारचे योगदान दिले.

तत्त्वचिंतन हे अंतिमतः समाजाच्या गरजांशी जोडलेले असते आणि समाजात जसजसा बदल होत जातो तसतसा तत्त्वचिंतनातही बदल होतो. गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्रात जे सामाजिक बदल झाले त्याचा तत्त्वचिंतनावर परिणाम झाला. त्याच्या आधारे महाराष्ट्रातील तत्त्वचिंतनाच्या मांडणीचे खालील तीन टप्प्यात विभाजन करता येईल :—

(१) यातील पहिला टप्पा १९६० ते १९८० या वीस वर्षांचा होता. या काळात यापूर्वीच्या विचारांचा व चळवळींचा जोर कायम होता. प्रा. बेडेकर, प्रा. रेगे, तर्कतीर्थ जोशी, प्रा. अ. भि. शहा, हमीद दलवाई, नरहर कुरुंदकर यांनी या काळात विपुल असे वैचारिक लेखन केले. प्रा. बेडेकरांनी धर्मश्रद्धेचा पुनर्लाभ या विषयावर केलेले विवेचन नवे होते. या काळातील विवेचनात धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद आणि इहवादी शासनव्यवस्था याबाबत मोठ्या प्रमाणात लिखाण झाले.

(२) वैचारिक वङ्मयाचा दुसरा टप्पा १९८०-२००० हा वीस वर्षांचा काळ होता. या काळात अनेक मोठ्या सामाजिक व राजकीय चळवळी झाल्या. शरद जोशी यांनी काँग्रेसच्या धोरणांवर केलेले प्रहार आणि शरद पाटील यांनी माफुआची व सकपची स्थापना करीत असताना कम्युनिस्टांवर केलेली टीका लक्षवेधक ठरली. या काळात म. फुले यांच्या विचारांची नवी मांडणी करण्यात आली व त्यादृष्टीने जोतीराव हे महाराष्ट्राचे संस्कृतिपुरुष ठरले. जोतीरावांच्या कामात साथ देणाऱ्या व त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे काम पुढे नेणाऱ्या त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांना पण याच काळात मानाचे स्थान प्राप्त झाले. नव्या पर्यावरणवादाचा विचारदेखील याच काळात मांडला जाऊ लागला. डॉ. आंबेडकरांच्या विचारांची नव्याने चिकित्सा करून मार्क्स व आंबेडकर यांच्या विचारांचा समन्वय करण्यात यावा असे मत मांडण्यात आले.

(३) तिसरा टप्पा २००० पासून सुरू झाला असून त्यात जागतिकीकरणाने व उदारीकरणाने समाजापुढे जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यांचा विचार करण्यात येत आहे. या काळात राज्य पुरस्कृत नोकऱ्यांचा प्रभाव कमी झाला. खाजगी नोकऱ्यात वाढ झाली. लाखोंच्या

संख्येने सुशिक्षित महाराष्ट्रीय पाश्चात्त्य देशात नोकरी करण्यास गेले आणि जगण्यासाठी जो संघर्ष केला जात आहे त्यात अस्तित्त्वभान तीव्र झाले. या काळातील तत्त्वविचारांचे वैशिष्ट्य म्हणजे म. गांधीचा विचार पुन्हा जास्त गंभीरपणे मांडला जाऊ लागला. त्यामुळे मार्क्स व गांधी यांच्या तुलनात्मक अभ्यासाबरोबरच गांधी-आंबेडकर यांच्या तुलनात्मक अभ्यासास सुरुवात झाली असून गांधीविचारांचा जास्त गंभीरपणे अभ्यास करण्यात येत आहे. स्त्रीवाद, पर्यावरणवाद, बहुसंस्कृतिवाद यांवर त्यांचा प्रभाव जाणवत असून नव्याने काही विचारांची मांडणी केली जात आहे.

गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्रात वेगवेगळ्या तत्त्वविचारांचे व तत्त्वज्ञानांचे मंथन झाले. या विचारांवर पाश्चिमात्य देशात झालेल्या तत्त्वचर्चेचा मोठा प्रभाव होता. त्याचप्रमाणे देशासमोर जे तात्त्विक प्रश्‍न निर्माण झाले, ज्या वैचारिक दुविधा निर्माण झाल्या त्याबाबतच्या चर्चांचाही त्यात समावेश होता. बहुतेक विचार भाष्यरूपाने मांडण्यात आले. मार्क्स, फुले, आंबेडकर, सावरकर, आगरकर, म. गांधी यांच्या विचारांवर भाष्य करीत असताना नवे विचार मांडण्यात आले. या काळातील मांडणीत आचार्य विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, शरद जोशी, शरद पाटील यांनी मांडलेले विचार अभ्यासाला नवी दिशा देणारे होते. त्याचप्रमाणे प्रा. दि. के. बेडेकर, प्रा. मे. पुं. रेगे आणि श्री. वसंत पळशीकर यांनी उल्लेखनीय असे लिखाण केले आणि अनेक महत्त्वाचे प्रश्‍न चर्चेस घेतले. त्यामुळे त्यांनी दिलेले योगदानही महत्त्वाचे आहे.

अनुक्रमणिका



**न्या. नरेन्द्र चपळगावकर**

ज्येष्ठ विधीज्ञ म्हणून प्रसिद्ध असलेले न्या. नरेन्द्र चपळगावकर यांनी काही काळ मराठी व कायद्याचे अध्यापन केले आहे. मुंबई उच्च न्यायालयात ९ वर्षे न्यायाधीश म्हणून त्यांनी काम पाहिले. मराठी समाजजीवन, साहित्य, राजकारण आणि न्यायकारण या विषयांवरील गाढे अभ्यासक. या विषयांवर विपुल लेखन. महाराष्ट्र शासनाने माहितीचा कायदा तयार करण्यासाठी नेमलेल्या समितीचे सभासद. सामाजिक उत्तरदायित्व, कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्षपद भूषविले. मराठवाडा साहित्य परिषद आणि भारतीय जलसंस्कृती मंडळ (औरंगाबाद), राजवाडे संशोधन मंडळ (बीड), कुसुमाग्रज प्रतिष्ठान (नाशिक), प्राज्ञ पाठशाळा मंडळ (वाई) या संस्थांचे विश्वस्त पदाधिकारी आणि सदस्य म्हणून वेळोवेळी काम केले. अनेक ग्रंथ वेगवेगळ्या पुरस्कारांनी सम्मानित. माजलगाव येथे २००५ साली भरलेल्या २६ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले. सध्या ते राज्य शासनाच्या मराठी भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

---

पत्ता : १३, जयनगर, दशमेश नगरजवळ, औरंगाबाद ४३१ ००५.
भ्रमणध्वनी.—९४२२७१२१२१

---

## प्रारंभीची न्यायव्यवस्था

**निः**स्पृहता आणि निर्भयता हे न्यायाधीशाचे आणि न्यायसंस्थेचे सर्वाधिक महत्त्वाचे गुण मानले जातात. महाराष्ट्राच्या संस्कृतीत न्यायसंस्थेने आपल्या एका प्रसिद्ध उदाहरणाने या गुणांना अधोरेखित केले. पेशवाईतील राघोबादादांच्या काळात रामशास्त्री प्रभुणे या न्यायाधीशांनी प्रत्यक्ष धन्याला देहांत प्रायश्चित सांगण्याची हिंमत केली आणि आपले नाव न्यायसंस्थेच्या इतिहासात अजरामर केले. मध्ययुगीन राजेशाहीत न्यायाधीशसुद्धा प्रत्यक्षात आपल्या चरितार्थासाठी राज्यकर्त्यांवरच अवलंबून असल्यामुळे त्याला अशी निःस्पृहता दाखवणे महागात पडत होते. रामशास्त्री प्रभुण्यांनी स्वतःच्या जागेवर आणि मानमरातबावर पाणी सोडण्याची तयारी ठेवूनच हे पाऊल उचलले होते. 'रामशास्त्री बाणा' हे विशेषण न्यायक्षेत्रातच नव्हे तर कोणत्याही क्षेत्रांत निर्भयता आणि निःस्पृहता वर्णन करण्यासाठी मराठी भाषेत वापरले जाते. मानवी जीवनातील उदात्ततेने, अत्युच्च त्यागाने आणि मूल्यनिष्ठेने संस्कृती घडत असते. महाराष्ट्राची न्यायसंस्कृती ज्यांनी घडवली त्यात रामशास्त्री प्रभुण्यांचे नाव म्हणूनच अग्रक्रमाने घ्यावे लागते.

मराठी राज्यामध्ये आज अस्तित्वात आहेत तशी तालुकानिहाय न्यायालये, जिल्हानिहाय न्यायालये आणि लिखित स्वरूपाचे सर्व गुन्ह्यांची व दिवाणी व्यवहारांची व्याख्या करणारे, गुन्ह्यासाठी निश्चित शिक्षा सांगणारे व दिवाणी व्यवहाराचे परिणाम सांगणारे कायदे अस्तित्वात नव्हते. न्याय हा पुष्कळसा परंपरांच्या आधारावर व विवेकाच्या साक्षीने दिला जात असे. न्याय देणारी वेगळी संस्था ग्राम किंवा परगणास्तरावर अस्तित्वात नसल्यामुळे न्यायदानाचे काम विविध मुलकी आणि फौजदारी अधिकारी व वेगवेगळे वतनदार करीत असत. गोतपंचायत, काजी, हकीम, फौजदार, कोतवाल, अमीन, दिवाण, जहागीरदार, सरदार, देशमुख, पाटील असे अनेक अधिकारी आपल्यासमोर आलेल्या खटल्यात न्याय देत असत. त्यांच्या त्यांच्या प्रभावक्षेत्रापुरते त्यांच्या न्यायाधिकाराचे क्षेत्रही मर्यादित असे. त्यांच्या न्यायबुद्धीवर होणारा न्याय अवलंबून असे. विशिष्ट तंट्याबाबत निवाडा करण्याचा त्यांना मिळणारा अधिकार दोन्ही पक्षकारांच्या संमतीने मिळालेला असे.

जी प्रकरणे न्यायासाठी येत असत त्यात वतनाच्या अधिकारांची वाटणी, पोळ्याच्या दिवशी कोणाचा बैल अगोदर जावा असल्या मानापानाची भांडणे, देणे-घेणे, जमिनीच्या हद्दीचे वाद अशा अनेक दिवाणी बाबी व हत्या अगर चोरीसारखे गुन्हे असत. वादी-प्रतिवादींना पुरावा देण्याव्यतिरिक्त काही वेळा रवादिव्यासारखे दिव्यही करण्याची मुभा होती. रवादिव्य म्हणजे तापलेल्या तेला-तुपामधून नाणे किंवा अंगठी काढणे. वेगवेगळ्या फौजदारी गुन्ह्यासाठी वेगवेगळे दंड केल्याची उदाहरणे तत्कालीन कागदपत्रांतून शोधून 'पेशवाईतील न्यायदान' या आपल्या पुस्तकात मधुकर कुलकर्णी यांनी सांगितली आहेत. तट्टू चोरण्याबद्दल दीडशे रुपये दंड, गावच्या कामगार महाराला मारहाण केल्याबद्दल पन्नास रुपये दंड, बापाने रागाच्या भरात मुलाला तप्त सळईने डागल्याबद्दल पंचाहत्तर रुपये दंड तर शेतातील भाजी चोरल्याबद्दल पाच रुपये दंड झाल्याची उदाहरणे त्यांनी दिली आहेत. गावातील गुन्ह्याचा छडा लागला नाही तर त्याबद्दल गावचा पाटील आणि वतनदार महार यांना बोल लागत असे, कारण गुन्ह्याचा तपास करण्याची जबाबदारी त्यांची असे. गुन्हेगार सापडल्यास त्याला वेताने मारणे, धिंड काढणे, दंड करणे अगर तीर्थयात्रेला पाठवणे अशा वेगवेगळ्या शिक्षा गुन्ह्याच्या स्वरूपानुसार दिल्या जात असत. व्यवसाय ज्ञातीपरंपरेप्रमाणेच करावे लागत. प्रायश्चित्त ही शिक्षा तर होतीच, शिवाय प्रायश्चित्त ते घेणाऱ्याची आत्मशुद्धी करणारे आहे असे मानले जाई. प्रायश्चित्ताच्या मागे शासनाबरोबर समाजाचीही दंडशक्ती उभी असे. प्रायश्चित्त न घेतल्यास सामाजिक बहिष्काराला तोंड द्यावे लागे.

महाराष्ट्रात इंग्रजी राज्य १९ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात प्रस्थापित झाले, परंतु तत्पूर्वी ते मुंबई बेटात बराच काळ अस्तित्वात होते. पोर्तुगीजाकडून ब्रिटिशांना आंदण मिळालेल्या या बेटात ८ ऑगस्ट १६७२ रोजी एका न्यायालयाचे उद्‌घाटन झाले त्यावेळी मुंबईचा गव्हर्नर आणि नवनियुक्त न्यायाधीश हे इतर अधिकाऱ्यांबरोबर घोड्यावर स्वार होऊन मिरवणुकीने कोटातून कोर्टाच्या इमारतीकडे गेले. मिरवणुकीतील इतर मंडळी पायी चालत होती व त्यात वकीलही होते. १७२६ साली मेयर्स कोर्ट, १७९८ मध्ये रेकॉर्ड्स कोर्ट अशी विविध न्यायालये भारतावर राज्य करणाऱ्या इस्ट इंडिया कंपनीने मुंबई शहरात स्थापन केली होती. १८२४ मध्ये सुप्रीम कोर्ट हे इंग्लंडच्या राजसत्तेचे प्रदत्त न्यायालय मुंबईत अस्तित्वात आले. कंपनीने नेमलेल्या कनिष्ठ न्यायाधीशांच्या न्यायनिर्णयांचे पुनरावलोकन करता यावे, त्याविरुद्ध अपील करता यावे म्हणून सदर दिवाणी अदालत आणि सदर फौजदारी अदालत अशी दोन न्यायालये स्थापन झाली होती. कंपनीचे राज्य विस्तारित होत गेल्यावर मुंबई बाहेरील प्रकरणांची अपिलेसुद्धा या न्यायालयासमोर येऊ लागली.

अनुक्रमणिका

या कालखंडात फारच थोडे अस्तित्वात होते. हिंदू आणि मुस्लीम यांना त्यांच्या धर्मशास्त्राप्रमाणे न्याय दिला जावा हे तत्त्व ब्रिटिश न्यायव्यवस्थेने मान्य केले होते. जेथे वादी व प्रतिवादी वेगवेगळ्या धर्माचे असतील तेथे प्रतिवादीच्या धर्मनियामांप्रमाणे त्यांच्यातील दिवाणी प्रकरणाचा न्याय करावा असा एक दंडक अस्तित्वात असलेला दिसतो. मुंबई शहरात सुप्रीम कोर्टासारखी ब्रिटिश राणीची न्यायालये आणि इस्ट इंडिया कंपनीची इतर न्यायालये अशी दुहेरी न्यायव्यवस्था काही दिवस अस्तित्वात होती. १८५७ च्या बंडानंतर व्हिक्टोरिया राणीने जेव्हा भारताचा राज्यकारभार प्रत्यक्ष हातात घेतला त्यावेळी हे दुहेरीपण संपुष्टात आले. तालुक्याच्या पातळीवर कनिष्ठ न्यायालय, जिल्ह्याला एक जिल्हा न्यायालय अशी व्यवस्था हळूहळू अमलात आली. १८६१ साली Indian High Courts Act संमत झाला आणि १८६२ पासून मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथे उच्च न्यायालये स्थापन झाली. महाराष्ट्रातील जिल्हा व तालुकास्तरावरील न्यायव्यवस्थेची देखरेखही मुंबई उच्च न्यायालयाच्या कक्षेत आली. पुढे १९३२ च्या सुमाराला नागपूर येथे उच्च न्यायालय स्थापन झाल्यानंतर मध्यप्रांत आणि वऱ्हाड यांच्या न्यायव्यवस्थेची देखरेख नागपूर उच्च न्यायालय करू लागले. हैदराबाद संस्थानात हैदराबाद येथे उच्च न्यायालय व संस्थानातील सर्वोच्च समजले जाणारे न्यायालय म्हणजे ज्युडिशियल कमिटी काम करीत असे. मराठवाड्यातील न्यायव्यवस्थेची देखरेख हैदराबाद संस्थान विलीन होऊन व नंतर राज्य पुनर्रचनेमुळे मराठवाडा मुंबई राज्यात सामील होईपर्यंत हैदराबादचे उच्च न्यायालय आणि निजामाची ज्युडिशियल कमिटी करीत असत.

ब्रिटिश सरकारने नेमलेल्या विधी आयोगाने जीवनव्यवहाराच्या वेगवेगळ्या क्षेत्राबद्दल महत्त्वाचे कायदे करण्याला प्रारंभ केला. सिव्हिल प्रोसिजर कोड, क्रिमिनल प्रोसिजर कोड, भारतीय दंडसंहिता, पुराव्याचा कायदा, कराराचा कायदा, संपत्ती विनिमयाचा कायदा असे अनेक कायदे तयार होऊन अमलात आले. शिवाय सतीबंदीचा कायदा आणि विधवांच्या पुनर्विवाहाला कायदेशीर ठरवणारा कायदा असे काही सामाजिक सुधारणांना राजमान्यता देणारे कायदेही अस्तित्वात आले. यातील बहुतेक कायदे केंद्रीय विधिमंडळाने केलेले होते व त्यांचा अमल ब्रिटिश भारताच्या इतर प्रांतांप्रमाणेच महाराष्ट्रातही सुरू झाला आणि सुसंघटित न्यायालये आणि त्यांच्यासाठी लिखित नियम सांगणारे वेगेवेगळे कायदे अशी एक न्यायव्यवस्था अमलात आली. महाराष्ट्रात या काळात तालुका न्यायालये आणि जिल्हा न्यायालये मोठ्या संख्येने स्थापन झाली. लिखित स्वरूपाच्या कायद्यानुसार न्याय देणारा सरकारचा पूर्णवेळ नोकर असलेला न्यायाधीश लोकांना उपलब्ध झाला. न्यायाधीशाचा धर्म कोणताही असला तरी त्याला सर्व धर्माच्या पक्षकारांचा न्याय करण्याचा अधिकार मिळाला या दृष्टीने न्यायसंस्था धर्मनिरपेक्ष (Secular) झाली.

मुंबई उच्च न्यायालय स्थापन झाल्याबरोबर मुंबई शहरात पूर्वी अस्तित्वात असलेले सुप्रीम कोर्ट बरखास्त झाले. सुप्रीम कोर्टाला उच्च न्यायालयाप्रमाणेच वेगवेगळे रिट किंवा विशेषादेश जारी करण्याचा अधिकार होता; मात्र त्यांचे भौगोलिक अधिकारक्षेत्र मुंबई बेटापुरतेच मर्यादित होते. याचवेळी इस्ट इंडिया कंपनीने स्थापिलेल्या सदर फौजदारी आणि सदर दिवाणी अदालतीही संपुष्टात आल्या. त्यांच्याकडे पूर्वी असलेले अपिल ऐकण्याचे अधिकार उच्च न्यायालयाला मिळाले. मुंबई उच्च न्यायालयाचा प्रारंभ सात न्यायाधीशांनी झाला आणि सुमारे साठ वर्षे तीच संख्या कायम होती.

महाराष्ट्रात ज्यांचे अधिकारक्षेत्र होते अशी काही मोठी संस्थाने होती. या संस्थानांना स्वतःची न्यायव्यवस्था ठेवण्याचे अधिकारही होते. हैदराबादचा निजाम (महाराष्ट्रातील मराठवाडा भागावर त्याची सत्ता होती) किंवा कोल्हापूरचे छत्रपती यांना आपल्या अधिकारक्षेत्रात उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय दोन्हींचे अधिकार असणारी न्यायालये चालवता येत होती. निजामाने सर्वसाधारणपणे इंग्रजी

अनुक्रमणिका

कायद्याचे अनुकरण करणारे व काही किरकोळ बदल करणारे कायदे उर्दूत तयार केले होते. हैदराबादचा निजाम उर्दूतच आपला सर्व कारभार चालवत असला, तरी कोल्हापूर व बडोदा या संस्थानांत लोकभाषेत कायदे किंवा हुकूम केले जात व न्यायालयाचे कामकाजही लोकभाषेत चालवले जाई.

**मुंबई उच्च न्यायालय**

मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना इंग्लंडच्या राणीच्या सनदेने १४ ऑगस्ट १८६२ रोजी झाली. मुंबईतील पूर्वीच्या सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश सर मॅथ्यू सॉस हेच मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले मुख्य न्यायाधीश म्हणून नेमले गेले होते. सात न्यायाधीशांपैकी प्रारंभी कोणीही भारतीय न्यायाधीश नव्हता. बॅरिस्टर झालेली युरोपीय मंडळी पूर्वीच्या सुप्रीम कोर्टात वकिली करीत होती. ती आता उच्च न्यायालयात वकिली करू लागलेली होती. भारतात काम करायचे आणि व्यवसायातून निवृत्त होताना इंग्लंडला परत जायचे असा बहुतेकांचा आयुष्यक्रम होता. प्रारंभकाळात बॅरिस्टर नसलेले परंतु वकिलीची सनद घेतलेले भारतीय वकील उच्च न्यायालयापुढे अपीलशाखेत (Appellate side) काम करीत; पण त्यांचीही संख्या फार थोडी होती. उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेकडे (Original side) ज्यांनी आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला अशा वकिलात बद्रुद्दीन तय्यबजी, काशीनाथ त्रिंबक तेलंग, बॅ. इन्व्हेरॅरिटी, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, चिमणलाल सेटलवाड, दाजी आबाजी खरे, महंमद अली जिना, भुलाभाई देसाई, मुकुंदराव जयकर, आदींचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. ॲडव्होकेटची परीक्षा पास होऊन उच्च न्यायालयातील मूळ शाखेत वकील म्हणून ज्यांनी नोंदणी केली त्यात बाळ मंगेश वागळे आणि महादेव गोविंद रानडे हे प्रथम होते. खानदेशात कनिष्ठ न्यायाधीश असलेल्या जनार्दन वासुदेवांना जून १८६४ मध्ये काही दिवस उच्च न्यायालयाचे कार्यवाहक न्यायाधीश म्हणून नेमण्यात आले होते. त्यांच्यानंतर नानाभाई हरिदास यांना कार्यवाहक न्यायाधीश म्हणून नेमले गेले. १८७३ ते १८८४ अशी सुमारे अकरा वर्षे थोड्या थोड्या कालावधीसाठी कार्यवाहक न्यायाधीश म्हणून काम केल्यानंतर १८८४ मध्ये नानाभाईंची मुंबई उच्च न्यायालयाचे कायम न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. या उच्च न्यायालयाचे ते पहिले भारतीय कायम न्यायाधीश. १८८९ पर्यंत म्हणजे पाच वर्षे त्यांनी त्या नात्याने काम केले.

नानाभाईंनी मुंबईतील विधी विद्यालयात कायद्याचे अध्यापक म्हणून काम केले होते. तसेच त्यांना वकिलीचाही दीर्घकाळाचा अनुभव होता. युरोपियनांच्यावरचे खटले भारतीय न्यायाधीशांसमोर न चालवता ते युरोपियन न्यायाधीशासमोरच चालावेत अशी पूर्वीची वंशवादी तरतूद बदलण्याचा प्रयत्न इल्बर्ट बिलाने केला. या बिलाला ॲंग्लो इंडियन समुदायाने तीव्र विरोध केला होता. माण नानाभाईंनी न्यायव्यवस्थेतील हा भेद नष्ट करू पाहणाऱ्या या बिलाला लेखी पाठिंबा दिला होता.

१८८९ मध्ये नानाभाईंच्या मृत्युनंतर मुंबई उच्च न्यायालयात रिकाम्या झालेल्या जागेवर त्याच न्यायालयात काम करणारे एक वकील काशीनाथ त्रिंबक तेलंग यांची नेमणूक करण्यात आली. या नेमणुकीच्यावेळी तेलंगांचे वय अवघे ३९ वर्षांचे होते. उच्च न्यायालयात नियुक्ती होण्यापूर्वी तेलंगांना अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशाची जागा देऊ करण्यात आली होती. ती त्यांनी नाकारली होती. हिंदू कायद्याचे तेलंग हे एक तज्ज्ञ मानले जात. तेलंग वकिली करीत असताना ज्या प्रकरणात ते वकील नसत त्या प्रकरणातही हिंदू कायद्यासंबंधी एखादा गुंतागुंतीचा प्रश्न निर्माण झाला तर तेलंगांना न्यायालयात सुनावणी चालू असताना बोलावून त्यांचे मत विचारण्यात येई. त्यावेळी संस्कृत संहितांच्या आधारे हिंदू कायदा अमलात आणावा लागे. या संहितांची थोडी इंग्रजी भाषांतरे उपलब्ध असली तरी विविध

संहितांतील फरक व त्यावरील विविध टीका यांचा विचार करून कोणता दृष्टिकोन स्वीकारावा हे परंपरांच्या जाणकारालाच शक्य होत होते. उत्तम संस्कृतज्ञान व कुशाग्रबुद्धी यांचा विशेष उपयोग तेलंग यांना न्यायदानात झाला.

तेलंगांना केवळ चार वर्षेच मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राहता आले; परंतु त्या अल्पावधीतही त्यांनी आपला ठसा उमटवला. मुलगा, बाप आणि आजा अशा तिन्ही पिढ्या जिवंत असताना एकत्र कुटिंबातील मुलाला (बापाच्या ह्यातीत) आणल्या आज्याकडून वाटणी मागता येईल का असा प्रश्न उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठापुढे असताना तेलंगांनी अल्पमताचे निकालपत्र देऊन हिंदू कायद्यानुसार जन्मतःच मालकी मिळत असेल तर वाटणी मागण्याचा अधिकार हा मालकीच्याच अधिकाराचा एक भाग असल्यामुळे तोही जन्मतः मिळतो असे ठरवले. तेलंगांची भूमिका मुंबई उच्च न्यायालयात त्यावेळी अल्पमतात असली, तरी इतर अनेक मुंबई उच्च न्यायालयांनी तेलंगांचे हे मत स्वीकारले. त्यांच्या अकाली मृत्यूनंतर त्यांच्यापेक्षा वयाने ज्येष्ठ असलेले परंतु कनिष्ठ न्यायसेवेत नोकरी करणारे महादेव गोविंद रानडे यांची उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. रानडेंची नेमणूक झाल्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे १८९५ साली बद्रुद्दीन तय्यबजी यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. एकाच वेळी दोन भारतीय न्यायाधीश या उच्च न्यायालयात कार्यरत असण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. रानडे यांच्या मृत्युनंतर म्हणजे १९०१ साली नारायण गणेश चंदावरकर यांची उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्या जागेवर नेमणूक झाली.

तेलंग, रानडे आणि चंदावरकर या तिघा न्यायमूर्तींच्या कार्याची काही समान वैशिष्ट्ये होती. या तिघांनीही हिंदू कायद्याबाबत मूळ संहितांचा आधार घेत शक्यतो प्रगतिशील अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. हिंदू धार्मिक कायदा आणि रूढी या परिवर्तनशील आहेत व हे परिवर्तन अतिशय मंदगतीचे असले तरी बदलाला वाव आहे अशी त्यांची श्रद्धा होती. मराठ्यांचे राज्य असताना अनिष्ट रूढी बाजूला सारण्याचे धैर्य समाजाने दाखविले होते. परकीय राजवटीत हे काम सरकारी पाठिंबा नसल्यामुळे अवघड झाले. परंतु जेथे दोन संहितांमध्ये वेगवेगळे प्रतिपादन आहे तेथे अधिक उदार प्रतिपादन स्वीकारावे असा त्यांचा सामान्य दृष्टिकोन दिसतो.

**कर्तव्य : न्यायाधीशाचे आणि देशहिताचेही**

दुसरे वैशिष्ट्य म्हणजे न्यायाधीशाचे काम करीत असतानाच सामाजिक नेतृत्व करण्याची जबाबदारी आपापल्या मर्यादेत तिघांनीही पार पाडली. महाराष्ट्राच्या समाजजीवनात असे कोणतेही क्षेत्र नाही, की ज्यात रानडे यांनी समाजाचे मार्गदर्शन केलेले नाही. १८६० साली न्या. रानडे यांचे सार्वजनिक जीवन सुरू झाले. नंतरची तीस वर्षे अविरतपणे त्यांचे हे काम चालू होते. कनिष्ठ न्यायसेवेत असताना त्यांच्या सार्वजनिक कामामुळे वरिष्ठांची नाराजी अनेक वेळा ओढवली गेली. आपल्या निःस्वार्थ दृष्टीने व देशहिताच्या उत्कट भावनेने प्रेरित झालेल्या रानडे यांनी सर्व परिस्थितीला तोंड दिले. पुण्याची सार्वजनिक सभा, अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, वक्तृत्वोत्तेजक सभा, अशा विविध स्वायत्त नागरी व राजकीय संघटना, वसंत व्याख्यानमाला, वृत्तपत्रे व नियतकालिके यासारखी लोकजागृतीची साधने यांचा पुरेपूर उपयोग त्यांनी केला; या संस्थांच्या स्थापना आणि अभिवृद्धी यामागेही रानडे यांचेच नेतृत्व उभे होते.

न्यायाधिशाने कर्तव्यकठोर कसे असले पाहिजे याबद्दलची एक आठवण न्या. रानडे यांच्या पत्नी रमाबाई यांनी 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या आपल्या पुस्तकात सांगितली आहे. कोल्हापुरात रानडे कनिष्ठ न्यायाधीश म्हणून काम करीत असताना त्यांच्या वडिलांनी एका पक्षकाराची शिफारस करण्याचा प्रयत्न केला. वडिलांविषयी योग्य तो आदर राखून पण स्पष्टपणे रानडे यांनी आपला निषेध नोंदवला. "सर्व कोल्हापूर आपले आहे व जो तो येऊन आपल्या कामाबद्दल भीड घालील. असा प्रकार न झाला तर बरे. नाही तर आपल्याला त्रास होईल म्हणून मला येथून दुसरीकडे बदली करून घ्यावी लागेल. कोणत्याही पक्षकाराचे काम घरी पाहावयाचे नाही किंवा त्याचे बोलणे खाजगी रीतीने ऐकावयाचे नाही असा माझा नियम आहे, तो आपण चालवावा."

'पुणे सार्वजनिक सभा' ही जनतेवर होणारे अन्याय वेशीवर टांगते व त्यामुळे असंतोष पसरतो. या उपक्रमाच्या मागे रानडेच आहेत याबद्दल काही ब्रिटिश अमलदारात त्यांच्याबद्दल राग होता. त्यांच्या बढतीसाठी त्यांचे सार्वजनिक काम आडवे येऊ लागले होते. खुद्द रानडे यांना त्याबद्दल स्पष्ट कल्पना देऊन त्यांनी सार्वजनिक कामातील लक्ष काढून घ्यावे असा सल्ला देण्यात आला होता. रानडे यांनी नम्रपणे तो सल्ला धुडकावून लावला. 'माझ्या अपेक्षा फार लहान आहेत. त्यामुळे माझे (देशहिताचे) कर्तव्य मी करतच राहणार असा स्पष्ट जबाब देऊन बढतीपेक्षा देशकर्तव्य आपल्याला महत्त्वाचे वाटते' हे त्यांनी कळवले.

महाराष्ट्रातील कर्जबाजारी शेतकऱ्याला दिलासा देणारा डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्ट तयार करताना आणि त्याची अमलबजावणी करताना रानडे यांची मदत महत्त्वाची ठरली. असा कायदा असावा असा आग्रह धरणारे तर ते होतेच, शिवाय त्या कायद्याची अमलबजावणी करणाऱ्या न्यायाधीशांपैकीही एक असण्याची संधी त्यांना मिळाली होती. सावकाराच्या घशात शेतकऱ्यांच्या जमिनी जाऊ नयेत यासाठी हा कायदा पुराव्याचे काही सवलतीचे निकष सांगणारा होता. या कायद्याच्या अमलबजावणीसाठी रानडे दोन जिल्ह्यांत गावोगाव फिरले. या फिरतीमुळे त्रास होतो तेव्हा त्यांनी सरकारी दप्तरे तालुक्याच्या गावीच मागवून घ्यावीत व तेथेच तपासणी करावी अशी सूचना काही कारकुनांनी रमाबाईंच्यामार्फत केली. त्याला रानडे यांनी दिलेला जबाब वाचनीय आहे.

"सरकारने जी आमची नेमणूक केली आहे, ती भत्ता घेऊन चैनीने फिरण्याकरिता नव्हे, तालुक्यावर दप्तरे मागविली म्हणजे त्यांतल्या त्यात जरा हुशार व लटपटी माणसे असतात, ती पुढे येतात व आपल्याला हवे असले ते चित्र रेखाटून कामगारांच्या पुढे ठेवतात. अशाने शेतकऱ्यांची खरी स्थिती कळत नाही. त्यांची खरी स्थिती समजून घेऊन त्यांच्या अडचणी दूर कराव्या, हा सरकारचा मुख्य हेतू आहे. तो काही लोकांना कळत नाही. उगीच आळस करतात. बाकी आपण स्वतः खेड्यापाड्यात हिंडलो म्हणजे त्या गावातील घरंदाज व वृद्ध माणसांची गाठ पडून आपल्याला हव्या असतात त्या गोष्टी त्यांच्याशी बोलत असताना सहज समजतात."

पुणे सार्वजनिक सभेने न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली केलेला एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे लवाद कोर्टे. दिवाणी स्वरूपाचे तंटे न्यायालयामार्फत सोडवण्यात वेळ, पैसा हा तर खर्च होतोच; शिवाय दोन पक्षात वाद संपला तरी कटुता शिल्लकच राहते. हे लक्षात घेऊन खासगी लवादामार्फत तडजोडीने प्रकरणे निकाली काढण्यात यावीत यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत सभेच्या पुढाकाराने लवाद कोर्टे स्थापन झाली होती. लवाद म्हणून काम करण्यास तयार असणाऱ्या प्रतिष्ठित गृहस्थांची एक यादी लवाद न्यायालयाच्या कार्यालयात ठेवलेली असे. पक्षकारांनी त्या यादीतून हव्या त्या

व्यक्तींना लवाद म्हणून निवडायचे आणि त्यांनी मग ते प्रकरण निकालात काढावयाचे अशी ती पद्धत असे. लवाद पद्धतीचा एक अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे त्या काळात अस्तित्वात असलेल्या परकीय सरकारच्या न्यायव्यवस्थेऐवजी आपल्याच देशबांधवांनी चालवलेल्या स्वायत्त संस्थेकडून न्याय मिळत असे, त्यावेळच्या प्रचलित कायद्यातही लवादाची तरतूद होती; परंतु तिचा वापर फारसा होत नसे. सार्वजनिक सभेच्या लवाद न्यायालयामुळे कागदावरची ही तरतूद प्रत्यक्षात आली.

**देशभक्तांवरील खटले**

रानडे आणि लोकमान्य टिळक हे दोघे अनेक राजकीय व सामाजिक बाबतीत तीव्र मतभेद असलेले महाराष्ट्राचे दोन नेते. जामिनाच्या अर्जासारखी किरकोळ प्रकरणे सोडली तर लोकमान्यांवरील मूळ खटला रानडे यांच्यासमोर योगायोगाने चालला नाही. परंतु आपल्या चौकटीत राहून आपले कर्तव्य रानडे कसे करीत याचे एक उदाहरण लोकमान्यांवरील खटल्याशीच संबंधित आहे. आपल्यावर राजद्रोहाचा खटला भरला गेल्यानंतर 'राजद्रोह म्हणजे काय' हे सांगणारा एक अग्रलेख लोकमान्यांनी 'केसरी'त लिहिला होता. एखाद्या सरकारी अधिकाऱ्याच्या वर्तनाबद्दल अगर एखाद्या विशिष्ट प्रश्नाबद्दलच्या सरकारी धोरणाबद्दल विरोध करणे म्हणजे राजद्रोह नाही, प्रस्थापित सरकारचे अस्तित्वच उलथून पाडण्याची भूमिका असली तरच तो राजद्रोह समजता येईल अशी टिळकांची भूमिका होती. रानडे यांना ही भूमिका मान्य होती. टिळकांच्या खटल्याबद्दल त्यांना मत व्यक्त करता येत नव्हते, परंतु आपली भूमिका मांडण्याची संधी त्यांनी दुसऱ्या एका खटल्यात घेतली. 'प्रतोद' नावाच्या साप्ताहिकावर अशाच स्वरूपाच्या गुन्ह्याबद्दल रानडे एक न्यायाधीश असलेल्या दोन सदस्यांच्या खंडपीठासमोर खटला चालला. दुसऱ्या न्यायाधीशाने शिक्षा कमी करणारा जो निकाल दिला होता तोच रानडे यांना मान्य होता. जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी जन्मठेपेची दिलेली शिक्षा दोघांनी एकमताने एका वर्षावर आणली. खरे म्हणजे या स्थितीत न्या. रानडे यांनी वेगळे निकालपत्र लिहिण्याची गरज नव्हती; आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्याचे निकालपत्र आपल्याला मान्य आहे एवढेच लिहून भागले असते; पण त्यांनी सहमतीचे पण वेगळे निकालपत्र लिहिले, कारण त्यांना त्यात राजद्रोह म्हणजे काय याबद्दल आपले मत व्यक्त करावयाचे होते. रानडे यांनी टिळकांच्या भूमिकेला पाठिंबा देणारे निकालपत्र लिहिले. रानडे यांनी घेतलेली भूमिका यापूर्वी काही न्यायालयांनी घेतलेली होती. न्यायाधीशाने आपले मत फक्त न्यायनिर्णयाद्वारेच व्यक्त करावयाचे असते हे पथ्य रानडे यांनी पाळले होते आणि तरीही आपले मत नोंदवले होते.

तेलंग, रानडे आणि चंदावरकर हे तिघेही अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या पहिल्या अखिल भारतीय राजकीय संस्थेच्या स्थापनेत सहभागी होते. चंदावरकर तर राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्षही झाले. रानडे शासकीय नोकर असल्यामुळे राजकीय कामात त्यांना प्रत्यक्ष भाग घेता येत नसे; तेथे ते मार्गदर्शकाची भूमिका घेत. अर्थात रानडे यांची ही कामगिरी सरकारला ज्ञात होती; तरी सरकारमध्ये काही उदार मंडळी असल्यामुळे त्याबाबत सरकारने कडक भूमिका स्वीकारलेली दिसत नाही. चंदावरकरांनी न्यायाधीश झाल्यानंतरही महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीचे काम केले. ते त्या संस्थेचे दीर्घकाळ अध्यक्षही होते. बारामतीच्या कळसकरांनी चालवलेल्या अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या वर्गासाठी शाळांना रानडे यांची मदत होती. रानडे यांचा अनेक शिक्षणसंस्थेच्या स्थापनेत सहभाग होता व मार्गदर्शनही होते. बहुजन समाजाच्या शिक्षणालाही त्यांचे सक्रिय प्रोत्साहन होते. उच्च न्यायालयाचे न्यायाधीशसुद्धा आपली जबाबदारी सांभाळून सार्वजनिक जीवनात किती काम करू शकतात याचा आदर्शच

या काळात या न्यायमूर्तीनी निर्माण केला. परकीय राजवटीतसुद्धा लोकहिततत्पर न्यायाधिशांना आपली चौकट सांभाळून पुष्कळ लोकोपयोगी गोष्टी करता आल्या.

महाराष्ट्राचे सामाजिक जीवन ज्यांनी समृद्ध केले आणि लोकनेतृत्व केले असे अनेक वकील मुंबईच्या उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. १८६७ च्या सुमाराला फिरोजशहा मेहता यांनी वकिलीला प्रारंभ केला. या उच्च न्यायालयातील पहिल्या काही भारतीय बॅरिस्टरांत त्यांची गणना होते. मेहता मुंबईचे मेयर आणि मुंबई विधिमंडळाचे सदस्यही होते. रावबहादूर विश्वनाथ नारायण मंडलिक हे हिंदू कायद्याचे एक तज्ज्ञ आणि समाजजीवनात सर्वांच्याबरोबर चांगले संबंध राखणारे एक आदरणीय व्यक्ती. उच्च न्यायालयातील त्यांच्या वकिलीबरोबरच 'Native Opinion' या नियतकालिकाचे संपादक आणि अनेक सार्वजनिक संस्थांचे आश्रयदाते म्हणूनही त्यांची ओळख आहे.

१८७० ते १९२३ अशी सुमारे ५३ वर्षे सतत वकिली केलेल्या जॉन डंकन इनव्हेरॅरिटी यांनी मुंबई उच्च न्यायालयांमध्ये आपल्या संयत आणि अभ्यासू कामाने वकिलीचा एक आदर्श निर्माण केला. आपल्या आयुष्याच्या शेवटच्या दिवशीसुद्धा त्यांनी उच्च न्यायालयात काम केले. मुकुंदराव जयकर आणि सर दिनशा मुल्ला हे दोघेही विधिक्षेत्रात ज्ञात आहेत. त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात दीर्घकाळ वकिली केली. १९३७ मध्ये भारतात फेडरल कोर्ट स्थापन झाल्यावर मुकुंदराव जयकरांना त्या न्यायालयात एक न्यायाधीश म्हणून नेमण्यात आले. प्रिव्ही कौन्सिलच्या ज्युडिशयल कमिटीचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले. सर दिनशा मुल्ला हे काही दिवस मुंबई उच्च न्यायालयाचे कार्यवाहक न्यायाधीशसुद्धा होते. कायद्यांच्या अनेक पुस्तकांचे लेखक म्हणून मुल्ला आजही ओळखले जातात. सर महादेव चौबळ हेही एक नामवंत वकील. त्यांची पुढे भारताच्या केंद्रीय लोकसेवा आयोगाचे सभासद आणि व्हाईसरायच्या कौन्सिलचे सभासद म्हणूनही नियुक्ती झाली.

भारतीय राजकीय जीवनात आणि सांस्कृतिक जीवनात ज्यांनी महत्त्वाची कामगिरी केली अशा अनेकांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली केलेली आहे. धर्मशास्त्राच्या इतिहासाचे लेखक महामहोपाध्याय पांडुरंग वामन काणे, केंद्रीय मंत्री आणि गुजरातेतील कादंबरीकार कन्हैयालाल मणिकलाल मुन्शी, स्वातंत्र्य लढ्याचे एक महत्त्वाचे नेते सरदार वल्लभभाई पटेल, केंद्रीय विधिमंडळाचे सभापती झालेले विठ्ठलभाई पटेल, भारतीय घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष आणि दलित समाजाच्या मुक्तिलढ्याचे सर्वोच्च नेते डॉ. भीमराव रामजी ऊर्फ बाबासाहेब आंबेडकर, केंद्रीय मंत्री व राज्यपाल झालेले पाटसकर आणि नरहर विष्णू ऊर्फ काकासाहेब गाडगीळ अशा काहींचा उल्लेख करता येईल.

आपल्यावरील राजद्रोहाचा दुसऱ्या खटल्यात बचावाच्या भाषणात लोकमान्य टिळकांनी उच्चारलेले संस्मरणीय शब्द एका शिलेवर कोरून ती त्यांना ज्या न्यायगृहात शिक्षा सुनावण्यात आली त्याच्या बाहेर बसवून लोकमान्यांचे स्मरण करण्यात आले.

"In spite of the verdict of the Jury I Maintain that I am innocent. There are higher powers that rule the destiny of men and nations and it may be the will of providence that the cause which I represent may prosper more by my suffering than by my remaining free."

अनुक्रमणिका

"ज्युरींनी जरी मला गुन्हेगार ठरवले आहे, तरी मी निर्दोष आहे, अशी माझी मनोदेवता मला ग्वाही देत आहे. मानवी शक्तींहून अधिक वरिष्ठ प्रतीच्या शक्ती जगत्सुत्रे चालवीत आहेत; आणि मी ज्या कार्याकरिता प्रयत्न केले, त्या कार्याला माझ्या दुःखाने व संकटानेच अधिक सामर्थ्य यावे, असा ईश्वरी नेमानेम दिसतो!"

मुबई उच्च न्यायालयात आणि त्यांच्या त्यावेळच्या कार्यकक्षेतील कनिष्ठ न्यायालयात तसेच नंतर १९३६ साली स्थापन झालेल्या नागपूर उच्च न्यायालयाच्या कार्यकक्षेत स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक देशभक्तांवर खटले चालले. लोकमान्य टिळकांवरील १८९७, १९०९, १९१६ असे तीन खटले, जॅक्सनच्या खुनाचा कट केल्याबद्दलचा स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील खटला, महात्मा गांधींवरील न्यायालयाच्या कक्षेतील अहमदाबाद कोर्टात चाललेला प्रसिद्ध खटला अशांचा निर्देश करण्यात येईल. न्यायाधीशाला कायद्याने सांगितलेले आपले कर्तव्य करावेच लागते, पण तसे करतानाही तो वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करत नाही याचे उदाहरण जिल्हा न्यायाधीश ब्रुमफील्ड यांनी न्यायालयात केलेल्या भाषणात मिळते, शिक्षा सुनावण्यापूर्वी ते गांधीजींना म्हणाले—

"कायदा हा व्यक्तींविषयी आदर दाखवत नाही हे खरे. परंतु तुम्ही एक वेगळ्याच प्रकारचे आरोपी आहात याकडे मी दुर्लक्ष करू शकत नाही. तुमच्या लक्षावधी देशबांधवांच्या दृष्टीने तुम्ही श्रेष्ठ देशभक्त आणि आदरणीय नेते आहात हे मी दृष्टिआड करू शकत नाही. कायद्याप्रमाणे तुम्ही तो मोडल्यामुळे मला तुम्हाला शिक्षा करणे आवश्यक आहे. परंतु हे मी विसरत नाही, की तुम्ही सतत हिंसेच्या विरोधात उपदेश केला आहे आणि हिंसा रोखण्यासाठी खूप काही केले आहे."

महात्मा गांधी मुंबई उच्च न्यायालयात नोंदणी झालेले एक वकील होते. त्यांनी या न्यायालयात प्रत्यक्ष वकिली कधीही केली नसली तरी त्यांची वकिलीची सनद जप्त करण्यात आली होती. ती नंतर परत करण्यात आली.

**स्वातंत्र्योत्तर काळातील न्यायव्यवस्था**

१४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री बारा वाजण्यापूर्वी काही क्षण मुंबई उच्च न्यायालयाचे सर्व न्यायाधीश आणि प्रमुख वकील उच्च न्यायालयाच्या सत्र न्यायगृहात एकत्र जमले होते. याच न्यायगृहात लोकमान्य टिळकांचा खटला चालून त्यांना सहा वर्षे काळ्यापाण्याची शिक्षा झाली होती. मुख्य न्यायाधीश सर लिओनार्ड स्टोन यांनी सर्वांना एक मिनिटभर शांततेत प्रार्थना करावयास सांगितली आणि बरोबर बारा वाजता तेथे उभारण्यात आलेल्या एका ध्वजदंडावर भारताचा राष्ट्रध्वज फडकावला. न्यायाधीशाच्या पूर्ण पोशाखात असलेल्या मुख्य न्यायाधीशांनी आणि इतर न्यायाधीशांनी राष्ट्रध्वजाला प्रणाम केला आणि एका नव्या न्याययुगाला प्रारंभ झाला. न्या. स्टोन यांच्यानंतर न्या. महंमदअली करीमभाई छागला हे पहिले भारतीय मुख्य न्यायाधीश म्हणून या उच्च न्यायालयाचे काम पाहू लागले.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात अनेक नव्या आव्हानांना उच्च न्यायालय सामोरे गेले. २६ जानेवारी १९५० रोजी भारताची नवी राज्यघटना अमलात आली. habeas corpus, mandanmus, prohibition, quo warranto, Certiorari या याच प्रकारांचे Writ किंवा विशेषादेश जारी करण्याचा अधिकार मुंबई उच्च न्यायालयाला इंडियन हायकोर्ट्स ॲक्टप्रमाणेच व राजाने दिलेल्या सनदेप्रमाणेच होता. आता

नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याची नवी जबाबदारी उच्च न्यायालयावर घटनेच्या २२६व्या कलमान्वये येऊन पडली होती.

जे आर्थिक व सामाजिक बदल नव्या भारतात होऊ पाहत होते त्यांच्यासाठी विधिमंडळांनी केलेल्या कायद्यांची वैधता तपासणे ही उच्च न्यायालयाची आणि सर्वोच्च न्यायालयाची जबाबदारी होती. कसणारांच्या मालकीची जमीन करणारे आणि कुळांच्या हक्काचे रक्षण करणारे कायदे, कामगारांच्या अधिकारांना जपणारे कायदे, स्त्रिया, मागासवर्गीय आणि आदिवासी यांच्या हितरक्षणांचे कायदे अशा अनेक गोष्टींची वैधता ठरवण्याचे काम न्यायालयांना करावे लागले. कायद्याचा उद्देश लक्षात घेऊन त्याचा अर्थ लावणे आणि जेथे शक्य आहे तेथे विधिमंडळाच्या मानसाला प्राधान्य देणे हे न्यायालयांचे धोरण होते.

**राज्यपुनर्रचना आणि नवी न्यायपीठे**

१९५६ साली राज्यपुनर्रचना झाली त्यावेळी हैदराबाद संस्थानात सामील असलेला मराठवाडा हा त्यावेळच्या पाच जिल्ह्यांचा मराठी मुलूख महाराष्ट्र राज्यात समाविष्ट झाला आणि विजापूर, धारवाड, कारवार आणि बेळगाव या जिल्ह्यांतला कन्नड भाग व काही मराठी मुलूखही कर्नाटकात सामील झाला व तो मुंबई राज्यातून वगळला गेला. छपन्नपर्यंत नागपूर येथे स्वतंत्र उच्च न्यायालय होते. ते आता मुंबई उच्च न्यायालयाचे एक न्यायपीठ झाले. गुजरात द्विभाषिक राज्यात समाविष्ट होता त्यामुळे राजकोट येथे मुंबई उच्च न्यायालयाचे एक न्यायपीठ छपन्न साली स्थापन झाले. १९६० साली गुजरात राज्य वेगळे झाल्यावर तेथे वेगळे उच्च न्यायालय स्थापन झाले.

१९५६ पासूनच औरंगाबाद येथे मराठवाड्यासाठी वेगळे न्यायपीठ असावे अशी मागणी होत होती; परंतु ती पूर्ण होण्यास आणखी २५ वर्षे वाट पाहावी लागली. राज्यपालांच्या संमतीने (म्हणजेच राज्य सरकारच्या संमतीने) उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना तात्पुरते न्यायपीठ राज्यपुनर्रचना कायद्याच्या कलम ५१ (३) प्रमाणे स्थापन करता येत होते. तो योग न्या. व्यंकट श्रीनिवास देशपांडे, मुख्य न्यायाधीश आणि बॅ. अब्दुल रहमान अंतुले मुख्यमंत्री असताना आला. २७ ऑगस्ट १९८१ रोजी औरंगाबाद येथे मुंबई उच्च न्यायालयाचे एक न्यायपीठ स्थापन झाले आणि मराठवाड्याच्या जनतेची फारा दिवसांची इच्छा पूर्ण झाली. या न्यायपीठाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केल्यानंतर १६ जून १९८४ रोजी हे न्यायपीठ कायम करणारा अध्यादेश राष्ट्रपतींनी काढला. प्रारंभी दोनच न्यायाधीश औरंगाबाद न्यायपीठावर काम करीत असत. ती संख्या आता १३-१४ वर पोहोचली आहे. न्या. सुजाता मनोहर या उच्च न्यायालयात नेमल्या गेलेल्या पहिला महिला न्यायाधीश. त्यांची नेमणूक १९७८ साली झाली. नागपूर उच्च न्यायालय मुंबई उच्च न्यायालयात समाविष्ट झाल्यानंतर यशवंत श्रीपाद तांबे हे मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश झालेले नागपूरचे पहिले न्यायाधीश. त्यांनी कार्यवाहक न्यायाधीश म्हणून काम पाहिले. न्या. व्यंकटराव देशपांडे हे मराठवाड्यातील पहिले न्यायाधीश ज्यांना मुख्य न्यायाधीश होण्याचा सन्मान मिळाला.

१९६१ मध्ये गोवा मुक्त झाला. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकार कक्षेत त्याचा समावेश झाला होता. पुढे गोवा स्वतंत्र राज्य झाल्यानंतर तेथे एक न्यायपीठ असण्याची आवश्यकता निर्माण झाली. ३० ऑक्टोबर १९८२ रोजी पणजी येथे मुंबई उच्च न्यायालयाचे एक न्यायपीठ स्थापन झाले. मराठवाड्यात अमलात असणारे पश्चिम महाराष्ट्रापेक्षा काही वेगळे कायदे आणि मुंबईपासूनचे अंतर यामुळे औरंगाबाद

अनुक्रमणिका

न्यायपीठाची मागणी जशी न्याय होती तशीच गोव्यासाठीची मागणीसुद्धा होती. गोव्यामध्ये पोर्तुगीज काळापासून अमलात असणारे वेगळे कायदे व वेगळ्या न्यायसंकल्पनांच्या आधारे असलेली समाजव्यवस्था हे घटकही वेगळ्या न्यायपीठाच्या आवश्यकतेला पूरक होते. गोवा हा लहानसा प्रदेश असल्यामुळे तेथे दोन किंवा तीन न्यायाधीश काम करतात.

महाराष्ट्राचे सर्वोच्च न्यायालयाला काही उल्लेखनीय न्यायाधीश दिले आहेत. भारताचे पहिले मुख्य न्यायाधीश न्या. हिरालाल कनिया हे मुंबईचेच. न्या. प्र. बा. गजेंद्रगडकर हे कामगार विषयक बाबीत प्रागतिक दृष्टिकोन स्वीकारणारे भारताचे मुख्य न्यायाधीश मुंबईतूनच गेलेले होते. अगदी तालुका न्यायाधीशापासून बढतीने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी विराजमान होण्याचा मान डी. जी. पालेकर या मुंबई न्यायव्यवस्थेतील न्यायाधीशांना मिळाला आहे. न्या. जे. आर. मुधोळकर, न्या. हिदायतुल्ला, न्या. ए. पी. सेन, न्या. यशवंतराव चंद्रचूड, न्या. विद्यारण्य तुळजापूरकर, न्या. डी. एफ. मादन, न्या. एम. एच. कनिया, न्या. पी. बी. सावंत, न्या. सुधाकर कुर्डुकर, न्या. बी. एन. श्रीकृष्ण, न्या. भरुचा, न्या. वरियावा, न्या. कापडिया, न्या. विकास सिरपूरकर असे अनेक न्यायाधीश मुंबई न्यायसंस्थेने सर्वोच्च न्यायालयाला दिले आहेत. श्री. एच. एम. सिरवाई हे भारतातले एक श्रेष्ठ विधिज्ञ. सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम करण्याची त्यांना विनंती करण्यात आली होती. परंतु त्याऐवजी भारतीय राज्यघटनेवरील आपले पुस्तक पूर्ण करणे जास्त उपकारक होईल असे त्यांना वाटले आणि त्यांनी नम्रतेने नकार दिला. सिरवाई कायद्याच्या ज्ञानाबद्दल जसे ओळखले जात तसेच ते न्यायालयातील वागणुकीबद्दलही. न्यायाधीश न्यायगृहात येण्यापूर्वी वकिलाने हजर असले पाहिजे हे ते कटाक्षाने पाळत व अतिशय नम्रतापूर्वक आपले विवेचन करीत. बराच दीर्घकाळ महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल म्हणून त्यांनी काम पाहिले आणि या पदाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

आपल्या न्यायव्यवस्थेत काही आमूलाग्र सुधारणा व्हाव्यात असा विचार नेहमीच मांडला जातो. गरीब देशाला आणि दरवर्षी वाढणाऱ्या न्यायालयात येणाऱ्या प्रकरणांची दरवर्षी वाढणारी संख्या पाहता आणि आपल्या देशाची आर्थिक स्थिती लक्षात घेता न्यायालयांच्या सुट्या कमी कराव्यात असा प्रयत्न चालू असतो. ब्रिटिशांच्या काळातील सुट्या आज असमर्थनीय ठरतील. शिवाय आणखी एका अडचणीला आपल्या न्यायव्यवस्थेला तोंड द्यावे लागते. ज्याच्याविरुद्ध निकाल होण्याचा संभव आहे व सध्याच्या ज्याचा मालमत्तेवर किंवा अधिकारपदावर ताबा आहे त्याला प्रकरण लांबत जावे असे वाटते, तर ज्याला न्याय हवा आहे त्याला ते लवकर चालावे असे वाटते. या दोन्हींतून वाट काढण्याची जबाबदारी न्यायाधीशावर असते. यादृष्टीने कामकाज चालवण्याच्या कायद्यात काही बदल नुकतेच करण्यात आले आहेत.

**आणीबाणी-परीक्षेचा काळ**

प्रत्येक व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या जीवनकालात असा एखादा कालखंड येतो; की जेव्हा त्या व्यक्तीची किंवा संस्थेची कसोटी पाहिली जाते. तिची निष्ठा कसाला लागते. २५ जून १९७२ रोजी तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी देशभर आणीबाणी जाहीर केली. राष्ट्रपतींनी घटनेने मूलभूत अधिकार आणि त्या अधिकारासाठी उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालय यांचे दरवाजे ठोठावण्याचा अधिकारही स्थगित करणारा हुकूम काढला. नागरिकांचे अभिव्यक्तीचे, संचाराचे, संघटना करण्याचे अधिकारच स्थगित झाले. जीवनाचा अधिकार देणारे २१ वे कलमसुद्धा स्थगित झाले. शेकडो स्थानबद्धांना आपल्या स्थानबद्धतेच्या कायदेशीरपणाविरुद्ध उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात आता जाता

अनुक्रमणिका

येईल, की नाही याचीच शंका उत्पन्न झाली. वृत्तपत्रांवर प्रसिद्धीपूर्व नियंत्रणासारखे निर्बंध घालण्यात आले. शिवाय काहींना तर टाळेच ठोकण्यात आले. अशा परिस्थितीत जिला नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याची जबाबदारी राज्यघटनेने सोपवली आहे ती न्यायसंस्था कोणती भूमिका घेणार असा प्रश्न निर्माण झाला. उच्च न्यायालयांसाठी आणि सर्वोच्च न्यायालयासाठी हा कसोटीचा क्षण होता. या परीक्षेच्या क्षणी सर्वोच्च न्यायालयापेक्षा काही उच्च न्यायालये अधिक धैर्याने वागली आणि त्यांनी आपले कर्तव्य करण्याचा प्रयत्न केला. त्यात मुंबई उच्च न्यायालयाचाही समावेश आहे.

मुंबईच्या पोलीस कमिशनरांनी आणीबाणी राबवताना आपल्या परवानगीशिवाय कोणतीही जाहीरसभा होऊ शकणार नाही, असा सर्वसाधारण हुकूम काढला होता. एक सभा घेण्यासाठी परवानगी द्या म्हणून त्यांच्याकडे करण्यात आलेला अर्ज त्यांनी नामंजूर केला होता. या दोन्ही आदेशांच्या विरुद्ध मुंबई उच्च न्यायालयाचेच एक माजी न्यायाधीश एन. पी. नथवानी यांनी एक रिटयाचिका दाखल केली होती. या रिटयाचिकेमध्ये अर्जदारातर्फे एन. ए. पालखीवाला, राम जेठमलानी, ए. बी. दिवाण अशा अनेक नामवंत वकिलांनी काम चालवले. नागरिक स्वातंत्र्याची न्यायसंकल्पनांच्या आधारे चर्चा करणारे या खटल्यातील विस्तृत निकालपत्र फार महत्त्वाचे आहे. (१९७६ बी. एल. आर., पृ. १; एन. पी. नथवानी वि. मुंबईचे पोलीस आयुक्त) या खटल्यात मुंबई उच्च न्यायालयाने ठरवले, की 'आणीबाणीची उद्‌घोषणा आणि नागरिक हक्कांना आणि त्यांच्यासाठी दाद मागण्याच्या नागरिकांच्या अधिकाराला स्थगित करणारे राष्ट्रपतींचे हुकूम असतानासुद्धा या देशातील कायद्याचे अधिराज्य (Rule of Law) संपुष्टात येत नाही. कायद्याचे राज्य चालूच राहते. कोणत्याही कायद्याने अधिकार दिलेले नसताना अगर कायद्यातील तरतुदीविरुद्ध एखादा आदेश देता येत नाही.' उच्च न्यायालयाने स्वीकारलेला हा दृष्टिकोन म्हणजे नागरिकांना मोठाच दिलासा होता. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आर. एम. कांटावाला आणि विद्यारण्य तुळजापूरकर यांनी मुंबईच्या पोलीस आयुक्तांचे दोन्हीही आदेश रद्द केले.

आणीबाणीतील कारभाराचा एक कुप्रसिद्ध भाग म्हणजे सरकारने लादलेली प्रसिद्धीपूर्व यंत्रणा. ख्यातनाम राजकीय नेते व माजी संसद सदस्य एम. आर. ऊर्फ मिनू मसानी हे Freedom First या नावाचे एक नियतकालिक चालवत असत. या नियतकालिकावर राज्याचे प्रसिद्धी नियंत्रणप्रमुख विनोद राव यांनी प्रसिद्धीपूर्व नियंत्रणे लागू केली होती. त्याविरुद्ध मसानी यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली. नियंत्रणे घालणारा हा हुकूम उच्च न्यायालयाचे एक न्यायाधीश न्या. भट्ट यांनी रद्दबातल ठरवला. त्याविरुद्ध विनोद राव यांनी केलेले अपील न्या. मादन व न्या. कनिया यांच्यासमोर सुनावणीला आले. महाराष्ट्रातील राज्यघटनेच्या कलम १९ (१) (अ) ने पहिल्या प्रथम हा अधिकार निर्माण आणि बहाल केलेला नाही, तर राज्यघटनेच्या पूर्वीही हा अधिकार अस्तित्वात होता. इंग्लंडच्या विधिपरंपरेने हा अधिकार मान्य केलेला होता व भारतातील न्यायालयांनीही त्याचे रक्षण केलेले होते, असे खंडपीठाने ठरवले. (१९७६ बीएलआर, पृ. १२५) सोली सोराबजी या ख्यातनाम विधिज्ञांनी मसानी यांची बाजू मांडली होती.

साने गुरुजींनी स्थापिलेले 'साधना साप्ताहिक' हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे विचारपीठ म्हणून गणले जाते. आणीबाणीच्या विरोधात मतप्रदर्शन करणाच्या या साप्ताहिकाचे ११ अंक सरकारने जप्त केले. शिवाय साधना मुद्रणालय बंद करण्याचा हुकूमही काढला. हे दोन्ही हुकूम भारत संरक्षण व अंतर्गत सुरक्षा नियमांच्या ४७ व्या नियमाखालील अधिकारान्वये काढलेले होते. या दोन्ही हुकूमांना आव्हान देणारा एक रिट अर्ज श्रीधर महादेव ऊर्फ एसेम जोशी या साधनेच्या विश्वस्तांनी उच्च न्यायालयात दाखल केला. सी.

आर. दळवी यांनी त्यांची बाजू न्या. तुळजापूरकर आणि न्या. गाडगीळ यांच्या न्यायपीठासमोर मांडली. उच्च न्यायालयाने हा अर्ज मंजूर करून दोन्ही हुकूम रद्द ठरवले (१९७७ बीएलआर, पृ. २८९).

कृष्णा माधवराव घटाटे यांच्या स्थानबद्धतेविरुद्ध त्यांच्यातर्फे उच्च न्यायालयात दाद मागण्यात आली होती. या प्रकरणात न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी व न्या. दिघे यांनी दिलेल्या निकालपत्रात राष्ट्रपतींनी आणीबाणीच्या काळात नागरिक स्वातंत्र्याचे घटनेतील अधिकार स्थगित केले तरी कायद्याचे अधिराज्य शिल्लकच राहते अशी भूमिका घेतली. कायद्याचे अधिराज्य अशा हुकूमांनी स्थगित होत नाही, असे ठरवून स्थानबद्धता बेकायदेशीर ठरवली.

न्या. धर्माधिकारी, न्या. कांटावाला, न्या. तुळजापूरकर, न्या. भट्ट, न्या. गाडगीळ आणि या न्यायालयाच्या इतर काही न्यायमूर्तींनी कायद्याच्या स्थितीची यथायोग्य समीक्षा केली आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या बाजूने आपला कौल दिला. राज्यघटनेतील मूलभूत अधिकारांचे प्रकरण हे अशा अधिकारांचे जन्मस्थान असून, ते अधिकार मूलभूत मानवी अधिकार आहेत. माणसाच्या जन्मापासून त्याला ते मिळालेले आहेत व कायद्याचे अधिराज्य ही लोकशाहीव्यवस्थेतील गृहीत संकल्पना आणीबाणीमुळे अगर त्याखाली काढण्यात आलेल्या राष्ट्रपतींच्या एखाद्या हुकूमामुळे स्थगित होत नाही ही भूमिका या उच्च न्यायालयाने (एखादा अपवाद वगळून) स्वीकारली. अशा तऱ्हेची भूमिका काही इतर उच्च न्यायालयांनीही घेतली. दुर्दैवाने सर्वोच्च न्यायालयाने मात्र याविरुद्ध भूमिका घेतली आणि आणीबाणीत नागरिकांना आपल्या अधिकार संकोचाविरुद्ध उच्च न्यायालयाकडे दाद मागता येतच नाही, असा निर्णय ए.डी.एम. जबलपूर वि. शिवकांत शुल्का या खटल्यात (एआयआर १९७६ सुप्रीम कोर्ट १२०७) या खटल्यात दिला; मात्र हे प्रकरण ऐकणाऱ्या न्यायपीठातील एक न्यायाधीश न्या. एच. आर. खन्ना यांनी मुंबई उच्च न्यायालयाची भूमिकाच आपल्या अल्पमताच्या निकालपत्रात ग्राह्य ठरवली.

**काही महत्त्वाचे निर्णय**

राज्यघटना अमलात आल्यानंतर विविध कायद्याची वैधता तपासण्याचे काम न्यायालयावर येऊन पडले. इतर कायदे आणि सामाजिक परिस्थिती यांचा संदर्भ लक्षात घेऊन त्याचा विचार न्यायाधीशांना करावा लागतो. महाराष्ट्र राज्य वि. नरसू आप्पा माळी (एआयआर १९५२, मुंबई ८४) या प्रकरणाची सुनावणी मुख्य न्यायाधीश म. क. छागला आणि न्या. प्र. बा. गजेंद्रगडकर यांच्या खंडपीठासमोर झाली. हिंदू द्विभार्या प्रतिबंधक कायदा १९४६ या कायद्यान्वये दुसरा विवाह केल्याबद्दल आरोपीवर खटला भरण्यात आला होता. या खटल्यात कनिष्ठ न्यायालयांनी आरोपीला दोषी ठरवले. त्याविरुद्धचे रिव्हीजन अर्ज उच्च न्यायालयाकडे सत्र न्यायाधीशांनी वर्ग केले होते. या रेफरन्समध्ये उच्च न्यायालयाला निर्णय द्यावयाचा होता. द्विभार्या प्रतिबंध ही योग्य गोष्ट असेल तर ती फक्त हिंदुंनाच का लागू करावी, त्यातून मुस्लिमांना वगळणे चुकीचे आहे व या कायद्यात हिंदू आणि हिंदूतर अशी केलेली विभागणी अन्यायमूलक आहे, म्हणून हा कायदा भेदभाव करणारा व त्या कारणावरून अवैध आहे, असा युक्तिवाद करण्यात आलेला होता. हिंदू विवाह आणि मुस्लीम विवाह या दोन्हींमधील मूलभूत फरक (संस्कार आणि करार) सांगत न्यायालयाने मुस्लीम कायद्यात घटस्फोटासंबंधी वेगळ्या तरतुदी कशा आहेत हेही लक्षात घेतले. केवळ हिंदूपुरता असा कायदा करणे अवैध नाही, असा निर्णय उच्च न्यायालयाने तर दिलाच; परंतु त्याचबरोबर दोन बायका करण्यास प्रतिबंध केल्यामुळे हिंदुच्या श्रद्धांवर आघात होतो हाही युक्तिवाद

फेटाळून लावला. दुसरे लग्न करणे हा धर्माने दिलेला अधिकार आहे किंवा धर्मश्रद्धेचा प्रश्न आहे. हे न्यायालयाने अमान्य केले.

महाराष्ट्रात १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लक्षावधी अनुयायांनी बौद्ध धर्म स्वीकारला. बौद्ध पद्धतीने केलेला विवाह हा कायदेशीर आहे व तो एक सिद्ध झालेला जुना रीतिरिवाज मानला पाहिजे, असा निर्णय या उच्च न्यायालयाने दिला. १९९५ साली केंद्र सरकारने अपंग किंवा विकल व्यक्तींना समान संधी देणारा आणि त्यांच्या अधिकारांचे रक्षण करणारा कायदा संमत केला. परंतु या कायद्याप्रमाणे समानसंधी द्यायची असेल तर कोणकोणत्या प्रकारची सेवा कोणत्या प्रकराच्या अपंगांना व्यक्तींना करता येईल याची पाहणी करून अपंगांसाठी उपलब्ध असणाऱ्या जागांची माहिती करून घेणे आवश्यक होते. मुंबई उच्च न्यायालयाने अंधांच्या राष्ट्रीय महासंघाने दाखल केलेल्या एका रिट याचिकेत राज्य सरकारने या पाहणीसाठी एक समिती नेमावी व क्रमवार पद्धतीने आरक्षण तालिकेत अपंगांचा समावेश करावा असा आदेश दिला. ध्वनिप्रदूषण, जलप्रदूषण आणि वायूप्रदूषण यांना प्रतिबंध करण्याचे कर्तव्य पुरेशा प्रमाणात शासनाने न केल्यामुळे उच्च न्यायालयाने त्यासाठी आवश्यक ते निर्देश अनेक प्रकरणांत दिले.

आपल्यासमोर आलेल्या विविध खटल्यांत मुंबई उच्च न्यायालयाने तुरुंगविषयक नियमांमध्ये बदल करण्यास सरकारला भाग पाडले. एखाद्या माणसाला पकडल्यानंतर त्याला तुरुंगात आणले तरी त्याच्या नातेवाइकांना तो तुरुंगात असल्याचे कळतच नसे. उच्च न्यायालयाने एक निर्देश देऊन तुरुंगात आणलेल्या कैद्यांबद्दल त्याच्या नातेवाइकांना तुरुंगाधिकाऱ्यांनी कळवले पाहिजे, असा आदेश देऊन Prision Manual मध्ये त्याप्रमाणे दुरुस्ती करावयास लावली. तुरुंगातील कैद्यांची पत्रे वाचून त्यातील मजकूर वगळणे किंवा पत्रच न पाठवता ठेवून घेणे हा अधिकार देणारे नियम राज्यघटनेच्या कलम १४, १९ व २१ प्रमाणे अवैध आहेत असा निर्णय उच्च न्यायालयाने दिला. कैद्यालासुद्धा स्वतःची राजकीय मते बाळगता येतात. शिक्षेमुळे तो आपला हा अधिकार गमावत नाही. फक्त ज्यामुळे हिंसेला चिथावणीमुळे अगर कायदा आणि सुव्यवस्थेला धोका निर्माण होईल एवढ्या गोष्टीपुरताच हा अधिकार वापरता येईल असे उच्च न्यायालयाने ठरवले.

एड्स झालेल्या व्यक्तीला तेवढ्याच कारणावरून नोकरीत घेण्यास नकार देणे हे मूलभूत अधिकारांचा भंग करणारे आहे आणि एखाद्या साक्षीदाराची ओळख जाहीर न होऊ देणे हे त्याच्या हिताचे आहे असे न्यायालयाला वाटल्यास न्यायालय त्याची ओळख गुप्त ठेवू शकते. त्याची जबानी बंद न्यायालयात घेऊ शकते व त्याचे नाव, ओळख प्रसिद्ध होऊ नये असा आदेश देऊ शकते असा निर्णय या उच्च न्यायालयाने दिला आहे.

एखाद्या व्यक्तीला शासनातर्फे संरक्षण पुरवीत असताना तो कायदा मानणारा शांतताप्रिय नागरिक आहे, की गुन्हेगारी जगतातला एखादा आहे याचा विचार करून दोन्हीत फरक करणे हा कलम १४ आणि २१ चा भंग होत नाही; सरकारला अशा प्रकरणांचा फेरविचार करताना या गोष्टी लक्षात घेता येतील असा निर्णय या उच्च न्यायालयाने दिला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने सार्वजनिक हिताच्या याचिकेबद्दल एक समतोल दृष्टिकोन स्वीकारलेला आहे. लोकप्रतिनिधींचा धोरण ठरवण्याचा अधिकार मान्य करीत जेथे नागरिक हक्कांचे उल्लंघन होत असेल

अगर जेथे शासन आपले कर्तव्य करीत नसेल तेथेच हस्तक्षेप करण्याचा न्यायालयाचा विचार असतो. गोव्यामध्ये एकदा मलेरियाची जबरदस्त साथ आली. मेंदूतील संसर्गामुळे दोन मृत्यू झाल्यानंतरही सरकार फारसे हललेले नव्हते. वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांची उच्च न्यायालयाच्या गोवा न्यायपीठाने दखल घेतली आणि स्वतःच याबाबत पुढाकार घेऊन राज्यसरकारच्या विविध अधिकाऱ्यांना नोटिसा बजावल्या. मलेरियाचा संसर्ग गोव्यात जोरात सुरू असलेल्या बांधकामासाठी प्रांताबाहेरून आलेल्या मजुरांद्वारे झाला होता. तसेच बांधकामासाठी बांधण्यात येणाऱ्या पाण्याच्या हौदात डासांची पैदास होत होती. शासनाची पावले वेगात पडत नाहीत हे दिसताच गोव्यातील सर्व नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांची बैठक कोर्टात बोलावून जंतुनाशकाची उपलब्धी आणि त्यांचे योग्य वाटप, बाहेरून येणाऱ्या मजुरांची रक्ततपासणी, बांधकामासाठी पाण्याच्या साठवणीत व सर्वच सांडपाण्यावर औषधाची फवारणी अशा गोष्टीचे निर्देश उच्च न्यायालयानेच दिले आणि त्याप्रमाणे शासनाला त्वरित अमलबजावणी करावयास लावली. थोड्याच दिवसात ही गंभीर साथ आटोक्यात आली.

प्रशासकीय यंत्रणेला जर मानवी अधिकारांची पूरक जाण नसेल तर केवळ कायद्याची शब्दशः अमलबजावणी कशी होते याचे उदाहरण अनेक वेळा पाहावयास मिळते. महाराष्ट्रात नद्यांत साचणारी वाळू काढून घेऊन जाण्याची परवानगी शासन देते व त्यासाठी काही स्वामित्वमूल्य आकारले जाते. यासाठीच्या नियमात किती वाळू घेऊन जाऊ द्यावी याचा उल्लेख नव्हता. वाळूवर मिळणारे स्वामित्वमूल्य हा सरकारला आपला उत्पन्नाचा स्रोत वाटणे स्वाभाविक होते. नदीच्या पात्रातून वाळूचा अमर्याद उपसा झाला तर आजूबाजूच्या विहिरींच्या पाण्याची पातळी खाली जात असे आणि नदीतसुद्धा पाणी राहत नसे. एका शेतकऱ्याने उच्च न्यायालयाला पाठवलेल्या पत्राची दखल घेऊन उच्च न्यायालयाने याबाबत सर्व राज्याला लागू होईल असा हुकूम काढला, की प्रत्येक जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या शासकीय भूगर्भशास्त्रज्ञाने पाहणी करून दिलेल्या अहवालाप्रमाणे किती वाळू काढणे हितावह आहे हे ठिकठिकाणी तपासण्या केल्यानंतर ठरवून त्याप्रमाणे वाळू उपासण्याची परवानगी दिली जावी; शास्त्रज्ञाच्या पाहणीशिवाय अशी परवानगी देऊ नये. जिल्हाधिकारी नियमानुसार काम करत होते; परंतु नियमात जास्त वाळू काढण्याने काय दुष्परिणाम होतील याचा विचार केलेला नव्हता, म्हणून पिण्याच्या पाण्याची उपलब्धी हा जीवनाच्या मूलभूत अधिकाराचा भाग आहे असे ठरवून गौण खजिने नियमाधारे वाळू उपसण्यास परवानगी देताना त्याचा पाण्याच्या उपलब्धीवर काय परिणाम होईल हे पाहिले पाहिजे, असा उच्च न्यायालयाने असा निर्देश दिला.

**यंत्रणेचा विस्तार**

उच्च न्यायालयात ७५ न्यायाधीशांच्या जागा मान्य असल्या तरी तेवढ्या नेहमीच भरलेल्या असत नाहीत. दरवर्षी सुमारे ७५ हजार प्रकरणे उच्च न्यायालयात दाखल होतात. दोन हजार साली राज्यात २८ जिल्हा न्यायाधीश, ४० सह-जिल्हा न्यायाधीश, १०९ अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, ५० नगर दिवाणी न्यायाधीश आणि १२ कुटुंब न्यायालयाचे न्यायाधीश असे जिल्हास्तरावरील २३९ न्यायाधीश कार्यरत होते. याशिवाय ६७० हून अधिक कनिष्ठ व वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश काम करीत होते. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशासह हजाराहून अधिक न्यायाधीश महाराष्ट्रात न्यायदानाचे काम करीत होते. दहा वर्षांत ही संख्या आणखी वाढली आहे.

अनुक्रमणिका

आज महाराष्ट्रातील न्यायसंस्थेचा विस्तार खूपच मोठा झाला आहे. प्रत्येक जिल्ह्यात फक्त जिल्ह्याच्या ठिकाणीच नव्हे, तर एक-दोन तालुक्यांच्या ठिकाणीही अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशाची व अतिरिक्त सत्र न्यायाधीशांची न्यायालये झाली आहेत. जिल्हा न्यायालयात चालणारी त्या भागातील दिवाणी अपिले व फौजदारी खटले त्या तालुक्याच्या ठिकाणी चालतात. त्या तालुक्यातील लोकांची व लगतच्या तालुक्यातील पक्षकारांची त्यामुळे सोय झालेली आहे. नागरिकांना कायद्याची तोंडओळख व्हावी म्हणून विधिसाक्षरतेचा कार्यक्रम, विविध प्रकरणे तडजोडीने मिटावीत म्हणून सतत चालणारी लोकन्यायालये आणि कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांच्या सततच्या प्रशिक्षणाला मदत करणाऱ्या कार्यशाळा नेहमी चालतात. प्रलंबित खटल्यांचे निकाल लवकर व्हावेत म्हणून जलदगतीने न्यायालये, केंद्र सरकारच्या मदतीने राज्यात सुरू करण्यात आली आहेत व त्यात प्रकरणांचे निकाल वेगाने होऊन प्रलंबित खटल्यांची संख्या बरीच कमी झाली आहे.

महाराष्ट्रातील नव्याने सेवेत येणाऱ्या कनिष्ठ न्यायाधीशांच्या प्रशिक्षणासाठी आणि सेवेत असलेल्या न्यायाधीशांच्या उद्‌बोधनासाठी ज्योती (Jaudicial Officers Training Institute) नावाची एक संस्था नागपूर येथे कार्यरत आहे. निवड झालेल्या निवडक कनिष्ठस्तर न्यायाधीशांना तेथे प्रशिक्षित केले जाते; शिवाय अधूनमधून सेवेतील न्यायाधीशांनाही छोट्या उद्‌बोधन वर्गासाठी बोलावले जाते.

नागपूर येथे उच्च न्यायालयाची एक देखणी इमारत ब्रिटिशकाळातच बांधली गेलेली आहे. त्या इमारतीचा विस्तार त्याच पद्धतीच्या बांधकामाने करण्यात आला आहे. औरंगाबाद येथे उच्च न्यायालयाचे न्यायपीठ स्थापन झाल्यानंतर एक मोठी इमारत बांधण्यात आली आहे. सुमारे १६-१७ न्यायाधीश एकाच वेळी काम करू शकतील आणि वकील व पक्षकार यांच्यासाठीही पुरेशा सोयी असलेली ही इमारत आहे. अनेक ठिकाणी जिल्हा न्यायालयांच्या आणि तालुका न्यायालयांच्या इमारती आणि न्यायाधीशांसाठी निवासस्थाने बांधण्यात आली आहेत.

**मराठीतून न्यायदान**

मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेल्या एका महत्त्वाच्या निर्णयाचा उल्लेख येथे मुद्दाम केला पाहिजे. न्यायालयाचे कामकाज पक्षकारांच्या भाषेत म्हणजे लोकभाषेत चालले म्हणजे आपल्या प्रकरणात न्यायाची प्रक्रिया कशी झाली याचा आलेख त्याच्यासमोरच उलगडतो. लोकांच्या भाषेत न्याय हा लोकांच्या भाषेत राज्यकारभार या तत्त्वाचा एक महत्त्वाचा भाग आहे. महाराष्ट्राच्या लोकभाषेत म्हणजे मराठीत न्यायव्यवस्थेचा कारभार जिल्हास्तरापर्यंत चालावा अशी शासनाची आणि उच्च न्यायालयाची इच्छा आहे. दोन वर्षांत जिल्हा स्तरापर्यंतची सर्व निकालपत्रे मराठीत यावीत अशीही अपेक्षा या योजनेत व्यक्त करण्यात आली आहे.

वकील आणि न्यायाधीश या दोघांच्या परस्पर सहकार्याशिवाय एवढा मोठा महत्त्वाचा निर्णय प्रत्यक्षात येणे अवघड असते. कायदे इंग्रजीत, आजवरची इंग्रजीची सवय अशा अडथळ्यांना पार करत मराठी न्यायदानाकडे जायचे आहे. अर्थात इच्छाशक्ती असेल, तर त्यात काही अवघड नाही. महाराष्ट्रात इंग्रजांचे राज्य १९ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात आले. त्यानंतरची २५-३० वर्षे महाराष्ट्राचा कारभार आणि ज्ञानव्यवहार मराठीतच चालावा असा हेतू बाळगून अनेक उपक्रम राबवण्यात आले. परिभाषेचा बाऊ आज मोठ्या प्रमाणात केला जातो. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर रसायनशास्त्रापासून कायद्यापर्यंत

विविध ज्ञानशाखांच्या उपयोगी परिभाषा राज्य शासनाने तयार केल्या. ती पुस्तके आज उपलब्ध आहेत. इंग्रजांचे राज्य आल्यानंतर युरोपातील विद्यांची मराठीतील भाषांतरे वेगाने झाली. भूगर्भशास्त्रापासून संपत्ती हस्तांतरणाच्या किंवा मुदतीच्या कायद्यापर्यंत सर्व कायद्यांची मराठी भाषांतरे करण्यात आली. ती छापलीही गेली होती. जर एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकातच महाराष्ट्रात आत्मविश्वासाने सर्व विद्याग्रंथांची मराठी भाषांतरे होत होती तर आता ती महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य असताना का होऊ शकत नाहीत? कायद्याच्या क्षेत्रात राज्य सरकारने उच्च न्यायालयाच्या मदतीने भाषांतरकक्ष चालवलेला आहेच. त्याला अधिक बळ देऊन वेगाने काम करता येऊ शकेल. मराठीत भाषांतरे आजही झाली आहेत व होत आहेत; पण त्यांचा वापर जेवढ्या प्रमाणात व्हायला हवा तेवढा होत नाही. आपल्या मनातील मराठीबद्दलचा न्यूनगंड थोडा बाजूला करावा लागेल. अगदीच अवघड अशा न्यायसंकल्पनांचा विचार किती खटल्यात करावा लागतो? बहुतेक खटल्यात व्यवहारातील इंग्रजी पुरेसे असते. तेथे व्यवहारातील मराठीचे ज्ञान पुरेसे असते. फार तांत्रिक संकल्पना असेल तर तेवढा इंग्रजी शब्द वापरला तरी चालतो. फक्त इच्छाशक्ती किती प्रबळ आहे आणि आपण मराठीच्या वापराबद्दल किती प्रामाणिक आहोत हे मनाशी ठरवले पाहिजे.

### मूल्यनिष्ठाच संस्कृतीचे रक्षण करील

कागदपत्रांचा पूर्ण अभ्यास, कोणत्याही बाह्य दडपणाचा परिणाम न घेणारे न्यायाधीश, आपण केवळ पक्षकाराचे हत्यार नाही, तर न्यायालयाचे एक जबाबदार अधिकारी आहोत असे मानणारे वकील जर न्यायसंस्थेत असतील तर न्यायाची प्रक्रिया अधिक लोकोपयोगी होते. न्यायसंस्थेविषयीचा लोकांच्या मनातील आदर हा उदार लोकशाही राज्यव्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक असतो. आजच्या आपल्या सामाजिक जीवनात ज्या अनिष्ट गोष्टींनी प्राबल्य माजवण्यास सुरुवात केली आहे. त्याचा प्रादुर्भाव न्यायसंस्थेत होणे स्वाभाविक आहे. न्यायसंस्थेशी संबंधित सर्वांनीच याबद्दलची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता आहे. समाजाच्या संस्कृतीहून न्यायसंस्कृती फार काळ वेगळी आणि स्वतंत्र राहू शकत नसते. तिचे मूल्याधिष्ठित वेगळेपण टिकवणे ही एक अवघड जबाबदारी न्यायाधीश, वकील, पक्षकार आणि समाजातील इतर घटक या सर्वांवरच आहे.

संस्कृती ही व्यक्तींच्या आणि समुदायाच्या मूल्यनिष्ठेतून जन्माला येते. तिच्या निर्मितीला दीर्घकाळ लागतो. सुदैवाने महाराष्ट्रात अशी अनेक छोटी-मोठी माणसे होऊन गेली, की त्यांच्यामुळे महाराष्ट्राची संस्कृती निर्माण झाली. उदाहरणादाखल एक गोष्ट सांगितली पाहिजे. रत्नागिरीच्या न्यायालयात गांगल नावाचे एक वकील होते. रत्नागिरीच्या जिल्हा न्यायालयाच्या इमारतीवरच जिल्हा न्यायाधीश राहत असत. गांगल वकील न्यायाधीशांना आपण कागदपत्राबद्दल खरीच माहिती दिली पाहिजे याबद्दल दक्ष होते. अमुक गोष्ट कागदपत्रात आहे किंवा अमक्याच्या जबानीत असा उल्लेख आहे असे गांगलांनी सांगितले म्हणजे न्यायाधीश कागदपत्र स्वतः उलटून पाहत नसत. गांगल सांगत ते खरेच असणार असा विश्वास असे आणि गांगलांनी त्याला कधीही तडा जाऊ दिलेला नव्हता. कोर्टाचे कामकाज संपल्यानंतर जिल्हा न्यायाधीश वर घरी जात तास-दीड तासानंतर ते खाली उतरून फिरावयास जात असत. एके दिवशी जिल्हा न्यायाधीश खाली उतरले. पाहतात तो गांगल वकील येथे उभे आहेत. कोर्टाचे काम संपून दीड-दोन तास होऊन गेल्यानंतरही ते का थांबले असावेत याचा जिल्हा न्यायाधीशांना विचार पडला. त्यांनी गांगलांना विचारले. गांगल म्हणाले, "आज विवेचन करीत असताना प्रतिवादीच्या एका साक्षीदाराने एक गोष्ट मान्य केली आहे असे मी सांगितले. नंतर मी ती फाईल पुन्हा तपासली, तर त्या साक्षीदाराच्या जबानीचा तसा अर्थ लावता येणार नाही असे मला वाटू लागले. माझ्या सांगण्यावर विश्वास ठेवून आपण आपले मत बनवाल म्हणून

आजच आपल्याला हे सांगावे व आपली क्षमा मागावी यासाठी मी आपण खाली येण्याची वाट पाहत होतो.” गांगलांसारख्या अनेक वकिलांनी महाराष्ट्रामध्ये आपल्या सचोटीने आमची न्यायसंस्कृती निर्माण केली आहे.

शब्दसंख्या : ६६९८

**अनुक्रमणिका**

# शिक्षण

शिक्षण

शिक्षण

# शि क्ष ण

शिक्षण

शिक्षण

शिक्षण



**हेरंब कुलकर्णी**

महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात नामवंत शिक्षण तज्ज्ञ म्हणून हेरंब कुलकर्णी यांनी आपला ठसा उमटविला आहे. सामाजिक दृष्ट्या कमकुवत, खाजगी व वंचित घटकांच्या शिक्षणासाठी ते विशेष प्रयत्नशील असतात. प्राथमिक शिक्षण हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय असून त्यावर त्यांनी पन्नासपेक्षा अधिक लेख लिहिले आहेत. लोकसत्ता, लोकमत सकाळ यांसारख्या प्रतिष्ठित दैनिकांमध्ये त्यांनी केलेले स्तंभलेखन लोकप्रिय झाले आहे. 'साप्ताहिक साधनाच्या' संपादन मंडळावर त्यांची निवड करण्यात आली होती. त्यांनी महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये जाऊन शैक्षणिक सर्वेक्षण केले आहे. त्यांना विविध प्रकारचे शैक्षणिक सन्मान प्राप्त झाले आहेत. शिक्षण क्षेत्रातील त्यांचा अभ्यास आणि अनुभव लक्षात घेता भारत सरकारच्या केंद्रीय नियोजन आयोगाच्या शिक्षणविषयक आढावा समितीचा सदस्य म्हणून त्यांना नियुक्त करण्यात आले होते.

पत्ता : चिरेबंदी, महालक्ष्मी मंदीराजवळ, मु. पो. ता. अकोले, जि. अहमदनगर ४२२ ६०१.
दूरध्वनी : (०२४२४) २२२२९९, भ्रमणध्वनी : ९२७०९४७९७१

## शालेय शिक्षण

**गे**ल्या २००० वर्षांचा महाराष्ट्राचा इतिहास पाहिला तर तेराव्या शतकापासून जवळजवळ ४०० वर्षे मुसलमानी सत्ता याप्रदेशात राहिली. त्या काळात प्रत्येक गावात तात्या पंतोजी प्रकारच्या लेखन, वाचन व अंकगणित अनौपचारिकपणे शिकविणाऱ्या अनेक शाळा महाराष्ट्रात होत्या. औरंगाबाद, पैठण, नांदेड, वाई येथे संस्कृत पाठशाळा होत्या.

१८१८ मध्ये ब्रिटिशांनी सत्ता घेतल्यावर मुंबई इलाख्यातील प्राथमिक शिक्षणाबद्दलची माहिती मिळविण्यास सुरुवात केली. मुंबई प्रांतातल्या प्रत्येक खेड्यात शाळा पोहोचली. हे शिक्षण इतके अल्पखर्ची होते, की एखाद-दुसरा रुपया किंवा थोडेफार धान्य शिक्षकांना दिले म्हणजे तेवढे मानधन पुरेसे असे. एकशिक्षकी शाळांमध्ये वर्गनायिकामार्फत अध्यापनाचे काम चाले.

स्वातंत्र्यानंतर १ एप्रिल १९४९ पासून प्राथमिक शिक्षण अधिनियम अमलात आले. त्यानुसार प्राथमिक शिक्षणाची योजना व त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याची जबाबदारी जिल्हा शिक्षण मंडळे व अधिकृत नगरपालिका शिक्षण मंडळे यांच्यावर सोपविण्यात आली.

अनुक्रमणिका

१ मे १९६२ पासून प्राथमिक शिक्षणाचा संपूर्ण कार्यभार, जिल्हा परिषद, पंचायत समितीकडे सोपविला. जिल्हा परिषदेपूर्वी महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी जिल्हा शिक्षण मंडळाकडे होती. विदर्भात प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी जनपद सभांकडे होती. मराठवाड्याचा कारभार प्रत्यक्ष शासनाकडून पाहिला जात होता. पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनासाठी जिल्हा शिक्षण मंडळे होती.

१९६२ नंतर खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील शिक्षणाला गती मिळायला सुरुवात झाली. पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची स्थिती सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे होती.—

महाराष्ट्र राज्यातील पूर्व-प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणातील प्रगती

| | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ |
|---|---|---|---|---|---|
| पूर्व-प्राथमिक शिक्षण संस्था | ५२७ | ७०४ | ६५४ | ८५७ | ४८,३५५ |
| एकूण विद्यार्थी | ३३,९३१ | ५१,३७१ | ६४,२६३ | १,५८,८९७ | २२,६६,१२० |
| विद्यार्थिनी | १५,३७० | २३,८४६ | २९,२६३ | ७०,६७५ | ११,३७,७२२ |
| एकूण शिक्षक | १,३५१ | १,६३६ | १,६४७ | २,१८९ | ४८,३८० |
| शिक्षिका | १,२८३ | १,६०१ | १,५७० | २,१६८ | ४८,३३१ |
| प्राथमिक शिक्षण संस्था | ३४,५९४ | ४४,५३५ | ५१,०४५ | ५७,७४४ | ६५,९६० |
| एकूण विद्यार्थी | ४१७८ हजार | ६५३९ हजार | ८३९२ हजार | १०४२४ हजार | ११८५७ हजार |
| विद्यार्थिनी | १४९५ हजार | २५६७ हजार | ३६०५ हजार | ४७९९ हजार | ५७१२ हजार |
| एकूण शिक्षक | ११३ हजार | १७८ हजार | २२२ हजार | २६८ हजार | ३१३ हजार |
| शिक्षिका | २५ हजार | ४७ हजार | ७० हजार | १०३ हजार | १३४ हजार |
| माध्यमिक सिक्षण संस्था | २,४६८ | ५,३१३ | ५,३५२ | ८,२०० | ११,६७२ |
| एकूण विद्यार्थी | ८५८ हजार | १९८५ हजार | २४८१ हजार | ३७२३ हजार | ५०४७ हजार |
| विद्यार्थिनी | २३० हजार | ६०८ हजार | ८९४ हजार | १५११ हजार | २३२१ हजार |
| एकूण शिक्षक | ३५ हजार | ७५ हजार | ८७ हजार | १२१ हजार | १४८ हजार |
| शिक्षिका | ९ हजार | २० हजार | २५ हजार | ३९ हजार | ४८ हजार |
| उच्च माध्यमिक शिक्षण | | | | | |
| संस्था | | | ७६७ हजार | १,७७२ | ३,१०१ |
| एकूण विद्यार्थी | | | ८२८ | २०७१ | ३६०५ |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| | हजार | हजार | हजार |
| विद्यार्थिनी | २५७ | ७५८ | १५५६ |
| | हजार | हजार | हजार |
| एकूण शिक्षक | २७ हजार | ६१ हजार | ९३ हजार |
| शिक्षिका | ८ हजार | १७ हजार | २७ हजार |

**पूर्व-प्राथमिक शिक्षण :** पूर्व प्राथमिक शिक्षणाबद्दलची माहिती पूर्णपणे उपलब्ध होत नाही. १९९३-९४ पर्यंत महाराष्ट्र शासन पूर्व-प्राथमिक शाळा आणि संपूर्ण पूर्व-प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी यांची नोंद करीत असे. १९९३-९४ नंतर मात्र संपूर्ण पूर्व-प्राथमिक स्तरावरील वर्गाची नोंद करीत असल्याने शाळांच्या तसेच विद्यार्थी-शिक्षकांच्या संख्येत एकदम वाढ झाल्यासारखे दिसत आहे. १९९३-९४ नंतर वेगवेगळ्या योजनांसाठी पूर्व-प्राथमिकचे वर्ग सुरू झाले. त्यांची एकत्रित माहिती २०००-२००१ या शालेय वर्षासाठी दिलेली आहे. पूर्व-प्राथमिक शाळांचे अनेक वर्ग खाजगी रीतीने चालू असल्याने त्यांची नोंद होत नाही हे लक्षात ठेवणे जरूर आहे.

**प्राथमिक शिक्षण :** १९६०-६१ ते २०००-२००१ या ४० वर्षांच्या कालखंडात शाळांची संख्या ३४५९४ वरून ६५९६० म्हणजे १·९१ पट झाली. त्या कालखंडात एकूण विद्यार्थ्यांची संख्या ४१७८ हजारावरून ११८५७ हजार म्हणजे २·८३ पट झाली. मुलींची संख्या १४९५ हजारावरून ५७१२ हजार म्हणजे ३·८२ पट झाली. एकूण शिक्षकांची संख्या ११३ हजारावरून ३१३ हजार म्हणजे २·७७ पट झाली तर शिक्षिकांची संख्या २५ हजारावरून १३४ हजार म्हणजे ५·३६ पट झाली. या ४० वर्षांच्या कालखंडात शाळांची संख्या केवळ दुप्पट झाली असली तरी एकूण विद्यार्थ्यांची संख्या तिप्पट तर विद्यार्थ्यांची संख्या चौपट झाली आहे. एकूण शिक्षकांची संख्या साधारणपणे तिप्पट झाली असली तरी शिक्षिकांची संख्या मात्र साडेपाचपट झाली आहे. यावरून सामान्यतः असे म्हणता येते की, या ४० वर्षांत राज्यातील मुलींच्या शिक्षणाचे व स्त्रियांच्या शिक्षण-क्षेत्रातील नोकरीचे प्रमाण चांगलेच वाढले आहे.

**माध्यमिक शिक्षण :** १९६०-६१ ते २०००-२००१ या कालखंडात माध्यमिक शाळांची संख्या २४६८ वरून व ११६७२ म्हणजे ४·७३ पट झाली. या मुदतीत विद्यार्थ्यांची एकूण संख्या ८५८ हजारावरून ५०४७ हजार म्हणजे ५·८८ पट झाली. मुलींची संख्या २३० हजारावरून २३२१ हजार म्हणजे १० पट झाली. शिक्षकांची एकूण संख्या ३५ हजारावरून १४८ हजार म्हणजे ४·२३ पट झाली, तर शिक्षिकांची संख्या ९ हजारावरून ४८ हजार म्हणजे ५·३३ पट झाली. यावरून सामान्यतः असे म्हणता येते की, प्राथमिक शिक्षणाशी तुलना करता महाराष्ट्रातील माध्यमिक शिक्षणाची वाढ प्रचंड झाली. त्यातील मुलींच्या संख्येतील वाढ विशेष उल्लेखनीय आहे.

**उच्च माध्यमिक शिक्षण :** +२ स्तरावरील अभ्यासक्रम १९७५-७७ या कालखंडात सुरू झाला. त्यातून सुरुवातीला वर्ग पूर्णपणे शाळेत, नंतर १ वर्ष बहुतांशी महाविद्यालयात, तर नंतर सोयीप्रमाण दोन्हीकडे अशी व्यवस्था झाल्याने १९८०-८१ पासूनचे आकडे तुलनेसाठी घेतले आहेत. १९८०-८१ ते २०००-०१ या कालखंडात उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या ७६७ वरून ३१०१ म्हणजे ४·०४ पट झाली. त्याच कालखंडात विद्यार्थ्यांची संख्या ८२८ हजारावरून ३६०५ हजार म्हणजे ४·३५ पट तर विद्यार्थिनींची संख्या २५७ हजारावरून १५५६ हजार म्हणजे ६·०५ पट झाली. शिक्षकांची एकूण संख्या २७

हजारावरून ९३ हजार रुपये ३·४५ पट तर शिक्षिकांची संख्या ८ हजारावरून २७ हजार म्हणजे ३·२८ पट झाली.

१९६०-६१ ते २०००-०१ या कालखंडामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या तुलनेत माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास तुलनेने भरपूर झाला. विद्यार्थ्यांची तसेच विद्यार्थिनींची संख्या दुपटीपेक्षा जास्त वाढली. त्यातून माध्यमिक स्तरावर विद्यार्थिनींची संख्या १० पट झाली. यावरून सामान्य जनतेत मुलींच्या शिक्षणाची जाणीव वाढली आहे, असा निष्कर्ष काढता येतो. सर्वच स्तरावर शिक्षिकांचे प्रमाण वाढले असले तरी तुलनेने वाढलेले नाही.

**महाराष्ट्राच्या शिक्षणावर प्रभाव टाकणारे महापुरुष :**

महाराष्ट्रातील शिक्षणाला गती मिळाली याचा विचार केवळ १९६० ते २०१० या कालखंडापुरताच करून चालणार नाही. याचे कारण स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक लढे, विचारमंथन यामुळे महाराष्ट्रातील शिक्षणाला गती मिळाली आहे हे लक्षात घ्यायला हवे.

महात्मा गांधींनी बुनियादी शिक्षणाची मांडलेली संकल्पना, लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाला दिलेले महत्त्व, त्यामुळे गावोगावी सुरू झालेल्या राष्ट्रीय शाळा, आगरकर, रानडे, वि. रा. शिंदे, इ. नी केलेल्या तर्कशुद्ध समाजजागरणाचा अपरिहार्य परिणाम शिक्षणाच्या जागृतीत झाला.

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेने व प्रत्यक्ष कार्याने बहुजन समाजातील शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला. बहुजनांच्या उद्धारासाठी केवळ आर्थिक विकास व सामाजिक चळवळी पुरेशा नाहीत तर शिक्षण हाच महत्त्वाचा मार्ग आहे हे त्यांनी पटवून दिले.

राजर्षि शाहू महाराजांनी सक्तीचे व मोफत शिक्षण १९१२ सालीच कार्यान्वित केले. आज शिक्षणाचा कायदा करताना खर्च वाचविण्याच्या अनेक पळवाटा शोधल्या जातात. पण त्या काळात शाहू महाराजांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची अमलबजावणी करून दाखविली. पगारी शिक्षक ही योजना राबविली. शाळेत येणाऱ्या मुलांना भाकरी, शाळेत मुलांना न पाठविणाऱ्या पालकांना शिक्षा. बहुजन समाजातील जाती-जमातींसाठी अनेक वसतिगृहे सुरू केली. शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्रातील शिक्षणाची प्रत्यक्षात अमलबजावणी सुरू झाली.

महात्मा फुलेंनी प्रत्यक्षात शाळा काढली. सावित्रीबाईंनी हालअपेष्टा सहन करून प्रत्यक्षात मुलींना शिकवले हे काम महान आहे पण त्याहीपेक्षा महात्मा फुलेंनी बहुजनांच्या मागास राहण्याचे कारण शिक्षण नसणे हे आहे व विकासाचा मार्गही शिक्षणच आहे हे तत्त्वज्ञान मांडले. त्यातूनच महाराष्ट्रातील उपेक्षित वर्गाच्या शिक्षणाला गती मिळाली. हे त्यांचे सर्वात मोठे योगदान मला वाटते. शोषणाच्या बेड्या तोडायला लोकलढ्यांबरोबरच शिक्षण हेच महत्त्वाचे हत्यार आहे ही जाणीव सर्व लोकचळवळींना महात्मा फुलेंनी करून दिली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या जीवनाचेच उदाहरण समाजापुढे ठेवून शिक्षणामुळे उपेक्षित वर्गाचे आयुष्य कसे बदलू शकते याचा वस्तुपाठच सर्वांपुढे ठेवला. "शिका, संघटित

अनुक्रमणिका

व्हा व संघर्ष करा" असा संदेश दिला. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हा राष्ट्रप्रगतीच्या इमारतीचा पाया आहे हे स्पष्ट करून त्यांनी सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह धरला. मांडणीसोबतच बाबासाहेबांनी विविध शैक्षणिक संस्थांचीही स्थापना केली.

गाडगे महाराज व तुकडोजी महाराज यांनी केलेल्या जनजागृतीमुळे ग्रामीण भागातील पालकवर्गात शिक्षणाविषयी जागृती निर्माण झाली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य हा महाराष्ट्रातील शैक्षणिक वाटचालीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. शिक्षणावर भाष्य करण्यापेक्षा गावोगावी पायी फिरून भाऊरावांनी दुर्गम ठिकाणी शाळा सुरू केल्या. कोणत्याही देणग्यांची वाट न पाहता केवळ श्रमाच्या आधारे त्यांनी शाळा उभारून ग्रामीण शिक्षणाला गती दिली. महाराष्ट्रात आज बहुजन समाजातील मध्यमवर्ग, उच्चशिक्षितवर्ग व राजकारण, समाजकारण, अर्थकारण यांचे वाढते प्रमाण हे भाऊरावांच्या प्रयत्नांचे फळ आहे.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी मुलींच्या शिक्षणासाठी केलेले कार्य स्त्री शिक्षणातील महत्त्वाचा टप्पा आहे. १९१६ साली त्यांनी सुरू केलेले 'महिला विद्यापीठ' ही महत्त्वाची उपलब्धी ठरली.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शिवाजी शिक्षण संस्थेच्या द्वारे शिक्षणाचे जे जाळे उभारले त्यामुळे विदर्भातील ग्रामीण भागातील अनेक पिढ्या शिकू शकल्या. साने गुरुजी हे नाव महाराष्ट्राच्या शिक्षणाला गती देणारे उत्प्रेरक आहे. साने गुरुजींनी प्रेम आणि निसर्गप्रेम, राष्ट्रभक्ती व सामाजिक बांधीलकीचा जो संस्कार दिला, त्या प्रेरणेतून हजारो उच्चशिक्षित तरुणांनी शिक्षक होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शिक्षणात गुणात्मक वाढ होण्यास मदत झाली.

महर्षि वि. रा. शिंदे यांच्या मांडणीमुळे व प्रत्यक्ष कामामुळे दलितांचे शिक्षण व स्त्रियांचे शिक्षण हा विषय ऐरणीवर आला. वि. रा. शिंदे यांची वंचित समूहाविषयीची तळमळ अनेक चळवळींना शैक्षणिक कार्यासाठी प्रेरणादायी ठरली.

जे. पी. नाईक यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेले शैक्षणिक कार्य हा खरे तर महाराष्ट्राच्या गौरवाचा विषय आहे. जगातील १०० शिक्षण तज्ज्ञांपैकी नाईकांना युनेस्कोने गौरविले आहे. कोठारी आयोगाचे सचिव म्हणून त्यांचे काम ऐतिहासिक आहे. शिक्षणावर त्यांची ३२ पुस्तके प्रसिद्ध आहेत. भारत सरकारच्या विविध शैक्षणिक धोरणांचे नाईकसाहेब उद्‌गाते आहेत. पुण्यात त्यांनी स्थापन केलेली 'भारतीय शिक्षण संस्था' ही संस्था साक्षरता प्रसार आणि प्राथमिक शिक्षणात काम करणारी पथदर्शक संस्था ठरली. अंशवेळ शिक्षण व अनौपचारिक शिक्षणाच्या क्षेत्रातही नाईकसाहेबांचे योगदान ऐतिहासिक आहे.

**शिक्षणविकासासाठी नेमलेल्या विविध समित्या :**

महाराष्ट्रातील शिक्षणाला गती देण्यासाठी शासनाने वेळोवेळी विविध समित्या नेमल्या आहेत. महाराष्ट्र निर्मितीनंतर १९६५ साली शिक्षणाच्या समस्या व आकृतिबंधाचे परीक्षण करण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने शिफारसी सुचविण्यासाठी शिक्षण व समाजकल्याण विभाग व महाराष्ट्र शासन

अनुक्रमणिका

यांनी एक समिती नेमली. चित्रा नाईक या कमिटीच्या अध्यक्षा होत्या. या समितीने पुढील शिफारसी केल्या :—

(१) अभ्यासक्रम रचनेच्या आधुनिक तंत्राप्रमाणे शाळा व शिक्षकांचे शिक्षण या दोन्हीत बदल करावेत.

(२) शालेय शिक्षणाचे आधुनिकीकरण करायला हवे.

(३) शिक्षकांना गुणवत्तेच्या आधारावर बढती द्यावी.

८ एप्रिल १९६८ रोजी शिक्षण मंत्री मधुकरराव चौधरी यांनी श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली. त्यात शिक्षणाची गुणवत्ता वाढवून तिच्या विकासाचे सातत्य राखणे, शिक्षणाची समानसंधी अधिक प्रमाणात निर्माण करण्याच्या दृष्टीने सर्व शैक्षणिक सुविधांत वाढ करणे अशी उद्दिष्टे ठरविण्यात आली. यात शैक्षणिक पुनर्रचनेसंबंधी धोरणविषयक निवेदन जाहीर करण्यात आले.

(१) शासनाला सल्ला देण्यासाठी राज्य शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात येईल.

(२) पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी प्रत्येक जिल्ह्यात अध्यापन केंद्रे उघडण्याचे मानस.

शिक्षण राज्यमंत्री पार्वतीबाई मलगोंडा यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षणात सुधारणा करण्यासाठी १९८४ साली शालेय शिक्षण सुधार समिती नेमण्यात आली. त्या समितीने पुढील शिफारशी केल्या :—

(१) बालवाडी व प्राथमिक शिक्षणात योग्य समन्वय असावा.

(२) हंगामी, स्थलांतरित, भटके यांच्या मुलांसाठी शिक्षणाचा विशेष कार्यक्रम असावा. बालकामगार प्रतिबंधक कायद्याची अमलबजावणी कडक करावी.

(३) मुलींसाठी स्वतंत्र आश्रमशाळा उघडाव्यात.

१९८६ साली प्राचार्य पी. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत राज्य मूल्यमापन समिती स्थापन करण्यात आली.

१९९२ साली माजी शिक्षणमंत्री प्रा. राम मेघे यांच्या अध्यक्षतेखाली प्राथमिक शिक्षण आयोग नियुक्त करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे निवृत्त मुख्य सचिव श्री. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्य नियोजन मंडळाने पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शिक्षण व साक्षरता याविषयीचे धोरणात्मक प्रश्न, त्यांचा प्राधान्यक्रम व अनुदाने यांच्याविषयीचा विचार करण्यासाठी अभ्यासगट नियुक्त करण्यात आला.

१९९५ साली प्रा. राम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या राज्यस्तरीय बालशिक्षण समिती बालशिक्षणासाठी महत्त्वाची ठरली.

अनुक्रमणिका

१९९२ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अमलबजावणीसाठी सुधारित कृती कार्यक्रम तयार केला. प्रत्येक राज्याने आपल्या राज्यातील परिस्थिती विचारात घेऊन आपला स्वतंत्र कृती कार्यक्रम तयार करावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने १९९२ ला कार्यबल गटाची स्थापना केली.

या कार्यबल गटाच्या अनेक धक्कादायक गोष्टी निदर्शनास आल्या. त्यात २० लाखांपेक्षा जास्त मुले शाळेबाहेर आढळली. इ. ५वी अखेर ३२% गळती तर ८वी अखेर ५२% गळती होती. आदिवासी मुलींमधली गळती ४९% आढळली.

हे चित्र बदलण्यासाठी सन २००० पर्यंत शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. कृतिकार्यक्रमात मुलींचे आणि कमकुवत गटांचे शिक्षण, सूक्ष्म नियोजन, विकेंद्रीकरण आणि समाजाचा सहभाग यावर विशेष भर दिला आहे.

महाराष्ट्रात २००१ साली सुरू करण्यात आलेल्या वस्तीशाळांमध्ये प्रश्न गंभीर झाले. महाराष्ट्रातील ८००० वस्त्यांवर १५ मुलींसाठी या शाळा सुरू करण्यात आल्या. वस्तीने दिलेल्या जागेत १२वी झालेला स्वयंसेवक विद्यार्थ्यांना शिकवत होता, परंतु केंद्र शासनाने ही योजना थांबवल्यावर महाराष्ट्र शासनाने ज. मो. अभ्यंकर समिती नेमून या ८००० स्वयंसेवकांना निमशिक्षक म्हणून मुख्य प्रवाहात सामील करून या वस्तीशाळांचे जि. प. शाळेत रूपांतरण केले. अलीकडच्या काळातील शिक्षणक्षेत्रातील हा महत्त्वाचा निर्णय आहे.

एन. डी. पाटील म्हणतात की, शिक्षणाचा इतिहास हा विविध आयोग आणि समित्यांचा इतिहास आहे. महाराष्ट्र शासनानेही वेळोवेळी विविध समित्या नेमल्या आहेत. या समित्यांमुळे त्या त्या वेळी जी शैक्षणिक आव्हाने उभी ठाकली त्यांची सोडवणूक करण्यासाठी नक्कीच उपयोग झाला. त्यामुळेच या समित्यांचे, शिक्षणाच्या विकासात खूप मोठे योगदान आहे.

**शिक्षणक्षेत्रातील महत्त्वपूर्ण शैक्षणिक शासकीय संस्था**

शासकीय स्तरावर शैक्षणिक विकासासाठी विविध शासकीय संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. त्यात सर्वात महत्त्वाची संस्था ही महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ही आहे. संशोधन, प्रशिक्षण, विस्तार सेवा, मूल्यमापन, अभ्यासक्रम निर्मिती, अध्ययन व अध्यापन साहित्यनिर्मिती, शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण, नवोपक्रम, अमलबजावणी इ. कार्ये ही संस्था करते. महाराष्ट्र राज्य दृकश्रवण शिक्षण संस्था ही शैक्षणिक साहित्याची निर्मिती व वापर यासाठी कृतिसत्रांचे आयोजन करते. राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर ही संस्था विज्ञान व गणित विषयांचे अध्ययन, अध्यापन याविषयी साहित्यनिर्मिती, उद्‌बोधनवर्ग, विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन ही कामे करते. राज्य आंग्लभाषा शिक्षण संस्था, औरंगाबाद ही संस्था शिक्षकांसाठी इंग्रजी विषयाचे उद्‌बोधन वर्ग, कृतिसत्रांचे आयोजन, साहित्यनिर्मिती इ. कामे करते.

महाराष्ट्र राज्य व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था ही इ. १०वी व १२वी नंतरचे व्यावसायिक अभ्यासक्रम निवडण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करते. शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था ही संस्था शालेय

विद्यार्थ्यांसाठी दूरचित्रवाणी कार्यक्रम विकसित करते. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तकनिर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ ही संस्था १ली ते ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके व शिक्षकांसाठी शिक्षक हस्तपुस्तिका यांची निर्मिती करते. महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ ही संस्था पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा, प्राथमिक शिक्षकांसाठी निवड परीक्षांचे आयोजन करते.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ही संस्था सध्या सर्व शिक्षा अभियान या योजनेची अंमलबजावणी करणारी शिखर संस्था आहे. महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद ही संस्था शिक्षण विभागात कार्यरत अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करते.

प्रकाशने 'महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद' जीवनशिक्षण हे मासिक प्रसिद्ध करते. १९५६ साली सुरू झालेल्या या सुवर्णमहोत्सवी मासिकाने आजपर्यंत १०० पेक्षा जास्त विशेषांक प्रसिद्ध केले आहेत. 'शाळा समूह विशेषांक', 'केंद्रप्रमुख', 'इंग्रजी' इ. विशेषांक महत्त्वपूर्ण ठरले. समाजातील मान्यवरांचे 'आठवणीतील शाळा' हे सदर व प्रत्यक्ष पाठ्यपुस्तकातील कवीने त्या कवितेबद्दल लिहिलेले लेख, शिक्षकांसाठी 'प्रश्नमंजुषा' हे स्तंभ खूपच लोकप्रिय ठरले. राज्यातील ग्रामीण भागातील हजारो शिक्षकांना 'जीवनशिक्षण' ने लिहिते केले. अशाचप्रकारचे मासिक एस.एस.सी. बोर्ड 'शिक्षणसंक्रमण' नावाने अतिशय माहितीपूर्ण रीतीने काढते. 'शिक्षणसंक्रमण' मधून शासकीय अध्यादेश, विविध धोरणांचा परिचय, विशेषांक, विविध विषयांबाबत मार्गदर्शन अशा स्वरूपाचे अंक प्रकाशित होतात.

**महाराष्ट्रातील माध्यमिक शिक्षण**

माध्यमिक शिक्षण विकासाचे प्रामुख्याने तीन टप्पे पडतात. १८१८ ते १९२० हा पहिला कालखंड. या कालखंडातील वाढ सर्वस्वी ब्रिटिश राज्यकर्त्यांवर अवलंबून होती. १९२१ ते १९४७ हा दुसरा कालखंड. या कालखंडात भारतीय शिक्षणमंत्री आले आणि त्यांनी उपलब्ध अधिकाराच्या बळावर शिक्षणाच्या सोयींची वाढ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. १९४७ ते १९७५ हा तिसरा कालखंड. या कालखंडात स्वातंत्र्योत्तर काळात बोर्डाच्या समान परीक्षाप्रणालीपर्यंत विकास होऊन माध्यमिक शिक्षणाला निश्चित असा चेहरा प्राप्त झाला.

महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा असे तीन विभाग एकत्र येऊन त्यातील संस्था एका शासनाखाली आल्या. महाराष्ट्र राज्य स्थापन होण्यापूर्वी हे तीनही विभाग भिन्न शासनाखाली असल्याने त्यांची विषम वाढ झालेली आहे. पश्चिम महाराष्ट्रात शैक्षणिक संस्थांची वाढ विदर्भापेक्षा जास्त आणि विदर्भात मराठवाड्यापेक्षा जास्त झाली होती.

माध्यमिक शिक्षणाबाबत ब्रिटिशांनी ठरविलेला ढाचाच स्वातंत्र्यानंतर थोड्याफार फरकाने सुरू राहिला. शासनाने प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी घ्यावी, माध्यमिक व उच्च शिक्षणाची सोय खाजगी संस्थांनी करावी. आर्थिक जबाबदारी व पुढाकार खाजगी संस्थांनी घ्यावा आणि या संस्थांना शासनाने आवश्यक ते पुरवणी सहाय्य द्यावे. आदर्श संस्था म्हणून शासनाने काही चांगल्या संस्था जिल्हाच्या ठिकाणी स्थापन कराव्यात. या धोरणानुसारच आज वाटचाल सुरू झाली. पुण्याची डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही माध्यमिक शिक्षण देणारी पहिली खाजगी संस्था ठरली.

१९६२ साली जिल्हा परिषदांकडे माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी सोपवली गेली. राज्य पुनर्घटना झाल्यानंतर गुजरात, महाराष्ट्र यांचे द्वैभाषिक राज्य अस्तित्वात आले. त्याचवेळी भिन्न विभागातील शिक्षणात समानता स्थापन करण्याच्या दृष्टीने योजना सुचविण्याकरिता 'इंटिग्रेशन कमिटी' नेमली गेली. त्यानुसार १ जानेवारी १९६६ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची स्थापना झाली. या मंडळाकडे शालांत परीक्षा घेण्याचे काम आलेच पण त्यापेक्षाही माध्यमिक शिक्षणाचे धोरण, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, परीक्षा, शाळा मान्यता, नियम इ. अनेक कामे या मंडळाकडे आली.

कोठारी आयोगाने शालेय शिक्षण एकूण १० वर्षांचे असावे २ वर्षे उच्च माध्यमिक शिक्षण असावे असे सुचविले. महाराष्ट्रात या प्रश्नाचा विचार १९६८ पासून १९७२-७३ पर्यंत झाला आणि उच्च माध्यमिक शिक्षण धरून एक समान शालेय कार्यक्रम १२ वर्षांचा असावा, त्यात प्राथमिक विभाग ४ वर्षांचे, निम्न माध्यमिक शिक्षण ३ वर्षांचे असावे व सात वर्षांनंतर ३ वर्षे माध्यमिक शिक्षण असावे. १० वर्षांच्या शालेय शिक्षणानंतर माध्यमिक शालांत परीक्षा घेतली जावी. १२ वर्षांनंतर उच्च माध्यमिक शालांत परीक्षा घेतली जावी.

एस. एस. सी. बोर्डाची स्थापना होण्यापूर्वी १५-२० वर्षांच्या कालखंडात शैक्षणिक व सामाजिक परिवर्तन झालेले होते. त्याचे प्रतिबिंब एस. एस. सी. बोर्डाच्या अभ्यासक्रमात व परीक्षापद्धतीत पडलेले आहे. माध्यमिक शिक्षणात बौद्धिकदृष्ट्या कमी, मध्यम आणि तीव्र बुद्धीचे सर्व दर्जाचे विद्यार्थी आलेले होते. त्यांच्या गरजेप्रमाणे शिक्षण देणाऱ्या स्वतंत्र शाळा नव्हत्या. काही कठीण विषय सोपे करण्याची आवश्यकता होती. व्यावहारिक, कलाप्रधान, सोपे आणि कठीण अशा सर्व विषयांचा समावेश एकाच परिक्षेत करून त्या सर्वांना एकत्र दर्जा देण्याची आवश्यकता होती. एस. एस. सी. बोर्डाने ती गरज पूर्ण केली.

१९४७ साली बाळासाहेब खेर, मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री झाल्यानंतर त्यांच्या कारकिर्दीत शिक्षणाच्या अभ्यासक्रमातून ५वी, ६वी, ७वी या वर्गातील अभ्यासक्रमातून इंग्रजी या विषयाची हकालपट्टी करण्यात आली व हा विषय फक्त ८ ते ११ या इयत्तांनाच शिकवण्याची व्यवस्था राहिली. या निर्णयाचे अनुकरण मुंबई व्यतिरिक्त इतर प्रांतात झाले नाही. मराठवाड्यात व विदर्भात निम्न माध्यमिक वर्गाचे इंग्रजी कायम राहिले. मुंबई प्रांतातील विद्यार्थी अखिल भारतीय परीक्षेत मागे पडू लागले. शेवटी १९७२-७३ साली झालेल्या बदलात इंग्रजी हा विषय ५वी, ६वी, ७वी मध्ये पुन्हा आला.

मुदलियार आयोगाने ज्या सुधारणा सुचविल्या त्या सुधारणांची शिफारस १९५६ साली झाली. या सुधारणांचे मुख्य तत्त्व विविधता हे होते. माध्यमिक शिक्षणात येणारा विद्यार्थीवर्ग निरनिराळ्या प्रवृत्तींचा, आवडीनिवडींचा आणि बौद्धिक पात्रतेचा असल्यामुळे त्या प्रमाणात अभ्यासक्रमातील विषयांची विविधता पाहिजे असे मुदलियार आयोगाचे मुख्य तत्त्व होते. या तत्त्वानुसार माध्यमिक शिक्षणात वाङ्मयप्रधान, विज्ञानप्रधान, कलाप्रधान, कृषिप्रधान, व्यापारप्रधान अभ्यासक्रमांचा समावेश केला गेला. पश्चिम महाराष्ट्रात हा उपक्रम १९३७ पासूनच सुरू झाला. विदर्भ मराठवाड्यात या संस्था १९६६ नंतर स्थापन झाल्या.

मुदलियार आयोगानंतर १९६४ साली नेमलेल्या कोठारी आयोगाने महत्त्वाच्या शिफारशी केल्या. १०+२+३ हा आकृतिबंध कोठारी आयोगाच्या शिफारशीनंतरच अमलात आला. महाराष्ट्र शासनाने या आयोगाच्या शिफारसींवर आधारित आपली 'श्वेतपत्रिका' आधारलेली होती आणि तिच्यावर व्यक्त झालेले जनमत लक्षात घेऊन २३ फेब्रुवारी १९७० ला आपले शासकीय धोरणाचे निवेदन जाहीर केले.

अनुक्रमणिका

मातृभाषा, गणित, भौतिकशास्त्रे व विज्ञान, सामाजिक शास्त्रे, कला, कार्यानुभव, समाजसेवा, शारीरिक शिक्षण व मूल्यशिक्षण हे कोठारी आयोगाने सुचविलेले सर्व विषय महाराष्ट्र शासनाने स्वीकारले आहेत.

मात्र शिक्षणाच्या पुनर्रचित माध्यमिक शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात व्यावसायिकरण व्हावे व सातवीनंतर २०% विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणाकडे वळावेत ही कोठारी आयोगाची अपेक्षा मात्र पूर्ण झाली नाही.

१९७५ साली एस.एस.सी. परीक्षेची पहिली बॅच बाहेर पडली. त्यानंतर एकसूत्रीकरण झालेल्या माध्यमिक शिक्षणाला खऱ्या अर्थाने गती मिळाली. खाजगी संस्थांनी महाराष्ट्रात गावोगावी शाळा उघडल्या. अनेक संस्थांनी संपूर्ण जिल्हाभर माध्यमिक शाळांचे जाळे निर्माण केले. अनेक गावकऱ्यांनी आपल्या गावस्तरावर पुढाकार घेऊन माध्यमिक शाळा सुरू केल्या. आदिवासी भागात आश्रमशाळा खेडोपाडी सुरू झाल्याने माध्यमिक शिक्षणाची गरज पूर्ण झाली. परंतु तरीही अजून विस्तार पुरेसा झालेला नाही.

**एस.एस.सी. परीक्षेचा फेरविचार व बोर्डाचा दर्जा**

कपिल सिब्बल मानव संसाधन मंत्री झाल्यानंतर त्यांनी माध्यमिक परीक्षांच्या फेररचनेचाच निर्णय घेतला. माध्यमिक शालांत परीक्षेचा फेरविचार करण्याचे महत्त्वाचे कारण हे आहे की, एकतर बोर्डाचे निकालात नापासांचे प्रमाण खूपच मोठे होते. त्यामुळे हे नापास झालेले विद्यार्थी आत्महत्येपासून तर नैराश्यापर्यंत विविध परिणामांना सामोरे जात. ते शाळांमधून गळती होत. पुढच्या शिक्षणाचा दरवाजा बंद होई व हे विद्यार्थी रोजगारासाठी मजुरीला जात. मुलींचे दहावी नापास होणे म्हणजे मुलींचे लग्न होणे असाच त्याचा अर्थ होता. त्यामुळे परीक्षांविषयी काहीतरी निर्णय घेणे गरजेचे होते. त्यामुळे नव्या निर्णयानुसार श्रेणीपद्धतीला प्राधान्य दिले जाणार आहे. यात फक्त अडचण ही आहे की, शालेय स्तरावर एखाद्या विषयाची लेखी परीक्षा काढून श्रेणी दिली की, शिक्षक व शाळा त्या विषयाकडे दुर्लक्ष करू लागतात. कार्यानुभव, समाजसेवा या विषयांबाबत, घडले आहे. त्यामुळे विषयज्ञान विद्यार्थ्यांना फारसे मिळत नाही. परीक्षा कडक केल्या की, आत्महत्येपासून गळतीपर्यंत परिणाम होतात आणि परीक्षा या सोप्या केल्या की, त्या विषयांकडेच शाळा दुर्लक्ष करतात असा हा गुंता आहे. तेव्हा परीक्षा सोप्या करताना किंवा श्रेणीपद्धती सुरू करताना शाळांचे, शिक्षकांच्या मूल्यमापनाचे वस्तुनिष्ठ निकष आपल्याला अमलात आणावे लागतील. हे जर केले नाही, तर आपल्या शैक्षणिक दर्जाचा आणखी ऱ्हास होईल.

मानव संसाधन मंत्री कपिल सिब्बल यांनी सर्व बोर्ड समान पातळीवर आणण्याचा निर्णय घेतला आहे. तो अत्यंत स्वागतार्ह आहे. तो अशासाठी, की आज उच्चमध्यमवर्गीय व मध्यमवर्गीय पालकांमध्ये इंटरनॅशनल स्कूल, सी.बी.एस.ई., अशा तत्सम बोर्डांचे आकर्षण वाढत आहे. आय.आय.टी., विविध स्पर्धा परीक्षा या परीक्षांमध्ये या बोर्डांचे विद्यार्थी यशस्वी होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे नकळत आपल्या बोर्डाचे महत्त्व कमी होत आहे. बारावीच्या निकालानंतर अभियांत्रिकी, वैद्यकीय विभाग प्रवेश परीक्षा घेतात. त्या परीक्षांमध्येही इतर बोर्डाचे विद्यार्थी चमकतात. त्यामुळे इथून पुढे आपल्या बोर्डाची गुणवत्ता सुधारून ते समान पातळीवर आणण्याचे आपल्यापुढे आव्हान आहे. आज महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील मोठ्या गावांमध्ये सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाच्या शाळा सुरू होत आहेत. या

अनुक्रमणिका

अभ्यासक्रमांविषयी आकर्षण इतके वाढले आहे, की ११वी प्रवेशाला या विद्यार्थ्यांना किती जागा ठेवायच्या हा विषय न्यायालये, मंत्रिमंडळाची बैठक व राजकीय पक्षांच्या प्राधान्याचा विषय होतो.

हे असेच घडत राहिले तर माध्यमिक शिक्षणात आजपर्यंत घेतलेली धोरणे फसतील व एक नवी विषमता तयार होईल. इंटरनॅशनल स्कूलच्या १०वीच्या वर्गातून पास झालेला विद्यार्थी व आश्रमशाळेतील १०वीच्या वर्गातील विद्यार्थी या दोघांच्या संपादणुकीतील अंतर हजारो मैलांचे आहे ही सर्वात अस्वस्थ करणारी गोष्ट आहे.

तेव्हा महाराष्ट्रातील बोर्ड हे समान पातळीवर आणून त्याच्या दर्जाबाबत पालकांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे.

**माध्यमिक शिक्षणातील प्रश्न**

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच माध्यमिक शिक्षणातील प्रश्नही गंभीर स्वरूपाचे आहेत. प्रश्न विस्ताराचाही आहे व प्रश्न गुणवत्तेचा आहे.

माध्यमिक शिक्षणाचा विस्तार प्राथमिक शिक्षणाच्या तुलनेत फारसा झाला नाही. ७०,००० प्राथमिक शाळांच्या तुलनेत केवळ १८,८४१ माध्यमिक शाळा सन २००७-०८ च्या आकडेवारीनुसार आहेत.

त्यातही महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील माध्यमिक शाळांची आकडेवारी बघितली तरी विस्तारातील विषमता लगेच लक्षात येते.

उदा.-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठाणे | – | १४३२ | वाशीम | – | २५३ |
| पुणे | – | १०९८ | वर्धा | – | २५७ |
| अहमदनगर | – | ९०३ | गोंदिया | – | २८० |
| सोलापूर | – | ८६० | हिंगोली | – | १६० |

वरील आकडेवारीकडे नजर टाकली, तरीसुद्धा माध्यमिक शिक्षणातील विषम विस्तार लक्षात येतो. ठाणे जिल्ह्यातील १४३२ माध्यमिक शाळा तर हिंगोलीत १६० शाळा. इतकी टोकाची विषम स्थिती आहे. तेव्हा माध्यमिक शाळेतील विस्ताराचे आव्हान आज लक्षात घेऊन त्यादृष्टीने प्रयत्न करावे लागतील.

विस्ताराबरोबरच माध्यमिक शिक्षणात संसाधने हाही महत्त्वाच्या मुद्दा आहे. खाजगी शिक्षणसंस्थांना शासन इमारत बांधणीसाठी निधी देत नाही, तर बांधलेल्या इमारतीला भाडे देते. त्याचा परिणाम म्हणून खाजगी शिक्षणसंस्था समाजातील दातृत्वाच्या आधारावर इमारती बांधत होत्या. शहरी, निमशहरी भागात माध्यमिक शाळांच्या इमारती बांधतात. परंतु ग्रामीण, दुर्गम भागात आजही माध्यमिक शाळांच्या इमारती

अनुक्रमणिका

बांधलेल्या दिसत नाहीत. विदर्भ, मराठवाड्याच्या ग्रामीण भागात शाळा अनुदानित असूनही इमारती बांधलेल्या नाहीत असे आढळते. त्याबाबत उपाययोजना कराव्या लागतील.

माध्यमिक शिक्षणातील गुणवत्तेचा प्रश्न प्राथमिक शिक्षणासारखाच तीव्र आहे. एकतर प्राथमिक स्तरावरून किमान अध्ययनक्षमता प्राप्त नसलेली मुले माध्यमिक स्तरावर येतात. त्यामुळे पायाच भुसभुशीत राहतो. या विद्यार्थ्यांवर माध्यमिक स्तरावरही विशेष कष्ट घेतले जात नाही. त्यातही पट टिकली तरच तुकडी टिकते त्यामुळे मुले पुढे ढकलणे ही अपरिहार्यता ठरते. त्यात इ. १०वी ला मासकॉपीचे प्रमाण मोठे आहे. याचा परिणाम माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित होत नाहीत. शिक्षकांची भरती हाही गुणवत्तेवर परिणाम करणारा घटक आहे. संस्थाचालकांना शिक्षकभरतीचे अधिकार असल्याने ती भरती गुणवत्तेनुसार काही अंशी, तर इतर अनेक निकषांवर बहुतांशी झाली आहे. त्याचाही परिणाम गुणवत्तेवर झाला आहे. इंग्रजी, गणिताच्या शिक्षकांचे प्रमाण एकूण शिक्षकात गरजेपेक्षा कमी आहे.

व्यावसायिक शिक्षणाचा अभाव ही माध्यमिक शिक्षणाची फार मोठी मर्यादा ठरली आहे. गरीब पालक मजुरीसाठी विद्यार्थ्यांना काढून घेतात. गळती होते. हे बदलायचे असेल तर माध्यमिक स्तरावर आज व्यावसायिक कोर्सेसची वाढ व्हायला हवी. कोठारी आयोगाने. मुदलियार आयोगाने व्यावसायिक शिक्षणाची गरज मांडली. पण त्यादृष्टीने फारसे प्रयत्न झाले नाहीत. कार्यानुभव हा विषय माध्यमिक स्तरावर आला पण तो कुंडीकाम, स्टोव्ह दुरुस्ती अशा बाळबोध वळणाने पुढे गेला. आजच्या समाजात ज्या व्यावसायिक कोर्सेसना मान्यता आहे, आर्थिक उत्पन्नाची संधी आहे अशा कोर्सेसचा परिचय आज माध्यमिक स्तरावर गरजेचा आहे.

पाबळ येथील विज्ञानआश्रमाने माध्यमिक स्तरावर व्यावसायिक शिक्षणाचे कोर्सेस तयार करून आज महाराष्ट्रातील ८५ शालांमध्ये हे कोर्सेस सुरू केले आहेत. ज्येष्ठ वैज्ञानिक श्री. कलबाग यांनी स्थापन केलेल्या संस्थेने माध्यमिक स्तरावर व्यावसायिक शिक्षणाचा विचार केला आहे. त्याचे सार्वत्रिकीकरण करायला हवे. त्यादृष्टीने धोरणात्मक निर्णय अपेक्षित आहेत.

माध्यमिक शिक्षणात शिक्षक प्रशिक्षण फारसे होत नाही. इंग्रजी शिकवण्याच्या जगभर नव्या नव्या पद्धती आहेत. त्यांचा परिचय या प्रशिक्षणांमधून होणे गरजेचे आहे. माध्यमिक शिक्षणावर संनियंत्रण ठेवणारी यंत्रणा विकसित होणे गरजेचे आहे. तालुकास्तरावर एकच गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचे प्रशासन बघतात. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. तेव्हा माध्यमिक शिक्षणासाठी तालुकास्तरावर स्वतंत्र यंत्रणेची गरज आहे.

**मागासवर्गीयांचे शिक्षण**

आपल्या समाजात दारिद्र्य, सामाजिक नीचता, सांस्कृतिक मागासपण इ. सर्व प्रकारेच दैन्य तळाशी एकत्रित झाल्याचे दिसून येते. त्यामुळे आपल्या देशातील दिसून येणारी शिक्षणातील असमानतासुद्धा आपल्या देशातील दारिद्र्याइतकीच निर्घृण आहे.

कल्याणकारी शासनाने वंचित समूहातील घटकांसाठी विविध योजना सुचवून त्यांची अमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला आहे. कोठारी आयोगाने आश्रमशाळांची सोय करण्यात यावी असे

अनुक्रमणिका

सुचविले होते. १९६८ च्या महाराष्ट्रातील शिक्षणाच्या पुनर्रचनेसंबंधीच्या निवेदनात मागासलेल्या वर्गातील विशेषतः आदिवासी जमातीतील मुला-मुलींसाठी शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याकडे खास लक्ष देण्यात येईल, असे नमूद केले आहे.

१९८४ च्या शालेय सुधार समितीने जिल्हा परिषदांनी विद्यार्थ्यासाठी विद्यार्थी वसतिगृहे सुरू करावीत, मागासवर्गीयांसाठी असलेल्या शैक्षणिक सवलतींची माहिती देण्यासाठी शिक्षक-पालक मेळावे भरवावेत, असे सुचविले तर १९८६ च्या धोरणात अनुसूचित जाती व जमातीच्या शिक्षकांची संख्या वाढवली जाईल असे सांगितले होते.

या सर्व धोरणात्मक बाबींनंतर प्रत्यक्ष मागासवर्गीयातील शिक्षणाची स्थिती बघायला हवी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून असल्याने तुलनेने महाराष्ट्रातील दलित जातींमध्ये शिक्षणाविषयीची आस्था चांगली आहे. शिवाय बाबासाहेबांनी मुंबई व औरंगाबाद येथे शिक्षणसंस्था व वसतिगृहे उघडल्याने या दोन्ही ठिकाणी दलित शिक्षणाची केंद्रे विकसित झाली.

महाराष्ट्र शासन मागासवर्गीयांसाठी शिक्षणक्षेत्रात विविध योजना राबवते. गणवेश व शालेय साहित्याचे विनामूल्य वाटप, इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळा, अस्वच्छ व्यवसाय-काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, ग्रामीण भागातील हुशार व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, सैनिकी शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता, भारत सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन, अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात शिष्यवृत्ती योजना + २ स्तरावरील किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम, अशाप्रकारे मागासवर्गीयांसाठी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणविषयक एकूण ७६ योजना आहेत.

२०००-२००१ च्या जनगणनेप्रमाणे महाराष्ट्रातील अनुसूचित जाती + नवबौद्धांची संख्या १ कोटी ९ लाख ८३ हजार होती. अनुसूचित जमातीची संख्या ८९ लाख ७१ हजार होती.

इयत्ता १ली ते १२वी या वर्गातील अनुसूचित जाती + नवबौद्ध ३१,३२,१५८ विद्यार्थ्यांपैकी पश्चिम महाराष्ट्रात १४,८०,४९६ (४७·२६%) मराठवाड्यात १,१४,८०२ (२३·०७%) तर विदर्भात ९,२८,८७८ (२९·६२%) विद्यार्थी होते. लोकसंख्येशी तुलना करता विदर्भ मराठवाड्यात लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त विद्यार्थी होते.

अनुसूचित जमातीच्या १९,३५,४९० विद्यार्थ्यांपैकी १०,४६,४३१ (५४·०७%) विद्यार्थी पश्चिम महाराष्ट्रात, १,९४,१६७ (१०·०३%) मराठवाड्यात तर ६,९४,८९२ विद्यार्थी (३५·९०%) विदर्भात होते. चंद्रपूर, गडचिरोलीतील आदिवासींमुळे विदर्भातील संख्या लोकसंख्येच्या प्रमाणपेक्षा जास्त आहे.

अनुक्रमणिका

भटक्या जमातींच्या १४,५४,८५८ विद्यार्थ्यांपैकी ७,१३,५३३ विद्यार्थी (४९·०४%) पश्चिम महाराष्ट्रात ३,९९,०१० (२७·४३%) विद्यार्थी मराठवाड्यात तर ३,४२,३१५ (२३·५३%) विद्यार्थी विदर्भात होते. मराठवाड्यात ती संख्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त होती.

विमुक्त जातीच्या ६,८२,२९८ विद्यार्थ्यांपैकी २,१४,३८४ (३१·४२%) विद्यार्थी पश्चिम महाराष्ट्रात २,६१,९३५ (३८·३९%) विद्यार्थी मराठवाड्यात तर २,०५,९७९ (३०·१९%) विद्यार्थी विदर्भात होते. विदर्भ व मराठवाड्यात त्यांचे प्रमाण लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा कितीतरी जास्त होते.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते, की महाराष्ट्रातील इ. १ ते १२ वी वर्गातील एकूण मागासवर्गीयांची संख्या १,१७,६३,०३५ इतकी होती. या वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांपैकी २,७८,००० शिक्षक मागासवर्गीय होते. त्यातील ८९,००० शिक्षिका होत्या.

वरील आकडेवारीवरून मागासवर्गीयांच्या शिक्षणाची नेमकी स्थिती लक्षात येते.

**आश्रमशाळा-एक प्रश्नचिन्ह**

महाराष्ट्रातील आदिवासी भागातील विद्यार्थी शिकावेत, त्यांच्या शिक्षणाची सोय त्याच परिसरातच व्हावी म्हणून महाराष्ट्र शासनाने १९७२ सालापासून आश्रमशाळांची सुरुवात केली.

महाराष्ट्रात एकूण १५ जिल्हे हे आदिवासी जिल्हे आहेत. महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी— लोकसंख्या ही आदिवासी लोकसंख्या आहे. १५ जिल्ह्यातील ६८ तालुके हे आदिवासीबहुल आहेत. त्या परिसरात आश्रमशाळा मोठ्या संख्येने आहेत.

| आश्रमशाळा संख्या | | मुले + | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| शासकीय आश्रमशाळा | ५५१ | १०६५२६ | ९२६८७ | १९९२१३ |
| अनुदानित आश्रमशाळा | ५५६ | १४०२८६ | ९३९७९ | २३४२६५ |
| एकूण आश्रमशाळा | ११०७ | | | ४३३४७८ |

समाजकल्याण विभागाने महाराष्ट्रात भटक्या, विमुक्त समाजासाठी आश्रमशाळा सुरू केल्या आहेत.

आदिवासी व समाजकल्याण विभागाच्या वतीने सुरू असलेल्या या आश्रमशाळांमुळे आदिवासी व भटक्या विमुक्तांचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. या दोन्ही समाजात सरकारी व खाजगी नोकऱ्यांचे प्रमाण वाढले. एका नव्या मध्यमवर्गाची निर्मिती झाली आहे. त्याचबरोबर मुलींच्या शिक्षणाचे प्रमाणही खूप वाढले आहे. मेळघाटमध्ये टेम्ब्रूसोंडा येथील ६०० कोरकू आदिवासींच्या मुली शिकतात. त्यातील बहुतेकजणी उच्च माध्यमिक शिक्षण घेत आहेत. याचा अर्थ आश्रमशाळेमुळे आदिवासींचे, भटक्या विमुक्तांचे जीवनमान बदलायला नक्कीच मदत झाली आहे.

अनुक्रमणिका

आश्रमशाळांचे हे योगदान ऐतिहासिक आहे हे मान्य करूनही हे स्पष्टपणे नोंदवले पाहिजे की, आश्रमशाळा आज एक प्रश्नचिन्ह बनल्या आहेत. शासकीय व खाजगी आश्रमशाळा या दोन्हीही आज दर्जाहीन होताना दिसत आहे.

प्रस्तुत लेखकाने महाराष्ट्रातील दुर्गम आदिवासी भागातील ५० पेक्षा जास्त आश्रमशाळांना अकस्मात भेटी देऊन अभ्यास केला तेव्हा मन विषण्ण करणारे अनुभव आले.

शासकीय आश्रमशाळेत एक प्रकारचा आळस व खाजगी आश्रमशाळेत आर्थिक अपहार असे साधारणपणे समस्येचे स्वरूप आहे. शैक्षणिक दर्जा न राखण्याविषयी शासकीय व खाजगी दोन्हीही आश्रमशाळांचे जणू एकमतच आहे! अर्थात या स्थितीला उत्तम काम करणाऱ्या काही आश्रमशाळा अपवाद आहेत. पण दुर्दैवाने ती संख्या खूपच कमी आहे.

आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना नाश्ता व दोन्ही वेळचे जेवण देण्याची तरतूद आहे. पण दुर्दैवाने गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना बहुसंख्य आश्रमशाळांमध्ये अत्यंत निकृष्ट जेवण दिले जाते. अनेक ठिकाणी मुले उपाशी असतात. अनेक ठिकाणी फक्त भात व डाळ दिले जाते. एका आश्रमशाळेत जेवणापूर्वी पोळ्या मोजल्या तर २६९ विद्यार्थ्यांना ४४४ पोळ्या होत्या. इतकी भयावह स्थिती आज आश्रमशाळांमध्ये आहे. शासकीय आश्रमशाळेत ठेकेदारी पद्धतीने रेशन, भाज्या पुरवल्या जातात. त्याठिकाणी निकृष्ट साहित्य पुरविले जाते. खाजगी आश्रमशाळा मुलांच्या भोजनासाठी असलेल्या रकमेत जास्तीत जास्त नफा कमावण्याचा प्रयत्न करतात. हे दुष्टचक्र कसे भेदायचे हा खरा प्रश्न आहे.

आश्रमशाळांमधील शिक्षणाचा दर्जा सर्वसाधारणपणे निकृष्ट आहे. अपवाद वगळता माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी प्राथमिक स्तरावरील क्षमताही प्राप्त करत नाहीत असे लक्षात येते. ९वी पर्यंत मुले पुढे ढकलली जातात. १०वी ला मास कॉपीचे प्रमाण मोठे आहे. शैक्षणिक दर्जा नसण्याला अनेक कारणे आहेत. मुळातच आदिवासी प्रकल्प विभागाचा शिक्षण हा प्राधान्यक्रमच नसतो. आदिवासी विभागाच्या ५० योजनांपैकी शिक्षण ही एक योजना आहे. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष होते. शिक्षणाची अमलबजावणी बघणारी स्वतंत्र यंत्रणाच आदिवासी विभागाकडे नाही. त्यामुळे दर्जा तपासला जात नाही. शिक्षण विभागाकडून अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेण्याची तरतूद आहे पण शिक्षण विभागाकडून अधिकारी तिकडे जात नाही. तेव्हा स्वतंत्र शैक्षणिक directorate (संचालनालय) ही गरज आहे.

शासकीय आश्रमशाळांमध्ये होणारी शिक्षक भरती ही संशयाच्या भोवऱ्यात सापडते. त्या निवडपरीक्षेच्या विश्वासार्हतेविषयी शंका घ्यावी अशी स्थिती असते. त्यात पुन्हा प्रतिकूल निसर्गामुळे पावसाळ्यात अध्यापनाचे कार्य नीट होत नाही. मुलांची राहण्याची व शिक्षणाची सोय एकाच खोलीत असते. त्यामुळे शिक्षण नीट होऊ शकत नाही. मुलांच्या गैरहजेरीचे प्रमाण खूप मोठे असते. सण, लग्न या काळात मुले खूप काळ गैरहजर राहतात. असे अनेक घटक गुणवत्तेवर परिणाम करतात.

आदिवासी व भटक्या विमुक्तांच्या आश्रमशाळांच्या बाबतीत सर्वात मोठी समस्या शिक्षक समृद्धीची जाणवते. त्या शाळेतील शिक्षक त्याच परिसरात जन्माला येतो. याचा अर्थ त्याचे सारे जगणे त्याच भागात होते. त्यामुळे व्यक्तिमत्त्वसमृद्धी होत नाही. बाहेरचे जगण्याचे वेग त्याच्यापर्यंत पोहोचत नाहीत. एक आव्हानरहित जीवन तो शिक्षक जगत राहतो. त्याचे भाषाप्रभुत्व इंग्रजीवरील प्रभुत्व, वाचन, लेखन विविध

छंदाचे विकसन, कलाविकसन घडत नाही व तो शिक्षक एकसुरी जगतो. शिक्षकाचे जगणेच मुलांमध्ये प्रतिबिंबित होते.

तेव्हा आदिवासी भागातील शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वसमृद्धीसाठी विशेष प्रयत्न होण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे आदिवासी समाजातील नसलेले शिक्षक आज आश्रमशाळांमध्ये काम करताना दिसतात. त्या शिक्षकांना आदिवासींचे प्रश्न, परंपरा, संस्कृती, आदिवासींचा गौरवशाली इतिहास, बोलीभाषेचे सौंदर्य, गाणी, नृत्य यांचा परिचय देणे गरजेचे आहे. त्याबाबत या शिक्षकांचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे. त्यातून आदिवासी विद्यार्थी समजावून घ्यायला त्या शिक्षकांना नक्कीच मदत मिळेल.

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकासाचेही आव्हान मोठे आहे. आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा बुजरेपणा कमी होणे गरजेचे असते. बोलीभाषेकडून प्रमाणभाषेकडे वेगाने येणे गरजेचे आहे. इंग्रजी भाषा अवगत होऊन विविध अभिव्यक्ती विकसित व्हायला हवी. परंतु तसे फारसे घडत नाही. आश्रमशाळेतील शनिवार, रविवारची सुट्टी यासाठी वापरणे सहज शक्य आहे.

मुळातच दुर्गमतेने निर्माण होणारे नैसर्गिक प्रश्न आणि मानवी प्रवृत्तीमुळे निर्माण झालेले ‘अ-मानवी प्रश्न’ या गर्तेत आश्रमशाळा सापडल्या आहेत. आश्रमशाळा प्रकल्प हा आदर्श असूनही दुर्दैवाने अमलबजावणीतील दोषामुळे तो यशस्वी होताना दिसत नाही.

शहरी माध्यमे शहरी शैक्षणिक प्रश्नांची जितकी दखल घेतात तितकी दखल या प्रश्नांची घेत नाही. उत्तरे तर दूरच पण प्रश्न सुद्धा दुर्लक्षित आहेत. अशा दुर्दैवी आश्रमशाळा!

**भटक्या विमुक्तांचे शिक्षण**

शैक्षणिक लेख लिहिताना ज्या समूहातील विद्यार्थी संख्या सोडा पण लोकसंख्याही नीटपणे उपलब्ध होत नाही असा दुर्लक्षित समूह म्हणजे भटके-विमुक्त! प्रमुख ४७ जातींमध्ये विखुरलेल्या भटक्या विमुक्तांच्यातील अनेक जातीतील महिला साक्षरतेचे प्रमाण अजून १ टक्काही नाही. काही जातीतील साक्षरता तर ०·५ ते ३·५ च्या आसपास आहे.

भटक्यांना सेटलमेंटमध्ये १९२४ साली शिक्षण सक्तीचे होते. त्यांना जीवनकौशल्ये शिकवली जात. रात्रशाळेतही मुले जात. या शाळांच्या हॉकीच्या टीम देशपातळीवर चमकत. पण स्वातंत्र्यानंतर सेटलमेंट संपली आणि शिक्षणही संपले. ब्रिटिशांनी भटक्यांना शिकवले पण आज कल्याणकारी शासन या समाजातील मुलांना शिकवत नाही.

‘आजी इंग्रजी लिहिते-वाचते पण नातवंडे अंगठा देतात’ असे भीषण चित्र या समाजाचे आहे. सेटलमेंटमधील सुशिक्षित पिढी आणि त्यांचे निरक्षर वारसदार असे चित्र या जमातींचे आहे.

भटक्या-विमुक्तातील ज्या जाती स्थिरावत आहेत, त्यांची मुले शिकायला सुरुवात करत आहेत. आश्रमशाळा आहेत पण भटक्यांचे गावच नक्की नाही त्यामुळे आश्रमशाळेत मुले दाखल करण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. एका भटक्या कुटुंबातील मुलगी आम्ही आश्रमशाळेत दाखल करण्याचा प्रयत्न केला

तेव्हा 'आमच्या जातीतील मुले शिकलेली नाहीत. ती शिकली तर तिचं लग्न कसं होणार?' असा प्रश्न त्यांनी विचारला. एक पालक म्हणाला, 'मी कैकाडी. टोपल्या विणतो. माझा पोरगा आईबापांकडं ठेवला. शिकवला. तो १२वी नापास झाला. आता तो तुमच्याही व्यवस्थेतून बाद झाला आणि टोपल्याही विणू शकत नाही' त्या व्यक्तीने मांडलेला युक्तिवाद हा बिनतोड व निरुत्तर करणारा आहे.

तेव्हा भटक्या-विमुक्तांचे प्रश्न समजावून घेऊन त्यांचे भावविश्व, गरजा लक्षात घेऊन त्यांचा शिक्षणाचा विचार करावा लागेल; ठोकळेबाज प्रयत्न पुरेसे ठरणार नाहीत.

दुर्दैवाने जणू भटके-विमुक्त आपल्या योजनांच्या नकाशावर अदृश्य आहेत अशी स्थिती आहे. ते बदलण्याचा प्रयत्न व्हायला हवा.

**मुस्लिमांचे शिक्षण**

महाराष्ट्रातील गेल्या ५० वर्षांतील शिक्षणाचा आढावा घेताना महाराष्ट्रातील शिक्षण ज्या समाजघटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचले नाही त्यात मुस्लीम समाजाचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल.

वास्तविक घटनेतील अनेक कलमे मुस्लिमांच्या शिक्षणाला पोषक आहेत. कलम २९ नुसार अल्पसंख्याकांच्या हितसंबंधाच्या संरक्षणाची हमी दिली आहे. कलम ३० नुसार अल्पसंख्याकांना शैक्षणिक संख्या स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार दिला आहे, तर कलम ३५० (अ) नुसार प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षणाची सोय करून दिली आहे. तरीसुद्धा मुस्लिमांच्या शिक्षणाला म्हणावी अशी गती प्राप्त झाली नाही.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्पष्टपणे नमूद केले आहे, की अल्पसंख्याक समाजातील या गटात शैक्षणिक संधीची समानता प्राप्त करून देऊन सामाजिक समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले जाईल पण मुस्लिमांच्या शिक्षणात फारशी प्रगती झाली नाही.

देशातील मुस्लीम बहुसंख्य असलेल्या ९० मागास जिल्ह्यात महाराष्ट्रातील परभणी जिल्ह्याचा समावेश आहे. भारतीय विद्यार्थ्याने शाळेत घालवलेला सरासरी कालावधी ४ वर्षे आहे. तर मुस्लीम मुलांचा शाळेत घालवलेला सरासरी कालावधी ३ वर्षे ४ महिने फक्त आहे. अनुसूचित जाती/जमातीचे पटनोंदणीतील प्रमाण ९५% तर तेच प्रमाण मुस्लिमांमध्ये ६५% आहे.

सय्यद कमिटीने मुस्लिमांबाबतचे विदारक वास्तव समोर आणले. २३ वर्षावरील वयोगटातील लोकसंख्येच्या साक्षरतेचे प्रमाण हिंदूंमध्ये ७४% आहे तर मुस्लिमांत ४६·१% आहे.

महाराष्ट्रात २००५ साली सर्व शिक्षा अभियानाने ६ ते १४ वयोगटातील शालाबाह्य मुलांची जी पाहणी केली त्यात एकूण शालाबाह्य मुलांमध्ये १२·७७% विद्यार्थी मुस्लीम होते. देशपातळीवर शाळेतच न गेलेल्या किंवा गळती झालेल्या मुलांची संख्या २५% आहे.

अनुक्रमणिका

या सर्व आकडेवारीचा अर्थ एकच आहे की मुस्लीम मुलांचे शिक्षण नीटपणे होत नाही. त्यात पुन्हा मदरशातून मुलांना शिकवायची सुरुवात झाली आहे. ते प्रमाण खूप नाही. मदरसा शिक्षण आधुनिक करण्याची शासनाची भूमिका आहे. परंतु मदरशातून मुलांना शिकवणेच गैर ठरविण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना उदरनिर्वाहासाठी रोजगाराची संधी मिळवून देणारे आधुनिक शिक्षण ही खरेतर विद्यार्थ्यांची गरज आहे. परंतु तरीही मदरसा शिक्षणाला परवानगी दिले जाते व काही आधुनिक शिक्षणाचे विषय शिकवले जातील अशी मखलाशी केली जाते. परंतु ही आत्मवंचना आहे.

प्राथमिक, माध्यमिक स्तरावर उर्दू शाळा आहेत. या उर्दू शाळा बऱ्याच ठिकाणी फक्त इ. ४ थी पर्यंत आहेत. तेथील मुले पाचवीला मराठी शाळेत जाण्याचे प्रमाण कमी असते व जरी गेले तरीही भाषिक बदल त्यांना पेलवत नाही. जिल्हा परिषद, नगरपालिकांच्या उर्दू शाळांची स्थिती तर खूपच दयनीय आहे. रिक्त पदे मोठ्या प्रमाणावर आहेत. पर्यवेक्षण यंत्रणेला उर्दू भाषा कळत नाही. त्यामुळे मूल्यमापन नीट होत नाही.

खाजगी संस्थांमध्ये मुस्लीम शिक्षक व शिक्षिकांचे प्रमाण अत्यल्प असल्याने उर्दू माध्यमातून आलेल्या मुलांना अशा शाळांमध्ये एकटेपणा वाटतो.

तेव्हा मुख्य प्रवाहातील शिक्षणातच मुली-मुले जास्तीत जास्त शिकली पाहिजेत अशीच स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. मदरसा, उर्दू शाळांचा पर्याय निवडण्यापेक्षा भाषिक व सांस्कृतिक गरजा भागविण्यासाठी स्वतंत्र प्रयत्न, स्वतंत्र उपक्रम राबवायला हवेत. इतर धर्मीय मुलांसोबत व आधुनिक शिक्षण घेणे हाच दृष्टिकोन अंतिमतः मुस्लीम समाजाच्या हिताचा राहील.

सय्यद आयोगाने मुस्लिमांच्या शिक्षणासंबंधी ज्या शिफारशी केल्या आहेत त्याच्या अंमलबजावणीचा विचार महाराष्ट्राच्या संदर्भात करायला हवा.

(१) अभ्यासक्रमात विविधतेच्या प्रतिबिंबाची गरज.

(२) मॅट्रिक नापास असलेल्यांसाठी आय.टी.आय. पॉलिटेक्निक वाढवावेत.

(३) शिक्षकांमध्ये अल्पसंख्याक समुदायांबद्दल संवेदनशीलता वाढविणे.

(४) उर्दू शाळांवरील पर्यवेक्षण वाढवून गळती रोखण्याचे उपाय योजणे.

मुस्लिमांतील मुलींच्या शिक्षणासाठीही स्वतंत्र प्रयत्नांची गरज आहे. मुलींसाठी विविध व्यावसायिक कोर्सेस सुरू करणे गरजेचे आहे.

अनुक्रमणिका

**मुलींचे शिक्षण**

महाराष्ट्रात सावित्रीबाईंनी मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर पंडिता रमाबाईंनी आर्य महिला समाजाची केलेली स्थापना आणि महर्षी कर्वे यांनी १९१६ साली स्थापन केलेले महिला विद्यापीठ या महत्त्वपूर्ण घटना मुलींच्या शिक्षणाच्या टप्प्यांवर आहेत.

१९५१ साली देशपातळीवर महिलांची साक्षरताच मुळात ६% होती. त्यामुळे महाराष्ट्राची मुलींच्या शिक्षणाची स्थितीही दयनीय होती.

| | **१९६०-६१** | **२०००-२००१** |
|---|---|---|
| प्राथमिक शिक्षण | १४९५ हजार | ५७१२ हजार |
| माध्यमिक शिक्षण | २३० हजार | २३२१ हजार |

याचा अर्थ मुलींच्या शिक्षणात लक्षणीय वाढ झाली आहे.

महाराष्ट्र शासनाने शिक्षण सुधार समिती स्थापन केली होती. त्या समितीने मुलींच्या शिक्षणाबाबत महत्त्वाच्या शिफारशी केल्या. त्यात शिक्षण संचालनालयात स्त्री शिक्षण विभागाची स्थापना करावी. मुलींसाठी स्वतंत्र आश्रमशाळा व विद्यानिकेतन उघडावे अशा शिफारशी होत्या.

१९८३ साली शालेय शिक्षण सुधार समितीने राज्याचे जे सर्वेक्षण केले त्या सिरोंचा (गडचिरोली), अक्कलकुवा, अक्राणी, धडगाव, चिखलदरा, धारणी, गंगाखेड, परभणी, वसमत या ९ तालुक्यांत स्त्रीसाक्षरता १०% पेक्षाही कमी आढळली.

सर्व शिक्षा अभियानात मुलींच्या शिक्षणासाठी NPEGL ही योजना राबविण्यात आली. या कार्यक्रमांत मुलींच्या शिक्षणास मदत होईल अशी शैक्षणिक साहित्य निर्मिती केली जाते. त्याचप्रमाणे मुलींसाठी विविध व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येत आहे. मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. याचा परिणाम म्हणून मुलींच्या पटनोंदणीत नक्कीच सुधारणा झाली आहे.

परंतु, तरीही मुस्लीम, आदिवासी व भटक्या विमुक्तांच्या मुलींची गळती रोखण्यासाठी उपाययोजनांची गरज आहे.

**महाराष्ट्रातील अनुशेष आणि शिक्षण**

विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि पश्चिम, उत्तर, दक्षिण महाराष्ट्र, असे महाराष्ट्राचे भौगोलिक विभाग आहेत. या विभागाची नैसर्गिक रचना ही असमान असल्याने विकासाच्या प्रक्रियेतही एक अनुशेष निर्माण झाला आहे. शासनस्तरावर वैधानिक विकासमंडळे उभारूनही अनुशेष भरण्याचे प्रयत्न होत आहेत. त्याचे प्रतिबिंब नकळत शिक्षणाच्या विकासातही पडले आहे.

अनुक्रमणिका

 Table 1·5

Educational Institutions by Regions
(1950-51 to 1965-66 and 1999-2000)

| year | Region | Higher Education | Higher secondary | Primary Schools | Pre-Primary | Vocational | Special Schools | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) |
| | Western Maharashtra. | 72 | 584 | 15616 | 95 | 266 | 7325 | 23958 |
| 1950-51 | Vidarbha | 23 | 148 | 4152 | 5 | 19 | 7216 | 11583 |
| | Marathwada | 3 | 33 | 2655 | .. | 10 | 67 | 2768 |
| | Maharashtra | 98 | 765 | 22423 | 100 | 295 | 14608 | 38309 |
| | Western Marathwada. | 106 | 750 | 18572 | 163 | 462 | 10320 | 30373 |
| 1955-56 | Vidarbha | 26 | 226 | 6337 | 63 | 27 | 798 | 7477 |
| | Marathwada | 4 | 42 | 3832 | 2 | 5 | 176 | 4061 |
| | Maharashtra | 136 | 1018 | 28741 | 228 | 494 | 11294 | 41911 |
| | Western Maharashtra | 176 | 1552 | 20572 | 290 | 644 | 21833 | 45117 |
| 1960-61 | Vidarbha | 65 | 417 | 8556 | 218 | 184 | 1387 | 10827 |
| | Marathwada | 24 | 229 | 5736 | 19 | 58 | 557 | 6623 |
| | Maharashtra | 265 | 2198 | 34864 | 527 | 886 | 23827 | 62567 |
| | Western Maharashtra | 199 | 2374 | 23294 | 293 | 718 | 166279 | 193607 |
| 1965-66 | Vidarbha | 89 | 782 | 11074 | 136 | 208 | 8319 | 20608 |
| | Marathwada | 32 | 565 | 7724 | 19 | 46 | 8116 | 16502 |
| | Maharashtra | 320 | 3721 | 42092 | 448 | 972 | 182714 | 230717 |
| Average annual % | Western Maharashtra | 7 | 9·8 | 2·7 | 7·8 | 6·8 | 23 | 15 |
| increase | Vidarbha | 9·4 | 11·7 | 6·8 | 24 | 17·3 | 0·9 | 3·9 |
| over | Marathwada | 17·1 | 20·5 | 7·4 | .. | 10·7 | 38 | 12·6 |
| 1950-51 | Maharashtra | 8·2 | 11·1 | 4·1 | 10·5 | 8·3 | 18·3 | 12·7 |
| | Western | .. | 8369 | 37905 | 25167 | .. | .. | .. |
| | Maharashtra | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |

अनुक्रमणिका

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1999-00 | Vidarbha | .. | 2518 | 15959 | 13369 | .. | .. | .. |
| | Marathwada | .. | 3620 | 11722 | 7537 | .. | .. | .. |
| | Maharashtra | .. | 14507 | 65586 | 46073 | .. | .. | .. |

No literate society is poor and no illiterate society is other than poor या उक्तीप्रमाणे विदर्भ, मराठवाड्याच्या मागास राहण्याचे कारण पुन्हा शिक्षणच आहे. या विभागात शिक्षणाच्या सुविधा कमी म्हणून शिक्षणाचे प्रमाण कमी आणि शिक्षण कमी म्हणून विकासात अनुशेष असे हे दुष्टचक्र आहे. विकासासाठी आज महामंडळे स्थापताना, यापूर्वीच जर या विभागांमध्ये शिक्षणाच्या विस्तारावर व गुणवत्तेवर जर लक्ष दिले असते तर आज नक्कीच समन्यायी विकासाला गती मिळाली असती. अमर्त्य सेन यांनी नोबेल पुरस्कार मिळाल्यावर कोणत्याही देशातील विकास हा शिक्षण आणि आरोग्याच्या प्रसारावर अवलंबून असतो अशी मांडणी केली. मराठवाडा, विदर्भाच्या अनुशेषाची चर्चा करताना या मांडणीची आवर्जून आठवण येते.

**अकराव्या पंचवार्षिक योजनेतील शिक्षणाचा विचार**

अकराव्या पंचवार्षिक योजनेला पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी 'Education Plan' म्हटले आहे. याचा अर्थ अकराव्या पंचवार्षिक योजनेचे शिक्षण हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्राच्या अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात विविध उद्दिष्टांवर भर दिला आहे. स्थलांतरित मजुरांसोबत जाणाऱ्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न व रस्त्यांवर भटकणाऱ्या मुलांच्या शिक्षणाच्या प्रश्नावर ठोस कार्यवाहीची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

याच मसुद्यात गळतीच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले आहे. इ. ५वी पर्यंत अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण १७·५९% असून अनुसूचित जमातीतील हेच प्रमाण ३८·३८% इतके आहे. वरील वर्गाकडे जाऊ तसतशी तफावत वाढत जाते. इ. १० वीला अनुसूचित जातीतील गळतीचे प्रमाण ५३·५९% तर अनुसूचित जमातीतील प्रमाण ७६·१८% इतके प्रचंड आहे. हे प्रमाण महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला शोभादायक नाही.

शिक्षणाची रुपरेषा खालील ८ मुद्यांवर ठरवावी :—

(१) सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षण (२) संशोधन व विकासावर भर (३) पायाभूत विज्ञानात संशोधन (४) शारीरिक शिक्षणावर भर देऊन क्रीडा विद्यापीठाची स्थापना करणे (५) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण बळकट करणे (६) प्रगत औद्योगिक संस्थांसाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करणे (७) कला व संस्कृती शिक्षणाला प्रोत्साहन (८) शिक्षणात समानता.

अकराव्या पंचवार्षिक योजनेत माध्यमिक स्तरावर व्यवसाय शिक्षणाची जोड देणे कालानुरूप ठरणार आहे. माध्यमिक स्तरावरून गळती होणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षणाची संधी त्याच स्तरावर उपलब्ध करून दिल्यास हे विद्यार्थी स्वयंरोजगाराद्वारे उदरनिर्वाह करून राज्याच्या उत्पन्नामध्ये भर घालू शकतील. त्यामुळे माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाची पुनर्रचना करून या स्तरावर अधिकाधिक विषय वैकल्पिक स्वरूपात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावेत.

अनुक्रमणिका

अकराव्या पंचवार्षिक योजनेने दिशा दाखवली आहे. त्या दिशेने महाराष्ट्रातील शिक्षणाची रचना होण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होण्याची गरज आहे.

**शिक्षणावरील खर्च**

प्राथमिक शिक्षणावर जास्त खर्च होताना दिसत असला तरी बजेटमध्ये शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण समाधानकारक नाही. 'समर्थन' या संस्थेने अर्थसंकल्पाचे जे विवेचन प्रसिद्ध केले आहे त्यावरून वास्तवाकडे लक्ष वेधले जाते.


दहा वर्षांपूर्वी राज्य योजनेतील १०० रुपयांपैकी ५ रुपये सर्वसाधारण शिक्षणावर खर्च होत होते. दहा वर्षांमध्ये या प्रमाणात घट होत गेली. आज स्थिती अशी आहे की, १०० रुपयांपैकी १ रुपयाही शिक्षणासाठी राखून ठेवलेला नाही.

सन २००० मध्ये जाहीर केलेल्या किमान समान कार्यक्रमात राज्य स्थूल उत्पन्नाच्या किमान ७% रक्कम शिक्षणासाठी राखून ठेवण्यात येईल व त्यापैकी ७५% रक्कम शिक्षणासाठी प्राधान्याने राखून ठेवण्यात येईल असे म्हटले होते.

शिक्षणावरील खर्च हा २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्रशिक्षण या प्रधान शीर्षाच्या अंतर्गत होतो. या दोन्ही शीर्षांवर होणाऱ्या खर्चाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण मागील ५ वर्षांत २·६७% फक्त राहिलेले आहे.

यापूर्वीच्या शासनाने किमान समान कार्यक्रमातील आश्वासनानुसार राज्य शासन शिक्षणावर होणाऱ्या खर्चापैकी ७५% रक्कम प्राथमिक शिक्षणावर खर्च करणार होते. प्रत्यक्षात २००१-०२ मध्ये शिक्षणावरील एकूण खर्चापैकी ५३% रक्कम प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्यात आल्यानंतर त्यापुढील सर्व वर्षे हा खर्च ४५% आसपासच राहिला आहे.

त्यामुळे प्राथमिक शिक्षणावरील खर्चात वाढ होण्याची गरज असून सातत्य राखणे अपेक्षित आहे.




अनुक्रमणिका

(**स्त्रोत :** संक्षिप्त अर्थसंकल्प, २००७-०८ व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागावर सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)

**(टीप :** शिक्षणावरील एकूण खर्चात २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण यांचा समावेश आहे.)

- शिक्षणावरील खर्च हा २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण या प्रधान शीर्षाच्या अंतर्गत होतो. या दोन्ही शीर्षांवर होणाऱ्या खर्चाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण आघाडी शासनाच्या काळात सरासरी २·४६ टक्के राहिलेले आहे.

- २०००-०१ मध्ये सर्वाधिक असलेले ३·७१ टक्के एवढे प्रमाण वर्षागणी कमी होत होत २००६-०७ मध्ये २·३८ टक्क्यांवर पोहोचले आहे.

- २००७-०८ व २००८-०९ चे अंदाजही उतरता कल कायम राहील असे सूचित करतात.

- राज्य स्थूल उत्पन्नाच्या ७ टक्के रक्कम शिक्षणासाठी राखून ठेवण्याच्या घोषणेचा आघाडी शासनाला घोषणेच्या पहिल्या वर्षापासूनच विसर पडला आहे.

**सर्व शिक्षा अभियान-**

महाराष्ट्रातील शिक्षणाचा विचार करताना शिक्षणातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून सर्व शिक्षण अभियानाचा विचार करावा लागेल. एकाचवेळी संसाधने व शिक्षणाच्या सर्व पैलूंचा एकत्रित विचार करणारी योजना यशस्वी योजना जरी म्हटली नाही तरी महाराष्ट्रातील शिक्षणक्षेत्रात भौतिक संसाधने, इमारतींचा प्रश्न सुटायला नक्कीच मदत झाली आहे.

सन २०१० पर्यंत ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना उपयुक्त आणि दर्जेदार प्राथमिक शिक्षणाची सुविधा पुरविणे आणि समाजाच्या सक्रिय सहभागाद्वारे सामाजिक, प्रादेशिक, लिंगविषयक भेदभाव कमी करणे ही उद्दिष्ट्ये ठेवण्यात आली होती.

मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, शालेय पोषण, आहार योजना, शाळा बांधकाम, इमारतींच्या खोल्या, शाळेसाठी साहित्य खरेदीला शाळाअनुदान, दुरुस्तीसाठी देखभाल दुरुस्ती अनुदान, शिक्षकांना शैक्षणिक साहित्य बनवायला शिक्षक अनुदान, ग्रामशिक्षण समितीचे दरवर्षी प्रशिक्षण या गोष्टींमुळे ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांचा चेहरामोहराच बदलायला मदत झाली हजारो वर्गखोल्या बांधल्या गेल्या. पर्यायी शिक्षणाच्या योजनेतून लाखो शालाबाह्य विद्यार्थी शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल करण्यात आले.

**सर्व शिक्षा अभियानाचे महाराष्ट्रातील शिक्षणावरील सकारात्मक परिणाम-**

सर्व शिक्षा अभियानासारख्या प्रचंड तरतूद असलेल्या योजनेमुळे नक्कीच काही सकारात्मक बदल दिसू लागले आहेत.

अनुक्रमणिका

(१) पटनोंदणीचे प्रमाण निश्चितच वाढले असून गळती काही अंशी कमी झाली आहे.

(२) खाजगी शाळांतील संसाधनांशी सरकारी शाळा स्पर्धा करू शकत नव्हत्या परंतु सर्व शिक्षा अभियानातील विविध अनुदानांमुळे सरकारी शाळा शालेय साहित्य, शिक्षकांसाठी शैक्षणिक साहित्य, यामुळे आकर्षक बनत आहेत.

(३) शालाबाह्य मुलांबाबत निश्चितच जागृती झालेली जाणवते. बरीच मुले मुख्य प्रवाहात आली आहेत. वस्तीशाळा, महात्मा फुले हमी केंद्र, सेतुशाळा, संधीशाळा या योजनांमुळे शालाबाह्य मुले मुख्य प्रवाहात दाखल झाली आहेत. हे प्रमाण समाधानकारक नसले तरी दुर्लक्ष करण्यासारखेही नाही.

(४) अपंगांबाबत देशव्यापी पहिले सर्वेक्षण सर्व शिक्षा अभियानाने केले. अपंगांबाबत याबाबत कोणतीही अधिकृत आकडेवारी यापूर्वी नव्हती. अपंग विद्यार्थ्यांना विविध साधने दिली आहेत. अनेक गंभीर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शालेय पोषण आहार, मोफत पास योजना, उपस्थितीभत्ता या योजनांमुळे नक्कीच शाळेतील पट व उपस्थिती वाढायला मदत झाली आहे.

**सर्व शिक्षा अभियानातील त्रुटी**

(१) सर्व शिक्षा अभियानातील प्रशिक्षणाचा दर्जा सामान्य राहिला. आशयाची गळती झाल्यामुळे प्रशिक्षणे प्रभावी झाली नाहीत. परिणामी त्यातून शिक्षक सक्षमीकरण होणे फारसे घडले नाही.

(२) अध्ययन.– अध्यापनप्रक्रिया, पर्यवेक्षणयंत्रणा, मूल्यमापन यावर काम प्रभावी ठरले नाही. त्यामुळे दरवर्षी ३० ते ३५% विद्यार्थी किमान अध्ययन क्षमताही प्राप्त करू शकत नाहीत हे कटू वास्तव समोर आले. गुणवत्ता सुधारण्याच्या योजनांना शिक्षकांनी फारसा प्रतिसाद दिला नाही.

(३) शैक्षणिक साहित्याचा वापर व निर्मिती याबाबत शिक्षकांमध्ये फारशी रुची निर्माण झाली नाही.

(४) शालाबाह्य मुलांबाबत इतक्या योजना राबवूनही आदिवासी, भटके विमुक्त, अल्पसंख्याक यांच्या शालाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न फारसे यशस्वी ठरले नाहीत. भटक्या विमुक्तांसाठी व स्थलांतरित मजुरांच्या मुलांसाठी प्रभावी योजनाच नाहीत असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. हमी केंद्रात अप्रशिक्षित स्वयंसेवक, इमारत नसणे या साऱ्या तरतुदी समान दर्जाच्या शिक्षणाच्या घोषणेशी प्रतारणा ठरली.

(५) लिंगसमभाव हे उद्दिष्ट फारसे यशस्वी नाही. मुलींची पटनोंदणी वाढली. मुलींसाठी व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले. तरीसुद्धा पुरुषप्रधान मानसिकता बदलण्याचे ठोस प्रयत्न जाणवले नाहीत.

अनुक्रमणिका

(६) सामाजिक सहभाग हे उद्दिष्ट असूनसुद्धा या प्रशिक्षण समित्यांतील गावकऱ्यांची उपस्थिती अत्यल्प राहिली. लोकसहभागासाठी त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी प्रभावी कार्यक्रमांची अंमलबजावणी झाली नाही.

वरील त्रुटींबाबत शिक्षणविभागाने गांभीर्याने विचार करून पुढील काळात या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करायला हवा. सर्व शिक्षा अभियानाबाबत एकूणच सामाजिक निरक्षरतेचाही मुद्दा मांडणे मला महत्त्वाचे वाटते. स्वातंत्र्यानंतर इतकी प्रचंड आर्थिक तरतूद असलेली ही सर्वात मोठी योजना आहे. अर्थात या योजनेला कर्जाऊ रक्कम घेण्यात आली नाही. जोमॅटन परिषदेत भारत सरकारने विशिष्ट अटी मान्य केल्यावरच डी.पी.इ.पी. आणि सर्व शिक्षा अभियान या योजना राबविल्या जातात हा निव्वळ योगायोग नाही हेही समजण्यासारखे आहे. पण अशा वेळी शिक्षणक्षेत्रात व समाजजीवनात काम करणाऱ्या चिंतक व कार्यकर्त्यांनी या योजनांचा संपूर्ण अभ्यास करून त्या योजनांचे खरे स्वरूप उघड करायला हवे व ते करतानाच या योजनांतील शिक्षणाच्या उपकारक मुद्यांबाबत समर्थनाचीही भूमिका घ्यायला हवी.

एकाचवेळी शिक्षणक्षेत्रातील जागतिकीकरण व बँकेचा हस्तक्षेप याबाबत नक्कीच तुटून पडायला हवे पण त्याचवेळी जर शासन शिक्षणासंदर्भात योजना राबवत असेल तर त्या योजनेच्या प्रभावी अमलबजावणीबाबतही लक्ष ठेवणे, सूचना करणे, सहभागी होणे या गोष्टी कराव्यात. पण सर्व शिक्षा अभियानाच्या वाट्याला टीकाही आली नाही व स्तुतीही आली नाही. उपेक्षा फक्त आली. सामाजिक कार्यकर्त्यांनी, अभ्यासकांनी योजनेचा अभ्यास करून त्यातील कमजोर बाबींवर आघात करायला हवा होता. पण त्यांच्या दुर्लक्षामुळे काही चांगल्या योजना फुलल्या नाहीत तर काही आर्थिक अपहाराच्या धनी ठरल्या. अभ्यासकांची या योजनेबाबतची अनास्था प्रभावी अमलबजावणीतील अडथळा ठरली.

सर्व शिक्षण अभियानापूर्वी महाराष्ट्रात D.P.E.P. (District Primary Education Programme) हा कार्यक्रम जागतिक बँकेच्या मदतीने राबविला गेला. ज्या जिल्ह्यांमधील महिला साक्षरतेचा दर हा राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे असे जिल्हे त्यासाठी निवडले गेले. महाराष्ट्रातील औरंगाबाद, परभणी, नांदेड, लातूर, उस्मानाबाद हे पहिल्या टप्प्यात तर बीड, जालना, धुळे, गडचिरोली हे दुसऱ्या टप्प्यात निवडले गेले. या कार्यक्रमाची उद्दिष्टे ही पटनोंदणी वाढविणे, गळती कमी करणे, संपादणूक उंचावणे अशाप्रकारची निश्चित करण्यात आली होती. या कार्यक्रमांचा वरील जिल्ह्यांना नक्कीच उपयोग झाला. सर्व शिक्षा अभियानाने DPEP तील उद्दिष्टांनाच पुढे गती दिली.

**महाराष्ट्रातील शिक्षणातला समाजसहभाग**

कोणत्याही देशातील शिक्षणात लोकसहभाग हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. महाराष्ट्रातील शिक्षणात समाजसहभाग हा संमिश्र स्वरूपाचा आहे.

समाजाचा आर्थिक स्तर आणि समाजाचा सहभाग यात एक अन्योन्य संबंध आपल्याला दिसून येतो. जे समाजघटक आर्थिक स्थैर्यामुळे पुढारलेले आहेत ते समाजघटक शिक्षणात रुची घेताना आढळून येतात तर जे समाजघटक आर्थिकदृष्ट्या मागास आहेत ते समाजघटक शिक्षणात फारशी रुची घेताना दिसत नाहीत. हीच बाब पुन्हा भौगोलिक पुढारलेपण व मागासलेपणातही आढळून येते.

अनुक्रमणिका

त्यातही पुन्हा प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत लोकसहभागात खूप फरक आढळून येतो. माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत शासनाने मराठवाडा व विदर्भाच्या काही भागात शाळा सुरू केल्या व इतर विभागात व मराठवाडा, विदर्भातही माध्यमिक शाळा काढण्यासाठी खाजगी शिक्षणसंस्थांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे समाजाच्या सहभागावरच या शाळा उभ्या राहिल्या. पहिल्या टप्प्यावर विनाअनुदानावरच शाळा सुरू झाल्या. तेव्हा गावाच्या मदतीनेच इमारत, जागा, लोकवर्गणी, सुरुवातीला शिक्षकांचे पगार होऊ लागले. त्यामुळे एखाद्या गावात माध्यमिक शाळा ही लोकसहभागानेच सुरू होऊ शकते. महाराष्ट्रातील खेडोपाडी माध्यमिक शाळा ही लोकसहभागामुळेच उभ्या राहिल्या. कर्मवीर भाऊराव पाटलांनी गावोगावी लोकसहभाग व श्रमदानावर शाळा उभ्या केल्या. श्रमदानाने त्यांनी शाळा उभ्या केल्या त्यामुळे त्या शाळांना लोकसहभागाचे बळ लाभले. त्यामुळे सावकार, धनदांडगे यांच्यापुढे कर्मवीरांना झुकावे लागले नाही. इमारतीसाठी फोडलेल्या दगडाकडे बघून 'These are my dollors' असे त्यामुळेच ते ठामपणे म्हणू शकले.

लोकसहभागाची माध्यमिक स्तरावरची स्थिती अशा प्रकारे उत्साहजनक असली तरीसुद्धा प्राथमिक स्तरावर ही स्थिती समाधानकारक नाही. त्याबाबतचे चित्र संमिश्र स्वरूपाचे आहे. कोकणातील शाळांमधील लोकसहभाग हा कौतुकास्पद व अनुकरणीय आहे. त्याचे कारण कोकणातील प्रत्येक खेड्यातील माणसे मुंबईत नोकरीला असतात. निवृत्तीनंतर ते सर्वजण पुन्हा आपल्या खेड्यात परततात. मुंबईतील जगण्यामुळे आलेले भान आपल्याही पुढील पिढीत यावे यासाठी ते गावच्या शाळेत लक्ष घालतात. गावातील सुशिक्षित लोक अशाप्रकारे शाळेत लक्ष घालतात. त्यामुळे या शाळा दर्जेदार होतात. त्यात पुन्हा मुंबईतले 'गावकरी' गावाचे ऋण फेडण्यासाठी गावात देण्ग्या पाठवतात. गावचे मंदिर व गावची शाळा या दोनच ठिकाणी देणग्यांचा वर्षाव होतो. त्यामुळे कोकणातील शाळा समृद्ध व सुंदर बनल्या आहेत. नवरात्रात गावकरी शाळेत गावजेवण करतात, भजन करतात, शाळा त्यांना आपली वाटते.

याउलट स्थिती पश्चिम महाराष्ट्र व आर्थिक स्थिती चांगली असणाऱ्या गावांमध्ये जाणवते. ही गावे शाळांना मदत करतात पण राजकारणप्रधानता हे वैशिष्ट्य असणाऱ्या या गावांमध्ये शाळेवर बारकाईने लक्ष ठेवले जात नाही. गुणवत्तेची बारकाईने तपासणी होत नाही. जे गावकरी गावात रस्ता मंजूर झाला तर ठेकेदार कोण? इथपासून चौकशी करतात ते गावकरी शाळेसाठी मंजूर योजनांची चौकशी करत नाहीत.

आर्थिकदृष्ट्या कमजोर व आदिवासी गावांमधील स्थिती एकूणच विदारक आहे. तिथे ग्रामशिक्षण समित्याच अस्तित्वात नाहीत. गावकरी स्वतःच्या जीवनसंघर्षात इतके व्यग्र आहेत की, त्या गावकऱ्यांना शिक्षण ही त्यांची गरजच वाटत नाही. शिक्षण हा त्यांना त्यांचा हक्कच वाटत नाही. आदिवासी गावातील बंद शाळेपुढे गावकऱ्यांना जमवून त्यांना ते आक्रमक का होत नाहीत? शिक्षकांना जाब का विचारत नाहीत? असे प्रश्न विचारले. पण असा जाब विचारण्याचा आपल्याला हक्क आहे याचीच त्यांना जाणीव नाही.

ब्रिटीश काळापासून शासकीय नोकर हा आपला साहेब आहे अशीच त्यांची भावना झाली आहे. त्याला आपण जाब विचारू शकतो याबाबत त्यांना जाणीवच नाही.

आदिवासी भागातील दुर्गमतेचा शिक्षक गैरफायदा घेतात. जिथे दोन शिक्षक आहेत तिथे आलटून पालटून शिक्षक हजर राहतात. नंदूरबारसारख्या दुर्गम जिल्ह्यात केवळ १५ ऑगस्ट, २६ जानेवारीलाच

अनुक्रमणिका

फक्त अनेक शाळा उघडल्या जातात, इतकी भयावह स्थिती आहे. गावकरी प्रसासनापुढे हतबल झाले आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील अनंतपूर येथील प्रसंग खूपच बोलका आहे. त्या शाळेतील मद्यपी शिक्षकाला आम्ही मेडीकलसाठी सोबत घेतले तेव्हा संपूर्ण गाव गाडीला आडवे आले व म्हणाले की, हा "शिक्षक पितो पण किमान रोज शाळा तरी उघडतो. याच्या पूर्वीचे शिक्षक शाळाच उघडत नव्हते. याला तुम्ही न्याल पण ही शाळा उद्या कोण उघडणार? पुढचा शिक्षक मिळेल याची खात्री काय? आणि मिळाला तरी तो शाळा उघडेल याची खात्री कोण देणार? गडचिरोली येथून २५० कि.मी. दूर आहे. तिथपर्यंत जाण्यासाठी आमची ४ दिवसांची मजुरी खर्ची पडते; आणि गेलो तरी आमचे तिथं ऐकणार कोण?"

वरील प्रसंग एकूणच प्रशासन व समाज यातील नाते स्पष्ट करायला पुरेसा बोलका आहे. प्रशासन आपले ऐकेल याची गावकऱ्यांना खात्री नाही. प्रशासनाचा गावकऱ्यांवर विश्वास नाही. अशा पातळीवर सध्या लोकसहभागाची समस्या आहे.

प्राथमिक शिक्षण तेव्हाच सक्षम व गुणवत्तापूर्ण होईल जेव्हा आमच्या शाळांमधील लोकसहभाग वाढेल. महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये हे घडले आहे, की जेथे जेथे ग्रामशिक्षण समित्या सक्षमीकरणाचे प्रयत्न झाले त्या ठिकाणी शाळेच्या गुणवत्तेत नक्कीच फरक पडला.

बुलढाणा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संपूर्ण जिल्ह्यातील ग्रामशिक्षण समित्या सक्षमीकरणाची मोहीम राबवली. तेव्हा शिक्षणाच्या बाबतीत विलक्षण जागरुकता वाढली, गावकरी शाळेत जाऊ लागले. ग्रामशिक्षण समित्यांच्या बैठका नियमित होऊ लागल्या. युनिसेफने महाराष्ट्रातील चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यांत लोकसहभागासाठी विविध उपक्रम राबविले त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. मेळघाटमधील 'मेळघाटमित्र' आणि 'खोज' या संस्था याप्रकारचे काम करतात. त्यातूनही गावकरी शाळांवर नियंत्रण ठेवू लागले आहेत.

एकूणच ग्रामशिक्षण समित्या जागृतीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील ग्रामशिक्षण समित्या सक्षमीकरणासाठी विशेष अभियानाची सुरुवात सुवर्णमहोत्सवी वर्षात व्हायला हवी अन्यथा शाळा म्हणजे केवळ सरकारी कार्यालये बनतील. गावकऱ्यांना ग्रामशिक्षण समिती अधिकार परिचित करून देण्याचे काम व्हायला हवे.

**महाराष्ट्रातील शिक्षणात स्वयंसेवी संस्थांचे योगदान**

महाराष्ट्रातील शिक्षणक्षेत्र समृद्ध होण्यासाठी आज अनेक स्वयंसेवी संस्था विविध प्रकारे योगदान देत आहेत. शिक्षण हा एकच विषय घेऊन संस्था काम करत आहेत. रमेश पानसे हे शिक्षणतज्ज्ञ ग्राममंगल ही संस्था चालवतात. ही संस्था शिक्षक प्रशिक्षण व शैक्षणिक साहित्य निर्मितीचे काम करते. मेंदूसंशोधनावर आधारित शिक्षणाची रचना ही संस्था करते आहे. भारतज्ञान विज्ञान ही संस्था विज्ञानप्रसार, शाळांमधून वैज्ञानिक मनाची निर्मिती यासाठी विविधांगी उपक्रम राबविते. नवनिर्मिती ही संस्था गणित हा विषय आनंददायी पद्धतीने शिकवण्यावर भर देऊन शिक्षक प्रशिक्षणावर काम करते. अवेहि अबकस ही संस्था सामाजिक शास्त्रे प्रभावीपणे शिकण्यासाठी प्रशिक्षणांचे आयोजन करते. त्याचप्रमाणे शिक्षण हक्कासाठी

जनआंदोलने उभारते. यशवंतराव प्रतिष्ठानच्या वतीने खा. सुप्रिया सुळे यांनी प्राथमिक शिक्षणातील धोरणात्मक बदलांसाठी व्यासपीठ निर्माण केले आहे. राज्यव्यापी आणि विभागीय परिषदांचे आयोजन करून विविध धोरणात्मक बदलांसाठी आग्रही भूमिका घेतली जाते. समर्थन ही संस्था दरवर्षी महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करून शैक्षणिक धोरणांची चिकित्सा करण्याचे महत्त्वपूर्ण काम करते.

**प्रयोगशील शाळांचे योगदान**

महाराष्ट्रातील शिक्षणाची चर्चा करताना नेहमीच प्रयोगशील शाळांविषयी चर्चा होत नाही. १९६६ साली कोठारी आयोगाने प्रयोगशील शाळांकडे शिक्षणव्यवस्थेने शिक्षणातील ‘प्रयोगशाळा’ म्हणून बघितले पाहिजे असे म्हटले होते. परंतु कोणत्याच सरकारने अशाप्रकारच्या शाळांना प्रोत्साहन दिले नाही.

महाराष्ट्रात शासकीय आधाराशिवाय आज काही मोजक्या शाळा शिक्षणात महत्त्वाचे प्रयोग करत आहे. त्या शाळांतील प्रयोगांचे सार्वत्रिकीकरण होण्याची आवश्यकता आहे.

कोल्हापूरमध्ये शिक्षणतज्ज्ञ लीलाताई पाटील यांची ‘सृजनानंद शाळा’, पुण्यातील ‘अक्षरनंदन शाळा’, नाशिकमधील ‘आनंदनिकेतन शाळा’, फलटणमधील मॅक्सीन बर्कसन यांची ‘कमला निंबकर बालभवन’, चिपळूणमधील राजन इंदूलकरांची शाळा, ज्ञानप्रबोधिनी हे प्रयोग नक्कीच महत्त्वपूर्ण आहेत. या शाळांमधून थेट अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर प्रयोग केले जातात. प्रत्यक्ष भाषा, गणित, विज्ञान, इंग्रजी, सामाजिक शास्त्रे हे विषय कशाप्रकारे शिकवले जावेत याचा अनेक अंगांनी विचार केला जातो. शैक्षणिक साहित्य निर्मिती केली जाते. शिक्षा व बक्षीस यापलीकडे विद्यार्थ्यांत प्रत्यक्ष जिज्ञासा निर्माण केली जाते. लीलाताई पाटील यांच्या शाळेत केवळ एका रुमालापासून विद्यार्थी ६० वस्तू बनवतात. इतकी सर्जनशीलता या शाळांमध्ये विकसित केली जाते.

पण दुर्दैवाने आपल्या सरकारी शाळा व या प्रयोगशील शाळा यांच्यात सेतू निर्माण करण्याचे प्रयत्न झाले नाहीत. वास्तविक या शाळांमधील जवळपास सर्वच उपक्रमांचे सार्वत्रिकीकरण होणे शक्य आहे, पण त्यादृष्टीने फारसा विचार झाला नाही. या शाळा रूढ नियम पाळू शकत नाहीत. त्यामुळे या शाळांना शासन अनुदान देत नाही. त्यामुळे या शाळा आर्थिक विपन्नावस्थेत वाटचाल करत आहेत.

शासनाने या शाळांकडून शैक्षणिक साहित्य निर्मिती, शिक्षक प्रशिक्षण याबाबत काम करून घेऊन अनुदान देणे गरजेचे आहे.

शिक्षणात गुणवत्ता नाही याचे कारण अध्यापनाच्या नव्या पद्धती शिक्षकांना परिचित नाहीत हेही एक कारण आहे. प्रयोगशील शाळांनी निर्माण केलेल्या पायवाटेचा महामार्ग होणे आवश्यक आहे!

**पहिलीपासून इंग्रजी**

महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाचा आढावा घेताना ‘पहिलीपासून इंग्रजी’ या योजनेची नोंद घ्यावीच लागेल. तत्कालीन शिक्षणमंत्री रामकृष्ण मोरे यांनी घेतलेला निर्णय हा बहुचर्चित ठरला. महाराष्ट्रातील प्रयोगशील शाळांतील शिक्षणतज्ज्ञ, भाषातज्ज्ञांनी या निर्णयाला भाषाशास्त्रीयदृष्ट्या व

अनुक्रमणिका

बालमानसशास्त्रानुसार आव्हान दिले. तर हरी नरकेंसारख्या विचारवंतांनी थेट महात्मा फुलेंचा दाखला देऊन बहुजनांच्या हिताशी हा निर्णय जोडला. त्याचवेळी दर्जेदार पाठ्यपुस्तके, उत्साहात पार पडलेली प्रशिक्षणे, सूत्रबद्ध अंमलबजावणीची तयारी यामुळे शिक्षकांनी हा निर्णय सकारात्मक रितीने स्वीकारला. महाराष्ट्रातील ग्रामीण विद्यार्थ्यांचा न्यूनगंड ह्यामुळे नक्कीच कमी झाला. इंग्रजीची गोडी लागली. भीती कमी झाली. परंतु आज या योजनेचे मूल्यमापन करताना असे लक्षात येते, की शिक्षकांच्या या विषयातील संकल्पना स्पष्ट होऊन त्यांची भाषिक तयारी होणे महत्त्वाचे आहे. संभाषणाचा त्यांचा आत्मविश्वास वाढलेला नाही. त्यामुळे केवळ हाईमपुरताच हा विषय उरला. त्यात पुन्हा संनियंत्रण करणारी पर्यवेक्षक यंत्रणा या विषयाचे प्रभावी मूल्यमापन करत नाही. त्यामुळे शिक्षकांच्या इंग्रजी विषय समृद्धीसाठी सातत्याने प्रयत्न व्हायला हवेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे आकर्षण जर कमी करायचे असेल तर सरकारी शाळांमधून इंग्रजी हा विषय प्रभावी पद्धतीने शिकवला गेला पाहिजे.

पहिलीपासून इंग्रजीचे प्रशिक्षण SMARTPT या वेगळ्या प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमातून राबविले गेले. डॉ. आर. एच. दवे यांच्या चिंतनातून हा क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम राबविला गेला. १९९७ साली सुरू झालेल्या या कार्यक्रमात दीड लाख शिक्षक सहभागी झाले. राज्यातील लाखो शिक्षक निवासी शिबिरात प्रशिक्षण घेतात ही गोष्टच अभूतपूर्व होती. 'पहिलीपासून इंग्रजी' प्रशिक्षणात निवासी शिबिरात शिक्षकांनी १० दिवस इंग्रजीचे धडे गिरवले त्यामुळे सुरुवातीची काही वर्षे शाळांमध्ये या कार्यक्रमांबाबत उत्साह आढळून आला.

**प्रा. रामकृष्ण मोरे व श्री. वसंत पुरके**

हे दोन्हीही शिक्षणमंत्री महाराष्ट्रात बहुचर्चित ठरले. माध्यमांनी त्यांच्या निर्णयांवर प्रचंड चर्चा घडवली. रामकृष्ण मोरे यांनी पहिलीपासून इंग्रजी, सर्व विद्यार्थ्यांना सक्तीची शिष्यवृत्ती परीक्षा, उच्च माध्यमिक वर्गात मराठीऐवजी माहिती तंत्रज्ञान हा विषय दिला. या सर्व निर्णयांवर दोन्ही बाजूंनी प्रचंड चर्चा झाली.

वसंत पुरके यांनी राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये गुणवत्ताविकास चाचण्या घेऊन राज्यात लाखो विद्यार्थी अप्रगत असल्याचे प्रथमच महाराष्ट्रासमोर आणले. सर्व शिक्षा अभियानात राज्य सरकार कोट्यवधी रुपये शिक्षणावर खर्च करताना राज्यातील लाखो विद्यार्थी धडपणे लिहू-वाचू शकत नाहीत हे वास्तव धक्कादायक होते. त्यांनी हे वास्तव बदलण्यासाठी गुणवत्ताविकास कार्यक्रम सुरू केला. शिक्षक संघटनांनी न्यायालयातून त्याला आव्हान दिले.

रामकृष्ण मोरे व वसंत पुरके यांच्या निर्णयाच्या मागे एक संगती होती व ती ग्रामीण महाराष्ट्राचा विचार करणारी होती. दोघांच्या निर्णयाला त्यामुळेच ग्रामीण भागातून प्रचंड पाठिंबा तर शहरी भागातून टोकाचा विरोध झाला. पहिलीपासून इंग्रजी, प्राथमिक स्तरावर शिष्यवृत्ती परीक्षा, अप्रगत विद्यार्थी प्रगत करणारा गुणवत्ताविकास कार्यक्रम या सर्व कार्यक्रमांची उद्दिष्टे ही ग्रामीण विद्यार्थी सक्षम करण्याची होती. ग्रामीण विद्यार्थ्याला स्पर्धेच्या युगात उभे करणारी होती पण नेमके हेच निर्णय शहरी भागातील पालक, माध्यमांनी वादग्रस्त ठरवून 'भारत' विरुद्ध 'इंडिया' ची ओळख पटवली. या निर्णयांमागची भूमिका समजावून घेतली नाही.

तीच कहाणी पुन्हा ए.टी.के.टी. बाबत घडली. राधाकृष्ण विखे यांनी नापास विद्यार्थ्यांना वर्ष वाया जाऊ नये म्हणून पुढील वर्गात बसण्याची संधी देताच टीकेचे काहूर उठले. वास्तविक ग्रामीण भागात दहावीला नापास होणे म्हणजे मुलाचे शिक्षण संपून त्याने मजुरीला जाणे आणि मुलगी असेल तर तिचे लग्न होणे. परंतु ही बाजू शहरी मानसिकतेला कळूच शकली नाही.

याउलट वसंत पुरके व रामकृष्ण मोरे यांचे मूल्यमापन शहरी माध्यमांनी ११वी च्या प्रवेशाचा प्रश्न ते कसा सोडवतात यावर ठरवले! त्यावरून त्यांची कार्यक्षमता ठरवली गेली. मुंबईतील १० महाविद्यालयांतील प्रतिष्ठेच्या प्रवेशाबद्दल राज्यातील तमाम माध्यमे, सत्ताधारी, विरोधीपक्ष तुटून पडतात. पण हीच जागरुकता ग्रामीण शिक्षणातील गुणवत्ता, आश्रमशाळांची विदारक स्थिती याबाबत आढळत नाही.

याचा अर्थ स्पष्ट आहे, की महाराष्ट्रातील नागरीकरण ज्या प्रमाणात वाढते आहे त्याप्रमाणात सत्ताधारी, विरोधी, माध्यमे व पालक यांचा प्राधान्यक्रम हा शहरी शिक्षणाचे प्रश्न हाच राहतो आहे. या आव्हानातून ग्रामीण शिक्षणाचे प्रश्न पुढे आणणे हेच इथून पुढे सर्वात मोठे आव्हान असणार आहे.

शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेपेक्षाही इथे मुलांना डब्यात कोणते पदार्थ द्यावेत यावर चर्चा झडते. ग्रामीण मुलांना जंगल तुडवत शाळा गाठण्यापेक्षा 'गुरुकुल' शाळा आस्थेचा विषय होतो. हे आव्हान शिक्षणावर काम करणाऱ्या विचारवंतांना पेलायचे आहे.

**महाराष्ट्रातील शिक्षणापुढे सध्याचे प्रश्न**

महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवाच्या वर्षी शिक्षणाच्या पुढील प्रश्नांचा साकल्याने विचार करण्याची गरज आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणापुढील प्रश्नांचा थोडक्यात आढावा घेतला तर पुढील प्रश्न लक्षात येतात :—

(१) कोठारी आयोगाने नेबरहूड स्कूलची कल्पना मांडली पण 'कॉमनस्कूल सिस्टीम' महाराष्ट्रात यशस्वी ठरली नाही. गरिबांच्या शाळा व श्रीमतांच्या शाळा असे शिक्षणाचे वर्गीकरण आज महाराष्ट्रातही खूप वेगाने होते आहे. माझ्यासकट बहुतांश मध्यमवर्गाची मुले खाजगी शाळेत शिकत आहेत. आर्थिक स्तर उंचावताना ऐपतीप्रमाणे शाळा निवडली जाते. नकळत शाळा हा प्रतिष्ठेचा सिम्बॉल बनतो आहे. याचे आणखी एक कारण सरकारी शाळांची ढासळती गुणवत्ता हे एक आहे. याचा अर्थ खाजगी शाळा दर्जेदार आहेत असा नाही पण सरकारी शाळांच्या दर्जेदार नसण्याविरुद्धची ती स्वाभाविक प्रतिक्रिया आहे. त्यामुळे आज गावपातळीपर्यंत खाजगी शाळा वेगाने वाढत आहेत. त्याचा फटका सरकारी शाळांना बसतो आहे. महाराष्ट्रातील मेळघाटातील धारणी म्हटले, की आपल्याला कुपोषण आठवते पण आज धारणीत चार इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. ही जर मेळघाटची स्थिती असेल तर पश्चिम महाराष्ट्रात काय असेल?

समाजाच्या स्तरानुसार शाळांचे वर्गीकरण होणे हे सामाजिक स्वास्थाच्या दृष्टीने अधिक घातक आहे. आज. सी.बी.एस.ई. शाळा ब्राह्मण, इंग्रजी शाळा, क्षत्रीय, खाजगी मराठी शाळा, वैश्य व सरकारी शाळा शूद्र ठरत आहेत. या वर्गीकरणामुळे सरकारी शाळांमध्ये मध्यमवर्गाची मुले नसल्यामुळे या शाळा आज समाजाच्या चर्चेचा विषय राहिल्या नाहीत. मध्यमवर्गीय पालकवर्ग नसल्याने पालकांचे नियंत्रण कमी झाले

अनुक्रमणिका

आहे. कष्टकरी पालकवर्ग या शाळांवर नियंत्रण ठेवू शकत नाही. याचा परिणाम या शाळा अधिक केविलवाण्या होऊ घातल्या आहेत.

अमर्त्य सेन यांनी म्हटल्याप्रमाणे 'गरिबांसाठीच्या सुविधा या अधिक गरीब (दर्जाहीन) बनतात' रेशनचे दुकान, ग्रामीण आरोग्य केंद्र, रोजगार हमी योजना या योजना ज्याप्रमाणे केविलवाण्या बनल्या आहेत, त्याचप्रमाणे सरकारी शाळा या दुर्लक्षित व कुपोषित होताना दिसत आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा व महानगरपालिका, नगरपालिकेच्या शाळांची अवस्था तशाच प्रकारची झाली आहे. गरिबांसाठी स्थानिक स्वराज्य संस्था ही एकमेव व्यवस्था असल्याने ती व्यवस्था टिकायला हवी. पण अत्यंत वेगाने या शाळांचे पट घसरत आहेत.

उदा.

| साल | विद्यार्थी संख्या (कोटी) |
| --- | --- |
| २०००-२००१ | १,१८,५७,००० |
| २००२-२००३ | १,१७,०९,००० |
| २००६-२००७ | १,१६,८८,००० |
| २००७-२००८ | १,१५,७१,००० |

(महाराष्ट्राची आर्थिक पाहणी)

माध्यमिक शाळांच्या बाबतीत मराठवाडा, विदर्भातील सरकारी शाळांची अवस्था तशीच झाली आहे; परंतु खाजगी संस्थांच्या माध्यमिक शाळा या छोट्या गावांमध्ये एकच असल्याने हा प्रश्न फारसा जाणवत नाही. मात्र तालुक्याच्या गावी एकापेक्षा जास्त माध्यमिक शाळा असल्याने एकाच शाळेकडे ध्रुवीकरण होण्याची प्रक्रिया मात्र गतिमान होते आहे.

महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमाच्या शाळा ज्या वेगाने वाढत आहेत त्यावर टीका करताना त्याचे विश्लेषणही होणे गरजेचे आहे. वरिष्ठ जाती व सरकारी नोकर, व्यापाऱ्यांची मुले म्हणजे इंग्रजी माध्यमाच्या शाळा हे चित्र आता राहिले नाही. अगदी शेतकरी, कष्टकरी वर्गातील मुलेही आता या शाळांमध्ये आहेत. अगदी कोणत्याही तालुक्यात ३ ते ४ इंग्रजी माध्यमाच्या शाळा हे आजचे प्रातिनिधिक चित्र आहे. हे का घडले? सरकारी शाळा आपली विश्वासार्हता गमावत असल्याने ही प्रक्रिया गतिमान झाली हे खरे पण त्याचबरोबर उच्च वेतन देणारे बहुतांश अभ्यासक्रम हे इंग्रजीतून असल्याने बालपणापासूनचे शिक्षण इंग्रजीतून शिक्षण द्यावे हा बहुतांचा युक्तिवाद आहे. इंग्रजी शाळांमधून मुले स्मार्ट होतात हा एक समज रूढ आहे. त्याहीपलीकडे सी.बी.एस.ई. बोर्ड हे प्रादेशिक बोर्डापेक्षा अधिक दर्जेदार आहे अशी मांडणी होते आहे. एन.सी.ई.आर.टी. ची आकर्षक पाठ्यपुस्तके, प्रकल्प पद्धती, मूल्यमापनाची प्रणाली हे नक्कीच शैक्षणिक व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे आहे. हे सारे मराठी अभ्यासक्रमांमध्ये लवकरात लवकर संक्रमित झाले पाहिजे तरच इंग्रजी शाळांकडे जाणारा लोंढा थांबेल. केवळ साहित्य संमेलनातील परिसंवादांनी ते घडणार नाही.

अनुक्रमणिका

**शिक्षणाची ढासळती गुणवत्ता**

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर शिक्षणाच्या विस्तारांचे खरे आव्हान होते. विस्तार हाच जेव्हा प्राधान्यक्रम असतो तेव्हा तेव्हा किमान अध्ययनक्षमतेची व गुणवत्तेची चर्चा होत नाही. पण आता विस्ताराचे उद्दिष्ट आपण साध्य केले आहे. महाराष्ट्रात वाडीवस्तीवर आपण शाळा नेऊ शकलो. माध्यमिक शिक्षणाचा विस्तार समाधानकारक नसला तरी अगदीच निराशाजनक नाही.

पण हा विस्तार बघून जेव्हा आपण या शिक्षणाची गुणवत्ता तपासू लागतो तेव्हा मन उद्विग्न होते. प्रगतिशील म्हणवणाऱ्या राज्यातील शाळांची अवस्था बघितली, की या शाळांमधून शिकणाऱ्या लेकरांचे भवितव्यच धूसर वाटू लागते. गुणवत्ता हा खूप दूरचा शब्द झाला पण किमान अध्ययन क्षमतासुद्धा बहुतांश विद्यार्थी प्राप्त करू शकत नाही इतके धक्कादायक वास्तव आज शाळा-शाळांतून दिसते आहे.

२००७ साली महाराष्ट्रातील शाळांमध्ये जी पायाभूत चाचणी घेण्यात आली. त्या चाचणीत ७४ लाख विद्यार्थ्यांपैकी ३१ लाख विद्यार्थी अप्रगत असल्याचे दिसून आले. त्यात कोणता प्रश्न किती लाख विद्यार्थ्यांनी सोडविला याचा तपशील दिला आहे.

| इयत्ता | प्रश्न | न सोडविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| इ. १ली | आजचा वार कोणता? | ६,५३,४१० |
| इ. २री | Say the number one to ten | ६,०४,५६० |
| इ. ३री | गुणाकार करा ६ × ४ | ५,२०,२४० |
| इ. ४थी | यमक जुळविणारा शब्द लिहा<br>Cat……………..? | ६,०१,७४६ |
| इ. ५वी | भारत देश केव्हा स्वतंत्र झाला? | २,८७,८६३ |

इतकी भयावह स्थिती आहे. विशेष म्हणजे वरील परीक्षा शिक्षकांनीच घेऊन निकालही शिक्षकांनीच तयार केला आहे.

'प्रथम' ही संस्था दरवर्षी पाहणी करून जो शैक्षणिक अहवाल तयार करते त्यानुसार ७ ते १४ वयोगटातील महाराष्ट्रातील ४५% विद्यार्थी इ. २ ची सोपी गोष्ट वाचू शकली नाहीत. याच वयोगटातील ४६·१% मुले दोन अंकी हातच्याची वजाबाकी किंवा तीन अंकी संख्येस एक अंकी संख्येला भाग देणाऱ्या भागाकाराचे उदाहरण सोडवू शकलेली नाहीत.

मी स्वतः दुर्गम आदिवासी भागातील २०० शाळांना भेटी देऊन ५११-४९९ ही वजाबाकी इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांना सोडवायला दिली पण पूर्ण बरोबर सोडविणारा मला एकही वर्ग आढळला नाही. त्याचप्रमाणे इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांना मी I am playing on the ground हे वाक्य लिहायला दिले. परंतु पूर्ण वाक्य बरोबर लिहिणारा एकही वर्ग आढळला नाही. I am लिहू न शकणारे ५०% पेक्षा जास्त विद्यार्थी आहेत.

अनुक्रमणिका

'दुष्काळ हटवू, माणूस जगवू' या पदयात्रेतील कार्यकर्त्यांनी मराठवाड्यातील २०० पेक्षा जास्त शाळांना भेटी दिल्या तेव्हा किमान अध्ययन क्षमतेबाबत अशीच विदारक अवस्था लक्षात आली.

वरील सर्व पाहण्यांची सरासरी एकच आहे. ते सर्व एकाच सत्याकडे अंगुलीनिर्देश करतात, की इ. ४ थी च्या बहुतांश विद्यार्थ्यांना किमान अध्ययन पातळीही प्राप्त होत नाही.

शिक्षणातील गळतीची दारिद्र्य, बालमजुरी ही कारणे सांगितली जातात पण खरे कारण हे आहे की, किमान अध्ययन पातळी प्राप्त नसल्यामुळे विद्यार्थ्यांना वरच्या वर्गातील अभ्यासक्रम पेलत नाही व त्या दडपणामुळे ते शाळा सोडतात. शिक्षणातील त्यांची रुची संपून जाते.

इंटरनॅशनल स्कूलमधील मुले लॅपटॉपवर बसून गणिते सोडवताना आपली मुले धड आकडेमोडही करू शकत नाहीत ते विद्यार्थी फाडफाड इंग्रजी बोलताना सरकारी शाळेतील मुले साधी जोडाक्षरेही लिहू शकत नाहीत. यामुळे होणारे परिणाम भीषण आहेत. सामाजिक विषमता त्यामुळे वाढीस लागते. किमान अध्ययनक्षमता प्राप्त होऊ न शकणारी मुले गळती होऊन पारंपरिक व्यवसायाची वाट धरतात. त्यामुळे दारिद्र्याची शृंखला तुटत नाही.

माध्यमिकस्तरावरही गुणवत्तेची स्थिती फारशी वेगळी नाही. बोर्डाचे निकाल जरी वाढले असले तरी त्याची कारणे परीक्षेत तोंडी परीक्षा आल्या, एकत्रित विषयात उत्तीर्णता धरणे अशी कारणे आहेत.

मासकॉपीचे प्रमाण खूप मोठे आहे. यामुळे एस.एस.सी.चे निकास वाढले आहेत. वास्तविक प्राथमिकस्तरावर किमान अध्ययन क्षमता प्राप्त नसणारी मुले तशीच पुढे ढकलली जातात. एस.एस.सी.ला वरीलप्रकारे पास होतात व महाविद्यालयात आदल्या दिवशी केवळ गाईड वाचले तरी दुसऱ्या दिवशी पास होता येते. या सर्व प्रक्रियेत विद्यार्थी कुठे तपासलाच जात नाही. सरसकट प्रत्येक स्तरावर फक्त ठिसाळ मूल्यमापनातून पुढे ढकलणे एवढेच उरले आहे. नांदेडच्या प्रज्ञा प्रतिष्ठानच्या वतीने डी.एड., बी.एड.ला शिकणाऱ्या १००० विद्यार्थ्यांची पाहणी झाली. त्यात पदवीधर झालेल्या मुलांना जोडाक्षरे नीट लिहिता येत नाही. भाषेला किमान दर्जाही नाही. चार वाक्य नीट लिहीत नाहीत असे आढळून आले.

तेव्हा सुवर्णमहोत्सवी वर्षात शिक्षणासाठी खरेच काही ठोस करायचे असेल तर १ली ते १२वी पर्यंत प्रत्येक इयत्तेत अपेक्षित क्षमता मुलांना प्राप्त का होत नाहीत? यावर संशोधन करून मूल्यमापन वस्तुनिष्ठ कसे होईल? याबाबत तात्काळ उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा अर्धनिरक्षरांच्या पिढ्या फक्त बाहेर पडतील. कोणतीच कौशल्ये प्राप्त नसलेली, ग्रामीण भागातील ही अर्धनिरक्षर मुले एकीकडे तर, लॅपटॉपधारी स्मार्ट मुले दुसरीकडे असा शिक्षणातला हा नवा 'भारत आणि इंडिया' आज सर्वत्र घडतो आहे पण दुर्दैवाने याबाबत गांभीर्याने काहीच घडत नाही व हे वास्तव मांडणाऱ्यांना नकारार्थी ठरवले जाते.

**गुणवत्ता घसरण्याची कारणे**

(अ) शाळांमध्ये गुणवत्ता घसरण्याची जागतिकीकरणापासून तर थेट शिक्षकापर्यंत अनेक कारणे दिली जातात. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत 'शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता' इतकेच उद्दिष्ट ठरवले आहे. त्यामुळे शासनाची धोरणे अप्रशिक्षित शिक्षक नेमणे, शिक्षक

अनुक्रमणिका

प्रशिक्षणावरचा खर्च कमी करणे, याप्रकारची आहेत. या वास्तवात तथ्य असले तरी महाराष्ट्रात प्रशिक्षित शिक्षकांची संख्या खूप मोठी आहे. देशपातळीवर शैक्षणिक सुविधांमध्येही महाराष्ट्र खूप पुढे आहे. तेव्हा शालेय दुरावस्थेचा दोष येथील शिक्षक व शैक्षणिक प्रशासनाचाच आहे. पर्यवेक्षीय यंत्रणेच्या अपयशाचा आहे हे स्पष्टपणे नोंदवावे लागेल. दरवर्षी किमान १००० तास (घड्याळी) शाळा चालते. चौथीपर्यंत ४००० तास शाळेत बसणारा विद्यार्थी जर वजाबाकी, जोडाक्षरे लिहू शकत नसेल तर त्यासाठी मी जागतिकीकरणाला व शिक्षणव्यवस्थेला जबाबदार धरणे ही आत्मवंचना ठरेल. पर्यवेक्षीय यंत्रणा व शिक्षकांचेच ते अपयश आहे. नेमके उत्तरदायित्व नक्की नाही याचा परिणाम आहे. कामाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणारी प्रणाली नाही. पर्यवेक्षीय यंत्रणेचेही वस्तुनिष्ठ मूल्यमापन नाही. त्यामुळे ढिसाळपणा आला आहे.

(ब) १२वीला उत्कृष्ट गुण असणारे विद्यार्थी आज शिक्षक झाले आहेत तरीसुद्धा गुणवत्तेची ही स्थिती आहे याचे कारण ते विद्यार्थीही पुन्हा याच वाईट शिक्षणाचे अपत्य आहेत. वाईट शिक्षणातून निकृष्ट विद्यार्थी व त्या विद्यार्थ्यांतून कमी क्षमतेचे शिक्षक असे हे दृष्टचक्र आहे. त्यातले चांगले गुण असणारे विद्यार्थी शिक्षक झाले. तरीसुद्धा त्यांच्याकडून शिक्षणातील यंत्रणा काम करून घेण्यास अपयशी टरते आहे. शिक्षणातील पर्यवेक्षीय यंत्रणा शिक्षकांचे एकाचवेळी मूल्यमापन करणे व प्रेरणा देणे हे करू शकत नाही. चांगल्याचे कौतुक नाही व वाईटाला शिक्षा नाही अशी एकंदर स्थिती आहे. कागदपत्रे, माहिती, मिटिंगा खूप वाढल्या आहेत. शिक्षणासारखे जिवंत क्षेत्र अहवाल व रिपोर्टींगमध्ये गुरफटले आहे. राजकीय हस्तक्षेपाने पर्यवेक्षीय यंत्रणा काहीशी बचावाच्या पावित्र्यात आहे. शिक्षक संघटनांचे राजकीयीकरण झाल्याने पर्यवेक्षीय यंत्रणेपुढील अडचणी वाढल्या आहेत. कर्तव्यनिष्ठेबद्दल उदासीन शिक्षक संघटनेआड लपून गैरफायदा घेताना दिसतात. असे एक व्यामिश्र चित्र आज दिसते आहे. या सर्व घटकांचा परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर झाला आहे. या प्रक्रियेत वाडीवस्तीवर इमानदारीने काम करणाऱ्या शिक्षकाचे नीतिधैर्य खच्ची होते आहे.

(क) माध्यमिकस्तरावरील गुणवत्ता ढासळण्याला जी कारणे आहेत त्यांतील एक महत्त्वाचे कारण राजकीय संस्थाचालकांनी गावोगावी साळा सुरू केल्या व दुर्दैवाने त्यांचे शिक्षणविषयक आकलन व हितसंबंध हा गुणवत्तेतील अडथळा ठरला. माध्यमिकस्तरावरील शिक्षकभरती ही खूप कमी प्रमाणात गुणवत्तेनुसार व विषयांच्या गरजेप्रमाणे झाली. इंग्रजी, गणिताच्या शिक्षकांची भरती एकूण भरतीत कमी झाली. शिक्षक भरतीतील जात, धर्म, आर्थिक व्यवहार, राजकीय गणिते या सर्वांमुळे अशाप्रकारच्या शिक्षक नेमणुकीचा परिणाम माध्यमिक शिक्षणाच्या गुणवत्तेवर झाला आहे. माध्यमिक शाळांवर पर्यवेक्षण करणारी स्वतंत्र यंत्रणा नाही, स्वतंत्र विस्तार अधिकारी नाहीत. याचा परिणामही जाणवतो आहे.

अनुक्रमणिका

**स्थलांतरितांचे शिक्षण**

महाराष्ट्रातील शिक्षणातील सध्या सर्वात दुर्लक्षित प्रश्न हा स्थलांतरित मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाचा आहे. ऊस तोडणी कामगार, विटभट्ट्या, दगडखाणी, बांधकामे, फळप्रक्रिया, शेती, कापूसवेचणी इ. विविध कारणांमुळे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होते. महाराष्ट्रातील फक्त ऊसतोडणीमुळे होणारे स्थलांतर सुमारे ८ लाख आहे अशी माहिती खुद्द कामगार मंत्र्यांनीच सदनात दिली होती. आज ती संख्या १२ लाख असावी असे मानले जाते. महाराष्ट्रात वाढल्या नागरिकीकरणामुळे बांधकामांना गती आली आहे. बांधकामांबरोबरच मोठी धरणे व विविध प्रकल्पांची कामे सर्वत्र सुरू असतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात दगडखाणींची कामे सुरू आहेत. बांधकामे सुरू आहेत. त्यावर लक्षावधी मजूर काम करतात.

त्याचप्रमाणे हंगामी स्थलांतर करणाऱ्यांची संख्याही महाराष्ट्रात वाढते आहे. विटभट्ट्यांवर दिवाळीनंतर काम करणारे मजूर हे हंगामी स्थलांतरित असतात. त्याचप्रमाणे कापूसवेचणी, फळप्रक्रियेच्या कारखान्यात, काम करणारे मजूर यासाठी लाखो मजूर स्थलांतर करतात. ऊसतोडणी कामगारांचे स्थलांतरही हंगामीच आहे.

महाराष्ट्रातून शेजारच्या राज्यात स्थलांतराचे प्रमाणही मोठे आहे. गुजरातमध्ये महाराष्ट्रातून लाखांच्या संख्येत तर कर्नाटकात हजारो मजूर स्थलांतर करतात.

ऊसतोडणीसाठी व एकूणच मोसमी स्थलांतरासाठी बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा, गेवराई या तालुक्यातून सर्वात जास्त कुटुंबे ऊस तोडणीसाठी स्थलांतरित होतात. बीड खालोखाल औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड या जिल्ह्यांचा नंबर लागतो.

स्थलांतरित होण्याची कारणे काय आहेत? हा चर्चेचा विषय या लेखाचा नाही. पण या स्थलांतरित मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाचे काय करायचे? हा खरा गंभीर प्रश्न आहे. दुर्दैवाने हा प्रश्न अजुनही शासनाचा प्राधान्यक्रम बनलेला नाही. शहरी मध्यमवर्ग व माध्यामांना पर्सेंटाईल ११वी चे प्रवेश हा प्रश्न जितका जीवनमरणाचा वाटतो तितका स्थलांतरितांचे शिक्षण हा प्रश्न वाटत नाही. किंबहुना असा काही प्रश्न अस्तित्वात आहे याची अजून समाजमनाच्या स्तरावर नोंदच नाही. या मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न खूपच गंभीर आहे. हे मजूर साधारणतः ६ ते ७ महिने स्थलांतर करतात. मुले त्यांच्यासोबत नेतात. जून ते सप्टेंबर मुले गावातील शाळेत व ऑक्टोबर ते मार्च पालकांसोबत व एप्रिल महिन्यात मुले पुन्हा परीक्षेला मूळ शाळेत! असे शिक्षण चालते. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी शिक्षणाचे वातावरणच नसते. पालक कामाच्या ठिकाणी मुलांना शाळेत पाठवण्यापेक्षा प्रत्यक्ष कामावर जुंपण्याला प्राधान्य देतात. ऊसतोडणीचे मजूर या लहान मुलांना वाढे बांधायला सोबत नेतात. मुलींना स्वयंपाक व भावंडे सांभाळणे अशी कामे करावी लागतात.

त्यामुळे शासनाने जरी साखरशाळा व पाषाणशाळा या योजना सुरू केल्या असल्या तरीसुद्धा प्रत्यक्ष शिक्षणाचा प्रश्न सुटताना दिसत नाही. एकतर या योजनांमध्ये १२वी झालेल्या अप्रशिक्षित स्वयंसेवकाची तरतूद आहे. इमारत नाही. पाचटाची खोली बांधली जाते व आजूबाजूला अजिबातच शैक्षणिक वातावरण नाही. गैरहजेरीचे प्रमाण मोठे असते. याला पर्याय म्हणून सर्व शिक्षा अभियानात हंगामी वसतिगृहे सुरू करण्यात आली. मुले मूळ गावातच थांबविण्याचे ठरले. गावच्या शाळेतच पालकांनी मुलांना ठेवावे व तेथेच

त्यांची जेवणाची सोय करावी असे या योजनेचे स्वरूप आहे. या योजनेत मोठ्या प्रमाणावर मुलांना गावातच थांबवून घेण्याचे प्रयत्न यशस्वी ठरत आहेत.

हीच योजना पुढे नेऊन आता कायमस्वरूपी वसतिगृहे उभारण्याची गरज आहे. कोणत्या गावांमधून दरवर्षी स्थलांतर होते. हे मागील १० वर्षांच्या अनुभवाने ठरवणे शक्य आहे. त्या ठिकाणी कायमस्वरूपी वसतिगृहाच्या इमारती उभारणे शक्य आहे. मुकादम व ठेकेदारांना जर असे स्पष्ट निर्देश दिले, की पालकांनी मुलांना आपल्यासोबत आणसे तर ठेकेदारावर कारवाई होईल, तर आणि तरच सर्व मुले गावातच थांबतील व मुलांचे शिक्षण खंडित होणार नाही. किंवा ज्या ठिकाणी मजूर कामाला जातात तिथे जवळच्या शाळांमध्ये ही मुले सामावून घेण्याचाही पर्याय असू शकतो.

एकूणच महाराष्ट्राच्या पन्नाशीत हा नवा प्रश्न पुढे आला आहे. त्यावर तात्पुरती उपाययोजना करण्यापेक्षा कायमस्वरूपी उपाययोजना करायला हवी.

इतर राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतर करण्याचे प्रमाणही वाढले आहे. विशेषतः ठेकेदार मजूर स्वस्त म्हणून पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, ओरिसा, बिहार मधून आणताहेत. या मजूरासोबत येणाऱ्या मुलांच्या शिक्षणाचे काय? हा खरा सध्या गंभीर प्रश्न आहे. भाषिक प्रश्नामुळे त्यांना शिकवावे कसे? याचे उत्तर अनुत्तरीत आहे. हा प्रश्न साधा चर्चेतसुद्धा अजून आलेला नाही.

**पूर्वप्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष :**

प्राथमिक शिक्षणाचा पाया पूर्वप्राथमिक शिक्षण हा आहे. ज्या विद्यार्थ्यांना पूर्वप्राथमिक शिक्षण चांगल्या दर्जाचे मिळते ते विद्यार्थी प्राथमिक स्तरावर चांगली प्रगती करतात. असे अनेक अभ्यासांनी सिद्ध केले आहे. दुर्दैवाने महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणातील पूर्वप्राथमिक शिक्षणाची स्थिती समाधानकारक नाही.

अंगणवाड्यांमध्ये पूर्वप्राथमिक शिक्षण दिले जाते परंतु, दुर्दैवाने अंगणवाड्यातून केवळ आहार वाटला जातो व केवळ आरोग्यविषयक जागृतीसाठी अंगणवाडी सेविकांची यंत्रणा वापरली जाते. त्यामुळे पूर्वप्राथमिक केंद्रामधून शिक्षण दिले जावे अशी शासकीय धोरणाचीच दिशा नाही असे खेदाने नोंदवावे लागेल.

मेंदूसंशोधन असे सांगते, की वयाच्या ३ ते ५ वयोगटात मेंदूचा सर्वात जास्त विकास होतो. शिक्षणाचे बहुतांश काम या वयोगटातच होते परंतु हाच कालावधी सर्वात दुर्लक्षित राहिला आहे. जीप चालविणाऱ्या ड्रायव्हरलाही आपण परमिट मागतो पण अंगणवाडी चालविणाऱ्या ताईला कोणत्याही प्रशिक्षणाची अट नाही इतके शासनाचे पूर्वप्राथमिक शिक्षणविषयक धोरण दुर्लक्षित आहे. अंगणवाडी सेविकांची भरती हा पूर्णतः राजकीय विषय झाला आहे. शैक्षणिक पात्रताही फारशी बघितली जात नाही. याचा थेट परिणाम या अंगणवाड्यांच्या गुणवत्तेवर झाला आहे.

त्यातही अंगणवाडी सेविकांना मोठ्या प्रमाणावर इतर लेखनाची, आरोग्यविषयक कामे दिली जातात. त्यामुळे या सेविका त्याच कामात व्यस्त दिसतात. बालशिक्षणकेंद्री प्रशिक्षण त्यांना भरीव स्वरूपाचे

अनुक्रमणिका

दिले जात नाही. गाणी, खेळ, बालकांचे भावविश्व याबाबत प्रभावी प्रशिक्षण दिले जात नाही. याचा अपरिहार्य परिणाम प्राथमिक शाळेत प्रवेश घेणाऱ्या मुलांच्या गुणवत्तेवर झाला आहे.

ज्या अंगणवाड्या उत्तम रीतीने चालतात तेथील मुलांची प्राथमिक शाळेतील प्रगती चांगली झाल्याचे लक्षात येते.

शिक्षणतज्ज्ञ रमेश पानसे यांनी मेंदूसंशोधनाच्या आधारे पूर्वप्राथमिक शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करून महाराष्ट्र शासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी असे अनेकदा मांडले आहे. या विषयावर शासनाने 'राम जोशी समिती' स्थापन केली होती परंतु, त्याबाबत प्रभावी उपाययोजना अद्यापही झाली नाही.

केंद्र शासनानेही ० ते ५ वयोगटातील मुलांची जबाबदारी टाळण्याचेच धोरण घेतल्याने त्याचा अपरिहार्य परिणाम अंगणवाडी शिक्षणाच्या गुणवत्तेवर झाला आहे.

**शिक्षणातील गळतीचा प्रश्न :**

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असले तरी दुर्दैवाने शिक्षणातील गळती रोखण्यात आपण राज्य म्हणून अपयशी ठरलो आहे. सर्व शिक्षा अभियान व इतर अनेक उपक्रम राबवूनही महाराष्ट्रातील गळतीची स्थिती अजूनही कमी झाली नाही.

प्राथमिक स्तरावरील गळतीचा दर .. १२·६६%
उच्च प्राथमिक स्तरावरील गळती .. २२·९०%
संदर्भ-महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद २००७

इयत्ता जशीजशी वाढत जाते तशीतशी गळती वाढत जाते.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण तर चिंताजनक म्हणावे इतके गंभीर आहे. एका पाहणीनुसार देशपातळीवरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या सरासरी गळतींपेक्षाही महाराष्ट्रातील आदिवासी गळतीचे प्रमाण जास्त आहे.

गळती जास्त असण्याचे कारण दारिद्र्य हे सांगितले जाते परंतु दारिद्र्य हे एकमेव गळतीचे कारण नाही. किंबहुना दारिद्र्य हे गळतीचे बऱ्याचदा फसवे कारण असते.

यूनेस्कोच्या एका पाहणीनुसार इ. १ली तील गळतीचे प्रमाण हे इ. ३री च्या गळतीच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, कोणताही विद्यार्थी शाळेत शिकायचा की नाही याचा निर्णय १ली च्या वर्गातच घेतो. शाळा जर आकर्षक असेल, अध्ययन अध्यापन प्रक्रिया आनंददायी असेल, विद्यार्थ्यांशी वर्तणूक ही जर मैत्रीपूर्ण असेल तर विद्यार्थी शाळेत रमतात अन्यथा ते शाळेतून गळती होतात.

विद्यार्थ्यांच्या मैत्रीपूर्ण नात्याविषयीचा मुद्दा आदिवासी, भटके विमुक्तांच्या शिक्षणाविषयी, गळतीविषयी जास्त खरा आहे. आदिवासी विद्यार्थी ज्याप्रकारचे स्वच्छंद, मुक्त आयुष्य जगतो, एका

अनुक्रमणिका

वेगळ्या परंपरेतून येतो त्याप्रकारचे अनुभव त्याला आपल्या आजच्या शिक्षणप्रणालीत सापडत नाहीत. त्याला निसर्गाच्या तुलनेत शाळा ही बंदिस्त वाटते, बोलीभाषा, एकटेपणा, कमी बोलण्याची सवय यामुळे आदिवासी मुलांना खूप हळुवारपणे हाताळण्याची गरज आहे, परंतु दुर्दैवाने इतर मुलांसारखी शिस्त लावण्याचा प्रयत्न या मुलांच्या बाबतीत झाला तर हे विद्यार्थी गळती होतात.

आदिवासींमधील गळतीचे प्रमाण शासकीय योजनांची अनेकप्रकारे अमलबजावणी करूनसुद्धा कमी न होण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. आमच्या अभ्यासक्रमांमध्ये आदिवासींना आपली ओळखच सापडत नाही. त्यांच्या मुक्त, निर्मळ जगण्याच्या खुणा, त्यांची संस्कृती, परंपरा, निसर्गाचे उपजत ज्ञान, प्राणी-पक्ष्यांची माहिती याविषयी या मुलांना जे ज्ञान असते ते आजच्या अभ्यासक्रमात त्यांना अजिबातच सापडत नाही. त्यामुळे हे शिक्षणच त्यांना आपले वाटत नाही. याचा अर्थ परंपरेचा अभ्यासक्रम बनवावा असे नाही. परंतु प्रकल्प पद्धतीद्वारे या विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला सन्मान देणे शक्य आहे. बोलीभाषा ही एक महत्त्वाची समस्या आदिवासी भागात आहे. ज्या बोलीभाषांची मुळे ही मराठीत नाहीत अशा भाषांतील मुलांना मराठीत शिकणे कठीण जाते. त्यामुळे गळतीचे प्रमाण वाढते. अर्थात बोलीभाषेतून शिकवावे असे नाही पण शिक्षकांनी मराठीचा वापर टप्प्याटप्प्याने वाढवत नेला पाहिजे.

तेव्हा गळतीसाठी केवळ गरिबी हे ठोकळेबाज कारण दिले जाते तेवढेच पुरेसे नाही. दारिद्र्य हेच कारण असेल तर ३०% कुटुंबातील मुले शाळेबाहेर दिसली असती! तेव्हा गळतीच्या प्रश्नाचा विचार सर्वंकष झाला पाहिजे.

माध्यमिक स्तरावरील गळतीचे कारण थोडे वेगळे आहे.

माध्यमिक शाळांची संख्या कमी असल्याने अनेक ठिकाणी ४थी नंतर ५वीचा व ७वी नंतर ८वीचा वर्ग नाही. त्यामुळे त्या भागातील विद्यार्थी पुढे शिकत नाहीत. विशेषतः आदिवासी भागात हे प्रमाण मोठे आहे. पुढचा वर्ग जवळ नसला तर मुलींना अजिबातच शिकवले जात नाहीत. ५वी व ८वीचे वर्ग सर्वत्र सुरू झाले तर माध्यमिक स्तरांवरील गळतीचे प्रमाण निश्चितच कमी होऊ शकेल.

गरिबी, बालमजुरी ही कारणे प्राथमिक स्तरावर गळतीसाठी फारशी समर्थनीय नसली तरी माध्यमिक स्तरावर मात्र ही कारणे गळतीला कारणीभूत ठरतात. ज्या कुटुंबाची आर्थिक स्थिती कमजोर आहे अशा कुटुंबातील मुलांना कामाला पाठविले जाते. मुलींना घरकामासाठी घरी ठेवले जाते. बालविवाहाचे प्रमाण महाराष्ट्रात अजूनही लक्षणीय आहे. त्यामुळे मुलींच्या गळतीचे प्रमाण खूप मोठे आहे. मुलगी ७वीच्या पुढे 'मोठी दिसते' म्हणूनही न शिकविणारे पालक आहेत. विदर्भातील काही आश्रमशाळांमध्ये मुलींवर अत्याचाराच्या घटना घडतात. त्याचा परिणाम त्या भागातील पालक पुढे अनेक वर्षे मुलींना शिकवत नाहीत. हे सारे पैलू लक्षात घ्यावे लागतात.

पुन्हा प्राथमिक शिक्षणासारखाच गुणवत्तेचा मुद्दा गळतीशी जोडलेला आहे. प्राथमिक स्तरावर किमान अध्ययनक्षमता प्राप्त न करणारी मुले तशीच पुढे ढकलली जातात. माध्यमिक स्तरावर तुकडी टिकवण्यासाठी मुले तशीच ढकलली जातात. मुलांना किमान लेखन, गणन येत नाही व अभ्यासक्रमाची पातळी वाढत जाते. ते विद्यार्थी ती पातळी पेलू शकत नाहीत. त्यामुळे ते स्वतः होऊन शाळेबाहेर पडतात.

अनुक्रमणिका

नापास होणे हे माध्यमिक स्तरावर गळतीचे मोठे कारण आहे. नापास झाल्याने निराश विद्यार्थी शाळा सोडतात. माध्यमिक स्तरावर नापास झालेले मुलगे गरीब पालकांच्या दृष्टीनं मजुरीसाठी व मुली लग्नासाठी पात्र ठरतात. गळतीची अशी अनेकविध कारणे आहेत.

**शिक्षक प्रशिक्षण विद्यालये, महाविद्यालयांचा दर्जा :**

शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत इथून पुढच्या काळात शिक्षक प्रशिक्षक विद्यालये व महाविद्यालये सर्वात गंभीर परिणाम करणार आहे. महाराष्ट्रात आजपर्यंत डी.एड्. व बी.एड्. कॉलेजेस हे मुख्यतः सरकारच चालवत होते व काही मोजक्याच प्रतिष्ठित संस्था डी.एड्., बी.एड्. कॉलेजेस चालवत होत्या.

परंतु, दुर्दैवाने मागील काही वर्षात एस.सी.टी.ई. या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेने कुठलाही विधिनिषेध न बाळगता मोठ्या प्रमाणावर डी.एड्., बी.एड्. केंद्रांना परवानगी दिली. ही मोठी चूक म्हणावी लागेल. या केंद्रातील विद्यार्थ्यांनी जवळच्या शाळेत तासिका घेणे अपेक्षित असते परंतु एकाच शहरात इतक्या मोठ्या प्रमाणात डी.एड्., बी.एड्. कॉलेजेस निर्माण जाली की, संपूर्ण वर्षभर परिसरातील शाळा ताब्यात घेतल्या तरीही तासिका पूर्ण होऊ शकणार नाही.

अपवाद वगळता बहुतेक ठिकाणी या डी.एड्., बी.एड्. कॉलेजांना इमारती नाहीत, ग्रंथालये नाहीत, प्रशिक्षित शिक्षक नाहीत असे चित्र आहे. तुषार खरात या पत्रकाराने महाराष्ट्रातील दुर्गम ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन या विद्यालय, महाविद्यालयांना भेटी दिल्या तेव्हा भयावह चित्र आढळून आले. अनेक ठिकाणी विद्यालये, महाविद्यालये प्रत्यक्षात भरतच नव्हती असे दिसले. कुठेही चांगली इमारत नव्हती. विद्यार्थ्यांचे आर्थिक शोषण मोठ्या प्रमाणावर केले जाते.

- अल्पसंख्याकांसाठीच्या प्रशिक्षण केंद्रात तर अनेक ठिकाणी इतर जातीच्या विद्यार्थ्यांचे कागदोपत्री धर्मांतर करून दाखविले आहे. महाराष्ट्रातील काही संस्थांनी अतिशय चांगली केंद्रे चालवली परंतु, दुर्दैवाने ती संख्या अत्यल्प आहे.

  ज्या महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्नीने वसतिगृहातील विद्यार्थ्यांना जेवू घालण्यासाठी स्वतःचे मंगळसूत्र गहाण टाकले त्याच महाराष्ट्रात आज विद्यार्थ्यांना डी.एड्. प्रवेशासाठी आईचे मंगळसूत्र गहाण टाकावे लागते आहे. संस्थाचालकांच्या मानसिकतेत झालेले हे परिवर्तन आज महाराष्ट्राच्या शिक्षणापुढे एक मोठ्ठे प्रश्नचिन्ह आहे.

  डी.एड्., बी.एड्. कॉलेजांच्या गुणवत्तेसाठी स्वतंत्र यंत्रणेची गरज आहे.

**जागतिकीकरण, तंत्रज्ञानयुगात शिक्षणाचे भवितव्य :**

१९९० ला जॉमटेन परिषदेत भारतासारख्या विकसनशील देशांनी त्यांचा सार्वजनिक क्षेत्रावरचा खर्च कमी करावा यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेच्या पुनर्रचना कार्यक्रमाबद्दल सत्र आयोजित करण्यात आले होते. त्याला भारताने मंजुरी दिल्यावर १९९३-९४ साली जागतिक बँकेकडून प्राथमिक शिक्षणाला मदत मिळत गेली.

अनुक्रमणिका

अनिल सद्‌गोपाल या शिक्षणतज्ज्ञांनी म्हटल्याप्रमाणे अभ्यासक्रमाचे नियोजन आणि अमलबजावणी यात शिकण्याची किमान पातळी गृहीत धरून स्पर्धात्मक व बाजाराभिमुख ढाचा लादण्यात आला. हळूहळू साक्षरता म्हणजेच शिक्षण असे सोपे समीकरण मांडले गेले.

या बदलांचे परिणाम इथून पुढे महाराष्ट्रातही दिसणार आहेत. शिक्षणावरील खर्च कमी करून कामचलाऊ योजना इथून पुढच्या काळात वाढत जातील. शिक्षणसेवक योजना, पर्यायी शिक्षणाच्या योजना ही त्याची काही उदाहरणे आहेत. जागतिक पातळीवरील या अपरिहार्य तडजोडींचा परिणाम महाराष्ट्रातील शिक्षणावर होणार नाही यासाठी सजग राहावे लागेल. शिक्षण हक्क विधेयकासारखी महत्त्वपूर्ण विधेयके मंजूर झाली तरीसुद्धा अजूनही भटके-विमुक्तांचे शिक्षण, स्थलांतरितांचे शिक्षण याबाबत ठोस भूमिका घेतली जात नाही. कोठारी आयोगाने शिक्षणावर ६% खर्च करावा असे सुचवूनसुद्धा अजूनही शिक्षणावर केंद्र किंवा राज्यस्तरावर ६% खर्च शासन करत नाही. या सर्व गोष्टी चिंतेच्या बाबी आहे. अजूनही ३५ विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक हे प्रमाण असल्याने एका शिक्षकाकडे दोन वर्ग असे प्रमाण आहे. हे प्रमाण बदलणे गरजेचे आहे. किमान २० विद्यार्थ्यांमागे एक वर्गखोली व एक शिक्षक हेच प्रमाण आवश्यक आहे.

**तंत्रज्ञानाचा प्राथमिक शिक्षणात वापर :**

जागतिकीकरणाचे वरीलप्रमाणे नकारार्थी मुद्दे आहेत, तरीसुद्धा तंत्रज्ञानाने निर्माण झालेली सुलभता ही प्राथमिक शिक्षणासाठी वरदान ठरेल अशीच बाब आहे. आज अनेक शाळा तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत आहेत. महाराष्ट्रात संगणकाचा वापर करणाऱ्या शाळा संपूर्ण भारतात सर्वात जास्त आहेत ही नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे. डिजिटल स्कूल ही कल्पना अनेक शाळा अमलात आणत आहेत. अनेक शाळांनी संगणकाद्वारे अभ्यासक्रम शिकवण्याच्या पद्धती अमलात आणल्या आहेत. त्याचे सार्वत्रिकीकरण व्हायला हवे. महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील एका वस्तीशाळेवर लॅपटॉपद्वारे शिक्षण दिले जात आहे. त्यातून विद्यार्थ्यांची संपादणूक उंचावल्याचे दिसून आले आहे. हे सर्व लक्षात घेऊन तंत्रज्ञानाच्या वापराची गती वाढवायला हवी.

भविष्यात मुळात शाळांची आजची रचना अशीच राहील का? हा खरा मुद्दा आहे. शिक्षकविरहित शाळांकडे वाटचाल होण्याचीच शक्यता जास्त आहे. विद्यार्थी इंटरनेटवर, कॉम्प्युटरवर जर शिकू लागले तर विद्यार्थी घरीच स्वयंअध्ययन करू शकतील. होमस्कूलींग ही संकल्पना वाढते आहे. त्यामुळे ते विद्यार्थी वाढत जातील व कदाचित आज फळा, गुरुजी व विद्यार्थी हे चित्र बदलण्याची शक्यता जास्त आहे. आज हे प्रमाण महाराष्ट्रात अत्यल्प असले तरी भविष्यात ते नक्कीच वाढणार आहे. हे लक्षात घेऊन पुढील २५ वर्षांत शिक्षणाची रचना आपल्याला करावी लागणार आहे.

महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लि. (M.K.C.L) या ज्ञानक्षेत्रातील संस्थेने या आव्हानाची दखल घेऊन शिक्षकांसाठी, विद्यार्थ्यांसाठी विविध अभ्यासक्रम, कोर्सेस विकसित केलेले आहेत. शिक्षक प्रशिक्षणाची रचना केली आहे. काळाची आव्हाने स्वीकारून या संस्थेने नक्कीच योग्य साधने विकसित केली आहेत. बहुविध बुद्धिमत्तांच्या सिद्धांतांची दखल घेऊन 'हॉबी होम' ही लहान मुलांसाठीची संगणकीय व्यक्तिमत्त्व कार्यशाळा सुरू केली आहे.

अनुक्रमणिका

ग्रामीण भागात, आदिवासी भागातील शिक्षकांसाठी नव्या वेगवान प्रवाहाबरोबर राहण्यासाठी इथून पुढे संगणक, इंटरनेटचा वापर करून शिक्षकांचे प्रशिक्षण व्हायला हवे तरच समान शिक्षणाची अमलबजावणी होऊ शकेल.

शिक्षणाच्या विस्ताराइतकेच शिक्षकांचे सक्षमीकरण महत्त्वाचे आहे. शिक्षक सक्षम झाले तरच शिक्षणप्रक्रिया उपयुक्त ठरेल. नोकरीतीतल सुरक्षिततेमुळे शिक्षक स्वतः होऊन, व्यक्तिमत्त्व समृद्धीचा प्रयत्न करत नाही. तेव्हा तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वसमृद्धीचे प्रयत्न व्हावेत. आज शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व समृद्ध नाही त्यामुळे शिक्षणक्षेत्राला पठारावस्था आली आहे. ते प्रवाही व गतिमान होण्यासाठी इथून पुढे शिक्षक हेच आव्हान मानून काम करावे लागेल.

**समारोप :**

१९६०ते २०१० या पन्नास वर्षातील शालेय शिक्षणाचा हा आढावा संक्षिप्त असला तरी शिक्षणाच्या विकासाचे टप्पे स्पष्ट करायला पुरेसा आहे.

देशातील हिमाचल प्रदेश, चंदीगड, दिल्ली, केरळ ही राज्ये शालेय शिक्षणाच्या विकासात महाराष्ट्राच्या पुढे असली तरीसुद्धा इतर बहुसंख्य राज्यांपेक्षा महाराष्ट्रातील शिक्षणाची प्रगती निश्चितच समाधानकारक आहे अर्थात तरीही राज्याचे उद्दिष्ट केरळ, हिमाचल प्रदेशाच्या बरोबरीने प्रगती करण्याचे असले पाहिजे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील ध्येयवादी वातावरण, सामाजिक प्रबोधनाचे झालेले प्रयत्न, शाहू महाराज, महात्मा फुले, कर्मवीर अण्णा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वि. रा. शिंदेनी वंचित समूहाच्या विकासासाठी शिक्षण किती महत्त्वाची गरच आहे याबाबत केलेली जागृती व प्रयत्न याचा अपरिहार्य परिणाम म्हणून महाराष्ट्रनिर्मितीनंतर शिक्षणाचा विस्तार झपाट्याने झाला. पंचायत राज्य व्यवस्थेतील लोकप्रतिनिधी व स्थानिक स्वराज्य संस्थातील नगरसेवकांचे शिक्षणाच्या विस्तारात नक्कीच योगदान आहे.

या विस्तारात गेल्या ५० वर्षात नक्कीच महत्त्वाचे काम झाले. आता प्रश्न गुणवत्तेचा आहे. शहरी व ग्रामीण भागातील शाळांची समान गती व विविध बोर्डांच्या तुलनेत महाराष्ट्रातील बोर्डाचा दर्जा, खाजगी शाळांविषयी वाढते आकर्षण हे आजच्या शालेय शिक्षणापुढे खरे आव्हान आहे, शिक्षणात संनियंत्रण वाढविणे सर्व संनियंत्रणेचे प्रेरक यंत्रणेत रूपांतर करणे यासाठी प्रयत्नांची गरज आहे. इतक्या प्रयत्नांनंतरही अजूनही भटक्या-विमुक्तांचे शिक्षणातील प्रमाण आपण वाढवू शकलो नाही. दलित, आदिवासी, मुस्लिमांची गळती कमी करू शकलो नाही. गळती रोखण्यासाठी माध्यमिक स्तरावर व्यावसायिक शिक्षणाचाही अजून फारसा विचार झालेला नाही. तंत्रज्ञानाचा यथोचित वापर करून अध्ययनप्रक्रिया प्रभावी करण्याचेही आव्हान समोर आहे.

पुढील १० वर्षात जागतिकीकरणाच्या वेगवान गतीत आपल्या शाळा टिकवून वरील आव्हाने आपण कशाप्रकारे पेलणार आहोत यावर महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाचे भवितव्य अवलंबून आहे. महाराष्ट्रातील विकासप्रक्रियेची चर्चा करताना त्या विकासप्रक्रियेचा रस्ता हा प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाच्या

सक्षमीकरणातून जातो, हे लक्षात घेऊन सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्राचा शालेय शिक्षण हा प्राधान्यक्रम व्हावा असे आग्रहाने नमूद करावेसे वाटते.

Herambrk@rediffmail.com

[या लेखात राज्यातील एकूण शिक्षणविषयक माहितीचा तक्ता व विश्लेषण ज्येष्ठ शिक्षण संशोधक श्री. ब. गोगटे (पुणे) यांनी तयार करून दिले. त्यांचे विशेष आभार]

अनुक्रमणिका

## संदर्भ ग्रंथसूची


महाराष्ट्रातील शैक्षणिक परिवर्तन : चित्रा नाईक, जीवन शिक्षण प्रकाशन

महाराष्ट्राचे शिक्षण : प्रयोग आणि परंपरा १९८०-बापूजी साळुंखे षष्ट्यब्दीपूर्ती प्रतिष्ठान

शिक्षणावर दृष्टिक्षेप : शिक्षण संचालनालय १९७८

दूरदर्शी शिक्षणयोगी : जे. पी. नाईक, सविता भावे २००८, भारतीय शिक्षण संस्था

शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास - व्हीनस प्रकाशन, १९७३

समानतेसाठी शिक्षण - SCERT प्रकाशन, १९८९

मराठवाड्यातील शैक्षणिक सांख्यिकी - स्वामी रामानंदतीर्थ संशोधन संस्था, २००७

शालेय सुधार समिती - शिक्षण व सेवायोजन विभाग - १९८४

महाराष्ट्रातील शैक्षणिक परिवर्तन - म. वि. अकोलकर, १९७१

संयुक्त महाराष्ट्र : काल आणि आज, संपादक प्रा. भगवान काळे, १९८८

आजचे शिक्षण : आजच्या समस्या : श्रीविद्या प्रकाशन, १९७१

भारतातील प्राथमिक शिक्षण : एक दृष्टीक्षेप - डॉ. रंजना गटकळ, प्राजक्त प्रकाशन

शालेय शिक्षण विभागाचा करंटेपणा - समर्थन अहवाल, २००८-२००९

मराठवाड्यातील शिक्षण : एकविसाव्या शतकातील आव्हाने - श्री. ब. गोगटे, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद.

School Education in Maharashtra : Status, Issues and Future Perspectives, NCERT Publication.

Education Administration in Maharashtra : NUEPA, New Delhi.


अनुक्रमणिका

# महाराष्ट्रातील उच्चशिक्षण : एक दृष्टिक्षेप



**डॉ. भालचंद्र मुणगेकर**

हे महाराष्ट्रातील ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ. अर्थशास्त्रावरील त्यांचा अभ्यास हा देशभर ख्यातनाम. अनेक पुरस्कारांनी सन्मानित, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वैचारिक वारसा घेऊन डॉ. मुणगेकर यांनी आतापर्यंत नेत्रदीपक प्रगती केली आहे. मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्रात पदव्यूत्तर पदवी आणि पीएच. डी ह्या दोन पदव्या त्यांनी घेतल्या. अर्थशास्त्रातील त्यांचा दांडगा अभ्यास लक्षात घेता केंद्र सरकारने त्यांची केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य म्हणून नियुक्ती केली. त्याचबरोबर त्यांना केंद्र सरकारच्या कमिशन फॉर अग्रीकल्चरल कॉस्ट्स ॲड प्राइसेस, टेक्निकल ग्रूप टू ॲडव्हाइस द मिनिस्ट्री ऑफ फूड, पब्लिक डिस्ट्रिब्युशन ॲड कन्झ्युमर्स अफेअरेस, इंटरसेक्टोरल इश्यूज ऑफ ट्रायबल डेव्हलपमेंट, नॅशनल एलिजिबिलिटी टेस्ट रिव्ह्यू कमिटी, कमिटी ऑन फायनान्सिंग, हायर ॲड टेक्निकल एज्युकेशन, टास्कफोर्स ऑन मायनोरिटी कॉन्सन्ट्रेटेड टाऊन्स ॲड सिटीज यासारख्या केंद्रावर सदस्य आणि इतर पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. गौतम बुध्दांच्या महापरिनिर्वाणाच्या २५५० या वर्षानिमित्त केंद्र सरकारने स्थापन केलेल्या उपसमितीचे ते अध्यक्ष होते. त्यांची बुध्दीझम अँड कन्टेम्परररी वर्ल्ड-इश्यूज अँड चॅलेंजेस, द इकॉनॉमी ऑफ महाराष्ट्र : चेंजिंग स्ट्रक्चर अँड इमर्जिंग इश्यूज, इंडियन इकॉनॉमी इन द न्यूमिलेनियम, द पोलिटिकल इकॉनॉमी ऑफ टर्म्स अँड ट्रेड, मी असा घडलो, इंधन ग्रंथसंपदा प्रसिध्द आहे.

पत्ता : ९०१, काव्हॅशन, दोस्ती एकर कॉम्प्लेक्स, वडाळा (पूर्व), मुंबई ४०० ००३.
दूरध्वनी : ९५-२४०-२३३११६६

## प्रास्ताविक

**मा**नवी विकासामध्ये शिक्षणाचे महत्त्व व वेगळेपणावर भर देऊन सांगण्याची गरज नाही. शिक्षण हे औपचारिक आणि अनौपचारिक असे दोन प्रकारचे असते. अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व ध्यानात घेऊनही गेल्या काही शतकांमध्ये औपचारिक शिक्षणाचे महत्त्व अनन्य साधारण वाढले आहे. अगदी पहिल्या इयत्तेपासून ते उच्च आणि अत्युच्च शिक्षण पर्यंत सर्व पातळीवरील शिक्षणाचा अंतर्भाव औपचारिक शिक्षणामध्ये होतो. या वेगवेगळ्या पातळीवरील औपचारिक शिक्षणाचे एक विशिष्ट संदर्भात केवळ वेगळेच नव्हे, तर अनन्यसाधारण महत्त्व आहे. उदा. निरक्षर व्यक्तीच्या दृष्टीकोनातून केवळ साक्षर होणे ही गोष्टीदेखील त्या व्यक्तीचे सक्षमीकरण करण्यास कारणीभूत होते. या औपचारिक शिक्षणाच्या क्षेत्रात एखादी व्यक्ती वा

अनुक्रमणिका

समाजघटक जस जसा वरच्या पातळीवर जातो, तसतशी ती व्यक्ती वा समाजघटकाला स्वतःच्या सर्वांगीण प्रगतीच्या अनेक व बहुविध संधी उपलब्ध होतात. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे, औपचारिक शिक्षणाची पातळी जशी जशी वाढते, तशी तशी व्यक्ती वा समाजघटकाची सक्षमताही वाढत जाते.

प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण हे तर महत्त्वाचे आहेच, परंतु गेल्या सुमारे शे-दोनशे वर्षातील अर्थव्यवस्थांचे बदलते स्वरूप, त्यातून निर्माण झालेले आर्थिक विकासाबाबतचे नवे नवे प्रश्न, आर्थिक विकास सर्वसमावेशक करण्यासाठी सातत्याने रोजगार वाढविण्याची आवश्यकता आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील झपाट्याने होत जाणाऱ्या बदलांच्या पार्श्वभूमीवर उच्च, तांत्रिक, वैद्यकीय आणि व्यावसायिक शिक्षणालाही फार महत्त्व प्राप्त झाले आहे.

**प्रा. शुल्ट्झ यांचे प्रतिपादन : मानवी भांडवलातील गुंतवणूक**

थोर अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते प्रो. थिओडोर शुल्ट्झ यांनी सर्वप्रथम 'मानवी भांडवलातील गुंतवणूक' (Investment in Human Capital) ही संकल्पना वापरली आणि सर्व समाजशास्त्रांमध्ये, विशेषतः अर्थशास्त्रामध्ये एक क्रांतिकारी बदल झाला. प्रो. शुल्ट्झ यांनी प्रथमच मानवी श्रमाला 'मानवी भांडवल' असा शब्दप्रयोग वापरला. त्यांच्या मते, विविध देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये महत्वाची तफावत असण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे श्रमाची उत्पादकता (Productivity of Labour) हे होय. पुढे, त्यांच्या मते, मानवी श्रमांची गुणवत्ता अथवा त्यांना प्राप्त करून देण्यात येणारे कौशल्य वेगवेगळे असल्यामुळेच विविध देशातील श्रमांच्या उत्पादकतेत फरक पडतो. श्रमांची अशी गुणवत्ता व त्यांना देण्यात येणाऱ्या कौशल्यासाठी मानवी भांडवलामध्ये (म्हणजेच श्रमिकांमध्ये) गुंतवणूक करावी. लागते, म्हणजेच खर्च करावा लागतो. उच्च, तांत्रिक, वैद्यकीय वा इतर कोणत्याही प्रकारचे व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी वा वेगळ्या प्रकारचे रोजगाराभिमुख कौशल्य प्राप्त करण्यासाठी करण्यात यावयाचा खर्च म्हणजे 'मानवी भांडवलातील गुंतवणूक होय.' हाच मुद्दा दुसऱ्या आणि सोप्या भाषेत सांगायचा म्हणजे एखाद्या देशातील श्रमिकांची गुणवत्ता वाढवून देण्याच्या उत्पादकतेत जितकी अधिकाधिक वाढ होते, त्या प्रमाणात त्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यात मदत होते.

**महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची घोडदौड**

१८५७ साली कलकत्ता आणि मद्रास विद्यापीठांबरोबरच (१८ जुलै १८५७ रोजी) मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली आणि भारतात उच्च शिक्षणाचा पाया रोवला गेला. स्वतःची साम्राज्यशाही दृढमूल करणे हा जरी भारतात उच्च शिक्षणाचा पाया रोवण्यामागे इंग्रजांचा मुख्य उद्देश असला, तरी त्या धोरणामुळे भारतात उच्च शिक्षणाची पहाट झाली, यात शंका नाही. त्यानंतर डेक्कन एज्युकेशन सोसायटीने १८८५ मध्ये पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. त्यानंतर दोनच वर्षांनी त्यावेळच्या मुंबई राज्याने व्ही.जे.टी.आय. या सुप्रसिद्ध तंत्रज्ञान संस्थेची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४५ साली पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन करून मुंबईमध्ये नोकरी करून उच्च शिक्षण घेणे शक्य व्हावे, म्हणून सिद्धार्थ महाविद्यालय हे भारतातील पहिले सकाळचे महाविद्यालय सुरू केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून पश्चिम महाराष्ट्रामध्ये उच्च शिक्षण बहुजन समाजापर्यंत घेऊन जाण्याचा ऐतिहासिक उपक्रम केला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांनी मराठवाड्यासारख्या शैक्षणिकदृष्ट्या अविकसित असलेल्या मराठवाड्यामध्ये उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ

अनुक्रमणिका

रोवली. विदर्भात पंजाबराव देशमुख यांनी उच्च शिक्षणाचा पाया घालण्याचे काम केले. मुंबईतील SNDT महिला विद्यापीठ हे भारतातील पहिले महिला विद्यापीठ होय. स्त्रियांना शिक्षणाचे दरवाजे मोकळे करण्याचे ऐतिहासिक कार्य महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केले आणि पुढे तो वारसा महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी चालविला.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला तेव्हा महाराष्ट्रात एकूण ७० च्या आसपास महाविद्यालये होती. या सर्व महाविद्यालयांचे वैशिष्ट म्हणजे ती सार्वजनिक विश्वस्त संस्थांनी उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उदात्त भावनेने सुरू केली होती. अशी महाविद्यालये सुरू करण्यात खाजगी विद्यापीठांचाही मोठा सहभाग असला, तरी त्यांच्या मनाला 'नफा' मिळविण्याच्या भावनेने तिळमात्रही स्पर्श केलेला नव्हता.

भारतात इंग्रजी वसाहतीचे राज्य सुरू झाल्यापासून अनेक अनुकूल गोष्टीमुळे मुंबई ही देशाची औद्योगिक राजधानी झाली. भारतातील इतर कोणत्याही शहराचा विचार करता मुंबई हे सर्वार्थाने औद्योगिकदृष्ट्या सर्वात प्रगत शहर झाले व त्यामुळे आपोआपच महाराष्ट्र हे औद्योगिक विकासाच्या दृष्टीने अग्रक्रमाचे राज्य झाले. "मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे," अशी घोषणा देऊन १९५६ ते १ मे १९६० म्हणजे मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची स्थापना होईपर्यंत मुंबईसाठी मराठी जनतेने जो अविरत व ऐतिहासिक संघर्ष केला आणि १०५ हुतात्म्यांचे बलिदान दिले ते, मुंबईशिवाय महाराष्ट्र राज्याची कल्पनाही करणे, अशक्य होते म्हणून.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर पुढील २५ वर्षात राज्यात शिक्षणाच्या बाबतीत झपाट्याने प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नामध्ये महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचे योगदान आहे, पण त्याबरोबरच सार्वजनिक विश्वस्त संस्थांचाही मोलाचा वाटा आहे.

**तक्ता क्र. १**

**राज्यनिहाय महाविद्यालयांची संख्या : २००७-२००८**

(नोंदणीचे आकडे लाखामध्ये)

| राज्य | महाविद्यालय | एकूण नोंदणी | विद्यार्थिनीची नोंदणी | विद्यार्थिनींचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| आंध्रप्रदेश | २८३१ | १०·२३ | ४·१३ | ४०·३७ |
| आसाम | ४५२ | २·५३ | १·०५ | ४१·६० |
| बिहार | ६७३ | ६·५१ | १·६० | २४·६० |
| गुजरात | ९३४ | ७·४६ | ३·३३ | ४४·६३ |
| हरियाणा | ३३६ | ३·१२ | १·२९ | ४१·४८ |
| हिमालय प्रदेश | २५२ | १·१६ | ०·५१ | ४४·०० |
| जम्मू आणि काश्मिर | २५६ | ०·८६ | ०·४० | ४७·०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कर्नाटक | २२८५ | ७·९५ | ३·३० | ४१·५६ |
| केरळ | ८४८ | ३·७० | २·२६ | ६१·१६ |
| मध्य प्रदेश | १३८९ | ६·६९ | २·५० | ३७·३७ |
| महाराष्ट्र | ३२२० | १६·९१ | ७·०४ | ४१·६२ |
| ओरीसा | ८७९ | ४·३४ | १·५७ | ३६·११ |
| पंजाब | ५९६ | ३·३० | १·७२ | ५१·९३ |
| राजस्थान | ९२८ | ४·५९ | १·५७ | ३४·१४ |
| तमिळनाडू | १६६८ | ९·४५ | ४·३४ | ४५·९५ |
| त्रिपूरा | २८ | ०·२५ | ०·१० | ४१·३४ |
| उत्तर प्रदेश | २३६९ | १६·०८ | ५·९५ | ३७·०३ |
| पश्चिम बंगाल | ६८९ | ८·१० | ३·२१ | ३९·५८ |
| दिल्ली | २०१ | २·३३ | १·१४ | ४९·०६ |
| छत्तीसगड | ४२० | १·९३ | ०·७२ | ३७·२३ |

आधार : विद्यापीठ अनुदान आयोग, वार्षिक अहवाल, २००७-२००८. तक्ता क्र.१ मध्ये २००७-२००८ मधील राज्यनिहाय महाविद्यालयांची एकूण संख्या व विद्यार्थ्यांची नोंदणी दिली आहे. देशातील सर्वात अधिक म्हणजे ३२२० महाविद्यालये व १६ लाख ९१ हजार महाविद्यालयीन विद्यार्थी महाराष्ट्रात आहेत.

याच दरम्यान मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या विभागात उच्च व तांत्रिक शिक्षणाचा झपाट्याने विकास झाला. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत मुंबईत येणाऱ्या लोकांची संख्या सतत वाढत गेली व त्याबरोबरच महाविद्यालयांची संख्या वाढली. याच दरम्यान ग्रामीण भागाचाही विकास झाला व तेथील जनतेच्या आकांक्षा वाढल्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्यांच्या संस्थेतही वाढ होऊन अधिकाधिक महाविद्यालये काढणे आवश्यक झाले. शहरी व ग्रामीण भागातील जनतेबरोबरच दलित, स्त्रिया, आदिवासी, अल्पसंख्यांक व भटके आणि विमुक्त समाज घटकांनाही उच्च शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व समजले व त्यांच्या शैक्षणिक विकासाच्या आकांक्षा जागृत झाल्या. हे उपेक्षित समाजघटक पूर्वीपेक्षा फार मोठ्या संख्येने उच्च शिक्षण घेऊ लागले व उच्च शिक्षण खऱ्या अर्थाने समाजाभिमुख झाले. तक्ता क्र. १ मध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मुलांमध्ये मुलींचे राज्यनिहाय प्रमाण तर तक्ता क्र. २ मध्ये उच्च व तंत्रशिक्षण घेणाऱ्या मुलांमध्ये अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण दाखविले आहे.

तक्ता क्र. २

अनुसूचित जातीच्या विद्यार्थांचे उच्च व तांत्रिक शिक्षणातील शेकडा प्रमाण

| | सहभागाचे शेकडा प्रमाण | | | |
|---|---|---|---|---|
| राज्य | उच्च शिक्षण | | तांत्रिक शिक्षण | |
| (१) | (२) | | (३) | |
| **राज्य** | **१९९१** | **२००१** | **१९९१** | **२००१** |
| आंध्रप्रदेश | ११·२९ | १३·९० | १०·०८ | १२·१३ |
| आसाम | ७·४५ | ८·८० | ५·४६ | १०·७२ |
| बिहार | — | ५·५८ | — | ३·४२ |
| गुजरात | ७·२४ | १५·२३ | ५·२६ | ५·३८ |
| हरियाणा | ५·६५ | ९·४५ | १६·९५ | ३·९३ |
| हिमाचल प्रदेश | ७·३३ | १२·५५ | १३·३२ | ८·९६ |
| जम्मू आणि काश्मिर | — | ०·०० | — | ०·०० |
| कर्नाटक | — | १२·७४ | ३·९६ | ५·८९ |
| केरळ | ६·४१ | ९·६३ | ६·७५ | ६·५२ |
| मध्यप्रदेश | ७·२७ | ८·९९ | १०·२० | ६·३४ |
| **महाराष्ट्र** | **८·२५** | **९·८५** | **५·७३** | **१·७२** |
| ओरीसा | ६·३६ | ९·३४ | ९·२२ | ८·५३ |
| पंजाब | ११·७५ | १२·०७ | १८·५५ | ७·८० |
| राजस्थान | — | १०·३४ | — | १९·१७ |
| तामिळनाडू | १२·९३ | १८·६२ | १०·०१ | १०·९८ |
| त्रिपूरा | ११·४५ | १५·७९ | १५·८० | १६·९७ |
| उत्तरप्रदेश | ११·६१ | १४·०८ | ४·८० | २२·०३ |
| पश्चिम बंगाल | ७·४९ | ११·७० | ५·९४ | ८·०४ |
| दिल्ली | ५·७६ | १०·२८ | ११·२७ | ८·७४ |

आधार - सुखदेव थोरात आणि चित्तरंजन सेनापती Dalits In India; Search For a Common Destiny - Sage Publication New Delhi 2006.

**नवे शैक्षणिक धोरण व उच्च शिक्षणाचे खाजगीकरण**

१९८६ मध्ये केंद्र सरकारचे नवीन शैक्षणिक धोरण जाहीर झाले. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण क्षेत्राला काही प्रमाणात नवीन दिशा देण्याचे काम या शैक्षणिक धोरणाने केले.

अनुक्रमणिका

या नव्या शैक्षणिक धोरणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे शिक्षण क्षेत्रातील खाजगीकरणाच्या प्रक्रियेला चालना देण्याचे ठरले. त्याचा परिणाम म्हणून अनेक खाजगी संस्था शिक्षण क्षेत्रामध्ये उतरल्या. १९९१ मध्ये जागतिकीकरण, शिथिलीकरण आणि खाजगीकरणावर आधारलेल्या नव्या आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून शिक्षण क्षेत्राच्या खाजगीकरणाची प्रक्रिया अधिक गतिमान झाली. याच दरम्यान महाराष्ट्र सरकारने उच्च, तांत्रिक, वैद्यकीय आणि व्यावसायिक अशा शिक्षणाचा सर्व स्तरांवर विना-अनुदान तत्वाचे धोरण स्वीकारले व शिक्षण क्षेत्राचे, त्यातही उच्च शिक्षणाचे जवळजवळ पूर्णपणे खाजगीकरण झाले. ही प्रक्रिया तंत्र, वैद्यकीय व्यवस्थापन या क्षेत्रात प्रामुख्याने झाल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. ३

महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाचे प्रमाण

| | शासकीय | खाजगी | एकूण | शेकडा खाजगी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| अभियांत्रिकी आणि तत्सम शाखा | | | | |
| अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान | १५ | १२६ | १४१ | ८९·३६% |
| **महाराष्ट्रातील उच्चशिक्षण-एक दृष्टिक्षेप** | | | | |
| कृषी अभियांत्रिका | ६ | — | ६ | ०·००% |
| रसायन तंत्रज्ञान | ४ | — | ४ | ०·००% |
| वास्तुकला | १ | १५ | १६ | ९३·७५% |
| एकूण | २६ | १४१ | १६७ | ८४·४३% |
| वैद्यकीय आणि शरीरशास्त्र | | | | |
| ॲलोपथी औषध | १७ | २७ | ४४ | ६१·३६% |
| आयुर्वेदिक औषध | ४ | ५२ | ५६ | ९३·८५% |
| युनानी औषध | — | ६ | ६ | १००·००% |
| होमिओपॅथी | — | ४४ | ४४ | १००·००% |
| दंतवैद्यक | ४ | १६ | २० | ८०·००% |
| सुश्रूशा (नर्सिग) | ३ | ६ | ९ | ६६·६६% |
| फिजीओथरीपी | ४ | १५ | १९ | ७८·९४% |
| औषधी निर्माण शास्त्र | ५ | ४९ | ५४ | ९०·७४% |
| एकूण | ३७ | २१५ | २५२ | ८५·३१% |
| व्यवस्थापन | १४ | ८१ | ९५ | ८५·२६% |
| शिक्षकी शिक्षण | ५९ | २१४ | २७३ | ७८·३८% |
| एकूण | १३६ | ६५१ | ७८७ | ८२·७२% |

अनुक्रमणिका

तक्ता क्र. ३ मध्ये महाराष्ट्र राज्यात व्यावसायिक शिक्षणाच्या खाजगीकरणाचे प्रमाण किती प्रमाणात वाढले आहे हे दिसून येते. उदा. तंत्रशिक्षण व तत्सम अभ्यासक्रमात खाजगी क्षेत्राचा हिस्सा ९० टक्के आहे. वैद्यकीय व आरोग्यविषयक शिक्षणामध्ये ६१ टक्के तर आधुनिक वैद्यकीय (ॲलोपेथीक) ९४ टक्के, व्यवस्थापन क्षेत्रात ८५ टक्के तर शिक्षक प्रशिक्षण क्षेत्रात (टिचर्स एज्युकेशन) ७८ टक्के आहे. ही आकडेवारी २००२ च्या दरम्यान आहे. गेल्या आठ वर्षात खाजगीकरणाचे एकूण प्रमाण ८२ टक्क्यावरून ९०-९२ पर्यंत जाण्याची शक्यता आहे.

## खाजगी विनाअनुदानित संस्था

विनाअनुदानित संस्थांमुळे उच्च, तांत्रिक, वैद्यकीय आणि व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार झाला, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. परंतु त्याबरोबरच अशा विनाअनुदानित संस्थांमध्ये प्रत्यक्ष खर्चापेक्षा कितीतरी प्रमाणात अधिक फी आकारली जाते, अशी सर्वसाधारण तक्रार आहे. ही तक्रार मोठ्या प्रमाणात खरी असण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे केवळ गरीब थरातील विद्यार्थ्यांनाच नव्हे तर कनिष्ठ व मध्यमवर्गातील मुलानांही उच्च व तंत्र शिक्षण परवडेनासे झाले आहे. अंतिमतः उच्च शिक्षण हे फक्त धनिक वर्गाची मक्तेदारी होईल, अशी भीती निर्माण झाली आहे खरे म्हणजे T.M.A. पै फाऊंडेशन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने २००३ मध्ये खाजगी विनाअनुदानित शिक्षण संस्थांनी फी आकारताना प्रत्यक्ष खर्च व शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आवश्यक (surplus) अशी फी आकारण्याचा निर्णय दिला आहे. खाजगी विना-अनुदान शिक्षण संस्थांनी हा निर्णय ध्यानात ठेवणे अगत्याचे आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विविध योजनांनुसार विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांची ‘राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या संस्था’ असे वर्गीकरण केले जाते. त्यासाठी शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे निकष लावले जातात. अशा निकषाच्या आधारे जी विद्यापीठे व शैक्षणिक संस्था यांना ‘राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची संस्था’ असा दर्जा दिला जातो, त्यांना त्यांच्या पुढील विकासासाठी भरघोस अनुदान दिले जाते. २००७-२००८ मध्ये संपूर्ण देशात (सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश) २६७ संस्था होत्या. त्यापैकी तामिळनाडू २१ संस्था आहेत, तर महाराष्ट्रात २० संस्था होत्या. या क्षेत्रात अग्रक्रम मिळवून विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शैक्षणिक विकासासाठी अधिकाधिक अनुदान मिळविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे आणि इतर उच्च शिक्षण संस्थांनी अधिक यशस्वी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

## व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व

रोजगार मिळवण्याच्या दृष्टीकोनातून व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणाचे अतोनात महत्त्व आहे. या भूमिकेतून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची स्थापना करण्यात आली. शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मुला-मुलींना अशा प्रकारच्या आय.टी.आय. मध्ये प्रवेश घेता येतो व त्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिले जाते. तक्ता क्र. ४ मध्ये आपल्याला असे दिसून येते की, २००६ मध्ये देशातील एकूण ५,०६८ आय.टी.आय. पैकी एकट्या महाराष्ट्रात ६१४ होत्या. त्यापैकी ३४७ शासकीय असून २६७ खाजगी क्षेत्रामध्ये होत्या. इथे एक गोष्ट ध्यानात घ्यायला हवी की आय.टी.आय. मधील जागांचा विचार करता एकूण सात लाख बेचाळीस जागांपैकी एकट्या महाराष्ट्रात ६७,३९० जागा होत्या. या संदर्भात आग्रहाने नमूद करण्याची गोष्ट म्हणजे वेगाने बदलत जाणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेत रोजगार

मिळण्याचा दृष्टीने रोजगार कौशल्य अतिशय महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने विचार करता शासन शिक्षण संस्था, पालक आणि विद्यार्थी या सर्वांनी प्रयत्नशील असायला हवे.

**तक्ता क्रमांक ४**

**राज्यनिहाय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि एकूण जागा यांची संख्या: २००७-२००८**

| | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | | | | एकूण जागा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्य | शासकीय | खाजगी | एकूण | स्त्रियांसाठी | शासकीय | खाजगी | एकूण | स्त्रियांसाठी |
| आंध्रप्रदेश | ९२ | ४७६ | ५६८ | ५४ | २४२३९ | ८७३४६ | १११५८५ | ३९८० |
| आसाम | २४ | ३ | २७ | २७ | ४५३६ | ८४ | ४६२० | ११०४ |
| बिहार | २९ | २९ | ५८ | ७ | १०४९६ | ४४७२ | १४९६८ | ४३२ |
| गुजरात | १३५ | १२९ | २६४ | ३३ | ७०५०० | १६६२६ | ८७१२६ | २१४४ |
| हरियाणा | ८१ | २५ | १०६ | ३९ | १३४७७ | १४२८ | १४९०५ | २५५६ |
| हिमाचल प्रदेश | ५५ | ८ | ६३ | १६ | ५६४९ | ९८० | ६६२९ | ११०२ |
| जम्मू आणि कश्मीर | ३८ | ० | ३८ | ५४ | ४३३२ | ० | ४३३२ | १२४५ |
| कर्नाटक | १३१ | ६१० | ७४१ | २९ | २१३४० | ३८५७६ | ५९९१६ | २२२४ |
| केरळ | ८२ | ४६७ | ५४९ | ९ | १६१७६ | ४३९४६ | ६०१२१ | १५२४ |
| मध्यप्रदेश | १३६ | ३३ | १६९ | १३ | १९५३८ | २८६० | २२३९८ | १०४४ |
| **महाराष्ट्र** | **३४७** | **२६७** | **६१४** | **३११** | **६७३९०** | **२९७९४** | **९७१८४** | **११७०४** |
| ओरीसा | २७ | १४७ | १७४ | १५ | ७३३८ | १६६६० | २३९८८ | ९१२ |
| पंजाब | ११० | ७१ | १८१ | ७० | १४३५१ | ४७१६ | १९०६७ | ४५६४ |
| राजस्थान | ९१ | ४५ | १३६ | १६ | ९४७२ | ३८६८ | १३३४० | ८१६ |
| तामिळनाडू | ७१ | ६०५ | ६७६ | २४ | २४८१२ | ६२१९१ | ८७००३ | २७१६ |
| त्रिपूरा | ४ | ० | ४ | १ | ४१६ | ० | ४१६ | ११६ |
| उत्तरप्रदेश | १८५ | १२८ | ३१३ | ६७ | ३८६४४ | १३२८४ | ५१९२८ | ३८५२ |
| वेस्ट बेंगाल | ४९ | १८ | ६७ | १२ | ११९५६ | ९६४ | १२९२० | ५९६ |
| दिल्ली | १४ | ४८ | ६२ | ४१ | ९३६४ | २५४८ | ११९१२ | २७६० |

आधार — India Yearbook : Manpower Profile Institute of Applied Manpower Research, New Delhi 2008.

अनुक्रमणिका

## राखीव जागांच्या धोरणाची सदोष अंमलबजावणी

भारतातील जातीव्यवस्थेमुळे अनुसूचित जाती-जमातींच्या लोकांना शेकडो वर्षे शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले. त्यांच्या बरोबरच आपण सध्या ज्यांना ओ.बी.सी. समजतो तो समाजाचा फार मोठा घटकही शिक्षण क्षेत्रात मागासलेला राहिला. भारतीय राज्य घटनेत त्यांचा उल्लेख "सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला सामाजिक घटक" असा करण्यात आला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात अनुसचित जाती-जमातीसाठी शिक्षण क्षेत्रात विशेष संधी देण्याच्या भूमिकेतून राखीव जागांच्या धोरणांचा अवलंब करण्यात आला आहे. त्यानुसार अनुसूचित जाती-जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्यात आल्या. खेदाची गोष्ट अशी की या राखीव जागांची नीट अंमलबजावणी होताना दिसत नाही. अलिकडे केंद्र सरकारने उच्च शिक्षणामध्ये अन्य मागासवर्गीयांसाठी २७ टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला. या धोरणाचा परिणाम म्हणून सर्वसामान्य प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या जागा कमी होऊ नये, म्हणून पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या पुढाकाराने २७ टक्के जागा वाढविण्यात आल्या. या धोरणाची सध्या राज्यात अंमलबजावणी सुरू आहे. सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून एकूणच राखीव जागांच्या धोरणाची प्रामाणिक व परिणामकारक अंमलबजावणी व्हायला हवी.

या सर्व पार्श्वभूमीवर ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये शिक्षण क्षेत्राला सर्वात जास्त महत्त्व देण्यात आले आहे. एकूण योजनेच्या सुमारे २० टक्के कर्च फक्त उच्च व तंत्र शिक्षणावर करण्यात येणार असून १० व्या पंचवार्षिक योजनेतील शिक्षणाशी तुलना करता ११ व्या पंचवार्षिक योजनेतील खर्च साडेचार पट अधिक असून उच्च शिक्षणावरील खर्च नऊ पट अधिक आहे. 'विस्तार, समानता आणि गुणवत्ता' या तीन महत्त्वाच्या उद्दिष्टांवर ११ व्या पंचवार्षिक योजनेतील उच्च व तांत्रिक शिक्षणाचा ढाचा तयार करण्यात आला आहे. उच्च व तांत्रिक शिक्षण क्षेत्रातील या सर्व कार्यक्रमाची योग्य ती अंमलबजावणी केल्यास समाजाच्या अधिक थरांपर्यंत उच्च व तांत्रिक शिक्षण घेऊन जाता येईल असा विश्वास वाटतो. महाराष्ट्र शासनाने या बाबतीत पुढाकार घ्यायला हवा.

तक्ता क्र. १ मध्ये उच्च व तांत्रिक शिक्षणात अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण दाखविले आहे. १९९१ मध्ये अशा विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण ८·२५ वरून ९·८५ टक्क्यांपर्यंत वाढले. परंतु तांत्रिक शिक्षणातील त्यांचे प्रमाण ५·७३ टक्क्यांवरून १·७२ टक्यांनी घसरले. सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून ही गोष्ट फार गंभीर आहे व संबंधितांनी याचा विचार करायला हवा. अशीच परिस्थिती हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि पंजाबमध्ये आहे. तर या उलट उत्तर प्रदेशमध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाचे प्रमाण ११·६१ टक्क्यांवरून १४·०८ टक्क्यांपर्यंत वाढले. परंतु तंत्रशिक्षणातील वाढ विस्मयजनक आहे. ती ४·८० टक्क्यांवरून २२ टक्क्यांपर्यंत वाढली. महाराष्ट्र शासनाने या संबंधी अधिक सजगतेने विचार करण्याची गरज आहे.

# इतिहास

# शासनाची इतिहास साधनसंपदा-गॅझेटिअर्स; काल आणि आज



**डॉ. के. के. चौधरी**

[कार्यकारी संपादक व सचिव, गॅझेटिअर विभाग (निवृत्त) महाराष्ट्र शासन]

डॉ. के. के. चौधरी यांनी राज्य शासनाच्या गॅझेटिअर विभागाचे कार्यकारी संपादक आणि सचिव म्हणून काम पाहिले आहे. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात ३६ गॅझेटिअरांसाठी इतिहास, समाजविज्ञान या विषयावर १०,००० छापील पानांचे मूळ व मौलिक योगदान दिले. त्यांनी १२,००० पृष्ठांचा संपादित मजकूर ३० ग्रंथांच्या रुपाने प्रकाशित केला. त्यांचे बृहन्मुंबई गॅझेटिअरचे तीन खंड आधुनिक मुंबईचा इतिहास, जळगाव, रायगड, वर्धा, कोल्हापूर व परभणी जिल्ह्यांचे गॅझेटिअर, महाराष्ट्राची भूमी व लोक, स्वातंत्र्यलढ्याविषयाचे तीन ग्रंथ प्रसिध्द आहेत. त्यांनी स्वतंत्र्यरीत्या लिहिलेले क्वीट इंडीया रिव्हॉल्यूशन, हिस्टरी ऑफ बॉम्बे, महाराष्ट्र अँड इंडियन फ्रीडम स्ट्रगल, झुंजार पुणे हे ग्रंथ मान्यता पावले आहेत. झुंजर पुणे : वसाहतवाद व सामाजिक विषमतेशी लढा या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार लाभला आहे. क्रांतिकारकांच्या इतिहासावर व संशोधन करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने त्यांना फेलोशिप दिली आहे.

---

पत्ता : ६०१, नीलसागर, बांद्रा रेक्लमेशन, बांद्रा (प.), मुंबई ४०० ०५०.
भ्रमणध्वनी : ९९६९४१२५३७

---

संस्कृतिकरणाच्या उषःकालापासून संस्कृती-संपर्कातून महाराष्ट्राने उत्तर, पूर्व व दक्षिणेतील लोकांचेही गुणविशेष आत्मसात करून वेगळा सांस्कृतिक आसमंत निर्माण केला. किंबहुना संस्कृती-संपर्काचे भारतातील सर्वोत्तम उदाहरण महाराष्ट्र हेच होय. अगदी ताम्रपाषाण युगापासून उत्तरेकडून दक्षिणपथाकडे संचार करण्याचे बहुतेक मार्ग याच भूमीतून जात असल्याने उत्तर-दक्षिण दरम्यानची विशेषतापूर्ण संयोग-भूमी महणजे महाराष्ट्र! म्हणूनच येथील समाजजीवन, सांस्कृतिक इथॉस, साहित्य व कलाविश्व तसेच इतिहासाला विशिष्ट स्वरूप लाभले. संस्कृत, प्राकृत, द्रविडिअन व मुंडरी या मूळ भाषा व नंतर आलेल्या पर्शियन, अरेबिक व उर्दू भाषिकांच्या येथील समाजाने संश्लेषण व संस्करण प्रक्रियेतून आपले विचारधन, साहित्य व कलाविश्व घडविले. स्वतंत्र अस्मिता उत्क्रांत केली. या संस्कृती संचिताचे मूल्यमापन येथील विचारधन, कलासंचित व इतिहासाच्या भानावरूनही करावे लागते. सामूहिक चेतना व भावविश्व घडविणाऱ्या सुधारणा व शिक्षणाचा एकूण परिणाम म्हणजे समाजाची संस्कृती. तिचे स्वरूप घडवण्यात सप्तकलांची भूमिका असतेच.

अनुक्रमणिका

महाराष्ट्राने बुद्धिवाद, तत्त्वज्ञान, समता अभियान, स्वातंत्र्यलढा, साहित्य, अभिजात कला आदी बाबींमध्ये चांगले योगदान दिले. हिंदवी स्वराज्य स्थापनेचा पहिला प्रयत्न झाला इथेच. स्वातंत्र्यासाठी लढलेल्या काँग्रेसला जन्म दिला न्या. रानडे, गणेश वासुदेव जोशी, दादाभाई नौरोजींनी. महात्मा गांधींनी आपले मुख्यालय मुंबई, साबरमती व सेवाग्रामला ठेवले ते उगीच नव्हे. शेवटचा स्वातंत्र्यलढा येथूनच लढला गेला.

महाराष्ट्र या नामाचा पहिला अधिकृत निर्देश इ.स.च्या चौथ्या-पाचव्या शतकापासून करण्यात येई. याचा अस्सल पुरावा. इ.स. ६३४ मधील दुसऱ्या पुलकेशी चालुक्य राजाच्या ऐहोळे येथील शिलालेखात मिळाला आहे. मात्र तत्पूर्वी म्हणजे इ.स.च्या पहिल्या शतकात देखील 'महाराष्ट्री' नामक मिश्र प्राकृत भाषा येथे प्रचलित होती. **गाथासत्तसई (गाथासप्तशति)** हा या भाषेतील पहिला काव्यग्रंथ इ.स. पहिले ते सहाव्या शतकादरम्यान रचला गेला. यात महाराष्ट्रातील जीवन, कला व संगीताचे वर्णन आहे. याचा प्रारंभ इ.स. ५० या वर्षी झाल्याचे दिसते. तेव्हापासून महाराष्ट्र हे नाव प्रचलित असावे. या प्रदेशाची सांस्कृतिक प्रतिमा सातवाहन काळातच (इ.स.पू. १८९ ते इ.स. २२५) निर्माण झालेली असावी. यानंतरच्या वाकाटकांच्या काळात (इ.स. २५०-५५०) महाराष्ट्राला सांस्कृतिक वैभव प्राप्त झाले. अजिंठा-गुरुवाडा येथील शिल्प व भित्तिचित्रांवरून याची प्रचिती येते. ऐतिहासिक महाराष्ट्राची व्याप्ती असीरगड-बऱ्हाणपुरापासून बेळगाव-विजापूर-धारवाड पर्यंत मानावी लागते. दख्खनच्या सुभ्याचे मुख्यालयच मुळी बऱ्हाणपूरला होते.

इंग्रजांनी लिहिलेल्या गॅझेटिअर ग्रंथांनी महाराष्ट्रातील बखर संस्कृतीतून इतिहास संस्कृतीत आणले हे खरेच. ज्यांच्या अभ्यासशिवाय मध्ययुगीन काळ व मराठा कालाचाही इतिहास पूर्ण होतच नाही, त्या पर्शियन, पोर्तुगीज, डच व इटालिअन भाषांमधील सुंदर ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर करून इंग्रजांनी मोठे कार्य करून ठेवलेले आहेत. पण तरीही सांगावेच लागते, की त्यांच्या गॅझेटिअरांमधून महाराष्ट्राचा वस्तुनिष्ठ असा राजकीय व सांस्कृतिक इतिहास चित्रित झालेला नाही. दिसते ते पूर्वग्रहदूषित, धूसर, संदिग्ध व तुच्छतापूर्ण चित्र. कदाचित त्यांना पर्याप्त आधार साहित्य मिळाले नसावे. अलीकडेच मिळालेले शिलालेख व ताम्रपट तेव्हा नव्हतेच. शिवाय मराठीतील लिखाण आय.सी.एस. मधील गॅझेटिअरकारांना समजणे शक्य नव्हते. पण सर्वात मोठे कारण, की वंशश्रेष्ठत्वाचा प्रचंड गर्व असलेल्या व भारताचे जेते असलेल्या इंग्रजांना येथील लोक अडाणी व बावळट, अप्रामाणिक व खोटारडे वाटत. शिवाय राजसत्तेबरोबरच येथे आर्थिक व सामाजिक शोषण करण्यासाठीच आलेल्या वसाहतवादी ब्रिटिशांचा दृष्टिकोन साम्राज्यवादी व वंशवादी वर्चस्वाचाच होता. यानुसार त्यांचे गॅझेटिअर 'कलोनिअल' दृष्टीकोनातूनच लिहिलेले आहेत.

शिक्षणाच्या प्रसाराबरोबर खूपच भौतिक व सामाजिक प्रगती १९४७ नंतर झालेली आहे. सर्व कला व सांस्कृतिक उपांगांचे नवे रूप दिसते आहे. महाराष्ट्राचा चेहरा बदलतो आहे. या भूमीला नवीन सांस्कृतिक भान आलेले आहे. आमची सांस्कृतिक अस्मिता सजग होताना दिसते. महाराष्ट्राचा सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा, समता अभियान व नवे भान प्रकट करण्यात नवीन गॅझेटिअर मालिका आणि विशेषतः आम्ही १९८६ पासून प्रकाशित केलेले ग्रंथ उचित योगदान देत आहेत. त्याशिवाय प्रचंड आधारसाहित्य व दस्तऐवजांचा समृद्ध खजिना असलेले महाराष्ट्र शासनाचेच अभिलेखागारदेखील इतिहास संशोधनासाठी आवश्यक अधिकृत कागदपत्र उपलब्ध करून मोठी कामगिरी करत आहेत.

अनुक्रमणिका

याशिवाय शासनाच्या पुरातत्व विभागाने महत्त्वाची उत्खनने करून ऐतिहासिक संदर्भसाहित्यात मोलाची भर घातलेली आहे.

जिल्हा गॅझेटिअरांव्यतिरिक्त राज्य पातळीवरील **महाराष्ट्र : भूमी व लोक** (१९९६) या अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथात आपली भूमी, लोक, प्रमुख जाती व जमाती, महाराष्ट्राचे सांस्कृतिक उप विभाग, सामाजिक संघटना व रूढी, धर्म-कल्पना इ. चा ऊहापोह केलेला आहे. या ग्रंथाची खास विशेषता म्हणजे महाराष्ट्रीय सांस्कृतिक आसमंताचे चित्रण करताना सुधारणात्मक प्रेरणांबरोबरच या भूमीने ललितकला, दृश्य व संयुक्त कला, संगीत कला व लोक कला अशा संस्कृतीचे स्वरूप घडविणाऱ्या कला विश्वात जे बहुमोल योगदान दिले त्याचे विवेचन यात आहे. कला व संस्कृतीचे परस्पर व आंतरिक संबंध, हिंदुस्तानी शास्त्रोक्त संगीताचा इसवीसनाच्या पहिल्या शतकापासूनचा कालक्रमानुसार इतिहास, नाट्यसंगीत व मराठी रंगभूमीचा इतिहास या ग्रंथात आहे. सांस्कृतिक इतिहासात अत्यंत मोलाचे स्थान असलेला हा संपूर्ण विषय ब्रिटिश गॅझेटिअरकारांनीच नव्हे तर १९८५-८६ पर्यंतच्या माझ्या अधिकाऱ्यांनीदेखील वर्ज्य मानला होता.

संगीत परप्रांतातून महाराष्ट्रात आलेले असले, तरी ही कला मोहरली, फुलली व विकसित झाली येथेच. संगीत व नाटक यांमधील जवळीक १८८० पासून येथेच निकटतम झाली. तेव्हापासूनच भारतात कोठेही तोड नसलेला नाट्यसंगीत हा जोमदार असा सांगीतिक प्रकार येथेच फुलला. मुघलकालीन लघुचित्र शैली येथे रुजली नाही. मात्र रंगचित्र, संगीत व शिल्प येथे बहरले. जवाहरलाल नेहरुंनी म्हटल्याप्रमाणे अजिंठा तर आपणास एका दूर स्वप्नवत, परंतु तरीही वास्तव जगतात घेऊन जाते. संगीत व नृत्य कला तेव्हा किती प्रगल्भ झालेल्या होत्या याचे दर्शन अजिंठा-वेरुळमध्ये घडते.

**ब्रिटिश गॅझेटिअरचे स्वरूप**

गॅझेटिअर म्हणजे सूक्ष्म पातळीवरील (मायक्रो लेव्हल) इतिहास! साधनसामग्रीचा समृद्ध ठेवा! विपुल आधारसाहित्य व अधिकृत दस्तऐवजांवर आधारित असलेला प्रादेशिक ज्ञानकोश! जिल्हा अथवा राज्याविषयी समाजविज्ञानाच्या दृष्टिकोनातून वस्तुनिष्ठ ऐतिहासिक विवेचन करणारा विश्वकोशसदृश ग्रंथ! यातील मजकुराशी शासन सहमत असेलच असे नव्हे. तरीदेखील गॅझेटिअर अधिकृत शासकीय दस्तऐवज असल्याचे मानले जाते. याचे कारण हा ग्रंथ एका शासकीय विभागाने प्रकाशित केला, इतकेच नव्हे, तर विपुल शासकीय दस्तऐवज, अभिलेख, गुप्तचर पोलिसांचे अभिलेख, शासन-नियुक्त अभ्यासगारांचे निष्कर्ष, सर्वेक्षण अहवाल, सांख्यिकी व गुणात्मकमाहिती इत्यादी आधारसाहित्यावर यातील मजकूर उभारलेला असतो, हे त्याचे कारण होय. लोकप्रतिनिधी किंवा राजकारण्यांचा या कामात हस्तक्षेप टाळण्यास्तव त्यांच्याशी संपर्क टाळण्याची पूर्वीपासून परंपरा होती. शक्यतो गॅझेटिअरकारांनी अलिप्तता पाळली. खरे तर सुमारे १९६३-६४ पर्यंत गॅझेटिअर कार्यालय पूर्णतया शासकीय विभाग नसून स्वायत्त निमशासकीय स्वरूपाचे होते. तथापि अधिकाऱ्यांच्या हितास्तव व काही विसंगती दूर करण्यासाठी याला शासकीय दर्जा देण्यात आला. येथे अभिमानाने सांगावेसे वाटते, की त्यानंतरही राजकीय हस्तक्षेपाचा गॅझेटिअरकारांना महाराष्ट्र या नवनिर्मित राज्यात त्रास झाला नाही.

गोपनीय शासकीय दस्तऐवज, विशेषतः पोलीस अहवाल व सरकारी निष्कर्ष गॅझेटिअर विभागाव्यतिरिक्त इतर अभ्यासकांना अप्राप्य असतात. जाणीवपूर्वक निर्णय घेऊनच केवळ वर्गीकृत केलेले

असेच कागदपत्र अभ्यासकांसाठी शासकीय अभिलेखागारांमध्ये ठेवले जातात. वर्गीकृत केलेले काही कागदपत्र पोलीस महासंचालक कार्यालयात शासनाच्या परवानगीनुसार अभ्यासकांना उपलब्ध होतात. तथापि स्वातंत्र्य आंदोलनाविषयीचे गुप्तचर पोलिसांचे व मुंबईच्या पोलीस आयुक्त कार्यालयातील खरेखुरे महत्त्वाचे कागद फक्त गॅझेटिअर विभागालाच उपलब्ध आहेत. हा संग्रह प्रचंड आहे आणि त्याचा उपयोग केल्याशिवाय ब्रिटिशांशी झालेल्या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास परिपूर्ण करणे शक्यच नाही. हे कागद पाहण्याची परवानगी सर्वप्रथम मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी माझे गुरू प्रा.न.र. फाटक यांच्या अधिकाराखालील 'कमिटी फॉर द सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मूव्हमेंट इन इंडिया' यांना दिली होती. त्यांनी कित्येक हजार कागद संकलित करून काही खंड प्रकाशित केले. पुढे ही संपूर्ण योजना गॅझेटिअर विभागाकडे हस्तांतरित झाल्यावर (१९७२-७३) हा अनमोल संग्रह आमच्याकडे आला. सांगायचा मुद्दा असा, की हे दस्ताऐवज व त्यात आम्ही घातलेली प्रचंड भर यामुळे १९८० च्या दशकापासून स्वातंत्र्यलढ्याचा अधिकृत इतिहास लिहिणे शक्य झाले.

इंग्रज लोक इतिहासप्रेमी खरेच. पण त्यांचे प्रेम त्यांच्याच इतिहासावर! भारताचा त्यांनी लिहिलेला इतिहास प्रेमापायी लिहिलेला नव्हेच. एकूण दृष्टिकोन इलायटिस्ट व भारत-विजेत्यांचा. मागील पाच दशकांमध्येही केंब्रिज-ऑक्सफर्ड इतिहास संप्रदायाच्या लेखकांनी इंग्रजांनी/वसाहतवादी शोषण, आर्थिक व सामाजिक खच्चीकरण, 'डिव्हाईड अॅन्ड रुल' नीती, कॉम्प्रेडोर आधारस्तंभांची नियोजित निर्मिती इत्यादी कूटनीतीचा इन्कार करून ब्रिटिश राजवटीला केवळ 'फॉरेन रुल' म्हटले. एक विचार मात्र मान्य करायलाच हवा, की इंग्रजांनी शिक्षित भारतीयांना इतिहासप्रेम शिकवले. मुघलांनी आपापला इतिहास चांगल्या पद्धतीने लिहून ठेवला. ही श्रेय नामावली नंतर देण्यात येईलच. पण तसा प्रयत्न हिंदू राज्यात झाला नव्हता. ज्याला 'सेन्स ऑफ हिस्टरी' किंवा 'इतिहासाचे भान' म्हणता येईल ते भारतीयांना नव्हते. म्हणूनच खूप महत्त्वाच्या घटना अथवा तारखांचा प्रचंड घोळ राहिला. जन्म-मृत्यूच्या तारखांचीही निश्चित नोंद नाही. मात्र भारतीयांना इतिहासाचे भान आणून दिले ते इंग्रजांच्या गॅझेटिअर ग्रंथांनी. त्यातून इतिहास संशोधनाला उत्तेजन मिळून सांस्कृतिक भान आले. सनातन्यांनी लिहिलेल्या पोथ्या व केवळ स्तुतिपर लिहिलेल्या पाल्हाळयुक्त बखरींचा पगडा दूर व्हायला मदत झाली. इंग्रजांचे गॅझेटिअर सत्यनिष्ठ व निःपक्षपाती आहेत असे अजिबात नव्हे. पण त्यामुळे बखर संस्कृतीच्या ठिकाणी गॅझेटिअर संस्कृती आली. परदेशी प्रवासी इतिहासकारांकडे लक्ष वेधून घेतले आद्य गॅझेटिअरकारांनीच.

गॅझेटिअर नामाची व्युत्पत्ती मनोरंजक आहे. एक लहान नाणे या अर्थाचा 'गझ्झेट्टा' शब्द मूळ इटालिअन भाषेतील. या नाण्यात मिळणाऱ्या वृत्तपत्रांना प्रथम इटलीमध्ये व लवकरच फ्रांसमध्ये गझ्झेट्टा (Gazzetta) म्हणण्याचा प्रघात पडला. फ्रेंच गझ्झेट्टा शब्दावरून इंग्रजीत 'गझेट' ही संज्ञा आली. कालांतराने गझेट यास सरकारी कामकाज, अधिघोषणा, खलिते इ. जाहीर करणारे अधिकृत वार्तापत्र असे स्वरूप आले. पुढे इंग्लंड, फ्रांस व नंतर भारतीय वर्तमानपत्रांच्या नावांमध्ये या शब्दाला स्थान लाभले. उदा. लंडन गॅझेट, बॉम्बे गॅझेट, कलकत्ता गॅझेट. बहुधा अठराव्या शतकाच्या अंतसमयी इंग्रजीत गॅझेटिअर हा विशिष्ट व स्वतंत्र अर्थ असलेला शब्द रूढ झाला. ऑक्सफर्ड वा चैंबर्सच्या शब्दकोशांमध्ये मूळ संकुचित अर्थ दिलेला आहे. मुळात हा शब्द असे संकलन करणाऱ्या लेखकासाठी वापरला जाई. परंतु या संकल्पनेचा अर्थ खूपच विस्तारला.

इंग्लंड-युरोपात रिनॅसन्स व औद्योगिक क्रांती यामुळे नवीन प्रकारचे साहित्य प्रसवू लागले. पण त्यापेक्षा मोठे कारण घडले या देशांनी स्थापन केलेल्या वसाहतींमुळे. आशिया, आफ्रिका व दक्षिण

अनुक्रमणिका

अमेरिकेत गोऱ्या लोकांनी वाणिज्यवृत्तीने वसाहती स्थापन केल्या व शोषण करण्यासाठी तेथील लोकांना, नैसर्गिक साधनसंपत्ती व अर्थ जीवनाची माहिती मिळवण्याची गरज वाटली. या वाणिज्यवादी गरजेतून गॅझेटिअरसारख्या कोशांची आवश्यकता वाटू लागली. भारतीय अर्थव्यवस्था व समाजकारण पूर्णतया ब्रिटिश अर्थव्यवस्थेच्या अधीन करून भारताला आपल्या हक्काचा 'पुरवठादार' बनवणे, तसेच आपल्या यंत्रनिर्मित मालासाठी हुकमी बाजारपेठ मिळवणे हे ब्रिटिश वसाहतवादाचे मूलभूत सूत्र होते. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धानंतर व कॅनडा तसेच ऑस्ट्रेलियामधील गोऱ्या वसाहती स्वायत्त झाल्यावर अशी 'अनुसेवी' (Subservient) भूमिका इंग्रजांनी भारतावर लादली. 'व्हाईट मॅन्स बर्डन' शिरावर घेतल्याची बतावणी करणारा इंग्रज मात्र मोठेच बर्डन होऊन बसला. असो.

या प्रकाराचा एक भाग म्हणून गॅझेटिअर साहित्य निर्माण होऊ लागले. कर्नल मॅकेंझी, लोगन, बाल्टर ॲमिल्टन, एडवर्ड थॅर्नटन इ. नी प्रारंभिक काम करून ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रदेशावर लेखन केले. १८२५ च्या सुमारास फ्रांसने 'मिलिटरी सर्व्हे ऑफ इजिप्त' हा एक चांगला ग्रंथ तयार केला. पण या सर्वांपेक्षा अधिक चांगला ग्रंथ १८१७ मध्ये जर्मन भूगोलज्ज्ञ जोहान्स जी.एच. हॅसल याने काढला. त्याचे शीर्षक : Geographish Statistisches Handworterbuch होते. हे फ्रेंच व जर्मन भाषेतील दोन ग्रंथ तसेच अबुल फझल लिखित **ऐन-इ-अकबरी** या त्रिखंडात्मक ग्रंथाचा उपयोग सर विल्यम हंटर याने आपले मॉडेल म्हणून केला. १६०४ च्या सुमारास लिहिलेल्या अबुल फझलच्या या तीन खंडांचे महानपण आजतागायत शाबूत आहे.

१८५७ च्या विद्रोहामुळे इंग्रज अत्यंत सावध झाले. तत्पूर्वी ब्रिटिश लोकमत भारताबद्दल अगदी उदासीन, अनिर्धारित व धूसर होते. पण विद्रोहात झालेल्या भयानक जीवितहानीने ते जागृत झाले. इकडे हितसंबंध गुंतलेल्या बलवान कंपन्या व नीळ आणि चहाचे मळेवाले आपले हितरक्षण करण्यासाठी आक्रमक झाले. एकूणच लोकमत जागृत होऊन, आपणच भारताचे मालक आहोत व ही मालकी अनंत काळ टिकविण्यासाठी कडक उपाययोजना करावी अशी जोरदार मागणी झाली. या विद्रोहामुळे हिंदुस्तानावरील आपले पाश आवळणे व जास्तीत जास्त राजकीय व आर्थिक शोषण करण्याची नीती दृढ होत गेली. शिवाय तेथील पार्लमेंटवर जबर प्रभाव ब्रिटिश कारखानदार व भांडवलदारांचाच. पार्लमेंटच्या आधी ही मंडळीच निर्णय घेत. पार्लमेंटमध्ये त्यावर औपचारिक निर्णय होई. प्रशासन अधिक परिणामकारक करण्याचा एक भाग म्हणून आय.सी.एस. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या युवकांच्या मार्गदर्शनार्थ गॅझेटिअर ग्रंथ तयार करण्याचा निर्णय झाला. गॅझेटिअर योजनेला संदर्भ होता १८५७ च्या विद्रोहाचा व शासन अधिक प्रभावी करण्याच्या निर्धाराचा. भारतावरील पकड घट्ट करण्यासाठी सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया म्हणजे भारतमंत्र्याच्या अधिपत्याखाली लंडनमध्ये इंडिया ऑफिस स्थापन करून आय.सी.एस. ची पोलादी चौकट निर्माण केली. याचाच एक भाग म्हणून भारतमंत्री लॉर्ड एस. नॉर्थकोटच्या ऑक्टोबर १८६७ च्या आदेशानुसार व्हाईसरॉयने गॅझेटिअर योजनेचे काम हिंदुस्थानचा सांख्यिकी महासंचालक विल्यम हंटर यावर सोपविले. या अत्यंत अभ्यासू अधिकाऱ्याने संपूर्ण देशासाठी इंपिरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया व प्रत्येक जिल्ह्यासाठी डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर बनविण्याची योजना आखली. हंटरपुढील प्रतिमानाचा (मॉडेल) उल्लेख वर आलेला आहेच.

विल्यम हंटरचे गॅझेटिअर विषयक कलोनिअल स्वरूपाचे संकलन व उद्दिष्ट त्याच्या शब्दांमध्ये सांगितलेले बरे :

अनुक्रमणिका

"My own conception of the work is that, in return for a couple of days reading, the Account should give a new Collector, a comprehensive and at the same time, a distinct idea of the district which he has been sent to administer. Mere reading can never supersede practical experience in the district administration. But a succint and well conceived district account is capable of antedating the acquisition of such personal experience by many months and of both experience by many months and of both facilitating and systematising a collector's personal enquiries.... But in all cases a District Account besides dealing with local specialities should furnish a historical narration of its revenue and expenditure since it passed under the British rule, of the sums which we have taken from it in taxes and of the amount which we have have returned to it in the protection of property and person and the other charges of Civil government."

इंग्रजांचे वाणिज्यवादी कलोनिअल धोरण व प्रशासकीय नीती या अवतरणावरूनही दिसून येते. सत्य हेच होते, की ग्रेट ब्रिटनमधील तेवीस वर्षांचे पदवीधर आय.सी.एस. परीक्षा पास झाल्यावर अगदी अज्ञात अशा हिंदुस्तानचे प्रशासन, कणखर नियमन व आर्थिक शोषण करण्यास्तव पाठवण्यात येत. या उपखंडावर कडवी हुकमत चालवून मातृदेशाच्या विपुल पोषणासाठी भारतीय साधनसंपत्ती हस्तगत करणे व हक्काची बाजारपेठ कायम करणे ही वसाहतवादी नीती होती. तिच्या साधनार्थ या युवकांना मार्गदर्शनपर साहित्याची गरज होती. यासाठी गॅझेटिअर निर्माण केले होते. पुढे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झनने ही कल्पना विशद करताना सनदी अधिकाऱ्यांच्या बैठकीत सांगितले, की "प्रत्येक मुलकी अथवा न्यायीक अधिकाऱ्याने आपापला कार्यभार स्वीकारताच गॅझेटिअरचा अभ्यास करणे अगत्याचे होय. ज्या प्रदेशावर वा प्रजेवर आपण इंग्रजांनी राज्य करावयाचे, त्यांचे ज्ञान असणे आवश्यक." कर्झनने या ग्रंथाच्या निर्मितीत स्वतः लक्ष घातले हे विशेष.

सरकारी पातळीवरील अगदी पहिलेच गॅझेटिअर काढण्याचा पहिला मान पटकावला वऱ्हाड व मध्यप्रांताचा चीफ कमिशनर रिचर्ड टेंपल याने (त्या काळी लहान प्रांताच्या गव्हर्नरला चीफ कमिशनर हे पदनाम होते). इंडिया ऑफिसमधील या विषयावरील विचारमंथनाची आधीच कल्पना आल्यावर रिचर्डने १८६६ मध्येच गॅझेटिअरसाठी पुढाकार घेतला व आय.सी.एस. अधिकारी सर आल्फ्रेड सी.ल्याल यास कामाला लावून वऱ्हाड प्रांतासाठी एक ग्रंथ करून घेतला. १८७० मध्ये ल्याल साहेबाने प्रसिद्ध केलेल्या या ग्रंथाचे शीर्षक होते. 'गॅझेटिअर फॉर द हैदराबाद असाइन्ड डिस्ट्रिक्ट्स' निजामाच्या ताब्यातील बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ जिल्हे व परभणी, हिंगोली व रायचूर दोआबचा काही भाग १८५३ च्या अनुबंध करारानुसार इंग्रजांनी अभ्यर्पित करून घेतला होता. त्यासाठी हे नाव होते. पूर्व विदर्भ व मध्य प्रांतासाठीही रिचर्ड टेंपलने १८७१ मध्ये 'सेंट्रल प्रॉव्हिन्सेस गॅझेटिअर' करवून घेतले. देशातील हे पहिले दोन.

हंटर याने ब्रिटिश इंडियासाठी १८८१ मध्ये नऊ व १८८२ मध्ये एका पूरक ग्रंथाद्वारे इंपिरिअल गॅझेटिअरची पहिली आवृत्ती काढल्यावर त्यातील त्रुटी दिसून आल्या. म्हणून दुसऱ्या आवृत्तीचे चौदा ग्रंथ १८८५-१८८७ दरम्यान प्रसिद्ध केले. पुढे लॉर्ड कर्झनने त्यात सुधारणा सुचवून तिसरी आवृत्ती काढायला लावली. १९०७-१९०९ दरम्यान काढलेल्या या मालिकेत हंटरच्याच 'द इंडिअन एम्पायर' चे चार सुधारित ग्रंथ व अल्फाबेटिकल मालिकेतील वीस नवीन ग्रंथ व सूचीचे दोन ग्रंथ समाविष्ट होते.

अनुक्रमणिका

इकडे मुंबई इलाख्यात विविध प्रयोगांनंतर या कामासाठी आय.सी.एस. अधिकारी जेम्स एम. कॅंबेलची निवड केल्यावर १८७४ मध्ये काम सुरू झाले. कॅंबेल काय आणि हंटर काय हे सर्वच कट्टर साम्राज्यवादी, वंशवर्चस्ववादी व इलायटिस्ट त्यांना जोड मिळाली गव्हर्नरपदी आलेल्या रिचर्ड टेंपलची (१८७७-१८८०). पश्चिम भारत व खास करून पुण्याच्या ब्राह्मणांमध्ये खदखदणारा इंग्रज-विरोध व राजकीय महत्त्वाकांक्षा यांचे समर्पक निदान केलेल्या टेंपलने ब्रिटिश श्रेष्ठींना वेळोवेळी सावध केले होते. वासुदेव बळवंत फडकेंचा क्रांतिकारी झंझावात यानेच विझवला. अंतरंगात मवाळ नसलेल्या न्या.म.गो. रानडेंची कोंडी यानेच केली. रानडेंमागे ससेमिरा लावणारा हाच. टिळकांकडे कडव्या नजरेने पाहण्याची परंपरा निर्माण करणाराही हाच टेंपल! १८८० मध्ये मायदेशी परतलेले टेंपल व लॉर्ड लीटन भारतविषयक धोरणांवर प्रभाव पाडत राहिले. विसाव्या शतकातील केंब्रिज इतिहास संप्रदायाच्या काही लेखकांना हा रिचर्ड टेंपल आपला पितामह वाटू लागला. (डॉ.के.के. चौधरी, झुंजार पुणे, पुणे २००८, पृ. ११३-१४, ११७) मुद्दा असा, की कॅंबलच्या गॅझेटिअरांवर अशा गव्हर्नरची छाप पडणे अगदी स्वाभाविकच होते.

भारतीय समाजाचे धर्मीय व जातीय विभाजन करणे, ब्राह्मणेतर समाजाला सांस्कृतिकरण करण्यास उत्तेजन देणे तसेच 'डिव्हाइड ॲन्ड रुल' या कूटनीतीचा अंगीकार करूनच आपले साम्राज्य टिकवता येईल अशी या मुत्सद्दी मंडळींची धारणा बनली. तिचे प्रतिबिंब त्यांच्या गॅझेटिअरांमध्ये दिसते.

कॅंबेल निर्मित मालिकेमध्ये प्रत्येक जिल्ह्यासाठी एक एक तर, पुणे व ठाणेसाठी प्रत्येकी तीन गॅझेटिअर ग्रंथ होते. सर्व कन्नड जिल्ह्यांसाठी बहुधा दोन ग्रंथ असावेत. सुरत व भडोचसाठी एकच तसेच पंचमहाल व खेडा या जिल्ह्यांसाठीसुद्धा एकच संयुक्त ग्रंथ होता. मुंबई शहर व बेट यावर एस.एम. एडवर्ड्स याने नंतर तीन खंड काढले. प्रांतिक गॅझेटिअर मालिकेतील एका ग्रंथात गुजरातचा इतिहास, तर दुसऱ्यामध्ये दख्खन कोकण व कन्नड प्रदेशाचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास देण्यात आला होता. गुजरातवर भगवानलाल इंद्रजी व ए.एम.टी. जॅक्शन यांनी, तर दख्खन, कोकण व कन्नड भागांवर अलेक्झांडर नैर्न, आर.जी. भांडारकर व जे.ए.फ्लीट यांनी लेखन केले होते. तत्कालीन अनेक मर्यादा लक्षात घेता हे लेखन चांगलेच मानले जाई. या लेखकांपैकी एक असलेल्या जॅक्सनचा १९०९ मध्ये नाशिक येथे सावरकरभक्त अनंत कान्हेरे यांनी खून केला. मात्र हा जॅक्सन प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीचा प्रेमी होता. इंग्रजांनी गुजरातमधील हिंदू, पार्शी व मुसलमान समाजावर ग्रंथ काढला. परंतु महाराष्ट्रासाठी नव्हे.

संस्कृत, पाली व मराठी भाषांचे अज्ञान ही या लेखकांची मोठी अडचण होतीच. परंतु त्यापेक्षा आधारसाहित्याचा अभाव खूपच. बहुतांश प्राचीन लेखन व कोरीव अभिलेख तोपावेतो उपलब्ध झालेले नव्हते. तरीही कॅंबेलने अशा परिस्थितीत चांगली कामगिरी करून ठेवली. कर्नल ब्रिग्ज, इलिअट, डॉवसन सारख्या इंग्रजांनी मध्ययुगीन मूळ पर्शियन व अरेबियन ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर करून मोलाची कामगिरी करून ठेवली. युरोपिअन ग्रंथांचा अनुवाद करून ठेवल्यामुळे आमचे काम सुकर करून ठेवले. जेम्स फर्ग्युसन, जेम्स बर्जेस, जॉन विल्सन, विल्यम जोन्स सारख्या अनेकांनी मोठे काम करून ठेवले. फर्ग्युसन व बर्जेसचे लेण्या व पुरावशेषांचे वर्णन आजही मोलाचे आहे. अर्थात मागील पाच-सहा दशकांमध्ये उपलब्ध झालेल्या ज्ञानातून शिल्प व रंगचित्रणाचा अर्थाविष्कार बदलावा लागला. महसूल आयुक्तापासून संपूर्ण जिल्हा यंत्रणा, कृषी, वन कार्यालये, अभियंते, नगरपालिका इ. ना इंग्रजांनी गॅझेटिअर कामासाठी जुंपले होते. आय.सी.एस. संवर्गातील कलेक्टर, न्यायाधीश व लष्करी अधिकाऱ्यांनी बहुतांश लेखन केलेले दिसते. पं. भगवानलाल इंद्रजी व पं. हिरालाल यांसारखे अभ्यासक अनुक्रमे मुंबई इलाखा व मध्यप्रांतातील

गॅझेटिअर आस्थापनेत नोकरीला होते. बऱ्याच ब्रिटिशनिष्ठ रावबहादुर मंडळींनी गॅझेटिअरच्या कामास मदत केली होती. १९५० पासूनच्या गॅझेटिअर कार्यालायला सरकारी यंत्रणेची मदत ब्रिटिश काळाइतकी मिळू शकली नाही हे मात्र खरे. आताच्या यंत्रणेपुढे अधिक महत्त्वाच्या कामंना प्राधान्यक्रम हे त्याचे कारण, ब्रिटिशांनी महसूल-प्राप्ती, कायदा आणि सुव्यवस्थेला सदैव प्राधान्यक्रम दिल्यामुळे त्यांनी महसूल प्रशासनाचा इतिहास चांगला लिहिला हे मान्य करावेच लागेल. मात्र त्यातही मराठी व मुघल प्रशासनातील दोषांचे भडक चित्र रंगवून आपल्या प्रशासनाने प्रजेवर केलेले घोर अन्याय व पिळवणूक लपवून ठेवलेली दिसते.

मुंबई इलाख्यातील गॅझेटिअर मालिकेची सांगता मुंबई शहर व बेट याविषयावरील काही खंडांनी व्हावयाची होती. त्यासाठी जेम्स कॅंबेलने प्रचंड आधारसाहित्य गोळा केले होते. ज्यासाठी आपण बहुतांश हयात खर्च केली त्याची सांगता आपणच करावी असे वाटणे स्वाभाविकच होते. तथापि त्याच्या यशामुळे छुपे शत्रू निर्माण झाले असावेत. काही नोकरशहांनी त्याविरुद्ध विषपेरणी केली असावी. अशा स्थितीत भारतातून मिळणारा आर्थिक नफा घटल्याचे कारण पुढे करून कॅंबेलच्या महत्त्वाकांक्षी योजनेला लगाम घालावा हा विचार प्रबळ झाला. तीन खंडांच्या छपाई इतकाच खर्च करणे शक्य असल्याचे सांगण्यात आले. आर्थिक चणचण हे कारण सांगून कॅंबेलला मायदेशी परत पाठवण्यात आले. लॉर्ड लॅमिंटन गव्हर्नर असताना थंडावलेले हे काम एस.एम.एडवर्ड्सकडे सोपवण्यात आले (१९०६). या नोकरशहाने **राईज ऑफ बॉम्बे** हा ग्रंथ त्यापूर्वीच लिहिला होता. म्हणून त्याची ही नेमणूक योग्य होती. आधीच संकलित केलेल्या आधारसाहित्यातून निवड करून कमी सविस्तर व संक्षिप्त असा मजकूर देण्याचा एडवर्डसला मध्यवर्ती सरकारचा आदेश होता. या मर्यादांच्या परिसीमेत राहून त्याने **बॉम्बे गॅझेटिअर** तीन खंडांमध्ये १९०९-१९१० मध्ये प्रसिद्ध केले. मूळ आधार साहित्य नष्ट न करता बांधणी करून शासनाच्या पुराभिलेखागारात तीन खंडांच जतन करण्यात आलेले आहे. जरी कॅंबेलकडून हे काम काढून घेतले तरी त्याच्या कामाचा गुणगौरव म्हणून सर विल्यम हंटरप्रमाणेच त्याला ‘सर’ हा किताब नंतर बहाल करण्यात आला.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी गॅझेटिअर-निर्मितीत देशात दोन परंपरा निर्माण झाल्या- ‘कॅंबेलिअन ट्रॅडिशन’ व ‘बेंगाल ट्रॅडिशन’ बंगाल परंपरेतील सर्वच पुस्तके संक्षिप्त व त्रोटक आणि म्हणून फारच कमी माहिती असलेली आहेत. अर्थात अभ्यासकांना त्यांची उपयुक्तताही कमीच. विदर्भातील सर्वच जुने गॅझेटिअर बंगाल परंपरेतीलच आहेत. येथे अभिमानाने सांगावेसे वाटते, की स्वातंत्र्यानंतर केंद्र सरकारच्या गॅझेटिअर विभागाचे आकृतिबंधविषयक सूत्र पूर्णतया अमान्य करून आम्ही १९५६ पासूनच ‘कॅंबेलिअन’ परंपरेचा स्वीकार केलेला आहे.

भूतपूर्व निजामाच्या शासनाने फक्त औरंगाबाद जिल्ह्यासाठी गॅझेटिअर काढले होते (१८८४). इतर जिल्ह्यांसाठी नव्हे. औरंगाबादवरील हा ग्रंथ कॅंबेलशी विचारविनिमय करून काढला असावा असे त्याचे स्वरूप पाहता दिसते.

तत्कालीन ज्ञानाच्या मर्यादा पाहता कॅंबेलच्या गॅझेटिअरांमध्ये डोंगर, स्वाभाविक विभाग, नद्या, तापमान, मान्सूनचा लहरीपणा इत्यादीचे कथन छानच आहे. तथापि भूगर्भाचे संशोधन झालेले नसल्याने भूशास्त्रीय संपत्ती व खजिनसंपत्तीचे विवेचन अगदीच तोकडे वाटते. वनसंपदेची वर्णने वाचल्यावर इंग्रजी राजवटीच्या प्रारंभीच्या काळात येथे किती वनसंपदा होती त्याची कल्पना येते. पण एकोणिसाव्या

अनुक्रमणिका

शतकाच्या मध्यान्ह समयी संपदेचे संवर्धन करण्याची आवश्यकता नसल्याने पुणे गॅझेटिअर लेखकाचे मत चुकीचेच होते. वनसंवर्धनापेक्षा अधिकाधिक वनक्षेत्र शेतीखाली आणावे असे इंग्रजांचे धोरण होते एकूणच वनधोरण भारताला अहितकारक होते. वनसंपत्तीपासून नफा मिळावा व वनप्रशासनावरील खर्च कमीत कमी असावा असे वाणिज्यवादी धोरण होते. याचे दुष्परिणाम ब्रिटिश राजवटीतच दिसून आलेले होते. बेसुमार जंगलतोड झाली म्हणून डॉ. गिब्सन सारख्या वनप्रेमी वनशास्त्रज्ञाने काही उपाय सुचविले होते. पुढे वन महसूल वाढवण्यासाठी इंग्रज सरकारने जंगलांजवळील लोकांना गवत कापण्यास व गुरे चारण्यास मज्ज्ञाव करून जबर शुल्क आकारण्याची पद्धती सुरू केली. जंगलांवरील जाचक करांचे ओझे हलके करण्यासाठी महात्मा गांधींना जंगल सत्याग्रह करावा लागला. १८७८ च्या जंगल कायद्याने शेतकरी व गुरांच्या मालकांवर खूप अन्याय केलेला होता. दुर्दैवाची गोष्ट ही, की फक्त सरकारनिष्ठ कंत्राटदारांनाच जंगलतोड करण्याचे परवाने देण्यात येत. जुन्या गॅझेटिअरांमध्ये वाघ वगैरे वन्यप्राणी, पक्षी, साप आणि मासे विपुल प्रमाणात असल्याचे नमूद आहे. याविषयीची वर्णने चांगली मनोरंजक आहेत हेही खरे. मात्र शिकारीच्या अनिवार हौशीमुळे ब्रिटिश अधिकारी, संस्थानिक व सरंजामदारांनी येथील बरीच प्राणिसृष्टी नष्ट केली. पुण्यापासून थोड्याच अंतरावर बरीच अस्वले व बिबटे मारल्याची शेखी जनरल डेव्हिसन याने मारल्याचे नमूद आहे (१८५५).

पुणे जिल्ह्यातील जातीजमातींची माहिति खूप विस्ताराने दिलेली असून खरोखरी अत्यंत मनोरंजक आहे. यातील काही माहिती के. रघुनाथजी, म.मो.कुंटे सारख्यांनी पुरविली असून रावबहादुर गोपाळ हरी देशमुखांनी मान्य केल्याचे नमूद आहे. प्रा. केरू लक्ष्मण छत्रे, सयीद दाऊद, अब्दुल कासंद, रावसाहेब नरसो रामचंद्र सारख्यांनी देखील काही माहिति दिलेली दिसते. जातीजमातीसाठी ४४० पाने तर नुसत्या ब्राह्मणासांठी ८७ पाने खर्च करण्यात आलेली आहेत. ही माहीती खरेच मनोरंजक आहे. यासाठी पुष्कळ परिश्रमही घेतलेले आहेत. कात्यायनीचा वारसा सांगणारे १७८ कायस्थ ब्राह्मण पुण्यात असल्याचे वाचून गंमतच वाटली. केवळ १५०० लोकसंख्या असलेल्या ध्रुव, वेल्हाळी, कायस्थ व पाठारे प्रभू या पोटशाखांसाठी ७६ पाने खर्च केल्याचा अचंबा वाटला. पण बहुतांश जातींच्या पोटशाखांमधील उच्चनीच भाव व अंतर्कलहांचे विवेचन करून त्यात रंग भरण्याची काय गरज होती? इंग्रज सत्ताधीशांना विरोध करण्याची क्षमताच नसलेल्या प्रजाजनांमधील कलह, तणाव व अनिष्ट प्रथांचे प्रदर्शन करणे हा त्यांचा हेतू असावा. १९५० नंतर तसे लिहिणे अशक्य झाले.

तीन खंडांमध्ये १८८५ मध्ये प्रकाशित झालेले पूना गॅझेटिअर नमुना म्हणून पाहा. वस्तुतः महात्मा जोतीबा फुले व न्या.म.गो. रानडे यांचे सामाजिक क्रांतीसारखे कार्य इंग्रजांच्या विरोधात नव्हते. सरकारशी त्यांचे संबंध शत्रुत्वाचे नव्हते. पण या महत्त्वाच्या कार्याचा साधा नामोल्लेखही त्यात नाही. फुलेंच्या शाळा व समाजप्रबोधनाची अजिबात नोंद नाही. न्यू. इंग्लिश स्कूल या आघाडीच्या शाळेचे संस्थापक (१८८०) एकटे विष्णु कृष्ण चिपळूणकर नसून पुण्यातील बरेच महनीय असल्याचे कलेक्टरला माहीत नव्हते काय? अखिल भारतात नामवंत ठरलेली डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेजच्या १८८४ मधील स्थापनेबाबत नाव फक्त गव्हर्नरचे? खऱ्या संस्थापकांची नावे गॅझेटिअरात नाहीत. हुजूरपागेसाठी विल्यम वेडरबर्न यांनी उत्तेजन दिले हे खरे. पण भारतात तेव्हा तोड नसलेल्या या कन्या शिक्षण संस्थेचे अध्वर्यु न्या. रानडे, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई डोंगरे अथवा गोपाळराव आगरकर यांना अनुल्लेखाने मारण्याचे कारण काय? डेक्कन कॉलेजबाबतीत इंग्रजांनी केलेली धरसोड त्यांच्या शिक्षणप्रेमाचे निर्देशक नाही. शेवटच्या पेशव्याने दक्षिणा फंडाचा केलेला दुरुपयोग अयोग्य होता. परंतु इंग्रजांनी त्याचा सदुपयोग कोठे केला?

अनुक्रमणिका

१८७० पासून मोठे विधायक देशकार्य करणाऱ्या पुणे सार्वजनिक सभेचे जनक व अध्वर्यु गणेश वासुदेव जोशी (सार्वजनिक काका) व रानडे होते! त्यांना अनुल्लेखाने मारण्याचे कारण काय? त्यांच्याऐवजी उल्लेख मात्र औंधच्या पंत प्रतिनिधींचाच. ते तेव्हा इंग्रजांचे आधारस्तंभ असलेल्यांपैकी होते म्हणून ना? गोपाळ हरी देशमुखांचे नाव केवळ पूना नेटिव ग्रंथालयाचे एक सभासद म्हणून! 'केसरी', 'मराठा', वर्तमानपत्रांची नोंद घेतली. पण त्यांचे महनीय संपादक व कार्य याची नोंदच नाही.

सर्वाधिकारी इंग्रजांना कुणाच्याही जातीय भावना अथवा रागलोभ जपण्याची आजच्यासारखी गरज नव्हती. यामुळे ते निर्भयपणे व मनाप्रमाणे लिहू शकले. मागील अर्धशतकात लोकक्षोभ व राजकीय हस्तक्षेप याचे आम्हाला भय निर्माण झाले. तरीदेखील अभ्यासकांना चेतावणी देणे आवश्यक वाटते, की इंग्रजांवर वांशिक श्रेष्ठत्वाचा जबर प्रभाव होताच. पूर्वग्रहदूषितपणा होता. येथील लोक निर्बुद्ध, अंधश्रद्धाळू, व्यसनाधीन, चोर, लुटारू विश्वासास अपात्र असल्याचे ठिकठिकाणी जुन्या गॅझेटिअरांमध्ये नमूद केलेले दिसते. असे अप्रतिष्ठाकारक मतप्रदर्शन नव्या गॅझेटिअरमध्ये पूर्णपणे वगळण्यात आले. लोकांच्या काही गटांना इंग्रजांनी व्यभिचारी, गुन्हेगारी प्रवृत्तीचे, दारुडे, भ्रष्टाचारी अशी दूषणे लावलेली दिसतात. अशी सरसकट विधाने विकृत वा विपर्यस्त आहेत. इंग्रजांनी फक्त लोकांचे बाह्यरंग पाहिले असे दिसते. या परकीय मंडळींना भारतीय सामाजातील गुंतागुंत व बहुत्व स्वरूप समजणे शक्य नव्हते. तरीही भारतीयांचे आर्थिक व सामाजिक विमोचन करण्यासाठी आणि 'व्हाईट मॅन्स बर्डन' वाहण्यासाठी आम्ही इंग्रज येथे अवतरलो असा आभास काही गॅझेटिअरांमधून त्यांनी निर्माण केला. विशाल मानवतावादी भूमिकेतून सांस्कृतिक उन्नयन शिरावर घेतल्याचा बहाणा केला. पण त्यांनी केले ते अत्यल्प. भारतीय समाजसुधारकांनी सातत्याने मागणी केल्यावर सतीबंदीचा कायदा, पुनर्विवाहाचा १८५६ मधील कायदा, १८९१ चा संमतिवयाचा कायदा, १८७९ चा कर्जदारांना संरक्षण कायदा इत्यादी पास केलेत. परंतु त्यांची अंमलबजावणी कोठे व किती केली? हे कायदे कागदावरच राहिले.

इंग्रजांनी त्यांच्या यंत्रणेला 'लेव्हलिंग सिस्टम' म्हटल्याचे काही ग्रंथांमध्ये तसे नमूद करून ठेवले. पण या यंत्रणेला आर्थिक वा सामाजिक 'समतलन' साधणारी यंत्रणा असे संबोधणे म्हणजे दांभिक आत्मप्रौढी म्हणावी लागते. वस्तुतः बहुतांश जुनी सरंजामशाही थोड्या बदलाने त्यांनी चालू ठेवली. प्रस्थापित मंडळींना सोयीप्रमाणे सवलती दिल्या. थकबाकीदार शेतकऱ्यांची घरेदारे 'संक्षिप्त न्याय' पद्धतीने विकण्यात येत. अनिश्चित काळ कारावास भोगावा लागे. फ्रेंच इतिहासकार जॅकमोंट याने पुण्याप्रमाणेच इतरत्र समक्ष निरीक्षण करूनच म्हटले होते, की सावकारांना लाभलेल्या सरकारी संरक्षणामुळे शेतकरी इतका नाडला जातो, की त्याची कशावरही मालकी असण्यापेक्षा तो कायमचा देणेदार असतो. १८३२ मधील जॅकमोंटचा हा अभिप्राय सरदार वल्लभभाई पटेलांच्या बार्डोली सत्याग्रहापर्यंत लागू पडण्याजोगा होता. (१९२८).

इंग्रजांनी शिवाजी महाराजांचा तर शत्रूसारखा समाचार घेतलेला दिसतो. त्यांच्या बाजूने लढलेल्या महादेव कोळी व रामोशांविषयी असत्य कथन करण्याचे काय कारण? पिलाजी जाधवरावाने स्वतःच्या तलवारीने असंख्य रामोशांना कापून टाकले व त्याचा भाऊ संभाजी जाधव याला दररोज पाच रामोशी कापून काढण्याचा अधिकार पहिल्या बाजीरावाने (१७२०-१७४०) दिला असे इंग्रज अधिकाऱ्याला कोणी सांगितले? पानिपतच्या लढाईत शेकडो वीर धारातीर्थी पडले. या पराभवाचे भयानक परिणाम झालेत. तरीदेखील पुणे गॅझेटिअरमध्ये केवळ पाच वाक्यांत पानिपत आटोपले.

अनुक्रमणिका

क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके व उमाजी नाईक हे इंग्रजांचे शत्रू हे खरे. पण म्हणून त्यांची नोंद प्रिडेटरी (Predatory) ट्राईबमध्ये? वस्तुतः उमाजींचा बंदोबस्त करणाऱ्या दुसऱ्या इंग्रजाला शिवाजीची आठवण झाली. तरीही दोघांना बेमुर्वत गुन्हेगार ठरविले आहे. माझ्या संशोधनातून दिसून आले, की वासुदेव बळवंतांची विद्वत्तापूर्ण भाषणे पुणे सार्वजनिक सभेच्या कार्याने घडविली गेली रानडेंच्या प्रबोधनातून. फडकेंच्या साथीदारांचे (कोळी, रामोशी, कुणबी) मुख्य गाऱ्हाणे होते ते त्यांच्या जमिनीपासून त्यांना वंचित करण्याचे. फडकेंच्या विद्रोहामुळे पुणे शहरात बरेच आठवडे रात्रीची संचारबंदी होती. उमाजी व वासुदेवरावांच्या विद्रोहाला मी 'सबाल्टर्न लढा' म्हणतो ते अनेक कारणांस्तव (कित्ता, पृ. ४१-४३, ११०-१४)

इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या स्थापनेची, १८८० पासूनची प्रक्रिया व्हाइसरॉय लॉर्ड डफरिन व रिपन यांना माहिती होती. तरीदेखील इंग्रजांच्या कोणत्याही गॅझेटिअरमध्ये कॉंग्रेसचा साधा उल्लेखही नाही. मात्र याबाबतच्या संशोधनातून आम्हास आढळलेली कॉंग्रेस स्थापनेची वस्तुस्थिती येथे कथन कराविशी वाटते. कायदा अथवा आय.सी.एस.च्या अभ्यासाठी लंडनला गेलेल्या कोलकाता-मुंबईच्या युवकांना राष्ट्रीयत्वाची कल्पना सुचली. त्यांच्यापैकी जे आय.सी.एस. मध्ये निवडले गेले नाहीत, त्यांनी परत आल्यावर गणेश वासुदेव जोशी, रानडे, फिरोजशहा मेहता, के.टी.तेलंग, द्वारकानाथ गांगुली, जी. सुब्रमणीया अय्यर, वीर राघवाचारी, आनंद चालू यांच्याशी चर्चा केली त्यातून एक 'न्युक्लिअस' म्हणजे केंद्रक उभारण्याची कल्पना प्रथम जोशींनी मांडली. यास रानडेंनी आकार देऊन चालना दिली. यावर जानेवारी १८७७ मधील "दिल्ली दरबार" प्रसंगी बराच खल झाला. रानडेंनी तयार केलेली 'चार्टर ऑफ डिमांड्स' जोशींनी व्हाइसरॉयला सादर केली. तेथून जोशी वगैरे कोलकात्याला गेले. त्यातून हा विचार रुजला. पुढे डिसेंबर १८८३ मध्ये महाराष्ट्र, बंगाल व मद्रासच्या नेत्यांनी कोलकात्यात कॉंग्रेसचे बी पेरले व १८८४ च्या मद्रास बैठकीत स्थापनेचा निर्धार झाला. मात्र डिसेंबर १८८५ मध्ये कॉंग्रेसचा जन्म झाला. या प्रक्रियेत ए.ओ.ह्यूम यांची भूमिका मोठी असली, तरी त्यांना कॉंग्रेसच्या जनक म्हणणे साफ चुकीचे होय. (कित्ता पृ. १२८-३०)

इंग्रजांच्या विरोधामुळे कॉंग्रेसचा गॅझेटिअरमध्ये उल्लेख नसावा. याच कारणामुळे गणेश जोशी, रानडे, टिळकांना त्यात स्थान मिळाले नसावे. या उलट देणगीदार, राजनिष्ठ सरंजामदार व किरकोळ अँग्लो-इंडियन पोलिसांची मर्दुमकी या ग्रंथामध्ये नमूद आहे.

समाजात समतोल व समन्वय घडविण्याऐवजी इंग्रजांनी विभाजनावरच भर दिलेला दिसतो. कायद्याचे अधिराज्य व सुरक्षितता आणली. पण पुनरुज्जीवनवादी व सनातनी प्रवृत्ती जोपासल्या. भारतीय समाजाचे दडलेले अंतःसामर्थ्य त्यांनी ओळखले. पण गळचेपीचे धोरण अंगीकारले. सरकारने आपल्या दायित्वाचा विचार केला नाही. रेल्वे बांधली भांडवलदार कंपन्यांनी. सरकारचा त्यात अत्यल्प सहभाग. उलट सर्व रेल्वे कंपन्यांवर निश्चित दराने नफ्याची हमी व जबर दराने गुंतवणुकीवरील व्याज भारतीय पैशातून दिले. म्हणूनच १८८१ मध्ये कार्ल मार्क्सने म्हटले होते, की रेल्वे हे भारतीयांवर एक ओझे आहे. शिक्षण, धरणे व जलसिंचनावरील खर्चापेक्षा इंग्रज सरकारने कसा नक्त नफा मिळवला हे त्यांच्याच पुणे गॅझेटिअरमधून पहायला मिळते. ज्यांना आम्ही क्रांतिकारक म्हणतो त्यांना इंग्रजांनी गुन्हेगार, डाकू, खुनी, प्रिडेटर अशी विशेषणे लावालेली आहेत.

अनुक्रमणिका

वरील कथन करण्यात जुन्या गॅझेटिअरांतील दोष दाखवण्याचा हेतू नाही. त्यांचे अवमूल्यन करण्याचा विचारही नाही. प्रामाणिक प्रयत्न हा आहे की, अभ्यासकांनी त्यातील सर्व माहिती गृहीत न धरता सावधानपणे त्याचा उपयोग करावा. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आम्ही काढलेल्या नवीन आवृत्ती व अस्सल साधनसामग्रीच्या आधारे संशोधन करावे. अलीकडे खूप साधनसामग्री उपलब्ध आहे. जुन्या गॅझेटिअरांची उपयुक्तता व मागणी लक्षात घेऊनच आम्ही महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचे ब्रिटिशनिर्मित ग्रंथ जसेच्या तसे पुनर्मुद्रित केलेले आहेत. शिवाय नवीन सुधारित ग्रंथांबरोबरच इंटरनेटवर घेण्याचेही काम चालू आहे. त्यांच्या उणिवांवर बोट ठेवूनही मान्य करतो की आम्ही १९५४ ते १९८२ पर्यंत प्रकाशित केलेल्या इंग्रजी ग्रंथांमध्येही काही उणिवा आहेतच. त्यांच्या प्रस्तावनेतही तशी कबुली दिलेली आहे. इतिहास संशोधन ही एक प्रदीर्घ प्रक्रिया होय. जसजसे नवीन ठोस पुरावे उजेडात येतात, तसतसा नवीन दृष्टिकोन बनतो व घटनांचा अर्थ-उकल होतो. इतिहास बदलत नाही. बदलतो तो नवीन पुराव्यांवर आधारित अर्थ-उकल. इंग्रजांनी इतिहास सामग्रीत विपुल भर घातली. पर्शियन व युरोपीय भाषांमधील प्रचंड इतिहास त्यांनी इंग्रजीत भाषांतर करून ठेवला. खरे तर पर्शियन ग्रंथांचे त्यांनी केलेले भाषांतर मूळ मजकुराशी तपासून सुधारित आवृत्ती काढणे उपयुक्त होईल.

## स्वातंत्र्योत्तर गॅझेटिअर संपदा

स्वातंत्र्य आंदोलन काळात भारतीयांना आपला इतिहास व सांस्कृतिक अस्मितेचे भान आले. आत्मविश्वास व आत्मसन्मानाची भावना निर्माण होऊ लागली. फुले, रानडे व टिळकांनी केलेले प्रबोधन व गांधीजींच्या नेतृत्वाखालील अवस्थाकल्पित आंदोलनातून भारतीयत्वाचा इथॉस व जनमानस प्रगल्भ होऊ लागले. फिरोजशहा, गोखलेंपासून नेहरू व आंबेडकरांपर्यंत राष्ट्रवाद व स्वत्वाचे स्फुलिंग जागृत झाले. महात्मा गांधींनी राजकीयच नव्हे तर वैचारिक क्रांती घडवली. ज्या महान कार्याची इंग्रजांच्या गॅझेटिअरांमध्ये साधी नोंदही घेतली नव्हती. त्याचे वर्णन आम्ही करणे आवश्यकच होते. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर परिवर्तन प्रक्रिया व इतिहासातील लोकांचा रस वाढतच होता. या गतिशील विश्वात सर्वच पिरिस्थिती व राष्ट्रीय जीवनात अखंड परिवर्तन होतच असते. राष्ट्रीय गरजा व समाजजीवनातील मूल्यांचा अधिक्रम बदलत असतोच. पाऊण शतकानंतर १८७४-७५ मधील राजनिष्ठा, सामाजिक व सांस्कृतिक आचारविचार बदलणे स्वाभाविकच! वसाहतवाद व इंग्रजांचे येथून उच्चाटन केल्यावर सरकार म्हणजे केवळ कर वसुली करणारी आणि कायदा व सुव्यवस्था राखणारी सर्वाधिकारी यंत्रणा असे सरकारचे स्वरूप टिकणे अशक्य होते.

भारतीय स्वातंत्र्यलढा राजकीयप्रमाणेच, सामाजिक ध्येयधारणा व नैतिक पातळीवरून लढला गेला. त्या विविध टप्प्यांमध्ये काऊन्टर-हेगेमनी म्हणजे प्रतिप्रभावी शक्ती निर्माण करण्यात आली व राष्ट्रीय मूल्येही रुजवण्यात आली. भारतीय राज्यघटनेची सर्वच मूलतत्त्वे यातूनच उत्क्रांत झाली. उदाहरणार्थ, भारतीय संविधानातील 'मूलभूत अधिकार' यावरील ठराव मार्च १९३१ च्या कराची काँग्रेस अधिवेशनातच पास झालेला होता. अशा अनेक कारणांमुळे गॅझेटिअरचा 'इलायटिस्ट' आकृतिबंध बदलणे क्रमप्राप्तच होते. अर्थात कालबाह्य झालेली माहिती, नवनवीन उपलब्ध दस्तऐवज, अभिलेख व पुरातत्त्वीय उत्खनने आणि सर्वेक्षणाचे अहवाल उपलब्ध झाल्यामुळे सुधारित आवृत्ती काढण्याची गरज ही इतर कारणे आहेतच. शिवाय जुन्या गॅझेटिअरांचा मूळ उद्देश इतिहास लिहिण्याचा नव्हता हे वर सांगितले आहेच. त्यांचे लेखन करणारे इतिहासकार किंवा समाजशास्त्रज्ञ नसून सनदी अधिकारी होते. मात्र कॅंबेल व एडवर्ड्स यांचा थोडा अपवाद होता.

अनुक्रमणिका

अशा प्रकारच्या विचारांमधून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुधारित गॅझेटिअर काढण्याचा विचार सर्वप्रथम मांडला गेला आपल्याच राज्यात, पी.एम. जोशी, एस.आर. टिकेकर, एस.एम. कत्रे, एस.जी. पाणंदीकर, डॉ. एच.डी. सांकलिया इत्यादींच्या प्रयत्नांमधून मुख्य सचिव एम.डी.भट व मुख्यमंत्री बी.जी. खेर यांनी १९४९ मध्ये गॅझेटिअरचे काम करण्यासाठी संपादक मंडळ नेमले. पहिले संपादक डी.जी. कर्वे होते. या कल्पनेला राष्ट्रीय स्तरावर पुष्टी दिली शिक्षणमंत्री मौलाना अब्दुल कलाम आझादांनी (१९५१). १९५५-५६ च्या सुमारास केंद्रीय शिक्षण मंत्री हुमायुन कबीर यांनी रस घेतल्याने केंद्रीय स्तरावरही एक यंत्रणा असावी असा निर्णय झाला. महाराष्ट्र शासन १ मे १९६० रोजी अस्तित्वात येण्यापूर्वी मुंबई शासनाने पुणे, धारवाड, सुरत इ. जिल्ह्यांसाठी गॅझेटिअर काढले होते.

केंद्र सरकारने संपूर्ण भारताचे गॅझेटिअर चार ग्रंथांच्या रूपाने प्रसिद्ध केले. हे ग्रंथ म्हणजे हंटरच्या ग्रंथांची केवळ सुधारित आवृत्ती नव्हेत. देशातील त्या त्या क्षेत्रातील कसलेल्या तज्ज्ञ मंडळींनी केलेली नवनिर्मिती होय. विशेषतः **'कंट्री अँड पीपल'** आणि **'हिस्टरी अँड कल्चर'** हे दोन ग्रंथ बरीच मान्यता मिळवून आहेत. केंद्रीय समितीने एक महत्त्वाचा विचार प्रसृत केला होता, की द गॅझेटिअर्स वेअर कंसिव्हड् अँड डिव्हाइड टू मिट अ पर्टिक्युलर अँड लिमिटेड नीड अंडर द ब्रिटिश रेजिम."

वस्तुतः आपल्या राज्यात जिल्हा व राज्य गॅझेटिअर ग्रंथांचे काम केंद्र सरकारच्या यंत्रणेपूर्वीच सुरू झालेले होते. स्वतंत्र भारतातील या क्षेत्रातील आद्यप्रवर्तनाचा मान आम्ही मिळविला. नंतर निर्माण झालेल्या केंद्रातील यंत्रणेने राज्य शासनांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने हिला केंद्र पुरस्कृत योजना असे घोषित केले. त्यांनी तयार केलेला आकृतिबंध स्वीकारण्याची सूचना केली. हा आकृतिबंध पूर्वोक्त 'बंगाल ट्रॅडिशन' वर आधारित होता. मात्र पहिल्यापासूनच 'कॅंबेलियन' परंपरेचा स्वीकार आम्ही आधीच केलेला होता. याबाबत आमचे केंद्रातील गॅझेटिअर विभागाशी बरेच खटके उडाले होते. कारण आम्हाला हवे होते सांगोपांग व सविस्तर माहिती असलेले ग्रंथ. पुढे एप्रिल १९८२ पासून केंद्रातील यंत्रणाच बरखास्त झाल्याने महाराष्ट्र गॅझेटिअर विभागाला मोकळा श्वास घेणे शक्य झाले. या व इतर अनेक कारणांमुळे १९८२ पर्यंतचे व नंतर प्रकाशित झालेल्या गॅझेटिअर ग्रंथांमध्ये सर्वच दृष्टीने फरक आहेत. नवीन संकल्पनेनुसार उपजलेली पहिली निर्मिती म्हणजे **ग्रेटर बॉम्बे गॅझेटिअरचे** इंग्रजीतील तीन खंड होत.

साहित्य, संस्कृती व इतिहासात रमणाऱ्या यशवंत चव्हाणांनी विशेष लक्ष घालून गॅझेटिअर योजनेला चांगली चालना दिली. सेतू माधव पगडी यांच्यासारख्या इतिहासकाराची त्यांनी प्रमुखपदी नेमणूक केली. त्यापूर्वी प्रा. एम. आर. पाळंदे, पी. एम. जोशी, श्री. रा. टिकेकर यांसारख्यांनी विचारमंथन करून गॅझेटिअरचे उद्दिष्ट, स्वरूप व दिशा ठरविली होतीच. पुणे व धारवाडवरील ग्रंथ प्रकाशितही केले होते. तसेच विचापूर, सुरत, भडोच व सौराष्ट्रातील जिल्ह्यांवर काही काम करून ठेवले होते. मात्र महाराष्ट्र शासनाच्या स्थापनेनंतर प्रथम प्रसिद्ध झाले ते कोल्हापूरचे इंग्रजीतील गॅझेटिअर. गॅझेटिअर कामासाठी १ एप्रिल १९५९ पासून ३८ वर्षांची ह्यात वाहून घेतलेला मी सर्व क्रिया-प्रक्रियांचा साक्षीदार आहे. काही विषयांवरील लेखन संपूर्ण राज्य पातळीवर उत्तमरीत्या होऊ शकते या विचारातून 'राज्य गॅझेटिअर' मालिका काढण्याची योजना आखण्यात आली. हे विषय आहेत :- इतिहास, लोक व संस्कृती, भाषा व वाङ्मय, वनस्पतिसृष्टी, प्राणिसृष्टी व भूगोल.

स्वातंत्र्यानंतर गॅझेटिअर विषयक जुने वसाहतवादी धोरण बदलणे अपरिहार्य होतेच. कालबाह्य माहिती अद्यावत करणे हे एक लहानसे उद्दिष्ट ठरले. पण त्यापेक्षा महत्त्वाचे असे, की या गतिशील विश्वात

सर्वच परिस्थिती समाजजीवन, राष्ट्रीय आशाआकांक्षा, राजकीय अधिक्रम, अर्थव्यवस्था, सांस्कृतिक आसमंत, नीतिमूल्ये, सामाजिक पुनर्निर्माणाची गरज यांत परिवर्तन होणे अपरिहार्य आहे. पूर्वीचा स्थितिशील समाज गतिमान झाला. म्हणूनच बरीच माहिती आता अप्रस्तुत वाटल्याने तिची पुनरावृत्ती करण्यात आली नाही. तसेच इंग्रजांनी न घेतलेला बराच मजकूर नव्याने घ्यावा लागला. १९४७ पासून सरकार लोकाभिमुख झाले. त्याचे प्रतिबिंब नवीन मालिकेमध्ये उमटणे आवश्यक झाले. विकासप्रवण व समाजवादी समाजरचना करण्याचे ध्येय असलेल्या आमच्या शासनालाही हे काम उपयोगी पडावे हाही विचार आला. म्हणूनच नवीन मालिकेत व विशेषतः १९८६ पासूनच्या गॅझेटिअरामध्ये संपूर्ण दृष्टिकोन बदलला आणि ही नुसती सुधारित आवृत्ती न राहता नवनिर्मितीच झाली.

१९५४-१९८२ दरम्यान झालेल्या ग्रंथांमधील इतिहास महाराष्ट्रात तेव्हा प्रचलित असलेल्या प्रथेनुसार होता. वस्तुतः पाश्चिमात्य देश व जे.एन.यू. सारख्या उत्तर भारतातील विद्यापीठांनी केवळ राजकीय इतिहासाची प्रथा आधीच मोडलेली होती. त्यामुळे आपल्याकडील परंपरावादी दृष्टिकोनामुळे बऱ्याच वेळा मी अस्वस्थ होत असे.

म्हणूनच अधिकारप्राप्तीनंतर **ग्रेटर बॉम्बे गॅझेटिअर** व मराठी ग्रंथमालेचा प्रारंभ करताना गॅझेटिअरची संकल्पना बदलून व्याप्ती वाढविण्याचे ठरविले. गुरुवर्य ग.ह. खेर व न.र. फाटक आणि अनेक विचारवंतांशी मी चर्चा केली. प्रत्येक ग्रंथ सूक्ष्म पातळीवरील इतिहास असावा असे कल्पून त्यात नवीन विषयांचा समावेश करण्याचे योजिले. गॅझेटिअर म्हणजे केवळ डोंगर, नद्या, प्राकृतिक भूस्वरूप, वनसंपदा, स्थल व वर्णने, लोकांच्या चालीरीती, राजघराण्यांचा इतिहास, अर्थव्यवस्था, महसूल प्रशासन व पुरावशेषांचा तपशील देणारा कोश नव्हे. यात माणसाचे निसर्गाशी नाते, पर्यावरणाचा ऱ्हास व संवर्धन, समाजजीवनातील बदलत्या प्रेरणा व संघर्ष, समाजाचे अंतःसामर्थ, मानव साधनसंपत्तीचा विकास, नियोजनामुळे आलेली गतिशीलता, कल्याणकारी प्रशासन व पुरावशेषांच्या अभ्यासातून गवसलेले तेव्हाचे लोकजीवन अशा पैलूंचे विवेचन करण्याचे मी ठरविले. इतिहास म्हणजे केवळ राजे-महाराजांचे संघर्ष, लढाया, कूटनीती, सुंदोपसुंदीचे कथन नव्हे. अकबर किंवा शिवाजी महाराजांच्या जय-पराजयाबद्दल पूर्वी खूप लिहून झाले. पण त्यांनी समाज, देश, शिक्षण, साहित्य, संस्कृती व कलाजीवनाच्या विकासासाठी काय केले हे नवीन संकल्पनेत अभिप्रेत आहे. इंग्रज भांडवलदारांनी, सरकारने नव्हे, रेल्वे बांधली. पण यामागील हेतू काय होता? हजार-पंधराशे वर्षे पारतंत्र्यात जखडलेल्या या देशाला स्वतंत्र करण्यासाठी, साऱ्या विश्वात मानाचे स्थान मिळवण्यासाठी व नवनिर्माण करण्यासाठी अवस्थाकल्पित स्वातंत्र्यलढा उभारला. लाखोंनी बलिदान दिले. स्थानिक व ग्राम 'स्तरावर' 'सबाल्टर्न' लढे म्हणजे लोकलढे झाले. आधुनिकता व नवविचार प्रसवला. टिळक-गोखलेंनंतर गांधी-नेहरूंच्या नेतृत्वाखाली हा प्रदेश लढला. बहुविध घटनांचा, स्थानिक मंडळी व युवकांनी केलेल्या स्वातंत्र्यसमराचा परामर्श घेण्याचाही कसून प्रयत्न करण्याचा मी निर्धार केला. मात्र अधिकृत दस्तऐवजांच्या आधारावरच.

स्वातंत्र्यकालीन इंग्रजी ग्रंथमालिकेची सांगता या स्मारकशिल्प सदृश गॅझेटिअरच्या तीन खंडांनी झाली (१९८६-८७) **हिस्टरी ऑफ बॉम्बे : मॉडर्न पिरिअड** हा चौथा खंड. अडतीस वर्षांच्या माझ्या प्रगतिपटाचा शिखरबिंदू. काही बंधनांमधून मुक्त झाल्यावर भव्य नवनिर्मिती करण्याचा निर्धार होता. शासनानेही पाठिंबा दिला. या महानगराला बऱ्याच जिल्ह्यांएवढे महत्त्व. शिक्षण आधुनिकता व प्रबोधन प्रक्रियेत मुंबई अग्रेसर. स्वातंत्र्यापूर्वी सात काँग्रेस अधिवेशने येथेच भरली. किमान आठ अधिवेशनांचे अध्यक्ष मुंबईचे सुपुत्र होते. रानडेंसह दादाभाई नवरोजी व फिरोजशहा मेहता हे काँग्रेसच्या जनकांपैकी

होते. दादाभाई तर १८९२ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटवर निवडून आले होते. स्वातंत्र्य लढ्याला बहुतांश पैसा मुंबईनेच दिला. गांधीजींनी १९२१ मध्ये उभारलेल्या एक कोटीच्या टिळक स्वराज फंडाला साडे-सदतीस लाखांचे योगदान एकट्या मुंबईने दिले होते. स्वातंत्र्य लढ्याचे मनसुबे येथेच रचले गेले. १९३० मध्ये मुंबईकरांनी केलेल्या लढ्याने सारे विश्व हेलावले होते, तर १९४२ चा क्रांतिलढा पेटवल्यावर त्याचे भूमिगत सूत्रसंचालन १९४४ पर्यंत अच्युतराव पटवर्धन व लोहियांनी येथूनच केले. मुंबई केवळ आर्थिक राजधानी नसून आंदोलनाचे मुख्यालय होते. (१९२०-१९४४) म्हणूनच हा ज्वलंत इतिहास लिहिणे अगत्याचे वाटले. देश-विदेशातील अनेकांनी मुंबईवर लिहिले. काही चांगलेही आहे. पण त्यांनी केवळ काही पैलूंनाच स्पर्श केला. सर्वंकष व सर्वस्पर्शी इतहास नव्हे. एस.एम. एडवर्ड्सची संकल्पना मर्यादिचत होती. तो इंग्रजांच्या कर्तबगारीचा इतिहास झाला. वसाहतवादी, इलायटियस्ट व वंशश्रेष्ठत्वाचा दर्प असलेला. भारतीयांना कमी लेखणारा. शिवाजीला चाचेगिरी करणारा लुटारू व कान्होजी आंग्रेला एका धर्मभ्रष्ट अरब गुलामाचा पुत्र किंवा पोर्तुगीज कोफेरीला एका द्रविडिअन बाईपासून झालेला मुलगा म्हणजे अप्रतिष्ठाकारकच नव्हे तर साफ चूक होते. नमुना म्हणून हा उल्लेख मी करत आहे. मुंबईला गौतम बुद्धापासून इतिहास असल्याचे इंग्रजाला माहिती नसावे. यात काँग्रेस अथवा टिळकांचे कोठेच नाव दिलेले नाही. काही महनीयांची नावे आहेत. पण क्षुल्लक बाबींच्या संदर्भात.

वस्तुतः विद्यावंत वर्गाचा उदय व उपक्रम, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय जागृतीशी मुंबईचा इतिहास निगडित आहे. हे केवळ स्थानीय नव्हे, तर देशाच्या प्रबोधनाचाही इतिहास आहे. १९६० च्या मुंबईवर संस्कार महाराष्ट्राचाच. म्हणूनच या सर्व पैलूंचे विहंगदर्शन घडवण्याच्या उद्देशाने या इतिहासासाठी मी ३४७ पृष्ठे खर्च केली. येथील अर्बन मॉफोलॉजी विशेषतापूर्ण असल्याचे प्रा. अरुणाचलम यांनी दाखवून दिले. मुंबईच्या विविधतापूर्ण समाजजीवनावर पत्रकार त्र्यं.वि. पर्वतेंकडून लेखन करून घेतले. येथील अर्थव्यवस्थेचा सखोल इतिहास तर आहेच, परंतु १६७६ पासूनच्या औद्योगिकरणाचा ३०० वर्षांचा इतिहास (३३२ पृष्ठे) म्हणजे या गॅझेटिअरच्या दुसऱ्या खंडाची विशेषता होय. डॉ.बी.आर. रायरीकरांच्या मार्गदर्शनानुसार हे अतुलनीय काम केल्याचे मला समाधान आहे. औद्योगिकीकरणाचा मायक्रो इकॉनॉमिक पातळीवरील हा एकमेव इतिहास असावा.

**लोक व संस्कृती** – जातिजमाती, त्यांच्या रूढी व चालीरीती या विषयावरील इंग्रजांनी करून ठेवलेली निरीक्षणे बरीच चांगली असल्याने त्याचा उपयोग सावधानता बाळगून करून घेतला. परंतु बऱ्याच ठिकाणी त्यांनी भारतीयांच्या वाईट चालीरीती व दुर्गुणांचे भडक चित्र रंगवून ठेवले. काही उल्लेख अत्यंत अप्रतिष्ठाकारक होते. इंग्रज राजवटीत याविरुद्ध आवाज उठवणे शक्यच नव्हते. पण जातीयवादाला त्यामुळे खतपाणी मिळत होते. म्हणूनही प्रारंभीच्या आमच्या काही इंग्रजी ग्रंथांमध्ये तो मजकूर वगळला होता. मात्र आमच्या लक्षात आले, की समाजशास्त्राच्या अभ्यासकांना बरीच जुनी माहिती हवी होती. म्हणून पुढील ग्रंथांमध्ये जुनी माहिती दुरुस्त स्वरूपात प्रकाशित केली. अभ्यासकांच्या गरजा लक्षात घेऊन मराठीतील गॅझेटिअरांमध्ये या विषयाला अधिक महत्त्व देण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यात क्षेत्रीय सर्वेक्षण करूनच माहिती संकलित केली. माझ्यासह सर्व अधिकारी संशोधन साहाय्यकांना मार्गदर्शन करू लागले. इंग्रज अधिकाऱ्यांनी काही जातींच्या नावांमध्ये व चालीरीतींमध्ये गल्लत केलेली आढळली. उदाहरणार्थ, बंजारा व वंजारीमहादेव कोळी, सोन कोळी, मल्हार कोळी व ढोर कोळी; हलबा व हलबा कोष्टी; कुणब्यांच्या अनेक पोटशाखा. अशी गल्लत व विसंगतींमुळे महाराष्ट्रात बरीच प्रकरणे कोर्टातही गेली. अधिकृत दस्तऐवज म्हणून गॅझेटिअरला आलेले महत्त्व लक्षात घेऊन खूप काळजी घेणे भाग पडले. ब्रिटिश आवृत्तीनंतर एन्योवेन, आर.व्ही.रसेल, पंडित हिरालाल आणि सईद सिराज-उल हसन यांचे अनुक्रमे मुंबई

अनुक्रमणिका

इलाखा, विदर्भ व निजामी प्रदेशावरील ग्रंथांनीही ज्ञानात भर घातली. हरबर्ट रिसले (१८९१) पर्यंत महाराष्ट्राचा मानववंशशास्त्रानुसार काहीच अभ्यास झालेला नव्हता. अजूनही पूर्ण झालेला नाही. आमच्या इंग्रजी राज्य गॅझेटिअरमध्ये इरावती कर्वेनी हा विषय प्रथमच समाविष्ट केला.

इरावती कर्वे लिखित राज्य पातळीवरील ग्रंथाची सुधारित व शास्त्रशुद्ध आवृत्ती म्हणजे **महाराष्ट्र : भूमी व लोक** हा ग्रंथ (१९९६). तज्ज्ञांकडून लिहवून घेतलेल्या या ग्रंथात महाराष्ट्राची संस्कृती, वांशिक व सांस्कृतिक पैलू, प्रमुख जाती व जमाती, सांस्कृतिक उपविभाग व सामाजिक संघटना, कुटूंबसंस्था, धर्म व संप्रदाय, कला व संस्कृती, शास्त्रोक्त संगीत व संगीत रंगभूमी इत्यादी पैलूंचे विहंगदर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. ब्रिटिश-पूर्व समाजशास्त्रीय इतिहासासाठी अभिलेखागारांचा उपयोग नाही. पोथी साहित्याचा उपयोग अगदी मर्यादितच. म्हणून प्राचीन जीवनाच्या अभ्यासासाठी कोरीव अभिलेखाचा आधार घ्यावा लागतो. **गाथासत्तसई** (गाथासप्तशति) सारख्या महाराष्ट्रीय प्राकृत काव्यातून काही कल्पना येते. मुघलकालीन पर्शिअन ग्रंथ व युरोपिअन प्रवाशांच्या वृत्तांतांमधून समकालीन जीवनाचे चित्र दिसते. इ.स. पहिले ते तिसरे शतक या दरम्यान येथे मानव कायम वसाहत करून राहू लागला. नागर संस्कृतीच्या पाऊलखुणा लोहयुग परिपक्व झाल्यापासून दिसू लागल्या. लोखंडी अवजारांमुळे शेती, घरे, नाणी व लेखनकला उदयास आली. बौद्ध धर्माचा प्रसार झाला. व्यापारी मार्गांवर आश्रयस्थान म्हणून प्रथम बौद्ध व नंतर हिंदू लेणी कोरली गेली. महाराष्ट्राची सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडण सातवाहनांच्या काळात झाली. रोमन इतिहासकार प्लिनी याच्या मते सातवाहन साम्राज्यातील तीस शहरांभोवती तटबंदी होती. विदेशी व्यापार वाढून रोमन पद्य, वाद्ये व दरबारासाठी गायक व नर्तक मुले-मुली आयात केल्या जात. **गाथासप्तशती** या काव्यामुळे महाराष्ट्राचा वाङ्मयीन पाया रचला गेला.

**महाराष्ट्र : भूमी व लोक** या गॅझेटिअरची खास विशेषता म्हणजे या भूमीतील संगीताचा पहिल्या शतकापासूनचा साधार इतिहास, येथील शास्त्रोक्त संगीत, संगीत रंगभूमी व प्रयोगित कला, या कलांचे संस्कृतीशी असलेले नाते वैचारिक भूमिकेतून दाखवण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. स्वतःचे संगीतावरील प्रेम व कलासक्ती यामुळे असेल किंवा वैचारिक भूमिका असेल, पण या विचारातून मी हे विषय गॅझेटिअरमध्ये आणले. माझ्या पूर्वाधिकाऱ्यांना हे पटवून देणे मला शक्य नव्हते, हे मात्र दुर्दैवच. या ग्रंथासह मराठीतील प्रत्येक गॅझेटिअरमध्ये १९८८ पासून या विषयाला उचित स्थान लाभलेले आहे. सर्वच जिल्ह्यांमध्ये गायक-वादक कलाकार मला आढळले. वर्ध्यासारख्या जिल्ह्यांतही मला जे. एल. रानडे, भास्कर नारायण संगीत व त्यांचे सुपुत्र प्रकाश हे आढळले. ग्वाल्हेर घराण्याची गायकी शिकलेले अनेक कलावंत तेथे दिसले. कोल्हापूर-मिरज येथे तर शास्त्रोक्त संगीताची काही काळ राजधानीच होती. अत्युच्च श्रेणीचे महान कलावंत अल्लादिया खान, अब्दुल करीम खान, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, विष्णु दिगंबर पलुसकर व भास्करबुवा बखले एकाच वेळी येथून संगीतावर अधिराज्य गाजवत होते. केसरबाई केरकर, मोगूबाई कुर्डीकर, अंजनीबाई मालपेकर, गोविंदराव टेंबे, भूर्जीखान अशी रत्ने येथेच घडली. कोल्हापूरमधील साहित्य, संगीत, नाटक शिल्प, चित्र कलांचा इतिहास देणे क्रमप्राप्तच वाटले. कोल्हापूरची चित्रपटसृष्टी व क्रीडाक्षेत्राचे विवेचन मनोरंजकच आहे. ललितकलांचे विहंगदर्शन घडविताना मला मनस्वी आनंद वाटल्यावाचून राहिला नाही. कोल्हापूर खरे तर कलापूर होते.

बालगंधर्व शास्त्रोक्त संगीत प्रथम शिकले जळगावच्या मेहबूब खान यांच्याकडून. सर्वोत्तम हार्मोनियम वादक म्हणून संगीतविश्वात कीर्ती लाभलेले सखाराम प्रभाकर ऊर्फ अप्पा जळगावकर हे मूळचे येथीलच. जळगावसारख्या जिल्ह्यातही बरेच साहित्यिक जन्मले किंवा येथील वास्तव्यात यांनी महाराष्ट्र

सारस्वतात भर घातली. कवी केशवसुत कोकणचे परंतु मडगावच्या मराठी शाळेत शिक्षक व नंतर आमच्या फैजपूर हायस्कूलचे मुख्याध्यापक असताना त्यांनी सुंदर कविता लिहिल्या. कवितांचा उल्लेख मी मुद्दाम केलेला आहे. बालकवी ठोमरे, बहिणाबाई चौधरी व सोपानदेव, दु. आ. तिवारी यांच्या काव्यप्रतिभेला याच जिल्ह्यात बहर आला. तसेच के. नारखेडेही इथलेच. अस्तित्ववादी कादंबरीचे प्रथम दर्शन घडविणारे भालचंद्र नेमाडे मूळचे सांगलीचे. हरी नारायण आपटे या विख्यात कादंबरीकाराचा जन्म पारोळ्याचा. येथे बराच काळ वास्तव्य असलेले बा. सी. मर्ढेकर, कवी माधव ज्युलिअन, साने गुरुजी येथे आल्यावर त्यांनी बरीच साहित्यनिर्मिती केली. 'तुकारामानंतर साने गुरुजींएवढा जनतेचा महाकवी महाराष्ट्रात होऊन गेला नाही' हे आचार्य अत्रेंचे मत स्वीकारणे क्रमप्राप्तच वाटते. निसर्गकन्या बहिणाबाईच्या कवितांमध्ये प्रकटलेले भारतीय जीवनाचे चित्र व तत्त्वज्ञान वैश्विक महत्त्वाचे वाटते. मराठी कवितेला वाहिलेले 'काव्यरत्नावली' हे पहिलेच मासिक (१८८७). सुमारे ६५० कवींच्या १,८३,००० कविता या मासिकाच्या ४५४ अंकांमधून प्रकाशित झाल्या. ही साहित्य सेवा महान होय. मी स्वतः ललित वाङ्मयात हात घातला नाही. परंतु महाराष्ट्राचा इतिहास व सांस्कृतिक वारसा बऱ्याच ग्रंथांमधून मी जतन करून ठेवलेला आहे. पुणे-मुंबई बाहेरील महाराष्ट्रात आढळणारे कलाविश्व थक्क करून सोडते. त्याची झलक मराठीतील गॅझेटिअरांमधून दाखवण्याचा माझा प्रयत्न होता. (डॉ. के. के. चौधरी, जळगाव गॅझेटिअर, १९९४, पृ. ७१५-७३८).

महाराष्ट्रातील चाळीस हजार वर्षांपासूनच्या मानव वसाहती विषयीची मनोरंजक माहिती येथे देणे उचित वाटते. आद्य-पुराश्म व मध्य-पुराश्म युगाच्या दरम्यान भूगर्भात झालेल्या प्रचंड स्थित्यंतरांमुळे तापी नदीचे खोरे निर्माण झाले. तापीचा आताचा प्रवाह आद्य-पुराश्म युगाच्या आधीच्या जलोढ निक्षेपातून तयार झाला असावा. १९७२-७३ पर्यंत देशाच्या उत्तर-पुराश्म संस्कृतीच्या अस्तित्वाची काहीच माहिती नव्हती. मात्र जळगाव जिल्ह्यातील पाटणे येथे एस. ए. साळी यांनी १९७१ पासून तेरा वर्षे उत्खनन व अभ्यास करून या कालखंडाविषयीचा भक्कम पुरावा उपलब्ध करून दिला. येथील मध्य-पुराश्म व उत्तर-पुराश्म युगे तसेच मध्याश्म युगीन संस्कृतीविषयीची बरीच माहिती उजेडात आणली. येथे २४,०८९ हत्यारे शोधून त्यांचे रेडिओकार्बन पद्धतीनुसार कालमापन करवून घेतले. वरील भूस्थित्यंतरांमुळे पाटणेजवळ अजिंठा डोंगराच्या पायथ्याशी एक अर्धवर्तुळाकार खोलगट भाग निर्माण झाला. अनेक दृष्टींनी सुरक्षित अशा या भागात ४०,००० वर्षांपासून मानव वास्तव्य करू लागला असे प्रा. साळींनी प्रतिपादन केले. येथे त्या युगांमधील शहामृगाच्या अंड्यांचे १७० हून अधिक अवशेष मिळाले. यातील तीन नमुने उत्तर-पुराश्म युगातील असून या अंड्यांच्या कवचावर जाळीची सुंदर नक्षी कोरलेली आहे. येथेच शहामृगाच्या अंड्यांपासून बनविलेले तीन चपटे मणी तसेच नदीमुखानजीक सापडणाऱ्या शंखशिपल्यांपासून देखील बनवलेले मणी मिळाले. यावरून अनुमान निघते, की त्या काळी या प्रदेशात शहामृग होते आणि येथील माणसाला नक्षीची व मण्यांसारख्या अलंकारांची आवड होती. हे संशोधन इतके महत्त्वाचे आहे, की उत्तर-पुराश्म युगीन एकत्रित मानवी वसाहत व कलाप्रेमाचे भारतातील सर्वात जुने पुरावे मानले गेले. अधिक विवेचनासाठी माझे **जळगाव जिल्हा गॅझेटिअर**, १९९४ पाहावे. या काळापूर्वीच्या युगातील मानव-निर्मित वस्तू मिळाल्या, भुसावळ जवळच्या मानेगाव येथील उत्खननात. हा सर्वच इतिहास विलक्षण मनोरंजक आहे.

पाच हजार ते ३७०० वर्षांपूर्वी मांसाहाराबरोबरच वनस्पतिजन्य अन्न विपुल प्रमाणात मिळू लागल्याने लोकसंख्या वाढली असावी. या काळाचा पुरावा रायगडाजवळील पाचाड व रत्नागिरीजवळील हातखंबा येथे अलीकडेच मिळाला. येथील नैसर्गिक गुहांमध्ये पाषाणाची टोकदार व ताशिव अवजारे,

अनुक्रमणिका

चंद्रकोरी पाते, मातीची भांडी व प्रगत अशी अवजारे सापडली. मात्र मुंबईजवळच्या बुचर बेटावरील हातकुऱ्हाडी व रापी सारख्या अवजारांवरून म्हणता येते की, येथे एक-दीड लाख वर्षांपूर्वी मानव राहत असावा. हे सर्व ज्ञानभंडार मराठी गॅझेटिअरांमध्ये आम्ही मांडले आहे.

**निसर्ग विज्ञानाचे पडसाद** - स्वाभाविक विभाग, भूगोल, पर्वत, नद्या अथवा वनस्पतिसृष्टीत बदल होत नाही असा एक समज आहे. तथापि, नवीन अभ्यास वा तंत्रज्ञानातून या क्षेत्रातही खूपच माहिती उजेडात येत आहे. सर्व्हे ऑफ इंडिया, जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, भूजल सर्वेक्षण यंत्रणा, भारत सरकारचाच मोसम विज्ञान विभाग, मृदा सर्वेक्षण विभाग, केंद्रीय सिस्मॉजिकल अभ्यास यंत्रणा अशा अनेक सरकारी विभागांच्या अभ्यासाचा गॅझेटिअरांमध्ये उपयोग केला जातो. राष्ट्रीय ॲटलास व थिमॅटिक मॅपिंग संघटनेचे बरेच काम केलेले आहे. मागील पाच दशकांमध्ये भूविज्ञान, खनिज संपत्ती व वनसंपदा अशा विषयांवरही केंद्र व राज्य शासनाने अभ्यास केलेला आहे. अनेक संशोधक यांवर काम करीत आहेत. म्हणूनच वैज्ञानिक विषयांवरील लेखन मानधन तत्त्वावर तज्ज्ञांकडून करवून घेण्यात येते. अशा विषयांचे आर्थिकदृष्टीने तसेच पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्व आहे. कोल्हापूर जिल्ह्याचे उदाहरण पहा. येथील सर्वेक्षणातून दिसून आले, की बॉक्साइटचे खनिज पठारी भागातील जांभा दगडाशी संबद्ध स्वरूपात असून त्याचे साठे सुमारे पाच कोटी टन इतके आहे. यातील काही खाणी दोन मोठ्या ॲल्युमिनियम कंपन्यांना भाडेपट्टी तत्त्वावर दिलेल्या आहेत. धरणे बांधण्यापूर्वी शासनाने केलेल्या अभ्यासामुळे नद्यांच्या जलग्रहण क्षेत्राची माहिती उपलब्ध झालेली आहे. भूजलाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच आहे. पुरातन काळी विपुल वनसंपदा असलेल्या ‘झाडिमंडळ’ प्रदेशात असलेल्या वर्धा जिल्ह्यात आज केवळ प्रतीकात्मक म्हणजे १४ टक्के क्षेत्रात वनसंपत्ती आहे. ही स्थिती शोचनीयच आहे. मानवाने निसर्ग संहाराच्या केलेल्या पापाचे प्रक्षालन करण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. गॅझेटिअरांमध्ये हे अधोरेखित करण्याचा आमचा अल्पसा प्रयत्न!

महाराष्ट्रातील वनस्पती सृष्टीचे अगदी काटेकोर शास्त्रीय विश्लेषण करणारा **बॉटनी अँड फ्लोरा ऑफ महाराष्ट्र** (१९८७) हा ९०० पानांचा आमचा ग्रंथ खरोखरीच अतुलनीय मानला गेला. भारतातील कोणत्याही विद्यापीठाने अथवा सरकारने अशा प्रकारचे काम केलेले नाही. महान वनस्पतिशास्त्रज्ञ टी. एस. महाबळे यांच्याकडून या ग्रंथाचे काम करुन घेतलेले आहे. थिओडोर कूक या शास्त्रज्ञाने १९०१ ते १९०८ दरम्यान करून ठेवलेल्या संशोधनानंतर शेकडो शास्त्रज्ञांनी मर्यादित स्वरूपाचे अध्ययन केले होते. त्या सर्वांचे मूल्यमापन करून व त्यातील बहुतांश त्रुटी दूर करून महाबळेंनी व्यापक व सखोल काम करून ठेवले आहे. पॅलिओबॉटनी व अश्मयुगातील वनस्पतींचे फॉसिलच्या स्वरूपातील अवशेष अशा नवनवीन पैलूंचेही विवेचन या ग्रंथात आहे. वन्यप्राण्यांच्या विवेकशून्य संहाराचे एक उदाहरण पाहा. १८७९ पर्यंत या पंधरा वर्षांमध्ये एकट्या खानदेशात ६५८ वाघ इंग्रज सरकारने ठार करवून घेतले होते. प्रच्छन्न हौसेपोटी अधिकारी व त्यांचे हुजरे शिकार करीत. कोल्हापूर संस्थानातील वाघ नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. मुंबईतील मलबार हिलभोवतीच्या गर्द दाट जंगलात विसाव्या शतकाच्या प्रारंभीपर्यंत वाघ होते ही आठवण कायमची इतिहासजमा झाली आहे.

**ऐतिहासिक स्थळे** - ऐतिहासिक स्थळे व पुरावशेषांची गॅझिटिअरांमधील वर्णने खरोखरच अप्रतिम असतात. कँबेलच्या मालिकेतील अशी माहिती खूपच चांगली आहे. अर्थातच आम्ही या वर्णनांमध्ये सुधारणा करून नवीन मालिकेत उपयोग केलेला आहे. मात्र नमूद करणे आवश्यक आहे, की बहुतेक लेण्यांमधील शिल्प व रंगचित्राचा अर्थउकल (इंटरप्रिटेशन) संशोधनानुसार बदलला आहे. अजिंठा, वेरुळ, घारापुरी,

अनुक्रमणिका

कुडा, पितळखोरा इत्यादी लेण्यांबद्दल फर्ग्युसन आणि बर्जेस सारख्या दिग्गजांनी लावलेले अर्थ नवीन अर्थ उकलानुसार बदलावे लागत आहेत. मात्र अजूनही हे संशोधन बाल्यावस्थेतच आहे. प्राचीन शिल्प वा रंगचित्रांच्या बदलेल्या इंटरप्रिटेशनचे एक चांगले उदाहरण म्हणजे घारापुरीतील (एलिफन्टा) मुख्य शिवप्रतिमा होय. मुख्य मंडपातील सर्वाधिक आकर्षक व भव्य प्रतिमेला पूर्वी 'त्रिमुर्ती' असे म्हणत. कलेच्या निखळदृष्टीने पाहणाऱ्या रसिकाला मंत्रमुग्ध करणारी ही त्रिमूर्ती म्हणजे ब्रह्म, विष्णू व शिव यांचे त्रिमूर्ती असे म्हणत. गॅझेटिअराच्या आधीच्या दोन्ही आकृतींमध्ये असाच चुकीचा समज आहे. पूर्वीच्या समजानुसार या मूर्तीच्या तीन मुखांपैकी जी दोन सौम्य वाटणारी मुखे आहेत ती ब्रह्मा व विष्णूची असून दक्षिणाभिमुख उग्रवदन शिवाचे असल्याचे समज होता. तथापि, आता मूर्तिशास्त्राचा अभ्यास प्राचीन ग्रंथांच्या आधारे शास्त्रशुद्ध पद्धतीने केला जातो. यानुसार ब्रह्मा व विष्णूची इतर लक्षणे घारापुरीत नाहीतच. म्हणून मूर्तिशास्त्रज्ञ गोपिनाथ राव यांनी ही तिन्ही मुखे शिवाचीच असून तिला 'महेशमूर्ती' असे म्हटले. यावर पाश्चात्त्य मूर्तिपंडिता स्टेला क्रॅमरिश यांनी ही केवळ शिवाचीच मूर्ती असली, तरी महेशमूर्ती नसून सदाशिवाची आहे असे प्रतिपादन केले. अनेक बाजूंचा अभ्यास करून प्रस्तुतची प्रतिमा सदाशिवाचीच असल्याचे सर्व अभ्यासकांनी अलीकडे मान्य केले आहे. हेही आता मान्य झालेले आहे, की यात शिवाच्या पाच अवस्थिती (आस्पेक्ट) आहेत. दक्षिणेकडे अघोर, पूर्वेस तत्पुरुष, उत्तरेस वामदेव, पश्चिमेस सद्योजात ही शिवरूपे आहेत. पाचवे मुख ईशान्येचे. ते वरच्या बाजूस असते. यातील अघोर म्हणजे भैरव. तत्पुरुष म्हणजे महादेव, वामदेव म्हणजे उमा, सद्योजात म्हणजे नंदीकेश्वर आणि ईशान म्हणजे सदाशिव होय. अधिक माहितीसाठी माझे **रायगड जिल्हा गॅझेटिअर** १९९३ पृ. ७४०-४२ पाहावे. अशा प्रकारच्या दुरुस्त्या मराठीतील गॅझेटिअर मालिकेत १९८८ पासून करून घेण्यात आल्या आहेत. मात्र सर्वच मजकुरात दुरुस्ती करणे शक्य होतेच असे नाही. काही त्रुटी राहतातच.

दुसरे उदाहरण रायगड किल्ल्याचा इतिहास व वर्णनामध्ये कराव्या लागलेल्या दुरुस्त्यांचे देता येईल. कुलाबा गॅझेटिअरांच्या १८८३ मधील आवृत्तीमध्ये बऱ्याच चुका व त्रुटी दिसून आल्या होत्या. विशेषतः इतिहासाबद्दल इंग्रजांचे बरेच गैरसमज दिसले होते. त्यांची दुरुस्ती १९६४ च्या इंग्रजी आवृत्तीत करण्यात आली. तथापि, उपरोक्त मराठीतील १९९३ ची सुधारित आवृत्ती काढताना प्रकर्षाने जाणवले, की पूर्वीच्या दोन्ही आवृत्तींमध्ये खूपच दोष राहून गेले होते. म्हणून रायगडाविषयीचे चार-पाच दशकांमधील झालेल्या लेखनाचा अभ्यास करूनच सर्व इतिहास व वर्णन मराठी गॅझिटिअरांमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. यासाठी प्रचंड परिश्रम व चिकाटी तसेच अभ्यासू वृत्तीची नितातं गरज असते. लेण्या व पुरावशेषांच्या बाबतीत तर खूपच अभ्यास करावा लागतो. याचे मुख्य कारण असे, की उपरोक्त सदाशिवमूर्तीप्रमाणे अनेक शिल्पकृती व रंगचित्रांचा पूर्वी केलेला अर्थउकल बदलला आहे. रायगडाचा संबंध फक्त शिवाजी महाराजांशीच नव्हता. एक सुरक्षित ठिकाण म्हणून या रायगडाचा उपयोग दक्षिण कोकणाच्या शिलाहार राजांपासून (इ. स. ७८३) केला जात होता. विजयनगर, बहमनी व अहमदनगरच्या निजामशाही राजवटींनी रायगडाचा पुरेपूर उपयोग करून घेतलेला होता.

इथे नमूद करावेसे वाटते की, आज आपण गॅझेटिअर अथवा इतिहास ग्रंथामध्ये किल्ले अथवा कोरीव लेण्यांची जी वर्णने वाचतो ती पूर्णस्वरूपातील नाहीत. रायगड, राजगड पन्हाळा, प्रतापगड, विशालगड, राजमाची, शिवनेरी, लोहोगड, पुरंदर, कर्नाळा, सिंहगड, अजिंक्य तारा, माहुली इत्यादी सुलतानी व मराठाकालीन किल्ले, त्यांवरील बांधकामे व तटबंदी नोव्हेंबर, १८१७ पासून मुद्दाम उद्ध्वस्त करण्यात आली. दुसरा बाजीराव पेशवा याने १७ नोव्हेंबर १८१७ रोजी पुण्यातून पलायनाला प्रारंभ केल्यापासून त्याचा पाठलाग करणाऱ्या इंग्रज सेनेने वाटेतील प्रत्येक किल्ला जिंकून घेतला. बऱ्याच

अनुक्रमणिका

किल्लेदारांनी शरणागती न पत्करता कडवी झुंज दिली. अशा झुंजीमध्ये बांधकामाची प्रचंड हानी झाली. ब्रिटिश तोफांच्या माऱ्यात तटबंदी नष्ट झाली. वासुदेव बळवंत फडकेंच्या आजोबांनीदेखील झुंज देऊन कर्नाळा किल्ला वाचवण्याचा प्रयत्न केला होता. पेशवाईची रत्नशाळा व संपूर्ण खजिना १२ जून १८१७ पासून रायगडावर शेवटच्या पेशव्यांची मुत्सद्दी पत्नी वाराणशीबाई सांभाळत होती. पेशव्यांच्या गच्छंतीनंतर कोकणातील महत्त्वाचे गड जिंकून कर्नल प्रॉथर जानेवारीला रायगडाजवळ आला. गडावर वाराणशीबाईंच्या मदतीला एक हजार अरबांची शिबंदी होती. प्रॉथरला गड जिंकता न आल्याने मंजर हॉल सेनेसह चालून आला. २५ एप्रिल १८१८ पासून या दोघा इंग्रजांनी गडावर तोफांचा भडिमार करण्यास प्रारंभ केला. पण यश येईना. या कपटी इंग्रजांनी एका स्थानिक माणसाला प्रलोभनाने वश केले. त्याचे नाव रायनाक असावे. या फितुर देशद्रोही माणसाने इंग्रजांना सांगितले, की गडावरील दारूगोळा कोठाराचा स्फोट केल्याखेरीज यश लाभणार नाही. यानुसार त्याने तोफेला अँगल लावलेल्या तोफांनी भडिमार केला. दारूगोळा कोठाराच्या स्फोटाने गडावर भयंकर आगी लागल्या. राणीवसादेखील नष्ट झाला. शिवाजीचा राजवाडा पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. महाराजांची समाधी, सुंदर इमारती व मंदिरे भग्न झाली. दप्तरखाना जळून खाक झाला. ब्रिटिशांच्या अग्निवर्षावातून बचावले फक्त एक घर व धान्याचे कोठार; बाकी राहिले केवळ भग्न इमारतींचे अवशेष. म्हणून रायगडाच्या मूळ वास्तुवैभवाची माहिती मिळणे संभवतच नाही. आम्ही रायगडावरील वास्तूची जी माहिती मराठी गॅझेटिअरांमध्ये दिलेली आहे ती उपलब्ध कागदपत्र, संशोधकांचे लेखन व माझ्या संशोधन चमूने संकलित केलेल्या साहित्यावर आधारित आहे. अर्थातच त्यातून मूळ वास्तू कशा असाव्या याची कल्पना येते.

अभ्यासकांनी लक्षात घ्यावे, की १८१७ ते १८१९ दरम्यान झालेला मराठ्यांचा पाडाव व त्यांत झालेली किल्ल्यांची हानी हा एक टप्पा झाला. यानंतरही काही अवशेष बऱ्या अवस्थेत होते. परंतु पुढे १८५७-१८५८ चा विद्रोह मोडून काढल्यावर कोठेही मराठे किंवा स्थानिक गटांना कोणत्याही प्रकारचा उठाव करणे अशक्य करून ठेवण्यासाठी उर्वरित तटबंदी इंग्रजांनी जाणीवपूर्वक नष्ट केली. हे उद्ध्वस्तीकरण अदमासे १८६२ च्या प्रारंभापर्यंत चालू होते. त्यामुळे आज दिसतात केवळ अतिभग्न अवशेष. निसर्ग व पावसाने त्यात थोडी भर घातली असावी.

मुंबईसमोरील घारापुरीच्या लेण्यांचे भयानक विध्वंसन इंग्रजांच्या पूर्वीच पोर्तुगीजांनी करून ठेवले होते. माथेफिरूपणे वागणारे पोर्तुगीज मुसलमानांपेक्षा भयंकर मूर्तिभंजक होते. या भंजकांनी लेण्यांमध्यील शिल्पे धार्मिक असल्याचे मानून त्यांचा विनाश करण्यासाठी सर्व उपाय केले. येथील पाषाणातील प्रचंड हत्तीमुळे पोर्तुगीजांनी या लेण्यांना एलिफन्टा हे नाव दिले. वस्तुतः पोर्तुगीज गव्हर्नर डॉम कॅस्ट्रो याने येथील काही शिल्पपटांचे यथामती वर्णन करून ठेवले. (१५३८). वास्तूची मोजमापे नमूद करून ठेवली. ही शिल्पे त्याला अलौकिक सौंदर्याने नटलेली वाटली. इतकी सुरेख व देखणी शिल्पे मानवनिर्मित असू शकत नाही असेही त्याला वाटले. येथील एक शिलालेख त्याने १५४० मध्ये पोर्तुगालमध्ये पाठविला. तो कधीच परत मिळाला नाही. मात्र शिल्पप्रेमी असा हा एकटाच पोर्तुगीज तेव्हा असावा. इतरांनी या लेण्यांचा उपयोग घोड्यांच्या पागा व गोठा म्हणून केला. पोर्तुगीज सैनिकांनी येथील मूर्तींच्या छातीवर गोळ्या घालून तुकडे उडविले. सैनिकांनी इथे सर्व प्रकारचे स्वैराचार केले. आवाजाचे प्रतिध्वनी कसे होतात हे पाहण्यासाठी त्यांनी लेण्यांमध्ये तोफा उडविल्या. येथील प्रतिमांवर व त्यांच्या अंगोपांगावर असलेले रंग व रंगचित्रे अगदी खरवडून काढली. म्हणूनच हे रंग आज दिसत नाहीत. शिल्पांचे अवयव, हात, स्तन, पाय तोडण्यात त्यांनी स्वतःची करमणूक मानली. करमणूक व परपीडानंद अशा भावनेने पोर्तुगीज सैनिकांनी शिल्पांचे गतिशील चैतन्य, चेहऱ्यावरील स्मित, अंगोपांगावरील खानदानी सौंदर्य प्रयत्नपूर्वक नष्ट केले.

अगदी असुरीवृत्तीने! आणि त्यांच्या देशबांधवांची ही विनाशक कामगिरी डी. कौटा या पोर्तुगीजानेच अभिमानाने लिहून ठेवली. एकूणच भारतीय शिल्पांचा विनाश जितका पोर्तुगीजांनी केला तितका दुसऱ्या कोणत्याही मूर्तिभंजकांनी केलेला नाही. मुंबईतील शिल्पवैभव नष्ट केले त्यांनीच. भारतीय कलाकारांनी कलाजगताला घारापुरीच्या रूपाने दिलेली देणगी अशी विद्रूप झाली. रेवदंडा व चौलच्या भग्नावशेषांची कथा अशीच करुण आहे. (पाहा रायगड गॅझेटिअर, १९९३ पृ. ७३२-७५०, ७५३-७७२, ८३८-८६१)

**प्राचीन सांस्कृतिक पर्यावरण** - महाराष्ट्रातील प्राचीन जीवनाच्या अंगांवर प्रकाशझोत टाकणारे **गाथासत्तसई** (गाथासप्तशति) हे महाराष्ट्री प्राकृतातील पहिलेच काव्य होय. इ.स.वी.च्या पहिल्या शतकात सातवाहन राजा हाल या प्रतिभावंताने सुमारे एक कोटी रचनांमधून सातशे निवडल्या व ग्रंथ तयार झाला. पण नंतर देखील अनेक प्रतिभावंतानी पाचव्या शतकापर्यंत त्यात भर घातली पण रचनांची संख्या सातशेच ठेवली. ए. एस. आळतेकरांच्या मते या ग्रंथाचे सद्यकालीन स्वरूप चवथ्या शतकातील संस्करण असावे. यातून महाराष्ट्रीय जीवनाचे थोडेफार दर्शन घडते. वात्स्यायनाचे कामसूत्र, शूद्रकाचे मृच्छकटिक, महावंश या बौद्ध ग्रंथामधून महाराष्ट्रीय संस्कृतीची थोडी कल्पना येते. तथापि हे तिन्ही ग्रंथ येथील नव्हते. म्हणजे फक्त गाथासत्तसई ही महाराष्ट्रातील कृती होय. किंबहुना याव्यतिरिक्त दुसरा कोणताच लक्षणीय प्राचीन ग्रंथ येथे रचला गेलेला नाही. **पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी** हा एका अनामिकाने लिहिलेला ग्रंथ येथील भूगोल व आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकतो खरा, परंतु लिखिति साधनांपेक्षा पुरातत्त्वीय साधनांवरूनच येथील जीवनावर अधिक प्रकाश पडतो.

भारतातील अश्मयुगावर संशोधनाचा आरंभ मागील शतकात झाला. तरी १९५४ पर्यंत अश्मयुगाच्या उप-कालखंडांविषयी ठोस पुरावा नव्हता. त्या वर्षी एच. डी. सांकलिया यांनी नेवासा जवळ प्रवरा नदीकाठी उत्खनन करून मध्य-पुराश्मयुगीन मानवाची हत्यारे शोधून काढली. त्यापूर्वीचे चित्र अगदीच धूसर होते. शंभर वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील आदिमानवाविषयी काहीच पुरावा नव्हता. म्हणूनच इंग्रजांच्या गॅझेटिअरमध्ये याविषयी काहीच माहिती नाही. इतकेच नव्हे, तर आम्ही काढलेला हिस्टरी ऑफ एन्शट महाराष्ट्र (१९६७) व १९८२ पर्यंत प्रकाशित केलेल्या इंग्रजी जिल्हा गॅझेटिअरांमध्येदेखील अपुरीच माहिती आहे. प्रा. सांकलिया या व्यासंगी इतिहासकाराने व त्यांनीच घडविलेल्या संशोधकांनी ४०-४५ वर्षांमध्ये पुरातत्त्वीय संशोधनाद्वारे मोठी भर घातली. यामुळे आद्य-पुराश्मयुगापासून मध्य-पुराश्मयुग, उत्तर-पुराश्मयुग मध्य-पुराश्मयुग व नवाश्मयुगापर्यंतचा सांस्कृतिक इतिहास क्रमाने रेखाटणे आता शक्य झाले आहे. इतिहासाच्या पूर्वीच्या ज्ञानातील प्रचंड त्रुटी भरून काढण्यासाठी मी एक महत्त्वाकांक्षी योजना बनवून शासनाच्या सहमतीने हे काम तज्ज्ञ सहयोगकर्ता संशोधकांकडे सोपविले. माझ्या कार्यकालात राज्य पातळीवरील या ग्रंथाचे बहुतांश म्हणजे सात सहयोगकर्ता लेखकांचे काम पूर्ण झाले होते. त्यांच्यापैकी दोन अमराठी लेखकांचे मराठीतील रूपांतर प्रगतिपथावर होते. माझ्यानंतर **महाराष्ट्राचा इतिहास : प्राचीन काळ** हा ग्रंथ प्रकाशित झाला (२००२). मात्र याच्या प्रकाशनापूर्वी यातील जिल्हाविषयक माहितीचा उपयोग रायगड, जळगाव वगैरे जिल्ह्यांच्या मराठी गॅझेटिअरांमध्ये मी स्वतः करून घेतलेला आहे.

सांप्रतच्या ज्ञानाच्या पातळीनुसार महाराष्ट्रातील माणसाच्या वसाहतीकरणाचा सर्वात प्राचीन पुरावा आद्य-पुराश्मयुगातील होय. प्रवरा, गोदावरी, मुळा-मुठा, कृष्णा भीमा, तापी, मांजरा व घोड या नद्यांच्या खोऱ्यांमधील आद्य-पुराश्मयुगीन स्थळे उजेडात आली. यातून दगडी हत्यारे, ते बनविण्याचे तंत्र व सामग्री, त्यांचे उपयोग याची माहिती समोर आली. विशेष असे की, या स्थळांचे स्वरूप व पर्यावरणाविषयी अनुमान काढणे शक्य झाले. भारतीय उपखंडात हिमयुगासारखे अतिथंड हवामान नव्हते. नाशिक, नेवासा,

भोकरदन, पौनी, पवनार, मांढळे, अडम, आरणी, आरम्भा, मनसर, वाशिम, ब्रह्मपुरी (कोल्हापूर), पाटणे, पाचाड (रायगड पायथा), हातखंबा, सावळदा, दायमाबाद, महेश्वर, जोर्वे, इनामगाव, प्रकाशे, वाळकी, टाकळघाट, खापा, महुरझरी, नायकुंड, भागी-माहारी, मानेगाव, भाडणे, बोरी, गंगापूर, कौण्डिण्यपूर इ. ठिकाणांच्या शोधमोहिमांमधून तेव्हाच्या मानवी जीवनाविषयी कल्पना आलेली आहे. जीवनोपयोगी वस्तू, आभूषणे व नंतरच्या काळातील नाण्यांमुळे आर्थिक व संस्कृतिविषयक बाबींवर प्रकाश पडलेला आहे. अदमासे सव्वा लाख वर्षांपूर्वी पाण्याची पातळी आतापेक्षा पंधरा-वीस मीटर खाली गेली व समुद्रातील बराच भाग खुला झाला. परशुरामाने बाण मारून कोकणातील समुद्र हटविल्याची कथा या संशोधनामुळे अगदीच काल्पनिक असल्याचे सिद्ध झाले आहे. बाणामुळे नव्हे तर भूस्थित्यंतरामुळे समुद्र पातळी घटली व मोठा भूभाग वसाहत-योग्य झाला.

महाराष्ट्रातील हवामान अश्मयुगातदेखील आताप्रमाणे मोसमी स्वरूपाचे असून आतापेक्षा २०-२५ टक्के अधिक पाऊस पडत असावा असे संशोधकांचे मत आहे. प्रवरा, गोदावरी, घोड, मांजराच्या खोऱ्यात मध्य-अश्मयुगीन बैल, म्हैस, घोडा, गेंडा, पाणघोडा व हरणांच्या अश्मास्थी मिळाल्या. कदाचित इथे दाट गवत, जंगले व दलदलीचा प्रदेश असेल. पैठण भागातील अभ्यासातून तेथे मध्य-पुराश्मयुगीन संस्कृतीची विशेषता दिसून आली. मात्र कोरड्या हवामानात आढळणारा शहामृग पक्षी महाराष्ट्रातील काही भागात उत्तर पुराश्मयुगात असावा. पाटणे, पाचाड व हातखंबा येथील संशोधनाचा उल्लेख वर आलेला आहेच. मानेगावच्या उत्खननात तीन वेगळ्या थरांमध्ये आद्य, मध्य व उत्तर पुराश्मयुगातील माणसाच्या अवजारांचे अवशेष प्राप्त झाले आहेत.

सातवाहन काळात (इ.स. पहिले शतक ते इ.स. तिसरे शतक) महाराष्ट्राची स्वतंत्र प्रतिमा निर्माण झाली. मात्र अलीकडील पुरातत्त्वीय उत्खननातून दिसते की, महाराष्ट्रात ताम्रपाषाण युगाच्याही संस्कृतीच्या ४-५ अवस्था होत्या. तापी खोऱ्यात उदय पावलेली सावळदा संस्कृती (इ.स. पूर्व २०००-१८००) हा यातील पहिला महत्त्वाचा टप्पा मानला जातो. उत्तरेतील सिंधु संस्कृतीच्या ऱ्हासानंतर आलेली 'उत्तर सिंधु संस्कृती' चे (इ.स. पूर्व १८००-१६००) अस्तित्व प्रवरा परिसरातील दायमाबादच्या उत्खननात आढळले. मध्यप्रदेशातील महेश्वरजवळील संशोधनातून शोधून काढलेली 'माळवा संस्कृती' (इ.स. पूर्व १६००-१४००) महाराष्ट्रात अवतरली. संगमनेर जवळच्या जोर्वे गावातील संशोधनातून उजेडात आलेली 'जोर्वे संस्कृती' (इ.स.पू. १४००-१०००) कोकण व विदर्भ वगळता महाराष्ट्रावर पसरली होती. मात्र इथे नमूद करायला हवे की, या सांस्कृतिक अवस्थांबाबत आतापावेतो पुरेसे संशोधन झालेले नाही. महाराष्ट्रातील सर्वात जुनी, सर्वथा स्थानिक व दुसरीकडे न आढळलेली सांस्कृतिक अवस्था म्हणजे 'सावळजा संस्कृती' होय. उत्तर सिंधु संस्कृतीचे लोक गुजरातमधून तापी खोऱ्यात आले असावेत. माळवा संस्कृतीतून जोर्वे संस्कृती विकसित झाली असावी. मात्र तेव्हाचे लोक कोणत्या मानववंशाचे हे सांगता येत नाही. ताम्रपाषाण युगीन संस्कृती इ.स. पूर्व एक हजारच्या आसपास अगदी लयाला गेली असावी. असे संशोधकांचे मत आहे. या काळातील पावसाचे प्रमाण घटल्याने व दुष्काळाची वारंवारता (फ्रिक्वेन्सी) वाढल्यामुळे कृषी व्यवसाय फारच घटला. (**इतिहास : प्राचीन काळ**, खंड १,२००२ पृ. २४, २८-३०, ३६-३८, ४३, ६१-६४)

प्राचीन काळावरील ग्रंथात सातवाहनांच्या इतिहासाविषयी काही अभिनव समीकरणे मांडलेली आहेत. भारतात राज्य करणारे क्षत्रप राजे भारतीय नव्हते तरी ते येथील जीवनाशी समरस झाले. क्षत्रप हा शब्दच मुळी इराणी होय. पश्चिमी क्षत्रपांनी विस्तृत प्रदेशावर सुमारे ४०० वर्षे राज्य केले. साहित्य

अनुक्रमणिका

परंपरेमध्येसुद्धा त्यांना मानाचे स्थान लाभले. भारत सरकारने राष्ट्रीय संवत म्हणून स्वीकारलेले शक संवत ही तर शंकाचीच देणगी होय. अशा परकीयांचा प्रभाव दूरगामी होता हे खास. त्यांनी भारतात विदेशी व्यापाराची परंपरा निर्माण केली.

इ.स.वी.च्या तिसऱ्या ते सहाव्या शतकाच्या प्रारंभापावेतो महाराष्ट्रभर राज्य करणाऱ्या वाकाटकांनी शांतता प्रस्थापित करून सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक सुबत्ता साध्य केली. या काळात अभूतपूर्व धार्मिक जागृती झाली. वाकाटकांचा मूळ गृहपती स्वतः बौद्ध धर्माचा अनुयायी असला तरी वंशजांनी वैदिक व पौराणिक धर्माचा पुरस्कार केला. राजे स्वतः ब्राह्मण असले तरी काहींनी क्षत्रिय व वैश्य मुलींशी विवाह केला. द्वितीय रुद्रसेनाची राणी प्रभावती ही तर वैश्य होती. अनुलोम विवाहाला राजमान्यता होतीच. काही वाकाटक सम्राट स्वतः कवी होते. संस्कृत कवींना त्यांनी उदार आश्रय दिला. कविकुलगुरू कालिदास याला वाकाटक दरबारात मानाचे स्थान होते. जवळच्या रामटेकमध्ये त्याने **मेघदूत** हे सुंदर खंडकाव्य लिहिले. प्रवरसेनाचे **सेतुबंध** हे प्राकृत काव्य मोठी कीर्ती प्राप्त करून आहे. दण्डीनच्या **दशकुमारचिरतमध्ये** समकालीन विदर्भातील राजकीय स्थितीचे सुंदर वर्णन आहे. जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यामध्ये अप्रतिम शिल्प व रंगतचित्रे वाकाटकांच्या कलाप्रेमाची साक्ष देतात. दिलवाडा येथील काही विहार व चैत्यलेण्यांनादेखील वाकाटकांनीच उत्तेजन दिले. त्यांनी बांधलेली उत्तुंग देवालये आज अस्तित्वात नसली तरी त्यांचे वर्णन प्राचीन साहित्यात आहे. पवनारला सापडलेल्या उत्थान व 'गंगा' भगवतीची अतिसुंदर मूर्ती उत्कृष्ट फ्रेंच शिल्पाकृतींशी बरोबरी करू शकते. विलक्षण, मोहक, मादक! तेथील कंसवधमूर्तीला धर्मिकपेक्षा अप्रतिम कलाकृती म्हणून महत्त्व आहे, असे मी मानतो.

वाकाटकांनंतर महाराष्ट्रावर बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट कल्याणीचे चालुक्य, शिलाहार व यादव राजवंशांनी कधी संयुक्तरीत्या तर कधी स्वंतंत्ररीत्या राज्य केले. अगदी राष्ट्रकुटांच्या काळातही महाराष्ट्रात काही मुसलमान असल्याचे शके ८४८ मधील चिंचणीच्या लेखानुसार दिसते. काही अरब लोक राष्ट्रकुटांचे मांडलिक असावेत. व्यापारासाठी आलेली ही मंडळी येथेच स्थायिक झाली.

### आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास

वंशश्रेष्ठत्वाचा टेंभा मिरवणाऱ्या इंग्रजांच्या गॅझेटिअरांमध्ये आधुनिक काळाच्या इतिहासाला नावापुरतेही स्थान नव्हते. भारतात राष्ट्रवाद अथवा आधुनिकता अवतरली नाही व प्रदीर्घ कालापर्यंत अवतरणार नाही अशी त्यांची पक्की धारणा! सर जॉन स्ट्रॅची या गर्विष्ठ सत्ताधीशांचे मत पाहा. याने केंब्रिजच्या विद्यार्थ्यांना ठणकावले. "इंडिया हे राष्ट्र नव्हेच, देशही नव्हे, कधीच नव्हता, नो पीपल ऑफ इंडिया, पंजाब, बंगाल, व मद्रास व वायव्य सरहद्द प्रांतातील लोकांना आपण भारतीय नागरिक आहोत असे कदापि वाटणार नाही". लॉर्ड कर्झन हा तर आपल्याच कार्यकालात (१८९९-१९०५) राष्ट्रीय कॉंग्रेसचे दफन करण्यास उत्सुक होता. अशी जहरी धारणा असलेले इंग्रज भारताच्या आधुनिकतेचा इतिहास कसे लिहिणार. दुर्दैवाने पण स्वातंत्र्यानंतर लिहिलेल्या बऱ्याच गॅझेटिअर ग्रंथांमध्येही या काळाचा इतिहास दुर्लक्षितच राहिला. उदासीनता असेल किंवा सदोष दृष्टिकोनही असेल.

महाराष्ट्रात किंवा एकूण भारतातही आधुनिकतेचे रोपटे लावले भारतीयांनीच, शिक्षण पुणे-मुंबईत प्रथम आणले मिशनरींनी, इंग्रज सरकारने नव्हे. शिक्षण ही शासनाची जबाबदारी नाहीच ही सरकारची धारणा १९२५-२६ पर्यंत होती. शिक्षण खाते स्वतंत्र स्वरूपात १९४७ पर्यंत अस्तित्वात नव्हते. पहिला

अनुक्रमणिका

गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन हा शिक्षणप्रेमी असल्याचा पसरवलेला भ्रम साफ चुकीचा होय. पहिले शिक्षणाचे उपक्रम मिशनरी सुरू करत असतानाच बाळशास्त्री जांभेकर, तर्खडकर, जगन्नाथ शंकरशेट, जमशेटजी जीजीभाय, महात्मा फुले इत्यादींनी पहिली इंग्रजी शाळा स्थिरस्थावर केली. कंपनी सरकार तेव्हा मिशनच्या शाळांनाही पैसा देत नसे. तत्कालीन लोखंडाचे ब्रिटिश कारखानदार व भांडवलदार यांनी केवळ वाणिज्य वृत्तीने रेल्वे उभारली. मुद्दा असा, की आधुनिकता घडवण्यात मोठे योगदान भारतीयांचे व शिक्षणाच्या बाबतीत मिशनरींचे! समाजसुधारणांविषयी तर सरकार भयंकर उदासीनच! सतीच्या प्रथेवरील बंदीपासून प्रत्येक सुधारणाविषयक कायदा करण्यामागे येथील समाजसुधारकांचाच रेटा होता आणि असे कायदे केल्यावरदेखील त्यांची अंमलबजावणी करण्यात सरकार नेहमीच कुचराई करत असे.

युरोपातील रिनॅसन्स भारतातील क्रिया-प्रक्रियांचे संस्करण व बुद्धिवंत वर्गाचा उदय आणि फुले, रानडे, जांभेकर, तर्खडकर, राममोहन रॉय इत्यादींच्या प्रयत्नांमधून आधुनिकता प्रसवली. हा प्रारंभ साधारणपणे मुंबई विद्यापीठाच्या स्थापनेपासून (१८५७) मानता येईल. आधुनिकता, नवविचार व सुधारणांच्या आशाआकांक्षांना वाचा फोडण्याचे केंद्र प्रथम मुंबईत व तेथून पुण्यात आले. मुंबईने देशात प्रबोधन प्रसारणाचे कार्य केले. पुणे-मुंबईतील शिक्षण संस्था देशभर प्रसिद्ध झाल्या. या दोन्ही नगरांचा इतिहास तर विद्यावंत वर्गाचा उदय, त्यांचे कार्य, शिक्षणाचा विकास समाजसुधारणांशी तसेच राजकीय जनजागरणाशी निगडित आहे. मुंबई केवळ आर्थिक राजधानीच नसून भारताचे प्रबोधन व स्वातंत्र्यलढ्याचेही आघाडीचे केंद्र होते. मी स्वतः परंपरेच्या बंधनातून मुक्त झाल्यावर (१९८२), आधुनिक काळाकडे औपचारिकपणे न पाहता राष्ट्रीयत्व व राष्ट्रवादाच्या दृष्टिकोनातून पाहण्याचा निर्धार केला. वैचारिक भूमिका तयार होती. त्यानुसार प्रा. न. फाटक, ग. ह. खरे प्रा. एल. बी. केणी व संपादक मंडळातील द्वा. भ. कर्णिक, प्रा. भा. ल. भोळे इ. शी. चर्चा करून आधुनिकतेच्या इतिहासाचा आकृतिबंध तयार केला. १९८२ मध्ये आधुनिक बृहन्मुंबईच्या इतिहासाचे प्रचंड आव्हान उभे होते. या महानगराला साजेसा व या शहराचे भारताच्या इतिहासातील स्थान लक्षात घेऊनच लेखन करणे आवश्यक वाटले. तसे पाहिल्यास प्रत्येक जिल्हा वा प्रदेशाचा इतिहास राज्य व देशाशी निगडित असतोच. म्हणून मुंबईचा 'स्थानीय' इतिहास लिहिण्याचा माझा संकल्प नव्हता. मौखिक इतिहासाच्या (ओरल हिस्ट्री) रूपातील कथनही नव्हे. येथील सांस्कृतिक संचिताचा मागोवा घेणे आमच्या योजनेत बसत नव्हते. मनोरंजन व ऐतिहासिक आभास साकारण्याचा माझा विचार नव्हताच, म्हणून इतिहास लेखनशास्त्रातील नवीन संकल्पना व पुरोगामी वैचारिक भूमिकेतून इतिहास लिहिण्याचा निर्धार केला. हे काम आव्हानात्मक होते. पण इच्छाशक्ती जबर होती. आणि जिद्दही! यातूनच आधुनिक भारताच्या जडणघडणीत या महानगराची आघाडीची भूमिका चितारण्याचे मी ठरविले.

'सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मूव्हमेन्ट' च्या प्रकाशनासाठी प्रा. फाटकांच्या कार्यालयाने गोळा केलेले गोपनीय अभिलेख आमच्याकडे हस्तांतरित झालेले होते. त्यांत आम्ही गृह विभाग, पोलीस आयुक्त व पोलीस महासंचालकांच्या अभिलेखागारांमधून गुप्तचरांचे अतिगोपनीय कागदपत्र मिळवून मोठी भर घातली. याव्यतिरिक्त दिल्लीतील राष्ट्रीय अभिलेखागारातून मी स्वतः अस्सल दस्तऐवजांच्या हजारो पानांच्या नकला मिळविल्या. मुंबईतील शासकीय अभिलेखागार, शासनाचे व अभ्यासगारांचे अहवाल इत्यादींची लाखो पानांची साधनसामग्री संकलित केली. अशा आधार साहित्यातून आधुनिक महामुंबईचा इतिहास मी साकारला. या विषयाचे महत्त्व व अभ्यासकांच्या गरजा लक्षात घेऊनच आधुनिक मुंबईच्या इतिहासाचा भाग **हिस्टरी ऑफ बॉम्बे : मॉडर्न पिरिअड** या शीर्षकाचा स्वतंत्र ग्रंथ छापण्याचा संपादक मंडळाचा निर्णय शासनाने मान्य केला. ३७४+११ पानांचा हा ग्रंथ व गॅझेटिअरचे तीन

अनुक्रमणिका

खंड १९८६-८७ मध्ये प्रकाशित झाले. यांद्वारे इतिहास संदर्भ साहित्यात मौलिक भर पडल्याचे विनम्रभावे सांगावेसे वाटते. विशेष म्हणजे हे चारही ग्रंथ इतिहासातील बी.ए. तसेच एम.ए. या पदव्यांच्या अभ्यासक्रमांसाठी विहित केलेले आहेत. मुंबईवर अनेक पुस्तके आहेत. त्यांत काही चांगलीही आहेत. तथापि, **हिस्टरी ऑफ बॉम्बे** यामध्ये ज्या विषयांचे विवेचन आहे त्यावर दुसरा एकही उल्लेखनीय ग्रंथ आजवर नाही.

कोणत्याही अभिलेखागाराकडे तेव्हापर्यंत हस्तांतरण न झालेले असंख्य अधिकृत दस्तऐवज मी यासाठी वापरल्यामुळे अभ्यासकांची सोय झालेली आहे. विशेष म्हणजे स्वातंत्र्यलढा काळातील गुप्तचरांचे दैनिक अहवाल, केंद्र सरकारला गृह विभागाने पाठविलेले पाक्षिक अहवाल, जिल्हा पोलिसांचे साप्ताहिक अहवाल, काँग्रेस व इतर पक्षांचे कागदपत्र अशा अधिकृत अभिलेखांवर हा इतिहास आधारित आहे.

मुंबईप्रमाणेच मराठीतील जिल्हा गॅझेटिअरांमध्येही अशा दस्तऐवजांच्या आधारे स्वातंत्र्यलढा, राजकीय व सामाजिक जागृती, समाजप्रबोधन, सांस्कृतिक आसमंत, साहित्य व कलाविश्वाचा साधारणपणे १८५० पासूनचा इतिहास लिहिलेला आहे. स्वातंत्र्यलढ्याव्यतिरिक्त नवविचार, सामाजिक आंदोलन व प्रबोधन, शिक्षणाचा विकास इत्यादी विषयांना यात उचित स्थान देण्यात आले. या विषयांबाबतच्या लिखित माहितीवर व अहवालांवर अवलंबून न राहता समक्ष सर्वेक्षणही करावे लागले. पूर्वीच्या सर्वच ग्रंथांमध्ये राहिलेली ही त्रुटी १९८५-८६ पासूनच्या प्रत्येक ग्रंथात भरून काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुंबई-पुण्याखालोखाल नागपूर, वर्धा, जळगाव, कराड, सातारा, कोल्हापूर परिसरात स्वातंत्र्यलढा व समता आंदोलनास प्रतिसाद मिळाल्याचे लक्षात आले. १८५७ पूर्वी व नंतरही तळागाळातील गरिबांनीही लोकलढे उभारले. आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, सावरकर बंधू, विष्णूपंत पिंगळे, पांडुरंग सदाशिव खानखोजे, शिवराम हरी राजगुरू इत्यादींचे क्रांतिकार्य राष्ट्रीय स्तरावरही गाजले. मार्क्सवादी विचार भारतात एम. एन. रॉय यांनी आणला असा दावा असला, तरी श्रीपाद अमृत डांगे व विल्सन कॉलेजातील त्यांच्या मित्रांनी मार्क्सवादानुसार लढे उभारले. स्वतः रॉय यांनाही महाराष्ट्रातच उत्तम अनुयायी मिळाले. (लक्ष्मणशास्त्री जोशी, कर्णिक बंधू इ.) स्वातंत्र्य आंदोलनात असंख्य स्त्री-पुरुषांनी योगदान दिले. राजा राममोहन रॉय यांच्यापेक्षाही ठसठशित समाज आंदोलन करून दाखवलेले महात्मा फुले, रानडे, प. रमाबाई डोंगरे व शाहू महाराज यांच्या कार्याचे दूरगामी परिणाम झाले. राजेरजवाड्यांच्या महत्त्वाकांक्षांपेक्षा समाजाच्या आशाआकांक्षा अधिक महत्त्वाच्या होत. या दृष्टीने या सर्वांच्या सामाजिक व राष्ट्रीय योगदानाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

भारतीयांनी इंग्रजांशी केलेला संग्राम हा केवळ परकीय राजवटीविरुद्धचा लढा नव्हता. कडव्या वसाहतवादी इंग्रज यंत्रणेशी आर्थिक, राजकीय व सामाजिक शोषक वर्गाविरुद्धाचा हा लढा होता. इंग्रज सत्तेचे अंतर्बाह्य स्वरूप वाणिज्यवादी शोषण यंत्रणा असेच होते. भारतीय अर्थकारण व समाजकारण पूर्णतया ब्रिटिश अर्थव्यवस्थेच्या व भांडवलदारांच्या अधीन करणे व भारताला 'पुरवठादार' बनवणे या वसाहतवादाचे सार होते. हे ओळखून गांधीजींनी अशा सरकारशी असहकार, विदेशी वस्तूंवर व दारूवर बहिष्कार, स्वदेशी व खादीचा पुरस्कार, शेतसारा बंदी, 'करबंदी' असा आर्थिक कार्यक्रम लोकांपुढे ठेवला. सविनय कायदेभंग हा तर इंग्रजांच्या आर्थिक व सामाजिक शोषणावर थेट हल्ला होता. भारतातच तयार झालेले मीठ त्याच स्वरूपात इंग्लंडमधून आयात करावे लागत होते. म्हणूनच मीठ हे एक प्रतीक कल्पून कायदेभंग करण्यात आला. व्हाइसरॉयला पाठविलेल्या निर्वाणीच्या खलित्यात गांधींजींनी जी अकरा सूत्री मागण्याचीं चार्टर घोषित केली होती तिच्यात अकरापैकी नऊ मागण्या अर्थिक शोषण व लूट

थांबविण्यासाठी होत्या. भारतीय लढा अशा लुटीविरुद्ध असल्याचे त्यांनी ठासून सांगितले. या लढ्याला आर्थिक, सामाजिक परिमाण असल्याने पश्चिमेतील देशांनीसुद्धा याकडे जिज्ञासेने पाहिले. इंग्रजांनाही आपले आसन डळमळीत होत असल्याची कल्पना आली (१९३१). हे कथन करण्याचे कारण की, या दृष्टिकोनातून मी मुंबई व जिल्ह्यांतील स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास लिहिलेला आहे. नुसत्या देशप्रेमाने व स्वराज्यप्रेमाने भारतीय उपखंडातील समाज एवढ्या संख्येने व इतक्या प्रदीर्घ काळापर्यंत आंदोलनात सहभागी झालाच नसता. यासाठी आर्थिक व सामाजिक परिमाण आवश्यकच होते. मिठाचा सत्याग्रह, स्वदेशी व बहिष्कार म्हणजे रणनीतीचे पैलू होते. आपले आसन डळमळीत झाल्याचे जाणवल्यामुळे मार्च १९३१ मध्ये विंस्टन चर्चिलने हेटाळणीपूर्वक म्हटले होते की, “हा अर्ध-नग्न फकीर व्हाइसरॉयच्या राजप्रासादात ब्रिटिश क्राऊनशी बरोबरीच्या नात्याने वाटाघाटी करत असल्याची कल्पनाच भयंकर घृणास्पद वाटते.” ही घृणा गांधीजींच्या अर्ध-नग्नतेची नसून या फकिराच्या आंदोलनामुळे आपले साम्राज्य डळमळीत होत असल्याची मुत्सद्दी चर्चिल यास झालेल्या जाणिवेमुळे होती. म्हणूनच १९३२-३३ मधील आंदोलन दडपण्याचा इंग्रजांनी कसून प्रयत्न केला. महाराष्ट्रात गांधीजींकडे आकर्षित होऊन ब्राह्मणेतर पक्ष काँग्रेसकडे १९३० च्या दशकात ओढला गेला. याचे श्रेय शंकरराव देव, न. वि. गाडगीळ, सेनापती बापट, केशवराव जेधे, वि. रा. शिंदे, खंडेराव बागल, नाना पाटील, मुकुंदराव पाटील व यशवंतराव चव्हाणांना द्यावे लागते.

‘छोडो भारत’ क्रांतिलढ्याचा आकृतिबंध व त्याच्या स्वरूपाचे विवेचन करताना इंग्रज गुप्तचरांनी याचे श्रेय गांधीजी, सरदार पटेल व युसूफ मेहअरअलींना दिले. मात्र अच्युतराव पटवर्धन, डॉ. लोहिया व अरुणा असफ अली यांनी मुंबईतून चालविलेल्या भूमिगत केंद्रीय संचालनाचा रोल सरकारला समजण्यास १९४३ हे वर्ष उलटावे लागले होते. या संग्रामालाही राजकीयप्रमाणेच आर्थिक व सामाजिक लढ्याचे परिमाण दिल्याने प्रचंड प्रतिसाद लाभला. यामुळे इंग्रज सत्तेचा पाया व कणा खिळखिळा झाला. सनदी नोकरशाही व पोलिसांचे नीतिधैर्य खचले. सरकारची सर्वंकष हानी झाली. साम्राज्याची अपरिमित हानी झाल्याचे नोकरशाहीने सरकारला कळविले. यातून इंग्रजांनी निष्कर्ष काढला, की इतःपर भारतावर राज्य करणे अगदी अशक्य! जून १९४५ पासून राहिली होती सत्तांतराची प्रक्रिया!

भारतीय स्वातंत्र्यलढा जसा प्रदीर्घ तसाच अनेक विशेषतांनी भरलेला होता. जितका विस्तीर्ण तितकाच विविध विचारप्रणालींनी प्रेरित. काँग्रेस म्हणजे राजकीय पक्षापेक्षा एक आघाडी (फ्रंट) होती. तिच्या परिसीमेवरील गटांनीदेखील एकाच कारणासाठी लढा दिला. प्रचंड वाद व वाग्ताडन झाले. पण मूलभूत विरोध नव्हता. मवाळांनी तथाकथित जहालांचे समर्थन केले. काँग्रेसने अहिंसेचा पुरस्कार करूनही भगतसिंग व सावरकरांचेही समर्थन केले. त्यांच्या सुटकेसाठी गांधीजींइतके प्रयत्न देशातील दुसऱ्या कुणीही केले नाही. आंदोलनाच्या प्रत्येक फेजमधून पुढची फेज निर्माण झाली. १९४७ पासून भारताने चोखळलेला मार्ग व बहुतेक ध्येयधोरणे, आर्थिक नियोजन व सामाजिक धोरणांचेही मूळ काँग्रेसच्या अधिवेशनांमधील ठरावांमध्ये आहे. उदाहरणार्थ, मूलभूत अधिकार व शासनाची निदेशक तत्त्वे आणि धोरणाविषयीचे निर्णय मार्च १९३१ पासूनच्या अधिवेशनांमध्ये झालेले होते.

भारताच्या इतिहासात या पर्वाला सर्वाधिक मानाचे स्थान आहे. कारण प्रदीर्घ अंधःकारमय युगाचा अंत या आंदोलनाने घडविला. क्षितिजावर नवा प्रकाश यामुळे दिसू लागला. नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे पुष्कळ वर्षांपूर्वी आम्ही नियतीशी करार केला होता. एका वचनाला बांधून घेतले होते. त्याची पूर्तता या लढ्याने झाली. देशोन्नती व प्रगतीचा मार्ग यामुळे खुला झाला. विश्वात महासत्ता बनण्याचा मार्ग खुला झाला. १९२०

ते १९४४ पर्यंतच्या आंदोलनाने नुसते स्वातंत्र्यच प्राप्त झाले असे नव्हे. यामुळे विद्यार्थी, शेतकरी, कामकरी व महिलांच्या सामाजिक परिवर्तनास चांगली चालना मिळाली. या वर्गांमध्ये स्वाभिमान जागृत झाला. महिला व अंत्यजांच्या सबलीकरण प्रक्रियेला गती प्राप्त झाली.

## शासनाची पुराभिलेख संपत्ती

अभिलेखागार म्हणजे राष्ट्राचा बहुमोल ठेवा!, नो डॉक्युमेंट, नो हिस्ट्री या उक्तीवरून अभिलेखागाराचे मोल लक्षात घ्यावे. दस्ताऐवजाविना लिहिलेला मजकूर म्हणजे काल्पनिक कथा! इंग्रजांनी भारताचे शोषण केले हे खरे. पण त्यांनी पद्धतशीर अभिलेखागार उभारून उपकारही केले आहेत. मात्र हेदेखील मान्य करावेच लागते की, मुघल, मराठे व पेशव्यांनीसुद्धा आपले दप्तरखाने बऱ्यापैकी जपले होते. मुघलांच दप्तरखाना राजनिवासाजवळच असायचा. फत्तेपूर-सिक्री येथील दिवाणखान्याजवळच दप्तर असायचे. शिवाजी महाराजांचा दप्तरखाना रायगडावर होता. पण संभाजीनंतर तो मुघल सैनिकांनी नष्ट केला. छत्रपती राजारामाच्या जिंजीमधील कागदपत्रांची गत तशीच. फक्त थोरले छत्रपती शाहूंपासूनचा संग्रह सांप्रतचे पेशवे दप्तर व 'एलिएनेशन' संग्रहात विराजमान आहे. पहिल्या बाजीरावाने (१७२०-१७४०) हे दप्तर शनिवारवाड्यात आणले. तेव्हापासून ते चांगल्या अवस्थेत आहे. नंतर हा संग्रह १७६४ ते १७९६ दरम्यान नाना फडणवीसाच्या ताब्यातील नानावाडा नामक वास्तूत सुरक्षित होता. दुसऱ्या बाजीरावाने याचे स्थलांतर शनिवारवाड्यात केले. तथापि, १८०८ मध्ये येथील दालनास आग लागल्यामुळे पेशवे दप्तर गोविंद नाईक व बाबूजी नाईक बारामतीकरांच्या घरी हलविण्यात आले. इंग्रजांनी मे १८१८ मध्ये रायगडावरील दारूकोठारावर कपटाने तोफांनी स्फोट घडवून आणल्यानंतर ज्या महाभयानक आगी लावल्या त्यांत तेथील दप्तरखाना भस्मसात झाला.

इंग्रज महाराष्ट्रात स्थिरावल्यावर त्यांनी विखुरलेले पेशवे व मराठा दप्तर एकत्र केले. पूर्वीचे संरजाम व इनामांचे लाभ पुन्हा मिळवण्यासाठी मराठा सरदार व मानकरी खुशामत करू लागल्यावर त्यांच्या सनदांचे पुनर्निरीक्षण करण्यासाठी इंग्रजांनी इनाम कमिशन नेमले. या आयोगाने सर्व लाभार्थींकडील कागदपत्र मागून घेतले. या एकत्रित संग्रहातील तब्बल तीन कोटी नव्वद लाख कागदपत्र बहुतांश मोडी लिपीत होते. पुण्यातील आताच्या पेशवे दप्तरात व एलिएनेशन संग्रहात हे कागद जतन करून ठेवलेले आहेत. शनिवारवाड्यातील फड म्हणजे पेशवाईचे सचिवालय होते. या सर्व अभिलेखागारासाठी १८९० मध्ये पुण्यात नवीन इमारत बांधण्यात आली. पेशवे दप्तरात मोडीतील कागदपत्रांव्यतिरिक्त पर्शियन, इंग्रजी, गुजराती व हिंदी पत्रव्यवहार देखील आहे. इंग्रजांशी झालेला पत्रव्यवहार पूजा रेसिडेंसी करस्पाँडन्स रेकॉर्ड म्हणून ओळखला जातो. पेशवे दप्तरातील कागदपत्रांचे ३६ विभागांमध्ये वर्गीकरण केलेले दिसते. हे वर्गीकरण विषय व नाव यानुसार केलेले दिसते.

शासनाच्या पुराभिलेख विभागाचे मुख्यालय मुंबईत असून येथे अभिलेखांचा समृद्ध संग्रह आहे. या अभिलेखागाराचा इतिहास साधारपणे ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरत येथील व्यापारी मुख्यालयाच्या स्थापनेपासून सुरू होतो (१६००). पोर्तुगालच्या राजाने शांततेचा तह करण्यासाठी आपल्या मुलीचा विवाह इंग्रज राजपुत्राशी लावून दिला व आंदण म्हणून मुंबइचे दान देण्याचे कबूल केले (११६१). तथापि हे आंदण हस्तगत करण्यासाठी इंग्लंडला बराच संघर्ष करावा लागला. शेवटी आंदणाच्या प्राप्तीसाठी लढाई करावी लागली. १६६४ मध्ये विजय मिळविल्यावरच इंग्लंडला मुंबईची प्राप्ती झाली. यानंतर कागदपत्र इथे आणले. पण या आधी दुसरे शासकीय अभिलेखागार पाहूया.

अनुक्रमणिका

पुण्यातील उपरोक्त पेशवे दप्तर व मुंबईतील अभिलेखागाराच्या व्यतिरिक्त कोल्हापूर, नागपूर व औरंगाबाद येथेही शासनाचे अभिलेखागार आहेत. कोल्हापूरचा संग्रहदेखील खूप जुना आहे. पहिल्या राजारामाने वाचविलेले शिवाजी-संभाजीचे रायगडावरील काही कागदपत्र इथे आहेत. हा संग्रह इथे आणण्यापूर्वी काही काळ पन्हाळगडावर असावा. मात्र तेथेही दोनदा लागलेल्या आगीत बरेच शिवकालीन व नंतरच्या कोल्हापूरच्या संस्थानाचे कागद नष्ट झाले. हे दुर्दैव इथेच संपले नाही. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात लिहिण्याच्या कागदाचा तुटवडा होता. यावर एक उपाय म्हणून इंग्रजांनी कागदाचा लगदा बनविण्यासाठी येथील दस्तऐवज हस्तगत केले. येथील रेसिडेंटने गाडीभर दस्तऐवज केवळ लगदा बनविण्यासाठी लंपास केले. कोल्हापूरचा संस्थानिक राजा सार्वभौम इंग्रजांना विरोध करणार कसा! अशा अनेक कारणांनी दस्तऐवज नष्ट झालेत. मात्र राजकीय किंवा 'दफाता' कागदपत्रांचा संग्रह नवीन राजवाड्यातील एका स्वतंत्र इमारतीत होता. कोल्हापूर संस्थान मुंबई राज्यात विलीन झाल्यानंतर (१ मार्च १९४९) हा अभिलेखागार पुराभिलेख संचालकांच्या अधिकाराखाली आला. ताराबाई-पूर्वकालीन फारच थोडे कागद इथे असले, तरी पेशवे, पटवर्धन, सावंतवाडीचे सावंत, निजाम, कर्नाटकातील पाळेगार, पोर्तुगीज व इंग्रजांशी झालेल्या पत्रव्यवहाराचे कागदपत्र व इचलकरंजी, कुरुंदवाड, बुधगाव व तोरगळच्या अधिपतींशी झालेल्या पत्रव्यवहाराचे कागद येथे आहेत. यामुळे शाहू महाराजांच्या कार्याचे संशोधन करता येते.

नागपुरात १८६२ मध्ये स्थापन झालेल्या अभिलेखागारात नागपूर रेसिडेन्सीचे कागदपत्र जबलपूर, छत्तीसगड, अलाहाबाद व पूर्व विदर्भातील जिल्ह्यांचे कागद तसेच येथील भोसल्यांचे कागदपत्र संग्रहित आहेत. मात्र १९२० नंतरचे बरेच कागद मध्यप्रदेशच्या निर्मितीनंतर भोपाळ येथे गेल्याचे सांगण्यात येते. पण मी स्वतः भोपाळच्या अभिलेखागारात गेल्यावर तेथे मला विदर्भाविषयीचे दस्तऐवज पाहावयाला मिळाले नाहीत. या संग्रहाचे काय झाले हे मी शासनसेवेत असेपर्यंत कधीच समजले नाही. यामुळे विदर्भविषयक अभ्यासात अपूर्णता राहतेच. औंधचे वस्तुसंग्रहालय व ग्रंथालय पाहण्याचा योग मला आला नाही. पण तेथे सुमारे दोन हजार हस्तलिखिते व पंतप्रतिनिधी घराण्याचे वीस हजार कागद आहेत. ही कामगिरी बहुतांश वि. का. राजवाडेंनी करून ठेवलेली आहे. अदमासे २४०-२५० वर्षांपूर्वीचे पर्शियन **महाभारत** औरंगजेबाने स्वहस्ते लिहिलेले कुराण तसेच साडे-सातशे वर्षांपूर्वीचा तिबेटी लिपीतील सोन्याच्या शाईने लिहिलेला बहुमोल ग्रंथही इथे जतन करून ठेवलेला आहे असे म्हटले जाते. येथील अप्रतिम रंगचित्रे व कलावस्तू म्हणजे कलासृष्टीतील सुंदर ठेवा मानला जातो.

मराठवाडा, तेलंगणा, कर्नाटकातील काही जिल्हे व वऱ्हाडवर हैदराबादच्या निजामाचे राज्य होते. म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासाचे संशोधन करण्यास्तव आम्हाला हैदराबादच्या अभिलेखागाराचीदेखील मदत घ्यावी लागतेच. म्हणूनच तीन वेळा तेथे जाऊन मला शेकडो पानांच्या नकला आणाव्या लागल्या. या अत्यंत भव्य व सुव्यवस्थित अभिलेखागारात लाखो पानांचे अभिलेख असल्याचे पाहिले. माझे तर मन थक्क झाले. पण तेथे एक मोठी अडचण अशी, की इंग्रजी व मराठी व्यतिरिक्त बरेच दस्तऐवज उर्दू व पर्शियन भाषांमध्येही आहेत. म्हणून मला एका भाषांतरकाराची मदत घ्यावी लागली होती. मराठवाड्यातील सामाजिक व स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास याशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. या तुलनेत औरंगाबादच्या शासकीय अभिलेखागारात फारच थोडे कागदपत्र आहेत. नागपूरच्या शासकीय संग्रहातदेखील वऱ्हाडाबद्दलचे बरेच अभिलेख दिसत नाहीत. अर्थात हा प्रदेश १९०२ पर्यंत (खरे तर १८५३ पर्यंत) निजामाकडेच असल्याने नागपुरात याबाबतचे कागदपत्र असणे कठिणच!

अनुक्रमणिका

मुंबईतील शासकीय अभिलेखागार अखिल भारतातील सर्वात जुना! इंग्रजीतील साधनसामग्रीचा बहुमोल संग्रह. मुंबईत १६८७ मध्ये स्थानापन्न झालेल्या या खजिन्यात १६३० मधील लेटर बुक नामक सर्वाधिक जुने हस्तलिखित आहे. सुरतहून येथे आणल्यावर या खजिन्याला पहिले घर मिळाले टाऊन हॉलजवळ असलेल्या पहिल्या सेक्रेटरिएटच्या परिसरात. यानंतर १८३२ मध्ये याचे स्थलांतर अपोलो स्ट्रीटवरील (भगतसिंग मार्ग) एका इमारतीत झाले. पुढे १८७४ मध्ये सेक्रेटरिएटची गोथिक इमारत बांधून झाल्यावर (सध्याचे न्यायालय) तेथे या संग्रहाला तात्पुरता निवारा मिळाला. मात्र अभ्यासकांना तेथे प्रवेश निषिद्ध असल्याने त्याबद्दल नागरिकांना काहीही आस्था नव्हती. अखेर १८८८ मध्ये एलफिन्स्टन कॉलेजची इमारत बांधून झाली. तिच्यातच या अभिलेखागारास कायमचे घर लाभले. पण गंमत अशी, की, ही इमारत मुळात शासनाच्या छापखान्यासाठीच बांधलेली होती. मात्र सरकारने मूळ निर्णय बदलून काही भाग कॉलेजला व उर्वरित भाग या महत्त्वाच्या अभिलेखागारास दिला. पण याचे दुर्दैव संपले असे म्हणू नये. कारण काही वर्षांपूर्वी याचे उच्चाटन नवीन मुंबईत करून येथे न्यायालयाला जागा द्यावी असा निर्णय झाल्याचे स्मरते. परंतु तो मुद्दा इथे नाही.

ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापार व राजवट भक्कम होत असताना प्रशासनिक मगरमिठी अभेद्य करण्यास्तव मुंबई, बंगाल, मद्रास अशा तीन प्रेसिडेंसी १७०८ मध्ये निर्माण करण्यात आल्या. वाणिज्य व्यवहारासाठी नेमलेल्या गोऱ्या अधिकाऱ्यांना मॅजिस्ट्रेटचे अधिकार बहाल करून राज्यकारभाराचे घटक बनवले. इंग्रजांनी गोड बोलून पुण्यात वकिलात उघडली. पद्धतशीरपणे पेशवाई गिळंकृत करण्यासाठी सर्व काही केले. पेशव्यांच्या मदतीने आरमारी सत्ता असलेल्या आंग्रे मंडळींचा निःपात केला. आशाळभूत संस्थानिकांना संरक्षण देऊन साम्राज्याचे आधारस्तंभ बनवले. कुटिल राजनीती अनुसरून आपले पाश आवळले. हा सर्व इतिहास इथे सांगता येणार नाही. पण याबाबतचे पुरावे या अभिलेखागारात आहेत. सुरत, भडोच, सिंध, बाणकोट, ठाणे, कारवार, बसरा इ. कार्यालयांचे कागद इथे आहेत. पोर्तुगीज व डचांशी झालेल्या संघर्षात मराठ्यांची घेतलेली मदत व तहनामे येथे आहेत. विद्यापीठ, शिक्षण, कायदे, प्रशासन, गिरण्या व कारखान्यांची स्थापना, कंपनीने व्यापारातून मिळविलेला नफा अशा शेकडो विषयांसंबंधीचे कागद आहेत. रामोशी, महादेव कोळी व भिल्लांची बंडाळी व वासुदेवराव फडकेंचा लढा ठेचून काढण्याची उपाययोजना इथे दिसून येते. टिळक, चाफेकर व सावरकर हे तर इंग्रजांचे खास टार्गेट, महात्मा गांधी, नेहरू, सरदार पटेल यांचा स्वातंत्र्यलढा, युवकांच्या संघटना, सर्वांवरील खटले इत्यादींबाबतचे कागद येथे आहेत. अशा हजारो दस्तऐवजांमधून मी स्वातंत्र्यलढा व सामाजिक आंदोलनाच्या इतिहास लिहून ठेवला आहे.

शिक्षण, आरोग्य दुष्काळनिवारण, शेती सुधारणा, सामाजिक सुधारणा अशा विषयांमध्ये इंग्रजांना अजिबात रस नव्हता. म्हणून ते विषय हाताळण्यासाठी स्वतंत्र खाती नव्हती. १८२० पासूनच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक इतिहासाच्या अभ्यासासाठी ज्युडिशिअल, जनरल, पोलिटिकल व पी.डब्ल्यू.डी. खात्यांच्या फायली पाहाव्या लागतात. शिक्षण विभाग स्वातंत्र्यानंतर निर्माण झाला. साहित्य व संस्कृतीला स्थान नव्हते. मात्र महसूल खाते वित्तप्राप्तीचे माध्यम असल्याने हे खाते १७७९ मध्ये सुरू करण्यात आले होते. सिंधपासून गुजरात, महाराष्ट्र व कारवारपर्यंतच्या प्रदेशावर काही गोऱ्यांच्या मदतीने एकटा गव्हर्नर हुकमत चालवित असे. पण कारभाराचे कागदपत्र व्यवस्थित ठेवण्यात येत.

मुंबई अभिलेखागारात १९६७-६८ च्या सुमारास अदमासे पाच लाख फायली व पुठ्ठा बांधणीतील हस्तलिखित खंड होते. टाईपरायटरचा शोध लागण्यापूर्वीचे पुठ्ठा बांधणीचे ९८,००० हस्तलिखित खंड व


अनुक्रमणिका

साध्या बांधणीच्या चार लाख हस्तलिखित खंडांचा यात समावेश होता. हे सर्व भांडार ब्रिटिश राज्यकारभाराविषयीचे व फक्त सरकारी असल्याने यास खास महत्त्व आहे. विशेष असे, की अनेक दुर्लक्ष ऐतिहासिक पर्शियन ग्रंथ, बहमनी व आदिलशाही सुलतानांची फर्माने, भीमसेन सक्सेनाचे दोन ग्रंथ, इसामी, मुहम्मद अब्दुल चघताई अशा महान इतिहासकारांच्या ग्रंथांच्या छायाचित्रित प्रती येथे जतन करून ठेवलेल्या आहेत. पानिपताबाबतच्या तीन समकालीन ग्रंथांच्या प्रतीसुद्धा विराजमान आहेत. ऐतिहासिक कागदपत्रांच्या महासागराचा १९४७-२००४ दरम्यान ३८७९ अभ्यासकांनी लाभ घेतल्याची एक नोंद मिळते. मात्र या शासकीय साधनसंपदेची जोपासना व वृद्धी केली पी. एम. जोशी, एम. जी. दीक्षित, वि. गो. खोबरेकर व आताचे भास्कर धाटावकर यांनी व त्यांच्या साहाय्यकांनी.

अनुक्रमणिका

# श्रम संस्कृती

# कामगार चळवळ, श्रमसंस्कृती आणि समाजपरिवर्तन



**भानू काळे**

जन्म ११ एप्रिल १९५३, समाजशास्त्र विषयामध्ये पदव्युत्तर पदवी घेतलेले भानू काळे यांनी मुंबई येथे सोळा वर्षे मुद्रण व्यवसाय केला. १९५५ मध्ये त्यांनी अंतर्नाद या वाङ्मय वैचारिक मासिकाची सुरुवात केली. अल्पावधीत हे मासिक महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठित पावले. अंतर्नादकडे मराठीतील साहित्यविषयक एक महत्त्वाचे मासिक म्हणून पाहिले जाते. त्यांनी लिहिलेली तिसरी चांदणी, कॉम्रेड, बदलता भारत, अंतरीचे धावे, स्वभावे बाहेरी ही पुस्तके विशेष प्रसिद्ध आहेत. या पुस्तकांना महाराष्ट्रातील महत्त्वाचे पुरस्कारसुद्धा मिळाले आहेत. भानू काळे यांचा अनेक सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध आहे. विविध परिषदांसाठी त्यांनी विसहून अधिक देशांची भ्रमंती केली आहे.

पत्ता : संपादक अंतर्नाद, सी-२ गार्डन इस्टेट, वायरलेस कॉलनीजवळ, औंध, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी : (०२०) ६५२२७२३३/२५८८३७२६

*"The pivotal question before all of us is : how to save our common legacy of the trade union movement. We are passing through an environment where many people in the World are hankering for a society without trade unions. The situation is so serious that the trade union movement faces destruction if the unions do not come together, shedding their differences and prejudices."*

("आपल्या सर्वांसमोरचा कळीचा प्रश्न हा आहे, की : कामगार चळवळीचा आपला सामाईक वारसा टिकवायचा कसा, आपण एका अशा वातावरणातून जात आहोत जिथे जगातील अनेक माणसे कामगार चळवळ नसलेल्या समाजाची मागणी करीत आहेत. परिस्थिती इतकी गंभीर आहे, की आपले मतभेद आणि पूर्वग्रह बाजूला सारून कामगार चळवळ एकत्र आली नाही, तर तिला विनाशालाच सामोरे जावे लागेल.")

—कॉम्रेड इंद्रजित गुप्ता

(अध्यक्ष, जागतिक कामगार संघटना महासंघ, भारतीय लोकसभेचे चाळीस वर्षांहून अधिक काळ सदस्य, आणि माजी केंद्रीय गृहमंत्री - एकविसांव्या शतकाच्या उंबरठ्यावरील कामगार चळवळ या विषयावर मुंबईत भरलेल्या एका परिषदेचे उद्घाटन करताना)

अनुक्रमणिका

**प्रास्ताविक**

**ए**क मे हा दिवस आपण महाराष्ट्र दिन म्हणून साजरा करतो आणि तोच दिवस जगभर कामगार दिन म्हणूनही साजरा केला जातो हा एक विलक्षण योगायोग आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये, आज महाराष्ट्र जसा काही आहे तसा घडण्यामध्ये, आणि भविष्यात महाराष्ट्र कसा असेल हे ठरवण्यामध्ये कामगारसंघटनांचा महत्त्वाचा हिस्सा असेल हेच जणू सूचित करणारा हा योगायोग आहे.

महाराष्ट्राची राजधानी मुंबई इथेच भारतातील कामगार चळवळ जन्मली आणि इथेच ती फोफावली हे ऐतिहासिक सत्यही सर्वच महाराष्ट्रबांधवांना अभिमान वाटावा असेच आहे.

कामगारचळवळ ही केवळ कामगारांच्या फायद्यापुरती नसते - त्याच्या खूप पलीकडे ती जाऊ शकते; जाते. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी समाजवादी समाजरचनेचे आपले स्वप्न पहिल्यांदा जाहीरपणे मांडले ते ८ डिसेंबर १९२९ रोजी नागपूरला भरलेल्या ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनातच. १२ डिसेंबर १९३० रोजी ब्रिटिश कापडाचे गठ्ठे नेणाऱ्या ट्रकपुढे स्वतःला झोकून देणारा आणि स्वदेशीचे आंदोलन आपल्या प्राणांची आहुती देऊन चेतवणारा बाबू गेनू हा एक कामगारच होता. ज्या १०५ हुतात्म्यांच्या बलिदानातून १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले त्या हुतात्म्यांपैकी अनेक जण कामगारच होते. आणि उद्याचा महाराष्ट्र फुलू शकेल, बहरू शकेल, तोदेखील लक्षावधी कामगारांच्या घामाच्या सिंचनातूनच. हे घडण्यासाठी. 'तुझ्या घामामधून, तुझ्या कामामधून, उद्या पिकेल सोन्याचं रान' हा वसंत बापटांचा आशावाद सार्थ ठरण्यासाठी, कामगार चळवळीची भूमिका मोलाची ठरणार आहे. म्हणूनच महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्णमहोत्सवाप्रीत्यर्थ प्रकाशित होणाऱ्या या महत्त्वाच्या ग्रंथात कामगारचळवळीची व त्या अनुषंगाने एकूणच आपल्या श्रमसंस्कृतीची स्वतंत्र दखल घेतली जात आहे याचे विशेष समाधान वाटते.

'कामगारचळवळ, श्रमसंस्कृती आणि समाजपरिवर्तन' हा विषय तसा खूप व्यापक आहे आणि त्याचे विवेचन महाराष्ट्र राज्याच्या गेल्या पन्नास वर्षांतील वाटचालीच्या संदर्भात करणे हे एक मोठे आव्हानच आहे. हे विवेचन विस्कळीत होऊ नये, त्यात नेमकेपणा व सूत्रबद्धता असावी या दृष्टीने प्रस्तुत लेखकाने विवेचनाचे तीन भाग केले आहेत - (१) कामगारचळवळ - एक संक्षिप्त ऐतिहासिक आढावा, (२) कामगारचळवळीपुढची आजची आव्हाने आणि (३) श्रमसंस्कृती आणि समाजपरिवर्तन.

या सर्व विवेचनातून वाचकाच्या हाती भरीव असे काहीतरी लाभेल अशी आशा आहे.

एकूण कामगारचळवळीचा इतिहास हा एखाद्या स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे, एखाद्या लेखात तो मांडणे अशक्यच आहे, पण महाराष्ट्रातील कामगारचळवळीचे योग्य आकलन होण्यासाठी तिची ऐतिहासिक पार्श्वभूमी अगदी थोडक्यात तरी समजून घेणे आवश्यक आहे.

**१·१ : नेमस्त भूमिकेचा पहिला कालखंड**

कामगारचळवळीची सुरुवात इंग्लंडमध्ये झाली. औद्योगिक क्रांतीचा व पर्याप्त कारखानदारीचा इंग्लंड हाच पाळणा असल्याने कामगारचळवळदेखील तिथेच सुरू होणे तसे स्वाभाविक होते. १८६८ साली

अनुक्रमणिका

इंग्लंडमधील मँचेस्टर या प्रमुख औद्योगिक शहरात ब्रिटिश ट्रेड युनियन काँग्रेसची (टीयुसीची) स्थापना झाली. जगातील ही पहिली कामगारसंघटना. तिचा अध्यक्ष होता कियर हार्डी - चर्चमध्ये नियमित जाणारा एक ख्रिश्चन. 'Brotherhood of men under fatherhood of God' ('देवाच्या पितृत्वाखाली माणसांचा बंधुभाव') हे टीयुसीचे ब्रीद होते. कामगारांना माणुसकीने वागवा हीच त्यांची मागणी होती.

बरेच जण कामगारचळवळीचा संबंध लाल बावट्याशी, व म्हणून कम्युनिझमशी (साम्यवादाशी), जोडतात पण ते चुकीचे आहे. टीयुसीचा - जगातील पहिल्या कामगारसंघटनेचा - साम्यवादाशी काहीही संबंध नव्हता; आजही नाही. American Federation of Labour (AFL) ही जगातील सर्वांत अधिक सदस्य असलेली कामगारसंघटना; तिचाही साम्यवादाशी काहीच संबंध नाही. किंवा स्वीडनमधील कामगारसंघटना ही देशातील समाजात सर्वाधिक प्रभाव असणारी कामगारसंघटना - तीही साम्यवादी नाही. कुठल्याही इझमपेक्षा शोषितांविषयीचा कळवळा व अन्यायाची चीड या मानवी प्रेरणांमध्येच कामगारचळवळीचा जीव साठवलेला आहे

भारतात कामगारचळवळीची मुहूर्तमेढ रोवली ती नारायण मेघजी लोखंडे यांनी. यांनी १८९० साली स्थापना केलेली बाँबे मिलहँड्स असोसिएशन ही भारतातील पहिली कामगारसंघटना. (या कामात त्यांनी शापूरजी बंगाली या पारशी दानशूराची व समाजसुधारकाची खूप मदत झाली होती हे इथे नमूद करायला हवे).

लोखंडे यांचा जन्म १८४८ साली एका गरीब माळी कुटुंबात झाला. त्यांच्यावर महात्मा जोतिबा फुले या ज्ञातिबंधूचा खूप प्रभाव होता. फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केल्यानंतर लोखंडेही त्या कामात भाग घेऊ लागले. काही वर्षे रेल्वे व पोस्ट खात्यांत नोकरी केल्यानंतर लोखंडे यांना मुंबईतील एका कापड गिरणीत स्टोअरकीपर म्हणून नोकरी लागली. तत्कालीन कामगारांचे हाल बघून त्यांनी फावल्या वेळात कामगारांमध्ये काम करायला सुरुवात केली. त्यातूनच बाँबे मिलहँड्स असोसिएशनचा जन्म झाला. मुंबईतील गिरणीकामगारांच्या तक्रारींकडे जनतेचे व सरकारचे लक्ष वेधणे आणि १८८१ सालच्या Factories Act मध्ये सुधारणा घडवून आणणे ही या असोसिएशनची दोन प्रमुख उद्दिष्टे होती. आपल्या विचारांच्या प्रसारार्थ ते 'दीनबंधू' नावाचे एक नियतकालिकही चालवत असत.

याच प्रकारचे काम करणाऱ्या इतरही काही संस्था पुढील काही वर्षांत स्थापन झाल्या. उदाहरणार्थ, १९०९ साली मुंबईत बी. आर. नरे (ज्यांचे स्मारक म्हणजे मुंबईचे नरे पार्क), एस. के. बोले आणि एन. ए. तलचेरकर यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली कामगार हितवर्धक सभा, किंवा १९११ साली मुंबईतच स्थापन झालेली सोशल सर्व्हिस लीग - जी आजही अस्तित्वात आहे. (साधारण याच सुमारास कलकत्ता येथे ब्राह्मो समाजाच्या नेतृत्वाखाली वर्किंग मेन्स मिशन नावाची एक अशीच संस्था सुरू झाली होती. कामगारांना शिक्षण घेता यावे यासाठी रात्रशाळा (night school) चालवायची सुरुवात त्याच संस्थेने भारतात सर्वप्रथम केली. देशाच्या इतरही काही शहरांत त्याच सुमारास कामगारांच्या हिताचे काम करणाऱ्या काही संस्था सुरू झाल्या; परंतु या लेखात आपण शक्यतो महाराष्ट्रातीलच उदाहरणे घेत आहोत.)

या सर्वच संघटनांच्या कामाचे स्वरूप ज्याला कल्याणकारी (Welfare) बाब म्हणात येईल असेच होते. कामगारांचे कष्ट कमी व्हावेत, कामाचे तास मर्यादित असावेत, त्यांना हक्काची सुट्टी असावी,

करमणुकीची साधने असावीत, त्यांना राहायला घरे मिळावीत, त्यांच्या व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची थोडीफार सोय व्हावी, त्यांच्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग असावेत वगैरे स्वरूपाचे काम या कामगार संघटना करीत असत; या संदर्भात सरकार आणि मालकवर्ग यांच्याबरोबर सल्लामसलत करत असत. गोपाळ कृष्ण गोखले यांनी १२ जून १९०५ रोजी स्थापन केलेल्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे मुंबईतील प्रमुख नेते ना. म. जोशी (निधन : १९५५) हेच तत्कालीन कामगारचळवळीचे सर्वांत मोठे नेते होते. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (A.I.T.U.C. ऊर्फ आयटक) हा भारतातील पहिल्या देशव्यापी कामगार महासंघ मुख्यतः त्यांच्याच पुढाकारातून सुरू झाला. सुरुवातीची अनेक वर्षे ते आयटेकचे सरचिटणीस होते. लोखंडे हे भारतातील कामगारचळवळीचे जनक मानले जातात तर ना. म. जोशी हे ह्या कामगारचळवळीचे पितामह मानले जातात. बहुतांशी नेमस्त व जवळजवळ पूर्णतः अराजकीय अशाच स्वरूपाची ही चळवळ होती.

१९२० मध्ये मुंबईत भरलेल्या आयटकच्या पहिल्याच अधिवेशनाचे अध्यक्ष फादर जोसेफ बाप्टिस्टा नावाचे एक ख्रिस्ती धर्मगुरू होते हा इतिहास या संदर्भात लक्षात घेण्यासारखा आहे.

१८९० साली स्थापना झाल्यापासून ते साधारण १९२९ सालापर्यंतचा (चाळीस-एक-वर्षांचा) कालखंड हा भारतीय कामगारचळवळीच्या इतिहासातील पहिला टप्पा मानता येईल. संघर्षाची भूमिका न घेता, व्यवस्थापनाशी व सरकारशी सामोपचाराने वाटाघाटी करत, मुख्यतः कामगार कल्याणाचे प्रयत्न करणारा, नेमस्त भूमिका असलेला असा हा कालखंड होता.

### १·२ : साम्यवादी प्रभावाखालचा दुसरा कालखंड

साधारण १९२९ नंतर भारतीय कामगार चळवळीच्या इतिहासातील दुसरा टप्पा सुरू झाला. त्यावर्षी नागपूर येथे भरलेल्या आयटकच्या अधिवेशनात पंडित नेहरूंनी सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणे प्रथमच समाजवादाचा जाहीर पुरस्कार केला आणि त्याच अधिवेशनात आयटकवर कम्युनिस्टांचे वर्चस्व प्रस्थापित झाले; चळवळीच्या नव्या पर्वाची सुरुवात झाली पण याचे कारण स्थानिक घडामोडी हे नसून जागतिक स्तरावर घडणाऱ्या काही घटनांचाच तो एक परिणाम होता. त्यामुळे हा दुसरा कालखंड नीट समजून घेण्यासाठी त्या जागतिक घडामोडींचा एक धावता आढावा घ्यायला हवा.

इथे आपण कार्ल मार्क्सशी येतो. १८६७ साली मार्क्सच्या 'द कॅपिटल' या क्रांतिकारक ग्रंथाचा पहिला भाग इंग्लंडमध्ये प्रकाशित झाला. (या ग्रंथांचे पुढचे दोन भाग १८८३ साली त्याचा मृत्यू झाल्यानंतर प्रकाशित झाले.)

उत्पादनाच्या प्रक्रियेनुसार (प्रॉडक्शन प्रोसेसनुसार) समाजजीवन घडत जाते; भांडवलदार व कामगार हे समाजातील दोन प्रमुख वर्ग आहेत (आहे-रे आणि नाही-रे, Haves आणि Have nots); त्यांच्यातील संघर्ष (Class War) हा अटळ आहे; आपापसांतील आत्यंतिक स्पर्धेमुळे भांडवलशाही एक दिवस नष्ट होईल आणि जगात कामगारांचे राज्य अस्तित्वात येईल; ही मार्क्सवादातील काही प्रमुख तत्त्वे. "जगातल्या कामगारांनो एक व्हा! गमावण्याजोगे तुमच्या साखळदंडाशिवाय तुमच्याकडे आहेच काय!" ("Workers of the world unite! You have nothing to loose but your chains!") हे त्यांचे आवाहन भारून टाकणारे होते. "प्रत्येकाला त्याच्या क्षमतेनुसार मिळण्याऐवजी त्याच्या गरजेनुसार मिळावे."

अनुक्रमणिका

("From each according to his abilities to each according to his needs.") हे एक आकर्षक स्वप्न त्याने मानवी समाजाला दिले. मार्क्सवादाचे आवाहन हे मुख्यतः हृदयाला होते, खिशाला नव्हते. मार्क्सवादात काव्य होते, 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' नेण्याचे आमिष होते, एक भारावून टाकणारा रोमान्स होता.

याच तत्त्वज्ञानाच्या आधारावर १९१७ मध्ये रशियात जुलमी झारची सत्ता संपुष्टात आणली गेली. एकीकडे साम्राज्यवादी ब्रिटनच्या विरोधात रशिया उभा होता तर दुसरीकडे जुनाट, शेतीधिष्ठित, बुरसटलेल्या अर्थव्यवस्थेच्या विरोधात नेमके हेच दोन प्रमुख शत्रू भारतासारख्या परतंत्र व गरीब देशापुढे होते. 'समानशीले व्यसनेषु सख्यम्' या न्यायाने बहुतेक सर्वच बुद्धिजीवी तरुणांमध्ये त्या वेळी रशियन प्रयोगाविषयी कमालीचे आकर्षण होते. एका अत्यंत किडलेल्या आर्थिक व सामाजिक व्यवस्थेचे आधुनिकीकरण रशियात होत होते. जे परिवर्तन पाश्चात्त्य देशांत दोनशे-तीनशे वर्षांत झाले तेच परिवर्तन मागासलेल्या रशियन राष्ट्रात अवघ्या पंचवीस-तीस वर्षांतच आणण्याचे रशियन नेत्यांचे स्वप्न होते. मानवी इतिहासात समाजपरिवर्तनाचा प्रयोग इतक्या मोठ्या प्रमाणावर पूर्वी कधीही केला गेला नव्हता. या प्रयोगाची भव्यता कुठल्याही तरुण मनाला भुरळ पाडणारी होती, जिंकून घेणारी होती. अशा परिस्थितीत भारतातील वा इतरही बहुतेक परतंत्र देशांतील संवेदनाक्षम नेते कम्युनिझमपासून वैचारिकदृष्ट्या तरी फार वेळ दूर राहूच शकले नसते.

या सगळ्या जागतिक घडामोडींचा भारतातील कामगारचळवळीवर अपरिहार्यपणे खूप प्रभाव पडला. श्रमिकांसाठी झटणाऱ्या कामगारचळवळीतल्या अनेक कार्यकर्त्यांनी मार्क्सवादाचा स्वीकार केला. कुठच्याही छोट्या स्वरूपाचे कार्य करताना त्या कार्यासाठी एखादे व्यापक अधिष्ठान, एखादे व्यापक कोंदण असणे उपयुक्त असते; एखादा ऑपरेटर फक्त एकच मशीन सांभाळत असेल, पण ते करताना आपण एका मोठ्या कारखान्याचे घटक आहोत, ही जाणीव त्याच्या जगण्याला अधिक अर्थपूर्णता देऊ शकते. शेवटी माणूस हा कळपाने राहणारा प्राणी आहे; आपण कुठल्यातरी व्यापक अस्तित्वाचा अंश आहोत ही जाणीव मानवी मनाला सतत सुरक्षितता देत आली आहे; मानवी मनाची ही एक जन्मजात गरज आहे. साहजिकच अनेक कामगार नेते त्यावकाळी 'कॉम्रेड' बनले. कॉम्रेड या शब्दाचा अर्थच शोषितांचा मित्र हा होता, त्या शब्दालाच एक विशिष्ट ऐतिहासिक संदर्भ होता. 'व्यवस्थापनाबरोबर एकत्र बसून सामोपचाराने परस्पर हिताच्या गोष्टींची चर्चा करणे' ही कामगार नेत्यांची आधीची कार्यपद्धत कॉम्रेड्सनी पार बदलून टाकली; तिची जागा झुंजार लढवय्येपणाने घेतली. मोर्चे-घोषणा-निदर्शने-संप ही रोजची हत्यारे बनली. त्यातूनच मग बघता बघता कामगारचळवळ म्हणजे लाल बावट्याची चळवळ हे समीकरण जनमानसात स्थिरावले.

साम्यवादी प्रभावाखालच्या भारतीय कामगारचळवळीचा हा दुसरा टप्पा पुढची साधारण चाळीस वर्षे, म्हणजे १९७० च्या आसपासपर्यंत टिकला कामगारचळवळ हे कम्युनिस्टांच्या दृष्टीने वर्गलढ्याचे (क्लास वॉरचे) प्रमुख हत्यार होते. या हत्याराचा वापर करून राजकीय सत्ता संपादन करायची व त्यातून मग श्रमिकांचे राज्य स्थापन करायचे हे त्यांचे अंतिम उद्दिष्ट होते. परंतु अनेक कारणांनी भारतातल्या लोकशाही राजकारणात हे उद्दिष्ट गाठता येणे दुरापास्त ठरले - अपवाद फक्त केरळ व पश्चिम बंगाल या दोन प्रांतांचा.

अर्थात अंतिम उद्दिष्ट साध्य झाले नाही तरी कामगारचळवळीला लढाऊ आणि जहाल स्वरूप देणात साम्यवाद्यांना यश लाभले ते याच कालखंडात. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई

अनुक्रमणिका

शहरापुरता विचार केला तर हा मुद्दा स्पष्ट होईल. वर्षानुवर्षे इथल्या कामगारचळवळीचे नेतृत्व गिरणी कामगार युनियन या कम्युनिस्ट संघटनेकडे होते. मात्र ही गिरणी कामगारांची अधिकृत मान्यताप्राप्त युनियन कधीच नव्हती - तो मान होता इंटकच्या राष्ट्रीय मिल मझदूर संघाला. मुंबईतील राजकीय सत्ता कम्युनिस्टांच्या ताब्यात जाणे तर कधी शक्यही नव्हते. पण असे असले तरी कामगार मैदानावरील सभेत गिरणी कामगार युनियनने संपाचा नारा दिला रे दिला, की लगेच दोन लाख गिरणी कामगार रस्त्यावर उतरत असत. मोर्चे-निदर्शने यांना उधाण येई, 'लाल बावटा – झिंदाबाद' च्या घोषणांनी गिरणगाव दुमदुमून जाई. गिरणी कामगार युनियनची कचेरी असलेली परळची दळवी बिल्डिंग जणू क्रांतीचे हेडक्वॉर्टर बनून जाई. आणि हे सगळे हाती राजकीय सत्ता अजिबात नसताना आणि युनियनला अधिकृत मान्यता नसतानाही घडत असे.

या दुसऱ्या टप्प्यातील कामगारचळवळ कशी होती याचे हे एक प्रातिनिधिक उदाहरण मानता येईल. १९६७ साली शिवसेनेचा उदय झाल्यानंतर ही परिस्थिती बदलू लागली. कॉम्रेड कृष्णा देसाई यांचा खून हा या संदर्भात एक वळणाचा क्षण (टर्निंग पॉईंट) मानता येईल. त्यानंतर साम्यवाद्यांची कामगारचळवळीवरील पकड झपाट्याने ढिली होत गेली, त्याचबरोबर चळवळीतला झुंजार लढाऊपणाही ओसरत गेला.

### १·३ : विघटनाचा तिसरा कालखंड

त्यानंतरचा पुढचा तीस-एक वर्षांचा - म्हणजे साधारण १९७० ते २००० पर्यंतचा कालखंड हा कामगारचळवळीच्या दृष्टीने संघटनात्मक व्यावसायिकीकरणाचा पण वैचारिक खच्चीकरणाचा कालखंड म्हणता येईल. या खच्चीकरणाची सुरूवात राजकीय सत्ताकारणातून सुरू झालेल्या कामगारशक्तीच्या विघटनातून झाली.

राजकारण आणि कामगारचळवळ यांचे नाते तसे गुंतागुंतीचे आहे. अगदी पहिल्यापासूनच अनेक राजकीय नेते कामगारचळवळीला महत्त्व देणारे होते, कामगारांच्या प्रश्नांविषयी प्रामाणिक कळकळ असणारे होते. मुळात अस्पृश्योद्धाराच्या चळवळीप्रमाणे किंवा स्त्रीशिक्षणाच्या चळवळीप्रमाणे कामगारचळवळीची सुरुवातही समाजाच्या अभिजनवर्गातील काही पुरोगामी मंडळींनीच - म्हणजेच 'बाहेरच्या' मंडळींनीच - केली होती. जे समाजघटक वर्षानुवर्षे शोषित राहिले आहेत, त्यांच्यात स्वतःहून उठाव करायचे सामर्थ्य निर्माण होणे कठीणच असते; ठिणगी पाडणारा 'बाहेरूनच' यावा लागतो. या बाहेरच्या मंडळींपैकी काही जण राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगून होते. कामगारांच्या मागण्या पदरी पाडून घेण्यासाठी राजकीय पाठबळ आवश्यक होते आणि राजकारण्यांनाही संघटित कामगारांचे संख्याबळ हवेच होते. कामगारकार्यकर्ते पक्षाच्या कामी येत होते तर पक्षकार्यकर्ते आपले राजकीय वजन कामगारप्रश्न सोडवण्यासाठी वापरत होते. यात दोन्ही बाजूंचा फायदाच होता. लाला लजपतराय, सुभाषचंद्र बोस, जवाहरलाल नेहरू वगैरे अनेक मोठे नेते आयटकच्या (तत्कालीन एकमेव देशव्यापी कामगार महासंघाच्या) कामात रस घेत असत, सल्लामसलत करत असत. महात्मा गांधींनी तर स्वतःच अहमदाबादच्या गिरणी कामगारांची मजूर महाजन नावाची संघटना सुरू केली होती. पण त्या सर्वच बड्या नेत्यांचे मुख्य ध्येय देशासाठी स्वातंत्र्य मिळवणे हेच होते, कामगारसंघटनेच्या प्रत्यक्ष कामात त्यांची ढवळाढवळ नसे.

परंतु स्वातंत्र्योत्तर काळात ही परिस्थिती बदलत गेली. राजकीय लोकशाहीने अनेक पक्षांना जन्म दिला व त्या सर्व स्वतःच्या कामगारसंघटना उभारल्या. पूर्वी फक्त आयटक (कम्युनिस्ट वर्चस्वाखाली) होती, नंतर काँग्रेसने इंटक (Indian National Trade Union Congress) सुरू केली, समाजवाद्यांनी एचएमएस (Hind Mazdoor Sabha), जनसंघाने बीएमएस (Bharatiya Mazdoor Sangh) सुरू केली. पुढे त्यांच्यातही फूट पडत गेली. उदाहरणार्थ, डाव्या कम्युनिस्टांनी सिटू (Centre of Indian Trade Unions) वा संयुक्त समाजवाद्यांनी एचएमपी (Hind Mazdoor Panchayat) सुरू केली. कामगार चळवळीत पूर्वीच सुरू झालेली ही विघटनाची प्रक्रिया या तिसऱ्या कालखंडात पूर्णत्वाला गेली.

हे विघटन केवळ राष्ट्रीय महासंघांच्या पातळीवर न राहता अगदी स्थानिक पातळीवरही उतरले. एकेका कारखान्यात चार-चार युनियन्स झाल्या. या कालखंडात औद्योगिकीकरण वाढले, मोठ्या शहरांपुरती सीमित असलेली कारखानदारी कमी-अधिक प्रमाणात ग्रामीण भागातही पसरली आणि त्याचबरोबर युनियन्सची संख्याही झपाट्याने वाढली. पण राजकीय प्रक्रियेतून होत गेलेल्या विघटनामुळे युनियन्सची संख्या वाढूनही त्यांचा प्रभाव मात्र वाढला नाही; किंबहुना तो कमी कमी होत गेला.

या विघटनाला आणखी एक दुर्दैवी पदर होता - आणि तो म्हणजे व्यक्तिगत नेतृत्वाची वाढ आणि त्यातून पडत गेलेली संघटनांची अधिकाधिक शकले.

या काळातल्या दोन मोठ्या कामगार नेत्यांचा उल्लेख या संदर्भात उदाहरणादाखल करायला हरकत नाही.

असोसिएशन ऑफ इंजिनीअरिंग वर्कर्स ही डॉ. दत्ता सामंत यांनी उभारलेली बलाढ्य कामगार संघटना. जवळपास दीड-दोन लाख कामगार तिचे सदस्य होते आणि १९७५ नंतरचे संपूर्ण दशक डॉ. सामंत त्यांचे अनभिषिक्त राजेच होते. चांदिवलीच्या दगडीखाण कामगारांच्या कुटुंबीयांवर उपचार करता करता त्यांच्या आजाराचे मूळ दारिद्र्यात व शोषणात आहे हे जाणवून, त्यांना संघटित करण्यासाठी प्रॅक्टिस सोडणारे डॉ. सामंत बघता बघता कामगारांच्या गळ्यातले ताईत बनले. गोदरेज, प्रिमियर ऑटोमोबाईल्स, मुकुंद आर्तन, क्रॉम्प्टन ग्रीव्हज अशा असंख्य बड्या कंपन्यांतील कामगारांना त्यांनी भरघोस पगारवाढ मिळवून दिली. पण पुढे त्यांच्या नेतृत्वाखालचा गिरणी कामगारांचा संप अयशस्वी ठरला व त्यानंतर डॉ. सामंत यांची दुर्दैवी हत्याच झाली. या सर्व कालखंडात त्यांची युनियन 'डॉ. सामंत यांची युनियन' म्हणूनच ओळखली जात होती, तिची सर्व धोरणे एक व्यक्तीच ठरवत होती. त्यामागे कुठच्याही राजकीय विचारसरणीची बांधीलकी नव्हती. जिथे जिथे त्यांची युनियन गेली तिथे तिथे पूर्वी कामगारांच्या वेगवेगळ्या मान्यताप्राप्त युनियन्स होत्या - ज्यांची डॉ. सामंत नावाच्या वादळापुढे पार ससेहोलपट झाली. इतकी, की डॉ. सामंतांच्या अस्तानंतर तिथे दुसरी कुठलीच युनियन पुन्हा पाय रोवू शकलीच नाही. जागतिकीकरणाच्या लाटेत पुढे कापड गिरण्यांप्रमाणेच यांतले असंख्य कारखानेही बंद झाले, जे टिकले त्यांच्यात प्रचंड प्रमाणावर कामगार कपात झाली; पण त्या सगळ्याविरुद्ध आवाज उठवायचे बळच तिथल्या मोडतोड झालेल्या कामगार संघटनांमध्ये उरले नव्हते.

१७ जुलै २००३ रोजी कालवश झालेले आर. जे. मेहता अशाच पूर्णतः व्यक्तीकेंद्रित कामगार नेतृत्वाचे दुसरे एक ठळक उदाहरण. कुठल्याही राजकीय पक्षाशी संलग्न नसलेल्या त्यांच्या मुंबई मझदूर सभेचे जवळपास पन्नास हजार सदस्य होते, मध्यम आकाराचे जवळपास तीनशे कारखाने त्यांच्या ताब्यात

अनुक्रमणिका

होते. हिऱ्यांच्या व्यापारासाठी प्रसिद्ध असलेल्या पालनपुरी जैन समाजातील हा माणूस, सिडनेहॅम कॉलेजमधून पदवी घेतल्यानंतर याने स्वतःला पूर्ण वेळ कामगारचळवळीत झोकून दिले. कायद्याचे सूक्ष्म ज्ञान, कंपनी बॅलन्स शीटचा सखोल अभ्यास (डॉ. सामंतांचा या बॅलन्स शीट्सवर कणभरही विश्वास नव्हता, मागण्यांना विरोध करताना कधी व्यवस्थापनाने बॅलन्स शीट पुढे केली, तर डॉ. सामंत तिला हातही लावत नसत.), आणि वाटाघाटींवरील प्रभुत्व यांच्या बळावर त्यांनी आपल्या कामगारांचा खूप फायदा करून दिला. प्रत्येक पगारवाढीच्या वेळी थकबाकीच्या रकमेची विशिष्ट टक्केवारी राजरोसपणे युनियनसाठी म्हणून कापून घेण्याची पद्धत कामगारचळवळीत आरजेंनीच सुरू केली. यातून त्यांची युनियन आर्थिकदृष्ट्या इतर कामगार नेत्यांना हेवा वाटावा इतकी समृद्ध झाली हे खरेच, पण त्याचबरोबर संप दीर्घकाळ रेंगाळला तर संपकरी कामगाराचे कुटुंब उपाशी राहू नये म्हणून त्याला दरमहा उचल देणाराही हा एकमेव कामगार नेता होता हेही खरे.

पण इथेही पुन्हा डॉ. सामंतांप्रमाणेच पूर्णतः व्यक्तिकेंद्रित नेतृत्व. अशा नेतृत्वातून काही कामगारांचा तात्कालिक फायदा झाला, तरी एकूण कामगारचळवळीला बळ लाभत नाही. उलट स्वतःला जास्त पगारवाढ मिळवून देऊ शकेल अशा कुठल्याही नेत्यामागे जायची प्रवृत्ती कामगारांमध्ये वाढीस लागते, नेत्यांमध्येही मग अधिकाधिक पगारवाढीचे आमिष दाखवण्याची चढाओढ सुरू होते. वाढत्या लोकानुनयाचा हाच प्रकार आज राजकीय क्षेत्रात सुरू झालेला आपल्याला दिसतो व हाच प्रकार विघटनाच्या वाढत्या प्रवृत्तीतून कामगार क्षेत्रातही बोकाळला. आज तर अनेक ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, गल्लीतल्या कुणाही गुंडाने हातात झेंडा घेऊन कंपनीच्या गेटवर उभे राहावे आणि स्वतःला युनियन लीडर घोषित करावे! वरिष्ठ नेतृत्वाचा स्थानिक पातळीवर जराही वचक उरलेला नाही. एकेकाळी बहुतेक उद्योग मुंबईत होते व साहजिकच कामगारचळवळही मुंबईकेंद्रित होती. त्यावेळी वरिष्ठ नेत्याचे युनियन्सवर थोडेफार तरी लक्ष असायचे. पण आज मात्र उद्योगक्षेत्राचे विकेंद्रीकरण होत आहे; उदाहरणार्थ, एम.आय.डी.सी.च्या औद्योगिक वसाहतींचे जाळे राज्यभर पसरले आहे. तिथल्या कामगारचळवळीला कसलाच धरबंद उरलेला नाही.

लेखाच्या सुरुवातीला उद्धृत केलेला कॉम्रेड इंद्रजित गुप्ता यांनी दिलेला निर्वाणीचा इशारा म्हणूनच इतका समयोचित आहे.

या तिसऱ्या कालखंडाचे आणखी एक वैशिष्ट्य नमूद करावेसे वाटते, ते म्हणजे कामगारसंघटनांचे झालेले व्यावसायिकीकरण. पूर्वीचे कामगार युनियनची अगदी कमी असलेली वर्गणीही कधीच नियमितपणे भरत नसत, आता ती परस्पर पगारातून कापली जायची सोय झाल्याने कामगार नेत्यांच्या हातात प्रथमच पैसा खेळू लागला. या आर्थिक स्थैर्यातून अनेक चांगल्या गोष्टी घडल्या. उसळपाव खाऊन दिवस काढायची आता कामगार नेत्यांना, कार्यकर्त्यांना गरज राहिली नाही. त्यांना नियमित व बऱ्यापैकी पगार मिळू लागला. वेगवेगळ्या कामांसाठी पगारी कर्मचारी नेमायची, कोर्टात केसेस लढवण्यासाठी चांगले वकील नेमायची सोय झाली. संघटनांचे अंतर्गत व्यवस्थापन सुधारले. कामात नीटनेटकेपणा आला. ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियन, राष्ट्रीय मिल मझदूर संघ, केमिकल वर्कर्स युनियन अशा अनेक संघटनांच्या स्वतःच्या इमारती मुंबईत उभ्या राहिल्या. दिमतीला वाहनांचे ताफे आले, जगण्याला स्वास्थ्य आले, विमानप्रवास-परदेशवाऱ्या या नित्याच्या बाबी झाल्या. एकूणच कामगारसंघटनांना एक व्यावसायिक परिपक्वता आली.

अनुक्रमणिका

हे बदल स्वागतार्हच होते आणि कामगारांचाही त्यांना विरोध नव्हता; त्यांचीही परिस्थिति या कालखंडात सुधारली होती, नेत्यांकडून अनावश्यक त्यागाची आता ते अपेक्षाही करत नव्हते.

पण खटकणारी गोष्ट म्हणजे हे व्यावसायिकीकरण कामाच्या सगळ्या घटकांमध्ये आले नाही; केवळ प्रशासकीय पातळीपुरतेच ते राहिले. उदाहरणार्थ, नेतृत्वाचे लोकशाहीकरण झाले नाही. त्यामुळे तरुणांना कार्यकर्ता म्हणून छोटी-मोठी प्रशासकीय कामे करण्यापलीकडे वावच मिळाला नाही. चळवळीत नवीन बुद्धिमान तरुण येईनासे झाले. परिणाम म्हणजे आजही कामगारचळवळीची बहुतेक सर्व सूत्रे जुन्या, आता वयपरत्वे थकलेल्या नेत्यांकडेच आहेत; नवे नेतृत्व क्षितिजावर फारसे कुठे दिसत नाही.

स्वयंस्फूर्त कार्याचे एन.जी.ओ. करण झाल्यावर तिथे जो फरक पडला, साधारण तसाच फरक या कालखंडात कामगारचळवळीतही पडला. सेवाभाव लयास गेला आणि त्याची जागा व्यावहारिक चातुर्याने घेतली.

कामगारचळवळीच्या मुंबईकेंद्रित मुख्य प्रवाहाच्या बाहेरही काही कामगारसंघटना महाराष्ट्रात होत्या. तिथल्या परिस्थितीचाही इथे थोडक्यात उल्लेख करायला हवा. मुंबई ठाण्यानंतर पुण्याला उद्योगधंदे सुरू झाले. ऑर्डनन्स फॅक्टरी (दारूगोळ्याचा कारखाना) हा त्यातला एक प्रमुख. तिथे साथी एस. एम. जोशी यांची युनियन होती. खाजगी क्षेत्राचा विचार केला तर टेल्को (आताची टाटा मोटर्स) ही पुण्यातली सर्वात मोठी कंपनी. तिथे चटर्जी, राजन असे वेगवेगळे लढाऊ नेते होऊन गेले. महाराष्ट्रात काही पब्लिक सेक्टरमधील महत्त्वाची युनिट्स होती. उदाहरणार्थ, नाशिकचा सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेस किंवा ओझरचा मिग विमान कारखाना. तिथे स्थानिक नेतृत्वाखालच्या अंतर्गत युनियन्स होत्या. या काळात महाराष्ट्रभर सहकारी साखर कारखाने उभे राहिले. तिथल्या कामगारांचे नेतृत्व साथी किशोर पवार यांच्याकडे होते. स्टेट ट्रान्सपोर्टचे कर्मचारीही महाराष्ट्रभर विखुरलेले होते. ते भाऊ फाटकांना मानत असत. अलीकडे बीड परिसरात ऊसतोडणी कामगारांची संघटना उभी राहिली. गोपीनाथ मुंडेंकडे त्यांचे नेतृत्व आले.

पण या सर्व युनियन्स स्थानिक पातळीवरच कार्यरत होत्या; त्यांचा एकूण कामगारचळवळीवर फारसा प्रभाव पडला नाही.

ऑल इंडिया पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशनचा स्वतंत्र उल्लेख करायला हवा. त्यांच्या कामाच्या स्वरूपामुळे त्यांचा प्रभाव देशभर पडायचा. भारताच्या इतिहासातील पब्लिक सेक्टरमधला पहिला अखिल भारतीय संप याच संघटनेने लढवला. गोदीकामगारांसाठी स्वतंत्र वेज बोर्ड (वेतन आयोग) असावे या मागणीसाठी. तो पूर्ण यशस्वी ठरला. पंडित नेहरूंनी या संपात स्वतः हस्तक्षेप केला होता. देशाच्या पंतप्रधानांनी एखाद्या संपात हस्तक्षेप करायचा हा पहिला (आणि बहुधा शेवटचा) प्रसंग. एस. आर. कुलकर्णी वा मनोहर कोतवाल यांसारखे या महासंघाचे नेते राजकारणापासून सतत दूर राहिले, संघटनेचा उपयोग ज्यांनी राजकीय सत्ता मिळवण्यासाठी एखाद्या शिडीप्रमाणे कधी केला नाही, हे त्यांचे आणखी एक वेगळेपण. त्यांचा संबंध राज्य सरकारबरोबर किंवा स्थानिक व्यवस्थापनाबरोबर फारसा नव्हता, केंद्र सरकारबरोबरच होता, हेही एक वेगळेपण.

अनुक्रमणिका

बँक व विमा कामगारांचे नेतेही तसे राजकारणापासून दूर राहिले. त्यांचे वेगळेपण म्हणजे ते बहुतेकदा स्वतःही संबंधित बँकेत वा विमा कंपनीत नोकरी करणारे असत. स्वतः कर्मचाऱ्यांमधूनच संघटनेचे नेतृत्व कायम उभे राहायचे; अशी उदाहरणे भारतीय कामगारचळवळीत कमीच आहेत.

असो. आज मागे वळून कामगारचळवळीचा एक संक्षिप्त आढावा घेताना आपल्याला हे तीन महत्त्वाचे टप्पे जाणवतात : सुरुवातीचा १८९० ते १९२९ हा मुख्यतः कल्याणकारी, नेमस्त कार्यावर भर देणारा कालखंड, नंतरचा १९३० ते १९७० हा साम्यवादी प्रभावाखालचा जहाल आणि लढाऊ नेतृत्वाचा कालखंड आणि त्यानंतरचा तिसरा साधारण १९७० ते २००० हा कामगारसंघटनांच्या विघटनाचा कालखंड. कामगारसंघटनांच्या सद्यःस्थितीचे मूल्यमापन करताना, तिच्यासमोरील आव्हानांचा वेध घेताना या पूर्वेतिहासाचे भान ठेवणे उपयुक्त आहे.

भारतात कामगारचळवळ सुरू झाली त्याला आता शंभर वर्षे उलटून गेली आहेत. या शंभर वर्षांत जग पार बदलून गेले आहे. या बदलाचा वेग गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढला आहे. बदलाबरोबर नवी-नवी आव्हाने उभी राहत असतात आणि त्या आव्हानांना तोंड देत राहणे व तसे करता करता स्वतःही बदलत राहणे हे स्वतःची परिणामकारकताच नव्हे तर अस्तित्व टिकविण्याच्या दृष्टीनेही अत्यावश्यक आहे. उत्क्रांतिवादाचा प्रणेता चार्ल्स डार्विन हा तसा कार्ल मार्क्सचा समकालीन. (मार्क्स : १८१८ ते १८८३, डार्विन : १८०९ ते १८८२) भोवतालच्या परिस्थितीनुसार ज्यांनी स्वतःमध्ये बदल घडवून आणले तेच प्राणी कालौघात टिकून राहिले आणि ज्यांनी तसे बदल स्वतःमध्ये घडवून आणले नाहीत असे प्राणी - मग ते डायनॉसॉर्ससारखे प्रचंड असले तरीही - कालौघात नामशेष झाले असे डार्विनचा उत्क्रांतिवाद सांगतो. कामगारचळवळही या नियमाला अपवाद असणार नाही, तिलाही भोवतालच्या आव्हानांना तोंड देत देत बदलत राहावे लागेल. अशी कोणती आव्हाने आज कामगारचळवळीपुढे आहेत ज्यांना तोंड देण्यासाठी कामगारचळवळीला स्वतःमध्ये बदल घडवून आणावे लागतील?

कामगारचळवळीपुढची ही आव्हाने तशी अनेक आहेत, पण प्रस्तुत लेखात आपण त्यांतल्या चार प्रमुख आव्हानांचा परामर्श घेऊ.

**२·१ : बदलत्या तंत्रज्ञानाचे आव्हान**

ज्या कार्ल मार्क्सचा कामगारचळवळीच्या एका मोठ्या कालखंडावर इतका प्रभाव पडला तो मार्क्स आपल्या तत्त्वांना नेहमी 'शास्त्रीय' ('सायंटिफिक') हे विशेषण लावत असे आणि असे असूनही कामगारचळवळीला बदलत्या तंत्रज्ञानाशी फारसे कधी जुळवून घेता आले नाही म्हणजे नवलच म्हणायचे! याचे उत्तम उदाहरण म्हणजे संगणक.

आज संगणकाशिवाय जगाची आपण कल्पनाही करू शकत नाही. इतका तो आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. उदाहरणार्थ, कंपन्यांकडून भागधारकांना (शेअरहोल्डर्सना) होणारे डिव्हिडंडचे वाटप. रिलायन्स वा टाटा स्टील यांसारख्या अनेक कंपन्यांच्या भागधारकांची संख्या आज लाखोंच्या घरात आहे. या सर्वांच्या डिव्हिडंडचे चेक्स हाताने लिहिणे, ते टपालाने घरोघर पाठवणे, नंतर भागधारकाने ते आपापल्या बँकेत जाऊन भरणे, बँकेने ते क्लिअरिंग हाऊसला पाठवणे, आणि अंतिमतः ती रक्कम भागधारकाच्या खात्यात जमा होणे हा सगळा व्याप आज संगणकाअभावी केवळ अशक्यप्राय आहे.

तसे करायला गेल्यास त्यात होणारी कागदाची-पर्यावरणाची हानी, प्रचंड खर्च, मनुष्यबळाची गुंतवणूक हे सगळे केवळ कल्पनातीतच आहे. पण संगणकीय तंत्रज्ञानामुळे हे सगळे सहजसुलभ झाले आहे. कंपनीने डिव्हिडंडची रक्कम जाहीर केल्यानंतर ती रक्कम भागधारकांच्या बँक खात्यात इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सिस्टिममुळे अवघ्या चोवीस तासांत विनासायास जमा होते! पण असे असूनही कामगारचळवळीने मात्र वर्षानुवर्षे संगणकाला कडाडून विरोध केला होता. संगणकांची तोडफोड करण्यापासून त्यांच्या वापराविरुद्ध संप करण्यापर्यंत सगळे प्रकार केले गेले आहेत!

सामान्यतः लोकांची प्रवृत्ती ही नव्या तंत्रज्ञानाला विरोध करण्याची असते. १८५० च्या सुमारास भारतात जेव्हा प्रथम रेल्वे धावू लागली तेव्हा तिलाही असाच विरोध झाला होता. 'साहेबाचा पोर कसा नकली रे, बिनबैलाची गाडी कशी हाकतो रे' असे एक गाणे तेव्हा लोकप्रिय झाले होते. संगणकाच्या बाबतीतही हेच घडले.

खुद्द संगणकामध्ये झपाट्याने क्रांतिकारक परिवर्तन होत गेले. १९४६-४७ साली जेव्हा पहिला ENIAC कंप्युटर तयार केला गेला, तेव्हा त्यात तब्बल १९,००० व्हॉल्व्हज् (व्हॅक्युम ट्यूब्स) होते, त्याचा आकार एखाद्या पाच मजली इमारतीएवढा होता व त्याचे वजन ३० टन होते! तो चालवायला शेकडो तंत्रज्ञ लागत! पण पुढच्या दहा वर्षांत ट्रान्झिस्टर्सचा शोध लागल्यानंतर हा आकार शंभर पटींनी कमी झाला. नंतरच्या सेमीकंडक्टर्सच्या शोधामुळे तो आणखीच कमी झाला आणि पुढे सिलिकॉन चिप्सच्या शोधानंतर तर तो अगदीच सुटसुटीत झाला. आता सगळीकडे लॅपटॉपचा जमाना सुरू झाला आहे आणि काही ठिकाणी तर पामटॉप (तळहातावर राहतील अशा) कंप्युटरचे दिवस आले आहेत.

१९८० च्या सुमारास आलेल्या सॅटेलाईट क्रांतीमुळे जगभरचे लक्षावधी संगणक एकत्र जोडण्याची शक्यता निर्माण झाली, World Wide Web (www) तयार झाले व त्यातूनच माहिती तंत्रज्ञान (Information Technology) विकसित झाले. नवी रोजगारनिर्मिती आज याच क्षेत्रात सर्वाधिक आहे.

गेल्या काही वर्षांत भारतात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची प्रचंड वाढ झालेली आहे आणि त्या क्षेत्रातील अनेक बड्या कंपन्या महाराष्ट्रात मुंबई, ठाणे व पुणे इथे आहेत. लक्षावधी कर्मचाऱ्यांना तिथे नोकऱ्या मिळाल्या आहेत. ज्याला आपण कॉल सेंटर्स किंवा Business Process Outsourcing म्हणतो तो या माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचाच एक भाग आहे. कामगारसंघटनांपुढे तंत्रज्ञानाने निर्माण झालेले आव्हान इतर कुठल्याही उद्योगापेक्षा या उद्योगात अधिक प्रखर आहे.

दुर्दैवाने भारतातील कामगारचळवळ या प्रचंड अशा आणि विशेष म्हणजे मानवकेंद्रित अशा, उद्योगापर्यंत अजून पोचलेलीही नाही. इथल्या कर्मचाऱ्यांना - ज्यांत उच्चशिक्षित तरुण-तरुणींचा भरणा सर्वाधिक आहे - आपल्या कार्यकक्षेत कसे सामावून घ्यायचे हे कामगारसंघटनांना लौकरच निश्चित करावे लागेल. कारण येत्या काही वर्षांत लक्षावधी रोजगार या क्षेत्रात नव्याने तयार होणार आहेत.

या माहिती तंत्रज्ञानाचे स्वरूप अन्य उद्योगांपेक्षा मूलतः भिन्न आहे. उदाहरणार्थ, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) घ्या. ही या क्षेत्रातली भारतातली आद्य कंपनी तिचे मुख्य कार्यालय मुंबईत आहे. टिस्को किंवा टाटा मोटर्स या टाटा ग्रुपच्याच इतर कंपन्यांसारखा टीसीएसचा कुठलाच मोठा कारखाना नाही. डोळ्यांना दिसेल असे पोलाद वा वाहने यांसारखे उत्पादन नाही. त्यांना सहसा कधी जाहिरातही करावी

अनुक्रमणिका

लागत नाही. पण तरीही टिस्को किंवा टाटा मोटर्सपेक्षा कितीतरी जास्त लोकांना, कितीतरी जास्त पगार देऊन, टीसीएस नोकरी देते आणि आपल्या शेअरहोल्डर्ससाठी कितीतरी जास्त नफाही कमावते.

या आयटी सेक्टरमधील प्रत्यक्ष दैनंदिन कामाचे स्वरूपही मुख्यतः तंत्रज्ञानामुळे अतिशय वेगळे असे झाले आहे. बघायला गेले तर या कंपन्यांचे ‘उत्पादन’ असे काहीच दिसत नाही. ऑफिसच्या छतावर बसवलेल्या एखाद्या सॅटेलाइट डिशमधून त्यांचे सगळे ‘उत्पादन’ परदेशी पाठवले जाते. त्यासाठी लागणारा सगळा ‘कच्चा माल’ हासुद्धा त्यांना सॅटेलाइटमार्फतच प्राप्त होतो; कारण तो ‘कच्चा माल’ वस्तुरूप नसून ‘डाटा’ या स्वरूपातच असतो व प्रक्रिया करून तो परत ‘डाटा’ याच स्वरूपात परदेशी गिऱ्हाइकांना परत पाठवला जातो. इथे कागदोपत्री तरी कामाची ठरीव वेळ नसते, ‘फ्लेक्सी अवर्स’ असतात - म्हणजे कर्मचारी खूपदा आपली वेळ स्वतः ठरवू शकतो, खूपदा लॅपटॉपच्या साह्याने घरून काम करण्याचीही त्याला मुभा असते.

अर्थात याचा अर्थ हे काम खूप सोपे असते असे मात्र मुळीच नाही. इथे शारीरिक श्रम नसले तरी एकाग्रता प्रचंड लागते. डोळ्यांवर कंप्युटरमधून बाहेर पडणाऱ्या प्रकाशलहरींचा दीर्घकाळ परिणाम खूप घातक असू शकतो. सततच्या बैठ्या कामामुळे पाठीच्या कण्यावर असह्य ताण पडतो. डोकेदुखी कायमचीच असते. बहुतेकदा कस्टमर्स पाश्चात्त्य जगात असतात व काम ‘रीअल टाइम’ मध्ये करायचे असते; त्यामुळे अक्षरशः रात्रीचा दिवस करूनच काम करावे लागते. खाण्यापिण्याच्या वेळा अनिश्चित असतात. त्यातून कायमच्या ॲसिडिटीसारखे विकार उद्‌भवतात; हे सर्व एकूणच शरीरातील जैविक घड्याळ्याच्या (‘बायॉलॉजिकल क्लॉक’च्या) विरोधात असते.

या सगळ्याचे मानसिक परिणामही दीर्घकाळ हानी करणारे आहेत. स्पर्धेच्या अतिरेकातून सतत तणाव निर्माण होत असतो. हाती भरपूर पैसा खेळत असल्यामुळे या तणावापासून मुक्ती मिळवण्याचे चुकीचे मार्ग शोधले जातात. या व्यवसायक्षेत्रात खूपदा पती-पत्नी वेगवेगळ्या शहरांत काम करतात, प्रवासही नित्याचा असतो. त्यातून येणाऱ्या विरहाचे - जो खूपदा तरुण वयातच येतो - वैवाहिक जीवनावर खूप दुष्परिणाम होतात.

या क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये तरुण मुलींचे प्रमाण बरेच असते - कधीकधी तर त्यांची संख्या निम्म्याहूनही अधिक असते. त्यांच्या जाण्यायेण्याची सोय बहुतेकदा कंपनीतर्फे केली जात असली तरीही एकूणच त्यांच्या वेळा अनिश्चित असल्यामुळे आणि कामाची जागा घरापासून लांब असल्याने प्रवासात धोके असतात. आयटीमधल्या एकेका युनिटमध्ये काम करणाऱ्यांची संख्या हजारोंच्या घरात असते व इतक्या सगळ्यांना बसण्यासाठी लागणारी मोठी जागा शहरात मध्यवर्ती भागात उपलब्ध होणे जवळपास अशक्य असते. अशी युनिट्स मग साहजिकच गावाबाहेर उभारली जातात. उदाहरणार्थ, पुण्यातील बहुतेक आयटी युनिट्स लांब हिंजवडीला किंवा मगरपट्टा परिसरात आहेत. अशा प्रवासात मग महिला कर्मचाऱ्यांबरोबर गैरवर्तणूक होण्याचे, कधीकधी तर बलात्कार होण्याचेही प्रकार अधूनमधून घडत असतात. अलीकडच्या काळात अशा घटना वृत्तपत्रांतून पुनःपुन्हा वाचल्याचे वाचकांना आठवत असेल. या सगळ्यातून निर्माण होणाऱ्या असुरक्षिततेचा ताण खूप जास्त असतो.

नोकरीची सुरक्षितताही इथे कूप कमी असते. ‘उद्यापासून कामावर येऊ नका, संध्याकाळी घरी जाताना आपला हिशोब घेऊन जा’ असा संदेश त्यांच्या पुढ्यातील मॉनिटरच्या स्क्रीनवर अचानक कधीही

अनुक्रमणिका

झळकतो. बस, नोंकरी सुटली! आयटीच्या परिभाषेत या संदेशाला ‘पिंक स्लिप’ असे म्हटले जाते. याविरुद्ध दाद मागायची कुठलीही यंत्रणा आज भारतात तरी उपलब्ध नाही. पिंक स्लिप ची टांगती तलवार अशी सतत डोक्यावर असतानाच इथे रोजचे काम करावे लागते. यामुळे कंपनीविषयी दीर्घकालीन निष्ठा वगैरे प्रकार कधीच नसतो. आयटीमधल्या कामाची तऱ्हा अगदी न्यारीच आहे.

आयटीमधील कार्यसंस्कृतीत जमेच्या बाजूही अर्थात अनेक आहेत. आपल्याकडे खूपदा आडनावावरून जात कळते; इथे सगळेच एकमेकांना पहिल्या नावाने हाक मारत असल्याने जातिजाणिवा फारशा नसतातच. बॉस बहुतेकदा दुसऱ्याच कुठल्यातरी लोकेशनवर असतो; बॉस व कर्मचारी यांच्यातील वरिष्ठ-कनिष्ठ हा पारंपरिक भेदभाव आयटीत विशेष नसतो. एकूणच आयटीत बऱ्यापैकी समानता असते. कामात कौशल्य असते, डोळ्यांत स्वप्ने असतात, देशापलीकडचे क्षितिज सतत खुणावत असते. पण या लेखात आपण कामगारसंघटनांच्या संदर्भात विचार करीत आहोत आणि त्या संदर्भात इथे संघटनेची जरूरच कोणाला वाटत नाही ही कटू वस्तुस्थिती आहे.

अर्थात तंत्रज्ञानाचे आव्हान आयटी क्षेत्रापुरतेच सीमित आहे असा समज करून घेणे अगदी चुकीचे होईल. साधे बटाट्याचे वेफर्स बनवण्यापासून लढाऊ विमाने बनवण्यापर्यंत आणि पुस्तके छापण्यापासून रस्ते बांधण्यापर्यंत सर्वच प्रकारच्या उद्योगधंद्यांमध्ये गेल्या काही वर्षात अगदी मूलभूत असा फरक पडलेला आहे.

तंत्रज्ञानामुळे कामाचे स्वरूपच पालटून गेले आहे. पूर्वी ‘प्रत्येक गोष्ट एका छताखाली’ (‘everything under one roof’) ही संकल्पना होती. आज तसे कारखाने क्वचितच कुठे दिसतात. छोट्या-छोट्या युनिट्समध्ये वेगवेगळ्या भागांचे उत्पादन होते व मुख्य कारखान्यात केवळ त्यांची जुळणी (असेम्ब्ली) होते. उत्पादक यंत्रेही खूप जलद व अचूक काम देणारी, पण मायक्रोप्रोसेसर्स बसवलेली व म्हणून आकाराने मात्र खूप छोटी अशी असतात. वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेल्या युनिट्समध्ये ती सहज चालवता येतात. त्यामुळे मोठ्या संख्येने कामगारांनी एकत्र यायची व एका छपराखाली काम करायची आज गरजच उरलेली नाही. ‘सहना भवतु, सहनौ भुनक्तु, सर्व वीर्यम् करवावहै’ ही उक्ती आता केवळ कल्पनेत शोभणारी आहे. एकत्र येणेच इतके कमी झाल्यामुळे संघटनेचे आकर्षणही त्या प्रमाणात नाहीसे झाले आहे. हा मोठाच मानसिक बदल आहे.

मुंबईतील बड्या-बड्या कापड गिरण्या बंद पडल्या, लाखो गिरणीकामगार बेकार झाले, त्यांच्या संघटना केवळ कागदोपत्री उरल्या आणि तरीही बाजारपेठा मात्र कपड्यांनी ओसंडून वाहत आहेत, याचे मुख्य रहस्य तंत्रज्ञानामुळे विखुरलेली आणि तरीही कार्यक्षम असलेली उत्पादनप्रक्रिया हेच आहे.

आज कुठल्याही प्रस्थापित कारखान्यांत जा; मग ती कापडगिरणी असो, की फाऊंड्री, स्टील प्लँट असो की टीव्ही बनवणारा कारखाना; पूर्वीप्रमाणे घणाचे घाव घालणारे, घामाघूम झालेले, कष्टकरी कामगार कुठेही दिसणार नाहीत. उलट पावलोपावली संगणक लावलेले दिसतील. इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या साहाय्यानेच कामे होत असतात. ऑटोमेशनमुळे कामगाराच्या प्रत्यक्ष हालचालीही खूप कमी असतात, खूपदा वेगवेगळ्या पॅनेल्सवरची ‘रीडिंग्ज’ बघून यंत्राला ‘कमांड’ देत राहणे असे त्याच्या कामाचे स्वरूप असते. आधुनिक तंत्रज्ञांनामुळे कामगार शब्दाचा अर्थच बदलून गेला आहे. पूर्वी उद्योगधंद्यात ब्ल्यू कॉलर व व्हाइट कॉलर असे कामाचे दोन प्रकार मानले जात. पूर्वी इंग्लंडमध्ये कामगार हे निळ्या रंगाचे,

अनुक्रमणिका

डाग पटकन दिसू न देणारे ओव्हर ऑल घालत, तर कारकून हे पांढरे शर्ट घालून बैठे काम करत. त्यावरून ब्ल्यू कॉलर व व्हाइट कॉलर ही नावे दिली गेली. व्हाइट कॉलर काम म्हणजे मुख्यतः कागदपत्रांचे काम - म्हणजेच कारकूनी. ते करणाऱ्यांना 'स्टाफ' असेही म्हणत. ब्ल्यू कॉलर म्हणजे श्रमाचे काम करणारे. दोघांच्या युनियन्सही वेगवेगळ्या असत. तंत्रज्ञानामुळे हा भेद आता जवळपास पुसला गेला आहे. दोघेही संगणकासमोर वा संगणकचलित उपकरणांसमोर बसून, वातानुकूलित जागेत काम करत असतात! आणि स्वतःला 'वर्कर' वा 'क्लार्क' ऐवजी 'नॉलेज वर्कर' म्हणवून घेणे दोघांनाही अधिक आवडेल!

टू-व्हीलर्स बनवणाऱ्या पुण्यालगतच्या एका विख्यात कारखान्यात पूर्वी जवळपास वीस हजार कामगार होते, पण ते जेवढ्या टू-व्हीलर्स बनवत होते त्याच्या चौपट टू-व्हीलर्स ती कंपनी आज त्यांच्या नजीकच्या नव्या कारखान्यात बनवते व तेही केवळ दोन हजार कामगारांच्या बळावर!

या तंत्रज्ञानातील बदलांची जाणीव काही कामगार नेत्यांना तरी निश्चित आहे, नाही असे नाही. मुंबईचे माजी महापौर आणि हिंद मझदूर सभेचे माजी अध्यक्ष डॉ. शांती पटेल म्हणतात : 'A handloom worker doing spinning and weaving by handling one loom is now replaced by a highly skilled technical worker controlling 56 air jet looms through a computer. The amount of cloth produced and its quality have increased on a large scale, whereas time and cost involved have decreased considerably. This process is going to improve still further so as to bring even more looms under one 'worke'r or may be under one 'Robot', in which case the defects will get removed and the machine repaired even without any worker. I learn that the repairs required to be done to the running engine of a railway train are now attended to by the engine itself! The efforts are on to adopt similar technology for an engine of a ship. One does not know when and where the technological development will end!" ("एका लूमच्या सहाय्याने कापड विणणाऱ्या कामगाराची जागा आता कंप्युटरच्या सहाय्याने एकट्याने ५६ एअर जेट लूम्स चालवणाऱ्या कामगाराने घेतली आहे. कापडाचे उत्पादन व त्याचा दर्जा प्रचंड प्रमाणावर वाढला आहे पण त्याचवेळी उत्पादनासाठी लागणारा वेळ आणि होणारा खर्च मात्र मात्र खूप कमी झाला आहे. ही प्रक्रिया आता अधिक सुधारणार असून आणखी अधिक लूम्स आता एकच कामगार - किंबहुना एकच रोबो - सांभाळू शकेल. मशीनमध्ये काही बिघडले तरी तीही दुरुस्ती तो रोबोच करेल. मी असे ऐकतो, की धावत्या ट्रेनच्या इंजिनमध्ये काही बिघाड झाला तर आता इंजिन स्वतःच दुरुस्त करते! हेच तंत्रज्ञान बोटीच्या इंजिनामध्येही बसवायचे प्रयत्न सुरू आहेत. हा तंत्रज्ञानातील विकास कधी आणि कुठे संपेल हे सांगणे कठीण आहे!"

तंत्रज्ञानातील विकासाची डॉ. पटेलांप्रमाणे इतरही कामगार नेत्यांना नक्कीच कल्पना असणार; तंत्रज्ञानामुळे होणारे बदल आपल्या अवती भवती ते रोजच बघत असतात. आयटेकचे एक विचारवंत नेते डॉ. भालचंद्र कानगो यांनी म्हटल्याप्रमाणे, "Technology is rapidly changing the production process in all industries and as Karl Marx had correctly pointed out, 'as production process changes, organization of society also undergoes changes.' We are witnessing tremendous changes due to this." (तंत्रज्ञानामुळे सर्वच उद्योगांमधील उत्पादनप्रक्रिया बदलत आहे आणि कार्ल मार्क्सने अचूक सांगितल्याप्रमाणे 'उत्पादनप्रकिया बदलली, समाजरचनाही बदलते.' परिणामतः खूप मोठे बदल

आपल्याला अवतीभवती दिसतात.") (महाराष्ट्र स्टेट बँक एम्प्लॉईज फेडरेशनतर्फे औरंगाबाद येथे १० ऑक्टोबर २००८ रोजी आयोजित केलेल्या एका सेमिनारमध्ये बोलताना.)

अर्थात परिस्थितीचे आकलन होणे ही केवळ पहिली पायरी आहे; त्या परिस्थितीला तोंड कसे द्यायचे, तंत्रज्ञानाच्या आव्हानाला सामोर कसे जायचे, हा खरा कळीचा मुद्दा आहे. "मार्क्सचा पराभव भांडवलशाहीने नाही तर टेक्नॉलॉजीने केला," हे बाबा आमटे यांचे उद्‌गार या प्रसंगी आठवतात.

**२·२ : जागतिकीकरणाचे आव्हान**

जागतिकीकरणाची संकल्पना भारतीय तत्त्वज्ञानाला तरी नवखी नाही. आमचे सर्वांत जुने धर्मग्रंथ म्हणजे उपनिषदे; त्यांनीही 'वसुधैव कुटुम्बकम्' अशी शिकवण दिलेली आहे. पण त्या अर्थाने आज जागतिकीकरण हा शब्द वापरला जात नाही. जागतिकीकरणाचा आज अभिप्रेत असलेला अर्थ सामान्यतः व्यापाराचे जागतिकीकरण (globalization of trade) हा आहे. जागतिकीकरणाला आज अभिप्रेत असलेले अन्य पदर-सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी- हे बव्हंशी व्यापारी हितसंबंधातून उद्‌भवलेले व आनुषंगिक असे आहेत.

कामगारचळवळीच्या दृष्टीने जागतिकीकरणात तसे नवे काहीच नाही. मुळात ट्रेड युनियन संकल्पनाच इंग्लंडमधून आलेली आहे. सदस्यांनी विशिष्ट वर्गणी भरून आपल्या हक्कांसाठी भांडणारी एखादी संघटना उभारणे, मोर्चे-निदर्शने-संप-वाटाघाटी ही तिची कार्यप्रणाली, कामगारांनी आपापले प्रतिनिधी युनियनच्या मॅनेजिंग कमिटीवर निवडून देणे, आणि मग त्या प्रतिनिधींनी वरिष्ठ पातळीवरील आपले नेते निवडणे वगैरे सर्वच यंत्रणा आपण ब्रिटिश टीयूसीवरून घेतलेली आहे आणि यात वावगे काहीच नाही, कारण मुळात ट्रेड युनियन ही संकल्पना औद्योगिकीकरणाचाच एक परिणाम आहे व हे औद्योगिकीकरण इंग्लंडमधूनच आपल्याकडे आले. आंतरराष्ट्रीय प्रभाव हा असा कामगारचळवळीवर जन्मापासूनच होता.

या संदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा मांडायला हवा-जो सहसा कधी चर्चेत येत नाही. अन् तो म्हणजे कामगारचळवळीच्या उदयापासूनच भारतातील कामगारसुधारणांसाठी परदेशाहून येत असलेला दबाव.

'Indian Trade Unions : A survey' या भारतीय कामगारचळवळीच्या आपल्या अभ्यासपूर्ण इतिहासात ज्येष्ठ लेखक व कामगारनेते व. भ. कर्णिक लिहितात (Manaktalas, Bombay, १९६०, पृष्ठ ६ व ७) :

"It is important to note that the demand of Indian workers for improvement in conditions of work received cordial suport from the textile workers and textile factory owners of Great Britain. The lower cost of production of Indian goods, possible only because of low wages, long hours of work, and absence of all aminities in factories, was affecting the competitive position of the British textile industry. This factor has from time to time helped the enactment of a number of labour laws beneficial to workers. All through the latter half of the nineteenth century, almost up to the years of the first great war, it was generally Lancashire

and Manchester Chamber of Commerce that agitated for an inquiry into the conditions of the Indian workers. The enquiries usually led to some ameliorative measures."

("आपल्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा व्हायला हव्यात या भारतीय कामगारांच्या मागणीला ब्रिटिश गिरणीकामगार आणि गिरणीमालक यांचा मनःपूर्वक पाठिंबा होता याची नोंद घेणे महत्त्वाचे आहे. कमी पगार, कामाचे अधिक तास आणि कारखान्यांतील सर्व सेवासुविधांचा अभाव यांमुळेच केवळ भारतीय वस्तूंचा उत्पादन खर्च कमी होता व त्यामुळेच ब्रिटिश कापडगिरण्यांच्या किफायतशीरपणावर विपरीत परिणाम होत होता. यातूनच वेळोवेळी कामगारांचे कल्याण होईल असे कायदे केले गेले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि अगदी पहिल्या महायुद्धापूर्वीपर्यंत भारतीय कामगारांच्या परिस्थितीची चौकशी करावी यासाठीचा संघर्ष हा मुख्यतः लँकशर आणि मँचेस्टर येथील व्यापारांची संघटना करत होती. बहुतेकदा अशा चौकश्यांमधूनच कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा आणणारी काही पावले उचलली गेली.")

कारखान्यांतील कामगारांच्या परिस्थितीची पाहणी करणारी अशी पहिली समिती १८७५ मध्ये नेमली गेली—भारतातील पहिली कामगारसंघटना स्थापन व्हायच्या तब्बल पंधरा वर्षे पूर्वीच-व त्यातूनच पुढे पहिला फॅक्टरी ॲक्ट अमलात आला हे लक्षात घेण्यासारखे आहे.

जगभराच्या कामगारांमध्ये एकजुटीची भावना प्रथमपासूनच होती. International Labour Organization ही कामगारांची जागतिक संस्था आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थापन झालेल्या इतर बहुतेक संस्थांच्या पूर्वी, म्हणजे १९१९ मध्ये स्थापन झाली लिग ऑफ नेशन्स स्थापन झाली त्याच वर्षी. आयएलओच्या स्थापनेचाच एक परिणाम म्हणजे १९२० च्या ऑक्टोबरमध्ये मुंबईत झालेली आयटकची (भारतातील पहिल्या कामगार महासंघाची) स्थापना. पुढे आंतरराष्ट्रीय पातळीवर रशिया व चीन यांच्यात फूट पडल्यानंतर या आयटकमध्येही फूट पडली व त्यातून सिटू तयार झाली-पुन्हा एकदा जागतिक घडामोडींचा प्रभाव.

भारतातील कामगारचळवळ खूप पूर्वीपासूनच अन्य भारतीय समाजसंघटनांच्या आंतरराष्ट्रीय घडामोडींची अशी दखल घेत असे. १९५६ च्या जुलैमध्ये इजिप्त सरकारने ब्रिटिश कंपनीची मालकी असलेल्या नाइल नदीवरील, आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी खूप महत्त्वाच्या अशा सुवेझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारत सरकारच्या कुठल्याही अधिकृत प्रतिक्रियेची वाट न पाहता मुंबईतील गोदी कामगारांच्या युनियनने मुंबई बंदरात येणाऱ्या ब्रिटिश जहाजांवरील मालाची चढउतार थांबवण्याची धमकी दिली. या उत्स्फूर्त प्रतिक्रियेचे इजिप्तचे अध्यक्ष अबुल गमाल नासेर यांना इतके कौतुक वाटले, की त्यांनी आपल्या कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून एक खास ढाल त्या युनियनला भेट म्हणून पाठवली.

आंतरराष्ट्रीय प्रभावाखाली आपल्याला चुकीच्या वाटणाऱ्या काही गोष्टींचाही स्वीकार कामगारचळवळीला करावा लागला आहे. उदाहरणार्थ, १९७० च्या दशकात आंतरराष्ट्रीय सागरी मालवाहतुकीचे झालेले कंटेनरायझेशन.

जसजशी जागतिक अर्थव्यवस्था वाढत गेली तसतसे मालाच्या आंतरराष्ट्रीय सागरी वाहतुकीचे प्रमाणही वाढत गेले. एकेकाळी सगळीकडेच या मालाची चढउतार हमालांकरवी होत असे त्यांची जागा पुढे क्रेन्सनी घेतली. पुढेपुढे यांत्रिकीकरणाची ही पातळीदेखील अपुरी पडू लागली. त्या गरजेतून कंटेनरायझेशनचा जन्म झाला.

मालाची हाताळणी करण्याच्या जुन्या पद्धतीनुसार सगळा माल लाकडी पेट्यांमध्ये किंवा ज्यूटच्या पोत्यांमध्ये भरला जाई. कंटेनर पद्धतीत हा माल मोठ्या पोलादी पेट्यांमध्ये भरला जाऊ लागला. वाहतुकीच्या दरम्यान मालाची नासाडी न होणे, मालाची बोटीवरील चढउतार जलद होणे, मालवाहतुकीचे स्टँडर्डाझेशन शक्य होणे आणि मालाचा ट्रकने होणारा पुढील देशांतर्गत प्रवास सुलभ होणे हे कंटेनरायझेशनचे चार प्रमुख फायदे होते. विसाव्या शतकात सागरी मालवाहतुकीत झालेला सर्वांत मोठा बदल असे या कंटेनर पद्धतीचे वर्णन केले जायचे. पण यामुळे गोदीत मालाची चढउतार करणाऱ्या माथाडी कामगारांची गरजच गोदीपुरती जवळपास संपुष्टात येणार होती. कारण थेट धक्क्यापर्यंत येऊ शकणाऱ्या ट्रेलरट्रकवरचा मालाचा भरलेला कंटेनर प्रचंड क्रेनच्या सहाय्याने थेट बोटीत भरला जाणार होता, व बोटीवरील मालाचा आलेला कंटेनर पुन्हा क्रेनच्या सहाय्याने थेट ट्रेलरट्रकवर ठेवला जाणार होता. साहजिकच, गोदीकामगारांचा या कंटेनरायझेशनला विरोध होता. पण जगभरच्या शिपिंग कंपन्यांनी यापुढे फक्त कंटेनरमधलाच माल स्वीकारायचे ठरवल्यामुळे नाइलाजाने हे कंटेनरायझेशन स्वीकारण्यावाचून कामगार संघटनांना गत्यंतरच उरले नाही. अन्यथा ही जहाजे भारतीय बंदरात आलीच नसती.

आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या घडामोडींमळे उद्योगक्षेत्रात येणारे असे बदल आता जागतिकीकरणाच्या या जमान्यात नित्याचेच झाले आहेत. आता जागोजागी उभी राहिलेली कॉल सेंटर्स किंवा बीपीओज हा असाच एक मोठा व मुख्यतः जागतिकीकरणामुळेच शक्य झालेला असा बदल आहे. भारतीय उद्योगांचे एकूण चित्रच त्यामुळे पालटून जात आहे. येथील उद्योगातील कार्यसंस्कृतीत त्यामुळे खूप महत्त्वाचे व दूरगामी असे बदल घडून येत आहेत.

बीपीओ म्हणजे नेमके काय? जगभर उद्योगांतील स्पर्धा जसजशी वाढत गेली— सेलर्स मार्केटपासून बायर्स मार्केटकडे प्रवास सुरू झाला — तसतशी ते उद्योग अधिकाधिक कार्यक्षम करण्याची गरजही वाढत गेली. तसे केल्याशिवाय स्पर्धायुगात कुठलाच उद्योग टिकला नसता. ही कार्यक्षमता वाढवण्याचा एक भाग म्हणजे जो आपला मुख्य (core) व्यवसाय आहे त्याच्यावर लक्ष केंद्रित करणे व जो आपल्या व्यवसायाचा केवळ आनुषांगिक भाग आहे तो बाहेरून करून घेणे. उदाहरणार्थ, एखादा कारखानदार जर चष्मे बनवत असेल, तर त्याने फक्त चष्मे बनवण्यावर लक्ष केंद्रित करावे, त्याने चष्मे पुसायचे कापड किंवा चष्मे ठेवायच्या पेट्या बनवत बसू नये. त्या गोष्टी बाहेरून (जगातल्या कुठल्याही देशातून) बनवून घेणे सोपे पडते. ढोबळमानाने हेच Business Process Outsourcing किंवा BPO. हा जागतिक उद्योगातील अलीकडचा एक प्रमुख प्रवाह आहे. डिव्हिजन ऑफ लेबर (श्रमविभागणी) या मूळ आर्थिक तत्त्वाचेच हे एक रूप आहे.

बीपीओ हे कधी उत्पादनक्षेत्राचे (मॅन्युफॅक्चरिंगचे) असते, तर कधी सेवाक्षेत्राचे (सर्व्हिसेसचे). वरचेच उदाहरण घ्यायचे तर कापड आणि पेट्या दुसरीकडून बनवून घेणे हे उत्पादनक्षेत्राचे बीपीओ होईल, पण आपल्या विशिष्ट ब्रँडच्या चष्मांचा प्रसार करण्याचे व त्यांचा खप वाढवण्याचे काम दुसरीकडून करून घेणे हे सेवाक्षेत्राचे बीपीओ होईल.

अनुक्रमणिका

ज्या उद्योगांचे एकूण उद्दिष्टच कुठल्या ना कुठल्या स्वरूपातील सेवा देण्याचे आहे त्या उद्योगांमध्ये साहजिकच बीपीओला भरपूर वाव आहे. आज जगभर सगळीकडेच उत्पादनक्षेत्रापेक्षा सेवाक्षेत्र वाढत आहे. पर्यटन, मनोरंजन, बँकिंग, इन्शुरन्स, संपर्कसाधने या सर्व मूलतः विविध प्रकारच्या सेवाच आहेत. उदाहरणार्थ, मोबाईल ही एक संपर्कसेवा आहे. यात हँडसेट या मेकॅनिकल उत्पादनाचा हिस्सा खूप छोटा आहे. तो तुम्ही एकदाच विकत घेणार. पण फोनसेवेचा हिस्सा प्रचंड आहे, कारण त्या सेवेचे बिल तुम्ही वर्षानुवर्षे दर महिन्याला भरणार आहात.

बीपीओचाच एक आविष्कार असलेला Information Technology Enabled Services (ITES) हाही जागतिक उद्योगातील अलीकडचा एक प्रमुख प्रवाह आहे आणि कॉल सेंटर्सच्या (जो ITES चाच एक भाग आहे) विकासासाठी मुख्यतः तो कारणीभूत आहे. कंप्युटर आणि टेलेकम्युनिकेशन यांच्यातील आश्चर्यकारक प्रगतीचा तो एकत्रित परिणाम आहे. या तंत्रज्ञानातील प्रगतीमुळेच सेवाक्षेत्रातील बरीचशी कामे जगभरात कुठूनही करून घेणे शक्य झाले.

कॉल सेंटर मुख्यतः दोन प्रकारची कामे करते - इनबाउंड आणि आऊटबाउंड. इनबाउंड म्हणजे येणारे कॉल्स रिसिव्ह करणारे आणि आऊटबाउंड म्हणजे स्वतः कॉल करणारे.

तुमचा ई-मेल अकाऊंट चालत नाही हे कळवण्यासाठी तुम्ही जेव्हा बीएसएनएल कंपनीने दिलेला नंबर फिरवता, तेव्हा प्रत्यक्षात तो फोन जात असतो एखाद्या कॉल सेंटरवर. बहुतेक बड्या कंपन्यांनी अशी तक्रारनिवारणाची कामे आता कॉल सेंटरवरच सोपवली आहेत. त्यासाठी स्वतःचा स्टाफ ठेवणे आता परवडणारे नाही. तुमची तक्रार अगदी जुजबी असेल तर कॉल सेंटरवरचा तो फोन घेणारा माणूस म्हणजे कॉल सेंटरच्या भाषेत ('एजंट') फोनवरच सूचना देऊन ती दूर करायचा प्रयत्न करतो. तितपत प्रशिक्षण त्याला दिलेले असते. तरीही तक्रार कायम राहिली तरच तो एजंट तुमच्या घरी तंत्रज्ञ पाठवायची व्यवस्था करतो. (तो तंत्रज्ञही बीएसएनएलचा नसतोच; तो दुसऱ्या कुणा तरी कॉन्ट्रॅक्टरचाच माणूस असतो. कारण दुरुस्तीसेवेचेही बीपीओ झालेले असते.) हा झाला इनबाउंड कॉल सेंटरचा प्रकार.

याउलट जेव्हा 'तुम्हाला घरासाठी कर्ज हवे आहे का?' असे विचारणारे फोन एखाद्या बड्या बँकेकडून वरचेवर येतात, तेव्हा तेही प्रत्यक्षात त्या बँकेकडून आलेले नसतात. ते मार्केटिंगचे काम त्यांनी ज्यांच्यावर सोपवलेले असते अशा आऊटबाऊंड कॉल सेंटरमधल्या एजंटचे ते कॉल असतात. अशा एजंटवर वैतागण्यात म्हणूनच अर्थ नसतो! अशा प्रकारचे टेलेमार्केटिंग दिवसभर करत राहणे हे त्याचे कामच आहे!

इनबाउंड आणि आऊटबाउंड अशा दोन्ही प्रकारची कॉल सेंटर्स जगाच्या पाठीवर कुठेही असली तरी नव्या तंत्रज्ञानामुळे ग्राहकसेवेत काहीच फरक पडत नाही. सिटीबँकेच्या क्रेडिट कार्डबद्दल विचारणा करण्यासाठी जेव्हा न्यूयॉर्कमधला एखादा माणूस फोन लावतो तेव्हा त्याला ती माहिती पुरवणारा माणूस न्यूयॉर्कहूनच बोलतो आहे का गुरगावहून, याच्याशी त्याला काहीच कर्तव्य नसते किंवा ब्रिटिश एअरचे तिकीट बुक करायला जेव्हा लंडनमधला माणूस फोन लावतो, तेव्हा ते तिकीट बुक करायचे काम लंडनमधल्या कंप्युटरवरून होते आहे का गोरेगावातल्या, याच्याशी त्याला देणेघेणे नसते. संपर्क सेवा तंत्रज्ञानामुळे भूगोल आता इतिहासजमा झाला आहे असे म्हणतात, ते या अर्थाने.

अनुक्रमणिका

सुमारे दोन पिढ्यांपूर्वी जी कष्टाची कामे करायला पाश्चात्त्य लोक तयार नव्हते. ती तिथे गेलेल्या भारतीयांच्या वाट्याला यायची. न्यूयॉर्कमधला जेनिटर आणि लंडनमधला हमाल, शिकागोमधला वेटर आणि मँचेस्टरमधला झाडूवाला खूपदा भारतीय आढळायचा. त्यावेळी नोकऱ्या मिळवून तिथे स्थायिक झालेल्या आपल्या भारतीयांची मुले आज शिकून-सवरून उच्चपदस्थ झाली आहेत. आता ती कामे बहुधा बांगलादेशी किंवा मेक्सिकन माणूस करीत असेल!

या नंतरच्या काळातही तिथे — विशेषतः सेवाक्षेत्रात — अशी अनेक कामे तयार झाली जी किचकट किंवा कंटाळवाणी होती. पाश्चात्त्य तरुण ही कामे करायला तयार नव्हता आणि तयार झालाच तर त्याची मजुरी खूप जास्त होती. पण ही कामे करण्यासाठी पूर्वीप्रमाणे मजूर आयात करायची आता गरज नव्हती. टेलेकम्युनिकेशन क्रांतीमुळे गरीब देशातले मजूर स्वतःच्या देशात राहूनच त्या सेवा परदेशी पुरवू शकणार होते. कॉल सेंटर्स हा त्यासाठी उत्तम पर्याय होता.

कमी मजुरीप्रमाणेच बऱ्यापैकी इंग्रजी बोलणारा तरुणवर्ग भारतात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे, हेही भारतातल्या कॉल सेंटर्सवाढीचे एक महत्त्वाचे कारण आहे.

इतिहासाची चक्रे मोठी अजब फिरतात! ब्रिटिशांनी इथे रेल्वे आणली, आम्हांला इंग्लिश भाषा शिकवली आणि आज सकाळी आठ वाजता मँचेस्टरहून निघालेली अमुक अमुक ट्रेन बर्मिंगला किती वाजता पोचणार हे ब्रिटिशांना बंगलोरच्या कॉल सेंटरमधला आमचा एजंट सांगतो! ब्रिटिश रेलनेच त्या कॉल सेंटरला हे कॉन्ट्रॅक्ट दिले असते. हे जे काही घडते आहे ती एक प्रकारची क्रांतीच आहे.

जागतिकीकरणाचा परिणाम हा केवळ तंत्रज्ञानापुरता सीमित नाही हेही लक्षात घ्यायला हवे. त्याचे परिणाम शहरांच्या रचनेवर (टाउनप्लॅनिंगवर), लोकांच्या परस्परसंबंधांवर, आणि एकूण विचारपद्धतीवरही होत असतात.

मुंबईसारख्या एकेकाळच्या उद्यमनगरीचे चित्र या जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे बदलून गेले आहे. मोठ्या संख्येने कामगारांची व अवजड यंत्रसाम्रगीची गरज असलेले उद्योग मुंबईबाहेर — आणि खूपदा महाराष्ट्र राज्याच्याही बाहेर — फेकले जात आहेत व त्यांची जागा सेवाक्षेत्र (सर्व्हिस सेक्टर) घेत आहे. मुंबईला देशाची औद्योगिक राजधानी म्हणण्याऐवजी देशाची आर्थिक राजधानी म्हणणे आता उचित ठरेल. जागतिकीकरणातून आलेल्या अशा मोठ्या बदलांना सामोरे जाणे कामगारचळवळीला अवघड जात आहे.

### २·३. : धर्मनिरपेक्षता टिकवण्याचे आव्हान

कामगारचळवळ ही तशी प्रथमपासूनच धर्म, पंथ, जात, भाषा, प्रांत यांच्यापासून बऱ्यापैकी मुक्त आहे. गावातून मुंबईसारख्या शहरात आलेला माणूस कुठल्यातरी गिरणीत काम धरायचा, कुठल्यातरी खानावळीत जेवायचा, कुठल्यातरी चाळीतल्या एखाद्या खोलीत रात्री आपली पथारी अंथरायचा. शहरातल्या धकाधकीत स्पृश्यास्पृश्यता पाळणे तर दूरच पण आपले कुठलेही कुळाचार पाळणे त्याला अशक्य होते. बाजूचा माणूस कुठच्या जातीचा, धर्माचा आहे त्याची त्याला जाणीवही नसे. त्याची जुनी निजखूण (आयडेंटिटी) शहरीकरणात पुसून जायची व ‘कामगार’ ही एकच ओळख उरायची. ‘ब्राह्मण

नाही, हिंदूही नाही, न मी एक पंथाचा' म्हणणारा हा कामगार म्हणजे केशवसुतांचा 'नव्या मनुतील, नव्या दमाचा शूर शिपाई'च होता. कामगारचळवळीतले तत्कालीन नेते बहुतांशी पुरोगामी, सुधारक विचारांचे होते व त्यांच्याकडून शहरातील कामगारवर्गाला धर्मनिरपेक्षतेचे बाळकडूच पाजले जायचे.

याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुंबईतील गोदी कामगार. (बंदर व गोदी ह्यांत सूक्ष्म फरक आहे - दोन्हीकडील कामगारांना सामान्यतः गोदीकामगार म्हटले जात असले तरी. किनाऱ्याच्या समुद्राकडील खालच्या अंगाला बंदर - पोर्ट - असते व वरच्या जमिनीकडील अंगाला गोदी - डॉक - असते. समुद्रावर जाणे एकेकाळी हिंदूंमध्ये निषिद्ध मानले जात असल्याने बंदरावर मुख्यतः मुसलमान कामगार असत - त्यांना खलाशी खाते असेही म्हणत. गोदीत मात्र हिंदू कामगारांचा भरणा असे - त्यातही घाटावरचे अधिक.) असे हे गोदीकामगार हिंदू किंवा मुसलमान असले, तरीही पी. डिमेलोसारख्या एखाद्या मंगलोरीयन ख्रिश्चनाला आपला नेता म्हणून स्वीकारण्यात त्यांनी कधीही खळखळ केली नाही.

मुकुंद आयर्न अँड स्टील कंपनी ही मुंबईतील पहिली मोठी फाऊंड्री जेव्हा सुरू झाली तेव्हा तिथल्या फर्नेस (भट्टी) समोरचे प्रचंड उष्णतेचे काम करायला स्थानिक कामगार तयार नव्हते. अशा कामाची सवय असलेले ओरिया कामगार मग कंपनीने मुंबईत आणले. कुर्ल्यातील कंपनीच्या फाऊंड्रीजवळ त्यांनी वस्ती थाटली. त्यांची दुसरी किंवा तिसरी पिढीही आज तिथेच आहे. स्थानिक लोकांमध्येच ते सामावून गेले; परप्रांतीय म्हणून त्यांना कधीही त्रास दिला गेला नाही.

मुंबईतील गिरण्यांमध्ये तेलुगु कामगार खूप होते, तिथल्या सिक्युरिटीत उत्तरप्रदेशी भय्यांचा भरणा होता. टॅक्सी ड्रायव्हर्स बरेचसे शीख होते. कारकुनी काम करणाऱ्यांत तमीळ-मल्याळींचा वरचष्मा होता. आपल्या विशाल हृदयात या सर्वांनाच कामगारचळवळीने सामावून घेतले.

हा स्थानिक, हा परप्रांतीय; हा हिंदू, हा मुसलमान, हा कोकणी, हा देशावरचा अशा प्रकारचे संकुचित उल्लेख कामगारचळवळीत कधीही होत नसत. चळवळीची ती एक मोठी जमेची बाजू होती व त्याचे श्रेय तत्कालीन कामगार नेत्यांच्या पुरोगामी दृष्टीला दिले पाहिजे. अगदी फाळणीपूर्वीच्या हिंदू-मुस्लीम दंग्यांच्या वेळीही कामगारांमधील धर्मनिरपेक्षता अभेद्य राहिली होती. अर्थात याच वेळी मुंबईबाहेरचा बव्हंशी समाज मात्र पारंपारिकच राहिला होता, हे मान्य करायला हवे.

याचे एक गमतीदार उदाहरण आयुष्याची तब्बल साठ वर्षे पूर्णवेळ कामगार नेता म्हणून काम केलेल्या माझ्या वडिलांच्या तोंडून मी ऐकले होते. तत्कालीन कामगारचळवळ कशी होती याची एक झलकही या उदाहरणात दिसते.

ही घटना १९३३ सालची. चाळीसगावजवळच्या एका गिरणीमालकाच्या मनमानी कारभाराविरुद्ध मिलमधील हजारएक कामगारांनी उत्स्फूर्तपणे संप पुकारला होता. कामगारांना नेता असा कुणीच नव्हता. बहुसंख्य कामगार निरक्षर होते. त्यांनी मदतीसाठी म्हणून 'लाल बावटा, मुंबई' अशा पत्त्यावर एक तार पाठवली. ती नेमकी दळवी बिल्डिंग, परळ येथील कम्युनिस्ट पक्षाच्या कचेरीत गेली. त्यानुसार कॉम्रेड बी. टी. रणदिवे ह्यांनी कॉम्रेड जी. एच. काळे यांना चाळीसगावला संपाचे नेतृत्व करण्यासाठी जायची सूचना केली. उसळत्या रक्ताच्या काळेंनी एक आव्हान म्हणून ती स्वीकारली. खिशात अवघे दहा रुपये व हातात एक कपड्याची पिशवी एवढ्या जाम्यानिम्यानिशी ते चाळीसगावला आले. नदीकाठच्या वाळूवरच मुक्काम

अनुक्रमणिका

ठोकला. सगळे कामगार ताबडतोब त्यांच्याभोवती जमा झाले. मोर्चे-निदर्शनांना सुरुवात झाली. त्या नदीकाठाला एखाद्या युद्धभूमीचे स्वरूप आले. जवळजवळ महिनाभर हा अभूतपूर्व संप सुरू होता. जुलमाला प्रत्युत्तर द्यायच्या ह्या नवख्या रीतीला सुरुवातीला सर्व गावकऱ्यांचा पूर्ण पाठिंबा होता. असला काही प्रकार त्यांनी पूर्वी कधी बघितलाही नव्हता. संपकऱ्यांसाठी तांदळाची पोतीच्या पोती दिली गेली भाकऱ्या भाजल्या गेल्या, पैसे उभारले गेले. स्वतःच्या कुटुंबीयांप्रमाणेच गावकऱ्यांनी कामगारांना वागवले. त्यांचा लढा हा स्वतःचा, सगळ्या गावाचा लढा मानला. जवळजवळ रोज संध्याकाळी जाहीर सभा व्हायची, गावकरीही कामगारांसमवेत मोठ्या संख्येने हजर राहत. कामगारांच्या व गावकऱ्यांच्या बहुतेक सर्व मागण्या मंजूर झाल्या. एका रोमांचकारी युद्धपर्वाची सांगता झाली. त्यावेळी कॉ. काळेंचा मार्क्सवादाशी नुकताच परिचय झाला होता आणि नव्याने आत्मसात केलेले आपले विचार इतरांपर्यंत पोचवायची त्यांची प्रेरणाही प्रबळ होती. मुंबईप्रमाणेच इथल्याही प्रत्येक सभेत देव-धर्म-पोथी-पुराणांवर ते टीकेची झोड उठवत. ह्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. हे मुंबईतले कामगार नव्हते! बहुतांशी भाविक, परंपराभिमानी गावकऱ्यांची सारी सहानुभूती काळे व पर्यायाने संपकरी कामगार गमावून बसले. ह्या संधीचा फायदा घेऊन काही महिन्यांच्या आतच ह्याच कामगारांवर मालकाने पुन्हा एकदा संप लादला. मागच्या वेळेप्रमाणेच पुन्हा काळेंकडेच संपाचे नेतृत्व आले. पण ह्यावेळी त्यांच्या पदरात दुखावलेल्या गावकऱ्यांकडून उपेक्षाच आली. इतकी, की संपाच्या संदर्भात चाळीसगाव पोलिसांनी काळेंना अटक केली तेव्हा त्यांना जामीन राहायलाही कोणी गावकरी पुढे येईना!

तत्कालीन कामगारनेते काळाच्या किती पुढे होते याचे हे एक उदाहरण. साहजिकच त्यांच्या नेतृत्वाखालील कामगारचळवळही कटाक्षाने धर्मनिरपेक्ष राहिली.

दुर्दैवाने गेल्या काही वर्षांत ही परिस्थिती बदलली आहे. संकुचित भावनांना आवाहन करून 'दुसऱ्या'चा द्वेष करायची चिथावणी काही राजकीय नेते देत असतात. त्यातून कामगारचळवळीतही फूट पडू लागते. ओबीसींची युनियन वेगळी, आंबेडकरवाद्यांची वेगळी, असलेही प्रकार सुरू झालेली दिसतात. परप्रांतीय कामगारांना मारझोड करून पळवून लावण्याचे प्रकार तर सर्रास सुरू झाले आहेत. धर्म-पंथ-जाती-प्रांतनिरपेक्षता हा आपला एकेकाळचा मानबिंदू टिकवून धरणे, श्रमणारा तो आपला ही व्यापक जाणीव कायम राखणे, हे आजच्या कामगारचळवळीपुढचे एक मोठेच आव्हान आहे.

### २·४ : सामाजिक बांधीलकीचे आव्हान

एकेकाळी कामगारचळवळ ही सगळ्या समाजाच्या व्यापक हिताचा विचार करणारी होती. सुरुवातीच्या काळातले कामगारनेते हे सामाजिक परिवर्तनाच्या ध्येयाने प्रेरित झाले होते; कामगारसंघटना उभारणे हा त्या व्यापक लढ्याचाच एक भाग होता.

कामगारांनी अन्य समाजाला वेठीस धरायचे प्रकार अजिबात होत नव्हते असे नाही. उदाहरणार्थ, जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली म्युनिसिपल वर्कर्स युनियनने ११ ऑगस्ट १९६३ रोजी पुकारलेला संप - महागाईभत्त्यात वाढ हवी या मागणीसाठी. तब्बल अकरा दिवस हा संप चालला. त्यात सफाई कामगारही सामील होते. ऐन पावसाळ्याचे दिवस व जागोजाग कचऱ्याचे ढीग साठलेले. शहरभर रोगराई पसरायची दाट शक्यता. तशातच या संपाच्या कालावधीत २० ऑगस्ट रोजी एक दिवसाचा सार्वत्रिक संप पाठिंबादर्शक म्हणून पुकारला गेला. ट्राम्स, बसेस व टॅक्सीज् ठप्प झाल्या. साहजिकच शहरातले सगळेच

कामकाज थंडावले. कामगारचळवळीच्या इतिहासातील हा पहिला 'मुंबई बंद'. तसा तो संप अशस्वीच ठरला, मागणी मान्य झाली नाही, शेवटी संप फिसकटला व कामगारांना २२ ऑगस्टला कामावर रुजू व्हावे लागले. मात्र या 'बंद' मुळे फर्नांडिस यांची लढाऊ नेता ही प्रतिमा पक्की झाली व त्याच लोकप्रियतेच्या लाटेवर स्वार होऊन पुढच्या १९६७ च्या लोकसभा निवडणुकीत ते दक्षिण मुंबईहून निवडूनही गेले. तेही स. का. पाटील यांच्यासारख्या मातब्बर नेत्याचा पराभव करून. सर्व वृत्तपत्रांनी त्यांचा 'जायंट कीलर' म्हणून गौरव केला. हे सगळे त्यांच्या दृष्टीने फायद्याचे झाले असले तरी आज मागे वळून पाहताना स्वतःच्या फायद्यासाठी सगळ्या समाजाला वेठीस धरण्याचा हा प्रकार गैरच वाटतो.

पण पूर्वी क्वचितच घडणारा हा प्रकार अलीकडे फारच बोकाळला आहे. विद्यार्थ्यांचे किती नुकसान होते आहे याची जराही तमा न बाळगता प्राध्यापक ऐन परीक्षेच्या मोसमात संपावर जातात, सरकारी रुग्णालयातील आपली दोन वर्षे ही नोकरी नसून केवळ आपल्या वैद्यकीय शिक्षणाचाच एक भाग आहे याची जाणीव न ठेवता तिथले डॉक्टर्स अधिक पगारासाठी संपावर जातात, आणि महिन्याला दोन-दोन लाख रुपये पगार घेणारे विमानांचे पायलट्सही प्रवाशांना वाऱ्यावर सोडून संपावर जातात. तेही पगारवाढीसाठी! याशिवाय वेगवेगळ्या राजकीय मागण्यांसाठी, स्वतःच्या शक्तिप्रदर्शनासाठी पुकारले जाणारे आणि केवळ दहशतीच्या जोरावर यशस्वी होणारे सार्वत्रिक बंद वेगळेच.

एकेकाळी कामगार खरोखरच वाजवी मागण्यांसाठी लढा देत होते व त्यावेळी त्यांना समाजाची सहानुभूतीही होती. आज संघटित कामगार ती सहानुभूती पूर्णपणे गमावून बसतील अशी लक्षणे आहेत.

इथे असंघटित कामगारांचाही प्रश्न उद्‌भवतो. एकूण कामगारांपैकी फार तर पाच टक्के कामगार संघटित (युनियनाइज्ड) आहेत, ९५ टक्के कामगार या चळवळीच्या वर्तुळात येऊच शकलेले नाहीत. वेगवेगळ्या इमारतींमधले रखवालदार, कुरियर सर्व्हिसमध्ये काम करणारी मुले, हॉटेलांमधले वेटर्स, डॉक्टर्स-वकील-आर्किटेक्ट्स यांच्या कार्यालयांमधले रिसेप्शनिस्ट्स, खासगी ड्रायव्हर्स, अगदी घराघरातल्या मोलकरणी, यांसारखे अनेक समाजघटक आज असंघटित आहेत. त्यांना ना सोयी-सवलती पुरेशा मिळतात, ना कसली सुरक्षितता असते. त्यांच्या पगारात आणि संघटित कामगारांच्या पगारात जमीनअस्मानाचा फरक असतो. कुरिअरवाल्याकडचा मुलगा आणि पोस्टमन यांच्या कामाचे स्वरूप साधारण सारखेच असले तरी त्या मुलाला जेमतेम महिना दीड-दोन हजार मिळत असतात तर सहाव्या वेतन आयोगानंतर पोस्टमनचा मासिक पगार सतरा-अठरा हजार सहज असतो. या असंघटित कामगारांसाठी आपण काय करू शकतो याचाही विचार आता कामगारसंघटनांनी अगदी प्राधान्याने करायला हवा.

बगाराम तुळपुळे हे कामगारचळवळीत एक ज्येष्ठ विचारवंत म्हणून मानले जातात. ते हिंद मझदूर सभेचे जनरल सेक्रेटरी होते व त्याचबरोबर त्यांनी दुर्गापूर स्टील प्लँटचे जनरल मॅनेजर म्हणूनही काम केले आहे; साहजिकच त्यांना दोन्ही बाजूंचा अनुभव आहे. असंघटित कामगारांच्या प्रश्नाविषयी ते म्हणतात :

"It must be realised that the strength of the trade union movement and its influence on national policies will remain marginal if 90 percent of the workforce remains outside the movement. What is more serious is that this 90 percent today views the other ten percent as

अनुक्रमणिका

an adversary which, in its drive to maximise its own benefits, appropriates a disproportionately large part of the national cake and deprives the 90 percent of what should legitimately come to it. Reciprocally, the organized sector workers regard the other 90 percent as a threat to their own relatively better emoluments."

("जोवर ९० टक्के कामगार हे चळवळीच्या बाहेरच राहतील तोवर कामगारचळवळीचे सामर्थ्य आणि तिचा राष्ट्रीय धोरणांवरचा परिणाम हा नगण्यच राहील हे समजून घेणे अत्यावश्यक आहे. आणखी गंभीर बाब म्हणजे या ९० टक्के असंघटित कामगारांना असे वाटते, की राष्ट्रीय उत्पन्नाच्या ज्या वाट्यावर त्यांचा न्याय्य हक्क आहे, तो वाटा १० टक्के संघटित कामगार स्वतःच्या स्वार्थासाठीच ओरबाडून घेतात व उरलेल्या ९० टक्क्यांना वंचित ठेवतात. या दृष्टिकोनामुळे त्या ९० टक्के कामगारांना संघटित दहा टक्के म्हणजे जणू आपला शत्रू वाटतो. याउलट संघटित कामगारांना असे वाटते, की हे ९० टक्के असंघटित कामगार म्हणजे आपल्या तुलनेने अधिक चांगल्या असलेल्या पगारमानाला असलेला एक मोठा धोकाच आहे.")

—बगाराम तुळपुळे (कॉम्रेड डांगे जन्मशताब्दी
समारोहासाठी सादर केलेल्या एका निबंधातून)

संघटनेने फक्त स्वतःच्या सदस्यांचेच हित पाहिले व अन्य समाजाचा विचार केला नाही तर काय परिस्थिती ओढवू शकते याचे अलीकडच्या काळातील एक उदाहरण सांगावेसे वाटते. पुण्याजवळच्या एका कारखान्याने सहा-आसनी रिक्षांचे उत्पादन सुरू केल्यानंतर या सहा-आसनी रिक्षा पुण्यातील (काही ठरावीक) रस्त्यांवर धावू लागल्या. वाटेत कुठेही थांबून त्या प्रवाशांना आत घेत, ते सांगतील त्या ठिकाणी त्यांना उतरू देत. भाडे अतिशय कमी; अगदी बसतिकिटाएवढेट. साहजिकच या सहा-आसनी रिक्षा खूप लोकप्रिय झाल्या. त्याचवेळी जुन्या तीन-आसनी रिक्षावाल्यांनी त्यांच्याविरुद्ध आरडाओरड करायला सुरुवात केली. 'यांच्यामुळे आमचा धंदा बुडतो' ही त्यांची खरी तक्रार होती; पण प्रत्यक्षात 'यांच्यामुळे ट्रॅफिक वाढतो, प्रदूषण वाढते' वगैरे कारणे पुढे करत प्रस्थापिक रिक्षा संघटनांनी सहा-आसनी रिक्षांविरुद्ध आंदोलन छेडले. अगदी हाणामाऱ्यांपर्यंत पाळी आली. आपल्यासाठी काही रस्त्यांवर तरी वाहतुकीसाठी परवानगी द्यावी ही सहा-आसनींची मागणी, तर यांच्यावर पूर्ण बंदी आणा ही तीन-आसनींची मागणी. सर्वसामान्य नागरिकाला सहा-आसनी सोयीच्या व स्वस्त वाटत होत्या, तीन-आसनी रिक्षावाल्यांविरूद्ध त्यांच्या पूर्वीपासूनच चालत आलेल्या अनेक तक्रारी होत्या. पण तीन-आसनींच्या संघटना खूप जुन्या, बळकट व प्रस्थापित अशा होत्या तर सहा-आसनी रिक्षा शहराच्या बाह्य भागात विखुरलेल्या, नव्यानेच सुरू झालेल्या व जवळजवळ असंघटित अशा होत्या. शेवटी विजय तीन-आसनींचाच झाला; त्यांच्या संघटित बळापुढे शासनानेही मान तुकवली. सहा-आसनी रिक्षावाल्यांचा एक मोर्चा महानगरपालिकेच्या कार्यालयावर गेला असताना त्यांच्यावर पोलिसांनी इतका जोरदार लाठीहल्ला केला, टिपून टिपून एकेकाला इतकी मारहाण केली की, त्यांचे कंबरडेच मोडले. सहा-आसनींवर पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत बंदी आली. खरे त्यांच्यापैकी जवळपास सगळ्यांनीच कर्ज काढूनच त्या रिक्षा खरेदी केल्या होत्या; आता त्या रिकाम्या पाडून ठेवायची वेळ आली. (आता उपनगरांतल्या काही थोड्याच रस्त्यांवर वाहतूक करायची सहा-आसनींना तुटपुंजी सवलत दिली गेली आहे.) कामगारचळवळीच्या दृष्टीने विचार केला तर या संघर्षाचे स्वरूप दुर्दैवी, 'गरीब विरुद्ध गरीब' असेच होते. प्रचंड गर्दीमुळे गाडीतल्या सगळ्यांनाच त्रास

होत असावा, पण अगोदर गाडीत चढलेल्यांनी आपल्या सीट्स अगदी कसोशीने अडवून ठेवाव्यात, आणि नंतर गाडीत चढलेल्यांना जणू शत्रूस्थानी मानावे असाच काहीसा हा प्रकार होता.

आपल्या सदस्यांचे हितसंबंध जपतानाच अन्य समाजघटकांच्याही हिताचा कसा विचार करायचा हे आजच्या कामगारसंघटनांना बघावेच लागेल.

## ३. रुजवात श्रमसंस्कृतीची आणि समाजपरिवर्तन

कामगारचळवळीचा एक संक्षिप्त आढावा घेतल्यानंतर आणि तिच्यापुढील आजच्या चार प्रमुख आव्हानांचा विचार केल्यानंतर आता आपल्याला श्रमसंस्कृतीची रुजवात व समाजपरिवर्तन या ह्या विवेचनाच्या तिसऱ्या व शेवटच्या भागाकडे वळायचे आहे.

कामगारचळवळ ही मुळात कष्टकऱ्यांची, राबणाऱ्यांची, श्रमणाऱ्यांचीच चळवळ आहे आणि आजवरची तिची वाटचाल बघितली तर आपल्या सदस्यांच्या हिताचे रक्षण करायची आपली प्राथमिक जबाबदारी तिने चांगल्यापैकी पार पाडली आहे हे कोणालाही मान्य करावेच लागेल.

गोपाळ कृष्ण गोखले म्हणत त्याप्रमाणे समाजाची स्थिती ही भरलेल्या गाड्याप्रमाणे असते; तो टपालाच्या टांग्याच्या वेगाने कधीही धावू शकत नाही. सामाजिक परिवर्तन हे बहुतेकदा क्रांतीपेक्षा उत्क्रांतीतूनच साधले जाते. अशा परिवर्तनाचे वारे वादळी वेगाने नाही पण एखाद्या झुळुकेच्या स्वरूपात तरी बहुसंख्य कामगारांच्या जीवनात वाहू लागले आहेत यात शंकाच नाही. देशाच्या विकासाची फळे थोड्याफार प्रमाणात तरी कामगारवर्गाच्या हाती पडायला सुरुवात झाली आहे. तुलनेने वाढलेले पगार, बोनस, प्रवासभत्ता, कामाचे मर्यादित तास, हक्काची रजा, वैद्यकीय मदत, नोकरीची शाश्वती, निवृत्तिवेतन वगैरे फायदे आज बहुतेक सर्व संघटित कामगारांना मिळतात. त्यामुळे स्वतः अशिक्षित असणाऱ्या अनेकांची मुले कॉलेजात उच्चशिक्षण घेत आहेत व अवघ्या काही वर्षांपूर्वी अर्धपोटी असणाऱ्यांकडे रंगीत टेलिव्हिजन आला आहे. अनेक फाटक्या धोतरांची जागा टेरीवूलच्या पॅंटींनी व मातीच्या चुलींची जागा गॅस सिलिंडर्सनी घेतली आहे. नाटक-सिनेमा ही चैन राहिलेली नाही व रस्त्यावरच्या दिव्याच्या प्रकाशात अभ्यास करायची वेळ कुणाच्याच मुलांवर येत नाही. पंचक्रोशीसुद्धा न ओलांडणारे सहज काश्मीरप्रवासाला निघताएत व पायी चालण्यात ह्यात गेलेल्यांची मुले ऐटीत स्वतःच्या स्कूटरला किक मारू लागली आहेत, अनेकांच्या दारात मोटारीही उभ्या आहेत.

असंघटित कामगारांची संख्या ९० टक्क्यांहून अधिक आहे ही गोष्ट खरी असली तरी या संघटित पाच-दहा टक्के कामगारांची संख्याही एक-दोन कोटींच्या दरम्यान नक्कीच असेल आणि एवढ्या मोठ्या समुदायाला ऊर्जितावस्था प्राप्त करून देणे हे योगदानही काही थोडेथोडके नाही.

अर्थात ही ऊर्जितावस्था आपोआपच प्राप्त झालेली नसून गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांतील तीव्र कामगारलढ्यांची ही परिणती आहे. आर्थिक विकास हा शिक्षण, विज्ञान, तंत्राधिष्ठित यंत्रे, आधुनिक उत्पादनपद्धती, व्यापार, हरहुन्नरी उद्योजक वगैरे अनेक घटकांच्या संयोजनातून साधला जात असला तरी सुसंघटित कामगार संघटनांच्या अभावी हा विकास समाजाच्या अगदी मूठभर उच्चभ्रू वर्गापुरताच मर्यादित

अनुक्रमणिका

राहिला असता. शेतीत हरितक्रांती होऊनही स्वतः कोरडे राहिलेल्या करोडो शेतमजुरांप्रमाणेच सध्याच्या कामगारवर्गाची अवस्था झाली असती.

हे दुर्भाग्य टाळण्याचे पुष्कळसे श्रेय कामगारचळवळीला द्यावे लागेल, स्वतःच्या रक्ताचे पाणी व हाडाची काडे करून ज्यांनी ह्या चळवळीचा पाया भारतात रोवला, ती जोपासली, वाढवली अशा अनेक निःस्वार्थी कामगार नेत्यांना ते द्यावे लागेल. ना. म. जोशी अन् नारायण मेघजी लोखंडे यांच्या सारख्यांची या संदर्भात आज आवर्जून आठवण येते.

**३·१ : अस्तित्वाचा प्रश्न**

आज मात्र ही चळवळ एका अशा टप्प्यावर येऊन पोहोचली आहे, की पुढच्या पिढीत ती टिकेल तरी का याचीच शंका ज्यांनी या चळवळीत आपले आयुष्य घालवले आहे अशा धुरीणांनाही वाटत आहे. या लेखात पूर्वी येऊन गेलेल्या इंद्रजित गुप्ता, डॉ. शांती पटेल, डॉ. भालचंद्र कानगो, बगाराम तुळपुळे यांसारख्या दिग्गजांच्या मतांवरून त्यांना वाटणाऱ्या काळजीची आपल्याला थोटीफार कल्पना येतेच.

आज तरुण कार्यकर्ते कामगारचळवळीकडे वळताना सहसा कधी दिसत नाहीत, युनियनचे साधे सदस्यत्व स्वीकारण्यासही आजचा तरुण कामगार उत्सुक नसतो. आयटीसारख्या अनेक नव्या उद्योगक्षेत्रांत तर युनियन हा प्रकारही नसतो, स्वतः कर्मचाऱ्यांनाही त्याची आवश्यकता भासत नाही. पत्रकारांपासून गॅरेज मेकॅनिकपर्यंत सगळ्याच प्रकारच्या कर्मचाऱ्यांची नव्याने होणारी नेमणूक आता कंत्राट पद्धतीने (काँट्रॅक्ट बेसिसवर) होते असे साधारण चित्र दिसते. जुन्या कामगारसंघटना आपापल्या सदस्यांच्या मुख्यतः पगारवाढीच्या मागणीसाठी अधूनमधून संप पुकारतात आणि त्यांना व्यापक समाजाची सहानुभूती नसली तरी त्यांच्या एकूण उपद्रवक्षमतेमुळे त्यांना माध्यमांतून प्रसिद्धीही मिळत असते, नाही असे नाही; पण ही तात्कालिक प्रसिद्धी सोडली तर माध्यमांमध्ये आज कामगारचळवळीला फारसे स्थान मिळत नाही; ते मिळावे अशा प्रकारचा समाजावरील प्रभावही आज कामगारचळवळीमुळे पडताना दिसत नाही.

मालक व मजूर हे नातेही आता पूर्विइतके ढोबळ - शोषक आणि शोषित असे - राहिलेले नाही. पूर्वीच्या गब्दुल, विलासी, जुलमी 'शेटजी' ची जागा आता एमबीए झालेल्या, स्मार्ट एक्झिक्युटिव्हने घेतली आहे आणि 'कामगार' ही आता त्याच्या पारंपरिक प्रतिमेप्रमाणे पोट खपाटीला गेलेला, पिचलेला, लाचार असा राहिलेला नाही. कंपन्यांची मालकी शेअरहोल्डर्सकडे असते आणि एखादा सफाईकामगारही त्याच्या कंपनीचा शेअरहोल्डर असू शकतो.

ज्या देशात कामगारचळवळीने जन्म घेतला त्या ग्रेट ब्रिटनमध्ये तिची आज काय अवस्था आहे? साधारण १९७३-७४ पर्यंत तिथली टीयुसी अगदी जोरात होती. वेजवुड बेनसारख्या जहाल नेत्याकडे तिचे नेतृत्व होते. १९७४ च्या ऐन हिवाळ्यात तिथल्या कोळसाखाणींतल्या कामगारांनी बेमुदत संप पुकारला. हे नेहमीचेच होते. आपल्याकडचे सफाईकामगार जसे नेमके पावसाळ्यात - जेव्हा त्यांची उपद्रवक्षमता सर्वाधिक असते - संपावर जातात, तसाच हा प्रकार होता. पुरेशा कोळशाअभावी घराघरातील फायर प्लेसेस (शेकोट्या) बंद करायची वेळ आली. नागरिकांचे बेसुमार हाल होऊ लागले. पण नेहमीप्रमाणे युनियनपुढे मान न तुकवता तेव्हा सत्तेवर आलेल्या कॉन्झर्वेटिव्ह पक्षाच्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर यांनी

अत्यंत कठोरपणे हा संप मोडून काढला. 'पोलादी महिला' ('आयर्न लेडी') म्हणून त्यांची ख्याती झाली ती मुख्यतः याच घटनेमुळे. पुढे आपल्या आठ वर्षांच्या सत्ताकाळात थॅचर यांनी कामगारसंघटनांचे पार खच्चीकरण करून टाकले. या बाबतीत सर्वसामान्य नागरिकही थॅचर यांच्याचमागे उभे राहिले. 'ब्रिटनमधल्या शेअरहोल्डर्सची संख्या ही युनियनमेंबर्सच्या संख्येपेक्षा जासत असेल' ही थॅचर यांची वल्गना होती व ती त्यांनी प्रत्यक्षात साकार करून दाखवली. पुढे सत्तेवर आलेल्या लेबर पार्टीने स्वतःला 'न्यू लेबर' म्हणवत तेच धोरण चालू ठेवले; एकेकाळी जिच्या पाठबळावर लेबर पार्टी उभी होती त्या टीयुसीलाच नामोहरम करून टाकले.

जे ब्रिटनमध्ये घडले, तेच जगाच्या इतरही देशांत हळूहळू घडत गेले. आयएलओच्या एका पाहणीनुसार युरोपातील एकूण कामगारांपैकी फक्त सहा टक्के कामगार आज युनियनचे सदस्य आहेत, भांडवलवादी अमेरिकेत हे प्रमाण अकरा टक्के आहे. ह्याच संघटित (युनियनाइज्ड) कामगारांचे भारतातील प्रमाण आज अवघे ५·६ टक्के एवढेच उरले आहे. (संदर्भ : आयएलओचा २००८ चा वर्ल्ड लेबर रिपोर्ट)

एकूण परिस्थिती ही अशी बिकट आहे. म्हणजे, एका बाजूला ज्यांच्यावरती आजही खूप अन्याय होत आहे अशा असंघटित कामगारांची संख्या प्रचंड आहे व त्यांना संघटनेची गरजही प्रचंड आहे; पण त्याचवेळी, या असंघटित समाजाला आपल्यात सामावून घेण्यात संघटित कामगारचळवळ अयशस्वी ठरली आहे; परिणामतः तिचे स्वतःचे अस्तित्वही आज धोक्यात आले आहे.

### ३·२ : श्रमसंस्कृतीचा देशातील अभाव

या परिस्थितीवर मात करून, कात टाकून, पुन्हा एकदा कामगारचळवळीला ताठ कण्याने उभे राहायचे असेल तर त्यासाठी तिला कठोर आत्मचिंतन करावे लागेल आणि त्यानंतर कुठल्यातरी एखाद्या व्यापक ध्येयाची तिला कास धरावी लागेल. एखादे व्यापक ध्येय समोर असेल तर माणूस मरगळ झटकून पुन्हा उभा राहू शकतो, जोमाने वाटचाल सुरू करू शकतो. जे व्यक्तीच्या बाबतीत खरे आहे, ते संस्थेच्या बाबतीतही खरे आहे. या देशात श्रमसंस्कृती रुजवण्याचे प्रयत्न आता कामगारचळवळीने सुरू करावेत आणि ह्या प्रयत्नांतून तिला कदाचित स्वतःसाठी नवी दिशाही सापडू शकेल असे नम्रपणे सुचवावेसे वाटते. समाजपरिवर्तनाचे व्यापक ध्येय समोर ठेवूनच एकेकाळी कामगारचळवळीची सुरुवात झाली होती आणि या देशात श्रमसंस्कृती रुजवणे हा ह्या व्यापक ध्येयाच्या पूर्तीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

पाश्चात्त्यांच्या विकासाची कारणे अनेक असणार, पण ह्यातील एक महत्त्वाचे कारण त्यांची श्रमसंस्कृती (वर्क कल्चर) हे आहे. औद्योगिक क्रांती ज्या युरोपियन देशांत सर्वप्रथम घडून आली ते ब्रिटन-हॉलंड-जर्मनी यांसारखे देश हे प्रामुख्याने प्रॉटेस्टंट आहेत व ज्या देशांमध्ये ती क्रांती बऱ्याच उशिराने घडून येऊ शकली ते स्पेन-पोर्तुगाल-इटली यांसारखे देश हे प्रामुख्याने कॅथलिक आहेत ही वस्तुस्थिती विचारात घेण्यासारखी आहे. वर्क एथिक्स (कामातली नैतिकता) हे ख्रिश्चनांपैकी प्रॉटेस्टंटांचे मोठे बलस्थान होते. 'Work is worship and duty is God' ('काम ही पूजा आणि कर्तव्य हा देव') ही केल्व्हिन या त्यांच्या मोठ्या धर्मगुरुची शिकवण. कुठलेही काम कमी लेखायचे नाही; चिकाटीने, कर्तव्यभावनेने आपापले काम करत राहायचे; आणि आपल्याला ते केल्याचा अभिमान वाटेल इतक्या चांगल्या प्रकारे ते करायचे; त्यातच जीवनाची सार्थकता मानायची; अशा प्रकारची एक प्रवृत्ती त्यातून पाश्चात्त्यांमध्ये रुजली व त्यातूनच पुढे त्यांची आजची कार्यसंस्कृती विकसित झाली. त्यांच्या प्रगतीचे ते एक मोठे कारण आहे.

अनुक्रमणिका

दुर्दैवाने आपल्या संस्कृतीने श्रमांना ही प्रतिष्ठा कधीच दिली नाही. आपल्या समाजाने श्रमणारे जीव शूद्र मानले; त्यांना व व्यापार करणाऱ्या (ज्यातही श्रम भरपूर लागतात) वैश्यांना खालचे सथान दिले तर राज्यकर्ते व विद्वान यांना - क्षत्रिय व ब्राह्मण यांना - उच्चासनी बसवले. अंगमेहनतीचे कुठलेही काम करायला जेव्हा आमचा तरुण नकार देतो, त्यामुळे 'आपली पोझिशन डाऊन होते' असे मनोमन मानतो, तेव्हा त्यामागे शेकडो वर्षे चालत आलेल्या एक दुर्दैवी रूढीचा प्रभाव असतो. शेतकऱ्याचा मुलगाही मग शहराकडेच धाव घेतो, त्याला पंख्याखाली बसून करायचे साहेबी कामच हवे असते; मातीत हात घालायचे नसतात. बहुतेकांची प्रवृत्ती ही काही ना काही बहाणा करून शारीरिक काम टाळण्याची असते आणि जेव्हा ते करावेच लागते तेव्हा कसेतरी हगावर माती लोटल्यासारखे काम करण्याकडे त्यांचा कल असतो. स्वयंप्रेरणेने चांगल्याप्रकारे काम करायची, मुकादमाशिवाय काम करायची आपल्याला सवय नसते. आपल्या देशात श्रमसंस्कृती ही अजून नीटशी रुजलेलीच नाही हे एक कटू सत्य आहे.

### ३·३ : श्रमसंस्कारांचे पूर्वसुरींचे प्रयत्न

मेदू आणि हात यांच्यातील ही फारकत दूर करायचे, श्रमांना प्रतिष्ठा द्यायचे प्रयत्न आपल्याकडे झाले नाहीत असे नाही. असे प्रयत्न ज्यांनी आयुष्यभर केले त्यांच्यातले एक प्रमुख म्हणजे महात्मा गांधी. आपल्या सहकाऱ्यांना संडास साफ करण्यापासून सर्व प्रकारचे शारीरिक काम करायची शिकवण त्यांनी दिली. बाबा फाटक यांच्यासारख्या संस्कृत पंडिताला त्यांनी मेलेल्या ढोराचे कातडे काढण्याचे काम सांगितले; तर मणीभाई देसाईंसारख्या तरुण इंजिनीअरला मैला वाहायचे काम दिले. त्यांना चरखा आणि रोजची सुतकताई हादेखील श्रमसंस्काराचाच एक भाग होता. स्वतःच्या हातांनी काम करण्याचे आध्यात्मिक महत्त्वही गांधीजींनी अधोरेखित केले.

स्वतंत्रता आंदोलनातील एक प्रसंग या संदर्भात खूप बोलका आहे. काँग्रेसनेत्यांची कुठल्यातरी महत्त्वाच्या विषयावर गांधीजींच्या आश्रमात चर्चा चालली होती. मध्येच गांधीजींनी घड्याळाकडे पाहिले आणि ते उठले, खोलीच्या बाहेर गेले. चर्चा मध्येच थांबल्यामुळे चकित होऊन सगळे नेते गांधीजींकडे पाहतच राहिले. जरा वेळाने गांधीजी परतले. आपल्या जागी जाऊन बसले. "बापू, मघाशी आपली इतकी महत्त्वाची चर्चा चालू असताना मध्येच उठून तुम्ही बाहेर कुठे गेला होता?" - कुणीतरी कुतूहलाने विचारले. "मी माझ्या शेळीला चारा देऊन आलो. तिची खायची वेळ झाली होती," गांधीजी उत्तरले. "पण आत्ता? आपली इतकी महत्त्वाची चर्चा चालू असताना?" - पुढचा प्रश्न आला. "आपली चर्चा महत्त्वाची आहेच, पण शेळीला वेळच्या वेळी चारा देणंही तितकंच महत्त्वाचं आहे," असे म्हणत गांधीजींनी पुन्हा चर्चा सुरू केली. आंदोलन व त्याची बौद्धिक चर्चा यांच्याइतकेच महत्त्व साध्यासुध्या शारीरिक कामांना आहे, कुठच्याच कामाला आपण कमी लेखू नये, हा एक महत्त्वाचा संदेश गांधीजींनी एका साध्या कृतीतून दिला.

स्वातंत्र्योत्तर काळात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनीही श्रमसंस्कार मोलाचे मानले. ग्रामीण महाराष्ट्रात सातशे शाळा चालवणाऱ्या भारतातील या सर्वांत मोठ्या शिक्षणसंस्थेचे सध्याचे कार्याध्यक्ष ॲड्. रावसाहेब शिंदे लिहितात :

"भाऊरावांच्या शिक्षणविचारात श्रमाचा मंत्र हा मोलाचा मंत्र होता. विद्यार्थी वसतिगृहात सर्व तऱ्हेची कामे करत. शाळा-कॉलेजात खडी फोडण्याच्या कामचा जणू नियमित परिपाठच असायचा. खडीचे ढीगचे ढीग तयार होत. याशिवाय वर्गांची स्वच्छता, घंटा देणे, जमीन सपाट करणे, इमारत बांधकामात

अनुक्रमणिका

मदत करणे, शेतीची कामे करणे, शेतीमाल बाजारात विकणे, तसेच, झाडलोट करण्यापासून संडास, मुताऱ्या साफ करण्यापर्यंतची कामेदेखील विद्यार्थी करत. रयत शिक्षण संस्थेत कर्मवीरांनी श्रमसंस्कृतीची जोपासना केली. सर्वांनीच कामे करावयाची म्हटल्यानंतर उच्चनीचतेच्या भावनेला थाराच मिळत नसे. श्रम करणाऱ्या सर्वच व्यक्ती समान! समानतेचे शील श्रमाच्या पायावर जोपासले जात होते. सर्व तऱ्हेच्या विषमतेशी झुंज द्यायची असल्यास श्रमाच्या समान धाग्याने जोपासले जाणारे समानतेचे शील अतिशय मोलाचे आहे, हे कर्मवीरांनी हेरले. शेतात आणि उद्योगात राबणारा समाज त्यांच्या दिव्यचक्षुंपुढे उभा होताच. माणसाने मीपणा, अहंभाव आणि स्वतःविषयीच्या श्रेष्ठत्वाचा विचार सोडल्याशिवाय समानतेचे शील जोपासले जाणे शक्य नाही, याची शिकवण गांधीजीही देतच होते. श्रमाचे असे संस्कृतीच्या विकासाशी अतूट नाते होते. —ॲड्. रावसाहेब शिंदे

(प्रश्न आहे मूल्यांचा, अमेय प्रकाशान, पुणे,
प्रथमावृत्ती, जून २००९)

**३·४ : उद्याची लढाई**

श्रमसंस्कृती रुजवण्याची अर्धवट राहिलेली ही लढाई कामगारचळवळ पुढे चालू ठेवू शकेल का? नाहीतरी कामगारचळवळीचा आणि श्रमांचा अगदी जैविक म्हणता येईल इतका जवळचा संबंध आहेच.

यासाठी चळवळीला हक्कांएवढाच कर्तव्यांवरही भर द्यावा लागेल, कामाचा योग्य तो मोबदला मिळालाच पाहिजे, पण त्यासाठी आधी आपले कामही उत्तम व्हायला हवे, असा आग्रह आपल्या सदस्यांपाशी धरावा लागेल; आणि हे खूप कठीण आहे; सतत लोकानुनय करत राहायची सवय झालेल्या, फक्त मागण्यांवरच भर देणाऱ्या नेत्यांच्या दृष्टीने तर खूप कठिण आहे. कारण त्यात आपले सदस्य दुसऱ्या युनियनकडे जायचा गंभीर धोका आहे! उदाहरणार्थ, "तुम्ही रोज शाळेत जायलाच हवं, मुलांना मन लावून शिकवायलाच हवं, तुमची वागणूक हाच विद्यार्थ्यांवरचा सर्वांत मोठा संस्कार आहे" असे सांगणाऱ्या नेत्यापेक्षा "बिनधास्त राहा, तुमच्या केसालाही धक्का लावायची कोणाची हिंमत नाही, इतका इतका पगार तुम्हाला मिळालाच पाहिजे, कोण म्हणतो देणार नाही - घेतल्यावाचून राहणार नाही" असे म्हणणारा नेता हा कुठल्याही शिक्षकांना जास्त आवडणार हे उघड आहे! पण हक्कांइतकाच कर्तव्यावर भर द्यायची सुरुवात केव्हातरी करावीच लागेल, पगारकेंद्रित संस्कृतीऐवजी श्रमकेंद्रित संस्कृती रुजवावीत लागेल.

अर्थात श्रमसंस्कृतीची रुजवात ही व्यापक समाजपरिवर्तनाची केवळ सुरुवात आहे, त्याच्याही पुढे जाऊन एक आदर्श समाज आपल्याला निर्माण करायचा आहे, याचेही भान ठेवावेच लागेल.

कष्टकऱ्यांच्या श्रमसंस्कृतीची काही उत्तम उदाहरणे सुदैवाने अगदी आपल्या महाराष्ट्रातच आहेत. उदाहरणार्थ, श्री महिला गृह उद्योग ही संस्था संस्थेने गरीब महिलांना पापडाचे भिजवलेले पीठ द्यायचे, आपापल्या झोपड्यांमध्ये ते नेऊन त्या महिलांनी त्याचे पापड लाटायचे, ते पुन्हा संस्थेत आणून द्यायचे, संस्थेने ते विकायचे, आणि झालेला नफा श्रमांचे मोल म्हणून त्या महिलांमध्येच पुन्हा वाटायचा, या साध्या रचनेवर आज एका प्रचंड संस्थेचा डोलारा उभा राहिला आहे. ना कुठे लाचारी, ना कुठे मग्रुरी; ना शोषक ना शोषित. घामाचे योग्य दाम आणि आपल्या श्रमांतून संसार चालवल्याचे समाधान. आज 'लिज्जत'चे पापड फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर जगभर विकले जातात, वाखाणले जातात.

असेच महाराष्ट्रातले श्रमसंस्कृतीचे दुसरे उदाहरण म्हणजे मुंबई डबेवाले. रोज सकाळी जेवणाचे डबे उपनगरातल्या घराघरातून गोळा करायचे, ट्रेनने ते फोर्टमधल्या कार्यालयांमध्ये पोचवायचे आणि रिकामे डबे पुन्हा सगळे घरोघर पोचते करायचे. डबेवाले भले अशिक्षित असोत, पण चूक कधीच होत नाही; तुफान गर्दीत अन् उन्हापावसात प्रवास करावा लागतो, ट्रेन बदलावी लागते; पण याचा डबा त्याला, त्याचा ह्याला, असे कधी होत नाही. हजारो नोकरदारांना रोजच्या रोज घरचे जेवण मिळते, डबेवाल्यांचाही संसार होतो.

लिज्जत पापडाची आणि डबेवाल्यांची कहाणी ही आजच्या श्रमसंस्कृतीची भगवद्गीता आहे.

या गीतेवर अनेकांनी भरभरून लिहिले आहे, अहमदाबादच्या इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंटपासून अमेरिकेतल्या हार्वर्ड बिझिनेस स्कूलपर्यंत दर्जेदार सेवेचे, सक्षमीकरणाचे (empowerment चे) मानदंड म्हणून त्यांची उदाहरणे अभ्यासली जातात. पण दुर्दैव म्हणजे आमच्या कामगारचळवळीने या श्रमसंस्कृतीची कधी दखलच घेतलेली नाही; असे काहीतरी आपण वेगवेगळ्या क्षेत्रांत करू शकतो, करू या, असा आदर्श आपल्या सदस्यांपुढे कधी ठेवलेला नाही.

सुदैवाने श्रमसंस्कृतीचे महत्त्व जाणणारे काही प्रमाणिक कामगारनेते आजही कार्यरत आहेत. उदाहरणार्थ, बँक ऑफ महाराष्ट्रमधून २००२ साली निवृत्त झालेले कॉ. सुरेश धोपेश्वरकर. २००१ ते २००४ या कालावधीत ते ऑल इंडिया बँक एम्प्लॉइज असोसिएशनचे अध्यक्ष होते, आजही युनियनच्या कामात ते हिरिरीने अग्रभागी असतात. ते म्हणतात, "आदर्श कार्यसंस्कृतीचा आग्रह व व्यवसायाच्या प्रगतीत युनियनने घ्यायचा पुढाकार ह्या दोन तत्त्वांवर मी गेली तीस वर्षं भर देत आलो आहे. अशा मूल्यांचा उच्चार करणंही तेव्हा चळवळीत निषिद्ध मानलं जाई, काही डाव्या संघटनांनी त्यावेळी 'प्रतिक्रियावादी' म्हणून माझ्यावर टीकाही केली. पण मी माझी भूमिका सोडली नाही. ट्रेड युनियन चळवळीने, विशेषतः सार्वजनिक सेवा क्षेत्रातील कामगार संघटनेने, कार्यसंस्कृतीविषयी आग्रही असलेच पाहिजे. बँकिंग हा वित्तीय सेवा पुरवणारा उद्योग आहे. १९७३ साली आमच्या महाराष्ट्र बँकेतील युनियनने, इतर संघटनांच्या विरोधाला न जुमानता, ठेवीसंकलन व ग्राहकसेवा मोहीम राबवली होती. १९८७ च्या सुमारास बँक ऑफ महाराष्ट्राची परिस्थिती खूप बिकट बनली होती. व्यवस्थापन निर्नायकी बनलं होतं. ठेवी संकलन थंडावलं होतं. क्रेडिट स्क्वीझमुळे कर्जवाटप जवळपास थांबलं होतं. सगळीकडे नैराश्याचं वातावरण होतं. अशा परिस्थितीत युनियननेच पुढाकार घ्यायला हवा हे ओळखून आम्ही 'Whither Bank of Maharashtra?' — 'बँक ऑफ महाराष्ट्र नष्ट होऊ द्यायची का?' - या शीर्षकाखाली एक पत्रक काढलं. त्यातील धोरणानुसार सामान्य कर्मचाऱ्यांमधली जिद्द वाढवली. त्यांच्याच पुढाकाराने पुढे बँक ऑफ महाराष्ट्रचं भरकटलेलं तारू सावरलं."

आज 'कामगारचळवळ नष्ट होऊ द्यायची का?' असाच प्रश्न निर्माण झाला आहे. कामगारसंघटनांनी पुढाकार घेतला, व्यापक समाजपरिवर्तनासाठी स्वतःला कटिबद्ध केले, तरच कामगारचळवळीचे हे भरकटलेले तारू उद्या सावरता येईल.

भारतीय कामगारचळवळीच्या आपल्या इतिहासात साथी व. भ. कर्णिक लिहितात :

अनुक्रमणिका

“There was a time when union were regarded as organs of class war. Even communists have now given up that outmoded dogma. Later, unions were regarded as agencies for collective bargaining. Even that is now inadequate. A trade union is now essentially a social organization looking after the alround interest of workers. In the new era, trade unions cannot content themselves with playing merely a negative role of criticizing, abusing and condemning employers and the government. They must also, play the positive role of sharing in the development of industries and of preparing and training workers to discharge their responsibilities as citizens.”

(“एक वेळ अशी होती, की कामगारसंघटना हे वर्गयुद्धाचे हत्यार मानले जाई. स्वतः साम्यवाद्यांनीही आता तो कालबाह्य दुराग्रह सोडून दिला आहे. त्यानंतर, कामगारसंघटना म्हणजे एकत्रित देवाणघेवाण करणारी यंत्रणा मानली गेली. तीही भूमिका आता अपुरी आहे. आज कामगारसंघटना ही मुख्यतः कामगारांच्या सर्वांगीण हितासाठी झटणारी एक सामाजिक संस्था आहे. आता या नव्या युगात व्यवस्थापन आणि सरकार यांच्यावर केवळ टीका करायची, त्यांना शिव्या द्यायच्या आणि त्यांचा धिक्कार करायचा एवढीच नकारात्मक भूमिका बजावण्यात कामगारसंघटनांना समाधान मानून चालणार नाही. उद्योगधंद्यांच्या विकासासाठी आणि एक नागरिक म्हणून असलेली आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी कामगारांना तयार करणे, प्रशिक्षित करणे यासाठीही कामगारसंघटनांनी झटणे, विधायक भूमिका बजावणे आज अत्यावश्यक बनले आहे.”)

(*Indian Trade Unions — A survey*,
पृष्ठ ३१४-१५)

योगायोगाची गोष्ट म्हणजे कर्णिक यांचा हा ग्रंथ डिसेंबर १९६० मध्ये प्रकाशित झालेला आहे - म्हणजेच संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर अवघ्या सात-आठ महिन्यांच्या कालावधीत. आज ५० वर्षांनंतरही कर्णिक यांचे त्यावेळचे उद्‌गार कामगार चळवळीला दिशादर्शक ठरतील असेच आहेत.

हातात कोयता आणि हातोडा घेतलेला कामगार हे जगभराच्या कामगार संघटनांनी स्वीकारलेले स्वतःचे बोधचिन्ह आहे. याच बोधचिन्हात एका नव्या श्रमसंस्कृतीचे वा त्या श्रमसंस्कृतीवर आधारलेल्या आदर्श समाजरचनेचे आवाहनही सामावलेले आहे. मागे लिहिल्याप्रमाणे अन्यायाची चीड आणि शोषितांचा कळवळा या मानवी प्रेरणांमध्येच आदर्श कामगार चळवळीचा खरा जीव साठवलेला होता, या प्रेरणा म्हणजे कामगार चळवळीचा अंतर्नादच आहे आणि आजही त्याच प्रेरणा कामगार चळवळीला नवी उमेद, नवा जोम प्राप्त करून देऊ शकतील.

अनुक्रमणिका


জীবন



**डॉ. मोहसिना मुकादम**

एम्. ए. एम.फील व पी.एच.डी. (मुंबई विद्यापीठ). खाद्यसंस्कृती विषयावर विशेष संशोधन व लेखन. लोकसत्ता (चतुरंग पुरवणी) १९९९ ते २००१ दरम्याने खाद्य संस्कृती हे सदर लिहिले. लोकमतमध्ये २००२ मध्ये 'खा खाण्याचा' हे सदर लिहिले. आकाशवाणी, दूरदर्शन या प्रसारमाध्यमांसाठी खाद्यसंस्कृतीवर लेखन. सल्लागार संहिता लेखिका व परीक्षक म्हणून सहभाग. विविध दिवाळी अंकातून व मासिकातून लेखन. तसेच अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय परिषदांतून शोधनिबंधांचे वाचन.

पत्ता : ९ बी, २०३, निलम नगर, गव्हाण पाडा, मुलुंड (पू.), मुंबई ४०० ०८१.

**को**णत्याही प्रदेशाच्या इतिहासात पन्नास वर्षांचा काळ तसा लहान म्हणायला हवा आणि त्या प्रदेशाला जर हजारो वर्षांचा इतिहास असेल तर नक्कीच. पण ही पन्नास वर्षे प्रचंड उलथापालथ करणारी असली तर मात्र त्या काळाची खास दखल घ्यावी लागते. १३ व्या शतकात यादवकाळात महाराष्ट्राला त्याच्या पृथकात्मकतेची पहिल्यांदा ओळख होऊ लागली. शेजारील प्रदेशाचा प्रभाव सामावून घेऊन स्वतःची अशी विशिष्ट संस्कृती आकार घेऊ लागली. १९६० च्या भाषावार प्रांतरचनेमुळे प्रादेशिक वेगळेपण अधिक स्पष्ट झाले. त्याच्या सीमा ठळक झाल्या. त्याला कायदेशीर तसेच राजकीय मान्यता मिळाली. ह्याच सीमांच्या मर्यादेत आपल्याला आढावा घ्यायचा आहे तो १९६० ते २०१० ह्या पन्नास वर्षांच्या महाराष्ट्राच्या खाद्यजीवनाचा. महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीवर पडलेला प्रभाव, स्वीकारलेले बदल पाहत वेध घ्यायचा आहे भविष्य काळाचा. रजत, सुवर्ण, हीरक असे टप्पे गाठताना सिंहावलोकन करणे सामाजिकदृष्ट्या आवश्यक असते.

गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचा आढावा घेतला तर त्यातले सातत्य पण त्याचबरोबर वेळोवेळी कालानुरूप केलेले बदल जाणवतात. खाद्यसंस्कृतीचे सातत्य टिकवून बदलाचेही तेवढ्याच जोमाने स्वागत होताना दिससे. परंपरेने चालत आलेले पदार्थ आजही त्याच पद्धतीने किमान सणसमारंभासाठी होतांना दिसतात. पण एकूणच मराठी समाज हा उदारमतवादी. त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक स्थानामुळे बाहेरच्या प्रभावापासून तो कधीच अलिप्त राहिलेला नाही म्हणून रुचतील ते, पटतील ते बदल त्याने नेहमीच स्वीकारलेले दिसतात. खाद्यसंस्कृतीही त्याला अपवाद नाही. काही वेळा हे बदल अत्यंत सूक्ष्मपणे होत होते तर काही वेळा अगदी ठळकपणे, स्पष्टपणे होत होते. हे बदल विविध स्तरांवर तसेच वेगवेगळ्या वेगाने झाले आहेत. काही वेळा बदलाची गती संथ होती तर काही वेळा अतिशय वेगवान. ह्या बदलाची कारणे राजकीय, आर्थिक, सामाजिक तसेच सांस्कृतिक घडामोडीत शोधता येतील.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरच्या पहिल्या दोन दशकात अन्नधान्याचा अभाव होता. त्यामुळे सरकारी नियंत्रणाने परिस्थिती काबूत ठेवण्याचा प्रयत्न व त्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतले गेल्याचे दिसते. खरे म्हणजे ह्या सर्वांची सुरुवात स्वातंत्र्यपूर्व काळापासून झाली होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे आहाराच्या संदर्भात फार महत्त्वाचा निर्णय तत्कालीन राज्यकर्त्यांना घ्यावा लागला. हा निर्णय सर्वप्रथम मुंबई इलाख्यात त्यातही मुंबई शहरासाठी घेण्यात आला होता. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने तसेच तिथे मोठ्या संख्येने कामगार वर्ग असल्याने हा धाडसी प्रयोग करण्याचे ठरले. तो प्रयोग होता रेशनिंगचा. १९४३ मध्ये गरजेमुळे सुरुवात झालेला हा प्रयोग एवढा यशस्वी ठरला की, पुढे भारताच्या सर्व प्रमुख शहरात तो राबवण्यात आला. आधुनिक भारताच्या इतिहासात पहिल्यांदा अशाप्रकारे सरकारतर्फे आहारावर नियंत्रण ठेवण्यात आले. आतापर्यंत नागरिकांना सकस अन्न पुरवणे व त्या अनुषंगाने त्यांचे आरोग्य राखणे ही शासनाची जबाबदारी आहे असे मानले जात नव्हते, पण हळूहळू हा विचार मागे पडून नागरिकांचे आरोग्य राखण्यासाठी त्यांना पौष्टिक, सकस, अन्नधान्य, दूधदुभत्यांची आणि आवश्यकता वाटली तर व्हिटामिन्स गोळ्या पुरवण्याची जबाबदारी शासनाची आहे हे स्वीकारले गेले. सुदृढ नागरिक ही राष्ट्राची गरज आहे हे त्यामागचे सूत्र तर होतेच पण अन्नधान्याचे उत्पादन मर्यादित असल्याने सर्वांना त्याचा पुरवठा होण्यासाठी अशाप्रकारे नियंत्रण ठेवणेही गरजेचे होते.

मध्यमवर्गीय व निम्न मध्यमवर्गीयांना रेशनिंगचा फार मोठा आधार वाटत असे. १९७० च्या दरम्यान दिवाळीच्या फराळासाठी रवा, मैदा, तेल हेही रेशनिंगच्या माध्यमातून उपलब्ध व्हायचे. दुधासाठी पत्र्याची कूपन्स घ्यावी लागायची. ठरावीक उद्दिष्टाने सुरू केलेली ही योजना आजही सुरू आहे. तिचे यश-अपयश मोजणे हा स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकतो. अभावाच्या काळात वेळोवेळी सरकारने अधिक नियंत्रण घातल्याचेही काहींना आठवत असेल. त्यात लग्नाच्या जेवणावळीसाठी मर्यादित पाहुणे बोलावायचे व टरावीक पदार्थच वाढायचे हे नियंत्रण आदरातिथ्याच्या आपल्या कल्पनेत नक्कीच बसणारे नव्हते. सर्वसामान्य माणूस बिचारा त्याची काटकोरपणे अंमलबजावणी करत होता पण समाजातील काही प्रभावशाली व श्रीमंत व्यक्ती या नियंत्रणाकडे दुर्लक्ष करीत. अशाच एका प्रभावशाली आमदाराने निंयत्रण असतानाही आपल्या मुलाच्या लग्नात हजारो लोकांना पंचपक्वानाचे जेवण दिले. उन्हाळ्यात झालेल्या ह्या लग्नात बर्फाच्या लाद्या विहिरीत घातल्याच्या वार्ता त्यावेळी वर्तमानपत्रात गाजल्या होत्या.

१९८० च्या दशकापासून हरितक्रांती, श्वेतक्रांतीमुळे फरक जाणवू लागला. अन्नधान्याचे उत्पादन वाढल्यामुळे त्यावरील नियंत्रण सैलावू लागले. तळागाळातील लोकांना आजही रेशनिंगचा आधार आवश्यक असला तरी मध्यमवर्गीयांना आता बाजारातून हव्या त्या दर्जाचा माल घेण्याचा पर्याय होता. श्वेतक्रांतीमुळे दुधासाठीचे पत्र्याचे कूपन कालबाह्य ठरले. दुधासोबत आता मस्का ओळखीचा होऊ लागला. पनीर आणि चीजचा वापर गृहिणी सढळ हस्ते करू लागली. रंगीत वेष्टणात गुंडाळलेला स्लाईस ब्रेड शहरी गृहिणींचा सखा बनला. आणीबाणीच्या परिस्थितीत अगदी ब्रेकफास्टपासून ते डिनरपर्यंत तोच कामी येत होता. दुकानातून तयार पोळ्या मिळायला अजून दहा वर्षांचा अवकाश होता.

गेल्या पन्नास वर्षांत गृहिणीच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट घडली ती म्हणजे बाजारात अनेक वस्तू सहज उपलब्ध होऊ लागल्या. त्यापूर्वी सर्व साठवणीचे पदार्थ घरी करण्याकडे कटाक्ष असे. ज्या घरांमध्ये सोवळे ओवळे मोठ्या प्रमाणात पाळले जाई तिथे तर नेहमीसाठी आणि उपवासासाठी असे वेगवेगळे प्रकार असायचे. मार्च महिन्यापासून ही लगबग सुरू होई. किनारपट्टीवर राहणाऱ्यांना मसाले-लोणच्यांसोबत सुक्या मासळीचीही पावसाळ्यासाठी बेगमी करावी लागे. साध्या साध्या गोष्टींसाठी बाजारात धाव घेण्याची

अनुक्रमणिका

पद्धत नव्हती. अगदी लाडवासाठी रवाही घरीच बनवला जाई. पण हळूहळू ह्या कष्टाच्या कामापासून सुटका होऊ लागली. शंभर वर्षांपूर्वी बेडेकरांना त्यांची लोणची, मसाले घेऊन दारोदारी जावे लागत होते तेव्हा त्यांना वाटलेही नसेल फक्त लोणची-पापडासाठी नव्हे तर दिवाळीच्या रेडीमेड फराळासाठीही त्यांच्या दुकानात झुंबड उडेल. रेडीमेड पदार्थ फक्त पापड, लोणच्यापुरते मर्यादित राहिले नाहीत. डाळ फ्राय, उपमा ते बिर्याणीपर्यंत सर्व पदार्थ मिळू लागले. फक्त पदार्थच नाही तर स्वयंपाकघरातील आधुनिक उपकरणेही स्त्रियांच्या स्वयंपाकापासूनच्या मुक्ततेला उपयोगी ठरली. कूकर, गॅस, फ्रीज, मिक्सर, ओव्हन ह्या प्रत्येक उपकरणाच्या बाजारातील आगमनाबरोबर गृहिणीचा स्वयंपाकघरातला वेळ कमी होत गेला. पण खरी 'युरेका युरेका' म्हणण्याची वेळ मात्र रोटी मेकरमुळे आली होती. पण इतर उपकरणांप्रमाणे हे लोकप्रिय झाले नाही. आता पोळ्यांना बाईही नको, उपकरणही नको, कारण वाण्याच्या दुकानातही पोळ्यांपासून भाकरीपर्यंत सर्व मिळू लागले आहे.

१९९० च्या दशकात मध्यमवर्गीयांच्या हातात पैसा खुळखुळू लागला. जागतिकीकरणामुळे 'हे विश्वचि माझे घर' बनले. मग त्याचे प्रतिबिंब ताटात न पडते तर नवलच होते. १९७० मध्ये पाककलेच्या वर्गात इडली कशी बनवावी ह्याचे प्रात्यक्षिक दिले जाई. १९८० मध्ये समोसा, केक, जेली, जॅम तर १९९० मध्ये चायनीज, पंजाबी पदार्थ शिकण्यासाठी ह्या वर्गांचा आधार होता. २००० मध्ये मॅक्सिकन, थाय, इटालियन पदार्थ आवडी लागले होते. २१ व्या शतकातील पिढी ही एम.टी.व्ही. पिढी म्हणजे remix आणि fusion आवडणारी आहे. तिची खाण्यापिण्याची आवडही तशीच आहे. मग शेज्वान वडापाव, स्प्रिंगडोसा, नूडल्सपोहे हे ह्या पिढीचे खाद्य झाले. मुलांच्या आवडी पुरवण्यासाठी घरीही प्रयोग होऊ लागले. मग वरणफळात कणकेच्या फळांऐवजी पास्ता घातले जाताहेत. आपल्या मराठमोळ्या पोळीचा रोल आता फ्रँकी म्हणून मिरवत आहे. ताटातील पदार्थांवरून ज्ञाती ओळखण्याची पद्धत तर कधीच मोडीत निघाली आहे. आता मराठमोळ्या लग्नात हळदीच्या जागी जसे 'लेडीज संगीत' अनिवार्य झाले आहे तसेच बुफेमध्ये कोणत्याही मोसमात उंधियो, पनीरचा वापर पाहता महाराष्ट्रात दुधाचे पाट अगदी पूर्वीपासून वाहत असावेत असेच कुणालाही वाटावे.

जीवनशैलीचा फार मोठा प्रभाव आहारशैलीवर पडत असतो. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राची आहारशैली आणि एकट्या मुंबईची आहारशैली ह्यात आता-आतापर्यंत जमीन-आसमानाएवढा फरक होता. मुंबई ही फक्त महाराष्ट्राची प्रशासकीय राजधानीच नाही तर सांस्कृतिक नेतृत्वही मुंबईकडे येते. फॅशनच्या क्षेत्रात केवळ महाराट्रच नव्हे तर संपूर्ण भारत मुंबईकडे पाहत असतो. मग खाण्यापिण्याच्या फॅशन्सचा त्याला अपवाद कसा असेल? मुंबईत काही नवीन घडले, की त्याचे पडसाद लगेच संपूर्ण महाराष्ट्रभर उमटतात. आज मुंबई आणि उर्वरित महाराष्ट्रात फार फरक राहिलेला नाही. दळणवळणाच्या साधनात सुधारणा, शैक्षणिक प्रगती, माहितीचे मायाजाल, मॉल्स, वेगवेगळ्या वाहिन्या ह्यामुळे तर हे अधिकच सोपे झाले आहे.

आता आतापर्यंत सांगली, सातारा, धुळे, नागपूर अशा शहरांमधे बाहेर जाऊन हॉटेलमध्ये खायला समाजमान्यता नव्हती. घरी आई, बहीण, बायको असताना असे बाहेरचे खाणे हे उचित मानले जात नव्हते. अनेक महाविद्यालयांना कॅन्टीन नसायचे. असल्यास क्वचितच कोणी त्यात जायचे. मुलींनी तर जाण्याचा प्रश्नच नसे. हॉटेल्स म्हणजे, 'उडाणटप्पूंचे अड्डे' असेच समाजाला वाटत असे. तालुक्याच्या ठिकाणी कामानिमित्त गेल्यावर घरचे कोणी सोबत असले तर बायका-मुली हॉटेलमध्ये जाऊन चहा किंवा वडा,

अनुक्रमणिका

भजी, मिसळपाव, पुरीभाजी खात पण तेही आत्यंतिक गरजेपोटी, नाहीतर सोबत डबा घेऊन झाडाखाली किंवा कार्यालयाच्या आवारात बसून खाणे होई. पण हळूहळू हे बदलू लागले.

१९७० च्या दशकात उडपींनी आपला दबदबा महाराष्ट्रात निर्माण केला. त्यांनी आपल्याला इडली, मेदूवडा, डोसा, यांची चटक लावली. १९८० च्या दशकात मुंबईत पंजाबी ए ग्रेड हॉटेल्समध्ये मुगलाई पदार्थ खाणे ही सेलिब्रेशनची व्याख्या झाली. उडप्याकडे जाणे आपल्या खिशापाकिटाला परवडत होते. पंजाबी हॉटेल्सच्या मेन्यूकार्डच्या उजव्या बाजूचे आकडे डोळे पांढरे करायचे. आत आल्यावर दरवाज्यावरील झुपकेदार मिशीवाल्या दरवानाशी गाठ असायची. आतले मंद दिवे, संगीत ह्यांचा बऱ्यापैकी प्रभाव पडायचा. पंजाबी हॉटेल्स जरी महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात पोहचली नसली तरी त्यांची उणीव भासत नाही. कारण उडप्यांनी आपल्या मेन्यू कार्डात दाक्षिणात्य आणि उत्तर भारतीय पदार्थ आणून प्रादेशिक एकात्मता साधली आहे. चायनीजची चव १९९० च्या दशकापासून कळू लागली. स्वातंत्र्यपूर्व काळातील तरुण पिढीला निदान मुंबई, पुणे, नाशिकच्या, इराणी कॅफे हे हक्काचे गप्पा मारण्याचे ठिकाण असायचे. आता ती जागा चायनीजच्या गाड्यांनी घेतली आहे.

मुंबईने महाराष्ट्राला जशी वेगवेगळ्या चवींची हॉटेल्स दिली तसेच काही खास पदार्थही दिले. भेळ म्हटले, की ती मुंबईचीच. तसे म्हटले तर चाटचा प्रकार उत्तरेकडून आला—आलू टिक्की, रगडा, गोलगप्पे किंवा पाणीपुरी. पण भेळ, ज्यात कुरमुरे, फरसाण आणि इतर साहित्य घालून चटपटीत केलेल्या ह्या पदार्थाचे उगमस्थान मुंबईच आहे असे म्हणतात, उत्तरप्रदेश, बिहारकडून आलेल्या कामगारांनी भूक भागवण्यासाठी कुरमुरे थोडे चटपटीत करून खायला सुरुवात केली. त्यातून हा पदार्थ तयार झाला. भेळपुरीचे ठेले किंवा गाड्यांवर तेच लोक असतात हा निव्वळ योगायोग नक्कीच नाही. आजही भारताच्या कुठल्याही प्रदेशात भेळीच्या गाडीवर 'बंबईकी भेळ' असं लिहिले जाते. भेळेप्रमाणेच कामगारांच्या सोयीसाठी तयार झालेला आणखी एक पदार्थ म्हणजे पावभाजी. १९७० च्या दशकात रात्रपाळीहून सुटणाऱ्या कामगारांसाठी हा कमी किंमतीचा पण पोटभरीचा पदार्थ बनू लागला. स्वस्तात मिळणाऱ्या बटाट्याचा बेस—त्यासोबत वेगवेगळ्या भाज्या बटरमध्ये परतून त्यात खास मसाला, [जो नंतर पावभाजीचा मसाला म्हणूनच ओळखला जाऊ लागला.] टाकून केलेली भाजी आणि सोबत पाव हा पदार्थ थोड्याच अवधीत महाराष्ट्रभर लोकप्रिय झाला. कोजागिरीच्या बटाटावड्याची जागा आता पावभाजीने घेतली आहे. ह्या सर्वात बाजी मारली ती मात्र वडापावने. आधुनिक काळात महाराष्ट्राची ओळख म्हणून ज्या वेगवेगळ्या प्रतिमा आहेत त्यात वडापाव नक्कीच आहे. महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीत ह्या पदार्थाला एक आगळेवेगळे स्थान आहे. हा निव्वळ खाण्याचा पदार्थ नाही तर त्याला राजकारण, अर्थकारण, समाजकारण असे वेगवेगळे पैलू आहेत. (उडप्यांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी तसेच] बेरोजगार मराठी तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी [शिवसेनेने] वडापावच्या गाड्यांना प्रोत्साहन दिले. [त्यामुळे अनेक गाड्या शिवसेना पुरस्कृत ह्या नावाने काम करt लागल्या.] गिरणी कामगारांच्या संपामुळे देशोधडीला लागलेल्या अनेक मराठी कुटुंबांना वडापावने उदरनिर्वाहाचे साधन दिले.

हा पदार्थ पूर्णपणे नव्याने तयार केला असे म्हणता येणार नाही, पण दोन वेगवेगळ्या पदार्थांना एकत्र आणून त्यापासून सर्वसामान्यांच्या खिशाला परवडेल, त्यांची भूक भागेल असा पदार्थ तयार करण्यासाठी जी वेगळी कल्पनाशक्ती लागते ती अशोक वैद्यांनी नक्कीच दाखवली. बटाटावडा हा पदार्थ महाराष्ट्राच्या खाद्यजीवनात बऱ्यापैकी स्थिरावला होता. दादर स्टेशनाबाहेरच्या मामा काणेंच्या हॉटेलमध्ये १९२८ पासून बटाटावडा मिळत होता. ते त्यासाठीच ओळखले जात होते. कर्जतचा दिवाडकरांचा वडा

अनुक्रमणिका

मुंबई-पुणे मार्गावरील एक आकर्षण होते. पण पाव मात्र तोपर्यंत एवढा लोकप्रिय झालेला नव्हता. त्याचे एक कारण म्हणजे त्याबद्दल असलेले अनेक गैरसमज. पावाचे पीठ पायाने मळतात म्हणून त्याला पाव म्हणतात ह्यापासून ते पोर्तुगीजांनी विहिरीत पावाचे तुकडे घालून गावच्या गाव बाटवले, अशा समजामुळे पावाबद्दल थोडासा संशय होता. १९६०-७० पर्यंत अनेक कर्मठ कुटुंबांत पाव खाल्ला जात नव्हता. नोकरी करणाऱ्या गृहिणीच्या स्वैपाकघरात पावाचे महत्त्व अजून वाटत नव्हते. शास्त्रीय पद्धतीने बनवलेले व रंगीबेरंगी वेष्टणात गुंडाळलेले स्लाईस ब्रेड अजून मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात दिसत नव्हते. त्यामुळे ज्या परिसरात पाव खाणारे इतर समाजाचे लोक जास्त होते तिथल्या मराठी लोकांना पावाची तोंडओळख झाली होती. भेंडीबाजारात पावामध्ये कबाब घालून खाण्याची पद्धत होती. खाण्यापिण्याचे दर्दी असलेल्या अशोक वैद्यांपुढे वडापाव तयार करताना हाच पदार्थ कदाचित असावा. तेव्हा मॅकडोनाल्ड नसल्याने अमेरिकन बर्गर ही मराठमोळ्या बर्गरची प्रेरणा नक्कीच नव्हती.

गोलगुठली पाव, त्यावर लसणीचे तिखट आणि गरमागरम वडा अशी सुरुवात झालेल्या ह्या पदार्थाने समाजातील सर्व स्तरांवरील लोकांवर तेव्हापासून गारूड आहे. पुढे लसणीच्या तिखटाच्या जोडीला हिरवी ओली चटणी आणि चिंचेची आंबट चटणी लावायला सुरुवात झाली. ह्यामागे चवीचा मुद्दा होताच पण पावाचा कोरडेपणा कमी करण्याचाही हा प्रयत्न होता. वडापावसोबत मग कांदा-बटाटा भजी, समोसापाव, पावामध्ये बटाट्याची भाजी भरून बेसनात घोळून पॅटीस असे पदार्थही गाडीवर मिळू लागले, गाडीवर पदार्थ तयार करून तिथल्या तिथे मिळण्याची पद्धत कदाचित तेव्हापासून सुरू झाली असावी. मुंबईतील दादर, परळ, लालबाग अशा मराठमोळ्या विभागातून सुरू झालेली ही मोहीम मुंबईत सर्वत्र पसरली आणि महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात जाऊन पोहचली. वडापावची लोकप्रियता पाहून हॉटेल्सवाल्यांनाही त्यांच्या मेनूकार्डावर हा पदार्थ आणावा लागला. प्रत्येक शाळा, कॉलेजजवळ वडापावची गाडी असणे अनिवार्य ठरू लागले.

चव हे वडापावच्या लोकप्रियतेचे एकमेव कारण नव्हे. बदलत्या काळाच्या बदलत्या गरजेचा फार मोठा हात वडापावच्या यशामागे आहे. हा पदार्थ फास्टफूडच्या व्याखेत चपखलपणे बलणारा आहे. फास्ट फूड म्हणजे टेबल, खुर्च्या, चमचे, काटे असे सोपस्कार नसलेला, चालता चालता खाता येण्यासारखा पदार्थ. कमीतकमी वेळात पदार्थ बनवून किंवा एकत्रित करून ग्राहकाला ताटकळत न ठेवता त्याच्या हातात देता येणारा पदार्थ म्हणजे फास्ट फूड. ह्या दोन्ही कसोट्यांवर वडापाव उतरतो. पावाच्या दोन्ही बाजूंना चटण्या लावून गरमागरम वडा सरकवून वर्तमानपत्रात गुंडाळून दिला, की देणारा आणि घेणारा दोन्हा मोकळे. वर्तमान जीवनशैलीत अधिक न थांबता खाता येण्यासारखा आणि खिशाला परवडणारा हा पदार्थ लोकप्रिय झाला नसता तरच नवल. आपल्या खाद्यसंस्कृतीत खाद्यपदार्थांची मूळकथा, त्याचा निर्माता, तारीख, वार, वर्षासकट क्वचितच सांगता येते, वडापाव मात्र याला अपवाद म्हणावा लागेल. १९६७ साली अशोक वैद्य यांना महाराष्ट्राच्या खाद्यविश्वात 'वडापाव' आणला.

मॅकडोनाल्ड आल्यावरही वडापावची लोकप्रियता घटली नाही. त्याचे एक कारण म्हणजे वडापावची किंमत. एका बर्गरच्या किंमतीत सहा वडापाव येतात. पुन्हा मॅकडोनाल्ड फक्त प्रमुख शहरांमध्ये आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मॅकडोनाल्डच्या कुठल्याही शाखेवर चव तीच लागते पण वडापावच्या प्रत्येक गाडीची स्वतःची एक वेगळी चव असते. म्हणजे खाणाऱ्याला निवडीचे अमाप स्वातंत्र्य मिळते. पण मॅकडोनाल्डमुळे महाराष्ट्राच्या ह्या आद्य फास्ट फूडवर वेगळ्या प्रकारे परिणाम झालेला आढळतो. मॅकडोनाल्डप्रमाणे स्वच्छ वातावरणात वडापाव देण्यासाठी त्याचे ब्रँडींग केले गेले. जंबोवडा किंवा

गोलीवडा ह्या नावाने वडापावचे फ्रॅन्चाइज तयार झाले. शेझवान वडापाव, चीज वडापाव असे फ्यूजन वडापाव मिळू लागले. रस्त्यावरील गाड्यांना त्यामुळे स्पर्धा निर्माण झाली. [शिवसेना पुरस्कृत वडापाववरील आपली राजकीय मक्तेदारी अधिक घट्ट करण्यासाठी शिववडापावची कल्पना पुढे आली. हा संपूर्ण कार्यक्रम म्हणजे एका पदार्थाच्या माध्यमातून राजकीय शक्ती प्रदर्शन दाखवण्याचा प्रयत्न होता. सध्या फक्त मुंबईतच असलेला शिववडापाव हळूहळू सर्व महाराष्ट्रात पसरणार हे निश्चितच.] पुढील पन्नास वर्षे वडापाव आणि महाराष्ट्र हे समीकरण कायम राहणार आणि मराठी जनांच्या मनातील वडापावचे ध्रुवपदही अढळ राहणार हेही निश्चितच. ह्या पदार्थांची लोकप्रियता पाहून इंग्रजी वर्तमानपत्रांनाही वडापाव स्पर्धा घेऊन मुंबईतील उत्कृष्ट वडापाव निवडण्याचा मोह आवरला नाही. फक्त चवीचे खाणाऱ्यांनाच नव्हे तर संशोधकांनाही वडापावचे आकर्षण वाटते. ह्याचे उदाहरण म्हणजे ब्राऊन विद्यापीठामधून मानववंशशास्त्रामध्ये पीएच.डी. करणारे हॅरीस सॉलोमन यांचा विषयच मुळी 'मुंबईतील वडापाव' हा आहे.

गेल्या पन्नास वर्षांत खानपानाच्या सवयी बदलण्याची कारणे कोणती? इतिहास, भूगोल, पर्यावरण ही झाली पारंपरिक कारणे, आधुनिक काळात इतर माध्यमे ही भूमिका मोठ्या प्रमाणात बजावत आहेत. पाककलेची पुस्तके, वृत्तपत्रे, मासिकातील पाककलेवरची सदरे आणि सध्या वेगवेगळ्या प्रादेशिक वाहिन्या हे घटक समाजाच्या आहारशैलीची दिशा ठरवत आहेत. ह्यात सर्वप्रथम विचार करू या पाककलेच्या पुस्तकांचा. सामाजिक बदलाचे प्रतिबिंब जसे साहित्यात दिसते, तसेच खाद्यसंस्कृतीतील बदल हे पाककलेच्या पुस्तकांमधून दिसून येतात.

भारताच्या इतर राज्यांपेक्षा अनेक बाबतीत आघाडीवर असणारा महाराष्ट्र ह्या क्षेत्रातही अग्रेसर होता किंवा आहे असेच म्हणावे लागेल. पाककलेच्या पुस्तकांची महाराष्ट्रातील परंपरा फार जुनी आहे. १८ व्या शतकात लिहिलेले रघुनाथ नवहस्ते ह्यांचे 'भोजन कुतूहल' हे हस्तलिखित महाराष्ट्रीय पाककलेवरचा आद्यग्रंथ म्हटला पाहिजे. संस्कृत भाषेतील ह्या ग्रंथात अनेक मराठी पदार्थांचा उल्लेख आहे. ह्या ग्रंथाची निर्मिती तंजावरच्या भोसले राजघराण्याच्या राणी दीपाबाईंच्या आग्रहावरून झाली होती. मराठी खाद्यसंस्कृतीचे दस्तऐवजीकरण करण्याची तंजावर घराण्याची परंपरा पुढे १८ व्या शतकात सरफोजी महाराजांनी कायम ठेवलेली आढळते. त्यांच्या मुदपाकखान्यात बनणारे पदार्थ त्यांनी मुद्दाम लिहवून घेतले. त्यात मराठी, मुगलाई आणि युरोपीय पदार्थांचा समावेश आहे. अव्वल इंग्रजकाळात अनेक पाश्चिमात्य गोष्टींचा महाराष्ट्राने डोळसपणे स्वीकार केलेला आढळतो. मुद्रणकला त्यापैकीच एक. आधुनिक काळात भारतात प्रकाशित झालेले पहिले पाककलेवरचे पुस्तक हे मराठीत आहे, ते म्हणजे १८७५ मध्ये रावसाहेब गोंधळेकर यांनी प्रसिद्ध केलेले आणि रामचंद्र गुप्ते यांनी लिहिलेले 'सूपशास्त्र'. १८९५ पर्यंत ह्या पुस्तकाच्या सहा आवृत्त्या निघाल्या. ह्याच काळात बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांच्या प्रोत्साहनाने वेगवेगळ्या प्रांतातील पाकशैलीवरची पुस्तके मराठीत प्रसिद्ध झाली. १९३७ पर्यंत जवळजवळ ५० पुस्तके प्रसिद्ध झाली.

सूपशास्त्रापासून सुरू झालेली ही परंपरा पुढे सुरू राहिली. पण दुसरे महायुद्ध ते १९७० चा कालखंड पाककलेच्या पुस्तकांसाठी एवढा प्रोत्साहक नव्हता. स्वातंत्र्य चळवळ, त्यानंतरची राजकीय उलथापालथ, अन्नधान्याचा तुटवडा इत्यादी कारणांमुळे पाककलेच्या पुस्तकांना एवढी मागणी नव्हती. जसजशी परिस्थिती बदलू लागली, तसतसे पुन्हा एकदा प्रकाशक ह्या पुस्तकांचा सकारात्मक विचार करू लागले. लोकांचे अनुभवविश्वही विस्तारत गेल्याने अशा पुस्तकांची मागणी वाढली. ह्या क्षेत्रात इतिहास घडवणारी आणि त्याच्या लेखिकांना लक्षाधीश करणारी दोन पुस्तके १९७० च्या दशकात प्रसिद्ध झाली. ती

होती कमलाबाई ओगलेलिखित ‘रुचिरा’ आणि मंगला बर्वे यांचे ‘अन्नपूर्णा’ १९७० च्या आधीचा कालखंड वर उल्लेखल्याप्रमाणे पाककलेच्या पुस्तकांना पोषक नव्हता. तरीही काही पुस्तके प्रसिद्ध झाली होती. त्याच काळात माहेर, स्त्री, अनुराधा, मानिनी ह्या स्त्रियांच्या मासिकात पाककृती प्रसिद्ध होत होत्या. पाककृतींचे विशेषांक निघत होते. कमलाबाईंची तसेच मंगलाबाईंची ह्या क्षेत्रातील लिखाणाची सुरुवात अनुक्रमे स्त्री आणि अनुराधा या मासिकांतून झाली. त्याचा पुढचा टप्पा साहजिकच पाककलेच्या पुस्तकांचा होता. किर्लोस्करांच्या स्त्री प्रकाशनाने अत्यंत सावधपणे कमलाबाई ओगलेलिखित ‘रुचिरा’ प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला. किर्लोस्करांनी हे शिवधनुष्य पेलण्याचे ठरवले. (पण तोट्यात लेखिकेला सहभागी करून.) हे धाडस तोट्यात जाण्याची वेळ आली नाही. पहिल्या आवृत्तीपासून ह्या पुस्तकाची घोडदौड सुरू आहे. आजही पाककलेच्या पुस्तकांच्या मांदियाळीत ‘रुचिरा’ आपले स्थान घट्टपणे टिकवून आहे.

रुचिराच्या लेखिका कमलाबाई ओगले यांचे वर्णन ‘सव्वा लाख सुनांची सासू’ असे त्यांच्या पुस्तकाच्या अभिप्रायात केले आहे, ते अत्यंत रास्तही आहे. एखाद्या सासूने ममत्वाने, प्रेमाने आपल्या सुनेला स्वैंपाकाचे धडे द्यावेत तशा पद्धतीने लिहिलेल्या ‘रुचिरा’ने प्रकाशित झाल्यापासून इतिहास रचला. ‘रुचिरा’च्या यशाचं गमक काय आहे? पहिले कारण म्हणजे सामग्रीचे प्रमाण वाटी-चमच्यात आहे. किलो, ग्रॅममध्ये नाही. पाककृती सांगण्याची पद्धत सोपी, सरळ भाषेत आहे. सर्व पदार्थ सतत केल्याने त्या करताना होणाऱ्या चुका टाळून पाककृती लिहिलेली आहे. पण सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ह्या पुस्तकात पाककृती आहेत त्या महाराष्ट्राच्या कम्फर्ट फूडच्या. जगभर संचार करून आल्यावर घरी परतल्यावर सय येते ती आईच्या हातच्या ऊन-ऊन वरण भाताची. हे पुस्तक काहीसे तसेच आहे. पिझ्झा, बर्गर, नाचोज टॅकोजच्या काळातही सणासुदीला आपल्याला मराठी पक्वान्नच लागतात. वरण-भात, चटण्या, कोशिंबीर, पुरणपोळी, श्रीखंड, चिरोटे, चकली, चिवडा हे महाराष्ट्राचे ‘कम्फर्ट फूड’ आहेत. महाराष्ट्राचे मूळ पदार्थ ह्यात असल्याने प्रत्येक पिढीला ह्या पुस्तकाची आवश्यकता वाटते. ह्या पुस्तकाच्या प्रती लाखोंनी संपल्याने त्याला लोकमान्यता तर आहेत, पण फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स ह्या राष्ट्रीय संस्थेने पुनर्मुद्रणासाठीचा पुरस्कार मेहता पब्लिशिंग हाऊसला देऊन राज्यमान्यताही दिली आहे. ‘रुचिरा’च्या ह्या यशाने ‘रुचिरा भाग दुसरा’ काढण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

रुचिरानंतर आठ वर्षांनी आणखी एका पाककलेच्या पुस्तकाने इतिहास घडवला. हे पुस्तक होते मंगला बर्वे यांचे ‘अन्नपूर्णा’. कमालाबाईंप्रमाणेच सदर लेखनाने सुरुवात झाली. पण त्यांच्या पाककलेवरील लिखाणात अधिक विविधता आहे दिनदर्शिकेच्या मागच्या बाजूला पाककृती लिहिणाऱ्या त्या पहिल्या लेखिका असाव्यात. ती दिनदर्शिका अर्थात ‘कालनिर्णय’ होती. रुचिरा’प्रमाणेच १९७८ मध्ये ‘अन्नपूर्णा’ प्रसिद्ध झाल्यावर काही महिन्यांतच दुसरी आवृत्ती काढावी लागली. दोन्ही पुस्तकांच्या प्रकाशनकाळात फक्त आठ वर्षांचे अंतर असले तरी पुस्तकाच्या स्वरूपात आणि त्यांनी साधलेल्या परिणामात मात्र खूप अंतर आहे. ‘रुचिरा’ हे पारंपरिक, माहीत असलेल्या पदार्थांची प्रमाणबद्ध पाककृती देणारे पुस्तक आहे तर अन्नपूर्णा हे मराठी समाजाच्या खानपानाच्या सवयी वैश्विक होत असल्याचे जाणून त्यानुसार पाककृती देणारे पुस्तक आहे. ‘रुचिरा’मध्ये मराठी पदार्थांसोबत भारतातल्या इतर प्रांतांतील म्हणजे गुजरात, कर्नाटक, बंगाल, पंजाब ह्या प्रांताचे पदार्थही आहेत. पण भारताच्या सीमा ओलांडून मराठी गृहिणीला जगाची खाद्यसफर घडवून आणण्याचे काम ‘अन्नपूर्णे’ने केले. पारंपरिक चटण्या, लोणच्यांसोबत, कॉन्टिनेन्टल पद्धतीचे सॉस, पिकल्स, आइस्क्रिम आणि केक ह्यांच्या पाककृती ‘अन्नपूर्णे’त मोठ्या प्रमाणात आहेत. ह्या दशकात मराठी समाज हा आधुनिकतेच्या उंबरठ्यावर उभा होता. निदान खाण्यापिण्याच्या बाबातीत तरी असे म्हणायला हरकत नाही. त्याची ही गरज ‘अन्नपूर्णे’ने नेमकी ओळखलेली आढळते. ह्या

अनुक्रमणिका

दोन्ही पुस्तकांचे अनुकरण करीत किंवा असे म्हणू या, की त्यांच्यापासून प्रेरणा घेत पाककलेची अनेक पुस्तके बाजारात आली. काही पुस्तकांचा खप बऱ्यापैकी झाला. पण ‘रुचिरा’ व ‘अन्नपूर्णे’ची प्रतिष्ठा किंवा प्रसिद्धी इतर पुस्तकांना लाभली नाही, हेही तेवढेच खरे.

जागतिकीकरणाच्या काळात एका बाजूला ‘हे विश्वचि माझे घर’ अशी भावना वाढीस लागत होती. त्याचबरोबर आपली स्थानिक जातीय अस्मिताही तेवढीच जागृच होत होती. ह्याचे प्रतिबिंब पाककलेच्या पुस्तकांमधूनही दिसून येऊ लागले. आतापर्यंत काही सामाजिक, आर्थिकदृष्ट्या प्रगत अशा ज्ञातींची पाककला पुस्तकांच्या माध्यमाने प्रसिद्ध जाली होती. पण आता मात्र इतरही जातींनी आपल्या खाद्यसंस्कृतीची ओळख महाराष्ट्राला करून देण्याचे ठरवले. अनेक ज्ञाती अशा होत्या, की ज्यांच्या खाद्यपदार्थांची नावे इतरांना माहीत नव्हती; ती ह्या पुस्तकांमुळे कळली. तसे पाहिले तर लक्ष्मीबाई धुरंधर यांच्या ‘गृहिणीमित्र’ ह्या पाककलेच्या पुस्तकात पाठारे प्रभुंच्या पाककृती प्रामुख्याने असल्या तरी त्यांचे अनुभवविश्व त्या काळाच्या तुलनेत म्हणजेच १९१० च्या काळात बरेच विस्तारित असल्याने देशविदेशातील पाककृती त्यांच्या पुस्तकात आढळतात. ‘रसचंद्रिका’ ह्या संशी लिखित पुस्तकात चित्रापूर सारस्वत पाककृती आहेत. पण ही पुस्तके स्वातंत्र्यपूर्व काळातील आहेत. १९६० नंतरच्या वेगवेगळ्या ज्ञातीच्या पाककलेवरील पुस्तकात दखल घेण्याजोगे पुस्तक म्हणजे डॉ. शरदिनी डहाणूकर यांनी संकलित केलेले ‘पांचाळीची थाळी’. दुर्गाबाई भागवतांप्रमाणेच शरदिनीबाईही पाककलेकडे गांभीर्याने पाहणाऱ्या संशोधिका असल्याने ‘पांचाळीची थाळी’त निव्वळ डहाणू, पालघर भागातील पाचकळशी ज्ञातीच्या पाककृती नसून त्यांची पूर्ण खाद्यसंस्कृती आहे. पुढे अशा प्रकारे अनेक पुस्तके बाजारात आली. त्यात आवर्जून उल्लेख करण्यासारखी म्हणजे ‘सारस्वत स्वैंपाक’, ‘मस्त मालवणी’, ‘सीकेपी खासियत’, ‘दैवेज्ञ’, ‘वैदर्भीय पदार्थ’ इत्यादी. ह्या पुस्तकांमुळे महाराष्ट्रातील विविध जातीजमातींच्या खाद्य संस्कृतींचे दस्तऐवजीकरण झाले. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जातीजमातींच्या व इतर प्रांतांतल्या मित्रमैत्रिणींच्या डब्यांतील खाल्लेले पदार्थ जर घरी बनवायचे असतील तर त्यासाठी ही पुस्तके उपयोगी पडणार होती.

१९९० च्या दरम्यान ‘रसनातृप्ती’ बरोबर आरोग्याकडेही लक्ष वळू लागले. आहार आणि आरोग्य ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि आधुनिक जीवनशैलीत आहार नियंत्रण खूप आवश्यक आहे हे जाणवू लागले. उष्मांक, प्रथिने, कार्बोदके ही नावे आता लोकांच्या कानावर पडू लागली होती. आपला आहार उष्मांकात मोजण्याची मानसिक तयारी हळूहळू होत होती. रोजच्या आहारात प्रथिने, मेद, जीवनसत्त्वे ह्यांची आवश्यकता काय, प्रमाण किती असावे ह्याची चर्चा गृहिणी करू लागल्या. हा विचार लोकांच्या, त्यातही मराठी गृहिणींच्या मनावर ठसवण्याचे महत्त्वाचे काम डॉ. मालती कारवारकर त्यांनी केले. ‘अन्नपूर्णेशी हितगुज’ आणि ‘स्वयंपाकशास्त्र’ ह्या त्यांच्या पुस्तकांनी लोकांना आपल्या आहारशैलीकडे बारकाईने बघण्यास प्रवृत्त केले. पण तरीही त्यातले पदार्थ नेमके कसे लागतील. आपल्याला आवडतील, की नाही ह्याबद्दल मनात शंका होती, ती दूर करण्याचे काम आणि नेहमीच्या माहीत असलेल्या चवीच्या पदार्थातले पोषणमूल्य टिकवायचे कसे, वाढवायचे कसे, ह्याबाबतीत सर्वसामान्यांना कळेल आणि रुचेल अशा पद्धतीने सांगायचे काम केले ते डॉ. कमला सोहोनी आणि वसुमती धुरू ह्यांनी. डॉ. कमला सोहोनींचे ‘आहारगाथा’ आणि वसुमती धुरू यांचे नुकतेच प्रसिद्ध झालेले ‘अन्नाविषयी सारे काही’ ही पुस्तके लोकांना मार्गदर्शक ठरू लागली आहेत.

१९९० नंतरचा कालखंड हा पाककलेवरच्या पुस्तकांसाठी अत्यंत पोषक ठरला. वेगवेगळ्या उपकरणांच्या आधारे पाककृती, बेकरी, आईस्क्रीम, भाज्या, भात अशी विशिष्ट पदार्थांना वाहिलेली पुस्तके,

अनुक्रमणिका

पुरुषांसाठी स्वयंपाक अशा विविध विषयांवरची अगदी कॉफी टेबल पुस्तकांपासून ते पॉकेट पुस्तकांपर्यंत प्रकाशित झाली. भारतातील इतर कुठल्याही भाषेत पाककलेवर इतक्या विपुल आणि विविध प्रकारचे लिखाण निश्चितच झालेले नाही.

महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचा ५० वर्षांचा इतिहास लिहिताना खाजगी वाहिन्यांवरील पाककलेच्या कार्यक्रमांची दखल घ्यावीच लागेल. पुस्तकांचा पुढचा टप्पा म्हणजे ह्या माध्यमातून दाखवले जाणारे हे कार्यक्रम. खाजगी वाहिन्या येण्यापूर्वी दूरदर्शनवर पाककृती दाखवण्याचा प्रयत्न झाला होता. पण त्यावेळेस हे माध्यम नवीन होते. पाककृतींचे प्रात्यक्षिक दाखवताना कॅमेऱ्याची हालचाल कशी असावी; पदार्थ तयार होताना मधला वेळ कसा घालवावा ह्याची कल्पना नव्हती. त्यामुळे ह्या कार्यक्रमांनी पकड घेतली नाही, तसेच हे कार्यक्रम काहीसे रटाळ वाटत असत. खाजगी वाहिन्या आल्या तेव्हा सुरुवातीला फक्त इंग्रजी वाहिन्या होत्या. Star वरील Yan Can Cook ही पाककृतीचा कार्यक्रम तर visual treat होती. प्रेक्षकांशी अखंड संवाद, भाज्या, फळं इत्यादी चिरताना सुरी/सुऱ्यांची सफाईदार हाताळणी ह्यामुळे कार्यक्रम लोकांना आवडू लागला. पाककलेवरचा कार्यक्रम करमणुकीपुरता मर्यादित राहिला, कारण एकतर त्यातले अनेक पदार्थ, जिन्नस भारतीयांसाठी नवीन होते. जागतिकीकरणाचे वारे जोरात वाहू लागले नसल्याने, वेगवेगळ्या देशातील पाककृतींचा आस्वाद निदान मध्यमवर्गीयांच्या आवाक्यात नव्हता. पण झी वर टखाना-खजानाट घेऊन संजीव कपूर आले, तोपर्यंत ह्यात फरक पडला होता. मध्यमवर्गीयांचे अनुभव विश्व विस्तारात होते. त्यात भारतातील वेगवेगळ्या प्रांतांच्या पदार्थांप्रमाणे देशोदेशीच्या पदार्थांच्या चवींचा समावेश होता. ते पदार्थ प्रत्यक्षपणे खाना-खजानामध्ये पाहता आले. त्यामुळे ते बनवून पाहणे सोपे झाले. खाना-खजानाच्या यशामुळे ज्यावेळी प्रादेशिक भाषेतील वाहिन्या आल्या तेव्हा त्यांना पाककलेवरच्या कार्यक्रमांचा विचार करावाच लागला.

आर्थिक गणितांमुळे म्हणा किंवा इतर काही कारणांमुळे सुरुवातीला पूर्णपणे पाककृतींवर स्वतंत्र कार्यक्रम मराठी वाहिन्यांवर होत नव्हते. स्त्रियांच्या मासिकाचा format असलेल्या कार्यक्रमात एक दिवस किंवा एखादे सेगमेंट पाककृतीचा असायचा. त्याला मिळणारा प्रतिसाद पाहून मग आठवड्याचे सातही दिवस पाककलेवर अर्ध्या तासाचा कार्यक्रम होऊ लागला. आता तर काही वाहिन्यांवर एक तासाची वेळ अशा कार्यक्रमांना देण्यात आली आहे.

मराठी वाहिन्यांचा प्रेक्षक वर्ग महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात पसरलेला असल्याने ह्या माध्यमातून खाद्यशैलींवर पडणारा प्रभाव फक्त शहरांपुरता मर्यादित नव्हता. जशी गावागावांमध्ये बदलत्या कपड्यांची, दागिन्यांची फॅशन दिसून येते, तशीच खानपानातील बदलत्या फॅशन दिसू लागल्या आहेत. पिझ्झा, पास्ता, मांचुरियन ही नावे आता नवीन राहिली नाहीत. भाकरीच्या पिठापासून पिझ्झा आणि ज्वारी/बाजरीचे पास्ता बनू लागले. पारंपरिक पदार्थ आता नवीन जिन्नसांपासून बनू लागले. ‘फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये मिळणारे पदार्थ आपल्याला घरी करता येतील का? ह्या प्रश्नांचे उत्तर ह्या कार्यक्रमांतून मिळते. दिसायला आकर्षक, रंगसंगतीत समन्वय साधणारा पदार्थ प्रत्यक्ष बनवताना किती सोपा असू शकतो हे रसिकांना कळत आहे. हे कार्यक्रम महाराष्ट्राबाहेर पाहिले जात असल्याने मराठी खाद्यसंस्कृतीची ओळख इतरांना होऊ लागली. मराठी पदार्थ म्हणजे फक्त श्रीखंड, मोदक, पुरणपोळी, बटाटावडा एवढेच नव्हे तर मराठी खाद्यसंस्कृती किती समृद्ध आहे हेही कळू लागले.

अनुक्रमणिका

सर्वात महत्त्वाचे ह्या कार्यक्रमांनी स्वयंपाककलेकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलला. स्वयंपाकघर म्हणजे गृहिणींचे साम्राज्य; तिथे पुरुषांना प्रवेश नाही. घरची गृहिणी बाहेरगावी गेली असेल तेव्हा किंवा ती आजारी असल्यास पुरुषांचे पाय स्वयंपाकघरात पडतात असा सर्वसाधारण समज होता. हौस, आवड म्हणून एखाद्या पुरुषाला स्वयंपाक करणे आवडी शकते हे समाजाला पटत नव्हते. ह्या कार्यक्रमांमध्ये पुरुषही आपले कौशल्य दाखवू लागले. 'आमच्या ह्यांना चहासुद्धा करता येत नाही', असे कौतुकाने सांगणाऱ्या गृहिणी आता आपल्या पतींना कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करू लागल्या. हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स करू पाहणाऱ्याला 'काय आचारी व्हायचे आहे का?' असे हिणवले जायचे पण ह्या कार्यक्रमांमुळे शेफना सामाजिक प्रतिष्ठा मिळाली. हा व्यवसायही डॉक्टर, इंजिनीयर प्रमाणेच आहे आणि तेवढेच कष्ट त्यासाठी घ्यावे लागतात, हे हळूहळू लक्षात येऊ लागल्याने बरेच मराठी तरुण हे करियर करू इच्छितात. इतर क्षेत्रांतील सेलिब्रटीप्रमाणे शेफ मिलिंद सोवनी, निलेश लिमये, पराग कान्हेरे, विष्णू मनोहर, देवव्रत जातेगावकर प्रसिद्ध झाले आहेत.

ई टिव्हीवरच्या 'मेजवानी' कार्यक्रमांचे सुरुवातीचे काही एपिसोड लोकेश गुप्ते आणि चैत्राली गुप्ते ह्यांनी केले होते. त्यांनी एकत्रितपणे पाककृती दाखवल्याने फार मोठा संदेश लोकांपर्यंत पोहचत होता. आधुनिक कुंटुंबव्यवस्थेत पतीपत्नीचे स्थान बरोबरीचे आहे. पत्नी नोकरी करणारी असेल किंवा नसेल तरी स्वैंपाकघरात तिला पतीने मदत केलीच पाहिजे. काहीवेळा तर चैत्रालीपेक्षा लोकेशला अधिक सफाईने पाककृती करताना प्रेक्षकांनी पाहिले. त्यामुळे रोजचा स्वैंपाक ही फक्त स्त्रियांची जबाबदारी नाही हा संदेश अप्रत्यक्षपणे पोहचत होता. (पुरुष आणि स्वैंपाक ह्याबद्दल समाजाच्या मनात असलेली अढी हळूहळू सैलावत होती.)

ह्या सगळ्या चर्चेत आज मराठी पदार्थांना काय स्थान आहे? घराघरातून होणारे पदार्थ काही वर्षांपर्यंत फक्त त्या विभागातील किंवा ज्ञातीतील लोकांपुरतेच होते. नागपूरचे सावजी मटण, पुडाची वडी, वडाभात किंवा कोल्हापुरचा तांबडा, पांढरा रस्सा, झुणक्याची वडी, नाशिकचे काळे मटण, सोलापूरची ज्वारीची कडक भाकरी नि शेंगदाण्याची चटणी, खानदेशाची खापराची पोळी, कळणाची भाकरी, सीकेपींचे बिरडे, ब्राह्मणी अळवाची पातळ भाजी, सारस्वती बांगड्याचे हुमण, मालवणी कोंबडी वडे, ही यादी खूप मोठी होऊ शकते. पण इतरांना त्याची तोंडओळख नव्हती. शेजारपाजारांमुळे वेगवेगळ्या पदार्थांची चव आणि कृती कळू लागली. ही थेट घरगुती पदार्थ असल्याने हॉटेल्समध्ये सहसा मिळत नव्हते. पण आता 'महालक्ष्मी सरस' किंवा वेगवेगळ्या खाद्यजत्रांमधून त्यांची लोकप्रियता वाढू लागलू आहे. पण अजूनही अमराठी लोकांना काही ठरावीक पदार्थच माहीत आहेत.

२०व्या शतकाच्या सुरुवातीला जेव्हा बाहेर खाण्याची सुरुवात झाली, तेव्हा इराणी हॉटेल्सच्या बरोबरीने मराठी उपाहारगृहेही होती. तिथल्या पदार्थांची चटक अगदी युरोपीय लोकांनाही लागली होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील अन्ननियंत्रणामुळे, महागाईमुळे हळूहळू या हॉटेल्सची पिछेहाट होऊ लागली. अनेक हॉटेल्स बंद पडू लागली. काही टिकली ती त्यांच्या निष्ठावान ग्राहकांमुळे आणि चवीशी तडजोड न केल्यामुळे. लहान गावातील एस.टी. स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन जवळची हॉटेल्स मराठी पदार्थांशी इमान राखून होती व आहेत. पण ग्राहकांच्या बदलत्या चवी लक्षात ठेवून त्यांना इतर पदार्थ ठेवणेही तेवढेच आवश्यक वाटू लागले आहे. जागतिकीकरणाच्या काळात रसनेच्या रसिकतेला बहर फुटला आहे. खवैय्या रोज नव्या नव्या चवीच्या शोधात असल्याने पुन्हा एकदा मराठी पदार्थांकडे लक्ष वळले आहे. जागतिकीकरणाचा एक परिणाम म्हणून स्थानिक अस्मितेला धुमारे फुटू लागले, तेव्हा आठवण होऊ

अनुक्रमणिका

लागली पारंपरिक पदार्थांची, आजीच्या-आईच्या हातच्या पदार्थांची. पुन्हा एकदा मराठी हॉटेल्सना बरे दिवस आले. काहींनी आपल रंगरूप बदलले. पुणेरी, केल्हापुरी तसेच उपवासाची मिसळ, थालिपीठ, पुरीभाजी, पीयूष, कोंबडीवडे ह्याचे वेड अमराठी लोकांना लागू लागले आहे. पण अजूनही बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे. गुजराती थाळीची लोकप्रियता मिळवायची आहे. भारताच्या कोनाकोपऱ्यात जसा उडुपी पोहचला तसे जाऊन पोहचायचे आहे.

मागच्या पन्नास वर्षांचा आढावा घेतल्यावर पुढच्या पन्नास वर्षात महाराष्ट्रीय खाद्यसंस्कृतीच्या क्षेत्रात काय करणे आवश्यक आहे, त्या प्रयत्नांची दिशा कोणती असावी ह्याचा आढावा घेणेही आवश्यक ठरते. सर्वप्रथम भारताच्या खाद्यनकाशावर महाराष्ट्राचे स्थान अधोरेखित करणे गरजेचे आहे. आपली खाद्यसंस्कृती इतरांपर्यंत पोहचावीशी वाटत असेल तर त्याबद्दल इतरांना समजेल अशा माध्यामातून ती पोहचविली पाहिजे. अनेकवेळा ह्या विषयाची पुस्तके इंग्रजी भाषेत उपलब्ध नसल्याने भारतीय खाद्यसंस्कृतीवर लिहिताना महाराष्ट्राला अनुल्लेखाने मारले जाते. अमेरिकेत राहणाऱ्या पण मूळच्या महाराष्ट्रातील असणाऱ्या कौमुदी मराठे ह्यांनी नुकतेच पेंग्विन इंडिया ह्या प्रकाशन संस्थेसाठी 'The essential Marathi Cook Book' हे पुस्तक लिहिले. महाराष्ट्रीय खाद्य पदार्थांची विविधता एकाच पुस्तकात आणणे तसे कठीण आहे, ते करण्याचा कौतुकास्पद प्रयत्न कौमुदी मराठे यांनी केलेला आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षात हे पुस्तक प्रकाशित होणे हा एक चांगला योग म्हणावा लागेल. ह्या पुस्तकामुळे मराठी पदार्थांबद्दल इतरांना कुतूहल निर्माण झाले तर उत्तमच होईल. जसे इंग्रजी भाषेतील पाककलेच्या पुस्तकांचे मराठीत भाषांतर होते. तसेच काही दर्जेदार मराठी पाककलेच्या पुस्तकांचेही इंग्रजी भाषांतर होणे, तेवढेच आवश्यक आहे. संजीव कपूर यांनी त्यांच्या 'खाना-खजाना'च्या तसेच पुस्तकांच्या माध्यमातून काही मराठी पदार्थांना प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांची मजल श्रीखंड, पुरणपोळी, तांबडा-पांढरा रस्सा, थालिपीठ ह्यापुढे गेलेली आढळत नाही. भारतभर पंजाबी, गुजराती आणि दाक्षिणात्य पदार्थांना जेवढी लोकप्रियता मिळाली आहे तेवढी अद्याप तरी मराठी पदार्थांना मिळालेली नाही, हे मान्य करावे लागेल. वेगवेगळ्या माध्यमातून मराठी पदार्थ जास्तीतजास्त लोकांपर्यंत अधिक आक्रमकतेने (इथे बाह्या सरसावून आक्रमकता अभिप्रेत नाही) नेले पाहिजेत.

पण खाद्यसंस्कृती म्हणजे फक्त पदार्थांचा आस्वाद नाही तर एकूणच संस्कृतीचं सार ज्यात प्रतिबिंबित होते ती. मग पाककृतींप्रमाणेच इतर अनेक गोष्टींमधून ती डोकावत असते. पाककलेशी, त्या शास्त्राशी निगडित अनेक प्रथा, रीतीरिवाज, समज स्वयंपाकघरात दडलेले आहेत त्याचे दस्तऐवजीकरण होणे गरजेचे आहे. लोककथा, लोकसंगीत ह्यांचे जसे संकलन करण्यात आले आहे, तसेच ह्याचेही संकलन झाले पाहिजे. त्यासाठी मौखिक परंपरेचा आधार घेतला पाहिजे. कुटुंब, ज्ञाती, समाज अशा टप्याटप्याने त्याचे दस्तऐवजीकरण झाले तर संपूर्ण महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचा विशाल पट डोळ्यांपुढे उभा राहील. महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचे दस्तऐवजीकरण करताना ते वेगवेगळ्या पद्धतीने करता येईल. मराठी पाककलेशी संबंधीत 'पाकशास्त्रीय शब्दकोश' तयार करता येईल. पु. ल. देशपांडे, जयवंत दळवी, दुर्गा भागवत, डॉ. शरदिनी डहाणूकर अशा अनेक लेखकांनी वेळोवेळी खाद्यअनुभवांवर लिहून ठेवले आहे, त्याचे संकलन खाद्यसंस्कृतीच्या संशोधकांना सहाय्यक ठरेल. अनेक बाबतीत महाराष्ट्राने पुढाकार घेतला आहे, ह्या बाबतीतही घ्यायला हरकत नाही. अशा सर्व पातळीवरच्या प्रयत्नांत शासनाचा सहभाग अपेक्षित आहे. प्रयत्न केल्यास भारताच्या खाद्यनकाशावर महाराष्ट्राचे स्थान ठळकपणे दिसू लागेल. पर्यायाने जागतिक पातळीवर भारतीय खाद्यसंस्कृतीचा जेव्हा जेव्हा विचार केला जाईल तेव्हा तेव्हा मराठमोळ्या खाद्यसंस्कृतीचा उल्लेख करावा लागेल.

अनुक्रमणिका



**सुरेश दत्तात्रय महाजन**

जन्म—३ एप्रिल १९४१ (कोल्हापूर) वस्त्रोद्योग विषयातील तज्ज्ञ, फिन्ले, गोल्डमोहर (मुंबई), जामश्री (सोलापूर) या कापड गिरण्यांमध्ये सुमारे १९ वर्षे गुणवत्ता नियंत्रण आणि संशोधन या विभागांमध्ये कार्यरत. मुंबई येथील दि बॉंबे टेक्सटाईल रिसर्च असोसिएशनमध्ये संशोधन अधिकारी म्हणून १० वर्षे कार्यरत आणि इचलकरंजी येथील टेक्स्टाईल अँड इंजीनिअरींग इन्स्टिटयूट या शिक्षण संस्थेत प्राध्यापक वस्त्रोद्योग विषयाच्या अभ्यासासाठी जर्मनी आणि जपान या देशांना भेट. राज्य मराठी विकास संस्थेतर्फे प्रकाशित झालेल्या वस्त्रनिर्मिती माहितीकोश-खंड १ चे सहसंपादन. अनेक राष्ट्रीय नियतकालिकात वस्त्रोद्योगासंबंधी लिखाण.

पत्ता : बी-७, श्रीनिकेतन अपार्टमेंट, इचलकरंजी, कोल्हापूर ४१६ ११५.

## वस्त्रद्योगातील बदल

**अन्न** व वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा समजल्या जातात. त्यामुळे कुठल्याही प्रदेशाच्या दृष्टीने वस्त्रोद्योग हा महत्त्वाचा असतो. शिवाय एखाद्या देशाच्या, राज्याच्या प्रगतीचा पन्नास वर्षांचा आढावा घेताना त्यामध्ये होत गेलेले विविध सांस्कृतिक बदल विचारात घेणे अपरिहार्य असते. या दृष्टीने १९६० ते २०१० या काळातल्या महाराष्ट्राच्या प्रगतीचा आढावा घेताना तेथील वस्त्रसंस्कृतीत होत गेलेले बदल विचारात घेणे आवश्यक ठरते.

व्यवस्थापन शास्त्रातील तत्त्वानुसार बदल ही एकच गोष्ट अशी आहे, की जी बदलत नाही. जसजसा काळ पुढे जातो तसतसा प्रत्येक गोष्टीत बदल होत जातो. याला अनुसरून महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगातही गेल्या पन्नास वर्षांत अनेक बदल झाले. उद्योगाचा एकही घटक बदलल्याशिवाय राहिला नाही. अगदी लहानसहान बदलांपासून आमूलाग्र बदलांपर्यंत या बदलांची वर्गवारी करता येते.

वस्त्रप्रावरणे वापरण्याच्या महाराष्ट्रातील लोकांच्या पद्धतीतही मोठा बदल झाला. खरे तर कित्येक शतकांमध्ये जो बदल झाला नव्हता तो या गेल्या पन्नास वर्षांमध्ये झाला असे म्हणायला हरकत नाही. याला बरीच कारणे आहेत. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात महात्मा फुले आणि महर्षी कर्वे यांनी रोवली त्यामुळे १९६० पर्यंत महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाला उर्जितावस्थेचा काळ आला आणि दिवसेंदिवस शिक्षण घेणाऱ्या, अर्थार्जन करणाऱ्या आणि त्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या, वाहने चालवणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढू

अनुक्रमणिका

लागली. स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह वाढू लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या वाढली. या सगळ्यांचा परिणाम स्त्रियांच्या वस्त्रांवर झाला. शिवाय चित्रपट, दूरचित्रवाणी, याच विषयाला वाहिलेली नियतकालिके या माध्यमांमधून जनमानसावर पडणाऱ्या परकीय वस्त्रसंस्कृतीच्या प्रभावामुळे स्त्री-पुरुष सगळ्यांच्याच वस्त्रांमध्ये मोठे बदल झाले. वस्त्रोद्योगामधील बदल, नवनवीन कापडांची, धाग्यांची निर्मितीही या बदलाला कारणीभूत ठरली. त्यामुळे महाराष्ट्राच्या वस्त्रसंस्कृतीमधील गेल्या पन्नास वर्षांमधील बदल समजून घेण्यासाठी या सगळ्यांचा साकल्याने विचार केला पाहिजे. या दृष्टीने याचे दोन भाग पडतात. पहिला म्हणजे वस्त्रोद्योगामधील बदल व दुसरा म्हणजे वस्त्रप्रावरणांमधील बदल तेव्हा प्रथम विचार करू या वस्त्रोद्योगातील बदलांचा.

**वस्त्रोद्योगाचे स्वरूप**

१९६० मध्ये महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग बहुतांशी एककेंद्रीच होता. त्यावेळी मुंबईत कुर्ल्यापासून भायखळ्यापर्यंत, शिवडीपासून वरळीपर्यंत असंख्य कापड गिरण्या होत्या हा सारा भागच गिरणगाव म्हणून ओळखला जाई. यामुळे मुंबई हेच तेव्हाचे वस्त्रोद्योगाचे महाकेंद्र होते. याखेरीज नागपूर, सोलापूर, मालेगाव, भिवंडी, इचलकरंजी यांसारखी काही उपकेंद्रेही होती.

गेल्या ५० वर्षांत या परिस्थितीत आमूलाग्र बदल घडले. आज मुंबईतील गिरणगावातील बहुतेक साऱ्या गिरण्यात बंद पडल्या आहेत. ज्या थोड्या चालू आहेत त्याही नाइलाजाने बंद पडत आहेत. अनेक गिरण्यांच्या जागी मोठेमोठे व्यापारी आणि निवासी संकुल उभे राहिले आहेत. सोलापूरमधील जुन्या कापड गिरण्या बंद पडून या उपकेंद्राचीही मोठी पिछेहाट झालेली आहे. अशीच अवस्था नागपूरचीही आहे. भिवंडी, मालेगाव येथील परिस्थिती **जैसे थे** राहिल्यामुळे या उपकेंद्रांपुढे आज अस्तित्वाचे प्रश्न उभे राहिले आहेत. या उलट याच कालखंडात इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली हा परिसर वस्त्रोद्योगाचे नवीन महाकेंद्र म्हणून उदयाला आला आहे. याखेरीज नागपूरजवळील बुटीबोरी, बारामती, धुळे-शिरपूर, यवतमाळ या सारखी नवीन उपकेंद्र ताकदीने उभी राहिली आहेत.

गेल्या ५० वर्षांतील फरक हे फक्त स्थानांपुरते मर्यादित नाहीत. वस्त्रोद्योगाचा संपूर्ण ढाचाच या काळात बदलला गेला आहे. तेव्हा मुंबई आणि सोलापूरमधील गिरण्या या बहुतांशी संयुक्त गिरण्या (Composite Mills) होत्या. एकाच आवारात सूतनिर्मिती (Spinning), कापडनिर्मिती (Weaving) आणि रासायनिक प्रक्रिया (Chemical Processing) विभाग असत. त्यामुळे तंतूपासून ते कापडनिर्मिती पर्यंत सगळे काम एकाच आवारात होई. मालकी एकाचीच असल्यामुळे अशा गिरणीत अधिक सुसूत्रता आढळून येई. मालाची बांधाबांध, ने-आण कमी करायला लागे. त्यामुळे खर्चातही बरीच बचत होई.

मात्र, मुंबई-सोलापूर-नागपूर इथल्या संयुक्त गिरण्या अनेक कारणांनी बंद पडल्या आणि महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगाचे स्वरूप बदलले. आजचा वस्त्रोद्योग हा मुख्यतः पुढील स्वरूपात आढळतो :—

* सूतनिर्मिती संघटित क्षेत्रातील सूतगिरण्यांमध्ये होते.

* कापडनिर्मिती ही मुख्यतः असंघटित, विकेंद्रित कारखान्यांमधून होते. असंख्य छोटे छोटे कारखाने आणि त्यांचे असंख्य मालक यामुळे हा विभाग खूपच विस्कळीत बनला आहे. हा विस्कळीतपणा

अनुक्रमणिका

आर्थिक नियोजन, तांत्रिक नियोजन, गुणवत्ता नियोजन, मालाचे बाजारीकरण या सर्वच बाबतीत आढळतो.

* कापडावरील रासायनिक प्रक्रिया संघटित कारखान्यांमधून होते.

अशा विकेंद्रित स्वरूपामुळे खर्चात तर वाढ झालीच आहे, शिवाय व्यवसायात शिस्त राखणे कठीण बनले आहे. प्रत्येक विभाग आत्मकेंद्रित वृत्तीने वागताना आढळतो. त्यामुळे पूर्वीच्या मानाने आजचा व्यवसाय हा अधिक अस्थिर बनला आहे.

महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगात मालकीबाबतही खूप बदल घडून आले आहेत. पूर्वी संयुक्त गिरण्या चालवणे हे मोठ्या खर्चाचे काम असल्यामुळे काही मोजक्याच खाजगी औद्योगिक घराण्यांकडे वस्त्रोद्योगाची मालकी होती. टाटा, बिर्ला, मफतलाल, वाडिया, रुईया, ठाकरसी अशा घराण्यांचे वर्चस्व असे. त्यानंतरच्या काळात काही अपरिहार्य परिस्थितीत नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशन (NTC) आणि महाराष्ट्र स्टेट टेक्सटाईल कॉर्पोरेशन (MSTC) च्या माध्यमातून काही गिरण्याची मालकी केंद्र सरकारकडे आणि काहींची राज्य सरकारकडे गेली. गेल्या काही वर्षांत मात्र दोन्ही सरकारांनी आपला सहभाग खूपच कमी केला आहे.

वस्त्रोद्योगातील सहकार क्षेत्राचा उदय ही गेल्या तीन/चार दशकातील घटना आहे. विशेषतः सूतनिर्मिती क्षेत्रात अनेक सूतगिरण्या आज सहकारी पद्धतीवर चालल्या आहेत. काही ठिकाणी कापडनिर्मिती कारखाने आणि रासायनिक प्रक्रिया विभागातही सहकार क्षेत्राने प्रवेश केला आहे.

कापडनिर्मिती कारखाने चालवणे हा त्या मानाने लघुउद्योग आहे. त्यामुळे असंख्य छोट्या-मोठ्या खाजगी मालकांनी हे क्षेत्र व्यापले आहे. या उलट रासायनिक प्रक्रियांचा कारखाना चालवणे हे अतिशय खर्चाचे आणि जिकिरीचे काम आहे. या क्षेत्रात छोट्या व्यक्ती टिकूच शकत नाहीत. त्यामुळे असे कारखाने एक तर सहकारी तत्त्वावर चालवले जातात वा मोठी औद्योगिक घराणी असे कारखाने चालवतात.

एकंदरीत पाहता वस्त्रोद्योगाची केंद्रे, मालकी, स्वरूप या साऱ्याच बाबतीत फार मोठे बदल गेल्या ५० वर्षांत घडून आले आहेत.

**वस्त्रोद्योगातील प्रमुख घटक**

**कापूस :** भारताच्या कापूस उत्पादनात महाराष्ट्राला फार महत्त्वाचे स्थान आहे. कापसाच्या लागवडीखालील सर्वाधिक क्षेत्रफळ महाराष्ट्रात आहे. (जवळ जवळ ३० लाख हेक्टर) देशाचा विचार करता हे प्रमाण ३५% इतके आहे. मात्र कापूस उत्पादनात देशात गुजरात आणि आंध्रप्रदेश यांच्यानंतर महाराष्ट्राचा ३ रा क्रमांक येतो. याचे कारण म्हणजे महाराष्ट्रात प्रतिहेक्टरी उत्पादन खूपच कमी आहे. देशातील सरासरी उत्पादन प्रतिहेक्टरी ३०० किलोग्रॅम असताना महाराष्ट्रात मात्र ही सरासरी १५० किलोग्रॅम इतकीच आहे. यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील बहुतेक कापूसशेती पूर्णतः पावसावर अवलंबून असलेल्या कोरडवाहू जमिनीत होते. निसर्ग प्रसन्न झाला तर पीक चांगले येते. पण निसर्ग कोपला म्हणजे उत्पादन घटते.

अनुक्रमणिका

महाराष्ट्रातील कापूसउत्पादन नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक आणि पुणे विभागात होत असले तरी सर्वाधिक महत्त्वाचा भाग आहे तो अमरावती विभाग. लागवडीखालील जमिनीच्या ५० टक्के जमीन अमरावती, अकोला, यवतमाळ आणि बुलढाणा या चार जिल्ह्यांतच आहे.

ओलिताखालील जमिनीचे प्रमाण फारसे वाढले नसले तरी गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्रात प्रति हेक्टरी उत्पादनात बरीच वाढ झाली आहे. याच्यामागे मुख्यतः दोन कारणे आहेत. एक म्हणजे कापसाच्या संकरित (Hybrid) बियाणांचा वापर. शुद्ध बियाणांपेक्षा संकरित बियाणांची उत्पादन क्षमता अधिक असते. शिवाय हा कापूस अधिक लांबीचाही असतो व त्याची प्रतिकार शक्तीही जास्त असते. या सर्व कारणांमुळे प्रति हेक्टरी उत्पादन वाढले आहे.

या मागचे दुसरे कारण म्हणजे बीटी (BT) कापसाची लागवड. कापसाच्या पिकाचे फार मोठे नुकसान कीटकांच्या आणि कसरींच्या हल्ल्यामुळे होते. जैव अभियांत्रिकी (genetic-engineering) या तंत्राचा वापर करून अशा कापसाची निर्मिती केली जाते. या कापसाची रोगप्रतिकारकशक्ती खूपच वाढलेली असते. त्यामुळे कीटकांकडून होणारे नुकसान कमी होते व शेतकऱ्याला प्रतिहेक्टरी अधिक उत्पादन मिळते. महाराष्ट्रातील अशा कापसाची लागवड वाढत्या प्रमाणावर होत आहे.

**लोकर :** महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकाला कापूस उत्पादनाबद्दल जेवढी माहिती असते तेवढी लोकरीच्या उत्पादनाबद्दल खचितच नसते. मात्र, भारतातील लोकर उत्पादनाच्या संदर्भात महाराष्ट्र हेही एक महत्त्वाचे राज्य आहे याची जाणीव सर्वांनी ठेवणे आवश्यक आहे.

मेंढीच्या अंगावरील केस म्हणजे लोकरीचे तंतू. जगात सुमारे १२० कोटी मेंढ्या आहेत. भारतातील मेंढ्यांची संख्या ५ कोटींच्या आसपास आहे. यातील महाराष्ट्राचा वाटा ३२ लाखांपर्यंत आहे. मेंढीपालनाचा विचार केला तर नाशिक व पुणे विभाग अथिशय महत्त्वाचे ठरतात. त्या खालोखाल औरंगाबाद विभाग येतो. हे मेंढीपालन मुख्यतः अवर्षणग्रस्त भागातच होते. म्हणजे शेती होऊ शकत नाही तिथे मेंढीपालन असे सारे चित्र आहे. अशा भौगोलिक परिस्थितीमुळे बहुतांशी मेंढ्यांना अन्नाकरीता जागोजागी फिरावे लागते. अशा फिरस्त्या मेंढ्यांपासून मिळणारी लोकर मुख्यतः जाडीभरडी, कमी दर्जाची असते व तिचा वापरही घोंगड्या, कांबळी कमी प्रतीचे गालिचे अशा वस्तूंकरिताच होतो.

१९७० पर्यंत महाराष्ट्रातील मेंढीपालन पूर्णपणे असंघटित स्वरूपात होते. ना त्यांना सरकारी पाठिंबा होता, ना सहकारी चळवळीचा. त्यांना मार्गदर्शन करणारी, त्यांचे प्रश्न सोडवणारी अशी कुठलीही प्रातिनिधिक संस्था नव्हती. या परिस्थितीतून मार्ग काढण्याकरता १९७८ साली **महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाची** स्थापना झाली. या महामंडळाचा दृश्य फायदा म्हणजे महामंडळ स्थापन होण्यापूर्वी महाराष्ट्रातील मेंढ्यांची संख्या २०/२१ लाखांपर्यंत होती. ती आता ३१/३२ लाखांपर्यंत गेली आहे. महामंडळाने पुण्याबरोबरच अन्य ९ ठिकाणी विकास क्षेत्रांची स्थापना केली असून मेढपाळांना लवकरात लवकर मदत मिळावी, योग्य तो सल्ला मिळावा अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रतिमेंढी मिळणारे लोकर उत्पादन आणि लोकरीचा दर्जा या दोन्ही बाबतीत महाराष्ट्राला बरेच काही करणे आवश्यक आहे. महामंडळाची स्थापना हे योग्य दिशेने टाकलेले पहिले सकारात्मक पाऊल आहे. या पुढेही अशी पावले टाकण्याची आवश्यकता आहे.

अनुक्रमणिका

**रेशीम :** रेशीम हा फार दीर्घ परंपरा असलेला नैसर्गिक, प्राणिजन्य तंतू आहे. तो रेशमांच्या किड्यांपासून मिळतो. जागतिक स्तरावर विचार केला तर रेशीम उत्पादनाबाबत चीनच्या मागोमाग भारताचा दुसरा क्रमांक लागतो. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कच्च्या रेशमाचे उत्पादन सातत्याने वाढत गेले आहे. रेशमाशी साधर्म्य असणारे मानवनिर्मित अनेक प्रकारचे तंतू निर्माण झाले असले तरी रेशमाने आपले महत्त्व व स्थान अबाधित राखले आहे.

देशांतर्गत रेशीम उत्पादनाचा विचार केला तर कर्नाटक राज्य इतर राज्यांपेक्षा खूपच पुढे आहे. बंगळूर शहराला तर **रेशीम राजधानी** असे म्हटले जाते. महाराष्ट्र राज्य मात्र या बाबतीत फारच मागे आहे.

वस्तुत : रेशीम व्यवसायाची चार अंगे आहेत.

१. तुतीची लागवड करणे

२. रेशमाच्या किड्यांचे संगोपन करून कोशांची निर्मिती करणे.

३. कोशांपासून मिळणाऱ्या धाग्यांची गुंडाळणी करणे.

४. विणाई (Weaving) किंवा गुंफाई (Knitting) द्वारा वस्त्रनिर्मिती करणे.

यापैकी कुठल्याच अंगाचा पाठपुरावा महाराष्ट्रात गंभीरपणे केला गेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य या बाबतीत मागे राहिले. खटकणाऱ्या या परिस्थितीतून मार्ग काढण्याचे प्रयत्न १९५४ साली सुरू झाले. खादी आणि ग्रामोद्योग मंडळाच्या पुढाकाराने ठिकठाकाणी प्रायोगिक तत्त्वावर रेशीम व्यवसायाची सुरूवात करण्यात आली. वाई, पाचगणी, महाबळेश्वर, पुणे, सांगली इथले प्रयोग बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले. १९९७ साली सहकार आणि वस्त्रोद्योग खात्यांच्या अंतर्गत स्वतंत्र रेशीम संचालनालयाची स्थापना करण्यात आली. नागपूर, अमरावती, पुणे विभागातील अनेक कार्यालयांतून या संचालनालयाचे काम चालते.

आज महाराष्ट्रातील रेशीम व्यवसाय रांगतो आहे. योग्य दिशेने, सातत्याने प्रयत्न होत राहिल्यास शेजारच्या कर्नाटक राज्याला जमले, ते काही ना काही प्रमाणात महाराष्ट्रालाही जमू शकेल इतपत खात्री आतापर्यंतच्या कार्यावरून देता येते.

**मानवनिर्मित तंतू :** प्रत्येक नैसर्गिक तंतूचे विवक्षित गुणधर्म असतात आणि एका मर्यादेबाहेर या गुणधर्मात बदल करता येत नाही. अशा मर्यादा लक्षात घेऊनच पुढील कार्यवाही करावी लागते. जोपर्यंत वस्त्रांचा वापर ठरावीक क्षेत्रांपुरता मर्यादित होता तोपर्यंत विशेष अडचणी उभ्या राहिल्या नाहीत. मात्र जसजशी विज्ञानाने आणि तंत्रज्ञानाने प्रगती केली, नव्या कार्यक्षेत्रात वस्त्रप्रावरणांनी प्रवेश केला त्या प्रमाणात वस्त्रप्रावरणांकडून अपेक्षा वाढल्या आणि नैसर्गिक तंतूच्या मर्यादा खुपायला लागल्या. या अडचणीतून मार्ग काढण्याकरता शास्त्रज्ञांनी मानवनिर्मित तंतूचा शोध लावला. हे तंतू कृत्रिमरीत्या बनवले जात असल्यामुळे हव्या त्या गुणधर्माचे तंतू बनवणे शक्य होते.

अनुक्रमणिका

हे मानवनिर्मित तंतू मुख्यतः दोन वर्गातील असतात. पुनर्जनित तंतू (Regenerated Fibre) आणि संश्लेषित तंतू (Synthetic Fibre).

पुनर्जनित तंतूमधील बहुवारिक आणि या तंतूच्या निर्मितीकरता वापरण्यात आलेल्या पदार्थामधील बहुवारिक एकच असते. निलगिरी लाकडाच्या लगद्यापासून व्हिस्कोज या तंतूची निर्मिती होते. या दोन्हींमध्ये सेल्यूलोज हे एकच बहुवारिक असते. एका अर्थाने लगद्यामधील बहुवारिक तंतूमध्ये पुनर्जनित होते. म्हणून या वर्गाला पुनर्जनित तंतू असे म्हणतात. उदा. व्हिस्कोज, केसीन, लायोसेल. इ.

या उलट संश्लेषित तंतूमधील बहुवारिक हे ज्या पदार्थांचा वापर करून हा तंतू बनतो त्यातील बहुवारिकापासून पूर्णतः वेगळे असते. उदाहरणार्थ हेक्झॅमिथिलीन डाय-अमाईन आणि ॲडिपिक आम्ल यापासून नायलॉन या तंतूंची निर्मीती होते. पण दोहोमधील बहुवारिक वेगवेगळे असते. म्हणजेच एका अर्थाने तंतूमधील बहुवारिकाचे संश्लेषण होते म्हणून या वर्गातील तंतूंना संश्लेषित तंतू म्हणतात. उदा. नायलॉन, पॉलिएस्टर, ॲक्रिलिक, पॉलिप्रॉपिलीन इ.

१९६० साली महाराष्ट्रातील कापड गिरण्यात मुख्यतः नैसर्गिक तंतूंचा वापर होई. त्यानंतर हळूहळू मानवनिर्मित तंतूच्या उत्पादनास आणि वापरास सुरुवात झाली. काही गिरण्यांत १०० टक्के नैसर्गिक तंतूंचा वापर होतो, काही गिरण्यांत १०० टक्के मानवनिर्मित तंतूंचा वापर होतो तर अन्य काही ठिकाणी या दोन्ही प्रकारच्या तंतूंचे हव्या त्या प्रमाणात मिश्रणही केले जाते. मानवनिर्मित तंतूंमुळे वस्त्रोद्योगाचा आवाका खूपच विस्तारला आहे. तो खऱ्या अर्थाने बहुआयामी बनला आहे.

या प्रत्येक तंतूचे गुणधर्म त्याच्या अंतर्गत रचनेवर अवलंबून असतात आणि त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल करणे शक्य असते. खंडित तंतू (Fibre) आणि अखंड (Fibment) तंतू या दोन स्वरूपात मानवनिर्मित तंतूंचे उत्पादन करता येते. खंडित तंतूंपासून कताई पद्धतीने सूत निर्माण करता येते, तर अखंड तंतूंचा वापर त्याच स्वरूपात करता येतो.

खंडित आणि अखंडित या दोन्ही प्रकारच्या मानवनिर्मित तंतूंचा वापरच नव्हे तर उत्पादनही मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात होत आहे. रिलायन्स इंडस्ट्रीज, ग्रासिम इंडस्ट्रीज, इंडोरामा सिंथेटिक्स, सेंच्युरी एन्का, गरवारे वॉल रोप या कंपन्यांच्या मुंबई, पुणे महाड, वाई, बुटीबोरी इत्यादी ठिकाणच्या कारखान्यांमधून जरुरीप्रमाणे असे तंतू निर्माण होत आहेत. उज्ज्वल भवितव्य असलेला हा विभाग आहे.

* मानवनिर्मित तंतूंचे अधिक विकसित आणि विशिष्टोपयोगी रूप म्हणजे उच्च कार्यक्षमतेचे तंतू (High Performance Fibres), उच्च तंत्र तंतू (High Tech Fibres) आणि चलाख तंतू (Smart Fibres) या तंतूंची निर्मिती अधिक शक्ती, अधिक ताठरता, अधिक औष्णिक स्थिरता, अधिक अपघर्षण रोधकता, अधिक आघात रोधकता, अधिक उष्णता रोधकता यातील एक किंवा अनेक गुणधर्मांकरता केली जाते. ॲरॅमिड, नॉमेक्स, केवलार, टवॅरॉन, टेकनोरा हे अशा प्रकारच्या तंतूंचे निर्मितीसाठी होताना आढळतो. अजून तरी या तंतूंची निर्मिती महाराष्ट्रात सुरू झालेली नाही. मात्र यातील काही तंतूंचा वापर करणारे उद्योग इथे सुरू झाले आहेत.

अनुक्रमणिका

**यंत्रसामग्री :** गेल्या ५० वर्षांत वस्त्रोद्योगात सर्वाधिक बदल झाले ते यंत्रसामग्रीमध्ये. या बदलांमागे मुख्यतः पुढील कारणे आहेत.

* अधिक उत्पादकतेची गरज.—५० वर्षांपूर्वीची बाजारपेठ ही विक्रेत्यांची बाजारपेठ (Salers Market) होती. बाजारपेठेवर संपूर्णपणे विक्रेत्यांचे नियंत्रण असे. तिथे स्पर्धा कमी असे. उत्पादकतेकडे दुर्लक्ष केले तरी चालत असे. त्याकाळी बहुतांश यंत्रसामग्री कमी अथवा मध्यम गतीने चाले. मात्र ही परिस्थिती आता राहिलेली नाही. आजची बाजारपेठ ही ग्राहकांची बाजारपेठ (Buyers Market) बनली आहे. अशा बाजारपेठेतील तीव्र स्पर्धेत टिकून राहण्याकरता उत्पादन खर्चावर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक बनले आहे. म्हणून आज सर्वत्र यंत्रसामग्री जलद गतीने चालणारी, अधिक उत्पादन देणारी असते.

* बाजारपेठेतील वाढत्या स्पर्धेचा सकारात्मक परिणाम मालाच्या गुणवत्तेवरही झाला आहे. दर्जेदार मालाची निर्मिती ही आज टाळण्याजोगी गोष्ट राहिलेली नाही. त्यामुळे दर्जेदार मालाची निर्मिती करता येईल अशाच प्रकारची यंत्रसामग्री आज वस्त्रोद्योगात आढळते. याकरता अशा यंत्रांमध्ये स्वयंचलिततेचा (Automation) अधिकाधिक वापर केलेला आढळतो. शिवाय गुणवत्ता नियंत्रणाकरिता काही यंत्रांवर सातत्याने काम करणारी नियंत्रण पद्धतीही (Online Monitoring System) वापरलेली आढळते.

* वस्त्रोद्योगाच्या सर्वच शाखातील तंत्रज्ञानात आश्चर्यकारक प्रगती झालेली आहे. या प्रगतीचे प्रतिबिंब साहजिकच यंत्रसामग्रीमध्येही पडलेले आढळते.

* याशिवाय काही क्षेत्रात संपूर्ण नवे तंत्रज्ञानही विकसित करण्यात आलेले आहे. १९६० साली ज्यांचा विचारही कुणाला सुचला नव्हता अशी यंत्रसामग्री आज वस्त्रोद्योगात प्रत्यक्ष वापरली जात आहे.

*** आणि एक लक्षणीय बदल म्हणजे आजकाल यंत्रसामग्रीची कार्यक्षमता आणि परिणामकारकता वाढवण्यासाठी अन्य इंजिनीअरिंग शाखांचा सर्रास उपयोग केलेला आढळतो. मेकॅनिकल इंजिनीअरिंगबरोबर इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक, न्युमॅटिक्स, हायड्रालिक्स आदी विविध शाखांचा यथायोग्य उपयोग आज होताना आढळतो.**

**गुणवत्ता सुधारणा : वस्त्रोद्योगाच्या सर्व घटकांमध्ये गुणवत्तेच्या बाबतीत गेल्या ५० वर्षांत कमालीची सुधारणा झाली आहे.**

**कापसाची गुणवत्ता तंतूची लांबी, ताकद, तलमपणा, परिपक्वता आणि कापसाच्या गाठीतील कचऱ्याचे प्रमाण या गुणधर्मांच्या आधारे जोखली जाते. जवळजवळ या सर्वच बाबतीत सुधारणा झाल्याचे आढळते. याचे श्रेय काही प्रमाणात संकरित बियाणांना, तर काही प्रमाणात या क्षेत्रात झालेल्या कृषी संशोधनाला द्यायला हवे. सर्वात लक्षणीय फरक झाला आहे तो कापसाच्या गाठीतील कचऱ्याच्या प्रमाणात कापसामधील सरकी काढण्याचे आणि तंतूंची गाठ बांधण्याचे काम जिनिंग (वटण) कारखान्यात केले जाते. बऱ्याच काळापर्यंत हे क्षेत्र पूर्णपणे दुर्लक्षिले गेले. त्यामुळे जागतिक स्तरावर सर्वाधिक कचरा असलेला कापूस म्हणून इथल्या कापसाची गणना होई. पाच ते सहा टक्के कचरा ही सामान्य गोष्ट समजली जाई. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारच्या साहाय्याने टेक्नॉलॉजी मिशन ऑन कॉटन ही योजना राबविली**

अनुक्रमणिका

**जात आहे. या योजनेचे एक अंग म्हणजे जिनिंग प्रक्रियेतील सुधारणा. या सुधारणांमुळे कापूसगाठीतील कचऱ्याचे प्रमाण दोन ते तीन टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात यश मिळाले आहे.**

**सुताची गुणवत्ता त्याची ताकद, एकसारखेपणा, फुलक्यांची संख्या, अधिक अंतरावर आढळणारे दोष यांच्याद्वारे मापली जाते. पन्नास वर्षांपासून आपण या बाबतीत फारच मागासलेले होतो. पण निर्यात अभिमुख कारखाने (Export Oriented Unit) ही संकल्पना काही ठिकाणी स्वीकारली गेली. दर्जेदार सूत ही परदेशी बाजारपेठांची मागणीच असल्यामुळे तशा सुताची निर्मिती इथे सुरू झाली. त्याकरिता आवश्यक ती यंत्रसामग्री आणली गेली, दर्जेदार कापसाकरिता आग्रह धरण्यात येऊ लागला, कार्यपद्धती सुधारल्या गेल्या आणि एका वेगळ्याच गुणवत्ता संस्कृतीचा उदय इथल्या वस्त्रोद्योगात झाला. आज महाराष्ट्रातील अनेक गिरण्यांचे सूत आंतरराष्ट्रीय पातळीवर वाखाणले जात आहे. अग्रक्रमाने स्वीकारले जात आहे.**

**जी गोष्ट सुताची तीच गोष्ट कापडाची. स्वयंचलित आणि धोटविरहित मागांचा वापर वाढला, सुताची गुणवत्ता वाढली, बाजारपेठेतील स्पर्धा वाढली. या सर्वांचा परिणाम म्हणून कापडाच्या गुणवत्तेतही मोठा फरक पडला आहे. त्यामुळेच वस्त्रांच्या बाजारपेठेत उतरणे आपल्याला शक्य झाले आहे. वस्त्रप्रावरणांची गुणवत्ताही या बाबतीत मागे नाही.**

एकूणच 'गुणवत्ता' हा आजच्या वस्त्रोद्योगातील परावलीचा शब्द बनलेला आहे. गुणवत्तेच्या शर्यतीत शेवटची रेषा नसतेच. त्यामुळे अजूनही सुधारणा व्हायला मोठा वाव शिल्लक आहे. हे आव्हानही समर्थपणे पेलले जाईल एवढे नक्की.

**तयार वस्त्रप्रावरणे** (Readymead Garments) **:** गेल्या दशकात महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगाला एक नवीनच पैलू जोडला गेला. तो पैलू आहे तयार वस्त्रप्रावरणांचा. पूर्वी रासायनिक प्रक्रिया करून वापरासाठी कापड तयार करणे इथपर्यंतचा वस्त्रोद्योगाचा संबंध असे. आपापल्या आवडीप्रमाणे लोक असे कापड दुकानातून खरेदी करत आणि शिंपी मापे वगैरे घेऊन आवश्यक ते वस्त्र (शर्ट, पँट, पायजमा, झब्बा, झगा, परकर इ.) शिवत.

गेल्या दशकात मात्र या प्रक्रियेला मोठा धक्का बसला. तयार वस्त्रप्रावरणांचा व्यवसाय सुरू झाला आणि बघता बघता प्रचंड प्रमाणात वाढला. सुरुवातीला **तरुणाची एक फॅशन** म्हणून या प्रकाराकडे काहीसे तुच्छतेने पाहिले गेले. पण चांगल्या दर्जाचे कापड, शिलाईचा उच्च दर्जा, प्रावरणे ग्राहकांपर्यंत चांगल्या स्थितीत पोचावीत म्हणून त्यांचे केलेले अद्यावत **पॅकिंग** आणि पद्धतशीर जाहिरातबाजी यामुळे सारे चित्रच बदलले. आज शिंप्याकडून वस्त्र शिवून घेणे हे अतिशय दुर्मीळ झाले आहे. सर्वांचा ओढा दिसतो तो तयार कपडे घेण्याकडे.

छोट्या प्रमाणात तयार वस्त्रप्रावरणांचा व्यवसाय करायला फार मोठे भांडवल लागत नाही. याचे तंत्रज्ञानही समजायला फार अवघड, क्लिष्ट असे नाही. शिवाय या व्यवसायात अतिकुशल कामगारांची गरज नसते. थोड्या भांडवलावर, छोट्या जागेतही लहान प्रमाणात हा व्यवसाय सुरू करता येतो. यामुळे आज महाराष्ट्रात अनेक शहरांतून छोटे छोटे व्यवसाय सुरू झाले आहेत. मुंबईत गिरण्या बंद पडल्या असल्या तरी तयार कपड्यांचा व्यवसाय तिथे मोठ्या प्रमाणात वाढत आहे. शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश,

विविध कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे गणवेष आदी मार्गांनी चांगली बाजारपेठही उपलब्ध झालेली आहे. शिवाय अंतर्गत बाजारपेठांबरोबर परदेशी बाजारपेठाही खुणावत आहेतच. येत्या काही वर्षांत तयार वस्त्रप्रावरणांची निर्यात मोठ्या प्रमाणात वाढेल असा सरकारी तज्ज्ञांचा अंदाज आहे. भविष्यकाळात हा उद्योग वाढणार आहे याची सर्वांनाच खात्री आहे.

अशा परिस्थितीत काही मोठे उद्योजकही या व्यवसायात शिरकाव करून घेत आहेत. आपले ब्रँड नेम तयार करण्याची चढाओढही सुरू झाली आहे. या व्यवसायाची गणना आज **उगवतीचा उद्योग** (Sunrise Industry) म्हणून केली जात आहे.

**तंत्रोपयोगी वस्त्रे (Technical Textiles) :** गेल्या दोन दशकांत भरभराटीला आलेले वस्त्रोद्योगाचे क्षेत्र म्हणजे तंत्रोपयोगी वस्त्रांचे (Technical Textiles). नजीकच्या भविष्यात हे क्षेत्र किती विस्तारेल याबद्दल तज्ज्ञांमध्ये चर्चा चालू असली तरी एका बाबतीत मात्र सर्वांचे एकमत आहे. ते म्हणजे येत्या काही वर्षांत सर्वाधिक वाढ होणारे क्षेत्र हे तंत्रोपयोगी वस्त्रांचेच असेल.

एकेकाळी वस्त्रांचा उपयोग शरीर झाकण्याकरता, ऊन-थंडी-वारा-पाऊस यापासून शरीराचे संरक्षण करण्याकरता आणि शरीर नटवण्याकरता होत असे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यातील आश्चर्यकारक प्रगतीमुळे वस्त्रोद्योगापुढे विविध कार्यक्षेत्रांची नवी आव्हाने उभी राहिली आणि ही आव्हाने वस्त्रोद्योगात समर्थपणे पेलली आहेत. काही वर्षांपूर्वी ज्यांचा विचारही करता येत नव्हता अशा अनेक कार्यक्षेत्रांमध्ये आज तंतू-सूत-धागा किंवा कापड यांचा वापर होताना दिसत आहे आणि यापुढेही नव्या क्षेत्रात असा वापर होत राहील असे खात्रीपूर्वक म्हणण्यासारखी आजची परिस्थिती आहे. सध्या पुढील कार्यक्षंत्रामध्ये वस्त्राचा वापर होताना आढळतो. अभिमानाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्र यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. मुंबई-पुणे-सागली-वाई-महाड इत्यादी ठिकाणी अनेक कारखान्यांमधून याला लागणारी निर्मिती होत आहे.

*** गृहसजावटीसाठी :** गृहसजावटीसाठी (यात कार्यालयाचाही समावेश आहे.) विविध प्रकारची वस्त्रे लागतात. (चादरी-अभ्रे-टॉवेल्स-गालिचे-पडदे पायपुसणी-ब्लँकेट इ.) यामध्ये नवीन तंतू, नवीन प्रक्रिया, नवी डिझाईन यांच्या वापराने भरपूर विविधता आली आहे.

*** बांधकाम व्यवसायासाठी :** बांधकाम व्यवसायातील वस्त्रोद्योगाचा सहभाग सातत्याने वाढत आहे. भिंतीवरील सिमेंट कॉंक्रीटचा गिलावा अधिक टिकावा म्हणून त्यात अति अल्प प्रमाणात पॉलिएस्टर अथवा पॉलिप्रॉपिलीनचे आखूड तंतू वापरले जातात. रस्ते अधिक टिकावेत याकरता धरणातून, तलावातून पाण्याची होणारी गळती रोखली जावी या करता जिओ टेक्सटाईल, जिओ मेंब्रेन यांचा वापर वाढत्या प्रमाणावर होत आहे.

*** वैद्यकीय वापरासाठी :** जखमा धुण्यासाठी वापरायचा कापूस आणि जखमा बांधण्यासाठी वापरायचे बँडेज ही तशी जुनी उदाहरणे. आता शस्त्रक्रिया करताना वापरण्यात येणारे धागेही वस्त्रोद्योग पुरवत आहे. इतकेच नव्हे, तर काही कृत्रिम अवयवांच्या बांधणीतही सूत, जाळ्या, कपडे यांचा वापर होताना आढळतो.

अनुक्रमणिका

*** मोटार व्यवसायासाठी :** मोटारगाड्यांच्या अंतर्गत सजावटीसाठी विविध प्रकारची कापडे वापरली जातात. वजनाने हलके पण कार्याला भारी असे मोटारीचे काही भाग तयार करण्याकरता कांपोझिट (Composite) तंत्रज्ञानाचा वापर होतो. यात विशिष्ट प्रकारच्या रेक्झिनमध्ये हवे ते तंतू, हव्या त्या प्रमाणात मिसळून अपेक्षित परिणाम साधला जातो.

*** खेळ व खेळाडूंसाठी :** यामध्ये खेळाडूंचे पोशाख, त्यांचे बूट आणि मोजे, हात-पायावर जरुरीप्रमाणे बांधायच्या पट्ट्या, विविध खेळात आवश्यक असलेल्या जाळ्या (नेट) यांचा समावेश होतो. आता तर टेनिस अथवा बॅडमिंटन रॅकेटमधील ताराही वस्त्रोद्योग पुरवत आहे.

*** मच्छीमारीसाठी** : मासे पकडण्यासाठी जाळी वापरावी लागतात या जाळ्यांमध्येही आता प्रगत तंत्रज्ञानाने प्रवेश केला आहे. मानवनिर्मित अखंड तंतूपासून हव्या त्या प्रकारची जाळी बनवायचा कारखाना वाई येथे आहे (गरवारे वॉलरोप) अशा प्रकारची जाळी बनवणाऱ्या कारखान्यात जगातील पहिल्या पाचमध्ये गरवारे वॉल रोपचा समावेश होतो.

*** गाळण प्रक्रियेसाठी :** अनेक आधुनिक भौतिक आणि रासायनिक प्रक्रियांमध्ये गाळण क्रिया हे महत्त्वाचे अंग असते. कुठलेही कापड अगर जाळी कुठेही वापरून चालत नाही. त्या त्या प्रक्रियेच्या जरुरीनुसार गाळणासाठी कापड अगर जाळी बनवावी लागते. तंत्रोपयोगी वस्त्रांमध्ये गाळणवस्त्रे हाही एक महत्त्वाचा विभाग बनला आहे.

*** संरक्षणासाठी :** बंदुकीच्या अथवा पिस्तुलाच्या गोळीपासून संरक्षण होणे हे सैनिकांसाठी आणि पोलीस अधिकाऱ्यांसाठी आवश्यक असते. याकरिता बुलेट प्रुफ कापडाची निर्मिती केली जाते. तसेच अनेक प्रसंगी माणसाला आग, घातक उष्णता, घातक रसायने असलेल्या ठिकाणी काम करावे लागते. तिथे त्याचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक त्या गुणधर्मांच्या वस्त्रप्रावरणांची निर्मिती होते.

**शेती व्यवसायासाठी :** आज शेतीमध्येही प्रगत तंत्रज्ञानाने प्रवेश केला आहे. **ग्रीन हाऊस** हा यातलाच एक प्रकार. अशी ग्रीन हाऊसेस तयार करण्यासाठी विशिष्ट प्रकारचे कापड वापरले जाते. शिवाय काही प्रसंगी पिकांचे संरक्षण करण्यासाठीही वस्त्रांचा वापर होतो.

अशा कापडांची निर्मिती आणि वापर यात महाराष्ट्र बराच पुढे आहे.

**वस्त्रोद्योगाची शिक्षण व्यवस्था :**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी मुंबईतील व्ही.जे.टी.आय.* आणि यु.डी.सी.टी.* या दोन ठिकाणीच वस्त्रोद्योगासंबंधीचे विशेष प्रशिक्षण मिळण्याची सोय होती. व्ही.जे.टी.आय. मधून बी.टेक्स्ट. ही पदवी आणि एल.टी.एम. व एल.टी.सी. या पदविका मिळत. तर यु.डी.सी.टी. मधून बीएस.सी. (टेक) ही पदवी मिळू शके. या दोन्ही ठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या अतिशय मर्यादित होती. एक प्रकारे एककेंद्रीत अशी ही शिक्षण पद्धती होती.

अनुक्रमणिका

गेल्या ५० वर्षांत हे चित्र खूपच बदलले आहे. व्ही.जे.टी.आय. आणि यु.डी.सी.टी. मधून आजही वरील पदवी आणि पदविका मिळू शकतात. याशिवाय पुढील संस्थांमधूनही अशी पदवी मिळण्याची सोय उपलब्ध झाली आहे.

१. टेक्सटाईल अँड इंजिनीअरींग इन्स्टिटयुट, इचलकरंजी.

२. श्री. गुरू गोविंदसिंगजी इन्स्टिट्युट ऑफ इंजिनीअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, नांदेड.

३. जवाहरलाल दर्डा इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळ.

४. श्री. शिवाजी कॉलेज ऑफ इंजिनीअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अकोला.

५. अनुराधा इंजिनीअरींग कॉलेज, चिखली.

शिवाय इचलकरंजीमधील इन्स्टिटयुट आणि नागपूर व सोलापूर मधील शासकीय तंत्रनिकेतनांमधून पदविका मिळू शकतात. गेल्या काही वर्षांत तयार कपड्यांची बाजारपेठ प्रचंड प्रमाणात विस्तारली. त्याचबरोबर फॅशन संबंधीच्या पद्धतशीर तंत्रशुद्ध शिक्षणाची मागणीही वाढली. यातूनच राष्ट्रीय स्तरावर नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीची (एन.आय.एफ.टी.) साखळी तयार झाली आहे. पुण्यामध्ये स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीमध्येही याचा अभ्यासक्रम शिकवला जातो. शिवाय महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये या संबंधीचे अल्पमुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालू असलेले दिसून येतात. याशिवाय एस. एन. डी. टी. निर्मला निकेतन, आय. टी. आय. यांच्या शिक्षण संस्थेमधूनही वस्त्रोद्योगाच्या काही पैलूंचे प्रशिक्षणही दिले जाते.

शिक्षणाच्या अशा बहुकेंद्रित प्रसारामुळे आज महाराष्ट्रातून वस्त्रोद्योगाकरता असंख्य तंत्रज्ञ उपलब्ध आहेत. अशा तंत्रज्ञानामुळे केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशभरातील वस्त्रोद्योग तंत्रज्ञानाची मागणी पुरी करण्यास सहाय्य होत आहे. यातील अनेक जणांनी परदेशातील प्रगत उच्च शिक्षणसंस्थांमध्येही आपला दबदबा निर्माण केला आहे.

मात्र या बदलांबाबत आणखी एक गोष्ट ध्यानात घेणे आवश्यक आहे, हे बदल फक्त स्थानांपुरते वा संस्थेपुरते मर्यादित राहिलेले नाही. बहुतेक ठिकाणी बी. टेक्स्ट. या पदवीसाठी एकच अभ्यासक्रम असतो. मात्र इचलकरंजीतील संस्थेत या पदवी करता टेक्स्टाईल टेक्नॉलॉजी (टी.टी.), मॅन मेड टेक्स्टाईल टेक्नॉलॉजी (एम. एम. टी. टी.), टेक्स्टाईल प्लान्ट इंजिनीअरींग (टी.पी.इ.), टेक्स्टाईल केमिस्ट्री (टी.सी.) आणि फॅशन टेक्नॉलॉजी (एफ.टी.) असे पाच अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात आले आहेत. यामुळे वस्त्रोद्योगाच्या विविध शाखांकरता त्या त्या शाखेचे तंत्रज्ञ मिळू शकतात. याशिवाय पदव्युत्तर अभ्यास करून एम. टेक्स. आणि डॉक्टरेट पर्यंतचे अभ्यासक्रमही आज उपलब्ध झालेले आहेत.

गेल्या ५० वर्षांत शिक्षण व्यवस्थेत झालेले हे बदल खूपच सकारात्मक म्हणायला हवेत.

अनुक्रमणिका

*** व्ही.जे.टी.आय. :** पूर्वीचे नाव व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्युट असे होते. आजचे नाव वीरमाता जिजाबाई टेक्निकल इन्स्टिट्युट असे आहे. इंग्रजी आद्याक्षरे तीच राहिलेली आहेत.

*** यु.डी.सी.टी. :** पूर्वीचे नाव युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी आजचे नाव युनिव्हर्सिटी ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (यु.आय.सी.टी.).

**संशोधन केंद्रे**

कुठल्याही व्यवसायात अनेक तांत्रिक प्रश्न निर्माण होत असतात. त्याचबरोबर काळानुसार नव्या तंत्रज्ञानाची गरजही भासते अशा कामांना वाहिलेली स्वतंत्र संशोधन केंद्रे असणे ही कुठल्याही व्यवसायाची मागणी असते. महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगाचा विचार केला तर पुढील संशोधन केंद्रे गेली अनेक वर्षे कार्यरत असल्याचे आढळून येते.

* दि बॉम्बे टेक्स्टाईल रिसर्च असोसिएशन-बीट्रा (BTRA) घाटकोपर, मुंबई या संस्थेने गेली अनेक वर्षे इथल्या वस्त्रोद्योगाला मोलाचे मार्गदर्शन केले आहे. आजही सोलापूर, इचलकरंजी, माधवनगर, इथल्या उद्योगांना विणकर सहाय्य केंद्रांच्या माध्यमातून ही संस्था मार्गदर्शन करत आहे.

* वूल रिसर्च असोसिएशन-विरा-(WRA) ठाणे-लोकरीचे उत्पादन आणि वापर या संबंधीचे संशोधन आणि मार्गदर्शन या संस्थेद्वारे केले जाते.

* सल्क अँड आर्ट सिल्क मिल इंडस्ट्रीज रिसर्च असोसिएशन-सस्मीरा (SASMIRA) प्रभादेवी, मुंबई-मुख्यतः मानवनिर्मित तंतूंचे उत्पादन, वापर आणि विकास या क्षेत्रात ही संस्था काम करीत आहे. याशिवाय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या द्वारे शिक्षणप्रसाराच्या मोलाच्या कार्यातही या संस्थेचा सहभाग असतो.

परिषदा, चर्चासत्रे, कार्यशाळा, भाषणे, गुणवत्ता तपासणे, सर्वेक्षणे, प्रकाशने अशा माध्यमांमधून वस्त्रोद्योगाला संजीवनी देण्याचे काम गेली अनेक वर्षे या केंद्रांनी केलेले आहे. आजही त्यांचे प्रयत्न सुरूच आहेत.



**डॉ. वर्षा जोशी**

डॉ. वर्षा जोशी यांनी एम्.एस्.सी. (मुंबई विद्यापीठ) एम्.एस्. (पर्डू विद्यापीठ अमेरिका) एम्.फिल. व पी.एच.डी. (पुणे विद्यापीठ) या पदव्या प्राप्त केल्या असून त्या पुण्यातील नौरोसजी वाडिया महाविद्यालयामध्ये भौतिकशास्त्राच्या प्राध्यापिका म्हणून तीस वर्षे कार्यरत होत्या. भौतिकशास्त्रावरील सोळा क्रमिक अभ्यासक्रमावरील पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. मराठीतून विज्ञान प्रसाराचे कार्य होती घेऊन त्यांनी अनेक नियतकालिकातून सुमारे २५० लेख वेगवेगळ्या वैज्ञानिक विषयावर लिहिले आहेत. इंडियन फिजिक्स असोसिएशन पुणे चॅप्टरचा उत्कृष्ट शिक्षकासाठी दिला जाणारा बी.एस्.राय पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे.

पत्ता : १२, साहिल पार्क, सानेवाडा, बाणेर रोड, औंध, पुणे ४११ ००७.
भ्रमणध्वनी : ९८२२०२४२३३, दूरध्वनी : २५८८५४७३.

## वस्त्रप्रावरणामधील बदल

**गे**ल्या पन्नास वर्षांमध्ये झालेल्या वस्त्रप्रावरणामधील बदलाचा आढावा घेण्याआधी काय परिस्थिती होती हे पाहणे जरुरीचे ठरते. नऊवारी साडी नेसण्याची पद्धत इ. स. पूर्व ३०० पासून होती. कंचुकी किंवा चोळी घालण्यास गुप्तकाळात सुरुवात झाली आणि अगदी चाळीस सालापर्यंत नऊवारी नेसणाऱ्या कित्येत स्त्रिया चोळ्या घालत. फक्त काठापदरांच्या लुगड्यांची जागा हळूहळू फुले, पक्षी अशी नक्षी असलेल्या तलम छापील पातळांनी घेतली होती. पण अशा वस्त्रांची वर्णने कालिदास आणि बाणभट्ट यांच्या संस्कृत साहित्यातही होती. पुरुषांची काचा मारून धोतर नेसण्याची पद्धतही प्राचीन होती. मुले धोतर किंवा पंचा नेसत. मुली कासोटा असलेले छोटे लुगडे नेसून वर चोळी घालत किंवा परकर व चोळी घालीत. हे सगळे पाहिल्यावर लक्षात येते, की कित्येक शतके पेहेरावामध्ये फारसा फरक पडला नव्हता. इंग्रजी अंमल आल्यानंतर हा फरक पडायला सुरुवात झाली. साहेबी पोशाखाचा प्रभाव पडून कित्येक पुरुष धोतरावर अंगरख्याऐवजी शर्ट आणि कोट घालू लागले तर काही पुरुष पँट-शर्ट, सूटही वापरू लागले. नऊवारी साडीवर चोळ्यां ऐवजी पोलकी घालण्याची पद्धत पडली. काही स्त्रिया पाचवारी साड्याही नेसू लागल्या, १९६० नंतर मात्र बदल झपाट्याने होऊ लागले आणि विविध प्रकारच्या वस्त्रांमध्ये ते बदल कसे होत गेले याचा आता आपण विचार करणार आहोत.

अनुक्रमणिका

**(१) साड्या :**

१९६० ते १९७० या दहा वर्षांत नऊवारी साडी नेसणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण बरेच होते. त्यावरील पोलकी लांब असत. साडीच्याच रंगाची ती हवीत असा आग्रह नसे. या काळात शहरातील वस्त्रे व खेड्यांमधील वस्त्रे यामध्ये फार तफावत नसली तरी नऊवारी नेसण्याचे प्रमाण खेड्यांमध्ये जास्त होते. शहरात तरुण स्त्रिया पाचवारी नेसत पण खेड्यात कित्येक तरुण स्त्रियाही नऊवारी नेसत. साठसालापर्यंत आणि नंतरही काही वर्षे खटाव, फिनले, मफतलाल अशा मिल्सच्या सुती छापील साड्या, वायल्स, फुल वायल्स अशा पाचवारी साड्या आवडीने नेसल्या जात. साडी चापूनचोपून नेसण्याची पद्धत होती. मॅचिंग ब्लाऊज असत पण एकूणच अंग दिसणार नाही याची खबरदारी घेतली जात असे. रेशमी साड्या विशेषप्रसंगी नेसल्या जात, लग्नासारख्या प्रसंगी वधूला महावस्त्र म्हणून शालू घेण्याची पद्धत होती. बनारसी शालू त्यावेळी प्रसिद्ध होते. दक्षिणेकडच्या कांजीवरम तसेच भरतकाम केलेल्या प्युअर रेशमाच्या साड्या महाराष्ट्रात बाजारपेठ मिळवित होत्या. याच सुमारास मानवनिर्मित कृत्रिम धाग्याची वस्त्रे बाजारात आली. कृत्रिम धाग्यांमध्ये प्रथम बाजी मारली ती नायलॉनने. या नायलॉनच्या साड्या लवकरच लोकप्रिय झाल्या. सुती साड्यांना स्टार्च व इस्त्री आवश्यक असे. रेशमी साड्या महाग असत. त्या एकतर सर्वांना परवडण्यासारख्या नसत. शिवाय त्यांनाही काळजीपूर्वक धुलाई व इस्त्री यांची आवश्यकता असे. या दशकात महाविद्यालयात जाणाऱ्या व नोकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली होती. अशांना या नायलॉनच्या साड्या म्हणजे वरदानच वाटले. या साड्यांचा रंग जात नसे. त्यामध्ये सुंदर रंग व डिझाईन असे. मुख्य म्हणजे त्या लवकरच वाळत, चुरगळत नसत आणि त्यांना इस्त्री लागत नसे. या सर्व कारणांनी या साड्यांचा खप वाढला. या साड्यांच्या आगमनापूर्वी कोणत्याही साडीच्या आत पांढरा परकर वापरला जात असे पण या साड्या पारदर्शक असल्याने त्यांच्या आत रंगीत परकर वापरण्याची पद्धत सुरू झाली आणि साडी सुती, रेशमी, सिंथेटिक कसलीही असो तिच्या रंगासारखा परकर वापरण्याची पद्धत आजही तशीच आहे. याच दशकात महाराष्ट्रात व्हिस्कोज रेयॉन या लाकडाच्या लगद्यापासून किंवा कापसाच्या सरकीला चिकटलेल्या आखूड तंतूपासून बनवणाऱ्या तंतूंची निर्मिती होत होती. १९७० ते १९८० च्या दहा वर्षांमध्ये पॉलिएस्टर ह्या धाग्याचा शिरकाव झाला आणि वस्त्रांच्या बाजारपेठेत त्याने जे स्थान मिळविले ते अजूनही टिकून आहे. नायलॉनप्रमाणेच याचाही रंग व चकाकी धुतल्यावर जात नसे. कपडा लवकर वाळत असे आणि त्याला इस्त्री लागत नसे. शिवाय नायलॉनचा स्पर्श जसा जरा खरखरीत होता, साडी अंगाबाहेर राहत नसे, तसे या पॉलिएस्टरच्या. साड्यांचे होत नव्हते. या साड्या अंगाभोवती व्यवस्थित बसत आणि त्यांचा स्पर्शही अगदी मुलायम असल्याने त्या वापरणे जास्त सुखदायी होते. रेशमाला पर्याय म्हणून ह्या मानवनिर्मित सर्व धाग्यांची योजना केलेली होती. हे मानवनिर्मित धागे आर्ट सिल्क किंवा आर्टिफिशल सिल्क म्हणून ओळखले जात असत. अशा साड्या तशा स्वस्तही असत. सर्वांना परवडण्यासारख्या असत. अगदी आतासुद्धा अशा धाग्यांचा वापर करून पैठणीच्या डिझाईनचा उपयोग करून सेमी पैठण्यांसारख्या साड्या बनवल्या जातात आणि प्युअर रेशमी पैठणी न परवडणाऱ्यांना तशा प्रकारची साडी नेसल्याचा थोडातरी आनंद मिळतो. मानवनिर्मित धाग्यांमुळे झुळझुळीत सुंदर वस्त्र नेसल्याचा आनंद आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील स्त्रियांनाही मिळू लागला आणि गरीब-श्रीमंतामधील दरी थोडीफार तरी कमी होण्यास त्यामुळे हातभार लागला. या धाग्यांच्या वस्त्रांचे विणकाम प्रामुख्याने भिवंडी येथे होते. तेव्हाही होत होते. मानवनिर्मित धाग्यांच्या गुणधर्मांमुळे रोजच्या वापरासाठी स्त्रिया अशाच साड्यांची निवड करीत. पॉलिएस्टरमध्ये इतर धाग्यांचे मिश्रण करूनही साड्या विणल्या जात होत्या. या दशकामध्ये बहुतेक तरुण व मध्यमवर्गीय स्त्रिया पाचवारी साड्या नेसत. ज्येष्ठ स्त्रिया मात्र तेव्हाही नऊवारी नेसत. शहरात आणि खेड्यात दोन्हीकडे हीच पद्धत होती. पण तरीही नऊवारी नेसणाऱ्या स्त्रिया खेड्यात जास्त होत्या. धार्मिक

कार्यांमध्ये मात्र खूप जणी आवर्जून नऊवारी नेसत. लग्नासारख्या प्रसंगी या काळातही शालूचे स्थान अव्वल होते.

या वीस वर्षांमध्ये चित्रपट या माध्यमाची पकड जनमानसावर जास्त होती. चित्रपटांमधील नायिका अंगाबरोबर लपेटलेली साडी नेसत पण हळूहळू त्यांनी सलवार-कुडता-दुपट्टा हा पोशाख वापरायला सुरुवात केली होती. रंगीत चित्रपटांमधल्या नायिकांच्या वस्त्राचा प्रभाव स्त्रियांवरही पडला आणि साडी हळूहळू मागे पडू लागली. दुचाकी वाहनांचे प्रमाण या वीस वर्षांत प्रचंड वाढले. दुचाकी चालवणाऱ्या स्त्रियांची संख्याही पुण्यासारख्या शहरामध्ये भरपूर वाढली. चारचाकी, दुचाकी चालवताना साडी हे वस्त्र तसे अडचणीचेच होते. त्यामुळे साडीची पीछेहाट झपाट्याने होऊ लागली. १९८० ते १९९० या दहा वर्षांच्या काळात बहुतेक महाविद्यालयीन तरुणी सलवार-कुडता-दुपट्टा वापरू लागल्या. पण जरा वयाने जास्त असलेल्या, मध्यमवयीन स्त्रिया पाचवारी साड्या नेसत होत्या आणि खूप ज्येष्ठ स्त्रिया मात्र अजूनही नऊवारीच नेसत. खेड्यातही जवळजवळ हीच स्थिती होती आणि याला कारण दूरचित्रवाणीचे जाळे खेड्यापाड्यांमधून पसरले जाते. रंगीत दूरचित्रवाणी संच बाजारात आले आणि अल्पावधीतच सगळीकडे लोकप्रिय झाले. आपल्याकडे संच नसला तरी ज्याच्याकडे असेल त्याच्याकडे जाऊन कार्यक्रम पाहण्यासाठी लोकांची गर्दी होत असे. रंगीत चित्रपट, मालिका खेड्यापाड्यातूनही सर्वजण बघू लागले आणि त्यातील वस्त्रांचे अनुकरण करू लागले. स्त्रियाही याला अपवाद नव्हत्याच. फिल्मी नियतकालिकांमधून केल्या जाणाऱ्या जाहिराती पाहून उच्चभ्रू समाजातल्या स्त्रिया त्यातील वस्त्रांचे अनुकरण करीत होत्याच. इंग्रजी माध्यमाची शाळा आणि इंग्रजी चित्रपट यामुळे पाश्चात्त्य वस्त्रसंस्कृतीचे जबरदस्त आकर्षण उच्चभ्रू स्त्रियांमध्ये निर्माण झाले होते आणि अशा समाजातल्या स्त्रिया पँट आणि टॉप असा पेहेरावही करू लागल्या होत्या. मध्यम आणि कनिष्ठवर्गीयांमध्ये हे लोण जरी पोचले नव्हते तरीही बदल झालेला होताच.

१९९० ते २००० या दहा वर्षांत आधीपेक्षाही जास्त बदल झाला. संगणक तोपर्यंत आले होते पण त्यांनी जोरदार मुसंडी या दहा वर्षांमध्ये मारली. माहिती आणि तंत्रज्ञानाचा विकास व्हावयास सुरुवात झाली. मोठ्या प्रमाणात स्त्रिया या क्षेत्राकडे आकर्षित होऊ लागल्या. या दशकाच्या उत्तरार्धात इंटरनेटचे जाळे जगभर विणले गेले आणि आपल्याकडील मध्यमवर्गीयांचाही त्याच्याशी परिचय झाला. जग आणखी जवळ आले. पाश्चात्त्य वस्त्रसंस्कृती आपल्याकडे जास्त लोकप्रिय होऊ लागली. याशिवाय एक मोठी घटना अशी घडली, की आशियामध्ये उपग्रहाद्वारे दूरचित्रवाणीचे प्रक्षेपण करण्यास सुरुवात झाली. आतापर्यंत दूरचित्रवाणी ही फक्त दूरदर्शनची मक्तेदारी होती पण आता स्टार आणि तिच्या जोडीला झी वाहिनी या दशकात आल्या आणि कार्यक्रमांमध्ये जाहिराती दाखवण्यास सुरुवात झाली. केबल टी.व्ही. तेव्हा खेड्यात नव्हता पण दूरदर्शनवर लोक जाहिराती पाहत होतेच. या जाहिरातींचा प्रभाव जनमानसावर पडू लागला. चित्रपटांमधील नायिका, नामवंत खेळाडू या जाहिराती करीत. त्यांच्या वस्त्रांचे अनुकरण होऊ लागले. शहरांमध्ये पाश्चात्त्य मालिका, चित्रपट केबल-टी.व्ही. वर दिसू लागले आणि पाश्चात्त्यसंस्कृतीकडे आकर्षित झालेल्या तरुणाईने पाश्चात्त्य वस्त्रसंस्कृती स्वीकारली. बाहेरच्या जगात पुरुषांबरोबर बरोबरीने वावरताना, वाहन चालवताना स्त्रियांना ट्राउझर्स, जीन्स, केप्री पँट्स आवडू लागल्या आणि साडीकडे तरुणाईने पाठ फिरवली. आता तरुण स्त्रिया ट्राउझर्स आणि टॉप घालतात. तर मध्यमवयीन स्त्रिया सलवार-कुडता-दुपट्टा पसंत करतात. त्यापेक्षा ज्येष्ठ स्त्रिया पाचवारी नेसतात आणि नऊवारी फक्त काही कामकरी वर्गातील स्त्रिया आणि वृद्ध व अतिवृद्ध स्त्रिया नेसतात.

अनुक्रमणिका

या दशकाच्या आधी महाराष्ट्र लघुउद्योग विकास मंडळाने येवल्याच्या पैठणी उद्योगाला चालना दिली आणि महाराष्ट्राचे भूषण असणाऱ्या पैठणीला पुन्हा एकदा या दशकात चांगले दिवस आले. मधल्या काळात शालूची फॅशन मागे पडून लग्नासारख्या प्रसंगात चनियाचोलीचा वापर होऊ लागला होता पण ते स्थान आता पैठणीने घेतले. नाभीजवळ छिद्र पाडून त्यात अलंकार घालण्याची आणि तो दिसावा म्हणून लोकट जीन्स वापरण्याची पद्धत पाश्चात्त्य देशात रूढ झाली होती ती आपल्याकडे आली. नाभी दाखवणाऱ्या साड्या, घागरे, लोकट पँट्स चित्रपटातून दिसू लागल्या आणि त्याचे अनुकरण स्त्रिया करू लागल्या. याच दशकात स्त्रियांच्या सौंदर्यस्पर्धा, त्यातील त्यांचे पोशाख, ते पोशाख निर्माण करणारे डिझायनर्स या डिझायनर्सचे फॅशन शोज या सगळ्यांना प्रसिद्धी मिळू लागली आणि डिझायनर कपड्यांचा जमाना आला. आता लग्नासारख्या प्रसंगी डिझायनर साडी वधू नेसतात. आता साडी नेसण्याची पूर्वीची एकच पद्धत राहिली नाही. पंचवीसतीस वेगवेगळ्या प्रकारे ती नेसता येते. खादी ग्रामोद्योग मंडळ आणि हातमाग उद्योगाला महाराष्ट्र सरकार देत असलेल्या प्रोत्साहनामुळे भारतातल्या विविध राज्यांमधल्या साड्यांची प्रदर्शने भरतात आणि या साड्या मोठ्या प्रमाणावर नेसल्याही जातात.

**मुलामुलींचे कापड व गणवेश :**

१९६० ते १९७० या काळात बहुसंख्य लहान मुली फ्रॉक घालीत व जरा मोठ्या मुली परकर-पोलके घालीत आणि स्कर्ट-ब्लाउज घालीत. मुलगी वयात आली, की तिने साडी नेसायला सुरुवात करायची अशी पद्धत या दशकाच्या पूर्वार्धापर्यंत होती पण ती हळूहळू बदलू लागली. शाळेच्या युनिफॉर्ममध्येही मुलींचा पोशाख स्कर्ट ब्लाऊज असा असे आणि वयात आलेल्या बऱ्याच मुली युनिफॉर्मच्या साड्या नेसत पण हळूहळू ही स्थिती बदलून सर्व मुली युनिफॉर्ममध्ये स्कर्ट-ब्लाऊज वापरू लागल्या. नंतरच्या दशकामध्ये युनिफॉर्ममध्ये सलवार-कुडत्याचा समावेश काही शाळांनी केला बऱ्याच मुली शाळेत आणि बाहेर वावरताना स्कर्ट-ब्लाऊज घालीत आणि घरीही त्यांचा तोच पोशाख असे पण कनिष्ठ मध्यमवर्गीय घरांमधल्या, कामकरी वर्गातल्या आणि खेड्यातल्या मुली मात्र घरी परकर-पोलके हाच पोशाख करीत. खेड्यांमध्ये मोठ्या मुली साड्याच नेसत. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मात्र पहिल्यापासून पिनाफोर किंवा फ्रॉक आणि सॅश असाच युनिफॉर्म सर्व मुलींसाठी असे.

महाविद्यालयांमध्ये जाणाऱ्या उच्चभ्रू सोसायटीतील मुली पँट-टॉप, स्कर्ट-ब्लाऊज किंवा सलवार-कुडता-दुपट्टा असा पोशाख करीत पण बहुसंख्य मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय मुली पाचवारी साडी नेसत. या मुलींचा घरचा पोशाखही साडी हाच असे. रोजच्या वापरासाठी छापील सुती किंवा मानवनिर्मित धाग्यांपासून बनलेल्या साड्या तर खास प्रसंगासाठी रेशमी साड्या असत. नायलॉनच्या काठ लावलेल्या, भरतकाम केलेल्या साड्याही खास प्रसंगासाठी असत. पण हे चित्र हळूहळू बदलू लागले. मधल्या काळात मॅक्सी नामक वस्त्राचा एक प्रकार मुलींमध्ये लोकप्रिय झाला होता. ह्या अखंड ड्रेसचा स्कर्ट पायाच्या घोट्यापर्यंत लांब असे. काही मुली लुंगी-कुडताही वापरीत पण या दोन्ही कपड्यांची लोकप्रियता लवकरच ओसरली. रॅपअराउन्ड स्कर्ट आणि कफनीसारख्या कफतानचीही फॅशन येऊन गेली. गरारा नावाचा घागऱ्याचा प्रकार आणि त्यावर कुडता आणि शरारा नावाचा खाली खूप घोळ असलेला लेंग्यासारखा प्रकार आणि त्यावर कुडता असे कपडेही मुली व तरुण स्त्रिया वापरीत. शरारा आणि सलवार कुडता काही समाजातील स्त्रिया वापरीत त्या साडी नेसत नसत. या पोशाखावरून बाहेर जाताना त्या स्त्रिया बुरखा घेत. हा बुरखा सुती किंवा रेशमी असे पण आता पॉलिएस्टर त्यासाठी वापरले जाते किंवा पॉलिएस्टरबरोबर मिश्र धागे वापरले जातात. हा बुरखा अजूनही या समाजात वापरला जातो.

अनुक्रमणिका

१९८० ते १९९० या दहा वर्षांत सर्व मुली सलवार-कुडता-दुपट्टा असा पोशाख करू लागल्या. इंग्रजी माध्यमात शिकलेल्या आणि पाश्चात्त्य संस्कृतीचा, पाश्चात्त्य चित्रपटांचा प्रभाव असलेल्या तरुण मुली पँट आणि शर्ट किंवा टॉप असा पेहराव करीत पण बहुसंख्य मध्यम आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय मुली सलवार-कुडता-दुपट्टा वापरणे पसंत करीत. महाविद्यालयीन तरुणींमध्ये तर हा पोशाख फारच लोकप्रिय होता. बोलपट आणि दूरचित्रवाणी दोन्हीमध्ये नायिका हा पोशाख वापरताना दिसत त्यामुळे त्यांचा प्रभाव तर होताच पण हा पोशाख आवडीने घालता जाण्याची बरीच कारणे आहेत. पहिलं हे, की कोणत्याही हवामानात हा पोशाख करणे सुखदायी वाटत होते अगदी उन्हाळ्यातही तो आरामदायक असे. वाऱ्याने स्कर्ट उडतो तसे या पोशाखाचे होत नाही. कमरेखाली पँट घातली, की अंतर्वस्त्र दिसण्याची शक्यता असते ती या पोशाखात कधीच नसते. हा पोशाख अंगभर असूनही डौलदार दिसतो. त्यात विविध रंग, फॅशन्स, विविध प्रकार असू शकतात. त्याप्रमाणे तो नेहमीसारखा किंवा विशेष समारंभासाठी वापरता येतो. रेडीमेड मिळू शकतो किंवा एका दिवसात शिवून मिळू शकतो. साडीचा घोळ सावरावा लागतो, पायात येतो, तसे याचे होत नाही. शिवाय तो आपल्या देहातल्या उणिवा झाकू शकतो आणि वाहन चालवण्याच्या दृष्टीने अत्यंत सोयीचा असतो. दुचाकीच काय, अगदी चारचाकी चालवणाऱ्यांनाही तो सोयीचा वाटतो. या सर्व कारणांनी समाजाच्या सर्व वर्गातल्या मुली, तरुण स्त्रिया, मध्यमवयीन आणि म्हाताऱ्या स्त्रियाही आता हा पोशाख करणे योग्य समजतात. अगदी ग्रामीण भागातही मुली आणि तरुण स्त्रिया हाच पोशाख करताना आजच्या काळात आढळतात. काळ बदलला त्याप्रमाणे याच्यातही बदल झाले. ८०-९० या दहा वर्षांत खाली रुंद सलवार व बेताच्या उंचीचा कुडता असे. विविध प्रकारच्या ओढण्या किंवा दुपट्टे असत. छापील, भरतकाम केलेले, लेस लावलेले सुती, जॉर्जेट, शिफॉन या विविध प्रकारच्या कापडांचे ते असत. त्या काळी आपला वस्त्रोद्योग मध्यपूर्वदेशांना दुपट्टे निर्यात करीत होता. याच काळात धोतर नेसल्यासारख्या दिसणाऱ्या धोतीसलवार वापरल्या जात होत्या. हळूहळू घोट्याशी अंगाबरोबर असणारा चुडीदार व त्यावर अंगाबरोबर बसणारा कुडता व त्यावर दुपट्टा असाही पोशाख मुलींना आवडू लागला. नंतरच्या काळात कुडत्याची लांबी वाढली आणि जवळजवळ घोट्यापर्यंत आली आणि आता आखूड कुडता घालण्याची फॅशन आली आहे. पैठणीच्या कापडाचे, सोलापुरी चादरीचे असे विविध प्रकारच्या कापडांचे सलवार सुट्स मिळतात. पँटवजा सलवार आणि आखूड कुडता असा पोशाख आवडीने घातला जातो. गेल्या दहा वर्षांत मात्र सलवार-कुडता मागे पडून त्याची जागा पँट आणि केप्री पँट आणि बेबी टी शर्टस्, स्पगेटी स्ट्रॅपवाले टॉप्स, कुर्ता यांनी घेतली आहे. पूर्वी गुरुशर्ट असायचा तशी; पण उंचीला कमी असलेली कुर्ती पुरुष आणि स्त्रिया सर्वजण वापरतात. चुडीदार, जीन्स, स्कर्ट, पँट कशावरही ती घालता येते. जॉर्जेट, क्रेप, शिफॉन, खादी यापासून किंवा रेशमी आणि सुती कापडापासून स्त्रियांची कुर्ती बनते. त्यावर विविध प्रकारचे भरतकाम केलेले असू शकते. मणी, लेस यांची नक्षी किंवा फुलांची छापील नक्षी, आरसे अशी कलाकुसर असू शकते. अशी ही कुर्ती आता पाश्चात्त्य देशातही लोकप्रियता मिळवत आहे. तऱ्हेतऱ्हेच्या फॅशनचे ड्रेसेस घालणेही मुली पसंत करतात. परकराचे आगमन पुन्हा लाँग स्कर्टच्या स्वरूपात झाले आहे. स्लिप असलेले लाँगस्कर्टही घातले जातात आणि पँट-टॉपवर उपरण्यासारखा स्टोलही घेतला जातो. १९९० ते २००० या दशकात दूरचित्रवाणीवर अनेक वाहिन्या वाढल्या. त्यानंतरच्या दहा वर्षात त्या आणखी वाढल्या, जाहिराती मोठ्या प्रमाणात होऊ लागल्या. एम.टी.व्ही., व्ही.टी.व्ही. सारख्या वाहिन्यांवरून पाश्चात्त्य वस्त्रसंस्कृती मोठ्या प्रमाणात आपल्या तरुणाईने उचलली आणि हा बदल घडून आला. डेनिमच्या जीन्स आणि अंगाबरोबर बसणाऱ्या पायाखाली पट्टा असलेल्या स्पॅन्डेक्सच्या ट्राउझर्स वापरायला मुलींनी ८० ते ९० च्या दहा वर्षांमध्येच सुरुवात केली होती पण त्यानंतर नाभी दाखविण्याची फॅशन आल्यानंतर आता लोकट जीन्स, हॉट पँट्स आणि आखूड किंवा गाठ मारून घालण्याचे टॉपही वापरले जातात. गेल्या वीसपंचवीस वर्षांतच डिझायनर आणि रेडीमेड कपड्यांची चलती सुरू झाली आणि असे पोशाख मुली वापरू लागल्या. तरी

अनुक्रमणिका

अजूनही कामकरी वर्गातल्या आणि ग्रामीण भागातल्या मुली सलवार-कुडता-दुपट्टाच वापरताना दिसतात. आणि आदिवासी स्त्रिया पारंपरिक पोशाख करताना आढळतात.

मुलींच्या कपड्यामध्ये गेल्या पन्नास वर्षांमध्ये जेवढे बदल झाले त्यामानाने मुलांच्या कपड्यांमध्ये फारसे बदल झाले नाहीत. अगदी १९६० पासून आतापर्यंत लहान मुले अगदी अर्धी चड्डी (हाफपँट) आणि शर्ट असाच पोशाख करीत आले आहेत. शाळांमधील गणवेशातही याच पोषाखाचा अंतर्भाव असतो. काही शाळांमध्ये टायही लावावा लागतो. पण अशांचे प्रमाण फार नाही. मुले जरा मोठी झाली, की फुल-पँट वापरू लागतात. केप्री पँट्स आणि अनेक खिसे असलेल्या गुडघ्यापर्यंत किंवा त्यापेक्षा थोड्या लांब असलेल्या पँट्स वापरणेही अशा मुलांना आवडते. साठ ते सत्तरच्या काळातच डेनिम कापडाचे आणि डेनिम जीन्सचे आगमन भारतात झाले होते. अमेरिकन चित्रपटातील रफ ॲण्ड टफ काऊबॉय प्रतिमेला अनुसरून या जीन्स बनवल्या होत्या. त्यामुळे अशी प्रतिमा निर्माण व्हावी अशी इच्छा असलेल्या तरुण मुलांनी जीन्स अल्पावधीत आत्मसात केल्या. विशेष समारंभात त्यावेळी मुले टेरिलीन, टेरिकल, वूलन अशा कापडाची पँट-शर्ट वापरीत. नेहमीच्या वापरासाठी साध्या पँट्स व जीन्स वापरल्या जात. अगदी ऐंशी सालापर्यंत कपडे शिवून घेण्याची पद्धत होती पण त्यानंतर मात्र रेडीमेड कपडे विकत घेण्याकडे कल वाढू लागला. ८० ते ९० या दहा वर्षांमध्ये उत्तरार्धात ॲसिड वॉश्ड जीन्स, स्टोन वॉश्ड जीन्स, धागे लोंबत असलेल्या जीन्स घालणे फॅशनेबल समजू जाऊ लागले. जीन्सवर वेगळ्या रंगाचे पॅचवर्कसुद्धा केलेले असे. दूरचित्रवाणीवरील वाहिन्या, पाश्चात्त्य वस्त्रसंस्कृतीचा पगडा या सगळ्याचा हा परिणाम आहे. गेल्या काही वर्षांत डेनिमच्या कापडामध्ये पॉलिस्टरचा धागा वापरला जातो. या धाग्याला चमक असते. आणि कापडाला त्यामुळे एक प्रकारची चकाकी आणि तलमपणा येतो. डेनिमची पूर्वीची रफ ॲण्ड टफ प्रतिमा जाऊन आता स्त्री/पुरुष सर्वांनी नेहमी वापरण्यासाठी जीन्स अशी प्रतिमा निर्माण झाल्यामुळे हा बदल योग्य ठरला. आता या जीन्सवर भरतकाम, मण्यांची नक्षी अशा अनेक गोष्टी करून त्या सजवलेल्या असतात. मुले आणि तरुण पुरुष त्या घालणे पसंत करतात. स्त्रिया आणि मुलीही त्या आवडीने घालतात.

गेल्या काही वर्षांतील बदल म्हणजे विशेष प्रसंगी मुले सुरवार, कुडता आणि उपरणे असा किंवा जोधपुरी कोट, सुरवार किंवा शेरवाणी, उपरणे असा पोशाख आवडीने करताना दिसतात. धोतर आणि जरतारी जामासुद्धा घालायला अनेकांना आवडतो. त्यावर जरीने भरतकाम केलेले असते. निरनिराळ्या प्रकारची जॅकेट्सही वापरली जातात. नेहमीच्या वापरासाठी डेनिमची जॅकेट्स आणि विंडचीटर्स वापरले जातात. पूर्वीच्या काळात पँटवर गुरुशर्ट वापरले जायचे. आता सुती, डिझाईन नसलेल्या पण चमकदार रंगांच्या वेगवेगळ्या गळ्यांच्या फॅशनच्या भरतकाम केलेल्या कुरती मुले वापरतात.

गेल्या वीस वर्षांत मुलांच्या वापरात जास्त असलेली गोष्ट म्हणजे टीशर्ट्स. गुंफित वस्त्रे जेव्हा बनू लागली तेव्हा त्यांचे अनेक गुणधर्म दिसू लागले. गोल पद्धतीने विणलेली ही गुंफित वस्त्रे ताणली जाऊ शकत होती. त्यामध्ये विणण्याच्या पद्धतीमुळे हवेचे कप्पे भरपूर होते. हवा खेळती राहिल्याने उन्हाळ्यामध्ये ही वस्त्रे अतिशय सुखदायी होती. या वस्त्रांना सामान्यपणे आपण होजियरी म्हणून ओळखतो. आपल्याकडच्या हवामानामुळे अल्पावधीतच ही वस्त्रे लोकप्रिय झाली. टीशर्ट हे तसेच एक वस्त्र. लहानथोर सगळ्यांना सुखदायी वाटणारा टीशर्ट लहान मुले, जरा मोठे मुले, पुरुष, मुली, स्त्रिया सर्वजण वापरताना दिसतात. याला इस्त्रीही फारशी लागत नसल्याने रोज वापरण्यासाठी अतिशय उत्तम असतात. स्वाभाविकच मुले जास्त करून टीशर्टच घालताना दिसतात.

**पुरुषांचे कपडे :**

१९६०ते ७० च्या काळात बाहेर जाताना धोतर न नेसता पँट व शर्ट वापरण्याची पद्धत पुरुषांमध्ये पडली. तरीही घरी आल्यानंतर मात्र कित्येकजण धोतर नेसत. ग्रामीण भागात मात्र धोतरच जास्त नेसले जायचे. तरुण मुले मात्र पँट शर्ट वापरत असत. विशेष प्रसंगी सूट वापरण्याची पद्धत होती. थ्री पीस सूटही वापरला जाई. लग्नाच्या वेळी नवरदेव सुटाबुटात असत. कामकरी वर्गातले बरेचसे अर्धी खाकी चड्डी (पँट) आणि शर्ट घालीत असत. कपडे शिवून घेतलेले असत. आणि रेडीमेड कपड्यांचे लोण पुरुषांच्या बाबतीत तरी आलेले नव्हते. मोठ्या पदावर असलेले पुरुष शर्टवर टाय लावीत असत. शर्टच्या बाह्या लांब असल्याने उकडत फार असे, त्यामुळे काही लोक अर्ध्या बाह्यांचे शर्ट वापरू लागले. यातूनच बुशशर्ट किंवा मनिलाचा जन्म झाला. काही लोकांना तो पँटमध्ये न खोचता बाहेरच ठेवणे पसंत पडू लागले. आणि त्याला बुशशर्ट ऐवजी बुशकोट म्हणू लागले; ही सुरुवात ६० च्या जरा आधीच झालेली होती. या पुढच्या दहा वर्षांच्या काळात बेलबॉटमचा जमाना आला. बेलबॉटमबरोबर शर्ट आणि साध्या पँटबरोबर बुशशर्ट घालण्याची पद्धत होती. पँटमध्ये टेरिलीन, टेरिकॉट, वूलन सुती असे प्रकार असत. शर्ट सुती किंवा टेरलिनचे असत. टेरिलिन म्हणजेच पॉलिस्टरचे शर्ट लवकर वाळत; चुरगळत नसत, त्यांना इस्त्री लागत नसे; त्यांचा रंग जात नसे आणि ते चमकदार दिसत, या त्यांच्या गुणधर्मामुळे ते नेहमीच्या वापरासाठी लोकप्रिय झाले होते. हळूहळू घरी धोतर नेसण्याची पद्धत बंद पडली. पुरुष घरात पायजमा व बंडी, अंगरखा किंवा शर्ट घालू लागले.

हळूहळू लोकांच्या लक्षात येऊ लागले, की उन्हाळ्यामध्ये कोणत्याही औपचारिक किंवा विशेष कार्यक्रमात सूट घालणे त्रासदायक होते, त्यामुळे यावर उपाय म्हणून पँटच्या कापडाचा बुशकोट शिवून तो त्या पँटवर घालण्यास सुरुवात झाली. या प्रकाराला सफारी सूट असे नाव पडले. मध्यमवयीन पुरुषांमध्ये हा प्रकार खूपच लोकप्रिय झाला. यानंतरच्या काही वर्षांतच बेलबॉटम मागे पडून साध्या पँट्स पुरुष वापरू लागले. अनौपचारिक कार्यक्रमांमध्ये काही पुरुष धोतर आणि नेहरूशर्ट आणि जाकीट असा पोशाख करीत. पुढे पुढे नेहरूशर्ट व जाकीट जाऊन गुरुशर्ट घालण्यास सुरुवात झाली. शहरी भागामध्ये फुलपँट आणि शर्ट हा पुरुषांचा पेहराव समाजातल्या सगळ्या थरांमध्ये अजूनही तसाच आहे. डॉक्टर व वकील यांच्या व्यावसायिक पोशाखात बदल झाला नाही. रहदारी नियंत्रित करणारे पोलीस मात्र पूर्वी हाफपँट कोट अशा निळ्या रंगाच्या गणवेशात असायचे ते आत खाकी फुलपँट आणि पांढरा शर्ट या गणवेशात असतात. इतर पोलिसांचा गणवेश मात्र पूर्वीपासून आतापर्यंत खाकीच राहिला आहे.

ग्रामीण भागातही धोतराऐवजी सरसकट लोक पँट व शर्ट किंवा जीन्स आणि टीशर्ट ९० सालानंतर वापरू लागले. ८० सालानंतर दूरचित्रवाणीवर अनेक वाहिन्या आल्या आणि जाहिरातींचे प्रस्थ वाढले. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी दूरदर्शनलाही जाहिरातींचा वापर करावा लागला. दूरदर्शन अगदी खेड्यापाड्यामधून पोचलेले असल्याने ग्रामीण भागातील लोक मोठ्या संख्येने बघत असत. त्यामुळे मालिका, चित्रपट, आणि जाहिरातींमधील नटांचे कपडे बघून तसे वापरण्याचा कल सर्व पुरुषांचा होऊ लागला, आणि विचारांमध्ये कदाचित मागासलेले पुरुष वस्त्रांमध्ये मात्र पुरोगामी होऊन जीन्स, टी शर्ट असा पोशाख करू लागले. ग्रामीण भागातले परंपरागत पोशाख मागे पडले. डेनिम जीन्स बाजारात येऊन अनेक वर्षे झाली तरी तिच्या रफ अ‍ॅन्ड टफ प्रतिमेमुळे ती मुलांना, तरुणांना जास्त योग्य असे प्रौढ पुरुषांचे मत असे. पण गेल्या दहापंधरा वर्षांत डेनिम जीन्सची प्रतिमा बदलली आणि पॉलिएस्टरमुळे कापडाचा पोतही बदलला. जगण्याबद्दलची, वस्त्राबद्दलची मानसिकता बदलली आणि आता प्रौढ पुरुषही जीन्स

वापरताना दिसतात, गुंफित वस्त्रांच्या आगमनानंतर लवकर वाळणारे, न चुरगळणारे, फारशी इस्त्री न लागणारे, रंगीबेरंगी, आकर्षक, हवा खेळती राहणारे, उन्हाळ्यातसुद्धा सुखदायी वाटणारे टी शर्ट्स प्रौढ पुरुषसुद्धा आता वापरताना दिसतात, याचा परिणाम म्हणजे आजोबा, मुलगा, नातू या सगळ्यांचा पोशाख पँट आणि टी शर्ट किंवा जीन्स आणि टी शर्ट असा समान असू शकतो. लक्षात येण्यासारखा मानसिकतेमधला बदल म्हणजे पूर्वी शर्ट फक्त पांढऱ्या किंवा निळ्या रंगाचे असत पण हळूहळू कोणत्याही रंगाचा, चौकटी किंवा रेषा असलेला शर्ट वापरायला पुरुषांनी सुरुवात केली. आजकाल या शर्टांवर भरतकाम असते. त्याप्रमाणे वस्त्रोद्योगातील इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक यामुळे आलेल्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून टी शर्ट्सवर हवी ती चित्रे, संदेश वगैरे छापण्यास सुरुवात झाली. आणि असे टी शर्ट्स आता प्रौढ पुरुषही वापरतात. एवढे झाले तरी पौरोहित्य करणारे पुरुष मात्र अजूनही धोतर व शर्ट वापरताना दिसतात. या बाबतीत मात्र समाजाची मानसिकता बदललेली दिसत नाही.

१९६० पर्यंत उच्चभ्रू समाजात पाश्चात्त्य पद्धतीची अंतर्वस्त्रे वापरावयास सुरुवात झाली होती. पण मध्यमवर्गीय घरातून आणि ग्रामीण भागातून तसेच कनिष्ठ वर्गातील घरातून मात्र जुन्या भारतीय पद्धतीची अंतर्वस्त्रे वापरली जात. १९६० ते १९७० या दहा वर्षांच्या पूर्वार्धातच मध्यमवर्गीय, कनिष्ठवर्गीय, शहरी तरुणी पाश्चात्त्य पद्धतीची सुती अंतर्वस्त्रे वापरू लागल्या. मध्यमवयीन आणि वृद्ध स्त्रिया मात्र जुन्याच पद्धतीची अंतर्वस्त्रे जास्त करून वापरत. अंतर्वस्त्रे साधारणः पांढऱ्या रंगाची असत. त्याच्या रचनेत प्रामुख्याने शरीराला आधार मिळावा व वस्त्रे आरामदायी वाटावीत हा उद्देश असे. लैंगिक आकर्षणाचा विचार त्या काळी कोणत्याही कपड्याबाबत फारसा केला जात नसे व फारसे महत्त्वही दिले जात नसे. याच काळात स्पॅन्डेक्स किंवा लायक्रा या धाग्याच्या उत्पादनाला सुरुवात झाली होती. हा धागा खूप ताणला जात असल्याने स्त्रियांच्या वक्षभागाच्या अंतर्वस्त्रासाठी हा धागा पश्चिमेत वापरला जात होता. अशी अंतर्वस्त्रे सत्तरनंतरच्या काळात महाराष्ट्रात वापरण्यास सुरुवात झाली. या काळात उत्तरार्धात पॅडिंग असलेली अंतर्वस्त्रेही वापरण्याची पद्धत रूढ झाली. चित्रपटतारका वक्षभाग मोठा दिसण्यासाठी त्यांचा वापर करीत. चित्रपटविषयक पाक्षिके, मासिके यामधूनही जाहिराती प्रसारित केल्या जात. अशा प्रकारे या सगळ्याच्या प्रभावामुळे ही अंतर्वस्त्रे खूप स्त्रिया वापरू लागल्या. नंतरच्या काही वर्षांत समाजातल्या सर्व स्तरातल्या तरुण मुली, स्त्रिया, मध्यमवयीन स्त्रिया पॅडिंग नसलेली पण पाश्चात्त्य पद्धतीची अंतर्वस्त्रे वापरू लागल्या. ७०-८० या काळातच हळूहळू अंतर्वस्त्रांचा उपयोग लैंगिक आकर्षण वाढवण्यासाठी होऊ लागला. विविध रंगांची, डिझाईन्सची, वेगवेगळ्या प्रकारच्या कापडांची अंतर्वस्त्रे स्त्रिया वापरू लागल्या. ६० नंतर दहा वर्षांतच मिनीस्कर्टचा उदय झाला होता पण आपल्याकडे तो वापरणारींची संख्या कमी होती. गेल्या दहापंधरा वर्षांत माध्यमांच्या प्रभावामुळे, पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आणि अंगप्रदर्शन करण्यात गैर काही नाही अशी मानसिकता झाल्याने लांडे स्कर्ट्स, ड्रेसेस, हॉट पँट्स, अंतर्वस्त्रासारखा दिसणारा टॉप हे सर्व चित्रपटांमधून दिसू लागले आणि काही प्रमाणात ते स्त्रियांनी उचलले. या वस्त्रांबरोबर पँटीजही वापरण्यास आपल्याकडे आता सुरुवात झाली आहे. ईव्हनिंग गाऊनमुळे पट्टे नसलेली अंतर्वस्त्रे अस्तित्त्वात आली. शरीराची कमनीयता उत्तम दिसण्यासाठी फॅशनेबल स्त्रिया गर्डल्सही वापरू लागल्या आहेत.

शहरातील बहुतेक पुरुष विशेषतः तरुण पुरुष ६० सालापासून पाश्चात्त्य पद्धतीची सुती अंतर्वस्त्रे वापरत. मध्यमवयीन आणि वृद्ध पुरुष व ग्रामीण भागातले पुरुष मात्र भारतीय पद्धतीची सुती अंतर्वस्त्रे वापरीत. गुंफित वस्त्रांच्या म्हणजेच होजियरीच्या आगमनानंतर (स्त्री-पुरुष दोन्हीच्या) अंतर्वस्त्रांसाठी होजियरीचा उपयोग केला जाऊ लागला. होजियरीची अंतर्वस्त्रे आरामदायी असतात. अंगाबरोबर बसतात. शरीराला चांगला आधार देतात. या सगळ्या गुणधर्मामुळे अगदी आतासुद्धा अंतर्वस्त्रे होजियरीपासून

बनवली जातात. पुरुषांची अंतर्वस्त्रे पूर्वी पांढरी असत. आता वेगवेगळ्या रंगाची अंतर्वस्त्रे बनवली जातात. सध्या आता बॉक्सर ब्रीफ्स आणि ट्रन्क्सचा जमाना आला आहे. बनियन मात्र सॅन्डो किंवा हातवाले असे दोन प्रकारचे असतात. याची पद्धत पूर्वीपासून तीच आहे. प्रामुख्याने ते पांढरे असतात पण आता रंगीतही बनवले जातात.

पूर्वी अंतर्वस्त्राच्या जाहिराती चित्रपटविषयक मासिके, पाक्षिके यातून असायच्या पण आता त्या दूरचित्रवाणीवर पाहायला मिळतात. वस्त्रसंस्कृतीत आणि समाजाच्या मानसिकतेत झालेला हा बदलही लक्षात घेण्यासारखा आहे.

**लहान बाळांची वस्त्रे :**

१९६० सालच्या आधी आणि त्यानंतरही दहाबारा वर्षे लहान मुलांसाठी घरी झबली शिवली जायची किंवा शिवून घेतली जायची. घरी बनवलेले त्रिकोणी लंगोट शीशूसाठी वापरले जायचे. पण पाश्चात्त्य वस्त्रसंस्कृतीचा परिणाम याही क्षेत्रावर झाला. शिवाय मुलांच्या आरोग्याविषयीची, स्वच्छतेसंबंधीची जागरुकता समाजात हळूहळू वाढत होती. रेडिमेड कापड्यांमध्ये रुमाल, अंतर्वस्त्रे आणि लहान मुलांच्या कपड्यांचा अंतर्भाव असे. बाबा सूट्स, फ्रॉक असे विकत मिळत पण ते बऱ्यापैकी महाग असत. होजियरीचा उपयोग वस्त्रनिर्मितीत व्हायला लागल्यावर लहान मुलांचे (बाळांचे) कपडे होजियरीपासून बनवण्यास सुरुवात झाली. यामध्ये छोटे बनियन, छोटी झबली आणि नॅपीज किंवा डायपर्सचा समावेश होता. आता तर एकदा वापरून फेकून देण्याचे म्हणजे डिस्पोजेबल डायपर्स मिळतात. नवजात शिशूपासून सर्व वयाच्या छोट्या मुलांसाठी सर्व प्रकारचे रेडिमेड कपडे मिळतात आणि परवडतील अशा किंमतीला मिळू शकतात.

**झोपाताना घालायचे कपडे :**

साठ सालापर्यंत आणि त्यानंतर जवळजवळ दहाबारा वर्षे झोपताना वेगळे कपडे घालायची आपल्याकडे पद्धत नव्हती. स्त्रिया साड्या नेसूनच झोपत. अजूनही ग्रामीण भागातील स्त्रिया आणि शहरातल्या वृद्ध स्त्रिया दिवसभर अंगावर असलेली साडी न बदलताच झोपतात. पण ७० ते ८० या दहा वर्षांच्या काळात तरुण मुली व स्त्रियांनी झोपताना गाऊन किंवा कफतान घालायला सुरुवात केली. लहान मुली गाऊन घालत किंवा पायजमा आणि त्याच कापडाचा कोट (नाईट सूट) घालत. त्यानंतर मात्र ही पद्धत कायम राहिली. मध्यमवयीन स्त्रियाही गाऊन घालू लागल्या आणि कित्येक तरुण स्त्रिया पायजमा आणि कोट म्हणजे नाईट सूट वापरू लागल्या. साठ सालानंतर अनेक वर्षे पुरुष झोपताना पायजमा आणि बंडी वापरीत किंवा शर्ट घालीत. काही मध्यमवर्गीय-कनिष्ठवर्गीय घरामध्ये पुरुषांचे पायजमे पट्ट्यांचे डिझाईन असलेले रंगीत असत तर काही पुरुष पट्ट्यांचे डिझाईन असलेल्या अर्ध्या चड्ड्या घालीत. त्यानंतरच्या वर्षामध्ये पुरुष लुंगी वापरीत असत. गेल्या पंधराएक वर्षात कित्येक पुरुष हाफ पॅंट किंवा शॉर्ट घरात घालतात आणि तीच घालून झोपतात. लहान मुले नाईटसूट किंवा पायजमा आणि टी शर्ट घालतात. सध्याच्या जमान्यात ट्रॅक पॅंट आणि टी शर्ट् घालून झोपण्याला मुलं-मुली प्राधान्य देताना दिसतात.

**पोहण्याचे आणि खेळांसाठीचे कपडे :**

साठसालापर्यंत आपल्याकडे पोहण्याचे पोशाख घालून स्त्रियांनी तलावावर जाण्याची फारशी पद्धत नव्हती. उच्चभ्रू समाजातल्या काही स्त्रिया पोहण्याचे पोशाख वापरीत पण जास्तीत जास्त अंग झाकण्याकडे लक्ष दिले जाई. पण नंतरच्या काळात मात्र स्त्रियांचे तलावावर जाण्याचे प्रमाण वाढले व वेगवेगळ्या पद्धतीचे पोहण्याचे पोशाख बाजारात मिळू लागले. लायक्रा वापरायला वस्त्रोद्योगात सुरुवात झाल्यावर पोहण्याचे पोशाखही लायक्रापासून बनू लागले. यांचा सगळ्यात मोठा फायदा हा होता की पाण्यातून बाहेर आल्यावर हे पोशाख लवकर वाळायचे. आजही बरेचसे पोहण्याचे पोशाख लायक्रापासून बनतात. चित्रपटातील नायिकांचे उदाहरण घेऊन आपल्याकडेही आता स्त्रिया बिकिनी वापरताना दिसतात. पुरुषांसाठी मात्र पूर्वीपासून पोहण्यासाठी आखूड चड्डी (ट्रन्क) बनवीत तशीच अजूनही बनवली जाते. फक्त मानवनिर्मित धाग्यांपासून चमकदार, टिकाऊ, रंग न जाणारी, लवकर वाळणारी अशी जी कापडे बनतात त्यापासून या बनवल्या जातात.

पूर्वी बॅडमिंटन किंवा टेनिस खेळायला जाताना अर्धी पांढरी पँट आणि अर्ध्या बाह्यांचा शर्ट असा पुरुषांचा पोशाख असे. स्त्रियांचे खेळण्याचे प्रमाण फारच कमी होते आणि आखूड स्कर्ट आणि टी शर्ट घालून खेळायला जाण्याची बऱ्याच जणींना लाज वाटे. पण ८० नंतर हे चित्र बऱ्यापैकी पालटले. पुरुषांचे पोशाख जवळजवळ तेच राहिले पण स्त्रियाही स्कर्ट, टी शर्ट किंवा हाफ पँट, टी शर्ट किंवा डिव्हायडेड स्कर्ट आणि टी शर्ट असे घालून खेळू लागल्या. मानवनिर्मित धाग्यांच्या कापडांनी याही क्षेत्रात बदल घडवून आणले. आता जिमला जाणाऱ्यांची संख्याही खूप आहे. लायक्राच्या पँट्स आणि टी शर्ट हा स्त्रियांचा, तर हाफ पँट आणि टी शर्ट हा साधारणतः पुरुषांचा पोशाख असतो.

**गृहसजावटीची वस्त्रे : व शीतकालीन वस्त्रे :**

वस्त्रसंस्कृतीचा विचार करताना जसा स्त्री-पुरुष परिधान करीत असलेल्या वस्त्रांचा विचार करावा लागतो तसाच घरामध्ये आपण वापरत असलेल्या इतर वस्त्रांचाही करावा लागतो. अंग पुसण्यासाठी, हात पुसण्यासाठी पूर्वी पंचे वापरले जायचे. खादी हे आपल्या देशाचे भूषण. या खादीचे टॉवेल्स, पंचे वापरण्यास नंतर सुरुवात झाली. त्यानंतर टर्किश टॉवेल लोक वापरू लागले. उच्चभ्रू समाजात टॉवेलिंगचे गाऊन (रोब) आंघोळीनंतर किंवा पोहण्याच्या तलावावर वापरण्याची प्रथा होती. आता आपल्याकडे निर्यात केला जाणारा उच्च प्रतीचा माल तयार होतो. त्यात टॉवेलांचा समावेश आहे. असे उत्कृष्ट टॉवेल्स सोलापूर इथे बनतात. पूर्वी घरांना क्रोशाचे विणकाम केलेले पडदे असत. त्यानंतर सुती पडदे वापरले जात. उच्चभ्रू समाजात रेशमी पडदे असत. पण आता पॉलिएस्टरबरोबर धागे मिश्रित करून वेगवेगळ्या प्रकारची सुंदर कापडे बनवली जातात आणि त्यापासून वेगवेगळ्या डिझाईनचे पडदे बनवले जातात. या पडद्यांना चमक असते. त्यांचा रंग जात नाही आणि धुतल्यावर ते लगेच वाळतात. सोफ्याच्या आच्छादनासाठी अशा मिश्रित धाग्यांपासून कापडे बनवली जातात. गालिचे, सतरंज्या, चादरी अशा अनेक सुंदर गोष्टी सोलापूरमध्ये बनतात आणि आपण त्या नेहमी वापरतो. पन्नास वर्षांपूर्वी थंडीसाठी स्वेटर्स वगैरे हाताने घरी विणले जात पण त्यानंतर लोकरीचे विणकाम करण्यासाठी खास यंत्रे बाजारात आली आणि त्याचा परिणाम म्हणजे आज स्वेटर्स, ब्लॅन्केट्स, शाली, हातमोजे, स्कार्फ, कानटोप्या असा सर्व माल बाजारात उपलब्ध असतो. अगदी पुलओव्हर्स, कोट, जर्सीज, टर्टलनेक्स असे फॅन्सी प्रकारही मिळू शकतात.

**समारोप :**

गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रातल्या वस्त्रोद्योगाने अनेक स्थित्यंतरे पाहिली. महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र लघुउद्योग विकास मंडळ, खादी ग्रामोद्योग मंडळ, बुनकर साहाय्यता केंद्र अशा संस्था तसेच संशोधन केंद्रे सुरू करून वस्त्रोद्योगाला चालना दिली. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातली परकीय गुंतवणूक प्रचंड प्रमाणात वाढली. रेडिमेड कपड्यांची मागणी वाढली. निरनिराळ्या परकीय कंपन्यांची उत्पादने इथे विकली जाऊ लागली. महाराष्ट्रातही रेडिमेड कपड्यांचा धंदा प्रचंड प्रमाणात वाढला. कपडे शिवून घेण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. शिलाईही खूपच वाढली आहे. स्त्रियांचे शिक्षण घेण्याचे, अर्थार्जन करण्याचे, वाहन चालवण्याचे प्रमाण वेगाने वाढत आहे. याचबरोबर चित्रपट, दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्या आणि त्यावरील जाहिराती, माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्राची मोठी आगेकूच या सर्व कारणांमुळे महाराष्ट्रातील वस्त्रसंस्कृतीमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. स्वतःची पारंपरिक वैशिष्ट्ये तिने काही प्रमाणात जपली असली तरी पाश्चात्त्य संस्कृतीच्या जवळ ती वेगाने जात आहे. पण त्याचबरोबर आपल्याकडील सुंदर कपडा, भरतकामाचे कलाकौशल्य यांना परदेशात दाद मिळत आहे आणि तिथल्या वस्त्रसंस्कृतीतही बदल होत आहे. जग खऱ्या अर्थाने वस्त्रसंस्कृतीच्या बाबतीत तरी वेगाने जवळ येत आहे असे म्हणायला काहीच हरकत नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विविध योजना विविध ठिकाणी राबविल्या जात आहेत. त्यांचा फायदा वस्त्रोद्योगालाही मिळत आहे. त्याचप्रमाणे एकाच भागामध्ये एकाच पद्धतीच्या उद्योगाचे आयोजन करणे अनेक दृष्टीने फायदेशीर ठरते, या अनुषंगाने **क्लस्टर** किंवा **टेक्नॉलॉजी पार्क** ही योजना कार्यान्वित झाली आहे. आणि त्याचा फायदा वस्त्रोद्योगालाही मिळत आहे. अर्थात या सगळ्यांचे परिणाम दिसण्यासाठी काही वर्षे तरी जावी लागतील पण एकंदरीत महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगाचे आणि पर्यायाने वस्त्रसंस्कृतीचे भविष्य उज्ज्वल आहे यात शंका नाही.

अनुक्रमणिका

# महाराष्ट्राची पर्यटन संस्कृती



**श्री. समीर कर्वे**

समीर कर्वे हे महाराष्ट्र टाइम्स या दैनिकात मुख्य वार्ताहर या पदावर कार्यरत आहेत. १९९२ पासून त्यांच्या पत्रकारितेला सुरुवात झाली. लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, नवशक्ती, आज दिनांक यासारख्या दैनिकांमधून त्यांना काम केले आहे. नागरी प्रश्न, पायाभूत सुविधा, पर्यटन, गिर्यारोहण, गुन्हेगारी, संरक्षण, शिक्षण, करियर, वाहतूक यासारख्या विविध विषयांवर त्यांचे अभ्यासपूर्ण लेखन प्रकाशित झाले आहे. ओळख मुंबई महापालिकेची ही आकाशवाणीवरील त्यांनी लिहिलेली दीर्घ मालिका चांगलीच गाजली आहे. पत्रकारितेसोबतच ते पत्रकारितेचा अभ्यासक्रमसुद्धा शिकवतात. पर्यटनविषयक लेखन हे त्यांचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

---

पत्ता : ए-२, यशोदीप, ठाकूर नगर, मुलुंड (पू.), मुंबई ४०० ०८१.
भ्रमणध्वनी : ९८२०७८२७७५

---

“**पा**पा, पापा छुट्टियोमें, महाबलेश्वर चलेंगे ना, होटलका नंबर याद है ना...” अशी एक जाहिरात ब्लॅक अॅण्ड व्हाइट टीव्हीच्या जमान्यात मुंबई दूरदर्शनवर झळकायची, साधारण १९८० चा काळ असेल तो. म्हणजे त्या काळी मुंबईसारख्या शहरातून पर्यटनासाठी जायचं, तर माथेरान-महाबळेश्वर या ब्रिटिशकालीन हिलस्टेशन्सवरच... हा फॉर्म्युला अगदी पक्का होता. तसं महाराष्ट्रीयांना देशाटन नवं नाही. पण आता एकविसाव्या शतकात ज्या अर्थाने आपण टूरिझम किंवा पर्यटन म्हणतो तसं कौटुंबिक पर्यटन हे या काळात नुकतंच सुरू झालं होतं. साधारण सत्तरीच्या दशकापासून महाराष्ट्रातली अनेक नवदांपत्यं गुलमर्ग, दाललेक आणि शिमला-नैनितालच्या थंडीत कुडकुडत सहलीची मजाही लुटू लागली होती, साहजिकच पर्यटनाचा बहर तेव्हापासूनच सुरू झाला होता. आज या पर्यटनाच्या बहराने अशी काही मजल मारली आहे, की महाराष्ट्रातला कुटुंबकबिला थेट नायगरा फॉल्समध्ये आनंदाचा वर्षाव झेलतो किवा मलेशियातल्या ट्वीन टॉवर्सची उंची मोजण्याचा प्रयत्न करताना दिसतो. कुणी ईजिप्तच्या नाईल नदीतली सफर करतो, तर कुणी केनियातल्या मसाईमारा जंगलात थेट वाघ-सिंहांची भेट घ्यायला जातो. महाराष्ट्रीय मनाच्या या जिज्ञासू, छंदप्रेमी व्यक्तिमत्त्वामुळेच जगभरात महाराष्ट्राने पर्यटनाला फार मोठी चालना दिली आहे. त्याचप्रमाणे याच भटकंतीप्रेमाने महाराष्ट्रातील पर्यटनालाही मोठा हात दिला, हेही तितकंच खरं. पर्यटकांची एवढी मोठी खाण असलेल्या महाराष्ट्रातही पर्यटनासाठी अमर्याद वाव होताच आणि अनेकविध गुणांनी समृद्ध असलेल्या महाराष्ट्रात पर्यटनाच्या संधी निर्माण न होत्या, तरच नवल. सुवर्णमहोत्सवाचा आनंद लुटत असलेल्या महाराष्ट्राने पर्यटनाच्या नकाशावर स्वतःचं कसं स्थान निर्माण केलं आहे, याचाच वेध घेण्याचा प्रयत्न करू या.

अनुक्रमणिका

**अमर्याद संधींचा उपजत ठेवा**

ज्या रमणीय नैसर्गिक सौंदर्याची मजा लुटण्यासाठी महाराष्ट्रातील पर्यटक काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत भ्रमंती करीत आले, त्याच नैसर्गिक ठेव्याची मुक्त उधळण महाराष्ट्रातही झाली आहे. रौद्रभीषण नैसर्गिक आविष्कारातही दडलेलं सौंदर्य दाखविणारी हिमशिखरं सोडली, तर संपूर्ण भारतदेशात असलेलं प्रत्येक पर्यटन वैशिष्ट्य महाराष्ट्रातही आढळेल. छत्रपती शिवरायांच्या दूरदृष्टीचे प्रतीक ठरलेले गड-किल्ले हे तर महाराष्ट्राचं आणखी एक वैभव. अर्थात केवळ उपजत नैसर्गिक ठेव्याबद्दल बोलायचं, तरी महाराष्ट्रात बहुविविधता आहे. तब्बल ७२० किलोमीटरची पश्चिम किनारपट्टी ही तर फारच रमणीय. त्यातही पुन्हा वैविध्य आहेच. उत्तरेकडे डहाणू, पालघरपासून रायगड, रत्नागिरी आणि मग तळकोकणात मालवण-सिंधुदुर्गापर्यंत प्रत्येक किनारपट्टी तिच्या वाळूच्या रंगापासून चिकूच्या वाड्या, आंब्याची कलमं आणि माडपोफळीच्या बागांपर्यंत वेगवेगळी रूपं धारण करते. विदर्भ, नागपूरमध्ये नवेगाव, नागझिरा, ताडोबा यांसारखी अभयारण्य म्हणजे वन्यजिवांच्या दर्शनाचा आनंद देणारी पर्वणी ठरतात. कोयनेचं जंगल किंवा अनेक दुर्मीळ पक्ष्यांची किलबिल जागती ठेवणारी कर्नाळा, फणसाड, नात्रज यांसारखी पक्षीअभयारण्यं म्हणजे पक्षीप्रेमींसाठी तर चंगळच, उल्कापातातून तयार झालेलं लोणार सरोवर हे विदर्भातलं वैशिष्ट्य ठरलंय, माथेरान, महाबळेश्वर, लोणावळा ही हिलस्टेशन्स तिथल्या रमणीय डोंगरदऱ्या आणि शीणवटा घालविणाऱ्या थंड हवेमुळे कायम हवीहवीशी वाटत आली आहेत. नाशिक, त्र्यंबकेश्वर, पंढरपूर, कोल्हापूरची अंबाबाई, शिर्डी यासारख्या देवस्थानांनी भक्तिमार्गावरचं पर्यटन जागृत ठेवलं आहे. काळसूबाईसारखं सर्वोच्च शिखर आणि उभा-आडवा पसरलेला सह्याद्री अन् त्यावरच्या कडेकपाऱ्या यांनी गिर्यारोहकांची फळी तयार केली आहे. देशाचीच नव्हे, तर संपूर्ण आशिया खंडाची आर्थिक राजधानी असलेली मुंबापुरी तर याच महाराष्ट्राचा अविभाज्य भाग.... मुंबापुरीची महती याचि डोळा पाहण्यासाठी तर भारतभरातून आणि देशविदेशातून पर्यटक येत असतात. मुंबईप्रमाणेच, पुणे, कोल्हापूर या शहरांमध्येही पर्यटनाची केंद्रे आकारास आली, ती त्यांच्या ऐतिहासिक रूपामुळे, तर एकूणच महाराष्ट्राकडे अशा वैविध्यपूर्ण ठेव्याची कमतरता कधीच नव्हती, निसर्गाने आपल्याला या सर्व रूपांमध्ये भरभरून ठेवा दिलाय.... आता त्याचा आपण सुयोग्य पर्यटनासाठी कसा वापर करून घेतला, हे पाहणं अर्थातच रंजक ठरतं. गेल्या पन्नास वर्षांचा धावता आढावा घ्यायचा ठरवला, तरी आपल्याला वाटी लागतं, की अरेच्चा, आपल्याला अजून किती मोठा महाराष्ट्र पालथा घालायचा राहूनच गेलाय की! किंवा प्रत्येक वेळी त्याच ठिकाणी पुनःपुन्हा गेलं तरी तो महाराष्ट्र आपल्याला नव्या रुपात भेटीस येतो. रायगडावरचं जगदीश्वराचं मंदिर आणि सूर्यास्ताच्या वेळी संधिप्रकाशात न्हाऊन निघालेलं आकाश आणि त्या बॅकड्रॉपवर काळ्या पाषाणातही तेजोमय झालेला शिवरायांचा पुतळा दरवेळी वेगळाच भासतो. अलिबाग तालुक्यात मांडव्याच्या किनारपट्टीवरून संध्याकाळच्या वेळी दिसणारी लुकलुकती मुंबई तिच्या वैभवाचं प्रतिबिंब समुद्रात पाडते तर याच समुद्राकाठी पावसाळ्याची चाहूल देणाऱ्या लाटांचा तडाखा मेअखेरीस पाहायला मिळतो. प्रत्येकवेळी हा किनारा वेगळा भासतो. नाशिकच्या वणीमध्ये सात डोंगररांगांमध्ये सप्तश्रृंगनिवासी झालेली शक्तिपीठांमधली एक दुर्गादेवी आणि तिच्यासमोरचा मार्कंडेयाचा डोंगर दरवेळी वेगळे भासतात. वारंवार जाऊनही महाबळेश्वर, माथेरानचा कंटाळा येऊ शकत नाही. या अशा वैशिष्ट्यांमुळे महाराष्ट्राला वेगळेपण आलेलं आहे. उपजत वैभव तर असतंच, पण त्याचा उपयोग करून माणसाने त्यातून काही चांगलंचुंगलं घडवलं तर ते त्या वास्तूच्या किंवा नैसर्गिक ठेव्याच्या रूपाचं सौंदर्य खुलवू शकतं किंवा त्याच्या मूळ सौंदर्याला बाधाही पोहोचवू शकतं. नेमक्या याच गोष्टीवर आपल्या पर्यटनाचा चेहरामोहरा ठरत असतो. त्यामुळेच एखादं स्थळ वर सांगितल्याप्रमाणे दरवेळी वेगळ्या रंगात खुलून दिसलं, तरी कधीकधी आपणच सभोवताली केलेल्या बजबजपुरीमुळे त्या स्थळाचं सौंदर्य पार लयालाही जाऊ शकतं. अशा गोष्टी

मात्र पर्यटनाला मारक ठरतात, पर्यटनाचा साक्षेपी आढावा घेताना या गोष्टींचाही विचार करणं अगत्याचंच ठरतं.

**लोणावळा, महाबळेश्वर, माथेरान**

"कशासाठी पोटासाठी, खंडाळ्याच्या घाटासाठी..." असा आवाज करत दख्खनची राणी घाट चढते, असं लहानपणापासून सांगितलं जायचं. याच दख्खन राणीच्या कुशीत बसून मुंबई-पुणे प्रवास करत असताना कच्च्या-बच्च्यांची पहिली ओळख खंडाळ्याच्या घाटाशी आणि पर्यायाने खंडाळा, लोणावळा या थंड हवेच्या ठिकाणांशी व्हायची. पूर्वी केवळ धनिक लोक तिथे एखाद्या व्हिलामध्ये सुट्टीचा आनंद लुटायला जायचे. कालांतराने मात्र लोणावळा, खंडाळा अनेकांच्या पर्यटनाचं ठिकाण बनू लागलं. तिथले भुशी, वळवण डॅम, राजमाची पॉइन्ट, पावसाळ्यात अमृतांजन जाहिरात फलकाखालचा बोगदा आणि तिथला पॉइन्ट तसंच नागफणीचा (ड्युक्स नोज) कडा ही ठिकाणं सर्वांच्या परिचयाची होऊ लागली. तरीही लोणावळ्यात सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किमतीत हॉटेल्स उपलब्ध नसायची. काही जणांचे बंगले मिळू लागले होते. तेही सर्वसामान्यांच्या आवाक्यातलं नसायचं. पण सर्वसामान्यांच्या लेखी लोणावळा हा वनडे स्पॉट मात्र कायम राहिला. मुंबई-पुण्यापासूनचं आवाक्यातलं अंतर ही त्यातली सर्वात जमेची बाजू, शेजारी राजमाचीचा किल्ला हा समस्त ट्रेकर्सचा कायम आवडीचा स्पॉट राहिला आहे. श्रीवर्धन आणि मनोरंजन या बालेकिल्ल्यांवर पावसाळ्यात ढगांबरोबर होणारा पाठशिवणीचा खेळ अनुभवणं हा अवर्णनीय अनुभव तिथे आजही घेता येतो. फरक इतकाच, की आता राजमाचीसभोवतीच्या जमिनीवरही बंगले आकारास आले आहेत. तिथे लोकांनी गुंतवणूक केली आहे. खालच्या कुणे गावातही बंगल्यांच्या स्कीम्स तयार झाल्या आहेत आणि त्याला खेटून मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे उभा आहे. एक्स्प्रेसवे तयार झाल्यामुळे लोणावळा हे तर सर्वांच्याच आवाक्यातलं बनलं. अर्थात एक्स्प्रेसवेनंतर जुन्या मुंबई-पुणे घाटरस्त्यावरची लोणावळा स्टेशनाजवळची चिक्की आणि फजची मजा आता टोलनाक्यावरच्या फूडमॉलमध्ये गाडीवाल्यांना मिळू शकते. पण लोणावळा-खंडाळ्याच्या घाटरस्त्यावर दमछाक करत चढावावर केलेलं सायकलिंग आणि नंतर परतीच्या प्रवासात पायडल न मारता उतारावरचा प्रवास.... शिवाय भर पावसात चिंब होऊन तिथे घेतलेलं गरम गरम कणीस याची लज्जत आजही अनेकांना आठवत असेल.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील लोकांकडे सुबत्ता आल्यावर लोणावळ्यातील रिसॉर्टमध्ये चार-सहा दिवसांच्या पॅकेजवर राहायला जाण्याचे पर्याय उपलब्ध झाले. आता तर अशा रिसॉर्टमध्ये महाराष्ट्रीय कुटुंबांचे विवाहसोहळे साजरे झाल्याची उदाहरणेही सापडतात. म्हणजे हे समस्त आप्तस्वकीयांसाठी एका वेगळ्या प्रकारचं पर्यटनच. पण तरीही अलीकडच्या काळात लोणावळ्यात सुट्टी साजरी करायला जाणाऱ्यांचं मराठीजनांचं प्रमाण कमी झालं. वीकेन्डसाठी लोणावळ्याला जाऊन येणारे बरेच आहेत. त्यातही बॅचलर पार्ट्यांसाठी लोणावळ्याला अनेकांची पसंती असते. लोणावळा आता वनस्टॉप डेस्टिनेशन झालं. अजूनही पावसात भिजण्याचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी लोणावळ्याचं सौंदर्य खचितच कमी झालेलं नाही. राजमाची हे आता नवोदित ट्रेकर्ससाठीही उत्तम ठिकाण झालं. शिवाय घाटातल्या उल्हास व्हॅलीमध्ये पावसातली सरकती वाट सांभाळत उतरायचं आणि तिथे गेल्यावर कवी सौमित्रच्या 'मऊ पावसाने दरी गोठली, ढगांनी किती खोल उतरायचं....' या ओळींचा साक्षात अनुभव घ्यायचा, असा मनमुराद आनंदही लुटायला मिळतो. बाकी मग लोहगड-विसापूर, तुंग-तिकोना असे गड आहेतच. पण हे सगळं ट्रेक आणि उंडारलेपण यांच्या वेशीवरचं, कौटुंबिक पर्यटनासाठी आता हे ठिकाण थोडं मागे पडलेलंच. शिवाय लोणावळ्याचा चेहरामोहरा मात्र एक्स्प्रेसवेच्या सद्दीनंतर पालटला आहे, हे नक्की.

अनुक्रमणिका

**महाबळेश्वर**

लोणावळ्याप्रमाणे सदाबहार अर्थात ऑल टाइम ग्रेट असलेली दोन ठिकाणं म्हणजे महाबळेश्वर आणि माथेरान. सह्याद्रीच्या कुशीत वसलेली ही दोन ठिकाणं पर्यटनाच्या नकाशावर आणण्याचं श्रेय ब्रिटिशांना जातं. पुण्याच्या दिशेने वाई, पाचगणी आणि कोकणच्या दिशेने महाड, पोलादपूरमार्गे महाबळेश्वरला पोहोचता येतं. घाटमाथ्यावर असल्याने महाबळेश्वरला जाण्यासाठी दोन्ही बाजूने कठीण असे वळणावळणांचे घाट पार केल्यानंतरच आपली गाडी महाबळेश्वरमध्ये पोहोचते. घोड्यावरची रपेट, वेण्णा किंवा तापोळा जलाशयातला नौकाविहार, स्ट्रॉबेरी गार्डन्सची सैर, श्रीक्षेत्र महाबळेश्वरमध्ये असलेला पाच नद्यांचा संगम आणि शिवरायांच्या धाडसी कर्तृत्वाचं प्रतीक ठरलेला प्रतापगड.... या जोडीला ब्रिटिशांनी विकसित केलेले कड्याच्या टोकावरचे रमणीय पॉइन्ट्स- असं महाबळेश्वरचं थोडक्यातलं वैशिष्ट्य. ही सारी वैशिष्ट्यं आजही कायमच आहेत. मुख्य बाजारपेठेसभोवती विविध हॉटेल्स, व्हिला हे उभे आहेत. गेल्या काही वर्षांत महाबळेश्वरमध्ये विशिष्ट प्रकारे पर्यटनाची चांगली घडी बसली आहे. त्यात बहुतकरून तीन रात्री-चार दिवस वगैरे प्रकारची पॅकेजेस असतात. यात आपली बुकिंग घेणारे टूर ऑपरेटर, हॉटेल्सवाले, स्थानिक स्थळदर्शनाचे टूर एजन्ट किंवा टॅक्सीवाले यांचा चांगला समन्वय तयार झाला आहे. मुंबईत तर ठिकठिकाणी अशी टूर एजन्टांची कार्यालयं आहेत आणि तिथे महाबळेश्वरच्या सर्व हॉटेलांची बुकिंग होऊ शकतात. पर्यटकांना बहुतांशी याचा फायदाच होतो. मुंबई, पुण्यातून रात्रीच्या वेळेस खाजगी आरामबसगाड्या महाबळेश्वरकडे निघतात आणि दुसऱ्या दिवशी पहाटे, सकाळपर्यंत पाचगणी, महाबळेश्वरला पोहोचतात. सकाळी त्याच गाड्या मुंबई, पुण्याची वाट धरतात. महाबळेश्वरला जाण्यासाठी रस्ता हा एकच मार्ग असल्याने बसच्या बुकिंगसह महाबळेश्वरचं पॅकेज घेणं लोकांना सोयीचं जातं. तुरळक प्रमाणात फसवले गेल्याचे प्रकारही घडत असतील. पण सरसकट तसं करणं टूर ऑपरेटरना परवडत नाही. प्रेक्षणीय स्थळांच्या भेटीचा समावेश असं पॅकेजमध्ये म्हणायचं आणि प्रत्यक्षात मात्र प्रतापगड किंवा तापोळा इथली लांबची टूर त्यात द्यायचीच नाही, अशी व्यावसायिक चलाखी या पॅकेजमध्ये स्वाभाविकपणेच केली जाते. पण तेवढा घाटा आता पर्यटकांनी आपलासा केलेला असतो. त्यामुळेच हौशी पर्यटक ही ज्यादा टूर आपापल्या आवडीप्रमाणे वेगळे पैसे मोजून करतातच. फक्त एक चांगली गोष्ट म्हणजे इथल्या टॅक्सीवाल्यांचे दर ठरलेले आहेत आणि थेट हॉटेलवरूनही टॅक्सीची सेवा मिळू शकते. घोड्यांचे दरपत्रक लावलेलं नाही. पण रपेटीचा आनंद लुटायचा, तर त्यासाठी वेगळी मोजदात करावी लागतेच. पर्यटक हे सगळं हौशीने करतातच, पण महाबळेश्वरचा एक मोठा आनंद हा तिथल्या बाजारपेठेतल्या खरेदीमध्ये असतो. मधुसागरच्या मधापासून वेगवेगळ्या प्रकारचे जॅम, जेली आणि रंगीबेरंगी चपला ही खरेदी लोक करतातच. स्ट्रॉबेरी हे इथलं मुख्य उत्पादन. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून इथे स्ट्रॉबेरी महोत्सव भरवला जातो. स्ट्रॉबेरी उत्पादकांनी ही फार चांगली प्रथा इथे रुजवली आहे. आपल्याकडे सहसा या प्रकारचे प्रयोग कुणी करत नाही. कोकणात कुणी आंबा महोत्सव भरून कोकणातल्या पर्यटनाला चालना देण्याचा प्रयोग आतापर्यंत केलेला नाही. आंबा महोत्सव मुंबईत भांडुप किंवा विलपार्लेमध्ये होतो, ही चांगलीच गोष्ट. तिथल्या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनाबरोबर त्या भूमीच्या इतर वैशिष्ट्यांचीही महती लोकांपर्यंत पोहोचावी, हा उद्देश चांगला आहे. स्ट्रॉबेरी महोत्सवात स्ट्रॉबेरीची शेती लोकांना पाहायला मिळते. साहजिकच पर्यटक इथे आकर्षिले जातात. महाबळेश्वरमध्ये जाऊन स्ट्रॉबेरी सुप्रीमचा स्वाद घेतल्याखेरीज परतला, असा पर्यटक शोधून सापडणार नाही. आजकाल प्रत्येक पर्यटनस्थळीही व्हिडिओ अन् कम्प्युटर गेमही असतातच. पण त्यापेक्षा अशा आकर्षणांनी पर्यटकांना आपलंसं करण्याचा प्रघात फारच स्तुत्य आहे. गुजराथी पर्यटकांनी महाबळेश्वरला चांगलाच लाभ दिला आहे. त्यामुळेच हॉटेल्सच्या पॅकेजमध्ये दमदार भोजनाची सोय केलेली असते. पॅकेजमध्येच चहा, नाष्टा, भोजनाचा समावेश असल्याने

हॉटेलच्या भटारखान्याची चूल कायम पेटती राहते आणि त्यामुळेच हॉटेलांना स्टाफ ठेवणंही परवडू शकतं. बाकी प्रत्येक पॉइन्टवर मक्क्याच्या पॅटिसपासून भेळ, फ्रूट डिशपर्यंत सर्व काही चरायला मिळतंच. महाबळेश्वरची बाजारपेठ आता एन्ट्रीच्या टोलपासून एसटी स्टॅन्डपर्यंत पसरली आहे आणि तिला वाढायला फारसा वाव नाही.

अजूनही महाबळेश्वरी हवा एप्रिल, मेमध्येही थंडच असते आणि पिण्यासाठी निर्मळ पाणी मिळतं. घनदाट जंगल अजूनही दृष्टीस पडतं. आतमध्ये मोटारी, बसेस यांची मुक्त वर्दळ असल्याने त्यातून होणारं प्रदूषण अपरिहार्यपणे स्वीकारावं लागतं. काही वर्षांपूर्वी प्रतापगडावर एक चांगला स्लाइड शो पाहायला मिळाला होता. तशी सोय आता नाही. गाइडचे दर किंवा त्यांची पात्रता याबद्दल कोणतेच निकष इथे नाहीत. या तशा सार्वत्रिकच समस्या. पण त्यांचा अडसर इथे जाणवतोच. बाकी मुख्य बाजारपेठेत रात्री उशिरापर्यंतही फिरण्यास तसा धोका नाही. वेण्णा लेकमधला एखादा नावाडी मध्येच गप्पा मारताना इथे भरलेल्या साहित्य संमेलनाची आठवण सांगतो, तेव्हा ऊर दाटून येतो. पर्यटनाच्या केंद्रांवर अशा संमेलनांची महती कुणा व्यावसायिकाने सांगावी, हे खचितच आनंद देणारं वाटू शकतं. तापोळा तलावातून कोयना अभयारण्य, वासोटा किल्ला या ठिकाणी नौकासफारीद्वारे जात येतं, पण त्या सफरीपेक्षा इतर आनंददायी सफरींकडेच पर्यटकांचा ओढा अधिक असतो. पाचगणी म्हणजे महाराष्ट्रातलं देहरादून वाटावं, इतक्या संख्येने इथे निवासी शाळा आहेत. त्यामुळे इथे थोडेफार उंडारलेले विद्यार्थीजनही दिसू शकतात. महाबळेश्वरमध्ये सीझननुसार पॅकेजचे दर बदलतात. आजकाल एक्स्प्रेसवेमुळे पुणेकरांना महाबळेश्वर खूपच जवळ आलं आहे. त्यामुळेच एरव्ही ऑफ सीझन असलेल्या वेळीही पुणे, सातारा सांगली इथून हौशी मराठीजनांचे पाय महाबळेश्वरकडे वळतात. पर्यटकांच्या गर्दीचा हंगाम असेल तर मात्र इथे प्रत्येक ठिकाणी भरपूर चिडबिडाट असतो आणि मग महाबळेश्वरच्या मूळ सौंदर्यापेक्षा “मकानो पॅटिस अने स्ट्रॉबेरी आइस्क्रीम केटला सरु छे”, यातच धन्यता मानण्याची वेळही आपल्यावर ओढवू शकते. अर्थात महाबळेश्वर हिल स्टेशन अजून तरी हुल्लडबाजांच्या दारुकामासाठी कुप्रसिद्ध झालेलं नाही, हेही नसे थोडके.

**माथेरान**

मुंबई आणि पुण्यापासून समान अंतरावर असल्याचा सर्वात मोठा लाभ झालेलं हिल स्टेशन म्हणजे माथेरान. माथेरानचं आणखी एक एकमेवाद्वितीय असं वैशिष्ट्य म्हणजे या हिल स्टेशनवर यंत्रचलित वाहनांना असलेला मज्जाव. गेली अनेक वर्षं म्हणजे ब्रिटिशांनी हे स्थान विकसित केल्यापासून आजतागायत माथेरानमधली वाहनबंदी टिकून राहिली, याबद्दल इथल्या स्थानिकांना आपण मनःपूर्वक धन्यवाद द्यायला हवेत. हॉटेलमधल्या किराणा मालापासून सोडालेमनच्या बाटल्यांपर्यंत सगळ्या अवजड वस्तूंची वाहतूक माणसांनी खेचून करायची, यासाठी भरपूर श्रमांची किंमत मोजावी लागते. पण इथल्या जनतेने ते कायम टिकवून ठेवलंय. त्यामुळे माथेरानचं नैसर्गिक वैभव अबाधित राहिलं आहे. वाहतुकीची आधुनिक साधनं वापरली जात नसूनही इथे कोणत्याही वस्तूची वानवा नसते, हे विशेष. माथेरानची ही सामर्थ्यस्थळं कदाचित अनेकांच्या दृष्टिआडही होत असतील. महाराष्ट्राच्या पर्यटनाला घराघरात लोकप्रिय करण्यामध्ये अभिनेता आणि भटकंतीकार मिलिंद गुणाजी याचं नाव आवर्जून घ्यावं लागेल. मिलिंद गुणाजीने माथेरानच्या भिजक्या वातावरणात काढलेला एक अप्रतिम फोटो आहे. हाताने ओढायची रिक्षा माथेरानच्या वळणावर उभी आहे आणि तिथलं वातावरण पावसाने धुंद झालेलं आहे, असं त्या छायाचित्रात दिसतं. गेली कित्येक वर्षं हे असं चित्रातलं वातावरण आजही कायम आहे, हे वैशिष्ट्य. वाहनांची वर्दळ नसूनही पावसाळ्यातही माथेरान तितकंच फुललेलं असतं. किंबहुना पावसातली इथली मजा काही औरच असते.

अनुक्रमणिका

वर्षानुवर्षं मराठी आणि गुजराथी पर्यटकांप्रमाणेच बोहरी, मुस्लिम पर्यटकांनी माथेरानच्या पर्यटन व्यवसायाला खूपच हात दिला आहे. त्याचं मुख्य कारण म्हणजे माथेरानची उभारणी करण्यातच बोहरी समाजातील आदमजी पीर भॉय यांचं असलेलं योगदान. आता युनेस्कोच्या हेरिटेज यादीमध्ये विराजमान होणारी माथेरानची इवलीशी टॉयट्रेन उभारण्यासठी पीरभॉय यांनी अपूर्व योगदान दिलं. आजही त्यांचे वंशज माथेरानमध्ये व्यवसाय करतात. नेरळहून माथेरानपर्यंत वळणावळणांचा रस्ता जड पावलांनी काळजीपूर्वक पार करत ही झुकझुक गाडी माथेरान स्थानकात पोहोचते. पूर्वीच्या कोळशाच्या इंजिनाला वळसा मारण्यासाठी माथेरान स्थानकात टर्नटेबल आणि वळसा मारणारा लोहमार्गही आहे.

सूर्योदयासाठी प्रसिद्ध असलेला पॅनोरमा पॉइन्ट, प्रतिध्वनीचा आनंद देणारा एको पॉइन्ट, रमणीय शार्लेट लोक, उघड्याबोडक्या डोंगरावर ठळकपणे दिसणारे एकमेव झाड असलेला वनट्री हिल, रेसकोर्स असे अनेक पॉइन्ट ही माथेरानची खासियत. आजूबाजूला सह्याद्रीची शिखरं, डोंगररांगा असल्याने पेब, पेठ, प्रबळगड, ईर्शाळगड यासारखे गडकिल्ले इथून अधेमधे दृष्टीस पडतात. सभोवती डेरेदार वृक्ष आणि लाल मातीतून ठेचकाळत वाट काढणारे घोडे, खेचरं किंवा अंगमेहनतीची परिसीमा गाठत ढकलली जाणारी हातरिक्षा ही माथेरानची वैशिष्ट्यं. अशा वळणावळणांच्या रस्त्यांवरून या पॉइन्ट्सची मजा लुटणारे असंख्य पर्यटक इथल्या माकडांना मात्र भेदरूनच वावरतात. रेल्वे स्टेशन ते बाजारपेठेच्या चौकापर्यंत घोड्यांची सारखीच वर्दळ असते. चामड्याच्या चपला, पर्स आणि इतर वस्तू, चिक्की आणि जेली, विविधरंगी गवती टोप्या, वेताच्या काठ्या ही खरेदी माथेरानला गेल्यावर हमखास होतेच. माथेरानची हॉटेल्स ही ब्रिटिश पद्धतीच्या व्हिला किंवा रेस्ट हाऊसेससारखी आहेत. इथल्या थंडाव्याचा आनंद लुटत सकाळी हॉटेलच्या प्रांगणात येणारा ब्रेकफास्ट, घोड्यावरची रपेट याचा आनंद अवर्णनीयच, इथल्या हॉटेल्सनीही पॅकेज पद्धतीवरच भर दिला आहे. गुजराथी पद्धतीचं जेवण इथेही अधिक प्रमाणात मिळतं. दस्तुरी या चौकापर्यंत मोटारी आणि आता एसटीची मिनीबसही येऊ लागली आहे. टॅक्सीही येतातच. टॅक्सी स्टॅन्ड इथेच आहे. त्यामुळेच दस्तुरीपासून माथेरान रेल्वे स्टेशनापर्यंत शटल सर्विस सुरू करावी, ज्यायोगे सामानाची नेआण करणं सोप्पं जाईल, अशी स्थानिकांची मागणी आहे. माथेरानचं पर्यावरण टिकवण्यासाठी इथे विकल्या जाणाऱ्या पेट बॉटल्स उत्पादकांनीच पुन्हा गोळा करून न्यायच्या, असा एक अभिनव प्रकल्प काही वर्षांपूर्वी सुरू झाला. आजही बऱ्याच प्रमाणात इथलं पर्यावरण टिकवण्याची काळजी घेतली जाते. असं प्रशस्तिपत्र पर्यावरण अभ्यासकांपैकी काही तज्ज्ञही देतात. वाहनं थेट पोहोचत नसल्याने मंत्री, संत्री, सरकारचे पाहुणे इथे कमी पोहोचतात. त्यामुळेच सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामधामांची अवस्था तशी दुर्लक्षित असते. काही मंत्री किंवा महनीय व्यक्ती माथेरानला अजूनही भेट देतात, तेव्हा ते हेलिपॅड असलेल्या हॉटेलांमध्ये थेट उतरतात. पावसाळ्यासारख्या वेळी माथेरान काही प्रमाणात हुल्लडबाज दारुबाजांचं स्थान बनतं. पण कुटुंबे मोठ्या प्रमाणात येत असल्याने सरसकट तसं होत नाही. रात्री-अपरात्री इथे फिरणं मात्र तितकंसं सुरक्षित नाही. शिवाय बहुतेक जागा तशा दुर्गम असल्याने यापूर्वी काही संशयास्पद प्रकार घडले आहेत. कुठल्याशा पॉइन्टवरून पाय घसरून पत्नीचा मृत्यू ओढवला, पण प्रत्यक्षात पतीनंच तिला ढकलून दिलं होतं, अशी एक गुन्हेगारी घटनाही इथे उघड झाली होती. अर्थात त्यामुळे प्रेक्षणीय स्थळांचं महत्त्व कमी होत नाही. पण इथला वावर सुरक्षितपणे करावा लागतो. दस्तुरी फाट्याजवळच एमटीडीसीचं संकुल आहे. त्यामुळेच पॅनोरमा पॉइन्ट वगळता बाकी बाजारपेठ वगैरे इथून लांब पडते आणि तसं मुख्य माथेरानपासून हे दुरावलेलं वाटतं. शिवाय बाकीच्या हॉटेलांइतकं पॅकेजचं मार्केटिंग एमटीडीसीकडून टूर ऑपरेटरांकडे होत नसावं. तरीही एमटीडीसीलाही मागणी असतेच. माथेरान हे नावाप्रमाणेच आहे आणि त्याचं सौंदर्य टिकवल्यास पर्यटकांची कमतरता निश्चितच नसेल.

अनुक्रमणिका

**कोकण/किनारे**

वळणावळणांचे बाकदार किनारे, त्यावर पसरलेली पांढरी वाळू, माडपोफळीच्या बागा, त्यात फिरवलेलं खळाळतं पाणी, सुमधुर घट्ट रस असलेल्या हापूसच्या आमराया, जांभूळ, चिंचा, करवंदं, आवळे असा खट्टामिठा रानमेवा, मत्स्यप्रेमींसाठी बांगड्यापासून पापलेटपर्यंत आणि सुकटपासून पाकटपर्यंत माशांचे विविध प्रकार, लाला मातीशी लगट करणारा काळाभोर डांबरी रस्ता, त्यावरून गावागावात फिरणारी लाल डब्याची एसटीबस आणि गावात मनःशांती देणारं भव्यदिव्य गणपती मंदिर....हमखास फिट्ट बसेल, असं हे कोकणातल्या कोणत्याही गावाचं वर्णन. या वर्णनापायीच कोकणातल्या लाल छप्परी घरातलं वास्तव हवंहवंसं वाटावं असं. मुंबईकडे कामानिमित्ताने आलेल्या चाकरमान्या कोकणी माणसामुळे कोकणच्या प्रदेशाची वैशिष्ट्यं तशी सर्वदूर परिचित अशीच. मराठी साहित्यातूनही कोकणचं वर्णन नेहमीच वाचलेलं. पण कोकणचा खऱ्या अर्थाने पर्यटन केंद्र म्हणून होऊ लागलेला विकास मात्र तसा अलीकडचाच. स्व. मधु दंडवते यांच्या प्रयत्नांतून साकारलेली कोकण रेल्वे ही पर्यटनविकासाचं मुख्य साधन ठरेल असं वाटलं, तरी प्रत्यक्षात थेट तसं म्हणता येत नाही. कारण कोकण रेल्वेने पर्यटक गोवा किंवा केरळला जातो, किंवा गणपतीसाठी गावाला जाण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. पण कोकणात फिरायला येणारा पर्यटक मात्र रस्तामार्गे येणंच अधिक पसंत करतो. त्यामुळेच कोकणच्या विकासात चांगला रस्ता ही महत्त्वाची गुरुकिल्ली होती. सुदैवाने अलीकडच्या काळात रस्त्यांचा दर्जा बराच सुधारला आणि देशावरचे काही भाग घाटरस्त्यांनी जोडले गेले, तसंच अनेक खाड्यांवर पूल झाल्याने सागरी मार्गाचं स्वप्न प्रत्यक्षात उतरू लागलं. पूर्णगड, भाट्ये इथे आता वळसा मारून जाण्यापेक्षा नव्या पुलावरून पटकन् पोहेचता येतं. मुंबईकडून गोव्याकडे जाणाऱ्या बसगाड्या पहाटेपर्यंत कोकणातल्या गावांमध्ये सोडतात. एसटीच्याही बसगाड्या आहेतच.

कोकण म्हटलं की, रत्नागिरी आणि तळकोकणातलं सिंधुदुर्ग असे दोन जिल्हे पर्यटनासाठी स्वतंत्रपणे विचारात घ्यावे लागतात. दोन्ही ठिकाणच्या समुद्रात फरक नाही. पण पर्यटनाच्या वैशिष्ट्यांमध्ये फरक आहे. सिंधुदुर्गातलं पर्यटन हे मालवणमधील मासे, कोंबडीवडे, सोलकढी या आहाराशिवाय आणि सिंधुदुर्ग किल्ल्याच्या सफरीशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. वेंगुर्ल्याचं दीपगृहसुद्धा फारच लोभसवाणं आहे. इथे एक प्राचीन दीपगृहसुद्धा आहे. वेंगुर्ला रॉक्स हे त्यांच्या अंगभूत स्थापत्यकलेसाठी प्रसिद्ध आहेत. सावंतवाडीची लाकडी खेळणी प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे गेल्या सुमारे दोन दशकांपासून सावंतवाडी ते कोल्हापूर मार्गवरचं आंबोली हे हिलस्टेशनही चांगल्यापैकी उदयास आलं आहे. कोल्हापूरला असलेली जवळीक ही त्याची आणखी एक जमेची बाजू. हिरण्यकेशी नदीचा उगम इथे आहे आणि इथला थंड तुषार उडवणारा धबधबा मनमुराद आनंद देतो. आंबोलीला गेल्या दोन दशकांमध्ये चांगल्यापैकी हॉटेल्स तयार झाली आहेत. स्वतःचं वाहन नेण्याखेरीज आंबोलीला फारसा काही पर्याय नाही. सार्वजनिक वाहतुकीमध्ये आंबोलीचं तसं मार्केटिंग झालेलं नाही. त्यामुळे तो पर्याय कुणी स्वीकारत नाही. इथे आसपास फिरण्यासाठी रिक्षा उपलब्ध असतात.

खुद्द मालवण शहरामध्ये आता वाढीला फारसा वाव राहिलेला नाही. रस्ते तसे चिंचोळे असल्याने पर्यटकांची मोठी बस येऊन उभी राहिल्यास समस्या येते. सिंधुदुर्ग किल्ल्यात गाईड मिळतात. पण त्यांची वन विंडो व्यवस्था नाही. किल्ला तसंच मालवण शहराची स्वच्छता अजून राखली जाण्याची गरज आहे. चांगली प्रसाधनगृह व्यवस्था ही तर समस्या आहेच.

अनुक्रमणिका

सिंधुदुर्गाचं अलीकडे आकारास आलेलं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सारंग कुलकर्णी यांच्या प्रयत्नातून तिथे सुरू झालेलं स्कूबा डायव्हिंग आणि प्रस्तावित सी वर्ल्डचा प्रकल्प. पाण्याखालचं अद्‌भुत जग पर्यटकांनाही दिसावं आणि त्यातून पर्यटनाला पूरक व्यवसायही आकारास यावा. असा मेळ सारंग कुलकर्णी यांनी इथे साधला आहे. परदेशातील अशा उपक्रमांचं आपल्याला अप्रूप वाटतं. तेच इथे आकारास आल्यास पश्चिम किनारपट्टीवरचं सागरी जीवन आपल्याला पाहता येईल.

सिंधुदुर्गाकडून रत्नागिरीकडे येईपर्यंत सिंधुदुर्ग किल्ल्याप्रमाणेच विजयदुर्ग हा जलदुर्ग शिवरायांच्या स्थापत्यकौशल्यासाठी कायम स्मरणात राहील. विजयदुर्ग संवर्धनासाठी स्थानिकांकडून चांगले प्रयत्न सुरू आहेत. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग वगळता याच परिसरातले इतर अनेक दुर्ग मात्र आता दुर्लक्षित तरी आहेत किंवा त्यांची वास्तपुस्त कुणाला नाही. खरं तर, ते सर्वांना सहज जाता येण्यासारख्या अंतरावर आहेत. रामेश्वरच्या मंदिरासमोर शिवरायांनी लावलेला वटवृक्ष आहे. राजापुरात धूतपापेश्वराचं मंदिर, धबधबा आणि गरम पाण्याची कुंडं (उन्हाळे) आहेत. देवगड, जयगडचे किल्ले आहेत, दीपगृहं आहेत. पण इथे पर्यटकांचा फारसा राबता नाही.

रत्नागिरीकडे पाय वळल्यावर मालेश्वरचा धबधबा, परशुराम घाट, दापोली कृषि विद्यापीठ, हर्णे-मुरुड बंदर, अंजनवेल, वेलदूरची खाडी हा सर्व परिसर आहे. गणपतीपुळे, कुणकेश्वर ही अप्रतिम मंदिरं आहेत. मालगुंडला केशवसुतांचं स्मारक आहे. गणेशगुळेचा गणपतीही अप्रतिम आणि अजून व्यावसायिकतेचं लोण न पोहोचलेला आहे. रत्नागिरीजवळचा भाट्येचा समुद्रकिनारा फारच मनोहर आहे, तर हेदवी, वेळणेश्वर यांच सौंदर्यही अप्रतिम आहे. खुद्द रत्नागिरी हे आता शहर झालं असून चिपळूण ते रत्नागिरी पट्टा आता औद्योगिक क्षेत्र बनला आहे. त्यामुळे तिथलं वातावरण शहरीच अधिक झालं आहे. या परिसरातील अशी अनेक ठिकाणं आजही सांगता येतील.

मुद्दा हा आहे, की इथलं पर्यटन गेल्या काही वर्षांत कसं बदललं? साधारण २० वर्षांपूर्वी गणपतीपुळे येथे एक कुटूंब पर्यटनासाठी गेलं होतं. मुंबईहून कोल्हापूर आणि कोल्हापूरहून गणपतीपुळे असा त्यांचा प्रवास झाला होता. त्यामुळे गणपतीदर्शनानंतर दुपारचं जेवून लगेचच कोल्हापूरकडे पुन्हा कूच करायचं होतं. तेवढ्या वेळामध्ये जवळच्याच एका कुटुंबाकडे त्यांनी जेवणाची ऑर्डर दिली. जेवण तर कोकणी स्वादानुसार रुचकरच झालं होतं. पण समोर कुटुंबातली मुलं कॅरम खेळत होती आणि पाणी देण्यापासूनही त्यांच्या चेहऱ्यावर हे कशाला आमच्या खेळात व्यत्यय म्हणून आले आहेत, असा भाव होता. साहजिकच पानं वाढतानाही त्यांच्या कृती अशाच मंदावलेल्या होत्या. गेल्या दहाएक वर्षांत हा आळस झटकायला मदत झाली आहे. कुटुंबातल्या मुलांना आपल्या पर्यटन व्यवसायाच्या हौसेपोटी कामाला जुंपावं की नाही, हा वेगळा मुद्दा आहे. पण तुम्ही अतिथी देवो भव म्हटलंत, तर त्या अतिथीचं स्वागत त्याच अपुलकीने व्हायवा हवं. कोकणात अधेमधे असे अनुभव येतात, असं वारंवार सांगितलं जायचं. हे अर्थातच सांगोवांगी नव्हतं. पर्यटनाकडे व्यवसाय म्हणून बघायचं, तर आपली सेवाभावी वृत्ती हा फार कळीचा मुद्दा ठरतो. कोकणी माणूस सेवाभावी नक्कीच आहे, पण शहाळ्याचं काळीज असलेल्या माणसांचा केवळ टणकपणाच समोरच्यापर्यंत पोहोचला, तर एखाददोन दिवस आलेले पर्यटक पुन्हा येऊ धजतील का, हा प्रश्न होता. गेल्या दहाएक वर्षांत परिस्थिती बदलली आहे, हेही नमूद करायलाच हवं. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने अर्थात एमटीडीसीने सुरू केलेल्या न्याहरी व निवासयोजनेला सुरुवातीस तितकासा प्रतिसाद मिळाला नाही. कारण त्या प्रकारची पर्यटनसंस्कृती आपल्या पर्यटकांमध्येही रुजलेली नाही. मात्र त्यातून अनेक घरांनी पर्यटकांची गरज भागविण्यास मात्र सुरुवात केली.

अनुक्रमणिका

मुंबई, पुण्यातील अनेक छोटे व्यावसायिक कोकण टूरबद्दल प्रसिद्ध होते. या छोट्या उद्योजकांनी कॉलेजच्या ग्रुपपासून कुटुंबाच्या समूहांपर्यंत अनेकांना कोकणच्या प्रेक्षणीय स्थळांकडे वळवलं. त्यात गुहागरचं व्याडेश्वर असायचं, हेदवीचा गणपती, पावस, गणपतीपुळे, परशुराम, मालवण, दापोली, वेळणेश्वर, कुणकेश्वर यासारख्या ठिकाणचं पर्यटन हे अशा व्यावसायिकांमुळे सुरू राहिलं. नाहीतर या ठिकाणांचं मार्केटिंग करणारी कुठलीही यंत्रणा नव्हती. ही झाली वीस-पंचवीस वर्षांपूर्वीची गोष्ट....त्यानंतर गेल्या सातआठ वर्षांत कोकणच्या विकासासाठी काही व्यावसायिक समूह कार्यरत झाले. काहींनी बाइक टूरपासून हाऊसबोट आणि डॉल्फिनदर्शनपर्यंत वेगवेगळी आकर्षणं कोकणच्या टूरमध्ये शोधून पर्यटकांना आपलंसं करण्याचा प्रयत्न केला. आर्यावर्तासारख्या काही ठिकाणांमध्ये बंगल्यामध्ये निवास करून स्वतः खाद्यपेयांची व्यवस्था करण्याची नवी पद्धतही आकारास आली. निसर्ग अभ्यासक भाऊ काटदरे यांनी 'कासव वाचवा' मोहिमेअंतर्गत वेगळ्या प्रकारे इकोटूरिझम रुजविण्याचा उपक्रम केला. त्यांनी वेळासमध्ये कासम महोत्सव सुरू केला. त्यात निसर्गवेड्या पर्यटकांच्या साक्षीने कासवांच्या पिल्लांना अथांग समुद्रात मार्गस्थ करण्याचा उपक्रम होता. त्याबरोबर वेळाससभोवतीच्या कोकणी घरांमध्ये आहार आणि निवास करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. हॉटेल्सची संख्या कोकणात पूर्वी फारच कमी होती. गेल्या काही वर्षांत स्टार हॉटेल्सचा उदयही इथे झाला आणि त्याप्रमाणे वाहतुकीची साधनंही चांगली होऊ लागली. रायगड जिल्ह्यातल्या हरिहरेश्वरचं दर्शन घेऊन पुढे फेरीबोटीने रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगडच्या बाणकोट किल्ल्यात उतरायचं आणि पुढे कोकणात जायचं, हा मार्ग पूर्वीही होता. पण आता अशा प्रकारे अनेक ठिकाणी खाड्या ओलांडण्याची आणि काही ठिकाणी आपल्या वाहनासह खाडी ओलांडण्याची सोय झाली. पूर्वी कोकणात जायचं, तर एसटीच्या लाल डब्याव्यतिरिक्त कोणतंही साधन नव्हतं. १९८० नंतरच्या काळात तुरळक प्रमाणात रिक्षा दिसू लागल्या, पुणे, वाई, सातारा, सांगलीइतक्या जीपगाड्या किंवा अन्य काळ्यापिवळ्या टॅक्सीगाड्या कोकणात फारश्या नव्हत्या. रिक्षा आल्यानंतर ती एक सोय झाली आणि आता तर अनेक प्रकारच्या मोटारी, गाड्या कोकणातच तिथल्या स्थानिक व्यावसायिकांकडूनही भाड्यावर उपलब्ध होतात. कोकणातल्या रस्त्यांची स्थिती गेल्या काही वर्षांत बरीच सुधारली. त्यातही अजून बरंच काही करणं बाकी आहेच. पण रस्ते सुधारले, तर पर्यटनाला हातभार कसा लागू शकतो, हे यावरून दिसून आलं. सध्या काही समूहांकडून वर उल्लेख केल्याप्रमाणे काही नवीन संकल्पना पर्यटनवृद्धीसाठी वापरल्या जातात. पण त्याला पूरक आधारभूत पाचएक हजारामध्ये अशी यॉट एका ट्रिपसाठी भाड्यावर मिळू शकते. ती अवघ्या पंधरा मिनिटांत तुम्हाला मुंबईतून रायगड जिल्ह्यात नेऊन सोडते. हा सौदा अनेकांना परवडतो. त्यामुळे इथे अनेक धनिक लोक विश्रांतीसाठी येतात. काही पंचतारांकित हॉटेल्सचा उदयही त्यामुळेच इथे झाला आहे. एक मात्र नक्की, की जलवाहतुकीने या परिसराचा आयामच पुरता पालटून टाकला आहे, हे निश्चित. पूर्वी उरणमध्ये जाण्यासाठी भाऊचा धक्का ते मोरा अशी बारमाही लॉँचसेवा होती, तर अलिबागला जाण्यासाठी भाऊचा धक्का ते रेवस ही पावसाळ्याव्यतिरिक्तची सेवा होती. आताशा रेवसला जाणाऱ्यांची गर्दी कमी झाली आहे. १९९० च्या दशकानंतर कॅटमरान सेवा प्रथम गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा या मार्गावर सुरू झाली. तेव्हा हवाईप्रवासाप्रमाणे कॅटमरानमध्ये शीतपेयं इत्यादी सुविधा दिल्या जायच्या. आता वातानुकूलित प्रवासाचं भाडं देऊनही डेकवर उभ्याने ऊन खात प्रवास करण्याची वेळ आली, तरी लोक ते स्वीकारतात. शिवाय थोडी स्वस्तातली लॉँचसेवाही सुरू झाली आहेच. या सर्व वाहतूक सुविधा वेळेच्या गणितानुसारच चालत असल्याने त्यांना यश मिळालं आहे. शिवाय मांडवा बंदरावर उतरल्यावर अलिबागपर्यंत त्यांचीच बससेवा असते आणि त्यांचं भाडं जलप्रवासातच समाविष्ट असतं. म्हणजे लॉँच अथवा कॅटमरानमधून उतरल्यावर वाहनासाठी धडपड करावी लागत नाही. हे एवढं विस्ताराने लिहिण्याचं कारण एवढंच की, महाराष्ट्रातल्या अनेक पर्यटन केंद्रांवर सुस्थितीतल्या आणि शिस्तीतल्या वाहतूक सुविधांची वानवा आहे. ती दूर केली, तर

अनुक्रमणिका

कित्येक ठिकाणचं पर्यटन बहरू शकतं. मुंबईच्या जवळ असल्याने साहजिकच रायगड जिल्ह्यातल्या काही स्थळांना बकालपणा आला आहे. खुद्द अलिबाग शहरातील काही ठिकाणांचं तसंच झालं आहे. चायनीज पदार्थांच्या गाड्या दिसतील, भिकारी दिसतील, फेरीवाले दिसतील आणि बिअरबार दिसतील.... त्यात अलिबागची पूर्वीची मिसळ मात्र हरवलेली असेल. अशा बकालपणाची किंमत पर्यटनाला मोजावी लागतेच.

वर आपण न्याहरी आणि निवाससारख्या योजनेबद्दलही बोललो. कोकण आणि रायगड या दोन्ही जिल्ह्यांमध्ये आता अनेक ठिकाणी ही योजना आकारास आली आहे. प्रश्न एवढाच आहे, की या गावांमधल्या जुन्या कौलारू घरांमध्ये पर्यटकांना पाहुणे म्हणून बोलवायचंय की दारू पार्ट्यांसाठी, हा एक वादग्रस्त मुद्दा होऊ शकतो. गणपतीपुळ्यात पर्यटकांसाठी वाढपी म्हणून काम करण्यास नाखूष असलेली मुलं पाहून कुणाला धक्का बसला असेल, पण आता पर्यटकांना बिअरची बाटली आणून देणारी अशाच घरातली मुलं पाहिल्यास ती मुलं बरी होती की काय, असं कुणालाही वाटू शकेल. बिअर शॉपींमुळे हा धोका आणखी गावांपर्यंत पोहोचला आहे. परदेशात मद्याची सोय ही गरज असू शकते, पण आपल्याकडे गावांमध्ये किंवा घराघरांमध्ये ही सोय उपलब्ध झाल्यास त्यातून गावातल्या घराचं घरगुती स्वरूपच नष्ट होण्याचा धोका असतो. त्यातून स्थानिकांना क्षणिक रोजगार मिळू शकतो, पण पिढी मात्र बरबादीच्या मार्गावर जाण्याचाही धोका असतो. यातला समतोल कसा साधायचा, ही एक मोठी समस्या आपल्यापुढे सध्या उभी आहे. रायगड जिल्ह्यामध्ये किनाऱ्यांप्रमाणेच हरिहरेश्वरचं मंदिर, साळावचं गणपती मंदिर, कनकेश्वराचं शंकराचं मंदिर, पाली, महड तसंच दिवेआगराचा गणपती ही ठिकाणं धार्मिक पर्यटनासाठी प्रसिद्ध झाली आहेत. तर फणसाड, कर्नाळा यांसारखी पक्षीअभयारण्यंही इथे आहेत.

**ठाणे जिल्हा**

रायगडप्रमाणेच मुंबईला खेटून उभ्या असलेल्या ठाणे जिल्ह्यानेही अशाच प्रकारच्या समस्येचा कायम सामना केला आहे. इथे तर स्थानिक ग्रामस्थांपेक्षा आदिवासी जनता मोठ्या प्रमाणात शहरी वातावरणात फेकली गेली आहे. आदिवासी पट्टा असल्याने अनेक ठिकाणी त्यांच्यासाठी सरकारी योजना आहेत आणि त्यांच्याच माध्यमातून त्यांचं शोषणही सुरू आहे. पर्यटनविकासामध्ये आदिवासी जनतेला त्यांचा वाटा मिळवून देऊन परिसर सुस्थितीत ठेवण्याचं आव्हान कुणी फारसं उचललेलं दिसत नाही. साहजिकच कित्येक स्थळं दुर्लक्षित राहिली आहेत. जव्हारसारखं ठिकाण पर्यटनाला केवढातरी हातभार लावू शकलं असतं. गुजराथेत डांग जिल्ह्यामध्ये म्हणजे महाराष्ट्राच्या सीमेला खेटूनच असलेलं सापुतारा आणि जव्हारमध्ये फार फरक दिसणार नाही. पण जव्हारचा पर्यटनाच्या दृष्टीने विकासच होऊ शकलेला नाही. जव्हारजवळचं विक्रमगड, संजान या परिसराचा विकास करण्यात दिवेकरांच्या नेचर ट्रेल्सने चांगला हातभार लावला आहे.

मुरबाडही तसंच काहीसं दुर्लक्षित....अलीकडे मुरबाड परिसरात बंगले किंवा प्लॉट विकण्याच्या विविध योजना आकारास आल्या आहेत. मध्यमवर्गीयांना सेकन्ड होम किंवा वीकेन्ड होमची स्वप्नपूर्ती इथे शक्य झाली आहे. अशाच काही संकुलांशेजारी काही रिसॉर्ट्स उभी राहिली आहेत. रायगड जिल्हा तसंच ठाणे जिल्हा हा अशा रिसॉर्टसाठी प्रसिद्ध झाला आहे. लोक तिथे एका दिवसाचं दोन किंवा तीन जेवणं, चहा, नाष्टा या प्रकारचं पॅकेज घेऊन जातात. धकाधकीच्या जीवनापासून पळवाट शोधण्यासाठी इथल्या पाऊलवाटा उपयुक्त ठरतात. ही अशी रिसॉर्ट्स लोकांचा राबता असेपर्यंत चांगली चालतात. काही रिसॉर्ट्सना त्या जागेतल्या सोयीसुविधांची जोड मिळत नसल्याने त्यांना पूर्णस्वरूपी यश मिळू शकत नाही.

आम्रपर्यटन हा असाच एक प्रकार अजूनही तितकासा प्रभावीपणे राबवला गेलेला नाही. महाराष्ट्राबाहेरच्या व्यक्तींसाठी कोकणचं वैभव आपण या सुखसोयींसह पोहोचवू शकलेलो नाही. कोकण महाराष्ट्रात लोकप्रिय आहे, पण त्याची महती अजूनही महाराष्ट्राबाहेर पर्यटकांपर्यंत पोहोचलेली नाही. महाराष्ट्राबाहेरच्या व्यक्तींनी, उद्योजकांनी किंवा राजकारण्यांनी कोकणात येऊन शे-चारशे एकर जागा घेणं, तिथे रिसॉर्ट बांधणं किंवा आमराई उभी करणं म्हणजे कोकणातल्या पर्यटनाचा विस्तार अजिबात नाही. दुर्दैवाने आज तसं घडत आहे. न्याहारी आणि निवाससारख्या योजनांमध्ये आपल्या कौलारू घराचं स्लॅबच्या घरामध्ये रूपांतर होतं, चार खोल्या वाढतात आणि मग त्याचा आपल्याला लाभ होतो, पर्यटन वाढतं, की आणखी काही घडतं, याकडे आपण रायगड जिल्ह्यातील पर्यटनाचा विचार केल्यानंतर येणारच आहोत.

**रायगड जिल्हा**

कोकणचं वैभव तरीही मुंबईपासून जवळ....आणि त्यामुळेच मुंबईच्या सुखसोयी किंवा कटकटी-त्रास या कायम चिकटलेल्या....असं रायगड जिल्ह्याचं पर्यटनाच्या दृष्टीने तयार झालेलं अंग. हरिहरेश्वर, दिवेआगर ही गावं रायगड जिल्ह्यातलीच, पण त्यांचं वैभव हे बहुतांशी कोकणातल्या रत्नागिरीच्या जवळ जाणारं. तरीही मूळ तोंडवळा मात्र रायगड जिल्ह्याचाच. रायगड जिल्ह्यातले समुद्रकिनारे दक्षिण दिशेस बागमांडला, हरिहरेश्वरपासून सुरू होतात. हरिहरेश्वर, दिवे-आगर, मुरुड-जंजिरा, काशिद, आक्षी, नागाव, अलिबाग, किहीम, सासवणे, मांडवा हे समुद्रकिनारे पर्यटकांसाठी वर्षानुवर्षं आकर्षण राहिलं. पूर्वी इथलं पर्यटन मात्र आपल्या गावातल्या घराकडे येणारे मुंबईकर मालक आणि त्यांच्याकडे येणारे पाहुणे यांच्याभोवतीच अधिक फिरायचं. अलीकडच्या काळात मात्र या सर्व ठिकाणांकडे मुंबई-पुण्यापासून एखाद-दोन दिवस हुंदडायला जाऊन येण्याचं डेस्टिनेशन म्हणून लोक पाहू लागले. मांडवा हे रायगड जिल्ह्यातलं सर्वात उत्तरेचं आणि मुंबईपासून जवळचं ठिकाण म्हणायला हरकत नाही. तसं उरणही जवळचंच. पण ते पर्यटनाच्या नकाशावर तितकंसं येऊ शकलेलं नाही. रायगड जिल्ह्यातले समुद्रकिनारे पर्यटकांसाठी खुले असले, तरी तिथे नियोजनबद्ध पर्यटन कधीच नव्हतं. त्यामुळेच नागाव किंवा मांडव्याच्या किनाऱ्यावर पॅरासेलिंग तसंच अन्य समुद्री साहसी नौकानयनाचे प्रकार सुरू झाले, तरी त्यावर नेमकं नियंत्रण कुणाचं, त्याचे दर नेमके किती, त्यांनी सुरक्षेची काळजी कितपत घेतली आहे, या सर्व गोष्टी पर्यटकांपर्यंत पोहोचत नाहीत. या साहसी प्रकारांची धुंदी भन्नाट असते. त्यातला आनंद फारच बेभान करणारा....शिवाय त्यामुळे पर्यावरणाची होणारी हानी तुलनेने कमी असते. पण त्यात जोखीमही मोठी असते. म्हणूनच अनेकदा ही साधनं आकर्षणं ठरली, तरी त्यातील जोखमीकडे डोळेझाक करून चालत नाही. परदेशात अशा साहसी प्रकारांवर कडेकोट निर्बंध असतात. कुणी म्हणेल, त्यासाठी किंमतही तितकीच मोजवी लागते. पण ही जिवाची किंमत असते. आपणही आपल्या पर्यटकांचा जीव किमतीच मानायला हवा. शिवाय या सर्व गोष्टींना अव्वाच्या सव्वा पैसे पडतही नाहीत. कदाचित या गोष्टी चालवणाऱ्याच्या नफ्यात थोडी घट होऊ शकते, पण त्याचा तोटा होणार नाही. शहाळं, ताडगोळे, बोरं, चिंचा, जांभळं, करवंदं, यासारखा रानमेवा आणि गरमागरम बटाटेवडे हे या परिसरातलं खास आकर्षण....त्यात सहसा कुणी गंडवागंडवी करत नाही, ही जमेची बाजू असून तरी या वस्तूंच्या विक्रीच्या जागा, त्यांचे दर यांच्या बाबतीत निश्चित अशी योजना आकारास आलेली नाही. भविष्यात त्यांची गरज नक्कीच भासेल.

अनुक्रमणिका

एकूणच रायगड जिल्ह्यातील पर्यटनवृद्धीसाठी पूरक अशा वाहतूक सुविधा किंवा अन्य साधनांचा विकास झालेला नाहीच. लोक रिक्षा किंवा स्वतःच्या वाहनाने फिरतात. एसटीची सेवा असूनही एसटीने पर्यटनस्थळांसाठी मिनीबस किंवा तत्सम सुविधा पुरवलेल्या नाहीत, कनकेश्वर, कोलइचं दीपगृह, चौलचं देऊळ, थळची टेकडी, सासवण्याचा चित्रकार करमरकरांचा बंगला आणि त्यातील जिवंत शिल्पं अशा अनेक छोट्यामोठ्या ठिकाणांचं दर्शन लोकांना चांगल्या प्रकारे व्हावं, त्याची माहिती लोकांना व्हावी, यासाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. अलिबागच्या किल्ल्याचं वैभव लोकांना दिसतं आणि केवळ ओहोटीच्या वेळीच किल्ल्यापर्यंत पोहोचता येतं, यातून निसर्ग आणि मानवी कौशल्याचा सुरेख मेळ दिसून येतो. पण तेवढंच. त्याची महती लोकांपर्यंत पोहोचत नाही. खांदेरी म्हणजेच सरखेल कान्होजी आंग्रे दीपगृह असलेला जलदुर्ग तर अप्रतिम आहे. तो मुंबई पोर्ट ट्रस्टच्या अखत्यारीत येतो. पण या दीपगृहाला भेट देण्यासाठी नक्की कसं जायचं, कुणाची परवानगी घ्यायची, हे लोकांना ज्ञातच नसतं. पावसाळा सरला, की गेटवे ऑफ इंडियावरून मांडव्यापर्यंत लॉंच किंवा कॅटमरानने यायचं आणि जवळच्या कुठल्याशा हॉटेलात हादडून मुंबई, पुण्याकडे परतायचं, इतकचं इथलं पर्यटन सध्या सीमित राहिलं आहे. या भागात धनिकांचे बंगले मोठ्या प्रमाणात आहेत. त्यात आलिशान मोटारींमधून बडेबडे पाहुणे वीकेन्डसाठी येतात. सचिन तेंडुलकर, रवी शास्त्री, रतन टाटा, शरद पवार, विजय मल्ल्या, आलिशा चिनॉय यांच्यापासून विविध क्षेत्रांतील मंडळी मांडवा बंदरात खाजगी यॉटमधून उतरताना दिसतात. खुशामतखोरीने एन्ट्री मिळवता येऊ शकते. खरं तर शंकरासारख्या देवालयाचं अस्तित्व जिथे आहे, तिथे दुधाचा अभिषेक होणार, त्यातून पिंडी आणि सभोवतीच्या भागास ओशटपणा येणार हे सगळं ओघाने आलंच. मारुती म्हटला की लोक त्यावर तेल घालणारच. हे सगळं जर असणारच आहे, तर त्यांच्या वापरासाठी योग्य ती सुविधाही निर्माण करता येऊ शकते. पण तसं कुठे केलेलं दिसत नाही. स्वच्छता हा अत्यंत कळीचा मुद्दा इथे फारच गौण मानला जातो. प्रगत तंत्रज्ञान येऊनही भक्तांच्या रांगेला पर्याय म्हणून टोकन सुविधेसारख्या नव्या तंत्राचा वापर अभावानेच केलेला आढळतो. प्रसाद ठेवणं, अभिषेक सांगणं, चपला ठेवणं, पाणी पिणं यासारख्या सुविधांना कित्येक देवळांमध्ये योग्य स्थानच देण्यात आलेलं नसतं. ज्या टपरीवरून आपण पूजेचं ताट घेणार, त्याच्याकडे चपला-बूट ठेवणार, ही परस्पर लाभाची अत्यंत सोयीची शिस्त आपण अंगी बाणवली आहे. पण दिल्लीच्या बिर्ला मंदिरात चपला काढून ठेवण्यासाठी स्वतंत्र लॉकरची व्यवस्था होऊ शकते, तर आपल्याकडे का होऊ नये? कित्येक देवळांबाहेर भिकाऱ्यांच्या रांगा लागलेल्या असतात. भिकारी तिथेच रस्त्यावर खाणं-पिणं करतात. त्यांना पैसे देण्यापेक्षा संस्थात्मक रूपात देवळाला देणगी देण्याची पद्धत अजून का कुणाच्या अंगवळणी पडत नाही, हा प्रश्नच आहे. देवाधर्माचं ठिकाण म्हणजे लुटालुटीला निमंत्रण असाच जणू प्रत्येकाचा समज झालेला असतो. त्यामुळेच नाशिकमध्ये त्र्यंबकेश्वर, पंचवटीला जायचं तर, कसारा रेल्वे स्टेशनपासूनच टॅक्सीवाल्यांची लुटालूट किंवा अरेरावीला सुरुवात होते. हे अनुभव पुढपर्यंत येत राहतात. लुटालूट आणि अस्वच्छता हा सार्वत्रिक अनुभव सर्वच धार्मिक तीर्थक्षेत्रांशी थोड्याफार फरकाने येतो. महालक्ष्मी, गणपतीपुळे, हरिहरेश्वर, अष्टविनायकातील गणपती यासारख्या अनेक देवळांमध्ये आणि आवारातही स्वच्छता आजकाल राखली जाते. पण तो सरसकट अनुभव असत नाही. शेगाव हे त्यादृष्टीने चांगलं उदाहरण ठरावं. गजानन महाराजांच्या या स्थानाला भाविकांच्या दृष्टीने मोठं महत्त्व आहे. विशेष म्हणजे संस्थाननेही केवळ राजयोगी किंवा श्रीमंत योगी भाविकांनाच उच्च स्थान न देता सरसकट सर्वांसाठी अनेक सोयी केल्याचं दिसतं. पाण्याचं दुर्भिक्ष असलेला प्रदेश असूनही जवळच आनंद सागर या पर्यटन करमणूक केंद्रामध्ये मुबलक पाणी सापडलेलं दिसतं आणि त्याचा तिथलं सौंदर्य वाढवण्यात मुक्तहस्ते वापर झालेलाही दिसतो. हैदराबादच्या रामोजी राव फिल्मसिटीचं प्रतिबिंब इथल्या सोयीसुविधांमध्ये दिसतं. त्यामुळेच भाविकांसाठी शेगाव रेल्वे स्टेशन, गजानन महाराजांचं समाधीस्थान

अनुक्रमणिका

आणि आनंद सागर अशी विनामूल्य बससेवा रात्रीपर्यंत सुरू असते. संस्थानाची निवासयोजना आहे. संस्थानने मध्यप्रदेशातही भाविकांसाठी निवासयोजना सुरू केली आहे.

साईबाबांच्या शिर्डीचा तर महाराष्ट्रात अव्वल क्रमांक लागला आहे. शेजारच्या आंध्र प्रदेशातील भाविकांनी शिर्डीला महत्त्वाचं स्थान दिलं आहे. त्यामुळेच आंध्र मिल म्हणजेच आंध्र पद्धतीचा आहारही इथे सहजी उपलब्ध करून दिला जातो. मुंबई, पुण्याहून शिर्डीला संध्याकाळी, रात्री अनेक खाजगी आराम बसगाड्या निघतात. आता तर रेल्वेही सुरू झाली आहे आणि विमानतळही आकारास येत आहे. या सुविधांमुळे शिर्डीच्या साईबाबांच्या चरणी झटपट नतमस्तक होण्याचं भाग्यही अनेकांना मिळतंय. शिर्डीला तसा सर्वांचाच राजाश्रय मिळाला आहे. साहजिकच इथे भक्तांचा, देणग्यांचा, सुविधांचा सगळ्याचाच ओघ वाढता आहे. मोठमोठे दानशूर देणगीदार संस्थानला लाभतात. त्यातून अनेक कामं संस्थानने हाती घेतली असून शिर्डीला जाणाऱ्यांसाठी दादर परिसरात विश्राम केंद्र उभारण्याची योजना पर्यटनाच्या दृष्टीने स्तुत्य म्हणायला हवी. बाकी योजनांबद्दल इथे विस्ताराने लिहिणं अस्थायी ठरेल.

आषाढी-कार्तिकीला वारकरी संप्रदायाच्या भक्तीचा महापूर ज्या चंद्रभागेच्या तीरी अवतरतो, त्या पंढरपूरच्या वारीने आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही कौतुकाचं स्थान मिळवलंय. अनेक छायाचित्रकारांना वारी हे भक्तीचे रंग टिपण्याचं महत्त्वाचं स्थान सापडलंय. त्यामुळे शहरातूनही अनेक जण एका वेगळ्या धार्मिकपेक्षाही आध्यात्मिक पर्यटनासाठी वारीमध्ये सहभागी होत असतात. हौशी भक्तांचा असा वाढता पूर पाहून मुंबई, ठाणे, पुणे, सोलापूर इथून अनेक समूहांनी नाममात्र दरांमध्ये कंडक्टेड टूर्स काढण्यासही सुरुवात केली आहे. वयोवृद्धांची त्यात खूपच चांगली सोय होते आणि काळजीही घेतली जाते.

कोल्हापूरच्या महालक्ष्मीलाही भक्तपर्यटकांची संख्या मोठी आहे. इथे महाराष्ट्राप्रमाणेच कर्नाटकातील पर्यटकांचं प्रमाणही मोठं आहे. रेल्वे स्टेशन अगदी जवळ असल्याचा पर्यटनाच्या दृष्टीने लाभ मिळतो. शिवाय मुंबई, पुण्यावरून एका रात्रीच्या प्रवासात कोल्हापूर गाठता येतं. तिकडे सोलापूर, बेळगाव, गोवा, कोकण, सांगली, मिरज, वाई, सातारा असे सगळेच मार्ग जोडले गेल्याने कोल्हापूरला विविध ठिकाणच्या भक्तांचा राबता मोठा आहे. शिवाय ते त्यांना सोयीचंही आहे. कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरासभोवती विविध वस्तुंची मोठी बाजारपेठ आहे. कोल्हापुरी चपला, बेळगावचा कुंदा, कोल्हापुरी साज व अन्य दागदागिने, साड्या आणि विविधरंगी लाकडी खेळणी यांची मोठी बाजारपेठ आहे. ऊसाचा प्रदेश असल्याने शोधल्यास चांगली काकवीही इथे मिळते. कोल्हापूर हे महालक्ष्मी मंदिराप्रमाणेच अन्य संलग्न पर्यटनाचं एक सर्किट आहे. त्यात ज्योतिबाचा डोंगर, रंकाळा तलाव, प्लॉट्स विकण्याच्या हेतूने सुरू करण्यात आलेली असतात. तो हेतू साध्य झाला की, रिसॉर्टकडे लक्ष दिलं जात नाही. साहजिकच त्यांची देखभाल नीट होत नाही. अन्नपदार्थांचा स्वाद निघून जातो किंवा अशी ठिकाणं कुटुंबांना जाण्यायोग्य राहत नाहीत. या सगळ्या गोष्टींचे लाभ आणि तोटे दोन्ही असतात. ऑफिसचा ग्रुप, बॅचलर्स पार्टी, पावसाळ्यातील मद्यधुंद सहली यांच्यासाठी ही रिसॉर्ट्स म्हणजे हक्काची ठिकाणं ठरतात. कदाचित त्यामुळे या सर्व वर्गातले हौशी पर्यटक रस्त्यांवर इतस्ततः फिरत नाहीत आणि इतरांना त्रास देत नाहीत. पण अशा रिसॉर्ट्सचे मग तोटेही असतातच.

ठाणे जिल्ह्याला खेटूनच उभं असलेलं आणखी एक रमणीय ठिकाण म्हणजे माळशेज घाट. साधारण २५ वर्षांपूर्वी माळशेज घाटाचं वैभव अवर्णनीय होतं. तेच वैभव आजही टिकून आहे. तस्साच ढगांचा पुंजका आजही इथे अवतरतो आणि आपल्या डोळ्यापुढे पांढरीशुभ्र चादर उभी करतो. पण इथलं

अनुक्रमणिका

पर्यटन आता अजिबातच सुरक्षित राहिलेलं नाही. एखाद्या रस्त्याच्या कडेच्या धबधब्यामध्ये मनमुराद भिजायला थांबलात, तर तुमच्या पायाला मद्याच्या बाटलीच्या काचा टोचतील अशी भीती असते. माळशेज घाटाच्या पठारावर एमटीडीसीने एक सुंदर जागा शोधली. हे रिसॉर्ट म्हणजे पूर्वी कित्येक पर्यटकांसाठी पर्वणी ठरायचं. गेल्या काही वर्षांत अख्खा घाटच मद्यधुंद पर्यटकांनी बदनाम केला, तर या जागेचं माहात्म्य कसं टिकणार म्हणा.

ठाणे जिल्ह्यात महाराष्ट्राच्या थेट उत्तर टोकाला पालघर, डहाणू, बोर्डीचे किनारे हेसुद्धा पर्यटकांचं वर्षानुवर्षं आकर्षण ठरत आलेत. इथल्या चिकूच्या बागाही खासच. ठाणे जिल्ह्याबद्दल बोलायचं तर टिटवाळ्याचं गणपती मंदिर आणि अंबरनाथचं शिवमंदिर ही ठिकाणंही भक्तांचा कायम राबता असलेली आहेत. तिथेही आता बऱ्यापैकी सुधारणा झाल्या आहेत.

**धार्मिक पर्यटन....**

आमच्या नात्यातील एक आजी फार पूर्वीच आम्हाला सांगायच्या, की त्यांनी विमानप्रवास केला आहे. तीसएक वर्षांपूर्वी विमानप्रवास मध्यमवर्गीयांच्या आवाक्यात आला नव्हता. पण या आजींनी नेपाळच्या पशुपतीनाथाचं दर्शन घेण्यासाठी विमानप्रवास केला होता. तात्पर्य काय, तर तीर्थस्थळांना भेट देण्याची ओढ आपल्याकडे पूर्वापारपासूनची.... त्यामुळेच अशा प्रवाशांसाठी भौगोलिक मर्यादा आणि वाहतुकसाधनांचा अडसर काधीच नव्हता. साहजिकच महाराष्ट्रातल्या धार्मिक पर्यटनास महाराष्ट्रातल्याच भाविकांना खूप मोठा आशीर्वाद दिला, यात शंकाच नाही. पण अलीकडच्या काळात भक्तीचा महापूर सर्वत्रच आला आहे. त्यातच महाराष्ट्रातली कित्येक धार्मिक स्थळं राज्याबाहेरच्या पर्यटकांच्या आशीर्वादानेही न्हाऊन निघाली. शिर्डी हे तसंच एक ठिकाण. अलीकडचीच आकडेवारी पाहिली, तर शिर्डी हे राज्याच्या पर्यटन नकाशावरचं सर्वात पसंतीचं ठिकाण ठरलंय. शिर्डीमध्ये महाराष्ट्राइतकंच आंध्र प्रदेशच्या पर्यटकांचंही मोठं स्थान आहे.

तीर्थयात्रेला जाण्याची प्रथा तशी बरीच जुनी, त्यालाच अनुसरून महाराष्ट्रात अनेक तीर्थस्थळांचा विकास होत गेला. बारापैकी पाच ज्योतिर्लिंग महाराष्ट्रातीलच. शिवाय शिर्डीचे साईबाबा, पंढरपूरचा विठोबा, कोल्हापूरची अंबाबाई, नाशिकच्या वणीची सप्तश्रृंगी, यवतमाळच्या माहूरगडची रेणुकादेवी, देहू-आळंदी, नाशिकचं त्र्यंबकेश्वर आणि पंचवटी, वाईचा ढोल्या गणपती, अंबोजोगाईची योगेश्वरी, मराठवाड्यातलंच परळी वैजनाथ आणि औंढ्या नागनाथ, कोल्हापूरचा ज्योतिबा, तुळजापूरची भवानी अशी अनेक स्थळं त्यांच्या त्यांच्या धार्मिक पंथांनुसार, भक्तगणांनुसार प्रसिद्ध झाली. पूर्वी कित्येक यात्राकंपन्या अष्टविनायक यात्रा काढायच्या. आजही त्यांची संख्या मोठी आहे. अष्टविनायक यात्रेचं वैशिष्ट्य म्हणजे अत्यंत अचूक असं सर्किट टूरिझमचं उदाहरण आहे. सर्किट टूरिझम म्हणजे एखादं स्थळ हे केंद्रस्थानी मानून त्याच्या परिघातल्या गोष्टी पाहायच्या आणि मग पुन्हा पुढच्या केंद्रावर जाऊन आणखी काही गोष्टी पाहायच्या....असा मार्ग विकसित झाला, तर त्यात बरंच काही बघून होतं. अष्टविनायक यात्रेमध्ये पुणे आणि जुन्नर केंद्रस्थानी ठेवून आठ गणपतींचं दर्शन तीन दिवसांत होऊ शकतं. अशा यात्रांमध्ये यात्राकंपन्या पूर्वनियोजित घरांमध्येच जेवणा-खाण्याची किंवा प्रसंगी विश्रांतीचीही सोय करतात. बसगाड्या असतील, तर मात्र हॉटेलांशिवाय पर्याय नसतो. पण हे सर्किट वर्तुळाकार पूर्ण होतं हे विशेष. नाशिक हे तर धार्मिक पर्यटनाचं मोठं केंद्र मानायला हवं. त्र्यंबकेश्वर, पंचवटीचा घाट, सप्तश्रृंगीचं देऊळ, शिर्डी ही चारही ठिकाणं अष्टविनायकांप्रमाणेच एका सर्किटमध्येही होऊ शकतात. कुंभमेळ्यासारख्या उत्सवाला तर

नाशिकमध्ये भक्तगणांचा महासागर लोटतो. तेव्हाचं स्वरूप वेगळंच असतं. त्यामुळेच मुंभमेळ्यासारख्या मोठ्या उत्सवांच्या निमित्ताने काही विकसकामं इथे हाती घेतली जातात. पण हे सोहळे आटोपले, की त्याकडे कुणी गांभीर्याने लक्ष देत नाही. त्यामुळेच मग अशा सोहळ्यांव्यतिरिक्त या परिसरास भेट देणाऱ्यांना अनेक गैरसोयीच प्रकर्षाने जाणवू लागतात. खरं तर यातल्या कित्येक धार्मिक प्राचीन स्थळांना केवळ महाराष्ट्राबाहेरचे पर्यटकच नव्हे, तर परदेशातील पर्यटकही भेट देण्यास उत्सुक असू शकतात. पण पुण्याचा गणपती फेस्टिवल किंवा कुंभमेळा सोडल्यास इतर देवांकडे पर्यटनाच्या दृष्टीने आपण फारसं लक्षही दिलेलं नाही. यातूनच मग अनेक गैरप्रकारांनाही चालना मिळू लागते. देवाचं दर्शन घ्यायलाही मग छत्रपती शाहू महाराजांचं त्यांच्या भव्य व्यक्तिमत्त्वाला साजेसं भव्यदिव्य वस्तूंचं संग्रहालय आणि बाजीप्रभूंच्या शौर्याने पुनीत झालेला पन्हाळगड अशा गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. ट्रेकरमंडळी पन्हाळगड ते विशाळगड असा कठीण ट्रेकही करतात. सादळे म्हादळे या डोंगरावर दिग्विजय खानविलकर यांनी केन्ट क्लब नावाचा एक आगळाच पसारा उभा केला आहे. महाराष्ट्रातलं पहिलं स्नो वर्ल्ड अर्थात बर्फातील मजामस्तीचा अनुभव देणारं मनोरंजन केंद्र ही इथली खास गोष्ट. बाकी स्वीमिंग पूल वगैरे स्वरूपाचं ते रिसॉर्ट असलं, तरी कोल्हापूरमध्ये पर्यटनाला चालना देण्यासाठी अशा गोष्टींना वाव असू शकतो, हे त्यातून दिसून आलंय. अशा पर्यटन केंद्रांनी साखर कारखान्याची टूर वगैरे आखल्यास आणखी एखाद्या आकर्षणाची भर पडू शकते. कोल्हापूरमध्येच श्रृंगेरीमठ इथे सिन्थेटिक व्हिलेज तयार करण्याचा अनोखा प्रयत्न करण्यात आला आहे. कृत्रिम साधनांनी पूर्वीचं गाव वसवण्याचा हा प्रयत्न असून आजच्या पिढीला गाव शिकवण्यासाठी ते मार्गदर्शक ठरू शकतं. या सर्व नव्या प्रयत्नांचं मार्केटिंग मात्र सर्व स्तरावर होताना दिसत नाही. शिवाय या ठिकाणांपर्यंत जाण्यासठी सुयोग्य वाहतूकव्यवस्था नाही. भाड्याने रिक्षा, टॅक्सी उपलब्ध असल्या, तरी त्यांचे निश्चित दर स्टेशनबाहेरच लावले गेल्यास पर्यटकांना या ठिकाणांची माहितीही होईल आणि निर्धोकपणे ते त्यांचा दौरा आखू शकतील. कोल्हापूरदर्शनसारख्या काही बससेवा एसटीने सुरू केल्या आहेत, ही स्तुत्य गोष्ट आहे.

नाशिकचा उल्लेख यापूर्वी आला असला, तरी त्याबद्दलची थोडं अधिक सांगायला हवं. नाशिकमध्येही धार्मिक पर्यटनाचं सर्किट विकसित करण्याची क्षमता आहे. शिर्डी, त्र्यंबकेश्वर, पंचवटी आणि गोदावरीचा परिसर तसंच सप्तश्रृंगी ही त्यातली मुख्य ठिकाणं. अजूनही नाशिकमध्ये आलेल्या नवख्या माणसाला चांगलं हॉटेल शोधणं कठीण जातं. स्टेशन लांब असल्याने तिथून सीबीएस अर्थात मुख्य एसटी स्टँड परिसरात आल्याखेरीज इतर वाहनं मिळणं दुरापास्त होतं. सप्तश्रृंगीचा महिमा फार मोठा....सात गडावर दुर्गेचं आसन असं जिचं वर्णन केलं गेलं, त्या सात गडांना पायी पार करण्याची दमछाक आता गेल्या तीनेक दशकांपासून तरी भक्तांना करावी लागत नाही. साधारण वीस-बावीस वर्षांपूर्वी सप्तश्रृंगीच्या पठारावर मिनिबस किंवा मेटॅडोर अशी छोटी वाहनं घाट पार करून जाऊ लागली. आता तर मोठ्या बसगाड्याही पठारापर्यंत येऊ लागल्या आहेत. गुजरात अगदी जवळ असल्याने आजकाल गुजरातमधून आलेल्या भक्तगणांची खास करून महिला भक्तांची संख्या मोठी असते. पठारावर एमटीडीसीचं विश्रामगृह आहे. शिवाय पुजारीवर्गाकडे निवासाची सोय होते. पठारापासून गडावरच्या देवीला जाण्यासाठीही साडेचारशे पायऱ्या चढाव्या लागतात. वयोवृद्धांसाठी डोलीची सोय होते. पठारावर वाहनांची वर्दळ आता खूप वाढली आहे. परिसर फार सुंदर आहे पण या गर्दीचं व्यवस्थापन करण्याची गरज आहे.

यवतमाळजवळ माहूरगडच्या रेणूकादेवीचं दर्शन घेण्यासाठी नांदेडहून दोन ते तीन तासात पोहोचता येतं. परिसर सुंदर असला, तरी राहण्याची हॉटेल्स आता आता होऊ लागली आहेत. परळी

वैजनाथ, औंढ्या नागनाथ या ज्योतिर्लिंगांचं दर्शन हे बहुतांश करून जाण्यायेण्याच्या मार्गावर असतं. या ठिकाणांच्या दर्शनासाठी कुणी लांबवरून तिथे निवास करण्यासाठी जात नाही. त्यामुळेच ही ठिकाणं सुखसोयींच्या दृष्टीने दुर्लक्षित राहतात. अशा ठिकाणांचाही समूह बनविल्यास त्यांचा विकासही होऊ शकतो आणि ती भक्तपर्यटकांपर्यंतही पोहोचतीलही. अंबेजोगाईची योगेश्वरी देवी हेही याच परिसरातलं ठिकाण. इथेही स्वच्छ हॉटेलांच्या सुविधा फारच मोजक्या आहेत. काही खाजगी टूर ऑपरेटरांनी असा समूह करण्याचे उपक्रम सुरू केले आहेत. त्यात लातूर किंवा अंबेजोगाईतील हॉटेलांमध्ये निवास करून योगेश्वरी देवी, परळी वैजनाथ, औंढ्या नागनाथ ही ठिकाणं दाखवली जातात. नांदेड, परभणीहूनही या ठिकाणांना भेटी देता येतात. शिखांचं महत्त्वाचं भक्तिस्थान असलेलं नांदेडचं गुरुद्वाराही प्रसिद्ध आहे. गोदावरीच्या तीरी असलेल्या नांदेडमध्येच गुरू गोविंदसिंगांचं देहावसान झालं.

नागपूर आणि मुंबईत चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लाखो अनुयायी महाराष्ट्र तसंच अन्य ठिकाणांहूनही मोठ्या श्रद्धेने कष्ट उपसत येतात. ही सर्व मंडळीही महापुरुषापुढे नतमस्तक होतानाच मुंबईचं वैभव पाहण्यातही गंग होतात. मुंबईतील धार्मिक स्थळांचा उल्लेख पुढे मुंबईविषयी लिहिताना केला आहेच.

महाराष्ट्रात आणखीही अनेक दैवतं आहेत. धार्मिक पर्यटनस्थळांमध्ये निवासाची सोय हा मुद्दा पूर्वी गौण मानला जायचा. साहजिकच स्थानिक पुजाऱ्यांकडेच राहण्याजेवण्याची सोय व्हायची. आता परिस्थिती काही प्रमाणात बदलत आहे. काही पुजाऱ्यांनीही त्यांच्याकडचं उत्पन्न वाढू लागल्यावर आपल्या घरामध्ये भक्तांच्या निवासासाठी आवश्यक अशा आंघोळीपांघोळीच्या सुविधा करून घेतल्या आहेत, ही चांगली गोष्ट आहे. सर्वसाधारणपणे भक्तगणांसाठी सुविधा उभ्या करताना भक्तांच्या खिशाला तोशीस पडणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. त्यामुळेच निवासाच्या सुविधाही नाममात्र दरात असाव्यात, असाच आग्रह असतो. तो योग्यही आहे.

भक्तगण म्हणजे किडुकमिडुक पैसेवालेच असणार, हा समजही आता मागे पडत चालला आहे. तरीही एरव्ही बाहेरगावी निवासासाठी पैसे मोजणाऱ्या पर्यटकांचं भक्तगणात रूपांतर झालं, की त्यांच्याकडे या सोयीसुविधांसाठी मोजावयाला पैसा नसतो. असं चित्र दिसतं. ते आता बदलू लागलं तर चांगलीच गोष्ट ठरेल. ही वृत्ती बदलली, तर सुखसोयींनाही काही प्रमाणात शिस्त लागू शकते. अन्यथा वरपांगी स्वस्तात सुविधा पण आतल्या आत ज्यादा पैसे मोजून चांगल्या सुवधा असे घडू लागते. अगदी मंदिरातल्या देवदर्शनाचाही अशाप्रकारे बाजार मांडला जाऊ शकतो. त्याला आळा घातला नाही, तर धार्मिक पर्यटनाला अवगुणच चिकटण्याची शक्यता असते. यातल्या कित्येक सोईसुविधा उभ्या करण्यास फारच नाममात्र खर्च येतो. प्रभादेवीच्या सिद्धिविनायक मंदिराने अलीकडेच व्हीआयपी पासची सुविधा बंद केल्यावर सर्वसामान्यांना मोकळ्या वातावरणात झटपट दर्शन होऊ लागलं, या कृतीचं सर्वसामान्य भक्तांकडून खूपच स्वागत झालं, असंच सर्वत्र होईल. देवापुढे सर्व समान आहेत हे मानून, मंदिर व्यवस्थापन व राज्यकर्त्यांनी अग्रक्रमाने सुविधा पुरवल्या पाहिजेत.

**विदर्भ, मराठवाडा, सोलापूर**

पर्यटनाच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात वैभव असूनही तसा दुर्लक्षितच राहिलेला प्रदेश म्हणजे विदर्भ आणि मराठवाडा. अजिंठा-वेरुळ ही जगप्रसिद्ध कोरीव लेणी आणि उल्कापातातून तयार झालेलं लोणारचं

सरोवर ही या प्रदेशाची विशेष ओळख. या दोन्ही स्थळांमुळे औरंगाबादच्या पर्यटनाने कमालीची उंची गाठली आहे. इथली अजिंठा आणि वेरुळची कैलास लेणी हा तर जगाच्या नकाशावर गेलेला पुरातन वास्तुंचा ठेवा. जगाच्या नकाशावर महाराष्ट्राचं पर्यटन आणण्यात सर्वात मोठा वाटा अजिंठा-वेरुळ लेण्यांचा आहे. अजिंठ्यामध्ये इ. स. पूर्व २०० ते इ. स. ६५० या काळातला २९ गुंफांचा समूह आहे. १९ व्या शतकात त्याचा शोध लागला तर इ. स. ३५० ते इ. स. ७०० या काळात राष्ट्रकुटाने बांधलेल्या वेरुळच्या लेण्यांमध्ये हिंदू, बौद्ध आणि जैन संस्कृतीचा संगम असलेल्या ३४ गुंफांचा समूह आहे. या प्राचीन ठेव्याचं स्थापत्यवैभव अफाट आहे. त्यावर पुरातत्त्वज्ञांनी भाष्य करणंच योग्य, पण अजिंठा-वेरुळ लेण्यांच्या आंतरराष्ट्रीय ग्लॅमर मिळाल्यामुळेच या परिसराची निगा राखण्यावरही सरकारी यंत्रणा जागरूक झाल्या आहेत. लेण्यांच्या परिसरात प्रदूषण होऊ नये, यासाठी या भागात बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. थोडे अधिक पैसे असतील तर वातानुकूलित बसही आहेतच. गिफ्टशॉपचं म्युझियम आहे. परदेशी भाषांसह सर्व भाषांचे गाइड उपलब्ध असतात. कॅमेऱ्याच्या फ्लॅशने लेण्यांना इजा होऊ नये, याची काळजी घेण्यात आलेली असते. त्यामुळे प्रकाशयोजना दाखविणारे गार्ड असतात. यासह अनेकांकडे आता डॉलर्समध्ये कमाई झालेली दिसते. पंचतारांकित हॉटेल्स, वातानुकूलित मोटारी हे सगळं इथे सहजी उपलब्ध होतं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे औरंगाबाद, अजिंठा-वेरुळ याबाबत पर्यटन प्रसारसाहित्यही विपुल प्रमाणात उपलब्ध झालेलं आहे. अनेक जाहिरातींमध्ये या ठिकाणांचा उल्लेख होतो. विमानसेवांमध्ये त्यांचा प्रसार दिसतो. त्यामुळेच या ठिकाणांचं मार्केटिंग चांगलं झालं आहे.

यमुनाकाठच्या ताजमहालाशी नातं सांगणारा बीबीका मकबरा तसंच दौलताबादचा किल्ला, बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेलं घृष्णेश्वर मंदिर हे सगळं औरंगाबादेतून फिरता येतं. बुलढाणा जिल्ह्यात उल्कापातातून तयार झालेलं लोणारचं विस्तीर्ण सरोवर पाहण्यासाठी एक पूर्ण दिवस द्यावा लागतो, अनेकजण औरंगाबाद करून बुलढाण्यातल्या लोणारसाठी येतात. त्यात संत एकनाथांचं पैठणही पाहण्याची संधी मिळू शकते. औरंगाबादजवळच म्हैसमाळ हे हिल स्टेशन अलीकडे प्रसिद्ध होत आहे. प्रतितिरुपतीचं मंदिर, गिरिजामाता मंदिर अशी ठिकाणं तिथे आहेत. त्यामुळेच औरंगाबाद हाही तसा सर्किट टूरिझमचाच मार्ग, गेल्या काही वर्षांत औरंगाबादपर्यंत रेल्वेसेवा सुधारल्यामुळे ते शक्य होतं. डेक्कन ओडिसी या अलिशान रेल्वेगाडीला औरंगाबाद हा महत्त्वाचा थांबा ठरतो. त्याचप्रमाणे अलीकडे एमआयडीसी झाल्यामुळे नगर, औरंगाबादला औद्योगिक शहरांचं रुप मिळालं आहे. साहजिकच तिथे उद्योजकांच्या सोयीसाठीही काही चांगली हॉटेल्स तयार झाली आहेत. इथल्या हॉटेल्सना उद्योजक आणि पर्यटक यांचा दुहेरी हात महत्त्वाचा ठरतो.

**सोलापूर**

सोलापूरलाही अशाच प्रकारच्या रेडी इन्फ्रास्ट्रक्चरचा पाया लाभलेला आहे. राज्याच्या सीमेवर असल्याने आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यांतून इथे पर्यटक येऊ शकतात. इथे तुळजापूर, पंढरपूर, गाणगापूर, सिद्धेश्वर तलाव, सोलापूरचा किल्ला आणि नात्रज अभयारण्य या ठिकाणांना सर्किट टूरिझममध्ये आणण्यास मोठा वाव आहे. पण असं सर्किट तयार होऊ शकलेलं नाही. ही ठिकाणं त्या त्या प्रकारच्या पर्यटकांना माहिती असतात. त्यांच्याकडून इथे प्रतिसादही मिळतो. इथे तारांकित हॉटेल्सही उभी राहिली आहेत. सोलापूरच्या चादरी प्रसिद्ध आहेत. त्यांनाही पर्यटन केंद्रांच्या सर्किटमध्ये स्थान मिळू शकतं. पण असं सर्किट अजून तयार झालेलं नाही.

**तोरणमाळ**

सातपुडा रांगेतलं तोरणमाळ हे आणखी एक नव्याने उदयास येत असलेलं हिल स्टेशन. नंदूरबारपासून जवळ असलेलं हे ठिकाण महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि गुजराथ या राज्यांच्या सीमेवर आहे. त्यामुळेच या ठिकाणी तिन्ही राज्यांमधून पर्यटक येऊ शकतात. गोरखनाथ, नागार्जुन ही मंदिरं, यशवंत जलाशय आणि थंड हवा या इथल्या खास गोष्टी. एमटीडीसीत राहण्याची सोय आहे. पण या सर्वच सुविधांचा अपेक्षेनुरूप विकास इथे झालेला नाही. म्हैसमाळ, तोरणमाळ किंवा अमरावतीतलं चिखलदरा यासारखी ठिकाणं अजूनही पर्यटनाच्या बाबतीत चांगल्या सुविधा आणि मार्केटिंगच्या प्रतीक्षेत आहेत.

**दुर्गभ्रमंती-गिरिभ्रमण**

महाराष्ट्रात साडेतीनशेहून अधिक संख्येने असलेले विविध प्रकारचे किल्ले, त्यांचा जाज्ज्वल्य इतिहास, भूगोल, स्थापत्यकला आणि शिवाजी महाराजांची त्यासभोवती घडलेली उत्तुंग कारकीर्द यांची भुरळ कुणाला पडणार नाही? सह्याद्रीच्या या कडेकपारी आणि डोंगरदऱ्यांमधलं दुर्ग, गडकोट आणि कोरीव लेणी, गुंफांचं वैभव गेली अनेक वर्षं अनेक डोंगरयात्री न्याहाळत फिरत आहेत. गो. नि. दांडेकर तथा अप्पा, हरिश कपाडिया, प्रा. प्र. के. घाणेकर, आनंद पाळंदे, रमेश देसाई, निनाद बेडेकर, अप्पा परब अशा अनेक धुरिणांनी दुर्गभ्रमंतीसाठी विपुल साहित्य निर्माण केलं. त्यातून अखिल महाराष्ट्राला दुर्गभ्रमंतीची ओढ लागली. ही ओढ त्यांना हिमालयातील भटकंतीपर्यंतही घेऊन गेली. अर्थात या जागेत काही आपण गिरिभ्रमण आणि दुर्गभ्रमंतीचा विस्ताराने विचार करणार नाही. पण या दुर्गवैभवातून पर्यटनाचा विकास झाला का, याचा विचार नक्की करणार आहोत. यात एक महत्त्वाचा फरक लक्षात घ्यायला हवा तो असा, की महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची आपण इतर राज्यांमधील किल्ल्यांशी तुलना करून चालणार नाही. राजस्थानमध्ये मेहरानगड किल्ल्याचं आणि त्यातल्या राजवाड्याचं पंचतारांकित हॉटेल होऊ शकतं तर आपल्याकडे का होऊ शकणार नाही, असा विचार इथे अस्थायी ठरतो. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे महाराष्ट्र हा भुईकोट किल्ल्यांमुळे ओळखला गेलेला नाही. भुईकोटही आपल्याकडे निश्चितच आहेत. पण रांगडे आणि लढवय्ये म्हणून या किल्ल्यांचीही महती मोठी आहे. त्याचं सामरिक महत्त्व हे गनिमी काव्यातील युद्धाच्या व्यूहरचनेमध्ये असल्याने त्याचं स्थान हे डोंगरावर किंवा समुद्रामध्ये अधिक संख्येने आहे. त्यामुळेच ते दुर्गम बनले आहेत. काहींचा भौगोलिक ऱ्हास झाला, तर काही या दुर्गमतेमुळेच टिकूनही राहिले. पण एकूणच या किल्ल्यांची तुलना उत्तरेकडच्या इतर भव्यदिव्य वास्तूंशी करता उपयोगी नाही. त्यामुळेच तिथलं पर्यटन हे दुर्गभ्रमंती या स्वरूपातच राहणार हे निश्चित. पण म्हणून काय आपण आपल्याकडे येणाऱ्या पर्यटकांना गडकिल्ले दाखवायचेच नाहीत का? तसं तर अजिबातच नाही. युद्धाची व्यूहरचना म्हणून पाण्याखाली भिंत बांधलेला विजयदुर्ग, मालवणच्या पाण्यात उभा असलेला सिंधुदुर्ग, अलिबागचा कुलाबा किल्ला किंवा उत्तर किनारपट्टीवरचा अर्नाळा नाहीतर वसईचा किल्ला या प्रत्येकाचं वैभव निराळंच. जलदुर्गांना भेटी देण्यासाठी कुणी परदेशी पर्यटक आला, तर त्यांना आज तरी दुर्गप्रेमी, स्थानिक जनता यांच्याशी समन्वय साधूनच तिथे पोहोचावं लागतं. असा पर्यटक थेट स्वतःच्या हिमतीवर गडकिल्ल्यापर्यंत पोहोचू शकत नाही. कारण मुंबई, पुण्यातून जिथे त्याचं मुक्कामाचं ठिकाण असतं, तिथे सरसकट सर्वांना अशा वास्तुंची पुरेशी माहितीही नसते.

बाकी दुर्गम गडांचंही तसेच आहे. जोग यांनी किल्ले रायगडावर रोपवे बांधला, तेव्हा त्यास दुर्गप्रेमींकडून कमालीचा विरोध झाला, त्यातलं एक कारण रास्त होतं. ते म्हणजे रोपवेमधून येणारे पर्यटक

अनुक्रमणिका

गडाचं पावित्र्य नष्ट करतील. पण त्याच्या दुसऱ्या बाजूकडे त्यावेळी दुर्लक्ष झालं. रोपवेमुळे आज आबालवृद्धांना हा स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना ठरलेला रायगड 'याचि देही याचि डोळा' पाहता आला, हेही नमूद करायलाच हवं. जेवढी वाटली, तेवढी काही गडाची नासधूसही आज झालेली नाही. महाबळेश्वरला जाताना हातात मोटार आहे म्हणून केवळ भोज्ञा करून रायगड पाहणारेही असतील. पण ती संख्या मोजकीच. गड पाहण्याची आवड असल्याखेरीज रोपनेही इथे कुणी येणार नाही. साठी-सत्तरी पार केलेल्यांनी त्यांच्या तारुण्यात दुर्गभ्रमंती केली नसेल, तर आज रोपवेमुळे त्यांना ही संधी मिळाली आहे. पण मग सगळेच गडकिल्ले असे रोपवेने आपल्या कवेत आले, तर त्यांचं सर्वात मोठं सामर्थ्य असलेली दुर्गमताच नष्ट होईल काय, अशीही भीती आहे. पण हे सगळं बाजूला ठेवून गडांचं वैभव टिकवण्यास प्राधान्य देण्याची गरज आहे. गडांच्या पायथ्याशी असलेली गावं, त्यातले ग्रामस्थ, आदिवासी यांना नियंत्रित पर्यटनातून उत्पन्नाचं साधन मिळवून दिलं, तर कदाचित तेच या गडांचे चांगले राखणदार होतील. काही जाणती ट्रेकरमंडळी या संकल्पनेवर सरकारदरबारी प्रयत्नही करत आली आहेत. पण यात मोठे हॉटेलवाले उतरल्यास सर्वसामान्यांच्या हिंडण्याफिरण्यावरच मर्यादा येण्याची भीती असते. सरकार मात्र मोठ्या हॉटेलांना किंवा समूहांना किल्ले आंदण देण्याचाच विचार करत असते. कदाचित मोठ्या समूहांकडेच मोठे प्रकल्प राबविण्याची शक्ती असते, असेही त्यांचे अनुभव असतील. पण हा एकूणच तिढा आहे. अलीकडेच दुर्गभरारी हा दुर्गप्रेमींच्या पुढाकाराने सुरू झालेला उपक्रम याच धर्तीवरचा स्वयंस्फूर्त प्रयत्न आहे. तो कसा प्रभावी ठरतो आणि त्यातून नियंत्रित पर्यटनाकडे तसंच आपलं गडवैभव सर्वदूर पोहोचवण्यामध्ये प्रगती होते का, ते पाहावं लागेल. ट्रेकरमंडळींना गडावर गेल्यावर भोजन, निवास आणि प्रसाधन यांच्याबाबतीत समस्या येत नाहीत. खूप गर्दी झाली, तर त्यांनाही यात अडचणी येतात. पण पर्यटकांना इथे आणण्याचा विचार झाल्यास या सुविधांच्या बाबतीत काटेकोर नियमांची आवश्यकता भासेल. पाण्याच्या वापराबाबत फारच काळजी घ्यावी लागेल. या सगळ्यासाठी आपण फारसे सुसज्ज झालेलो नाही. बाकी जिज्ञासूंना इथे अमर्याद ठेवा आहे याच शंका नाही. गडांचा राजा आणि राजांचा गड असलेला राजगड, तानाजीच्या कर्तृत्वाचा सिंहगड, अत्यंत कठीण असे अलंग, कुलंग मदन, सर्वोच्च किल्ला साल्हेर अशा अनेक किल्ल्यांची नावं घेण्याचा मोह आवरत नाही.

गेल्या पाचदहा वर्षांत ट्रेकिंगच्याच छंदातून पुढे आलेल्या काही तरुणांनी गडकिल्लेभ्रमंतीला अर्थव्यावसायिक रूप दिलं आहे. त्यात त्यांचा छंदही भागवला जातो. येणाऱ्या डोंगरयात्रीची सोयही होते आणि दोघांचा आर्थिक फायदाही होतो, असं ते गणित आहे. शिधा बरोबर घेऊन स्वतः चूल पेटविण्यापेक्षा कुककडून तयार जेवण गडावर मिळालं, तर कुणाला नकोय? यातूनच वर्गणी काढून होणाऱ्या ट्रेकची वाटचाल अशा व्यावसायिक ट्रेककडे झाली आहे. महाराष्ट्रात पन्नास वर्षांपासून कार्यरत असलेल्या विविध ट्रेकिंग संस्थांनी यात खूप मोलाची भूमिका बजावली आहे, हे नमूद करायलाच हवं. सरकारच्या भरवशावर ते काहीही टिकलेलं नाही. इको-टूरिझम संकल्पनेची इथे मोठी गरज आहे. मुंबईतील महाराष्ट्र सेवा संघातर्फे गेली दहा वर्षं, दरवर्षी महाराष्ट्रातील समस्त ट्रेकिंग संस्थांचं गिरिमित्र संमेलन भरवण्यात येतं. त्यातून या संस्थांचे उपक्रम, भटकंती यांची माहिती सर्वदूर पोहोचते. त्यातूनच पर्यटनालाही चालना मिळत असतेच.

**साहसी पर्यटन**

ट्रेकिंगबरोबरच साहसी पर्यटनाचे इतर प्रकारही महाराष्ट्रात सुरू झाले आहेत. काही जण कामशेतच्या पठारावर पॅराग्लायडिंग करायला शिकवतात. तरुण काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी इथेच

अनुक्रमणिका

येऊन पॅराग्लायडिंगचे धडे घेतले होते. नद्या वाहत असतात. तेव्हा काही जण तिथे रिव्हरराफ्टिंगचा आनंद तुम्हाला देतात. रॅपलिंगची शिबिरं होत असतात. प्रस्तरारोहणासाठी सह्याद्रीतल्या कित्येक कातळभिंती आव्हान म्हणून उभ्या असतातच. हिमालय फिरलेले ब्रिटिश किंवा अमेरिकन गिर्यारोहकही सह्याद्रीतले सुळके चढण्यामध्ये आनंद घेतात. अनेक ठिकाणी लहान मुलांची शिबिरं दिवाळी आणि मे महिन्याच्या सुट्टीत होत असतात. यात जंगल प्रशिक्षण शिबिरं असतात. नदीत पोहायला शिकवण्यापासून जंगलात तंबूमध्ये कसं राहायचं याचं शिक्षण देणारी शिबिरं असतात तर काही निसर्गनिरीक्षण शिबिरंही असतात. हे एर प्रकारचं पर्यटनच म्हणायला हवं. पण अशा संस्थांवर एकखांबी अंकुश कुणाचाही नाही. सुदैवाने अनेक ग्रुप हे ट्रेकिंगची पार्श्वभूमी असलेले आहेत. या क्षेत्रात ते ओळखलेही जातात. पण ज्यांचा आगापिछा ठाऊक नाही, त्यांनी काही भोंगळ कारभार केला, तर त्यांच्यावर कुणाचा अंकुश, हा प्रश्नच असतो. पर्यटनाची आवड आणि सवय लावण्यासाठी अशी लहान मुलांची शिबिरं फारच उपयुक्त असतात. त्यामुळे त्यांना योग्य रीतीने चालना ही द्यायलाच हवी. साहसी पर्यटनामध्येच सध्या कॉर्पोरेट लीडरशीप कॅम्प्स किंवा आऊटबाऊन्ड डेव्हलपमेंन्ट प्रोग्राम्स हा एक नवीन प्रकार उदयास आला आहे. अनेक बड्या कंपन्यांमध्ये उच्च प्रशिक्षित कर्मचारीवृंदांमध्ये टीमस्पिरीट जागृत ठेवण्यासाठी त्यांना प्रतिकूल वातावरणात एकत्र राहण्याचं शिक्षण दिलं जातं. त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित केले जातात. अशा या प्रकारासाठी सह्याद्रीतलं वातावरण फारच उपयुक्त ठरतं. त्यातून अनेक ग्रामस्थ, आचारी, ट्रेकरमंडळी, वाहतूकदार यांना रोजगारही मिळाला आहे.

**निसर्गनिरीक्षण, नेचर ट्रेल्स, इत्यादी....**

महाराष्ट्र पदोपदी निसर्गवैभवाने नटलेला आहे. त्यात अनेक ठिकाणी नयनरम्य अशी जैविक बहुविविधता आहे. फुलपाखरं, रंगीबेरंगी फुलं, चविष्ट फळं, वन्यजीव, पक्षी हे सारे कित्येक ठिकाणी गुण्यागोविंदाने एकत्र नांदतात. कित्येक ठिकाणी निसर्गाची ही मुक्त उधळण धोक्यातही आली आहे. या साऱ्याचाच अभ्यास हा निसर्गनिरीक्षणातून अंतर्भूत असतो. त्यासाठी कर्नाळा किंवा फणसाडसारखी पक्षीअभयारण्यं आहेत. नांदूर-मधमेश्वर आहे, रेहेकुरी आहे, पेंच आहे, ताडोबा आहे, नवेगाव, नागझिरा आहे...अशा अनेक अभयारण्यांमध्ये वन्यजिवांचं निरीक्षण करण्यासाठी अनेक जण मनमुराद भटकंती करत असतात. महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर हे नवेगाव, नागझिरा, चंद्रपूर आणि ताडोबा या अभयारण्यांसाठी आणि तिथे दिसणाऱ्या वाघोबांसाठी प्रसिद्ध झालं आहे. गेल्या पाच-दहा वर्षांत ताडोबाला जाऊन वाघांची मनसोक्त छायाचित्रं घेणारे अनेक हौशी वन्यप्रेमी आपल्याला भेटतील. पण अजूनही मध्य प्रदेशाच्या तोडीचं वन्यजीव पर्यटन आपण साधू शकलेलो नाही, हे जाणकार अधोरेखित करतात. महाराष्ट्रात अनेक जंगलांमध्ये तिथे मिळणारं उत्पन्न त्याच परिसराच्या विकासासाठी उपयोगात आणलं जात नाही, याकडे काही जाणकार लक्ष वेधतात. कित्येकदा आपण आपल्या ठेव्याबद्दल पुरेसे जागरूकही नसतो. मुंबईतच राहणारे किती लोक दोन तासांच्या अंतरावर असलेल्या कर्नाळा पक्षीअभयारण्यात जाऊन आले असतील, ते एकदा विचारून पहा. कर्नाळा कशाला मुंबईचा एक चतुर्थांश भाग व्यापणाऱ्या बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातही कुणी डोकावलेलं नसेल. साताऱ्यातल्या कास पठारावर अलीकडे पर्यटकांची भलीमोठी झुंबड असते. तिथे काहीच धरबंद न उरल्याने तिथली इकोसिस्टिमच धोक्यात आली आहे.

भीमाशंकर, नात्रज, नांदूर-मधमेश्वर, कर्नाळा, फणसाड, कोयनानगर, राधानगरी, तानसा, रेहेकुरी आदी ठिकाणं निसर्ग आणि वन्यजीव निरीक्षकांसाठी पर्वणी ठरतात.

अनुक्रमणिका

असे परिसर तसंच उद्यानांमध्ये माणसांच्या वर्दळीस काही विशिष्ट निर्बंध असायलाच हवेत. पण माणसांची या वातावरणाशी ओळखही व्हायला हवी. आपल्याकडे बरोबर दोन टोकं असतात. निर्बंध लादून पार्काची गेटं कडेकोट बंद तर करायची, पण चिरीमिरी घेऊन दारुपार्ट्यांसाठी वाहनंही आतमध्ये सोडायची, असे दोन्ही प्रकार अशा अनेक पार्कांमध्ये आतापर्यंत उघड झाले आहेत. पर्यटनाचा विचार करता यात एक मोठाच धोका दडलेला असतो. तो म्हणजे तुम्ही पार्कात लावलेले फलक, उभारले अडथळे यांना मग कुणी जुमानतच नाही. नियम जर धाब्यावर बसवता येतात, तर आम्ही तरी ते का पाळायचे, असा त्यांचा सवाल असतो. हरित पर्यटनाचा विकास करायचा, तर आपल्याला या गोष्टींची उत्तरं द्यायलाच लागतील. नेरळ, पालघर आदी भागांमध्ये काही प्रयोगशील शेतकऱ्यांनी कृषिपर्यटनाची अनोखी संकल्पना रुजवली आहे. तिचं स्वागत करायलाच हवं. कारण आजकल कित्येक लहान मुलांना सरडा, बेडूक यांसारखे सजीवही प्रत्यक्ष बघायला मिळत नाहीत. अन्नधान्य कसं पिकतं, ते ठाऊक नसतं. विहीर, नदी यातून पिण्याचं पाणी मिळतं ते माहिती नसत. त्यांनी बैलगाडी पाहिलेली नसते आणि झोपाळ्यावर बसायचंही त्यांना माहिती नसतं. हे सगळं मुलांना दाखविण्यासाठी कृषिपर्यटन उपयुक्त ठरेल.

**मायानगरी मुंबापुरी**

मायानगरी मुंबापुरी ही देशोदेशीच्या पर्यटकांना आपल्याकडे चुंबकाप्रमाणे खेचून घेते. मुंबई ही आर्थिक राजधानी, महाराष्ट्राची राजधानी, आशियातील व्यापरउदीमाचं महत्त्वाचं केंद्र, बॉलिवुड-मनोरंजन नगरीचं माहेरघर, एक महत्त्वाचं सुरक्षित बंदर... अशी अनेक खास आकर्षणं मुंबईबाबत सांगता येतात. गेटवे ऑफ इंडियाजवळ समुद्रात फेरफटका मारण्यासाठी इथे हार्बर क्रूझची अर्थात लॉंचसेवेची सुविधा आहे. व्हिक्टोरिया अर्थात घोडागाड्या आता फारच तुरळक उरल्या आहेत आणि त्या ताजमहाल हॉटेलच्या परिसरातच असतात. पण मरीन ड्राइव्हची आशियातली सर्वात विशाल नैसर्गिक गॅलरी इथे आहे. दहा वर्षांपूर्वी याच गॅलरीसमोर तिन्ही सैन्यदलांनी शानदार एअर शो केला होता. त्यावरून या क्वीन्स नेकलेसची अर्थात राणीच्या रत्नहाराची व्याप्ती लक्षात येईल. मुंबईचं दर्शन घेण्यासाठी टूर्स खाजगी बससेवांद्वारे चालवल्या जातात. त्यात प्रामुख्याने गेटवे ऑफ इंडिया, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (पूर्वीचं प्रिन्स ऑफ वेल्स म्युझिअम), कमला नेहरू पार्क, त्याशेजारचा म्हातारीचा बूट, गिरगाव चौपाटी, शेअर बाजारची इमारत, छत्रपती शिवाजी टर्मिनस अर्थात बोरीबंदर, मुंबई महापालिका मुख्यालय, वरळीचं नेहरू तारांगण, नेहरू विज्ञान केंद्र, नेहरू सेंटरमधील भारत एक शोध (डिस्कव्हरी ऑफ इंडिया) हे कायमस्वरूपी प्रदर्शन, हाजीअलीचा दर्गा, महालक्ष्मी मंदिर, सिद्धिविनायक मंदिर, जिजामाता उद्यान अर्थात राणीची बाग या गोष्टी प्रामुख्याने असतात. माऊन्ट मेरी, अफगाण चर्च ही ख्रिस्ती धर्मस्थळंही प्रसिद्ध आहेत. माऊन्ट मेरीच्या जत्रेसाठी भरपूर गर्दी लोटते.

नेहरू विज्ञान केंद्र, म्युझिअम यासारख्या वास्तू मुंबईदर्शन ट्रिपच्या नकाशावर नसत्या, तर तिथे आपणहून कुणी गेलं असतं का? तसं त्यांचं मार्केटिंग किंवा मार्गदर्शन आपण लोकांपर्यंत पोहचवतो का, हा प्रश्न उरतो. बेस्टने नीलांबरी ही ओपनडेकची डबलडेकर बस दक्षिण मुंबईतील प्रेक्षणीय स्थळांभोवती फेरफटका मारण्यासाठी सुरू केली. प्रतिसादानुसार ती सुरू असते. पण डबलडेकरचा आनंद लुटण्यासाठी आता शहराच्या फारच थोड्या भागांमध्ये डबलडेकर सुरू असतात. बेस्टच्या आणिक आगारात एक छान वस्तुसंग्रहालयही आहे. सी-लिंक हे आणखी एक आकर्षण तयार झालं आहे. दुर्दैवाने वास्तू या रूपात आपण नेहरू तारांगण सोडल्यास फारशी भर घालू शकलो नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील अशा कितीशा इमारती मुंबईची ओळख म्हणून आपण दाखवू शकतो, हा प्रश्नच आहे. मुंबईबाहेरचे पर्यटक

अनुक्रमणिका

अशा केंद्रांवर फिरण्यासाठी आले, तर प्रसाधनगृह, स्वस्तातली हॉटेल्स यांची त्यांना कायम वानवा जाणवते. मग या गोष्टीसाठी कुठेतरी आसरा शोधला जातो. शहरापासून जवळ म्हणजे पाऊण तासाच्या अंतरावर समुद्रमार्गे प्रवास करून घारापुरी लेण्यांनाही भेट देता येते. इथेही पर्यटकांची गर्दी होते. वाढत्या पसाऱ्यामुळे मुंबईला स्वतःचा डोलारा सांभाळणं नेहमीच जड जात असतं. त्यामुळेच कदाचित पर्यटनाच्या बाबतीत मुंबईने गेल्या एकदोन दशकांत फारसा वेगळा ठसा उमटवलेला नाही. जे आहे ते पूर्वसंचित. कुणी नव्याने चौपाटी बांधू शकणार नाही की कुणी राणीचा बाग उभा करू शकणार नाही. या गोष्टी टिकवता आल्या तरी खूप. याबाबतीत हैदराबाद शहराने जे करून दाखवलं आहे, तसं आपल्याला शक्य झालेलं नाही. अलीकडच्या काळात मुंबईत येणारे काही गुंतवणूकदार छोट्या चार्टर्ड फ्लाईटने मुंबईचा हवाई दौरा करण्याची हौसही भागवून घेतात. बाकी मुंबई त्यांना छानच भासत असणार, पण विमानतळावर उतरताना झोपड्यांवर आपण पडू की काय, या भीतीने मात्र त्यांचं मन गोठत असणार.

काळा घोडा फेस्टिवलसारख्या उत्सवांमधून मुंबईमध्ये कला, संस्कृती यांचं दर्शन घडविण्याची अभिनव चळवळ आकारास आली पण ती दक्षिण मुंबई किंवा काही विशिष्ट वर्गापुरतीच उरल्याने सर्वदूर पोहोचू शकलेली नाही. ही संकल्पना अधिक प्रभावी करता येईल. पर्यटनवाढीमध्ये या संकल्पनेचं स्थान नक्कीच मोठं आहे. मुंबईतील सांस्कृतिक संचिताचा पर्यटनासाठी अधिक प्रभावी उपयोग करून घ्यायला हवा. बाणगंगा महोत्सवात बाणगंगा तलावाच्या तीरावर बसून शास्त्रीय संगीताच्या मैफलीत न्हाऊन निघण्याचा अनुभव फारच वेगळा असतो. अशा प्रयोगांना परदेशी पर्यटकांकडून चांगला प्रतिसाद मिळतो. शिवाय आपल्या अभिरुचीचं, कलावैभवाचं प्रतिबिंब अशा महोत्सवात पडतं आणि पर्यटनाच्या विकासासाठी ते फारच महत्त्वाचं असतं. बॉलिवूड नावाने मुंबईतला चित्रपटउद्योग प्रसिद्ध असला, तरी या बॉलिवूडची महती पर्यटकांना दाखविण्याची सध्या तरी कुठलीही योजना अस्तित्वात नाही. चित्रपट बनतो कसा, हा उद्योग केवढा मोठा आहे, त्यातली सुपरस्टार मंडळी कोण हे सारं एखाद्या ठिकाणी पर्यटकांना दाखवण्याची सोय हवी. छत्रपती शिवाजी टर्मिनस तसंच इतर ब्रिटिशकालीन वास्तू पर्यटकांचं आकर्षण ठरतात. तशी एकही वास्तू नेहरू केंद्र वगळल्यास आपण नंतर तयार केलेली नाही.

**घारापुरी लेणी**

मुंबईपासून जवळच असलेल्या घारापुरी लेण्यांच्या बेटांवर एका दिवसात लाँचने जाऊन येता येतं. अजिंठा-वेरुळप्रमाणेच परदेशी पर्यटकांसाठी घारापुरी तथा एलिफंटा लेणीही विशेष आकर्षण असतात. त्यामुळे इथेही पर्यटकांचा राबता असतो. इथे निवास करण्यास मज्जाव आहे. ताज, ओबेरॉय, यासारखी दक्षिण मुंबईतील हॉटेल्स जवळ असल्याने परदेशी पर्यटक इथे मोठ्या संख्येने येतात. घारापुरी लेण्यांवरही संगीत मैफलींचं आयोजन एमटीडीसीतर्फे करण्यात येतं. तोही स्तुत्य प्रयोग आहे.

**पुणे व इतर शहरं**

मुंबईप्रमाणेच पुण्यासारख्या इतर शहरांमध्येही शहरांतर्गत प्रेक्षणीय स्थळदर्शनाची क्षमता आहे. जसं पुण्यामध्ये सारसबागेमधून सिंहगड आणि शनिवारवाड्यापासून राजा केळकर म्युझिअमपर्यंत विविध प्रकारचा ठेवा आहे. तसंच चितळ्यांची बाकरवडी, मस्तानी आणि तुळशीबागेतल्या खरेदीपर्यंत विविध गोष्टींबद्दल पुणं प्रसिद्ध आहे. पुणे फेस्टिवलने गणपती उत्सवादरम्यान पर्यटकांना आपल्याकडे खेचण्यात यश मिळवलं आहे. ओशोंच्या आश्रमामुळेही परदेशी पर्यटकांचा इथे राबता असतोच. एक महानगर म्हणून

पुणं वेगाने आकारास येऊ लागल्यानंतर इथल्या ऐतिहासिक स्थळांची महती काहीशी मागे पडत गेली. कोल्हापूर, औरंगाबाद, नगर ही नवविकसित शहरंही याच कचाट्यात सापडलेली दिसतात.

**मेडिकल टूरिझम**

आशियाई शहरांमध्ये आणि खास करून मुंबई, पुण्यासारख्या शहरांमध्ये सुपर स्पेश्यालिटी हॉस्पिटलांची सद्दी सुरू झाल्यानंतर मेडिकल टूरिझमने आपला मोहरा इथे वळवला. ज्या देशांमध्ये वैद्यकीय उपचार महागडे असतात, त्या देशांचे लोक भारतात वैद्यकीय उपचार घेण्यासाठी येतात. उपचारांबरोबरच ते पर्यटनाचाही आनंद लुटतात. म्हणून त्यास मेडिकल टूरिझम असा शब्द परिचित झाला आहे. ठाण्यातला एका सुपर स्पेश्यालिटी हॉस्पिटलने त्यांच्याच आवारात एक पंचतारांकित हॉटेल सुरू केलं आहे, यावरून या संकल्पनेस मिळणारा प्रतिसाद लक्षात येतो. बाकी मेडिकल टूरिझमप्रमाणेच विविध विषियांवरच्या परिषदा, कार्यसत्रं यांच्यासाठीही महाराष्ट्रातल्या ठिकाणांची निवड केली जाऊ शकते. याबाबतीत अजून तरी मुंबई, पुण्यालाच महत्त्व जास्त असतं. खरं तर अशा गोष्टींसाठी दूर गावातल्या ठिकाणांचा विचार झाल्यास तिथे पर्यटन चांगलं मूळ धरू शकतं. त्याचा म्हणावा तसा विकास झालेला नाही.

**संधी गमावली विक्रान्तची.......**

मुंबई हे सुरक्षित बंदर म्हणून सर्वांनाच परिचित आहे. इथेच अडीचशे वर्षं जुनी नौदल गोदी आहे. भारताची पहिली गौरवशाली विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रान्त याच मुंबईच्या आरमार तळावरून निवृत्त झाली. निवृत्तीनंतर तिचं रूपांतर इंडियन म्युझिअम शीप विक्रान्त या नावाने तरंगत आरमार वस्तुसंग्रहालयात करण्यात आलं. नौदलाच्या थरारक कार्याची माहिती देणारं हे प्रदर्शन आपल्याकडे घेण्याची महाराष्ट्र सरकारला उत्तम संधी होती. मात्र १९९५ पासून या प्रकल्पाचं घोंगडं भिजत पडलं आहे. आता दरवर्षी नौदल सप्ताहादरम्यान हे संग्रहालय सर्वांना पाहता येतं. पण तिचं कायमस्वरूपी संग्रहालय बनवण्याच्या कामास मात्र अजूनही गती मिळालेली नाही. सुरुवातीस ६०-७० कोटी रुपये असलेला खर्च आता दोनएकशे कोटींपर्यंत गेला आहे. त्याच दरम्यान महाराष्ट्र सरकारने अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचं स्मारक करण्याची घोषणा केली आहे. मग विक्रान्तला आपण का वाचवू शकलो नाही, असा सवाल शिवप्रेमींच्याही मनांत वारंवार डोकावतो. प्रश्न राजकीय बनले, की त्याचं उत्तर ठाऊक असतं. ते शोधायला जावं लागत नाही आणि त्यावर काही कार्यवाहीही करावी लागत नाही. विक्रान्तचं लवकरच कायमस्वरूपी संग्रहालयात रूपांतर होईल, अशी आशा करू या. ते मुंबईतच होणार असल्याने गर्दी आणि सुरक्षेचं व्यवस्थापन करणं ही आणखी एक कसोटीही तिथे असेलच.

**मरीना**

विक्रान्तप्रमाणेच मुंबईच्या आसपास नौकानयनाची मजा अनुभवण्यासाठीही या बंदराचा आपण उपयोग करून घेऊ शकलो नाही. परदेशात अशा ठिकाणी मरीना उभारले जातात. त्यात छोट्या यॉट्स नांगरण्याची सुविधा असते. तसं नसल्यामुळे अरबी समुद्रातील नौकानयनाची सुविधा पर्यटक आकर्षित करण्यासाठी उपयुक्त ठरत नाही. काही छोट्यामोठ्या तलावांमध्ये लोकांना नौकानयन करता येतं. ही चांगली गोष्ट आहे.

अनुक्रमणिका

**डेक्कन ओडिसी**

महाराष्ट्रातल्या पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि खास करून परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पॅलेस ऑन व्हील्सच्या धर्तीवर डेक्कन ओडिसी ही आलिशान रेल्वेगाडी सुरू करण्यात आली. तिच्या फेऱ्यांपेक्षा विविध प्रकारच्या वादांमुळेच ती अधिक गाजली आहे. अशा रेल्वेगाडीला थोडी दुय्यम पण या प्रकारची रेल्वेगाडी पर्यटनासाठी सुरू करता येते का, याचाही विचार व्हायला हरकत नाही. अशा गाडीतून काही सर्किट्सचा उपयोग करून घेता येईल. डेक्कन ओडिसीचं पर्यटन नकाशावरचं स्थान मात्र वाढवायला हवं.

**खाजगी सहभाग**

राज्याच्या पर्यटन केंद्राचा विकास करण्यामध्ये सरकारपेक्षा इथल्या पर्यटनप्रेमी जनतेचाच मोठा वाटा राहिला आहे. राजा पाटील, केसरी पाटील, अशा धुरिणांनी राज्याबाहेरच्या पर्यटनाची ऊर्मी महाराष्ट्रातल्या पर्यटकांमध्ये जागवली. तो वारसा अनेक खाजगी टूर ऑपरेटर आजही चालवत आहेत. पण महाराष्ट्राचं पर्यटन महाराष्ट्राबाहेरच्या राज्यांमध्ये त्या प्रमाणात पोहोचतं आहे का, हा खरा प्रश्न आहे. तसं करून पर्यटक आले, तर त्यांची सोय करण्यासाठी आपण सुसज्ज आहोत का, हाही सवाल आहेच. याकामी खाजगी छोटे छोटे टूर ऑपरेटर खूप महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. पण खाजगी टूर ऑपरेटरांची फौज सरकारदरबारी योग्य प्रकारे राबवली जात नाही आणि ओळखली जात नाही. हॉटेल व्यावसायिकांचा काही ठिकाणी चांगलाच वरचष्मा असतो. त्यामुळेच सरकारी परिषदांमध्ये सीआरझेड कायदा रद्द करून आम्हाला समुद्राला खेटून हॉटेलं कशी उभारता येतील, यावरच हे हॉटेल व्यावसायिक आग्रही राहतात. इतर राज्यांनी किनारपट्टीपासून दूर राहूनही पर्यटनाचा विकास करून दाखवलाच, याकडे जाणकार लक्ष वेधतात. प्रत्यक्षात पर्यावरणाची काळजी घेऊन पर्यटन कसं वाढवता येईल, यावर कुणीच बोलत नाही. सोन्याची अंडी देणारी कोंबडी कापून खायची, की तिच्या अंड्यांचा लाभ घ्यायचा, ते आपण एकदा ठरवायलाच हवं.

राज्यातील रस्त्यांचं जाळं इतकी वर्ष होऊनही कमालीचं कमकुवत आहे. टोलनाक्यांवर टोल भरायचा आणि खड्ड्यांचा त्रासही सोसायचा, अशी बहुतांश ठिकाणी परिस्थिती असते. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने वेळोवेळी त्यांचा रोल बदलला. काही वर्षांपूर्वी त्यांच्या स्वतःच्या बसगाड्या होत्या. या बसगाड्या पांढरा हत्ती ठरू लागल्यावर त्या बाद झाल्या. एमटीडीसीची विश्रामगृहं फारच सुंदर ठिकाणी आहेत. त्यांचं लोकेशन निवडणाऱ्या बक्षीस द्यायला हवं. पण त्यांची व्यवस्था ढिसाळ असेल, तर त्याचीही जबाबदारी कुणावर तरी निश्चित करायला हवी. कित्येक ठिकाणी मूलभूत सुविधांची वानवा असते, असाच अनुभव पर्यटक सांगतात. आता काही ठिकाणी थोडाफार फरक पडला आहे. पण लोक सरसकट प्रशस्तिपत्र देत नाहीत. पर्यटनात माऊथ पब्लिसिटीला खूप महत्त्व असतं. एकदा एखादा पर्यटक खूष झाला, तर तो जन्मभर तुमच्याकडे येईल. पण तो नाराज झाला, तर दहा ठिकाणी तुमचं नावही बदनाम करील.

प्रसाधनगृहांची तर महाराष्ट्रात ठिकठिकाणी वानवा आहे. मुंबई-गोवा, रत्नागिरी आदी खाजगी आराम बसगाड्या ज्या हॉटेलांमध्ये थांबवतात, तेथे त्यांची स्थिती फारच वाईट असते. स्त्रियांची तर तिथे

अनुक्रमणिका

फारच कुचंबणा होते. प्रसाधनगृहं वाईट अवस्थेत असतात. आंघोळ, प्रसाधन आणि आहार या पर्यटनातल्या अत्यंत निकडीच्या गरजा आहेत. याची जाणीव आपण ठेवायलाच हवी.

महाराष्ट्रातील अनोखी किंवा परिचितही ठिकाणं याबद्दल माहिती देणारं प्रसार-प्रचार साहित्य फारसं उपलब्ध नसतं. छायाचित्रकार गोपाळ बोधे यांनी त्यादृष्टीने चांगले दस्तऐवज कॉफीटेबल बुक स्वरूपात आकारास आणले. सर्वप्रथम मुंबई, महाराष्ट्र, महाराष्ट्रातील नद्यांसह विविध ठेवा, प्राचीन व्यापारीमार्ग, शेगाव अशा अनेक विषयांवर त्यांनी हवाई छायाचित्रांची प्रदर्शनं भरवली तसंच कॉफीटेबल बुकही प्रकाशित केले. छायाचित्रकार उद्धव ठाकरे यांनीही 'महाराष्ट्र देशा' या पुस्तकातून हवाई छायाचित्रांमधला महाराष्ट्र लोकांपुढे आणला. अशा दस्तऐवजांचा सुयोग्य वापर प्रचारसाहित्यांमध्ये करायला हवा. पर्यटनाच्या विकासात अशा प्रसारसाहित्याचं स्थान खूपच मोठं असतं. मराठीत कित्येक लोकप्रिय लेखकांनी विविध माध्यमातून प्रवासवर्णनं लिहिली. त्यामुळे ती ठिकाणं परिचित तर झालीच, पण त्यांच्याशी अनेक आठवणी जोडल्या गेल्या. त्या ठिकाणांना भेटी देण्याची ऊर्मी जनसामान्यांच्या मनात या लिखाणाने जागवली. महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, सकाळ, लोकमत, सामना, लोकप्रभा, चित्रलेखा, साप्ताहिक सकाळ, द टाइम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, आऊटलुक ट्रॅव्हलर यांसह अनेक वृत्तपत्रं व नियतकालिकांनी वेळोवेळी प्रवासवर्णनं, नव्या प्रेक्षणीय स्थळांची माहिती तसंच संबंधित बातम्या, लेख प्रसिद्ध करून महाराष्ट्रातलं पर्यटन जागृत ठेवलं. छायाचित्रकारांचं योगदानही मोठं आहे. दूरचित्रवाणी वाहिन्यांवर विविध प्रकारचे कार्यक्रम सादर करण्यात आले. आकाशवाणीवरूनही कार्यक्रम झाले. आता इंटरनेट या नव्या माध्यमालाही खूप मोठ श्रेय जातं. इंटरनेटवर आता मोठ्या प्रमाणात आदानप्रदान होतं. पण परदेशी लिखाणांमध्ये ज्या प्रकारे पर्यटनस्थळं आणि तिथल्या सुविधांविषयी सडेतोडपणे शिफारस केली जाते, तसं साहित्य आपल्याकडे फारसं दिसत नाही. तसं झाल्यास पर्यटन व्यावसायिक, सरकारी यंत्रणा यांच्यावरही एक प्रकारचा दबाव कायम राहतो. लोकांचा प्रतिसाद किंवा नापसंती लगेचच कळते.

परिसराच्या आवश्यकतेनुसार किमान प्रमाणात नियम आणावेच लागतात. तशा नियमांचं सर्वांनी स्वागतच करायला हवं. हॉटेलचे दर, वाटाड्या किंवा गाईडचे दर रिक्षा-टॅक्सीसारखी स्थळदर्शनाची वाहनं या सर्व गोष्टींमध्ये काही प्रमाणात प्रमाणीकरण यायलाच हवं. तरच पर्यटकांमध्ये आपल्या राज्याबद्दल विश्वासार्हता निर्माण होईल. हॉस्पिटॅलिटी उद्योगामध्ये विश्वासार्हतेला अपार महत्त्व आहे.

प्रेक्षणीय स्थळांचे परिसर ज्या वैभवासाठी प्रसिद्ध आहेत, ते वैभव आपण टिकवलंच पाहिजे. म्हणजेच पर्यायाने पर्यावरण टिकवल्याशिवाय पर्यटनही बहरू शकणार नाही. पर्यटनासाठी एखादा परिसर खुला केला, की त्याचा काही प्रमाणात ऱ्हास होणारच. अशा वेळीच समतोल कसा साधायचा, हे आव्हान आपल्यापुढे कायम राहणार आहे. साहित्य संस्कृती मंडळाने महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवात पर्यटनसंस्कृती या विषयाला विशेष स्थान दिलं, ही कौतुकास्पद आणि प्रशंसनीय बाब आहे.

sameerkarve@gmail.com

अनुक्रमणिका



**श्री. संदीप चव्हाण**

'आयबीन लोकमत' या वृत्तवाहिनीचे क्रीडा संपादक असलेल्या श्री. संदीप चव्हाण यांना पत्रकारितेच्या क्षेत्राचा दांडगा अनुभव आहे. दैनिक सामना, महानगर, दैनिक प्रभात, सांज तरूण भारत, साप्ताहिक मार्मिक, साप्ताहिक विवेक, अशा नियतकालिकांमधून क्रीडाविषयक विपुल लेखन केले आहे. २००३ साली अथेन्स ऑलिम्पिकचे वार्तांकन करण्याचा मान मिळविणारे ते पहिले मराठी पत्रकार ठरले. २२ देशांमध्ये विविध क्रीडास्पर्धांचे वार्तांकन करण्याचा अनुभव श्री. चव्हाण यांच्या पाठीशी आहे. भारतीय क्रीडा पत्रकार महासंघाचा २००४-०५ सालचा सर्वोत्कृष्ट क्रीडा वार्तांकनासाठीचा पुरस्कार श्री. चव्हाण यांना प्राप्त झाला. कबड्डीवरील त्यांच्या विशेष डॉक्युमेंटेशनचे प्रसारण अमेरिकेतील फॉक्स टीव्हीवर करण्यात आले. विदेशात दाखविण्यात आलेले ते कदाचित कबड्डीवरील पहिलेच प्रसारण असण्याची शक्यता आहे.

---

पत्ता : १२३, मौलिक, सुभद्रा निवास, शिवसेना शाखेसमोर, वरळी कोळीवाडा, मुंबई ४०० ०३०.
भ्रमणध्वनी : ९९३०३६०४३१

---

**म**हाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. क्रिकेटच्याच भाषेत बोलायचे झाले तर महाराष्ट्राने दिमाखदार हाफ सेंच्युरी झळकाविली आहे. पन्नाशीनंतर क्रिकेटरला वेध लागतात ते सेंच्युरीचे त्यासाठी तो नव्याने गार्ड घेतो. या गौरव ग्रंथात आपणही पुन्हा अशीच गार्ड घेणार आहोत. गौरवशाली इतिहासाला उजाळा देणार आहोत. महाराष्ट्राला गौरव प्राप्त करून दिलेल्या खेळाडूंच्या कामगिरीला सलाम करणार आहोत. ज्या घटनांनी महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्राला दिशा दिली त्या घटनांची दखल घेणार आहोत, आणि हो, इतिहासात झालेल्या चुका टाळण्यासाठी त्या चुकांचे तटस्थपणे मूल्यांकनही करणार आहोत.

भारताच्या गौरवशाली क्रीडा इतिहासात महाराष्ट्राचे स्थान सगळ्यात वरचे आहे. भारताच्या गौरवशाली इतिहासाचा पायाच नव्हे, तर त्यावर कळस चढवण्याचे कार्य महाराष्ट्राने केले. कोणताही खेळ घ्या, महाराष्ट्राचे त्यातील योगदान देदीप्यमान असेच असल्याने तुम्हाला आढळेल.... महाराष्ट्राला वगळून भारताचा क्रीडा इतिहास लिहिता येणेच शक्य नाही. भारतात क्रिकेट हा सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे. आजच्या घडीस भारताने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला एकूण २६७ टेस्ट क्रिकेटर दिले आहेत. त्यातील ६७ टेस्ट क्रिकेटर हे एकट्या मुंबईचे तर ११ महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे आहेत. वन डेत हीच संख्या आहे एकूण ३५. रणजी क्रिकेट स्पर्धा ही भारतातील मानाची स्पर्धा. या रणजी स्पर्धेने मुंबई आणि मुंबई वगळता उर्वरित महाराष्ट्राचा संघ असे एकूण दोन संघ खेळतात. या स्पर्धेचे यंदा आपले ७५ वे वर्ष दिमाखात साजरे

अनुक्रमणिका

केले. या ७५ वर्षांपैकी तब्बल ३९ वेळा मुंबईने तर २ वेळा महाराष्ट्राने रणजी विजेतेपद पटकावले आहे. ही आकडेवारीच क्रिकेटमधील मुंबई महाराष्ट्राची ताकद स्पष्ट करणारी आहे. केवळ मैदानावरच नव्हे तर मैदानाबाहेरील क्रीडा संस्कृतीचा विकास करण्यात महाराष्ट्राने दीपस्तंभाची भूमिका बजावली आहे.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपण जग जिंकू शकतो याचा विश्वास महाराष्ट्राने सगळ्यात आधी भारताला आणि एकूणच भारतवासीयांना दिला. विल्सन जोन्स हे स्वतंत्र भारताचे पहिले वर्ल्ड चॅम्पियन खेळाडू ठरले. पुण्यात जन्मलेल्या आणि मुंबईत क्रीडा कारकीर्द घडविणाऱ्या विल्सन जोन्स यांनी १९५८ साली बिलियर्ड्सचे जगज्जेतेपद पटकावले. कोणत्याही वैयक्तिक खेळात भारताला मिळालेले ते पहिले जगज्जेतेपद होते. पुढे १९६४ मध्ये जोन्स यांनी पुन्हा एकदा वर्ल्ड चॅम्पियनशीप भारताकडे खेचून आणली. तब्बल १२ वर्षे जोन्स राष्ट्रीय विजेते होते.

जोन्स यांच्या आधी ६ वर्षे म्हणजेच १९५२ साली, महाराष्ट्राच्या खाशाबा जाधव या पहिलवानाने भारताला ऑलिम्पिकमधील पहिले वैयक्तिक मेडल जिंकून दिले होते. खाशाबांनी त्यावेळी कांस्य पदक जिंकले होते. मैदानावरील खेळाडूंच्या सुवर्ण कामगिरीचा आपण आढावा घेणारच आहोतच, पण मैदानाबाहेरील भारताच्या क्रीडा चळवळीतील महाराष्ट्राच्या योगदानाची दखलही आपण घेणार आहोत. त्यासाठी साधारणतः आपण फक्त १०० वर्षे मागे जाणार आहोत इतकेच. भारतातील असे अनेक खेळ आहेत ज्यांची मुहूर्तमेढ मुंबई, पुणे आणि अमरावतीत रोवली गेली. थोडक्यात महाराष्ट्रात रोवली गेली. पुण्यातील डेक्कन जिमखाना हा त्यावेळी या क्रीडा चळवळीचा केंद्रबिंदू होता. अमरावतीच्या हनुमान प्रसारक व्यायामशाळेनेही या क्रीडाचळवळीत आपले योगदान दिले.

**क्रिकेटला स्पर्धात्मक रूप दिले**

साधारणतः १८९५ पासून युरोपियन आणि पारशी जिमखान्याच्या टीममध्ये प्रतिवर्षी मुंबईत प्रातिनिधिक सामने व्हायचे. या दुरंगी क्रिकेट स्पर्धेला १९०७ साली तिरंगी क्रिकेट स्पर्धेचे स्वरूप मिळाले. हिंदू संघाच्या स्पर्धेतील सहभागामुळे क्रिकेटही सर्वदूर पसरले. पुढे १९१२ साली मुसलमान संघ या स्पर्धेत सहभागी झाल्यामुळे ही स्पर्धा चौरंगी झाली आणि पुढे शेष भारताच्या समावेशामुळे पंचरंगी झाली. इतिहासात इतके मागे जाण्याचे कारण म्हणजे १९३४-३५ साली सुरू झालेल्या रणजी क्रिकेट स्पर्धेचा पाया याच पंचरंगी क्रिकेट स्पर्धेने रचला. भारतीय क्रिकेटला एक दिशा देण्याचे काम त्यावेळी महाराष्ट्राने केले. भारतीय क्रिकेट संघटनेचे (बीसीसीआय) मुख्यालय आजही मुंबईत दिमाखात उभे आहे. योगायोग म्हणजे महाराष्ट्र राज्य ५० व्या वर्षात पदार्पण करीत असतानाच मुंबई क्रिकेट संघटना आणि त्यानंतर भारतीय क्रिकेट संघटनेचे (बीसीसीआय) अध्यक्षपद भूषविणारे शरद पवार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष बनले आहेत. जगमोहन दालमियांनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे (आयसीसी) अध्यक्षपद भूषविणारे ते दुसरे भारतीय ठरले आहेत.

भारतीय क्रिकेटच्या मैदानावरील ऐतिहासिक कामगिरीचे विश्लेषण केले, तर त्या प्रत्येक ऐतिहासिक कामगिरीत मुंबई-महाराष्ट्राच्या खेळाडूंचे मोठे योगदान दिसून येईल.

अगदीच सुरुवात करायची झाली, तर भारताने इंग्लंडवर मिळविलेल्या पहिल्या ऐतिहासिक टेस्ट विजयापासून करूया. मद्रासमध्ये १९५२ साली भारताने इंग्लंडला पराभवाची धूळ चारली होती. इंग्लंडवर

ऐतिहासिक विजय मिळविणाऱ्या त्या भारतीय टेस्ट संघात विजय हजारे, विनू मंकड, दत्तू फडकर, पॉली उम्रीगर आणि रमेश दिवेचा या मुंबईकर क्रिकेटर्सचा समावेश होता. भारताने इंग्लंडविरुद्धची ती सिरिज १-१ अशी ड्रॉ केली होती. १९६७-६८ साली भारताने न्यूझीलंडविरुद्ध टेस्ट सीरिज जिंकली. भारताने कोणत्याही देशाविरुद्ध जिंकलेली ती पहिली आंतरराष्ट्रीय क्रिकेट टेस्ट सीरिज होती आणि या विजयी भारतीय टेस्ट संघात समावेश होता मुंबईकर अजित वाडेकर, फारूक इंजीनियर, बापू नाडकर्णी आणि महाराष्ट्राच्या चंदू बोर्डे या दिग्गज खेळाडूंचा.

१९७०-७१ साली भारताने वेस्ट इंडिज आणि क्रिकेटच्या जन्मदात्या इंग्लंडला त्यांच्याच देशात परावभवाची धूळ चारली. त्या दोन्ही अजरामर टेस्टमध्ये विजय मिळवणाऱ्या भारतीय टीमचा कॅप्टन होता मुंबईकर अजित वाडेकर आणि त्या विजेत्या टीममध्ये अजितला साथ लाभली होती ती मुंबईच्या सुनील गावसकर, दिलीप सरदेसाई, एकनाथ सोलकर आणि अशोक मंकड यांची.

१९८३ साली भारताने क्रिकेटचा वर्ल्डकप जिंकला. भारताच्या या पहिल्या जगज्जेत्या क्रिकेट टीममध्ये सुनील गावसकर, दिलीप वेंगसकर, संदीप पाटील, रवी शास्त्री आणि बलविंदर संधू या दिग्गज मुंबईकर खेळाडूंचा समावेश होता. हा सिलसिला अगदी ट्वेण्टी-२० क्रिकेटमध्ये वर्ल्ड चॅम्पियन ठरणाऱ्या भारतीय टीमपर्यंत कायम राहिलाय. टी-२० च्या वर्ल्ड चॅम्प टीममध्ये अजित आगरकर आणि रोहित शर्मा या मुंबईकर खेळाडूंचा समावेश होता, तर या टीमचा व्यवस्थापक-कम कोच होता मुंबईचाच लालचंद रजपूत.

मुंबई आणि महाराष्ट्राने भारताला अनेक दिग्गज क्रिकेटर्स दिले. प्रत्येक क्रिकेटरने भारतीय क्रिकेटवर आपली छाप उमटवली आहे. मुंबई-महाराष्ट्राच्या या प्रत्येक खेळाडूच्या कामगिरीचा आढावा घेणे येथे जागेअभावी शक्य नाही. पण दोन दिग्गज खेळाडूंचा उल्लेख केल्याशिवाय केवळ भारतीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा इतिहासही पूर्ण होऊ शकणार नाही आणि ते दोन दिग्गज खेळाडू म्हणजे सुनील गावसकर आणि सचिन तेंडुलकर. क्रिकेटमध्ये १० हजार रन्सचा एव्हरेस्ट सगळ्यात आधी पार करण्याचा विक्रम सुनील गावसकर यांनी केला. लक्षात घ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ज्यावेळी फास्ट बॉलर्सची दहशत होती त्यावेळी गावसकर यांनी हेल्मेट न घालता धावांचा पाऊस पाडला. २००७ साली वन डे क्रिकेटचा वर्ल्ड कप कव्हर करायला मी वेस्ट इंडिजमध्ये गेलो होतो. त्यावेळी तीन दशकानंतर वेस्ट इंडिजमधील गावसकराची तेथील लोकप्रियता पाहून भारावून गेलो. १९७१ साली वेस्ट इंडिज टीमची दाणादाण उडवणाऱ्या गावसकरवर लॉर्ड रिलेटर यांनी 'गावसकर कॅलिप्सो' हे गाणे लिहिले. ते इतके लोकप्रिय झाले की, 'कॅलिप्सो ऑफ सेंच्युरी' या शंभर वर्षांतील सर्वोत्कृष्ट कॅलिप्सो गाण्यात 'गावसकर कॅलिप्सो' हे गाणं ६८ व्या क्रमांकावर होते. त्या गाण्याच्या ओळी होत्या….

"ईट वॉज गावसकर
दि रियल मास्टर
जस्ट लाईक वॉल
वुई कुडण्ट आऊट गावसकर ॲट ऑल
नॉट ॲट ऑल
युनोद वेस्ट इंडिज कुडण्ट आऊट गावसकर ॲट ऑल…."

अनुक्रमणिका

तीन दशकांनंतरही तेथील क्रिकेट फॅन्सच्या ओठावर हे कॅलिप्सो गाणे आहे. गावसकर यांनी त्या वेस्ट इंडिज दौऱ्यात १५४·८० च्या सरासरीने ७७४ रन्स केले. त्यात तीन सेंच्युरीज आणि एका डबल सेंच्युरीचा समावेश होता. एकाच टेस्टमध्ये पहिल्या इनिंगमध्ये सेंच्युरी (१२४) तर दुसऱ्या इनिंगमध्ये डबल सेंच्युरीही (२२०) गावसकर यांनी त्या दौऱ्यात विंडीजविरुद्ध केली आणि ही कामगिरी गावसकर यांनी केली ती पदार्पणात सीरीजमध्ये आणि तेही वेस्ट इंडिजसारख्या संघाविरुद्ध. कोणत्याही खेळाडूने पदार्पणात केलेले हे आजवरचे सर्वाधिक रन्स आहेत. गावसकरच्या त्या तुफान कामगिरीच्या जोरावर भारताने वेस्ट इंडिजमध्ये मिळविलेला तो पहिलावहिला टेस्ट सीरीज विजय होता. दुसरा टेस्ट सिरीज विजय मिळविण्यासाठी भारताला २००६ सालापर्यंत म्हणजेच ३५ वर्षांपर्यंत वाट पाहावी लागली होती. यावरून १९७१ च्या त्या विजयाचे महत्त्व लक्षात येईल. गावसकर यांनी क्रिकेटमधील अनेक विक्रम मोडले आणि त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत सचिनने विक्रमांच्या या एव्हरेस्टला आसमानाची उंची गाठून दिली. गावसकर यांनी धावांचा पाऊस पाडला तर सचिन विक्रमांचा पाऊस पाडतोय. सचिनचे अनेक विक्रम येणाऱ्या काळात मोडता येणे कठीणच नव्हे, तर अशक्य कोटीतील बाब आहे. सचिनची प्रत्येक धाव ही आता वर्ल्ड रेकॉर्ड बनते आहे. बॅटिंग, बॉलिंग, फिल्डिंगमध्ये तर त्याने विक्रम केलेच पण सर्वाधिक मॅन ऑफ द मॅचचा किताब जिंकणाराही तो जगातील एकमेव खेळाडू आहे.... मॅच जिंकण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूला मॅन ऑफ द मॅचचा किताब देण्यात येतो, यावरून सचिनच्या महानतेची कल्पना येऊ शकते.

भारतीय क्रिकेटवर मुंबई-महाराष्ट्र छाप पाडत असताना एक गोष्ट येथे आवर्जून नमूद करावीशी वाटते ती म्हणजे क्रिकेट हा खेळ लोकप्रिय असूनही त्याची व्याप्ती महाराष्ट्रातील शहरांपुरतीच मर्यादित राहिली. खेडोपाड्यात हा खेळ खेळला जातो, पण मुंबई आणि पुण्याच्या तुलनेत महाराष्ट्राच्या खेडोपाड्यातून क्रिकेटर्स तयार करण्यात क्रिकेट संघटना अपयशी ठरल्या. खेळातील पैसा आणि लोकप्रियतेला गावपातळीपर्यंत नेण्यात मुंबई आणि महाराष्ट्र संघटनेला अपयश आले आहे. इंडियन प्रिमियर लीगच्या निमित्ताने आता स्थानिक खेळाडूंना खेळवणे सक्तीचे झाल्याने पुणे आणि महाराष्ट्रातील इतर खेळाडूंना नवे व्यासपीठ मिळाले आहे. पण हेच या संघटनांना अधीही करता आले असते. एकमात्र खरे, खेळात करीयर करता येऊ शकते हे क्रिकेटने दाखवून दिले.

**हॉकीत चक दे इंडिया**

क्रिकेटनंतर महाराष्ट्राने सर्वाधिक नावलौकिक कमावला तो हॉकीत. तब्बल ४० पेक्षा अधिक ऑलिम्पियन महाराष्ट्राने भारताला दिले. १९३६ च्या बर्लिन ऑलिम्पिकमध्ये भारताला गोल्ड मेडल जिंकून देणारे बाबू निमल आणि पुण्याचे जोसेफ फिलिप्स, १९४६ च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये गोल्ड मेडल जिंकून देणारे गोल कीपर लिओ पिंटो, रोम ऑलिम्पिकमध्ये सिल्व्हर मेडल जिंकणारे शांताराम जाधव, गोविंद सावंत, ते बंडू पाटील, शिवाजी पवार, शंकर लक्ष्मण, जो फेलिक्स, जोकीम कार्वालो ते धनराज पिल्लेपर्यंत भारतीय हॉकीत महाराष्ट्राने मोठे योगदान दिले आहे. धनराज पिल्लेने तर चार ऑलिम्पिक (१९९२, १९९६, २०००, २००४), चार वर्ल्ड कप (१९९०, १९९४, १९९८, २००२), चार चॅम्पियन्स ट्रॉफी (१९९५, १९९६, २००२, २००४) आणि चार एशियन गेम्समध्ये (१९९०, १९९४, १९९८ आणि २००३) भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. अशी कामगिरी करणारा तो भारताचा एकमेव खेळाडू आहे! धनराजच्या कॅप्टन्सीखाली १९९८ मध्ये भारताने एशियन गेम्स आणि २००३ साली आशियाई हॉकी स्पर्धेचे विजेतेपद पटकावले होते.

अनुक्रमणिका

**कुस्तीत मैदान मारले....**

मुंबईला जसे भारतीय क्रिकेटची राजधानी म्हटले जाते तसे कोल्हापूरला कुस्तीची राजधानी. कोल्हापूर आणि शेजारच्या सांगली, साताऱ्याने महाराष्ट्रातील कुस्तीला राजाश्रय आणि लोकाश्रयही मिळवून दिला. लाल मातीतील रांगडा खेळ ही कुस्तीची ओळख आजही येथे श्रद्धेने जपली जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवर कुस्ती मातीतून मॅटवर गेली पण मातीशी असलेले या खेळाचे नाते आजही अबाधित आहे. भारतीय कुस्तीला दिशा देण्याचे काम महाराष्ट्राने केले. राजर्षि छत्रपती शाहू महाराज आणि छत्रपती राजाराम यांनी राजाश्रय दिल्याने हा खेळ महाराष्ट्राच्या मातीत बहरला आणि गावकुसातही वाढला. शाहू महाराजांनी कोल्हापुरात उभारलेले रोमच्या ऑलिम्पिक स्टेडियमच्या धर्तीवरील खासबाग स्टेडियम, आजही महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देतेय.

महाराष्ट्रातील कुस्तीला आंतरराष्ट्रीय नकाशावर मानाचे स्थान मिळवून दिले ते सातारा जिल्ह्यातील कराडच्या खाशाबा जाधव यांनी. भारतीय कुस्तीचे जणू ते पितामहच. १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये पहिलवान खाशाबा यांनी भारताला पहिले वैयक्तिक ब्राँझ मेडल जिंकून दिले. तोवर भारताला सांघिक खेळ असणाऱ्या हॉकी या खेळातचं फक्त मेडल जिंकता आले होते. खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिक मेडल जिंकून भारतीय खेळाडूंना वैयक्तिक खेळात जिंकण्याची जिद्द मिळवून दिली. ऑलिम्पिकमध्ये भारताला दुसरे वैयक्तिक मेडल जिंकण्यासाठी त्यानंतर तब्बल ४४ वर्षे वाट पाहावयाला लागली. लिअँडर पेसनं १९९६ साली टेनिसमध्ये भारताला ब्राँझ मेडल जिंकून दिले होते. यावरून खाशाबांच्या अतुलनीय कामगिरीची कल्पना येईल. खाशाबांनी त्यापूर्वी १८४८ च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये सहभाग नोंदवला होता. त्यावेळी त्यांनी सहाव्या क्रमांकापर्यंत धडक दिली होती. त्यावेळी हुकलेल्या मेडलची भरपाई त्यांनी हेलसिंकीत भरून काढली. पण त्यावेळी भारतीय हॉकी टीमच्या ऑलिम्पिकमधील गोल्डन कामगिरीपुढे खाशाबांची ब्राँझची कामगिरी झाकोळली गेली. खाशाबानंतर ५६ वर्षांनी बीजिंग ऑलिम्पिकमध्ये कुस्तीत ब्राँझ मेडल जिंकणारा सुशील कुमार रातोरात करोडपती झाला. त्याच्यावर बक्षिसांचा वर्षाव झाला. पण वैयक्तिक कर्ज काढून ऑलिम्पिकला जाणाऱ्या खाशाबांचा खिसा मात्र मेडल जिंकल्यानंतरही रिकामाच राहिला होता. कऱ्हाडमधील गोलेश्वर या त्यांच्या गावात १०१ बैलगाड्यांच्या सलामींनी त्यांची निघालेली मिरवणूक हीच काय ती त्यांची कमाई होती. पण एक खरे, खाशाबांनी उपसलेल्या त्या कष्टामुळेच आजची पहिलवानांची पिढी सोन्याची फळे चाखतेय. खाशाबांच्या याच कामगिरीची दखल घेत दिल्लीतील कॉमनवेल्थसाठी उभारण्यात आलेल्या कुस्ती क्रीडा संकुलाला खाशाबा जाधव यांचे नाव देण्यात आले आहे.

भारतीय कुस्तीत खाशाबांचे योगदान दीपस्तंभासमान आहे. खाशाबा जाधव यांनी लावलेल्या रोपट्याचे पुढे हिंद केसरी श्रीपती खंचनाळे, मारुती माने, गणपतराव आंदळकर, दीनानाथ सिंह, दादू चौगुले, हरिश्चंद्र बिराजदार, योगेश दोडके आणि विनोद चौगुले यांनी वटवृक्षात रूपांतर केले. आजही महाराष्ट्राच्या गावखेड्यात लाल मातीची परंपरा त्याच श्रद्धेनं जपली जाते आहे.

**हुतुतू ते कबड्डी.....**

महाराष्ट्राच्या मातीत जसा कुस्तीचा कस लागला तितक्याच ताकदीने कबड्डीचा घुमाराही घुमला. भारतीय कबड्डीच्या वैभवशाली परंपरेची मुहूर्तमेढ याच महाराष्ट्रात रोवली गेली. ही आपणा सगळ्यांसाठी

भूषणावह बाब आहे. १९५० साली राष्ट्रीय कबड्डी फेडरेशनची मुंबईत स्थापना झाली आणि तिथून खऱ्या अर्थाने कबड्डीच्या जागतिकीकरणाला सुरुवात झाली. योगायोग पाहा, ज्या मुंबईत कबड्डीची राष्ट्रीय संघटना स्थापन झाली त्याच मुंबईत कबड्डीची आंतरराष्ट्रीय संघटनाही स्थापन झाली आणि पहिली वर्ल्डकप कबड्डी स्पर्धाही याच मुंबईत दिमाखात पार पडली.

कबड्डी आज ज्या स्वरूपात पाहावयास मिळते आहे. तिला तो जागतिक दर्जा मिळवून देण्यासाठी महाराष्ट्राने सर्वाधिक योगदान दिलं. यासाठी आपल्याला जवळपास शंभर वर्षे मागे जावे लागेल. १९१५ साली पुण्याच्या डेक्कन जिमखान्याने कबड्डीचे नियम करून सर्वप्रथम सामने भरवल्याची नोंद आहे. १९२३ साली बडोद्याच्या हिंद विजय जिमखान्यानेही आपल्या परीने हा खेळ नियमबद्ध करण्याचा प्रयत्न केल्याची नोंद आहे. त्यानंतर १९३१ साली अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेच्या चौथ्या अधिवेशनात या खेळाच्या नियमनासाठी एक समिती गठित करण्यात आली व पुढे १९३७ साली नाशिक येथे झालेल्या अधिवेशनात कबड्डीच्या नियमांना मान्यताही देण्यात आली. त्यापूर्वी १९३६ च्या बर्लिन ऑलिम्पिकमध्येही कबड्डीचा प्रदर्शनीय सामना खेळवल्याची नोंद आढळते. १९४४ साली महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेची स्थापना करण्यात आली आणि त्याचवेळी मुंबई प्रांत हुतुतू संघटनाही अस्तित्वात आली. देशाच्या कोनाकोपऱ्यात खेळली जाणारी कबड्डी वेगवेगळ्या नावाने ओळखली जायची. महाराष्ट्रातही हुतुतू, की कबड्डी हा वाद सुरूच होता. त्याच दरम्यान १९५२ साली सदुभाऊ गोडबोले समितीने कबड्डी शब्दोचाराच्या नियमांची शिफारस केली आणि १९५३ साली कबड्डी फेडरेशनने ते नियम स्वीकारले. बुवा साळवी, दत्ता मालप, दादोबा गावंड, अश्विन कुमार भोईर आणि त्यांच्यासारखे असे अनेक अनाम शिलेदार कबड्डीला लाभले म्हणूनच हा खेळ टिकला आणि वाढला. आज महिला कबड्डीला जगभरात जो सन्मान आहे त्याचे सर्वस्वी श्रेय जाते ते कबड्डीचे भीष्माचार्य शंकरराव तथा बुवा साळवी यांना. नऊवारी साडीतील महिलांना कबड्डीच्या मैदानावर आणण्याचे महान कार्य त्याकाळी बुवांनी केले आणि आज त्याचं फलित म्हणून चीनमधील यंदाच्या एशियाड क्रीडा स्पर्धेत पहिल्यांदा महिला कबड्डीचा समावेश झाला आहे. कबड्डीची सांघिक बांधणी जशी मुंबई-महाराष्ट्रात झाली तशी तिच्या जागतिक प्रचाराची सूत्रेही मुंबई-महाराष्ट्रातूनच हलवली गेली. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण ते शरद पवारांपर्यंत साऱ्यांनीच कबड्डीच्या विकासासाठी आपले योगदान दिले. मोहन धारियांसारख्या कबड्डी प्रेमींनी या खेळाला नवी उंची गाठून दिली. १९७५ साली शरद पवार अखिल भारतीय हौशी कबड्डी संघटनेचे अध्यक्ष झाले आणि कबड्डीनेही सातासमुद्राच्या सीमा ओलांडल्या. विदेशात कबड्डीच्या प्रचार आणि प्रसारासाठी पवारांनी सरकारी मदतीचा हात पुढे केला. कबड्डीला मिळालेल्या या राजाश्रयामुळे खेळाला खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय दर्जा मिळाला. २६ डिसेंबर १९६३ साली तर अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करायला स्वतः तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू उपस्थित होते. १९६८ साली इंदिरा गांधींनीही मुंबईतील कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन केले.

मैदानाबाहेर कबड्डीच्या विकासात मुंबई-महाराष्ट्राचे कबड्डी संघटक झटत असताना प्रत्यक्ष मैदानातही महाराष्ट्राच्या कबड्डी खेळाडूंचा दबदबा होता. मुंबईचे मधुसूदन पाटील हे शिवछत्रपती पुरस्कार पटकावणारे पहिले कबड्डीपटू होते.

देशपातळीवरही महाराष्ट्राचा दबदबा होता. १९३८ आणि १९४० साली झालेल्या पहिल्या दोन्ही राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा महाराष्ट्राने जिंकल्या होत्या तर पहिल्या दहा राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र तब्बल पाच वेळा विजेता होता.

अनुक्रमणिका

भारतातील सर्वोत्तम खेळाडूसाठी दिला जाणारा अर्जुन क्रीडा पुरस्कार पटकावण्यातही महाराष्ट्राचे कबड्डीपटू आघाडीवर होते. महाराष्ट्राचे सदानंद शेटे, भोला मोहीन, शांताराम जाधव, अशोक शिंदे आणि पी. गणेश या पुरुष खेळाडूंना तर शकुंतला खटावकर, माया आक्रे, मोनिक नाथ आणि रमा सरकार या महिला कबड्डीपटूंनाही अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आणि आजही ही परंपरा कायम आहे.

**खो-खो ला लोकाश्रय लाभला**

कुस्ती आणि कबड्डीला महाराष्ट्रात राजाश्रय मिळत असतानाच तितक्याच ताकदीच्या किंबहुना अधिक वेगवान अशा खो-खो खेळाला महाराष्ट्राने खऱ्या अर्थाने लोकाश्रय दिला आणि त्याच जोरावर खो-खो आजही तग धरून आहे. १९१५ मध्ये डेक्कन जिमखान्याने खो-खो ला स्पर्धात्मक रूप देण्याचा पहिला प्रयत्न केला. त्यानंतर भाई नेरूरकर यांच्या अथक प्रयत्नातून खो-खोला खऱ्या अर्थाने संघटनात्मक रूप मिळाले. राष्ट्रीय पातळीवर खो-खोला संघटनात्मक रूप देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या निधनानंतर १९६३ साली भाई नेरूरकर सुवर्ण चषक अखिल भारतीय पुरुष आणि महिला खो-खो स्पर्धेचे आयोजन होऊ लागले. तब्बल १५ वर्षे ही स्पर्धा सुरू होती. या स्पर्धेची कीर्ती इतकी पसरली होती, की २१ मे १९६५ रोजी या स्पर्धेतील थरार पाहायला रशियाचे व्हाईस कौन्सिलर गॉर बोनी, गॅली शिनकॉन व गेनाडी मातुशीन उपस्थित होते. खो-खोच्या प्रचार आणि प्रसारासाठी मुंबई-महाराष्ट्राचा पुढाकार हा सर्वाधिक होता.

दरम्यानच्या काळात पुण्यातील गोपाळ फडके यांनीही खो-खोच्या प्रचारासाठी चक्क चित्रफीत तयार केली होती. पुण्याच्या नव महाराष्ट्र व आर्य क्रीडोपासक मंडळांनी नेपाळचा केलेला दौरा, खो-खो आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यात महत्त्वाचा ठरला. क्रिकेटच्या पंढरीत मुंबईच्या वानखेडे स्टेडियमला जे स्थान आहे तेच स्थान खो-खोत धुळ्याच्या गरूड मैदानाला आहे. धुळ्यातील गरूड मैदान आणि खो-खो पटूंचे एक अतूट नाते आहे. खो-खोतील सहाही गटातील अजिंक्यपद स्पर्धा आयोजित करण्याचा मान या गरूड मैदानाने मिळवला आहे.

बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ हे १९८५ साली भारतीय खो-खो संघटनेचे अध्यक्ष होते आणि केंद्रात ते तत्कालीन नभोवणी मंत्रीही होते. त्यांच्याच पुढाकाराने १९८५ सालातील पुण्यातील राष्ट्रीय खो-खो स्पर्धेचे दूरदर्शनवरून पहिल्यांदा थेट प्रेक्षपण झाले होते. खो-खोच्या प्रसारासाठी हे थेट प्रक्षेपण मैलाचा दगड ठरले. अनेक युवा खेळाडू त्यामुळे या खेळाकडे आकर्षित झाले. पण खो-खो आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्यासाठी १९९६ साल उजाडावे लागले. कोलकोत्यात झालेल्या पहिल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत जगातील पाच देश सहभागी झाले होते. पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंकेचा समावेश असलेली ही स्पर्धा भारताने जिंकली होती आणि त्या आशियाई खो-खो स्पर्धेतील पहिल्यावहिल्या भारतीय टीमचा कॅप्टन होता महाराष्ट्राचा नरेंद्र शहा. त्या पहिल्या भारतीय टीममध्ये महाराष्ट्राच्या ललित सावंत, मंगेश पाठारे आणि आशुतोष गायकैवारी यांचा समावेश होता.

भारतीय रणजी क्रिकेटमध्ये जसा मुंबईचा दबदबा, अगदी तसाच दबदबा राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राचा आहे. आजवर झालेल्या ४४ राष्ट्रीय पुरुष खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राने विक्रमी ३६ वेळा विजेतेपद पटकावले आहे, तर ६ वेळा महाराष्ट्राच्या पुरुषांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले

अनुक्रमणिका

आहे. याचाच अर्थ ४४ पैकी ४२ वेळा महाराष्ट्राच्या पुरुषांनी फायनलमध्ये धडक दिली आहे. हीच स्थिती महिला विभागात आहे. आजवर झालेल्या ४३ महिला राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिलांनी १४ वेळा अजिंक्यपद पटकावले तर १३ वेळा त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले आहे.

मुंबई-महाराष्ट्राने अनेक अर्जुन पुरस्कार विजेते खेळाडू भारताला दिले. खो-खोसाठी देण्यात आलेल्या आजवरच्या एकूण १३ पुरस्कारांपैकी ६ पुरस्कार हे महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पटकावले आहेत. पुरस्कार पटकावणारे खेळाडू पुढीलप्रमाणे :—

| | | |
|---|---|---|
| १९७६ | - | श्रीरंग इनामदार (नवमहाराष्ट्र संघ, पुणे) |
| १९७६ | - | उषा नगरकर (सरस्वती कन्या संघ, पुणे) |
| १९७७ | - | शेखर धारवडकर (सन्मित्र संघ, पुणे) |
| १९८२ | - | हेमंत टाकळकर (सन्मित्र संघ, पुणे) |
| १९८३ | - | वीणा परब (वैभव क्लब, मुंबई) |
| १९८४ | - | सुरेखा कुलकर्णी (इगल्स, पुणे) |

इतकेच काय, तर खो-खोच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूसाठी देण्यात येणारा पहिलावहिला एकलव्य क्रीडा पुरस्कार महाराष्ट्राच्या खेळाडूने पटकावला होता. १९६३ साली इंदूर येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत मुंबईच्या विश्वनाथ मयेकर यांनी हा मानाचा पहिला पुरस्कार पटकावला होता.

**नेमबाजीत महाराष्ट्राने नेम साधला...**

नेमबाजीत जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर झेप घेणारी पहिली भारतीय खेळाडू महाराष्ट्राची होती. अंजली भागवतने ही किमया केली होती. नेमबाजीत वर्ल्ड रेकॉर्डशी बरोबरी करणारी पहिली भारतीय खेळाडू महाराष्ट्राची होती. महाराष्ट्राच्या सुमा शिरुरने ४०० पैकी ४०० गुणांची कमाई करीत भारतासाठी पहिला वर्ल्ड रेकॉर्ड केला होता. इतकेच नव्हे, तर कॉमनवेल्थमध्ये पिस्तुल प्रकारात पहिले गोल्डमेडल जिंकणारा खेळाडूही महाराष्ट्राचा होता. अशोक पंडित यांनी भारतासाठी कॉमनवेल्थचे पहिले गोल्ड मेडल जिंकले होते. विक्रमांची ही परंपरा आजतागायत कायम आहे. भारतीय शूटिंगच्या जडणघडणीत महाराष्ट्राचे योगदान अतुलनीय आहे. सिडनी ऑलिम्पिकमध्ये अंजलीचे ऑलिम्पिक मेडल काही शतांश गुणांनी हुकले, पण तिच्या त्या कामगिरीने भारतातील केवळ महिलांनाच नव्हे तर पुरुष खेळाडूंनाही जिंकण्याची एक जिद्द मिळवून दिली. अथेन्स ऑलिम्पिकमध्ये राज्यवर्धन राठोडने जिंकलेले सिल्व्हर मेडल असो अथवा अभिनव बिंद्राने बीजिंग ऑलिम्पिकमध्ये जिंकलेले गोल्ड मेडल... त्यांच्या या यशाचा पाया महाराष्ट्राच्या या जिगरबाज खेळाडूंच्या कामगिरीत दडलेला आहे. मी स्वतःला याबाबत नशिबवान समजतो कारण राज्यवर्धन राठोडचे अथेन्समधील सिल्व्हर आणि अभिनवचे बीजिंग ऑलिम्पिकमधील गोल्डमेडल जिंकतानाच्या कामगिरीचा मी साक्षीदार होतो. भारताचे पहिले सिल्व्हर आणि पहिले गोल्डमेडल जिंकताना मी पाहिले आहे. या दोन्ही ऑलिम्पिकचे वार्तांकन त्या त्या देशात जाऊन करताना मी अनुभवला तो माहाराष्ट्राच्या नेमबाजांना मिळणारा मानसन्मान... अशोक पंडित ते अंजली भागवतचा हा वसा आता जगज्ञेती तेजस्विनी सावंत आणि जगज्ञेता नवनाथ फडतरे चालवत आहेत. दिल्लीत नुकत्याच संपन्न झालेल्या कॉमनवेल्थ स्पर्धेत महाराष्ट्राच्या अनिसा सय्यदनं दोन गोल्ड

अनुक्रमणिका

मेडल्स जिंकली, तर राही सरनौबतने एक गोल्ड आणि एक सिल्व्हर मेडल जिंकले...तेजस्विनी सावंत, सुमा शिरुर यांनीही या स्पर्धेत सिल्व्हर आणि ब्राँझ मेडलची लयलूट केली. २००५ च्या आशियाई शूटिंग स्पर्धेत महाराष्ट्राच्या रौनक पंडितने ७ गोल्ड मेडल्स आणि १ सिल्व्हर मेडलची विक्रमी कमाई केली होती. २००६ च्या मेलबॉर्न कॉमनवेल्थ गेममध्ये तेजस्विनी सावंतने २ गोल्ड मेडल्स तर रौनक पंडितने १ गोल्डमेडल जिंकले होते. अंजली भागवतने १ सिल्व्हर मेडल जिंकले होते. क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय कामगिरीसाठी भारत सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या सर्वोच्च अशा 'राजीव गांधी खेलरत्न' पुरस्कारासाठी महाराष्ट्राच्या अंजली भागवतची निवड करण्यात आली होती. हा सर्वोच्च असा पुरस्कार पटकावणारी ती भारतातील पहिली नेमबाज खेळाडू ठरली. नेमबाजीतील कौतुकास्पद कामगिरीसाठी महाराष्ट्राच्या अशोक पंडितसह अंजली भागवत, दीपाली देशपांडे, सुमा शिरूर यांना अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. भारतीय नेमबाजीसाठी महाराष्ट्राने खऱ्या अर्थाने अचूक नेम साधला!

**बुद्धिबळातही महाराष्ट्राचीच चाल पहिली!**

इतर खेळांप्रमाणे बुद्धिबळाच्या राष्ट्रीय संघटनेची स्थापनाही महाराष्ट्रातील मुंबईत झाली. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर मुंबई - महाराष्ट्राने अवघ्या भारताला बुद्धिबळाचे सध्याचे स्पर्धात्मक रूप मिळवून दिले. महाराष्ट्रात १९२१ साली साऊथ महाराष्ट्र चेस असोसिएशनच्या नावाने पहिल्यांदा बुद्धिबळाला संघटनात्मक रूप मिळाले. गोविंदराव पडसलगीकर, विनायकराव खाडिलकर, गोपाळराव मुजुमदार, ताम्मन काळे आणि स्टॅम्प विक्रेते आपटे यांच्या पुढाकाराने बुद्धिबळाच्या संघटनात्मक प्रवासाला सुरुवात झाली. बुद्धिबळासाठी विदेश प्रवास करणारे विनायकराव खाडिलकर हे पहिले बुद्धिबळपटू होते. १९२२ साली डॉ. व्ही. एन्. देसाई यांनी सांगलीत बुद्धिबळाची पहिली स्पर्धा सुरू केली. पुढे १९३० साली पडसलगीकर, दादासाहेब गाडगीळ आणि विष्णुपंत राजवाडे यांनी सांगली चेस सोसायटीची स्थापना केली. तिथूनच मग नूतन बुद्धिबळ मंडळ १९४१ मध्ये स्थापन झाले. याच नूतन बुद्धिबळ मंडळाने आजवर हजारो बुद्धिबळपटू घडविले. बुद्धिबळाचा बेताज बादशहा विश्वनाथन आनंदही या स्पर्धेत खेळलाय. मुंबईत १९५० साली ऑल इंडिया चेस फेडरेशनची स्थापना झाली आणि पुढील ५ वर्षे मुंबईत राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन होत राहिले.

अगदी भारताचा पहिला ग्रँडमास्टर खेळाडू हा खरे तर महाराष्ट्राचाच होणार होता. कारण पुरुषांमध्ये पहिला आंतरराष्ट्रीय ग्रँडमास्टर नॉर्म मिळवणारा खेळाडू महाराष्ट्राचा होता. प्रवीण ठिपसे यांनी हा नॉर्म पटकावला होता, पण ग्रँडमास्टर किताबासाठी आवश्यक असणारे तीन नॉर्मस् मिळविण्यात ठिपसे यांना अमळ उशीर झाला आणि विश्वनाथन आनंद हा भारताचा पहिला ग्रँडमास्टर किताब पटकावणारा खेळाडू ठरला. त्यानंतर दिबेंदू बारुआनं ग्रँडमास्टर हा किताब पटकावला आणि मग प्रवीण ठिपसे ग्रँडमास्टर किताब जिंकणारे भारताचे तिसरे खेळाडू ठरले. त्यांच्या पत्नी भाग्यश्री ठिपसे याही ग्रँडमास्टर नॉर्म पटकावणाऱ्या भारताच्या पहिल्या महिला बुद्धिबळपटू आहेत.

प्रवीण ठिपसेसह अभिजित कुंटेनेही प्रतिष्ठेचा ग्रँडमास्टर किताब पटकावला आहे. तर स्वाती घाटेने महिला ग्रँडमास्टर किताब जिंकला आहे.

अगदी अलीकडच्या काळापर्यंत महाराष्ट्राचे भारतीय बुद्धिबळावर वर्चस्व होते. प्रवीण ठिपसे तर सात वेळा राष्ट्रीय बुद्धिबळ विजेते होते. तर महिलात रोहिणी खाडिलकरने पाच वेळा राष्ट्रीय बुद्धिबळ

अनुक्रमणिका

स्पर्धा जिंकली. आशियाई बुद्धिबळ स्पर्धा जिंकणारी ती पहिली भारतीय महिला बुद्धिबळपटू आहे. दोन वेळा तिने ही स्पर्धा जिंकली. तिच्या याच कामगिरीसाठी तिला अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बुद्धिबळ या खेळासाठी अर्जुन पुरस्कार पटकावणारी ती पहिली महिला बुद्धिबळपटू ठरली. रोहिणीसह महाराष्ट्राच्या प्रवीण ठिपसे, भाग्यश्री ठिपसे, अनुपमा गोखले यांनीही बुद्धिबळातील अतुलनीय कामगिरीसाठी अर्जुन पुरस्कार पटकावला आहे. रोहिणीसोबतच तिच्या बहिणी वासंती आणि जयश्री खाडिलकरनेही बुद्धिबळ स्पर्धा गाजवली होती. तर त्यावेळी शरद टिळक, शेखर साहू, राहुल शेट्टी आणि रवी हेगडे यांनीही आंतरराष्ट्रीय किताब पटाकावत महाराष्ट्राच्या बुद्धिबळ यशात आपले योगदान दिले.

**टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राचा दबदबा**

या खेळातील महाराष्ट्राचा दबदबा इतका होता, की राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेच्या सेमी फायनलमध्ये बहुतांशवेळा महाराष्ट्राचेच खेळाडू आमने-सामने ठाकायचे. टेबल टेनिसमधील पहिला अर्जुन पुरस्कारही बहाल करण्यात आला तो मुंबईच्या जयंत व्होरा यांना. जयंत व्होरा ते कमलेश मेहतापर्यंत महाराष्ट्राने भारतीय टेबल टेनिसवर वर्चस्व गाजविले. महाराष्ट्राच्या कमलेश मेहताने आपल्या अफाट कामगिरीने स्वतःचे असे एक स्थान या खेळात निर्माण केले होते. टेबल टेनिस म्हणजेच जणू कमलेश मेहता असे जणू त्याकाळी समीकरणच झाले होते. १९८१ ते १९९४ दरम्यान कमलेश मेहताने तब्बल ११ वेळा राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेची फायनल गाठली होती. त्यापैकी तब्बल ८ वेळा त्याने राष्ट्रीय स्पर्धेचे विजेते पद पटकावले. कमलेशने सात वर्ल्डकप स्पर्धेत, आठ आशियाई टेबल टेनिस स्पर्धेत, दोन एशियाड स्पर्धेत आणि सहा कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले. १९८२ ते १९८९ दरम्यान कमलेश भारतीय टेबल टेनिस टीमचा कॅप्टनही होता. सहा कॉमनवेल्थ स्पर्धेत मिळून कमलेश मेहताने चार सिल्वर आणि चार ब्रॉंझ मेडल्स जिंकली. १९९१ च्या सॅफ स्पर्धेत कमलेशने ७ विक्रमी गोल्ड मेडल्सची कमाई केली. त्याच्या याच विक्रमी कामगिरीसाठी त्याला प्रतिष्ठेच्या अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आले.

१९५२ साली टेबल टेनिसची वर्ल्ड चॅम्पियन्सशिप मुंबईत खेळवण्यात आली. भारतीय टेबल टेनिससाठी ही स्पर्धा म्हणजे मैलाचा दगड ठरली. कारण या स्पर्धेच्या निमित्ताने आशिया खंडात पहिल्यांदाच टेबल टेनिसची जागतिक स्पर्धा आयोजित होत होती. अगदी चाळीसच्या दशकात उत्तन चंद्रन ते पन्नाशीच्या दशकात दिलीप संपत, सुधीर ठाकरसी, यतीन व्यास आणि जयंत व्होरा यांनी टेबल टेनिसमध्ये आपला दबदबा निर्माण केला. फारूक खोदायजी, नीरज बजाज आणि विलास मेनन यांनी सत्तरचे दशक गाजविले. कमलेश मेहता, एस्. रामास्वामी, एस्. श्रीराम आणि सुजय घोरपडे यांनीही महाराष्ट्राच्या टेबल टेनिसवर आपला ठसा उमटवला.

**बॅडमिंटनमध्येही महाराष्ट्रच पहिला!**

भारतीय बॅडमिंटनपटूही आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकू शकतात हा विश्वास महाराष्ट्राने सगळ्यात पहिल्यांदा भारताला दिला. नंदू नाटेकर हे विदेशात बॅडमिंटनचे विजेतेपद पटकावणारे पहिले भारतीय बॅडमिंटनपटू होते. १९५६ साली क्वालालम्पूर येथे झालेल्या सेलँगोर बॅडमिंटन स्पर्धेतील पुरुष एकेरीचे विजेतेपद नंदू नाटेकर यांनी पटकावले होते. टेबल टेनिसप्रमाणे बॅडमिंटनमध्येही प्रतिष्ठेचा पहिला अर्जुन पुरस्कार हा महाराष्ट्राच्या खेळाडूने पटकावला. नंदू नाटेकर हे बॅडमिंटनमधील पहिल्या अर्जुन पुरस्काराचे मानकरी ठरले. त्यांच्याच गौरवशाली कामगिरीचा वसा पुढे प्रदीप गंधे, अमी घिया, लेरॉय डिसूझा, उदय

अनुक्रमणिका

पवार, संजय शर्मा, राजीव बागा, निखिल कानेटकर आणि अपर्णा पोपट यांनी पुढे सुरू ठेवला. स्वातंत्र्यपूर्व काळात देवधर भगिनींनी राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धा गाजविली होती. १९४२ ते १९४४ अशी सलग तीन वर्षे तारा देवधर राष्ट्रीय विजेती होती. तर त्याच दरम्यान ४२ व ४३ साली ताराने आपली बहीण सुंदरसह महिला दुहेरीचेही राष्ट्रीय विजेतेपद काबीज केले होते. शैलजा साळोखे, नागपूरच्या सरोजिनी आपटे तसेच सरोजिनी गोगटे या महाराष्ट्राच्या महिलांनीही अनुक्रमे ६६ व ६७ साली विजेतेपद पटकावले होते. त्यानंतर ६८, ६९, व ७० अशी तीन वर्षे दमयंती तांबे यांनी महिला राष्ट्रीय विजेतेपद पटकावले होते. पण या महिला बॅडमिंटनवर खऱ्या अर्थाने ठसा उमटविला तो अपर्णा पोपटने. अपर्णाने १९९७ ते २००६ अशी सलग दहा वर्षे राष्ट्रीय महिला बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. भारतीय क्रीडा क्षेत्रातील हा एक नवा उच्चांक ठरला आहे. त्यानंतर महाराष्ट्राच्या तृप्ती मुरगुंडेने राष्ट्रीय महिला बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद पटकावत ही परंपरा कायम राखली.

**पहिला जगज्ञेता महाराष्ट्राने दिला!**

बिलियर्ड्स या खेळाने भारताला खऱ्या अर्थाने जगज्ञेता राष्ट्र बनविले. स्वतंत्र भारताचा पहिला जगज्ञेता खेळाडू देण्याचा मान बिलियर्ड्सने पटकावला आणि तोही महाराष्ट्राच्या खेळाडूने. पुण्यात जन्मलेल्या आणि मुंबईत क्रीडा कारकीर्द घडविणाऱ्या विल्सन जोन्स यांनी १९५८ साली बिलियर्ड्सचे जगज्ञेतेपद पटकावले. कोणत्याही वैयक्तिक खेळात भारताला मिळालेले ते पहिले जगज्ञेतेपद होते. पुढे १९६४ मध्ये जोन्स यांनी पुन्हा एकदा वर्ल्ड चॅम्पियनशीप भारताकडे खेचून आणली. तब्बल १२ वर्षे जोन्स राष्ट्रीय विजेते होते. भारताला महाराष्ट्राने जोन्स यांच्यासह मायकल फरेरा आणि गीत सेठी असे एकूण ३ जगज्ञेते बिलियर्ड्सपटू दिले. याशिवाय आशियाई स्नूकर स्पर्धा जिंकणारा यासिन मर्चंटही मुंबईचाच. जागतिक बिलियर्ड्समध्ये महाराष्ट्राचे खेळाडू वर्ल्डक्लास कामगिरी करत असतानाच राष्ट्रीय बिलियर्ड्स आणि स्नूकर स्पर्धेतही महाराष्ट्राच्या खेळाडूंनी तितक्याच ताकदीची कामगिरी केली. अशोक शांडिल्य, यासिन मर्चंट, देवेंद्र जोशी आणि ओम अग्रवाल या खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धा जिंकत महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. पुरुष विभागात दिमाखदार कामगिरी होत असताना मीनल आणि अनुजा या ठाकूर भगिनींनी राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राची पताका डौलाने फडकवत ठेवली.

**फूटबॉलमध्ये ऑलिम्पिक मेडल हुकले....**

१९५६ च्या मेलबॉर्न ऑलिम्पिकमध्ये भारताचे फूटबॉलमधील मेडल थोडक्यात हुकले होते. त्या ऑलिम्पिकमध्ये भारताला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. त्या ऑलिम्पिकमध्ये मुंबईकर नेव्हिल डिसूझाने क्वॉर्टर फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध गोलची हॅट्ट्रीक नोंदविली होती. भारताने ती मॅच ४-२ अशी जिंकली. त्या मेलबॉर्न ऑलिम्पिकमध्ये नेव्हिल डिसूझा संयुक्तपणे टॉप स्कोअरर होते. मुंबई आणि एकूणच महाराष्ट्राला फूटबॉलची मोठी परंपरा आहे. भारतातील दुसऱ्या क्रमांकाची सगळ्यात जुनी रोव्हर्स कप फूटबॉल स्पर्धा याच मुंबईत १८९१ साली सुरू झाली. मुंबईतील कुपरेज मैदान या स्पर्धेतील अजरामर लढतींचा साक्षीदार आहे. १९५८ साली मुंबईच्या कोल्टेक्स संघाने पहिल्यांदा रोव्हर्स कप जिंकला. कूपरेजवरचे आपले कौशल्य आजमावणाऱ्या मुंबईकर फूटबॉलपटूंनी १८५४-५५ साली पहिल्यांदा संतोष चषक फूटबॉल स्पर्धा जिंकली. त्यानंतर १९६३-६४ साली मद्रासमध्ये तर १९९०-९१ साली पल्लकडमध्ये आणि १९९९-२००० साली त्रीशुरमध्ये संतोष ट्रॉफी स्पर्धा जिंकली.

अनुक्रमणिका

१९४८ च्या ऑलिम्पिकमध्ये भारतीय फूटबॉल टीम अनवाणी खेळली होती. त्या टीममध्ये मुंबईच्या पी. परब संजीव उच्चील आणि टी. एम. वर्गीस या खेळाडूंचा समावेश होता. याशिवाय मुंबईने भारताला अनेक आंतरराष्ट्रीय फूटबॉलपटू दिले. ज्यामध्ये एस्. एस्. तथा बाबू नारायण, अँथोनी ब्रेगेंझा, नेव्हिले डिसूझा, पीटर फेरो, डेरिक डिसूझा, फॉर्ट्युनटो फ्रँको, मार्टो ग्रेसियस, शबीर अली, रणजीत थापा, अमर बहादूर आणि बेर्नार्ड फरेरा या खेळाडूंचा समावेश होता. बाबू नारायण तर १९५६ आणि १९६० च्या ऑलिम्पिकमध्ये भारतीय टीमचे गोलकीपर होते.

**बॉक्सिंगमध्येही नंबर वन!**

भारताचा पहिला अर्जुन पुरस्कार विजेता बॉक्सर हा महाराष्ट्राचा होता. बुद्दी डिसुझाने तब्बल ९ वेळा राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेचे विजेतेपद काबीज केले होते. बॉक्सिंगमध्ये अनेक अर्थाने महाराष्ट्र नंबर वन आहे. विशेषता बॉक्सिंगला संघटनात्मक स्थिरता देण्यात महाराष्ट्राने पथदर्शी भूमिका बजावली. केवळ भारतातीलच नव्हे, तर आशियातील सगळ्यात जुनी आणि मानाची समजली जाणारी वेस्टर्न इंडिया बॉक्सिंग चॅम्पियनशिप महाराष्ट्राने सुरू केली. इतकेच नव्हे, तर १९२५ सालापासून मुंबईत इंटर कॉलिजिएट बॉक्सिंग चॅम्पियनशिप सुरू करण्यात आली. भारताची सगळ्यात पहिली आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धाही मुंबईतच सुरू झाली. आणि भारताची पहिली राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धाही १९५० साली मुंबईच्या ब्रेबॉर्न स्टेडियमवर मोठ्या दिमाखात आयोजित करण्यात आली. भारतातील पहिल्या आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजनही मुंबईतच करण्यात आले होते. १९८० साली आशियाई बॉक्सिंग स्पर्धेच्या रूपाने मुंबईत आणि पर्यायाने भारतातही पहिल्या आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन झाले होते. बॉक्सिंगमधील याच प्रशासकीय कामाची दखल घेत भारत सरकारतर्फे ॲस्पी अदाजानिया यांना पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले. मणिपूरच्या मेरी कोमने महिलांची जागतिक बॉक्सिंग स्पर्धा जिंकून भारतीय महिलांचा आवाज बुलंद केला. पण महिलांसाठी पहिली बॉक्सिंग स्पर्धा १९९४ साली महाराष्ट्राने आयोजित केली होती. बॉक्सिंगमधील अतुलनीय कामगिरीसाठी बुद्दी यांच्यासमवेत गोपाळ देवांग, मनोज पिंगळे आणि मुकुंद किल्लेदार या महाराष्ट्राच्या बॉक्सर खेळाडूंचा अर्जुन पुरस्काराने गौरव करण्यात आला.

**टेनिसमधील 'गौरवशाली' कामगिरी**

महाराष्ट्राच्या टेनिसचा इतिहास सांगायचा झाला, तर त्यात गौरव नाटेकर याची कामगिरी सगळ्यात वरची आहे. तब्बल सात वेळा टेनिसचे राष्ट्रीय विजेतेपद गौरव नाटेकरने काबीज केले. १९९२ ते ९७ दरम्यान भारतीय डेव्हिस कप टीमचा तो सदस्य होता. १९९२ सालच्या डेव्हिस कप टेनिस स्पर्धेची सेमी फायनल गाठणाऱ्या टीममध्ये गौरव नाटेकरचा समावेश होता. १९९४ च्या हिरोशिमा एशियाडमध्ये गौरवने लिएण्डर पेससोबत दुहेरीत एक आणि एक सांघिक अशी दोन गोल्ड मेडल पटकावली. १९९३, १९९५ आणि १९९७ च्या सॅफ गेममध्ये गौरवने प्रत्येकी दोन गोल्ड मेडल्स जिंकली. याच कामगिरीची दखल घेत त्याला क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या अशा अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आले. आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू आणि अर्जुन पुरस्कार प्राप्त नंदू नाटेकर हे गौरवचे वडील. वडिलांप्रमाणेच गौरवनेही आपल्या कामगिरीने महाराष्ट्राला गौरव प्राप्त करून दिला आहे.

अनुक्रमणिका

**कविताचा विजय असो**

दिल्लीत नुकत्याच झालेल्या कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धेत कविता राऊतने १०००० मीटर शर्यतीत ब्रॉंझ मेडल जिंकले आणि इतिहास घडविला. कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धेत मेडल जिंकणारी ती महाराष्ट्राची पहिली ॲथलेट ठरली. नाशिकच्या आदिवासी पाड्यातून आलेल्या कविताने आपल्या जिद्दीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. तसे पाहता ॲथलेटिक्समध्ये महाराष्ट्राच्या वाट्याला फारसे यश आलेले नाही. महाराष्ट्राच्या केनेथ पॉवेल, आदी सिक्वेरा, आदिल सुमारीवाला, वंदना शानबाग आणि रचिता मिस्त्री यांना ॲथलेटिक्समधील अतुलनीय कामगिरीसाठी अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

सिक्वेरा यांनी १५०० आणि ५००० मीटर शर्यतीत भारतात आपला दबदबा निर्माण केला होता. १५०० मीटर शर्यतीत त्यांनी नोंदवलेला राष्ट्रीय विक्रम तब्बल २० वर्षे अबाधित होता. १५०० आणि ५००० मीटर शर्यतीतील त्यांचे राज्य विक्रम आज जवळपास ४० वर्षांनंतरही अबाधित आहेत. आदिल सुमारीवाला १०० मीटरमध्ये राष्ट्रीय चॅम्पियन होते. त्यांनी नोंदवलेला १०·४ सेकंदाचा राज्य विक्रम जवळपास ३० वर्षांनंतर आजही अबाधित आहे. महिलांच्या ४ बाय ४०० मीटर शर्यतीत वंदना शानबागने राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली होती. रचिता मिस्त्रीने भारताची फास्टेट महिला होण्याचा बहुमान पटकावला होता. महिलांच्या १०० मीटर शर्यतीत रचिता मिस्त्रीने ११·३८ सेकंदांचा राष्ट्रीय विक्रमही नोंदवला होता. ११·३२ ही तिची वैयक्तिक सर्वोत्तम वेळ होती.

**जलतरणाचा 'धवल' काळ**

भारतीय जलतरणाचा आंतरराष्ट्रीय चेहरा देण्याचे काम महाराष्ट्राच्या वीरधवल खाडे याने केले. ऑलिम्पिकसाठी थेट पात्र ठरणारा तो आजवरचा सर्वात लहान भारतीय खेळाडू ठरला आहे. बीजिंग ऑलिम्पिकमध्ये तो ५० मीटर, १०० मीटर आणि २०० मीटर शर्यतीसाठी पात्र ठरला होता. कोल्हापूरच्या वीरधवल खाडेच्या नावावर आजघडीस ५०, १००, २०० आणि ४०० मीटर फ्रीस्टाईल शर्यतीचे राष्ट्रीय विक्रम आहेत. शिवाय ५० मीटर बटरफ्लाय शर्यतीचा राष्ट्रीय विक्रमही वीरधवलच्या नावावर आहे. बीजिंग ऑलिम्पिकमध्ये तो सेमीफायनल गाठण्यात अपयशी ठरला पण त्याने तिथे नव्या राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली.

२००६ साली झालेल्या दक्षिण आशियाई जलतरण स्पर्धेत त्याने तीन नव्या विक्रमांसह एकूण ६ गोल्ड मेडल्स जिंकली होती, तर ३३ व्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत पाच नव्या स्पर्धा विक्रमांची नोंद करत त्याने पुन्हा ६ गोल्ड मेडल्स जिंकली होती. चीनमध्ये झालेल्या आशियाई जलतरण स्पर्धेत वीरधवल खाडेने सिल्व्हर मेडलची कमाई केली होती. पुण्यात झालेल्या युथ कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धेत वीरधवलने ३ गोल्ड आणि २ सिल्व्हर मेडल्स जिंकली.

महाराष्ट्रासाठी जलतरणात ८० चे दशक सुवर्णकाळ होता. अनिता सूद, पर्सिस मदन, स्मिता देसाई आणि डॉली नझिर यांनी एकामागोमाग यशोशिखरे सर केली. तेजस्वी आणि श्रृती शेट्टी, तसेच दीर्घ पल्ल्याच्या जलतरणात रूपाली रेपाळे, आरती प्रधान आणि मयुर मेहता यांची कामगिरीही उजवी आहे. अविनाश सारंग ते मिलिंद सोमण यांनीही जलतरणात आपला ठसा उमटवला. वॉटर पोलोमध्येही महाराष्ट्राचा संघ दादासंघ होता.

अनुक्रमणिका

जसा क्रिकेटमध्ये मुंबई किंवा महाराष्ट्राचा खेळाडू असायचाच तसेच चित्र बास्केटबॉलमध्ये होते. बास्केटबॉलच्या प्रत्येक राष्ट्रीय संघात मुंबईचे दोन तरी खेळाडू हमखास असायचे. अब्बास मुंतासिर आणि एस्मेरो फिग्रेडो यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली चमक दाखवली. मल्लखांबातही महाराष्ट्र आघाडीवर आहे. मल्लखांब या खेळाचा देशविदेशात प्रचार आणि प्रसार करण्यात मुंबईच्या समर्थ व्यायाम मंदिर आणि अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक शाळेने महत्त्वाची भूमिका बजावली. मल्लखाबांची आंतरराष्ट्रीय संघटना बांधणीसाठी समर्थचे सरकार्यवाह उदय देशपांडे यांनी यशस्वी पुढाकार घेतला आहे. विविध खेळात मुंबई-महाराष्ट्राचे खेळाडू आगेकूच करीत असतानाच पुण्याच्या सुरेंद्र चव्हाणने तर चक्क एव्हरेस्ट शिखर सर केले. एव्हरेस्ट सर करणारा तो महाराष्ट्राचा पहिला गिर्यारोहक ठरला. महिलांमध्ये हीच कामगिरी कृष्णा पाटीलने केली. गिर्यारोहणाला खेळाचा दर्जा मिळावा, की मिळू नये याबाबत आजही मतभेद आहेत, पण महाराष्ट्र सरकारने सुरेंद्र चव्हाणला प्रतिष्ठेचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार देऊन आपल्यापुरता हा प्रश्न निकाली काढला आहे.

शालेय शिक्षणातून क्रीडा संस्कृती रुजावी यासाठी महाराष्ट्र सरकारने २००१ साली क्रीडा धोरण जाहीर केले. अशा प्रकारे खेळाच्या विकासासाठी क्रीडा धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. हीच बाब क्रीडा प्रबोधिनीबाबतही घडली. महाराष्ट्राच्या खेडोपाड्यात राहणाऱ्या खेळाडूंना अद्ययावत प्रशिक्षण मिळावे यासाठी क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्यात आली. राज्यात आजमितीस पुणे, कोल्हापूर, प्रवरानगर, सांगली, नाशिक, अमरावती, अकोला, औरंगाबाद, ठाणे, नागपूर आणि गडचिरोली येथे क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली आहे. यातूनच येत्या ५० वर्षांत ऑलिम्पिक विजेते खेळाडू तयार होऊ शकतील. भारताच्या क्रीडा क्षेत्राचा इतिहास गौरवशाली आहेच पण नुसत्या गौरवशाली इतिहासाच्या जोरावर युद्ध जिंकता येत नसतात; त्यासाठी मनगटात ताकद असावी लागते. मनगटात ताकद फुलविण्यासाठी या दिग्गज खेळाडूंची कामगिरी या क्रीडा कोशामुळे भावी पिढीसमोर आदर्श म्हणून यावी हिच अपेक्षा.

**संदर्भ** —


(१) क्रिकेट सांख्यिकी – सुधीर वैद्य

(२) खो खो — रमेश वरळीकर

(३) कबड्डी — प्रा. श्रीपाद जर्दे, प्रा. विजय पाटील, श्रीहनुमान प्रसारक व्यायामशाळा, अमरावती.

(४) कबड्डी आणि खो खो – चक्रधर दळवी

(५) भारतीय क्रिकेट – द. सराफ

(६) ऑलिम्पिकमधील भारतीय खेळाडूंची कामगिरी — गे. परदेशी

(७) आशियाई स्पर्धेतील भारतीय खेळाडूंची कामगिरी — परदेशी


अनुक्रमणिका

(८) हॉकी — वा. साने

(९) मुष्टियुद्ध — शंकर निकम

(१०) कसोटी क्रिकेट ते एक दिवसीय क्रिकेट — मा. हरवंदे

(११) आठवणीतील व्यक्ती आणि प्रसंग — बाळ ज. पंडित

(१२) ट्रॅक ॲण्ड फिल्ड स्पोर्ट्स — कोठीवाले

(१३) स्वदेशी खेळ, भाग-१ — चि. वझे

(१४) अशा झुंजा, असे झुंजार — ना. सी. फडके

(१५) विम्बल्डनच्या तृणांगणावर — श्रीकांत लागू

(१६) ऑलिम्पिकमधील ॲथलेटिक्स — हेमंत जोगदेव

(१७) कुस्तीचा आखाडा — भास्कर म्हुरसाळे

(१८) विशेष आभार — वि. वि. करमरकर, विनायक दळवी, रणजीत दळवी, दत्ता जाधव, प्रवीण ठिपसे, कमलेश मेहता, श्रीकांत वाड, विश्वजित शिंदे, अंजली भागवत, सुमा शिरूर, प्रल्हाद नाखवा, शिवाजी गोरे, ज्ञानेश भुरे, संजय दुधाणे, जय कवळी, पी. बी. भिलारे, रमेश वरळीकर, सुधीर वैद्य, माधव दळवी, उदय देशपांडे, दत्ता सावंत, महेंद्र चेंबूरकर, द्वारकानाथ संझगिरी, राजीव कासले आणि प्रज्ञा जांभेकर.

एक नजर टाकूया भारतासाठी आजवर टेस्ट आणि वन डे खेळलेल्या मुंबईच्या क्रिकेटर्सवर.

| अनु. क्र. | मुंबईचे क्रिकेटर | टेस्ट | वन डे |
|---|---|---|---|
| १ | अजित आगरकर | २६ | १९१ |
| २ | प्रवीण आमरे | ११ | ३७ |
| ३ | सलिल अंकोला | १ | ३७ |
| ४ | अन्वर हुसेन | ४ | ... |
| ५ | ए. ल. आपटे | १ | ... |
| ६ | एम. एल. आपटे | ७ | ... |
| ७ | साईराज बहुतुले | २ | ८ |
| ८ | आर. बी. देसाई | २८ | ... |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | समीर दिघे | ६ | २३ |
| १० | आर. वी. दिवेचा | ५ | ... |
| ११ | फारूख इंजीनियर | ४६ | ५ |
| १२ | सुनिल गावसकर | १२५ | १०८ |
| १३ | करसन घावरी | ३९ | १९ |
| १४ | गुलाम गौड | २ | ... |
| १५ | बाळू गुप्ते | ३ | ... |
| १६ | एस्. पी. गुप्ते | ३६ | ... |
| १७ | एम्. एस्. हर्डिकर | ४ | ... |
| १८ | डी. डी. हिंदळेकर | ४ | ... |
| १९ | के. सी. इब्राहिम | ४ | ... |
| २० | एल्. पी. जय | १ | ... |
| २१ | आर. जे. डी. जमशेदजी | १ | ... |
| २२ | विनोद कांबळी | १७ | १०४ |
| २३ | आर. बी. केणी | ५ | ... |
| २४ | नीलेश एम. कुलकर्णी | ३ | १० |
| २५ | आर. आर. कुलकर्णी | ३ | १० |
| २६ | यु. एन्. कुलकर्णी | ४ | ... |
| २७ | ॲबी कुरुवीला | १० | २५ |
| २८ | ई. एस. माका | २ | ... |
| २९ | संजय मांजरेकर | ३७ | ७४ |
| ३० | विजय मांजरेकर | ५५ | ... |
| ३१ | अशोक मंकड | २२ | १ |
| ३२ | व्ही. मंकड | ४४ | ... |
| ३३ | माधव मंत्री | ४ | ... |
| ३४ | विजय मर्चंट | १० | ... |
| ३५ | पारस म्हांब्रे | २ | ३ |
| ३६ | रुसी मोदी | १० | ... |
| ३७ | बापू नाडकर्णी | ४१ | ... |
| ३८ | सुधीर नाईक | ३ | २ |
| ३९ | एस्. व्ही. नायक | २ | ४ |
| ४० | ए. एम्. पै | १ | ... |

| | | | |
|---|---|---|---|
| ४१ | पी. ई. पलिया | २ | ... |
| ४२ | चंद्रकांत पंडित | ५ | ३६ |
| ४३ | जे. व्ही. परांजपे | ... | ४ |
| ४४ | गुलाम पारकर | १ | १० |
| ४५ | आर. डी. पारकर | २ | ... |
| ४६ | सी. टी. पाटणकर | १ | ... |
| ४७ | मुनाफ एम्. पटेल | ९ | ४१ |
| ४८ | एस्. एम्. पाटील | २९ | ४५ |
| ४९ | डी. जी. फडकर | ३१ | ... |
| ५० | रमेश पोवार | २ | ३१ |
| ५१ | लालचंद रजपूत | २ | ४ |
| ५२ | गुलाब रामचंद | ३३ | ... |
| ५३ | के. एम्. रांगणेकर | ३ | ... |
| ५४ | ए. एम्. साळवी | ... | ४ |
| ५५ | बलविंदर संधू | ८ | २२ |
| ५६ | दिलीप सरदेसाई | ३० | ... |
| ५७ | सी. टी. सरवटे | ९ | ... |
| ५८ | रोहित शर्मा | ... | ३७ |
| ५९ | रवी शास्त्री | ८० | १५० |
| ६० | एस्. जी. शिंदे | ७ | ... |
| ६१ | एस्. डब्ल्यू. सोहणी | ४ | ... |
| ६२ | एकनाथ सोलकर | २७ | ७ |
| ६३ | एस्. सी. स्टेयर्स | ४ | ... |
| ६४ | जी. आर. सुंदरम | २ | ... |
| ६५ | नरेन ताम्हाणे | २१ | ... |
| ६६ | के. के. तारापोर | १ | ... |
| ६७ | सचिन तेंडुलकर | १७१ | ४४२ |
| ६८ | पॉली उम्रीगर | ५९ | ... |
| ६९ | दिलीप वेंगसरकर | ११६ | १२९ |
| ७० | अजित वाडेकर | ३७ | २ |
| ७१ | वसिम जाफर | ३१ | २ |
| ७२ | झहिर खान | ६५ | १५६ |

अनुक्रमणिका

**ता.क.** — भारत आणि पाकिस्तानच्या फाळणीनंतर अन्वर हुसैन पाकिस्तानात गेला आणि पाकिस्तानाकडूनही ४ टेस्ट खेळला.

(२) एस् स्टेयर्स हे नंतर वेस्ट इंडिजकडूनही ४ टेस्ट खेळले.

एक नजर टाकूया भारतासाठी आजवर टेस्ट आणि वन डे खेळलेल्या महाराष्ट्राच्या क्रिकेटर्सवर...

| अनु. क्र. | महाराष्ट्राचे क्रिकेटर | टेस्ट | वन डे |
|---|---|---|---|
| १ | सलिल अंकोला | १ | २० |
| २ | साईराज बहुतुले | २ | ८ |
| ३ | चंद्रकांत बोर्डे | ५५ | ... |
| ४ | चेतन चौहान | ४० | ७ |
| ५ | हेमचंद्र दाणी | १ | ... |
| ६ | चंद्रशेखर गडकरी | ६ | ... |
| ७ | विजय हजारे | ३० | ... |
| ८ | इक्बाल सिद्दीकी | १ | ... |
| ९ | पद्मनाभ जोशी | १२ | ... |
| १० | अभिजित काळे | ... | १ |
| ११ | हृषिकेश कानेटकर | २ | ३४ |
| १२ | हेमंत कानेटकर | २ | ... |
| १३ | विजय मांजरेकर | ५५ | ... |
| १४ | विनू मंकड | ४४ | ... |
| १५ | माधव मंत्री | ४ | ... |
| १६ | रमेशचंद्र नाडकर्णी | ४१ | ... |
| १७ | डॉ. चंद्रकांत पाटणकर | १ | ... |
| १८ | सदाशिव पाटील | १ | ... |
| १९ | दत्तू फडकर | ३१ | ... |
| २० | खंडेराव रांगणेकर | ३ | ... |
| २१ | वसंत रांजणे | ७ | ... |
| २२ | मधुसूदन रेगे | १ | ... |
| २३ | चंद्रशेखर सरवटे | ९ | ... |
| २४ | सदाशिव शिंदे | ७ | ... |
| २५ | श्रीरंग सोहणी | ४ | ... |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | वेणूगोपाल राव | ... | १६ |
| २७ | यजुवेंद्रसिंग | ४ | ... |

मुंबईचे काही खेळाडू हे भारताकडून खेळता यावे म्हणून महाराष्ट्राकडून खेळले… कारण त्यावेळी मुंबईच्याअंतिम ११ खेळाडूत जागा मिळवणे अवघड असायचे.

**ता.क.**— (१) दि. बा. देवधर, भाऊसाहेब निंबाळकर आणि पी. साळगावकर यांनी अनऑफिशियल टेस्टमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले.

(२) आर. निंबाळकर आणि एस्. मोहोळ यांची इंग्लंड दौऱ्यासाठी निवड झाली पण त्या दौऱ्यात पदार्पण करण्याची संधी त्यांना मिळाली नाही.

अनुक्रमणिका

## महाराष्ट्राबाहेरील मराठी जगत



**श्री. निशिकांत मिरजकर**

दिल्ली विद्यापीठातील आधुनिक भारतीय भाषा आणि साहित्याचा अभ्यास. या विभागात प्राध्यापक म्हणून काम केलेल्या श्री. निशिकांत मिरजकर यांनी विज्ञान विषयात पदवी प्राप्त केल्यानंतर मराठी विषयामध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवी आणि पी.एच.डी. प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र आणि देशातील इतर ठिकाणी मराठी अध्यापनाचे कार्य केले. त्यांनी देशातील वेगवेगळी विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांच्या समिती आणि मंडळांमध्ये तज्ज्ञ म्हणून काम केले. मराठी, इंग्रजी आणि हिंदी मध्ये कविता, भाषांतर, संपादन आणि समीक्षक म्हणून आपला ठसा उमटवला. महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या संत नामदेव यांच्या सप्तशताब्दी जन्मसोहळा आयोजन समितीचे सदस्य म्हणून त्यांनी काम बघितले.

१९७० साली त्यांनी संत नामदेव यांच्या महाराष्ट्रात शंभर व्याख्याने दिली आणि तीन ग्रंथांचे संपादन केले. त्यांच्या अनेक निबंधांना विविध पारितोषिके मिळाली आहेत. त्यांनी देशविदेशातील अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये भाग घेतला आहे.

पत्ता : बी-३०२, डी. एस. के. गार्डन एनक्लेव्ह, एस. एन. ३७, कोंधवा खुर्द, पुणे-४११ ०४८.
दूरध्वनी : ०११-२७६६७५२३, भ्रमणध्वनी : ९८७१९४४२६२

**हा** अभ्यासपूर्ण माहितीपर लेख नाही. संख्याशास्त्रीय पुरावे देऊन महाराष्ट्राबाहेरच्या मराठी जगताची स्थिती-गती वर्णन करण्याचा आणि त्यावर टिप्पणी करण्याचा इथे माझा इरादा नाही.

माझ्या आयुष्याचा दीर्घ काळ महाराष्ट्राबाहेर गेला. तीस वर्षे मी भारताच्या राजधानीमध्ये दिल्ली विद्यापीठात अध्यापन केले. अनेक परप्रांतीय आणि परदेशी विद्यार्थ्यांना मराठी भाषा आणि मराठी साहित्य शिकवले. त्यांच्याशी संवाद करताना मराठी जगताविषयीच्या त्यांच्या मनातील प्रतिमेचा धांडोळा घेतला. व्याख्यानांच्या, चर्चासत्रांच्या आणि परिषदांच्या निमित्ताने भारतामध्ये उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल, पंजाब, गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडू, मध्य प्रदेश, बिहार, या राज्यांमध्ये आणि परदेशांत मलेशिया, सिंगापूर, इंग्लंड, अमेरिका येथे फिरलो. त्या त्या वेळी तिथे जाऊन राहिलेल्या महाराष्ट्रीयांशी सुसंवाद साधला, तसेच तिथल्या लोकांच्या मनात मराठी जगताची काय प्रतिमा बनलेली आहे त्याचा शोध घेतला.

अनुक्रमणिका

या सगळ्यातून महाराष्ट्राबाहेरील मराठी जगताविषयी मला जे जाणवले ते आत्मनिष्ठ संवेद्यतेने मी या लेखात मांडणार आहे. माझ्या मनावर व जाणिवेवर उमटलेल्या ठशांचे हे आकृतिबंध आहेत. याला संख्याशास्त्रीय आणि वास्तव-नोंदींच्या पुराव्यांचा आधार नाही. पण अनुभवाची साक्ष आहे. आणि चिंतनाची शिस्त आहे. सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे, हा माहितीपर आणि चर्चात्मक स्वरूपाचा लेख नाही; हे निरीक्षणातून आणि अनुभवातून गेली तीस वर्षे मनात चाललेल्या चिंतनाचे फलित आहे.

सर्वसाधारणपणे मराठी माणूस महाराष्ट्राबाहेर जाऊन स्थायिक व्हायला नाखूष असतो. तामिळी, बंगाली, बिहारी, उत्तर भारतीय लोक जसे भारतात कुठेही जाऊन स्थिरावतात आणि आपली भरभराट करून घेतात, तशी मराठी माणसाची मानसिकता नसते. महाराष्ट्राबाहेरच काय, आपल्या पंचक्रोशीबाहेरही जायला ती नाराज असतात. महाराष्ट्रातल्या महाराष्ट्रात जरी थोड्या दूरच्या ठिकाणी बदली झाली तर ती रद्द करून घेण्यासाठी खटपटी-लटपटी करायच्या मागे लागतात. याला भेट, त्याला भेट, वशिला लाव, पैसे चार वगैरे उपाय करून एकदाची बदली रद्द झाली की सुटकेचा श्वास सोडतात. सत्यनारायण घालतात.

पण तरीदेखील बराच मोठा महाराष्ट्रीय समाज महाराष्ट्राबाहेर वास्तव्य करून राहिलेला आहे. नोकरीधंद्याच्या निमित्ताने अल्प काळासाठी महाराष्ट्राबाहेर वास्तव करून पुन्हा महाराष्ट्रात परत येणाऱ्यांची, ज्याला 'मोबाईल पॉप्युलेशन' असे म्हणतात अशांची, संख्याही लक्षणीय आहे. बेळगाव, निपाणी, धारवाड, बंगळूरू, दावणगिरी, गुलबर्गा, हुबळी इत्यादी कर्नाटकातील शहरांमध्ये पिढ्यानुपिढ्या वास्तव्य करून राहिलेल्या मराठी लोकांची संख्या भरपूर आहे. बेळगाव आणि निपाणी येथे ती कन्नडिगांच्या बरोबरीने अथवा त्यांच्यापेक्षाही जास्त आहे आणि म्हणून ही शहरे कर्नाटकाऐवजी महाराष्ट्रातच समाविष्ट करावयास हवी होती, असे तेथील मराठी लोकांचे म्हणणे आहे. बंगळूरू येथे शहाजीराजांची जहागीर होती आणि शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्य स्थापन केल्यानंतर कर्नाटकातील जहागीर त्यांचे सावत्र बंधू एकोजीराजे यांनी सांभाळली, तेव्हापासून राहत आलेल्या मराठी माणसांचे काही पिढीजात वारस बंगळूरूमध्ये अजून राहत आहेत. बंगळूरूमधील महाराष्ट्र मंडळ १९२० मध्येच स्थापन झाले आहे. गांधीनगर भागात या महाराष्ट्र मंडळाची स्वतःची इमारत आहे. रेल्वे स्टेशन आणि बसस्थानकापासून दहा मिनिटांच्या अंतरावर असलेल्या या इमारतीत मराठी प्रवाशांची राहण्याची सोय केली जाते. या महाराष्ट्र मंडळातर्फे गणेशोत्सवात एकांकिका स्पर्धांचे आयोजन केले जाते. 'सनविवि' ही मासिकपत्रिकाही काढण्यात येते. केल्हापुरातल्या व्यापाऱ्यांच्या इस्टेटी निपाणीमध्ये आहेत आणि त्यांच्या घराण्याच्या काही शाखा निपाणीत स्थायिक झालेल्या आहेत. धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठामध्ये आणि गुलबर्गा येथील विद्यापीठामध्ये मराठीचे स्वतंत्र विभाग आहेत. सुप्रसिद्ध मराठी कथाकार जी. ए. कुलकर्णी यांचे आयुष्य धारवाडमध्येच व्यतीत झाले. मंगसुळीचा खंडोबा हे महाराष्ट्रातील बऱ्याच घराण्यांचे कुलदैवत आहे.

गुजरातमध्ये वडोदरा येथे गायकवाडांचे संस्थान होते. सयाजीराव महाराज गायकवाड हे ब्रिटिश अमदानीमधील एक महत्त्वाचे कर्तबगार आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. वडोदरा येथे गुजराती आणि मराठी लोकांचे प्रमाण ५०-५० टक्के आहे, ही गोष्ट वडोदरा येथील गुजराती लोकसुद्धा अजूनही अभिमानाने नमूद करतात. तांबे यांची हवेली (आणि त्यातील भित्तिचित्रे) ही वडोदरा येथील आवर्जून पाहण्यासारखी एक वास्तू आहे. वडोदरा येथील महाराजा सटाजीराव विद्यापीठात मराठी विषयाचा स्वतंत्र विभाग आहे. अहमदाबादमध्ये 'महाराष्ट्र समाज' या नावाने महाराष्ट्र मंडळाची स्थापना १९२३ मध्ये झाली. आता याची

सदस्य संख्या ३००० च्या आसपास आहे. नाट्यविभाग, सांस्कृतिकविभाग, शिक्षणविभाग, वाचनालय, अतिथिगृह आणि 'समाजपत्रिका' ही या महाराष्ट्र मंडळाची कार्यक्षेत्रे आहेत.

मध्य प्रदेशात भोपाळ, झाशी, इंदौर, ग्वालियर, उज्जैन, भिलई, सागर, खांडवा, महू येथे मराठी लोकांची बहुल वस्ती आहे. बुंदेलखंडचे महाराज वीर छत्रसाल यांच्या वृद्धापकाळी अलाहाबादचा सुभेदार महंमदखाँ बंगश याने पन्ना शहरावर चौतर्फा आक्रमाण केले. छत्रसालांच्या मदतीच्या हाकेला प्रतिसाद देऊन बाजीराव पेश्व्यांनी बंगशाच्या सेनेची धूळधाण केली. भारावलेल्या छत्रसालांनी बाजीरावांना आपल्या राज्याचा एक तृतीयांश भाग देऊ केला. मिळालेल्या भूभागाची प्रशासनिक आणि सैनिकी व्यवस्था लावण्यासठी अनेक महाराष्ट्रीय कुटुंबे येथे स्थायिक केली गेली. हळूहळू बंदेलखंडाचा झांशी, सागर, जालौन, गुरसराई वगैरे भाग मराठी वसाहत बनून गेला. झांशी, ग्वालियर आणि इंदौर येथे मराठी सरदारांनी स्वतंत्र राज्ये बनवली. आज इंदौर येथील देवी अहिल्या विद्यापीठ, उज्जैन येथील विक्रम विद्यापीठ व सागर येथील विद्यापीठांत मराठी विषयाचे स्वतंत्र विभाग आहेत. भोपाळमध्ये 'महाराष्ट्र समाज' सक्रिय आहे. 'मराठी विकास मंडळ' आणि 'मध्यप्रदेश मराठी सामज' या संस्था कार्यरत आहेत. 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संस्था' तेथे आहे. त्यातूनच 'मध्यप्रदेश मराठी अकादमी' निर्माण झाली आहे.

तामिळनाडूमध्ये चेन्नई येथे मराठा एज्युकेशन फंड या संस्थेची दुमजली अतिथिगृहाची इमारत आणि सभागृह आहे. तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयात फार दुर्मिळ मराठी हस्तलिखिते आहेत. रामेश्वरम येथील सुप्रसिद्ध शिवमंदिरांचे पुजारी मराठी आहेत आणि ते पिढ्यानुपिढ्या तेथे पुजारीपण करीत आले आहेत.

राजस्थानात कोटा येथे महाराष्ट्र समाज आहे. माउंट अबू येथे नोकरी-धंद्याच्या निमित्ताने स्थायिक झालेले मराठी लोक आहेत.

पश्चिम बंगालमध्ये खुद्द कोलकात्यात मराठी लोकांचे वास्तव्य आहे. तेथे महाराष्ट्र मंडळाची स्वतःची इमारत आहे. शांतिनिकेतनमध्ये मराठीचे अध्यापन केले जाते.

उत्तर प्रदेशात पेशव्यांनी स्थानिक राजांच्या कामगिरीवर लक्ष ठेवण्यासाठी मराठी माणसे आणली. त्यांनी गंगाकिनारी कानपूरजवळ बिठूर येथे वास्तव्य केले. काशीमध्ये वैदिक धर्माचा आणि हिंदू शास्त्रांचा अभ्यास करण्यासाठी मराठी पंडितांनी वास्तव्य केले. बनारस हिंदू विद्यापीठात मराठी विभाग आहे. कानपूरच्या 'मराठी मंडळ' या संस्थेचे उद्घाटन १९५० मध्ये तेव्हाचे उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांच्या हस्ते झाले. कानपूरच्या आय.आय.टी.मध्ये विद्यार्थ्यांनी चालवलेले 'महाराष्ट्र मंडळ' आहे. आगरा येथे राजा की मंडी या स्टेशनच्या जवळ 'मराठी मंडळ' आहे. अलीगढ मुस्लिम विद्यापीठात 'आधुनिक भारतीय भाषाविभाग' आहे आणि त्या विभागात मराठी विषयाचा समावेश आहे. अलाहाबाद विद्यापीठाचे कर्तृत्ववान कुलगुरू डॉ. राजन हर्षे हे मराठी आहेत, तर कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या संगीत विभागात श्रीखंडे पतिपत्नींनी महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करून घेतले आहे.

पंजाबात गुरुदासपूर जिल्ह्यात घुमान येथे संत नामदेवांची स्मृतिसमाधी आहे. तिच्या दर्शनासाठी तेथे मराठी भाषिकांचे जाणेयेणे असते. २००० साली नामदेवांच्या साडेसहाशे वर्षांच्या समाधिदिनाचा सोहळा भव्य प्रमाणात घुमानच्या मंदिरात साजरा झाला, तेव्हा हजारो मराठी भाषिक तेथे उपस्थित होते.

अनुक्रमणिका

आंध्र प्रदेशात हैदराबाद येथे मराठी भाषिक मोठ्या संख्येने राहत आहेत. मराठीच्या जोपासनेचेच नव्हे, तर अभिवृद्धीचे कौतुकास्पद काम तेथील आंध्र प्रदेश मराठी साहित्यपरिषदेने गेली अनेक वर्षे केलेले आहे. 'पंचधारा' हे त्रैमासिक आणि मराठी महाविद्यालय चालवलेले आहे. उस्मानिया विद्यापीठात मराठीचा स्वतंत्र विभाग आहे.

भारताच्या राजधानीत, दिल्लीमध्ये, मराठी लोकांची संख्या खूपच आहे व ती आणखी आणखी वाढत आहे. पश्चिम विहार, राजा गार्डन, पटपडगंज, मयूर विहार या भागांमध्ये मराठी लोकांच्या हाउसिंग सोसायट्या आहेत. करोल बाग आणि पहाडगंज येथे मराठी लोकांनी चालवलेल्या शाळा आहेत. दिल्लीच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळी स्वतंत्र महाराष्ट्र मंडळे आहेत. शिवाय सर्वांची मिळून एक केंद्रवर्ती मराठी सांस्कृतिक संस्था आहे. व्यापार, उद्योग, न्यायालये, शिक्षण, कला इत्यादी क्षेत्रांमध्ये मराठी लोकांनी आपले स्थान निर्माण केले आहे. विविध मंत्रालये आणि कंपन्या यांमध्येही काम करणाऱ्या मराठी लोकांची संख्या लक्षणीय आहे. महाराष्ट्र परिचय केंद्र, दिल्लीमध्ये महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व करते. दिल्ली विद्यापीठाच्या 'आधुनिक भारतीय भाषा व साहित्याभ्यास' विभागात मराठीचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'महाराष्ट्र सदन'मध्ये आणि खाजगी संस्थेच्या 'बृहन् महाराष्ट्रभवन'मध्ये मराठी प्रवाश्यांची राहण्याची सोय आहे. पुण्याच्या 'पूना गेस्ट हाऊस' ची शाखाही करोलबागेत आहे.

गोवा हे जरी स्वतंत्र राज्य असले तरी सांस्कृतिक आणि भावनिकदृष्ट्या ते महाराष्ट्राशी अभिन्न आहे. गोव्याच्या मुक्तिसंग्रामात मराठी सत्याग्रहींचे प्रमाण तेथील स्थानिक लोकांच्या बरोबरीने होते. कोंकणी ही स्वतंत्र वेगळी भाषा आहे, या सत्याची प्रतिष्ठापना होण्यापूर्वी तिला मराठी भाषेची बोली म्हणूनच मानले जात होते. आजही गोव्याची अधिकृत भाषा कोंकणी असली तरी मराठी ही तिथली दुसऱ्या क्रमांकाची भाषा आहे. गोव्यात राहत असलेले मराठी लोक मराठी जगताचा आंतरिक भाग आहेत. बा. भ. बोरकर, लक्ष्मणराव सरदेसाई, गोपाळ मयेकर, प्रल्हाद वडेर इत्यादी साहित्यिकांनी गोव्यात राहूनच मराठी साहित्यात कर्तृत्व गाजवले. गोवा विद्यापीठात मराठीचा स्वतंत्र विभाग आहे. तेथील इंग्लिश विभागातही भालचंद्र नेमाडे आणि आनंद पाटील यांच्यासारखे मराठी साहित्यिक काम करून गेलेले आहेत.

भारताबाहेर मॉरिशस, इंग्लंड, आफ्रिका, इस्त्रायल, अमेरिका, ऑस्ट्रेलिया येथे मराठी लोक वास्तव्य करून राहिलेले आहेत. १८३० मध्ये मॉरिशसला उसाच्या मळ्यात काम करण्यासाठी मजूर म्हणून मराठी लोकांनी स्थलांतर केले. तिथपासून ते मॉरिशसचे पंतप्रधान बनण्यापर्यंत मराठी लोकांनी आपली प्रगती करून घेतली. मॉरिशसच्या शाळांमध्ये मराठीचे अध्यापन केले जाते. शालेय बोर्डाच्या परीक्षेला मराठी हा एक विषय आहे.

१९४८ मध्ये इस्त्रायल राज्याची स्थापना झाल्यावर बऱ्याच मराठी ज्यूंनी तिकडे स्थलांतर केले. ब्रिटनमध्येही शंभर वर्षांपूर्वीपासून मराठी लोकांचे स्थलांतर होत आहे. लंडनमध्ये आणि लंडनच्या परिसरात मराठी लोकांची लक्षणीय संख्या आहे. लंडनच्या महाराष्ट्र मंडळाचा अलीकडेच अमृतमहोत्सव साजरा झाला. स्वातंत्र्यवीर सावरकर लंडनमधील 'इंडिया हाऊस' मधून सशस्त्र क्रांतीच्या हालचाली करीत होते. लंडनमध्येच त्यांना अटक झाली. सावरकरांच्या विचारांवर मूलगामी संशोधन करून 'रॅशनॅलिझम ऑफ सावरकर' सारखा बृहद्ग्रंथ निर्माण करणारे व्ही. एस. गोडबोले लंडनमध्येच राहतात.

अनुक्रमणिका

ब्रिटिश काळातच अनेक मराठी माणसांनी आफ्रिकेमध्ये स्थलांतर केले. 'महाराष्ट्र मंडळ दार-ए-सलाम' टांझानियामध्ये, तर 'महाराष्ट्र मंडळ' केनियातील नैरोबीमध्ये अजूनही कार्यरत आहे.

अमेरिकेमध्ये १९६५ च्या इमिग्रेशन अँड नॅशनॅलिटी ॲक्टनंतर मोठ्या प्रमाणात मराठी लोकांनी स्थलांतर केले. हे लोक मुख्यतः डॉक्टर, इंजिनियर आणि शास्त्रज्ञ या वर्गांतील होते. माहिती आणि तंत्रज्ञान (आयटी) या विषयाच्या प्रगतीनंतर मराठी माणसांच्या स्थलांतराची दुसरी लाट अमेरिकेत पोचली. सध्या तिकडे जवळजवळ ३५००० मराठी लोक आहेत. उत्तर अमेरिकेत एकंदर चौदा महाराष्ट्र मंडळे आहेत. 'मराठी कलामंडळ' ग्रेटर वॉशिंग्टन, 'महाराष्ट्र स्नेहमंडळ' इंडियाना, 'नॉर्थ ईस्ट ओहियो मराठी मंडळ' क्लीव्हलँड, ओहियो, 'त्रिवेणी मित्रमंडळ' सिनसिन्नाटी, 'महाराष्ट्र मंडळ' न्यूयॉर्क, 'मराठी विश्व' न्यू जर्सी, 'महाराष्ट्र मंडळ' शिकागो ही त्यातली विशेष कार्यरत.

माहिती तंत्रज्ञानाच्या उद्रेकानंतर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, गल्फ कंट्रीज, जपान व चीन येथेही मराठी स्थलांतरित झाले. ऑस्ट्रेलियात ॲडेलेड, सिडनी व व्हिक्टोरिया येथे महाराष्ट्र मंडळे आहेत. दुबई आणि अबूधाबी येथे महाराष्ट्र मंडळे आहेत. माहिती आणि तंत्रज्ञान या बरोबरच शिक्षणक्षेत्र, अर्थक्षेत्र, व्यापारक्षेत्र आणि वैद्यक या क्षेत्रांमध्ये ही मराठी मंडळी स्थिरावलेली आहेत.

पंचक्रोशीच्या बाहेर जाण्यास मुळात नाखूष असणाऱ्या, परदेशगमनाचे भय बाळगणाऱ्या मराठी माणसाने, अशा प्रकारे काळाच्या ओघात भारताच्या विविध राज्यांमध्ये आणि भारताबाहेर साता समुद्रापलीकडे पसरलेल्या जगात जाऊन आपले वास्तविक, भावनिक आणि सांस्कृतिक जगत विस्तारित केले आहे. महाराष्ट्राबाहेरच्या या मराठी जगताचे स्वरूप कुठे महाराष्ट्रातील मराठी जगताशी सुसंवादी आणि समांतर आहे, तर कुठे ते वेगळे आणि विस्तारित स्वरूपाचे आहे. कसेही असले, तरी त्याची नाळ महाराष्ट्राशी जोडलेली आहे.

इतिहासामधील कर्तबगार मराठी माणसांनी आणि मराठी लढवय्यांच्या बऱ्यावाईट कृत्यांनी मराठी माणसांविषयीच्या संमिश्र प्रतिमा विविध ठिकाणच्या परप्रांतीयांच्या व विदेशी लोकांच्या भावसंचितात कोरल्या गेल्या आहेत. सातशे वर्षांपूर्वी संत नामदेवांनी उत्तर भारतात दीर्घ काळ भ्रमण आणि वास्तव्य केले. आपल्या आयुष्याची अंतिम वीस वर्षे त्यांनी पंजाबात घुमान येथे व्यतीत केली. त्यांची मोठी शिष्यपरंपरा तेथे आहे. बहोरदास या त्यांच्या पंजाबी पट्टशिष्याचे वंशज आजही अभिमानाने त्यांची नाममुद्रा मिरवतात. "ईभै बीठलु ऊभै बीठलु। बीठलबिनु संसार नहीं। थानथाणंतरि प्रणवै नामा। पूरि रहियो तू सरब मही॥" असा विठ्ठलभक्तीतून विकसित होणारा अद्वैताचा संदेश संत नामदेवांनी पंजाबात घुमवला. सिखांचे तिसरे गुरु अर्जुनसिंह यांनी जेव्हा 'गुरुग्रंथसाहेबा' चे संपादन केले, तेव्हा नामदेवांच्या एकसष्ट पदांना त्यात आदराने समाविष्ट केले गेले. घुमान येथील नामदेवांच्या स्मृतिसमाधिमंदिराची सर्व देखभाल सिखांच्याकडूनच श्रद्धेने केली जाते. नामदेव-पुण्यतिथीच्या दिवशी, विशिष्ट वेळेला शेकडो भाविक सिख स्त्री-पुरुष त्या मंदिरात जमून शांत, निःशब्दपणे बसून राहतात. त्या वेळेस नामदेव तेथे अवतीर्ण होतात. अशी त्यांची श्रद्धा असते.

दिल्लीमधील नामदेव भक्तांनी लोधी इस्टेट भागात एक मोठे नामदेव मंदिर बांधले आहे. या मंदिरात संत नामदेव आणि पांडुरंग यांच्या सुंदर मूर्ती आहेत. या मंदिरात एक प्रशस्त सभागृह बांधण्यात आले आणि नामदेव पुण्यतिथीच्या निमित्ताने त्याचे उद्घाटन करण्यात आले, तेव्हा एक भव्य सोहळा

आयोजित केला होता. त्यात माझे भाषण होते. माझे भाषण चालू असताना ग्यानी झैलसिंह (जे त्यावेळेस देशाचे गृहमंत्री होते) अचानक उपस्थित झाले आणि संयोजकांनी गडबडीने व्यासपीठावर मांडलेली खुर्ची नाकारून समोर श्रोतृवर्गात जाऊन बसले. त्यानंतर त्यांनी नामदेवांच्या हिंदी पदांचा संग्रह माझ्याकडून मागवून घेतला. नंतर अल्पावधीत ते राष्ट्रपती बनले. त्यांनी पंढरपूरला भेट दिली आणि पुणे विद्यापीठात 'संत नामदेव अध्यासन' स्थापन करण्याची घोषणा पंढरपुरात केली. पंजाबमधील आतंकवाद नुकता नुकता संपुष्टात आला होता तेव्हा लुधियानामध्ये संत सुचासिंह यांच्या प्रेरणेने 'विस्माद नाद' या संस्थेने तेथील गुरुद्वारात, 'गुरु ग्रंथसाहेबा'त ज्यांच्या ज्यांच्या पद्यरचना समाविष्ट आहेत अशा भक्तकवींवर एक चर्चासत्र आयोजित केले आणि त्यामध्ये, संत नामदेवांवर निबंध सादर करण्यासाठी डॉ. ललिता मिरजकरांना दिल्लीहून निमंत्रित केले. त्याच्या पुढच्याच वर्षी, त्यांनी मुंबई येथे खास नामदेवांवर एक राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आणि त्याच्या संयोजनाची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर सोपवली. यशवंतराव चव्हाण सभागृहात दिवसभर चर्चासत्र झाले. उद्‌घाटनाच्या समारंभाचे अध्यक्ष मुख्यमंत्री मनोहर जोशी होते, उद्‌घाटक राम जेठमलानी होते व पोलीस महानिरीक्षक सामरा हे मुख्य पाहुणे होते. चर्चासत्र मराठी, इंग्लिश, हिंदी व पंजाबी असे चतुर्भाषिक झाले. अमृतसर, पतियाळा, लुधियाना, दिल्ली, जालंधर, मुंबई, पुणे, कोल्हापूर, बीड येथून आलेल्या समीक्षकांनी निबंध सादर केले. या चर्चासत्रासाठी लुधियानाहून दोन बसेस् भरून श्रोते आले होते आणि चारी भाषांतले निबंध शांतपणे ऐकत होते. या चर्चासत्रानंतर त्यांनी पंढरपूरची वारी करून नामदेवांच्या पायरीचे दर्शन घेतले.

घुमान येथे झालेल्या नामदेवांच्या ६५० व्या समाधीदिनाच्या सोहळ्याचा उल्लेख मागे आलाच आहे. त्या प्रसंगी शेकडो पंजाबी श्रोत्यांच्या समोर नामदेवांवर हिंदीतून प्रवचन करताना त्यांच्या चेहऱ्यांवरील श्रद्धेचे भाव मला मोहून टाकत होते. या सोहळ्याच्या सांगता समारंभास मुख्यमंत्री प्रकाशसिंह बादल प्रमुख पाहुणे म्हणून आले होते.

माझ्या आणि ललिता मिरजकरांच्या नामदेवविषयक लेखनाचा गौरव करण्यासाठी जालंधरच्या नामदेव भक्तांनी आम्हाला जालंधरला निमंत्रित केले आणि मानपत्रे देऊन आमचा सत्कार केला. त्यावेळेस जालंधरमध्ये भव्य नामदेव-भवन उभारलेले आहे, आणि एका चौकाला 'संत नामदेव चौक' असे नाव देण्यात आलेले आहे, हे पाहून आम्हाला विस्मय वाटला.

नामदेवांचे जन्मस्थान नरसी बामणी येथे सिखांनी भव्य नामदेव मंदिर व गुरूद्वारा उभारलेले आहे, आणि त्या स्थानाला पवित्र स्थान म्हणून विकसित करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे.

पुणे विद्यापीठाप्रमाणेच अमृतसर येथील गुरूनानक विद्यापीठातही 'नामदेव अध्यासन' आहे.

एकंदरीत, सातशे वर्षांपूर्वी होऊन गेलेले संत नामदेव हा पंजाब आणि महाराष्ट्र यांच्यातील सांस्कृतिक, भावनिक आणि सामाजिक जवळिकीचा एक सेतू बनलेला आहे. पंजाबमध्ये मराठी जगताला सलोख्याचे, आत्मीयतेचे व मानाचे स्थान प्राप्त करून देणारा हा एक घटक आहे.

त्याचप्रमाणे, छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे कर्तृत्व हा महाराष्ट्राबाहेरील भारतात आदराचा, अभिमानाचा आणि प्रशंसेचा विषय आहे. आपल्याकडे मराठी मध्ये जसा 'बखर' हा मध्ययुगीन काळातील वाङ्‌मय प्रकार आहे, तसाच असम मध्ये असमीया भाषेत 'बुरूंजी' हा ऐतिहासिक गद्य वाङ्‌मय

प्रकार आहे. असमीय भाषेतील एक बुरूंजी शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर आहे, आणि ती शिवाजी महाराजांच्या जीवनकाळातच लिहिली गेली, असे म्हणतात. (या कालनिश्चितीस पुराव्याचा आधार नाही. तरीपण महाराष्ट्राबाहेर अन्य भाषेत लिहिली गेलेली ही शिवाजी महाराजांची पहिली गौरव गाथा होय, यात शंका नाही.) बंगालच्या इतिहासात कोणी गौरवशाली वीरपुरूष नसल्याने, बंगाला साहित्यिकांना शिवाजीराजांचे विलक्षण आकर्षक आहे. 'अंगुलीपरिणय' हे काव्यात्म नाट्य शिवाजी महाराजांवर बांगालमध्ये लिहिले आहे. खुद्द रवींद्रनाथ टागोरांनीही शिवाजी महाराजांवर एक दीर्घ कविता लिहिलेली आहे.

पेशवाईच्या उत्तरकाळात नागपूरकर भोसल्यांनी बंगाल आणि ओडिशावर वारंवार मुलूखगिऱ्या करून लुटालुटीचे सत्र आरंभिले मुलूखगिऱ्यांमध्ये मराठ्यांनी तेथील जनतेशी अत्यंत क्रूरपणाचा व्यवहार केला. त्यामुळे बंगाल आणि ओडिशा येथील लोकमानसात मराठ्यांची राक्षसी, क्रूर प्रतिमा कोरली गेली. बंगाली स्त्रिया रडणाऱ्या मुलाला थोपटून झोपवताना बागुलबुवासारखी 'बर्गी' (बारगीर) ची भीती घालतात, असे बांगला लोकगीतांमधून चित्रण आले आहे.

ग्वालियरचे महादजी शिंदे, इंदौरच्या अहिल्याबाई होळकर आणि वडोदऱ्याचे सयाजीराव गायकवाड या राज्यकर्त्यांना संपूर्ण उत्तर भारतात आदराचे स्थान आहे. महाराष्ट्राबाहेरील मराठी जगताचे हे तीन मानबिंदू महाराष्ट्रा बाहेरील जनतेचे आपले मानले आहेत. झाशीची राणी लक्ष्मीबाई हा तर संपूर्ण महाराष्ट्रेतर भारताला विशेषतः उत्तर भारताला, महाराष्ट्राशी आंतरिकतेने जोडणारा इतिहास संदर्भ आहे. हिंदी, बांगला, पंजाबी इत्यादी भाषांतून झाशीच्या राणीवर साहित्यनिर्मिती झालेली आहे. "बुंदेले हरबोली के मुँह हमने सुनी कहानी थी। खूब लडी मर्दानी वह तो झाँसीवाली रानी थी" ही सुभद्राकुमारी चौहान यांची हिंदी कविता प्रसिद्धच आहे.

दिल्लीमध्ये लोकमान्य टिळकांचा पुतळा आहे. दरवर्षी टिळक पुण्यतिथीच्या दिवशी महाराष्ट्र परिचय केंद्राच्या वतीने त्या पुतळ्याला हार घालण्याचा कार्यक्रम साजरा केला जातो. बहुधा प्रमुख पाहुणे अमराठी असतात, आणि त्यांच्या भाषणामध्ये टिळकांना केवळ मराठी नव्हे, तर भारतीय स्तरावरील महत्त्वपूर्ण नेता म्हणूनच सादर केले जाते. पण यापलीकडे लोकमान्य टिळक हे महाराष्ट्राबाहेरील मराठी जगतामध्ये काही खास स्थानावर आहेत, असे चित्र दिसत नाही. बंगाली बुद्धिजीवी वर्गात त्या मानाने गोपाळ कृष्ण गोखले यांच्या कर्तृत्वाचा, विशेषतः त्यांच्या भाषणांमधील आणि लेखनामधील इंग्लिश भाषेच्या डौलाचा वारंवार कौतुकाने आणि गौरवाने उल्लेख केला जातो. तसेच गणेश विद्यार्थी हे नाव महाराष्ट्रातील बहुतांश लोकांना ऐकूनही माहीत नसेल. पण बंगाली बुद्धिजीवी वर्गात या महाराष्ट्रीय तरूणाचा अत्यंत आदराने व कृतज्ञतेने उल्लेख केला जातो. स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात बंगाली तरूणांना जागृत करण्याचे काम या महाराष्ट्रीय तरूणाने बंगालमध्ये धडाडीने केले होते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या बाबतीतला अनुभव मात्र संक्षिप्त स्वरूपाचा आहे. त्यांचे क्रांतिकार्य, त्यांनी लंडनमध्ये इंडिया हाऊस मध्ये राहून केलेले प्रयत्न, समुद्रात उडी मारून पोहून निसटून जाण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न, अंदमानच्या जेलमध्ये त्यांनी सोसलेले अनन्वित कष्ट यांमुळे त्यांच्याविषयी पराकाष्ठेचा आदर आणि भक्ती असणारा एक वर्ग आहे. (दिल्लीच्या एआरएस्डी महाविद्यालयातील इंग्लिशचे प्राध्यापक हरींद्र श्रीवास्तव यांनी सावरकरांच्या लंडनमधील वास्तव्यावर हिंदी आणि इंग्लिशमध्ये संशोधनपर पुस्तके लिहिली, आणि नंतर 'एपिक स्ट्रिंग्ज इन सावरकर्स लाइफ' या विषयावर नागपूर

विद्यापीठातून पीएच.डी.ही प्राप्त केली.) तर सावरकरांचे प्रखर हिंदुत्ववादी विचार आणि त्यांनी महात्मा गांधींना केलेला विरोध यांमुळे त्यांच्याविषयी अनादर आणि दुरावा बाळगणारा एक वर्ग आहे. पण यांपैकी कोणालाही सावरकर हे मराठीतले एक प्रभावी कवी, कादंबरीकार, नाटककार, कथाकार होते याची कल्पनाच नाही. मी दिल्ली विद्यापीठाच्या 'आधुनिक भारतीय भाषा' विभागाचा प्रमुख झालो, तेव्हा 'पेट्रियॉटिक एलिमेंट्स इन इंडियन लिटरेचर, विथ स्पेशल रेफरन्स टू सावरकर' या विषयावर एक राष्ट्रीय चर्चासत्र घेतले. त्या चर्चासत्रास उपस्थित असलेल्या श्रोत्यांना सावरकरांचे साहित्यिक रूप पहिल्यांदाच माहीत झाले! या चर्चासत्राच्या समारोपाच्या वेळी विश्व हिंदु परिषदेने सावरकरांचे एक सुंदर चित्र आमच्या विभागाला भेट दिले. ज्यांच्या ज्यांच्या साहित्यावर अशी राष्ट्रीय चर्चासत्रे झालेली होती, अशा साहित्यिकांची चित्रे त्या सभागृहात लावलेली होती. त्या प्रथेनुसार सावरकरांचे चित्रही तिथे लावले जायला हवे होते. पण कलाशाखेचे अधिष्ठाता असलेले प्राध्यापक सावरकरांविषयी अनादर असलेल्या गटातले असल्यामुळे ते या बाबतीत चालढकल करीत राहिले. पुढे मी जेव्हा कलाशाखेचा अधिष्ठाता झालो तेव्हा ते चित्र त्या सभागृहात मी लावून घेतले.

दिल्लीच्या प्रभात प्रकाशनाने सावरकरांच्या समग्र साहित्याचा हिंदी अनुवाद प्रसिद्ध करण्याचा प्रकल्प हाती घेतला. या अनुवादाचे एकूण दहा खंड तयार झाले. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या निवासस्थानी प्रकाशनाचा भव्य समारंभ झाला. त्यातून सावरकरांच्या साहित्याचा परिचय हिंदी जगताला झाला.

लंडन आणि लेस्टर येथे 'सावरकरांचे साहित्यिक कर्तृत्व' या विषयावर माझी व्याख्याने झाली. तेव्हा तेथील भारतीय आणि ब्रिटिश श्रोते असेच नवलाईने भारावून गेले होते. लंडनमधल्या व्याख्यानाला भगतसिंगांच्या जवळच्या नात्यातील एक प्रौढ महिला आल्या (भगतसिंगांची पुतणी) होत्या. व्याख्यानानंतर माझ्याशी बोलताना त्या सद्‌गदित झाल्या होत्या.

तामिळ कवी सुब्रह्मण्यभारती यांची शताब्दी साजरी करण्यासाठी दिल्लीच्या लेडी श्री राम कॉलेजने त्यांच्या काव्यावर चर्चासत्र आयोजित केले. सुब्रह्मण्यभारतींच्या एका कवितेत "सिंहाच्या हृदयाचे मराठी कवी" असा उल्लेख आहे. तो सावरकरांना उद्देशून असावा, अशी कल्पना मांडून सुब्रह्मण्यभारती आणि सावरकर यांच्या कवित्वाची तुलनात्कक छाननी करणारा निबंध मी त्या चर्चासत्रात सादर केला, तेव्हा सावरकरांच्या कवित्वाची ओळख तिथल्या उपस्थितांना नव्यानेच झाली होती. असाच अनुभव मला तिरूअनंतपुरम् येथे आला. देशभक्तीची कविता लिहिणारे मल्यालम् कवी बोधेश्वरन् यांच्या कन्येने त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त चर्चासत्रात भाग घेण्यासाठी निबंध मला निमंत्रित केले होते. सावरकरांच्या कवित्वावर मी तेथे सादर केलेला निबंध तिथल्या लोकांना सावरकरांचा अज्ञात पैलू दाखवणारा वाटला होता.

चंडीगढला मात्र याच्या विरूद्ध प्रकारचा अनुभव आला. तिथल्या राष्ट्रीय कविसंमेलनाच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलताना मी भारतीय कवितेतील वेगवेगळे प्रवाह सांगत होतो. देशभक्तीपर कवितेच्या प्रवाहाचे उदाहरण म्हणून मी सावरकरांच्या कवितांचे विश्लेषण करू लागलो, तेव्हा श्रोत्यांमधला एक सरदारजी उठून तावातावाने म्हणू लागला, "आम्हाला सावरकरांचे कौतुक सांगू नका. त्यांनी शेवटी माफी मागून तुरूंगातून सुटका करून घेतली होती!"

अनुक्रमणिका

स्वातंत्र्यवीर सावरकर या मराठी व्यक्तिमत्वाबद्दल महाराष्ट्राबाहेर अशा संमिश्र स्वरूपाच्या प्रतिक्रिया अनुभवायला मिळाल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी मात्र महाराष्ट्राबाहेर सर्वत्र केवळ आदर, कौतुक आणि गौरव यांचेच प्रतिध्वनी सदैव ऐकू येत राहिले. राजकारण, समाजकारण आणि साहित्य या तिन्ही क्षेत्रांत आंबेडकरांची प्रेरणा महाराष्ट्राबाहेरही प्रभावी असल्याचे जाणवते. आंबेडकरांनी जागृत केलेल्या आत्मभानामुळे प्रस्फुरित झालेले मराठी दलित साहित्य हे आदर्श मानून तमिळ, हिंदी, गुजराती, कन्नड इत्यादी भाषांतही दलित साहित्याचे प्रवाह सुरू झाले.

असेच दुसरे महाराष्ट्राबाहेर वंदनीय ठरलेले महान मराठी व्यक्तिमत्त्व म्हणजे बाबा आमटे. ते जेव्हा दिल्लीला आले होते तेव्हा त्यांच्या आगमनाने दिल्ली पुलकित झाली होती, हे मी स्वतः अनुभवले आहे.

याखेरीज क्रिकेटच्या क्षेत्रात सुनील गावसकर आणि सचिन तेंडुलकर, आणि संगीताच्या क्षेत्रात लता मंगेशकर आणि आशा भोसले ही मराठी व्यक्तिमत्त्वे महाराष्ट्राबाहेर सर्वत्र लोकांच्या कौतुकाचा, आदराचा आणि प्रेमाचा विषय बनलेली आढळतात.

संत नामदेवांपासून या वर्तमानकालीन व्यक्तिमत्त्वांपर्यंत कर्तृत्वशाली मराठी माणसांनी भारतात आणि भारताबाहेर अन्य भारतीयांच्या मनात महाराष्ट्राची एक आपुलकीची, आत्मीयतेची, अभिमानाची प्रतिमा निर्माण केलेली आहे. पण दुर्दैवाने ही प्रतिमा व्यक्तिकेंद्रित आहे. म्हणजे, त्या त्या विशिष्ट व्यक्तीविषयी अन्य भारतीयांना प्रेम, आदर अथवा भक्ती वाटत असली, तरी ते प्रेम, तो आदर अथवा ती भक्ती त्या व्यक्तिमत्त्वांच्या महाराष्ट्रीयत्वाशी जोडली गेलेली नाही. त्या त्या व्यक्तीमुळे एकूणच मराठी माणसांविषयी, मराठी संस्कृती जगताविषयी आणि मराठी संस्कृतीविषयी महाराष्ट्राबाहेर प्रेम अथवा आदर निर्माण झाला, असे घडले नाही.

महाराष्ट्राबाहेरील मराठी जगतात भाषेची समस्या फार तीव्र बनलेली दिसते मराठी भाषा हे मराठी अस्मितेचे प्रतीक आहे. आणि तिचीच पकड मराठी जगतावर सैल होत चाललेली आहे. परभाषिक माणसाशी गाठ पडल्यावर त्याच्या भाषेत बोलून त्याच्याशी आंतरिक जवळीक प्रस्थापित करणे, हे सौजन्य आणि सुसंस्कृतता आहे. पण दोन मराठी भाषिक समोरासमोर आले तर? त्यांनी परस्परांशी मराठीत बोलणे हेच स्वाभाविक असले पाहिजे ना? पण महाराष्ट्राबाहेर सहसा तसे चित्र आढळत नाही. का कुणास ठाऊक, पण महाराष्ट्राबाहेरच्या मराठी जगतात सार्वजनिक ठिकाणी परस्परांशी मराठीतून संवाद करणे मराठी माणसाला लज्जास्पद वाटते! दिल्लीतल्या माझ्या तीस वर्षांच्या वास्तव्यात ही गोष्ट मी अतिशय दुःखाने वारंवार अनुभवलेली आहे. म्हणजे, एखादा मराठी लोकांचा कार्यक्रम असेल, आजूबाजूला सगळे मराठी लोक असतील, तर दोन मराठी माणसे एकमेकांशी बोलताना मराठीत बोलण्याचे धैर्य करतील. पण बसमध्ये, रस्त्यावर, बागेत, दुकानात खरेदी करताना अचानक भेट झाल्यावर ती हिंदीत किंवा इंग्लिशमध्येच परस्परांशी बोलताना दिसतील दोन तमिळ माणसे बसमध्ये परस्परांपासून दूरच्या आसनांवर बसलेली असली तरी मोठ्या आवाजात (आजूबाजूच्या परभाषिकांच्या चेहऱ्यांवरील प्रतिक्रियांकडे लक्ष न देता) परस्परांशी तमिळमध्ये बोलताना आढळतात. कारमधून एकत्र प्रवास करताना बंगाली माणसे परभाषिक सहप्रवाशाला खिजगणतीत न धरता प्रवासभर बांगलामध्ये तावातावाने चर्चा (भांडणच वाटावे अशा सुरात) करीत राहतात. (वाराणसीहून सारनाथला टॅक्सीने जाताना मला एकदा हा अनुभव आला.)

अनुक्रमणिका

यातला अतिरेकीपणा टाळण्यायोग्य असला, तरी यामागे आपल्या मातृभाषेत बोलण्याची जी एक ऊर्मी आणि सहजता आहे, ती मराठी माणसांमध्ये नाही, ही वस्तुस्थिती आहे.

त्याचा एक भयावह परिणाम असा झालेला आहे, की महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्या मराठी लोकांच्या मुलाबाळांचा मराठीशी संबंध तुटत चालला आहे. त्यांचे आईवडिलच त्यांच्याशी कौतुकाने हिंदी-इंग्लिशमध्ये बोलतात; मग त्यांचा मराठीशी संबंध राहणार कुठून? आपले मूल सफाईदार इंग्लिशमध्ये वा हिंदीमध्ये बोलते, त्याला मराठी तितकेसे येत नाही, ही बाब आईवडिलांना चिंतेची न वाटता उलट कौतुकीचीच वाटत असेल, तर त्याला कोण काय करणार? दिल्लीमध्ये आमची मराठी मित्रमंडळी आमच्या घरी आल्यावर आमची मुले सहजशुद्ध मराठीत वार्तालाप करताना पाहून त्यांना साश्चर्य कौतुक वाटायचे आणि ते ती बोलून दाखवायची पण असा प्रयोग आपल्या मुलांच्या बाबतीत करावा, असे त्यांना कधी वाटायचे नाही.

इंदौरला अखिल भारतीय मराठी साहित्यसंम्मेलन थाटात झाले. तीन दिवस भरगच्च कार्यक्रम होते. भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था होती. ग्रंथप्रदर्शन सुरचित होते. पण या तीन दिवसांत इंदौरच्या मराठी भाषिकांची कुमार आणि युवा वर्गातली पिढी तिकडे बिलकूल फिरकली नाही. त्यांना मराठी भाषेच्या या साहित्यमहोत्सवात काही रसच नव्हता. महाराष्ट्राबाहेर ज्या ज्या मराठी माणसांच्या घरी मी जातो, तिथल्या मुलामुलींच्या पुस्तकांच्या कपाटात एकही मराठी पुस्तक मला पहायला मिळत नाही. मराठी गाणी त्यांच्या तोंडी ऐकायला येत नाहीत.

मराठी माणसांचे नाटकाचे वेड महाराष्ट्राबाहेरही शाबूत राहिलेले आहे. जिथे जिथे मराठी माणसांची वस्ती आहे. तिथे तिथे एखादे तरी हौशी नाट्यमंडळ असतेच ही मंडळी नाटके बसवतात, निष्ठेने तालमी करतात, गणेशोत्सवात किंवा अन्य प्रसंगी ती रंगमंचावर सादर करतात. दिल्लीमध्ये ‘महाराष्ट्र रंगायन’ तर्फे दरवर्षी ‘बृहन्महाराष्ट्र हौशी नाट्यस्पर्धा’ होतात. पंधरा वीस दिवस हा कार्यक्रम चालतो. महाराष्ट्राबाहेरच्या हौशी नाट्यमंडळांकडून रोज एक याप्रमाणे नाटके उत्साहाने सादर केली जातात. दिल्लीतले नाट्यरसिक या हौशी नाट्यमंडळीच्या नाट्यप्रयोगांना हौसेने गर्दी करतात. शेवटी पारितोषिक जाहीर करण्याच्या दिवशी औत्सुक्याचे आणि जल्लोषाचे वातावरण असते. परीक्षकांनी दिलेला निकाल पटला नाही, तर जाणकार नाट्यरसिक वाद घालतात, स्पष्टीकरण मागतात. एकूण नाट्यस्पर्धांमधली नाट्यकर्मींची आणि नाट्यरसिकांची दौघांचीही भावनिक गुंतवणूक विलोभनीस असते. वर्षातून एकदा नाट्यमहोत्सव साजरा केला जातो तेव्हा, आणि गणेशोत्सवात व्यावसायिक नाटकांचे प्रयोग करविले जातात, त्याही वेळेस नाटकवेड्या मराठी प्रेक्षकांनी नाट्यगृह तुडुंब भरलेले असते. वर्षभरात एकमेकांना भेटू न शकणारी मराठी माणसे अशा वेळी नाट्यगृहात हमखास एकमेकांना भेटतात.

महाराष्ट्राबाहेरच्या सर्व महाराष्ट्र मंडळांत कोणती एक गोष्ट सर्वसामान्य असेल तर ती म्हणजे गणेशोत्सव. मग ते महाराष्ट्र मंडळ दिल्लीतले असो, की चेन्नईतले असो, की अमेरिकेतले असो, काही महाराष्ट्र मंडळे तर गणेशोत्सव साजरा करण्यासाठीच निर्माण झालेली असतात आणि वर्षातून एकदा गणेशोत्सव साजरा करणे एवढाच त्यांचा एककलमी कार्यक्रम असतो. महाराष्ट्रात सध्या साजरा केला जाणारा सार्वजनिक गणेशोत्सव आणि महाराष्ट्राबाहेरच्या मराठी जगतात साजरा होणारा गणेशोत्सव यामध्ये महदंतर आहे. मुळात लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सवात समाजप्रबोधन हे मुख्य उद्दिष्ठ होते. हळूहळू त्यामध्ये मनोरंजन आणि कलास्वाद ही उद्दिष्टे येऊन मिसळली.

मला आठवते, आमच्या लाहानपणी आम्ही बी. सायण्णा, जानकी अय्यर, हिराबाई बडोदेकर, फार काय सुधीर फडके यांची गायने सार्वजनिक गणेशोत्सवात रस्त्यावर उभे राहून ऐकलेली आहेत. माझ्या तरूणपणी प्राध्यपकीच्या सुरूवातीच्या काळात कऱ्हाड-साताऱ्यासारख्या शहरांमध्ये सार्वजनिक गणेशोत्सवासत परिसंवाद, चर्चा, अभिरूप न्यायालय यांसारख्या कार्यक्रमांत मी भाग घेतला आहे आणि अफाट श्रोतृवंद त्या कार्यक्रमांत रस घेताना अनुभवले आहे. आता पुण्यासारख्या गणेशोत्सवाच्या माहेरघरीदेखील ना व्याख्याने-परिसंवाद-चर्चा यांसारखे प्रबोधनाचे कार्यक्रम, ना जातिवंत कलाकरांच्या कलास्वादाचे कार्यक्रम. केवळ खूप पैसे खर्च करून भव्य सजावट करणे आणि लाऊडस्पीकरवर दिवसभर ठणठणाट करणारी गाणी वाजवणे यावरच सारा भर असतो. महाराष्ट्राबाहेरच्या मराठी जगतात मात्र अजूनही गणेशोत्सवात उच्च अभिरूचीचा दर्जा सांभाळला जाताना दिसतो. गणपतीची प्रतिष्ठापना बंदिस्त जागेत, एखाद्या सभागृहात वा पटांगणात केली जाते, रस्त्यावर मांडव घालून वाहतुकीला अडथळा निर्माण केला जात नाही. खूप आधीपासून योजना आखून कार्यक्रमाचे नियोजन केले जाते. एक दिवस (बहुधा रविवारी) महाप्रसादाचे भोजन असते इतर कार्यक्रमांत नाटक (याला प्राधान्य), चित्रपट (शक्यतो मराठी), नृत्य, गायन, वाद्यवृंद यांचा समावेश असतो. एखादी काव्यसंध्या असते. त्यामध्ये स्थानिक कवी हौसेने आपल्या कविता सादर करतात आणि श्रोते त्यांना प्रोत्साहन देतात. एखादा चक्क चर्चेचा वा परिसंवादाचा कार्यक्रमही असतो. (दिल्लीला एकादा श्रीराम लागू आणि नरेंद्र दाभोलकर यांचा 'अंधश्रद्धा आणि परमेश्वराचे अस्तित्व' यावरील प्रश्न चर्चेचा कार्यक्रम गणेशोत्सवात ठेवला होता!) कधी कधी प्रश्नमंजुषेचा (Quiz) कार्यक्रमही रंगतो.

पण हळूहळू आता यातही बदल होऊ लागला आहे. कलाकारांच्याही बाजूने व श्रोत्यांचाही बाजूने. मराठी गानसृष्टीतल्या एका आघाडीच्या तरूण गायिकेचा कार्यक्रम एके वर्षी अलीकडेच ठेवला होता. तेव्हा सभागृह गच्च भरलेले होते. पण "कोंबडी पळाली, तंगडी धरून लंगडी घालाया..." सारखी गाणीच त्या गायिकेने म्हटली. गाणी ऐकताना वय वर्षे पाच पासून वय वर्षे पंचवीस पर्यंतच्या मुली सभागृहातच नव्हे, तर चक्क स्टेजवर येऊन नाचू लागल्या. गायिकेने त्यांना भरघोस प्रोत्साहन दिले आणि एकंदर 'धमाल' झाल्याचा आनंद व्यक्त केला. जाणकार दर्दी श्रोते "गाण्यापेक्षा धागडधिंगाच जास्त होता हो!" असे आपापसात कुरबुरत राहिले. याउलट, एकदा माधुरी पुरंदरे यांच्या ग्रुपचा लोकसंगीताचा दर्जेदार कार्यक्रम होता, त्याला सबंध सभागृहात मोजून सतरा श्रोते उपस्थित होते! हजारोंच्या श्रोतृसमुदायापुढे महाराष्ट्रात कार्यक्रम करणारे ते गुणी कलाकार नाराज झाले होते, पण आपली अस्वस्थता लपवून त्यांनी कार्यक्रम सादर केलाच.

हे हळूहळू असे होत जाणार, त्याला इलाज नाही. पण तुलनेने महाराष्ट्रापेक्षा महाराष्ट्राबाहेरील मराठी जगातातले गणेशोत्सव नियोजनबद्ध आणि अभिरूचिसंपन्न असतात, असे सध्या तरी म्हणायला हरकत नाही; (काही वर्षांनी कदाचित हे वाक्य भूतकाळात लिहावे लागेल, इतकेच.)

गणेशोत्सवाप्रमाणेच, होळी, नवरात्र हे सणही काही ठिकाणी साजरे केले जातात. होळीच्या कार्यक्रमात होलिकादहन आणि रंग खेळणे यांतून महाराष्ट्रीय आणि स्थानिक संस्कृतीचा समन्वय साधला जातो; तर नवरात्रात दुर्गापूजा, गर्बानृत्य असे स्थानिक संस्कृतीचे कार्यक्रम समाविष्ट केले जातात.

अशा कार्यक्रमांच्या निमित्ताने मराठी माणसे एकत्र येतात. क्षीण होत चाललेले आपल्या संस्कृतीचे धागे पुन्हा नव्याने गुंफून घेतात. महाराष्ट्रातील कलावंतांशी आपले सांस्कृतिक संबंध जोडून ठेवतात.

मराठी नाटक, मराठी चित्रपट, मराठी संगीत, मराठी कविता, मराठी सामाजिक प्रबोधन यांच्या वातावरणात काही काळ आपले हरवलेले स्वत्व शोधण्याचा प्रयत्न करतात. पुन्हा अमराठी जगाच्या दैनंदिन जीवनव्यापात बुडून जायला सिद्ध होतात.

मराठी लोकांच्याविषयी अमराठी लोकांच्या मनात जी प्रतिमा आहे, तिचा मागोवा घेत चांगले हजार बाराशे वर्षे मागे जाता येते. आठव्या शतकात उद्योतनसूरीने लिहिलेल्या 'कुवलयमाला' ग्रंथामध्ये मराठी लोकांचे वर्णन पुढीलप्रमाणे केलेले आहे

"दढमढह सामलंगे सहिरे अहिमाण कलहसीले या ।
दिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे ॥"

धडधाकट, सावळ्या रंगाचे, सहनशील, अभिमानी, भांडखोर आणि 'दिले' 'घेतले' अशी भाषा बोलणारे मराठे तेथे (राहतात.)

मराठी लोकांच्या बाह्य रूपाचे, सवयींचे आणि स्वभावाचे हे वर्णन उद्योतनसूरीने तेराशे वर्षांपुर्वी केलेले आहे. आजही, इतक्या वर्षांनंतर अमराठी लोकांच्या मनातील मराठी लोकांची प्रतिमा अशीच आहे. यामध्ये मराठी लोकांच्या सहनशीलतेबद्दल किंचित कौतुकाची छटा असली (तशी ते नेहमी असतेच असे नाही. कधी कौतुकाची जागा हेटाळणीनेही घेतलेली असते.) तरी त्यांच्या (अनाठायी?) अभिमानीपणाबद्दल आणि भांडखोरपणाबद्दल मात्र कायम आणि सर्वत्र नाराजी, उपरोध, तुच्छता, टिंगलटवाळी याचेच सूर आढळतात. वागण्याबोलण्यातील निर्मळ सहजता आणि कमावलेला अदबशीर कृत्रिमपणा, दुसऱ्यावर छाप पाडणारा रूबाब आणि हास्यास्पद बावळटपणा, लोभसवाणी नम्रता आणि निरर्गल उद्धटपणा या सीमान्त गुणविशेषांच्या दरम्यान मराठी माणसाला नेमके कुठे बसवावे, हे अमराठी लोकांना समजेनासे होते.

महाराष्ट्राबाहेर मराठी माणसाची वृत्ती मोठी नमुनेदार असते. तो सदा दुसऱ्या क्रमांकावर खूष असतो. आपण पहिल्या क्रमांकावर हक्क सांगावा अशी महत्त्वाकांक्षा बाळगून त्याप्रमाणे आपल्या कार्यकर्तृत्वाची व्यूहरचना करणे त्याच्या स्वभावात नसते. "माझ्याशिवाय साहेबाचे अजिबात चालत नाही" एवढे स्वतःचे महत्त्व त्याला सुखावणारे असते. आपणच साहेब बनावे आणि आपल्या मनाप्रमाणे इतरांच्याकडून गोष्टी घडवून आणाव्यात, अशी महत्त्वाकांक्षा त्याच्यात जागृत होत नाही. "मोडेन पण वाकणार नाही" या मराठी बाण्याचे इतिहासकाळापासून चालत आलेले कौतुक मराठी माणसाच्या अंगात इतके भिनलेले असते की बाहेरच्या जगात वावरताना प्रसंगी नम्रता धारण करावी लागते, गोड बोलून सौजन्याने आपले म्हणणे दुसऱ्याला पटवून द्यावे लागते, प्रसंगी आपली मते बाजूला ठेवून दुसऱ्याच्या मताप्रमाणे वागावे लागते, इत्यादी व्यवहारीपणाच्या गोष्टी त्याला मानवत नाहीत. परिणामी "मोडेन पण वाकणार नाही" या ब्रीदाच्या पूर्वार्धालाच त्याला बऱ्याचदा सामोरे जावे लागते. एखाद्या प्रसंगी अकारण सडेतोड आक्रमक बोलण्याने आपले नुकसान झाले, हे समजून घेण्यापेक्षा "मी आज त्याला चांगला सुनावला" यातच अधिक सुख मानून घेण्याची त्याची वृत्ती असते. मराठी माणसाच्या वृत्तीत लढाऊपणा मुरलेला आहे. हा लढाऊपणा गुणस्वरूप असतो तेव्हा महाराष्ट्राबाहेरच्या जगावर त्याची चांगली छाप पडते. कितीही प्रतिकूल परिस्थितीत नाउमेद न होता, चिकाटीने झुंज देत राहण्याची मराठी माणसाची वृत्ती सर्वांनाच प्रशंसनीय वाटते. पण हा लढाऊपणा जेव्हा सर्वच लहानमोठ्या गोष्टींत अवतरू लागतो

अनुक्रमणिका

आणि त्यातून 'या माणसांची कधी तडजोडीची तयारीच नसते' असा सार्वत्रिक ग्रह निर्माण होऊ लागतो, तेव्हा मराठी माणूसच अडचणीत येऊ लागतो. मराठी माणसाला प्रिय असणारा त्याचा 'रोखठोकपणा' त्याच्या व्यक्तिमत्त्वात 'तुसडेपणा' बनून स्थिरावतो, तेव्हाही अशीच परिस्थिती निर्माण होते.

परक्या ठिकाणच्या संस्कृतीशी आणि हवामानाशी जुळवून घेणे मराठी माणसाला पटकन साध्य होत नाही. तो मनातून परकेपणा, आणि परिणामतः एकटेपणा अनुभवत राहतो. हा परकेपणा, आणि एकटेपणा गोंजारत रहायला त्याला आवडते. अवतीभोवतीच्या परक्या लोकांच्या सवयींविषयी, बोलण्यावागण्याविषयी आणि हवामानाविषयी सतत टीकेचे तुणतुणे वाजवून त्या तुलनेत आपल्या मूळ ठिकाणच्या आठवणी उगाळत बसण्यातून हे गोंजारणे व्यक्त होते. तिथे त्या परक्या ठिकाणी लहानाची मोठी झालेली मराठी माणसे मात्र असे वागत नाहीत. ती त्या संस्कृतीशी आणि हवामानाशी समरस झालेली आढळतात. तेव्हा या टिकेच्या तुणतुण्याचा रोख त्यांच्याकडेही वळविला जातो.

महाराष्ट्राबाहेर वास्तव्य करणाऱ्या मराठी लोकांनी शाळाही काढल्या आहेत. पण नव्या पिढीच्या या स्थानिक संस्कृतीशी समरस होण्याच्या सहजप्रवृत्तीमुळे मराठी माध्यम तर सोडाच, पण एक विषय म्हणून देखील मराठी विषयाची निवड मराठी मुले करत नाहीत. दिल्लीमध्ये मराठी मंडळींनी काढलेल्या एक शाळेशी मुलांचा पालक म्हणून आणि नंतर संचालक मंडळाचा सदस्य म्हणून बरीच वर्षे माझा संबंध आला. तिथे आठवीपर्यंत मराठी हा एक अनिवार्य विषय म्हणून ठेवलेला आहे. पण त्यात उत्तीर्ण होणे अनिवार्य नाही. नववी ते बारावी या वर्गात मराठी विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या मुष्किलीने तीन ते पाचपर्यंत असायची, दुसऱ्या एका शाळेच्या नावातच 'मराठी' हा शब्द आहे, पण तेथे मराठी या विषयाचे अध्यापन (कोणी तो विषय घेईना म्हणून) बंद करावे लागले. दिल्ली विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात बी. ए.साठी 'मराठी' हा एक गौण (Subsidiary) विषय म्हणून घेण्याची सोय आहे. त्याचा व्यवस्थित अभ्यासक्रम बनविलेला आहे. पण तो कागदावरच राहतो. आतापर्यंतच्या काळात बी. ए साठी मराठी हा गौण विषय घेण्याचा उपक्रम फक्त एका विद्यार्थ्याने (माझ्या मुलाने) केला आहे. ही स्थिती फक्त मराठीचीच आहे असे नाही. तमिळ आणि कन्नड भाषिकांचा हाच अनुभव आहे. याला ठळक अपवाद बंगाली आणि पंजाबी भाषिकांचा आहे. या भाषा घेणारे विद्यार्थी या लोकांनी चालविलेल्या शाळांमध्ये भरपूर प्रमाणात असतात. परिणामतः ते महाविद्यालयात आणि विद्यापीठातही असतात. या क्षेत्रातला माझा प्रत्यक्षानुभव दिल्लीपुरता मर्यादित आहे, पण गुजरात, कर्नाटक वगैरे राज्यांतही अशीच स्थिती असल्याचे मी ऐकले आहे. मराठी हा विषय दिल्ली, वाराणसी, अलीगढ, धारवाड, गुलबर्ग, इंदौर, उज्जैन, वडोदरा येथील विद्यापीठामध्ये विद्यापीठीय स्तरावर आहे. या सर्व ठिकाणी विद्यार्थीसंख्येच्या बाबतीत हीच निराशाजनक परिस्थिती आहे. याला ढळढळीत अपवाद फक्त गोवा विद्यापीठाचा आहे.

दिल्लीमध्ये दरवर्षी 'आंतरराष्ट्रीय पुस्तक जत्रा' मोठ्या भव्य प्रमाणात भरते. 'प्रगति मैदान' या विशाल प्रदर्शन-पटांगणात ती नॅशनल बुक ट्रस्ट तर्फे आयोजित केली जाते. अनेक भव्य दालनांमधून शेकडो स्टॉल्समधून देश-विदेशांतील प्रकाशकांनी आपली पुस्तके आकर्षकपणे मांडलेली असतात. लाखोंच्या संख्येने दिल्लीमधील वाचनप्रेमी लोक या जत्रेला भेट देतात. तास न् तास पुस्तके पाहण्यात घालवतात आणि शेकडो पुस्तके खरेदी केली जातात. यात मराठी पुस्तके मात्र, सगळ्या मराठी प्रकाशकांत मिळून, एका किंवा फार फार तर दोन स्टॉल्समध्ये मांडलेली आढळतात. या स्टॉल्सना जागाही कुठेतरी कोपऱ्यात मिळालेली असते आणि त्यातल्या मराठी पुस्तकांची विक्रीही फारशी होताना दिसत नाही.

अनुक्रमणिका

महाराष्ट्राबाहेरील मराठी पुस्तकांच्या प्रकाशनांचा विचार करताना, हैदराबादच्या 'आंध्रप्रदेश मराठी साहित्य परिषदेला' अग्रक्रम द्यावा लागतो. 'पंचधारा' हे दर्जेदार त्रैमासिक त्यांनी गेली अनेक दशके अत्यंत नियोजनबद्ध रीतीने चालवले आहे. या त्रैमासिकामध्ये समीक्षात्मक लेखांच्या बरोबरच विख्यात तेलगू आणि उर्दू कथा-कादंबऱ्यांची भाषांतरेही ते प्रसिद्ध करत आलेले आहे. या दोन भाषांतील साहित्याचा परिचय मराठी वाचकांना करून देण्याच्या बाबतीत या त्रैमासिकाने मोलाची कामगिरी केलेली आहे. नाली व्यंकटेश रेड्डींच्या 'सीताजोस्यम्' सारखे महत्त्वाचे नाटक 'पंचधारे' मुळेच मराठीत आले. याखेरीज, आंध्रप्रदेश मराठी साहित्यपरिषदेने महत्त्वपूर्ण समीक्षात्मक आणि समालोचनात्मक ग्रंथही प्रकाशित केलेले आहेत. डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांचे 'सेतू' आणि 'ओवी ते लावणी' हे दोन ग्रंथ उदाहरणादाखल उल्लेखिता येतील. मराठी साहित्य-समालोचनातील अपुरे दुवे जोडण्याचे आणि मराठी साहित्याला नवे परिप्रेक्ष्य देण्याचे सामर्थ्य या दोन ग्रंथांमध्ये आहे. दुदैवाने महाराष्ट्रातील समीक्षकांनी या दोन्ही ग्रंथांची पुरेशी दखल घेतली नाही. त्यांना काहीसे उपेक्षित ठेवले. एकूणच आंध्रप्रदेश मराठी साहित्य परिषदेच्या प्रकाशनांना आणि त्रैमासिकाला महाराष्ट्रातून जेवढा प्रतिसाद मिळणे न्याय्य आणि अपेक्षित होते, तेवढा आजपर्यंत मिळालेला नाही.

दिल्लीमधील साहित्य अकादमी आणि नॅशनल बुक ट्रस्ट या दोन संस्थांनीही मराठी प्रकाशने केलेली आहेत. साहित्य अकादमीची पारितोषके ज्या पुस्तकांना प्राप्त होतात, त्या सर्व पुस्तकांची भाषांतरे उर्वरीत भारतीय भाषांमध्ये करणे, हा साहित्य अकादमीच्या ध्येयधोरणाचाच एक भाग आहे. अर्थात ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. या योजनेच्या अंतर्गत अन्य भारतीय भाषांमधील पारितोषिकप्राप्त पुस्तकांची काही मराठी भाषांतरे साहित्य अकादमीने प्रकाशित केली आहेत. नॅशनल बुक ट्रस्टची 'आदानप्रदान' नावाची एक योजना आहे. या योजनेमध्ये, विविध भारतीय भाषांमधील अभिजात वाङ्मयकृतींची पारस्परिक भाषांतरे नॅशनल बुक ट्रस्ट प्रकाशित करते. यात काही नमुनेदार भाषांतरे मराठीमध्ये प्रकाशित झालेली आहेत. पन्नालाल पटेल यांच्या 'मानवीनी भवाई' या ज्ञानपीठ-पुरस्कृत गुजराती कादंबरीचे दादा धर्मधिकारी यांनी केलेले 'मानव जन्माचे नाटक' हे भाषांतर यातले सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे.

अलीकडे दोनतीन वर्षांपूर्वी पेन्ग्विन या विदेशी प्रकाशनसंस्थेच्या 'पेन्ग्विन इंडिया' या भारतीय शाखेने भारतीय भाषांमध्ये प्रकाशने काढण्याचे ठरविले, त्यांनी हिंदीपासून प्रारंभ केला. मग मराठी आणि मल्याळम् या भाषांकडे ते वळले. समकालीन मराठी कथाकारांच्या कथांचा एक प्रातिनिधिक संग्रह त्यांनी 'बदलते रंग' या नावाने प्रकाशित केला. मराठीतल्या जुन्या अभिजात वाङ्मयकृती प्रकाशित करण्याची एक उपयुक्त महत्त्वकांक्षी योजनाही त्यांनी आखली. पण 'बदलते रंग' या पुस्तकाचे मुद्रण दिल्लीतच अमराठी मुद्रकाकडून करून घेतल्यामुळे त्यात बरेच मुद्रण दोष राहून गेले. पेंग्विन इंडियाचा मराठी प्रकाशनाचा हा पहिलावहिला प्रयत्न होता. काही व्यावसायिक कारणांमुळे त्यांना अमराठी मुद्रकाकडून मुद्रण करून घेणे भाग पडले होते. पुढील प्रकाशनांचे मुद्रण महाराष्ट्रातूनच करून घेण्याच्या दृष्टीने त्यांनी आखणी सुरू केली होती. पण त्यांच्या अडचणींविषयी सहानुभूती न राखता महाराष्ट्रातील एक मराठी वृत्तपत्रामध्ये त्या पुस्तकातील मुद्रणदोषांवर कडाडून निरर्गल टीका करण्यात आली. ती टीका इतकी तीव्र होती, की पेन्ग्विन इंडियाने ती आवृत्ती मागे घेतली आणि नवी सुधारित आवृत्ती प्रसिद्ध केली. पण या प्रकारामुळे मराठी प्रकाशनाबद्दलचा त्यांचा उत्साह ओसरून गेला. जुन्या मराठी अभिजात वाङ्मयकृतींचे पुनःप्रकाशन करण्याची योजना त्यांनी बासनात गुंडाळून ठेवून दिली. नवीन मराठी प्रकाशने न करता, केवळ पेन्ग्विनच्याच इंग्लिश पुस्तकांची मराठी भाषांतरे प्रकाशित करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. मराठी प्रकाशनाना एक नवी वाट महाराष्ट्राबाहेर लाभत होती, ती हरवली.

अनुक्रमणिका

काही मराठी साहित्यिक महाराष्ट्राबाहेरच्या जगामध्ये फार महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करून घेऊ शकले आहेत. तेराव्या शतकातले संत नामदेव पंजाबात किती महत्त्वाचे मानले जातात, याचे वर्णन मागे आलेच आहे. नामदेवांप्रमाणेच, मराठीखेरीज अन्य भाषांत साहित्यनिर्मिती करून तेथे महत्त्वाचे स्थान प्राप्त करून घेणारे आधुनिक काळातील बहुभाषी मराठी साहित्यिक म्हणजे काका कालेलकर. त्यांनी मराठी प्रमाणेच गुजराती आणि हिंदी या भाषांमध्येही विपुल लेखन केले. त्यांचे गुजरातीमधील लेखन इतके महत्त्वपूर्ण आहे की, गुजराती समीक्षक त्यांना गुजराती गद्यवाङ्याच्या शिल्पकारांपैकी एक मानतात. दिल्लीमध्ये, त्यांच्या हिंदी लेखनापासून प्रेरणा घेऊन 'नागरी लिपी' परिषद ही संस्था प्रतिवर्षी चर्चासत्रांचे आयोजन करते.

अनुवादाच्या माध्यमातून महाराष्ट्राबाहेर महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झालेले मराठी लेखक म्हणून वि.स.खांडेकर, विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार, साने गुरुजी, शिवाजी सावंत आणि विश्वास पाटील यांची नावे घेता येतील. वि.स.खांडेकरांच्या प्रत्येक मराठी कांदबरीचे गुजराती आणि तमिळ या भाषांमध्ये ताबडतोब भाषांतर प्रसिद्ध होत असे, आणि मराठीइतकेच या दोन्ही भाषांमध्ये ते लोकप्रिय कादंबरीकार बनले होते. कित्येक गुजराती वाचकांची तर त्या काळी अशी समजूत होती की खांडेकर हे मुळातले गुजराती लेखकच आहेत. 'तमिळ कादंबरीच्या विकासक्रमावर खांडेकरांचा प्रभाव' या विषयावर अलीगढ मुस्लिम विद्यापीठात पीएच.डी.चा प्रबंध झालेला आहे. विजय तेंडुलकर हे खऱ्या अर्थाने अखिल भारतीय (pan-indian) नाटककार आहेत. त्यांच्या नाटकांचे अनुवाद भारतातील बहुतेक सर्व भाषांमध्ये झालेले आहेत, आणि त्या त्या भाषेत त्या नाटकांचे रंगमंचावर प्रयोगही झालेले आहेत. त्या सर्व भाषांतील रंगभूमीच्या विकासावर तेंडुलकरांच्या नाटकांचा काही ना काही प्रभाव झालेला आहे, असे त्या त्या भाषेचे समीक्षक मानतात. महेश एलकुंचवार यांचे 'वाडा चिरेबंदी' हे नाटक हिंदी नाट्यसृष्टीत बहुचर्चित आहे, आणि त्यांच्या 'होळी' या एकांकिकेचे प्रयोग हिंदीमध्ये महाविद्यालयातील तरुण-तरुणी अजूनही करतात. साने गुरुजींच्या संकलित साहित्याच्या हिंदी अनुवादाचे दोन खंड प्रकाशित झाले आहेत, आणि पुढील खंडांचे काम सुरू आहे. शिवाजी सावंतांच्या 'मृत्युंजय' चा हिंदी अनुवाद जेव्हा प्रसिद्ध झाला तेव्हा हिंदी जगतात त्याचे जोरदार स्वागत झाले. नामवंत समीक्षकांनी त्यावर लेख लिहिले. विश्वास पाटील त्यांच्या 'महानायक' चा हिंदी अनुवाद भारतीय ज्ञानपीठाने प्रकाशित केला, तेव्हा नेताजी सुभाषचंद्रांच्या आझाद हिंद सेनेच्या स्त्रीशाखेच्या प्रमुख कॅप्टन लक्ष्मी सेहेगल यांच्या हस्ते त्याचे प्रकाशन झाले, आणि आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रावर या पुस्तकावर हिंदी समीक्षकांची चर्चा झाली. त्या चर्चेत माझाही सहभाग होता. मराठीतील दलित साहित्य तर महाराष्ट्राबाहेर चांगलेच विख्यात आहे. डॉ. आंबेडकरांच्यासारखा, दलितांच्या अंतरंगात आत्मभानाची ज्योत पेटवणारा महामानव महाराष्ट्रात झाल्यामुळे, शतकानुशतकांच्या पीडेचा, वेदनेचा आणि त्यातून उफाळणाऱ्या संतापाचा स्फोट करणारा चमत्कार दलित साहित्याच्या रूपाने मराठीमध्ये अवतीर्ण झाला महाराष्ट्राबाहेरील साहित्यप्रेमींना साहजिकच या प्रवाहाविषयी कौतुक, आदर, विस्मय यांचा प्रयत्न येतो. मराठीपासून प्रेरणा घेऊन तमिळ, गुजराती, कन्नड, हिंदी आदी भाषांमध्ये दलित साहित्याचे प्रवाह सुरू झाले. त्या भाषांतील दलित साहित्यिक मराठीचे हे ऋण मिरवतात.

असे असले तरी महाराष्ट्रातील समीक्षक जेव्हा महाराष्ट्राबाहेर विविध राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सहभागी होतात, तेव्हा मराठी साहित्याचे प्रतिनिधित्व करण्याच्या आपल्या जबाबदारीचे यथायोग्य पालन करीत नाहीत, असा माझा अनुभव आहे. बंगाली, हिंदी आणि कन्नड समीक्षक जेव्हा राष्ट्रीय चर्चासत्रांत बोलतात, तेव्हा विविध साहित्यविषयक सिद्धांतांची आणि समस्यांची चर्चा-चिकित्सा करताना आपापल्या

भाषेतील साहित्य कृतींमधील भरपूर उदाहरणे देताना दिसतात. याउलट महाराष्ट्रातून आलेले समीक्षक मराठी साहित्यकृतींतील उदाहरणे अजिबात चर्चेला घेत नाहीत. ते उदाहरणे देतात ती पाश्चात्य साहित्यातली, किंवा फार तर बांगला-कन्नड हिंदी या भाषांमधील साहित्यकृतींची. या न्यूनगंडाचे मला बऱ्याच वर्षांपासून आश्चर्य वाटत आलेले आहे. बरे, जेव्हा मराठी साहित्याविषयीचे बोलण्याचा प्रसंग येतो, तेव्हा हे समीक्षक मराठी साहित्य कसे कमी दर्जाचे, उथळ आणि बालिश आहे, हेच सांगण्याचा प्रयत्न करतात. हे त्यांच्या न्यूनगंडाचेच प्रक्षेपण असते, किंवा त्यांच्या आत्मकेंद्रित पूर्वग्रहांचा तो प्रभाव असतो. दिल्लीमध्ये वि.स.खांडेकरांच्या जन्मशताब्दीनिमित्त भारतीय ज्ञानपीठाने त्यांच्या गौरवार्थ एक परिसंवादाचा कार्यक्रम हिंदी समीक्षक नामवरसिंह यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला. त्या परिसंवादात बोलताना, माझ्यासारखेच दिल्लीत अनेक वर्षे स्थिरपद झालेले एक मान्यवर मराठी समीक्षक याच पद्धतीने बोलले. खांडेकर हे कसे 'विशिष्ट मध्यमवर्गीय मानसिकतेचे लेखक' होते, त्यांचा आदर्शवाद कसा भाबडा होता, त्यांची शैली कशी कृत्रिम होती आणि आजच्या विचारवंताला त्यांच्याशी स्वतःचा सांधा जुळवणे कसे असंभवनीय आहे, याचीच तबकडी ते वाजवत राहिले. दुसरे एक 'आधुनिक' समीक्षक (मराठीमध्ये कथा आणि इंग्लिशमध्ये समीक्षा लिहिणारे) साहित्य अकादमीच्या एका चर्चासत्रात म्हणाले, की मराठीतले कवी हे विहिरीत पोहणाऱ्या बेडकांप्रमाणे आहेत; कारण ते इंग्लिश काव्य वाचत नाहीत!

मुळात मराठी साहित्य अनुवादाच्या रूपात महाराष्ट्राबाहेर फारसे पोचलेले नाही (जसे बांगला अथवा कन्नड साहित्य पोचलेले आहे!). त्यातून मराठी समीक्षकांची ही अनास्था त्यामुळे महाराष्ट्राबाहेरील चर्चासत्रांत मी जेव्हा जेव्हा मराठी साहित्याविषयी बोलत असे, तेव्हा तेव्हा तेथील श्रोते ते नवलाईने ऐकत असत, असा अनुभव मला नेहमीच येत गेला. 'मराठी साहित्यात हे असेसुद्धा आहे, हे आम्हाला माहितीच नव्हते' अशी कबुली नंतरच्या चर्चेमध्ये ते देत असत.

साहित्यिकांच्या तुलनेत, संगीत क्षेत्रातील मराठी कलावंत महाराष्ट्राबाहेरच्या जगात जास्त प्रमाणात कौतुकाचा, गौरवाचा आणि श्रद्धेचा विषय झालेले आढळतात. पंडित विष्णू दिंगबर पलुसकर यांना हिदुंस्थानी संगीतात पितामहाचे स्थान आहे. पंडित भीमसेन जोशी सर्व हिंदुस्थानी संगीताच्या गायकांचे आदराचे केंद्र आहे. लता मंगेशकर, आशा भोसले, हृदयनाथ मंगेशकर या भावंडांवर अख्खा भारत आत्मीयतेने प्रेम करतो. अगदी नव्या तरूण पिढीतल्या मंजिरी असनारे-केळकर सारख्या गायिकेलाही महाराष्ट्राबाहेर संगीतप्रेमी रसिकांचे भरभरून कौतुक आणि प्रेम मिळते.

शौर्य, धाडस आणि कर्तव्यनिष्ठा यांच्या बाबतीत शिवाजी महाराजांचा वारसा मराठी लढवय्यांनी जपलेला आहे, अशीच त्यांची महाराष्ट्राबाहेरची प्रतिमा आहे, सिख अतिरेक्यांना नेस्तनाबूत करणारे जनरल अरूण कुमार वैद्य निवृत्त झाल्यानंतर सूडाच्या घातकी गोळ्यांना बळी पडले, तरी त्यांची स्मृती मिटलेली नाही. इंदिरा गांधीनी एशियाडच्या क्रीडास्पर्धा दिल्लीमध्ये आयोजित केल्या, तेव्हा कर्तबगार पोलिस अधिकारी सूर्यकांत जोग यांना बंदोबस्तासाठी मुद्दाम दिल्लीला बोलावून घेतले होते. त्यावेळेस ओळखपत्र जवळ नसल्यामुळे खुद्द राजीव गांधीची गाडी सूर्यकांत जोगांनी अडवली होती. पुढे राजीव गांधी पंतप्रधान बनल्यावर त्यांनी दिल्लीच्या पोलिस कमिशनरच्या पदावर सूर्यकांत जोगांची नेमणूक केली. दिल्लीच्या पोलिसदलातील भ्रष्टाचार निपटून टाकून दिल्ली पोलिसांना कार्यक्षम बनवण्याचे काम जोगांनी आपल्या कारकीर्दीत केले.

अनुक्रमणिका

त्या मानाने मराठी राजकारणी मात्र महाराष्ट्राबाहेरच्या जगात पुरेसा प्रभाव पाडू शकले नाहीत, असे म्हणावे लागते. बऱ्याच मराठी नेत्यांना राष्ट्रीय स्तरावर उच्च पदापर्यंत पोचण्याची संधी लाभली, पण ज्याच्यामुळे देशाच्या राजकारणाचा रंग बदलून गेला, अथवा ज्याच्या नेतृत्वाबद्दल महाराष्ट्राबाहेरच्या लोकांना आपलेपणा, विश्वास आणि आधार वाटल्याचे दृश्य राष्ट्रीय स्तरावर झळझळीतपणे दिसले, असा मराठी नेता स्वातंत्र्योत्तर काळामध्ये दाखवता येत नाही. लोकमान्य टिळक आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतुल्य स्थानापर्यंत अन्य मराठी नेता पोचू शकला नाही.

महाराष्ट्राची वैचारिक प्रागतिकता, महाराष्ट्राचा बुद्धिवादी आणि विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन (जरी अंधश्रद्धाविरोधी कायदा करायला महाराष्ट्रात अजून यश आलेले नसले तरी), महाराष्ट्रातील स्त्रियांचे उन्नयन आणि त्यांची प्रगती, महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगती, महाराष्ट्रातील चित्रपटसृष्टी आणि मराठी साहित्यातील जनसामान्यांचे योगदान या महाराष्ट्राबाहेरील जगाला विस्मित करणाऱ्या आणि महाराष्ट्राबद्दल त्यांच्या मनात आदर उत्पन्न करणाऱ्या गोष्टी आहेत; तर महाराष्ट्रात पसरत चाललेली अतिरेकी प्रादेशिक, भाषिक आणि जातीय अस्मिता, महाराष्ट्रात वाढत चाललेले पाशवी शक्तिप्रदर्शन, महाराष्ट्रातील नेत्यांची कणाहीन शबलता आणि महाराष्ट्रातील आंतरिक दुफळ्या या त्यांच्या दृष्टीने उपहासाच्या, करूणेच्या आणि चिंतेच्या बाबी आहेत. मराठी लोकांनी महाराष्ट्राबाहेर वावरताना आपली प्रतिमा आणि महाराष्ट्राची प्रतिमा अधिकाअधिक सकारात्मक, अधिकाअधिक कर्तृत्वशाली आणि अधिकाअधिक प्रभावी कशी राहील याचे सदैव भान ठेवणे आणि त्या दृष्टीने प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

अनुक्रमणिका



**मधु मंगेश कर्णिक**

जन्म २८ एप्रिल १९३३. मराठीतील ज्येष्ठ व चतुरस्त्र साहित्यिक. समीक्षा सोडून साहित्यातील सर्व प्रकार हाताळले आहेत. अनेक वाङ्मयप्रकारांतील ७२ पुस्तकांचे लेखन. १९९० साली रत्नागिरी येथे झालेल्या ६४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. कोकण मराठी साहित्य परिषदेची व मालगुंड येथील केशवसुत स्मारकाची स्थापना. अनेक सामाजिक संस्थांची स्थापना करून कार्यभार सांभाळला. साहित्यसेवेबरोबर शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व ग्रामीण विकासाच्या कार्यामध्ये सहभाग. सध्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष व राज्य मराठी विकास संस्थेचे प्रभारी संचालक. भारताच्या राष्ट्रपतींनी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केलेले साहित्यिक.

पत्ता : ४०१/एक्स-१८, मार्व्हल, शास्त्री नगर, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.
भ्रमणध्वनी : ९९२०३२३६६७

**स**माजाची जीवनशैली बदलण्यासाठी कित्येक पिढ्या जाव्या लागतात. जीवनशैली हा संस्कृतीचा एक महत्त्वाचा विशेष असतो. संस्कृतीचे चलनवलन तडकाफडकी होत नाही. ती दीर्घकालीन प्रक्रिया असते. तरीही सांस्कृतिक प्रवासामध्ये अनेकदा अशा वाटा आणि वळणे निर्माण होतात की, समाजाचा वावर त्यामुळे बदलल्याचे आढळते. त्या वाटावळणांवरून जाताना सामाजिक स्थित्यंतरे स्वाभाविकपणे घडून येतात व त्यांनी समाजाची जीवनशैली बदलते. महाराष्ट्रीय समाजापुरते बोलायचे झाले तर गेल्या पन्नास वर्षांतील अनेक घटना, नव्याने आलेल्या गोष्टी, स्वातंत्र्यानंतरचे आणि त्यातही महाराष्ट्रनिर्मितीनंतरचे एकूणच वातावरण यांचा एकत्रित परिणाम महाराष्ट्रावर, तेथील समाजजीवनावर इतक्या वेगाने आणि ठळकपणे घडून आलेला आहे, की त्यामुळे महाराष्ट्राची सामाजिक जीवनशैलीही त्याच वेगाने बदलत आलेली आहे. म्हणून समाजाची जीवनशैली बदलण्यासाठी अनेक पिढ्या जाव्या लागतात, हे खरे असले तरी गेल्या पन्नास वर्षांतील महाराष्ट्रामधील स्थित्यंतर वेगाने घडून आल्याचे दिसते. या बदलत्या जीवनशैलीचा वेध घेण्याचा येथे प्रयत्न आहे.

समाज बदलू लागतो तेव्हा सर्वप्रथम त्याची मानसिकता बदलू लागते. बदलत्या जनमानसाचा प्रभाव समाजाच्या सर्व अंगावर पडतो आणि ती ती अंगे-उपांगे आपापल्या बदलत्या रूपांनिशी समाजपुरुषाचे एक नवे व्यक्तिमत्त्व प्रकट करतात. १९६० सालचा महाराष्ट्र आणि २०१० सालचा महाराष्ट्र यातील सामाजिक बदल त्याच्या या नव्या व्यक्तिमत्त्वातून दिसून येतात. महाराष्ट्र हा नेहमीच

अनुक्रमणिका

परिवर्तनशील राहिलेला आहे. आधुनिक महाराष्ट्राला एकोणिसाव्या शतकातील न्या. रानडे, न्या. गोखले, न्या. तेलंग, न्या. चंदावरकर, डॉ. भांडारकर, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज यांसारख्या समाजधुरीणांनी पुरोगामित्वाचे जे धडे दिले ते नंतरच्या काळात राजकीयदृष्ट्या लोकमान्य टिळक, स्वा. सावरकर आणि सामाजिकदृष्ट्या आगरकर, कर्वे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी व तत्कालीन समाजसेवकांनी गिरवले व महाराष्ट्राची पुरोगामी, राष्ट्रीय वृत्तीचा, नवयुगाचे स्वागत करणारा प्रदेश अशी प्रतिमा उभी होत राहिली. ती आजतागायत टिकून आहे. विसाव्या शतकामध्ये तर ही प्रतिमा विशेष उज्ज्वल व्हावी, अशा श्रेष्ठ श्रेणींचे समाजनेते विविध क्षेत्रातून उदयाला आले. त्यांनी मराठी भाषा, साहित्य, संशोधन, ज्ञान-विज्ञान, ललितकला, पत्रकारिता, अर्थकारण, सहकार, उद्योग, राजकारण आदी संस्कृतीच्या सर्व क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाने भर घातली. ज्ञानशाखा संपन्न केल्या. परिणामी गेल्या दीडशे वर्षांतील महाराष्ट्राचे संचित, मराठी भाषकांचा वेगळा महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर त्याला पार्श्वभूमीसारखे भूषवू लागले व स्वतंत्र महाराष्ट्राची वाटचाल सुरू झाली.

वर म्हटल्याप्रमाणे कोणत्याही प्रदेशाची जीवनशैली तातडीने बदलत नाही. त्यासाठी प्रदीर्घ काळ जावा लागतो. महाराष्ट्राचे असे एक इतर राज्यापेक्षा पृथगात्म व्यक्तिमत्त्व आहे. महाराष्ट्राचा महानायक सह्याद्री, महाराष्ट्राला लाभलेला ७५० कि.मी. लांबीचा महासागर, त्याच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या गोदावरी, कृष्णा, भीमा, यांसारख्या अनेक नद्या आणि त्यामुळे महाराष्ट्राचे मूलतः विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र आणि महामुंबई असे जे विभाग पडलेले आहेत त्या प्रत्येक विभागाची जीवनशैली परस्परांपासून वेगळी बनली आहे. या सर्वांचे मिळून एक स्वतंत्र प्राकृतिक व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राला लाभलेले आहे व त्यामुळे महाराष्ट्राच्या जीवनशैलीचा विचार करताना या सर्व वैशिष्ट्यांचा विचार कारावा लागतो. महाराष्ट्राची भाषा मराठी असली तरी महाराष्ट्रामध्ये अनेक बोलीही बोलल्या जातात. उदा. अहिराणी, वऱ्हाडी, झाडी, कुडाळी/मालवणी, संगमेश्वरी, आग्री, वारली, बाणकोटी, सातारी, कोल्हापुरी इत्यादी. या सर्व बोली अर्थवाही व समृद्ध आहेत व त्यांनी प्रमाण मराठी भाषा अधिकच समृद्ध आणि परिपूर्ण केली आहे. पन्नास वर्षांपूर्वी या सर्व वैशिष्ट्यांनिशी जो महाराष्ट्र अस्तित्वात होता. त्यावर बदलत्या युगाचा, जागतिकीकरणाचा, उदारीकरणाचा व खाजगीकरणाचा प्रभाव पडून संयुक्त महाराष्ट्राच्या बदलत्या जीवनशैलीमध्ये त्याचे रूपांतर झाल्याचे आढळते.

महाराष्ट्राची राजधानी जी महामुंबई, तिच्यापुरताच विचार करावयाचा झाल्यास गेल्या पन्नास वर्षांमध्ये या महानगरीमध्ये मोठ्या प्रमाणात परप्रांतीयांचे प्रमाण वाढल्यामुळे, या शहराची जीवनशैलीही मोठ्या प्रमाणात बदलल्याचे आढळते. मुख्य म्हणजे महाराष्ट्राचा रहिवाशी जो मराठी माणूस, त्याचा टक्का मुंबईमध्ये हळूहळू कमी होताना दिसत आहे व त्यामुळे मराठी भाषा ही हळूहळू मागे पडत आहे. मुंबई शहर म्हणजे भारताची छोटी प्रतिकृती असे म्हटले जाते व या शहरामध्ये देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या सर्व भागांतून मोठ्या प्रमाणात माणसे स्थलांतर करताना दिसतात. त्यामुळे या शहरात हिंदी, गुजराती भाषांचे तसेच इंग्रजीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. भारतातील अन्य भाषा तर येथे आहेतच. मुंबईचा मूळ पुरुष म्हणून कोळी समाज, पाठारेप्रभू, पारशी या समाजांचा उल्लेख होतो. पन्नास वर्षांपूर्वी या समाजाचे अस्तित्व मुंबईमध्ये बऱ्यापैकी शिल्लक होते. परंतु महाराष्ट्रनिर्मितीनंतर हळूहळू मूळच्या रहिवाश्यांपेक्षा महाराष्ट्रीय मध्यमवर्गीय समाजापेक्षा अन्य भाषक व अन्य धर्म, पंथाचे लोक मोठ्या प्रमाणात आल्याने त्यांचा प्रभाव साहजिकच सामाजिकदृष्ट्या दिसून येतो. गेल्या पन्नास वर्षांत मुंबईतील झोपडपट्ट्यांचे प्रमाण जसे वाढले आहे, तसेच मध्यमवर्गीयांची चाळसंस्कृती अस्तंगत होऊन त्याठिकाणी

उत्तुंग टॉवर्स उभे राहिलेले आपणास दिसतात. ज्या गिरण्यांनी व गिरणी कामगारांनी मुंबईमधला श्रमव्यवहार जिवंत ठेवला होता, त्या गिरण्या बंद पडल्याने व गिरणी कामगार परागंदा झाल्याने ही श्रमसंस्कृतीसुद्धा लोप पावली आणि संगणकयुगाने नवी श्रमसंस्कृती निर्माण केली. यातून मनुष्यबळापेक्षा यंत्रबळाचा वापर प्रकर्षाने होऊ लागला. हे सारे जागतिकीकरणाचे परिणाम आहेत, असे आपण सोपे उत्तर द्यावे, तसे म्हणू लागलो तर व्यापकपणे विचार करता मुंबईच्या बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचे अंगभूत असेही हे परिणाम आहेत. सर्वांना रोजगार पुरवणारी अशी मुंबईची प्रतिमा पन्नास वर्षांपूर्वी होतीच. पण गेल्या पन्नास वर्षांमध्ये मुंबईच्या दुभत्या गायीला सर्व जगातील वासरे लुचू लागल्यामुळे व त्यावर लोकशाहीच्या तत्त्वाखाली सरकारचेही नियंत्रण नसल्यामुळे ही मूळची कामधेनू हळूहळू भाकड होते आहे व तिच्या जागी यांत्रिक रोबोसारखी दुसरी गाय जन्मत आहे. ती दुधाळ आहे व तिच्यावर जगणारा जुना कामकऱ्यांचा, मध्यमवर्गीयांचा वर्ग नष्ट होऊन तेथे नवा लक्षाधीश, कोट्याधीशांचा वर्ग जन्माला आलेला आहे. त्याने स्वतःची अशी मॉलसंस्कृती, टॉवरसंस्कृती कारसंस्कृती स्वतःबरोबर निर्माण केली आहे. तिच्यापुढे पूर्वीची साधीसुधी, सरळ स्वभावाची, सात्त्विक वृत्तीची मुंबई मागे पडून नव्या झगझगीत, श्रीमंत जीवनशैलीची महामुंबई उभी राहिली आहे. तिने स्वतःची अशी नवी जीवनशैली निर्माण केल्यामुळे सारेच चित्र बदलले आहे.

मुंबईचे सांस्कृतिक जीवन एकेकाळी मुंबईतील पांढरपेशा वर्गाने सांभाळले होते. आता बदलत्या जीवनशैलीमुळे मुंबईतील गिरगाव, दादर, परेल यासारख्या ठिकाणी बहुसंख्य असणारा मराठी पांढरपेशावर्ग मुंबई बाहेरील उपनगरामध्ये सरकला असून मूळ मुंबईतील मराठी सांस्कृतिकता लोप पावली आहे. परिणामी गिरगाव, दादर याठिकाणी होणारे सांस्कृतिक कार्यक्रम व त्याच्यासाठी असणारी नाट्यगृहे रिकामी दिसतात. अफाट गर्दी, तिच्यामुळे हालचालीवर येणारे नियंत्रण व धावपळीची जीवनशैली यामुळे पूर्वीसारखी सांस्कृतिक कार्यक्रमांना गर्दीही होत नाही. पूर्वीच्या रेडियोची जागा आता दूरदर्शनने घेतल्यामुळे घरबसल्या मनोरंजनाचे अनेक कार्यक्रम पाहायला मिळतात हाही एक बदलत्या जीवनशैलीचा अटळ परिणाम होय. अशा प्रकारे मुंबई शहरातील महाराष्ट्रीयांची जीवनशैली वेगाने बदलत असल्यामुळे या शहराच्या एकूणच व्यक्तीमत्त्वामध्ये फार मोठा बदल झाल्याचे दिसून येत आहे. पूर्वीचे कौटुंबिक वातावरण जाऊन त्याठिकाणी माणसामाणसामधील तुटलेपण प्रत्ययाला येत आहे. जिव्हाळा कमी होत आहे आणि सार्वजनिक उपक्रमामधील आस्थासुद्धा कमी होत आहे.

जी गोष्ट मुंबईची तीच परंपरा जपणाऱ्या पुण्यासारख्या शहराचीही. पुणे शहराला एक फार मोठा सांस्कृतिक वारसा आहे. येथे एकोणिसाव्या, विसाव्या शतकामध्ये अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संस्था स्थापन झाल्या व त्यांच्याद्वारे संस्कृतीची विविध क्षेत्रे उन्नत करणारे उपक्रम राबवले गेले. तेथील शंभर वर्षांपूर्वीची महाविद्यालये, भांडारकर प्राच्यविद्या संस्था, भारतीय इतिहास संशोधक मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, यांसारख्या संस्था म्हणजे पुणे शहराचे सांस्कृतिक वैभव होते. पुण्यातील वाडे ही सुद्धा सांस्कृतिक केंद्रे होती. शनिवारवाडा, विश्रामबागवाडा, केसरीवाडा हे वाडे म्हणजे मराठी मनाची स्पंदने जपणारी केंद्रे होती. काळाच्या ओघामध्ये हे सर्व सांस्कृतिक वैभव क्षीण होऊ लागले व आधुनिक जीवनशैलीची वाट पुणे शहराने धरली. नव्या शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या. तंत्रविज्ञानाचे व संगणक प्रणालीचे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील महत्त्वाचे केंद्र म्हणून पुणे शहराचा उल्लेख होऊ लागला. पूर्वीची उपाहारगृहे जाऊन नवे डायनिंग हॉल निर्माण झाले व पुण्यातील मराठी खाद्यसंस्कृती बदलत गेली. तीच गोष्ट सातारा, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर, नाशिक, जळगाव या शहराबद्दल म्हणता येईल. खाणेपिणे बदलले त्याचप्रमाणे वस्त्रप्रावरणे बदलली. जुनी गंधर्वकालीन संगीत रंगभूमी कधीच मागे पडली

आणि नवनाट्याचा उदय झाला. साहित्य क्षेत्रातही तेच घडले. साहित्य संमेलनासारखा सांस्कृतिक उत्सव, महोत्सवाचे रूप धारण करू लागला. पुस्तकांची बाजारपेठ विस्तार पावली. ग्रामीण भागातही ग्रंथखरेदी मोठ्या प्रमाणात होऊ लागली. शिक्षणाच्या प्रसारामुळे आधुनिक महाराष्ट्रातील ग्रामीण समाज मोठ्या प्रमाणात शिकू लागला, लिहू लागला व बोलू लागला. त्याचा परिणाम म्हणून ग्रामीण महाराष्ट्रातून अनेक नवे लेखक उदयाला आले. ग्रामीण आणि दलित साहित्याची अभिनव निर्मिती झाली. गावोगावी माध्यमिक विद्यालये आणि महाविद्यालये स्थापन झाली. मोबाईलच्या प्रसारामुळे संपर्कसुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या आणि गावोगावी ब्रँच पोस्ट ऑफिसे रिकामी दिसू लागली. कृषी क्षेत्रामध्येही नव्या जीवनशैलीचा परिणाम दिसून येऊ लागला. ट्रॅक्टर, पॉवर टीलर या गोष्टी नांगरणीसाठी उपयोगात येऊ लागल्या. नवी बी-बीयाणे व नवी खते यामुळे पीक वाढल्याचे दिसून येत असले तरी बदलत्या ऋतुमानामुळे पावसाचे प्रमाण अनिश्चित होऊन दुष्काळाचे क्षेत्र वाढू लागले. परिणामी केवळ शेतीवर जगत असलेला शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करू लागला. सरकारी योजना कितीही उपयुक्त असल्या तरी त्या शेतकऱ्यांपर्यंत पोचत नसल्यामुळे शेतकरी अभावग्रस्त राहिला. त्याची मुले शिक्षणात पुढे गेली, परंतु रोजगाराविना बेकार राहिली. गावोगावच्या मुली शिकल्या, परंतु त्यांच्या अपेक्षेनुसार स्थळे मिळत नसल्यामुळे महिला वर्गामध्ये ग्रामीण भागांत एकप्रकारचे वैफल्य दिसून येऊ लागले. तेहतीस टक्के आरक्षणामुळे महिलांना सरपंचासारखी पदे ग्रामीण भागांत उपलब्ध झाली, तरीही पुरुषी वर्चस्व संपलेले नाही. बचत गटांसारखे शासकीय उपक्रम काही प्रमाणात या महिलांसाठी वरदान ठरत असले तरी व्यापकतेने विचार करता ग्रामीण भागातील कष्टकरी महिला आजही काबाडकष्टांना जुंपलेली व कष्टी आढळते. आधुनिक जमान्यानुसार ग्रामीण भागातील समाजही नागरी जीवनशैलीचे अनुकरण करू लागला. शेतावर राबणाऱ्या मुली ड्रेस घालून व तरुण मनिला-पँट घालून नांगर चालवू लागले. खेड्यांची नागरिकीकरणाकडे वेगाने वाटचाल होऊ लागली.

समाजाच्या जीवनशैलीवर मूल्यव्यवस्थेचा मोठा परिणाम होतो. या मूल्य व्यवस्थेला तडा जाऊ लागला म्हणजे जो विसंवाद निर्माण होते तो भयावह असतो. वाढत्या भ्रष्टाचाराचे उदाहरण याबाबतीत देता येईल. शासनामध्ये व समाजामध्ये पूर्वी भ्रष्टाचार नव्हता असे नाही. मुंबईच्या क्रॉफर्ड साहेबाला शंभर वर्षांपूर्वी भ्रष्टाचाराच्या आरोपावरून तेव्हाच्या ब्रिटिश सरकारने शिक्षा केली होती. परंतु आज भ्रष्टाचार एवढ्या प्रमाणात व सर्वत्र वाढला आहे, की त्याला एकप्रकारे शिष्टाचाराचे स्वरूप आल्यासारखे वाटते. मूल्यव्यवस्था संपूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याचे आढळते व त्याचाही परिणाम समाजाच्या बदलत्या जीवनशैलीवर अपरिहार्यपणे झालेला आहे. शिक्षेचे भय कोणालाही राहिले नाही. गेल्या पन्नास वर्षांतील महाराष्ट्रामध्ये, महानगरी व ग्रामीण भागात, सर्व ठिकाणी, सर्व क्षेत्रातील भ्रष्टाचार जीवनशैलीला एक मोठा शाप ठरला आहे. भ्रष्टाचारातून आलेल्या, श्रम न करता मिळालेल्या अलोट पैशामुळे चंगळवादालाही सीमा उरलेली नाही. भ्रष्टाचारामध्ये राजकारणी, सनदी अधिकारी व 'संस्कृती सांभळणारा' म्हणून मानला गेलेला मध्यमवर्ग सापडल्यामुळे सर्व मूल्यव्यवस्था उद्ध्वस्त झालेली आहे. याचा जीवनशैलीवर दुष्परिणाम झाल्याशिवाय कसा राहील?

वाढती गुन्हेगारी हीसुद्धा समाजामधील भयावह गोष्ट आहे. वाढते नागरीकरण व गरजेपेक्षा हाती खेळू लागलेला पैसा त्यामुळे जसा चंगळवाद वाढला तसेच पैशाच्या वाढत्या हव्यासातून गुन्हेगारीचे प्रमाणही वाढले. पन्नास वर्षांपूर्वी समाजामध्ये गुन्हेगारी नव्हती असे नाही. परंतु अलीकडील काळात ही गुन्हेगारी पांढरपेशा वर्गातही मोठ्या प्रमाणात दिसून येते. पूर्वीची गुन्हेगारी दारिद्र्यातून, अभावग्रस्ततेतून तसेच समाजाच्या काही घटकातील पारंपरिक गुणसूत्रांनुसार घडून येत होती. त्यामुळे ब्रिटिशांच्या काळात

अनुक्रमणिका

गुन्हेगार म्हणून वर्गीकृत केलेले समाजघटक होते. आता गुन्हेगारीला वर्ग राहिलेला नाही. बँका, पतपेढ्या, सहकारी संस्था, यांसारख्या पांढरपेशांच्या संस्थांमध्येही आर्थिक गुन्हेगारी वाढलेली आढळते. बौद्धिक गुन्हेगारीबरोबरच खून, मारामारी यासारखी हिंस्र गुन्हेगारी आता खेड्यापाड्यातही दिसून येते. बलात्कार, अपहरण, स्त्रीभ्रूणहत्या यांचेही प्रमाण खूप वाढले आहे. त्यामुळे समाजामध्ये एकप्रकारची असुरक्षितता पूर्वीपेक्षा अधिक दिसून येते व त्याचा समाजाच्या जीवनशैलीवर अटळ परिणाम होतो. वाढता दहशतवाद गुन्हेविषयक जीवनशैलीमध्ये मोडतो.

नागरी भागातील महिला वर्गातील जागृती ही एक चांगली गोष्ट म्हणता येईल. सुशिक्षित आणि नोकरदार महिलांचे प्रमाण वाढते असल्यामुळे या वर्गाला आर्थिक विवंचना पूर्वीएवढी राहिलेली नाही. परंतु स्त्रीवर्गाकडे पाहण्याचा पुरुषी दृष्टिकोन अजूनही सुसंस्कृतपणाकडे वळलेला दिसत नाही. कदाचित समाजातील स्त्री-पुरुष नातेसंबंधातील मोकळेपणा व मुक्त जीवनशैलीचेही (permissive) ते कारण असावे. तरीही गेल्या पन्नास वर्षांत आगरकरांच्या, कर्व्यांच्या महाराष्ट्रात आत्मभान आलेल्या येथील महिलांनी त्यांना समाधान वाटावे, इतपत आपल्या गुणांचा विकास केला आहे.

अंधश्रद्धा तर पूर्वीही होती. तो आपल्या समाजातील ठळक दुर्गुण आहे. परंतु गेल्या पन्नास वर्षांमध्ये या अंधश्रद्धेचे प्रमाण अधिकच वाढल्याचे दिसून येते. विशेषतः पांढरपेशा व बुद्धिजीवी वर्गामध्ये देवदेवता, महाराज व बुवाबाजी यांकडे अधिक ओढा दिसू लागलेला आहे. एका बाजूला अणुशास्त्रातील व संगणकातील अत्युच्च प्रगती ज्या बुद्धिजीवी वर्गाने केली त्याच बुद्धिजीवी वर्गाचा एक भाग अंगारकी संकष्टीनिमित्त गणपतीसमोर प्रचंड मोठ्या रांगेने उभा राहताना दिसून येतो. समाजातील अशा अनेक विसंगती व विरोधाभास यांचा उल्लेख करता येईल. परंतु वर दिलेल्या उदाहरणावरून जीवनशैलीतील फरक अधोरेखित होईल. पंढरपूरच्या वारीमध्ये आता लक्षावधी लोक सामील होताना दिसतात. श्रद्धा-अश्रद्धेचा हा खेळ भाविकतेबरोबर आरोग्याचे व पर्यावरणाचे अनेक प्रश्न निर्माण करीत आहे. समाजाची उत्सवप्रियता, भाविकता पूर्वीही होती. पम तिला नव्या जमान्यात महोत्सवी रूप आलेले आहे. मराठी मध्यमवर्ग, विशेषतः शहरातील, खूप प्रमाणात बदलला. त्याची जीवनशैली बदलली. मुलांपासून वृद्ध आजीबाईंपर्यंत सर्व घर टीव्हीला चिकटलेले दिसू लागले. दुपारच्या निवांत घटकेला शेजारणीकडे जाऊन सुखदुःखाच्या गोष्टी, निवडणं, शिवण-टिपण जिवाभावाने करणाऱ्या कुटुंबिनी आता आपल्याच फ्लॅटमध्ये टीव्हीच्या मालिकेला एकमेव मैत्रीण मानून हितगुज करतात! दुपारचे मासिकांचे, पुस्तकांचे वाचन गेले व टीव्ही पाहणे आले. मुलींच्या खेळातल्या भावल्या, बुडकुल्या, ठकी जाऊन तेथे बार्बी, खेळासाठी संगणक आला. मराठी मुलांच्या हातातील श्यामची आई, गोट्या जाऊन हॅरी पॉटर आला!

पाहुणे आले तर पूर्वी चहापाण्याची धांदल उडायची, आता बीअरचे मग बाहेर पडतात. पार्टीबाजीचे प्रमाण घराघरांतून वाढले आहे. मद्यपान निषिद्ध राहिले नाही. मध्यमवर्गीयांच्या बदलत्या जीवनशैलीचा हा प्रभाव.

गेल्या पन्नास वर्षांमधील प्रसार माध्यमांचे स्वरूप आमूलाग्र बदललेले आहे. पन्नास वर्षांपूर्वी हाताच्या बोटावर असलेल्या दैनिकांची व साप्ताहिकांची संख्या आता अनेकपटीने वाढली आहे. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे जिल्हा दैनिकांची संख्या वाढली आहे व त्यांना ग्रामीण भागात मोठा वाचकवर्ग आहे. गाव तेथे वाचनालय या धोरणानुसार शासनाने ग्रंथालयांना तुटपुंज्या प्रमाणात का होईना, परंतु अर्थसाहाय्य करून वाचनालयांची संख्या ग्रामीण भागातही वाढवली आहे. परंतु ग्रामीण भागातील

ग्रंथालयांना प्रौढ वाचक लाभत नाही. त्यांचे वाचन दैनिकांपुरते मर्यादित राहते, ही वस्तुस्थिती होय. दूरदर्शनचा प्रभाव अगदी दुर्गम भागातील खेड्यातूनही आढळतो व छोट्या पडद्यावर दिसणाऱ्या मालिकांतील जीवनशैली आत्मसात करण्याकडे ग्रामीण भागाचा कल दिसून येतो. त्यामुळे फार मोठे सांस्कृतिक दुभंगलेपण दिसून येते. वाचण्यापेक्षा पाहणे सोपे असे सुशिक्षित वर्गालाही वाटू लागले आहे. दूरदर्शनमुळे रंगभूमीसाठी तरुण कलाकार मिळणे दुरापास्त होऊ लागले असून पन्नास वर्षांपूर्वीच्या गंभीर स्वरूपाच्या वैचारिक नाट्यप्रयोगांपेक्षा उथळ व अंगविक्षेपप्रधान सवंग नाटके मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागली आहेत. एकेकाळी चित्रपट आणि रंगभूमी यांचा समाजमनावर मोठा प्रभाव असे. बदलत्या जीवनशैलीत तो राहिलेला नाही. क्वचितच एखादा अंतर्मुख करणारा चित्रपट वा नाट्यप्रयोग पाहयला मिळतो न मिळतो तोपर्यंत तो अंतर्धानही पावतो! प्रसार माध्यमामध्ये वृत्तपत्रे, दूरदर्शन, आकाशवाणी, रंगभूमी, चित्रपट, साहित्य यांचा समावेश होतो. या सर्व क्षेत्रांमध्ये गुणात्मक परिवर्तन झाल्याचे आढळते. अर्थात अपवाद म्हणून काही चांगली उदाहरणे दाखवता येतील. पण व्यापक प्रमाणात पाहिले तर प्रसारमाध्यमांची शैलीही बदललेली आहे. मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांवरच आपले मराठीपण आजवर टिकून होते. हे मराठीपण टिकवण्यामध्ये भाषिक प्रसारमाध्यमांचा मोठा सहभाग होता. दुर्दैवाने तो कमी झालेला आहे. चुकीचे मराठी लेखनसुद्धा याला कारणीभूत आहे.

शासनाचे या बाबतीमधील प्रयत्न उल्लेखनीय असले तरी त्यांना मर्यादा आहेत. मराठीपण टिकवा हे शासकीय आदेशाने घडून येत नाही. सर्व मराठी समाजाने त्याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. मुंबईसारख्या महानगरीतील मराठीपण आपण कितीही कंठशोष केला तरी हळूहळू लुप्त होत आहे व त्याठिकाणी अठरा पगड भाषक संस्कृती निर्माण होत आहे; हे वास्तव होय.

समाजामध्ये आरोग्यविषयक नव्या जाणिवा आलेल्या आहेत, ही एक चांगली गोष्ट म्हणता येईल. पूर्वीचे देवी, कॉलरा, टायफॉइड, प्लेग यांसारखे रोग नष्ट झाले तरी कॅन्सर, एड्स व हृदयविकार यांचे प्रमाण वाढल्याचे आढळते, वाढती व्यासनाधीनता, ताणतणाव यांनी आपले जीवन व्यापल्यामुळे नव्या व्याधी निर्माण झाल्या तसेच नवे औषधोपचारही. पूर्वीची फॅमिली डॉक्टर ही संकल्पना गेल्या पन्नास वर्षांत नाहीशी होऊन प्रत्येक छोट्यामोठ्या आरोग्याच्या प्रश्नासाठी कन्सलटंट दिसू लागले आहेत.

बदलत्या राजकीय संस्कृतीबद्दल भाष्य करणे कठीण वाटावे एवढी राजकीय शैलीही आरपार बदलली आहे. सैद्धांतिक मूल्यांवर आधारलेले राजकारण जाऊन तेथे सत्ता, मत्ता व स्वार्थपरायणता हीच प्राथमिक मूल्ये बनली आहेत. त्यानुसार राजकीय जीवनशैलीही बदलली आहे. राष्ट्रीय व सामाजिक प्रश्नांभोवतीचे राजकारण व्यक्तिगत पातळीवर, व्यक्तिगत हितसंबंधांवर आता चालले आहे. त्यात जनतेचा विचार कोठेच नसतो. जातीयता आणि धर्माचा प्रभाव हे भारताचे वैशिष्ट्य! महाराष्ट्रही त्याला अपवाद नाही. गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रातील जातीयता अधिक टोकदार बनली आहे व धर्मवादाचा प्रभावही वाढला आहे, सर्वधर्म समभाव व धर्मनिरपेक्षता हे शब्द फक्त राजकारणामध्ये तोंडी लावण्यासाठी उपयोगात आणले जातात. गावोगावच्या ग्रामपंचयती जातीपातींचे, राजकारणाचे, स्वार्थांधांचे अड्डे बनल्या आहेत.

महाराष्ट्राची मानसिकता बदलते आहे तशी ती सर्व देशाचीच बदलते आहे. पण इथे आपण महाराष्ट्रापुरता विचार करीत आहो. बदलत्या मानसिकतेचा परिणाम जीवनशैलीच्या, जीवनमूल्यांच्या बदलामध्ये प्रतिबिंबित होतो. पन्नास वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र शांत, जुनी मूल्ये उराशी कवटाळून, सात्त्विकतेने

अनुक्रमणिका

जगणारा व दुसऱ्याला जगवणारा असा होता. स्वातंत्र्यपूर्वीच्या महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्यलढा प्राणपणाने लढला गेला. तेव्हा स्वातंत्र्याचे एकमेव उद्दिष्ट सर्व पक्षांच्या आंदोलनांना होते. स्वातंत्र्यापाठोपाठ संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, गोवाप्रश्नाचे आंदोलन आले. समाजाला या साऱ्या उद्दिष्टांचे एक सामूहिक प्रयोजन होते, ही सारी उद्दिष्टे प्राप्त झाल्यानंतर समाजासाठी 'प्रयोजन' म्हणून काय उरले आहे?

दरम्यान आलेल्या जागतिकीकरणामुळे पैसा, नोकऱ्या, कल्पनेतही नसलेले पगार, परदेशांशी वाढते दळणवळण, चंगळवाद आणि अनेक कारणांनी सगळीकडील माणून स्वयंकेंद्रित बनला. तो फक्त आपल्यापुरते पाहू लागला. त्याच्यासमोर कोणतेही सामाजिक, राष्ट्रीय उद्दिष्ट राहिले नाही. त्याचा एकटेपणा वाढतो आहे व तोच त्याला प्रिय होतो आहे. मी, माझे कुटुंब, माझे करीयल व बँक बॅलन्स! यापुढे मातापित्यांचाही सांभाळ उद्दिष्ट म्हणून राहिलेला नाही. व्यक्तिगत स्पर्धा आणि अधिकाधिक एकाकीपणा त्यातच आनंद. वृद्धाश्रमांची संख्या वाढते आहे. वृद्धांची वयोमर्यादाही वाढते आहे. त्यामुळेही नवनवीन समस्या उद्‌भवत आहेत.

ही बदलती जीवनशैली म्हणजे आजची सामाजिक संस्कृती. ती एकमुखी असणे यापुढे शक्य दिसत नाही. दुभंगलेपण हेच तिचे अविभाज्य लक्षण बनले आहे. महाराष्ट्राच्या बदलत्या सांस्कृतिक जीवनशैलीची ही केवळ झलक म्हणता येईल. अनेक विरोधाभासांनी अवगुंठित झालेली ती काहीशी निराशाजनक व नकारात्मक वाटली, तरी ती वस्तुस्थिती निदर्शक आहे. अर्थात या बदलत्या जीवनशैलीमध्ये अनेक चांगल्या गोष्टींचा अवश्य उल्लेख करता येईल. या काळात भूकंप, महापूर, दुष्काळ, अतिपर्जन्य यासारख्या नैसर्गिक आपत्तींना महाराष्ट्राने खंबीरपणे तोंड दिले आहे. सव्वीस अकरासारख्या दहशतवादाचा मुंबई शहराने हिमतीने मुकाबला केलेला आहे. महाराष्ट्र हा शूरांचा, मर्दांचा प्रवेश आहे हे गेल्या पन्नास वर्षांमध्ये अनेकदा सिद्ध झालेले आहे. गोविंदाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे हा दगडांचा, कणखर, राकट महाराष्ट्र देश असला तरी इथे जाई, जुई, प्राजक्ताचाही आदर केला जातो. राष्ट्रीयत्वाचा प्रश्न आला, की महाराष्ट्र सरसावून पुढे होतो. महाराष्ट्राची मूळ प्रवृत्ती संतांनी सात्त्विक बनवली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मर्दानी बनवली आहे. राजसपणा तर त्याच्या व्यक्तिमत्त्वातच आहे. त्याला पुरोगामीपणाची, परिवर्तनशीलतेची, एकात्मतेची सुंदर जोड आहे. हे सारे संचित नव्या महाराष्ट्राने जपले, जोपासले, आपले मराठीपण प्राणपणाने सांभाळले, तर नव्या युगधर्मातही आपली मूळची निकोप जीवनशैली आपणाला सोडून जाणार नाही. कारण व्यक्तीचे, समाजाचे वा देशाचे व्यक्तिमत्त्व परंपरा जपत नव्याचा स्वीकार करण्यातून घडत असते.

अनुक्रमणिका

# परिशिष्ट

महाराष्ट्राला साहित्य आणि संस्कृतीचा मोठा वारसा लाभलेला आहे. या वारशाचे जतन, संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. या विभागांतर्गत कार्यरत असणारे साहित्य आणि संस्कृती मंडळ, सांस्कृतिक कार्य संचालनालय, विश्वकोश निर्मिती मंडळ, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, पु. ल. देशपांडे अकादमी, पुरातत्त्वे व वस्तुसंग्रहालये आदी मार्फत गेल्या काही वर्षात महत्त्वाची कामगिरी बजावण्यात आली आहे. त्यांच्या या कामगिरीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे आहे :—

अनुक्रमणिका

# महाराष्ट्राचे ‘सुवर्णपान’-साहित्य आणि संस्कृती मंडळ

श्री. सुरेश वांदिले, सचिव
साहित्य आणि संस्कृती मंडळ

महाराष्ट्र राज्य हे देशात साहित्य आणि संस्कृती क्षेत्रात अग्रगण्य राज्य समजले जाते. ही अग्रगण्यता टिकवून ठेवण्यासाठी राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने महत्वाचा वाटा उचलला आहे.

मंडळाच्या स्थापनेचा शासकीय अध्यादेश १९ नोव्हेंबर १९६० रोजी निघाला. म्हणजेच यंदा मंडळाला पन्नास वर्षं पूर्ण झाली आहेत. महाराष्ट्राची स्थापना १ मे १९६० रोजी झाल्यानंतर महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी लगेचच या मंडळाची स्थापना केली. साहित्य आणि संस्कृतीविषयक उपक्रमांना शासकीय पातळीवरून प्रोत्साहन आणि सर्व प्रकारचे साहाय्य देण्यासाठी स्थापन करण्यात आलेले हे देशातील पहिलेच मंडळ ठरले. यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय यातून दिसून येतो.

कोणत्याही राज्याच्या प्रगती आणि समृद्धीचा मापदंड हा त्या प्रदेशाच्या साहित्य, संस्कृती आणि कला यांच्या प्रगतीवरून अधोरेखित होतो याची जाणीव असल्यानेच मंडळाच्या पहिल्या बैठकीला संबोधताना यशवंतरावजी म्हणाले होते, “मराठी भाषिक जनतेच्याही अशा काही आशा-आकांक्षा, इच्छा असून त्या विविधप्रवाही आहेत. त्यांना आपण लेखणीद्वारा शब्दरूप केले पाहिजे. त्याचप्रमाणे ज्ञानाच्या सरोवराचे पाट आपण लोकांच्या जीवनापर्यंत पोहोचवले पाहिजेत. ही ज्ञानगंगा लोकांच्या जीवनापर्यंत पोहोचवण्यासाठी या मंडळाची आम्हास मदत होईल.”

यशवंतरावजींनी व्यक्त केलेल्या अपेक्षेनुसार मंडळाने आपले कामकाज तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नेतृत्वाखाली सुरू केले. त्यांनी आखून दिलेल्या मार्गावरून कालानुरूप विविध बदल करीत मंडळाने गेल्या ५० वर्षात राज्याच्या साहित्य संस्कृतीचा चौफेर विकास व्हावा व सर्व घटकांना यात सामावून घेणे शक्य व्हावे आणि महाराष्ट्राची अभिरूचीसंपन्नता वाढावी यासाठी यशस्वीपणे प्रयत्न केले आहेत.

गेल्या ५० वर्षात साहित्य संस्कृती मंडळाने मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, कला या क्षेत्रात महाराष्ट्राला लाभलेला थोर वारसा जतन करण्यासाठी आणि संवर्धनासाठी स्तुत्य असे विविध उपक्रम राबवले आहेत.

विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान, समाज विद्या, भाषा, बोलीभाषा, वाङ्मयीन संस्कृती, इतिहास यांच्याशी निगडित महत्वाची ग्रंथसंपदा मंडळाने महाराष्ट्राला गेल्या ५० वर्षात दिली आहे.

मंडळाच्या ग्रंथ प्रकाश योजनांतर्गत विज्ञान ग्रंथमाला, उत्कृष्ट ग्रंथांचे अनुवाद, महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्राच्या इतिहासाशी संबंधित ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन, प्रकाशन, संशोधन आणि मंडळाच्या वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक अन्य प्रकाशनांचा यात समावेश आहे. मंडळाने २०१० पर्यंत ५०० च्या आसपास ग्रंथसंपदा सिद्ध केली आहे. हे ग्रंथ त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांनी परिश्रमपूर्वक लिहिले

अनुक्रमणिका

आहेत. संशोधनात्मक अशा या ग्रंथाचे संदर्भमूल्य फार मोठे आहे. या ग्रंथसंपदेमध्ये संपूर्ण गडकरी भाग-१ व २, महात्मा फुले समग्र वाङ्मय, लोकहितवादी समग्र वाङ्मय, आगरकर समग्र वाङ्मय खंड १ ते ३, आचार्य भागवताचे संकलित वाङमय, प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय, केशवसुतांच्या कवितांच्या हस्तलिखिताची यथामूल आवृत्ती आदींचा ठळकपणे उल्लेख करता येईल.

**महाराष्ट्राचे शिल्पकार**

मंडळाची ही वैशिष्ट्यपूर्ण योजना असून त्या अंतर्गत महाराष्ट्र घडविणाऱ्या विविध क्षेत्रातील थोर पुरूषांची संक्षिप्त चरित्रे प्रकाशित करण्यात आली आहेत. १०० ते १२५ पृष्ठांची ही पूस्तके अल्प किंमतीत असून, 'ज्ञान-प्रबोधन-संस्कार-प्रोत्साहन' या गुणवैशिष्ठ्यांनी त्यांचे वाङ्मयीन मूल्य वाढले आहे. नव्या पिढीला प्रेरणा देणारी व त्यांच्यातून महाराष्ट्राचे शिल्पकार घडवण्यासाठी साहाय्यभूत ठरणाऱ्या या मालिकेसाठी आणखी ४०-४५ पुस्तकांचे नियोजन करण्यात आले आहे.

**मराठी वाङ्मयकोश**

मराठी वाङ्मय कोशाचा प्रकल्प १९६९ पासून राबवण्यास घेतला. २५० पृष्ठांचे ४ खंड आतापर्यंत प्रकाशित झाले आहेत. खंड पहिल्यात १०५० ते १८५७ पर्यंतच्या मराठी ग्रंथकरांचा, खंड दुसऱ्यात (भाग १) मध्ये १९५८ ते ३० एप्रिल १९६० पर्यंतच्या दिवंगत मराठी ग्रंथकरांचा, खंड तिसऱ्यात १८८५ ते १९६० पर्यंतच्या ग्रंथ परिचयाचा आणि खंड चौथ्यात समीक्षा संज्ञांच्या समावेश करण्यात आला आहे. या चारही कोशातील नोंदी अभ्यासक, संशोधक, पत्रकार, सामान्य वाचक यांच्यासाठी वाचन आनंदाची अनुभूती देणारे तर आहेच पण हे कोश मराठी ग्रंथप्रेमींच्या घरांचे वैभव वाढवणारेसुद्धा आहेत. वाङ्मय कोशाच्या दुसऱ्या भागाच्या दुसऱ्या खंडाचे प्रकाशन लवकरच अपेक्षित आहे.

**शब्दकोश**

मंडळाचा अतिशय महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणजे शब्दकोश. जवळपास दीड लाख मराठी शब्दांचे विविध अर्थ देणाऱ्या शब्दकोशाचे दहा खंड प्रकाशित होणार आहेत. मंडळाच्या पुणे येथील कार्यालयात प्रा. रामदास डांगे यांच्या संपादकत्वाखाली हा प्रकल्प सुरू आहे. आतापावेतो शब्दकोशाचे २ खंड प्रकाशित झाले असून ३ रा खंड मुद्रणासाठी सोपवण्यात आला आहे.

**विज्ञान आणि तंत्रज्ञान कोश**

महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मंडळाने 'विज्ञान आणि तंत्रज्ञान' कोश तयार करण्याचा संकल्प केला. मराठी वाचकांना ज्या वैज्ञानिक संज्ञा आणि संकल्पना समजायला किंवा आकलन व्हायला कठीण जातात त्यांचे स्पष्टीकरण सोप्या मराठीत व आवश्यक त्याठिकाणी रेखाचित्रे, छायाचित्रे यांच्यासह देण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या विविध कोशांमध्ये मंडळाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान कोशाने वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त केले आहे. या कोशाच्या १५ हजार प्रती मुद्रित करण्यात आल्या होत्या. त्या सर्व प्रतींची विक्री झाली आहे. हा कोश तयार करण्याचे शिवधनुष्य मराठी विज्ञान परिषदेने यशस्वीपणे उचलले.

## नवलेखकांना प्रोत्साहन

गेल्या ५० वर्षात मंडळाने नवलेखकांना प्रोत्साहन देणारी योजना प्रभावीपणे कार्यान्वित केली आहे. नवलेखकांच्या पुस्तकांसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानातून आतापावेतो २०३७ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. नवलेखकांच्या साहित्यिक प्रतिभेला आणखी पैलू पडावेत यासाठी मंडळामार्फत दरवर्षी महाराष्ट्रातील विविध भागात वाङ्मयाच्या विविध शाखांवर आधारित शिबिरे/कार्यशाळासुद्धा आयोजित केल्या जातात. त्याचबरोबर नवलेखक अनुदान योजनेत प्रकाशित पुस्तकांमधून दरवर्षी कथा/काव्य/कादंबरी/नाटक/एकांकिका/ललितगद्य/बालसाहित्य यासाठी यशवंतराव चव्हाण उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार आणि प्रकाशकांसाठी सरफोजीराजे भोसले पुरस्कार दिला जातो.

## नियतकालिकांना अनुदान

महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यात साहित्यविषयक नियतकालिके निघतात. विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन परिश्रमपूर्वक निघणाऱ्या या नियतकालिकांनी साहित्यविषयक अभिरूची संपन्न करण्यासठी व संशोधनाला चालना देण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण हातभार लावाला आहे. त्यांना अर्थसाहाय्य करून मंडळाने त्यातील आपलाही वाटा उचलला आहे. दरवर्षी साधारणतः ४० ते ४५ नियतकालिकांना अनुदान दिले जाते.

## साहित्य संस्थांना अनुदान

राज्यातील ७ साहित्य संस्थांना त्यांचे साहित्यविषयक विविध उपक्रम राबवण्यासाठी आर्थिक चणचण भासू नये म्हणून मंडळामार्फत दरवर्षी प्रत्येकी ५ लाख रुपये आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला दरवर्षी २५ लाख रुपयांचे अनुदान दिले जाते.

## साहित्यिकांना गौरववृत्ती

साहित्य आणि कलेच्या प्रांतात चांगली कामगिरी बजावलेल्या ज्येष्ठ लेखक आणि ज्येष्ठ कलावंतांला मंडळामार्फत दरवर्षी ५० हजार रुपयांची गौरववृत्ती व सन्मानपत्र दिले जाते. आतापावेतो ५६ मान्यवरांना या गौरववृत्तीने सन्मानित करण्यात आले आहे.

मंडळाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त मंडळाच्या सदस्यांनी बहुमताने निवडलेल्या १० ज्येष्ठ साहित्यिकांना २५ हजार रुपयांची खास साहित्य-सन्मानवृत्ती देऊन गौरवण्यात येणार आहे.

## सुवर्णमहोत्सवी प्रकल्प

गेल्या ५० वर्षात महाराष्ट्राने केलेल्या प्रगतीचा सांस्कृतिक अंगाने घेतलेला चिकित्सक, संशोधनात्मक आढावा घेणार ‘सांस्कृतिक महाराष्ट्र १९६० ते २०१०’ या बृहद्ग्रंथाची निर्मिती ही राज्य आणि मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षातील महत्वाची उपलब्धी आहे. याशिवाय ‘मराठी नाटक आणि रंगभूमिचा इतिहास’, ‘मराठी चित्रपटसृष्टीचा इतिहास’ हे प्रकल्पही कार्यान्वित करण्यात आले आहेत.

अनुक्रमणिका

**राज्याच्या सांस्कृतिक धोरणात अंतर्भूत असणाऱ्या**

(१) मराठीसाठी प्रमाण भाषा कोश

(२) एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून आतापर्यंत महाराष्ट्रात झालेल्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरांचा इतिहास.

(३) अन्य साहित्य संमेलने अनुदान

(४) मराठी शब्द व्युत्पत्ती कोश

(५) दुर्मिळ मराठी ग्रंथ संकेतस्थळावर आणणे.

(६) महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात आणि महाराष्ट्राबाहेरील महत्त्वाच्या शहरांमध्ये ग्रंथोत्सवाचे आयोजन करणे.

(७) ग्रंथसंस्कृती जोपासण्यासठी महिन्यातून एक-दोनदा ग्रंथचर्चा, ग्रंथसमीक्षण, साहित्यविषयक चर्चा अशा उपक्रमांचे आयोजन करणे.

(८) महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृति या संदर्भात कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसाहाय्य करणे.

(९) मराठीतील उत्तम साहित्यकृती हिंदी आणि इंग्रजीमध्ये अनुवादित करण्यासाठी अनुवाद प्रोत्साहन देणे.

(१०) अमराठी भाषिकांसाठी पाठ्यपुस्तकांची निर्मिती करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना अर्थसाहाय्य देणे, त्या भाषांतील शब्दांचे मराठी अर्थ देणाऱ्या आणि मराठी भाषेतील शब्दांचे त्या भाषांतील अर्थ देणाऱ्या शब्दकोशांची निर्मिती करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना अर्थसाहाय्य देणे.

(११) मराठी रंगभूमीच्या व चित्रपटसृष्टीच्या इतिहासाचे लेखन करवून घेणे.

या बाबींवर प्राधान्याने लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

मागील पन्नास वर्षांत मंडळाने साहित्यविषयक उपक्रमांचा संवर्धन आणि समृद्धीसाठी केलेली कामगिरी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वातील सोनेरी पान ठरणारी आहे.

अनुक्रमणिका

# महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळ आणि शासनाचा सहभाग

श्री. दिलीप शिंदे, संचालक
सांस्कृतिक कार्य

महाराष्ट्राला प्राचीन, वैविध्यपूर्ण आणि समृद्ध असा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. राज्याची सांस्कृतिक उंची आणि श्रीमंती देशाच्या सांस्कृतिक नकाशावर अधोरेखित होणारी आहे.

राज्य निर्मितीच्या सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधून मराठी भाषा विकास, कला व संस्कृती यांचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनामार्फत नुकतेच राज्याचे 'सांस्कृतिक धोरण' जाहीर करण्यात आले आहे. त्याच्या प्रस्तावनेतच शासनाचा सांस्कृतिक क्षेत्राविषयीचा दृष्टीकोन स्पष्ट होतो. 'कोणताही समाज केवळ आर्थिकदृष्ट्या श्रीमंत असणे पुरेस नाही तर त्या समाजाची संस्कृती हे त्या समाजाचे खरे वैभव असते...' महाराष्ट्रासारख्या व्यापक, समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभलेल्या आणि पुरोगामी राज्याला संस्कृतीसारखे अत्यंत महत्त्वपूर्ण क्षेत्र उन्नत आणि सतत विकसनशील ठेवण्यासाठी आपल्या भावी वाटचालीचे नियोजन करण्याची निकड जाणवणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्र राज्याचे प्रस्तुत सांस्कृतिक धोरण राज्य शासनाच्या संस्कृती संवर्धनाच्या आस्थेचे प्रतिक होय.

नागर व ग्रामीण रंगमंचवार सादर होणाऱ्या पारंपारिक लोककलांचा उज्ज्वल वारसा महाराष्ट्राला लाभला आहे. शंभर वर्षापेक्षा अधिक काळ संगीत रंगभूमी प्रयोगसिद्ध कलांचे प्रात्यक्षिक, नाट्यरूपाने बंदिस्त व खुल्या व्यासपीठावर अखंडपणे करीत आहे. बालरंगभूमीपासून ते व्यावसायिक रंगभूमीपर्यंत सर्व क्षेत्रांचा विचार करून धोरण ठरविणारे आणि त्यांच्यासाठी विविध योजना राबविणारे शासन उपक्रमशील आहे. बालरंगभूमी सक्षम करण्यासाठी बालनाट्य शिबिरांचे आयोजन करून सांस्कृतिक संचालनालयामार्फत भावी कलाकार घडवले जातात. त्यांच्या नाट्यस्पर्धा नियमितपणे घेतल्या जातात. व्यावसायिक नाट्य रंगभूमीचा स्त्रोत मागील ५० वर्षांपासून हौशी व व्यावसायिक राज्य नाट्य स्पर्धेच्या चळवळीतून अव्याहतपणे प्रवाहित आहे.

**राज्य नाट्य स्पर्धा**

राज्यनिर्मितीबरोबर शासनाची राज्य नाट्य स्पर्धादेखील सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. साधारणतः दरवर्षी ३२५ ते ३५० संस्था या चळवळीत सहभागी होत असतात. दरवर्षी या योजनेवर शासन अंदाजे रु. १ कोटी ५० लक्ष इतकी रक्कम खर्च करते. अशाप्रकारे सतत ५० वर्षे अखंडपणे नाट्यविषयक योजना राबवण्याचा जागतिक विक्रम राज्य नाट्य स्पर्धेने केला आहे! अशी कामगिरी करणारे, महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे! मराठी राज्य नाट्य स्पर्धा दरवर्षी राज्यातील १६ केंद्रावर तर दिल्ली व गोवा ही दोन राज्याबाहेरील केंद्रे, अशी एकूण १८ केंद्रांवर घेतली जाते. ही स्पर्धा द्वित्सरीय पद्धतीने घेतली जाते, हे याचे आणखी वैशिष्ट्य! १८ केंद्रावर प्रादेशिक फेरी तर मुंबई येथे अंतिम फेरी घेतली जाते. अतिशय मान्यवर अशा तज्ज्ञ नाट्यकर्मीकडून या नाटकांचे परीक्षण होते. त्यातून गेल्या ५० वर्षात अनेक नाट्यलेखक, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ, रंगभूमी व चित्रपट सृष्टीला मिळाले आहेत. डॉ. श्रीराम लागू, विजया मेहता, अरविंद देशपांडे, सुलभा देशपांडे, मोहन आगाशे, रोहिणी हट्टंगडी, लालन सारंग, अमोल

अनुक्रमणिका

पालेकर, नाना पाटेकर, डॉ. जब्बार पटेल, भक्ती बर्वे-इनामदार, मधुकर तोरडमल, विनय आपटे, रमेश भाटकर, मकरंद अनासपुरे संजय मोने, प्रदीप पटवर्धन, गिरीश ओक, अरूण नलावडे, प्रशांत दामले, अविनाश नारकर, शफाअत खान, मंगेश कदम ही यातील काही ठळक नावे! संस्कृत, हिंदी व संगीत राज्य नाट्यस्पर्धा या एकस्तरीय असतात. संस्कृत नाट्यस्पर्धा मुंबईत, हिंदी नाट्यस्पर्धा औरंगाबाद येथे तर संगीत नाट्य स्पर्धा सांगली येथे आयोजित केली जाते.

नाट्य-रंगभूमीच्या व्यवसायाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शासनाने मराठी चित्रपटाच्या अनुदान योजनेप्रमाणे सन २००६ पासून, नवीन नाट्य निर्मितीस अनुदान योजना सुरू केली आहे. या योजनेमुळे काहीशा डबघाईला आलेल्या नाट्य संस्थांना संजीवनी मिळाली आहे. या संचालनालयाने ७२ व्यावसायिक नाट्यनिर्मात्या संस्थांना रुपये तीन कोटी पाच लक्ष एवढी आर्थिक मदत मागील चार वर्षात केली आहे. या योजनेचा लाभ घेत निर्मिती करण्यात आलेल्या दर्जेदार नाट्यकृतींमुळे रंगभूमी निश्चितच समृद्ध होत आहे. बालनाट्य स्पर्धा त्याचप्रमाणे व्यावसायिक नाट्य स्पर्धा वर्षागणिक दर्जेदार होत आहेत. नवनवीन संहिता, नवीन कलाकार, लेखक, तंत्रज्ञ उदयास येत आहे. मराठी दूरचित्रवाणी वाहिन्यांसाठी व मराठी चित्रपटांसाठी कलाकार, तंत्रज्ञ उपलब्ध करून देण्याची 'राज्य नाट्य स्पर्धा' ही खाण आहे!

**पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी**

शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीन मुंबई 'पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी' सुरू करणे हे, सांस्कृतिक क्षेत्राच्या प्रगतीतील उचलेले एक दमदार पाऊल म्हणावे लागेल. गायन, वादन, नृत्य, नाट्य, अशा कलाप्रकारांच्या अभ्यासक व रसिकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ अकादमीच्या रूपाने निर्माण झाले आहे. या अकादमीत प्रामुख्याने प्रयोगसिद्ध कला/उपयोजित कला/शिल्पकला/चित्रकला इत्यादी कलांचे अभ्यासक्रम लवकरच सुरु होणार आहेत.

**संतपीठ**

एकीकडे विज्ञानामध्ये दररोज नवनवे शोध लावले जात असले तरीही दुसरीकडे समाजाची अध्यात्माकडे ओढही वाढते आहे. ही गरज लक्षात घेऊन शासनाने पैठण, जिल्हा औरंगाबाद येथे संतपीठाची स्थापना केली आहे. हे संतपीठ सर्व धर्मातील व जातीतील मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या संतांच्या विचारांचे व कार्याचे अध्ययन आणि अभ्यास करणारे केंद्र म्हणून विकसित करण्यात येत आहे. संतपीठाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून लवकरच ते कार्यान्वित होईल.

**लोककलांचा विकास**

राज्य शासनाच्या वतीने लोकरंगभूमी समृद्ध होण्यासाठी तमाशा, लावणी, दशावतार, शाहिरी, खडीगंमत या लोककलांसाठी मागील दोन वर्षापासून 'अनुदान पॅकेज' देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. प्रयोग अनुदान व भांडवली खर्चाच्या पॅकेज योजनेतून लोककलाकार व सांस्कृतिक संस्था, कला पथकांना प्रत्यक्ष आर्थिक मदतीचा हात देऊ केला असून, आजमितीस जवळपास १२५ तमाशा व लोककला पथकांना गेल्या दोन वर्षात रुपये तीन कोटी वितरित

करण्यात आले आहेत. यावर्षी जवळपास १२० पथकांना भांडवली खर्च म्हणून रुपये एक कोटी वीस लक्ष वितरित करण्यात येत आहेत.

### चित्रपट, अनुदान व पुरस्कार

मराठी चित्रपट व्यवसाय करणाऱ्या चित्रपट संस्थांना दरवर्षी वर्गवारीनुसार किमान ५ लक्ष व कमाल ३० लक्ष इतके आर्थिक अनुदान दिले जाते. ऐतिहासिक, सामाजिक व्यक्तींच्या जीवनावर चित्रपट निर्माण करणाऱ्या संस्थेला रुपये ५०लक्ष पर्यंत अनुदान देण्यात येते. त्या अनुदानप्राप्तीचा परिपाक दर्जेदार चित्रपट निर्मितीत होतो. वासुदेव बळवंत फडके, हुतात्मा राजगुरू, साने गुरूजी या चित्रपटांची उदाहरणे देता येतील. तांत्रिक व उत्कृष्ट दर्जाच्या कलात्मक गुणांवर मराठी चित्रपट यापूर्वीच ऑस्कर पर्यंत पोहचला आहे. शासनाच्या आर्थिक पाठबळामुळे बॉलीवूड व हॉलीवूडच्या तोडीस तोड मराठी चित्रपट निर्माण होऊ लागले आहेत. वार्षिक पुरस्कार समारंभाचे आयोजन भव्य स्वरूपात, ऑस्कर पद्धतीने करण्यात येते. शासनामार्फत दरवर्षी चित्रपट क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेल्या कलावंतास चित्रपती व्ही. शांताराम व स्व. राजकपूर यांच्या नावाने प्रत्येकी दोन लक्ष रुपयांचे दोन पुरस्कार देण्यात येतात. त्याचप्रमाणे संगीत, गायन, क्षेत्रातील ज्येष्ठ गायक-संगीतकारांसाठी रु. २ लक्ष इतक्या रकमेचा तर तमाशा क्षेत्रात प्रदीर्घ सेवा केलेल्या तमाशा कलावंतास रु. १ लक्ष चा पुरस्कार दिला जातो. नाट्य क्षेत्रात मोलाची भर टाकणाऱ्या कलावंतास रु. १ लक्ष चा श्री. प्रभाकर पणशीकर यांचे नावाचा 'रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात येते. त्याचप्रमाणे पारंपारिक लावणी महोत्सव, तमाशा महोत्सव, दशावतार महोत्सव आयोजित करण्यात येतात. सांस्कृतिक कार्य करणाऱ्या नोंदणीकृत विविध संस्थाना दरवर्षी रु. ४० लक्ष एवढे अनुदान देण्यात येते.

### कलावंताना मानधन

आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या जवळपास २० हजार गरजू व वयोवृद्ध कलावंत/साहित्यिकांना सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षासाठी जवळपास रु. २५ कोटी इतके आर्थिक साहाय्य मंजूर करण्यात आले असून त्यांना संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमार्फत ते दरमहा देण्यात येते. ५० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या तसेच कमाल रु. २४,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या गरजू व वयोवृद्ध कलाकार/साहित्यिक इ. ना त्यांच्या सांस्कृतिक सेवेप्रती कृतज्ञता म्हणून हे मानधन देण्यात येते.

### राज्य सांस्कृतिक निधी

अर्थसंकल्पातील तरतुदीच्या जोडीने राज्य शासनाचा स्वतंत्र असा एक राज्य सांस्कृतिक निधी स्थापन करण्यात येत आहे. हा निधी उभारण्यासाठी शासकीय अर्थसाहाय्याच्या जोडीने लोकसहभागाचेही स्वागत करण्यात येईल. लोकसहभागामुळे लोकांच्या सर्जनशीलतेला वाव मिळेल आणि त्यांना सांस्कृतिक क्षेत्रासाठी योगदान देण्याची संधी लाभेल. असा निधी उभारण्यासाठी आणि विविध योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी समाजातील विविध घटकांचे सहकार्य घेण्यात येईल. एरव्ही केवळ शासकीय तरतुदींमधून सहजरित्या राबवता न येणाऱ्या योजना/उपक्रम या निधीतून राबवले जातील.

अनुक्रमणिका

विश्वकोश मंडळ, लोक साहित्य समिती इ. उपक्रम नव्याने सुरू झालेल्या मराठी विभागांतर्गत काम करीत आहेत. हा स्वतंत्र विभाग सुवर्ण महोत्सवी वर्षाची मोठी भेट ठरावी.

**शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना**

मराठी रंगभूमी आणि लोककला यांच्यासाठी राज्य शासनाने अलिकडेच दोन स्वतंत्र प्रोत्साहन योजना (पॅकेज) जाहीर केल्या आहेत. त्याच धर्तीवर शास्त्रीय संगीतासाठी अनेक उपक्रमांचा समावेश असलेली शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना अमलात आणण्याचे प्रस्तावित आहे. शिष्यवृत्ती, सन्मानवृत्ती, जीवन गौरव पुरस्कार, संगीतसभांना (म्युझिक सर्कल्सना) अनुदान, महाविद्यालयीन पातळीवर शास्त्रीय संगीतचे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी अर्थसाहाय्य इ. उपक्रमांचा या योजनेत समावेश असेल.

**विविध कला महोत्सव**

शास्त्रीय संगीत नृत्या बरोबरच महाराष्ट्रातील पारंपरिक लोककला उदा. तमाशा, कीर्तन, भजन, दशावतार, शाहिरी, इत्यादी कलाक्षेत्रातील राष्ट्रीय ख्यातीप्राप्त कलाकारांपासून ते उदयन्मुख कलाकारांचा अंतर्भाव असलेल्या विविध कला महोत्सवाचे महाराष्ट्रात ६ ठिकाणी प्रत्येकी ५ दिवसांचे आयोजन करण्यात येते.

**लोकोत्सव**

शास्त्रीय संगीत, नाट्य, तमाशा व पारंपरिक लोककला कलांचा समावेश असलेल्या कलाप्रकारांचे दरवर्षी पर्यटन स्थळी तीन दिवसांच्या लोकोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

**दशावतारी नाट्य महोत्सव**

कोकणातील पारंपरिक दशावतारी नाट्यकलेला उत्तेजन व संवर्धनासाठी शासनातर्फे सात दिवसांच्या दशावतारी नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवात उत्तमोत्तम पथकांना सहभाग देण्यात येतो.

**लावणी महोत्सव**

शासनामार्फत लावणी या कलेच्या उत्तेजनासाठी दरवर्षी तीन दिवसांच्या लावणी महोत्सवाचे आयोजन विधीमंडळाच्या उन्हाळी अधिवेशनाच्या कालावधीत मुंबई येथे करण्यात येते.

**तमाशा महोत्सव**

दरवर्षी सात दिवसांच्या तमाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. सदर महोत्सवाप्रसंगी विठाबाई नारायणगांवकर जीवन गौरव पुरस्कारांचे वितरण करण्यात येते.

अनुक्रमणिका

**सांस्कृतिक क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या कलावंतांना राज्य सांस्कृतिक पुरस्कार**

सांस्कृतिक क्षेत्रात विशेष लक्षणीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राज्य पुरस्कार प्रदान करण्याची योजना कार्यरत आहे. सदर योजनेतील संगीत, नृत्य, नाट्य, तमाशा, शाहिरी, लोककला, कीर्तन (मराठी), समाज प्रबोधन, मराठी चित्रपट, आदिवासी गिरीजन कलादान, कंठसंगीत, वाद्यसंगीत इ. निरनिराळ्या क्षेत्रातील कलावंतांची निवड करण्याकरिता निवड समितीची स्थापना करण्यात आली असून समितीने निवड केलेल्या एकूण १२ कलाकारांना सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रत्येकी रु. ५१,००० रोख तसेच शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात येतो.

**उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीस राज्य पुरस्कार**

उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी लेखकांना उत्तेजन देण्याच्या हेतूने राज्य शासन त्यांच्या उत्तम पुस्तकास प्रौढ आणि बालवाङ्मय या विभागात विविध मान्यवरांच्या नावांनी पुरस्कार देण्यात येतात. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम जास्तीतजास्त रु. २०,००० व कमीतकमी रु. ५,००० व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र असे आहे. एकूण ८० पुस्तकांना दरवर्षी पुरस्कार देऊन गौरवण्यात येते.

**महाराष्ट्र भूषण पुरस्कार**

साहित्य, कला, क्रीडा व विज्ञान या विविध क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्या राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात योगदान देणाऱ्या महाराष्ट्राचा नावलौकीक उंचावणाऱ्या व्यक्तीस महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र भूषण प्रतिवर्षी महाराष्ट्र दिनी (१ मे रोजी) प्रदान करण्यात येतो. त्या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम रु. ५ लाख, मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे आहे. यात पुढील मान्यवरांचा समावेश आहे.

१९९७-पु. ल. देशपांडे, १९९८-लता मंगेशकर, १९९९-सुनिल गावसकर, २०००-विजय भाटकर, २००१-सचिन तेंडुलकर, २००२-भिमसेन जोशी, २००३-अभय बंग व राणी बंग २००४-बाबा आमटे, २००५-रघुनाथ माशेलकर, २००६-रतन टाटा, २००७-रा. कृ. पाटील, २००८-मंगेश पाडगांवकर व नानासाहेब धर्माधिकारी, २००९-सुलोचना.

**कै. विठाबाई नारायणगांवकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ लोककला जीवन पुरस्कार**

कै. विठाबाई नारायणगांवकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ जीवन गौरव पुरस्कार २००५-२००६ या वर्षासाठी श्रीमती कांताबाई सातारकर यांना प्रथमच प्रदान करण्यात आला. या पुरस्काराची रक्कम रु. ५०,००० आहे. सन २००९-१० या वर्षीच्या पुरस्काराची रक्कम रुपये १ लाख, मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप करण्यात आले. यात पुढील मान्यवरांचा समावेश आहे.

२००५-शांताबाई सातारकर, २००६-वसंत अवसरीकर, २००७-सुलोचना नलावडे, २००८-हरिभाऊ बडे, २००९-मंगला बनसोडे.

**श्री. पु. भागवत पुरस्कार**

साहित्य निर्मिती मध्ये मोलाचे कार्य करणाऱ्या प्रकाशकाला श्री. पु. भागवत यांचे नावे राज्य पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सदर पुरस्काराचे स्वरूप रुपये १ लक्ष, मानपत्र, मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे आहे. यात पुढील मान्यवरांचा समावेश आहे.

२००८-रामदास भटकळ, २००९-श्री. बाबा भांड.

**भारतरत्न गायनसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार**

राज्यात प्रतिवर्षी गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे नावाने त्यांच्या जन्म दिनी गायन/संगीत क्षेत्रातील एका मान्यवर व्यक्तीस शासनातर्फे पुरस्कार दिला जातो. सदर पुरस्काराचे स्वरूप रु. २ लाख रोख व मानचिन्ह असे आहे. यात पुढील मान्यवरांचा समावेश आहे.

१९९२-माणिक वर्मा, १९९३-श्रीनिवास खळे, १९९४-गजानन वाटवे, १९९५-दत्ता डावजेकर, १९९६-जितेंद्र अभिषेकी, १९९७-हृदयनाथ मंगेशकर, १९९८-ज्योत्स्ना भोळे, १९९९-आशा भोसले, २०००-अनिल विश्वास, २००१-सुधीर फडके, २००२-प्यारेलाल शर्मा, २००३-रवींद्र जैन, २००४-स्नेहल भाटकर, २००५-मन्ना डे, २००६-जयमाला शिलेदार, २००७-खय्याम, २००८-महेंद्र कपूर, २००९-सुमन कल्याणपूरकर.

**ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार**

ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार ही योजना सन २००६ पासून सुरू करण्यात आली आहे. संत साहित्य लिहिणाऱ्या लेखकाच्या कामगिरीचा गौरव करण्यासाठी प्रतिवर्षी ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार दिला जातो. पुरस्कार स्वरूप रु. १ लाख, मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे आहे. यापूर्वी सन २००७ चा पुरस्कार डॉ. रा. चिं. ढेरे यांना मुंबईमध्ये प्रदान करण्यात आला तर गतवर्षी सदरचा पुरस्कार डॉ. दादा महाराज मनमाडकर यांना पुण्यामध्ये प्रदान करण्यात आला. सन २००९ या वर्षीचा ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार श्री. जगन्नाथ महाराज पवार, नाशिककर यांना प्रदान करण्यात आलेला आहे.

**चित्रपती व्ही. शांताराम स्मृती जीवन गौरव पुरस्कार आणि चित्रपती व्ही. शांताराम स्मृती विशेष योगदान पुरस्कार**

**राज कपूर स्मृती प्रतिभा गौरव पुरस्कार व राज कपूर स्मृती विशेष योगदान पुरस्कार**

मराठी चित्रपट क्षेत्राच्या उत्कर्षासाठी ज्यांनी दीर्घकाळ आपले आयुष्य घालवले आहे व त्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली आहे अशा व्यक्तीस प्रतीवर्षी चित्रपती कै. व्ही. शांताराम पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

अनुक्रमणिका

**चित्रपती व्ही. शांताराम स्मृती जीवन गौरव पुरस्कार आणि चित्रपती व्ही. शांताराम स्मृती विशेष योगदान पुरस्कार** अशा दोन व्यक्तींना प्रत्येकी रु. २ लाखाप्रमाणे देण्यात येतो.

हिंदी चित्रपट क्षेत्राच्या उत्कर्षासाठी ज्यांनी दीर्घकाळ आपले आयुष्य घालवले आहे तसेच चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनय, संगीत, निर्मिती, दिग्दर्शन इ. अष्टपैलू गुंणानी त्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली आहे अशा व्यक्तीस राज कपूर स्मृती प्रतिभा गौरव पुरस्कार व राज कपूर स्मृती विशेष योगदान पुरस्कार अशा व्यक्तींना प्रत्की रु. २ लाखाप्रमाणे देण्यात येतो.

**ललित कला अकादमी**

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात दृश्यात्म कलेसाठी कार्य करणाऱ्या संस्थेची गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र ललित कला अकादमी स्थापन करण्याचा मानस सांस्कृतिक धोरणात आहे. या निर्णयाची लवकरच अंमलबजावणी होईल. अकादमीच्या अंतर्गत सुयोग्य ठिकाणी कलाग्राम स्थापन करण्यात येईल. त्यामध्ये पुढील सुविधा असतील—धातु ओत शाळा (मेटल फाउंड्री), ग्राफीक्स स्टुडीओ, सिरॅमिक फाऊंड्री, प्रदर्शनासाठी कलादालन, कार्यशाळा, (वर्कशॉप शेड), भाडे तत्वावर आवश्यक तितके स्टुडिओ, खुले नाट्यगृह (ॲम्फी थिएटर), अतिथी गृह इत्यादी.

या सर्व उपक्रमांमधून एकूणच राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक चळवळींना प्रोत्साहन देण्याचे, त्यांचे संगोपन व संवर्धन करून त्यांना जोपासण्याचे, त्याद्वारा समाजातील बंधुभाव, एकता, राष्ट्रप्रेम आणि सर्जनशिलता वाढविण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न शासन करीत आहे. सांस्कृतिक विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांमुळे राज्यात साहित्य, संस्कृती, कला यांचा नियोजनबद्ध विकास, त्यांची जोपासना व संवर्धन करण्यात येत आहे. राज्याच्या सांस्कृतिक विश्वात या विभागाचे योगदान आणि सहभाग अत्यंत मोलाचा, महत्त्वाचा आणि सर्वसमावेशक आहे.

अनुक्रमणिका

# मराठी विश्वकोश

डॉ. विजया वाड, अध्यक्ष
मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

दिनांक १ मे १०६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. राज्याच्या स्थापनेच्यावेळी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. कै. यशवंतराव चव्हाण यांनी राज्यकारभारांसंबंधी मूलभूत धोरण सूचित करणारी काही सूत्रे सांगितली. त्या सूत्रांनुसार मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठी राज्य शासनाने दिनांक १९ नोव्हेबर १९६० रोजी कै. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. या मंडळाने जे अनेकविध उपक्रम सुरू केले. त्यांपैकी एक प्रमुख व वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणजे मराठी विश्वकोशाची रचना व प्रकाशन होय. ख्यातनाम एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाच्या धर्तीवर मराठी विश्वकोशाचे संपादन मंडाळाचे मराठी विश्वकोश कार्यालय, वाई, जि. सातारा येथे चालू आहे.

विश्वकोश म्हणजे ज्ञान-विज्ञानातील अनेक विषयांची अद्ययावत माहिती लहानमोठ्या लेखाच्या स्वरूपात वस्तुनिष्ठ पद्धतीने उपलब्ध करून देणारा संदर्भ ग्रंथ होय. कामाचा वाढता व्याप विचारता घेता, दिनांक १ डिसेंबर १९८० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे विभाजन होऊन मराठी विश्वकोशाच्या संपादन व प्रकाशनकार्यार्थ स्वतंत्र मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनानंतर (दिनांक २७ मे १९९४) मा. कै. प्रा. मे. पु. रेगे, प्रा. रा. ग. जाधव व कै. डॉ. श्रीकांत जिचकार यांनी विश्वकोशाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक म्हणून काम पाहिले आहे. आता मी या मंडळाची अध्यक्षा व प्रमुख संपादक म्हणून काम पहात आहे.

शतकानुशतके ज्या भाषेत विविध विद्यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती झालेली असते, तेथेच विश्वकोशासारखे विविध ज्ञानसंग्राहक ग्रंथ निर्माण करण्याची आवश्यकता असते. जगातल्या साक्षर समृद्ध भाषांमध्ये अशा प्रकारचे ग्रंथ निर्माण झाल्याची उदाहरणे आहेत. कोणताही एक महत्त्वाचा विषय अन्य अनेक विषयांशी सलग्न असतो. अनेक विषयांची एकत्र माहिती मिळाली तर तो विषय नीट समजावून घेता येतो. अत्यंत बुद्धिमान अशा एका माणसाला आयुष्यात आपला विषय व संलग्न विषय यांचे पूर्ण ज्ञान संपादन करणे अशक्य ठरते. कारण विद्यांचा विस्तार अफाट झालेला असतो. एका वैद्यक शास्त्रातून शरीर, शरीरक्रिया, औषध जीवरसायन, रोगजंतू इत्यादी अनेक विद्याशास्त्रे निर्माण होतात. यासाठी विश्वकोशाची आवश्यकता ठरते. अनेक विद्यांची माहिती एकत्र व थोडक्यात मिळाल्याने व्यवहारात चुका टाळणे शक्य होते. शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत असून वाढत्या औद्योगिकीकरणामुळे समाजाच्या वैज्ञानिक व तांत्रिक गरजा वाढत आहेत. उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा स्वीकार झाला असून शासन व्यवहाराची भाषा म्हणूनही मराठीला मान्यता मिळालेली आहे. सर्वसाधारण शिक्षित मराठी माणूस कोणत्याही क्षेत्रात काम करीत असला तरी त्यांच्या ज्ञान विषयक गरजा मराठीतून भागविणे आणि त्यासाठी आजच्या स्पर्धात्मक समाजात व्यक्तीला अनेक विषयांचा परिचय करून घेणे आवश्यक झाले आहे. प्रतिदिनी विकसित होणारे विविध विषयांचे ज्ञान नभोवाणी, अनुबोधपट, वृत्तपट, वृत्तपत्रे, तबकडी याद्वारे सामान्य माणसापर्यंत पोहोचत असल्याने विषय समजून घेण्यासाठी विश्वकोशासारख्या ज्ञानसाधनाची मोठी गरज आहे. विशिष्ट विषयाचा व सर्वविषयसंग्राहक असे प्रकारचे कोष असतात. मराठी विश्वकोश हा सर्वविषयसंग्राहक

अनुक्रमणिका

ज्ञानकोश आहे. एखाद्या विषयाची माहिती उपलब्ध झाल्यावर इतर विषयांचा परिचय करून घेण्यास माणूस प्रवृत्त होतो व त्याच्या ज्ञानात भर पडते. असे अनेकविध फायदे व उपयोग विश्वकोशाचे आहेत.

मराठी विश्वकोश हा ख्यातनाम एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिकाच्या धर्तीवर प्रत्येकी सुमारे १००० पृष्ठांच्या एकूण २३ खंडात प्रकाशित होत असून या खंडामध्ये येणाऱ्या नोंद विषयांची रचना मराठी वर्णक्रमानुसार अकारविल्हे करण्यात आलेली आहे. आतापर्यंत प्रकाशित झालेल्या १ ते १८ खंडांमध्ये 'अंक' ते 'सह्याद्री' पर्यंतच्या माहितीचा अंतर्भाव झालेला असून उर्वरित 'ज्ञ' पर्यंतची माहिती १९ व २० यामध्ये समाविष्ट होईल असा अंदाज आहे. विश्वकोशाचे पहिले २० संहिता खंड (शरीर खंड) असून शेवटचे २१, २२ व २३ हे तीन खंड अनुक्रमे (१) परिभाषासंग्रह (संपूर्ण विश्वकोशात आलेल्या तांत्रिक परिभाषेची मराठी-इंग्रजी आणि इंग्रजी-मराठी शब्दसूची), (२) नकाशा खंड (मानचित्रसंग्रह) व (३) सूची खंड (संपूर्ण विश्वकोशाची संदर्भसूची) यांचे होणार आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी भाषेचा एक मौलिक अलंकार व महाराष्ट्र शासनाचा मानबिंदू ठरलेला वाङ्मयीन प्रकल्प म्हणजे मराठी विश्वकोशाची रचना व प्रकाशन होय. मानव्यविद्या विज्ञान व तंत्रविद्या या मुख्य विषयांतील सर्व विषयोपविषयांचे अद्ययावत ज्ञान/माहिती मराठी विश्वकोशाच्या एका व्यापक योजनेखाली संकलित करण्यात येत आहे. गेल्या शतकात सर्व ज्ञान-विज्ञानांचा वेगाने झालेला विकासविस्तार लक्षात घेऊन विद्यमान ज्ञानक्षेत्रांचा सर्वांगीण परिचय देणारा मराठी विश्वकोश संदर्भग्रंथ आहे. या मराठी विश्वकोशाच्या संपादन व प्रकाशनाचे कार्य शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्याचा मंडळाचा विचार आहे.

विश्वकोशाच्या मुख्य खंडातील सु. २३,५०० पृष्ठांचे वाटप भौतिक विज्ञाने न तंत्रविद्या आणि समाजशास्त्र व मानव्यविद्या या विषयगटासाठी समप्रमाणात केले आहे. विविध ज्ञानशाखांमध्ये होणारी वाढ, विकास विचारात घेता, सर्वसाधारण जिज्ञासू मराठी वाचकांच्या ज्ञानविज्ञानविषयक गरजा पुरवू शकेल अशा पद्धतीने माहितीचा अंतर्भाव करण्यात येत आहे. त्यामध्ये सामान्यपणे खालील विषयांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

| **मानव्यविद्या** | **विज्ञान व तंत्रविद्या** |
| --- | --- |
| सामाजिक विज्ञाने (अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र इ.) धर्म आणि तत्त्वज्ञान, इतिहास आणि पुरातत्त्वविद्या, कला, साहित्य, खेळ आणि मनोरंजन | गणित व भौतिक रसायनशास्त्र जैव विज्ञान (लाइफ सायन्सेस) तंत्रविद्या पर्यावरण |

ज्ञानाचा व माहितीचा हा सर्वविषसंग्राहक ज्ञानसंग्रह भारतीय व महाराष्ट्रीय दृष्टिकोनाला प्राधान्य देऊन संपादित करण्यात येत आहे. भारत व महाराष्ट्राशी संबंधित असलेल्या माहितीला तुलनेने अधिक महत्त्व दिले जात आहे. विज्ञान व तंत्रज्ञान, सामाजिक विज्ञाने, तसेच साहित्य, कला इ. सांस्कृतिक क्षेत्रे यांत भारतीय आणि महाराष्ट्रीय ज्ञानवंतांनी, संशोधकांनी केलेल्या योगदानाची योग्य ती दाखल घेतली जात आहे.

## अनुक्रमणिका

मराठी विश्वकोश संपादनाचे हे कार्य पूर्ण झाल्यावर इतर जागतिक विश्वकोशाप्रमाणे हा विश्वकोशामध्येही आधुनिक, उपलब्ध माहितीचा अंतर्भाव करून सुधारित आवृत्ती मंडळास काढावी लागणार आहे. वाचकांच्या व अभ्यासकांच्या ज्ञानविषयक गरजा पुरवण्यात हा मराठी विश्वकोश परिपूर्ण ठरला आहे.

**२) मराठी विश्वकोश खंडाचे पुनर्मुद्रण**

मंडळातर्फे प्रकाशित झालेल्या १ ते १८ खंडांपैकी १ ते १४ खंडांच्या प्रत्येकी सुमारे १०,००० प्रती संपल्या असून खंडांच्या प्रतीसाठी ग्राहकांकडून येणारी मोठ्या प्रमाणातील मागणी विचारात घेता, खंडांचे प्रत्येकी ५००० प्रतीमध्ये क्रमशः पुनर्मुद्रण करण्यात येत आहे. खंड १ ते ३ व ५ च्या पुनर्मुद्रित प्रती विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. खंड ४ व ६ ते १० पुनर्मुद्रणासाठी सोपवण्यात आले आहेत.

**३) मराठी विश्वकोश परिभाषासंग्रह आणि सीडी**

मंडळातर्फे मराठी विश्वकोश रचना सुरू करण्यात आली त्यावेळी मंडळापुढे परिभाषेची मोठी अडचण निर्माण झाली होती. या अडचणीच्या निवारणासाठी सुरुवातीस मंडळास परिभाषा निर्मितीचे/मराठीकरणाचे काम सुरू करणे भाग पडले. ही तयार झालेली परिभाषा कार्यालयीन वापरासाठी सुरूवातीस नमुना खंड प्रकाशित करून भागविण्यात आली आहे. या परिभाषासंग्रहाच्या कार्यालयीन वापरासाठी २००० प्रती काढण्यात आल्या होत्या. परंतु या खंडाची मोठ्या प्रमाणातील मागणी विचारात घेता त्याचे चार वेळा पुनर्मुद्रण करण्यात आले. या संबंधातील मागणी विचारात घेता मंडळाने त्याची सीडी काढण्याचा निर्णय घेतला आहे. मराठी विश्वकोश खंडाच्या योजनेप्रमाणे आता हा सुधारित परिभाषासंग्रह २१ वा खंड म्हणून प्रकाशित व्हावयाचा आहे.

**४) मराठी विश्वकोश पुरवणी खंड**

मराठी विश्वकोशात ज्या ज्ञानविद्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात सतत भर पडत आहे. नवीन नवीन संशोधन, सुधारणा, बदल, प्रगती होत आहे. कालचे तंत्र व यंत्र जुने ठरत आहे. सर्वच ज्ञानशाखांमध्ये नवीन नवीन संशोधन पुढे येत आहे. या सर्व बाबींची दखल घेऊन विश्वकोशामध्ये नवीन येणाऱ्या अद्ययावत ज्ञानाची, माहितीची सतत भर घालण्याची प्रक्रिया चालू ठेवावी लागणार आहे. त्यासाठी विश्वकोशाची पहिली आवृत्ती (संहिता खंड १ ते २०) पूर्ण झाल्यावर त्यातील माहिती अद्ययावत करून प्रत्येक खंडास पुरवणी खंड काढण्याची कार्यवाही मंडळास करावी लागणार आहे.

**५) मुलांचा विश्वकोश**

मंडळाच्या वाङ्मयीन कार्याचा भाग म्हणून मराठी विश्वकोशाच्या संपादन व प्रकाशन कामाबरोबरच मानव्यविद्या तसेच विज्ञान व तंत्रविद्या या विषयांतील ज्ञान सोप्या व सुटसुटीत भाषेत जरूर तेथे सुटसुटीत आकृत्या, आलेख व भरपूर चित्रांसह मुलांना उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने, 'बालविश्वकोश' व 'कुमार विश्वकोश' अशा दोन भागांत 'मुलांचा विश्वकोश' संपादित करण्याची योजनाही मंडळाने हाती घेतली आहे. प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या ज्ञानविषयक गरजा

भागविण्यासाठी व त्यांच्या अध्ययनास पूरक असा एखादा संदर्भग्रंथ असावा म्हणून मंडळाने हा मुलांचा विश्वकोश संपादित करण्याचे ठरवले आहे. विश्वकोशासारख्या सर्वविषयज्ञानसंग्रहाचा ज्ञानार्जनासाठी, संदर्भासाठी वापर करण्याची सवय/प्रवृत्ती लहानपणापासून मुलांमध्ये वाढीस लागावी, त्यांच्या स्वाभाविक जिज्ञासेचे समाधान व्हावे, त्यांच्या जिज्ञासेला चालना मिळावी व ज्या जगात मुलांना पुढे वावरावयाचे आहे त्याच्याशी त्यांचा सर्वांगीण परिचय करून द्यावा हा उद्देशही त्यामागे आहे. या ‘मुलांचा विश्वकोश’ योजनेत प्रकाशित व्हावयाच्या ‘कुमार विश्वकोशा’ चा परिचय-ग्रंथ मल्टिमिडिया सीडीसह प्रकाशित झाला आहे.

**कुमार विश्वकोशाची पुढीलप्रमाणे १२ खंडांची योजना आहे.**

१. भौतिक विज्ञान व तंत्रज्ञान
२. जीवसृष्टी आणि पर्यावरण
३. विश्व व पृथ्वी
४. प्राचीन संस्कृती
५. आधुनिक जग
६. उद्योगधंदे आणि व्यापार
७. शेती आणि शेतकी
८. जागतिक साहित्य
९. ललित कला
१०. क्रीडा, खेळ, मनोरंजन
११. थोरांची चरित्रे
१२. महाराष्ट्र आणि भारत

प्रत्येक खंड विशिष्ट विषयाला/विषयांना वाहिलेला असेल, पण त्यातील नोंदी (लेख) मराठी वर्णानुक्रमे अकारविल्हे असतील. यामध्ये प्रकाशित व्हावयाचा कुमार विश्वकोश खंड २ जीवसृष्टी आणि पर्यावरण भाग-१ चे संपादन व मुद्रणकार्य पूर्ण होत आले असून सदर खंड लवकरच प्रकाशित करण्यात येत आहे.

कुमार विश्वकोशाचे खंड मिडियम म्हणजे २४·५ सेंमी. x १८·५ सेंमी. ह्या आकारमानाचे व सुमारे ५०० पृष्ठांचे आणि आवश्यकतेनुसार एका खंडाचे आवश्यकतेनुसार २/३ भाग असतील तसेच आकृत्या, आलेख, रेखाचित्रे, काळी पांढरी चित्रे आणि रंगीत चित्रे यांचा अंतर्भाव करण्यात येत आहे. मुद्रित मजकुराला जितकी पृष्ठे देण्यात येतील, तितकीच पृष्ठे आकृत्या, रेखाचित्र, चित्रे इत्यादींना देण्यात येतील.

**६) महाराष्ट्र कन्या चरित्रकोश**

मंडळाच्या वतीने प्रकाशित होत असलेला मुलांचा विश्वकोशामध्ये कुमारविश्वकोशांतर्गत शासनाच्या महिला सबलीकरणाच्या धोरणास अनुसरून कला, साहित्य, संगीत, पत्रकारिता, समाजसेवा आणि क्रीडा या तसेच इतरही विविध क्षेत्रातील नामवंत कर्तबगार महाराष्ट्र कन्यांची प्रेरणादायी

अनुक्रमणिका

चरित्रात्मक माहिती असलेला महाराष्ट्र कन्या चरित्रकोश मंडळाच्या वतीने प्रकाशित करण्यात येत आहे. सध्या कन्या चरित्रकोश भाग १ चे संपादन सुरू आहे.

### ७) विश्वकोश वार्षिकी

मराठी विश्वकोश मराठी भाषिकांसाठी असल्याने या विश्वकोशाचे ज्ञान देश परदेशातील मराठी वाचकांनासुद्धा मिळावे व त्यांच्या ज्ञानामध्ये भर पडावी या उद्देशाने मराठी विश्वकोशाचाच एक अंगीकृत उपक्रम म्हणजे मराठी विश्वकोश वार्षिकीची निर्मिती व प्रकाशन होय. मंडळाचे माजी अध्यक्ष कै. डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या कालावधीत ब्रिटानिका ॲल्मॅनॅकच्या धर्तीवर मराठी विश्वकोश वार्षिकी २००५ प्रकाशित करण्यात आली आहे. स्पर्धा परिक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही वार्षिकी उपयुक्त ठरली असून दरवर्षी याचे प्रकाशन करणे आवश्यक आहे.

### ८) बोलका विश्वकोश

मराठी विश्वकोश हा बोजड, किचकट आहे, तो केवळ उच्चशिक्षित लोकांकरिताच आहे हा गैरसमज दूर व्हावा, तो कपाटात न राहता, लोकाभिमुख व्हावा, विश्वात यावा, त्याचा लोकांनी वापर करावा, या प्रयत्नाचा एक भाग म्हणून मंडळातर्फे अंधांकरिता, तसेच वयोवृद्धांसाठी अथवा वाचन ताण कमी करण्याकरिता, प्रायोगिक स्वरुपाचा बोलका विश्वकोश तयार करण्यात आला आहे. १७ व्या खंडातील काही निवडक नोंदींचे सीडीवर, मान्यवरांच्या आवाजात वाचन व त्याचे ध्वनिमुद्रण (रेकॉर्डिंग) करून बोलका विश्वकोश सीडी प्रसिद्ध करण्यात आली.

### ९) मराठी विश्वकोश खंड १ ते १७ ची सीडी

मराठी विश्वकोश हा सर्वविषयसंग्राहक ज्ञानकोश असून त्याचे आतापर्यंत १ ते १८ खंड प्रकाशित झाले आहेत. त्यापैकी १ ते १४ खंडांच्या प्रती संपल्याने वाचकांची दीर्घ कालाची, मोठी मागणी विचारात घेऊन ज्ञानार्जन व लोकशिक्षणाच्या उद्देशाने सीडी स्वरुपात हे खंड वाचकांना मिळावेत, तंत्रप्रवण युगाशी संगती राखावी म्हणून मंडळाने प्रकाशित १ ते १७ खंडांमधील माहिती सहा सीडींच्या संचामध्ये उपलब्ध करून दिली आहे. ई. बुक स्वरुपात असलेल्या या महासीडीमध्ये २०१८२ पृष्ठे आणि ९५२ चित्रपत्रे समाविष्ट केली आहेत.

### १०) विश्वकोश राजस्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा

ज्या लोकशिक्षणाच्या उद्देशाने शासनाने मराठी विश्वकोश रचना हाती घेतली तो हेतू सफल व्हावा, मराठी विश्वकोशाचा प्रचार आणि प्रसार व्हावा, शासनाच्या या प्रकाशनाची जनतेस माहीती व्हावी यादृष्टीने मंडळाने वयाचे, शिक्षणाचे कोणतेही बंधन न ठेवता सर्वांसाठी ह्या स्पर्धा खुल्या ठेवल्या आहेत. महाराष्ट्रभर ही स्पर्धा अनेक ठिकाणी घेण्यात आली आणि पुढेही ही स्पर्धा विश्वकोश प्रचाराच्या दृष्टीने ठिकठिकाणी आयोजित करणे आवश्यक आहे. आतापर्यंत राज्यात प्रायोजक मिळालेल्या एकूण ४० ठिकाणी विश्वकोश राजस्पर्धा पार पाडल्या असून वाचन चळवळीचा एक भाग व विश्वकोशाचे परिशीलन आणि प्रचार यासाठी दूरदर्शनवरही विश्वकोश महा राजस्पर्धा प्रसारित करण्यात येत आहेत.

अनुक्रमणिका

## ११) मराठी विश्वकोशाचे संगणकीकरण

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जगातील इतर विश्वकोशाच्या तुलनेत मराठी विश्वकोशाला आंतरराष्ट्रीय स्थान मिळवून तो इंटरनेटवर (महाजालकावर) आणण्याच्या दृष्टीने www.vishwakosh.org.in या वेबसाईटवर जगभराच्या मराठी वाचकांसाठी १ ते १७ खंडांची सर्व नोंदसूची, मंडळाच्या मा. अध्यक्षांचा परिचय, छायाचित्रे उपलब्ध करण्यात आली आहेत. इंटरनेटची सुविधा कार्यान्वित ठेवून माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे मराठी विश्वकोशाचे सर्व प्रकाशित खंड युनिकोडद्वारे महाजालकावर टाकून जगातील सर्व मराठी भाषिकांना मराठी विश्वकोशातील माहिती उपलब्ध करून देण्याचे कार्य मंडळामार्फत, भारत सरकारच्या सी-डॅक, पुणे या संस्थेच्या सहकार्याने करण्यात येत आहे. या माहितीत वेळोवेळी सुधारणा व बदलाची भर टाकण्याचे/दुरुस्तीचे कामही मंडळास करावे लागणार आहे.

**आगामी उपक्रम :**

- मराठी विश्वकोश खंड १९ ते २३ चे प्रकाशन
- खंड १ ते १८ अद्ययावतीकरण व पुरवणी खंडाचे संपादन/प्रकाशन
- कुमार विश्वकोश, बालविश्वकोश प्रत्येकी १२ खंडाचे संपादन/प्रकाशन
- प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी विश्वकोश राजस्पर्धा
- विश्वकोशाचे सर्व ग्रंथ महाजालकावर टाकणे
- महाराष्ट्र कन्या चरित्रकोश
- अंधांसाठी ब्रेलकोश
- विश्वकोशावर अनुबोधपट

अनुक्रमणिका

# दर्शनिका विभाग-अचूक संदर्भाचा खजिना

डॉ. अ. शं. पाठक, संचालक
दर्शनिका विभाग

गॅझेटिअर म्हणजे प्राकृतिक भूस्वरुप, नद्या, वनसंपदा, स्थळांची भौगोलिक माहिती, लोकांच्या चालीरिती, राजघराण्यांचा इतिहास, अर्थव्यवस्था, महसूल, प्रशासन आणि पुरावशेषांचा तपशील देणारा कोश. ही गॅझेटिअरची मूळ संकल्पना होय.

एक भौगोलिक कोश या प्रारंभिक संकल्पनेपासून ब्रिटिशांनी आपल्या अधिकाऱ्यांना प्रशासनासाठी एतद्देशियांची माहिती पुरविणारा एक उपयुक्त ग्रंथ म्हणून गॅझेटिअरची निर्मिती केली. आज समाजाभिमुख शासन ही संकल्पना आम्ही स्वीकारलेली आहे. या दृष्टीने विविध क्षेत्रांतील विकास विषयक संकल्पनांचा आराखडा मांडताना सहायभूत ठरणारा उपयुक्त ग्रंथ म्हणून गॅझेटिअर सर्वमान्य होत आहे.

मुळात ब्रिटिशकाळात गॅझेटिअर निर्मितीचा प्रारंभ झाला असे असले तरी स्वातंत्र्योत्तर काळात इंडिया गॅझेटिअर मालिकेत देशात सर्वप्रथम काम पूर्ण करणारा हा एक विभाग आहे.

दर्शनिका विभाग (गॅझेटिअर डिपार्टमेंट) हे एक स्वतंत्र संचालनालय असून ते महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत आहे. या विभागाकडून इंग्रजी व मराठी भाषांमधून जिल्हा गॅझेटिअर ग्रंथ प्रकाशित केले जातात.

या विभागाकडून मूलभूत अशी माहिती देणाऱ्या प्रकाशनविषयक ज्या मालिका कार्यान्वित आहेत त्यात जिल्हा व राज्य गॅझेटिअर यांची इंग्रजी व मराठी आवृत्ती, ब्रिटीशकालीन गॅझेटिअर याशिवाय सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रिडम मुव्हमेंट व स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोश यांचा अंतर्भाव आहे. ह्या सर्व योजनांची माहिती खाली दिली आहे.

दर्शनिका निर्मितीच्या विविध मालिकांसाठी एक शासनमान्य असे संपादक मंडळ कार्यरत असून दर तीन वर्षांनी त्याची पुनरावृत्ती होते. त्यात विद्यापीठ पातळीवर सर्वमान्य तज्ज्ञ अभ्यासकांचा समावेश असतो तर ज्या जिल्ह्याचे काम सुरू असेल त्या जिल्ह्यातील एक सर्वमान्य तज्ज्ञ अभ्यासक संपादक मंडळ सदस्य या नात्याने काम करतो.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव या संपादक मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात व कार्यकारी संपादक सदस्य सचिव म्हणून कार्य करतात. या संपादक मंडळाच्या मान्यतेने व शिफारशीतून ग्रंथनिर्मिती विषयक प्रकल्प राबवले जातात.

**विभागाकडून राबवण्यात येणाऱ्या योजना**

महाराष्ट्र राज्याचे गॅझेटिअर ग्रंथ मराठी भाषेत जिल्हा गॅझेटिअर व महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर अशा दोन स्वतंत्र मालिकांमधून या विभागाकडून प्रकाशित केले जातात.

अनुक्रमणिका

**(१) जिल्हा गॅझेटिअर ग्रंथ (इंग्रजी).**— या मालिकेत राज्यातील पूर्वीच्या सर्व म्हणजे २६ जिल्ह्यांपैकी २५ जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक गॅझेटिअर ग्रंथ व बृहन्मुंबईसाठी तीन गॅझेटिअर ग्रंथ असे एकूण २८ ग्रंथ इंग्रजीतून प्रकाशित करण्यात आलेले आहेत.

**(२) जिल्हा गॅझेटिअर ग्रंथ (मराठी).**— या मालिकेत राज्यातील एकूण ३५ जिल्ह्यांसाठी ३५ जिल्हा गॅझेटिअर ग्रंथ मराठीतून प्रकाशित करण्यात येत आहेत. साधारणतः ११०० ते १३०० पृष्ठांच्या या ग्रंथात नव्या दृष्टीकोनातून सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील स्थित्यंतरे व दूरगामी बदल यांच्या माहितीसोबतच जिल्ह्याची ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी, स्वातंत्र्य आंदोलन, भूगोल, लोक, अर्थव्यवस्था, प्रशासन, नियोजन, सामाजिक सेवा, ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळे या विषयांवर सखोल माहिती देण्यात येते. या योजनेत आतापर्यंत १) परभणी (१९८८), २) वर्धा (१९९२), ३) कोल्हापूर (१९८९), ४) रायगड (१९९३), ५) जळगाव (१९९४), ६) सातारा (१९९९), ७) नागपूर (खंड १ व २) (२००५), ८) लातूर (खंड १ व २) (२००८) या जिल्ह्यांचे गॅझेटिअर ग्रंथ प्रकाशित करण्यात आलेले आहेत.

**३) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (इंग्रजी).**— जिल्हा पातळीपेक्षा राज्य पातळीवर उत्तमरित्या लेखन होऊ शकणाऱ्या विषयांवर या मालिकेंतर्गत इंग्रजीतून ग्रंथ प्रकाशित करण्याची ही योजना आहे. त्या अंतर्गत महाराष्ट्राचा इतिहास, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, महाराष्ट्र : भूमी व लोक, भाषा व वाङमय आणि भूगोल अशा सहा विषयांवर एकूण १० ग्रंथ प्रकाशित करण्यात आलेले आहेत.

तसेच नव्याने प्रकाशित मराठी राज्य गॅझेटिअरची सुधारित इंग्रजी आवृत्ती प्रकाशित करण्याच्या योजनेंतर्गत मराठी 'महाराष्ट्र : भूमी व लोक' गॅझेटिअरची सुधारित इंग्रजी आवृत्ती प्रकाशित करण्यात आलेली आहे.

**४) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (मराठी).**— उपरोक्त इंग्रजी मालिकेतील दहाही ग्रंथांचे मराठी भाषेतून सुधारित माहितीसह रुपांतर करण्याची ही योजना आहे. या योजनेंतर्गत आजपर्यंत १) महाराष्ट्र : भूमि व लोक (१९६६), २) महाराष्ट्र : इतिहास-प्राचिन काळ, खंड १ भाग १ (२००२), ३) महाराष्ट्र : स्थापत्य व कला, खंड १ भाग २ (२००२), ४) औषधी वनस्पती (२००४) व ५) महाराष्ट्रातील वनस्पतीशास्त्र व वनसंपदा (२००६) हे पाच ग्रंथ प्रकाशित करण्यात आले आहेत. तसेच औषधी वनस्पती ग्रंथाची दुसरी आवृत्ती २००६ मध्ये प्रकाशित करण्यात आली.

**५) जुन्या जिल्हा गॅझेटिअर (इंग्रजी) ग्रंथाचे पुनर्मुद्रण.**— ब्रिटिश सरकारने प्रकाशित केलेल्या इंग्रजी भाषेतील जुन्या जिल्हा गॅझेटिअर ग्रंथांना अजूनही संदर्भमूल्य आहे. या मालिकेतील हे ग्रंथ दुर्मिळ व अप्राप्त असल्याने अशा एकूण २० जिल्हा गॅझेटिअर ग्रंथांच्या २६ खंडांचे पुनर्मुद्रण करून त्यांचे प्रकाशन करण्यात आलेले आहे.

**६) सुधारित व पुनर्मुद्रित इंग्रजी जिल्हा गॅझेटिअर ई-बुक आवृत्ती.**— या योजनेखाली सर्व म्हणजे सुधारित इंग्रजी जिल्हा गॅझेटिअर मालिकेतील २८ आणि पुनर्मुद्रित इंग्रजी जिल्हा गॅझेटिअर मालिकेतील २६ गॅझेटिअर ग्रंथांच्या ई-बुक आवृत्त्या बनविण्यात आल्या असून शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

अनुक्रमणिका

**७) मराठी जिल्हा गॅझेटिअर ई-बुक आवृत्ती.**— या योजनेखाली १) नागपूर, २) लातूर, ३) सातारा, ४) रायगड, ५) परभणी जिल्हा गॅझेटिअर ग्रंथाची ई-बुक आवृत्ती बनविण्यात आली असून शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे.

**८) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (इंग्रजी) ई-बुक आवृत्ती.**— या योजनेखाली सहा राज्य गॅझेटिअर ग्रंथाची ई-बुक आवृत्या बनवण्यात आली असून शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिली आहे.

**९) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (मराठी) ई-बुक आवृत्ती.**— या योजनेखाली पाच राज्य गॅझेटिअर (मराठी) ग्रंथांच्या ई-बुक आवृत्ती बनवण्यात आली असून शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिलेली आहे.

**१०) भारतीय स्वातंत्र्य आंदोलन इतिहास आधार साहित्याचे प्रकाशन.**— या योजनेखाली स्वातंत्र्य आंदोलनासंबंधीचे दस्तऐवज, अभिलेख व इतर महत्त्वाची कागदपत्रे इंग्रजीतून प्रकाशित करण्याचे काम केले जाते. २१ खंडामध्ये एकूण १४ ग्रंथ प्रकाशित करण्याची ही योजना आहे. आतापर्यंत ग्रंथ क्र. १ ते १२ चे एकूण १९ खंड प्रकाशित करण्यात आलेले आहेत. तसेच ह्या ग्रंथांच्या ई-बुक आवृत्ती प्रकाशित करण्यात आल्या असून शासनाच्या संकेतस्थळावर उपलबध करून दिल्या आहेत.

अनुक्रमणिका

## दर्शनिका विभाग प्रकाशने

### * जिल्हा गॅझेटिअर

(अ) ब्रिटिशकालीन ग्रंथांचे पुनर्मुद्रण

बॉम्बे प्रेसिडेन्सि गॅझेटिअर
१७ ग्रंथ
(१९७७-२००३)
(मूळ १८८०-१९०९)

सेंट्रल प्रोव्हिन्सेस ॲण्ड वेरार गॅझेटिअर
८ ग्रंथ
(१९७९-२००५)
(मूळ १९०६-१९११)

गॅझेटिअर ऑफ दि निझाम डोमिनियन्स
१ ग्रंथ
(२००६)
(मूळ १८८४)

(अ) सुधारित इंग्रजी जिल्हा गॅझेटिअर

२८ ग्रंथ
(१९५४-१९८७)

जिल्हा पुरवणी ग्रंथ
१० ग्रंथ
(१९७८-१९८९)

(क) सुधारित मराठी जिल्हा गॅझेटिअर

८ ग्रंथ
(१९८८ प्रथम गॅझेटिअर)
सध्या चालू असलेली योजना

अनुक्रमणिका

* राज्य गॅझेटिअर

इंग्रजी राज्य गॅझेटिअर

११ ग्रंथ

(१९५३-१९८७)

मराठी राज्य गॅझेटिअर

५ ग्रंथ

(१९९६-प्रथम गॅझेटिअर सध्या चालू असलेली योजना)

सोर्स मटेरिअल फॉर दि हिस्टरी ऑफ फ्रिडम मुव्हमेंट

१२ ग्रंथ (१९ खंड)

(१९५७-१९९५)

स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश

६ ग्रंथ

(१९७०-१९८०)

महात्मा गांधी संकलित वाङ्मय

६१ खंड

ई-बुक आवृत्ती

पूर्व प्रकाशित ७५ ग्रंथांचे ई-बुक

(२००६-२००७)

अनुक्रमणिका

## दर्शनिका प्रकाशने

**वर्ष २००९-१०**

(१) स्थापत्य व कला (द्वितीय आवृत्ती)
(२) ई-बुक-सातारा जिल्हा गॅझेटिअर (मराठी)
(३) ई-बुक-रायगड जिल्हा गॅझेटिअर (मराठी)

**वर्ष २००८-०९**

(१) लातूर जिल्हा गॅझेटिअर
(२) ई-बुक लातूर जिल्हा गॅझेटिअर (मराठी)
(३) ई-बुक गॅझेटिअर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सि (व्हॉल्युम १ पार्ट-२)
(४) ई-बुक बृहन्मुंबई डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर (पार्ट-१ ते ३) (सुधारित आवृत्ती)

**वर्ष २००७-०८**

(१) राज्य गॅझेटिअर-वनस्पतीशास्त्र व वनसंपदा (मराठी)
(२) ई-बुक जिल्हा गॅझेटिअर-सुधारित (१७)

(१) कोल्हापूर, (२) जळगाव, (३) रत्नागिरी, (४) सातारा, (५) कुलाबा, (६) अमरावती, (७) सांगली, (८) चंद्रपूर, (९) धुळे, (१०) वर्धा, (११) यवतमाळ, (१२) बुलढाणा, (१३) अहमदनगर, (१४) सोलापूर, (१५) अकोला, (१६) भंडारा, (१७) ठाणे.

(३) ई-बुक-पुनर्मुद्रित जिल्हा गॅझेटिअर-इंग्रजी (२०)

(१) बृहन्मुंबई भाग-१ ते ३, (२) रत्नागिरी ॲण्ड सावंतवाडी, (३) खानदेश, (४) नाशिक, (५) ठाणे (भाग-१ ते ३), (६) कुलाबा, (७) सातारा, (८) सोलापूर, (९) पुणे (भाग-१ ते ३), (१०) कोल्हापूर, (११) अहमदनगर, (१२) वर्धा, (१३) यवतमाळ, (१४) बुलढाणा, (१५) अकोला, (१६) अमरावती, (१७) नागपूर, (१८) भंडारा, (१९) चांदा, (२०) औरंगाबाद.

(४) ई-बुक-इंग्रजी जिल्हा गॅझेटिअर (६)

(१) हिस्टरी पार्ट-१ एन्शंट पिरिअड, (२) हिस्टरी पार्ट-२ : मेडिवल पिरिअड, (३) महाराष्ट्र लॅण्ड ॲण्ड इटस् पिपल, (४) लॅंग्वेज ॲण्ड लिटरेचर, (५) बॉटनी (पार्ट-१) मेडिसिनल प्लॅन्टस, (६) हिस्टरी पार्ट-३ : मराठा पिरिअड.

अनुक्रमणिका

(५) ई-बुक-मराठी राज्य गॅझेटिअर (५)

(१) महाराष्ट्र-भूमि व लोक, (२) इतिहास : प्राचीन काळ (खंड १, भाग-१), (३) स्थापत्य व कला (खंड १, भाग-२), (४) औषधी वनस्पती, (५) वनस्पतीशास्त्र व वनसंपदा.

**वर्ष २००६-०७**

(१) पुनर्मद्रित जिल्हा गॅझेटिअर—औरंगाबाद
(२) ई-बुक—(१) उस्मानाबाद, (२) परभणी, (३) बीड सुधारित जिल्हा गॅझेटिअर
(३) ई-बुक—नागपूर जिल्हा गॅझेटिअर—मराठी.

**वर्ष २००५-०६**

(१) पुनर्मुद्रित जिल्हा गॅझेटिअर—चंद्रपूर (चांदा)
(२) मराठी राज्य गॅझेटिअर—औषधी वनस्पती
(३) मराठी जिल्हा गॅझेटिअर—नागपूर (भाग १ व २)
(४) ई-बुक-नागपूर जिल्हा गॅझेटिअर—मराठी.

अनुक्रमणिका

| **महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर्स (मराठी)** | **वर्ष** |
|---|---|
| (१) महाराष्ट्र : भूमि व लोक | १९९६ |
| (२) महाराष्ट्र : इतिहास : प्राचीन काळ, खंड १ भाग—१ | २००२ |
| (३) महाराष्ट्र : स्थापत्य व कला खंड १ भाग—२ | २००२ |
| (४) औषधी वनस्पती | २००४ |
| **पुनर्मुद्रित जिल्हा गॅझेटिअर्स** | |
| (१) पुणे डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर पार्ट—२ (१८८५) | १९९२ |
| (२) पुणे डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर पार्ट—३ (१८८५) | १९९२ |
| (३) नाशिक डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर (१८८३) | १९९४ |
| (४) रत्नागिरी ॲण्ड सावंतवाडी डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर (१८८०) | १९९४ |
| (५) सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर (१८८४) | १९९७ |
| (६) कोल्हापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर (१८८६) | १९९९ |
| (७) ठाणा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर भाग—३ (१८८२) | २००० |
| (८) अहमदनगर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर (१८८४) | २००३ |
| (९) अकोला डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर (१९१०) | १९९८ |
| (१०) अमरावती डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर (१९११) | १९९८ |
| (११) भंडारा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर (१९०८) | २००३ |
| (१२) चांदा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर | २००५ |
| **जिल्हा गॅझेटिअर्स (मराठी)** | |
| (१) वर्धा जिल्हा गॅझेटिअर | १९९२ |
| (२) रायगड जिल्हा गॅझेटिअर | १९९३ |
| (३) जळगाव जिल्हा गॅझेटिअर | १९९४ |
| (४) सातारा जिल्हा गॅझेटिअर | १९९९ |
| **सोर्स मटेरिअल फॉर दि हिस्टरी ऑफ फ्रिडम मुव्हमेंट** | |
| (१) व्हॉल्युम-११, सिव्हिल डिसओबेडियन्स मुव्हमेंट (एप्रिल ते सप्टेंबर १९३०) | १९९० |
| (२) व्हॉल्युम-१२, सिव्हिल डिसओबेडियन्स मुव्हमेंट (ऑक्टोबर १९३०-डिसेंबर १९४१). | १९९५ |

# पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

**पुराभिलेख संचालनालयातील कामे/योजना पुढीलप्रमाणे आहेत :—**

(१) राज्य सरकारच्या अभिलेखांचे व्यवस्थापन व जतन.

(२) सशोधन, मंत्रालयीन विभाग व इतर व्यक्ती यांना त्यांच्या मागणी प्रपत्रानुसार अभिलेख उपलब्ध करून देणे आणि त्या अभिलेखांच्या प्रती देणे.

(३) अभिलेख संदर्भसाधने तयार करणे (अभिलेखांचे सर्वेक्षण, संपादन व प्रकाशन इ.).

(४) जुन्या अभिलेखांचे आणि मागितलेल्या प्रकरणांचे संशोधन करणे.

(५) अभिलेख संदर्भसाधने व अभिलेखांचे सूचीकरण करणे आणि महत्त्वाचे अभिलेख प्रकाशित करणे.

(६) खाजगी अभिलेख जे ऐतिहासिक महत्त्वाचे असतील त्याचे देणगी दाखल अथवा खरेदी करून संपादन करणे.

(७) जिल्हा व तालुका पातळीवर शासकीय व निमशासकीय अभिलेखाची पाहणी करणे व त्याचे मूल्यांकन करणे.

(८) मंत्रालयीन विभाग आणि अन्य कार्यालयामधील अभिलेखपालांसाठी आणि इतर कर्मचाऱ्यांकरिता पुराभिलेख प्रशिक्षण आयोजित करणे.

(९) संशोधक व इतर व्यक्ती यांना शासन राजपत्रांच्या प्रमाणित प्रती देणे.

(१०) प्रदर्शनाद्वारे अभिलेखांचे महत्त्व प्रस्थापित करणे.

(११) महत्त्वाच्या अभिलेखांचे सुक्ष्मचित्रिकरण करणे.

(१२) मोडीलीपी प्रशिक्षण आयोजित करणे.

(१३) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी करणे.

(१४) अभिलेखाचे सुक्ष्मचित्रिकरण डिजिटलायझेशन (सिडीरोम) तयार करणे.

अनुक्रमणिका

**अभिलेख**

पुराभिलेख संचालनालयात सन १६३० पासून ते आजतागायत पर्यंतचे अभिलेख जतन करून ठेवण्यात आले आहेत. मुंबई पुरालेखागारात ब्रिटीश काळापासून ते सन २००५ पर्यंतचे अभिलेख दाखल आहेत तर पुणे पुरालेखागार येथे पेशवेकालीन तसेच ब्रिटीशकालीन कोल्हापूर येथे शाहू दप्तर आहे आणि अलिकडे निर्माण करणायत आलेला मराठवाडा येथे निजाम काळातील दप्तर व नागपूर येथे स्थानिक अभिलेख दाखल आहेत. भावी पिढ्यांना उपयोगासाठी व मानव विकासाच्या अभ्यासासाठी अभिलेख जतन करणे आवश्यक आहे. सरकारी व खाजगी असे अभिलेखांचे दोन प्रकार आहेत. या अभिलेखात मराठेकालीन ग्रामीण अर्थव्यवस्था, सत्ता, स्पर्धा, लष्करी हालचाली, दळणवळण, पाणीपुरवठा, बंदरांची सुधारणा, शिक्षण, स्वच्छता, साफसफाई, इत्यादी विषयासंबंधी माहिती मिळते. पुराभिलेख संचालनालयाचे मुख्य काम म्हणजे जुने अभिलेख संपादन करणे, त्याचे संरक्षण करणे आणि ते शासकीय कामासाठी शासनास व इतिहास संशोधकांना उपलब्ध करून देणे.

**अभिलेखांचे जतन व व्यवस्थापन**

अभिलेखांच्या बहुउद्देशासाठी त्यांचे योग्य जतन आणि व्यवस्थापन करणे. जेणेकरून ते अधिक काळ उपयोगात राहतील ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यांच्यावरील धुळ झटकणे, त्याचे उंदीर, मुंग्या, वाळवी यांचेपासून संरक्षण करणे यासाठी अभिलेख पोलादी मांडण्यांवर व्यवस्थित ठेवण्यात आले आहेत. या पोलादी मांडण्यांवर नॉर्थ्थलिन विटा ठेवल्या जातात व ते पॅरॉडाय क्लोरोबेंन्झांईन धूमीकरण करून स्वच्छ केले जातात. महिन्यातून दोन वेळा किटक नियंत्रण द्रव्यांचा फवारा अभिलेख कक्षात मारला जातो. अभिलेखांवरील धूळ काढण्याचे काम हाताने तसेच यांत्रिक पद्धतीने केले जाते.

मुंबई पुरालेखागारात निरनिराळ्या प्रकारचे अभिलेख आहेत. डायरीज, व्हॉल्यूम्स, फाईली व छापील पुस्तके अठरा फूट उंचीच्या लोखंडी मांडण्यांवर ठेवण्यात आली आहेत. साधारण उंचीवर असलेले अभिलेख एका अभिलेख वाहकाच्या मदतीने सहज काढता येतात. परंतु जास्त उंचीवर असलेले अभिलेख तीन अभिलेख वाहकांच्या मदतीने काढणे आवश्यक असते. फाईल्स या जाड खोक्याच्या पेटीत ठेवण्यात येतात. अशा तऱ्हेच्या एका पेटीत सहा-सात फाईल्स राहतात. अशा प्रकारची पद्धत पुणे व कोल्हापूर पुरालेखागारात प्रचलित आहे. अभिलेखांवरील धूळ झटकणे व ते धुमाऱ्याच्या कक्षात ठेवणे ही पद्धत सर्व पुरालेखागारातून सारखीच आहे.

आता या संचालनालयात संगणक कक्षाची निर्मिती करण्यात आलेली आहे. शासनाच्या आदेशानुसार या संचालनालयातील जुने, दुर्मिळ अभिलेख स्कॅनिंगद्वारे सी.डी.रोमवर घेण्याचे काम सुरू आहे. या संचालनालयात ए-३ साईजचा स्कॅनर कार्यरत असून त्यावर संशोधकांचे काम स्कॅन करून देण्यात येते. या संचालनालयात ए-२ साईजचा एक स्कॅनर व ए-३ साईजचे दोन व ए-४ साईजचे दोन स्कॅनर घेण्यात आलेले आहेत. त्यापैकी ए-३ साईजचा एक स्कॅनर व ए-४ साईजचा एक स्कॅनर पुणे पुरालेखागार कार्यालयात देण्यात आलेले आहेत. पुणे कार्यालयातही अभिलेख सी.डी. रोमवर घेण्याचे काम सुरू आहे. ह्या पृष्ठांचे त्याचवेळेस (online) इंडेक्सिंग व कॅटलॉगिंग करण्याचे कामही सुरू आहे.

अनुक्रमणिका

**कार्यालये**

पुराभिलेख संचालनालयाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे संचालक, पुराभिलेख संचालनालय यांचे नियंत्रणाखाली असून त्यांची पुणे, कोल्हापूर, नागपूर व औरंगाबाद येथे विभागीय कार्यालये आहेत.

**संचालक, पुराभिलेख संचालनालय व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांच्या आस्थापनाविषयी माहितीचा संक्षिप्त तक्ता.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मुंबई पुरालेखागार, मुंबई एलफिन्स्टन महाविद्यालय, एम. जी. रोड, मुंबई ४०० ०३२, फोन नं. २२८४३९७१ | पुणे पुरालेखागार, पुणे कौन्सिल हॉलसमोर पुणे ४११००१ फोन नं. ०२०-२६१२७३०७ | कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर हूजूर रेकॉर्ड इमारत, टाऊन हॉलसमोर, कोल्हापूर ४१६००२, फोन नं. ०२३१-२६४४३९४ | मराठवाडा पुरालेखागार, औरंगाबाद एन-८, सिडको, बजरंग चौक, सिडको, औरंगाबाद ४३१००३, फोन नं. ०२४०-२४८२१९३ | विदर्भ पुरालेखागार, नागपूर कक्ष क्र. ३०, जुने सचिवालय इमारत, जीपीओ समोर, सिव्हील लाईन, नागपूर ४४०००१, फोन नं. ०७१२-२५४३४५४ |

अनुक्रमणिका

# राज्य मराठी विकास संस्था

मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्याच्या हेतुने महाराष्ट्र शासनाने दिनांक १ मे १९९२ रोजी 'राज्य मराठी विकास संस्थेची' स्थापना केली. 'संस्था नोंदणी अधिनियम १९६०' आणि 'मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५०' याअन्वये दिनांक २ जानेवारी १९९३ रोजी संस्थेची धर्मादाय आयुक्तांकडे स्वायत्त संस्था म्हणून नोंदणी झाली. सर्व कायदेशीर बाबी पूर्ण झाल्यावर दिनांक १ मार्च १९९३ पासून म्हणजे स्थापनेनंतर जवळजवळ दहा महिन्यांनी संस्थेच्या कामकाजास प्रत्यक्ष सुरुवात झाली.

विविध क्षेत्रांत होणारा मराठीचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा यासाठी प्रयत्नशील राहावे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करावी ही या संस्थेच्या स्थापनेमागील दोन मुख्य उद्दिष्टे आहेत. त्यानुसार सर्व स्तरांवर मराठीचा विकास साधण्यासाठी संस्था स्वतंत्रपणे उपक्रम हाती घेते. भाषा व संस्कृतीच्या क्षेत्रात मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय संस्थांमध्ये समन्वय राखून त्या संस्थांच्या साहाय्यानेही काही उपक्रम संस्था पार पाडते.

संस्थेचे कामकाज तिच्या नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार चालते. संस्थेचे कार्यक्रम/उपक्रम/प्रकल्प यांचे अग्रक्रम ठरवण्यासाठी नियामक मंडळाच्या सदस्यांमधून निर्माण केलेली एक उपक्रम समिती असते. आर्थिक बाबी विचारात घेण्यासाठी नियामक मंडळाच्या सदस्यांमधून निर्माण केलेली एक वित्त समिती असते आणि संस्थेचे आर्थिक प्रशासकीय व कायदेविषयक नियोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी तसेच संस्थेच्या विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी नियामक मंडळाचे सदस्य अंतर्भूत असलेली एक कार्यकारी समिती नेमण्यात येते. संस्थेच्या विविध कार्यासाठी या कार्यकारी समितीची मंजुरी आवश्यक असते. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री हे संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत आणि शालेय शिक्षणमंत्री संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष आहेत. संस्थेने आपल्या उद्दिष्टांना अनुसरून १४ वर्षांत चर्चासत्रे, सर्वेक्षणे, कार्यशाळा, दृकश्राव्य कार्यक्रम, विविध प्रकल्पांतर्गत संशोधन करून शैक्षणिक व भाषाविषयक पुस्तके प्रकाशित करणे, कोशनिर्मिती करणे तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर प्रभाव असणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि विचारधारा यांवर आधारित 'महाराष्ट्राची जडणघडण' ही ग्रंथमालिका इत्यादी अनेक प्रकल्प पार पाडलेले आहेत. संगणकाच्या मराठी कळफलकाच्या एकरूपतेसाठी वर्णमाला निश्चितीचे काम संस्थेने पार पाडलेले आहे.

मराठी भाषेच्या विकासासाठी संस्थेने आजवर अनेक उपक्रम हाती घेऊन पूर्ण केले. सध्या दलित-ग्रामीण शब्दकोशाच्या प्रकल्पावर काम चालू आहे व दलित ग्रामीण क्षेत्रातील नामवंत साहित्यिकांचा या प्रकल्पामध्ये सहभाग आहे. नामवंत दलित साहित्यिक डॉ. नामवंत पानतावणे हे या प्रकल्पाचे प्रमुख संपादक म्हणून काम करीत आहेत.

महाराष्ट्रामध्ये वस्त्रोद्योग मोठ्या प्रमाणात आहे. त्या वस्त्रोद्योगाबद्दलचा परिपूर्ण माहितीकोश सिद्ध करण्याचे कामही चालू आहे. या कोशाचे दोन खंड आजवर प्रसिद्ध झाले असून तिसरा खंड मुद्रणालयाकडे पाठवला जात आहे. एकूण सात खंडामध्ये हा प्रकल्प पूर्ण होईल. इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम वस्त्रोद्योग संस्थेचे सहकार्य या प्रकल्पासाठी घेण्यात आलेले आहे. टेक्सटाईल इंडस्ट्रीमधील तज्ज्ञ मंडळी या माहितीकोशाचे लेखन व संपादन करीत आहेत.

अनुक्रमणिका

महाराष्ट्रातील प्रकाशित ग्रंथांची २००० ते २०१० दरम्यानच्या कालावधीतील अद्ययावत व परिपूर्ण सूची तयार करण्याचे काम संस्थेने हाती घेतले आहे व हे कामही लवकरच पूर्ण होईल. त्याशिवाय राष्ट्रीय शिक्षण संशोधन प्रशिक्षण परिषद, दिल्लीमार्फत इंग्रजीमधील प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचे मराठी भाषांतर करण्याचा उपक्रम चालू आहे. ही पुस्तके शालेय, माध्यमिक अभ्यासक्रमासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

—————————————————

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**

**अनुक्रमणिका**

महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई